म. ग्र. सं. ठाणे
विषय बिबंध
सं. नं. ९१०

REFBK-0007903

सं. नि. ९१०



मराठीचा परिमल

खंड २ रा

[समग्र मराठी वाङ्मयाचें सोदाहरण विवेचन]



लेखक
दा. न. शिखरे,
एम्. ए.



REFBK-0007903

मूल्य ६ रुपये

प्रकाशक :
न. शं. कुलकर्णी, एस्. टी. सी., टी. डी.
दि टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाउस लि.,
७७ शनिवार पेठ, पुणें २ करितां.



आवृत्ति पहिली : १९५३
मुखपृष्ठ चित्रकार–दीनानाथ दलाल
अंतर्गत चित्रकार–जि. भि. दीक्षित



मुद्रक :
य. गो. जोशी, बी. ए. (ऑ.)
आनंद मुद्रणालय,
१९६।४६ सदाशिव, पुणें २.

लेखकाचें समालोचन



" I bring fresh showers for the thirsty flowers
From the seas and the streams." —Shelley

लहान मोठें, उणें–पुरें, भलें–बुरें जें जसें योजलें, तें तसें तडीस गेलें, याचें समाधान आज मला लाभत आहे. फुललेल्या फुलांनीं भरगच्च भरलेली हातांतील परडी पाहून एकाद्या भक्ताला जितकें समाधान मिळतें, तितकेंच हें माझें समाधान आहे. हातांत परडी घेऊन, बागेच्या दाराशीं उभें राहून, तो संतृप्त भक्त जेव्हां मागें वळून पहातो, तेव्हां त्याला बागेच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सुंदर व सुगंधी फुलेंच फुलें वृक्ष-वेलीवर डोलत असलेलीं दिसतात; तेव्हां त्याचें संतुष्ट झालेलेंहि मन म्हणतें, " अरे, तूं किती फुलें तोडणार ? त्याच्या किती तर पट फुलें तोडावयाचीं शिल्लक राहिलेलींच आहेत ना ? " पण तो अल्पसंतुष्ट भक्त आपल्या महत्त्वाकांक्षी मनाची अशी समजूत घालतो कीं, " जशी माझी शक्ति, तशीं माझीं भक्तीचीं साधनें; पण माझ्या भक्तीची शुद्धि व गाढ भावना देव जाणेलच जाणेल. " या विश्वासानेंच मी माझें हें वाङ्मय–पुष्प महा-राष्ट्र–शारदेच्या चरणीं अर्पण करीत आहें.

या ग्रंथाचे दोन खंड आहेत व ते सुमारें बाराशें पृष्ठांत सामावले आहेत. पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंतच मीं सत्यार्थानें म्हटलें होतें कीं, ' मूळ समग्र ग्रंथाचा आस्वाद घेण्याची प्रवृत्ति वाचकवर्गामध्यें निर्माण करणें एवढेंच या ' परिमला ' चें कार्य. ' तें पूर्णपणें पार पडतें असा निःपक्षपाती निर्वाळा अनेक वाचकांनीं मला लिहून कळविला, याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. उलट, कांहीं विदग्ध टीकाकारांनीं या ग्रंथांत शास्त्रीय मीमांसा, संशोधन वगैरे नसल्याबद्दल खेद प्रदर्शित केला. त्यांचा आक्षेप सत्यपूर्णच आहे. फक्त त्यांचा एक गैरसमज झालेला आहे. मी पहिल्या खंडांतच खरेपणानें असें स्वच्छ म्हटलें आहे कीं, "माझी भूमिका ना चिकित्सक संशोधकाची, ना विद्वान टीकाकाराची; तर केवळ नम्र वाटाड्याची." सप्त समुद्रांचें व शत सरितांचें पाणी वाहून नेणाऱ्या मेघाचींच कामगिरी माझी.

ही माझी भाषा टीकाकारांना विनयाची वाटली असावी आणि म्हणून त्यांनीं अपेक्षा मोठी ठेवली व ती भंग पावल्याबद्दल हळहळ वाटून घेतली. पण मला जें व जेवढें म्हणावयाचें आहे, तेवढेंच मीं लिहिलें आहे. मी म्हणतों ही माझी पणती आहे, तरी आक्षेपक विचारतात, विद्युद्दीपाचा झगझगीत प्रकाश हिच्यांत कोठें आहे ? एकादा गरीब शेतकरी शहरीं पाहुण्याला अदबीनें सांगतो, ' ही माझी झोपडी अन् ती माझी विहीर. ' पण पाहुणा त्याला हटकतो, " आमच्या मुंबईसारखी सात-

मजली बंगली तुझी कोठें आहे ? तिला गच्ची नाहीं, सज्जा नाहीं, तबेला नाहीं. आणि त्या विहिरींत आमच्या समुद्रासारख्या लाटा कोठें उसळत आहेत आणि त्यांचा मोत्यासारखा फेस कोठें चमकत आहे ? " ग्रंथकाराची जी भूमिका असेल, ती ओळखून ग्रंथाकडे पहाणें न्यायाचें व रसिकतेचें नव्हे काय ?

प्रस्तुतच्या द्वितीय खंडांत दहा नाटककार, दहा आधुनिक कवि, पांच लघुकथाकार, पांच लघुनिबंधकार व पांच विनोदकार—अशा पस्तीस साहित्य-सेवकांच्या वाङ्मयाचा साधार परिचय करून देण्याचा प्रयत्न मीं केलेला आहे. दोन्ही खंडांत मिळून साठ वाग्भटांच्या साहित्याचा परिमळ सांठविलेला आहे. त्यामुळें मराठी भाषेचा विस्तार व विविधता, तिची माधुरी व महती, तिचा स्वभाव व ध्येय—या सर्वांची तोंडओळख वाचकांना यथार्थपणें होईल असा विश्वास मला वाटतो. हें साधार व सविकल्प ज्ञान मिळविलेल्या वाचकानें, यांत समाविष्ट न झालेल्या लेखकांचेंहि वाङ्मय कसें आहे तें पहाण्यासाठीं तिकडे वळावें अशी माझी नम्र सूचना आहे. आणि मराठी साहित्याची गोडीच अशी आहे कीं, तिच्या एका थेंबाचीहि चव ज्यानें चाखली, त्याला सर्वच वाङ्मयाचा आस्वाद घेण्याची इच्छा झाल्याविना रहाणार नाहीं.

माणसाच्या मनाचें प्रतिबिंब त्याच्या भाषा-शैलींत पडतें म्हणतात. सह्याद्रीचा कणखरपणा महाराष्ट्राच्या अंगीं आहे आणि तसाच तो मराठी साहित्यांत पुरेपूर उतरलेला दिसतो.

राजकारणांत श्रीशिवाजीमहाराजांनीं किंवा धर्मकारणांत श्री ज्ञानेश्वरमहाराजांनीं जशी बंडखोरी केली, तसाच बंडाचा झेंडा साहित्याच्या क्षेत्रांत तेजस्वी व सामर्थ्यवान लेखकांनीं व कवींनीं उभारला आहे. मराठीचा पिंडच मुळीं स्वतंत्र बाण्याचा आहे. ज्ञानेशापासून मयूरेशापर्यंत संस्कृतविरुद्ध बंड पुकारल्याची प्रौढी मराठी कवि गात आहेत. मालाकार चिपळूणकरांपासून साने-गुरुजींपर्यंत अनेकानेक लेखकांनीं राजकीय क्रांतीचा जयजयकार केला आहे. राजकारणाच्या रणांगणावर प्रत्यक्ष झुंजणारे लो. टिळक, प्रा. परांजपे, बॅ. सावरकर इत्यादि वीर-पुरुष हातांत लेखणी घेऊन पुढें आल्यामुळें त्यांचें सारेंच साहित्य जिवंत व रसरशीत निघालें आहे. संतकाव्य हें जसें मराठी साहित्याचें उत्तमांग, तसेंच हें स्वातंत्र्य—पोषक राष्ट्रीय वाङ्मय हृदय आहे. पंधराव्या वर्षीं ज्ञानदेवी प्रगटविणारे ज्ञानेश्वर जसे अन्य साहित्यांत दुर्मिळ, तसेच पंधराव्या वर्षीं चाफेकरांचा पोवाडा रचणारे सावरकरहि. राजकारणी नेत्यांच्या स्वातंत्र्यप्रेरक निबंधांचें मराठींतील हें धन भाषा—भगिनींना हेवा वाटण्याइतकें बहुमोलाचें आहे. राजकीय पारतंत्र्याविरुद्ध बंडाचें निशाण उभें करण्यांत महाराष्ट्र शारदेनें महनीय कामगिरी बजावली आहे.

सामाजिक क्रांतीची तुतारी फुंकण्यांताहि मराठी कलम-बहादर आघाडीवर आहेत. समाजांतील उच्चनीचभाव, विवाहांतील विषमता, केशवपनासारख्या क्रूर रूढि—इत्यादि सामाजिक अन्यायाशीं झगडा करणारे लेखक व कवि मराठींत अनेक

झाले. हरिभाऊ आपटे यांच्यापासून विभावरी शिरूरकरापर्यंत ललित लेखकांनीं सामाजिक क्रांतीचा रथ पुढें नेण्यास जितकें साहाय्य केलें, तितकेंच केशवसुतांपासून कुसुमाग्रजांपर्यंतच्या कविश्रेष्ठांनींहि केलें आहे. नाटकें हीं केवळ रंजनार्थ असतात ना ? पण खरे–खाडिलकरांनीं आपलीं नाटकें म्हणजे स्वातंत्र्य-युद्धांतील तोफाच ठरविल्या. कोल्हटकर, गडकरी वगैरे नाटक-कारांनींहि त्यापल्या नाटकांतून सामाजिक क्रांतीचा रण–घोष केला. आर्थिक क्रांतीची ललकारीहि अनंत काणेकरप्रभृतींच्या लेखाकवितांतून ऐकूं येते. साम्यवादाचा सखोल अभ्यास केलेले आणि दलित समाजाच्या साक्षात् जीवनाशीं समरस झालेले असे साहित्यिक यापुढें मराठींत निर्माण होतील आणि महाराष्ट्राच्या सर्वांगीण क्रांतीचें कार्य सिद्धीस नेण्यास साहाय्यभूत ठरतील अशीं चिन्हें दिसत आहेत.

तार्किकता व रसिकता यांचा संगम मराठी वाङ्मयामध्यें आढळतो. प्रखर विचार व कोमल भावना यांचें मीलन मराठी लेखा–कवितांमधून दिसतें. श्रीसमर्थ रामदासांनीं प्रबोधावर भर देऊन जो प्रवृत्तिधर्म उपदेशिला, तो आजपर्यंतच्या मराठी लेखकांनीं आपल्या कृतींतून खेळविला आहे. रे. टिळकांचे 'वनवासी फूलां' तून या प्रवृत्तिवादाचाच सुगंध दरवळत आहे. अलीकडील लेखाकाव्यांचा वास्तवता हा तर प्राणच बनत चालला आहे. कृत्रिम भाषा व स्वप्नाळु भावना यांना आतां थाराच मिळत नाहीं. मनांतील भल्याबुऱ्या साऱ्या

संज्ञा–प्रवाहांनाहि साहित्याचें स्वरूप निःसंकोचपणें देण्याचीच प्रवृत्ति बळावत आहे. व्यवहाराच्या कठोर भूमिकेवरून, उघड्या डोळ्यांनीं, मराठी लेखकवर्ग आतां बेदरकारपणें चालू लागला आहे त्याच्या अंगीं मूर्ति-भंजनाचा आवेश इतका जोरानें संचरला आहे कीं, त्यामुळें तो पूज्यापूज्यतेचा किंवा इष्टानिष्टतेचा विवेक करण्यासहि थांबत नाहीं. त्याला तळमळ समाजांतील सर्व दुःखांना वाचा फोडण्याची,त्याची उभारी समाजांतील सर्व ढोंगें फोडून टाकण्याची आणि त्याची महत्त्वाकांक्षा सर्व समाजांत समता व स्वतंत्रता यांची स्थापना करण्याची. हा समाज–मनस्कतेचा गुण मराठींतील विनोदी लेखकांमध्येंहि आढळतो. 'विनोदासाठीं विनोद' करण्याइतकें स्वास्थ्य आम्हांला अद्याप लाभलेलें नाहीं. कोल्हटकर–गडकऱ्यांनीं आपलें हास्याचें हत्यारहि समाजाच्या उद्धारासाठींच वापरलें. बुद्धिप्रधान, बंडखोर, वास्तववादी व समाज–हित–तत्पर अशीच वृत्ति बहुतेक प्रमुख मराठी लेखकांची आहे.

मात्र बहुतेक कवि निराशावादी आढळतात. त्यांच्या काव्यांतील जीवन–स्वर निराशा हाच दिसतो. ज्ञानेश्वरासारखे सिद्ध संतकवि सोडले, किंवा तांब्यांसारखे निसर्गांत रंगलेले आधुनिक कवि वगळले, तर थोड्याफार प्रमाणांत प्रत्येक कवि निराशेचीच तार छेडीत बसलेला दिसतो. कांहीं आंग्लकविहि "I Pant, I Sink, I Tremble, I Expire" (मी दमतों–दबतों, झिजतों–झुरतों) असे उसासे सोडून तिसऱ्या पट्टींत

निराशेचा राग घोळूंनघोळून आळवितात. कवि म्हणजे निराश झालेला, निष्क्रिय बनलेला, स्वप्नरंजनांत गुंगलेला, गूढगुंजनांत गढलेला असा एक व्यवहारविन्मुख अपेशी जीव, अशीच कल्पना बहुतेक मराठी कवींच्या चरित्रावरून होते. त्याचें शिक्षण अपुरें, त्याचें गृहसौख्य भंगलेलें, त्याची आर्थिक घडी विस्कटलेली, त्याची शरीर–यष्टि किडलेली आणि म्हणून सत्य–सृष्टींतून त्यानें पळ काढलेला !—आणि मग सहजच त्याच्या तोंडून 'नैराश्यें मज पुरें घेरलें', 'कटु निराशा दाटलेली', 'पेट घेतात असंख्य वणवे आंत' – इत्यादि उसासे निघून, ते अल्पायुषी होऊनच आपली जीवित–यात्रा समाप्त करतात ! दत्त २४ वे वर्षीं तर बालकवि २८ वे वर्षीं दिवंगत झाले आणि गोविंदाग्रज ३४ वे वर्षीं तर केशवसुत ३९ वे वर्षीं निधन पावले. फक्त तांबे, चंद्रशेखर व बी हे तीन कवीच काय ते साठीच्या पुढचें दीर्घायुष्य समाधानानें भोगूं शकले. सावरकर यांचें आयुष्य जसें काल–गणनेंत प्रदीर्घ, तसेंच कर्तृत्वानेंहि प्रकाशमान आहे. म्हणून अन्य कवींचें दैन्य व नैराश्य त्यांच्या गांवींहि नाहीं.

सर्वसामान्य कवि भावनेनें हळवा असतो व जगांतील जें जें दुःख पाहतो, ऐकतो वा कल्पितो, त्यानें त्याचें हळुवार हृदय होरपळून जातें. पण तें दुःख दूर करण्याचें सामर्थ्य त्याच्या ठायीं नसतें. अपार सहानुभूति पण शून्य आचार या विजोड जोडण्याचें अपत्य म्हणजे निराशा. ती त्यांच्या काव्यांत

बागडत असते. पण सावरकरांचें तसें नाहीं. कवीचें संवेदनक्षम नाजूक मन त्यांच्या ठायीं आहे आणि झुंझार नेत्याची कणखर प्रतिकारशाली शक्तिहि त्यांचे अंगीं आहे. ते कर्ते पुढारी आहेत, क्रांतिवादी कार्यकर्ते आहेत, स्वातंत्र्य–संग्रामांतील एक सेनापति आहेत. दिसेल तें दुःख दूर करण्यासाठीं ते प्रत्यक्ष कार्य करतात–आपलें शरीर झिजवितात–आणि त्यामुळें त्यांच्या मनांत वा लेखनांत निराशा नसते. अंगीकृत कार्यांत अपयश आलें, तरी कर्तव्य केल्याचें समाधान त्यांना लाभलेलें आहे. असे कृतिसंपन्न व म्हणून आशायुक्त कवि किती ? 'खाणारे आम्ही मोती, राजहंस भूमीवरतीं ' अशी कल्पनारम्य प्रौढी बालकवि गातात, पण सत्यसृष्टीचा विचार करतांच 'देह–चिंतनीं जीव जाळुनी हा कुठवर घ्यावा ? ' असें ते विचारतात. देह–यात्रा नीट पार पाडतां न आली म्हणजे ' शिणली काया, शिणली माया ' असा थकवा त्यांना येतो आणि ते पृच्छा करतात, " कोठुनि येते मला कळेना । उदासीनता ही हृदयाला. " उलट, वाल्मीकीसारख्या श्रेष्ठ कवीचा क्षणिक शोकहि सर्वांचा चिरंतनचा श्लोक ठरतो.

कविवर्गाच्या स्थायी नैराश्यभावाचें हें व्यक्तिगत कारण सर्वांत प्रमुख होय. त्याशिवाय अन्य व्यापक व तात्त्विक कारणेंहि कांहीं कविश्रेष्ठांच्या बाबतींत असूं शकतील. राष्ट्राचें पारतंत्र्य किंवा देशांतील दुष्काळ अथवा जगांतील महायुद्ध–अशा विश्वकुटुंबांतील आपत्ति या आपल्या स्वतःच्याच मानून त्यांचें

दुःख उराशीं बाळगणें आणि त्या आपत्तींतील दुःखी बांधवांशीं समरस होणें हेंहि कारण संभवतें. या भौतिक आपत्तींप्रमाणेंच मानवामानवांतील वंचना, असूया, असत्य इत्यादि दोष पाहूनहि कवीची मनोव्यथा वाढेल. एक गांधी-हत्या घेतली, तरी ती इतकी क्रूरतम आहे कीं, तिची वार्ता ऐकतांच एखाद्या संवेदन-क्षम कविवराचा सारा भाव—दुर्ग जमीनदोस्त व्हावयाचा किंवा डोकेंच फिरून जावयाचें! गांधी-हत्त्येमुळें दिन—प्रतिदिन अश्रु ढाळणारे, ओक्साबोक्शीं रडणारे, स्वतःचें सारें जीवन शून्यवत् झालें असें वाटून वेड्यासारखे वागणारे कैक तरुण, कवि नसलेल्या पण श्रद्धाशील वर्गांतून निघाले; तर मग खऱ्या कवीचें कोमल हृदय किती काळ पाझरत असेल? त्याचें आंतडें किती तुटत असेल?

कोणताहि तल्लख माणूस तारुण्यांत अफाट महत्त्वाकांक्षा धारण करतो आणि त्या महत्त्वाकांक्षेची वावडी कल्पनेच्या दोऱ्यानें आकाशांत उंच उंच उडवितो. पण परिस्थितीच्या उलट-सुलट वाऱ्यानें ती वावडी जेव्हां गोते खाते आणि जमिनीवर आदळते, तेव्हां त्याच्या मनावर निराशेचा जबरदस्त तडाखा बसतो. पुढें पुढें त्याला अनुभवांतीं असें पटतें कीं, या जगांत अपयश येणें हा नियम आहे व सिद्धि पावणें हा अपवाद आहे. आपल्या महत्त्वाकांक्षेच्या मानानें आपली शक्ति अत्यंत मर्यादित आहे आणि तिला नामोहरम करणाऱ्या शक्ति जगांत अनेक आहेत. त्या सर्वांची बेरीज—वजाबाकी होऊन यशाचा जो लहानसा कण हातीं येईल तोच मोठा मानला पाहिजे. अशी वास्तववादी

दृष्टि प्राप्त झाल्यावर कवीचें मन समाधानपूर्ण व समतोल बनतें.

भावना जितकी प्रचंड तितकाच विचार प्रबळ; असा समतोल कवि सहसा सांपडत नाहीं. लो टिळकांसारखा एकादाच कर्मयोगी नेता तसा असावयाचा. आपल्या हृदय-मंदिराला अढळ तत्त्वज्ञानाचा पाया घालणें हें किती जणांना साध्य होतें ? शिवाय नैराश्यवाद हेंहि एक तत्त्वज्ञानच आहे ना ? जगांत 'दुःख पर्वताएवढें' आहे, तें अपूर्ण आहे, वैषम्य नैर्घृण्यानें काळवंडलेलें आहे, असा निराशावाद कांहीं पाश्चात्य व पौरस्त्य या उभय तत्त्ववेत्त्यांनीं मांडलेला आहे. पण त्या तत्त्वज्ञानाच्या उंच भूमिकेवरून कांहीं आमचे मराठी कवि निराशेचा सूर लावीत नाहींत. त्यांची कल्पना—शक्ति विहरत असते उच्च वातावरणांत व त्यांची दृष्टि खिळलेली असते आकाशांतील नक्षत्रावर, त्यामुळें व्यवहाराच्या उंचसखल भूमीवरून चालतांना कोठें ठेंच लागली कीं ते विव्हळतात. वैयक्तिक दुःखांचा अनुभव व सामाजिक आपत्तींचा कृतिविरहित सहानुभव हींच दोन कारणें बहुतेक सर्व आधुनिक कवींच्या निराशावृत्तीच्या तळाशीं असतात असें मला वाटतें.

जगाचें सत्य ज्ञान होण्यासाठीं त्याच्या अंतरंगांत शिरलें पाहिजे. अनेक भाषा अवगत असलेले, नाना प्रांत अवलोकन केलेले, समाजांतील विविध थरांमध्यें फिरलेले, जीवनांतील भिन्न-भिन्न अनुभव घेतलेले साहित्यिक मराठींत किती ? सावरकर-साने-गुरुजींसारखे अपवाद थोडेच. आपल्या प्रांताबाहेर, नव्हे शहरा-

बाहेरसुद्धां फारसे कधीं जाऊं न शकणारेच लेखक बहुसंख्य. त्यांनीं कल्पनेनेंच सारें जाणावयाचें. स्वातंत्र्य–संग्राम असो किंवा भू-दान–यज्ञ असो, लाल किल्ल्यावर तिरंगी झेंडा चढविण्याचा समारंभ असो अथवा योगींद्र अरविंदांचा निर्वाण-विधि असो, –त्या त्या वेळीं तेथें तेथें प्रत्यक्ष हजर रहाण्याचें भाग्य शेंकडा एका तरी साहित्यिकाच्या नशिबीं असतें काय ? काश्मीरच्या पंचरंगी सरोवराप्रमाणेंच कन्याकुमारीच्या त्रि–सागर-संगमापर्यंतचीं निसर्गाचीं नानाविध दृश्यें किती कवि–लेखकांना प्रत्यक्ष नजरेखालीं घालतां येतात ? आकाशाला भिडणारीं हिमालयाचीं शिखरें आणि खोल दऱ्यांच्या अंतरंगाचा ठाव घेणारे गिरसप्पाचे धबधबे, अशा सृष्टि–सौंदर्याचें साक्षात् दर्शन घेण्याइतकी अनुकूलता एकाद्या काका कालेलकरांनाच प्राप्त झालेली ! बाकीच्यांचें जीवन ठराविक वर्तुळांत संसाराचा घाणा फिरविण्यांतच जातें. मग त्यांच्या विषयांना संकुचितपणाची मर्यादा पडते किंवा त्यांच्या लेखनांत 'तोचतो-पणा' येतो, यांत नवल काय ? त्यांतूनहि ते इतकी सुंदर साहित्य–सृष्टि निर्माण करतात, याचेंच कौतुक केलें पाहिजे. कारण त्यांच्या त्या साहित्याचा अर्थ असा असतो कीं, विपरीत परिस्थितीवरहि मात करण्याइतकी सामर्थ्य–शाली त्यांची प्रतिभा आहे.

खोल तत्त्वज्ञानानें किंवा विशाल अनुभवानें संपन्न व समृद्ध झालेलें जीवन जगण्याची संधिच मराठी साहित्यिकांना फारशी

लाभत नाहीं. ही उणीव भरून काढण्याचा सोपा मार्ग म्हणजे इंग्रजी वाङ्मयाची उसनवारी करणें. जितका पूर्वी संस्कृतचा, तितका आतां इंग्रजीचा उपसा करून मराठीचे मळे भिजविण्याचें कार्य जोरानें चालू आहे. आमच्या लघुकथा घ्या, कीं लघुनिबंध घ्या, कादंबऱ्या घ्या कीं नाटकें घ्या, विनोद घ्या कीं टीका घ्या—बहुतेक सारे इंग्रजी साहित्याचे टिपकागद! इंग्रजी वाङ्मयांत जें आपण काल वाचलें, तेंच उद्यां मराठीमध्यें दिसणार, असा अंदाज चतुरस्र वाचक बांधूं लागला आहे. इतिहासाचार्य राजवाडे, आचार्य जावडेकर, सानेगुरुजी, बॅ. सावरकर यांच्यासारखे स्वतंत्र विचाराचे व स्वयंभू अनुभवाचें वाङ्मय लिहिणारे लेखक मराठींत विरळा! फार काय, नाटक—कादंबरी किंवा लघुकथा—लघुनिबंध अशा आत्मनिष्ठ ललित वाङ्मय-प्रकारांताहि वैशिष्ट्य दर्शविणारे पांचपांच लेखक निवडावयास बसावें, तर अवघी पांचांचीहि संख्या समाधानकारकपणें पूर्ण होत नाहीं! सर्वांत जास्त भरणा कवींचा. पण त्यांचे विषय, भावना, शब्दहि—ठराविकाच्या कुंपणांतच घुटमळणारे. आपल्या आजूबाजूला राजकीय—सामाजिक क्रांत्यांचे महान उत्पात होत असतांना त्याकडे यांपैकीं बहुतेकांची पाठ फिरलेली! स्त्रीवर्गांत जात्या काव्य—प्रवृत्ति अधिक व आतां शिक्षण वाढलेलें; तरी स्त्रियांनीं एकंदर साहित्यांत भर थोडीच घातलेली आहे—मात्र, जी घातली आहे, ती स्वानुभूतीची व मोलाची आहे. यापुढें

स्त्रियांनीं व पुरुषांनींहि " हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडूं " अशी प्रतिज्ञा केली, तर महाराष्ट्र शारदेचें वैभव व सामर्थ्य आपल्याला संतोष व अभिमान वाटण्याइतकें वाढेल यांत शंका नाहीं.

सुमारें साठ साहित्यिकांचें अवतरण या 'परिमलां'त मीं घडविलें आहे. त्यांची निवड करतांना किंवा गुणदोष सांगतांना राजकीय किंवा सामाजिक पक्षाची किंवा मताची छाप माझ्या मनावर मी अणुमात्र पडूं दिलेली नाहीं. कोणत्याहि प्रकारची अढी चित्तांत न बाळगतां, केवळ साहित्याच्या शुद्ध दृष्टीनें व निराग्रही वृत्तीनें मी ही महाराष्ट्र—शारदेची उपासना केलेली आहे. ती करण्याला परिस्थितीचीं बंधनें पुष्कळच संभाळावीं लागलीं, पण त्याहिपेक्षां जास्त मर्यादा पडली माझ्या अंगभूत अपात्रतेचीच. ग्रंथाची कल्पना, ग्रंथाची दिशा, ग्रंथाची रचना—मींच कल्पिली, आंखली व पार पाडली. असा सारा एकाकीच कारभार असल्यामुळें अव्याप्ति—अतिव्याप्तीचे दोष या ग्रंथांत शिरले असणें स्वाभाविक आहे. त्याचप्रमाणें एका वर्षाच्या बांधीव मुदतींत सारें लेखन व मुद्रणहि हातावेगळें करावयाचें असल्यामुळें घाई—गर्दीच्या चुकाहि बऱ्याच लपलेल्या असतील. त्या कोणा सहृदय वाचकानें सदय बुद्धीनें मला कळविल्या, तर पुढील आवृत्तींत मी त्या दूर करीन.

'महाराष्ट्र साहित्य परिषद' आणि 'स. प. कॉलेज' या दोन्ही संस्था मला अनेक दृष्टींनीं 'जवळच्या' असल्या-

मुळें त्यांच्या चालकांनीं त्यांतील संपन्न ग्रंथ–संग्रहांचा उपयोग मला मुक्तहस्तानें करूं दिला, याबद्दल मी त्यांचा ऋणाईत आहें. त्याचप्रमाणें सौजन्यपूर्ण स्वभाव व सौष्ठवपूर्ण मुद्रण यांचा लाभ, 'आनंद मुद्रणालयाचे' मालक श्री. य. गो. जोशी यांनीं मला दिला म्हणून त्यांचाहि मी ऋणी आहें. सुविद्य व कलादृष्टीचा मुद्रक असला म्हणजे छपाईचें काम किती सुव्यवस्थित व सुखदायक होतें याचा जणु वस्तुपाठच त्यांनीं मला दाखविला.

मराठी साहित्याच्या फुलबागेंत वर्षभर फिरत असतांना मला जो निर्भेळ आनंद यथेच्छ लाभला, तोच या ग्रंथांत मीं अर्करूपानें सांठवून ठेवला आहे. तो रसिकांनीं मनसोक्त लुटावा ही माझी इच्छा. असा अक्षय्य साहित्यानंद देणाऱ्या लेखकवर्गाला मी कृतज्ञतापूर्वक वंदन करतों आणि माझे हातून कळत–नकळत अधिक–उणें पडलें असल्यास त्याची नम्रतापूर्वक क्षमा मागतों. त्या थोरथोर साहित्यिकांना, "तुम्हां सज्जनांचें केलें। आकळुनि जी मीं बोलें।" या आद्य कवि–राजाच्या विनीत शब्दांनीं विनवून मी त्यांच्या साहित्यानंदाची स्मृति चित्तांत घोळवीत घोळवीतच या ग्रंथ–लेखनाला विराम देतों.

महात्मा मासिक कार्यालय,
पुणें २
ता. १ एप्रिल १९५३

दा. न. शिरवाडकर

अनुक्रम

नाटककार पृष्ठ

१. अण्णासाहेब किर्लोस्कर १– २५
२. गो. ब. देवल २६– ४९
३. श्री. कृ. कोल्हटकर ५०– ७६
४. रा. ग. गडकरी ७७– ९६
५. आचार्य अत्रे ९७–१०८
६. कृ प्र. खाडिलकर १०९-१५६
७. न. चिं. केळकर १५७-१७०
८. वासुदेवशास्त्री खरे १७१-१८५
९. भा. वि. वरेरकर १८६-२०४
१०. मो. ग रांगणेकर २०५-२१६

लघुनिबंधकार

११. प्रा. फडके २१७-२३५
१२. वि. स. खांडेकर २३६-२५१
१३. य. गो. जोशी २५२-२७५
१४. ग. ल. ठोकळ २७६-२९४
१५. सौ. मुक्ताबाई दीक्षित २९५-३१२

लघुकथाकार

१६. प्रा. फडके ३१३-३३६
१७. वि. स. खांडेकर ३३७-३६७

[मागें

१८. प्रा. अनंत काणेकर ३६८-३८३
१९. डॉ. दांडेकर ३८४-४००
२०. सौ. कुसुमावती देशपांडे ४०१-४१२

विनोदकार

२१. श्री. कृ. कोल्हटकर ४१३-४४५
२२. रा. ग. गडकरी ४४६-४६५
२३. आचार्य अत्रे ४६६-४८७
२४. प्रा. चिं. वि. जोशी ४८८-५१२
२५. कॅ. गो. गं. लिमये ५१३-५२४

आधुनिक कवि

२६. केशवसुत ५२५-५६१
२७. गोविंदाग्रज ५६२-५९३
२८. राजकवि तांबे ५९४-६१५
२९. बाल-कवि ६१६-६२७
३०. बा भ. बोरकर ६२८-६३६
३१. रे. टिळक ६३७-६६०
३२. बॅ. सावरकर ६६१-६८४
३३. माधव जूलियन् ६८५-७०३
३४. राजकवि यशवंत ७०४-७२६
३५. कुसुमाग्रज ७२७-७४४

आण्णासाहेब किर्लोस्कर : : १

महाराष्ट्र नाट्य-कलेचा मोठा भोक्ता आहे. नाट्य-गृहाचा कानाकोपरा धूपाच्या सुगंधानें दरवळूं लागला कीं, महाराष्ट्रीय प्रेक्षकांचा जीव खुंद होऊं लागे. नाट्य-गृहाच्या नौकेंत बसून आपण जणूं कांहीं एखाद्या



मौजेच्या सफरीवर निघालों आहोंत आणि नवे नवे आश्चर्यकारक प्रदेश पहाणार आहोंत, अशा आनंदांत व उत्सुकतेंत प्रेक्षकांचीं मनें गुंग होऊन जात. नाटकाची पहिली घंटा घणघणूं लागली म्हणजे त्यांच्या अंतःकरणांत हर्षाचे सहस्र नाद उमटत. दुसरी घंटा वाजूं लागली म्हणजे, 'आतां आपणांस पहावयास काय मिळणार? ऐकावयास काय मिळणार?' अशा उत्कंठेचीं फुलपांखरें त्यांच्या हृदयांत उडूं लागत. आणि ती तिसरी घंटा!— अल्लाउद्दिनाची रत्नमाणकांची गुहाच दृष्टीस पडणार अशा भावनेनें सारा प्रेक्षकवृंद एक होऊन रंगभूमीकडे टक लावून पाहूं लागे. पहिला रेशमी—किंवा भरजरी—पडदा जसजसा हळूहळू वर जाई, तसतसें श्रोतृवृंदाचे डोळे जिज्ञासेनें उमलत जात. भिन्न रुचीच्या सर्व जनांना संतृप्त करणारें नाटकाइतकें यशस्वी साधन दुसरें कोणतेंच नसेल!

महाराष्ट्राची नाट्य-प्रीति

सुमारें शंभर वर्षे नाट्यकलेनें महाराष्ट्रावर विलक्षण मोहिनी घातली

होती–रंगभूमीनें रसिकवर्गाला अक्षरशः वेडें केलें होतें. इतकी ओढ, इतकी जादू, महाराष्ट्रीयांवर दुसऱ्या कोणत्याच कलेनें टाकली नसेल. गरीब विद्यार्थी–दुसऱ्याकडे वारानें जेवणारे–पण तेहि आपलीं शाळेचीं पुस्तकें विकून 'सौभद्र' नाटक पहावयास जात. पुण्या–मुंबईस 'स्वयंवर' लागलें रे लागलें कीं, दूरदूरच्या रसिकांच्या झुंडीच्या झुंडी रेल्वेच्या स्पेशल गाडीनें जात. इंग्रज लोकांना जसा क्रिकेटचा नाद; तसा मराठी माणसांना नाटकाचा. आरंभीं आरंभीं धार्मिक आचरणाचे व श्रेष्ठ कलेचे नट रंगभूमीवर चमकत होते. त्यांच्या अंगावर बहुमोल वस्त्रें व सोन्या–मोत्याचे खरेखुरे दागदागिने लखलखत असत. आणि नाटकमंडळीचा सर्व जामानिमा एखाद्या संस्थानिकासारखा असे. बडोदें, इंदूर, कोल्हापूर वगैरे संस्थानांचे कलाप्रेमी अधिपतिहि नाटक-मंडळ्यांना आश्रय देत. त्यामुळें मराठी नाटकांची छाप एकंदर समाजावर कमालीची पडलेली असे. लो. टिळकप्रभृति राजकारणी पुढाऱ्यांनींहि 'किर्लोस्कर नाटक मंडळीच्या' पहिल्या जाहीर पत्रकावर आपल्या सह्या केल्या होत्या. 'सौभद्र' नाटकाच्या भरतवाक्यांत आण्णासाहेब किर्लोस्कर ईश्वरापाशीं अशीच प्रार्थना करतात कीं, 'प्रजाजनहि सुद्धमें करुत आत्मदेशोन्नति.' नाट्यसेवा हाहि देश–सेवेचाच एक भाग होऊं शकतो हें पुढें खाडिलकरप्रभृतींनीं सिद्धच केलें.

नाट्य–कलेची गंगोत्री

मराठी नाट्यकलेचा जन्म १८४३ सालीं झाला. त्यापूर्वी गोंधळी किंवा बहुरूपी ही एक एक व्यक्ति, निरनिराळीं सोंगें घेऊन, लोकांचें मनोरंजन करीत असे. पण सांगलीचे श्री. विष्णुदास भावे यांनीं अनेक पात्रांवर उभारलेलें 'सीतास्वयंवर' नाटक तेथील श्रीमंत राजेसाहेबांसमोर १८४३ सालीं करून दाखविलें तेव्हां प्रेक्षकांना झोपडींतून उठून राजवाड्यांत रहावयास गेल्याइतका आनंद झाला असेल. पण मराठी नाट्यगंगेचीं गंगोत्री म्हणजे अण्णासाहेब किर्लोस्कर हेच मानले जातात. त्यांनीं नाट्यकलेला संगीत कलेची सुंदर जोड मिळवून दिली. त्यांच्या

'शाकुंतल' व 'सौभद्र' या प्रत्येक नाटकांत शंभरावर पदें भरलेलीं आहेत. आणि तीं पदें गाणारे नट भाऊराव कोल्हटकर किंवा बालगंधर्व यांसारखे अलौकिक असले म्हणजे मग तर काय? सबंध रात्रभर नाटक चालून पहाट फटफटण्याचें वेळीं तें संपे. आकाशांतील तारांची क्रीडा, तसाच रंगभूमीवरील नाटकाचा खेळ–सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत अखंड चाललेला व रंगलेला. आपल्या मधुर तानांचीं रेशमी जाळीं रसिकांवर फेकून व त्यांत त्यांचीं मनें बांधून घेऊन बालगंधर्वासारखे अलौकिक नट जणूं कांहीं उंच अस्मानांत त्या मनांना विहार करावयास सोडीत. जाळ्यांत पकडलेलीं कबुतरें पंखांची फडफड करीत आनंदानें घरीं परत यावींत; त्याप्रमाणें प्रेक्षकांच्या टाळ्यांचा कडकडाट नाट्यगृहांतील कानाकोपऱ्यांतून, बालगंधर्व अभिनयाच्या सीमेवर–अथवा संगीतांतील समेवर–आले कीं, होत असे.

अगदीं आरंभीं, पूर्वीच्या रूढीप्रमाणें रंगभूमीवर सोंग घेणाऱ्या नटास समाज हीन लेखीत असे, त्याच्यावर बहिष्कार घालत असे, कांहीं कांहीं वेळां त्यांना भोजनाच्या भर पंक्तींतूनहि उठविलें जात असे. परवांपरवां-पर्यंत नटाला रहावयास जागा किंवा लग्नासाठीं मुलगी मिळणें मुष्कील होतें. पण नटाचें गुणग्रहण करण्यांत, त्यांचें गोडवे गाण्यांत, त्यांच्या आवडीनिवडी ऐकण्यांत मात्र जो तो पुढें असे.

संगीताची वाटणी

नाटकांतील सारीं पदें गाण्याचा मक्ता पूर्वी एकट्या सूत्रधाराकडे असे. तसाच वेडावाकडा कसाहि विनोद करून श्रोत्यांना हसविण्याची कामगिरी विदूषकाकडे असे. नाटकाचें कथानक एखाद्या पौराणिक आख्यानावर उभारलेलें असे. त्यांत देवपार्टी व राक्षसपार्टी असत. आरंभीं मोरावर बसून थै थै नाचत सरस्वती प्रवेश करी. आणि मग श्रीगजाननमहाराज अवतीर्ण होऊन, "वत्सा, तुजप्रत कल्याण असो." असा आशीर्वाद सूत्रधारास देत असत. व त्यामुळें (?) पुढील नाट्यभाग निर्विघ्नपणें सिद्धीस जाई. त्रिलोकेकर यांनीं सूत्रधाराचा गाण्याचा मक्ता रद्द करून

निरनिराळ्या पात्रांना पदें वाटून दिलीं आणि 'नल-दमयंती' नाटक १८७९ सालीं रसिकजनांना सादर केलें. पण संगीत नाटकांची परंपरा सुरू करण्याचें श्रेय किर्लोस्करांकडेच जातें.

नाटकाचा नाद

ज्या वर्षी मराठी नाट्यकलेचा अवतार झाला, त्याच वर्षी किर्लोस्करांचा जन्म झाला. बळवंत पांडुरंग किर्लोस्कर यांचा जन्म ता. ३१ मार्च १८४३ रोजीं बेळगांव जिल्ह्यांतील गुर्लसूर गांवीं झाला. १८६३ सालीं आण्णा शिक्षणासाठीं पुण्यास आले, पण त्यांचें चित्त शाळेपेक्षां नाटकाकडेच अधिक असे. नाटकें पहाणें, नाटकासाठीं पदें रचून देणें, या कामांतच त्यांचा वेळ अधिक जाऊं लागला. याचा बोभाटा त्यांच्या घरापर्यंत पोहोंचला. तेव्हां वडिलांनीं १८६३ सालीं, मुद्दाम माणसें पाठवून आण्णांना पुण्याहून परत घरीं आणलें. बेळगांव येथें त्यांनीं शिक्षकाची नोकरी पत्करली. पगार पंचवीस रुपये होता. आठ वर्षें शिक्षकीचा पेशा त्यांनीं चालविला. या अवधींत नाटक मंडळ्या व कीर्तनकार यांच्यासाठीं त्यांनीं पंचवीस आख्यानें रचून दिलीं. शिक्षकीचा कंटाळा आला म्हणून ते पोलिस-खात्यांत शिरले आणि जमादारीचा वीट आला म्हणून रेव्हिन्यू कमिशनरच्या कचेरींतील कारकुनी त्यांनीं पतकरली.

रंगभूमीवरील नवयुग

किर्लोस्करांच्या मनाचा कल कला-विलासाकडेच सदैव असे. संगीत ऐकण्यांत व नाटकें पाहण्यांत त्यांना खरा आनंद वाटे. वयाच्या तेविसाव्या वर्षीं त्यांनीं 'भरतशास्त्रोत्तेजक मंडळी' स्थापन केली. तिसाव्या वर्षीं त्यांनीं 'श्रीशांकर दिग्विजय' नांवाचें एक गद्य नाटक लिहिलें. नंतर ऊर्दू नाटकें पाहून मराठींत संगीत नाटकें लिहिण्याची कल्पना त्यांना सुचली. ता. ३१ आक्टोबर १८८० रोजीं, वयाच्या सदतिसाव्या वर्षीं, त्यांनीं एका महाकवीचा हात धरून, संगीत रंगभूमीवर प्रवेश केला— कालिदासाच्या 'शाकुंतल' नाटकाचे चार अंक मराठींत भाषांतरित

करून, त्याचा प्रयोग त्यांनीं रसिकांना दाखविला. तो ' नवनवल नयनोत्सव ' पाहून रसिकांचीं मनें गारीगार झालीं.या नाटकांत संगीत घातलें आहे असें म्हणण्यापेक्षां, संगीतांत हें नाटक बसविलें आहे, असें म्हणणेंच योग्य ठरेल. त्यांतील पदांची संख्या १९८ आहे. " पंचतुंड नररुंडमालधर " हें सूत्रधाराचें पहिलें पद कानांवर पडतांच पुण्यांतील ' आनंदोद्भव ' नाट्यगृहाच्या तिन्ही मजल्यावर दाटीवाटीनें बसलेल्या प्रेक्षकांना वाटलें, ' मराठी रंगभूमीवर आज नवयुग सुरू झालें ! ' नाटकाचीं सगळीं तिकिटें अगोदरच खपलीं होतीं. साऱ्या महाराष्ट्रांत किर्लोस्करांच्या कीर्तीचे चौघडे झडूं लागले. " संगीताचा इंद्र किंवा नभींचा चंद्र " अशीं स्तुति-सुमनें कटावांतून आणि पोवाड्यांतून त्यांच्यावर उधळलीं गेलीं.

पांच वर्षांतील कामागिरी

पुढील वर्षी त्यांनीं ' शाकुंतला 'च्या पुढील तीन अंकांचें भाषांतर केलें. आणि १८८२ सालीं तर अशी एक संगीत स्वतंत्र नाट्यकृति निर्माण केली कीं, तिचें सौंदर्य आजमितीलाहि टवटवीत राहिलें आहे. ती कृति म्हणजे ' सौभद्र '. हें सुंदर–सुकुमार पुष्प कधींच न कोमेजणारें आहे. लक्षावधि रसिक–भृंगांनीं त्यांतील मध कितीहि लुटला तरी अजून तो अक्षय्य आहे–अवीट आहे. सौभद्राचे तीन अंकच प्रथम पूर्ण करून त्याचा प्रयोग रंगभूमीवर दाखविला गेला. १८८४ सालीं आण्णासाहेबांनीं ' रामराज्यवियोग ' हें नाटक रंगभूमीवर आणलें. त्याचेहि तीन अंकच लिहिलेले होते. ' शाकुंतला 'प्रमाणें याहि नाटकाचे उरलेले अंक त्यांनीं पुढें लिहिलें असते, पण मृत्यूनें त्यांना तशी सवड ठेवली नाहीं. १८८५ सालीं त्यांच्या आयुष्यावर काळानें अखेरचा पडदा टाकला. त्या वेळीं महाराष्ट्रांतील सारा रसिकवर्ग हळहळला. "आम्ही मेलों, तूं मात्र मराठी भाषा जिवंत असेपर्यंत जिवंत राहशील ! " असे आत्यंतिक शोकाचे व कौतुकाचे उद्गार त्यांच्या बडिलांनीं काढले. त्याचेच पडसाद लाखों कलाप्रेमी अंतःकरणांत उठत होते. अवघ्या पांच वर्षांत, केवळ

अडीच नाटकें लिहून, नाट्यसृष्टींत क्रांति करणारे किर्लोस्कर हे महाराष्ट्रांतच काय, पण बहुधा सर्व जगांत असामान्य होत ! ते स्वतः कण्व, दशरथ, यांच्या भूमिका कुशलपणें करणारे नटहि होते.

भाषांतराचे गुण-दोष

" तुझ्या मधुरगानाच्या नादें वेडावुनि हा गेला " अशी स्थिति किर्लोस्करांच्या संगीतानें महाराष्ट्राच्या रसिकवर्गाची करून सोडली. पण केवळ ' मधुर-गान ' हेंच कांहीं शाकुंतलाचें आकर्षण नव्हे. " खेळ चांगला वेषधर बरें " अशी जी प्रशंसा नटी करते, ती यथार्थच आहे. कवीन्द्र कालिदासाचें कथानक मराठींत आणणें हें किती अवघड काम. एका बाटलींतील अत्तर दुसऱ्या बाटलींत ओतण्यासारखेंच ! - मध्येंच वास उडून पाणी राहावयाचें ! पण आण्णासाहेबांनीं भाषांतरांत मूळचा सुगंध कायम ठेवला आहे. भाषांतर करतांना त्यांनीं मुख्य लक्ष ठेवलें आहे, तें सुबोधपणावर. गद्य काय नि पद्य काय, सारें साधें–सोपें करण्यावर त्यांचा भर. त्यामुळें क्वचित् ' शैवलेनापि ' यांतील ' अपि ' चा जोर नाहींसा झाला असेल, कोठें ह्रस्वदीर्घांची ओढाताण झालेली असेल, तर कोठें कोठें ' तैय्यार,' ' खासा, ' ' फाकड्या, ' ' कमाल केली, ' ' काय बेट्या हरणाची मजा, ' ' गप्पा मनिं कोरड्या ' इत्यादि नीरस शब्द पद्यामध्यें गुंफले गेले असतील, पण एकंदरींत सर्व नाटक सुगम, मधुर व आकर्षक असेंच झालें आहे.

शाकुंतलाचा साजशृंगार

अर्थात् शाकुंतल नाटकाच्या सुंदर कथा-वस्तूचें श्रेय कांहीं किर्लोस्करांचें नव्हे तें आहे कालिदासाचें. जसा आग्ऱ्याचा ताजमहाल सर्व जगाला शिल्पकलेचा उत्कृष्ट आदर्श वाटतो, तसेंच कालिदासाचें शाकुंतल नाटक रसिकांना ललित कृतींचा सुवर्ण–कळस भासतो. ' नाटकांत शाकुंतल, त्यांत चौथा अंक व त्यांतहि चार श्लोक ' अशी रम्यत्वाची चढती श्रेणी सर्व रसिकांनीं एकमुखानें मान्य केली आहे. जर्मन कवि गटे याला तर

शाकुंतल नाटकांत 'स्वर्भू–संगम' च आढळला व तो आनंदानें नाचूं लागला. कविवर डॉ. टागोरप्रभृतींनीं शाकुंतलांतील आध्यात्मिक सौंदर्याचा गुप्त खजिना उघडून दाखविला. अशा या सर्वश्रेष्ठ नाटकाचे मूळचे जे जे गुण असतील, त्या सर्वांचें श्रेय कालिदासाकडे सहजच जातें. पण त्या राजकन्येला मराठी मुलखांत आणतांना किर्लोस्करांनीं जो साजशृंगार चढविला, तोहि उंची व कलाकुसरीचाच आहे. भावार्थाकडे अवधान ठेवून भाषांतर करण्याचें धोरण किर्लोस्करांचें आहे. भाषांतर ही अस्सल स्वतंत्र कृति वाटावी असें सरस लेखन त्यांनीं केलें आहे–आणि तेंच यश मोठें आहे. यामुळें भाषांतरांतील पुष्कळ पदें महाराष्ट्रीय रसिकांच्या जिव्हाग्रावर नर्तन करीत आहेत, आणि त्यांतील कांहीं कांहीं चरण तर, सुभाषितांप्रमाणें किंवा म्हणींप्रमाणें, घरांघरांत बायकामुलांच्या तोंडीं खेळत आहेत.

भाषांतराचें कसब

शकुंतलेची प्रथम दृष्टिभेट होतांच राजा दुष्यंताच्या मनांत कोणती भावना चमकून गेली, याचें वर्णन करणारें पद पहा. "किती मधुर रूप तरि यांचें। मम नेत्र धन्य अजि साचे ॥ नृपमंदिरीं यापरि कैचें। वन हरी सत्व बागेचें ॥ किती वर्णु येईना वाचे। ह्या बघतां कामि न वांचे ॥ हळु हळु चमकति बागेंतुनीया। विद्युल्लता तशा या रूपिजा ॥ भाग्योदय माजा ॥" यांतील 'वन हरी सत्व बागेचें,' हें भाषांतर सहज व सरस झालें आहे आणि म्हणून तें सुभाषितांप्रमाणें सर्वत्र चलन पावलें आहे.

शकुंतलेसारखी लावण्यवती युवती, पण तिनें धारण केली होती वृक्षांचीं वल्कलें. त्यामुळें तिच्या सौंदर्याला कांहीं हानि पोंचली होती काय? राजा म्हणतो,—"शैवालें युक्त पंकज तें शोभतें ॥ शशिमाजीं लांछनाची बहु शोभा दीसते ॥ तैसी ही वल्कलानें किति नामी वाटते ॥ जातीच्या सुंदरांना कांहींही चालतें ॥" यांतील शेवटची ओळ ज्यानें गुणगुणली नाहीं, असा रसिक महाराष्ट्रांत विरळा.

सहजरम्य गद्य

साधें गद्य भाषांतर घेतलें तरी किर्लोस्कर तें किती सहजरम्य रीतीनें

करतात, याचा नमुना पहिल्या अंकांतच दृष्टीस पडतो. शकुंतलेच्या मुख-कमलावर झेप घालणाऱ्या भुंग्याचा त्रास होत असतांना, तिचा आपल्या सखीशीं झालेला संवाद ऐकण्यासारखा आहे.

शकुंतला—[घाबरून] सख्यांनो, सोडवा ग सोडवा ! पहा या दुष्ट भुंग्यानें कशी माझी पाठच वेतली आहे.

प्रियंवदा—[हंसून] अग आम्हीं सोडविणार कोण ? दुष्यंत राजाला हाक मार. कारण तपोवनांतलीं संकटें राजानेंच दूर करावयाचीं.

राजा—आतां ही वेळ पुढें जाण्याला फार चांगली आहे. हां भिऊं नका, भिऊं नका-अरे, पण मी राजा आहे असें ओळखून त्या विचकतील. बरें, त्यांना कांहीं तरी सांगतां येईल.

शकुंतला—[दोन पावलें जाऊन, पाहून] काय इकडेहि आला.

राजा—[त्वरेनें जवळ जाऊन] हां खबरदार, दुर्जनाचा शास्ता पौरव राजा पृथ्वी पालन करीत असतां, कोण रे तो दुष्ट या मुनि-कन्येला त्रास देत आहे ?

भ्रमराच्या तावडींतून सुटलेली शकुंतला दुष्यंताच्या पाशांत अडकली. तिच्या मैत्रिणींनीं राजाची चौकशी कोणत्या गौरवपूर्ण शब्दांनीं केली, आणि त्यावेळीं शकुंतलेच्या भावना कशा उचंबळून आल्या याचें वर्णन पुढील चार वाक्यांत केलेलें आढळतें,—

" अनसूया—आपण उत्पन्न होऊन कोणत्या राजाचा वंश शोभविला ? आपण इकडे आल्यानें कोणत्या देशांतले लोक आपल्या वियोग-दुःखानें झुरत आहेत ? आणखी या सुकुमार देहाला या तपोवनांत येण्याची पीडा कशाकरितां दिली ?

शकुंतला—मेल्या वेड्या मना, व्यर्थ तळमळूं नको ! तुला जें पाहिजे होतें तेंच अनसूयेनें विचारलें.

राजा—[आपल्याशीं] आतां खरें नांव सांगावें तरी कसें, आणखी लपवावें तरी कसें ? बरें, असें सांगावें. मुलींची समजूत घालण्याचें काय जड आहे. [उघड] बाई, ज्याला पौरव राजानें धर्माधिकारावर नेमला,

तो मी येथल्या तुमच्या क्रिया निर्विघ्न चालल्या आहेत कीं नाहीं हें पाहण्यासाठीं येथें आलों आहे.

अनसूया—तर मग ह्या आगमनानें आम्ही सनाथ झालों.'' यांतील 'सनाथ' या शब्दावरील श्लेष किती मौजेचा आहे !

पात्रोचित उपमा

शकुंतलेचें मन दुष्यंतावर बसलें हें योग्यच झालें असें पटविण्यासाठीं तिला साजेशी निसर्गातील उपमा तिची मैत्रीण देते.

'' प्रियंवदा—[मोठ्यानें] गडे, हिचें मन त्याच्यावर गेलें हें ठीकच आहे. महानदी समुद्रालाच जाऊन मिळायची; पालवीनें भरलेली मोतियाची वेल आंब्यांच्या झाडावर चढली तरच शोभते.'' त्याचप्रमाणें या 'समसमा संयोगाची' सार्थकता कण्वऋषी आपल्याला शोभेल अशा भाषेनेंच व्यक्त करतात. '' तिला बाबांनीं पोटाशीं धरून मोठ्या प्रेमानें म्हटलें,—'' बये, ज्याप्रमाणें यजमानाचे डोळे धुरानें भरले असतांहि त्याच्या हातून अग्नीच्याच मुखांत आहुति पडावी तसें हें सुदैवानें झालें.''

विनोदपूर्ण संवाद

शकुंतलेचें मन दुष्यंताकडे कसें ओढ घेत होतें, याची कल्पना पुढील पदावरून येतें. ''सखये अनसूये थांब कि बाई ॥ येतें मी अशि कां घाई ॥ रुतला दर्भांकूर माझ्या पाई ॥ मजला तो दुःखद होई ॥ साडी कोरांटीस गुंतुन जाई ॥ सोडविते तोंवरी राही ॥ '' ही झाली शकुंतलेची अवस्था. आणि राजाची ? '' हिला पाहतांना माझ्या डोळ्याची पापणीसुद्धां लवावयाची विसरते.'' असें तो म्हणतो. पुढें आपला विदूषक यालाहि हाच अभिप्राय तो कळवितो. त्या वेळचा त्या दोघांचा संवाद किती विनोदपूर्ण आहे पहा

'' राजा—गड्या फारच बघण्यालायक अशी वस्तू तूं पाहिली नाहीं, म्हणून तुझ्या डोळ्यांचें कांहीं सार्थक झालें नाहीं. व्यर्थ रे व्यर्थ !

विदू० – महाराज, आपण तर माझ्यापुढेंच आहां, आणखी दुसरी सुंदर वस्तु ती कोणती ?

राजा—अरे, आपलीं माणसें सर्वांना सुंदरच दिसतात; पण या आश्रमास अलंकारभूत जी शकुंतला, तिच्याविषयीं माझें बोलणें आहें. ''

याच विनोदाची तार वर खेचण्यासाठीं दुसऱ्या अंकाच्या शेवटीं राजा विदूषकाशीं उपहासानें बोलतो. विदूषकाला राजधानीकडे परत पाठविण्यासाठीं तो त्याला विनोदानें म्हणतो,

'' विदू० — मित्रा, मी राक्षसाला भिणारा म्हणून मला एकट्यालाच नगराला पाठवितोस होय ?

राजा—(हंसून) छे, छे, तुम्ही केवढे शूर, तुम्हांला भित्रे म्हणतो कोण !

विदू० — तर मग, राजाचा भाऊ जसा डौलानें जातो तसा मी जाईन; त्या माझ्या पहिल्या तट्टावर बसून नाहीं जायचा.

राजा तपोवनाला पीडा होऊं नये म्हणून सगळें सैन्यच तुझ्याबरोबर पाठवावयाचें आहे. मग हव्या त्या डौलानें जा.

विदू० — (आपल्या पाठीवर आपणच हात थोपटून) शाब्बास, मी आज युवराज झालों. ''

करुण रसाचा उत्कर्ष

शाकुंतल नाटकाचा गाभा म्हणजे चौथा अंक. कालिदासाच्या सर्व काव्यकृतींचा हा मेरुमणी. करुण व वत्सल या रसांच्या गंगायमुनांचा संगमच तो. कण्वासारख्या विरक्त तपस्व्याच्या हृदयांतहि कालवाकालव करणारा कन्या-वियोगाचा तो प्रसंग. मग शकुंतलेची, तिच्या सख्यांची, तिच्या हरणाची, मैनेची, फार काय, वृक्षाची-वेलींचीहि, काय अवस्था झाली असेल ? एक महाकवि कालिदासच तें वर्णन करूं शकला. त्या आश्रमाचा निरोप घेतांना शकुंतला विव्हळ होऊन म्हणते, '' आजि शेवटचा, लाभचि हा ममतेचा, मज होय तुमच्या करिंचा ॥ बहु दावियलें प्रेम निरंतर अपुलें, कधीं नाहीं अंतर पडलें ॥ प्रतिदिवशीं कोमल करिंची, वेणीफणी आतां कैची ॥ त्या आशेचा लेश न उरला साचा, शोक न आवरे मनिंचा ॥ ''

करुणरसाला पोषक अशीच शब्द-योजना या पदाची किर्लोस्करांनीं केलेली आहे.

सृष्टीची समरसता

शकुंतला सासरीं निघाली, तेव्हां आश्रमांतील वस्तुजाताची अवस्था काय झाली, हें प्रियंवदा तिला सांगत आहे, "गडे, हें तपोवन सोडून चाललीस म्हणून तुला एकटीलाच वाईट वाटतें असें नको समजूं; तुझा आतां विरह होणार म्हणून सगळ्यांचीहि अवस्था तुझ्या-सारखीच झाली आहे. पहा, हे हरिण कसे तोंडांत घेतलेल्या दर्भाचा घांस परत टाकताहेत, वेलीदेखील अश्रुबिंदु ढाळल्याप्रमाणें टपाटप पिकलेलीं पानें गाळीत आहेत."

आपल्या आवडत्या लतेला संभाळावयास शकुंतलेनें आपल्या दोघां मैत्रिणींना सांगितलें, तेव्हां त्या मैत्रिणींनीं विचारलेला एक एक करुण प्रश्न फारच हृदयस्पर्शी आहे.

"शकुंतला—(सख्याकडे वळून) सख्यांनो, हिला आतां मी तुमच्या ओटींत घातली आहे.

दोघी सख्या—पण बाई, आम्हांला कोणाच्या ओटींत घातलें आहेस ? (रडूं लागतात)"

तिच्या मागें मागें जाणारा व तिचा पदर ओढून धरणारा हरिण पाहतांच शकुंतलेचें हृदय उचंबळून आलें, आणि त्यांतून पुढील आर्त उद्गार निघाले,

"जाई परतोनी, बाळा, जाई परतोनी ॥ निष्ठुर मी तुज टाकुनि जातें, येशि कशाला माझ्या मागोनि ॥ ध्रु ॥ जन्मतांच तव जननि गेली सोडुनि तुज या तपोवनीं । मीच पाळिलें लाड करोनि, कांहिं न अडलें कीं तुझें । गेलें जरी, काय उणें तुज, सांभाळतील बाबा तुजलागुनि ॥"

सर्व सृष्टीशींच शकुंतला समरस झाली होती. तिला वृक्षांनीं आणि लतांनीं रेशमी वस्त्रें व दागदागिने दिले—फुलांच्या रूपानें अश्रु गाळलें. आणि तपस्वी कण्वहि भरल्या अंतःकरणानें व गहिंवरल्या कंठानें म्हणूं लागले,

" जाते कीं मम शकुंतला ही आजचि पतिसदना ॥ उत्कंठेनें काळिज तुटतें हुरहुर लागे मना ॥ ध्रु० ॥ गहिंवर दाटे कंठिं कसा ये बाष्पपूर नयनां ॥ चिंतेनें जड दृष्टी झाल्या कांहिंच वदवेना ॥ मी वनवासी स्नेहि हिचा पण वियोग साहवेना ॥ न कळे कैसे गृहस्थ सोशिती कन्या-विरहांना ॥ "

अनुभवाची सार्वत्रिकता

महर्षि कण्वाचे डोळे अश्रूंनीं डबडबले हें वात्सल्याचें स्वरूप पाहून शकुंतलेचें कोमल हृदय तुटूं लागलें. ती आपल्या प्रेमळ पित्याला, स्वतःचें दुःख आवरून म्हणते, " तनु ही सुकली अधिंच तपानें ॥ पांडुरताहि आलि तयानें ॥ त्यांतुनि या माझ्या चिंतेनें ॥ कष्टि नका होऊं ॥ १ ॥

एकानें दुसऱ्याचें सांत्वन करावें आणि तें करतांनाच आपण दुःख करूं लागावें—दुसऱ्याच्या डोळ्यांतील अश्रु पुसतां पुसतांच स्वतःच्या डोळ्यांतच आसवें तरारावींत, असा हा प्रेममूलक विरहाचा प्रसंग ! पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याहि स्थळीं आणि इतिहासाच्या पानावरील कोणत्याहि काळीं अनुभवास येण्यासारखा हा त्रिकालाबाधित प्रसंग ! त्याची पकड (Appeal) सार्वत्रिक व शाश्वतची आहे.

शकुंतलेला सांगातीं घेऊन कण्वाचे शिष्य दुष्यंताच्या राजधानींत गेले. तेथें एक शिष्य सज्जनांचें वर्णन करतांना पुढील सुभाषितप्राय सिद्धांत सांगतो. " नम्र होती फलभारें तरुवर सारे । लवुनि येती मेघहि ते नवजलभारें ॥ उदयिं साधू लोकांचे ते निजाचारें ॥ सज्जनांची ऐशि ही रीति बा रे ॥ "

कल्पना-शक्तीचा विलास

शकुंतला आश्रमांत विरहानें विमनस्क असतांना दुर्वासानें तिला शाप दिला, त्यामुळें राजानें तिला ओळखलें नाहीं—किंबहुना तिचा धिक्कारच केला. तेव्हां ती अपमानित आर्य-स्त्री विजेप्रमाणें कडाडून तेथून अदृश्य झाली. या प्रसंगाचें स्मरण पुढें दुष्यंत राजाला जेव्हां झालें, तेव्हां त्याची

स्थिति एखाद्या अपराधी माणसाप्रमाणें कशी झाली, हें पुढील पदांत सांगितलें आहे. "माझें हृदय पोळत धैर्य गळत सर्व दिसत शून्य मला रे ॥ मुनि दरडावूनि कथित रहा एथ फीर मागें ॥ मग दीन नेत्रिं मजचि बघे अश्रुच्या वियोगें ॥ मज रे, तोचि नेत्र टोचितसे, हृदयिं जसा भाला" इंद्रानें आपल्या साहाय्यासाठीं दुष्यंत राजाला स्वर्गलोकीं बोलाविलें. तेव्हां, आकाशांतून ढगावरून रथांत बसून जातांना दुष्यंताला जो अनुभव आला, तो आजकाल विमानांतून संचार करणाऱ्या कोणाहि माणसाला पटण्यासारखा आहे. त्या अनुभवाचें वर्णन दुष्यंत पुढील शब्दांनीं करतो. "रथचक्रांच्या आरांतूनि । चातकपक्षी जाति उडोनी ॥ अश्वशरीरीं सौदामिनी । लखलखती ॥ कैशा ॥ १ ॥ पूर्ण जलानें जो का भरला । ऐसा मेघांचा ढग आला ॥ त्यावरुनी अमुचा रथ गेला । धांवा या भिजल्या ॥ २ ॥" जमिनीवर बसून नाटक लिहिणाऱ्या कालिदासानें अंतरिक्षांतील प्रवासाचें हें जें सूक्ष्म वर्णन केलें आहे, तें त्याच्या कल्पनाविलासाचेंच फल म्हणतां येईल.

स्वर्गातील मारीचाश्रमांत शकुंतलेचें दर्शन दुष्यंताला अकल्पितपणें होतें. त्याआधीं तिच्या मुलाची भेट होते. त्या बालकाचें वर्णन दुष्यंताच्या मुखानें कालिदासानें जितक्या कोमलतेनें केलें आहे, तितक्याच बहारीनें त्याचें भाषांतर किर्लोस्करांनीं केलें आहे, तें असे.—"निष्कारण हसतांना दिसती मुकुलदंत हे याचे ॥ सर्व वर्ण ते स्पष्ट न उमटती मधुर बोल ते ज्याचे ॥ ऐशा बाला अंकीं घेउनि रज त्याच्या अंगाचे ॥ लागुनि वसनें मळतीं ज्यांची तेचि धन्य दैवाचे ॥"

सौभद्राचा सौरभ

पंचपक्वान्नांची मिठी जेवणाराच्या तोंडाला बसली म्हणजे त्याला खमंग पदार्थांची वासना होते. शाकुंतलांत नाना रसांची गोडी सांठविलेली आहे. त्या 'पक्वान्नातें सेवूनि विटलें', त्यांची भूक पुनः चेतविण्यासाठीं किर्लोस्करांनीं आपलें नवें नाटक 'तिखटचि केलें.' तें नाटक म्हणजे सौभद्र. भाषांतराचा पांगुळगाडा सोडून देऊन त्यांची लेखणी आतां

स्वतंत्रपणें पाऊलें टाकूं लागली. कथानकाच्या बांधणीपासून पदरचना, संवाद–योजना इत्यादि सर्व अंगोपांगें किर्लोस्करांनीं आपल्या स्वतंत्र प्रतिभेंतून प्रगट केलीं. 'अर्जुन–सुभद्रा' विवाहाचें कथानक महाभारतांत मूळचें असलें, तरी नाट्यदृष्ट्या त्यांत किर्लोस्करांनीं इतके फेरफार केले आहेत कीं, ही त्यांची स्वतंत्र कृति म्हणूनच महाराष्ट्रानें सुगंधी पुष्पाप्रमाणें मस्तकीं धारण केली. विशेष हें कीं, हें पुष्प कधींहि कोमेजत नाहीं. गंगा जशी सतत अथांग वाहत असते, तशी या नाटकाची लोकप्रियता अभंग आहे. आजवर शेंकडों नाटक मंडळ्यांनीं या नाटकाचें हजारों प्रयोग करून लाखों रसिकांना रिझविलें आहे, आणि पुढेंहि तें तसेंच त्यांना झुलवीत ठेवील.

शाश्वत भावनांचें चित्रण

'सौभद्रा'च्या या अवीट गोडीचें, अखंड लोकप्रियतेचें आणि अक्षय्य यशाचें रहस्य कोणतें? शृंगार, हास्य व करुण या तीन प्रमुख रसांचा उत्कर्ष तर त्यांत आहेच, पण तेवढ्यानें कांहीं त्याला हें अम्लान सौंदर्य प्राप्त झालेलें नाहीं. पौराणिक कथांची पकडच काय, पण आठवणसुद्धां आतां हळूहळू नाहींशी होत आहे. संगीताच्या चालींतहि पंजाबी, बंगाली वगैरे ढंग शिरत आहेत. नाट्य-लेखनाचें तंत्रहि एकप्रवेशी वगैरे पाश्चात्य वळणावर जात आहे. अशा नव्या नव्या घटना नाट्य-सृष्टींत एकसारख्या घडत असतांनाहि हें जुनेंपुराणें नाटक ताजेतवानें कसें राहतें? याचें मुख्य कारण म्हणजे मानवाच्या ज्या शाश्वत भावना आहेत, त्या संतृप्त करण्याचें सामर्थ्य या नाटकांत आहे. हर्ष–शोक, प्रणय–मत्सर, महत्वाकांक्षा–औदार्य, इत्यादि भावना सार्वत्रिक व सार्वकालिक आहेत. त्या खेळविण्याची शक्ति शेक्सपिअर–कालिदासांत आहे. आणि म्हणून त्यांची नाटकें दिक्कालाचीं बंधनें तोडून सर्वत्र प्रसार पावलीं आहेत. हीच जादू किर्लोस्करांनाहि साधलेली आहे. कृष्ण–अर्जुन–बलराम किंवा सुभद्रा-रुक्मिणी या स्वभाव–रेखा कोठेंहि, केव्हांहि पहावयास मिळतील अशाच आहेत. नांवें बदललीं असतील, पण वस्तु कायम आहेत. अर्जुन-सुभद्रा

१५

काय, रोमिओ-ज्युलिएट काय किंवा लैला-मजनू काय,-हीं नांवें गौण होत, पण त्यांची प्रेमाचीं तीव्रता व निष्ठा अलौकिक आहे आणि म्हणून जोंवर मानवी हृदय प्रेमाचें पूजक आहे, तोंवर त्यांच्या कथा सर्वांना आकर्षक वाटणारच.

कौटुंबिक प्रेम-कथा

'सौभद्रा'चें कथानक मूळचें पौराणिक असलें, तरी त्याची मांडणी किर्लोस्करांनीं सामाजिक स्वरूपांत केली आहे. 'ही एक प्रेम-कथा आहे—कौटुंबिक कथा आहे' असेंच प्रेक्षकांना सतत वाटत असतें. आपल्या घरांतीलच लग्नाचा प्रसंग आपण पाहत आहोंत, त्यांत दोन भावांचीं दोन मतें पडलेलीं आहेत, त्यामुळें लग्नाला विघ्न उत्पन्न झालेलें आहे, तेव्हां नियोजित वराची व वधूची विरहावस्था शिगेस पोचली आहे आणि शेवटीं लग्न लागून व 'नांदा सौख्यभरें' म्हणून आनंदीआनंद होत आहे, अशी एक नित्याची, आपल्याभोंवतीं घडणारी कुटुंबकथाच आपण रंगभूमीच्या आरशांत पाहात आहोंत, असा भास रसिकाला होतो आणि त्यामुळें तो त्या नाट्यवस्तूशीं सहानुभूतीनें समरसहि बनतो.

संसाराचें प्रतिबिंब

आतां पूर्वींच्या मुकुटाऐवजीं टोपी आणि रथाऐवजीं मोटार आली असेल, पण त्या टोपीखालील डोकें व मोटारींतील अंतःकरण पूर्वींचेंच आहे. अर्जुन-सुभद्रेच्या प्रणय-लीला आजच्याहि युव-युवतीच्या अंतःकरणास गुदगुल्या केल्यावांचून रहात नाहींत. वसंत ऋतूंत 'रमतात युवति चांदण्यांत पतिस घेउनि' हा प्रेमाचा खेळ द्वारकेप्रमाणें पुण्यास-व पुण्याप्रमाणेंच पॅरिसमध्यें-सदैव चालू असणार, तसेंच 'खिडक्यांचे वाळ्याचे पडदे भिजवूनि कोणी गार करी । गुलाबपाणी थंड करोनि शिंपीत कोणी गच्चिवरी ॥' हें वर्णन रुक्मिणीच्या 'लक्ष्मी-विलास' मंदिराचें असलें, तरी महाराष्ट्रीय रसिकांना तें आपल्याच घराला लागू आहे असें वाटे.

" मी कुमार तीहि कुमारी असतांना जागीं एका। वाढलों-खेळलों प्रेमें। प्रिय झालों एकामेकां ' असें दृढ भाव–बंधन अर्जुन-सुभद्रा यामध्यें निर्माण झालेलें पाहतांच तरुण मनें या नाटकावर प्रथमपासूनच लुब्ध होतात. त्या दोघांचा ' प्रीति-तरु ' तोडला जात आहे, या संघर्षातूनच नाटकाचा प्रारंभ असल्यापुढें प्रेक्षकांची जिज्ञासा सुरवातीपासून ताणली जाते. विरह-व्याकुळ सुभद्रेच्या मनाची तडफड तरुण प्रेक्षकांच्या हृदयास जाऊन भिडते. आणि जेव्हां सुभद्रा आणि रुक्मिणी या वन्स-वहिनीचा संवाद तुळशीवृंदावनापुढें चालतो, तेव्हां तर प्रत्येक स्त्री-पुरुषाला वाटतें कीं, ' अरे, या तर आपल्याच संसारातील गोष्टी.' हा घरगुतीपणा, हा सामाजिकपणा किर्लोस्करांनीं शेवट-पर्यंत सुरेख संभाळला आहे. स्वाभाविकता या नाटकांत ओतप्रोत भरलेली आहे. त्यामुळें सारीं पात्रें खरीं वाटतात व सारे संवाद सहज भासतात.

या नाटकांत पात्रें किती ? फक्त पांच. गौण पात्रें आहेत तींहि चारच. अर्जुन हा नायक असला, तरी त्याचें कर्तृत्व किंवा चातुर्य असें फारसें कोठेंच प्रगट होत नाहीं. जणुं कांहीं त्यानें आपल्या पराक्रमाचा खरोखरी-चाच संन्यास घेतला आहे ! ' बलसागर तुम्ही वीरशिरोमणि ' असा त्याचा गौरव सुभद्रा करते, म्हणूनच अर्जुनाला शूर मानावयाचें ! बाकी सारीं चक्रें फिरविलीं जातात कृष्णाकडून. कृष्णाचें कारस्थानी कर्तृत्व व विनोदी स्वभाव हीच या नाटकाच्या माधुर्याची गुरु-किल्ली आहे. कृष्णाचें पात्र वगळलें तर सौभद्रांतील सौरस्य राहतें कोठें ?

एकनिष्ठ प्रेमाची मूर्ति

सुभद्रेची स्वभाव-रेखाहि अत्यंत कोमल व रमणीय रेखाटली आहे. तिची अर्जुनावरील प्रीति अनिवार असली, तरी ती आपली मर्यादशीलता कधींहि सोडीत नाहीं. तिच्या विरहावस्थेचें शब्दचित्र फारच बारकाईनें व कुशलतेनें किर्लोस्करांनीं काढलें आहे. अर्जुनावरील आपली निष्ठा किती दृढ आहे हें व्यक्त करतांना ती म्हणते, " पांडुनृपति जनक जया। माता कुंती यदुतनया। धर्म–भीम बांधव जया। नामें विजय जो ॥ १ ॥

अर्पियलें या शरिरा । तया लोक धनुर्धरा । न फिरे जरि चराचरा । कंठ चिरियला ॥ ”

ही सुभद्रेची प्रेमनिष्ठा पहात असूनहि श्रीकृष्ण तिला विनोदानें खिजवितो आणि म्हणतो,

“ ताई, एवढा चातुर्मास संपला, कीं पहिल्या मुहूर्तासच तूं त्या सार्वभौम राजा दुर्योधनाची पट्टराणी होणार. मग केवढा ताईला डौल येईल ! आमच्याबरोबर बोलशील तरी कां नीट मग ? ’ दुःखावर डागण्या दिल्याप्रमाणें हें बोलणें सुभद्रेच्या जिव्हारीं लागते. ती पुढें रुक्मिणीशीं बोलतांना आपली हृदयव्यथा ओकते आणि म्हणते, “ त्या कृष्णाचें बोलणें तूं नाहीं का ऐकलेंस ! चातुर्मास संपल्यावर म्हणे मी त्या मेल्याची पट्टराणी होणार; मग मला डौल येईल. अहाहा ! हीं कसाबासारखीं बोलणीं सख्ख्या भावाला शोभतात काय ग ? ” एवढेंच नव्हे तर ती संतापाच्या भरांत कृष्णाला उद्देशून म्हणते.

“ जैसा वरती दिसतो काळा आंतुनही झाला । ”

संवादांतील चातुर्य

साध्या संवादांतूनहि सुभद्रेचें विरह–दुःख व तिचें भाषण–चातुर्य कसें व्यक्त केलेलें आहे पहा.

‘ सुभद्रा : अग, तुझी तशी ममता असती, तर तूं माझी इतकी विटंबना चालली असतां, डोळ्यांवर कातडें ओढून बसली नसतीस.

रुक्मिणी : बन्सें, आतां बोललें तर तुम्हांला खंडीभर राग मात्र येईल. मला सांगा, काय तुमची विटंबना चालली भाहे ? तुम्ही होऊन विनाकारण आपल्या जिवाला संताप करून घेतां.

सुभद्रा : मला ज्या गोष्टीचा मनापासून तिटकारा आहे, ती गोष्ट तुम्ही जबरदस्तीनें माझ्याकडून करावयाला लागला, तर ती विटंबना नव्हे का ?

रुक्मिणी : हं, हं, आतां आलें ध्यानांत, भावोजींनीं इतके सायास करून दुर्योधनाला देण्याचें ठरविलें तें काय तुमच्या अकल्याणाकरितां ?

अहो, त्यांच्यासारखा वर आज सगळ्या पृथ्वींत तरी मिळेल कां ? केवढी राजसत्ता ? किती ऐश्वर्य ! इतकें असून, बरें, सौंदर्यांत तरी कमतरता आहे ? तीहि नाहीं. फार काय सांगूं, उद्यां तुम्ही त्यांची पट्टराणी झालां म्हणजे आम्हांलादेखील तुमच्यापुढें मान लववावी लागणार आहे, समजलांत ?

सुभद्रा : पुरें पुरें वर्णन. नवराबायकोंनीं जसा काय एकच कित्ता गिरविला आहे. वहिनी, तो इंद्रापेक्षांहि भाग्यवान् असला तरी मला नको असल्यावर, तेथें आग्रहानें मला देऊन माझ्या जन्माची माती कां करतां ?

रुक्मिणी : छे छे. असें बोलूं नये. असलें भाषण आम्हां बायकांना शोभत नाहीं.

सुभद्रा : परदुःख शीतळ आहे ग वहिनी ! आतां मी बोललें तर दुसऱ्यांचीं वर्मे काढतां, असें म्हणशील.

रुक्मिणी : कांहीं नाहीं. काय बोलायचें असेल तें खुशाल बोला.

सुभद्रा : बरं तर वहिनी, तुझ्या भावानें तुला शिशुपाल राजाला देऊं केली होती, तो काय रूपानें, पराक्रमानें किंवा ऐश्वर्यानें कमी होता, म्हणून तूं चोरून ब्राह्मणाबरोबर पत्र पाठवून, कृष्णाला वरलेंस. तें कां बरें ? याचें समर्पक उत्तर दे म्हणजे मी तुमचें सगळें ऐकतें. ”

रसमय भावगीतें

प्रेमभंगाच्या यातना सोशीत असतांना, सुभद्रेला वाटतें, “ व्यर्थ मी जन्मलें थोर कुळीं । लागला सर्वदा फास गळीं ॥ नच ठावें स्वातंत्र्य कसें तें । बंदिंत वास मुळीं ॥ गरिबा पोटीं येते तरि ते । मज नच देते बळी ॥ ”

आपल्या दासीपुढें आपलें तळमळणारें हृदयच जणू कांहीं सुभद्रा काढून ठेवते. तिच्या अमूर्त भावनांना मूर्त स्वरूप देतांना नाटककारानें तिच्या तोंडीं घातलेलीं पुढील दोन पदें म्हणजे रसमय भावगीतेंच होत. “ वद जाउं कुणाला शरण । करी जो हरण संकटाचें । मी धरिन चरण त्याचे । अग सखये ॥ बहु आप्त बंधुबांधवां । प्रार्थिलें कथुनि दुःख मनिंचें । तें होय विफल साचें । अग सखये ॥ मम तातजननि मात्र तीं । बधुनि

कष्टती हाल ईचे । न चलेचि कांहिं त्यांचें । अग सखये ॥ जे कर जोडुनि मजपुढें । नाचले थवे यादवांचे । प्रतिकूल होति साचे । अग सखये ॥ ”

“ किती सांगुं तुला मज चैन नसे ॥ हें दुःख तरी मी साहुं कसें । या समयिं मला नच कोणी पुसे । हा विरह सखे मज भाजितसे । मन कसें आवरूं । किती धीर धरूं ? कसें करूं ? ॥ हे बंधु नव्हत मम वैरी खरे । दावीती कसें वरि प्रेम बरें । बोलोनी पाडीती हृदयासी घरें । नको नको मला जिव । विष तरि पाजव । सखे सोडिव ॥ ”

विरहावस्थेचें वर्णन

आपला प्रियकर जो अर्जुन त्याचा शेला दृष्टीस पडतांच सुभद्रेचा विरहाग्नि भडकतो. त्याचें वर्णन किर्लोस्करांनीं किती कुशलतेनें केलें आहे. सुभद्रा म्हणते, “ अरसिक किती हा शेला । त्या सुंदर तनुला सोडुनि आला ॥ प्रेमें प्राणपतीला । मीं संतोषें हा अर्पण केला । दुर्मिळ जें स्थळ मजला । तें सहज मिळुनि या दुर्भाग्याला । तेथुनि कां हा ढळला । त्या सत्संगतिला कैसा विटला । कोंडुनि ठेविन याला । मज दृष्टीस नलगे निष्ठुर मेला ॥ ” विरहानें संतप्त झालेल्या सुभद्रेच्या मनाला बागेंतील प्रत्येक सुखदायक वस्तुहि कशी तापदायक होते, याचें विरोधाभासात्मक वर्णन पुढील पदांत केलें आहे. “ बघुनि उपवना विरहाग्नीची ज्वाला भडकें उरीं । पुष्पांचा तो सुगंध माझ्या शूल निपजवी शिरीं । कोकिल-कूजित ऐकुनि वाटे वीज कडाडे वरी । कारंजाचे तुषार भासति अग्नि-कणाचे परी । सुमंद शीतल सुगंध मारुत येतां अंगावरी । थरथर काळिज कांपे वाटे डाग बसति अंतरीं । पक्ष्यांचिं जोडपीं खेळतिं नानापरी । दे तंतुस हंसही स्त्रीच्या वदनांतरीं । सुखवाया कांता मोर सुनृत्या करी । जिकडे तिकडे पाहुनि ऐसें होतें मी घाबरी । मजला मग घायाळचि करितां मन्मथ आपुल्या शरीं ॥ ”

सविस्तर शब्द-चित्रें

“ सौभद्र ” नाटकांतील मौजेला कृष्णाचें कपट—कारस्थान जितकें कारणीभूत आहे, तितकेंच अर्जुनाचें वेषांतरहि आहे. त्रिदंडी संन्यास घेऊन

तो जेव्हां राजवाड्यांतील अंतःपुरांत ठाण मांडतो, तेव्हां त्याची किती धांदल उडते, यांचीं शब्दचित्रें या नाटकांत फार बहारीनें रंगांवलीं आहेत. दोन दासींच्या स्वभावरेखाहि भिन्नभिन्न रेखाटल्या आहेत. त्यांच्याशीं होणारें संन्यासी अर्जुनाचें वर्तन हास्यरस उत्पन्न करणारें आहे. आणि रुक्मिणी जेव्हां, 'अर्जुना!' म्हणून हांक मारते तेव्हां तर प्रेक्षकांच्या हंसून हंसून मुरकुंड्या वळतात. विदूषकाच्या विनोदापेक्षां अर्जुनाचा हा प्रसंगनिष्ठ विनोद अत्यंत हृदयंगम आहे. संन्यासी अर्जुनाचें शब्दचित्र किती हुबेहूब व सांगोपांग रेखाटलें आहे. "लाल शालजोडी जरतारी झोकदार शिरिं बांधोनि । नाचत चाले जैसा येतो रंगभूमिवर नट सजुनी । बाजे कडकड छाटि गुलाबी माळ जपाची करिं धरुनी । ध्यान करुनि बैसतां दिसे मज दांभिकपण वर ये फुटुनी । सर्वांगावर भस्माचे ते पुंड्र लाविं किती रेखोनी । त्यावरि रुद्राक्षांच्या माळा घालितसे तरि किती जपुनी । स्फटिकांचीं तीं सुबक कुंडलें डुलतांना हलती कानीं । पायिं खडावा चटचट करिती दंड शोभती करिं तीनी"

असेंच दुसरें सूक्ष्म व सविस्तर रीतीनें रेखाटलेलें शब्दचित्र म्हणजे क्रुद्ध रुक्मिणीचें. 'रागानें फुसफुसत' असतांना ती कशी दिसत होती याचें बारीक वर्णन पुढील पदांत केलेलें आहे.

"अति कोपयुक्त होय परी सुखविते मला । भृकुटि वक्र करुनि बघत । गाल लाल सर्व होत । थरथर तनु कांपवीत । इंदुवदनिं घर्म सुटला ॥ जणुं कनकाची मूर्ति अग्निमाजिं तावली । कीं नभ सोडुनि वीजचि ती खालिं उतरली । कीं ज्वलनाची ज्वाला कुंडांत पेटली ॥ एक जागिं पद न ठरत । हृदय भरत रिक्त होत । अधरबिंब काय फुटत । तैंवि वरी दांत रोंविला ॥"

बलरामाचा भोळा, प्रांजल व शीघ्रकोपी स्वभाव सर्वत्र सुसंगतपणें रंगविला आहे. लग्नाच्या ऐन वेळीं सुभद्रा नाहींशी झाली आणि ती दुर्योधनाला देण्याचा आपला व्यूह ढासळला हें कळतांच स्वतःच्या मनांत कोणकोणत्या भल्याबुऱ्या शंकाकुशंका आल्या, तें सर्व मनमोकळेपणें बलरामदादा कारस्थानी कृष्णाला सांगतात. तें इतकेंहि म्हणतात कीं,

" नाहिं सुभद्रा या वार्तेतें जेव्हां आयकिलें । सर्वांगाची लाहि होऊनी काळिज चरचरलें । एकवार वाटे कीं क्रोधें तिनें प्राण दिधले । एक वार बाटे कीं तिजला पार्थानें नेलें ॥ एकवार वाटे तूं तिजला कपटें लपवीलें । ऐसें माझ्या मनांत नाना तरंग ते आले ॥ "

या एका प्रसंगावरूनहि बलरामाच्या स्वभावावर किती स्वच्छ प्रकाश पडतो.

कल्पकतेचे नमुने

सौभद्रांतील कांहीं पदें अगदीं संस्कृत–प्रचुर आहेत हें खरें; तथापि बहुतेक पदांची रचना सरळ व प्रासादिक आहे. ' राधाधर–मधुमिलिंद ', ' वीरशिरोमणि सकल–धनुर्धर-नायक, ' ' पावना वामना या मना ' ' कोण तुजसम सांग मज, ' ' नीरक्षीरालिंगनरूपी, ' इत्यादि पदांवरून किर्लोस्करांचें भाषा-सामर्थ्य प्रतीत होतें. पण नाटकाचा प्रेक्षक म्हणजे कांहीं विद्यापीठांतील अभ्यासू विद्यार्थी नव्हे. दमल्याभागलेल्या सर्वसामान्य संसारी जनांचें तें एक विश्रांति-स्थान आहे, हें ओळखूनच किर्लोस्करांनीं आपली पद्यरचना सुगम व मनोरम ठेवली आहे. कल्पनाशक्तीनें नटलेल्या व अलंकारांनीं मोहोरलेल्या पदांची रचनाहि ते किती साधी व सुबोध ठेवतात पहा. " गंगानदी ती सागर सोडुनी । कूपा मिळण्या धांवे । किंवा राका चंद्रकलेनें राहुमुखांत पडावें । अथवा चांडालाच्या सदनीं श्रुतिनें काय रिझावें । किंवा कोमल हरिणीनें त्या वृकगेहांत शिरावें । कामधेनुनें आनंदानें खाटिकहस्तिं पडावें । तशी सुभद्रे तूं मज सोडुनी अंधसुतासि वरावें ॥ "

निसर्गाचीं शब्दरूपें

पर्जन्याचें वर्णन दोनचार वाक्यांतच किती सुंदर केलें आहे. " नभ मेघांनीं आक्रमिलें । तारागण सर्वहि झाकुनि गेले । कड कड कड कड शब्द करोनि । लखलखतां सौदामिनी । जातातांचि नेत्र दिपोनि । अति विरहि जन ते व्याकुल झाले ॥ "

तसच हें निसर्गाचें हृदयंगम वर्णन—"पुष्पपरागसुगंधित शीतल अति-मद चरे वनवायु हा । निखिल तरूंतिल पक्षि उठोनि शब्द करिति किती मंजु हा ॥ निबिड कुंजमुखिं मोरमयुरी नटुनिथटुनि नाचती हे । हरिण उडति बहु शशक धावती गिरिवरि डोलत नाग हा ॥ "

सूर्योदयाचें प्रशांत शब्दचित्र कसें प्रसन्न रेखाटलें आहे, " प्रिये पहा रात्रीचा समय सरुनि येत उषःकाल हा ॥ थंडगार वात सुटत । दीपतेज मंद होत । दिग्वदनें स्वच्छ करित । अरुण पसरि निज महा ॥ १ ॥ पक्षि मधुर शब्द करिति । गुंजारव मधुप वरिति । विरलपर्ण शाखि होति । विकसन ये जलरुहा ॥ सुखदुःखा विसरुनियां । गेलें जें विश्व लया । स्थिती निज ती सेवाया । उठतें कीं तेंच अहा ॥ "

प्रभातकालाचाच प्रसंग, पण तो उपमांच्या माळा घालून कसा सजविला आहे—" नच दृष्टिस पडती ते सज्जन उदय पावतां कली । तैसीं नक्षत्रें लोपलीं । साधूंच्या चित्तांतुनि जाते कामक्रोधावली । तमाची जशी गति जाहली । तें मुनिमन जैसें सर्व काल भासतें । हें प्रसन्न तैसें नभ आतां दीसतें । निरुद्योगि पुरुषाची लक्ष्मी क्षीणतेस पावती । तशी बघ रात्र नष्ट जाहली ॥ "

सोप्या भाषेंतील सुबोध वचनें नाटकांत सर्वत्र रिखुरलीं आहेत. तीं सुभाषितांप्रमाणें सर्वांच्या तोंडीं खेळत असतात. शब्द–सौंदर्य व अर्थ-सौंदर्य या दोन्ही दृष्टींनीं नमुनेदार असें एक सुभाषित ऐका. " राजा लुटि जरि प्रजाजनांला । माता मारी निज बाळाला । बंधु विकी जरी निज भगिनीला । शरण कुणा जावें ? "

अखेरचें अपुरें नाटक

' शाकुंतल ' व ' ' सौभद्र ' या दोन नाटकांनीं अमाप यश कमावल्यावर किर्लोस्करांनीं ' रामराज्यवियोग ' हें नाटक रचण्यास घेतलें. " प्राचीनापरि अर्वाचीना कविला बहु मानाला । देतां पाहोनी । होतो मज बहु तोष मनीं " अशा संतोषी वृत्तीनें व आत्मविश्वासानें त्यांनीं हें नाटक

हातीं धरलें. त्याच्या कथानकांत शृंगार किंवा हास्य या सर्वसुलभ रसांना वावच नाहीं. केवळ करुण व उदात्त या रसांचा आस्वाद घेण्यास रसिकांची अभिरुचि सूक्ष्म व तरल असावी लागते. पण कालिदासाचें शृंगारप्रधान 'शाकुंतल' जितकें लोकप्रिय झालें, तितकेंच भवभूतीचें करुणप्रधान 'उत्तररामचरित' हि परिणामकारक ठरलें, हा दाखला किर्लोस्करांच्या डाळ्यापुढें होताच पण 'शाकुंतल–सौभद्रां' तील नाट्यगुणच 'रामराज्यवियोगांत' कमी उतरले आणि त्यामुळें हें नाटक रसिकांच्या मनांतूनहि उतरलें. दशरथ, वरिष्ठ किंवा कैकयी यांचे स्वभाव या नाटकांत सखोलपणें चितारले गेले नाहींत. या उदात्त कथा-वस्तूचा उठाव किती उत्कर्षानें करतां येतो, याचा पुरावा पुढें खाडिलकरांनीं आपल्या 'सवती-मत्सर' नाटकांत उत्कृष्ट रीतीनें दिला.

'राम-राज्य-वियोग' हें नाटक अपूर्ण अवस्थेंत असतांनाच नाटककाराला इहलोकाचा वियोग घडला. म्हणून प्रकाशकांनीं तें रसिकजनास अर्पण करतांना म्हटलें आहे, "अत्यंत बाल्यावस्थेंत आईबाप मरून जाऊन तान्ह्या लेकराची जशी अवस्था व्हावी, तद्वत् ह्या पुस्तकाचें झालें आहे." वास्तविक, किर्लोस्करांनीं हें नाटक वाढत्या विश्वासानें "नवनाटकदर्शनलोलुप महारसिक सभाजनांना" अर्पण केलेलें आहे शंबुकाचें वेषांतर व कारस्थान आणि त्यामुळें मंथरेची कारागृहांतून सुटका असे नाट्यपूर्ण प्रसंगहि त्यांनीं कल्पनेनें रचून त्यांत गुंफले आहेत. 'नृपममता रामावरती' अशीं कांहीं पदेंहि सुगम व सुरस असल्यामुळें जनतेच्या तोंडीं खेळत असत. पण स्वभावांचा परिपोष यथास्थित न झाल्यासुळें नाटकांतील पात्रें यमपुरींतील लाकडी बाहुल्यासारखीं वाटतात.

भिन्न रसांचा उठाव

सूत्रधार–नटीच्या संवादापासूनच या नाटकांतील संघर्षाला सुरुवात होत आहे. 'व्यर्थ अम्हीं अबला' अशी तक्रार करणारी नटी स्त्री–पुरुषांच्या समानतेची मागणी करतांना असा युक्तिवाद करते कीं, "आम्हांला स्वतंत्रता तुम्ही देत नाहीं, म्हणूनच आपण म्हणतां ते अनर्थ

होतात. पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाहि स्वतंत्रता असती तर इतके अनर्थ होतेच ना, समजलांत ?" तसेंच शंबुकाच्या तोंडून ब्राह्मणाच्या वर्चस्वावर व अस्पृश्यांच्या दुर्दशेवर नाटककारानें टीका केलेली आहे. पण अशा संघर्षामुळें कथानकांत फारसें औत्सुक्य निर्माण झालेलें नाहीं. वर्षाकालाचें वर्णन 'सुटला पितृदशेचा वारा' इत्यादि शब्दांनीं नटी करते, तेव्हां दशरथाच्या भावी मृत्यूचें सूचन 'राजा वसंत जणु मृत झाला' या चरणानें केलें आहे. तसेंच कौशल्य दशरथाच्या बोलण्यांतहि दाखविलें आहे. क्रोधानें फणफणणाऱ्या कैकेयीचीं "कवणें तुज गांजियलें सांग सुंदरि' अशीं आर्जवें करीत असतांनाहि शेवटीं दशरथ तिला वचन काय देतो ? तर "रामाची शपथ सर्व सत्य मी करी" केवढी नाट्य-चमत्कृति साधली आहे येथें ! कैकेयीच्या दुष्टतेचें व त्याबरोबरच वनवासांतील त्रासाचेंहि वर्णन थोडक्यांत करण्याचें चातुर्य किर्लोस्करांनीं दाखविलें आहे.

कैकेयीमुळें दशरथ 'पदर पसरून भिक्षा मागतो' व रामाला वनवासाला पाठवूं नको म्हणून प्रार्थना करतो, तेव्हां तो म्हणतो, 'कटु तव शब्दाहुनी ॥ कंदफलें ती सेउनी राहिल कां वनीं ॥ सांग कैकयी ॥ अतितापद तुझ्याहुनी ॥ चंडकिरण शिरिं साहुनी राहिल का राम वनीं ॥ सांग कैकयी ॥ बघ तव चित्ताहुनी ॥ कठिण शिला-शयनिं पडुनि । राहिल का राम वनीं ॥ सांग कैकयी ॥" यांत कैकेयीच्या क्रूर स्वभावावर जितकी दारुण टीका आहे, तितकीच राजाची करुण अवस्थाहि चित्रित झालेली नाहीं काय ? एकाच वेळीं भिन्नरस निर्माण करण्याचें हें कौशल्य एकाच झाडावर निरनिराळीं फळें आणणाऱ्या, कलम करणाऱ्या माळ्याइतकेंच प्रशंसनीय आहे.

संगीताचें संजीवन

फक्त पांच वर्षांत अडीच नाटकें लिहून मराठी रंगभूमीला संगीताची टवटवी आणणारे किर्लोस्कर यांनीं महाराष्ट्र सारस्वतांत आपल्या नांवाचें लेणें कायमचें कोरून ठेवलें आहे. त्यांनीं संगीतप्रधान नाटकांची नवी परंपराच निर्माण करून ठेवली. त्यांनीं दिलेल्या या जीवन-रसामुळेंच मराठी

रंगभूमि पुढील साठ वर्षें सन्मानानें जगली. तिनें शकुंतलेप्रमाणें आपल्या सौंदर्यानें सर्वांना वेडें केलें, याचें कारण तिचें संगोपन व संवर्धन 'आण्णां'-च्या कण्वाश्रमांत झालें हेंच होय. 'स्वयंवरादि' जीं नाटकें पुढें लोक-प्रियतेच्या लाटेवर उंचउंच चढलीं, त्यांचीं बीजेंहि सौभद्र–शाकुंतलांत सांपडतात. प्रतिभाशाली नाटककार व अभिनय कुशल नट यांचा संगम झाल्यास मराठी नाट्यकला रसिकांना सदैव संजीवन देत राहील यांत शंका नाहीं.

नाट्यकला

What is the Book

गो. ब. देवल : : : २

'क्रांतिकारक' हें विशेषण मराठी नाटकामध्यें प्रथम कोणास लावण्यासारखें असेल, तर तें 'शारदा' या नाटकासच. त्याच्यापूर्वी सामाजिक नाटकें अजिबात नव्हतीं असें नाहीं. पण समाजाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न हातीं घेऊन व तो कलात्मक रीतीनें मांडून त्याचा प्रभाव महाराष्ट्रांतील आबालवृद्धांवर पाडणारें आणि त्यांच्या विचारांत क्रांति करणारें पहिलें नाटक म्हणजे 'शारदा'च. तें नाट्यकलेच्या दृष्टीनें जितकें यशस्वी आहे, तितकेंच प्रचाराच्या दृष्टीनें प्रभावी आहे. बाला-वृद्ध-विवाहाची भीषणता शारदेइतक्या करुण-भेदक वाणीनें दुसऱ्या कोणीच सांगितली नसेल. पन्नास वर्षे होऊन गेलीं, तरी शारदेनें फोडलेली किंकाळी महाराष्ट्रीयांच्या कानांत घुमतच आहे. त्यांतील पदेंच काय, पण गद्य वाक्येंसुद्धां घराघरांत रुळलेलीं आहेत. त्या नाटकांतील शारदा, भुजंगनाथ, भद्रेश्वर दीक्षित वगैरे विशेषनामें सामान्यनामेंच बनलीं आहेत. सरकारनें केलेला बाल-विवाह-प्रतिबंधक 'सारडा कायदा' हा महाराष्ट्रांत 'शारदा कायदा' या नांवानेंच ओळखला जातो! या नाटकाच्या कथानकावर मराठी चित्रपटहि निघाला आहे. जरठ-बाला-विवाह जरी आतां मागें पडत असला,



तरी विजोड दांपत्यें घडविण्याचा विधात्याचा छंद कांहीं सुटलेला नाहीं. त्यामुळें 'कुंकू' वगैरे चित्रपटावरहि शारदेची कांहींशी छाया पडलेली आढळते. शारदेची कीर्ति शारदीय चंद्रकलेप्रमाणें एकसारखी वृद्धिंगत होणारीच आहे.

नाट्यकलेची जन्मभूमि

सांगलीजवळचा कृष्णाकांठ नाट्याचे पिकाला फार पोषक दिसतो. मराठी रंगभूमीचे प्रवर्तक विष्णुदास भावे हे सांगलीचे, वासुदेवशास्त्री खरे हेहि त्या पचक्रोशींतले, आणि काकासाहेब खाडिलकर हेहि तेथलेच. त्याच भूमींत देवलांच्या नाट्यकलेचें भरघोस पीक आलें. त्यानंतर खांडेकर, कमतनूरकर इत्यादि नाटककार सांगलीच्या कृष्णेचेंच पाणी पिऊन पुढें आले. शारदा, मृच्छकटिक व संशयकल्लोळ या 'तीन चांदां'चा धनी असलेले देवल यांचें बालपण सांगलीसच गेलें. गोविंद बल्लाळ देवल यांचा जन्म १८५५ सालीं कोंकणांतील एका खेड्यांत झाला. पण बालपण गेलें सांगलीजवळील हरिपुरांत. तेथें संगमेश्वर या नांवाचें एक शंकराचें देऊळ आहे. तेंच 'शारदें'त प्रेक्षकांपुढें मांडण्यांत आलें आहे. तसेंच तेथील संस्थानिकानें वृद्धपणांत एका बालिकेशीं नववें लग्न करून देवलांच्या शारदा नाटकाला विषय पुरविला.

१८८५ हें वर्ष जसें भारताच्या इतिहासांत तसेंच महाराष्ट्राच्या नाट्यकलेंतहि संस्मरणीय होऊन गेलें. किर्लोस्करांचा अस्त त्यावर्षीं झाला आणि गडकऱ्यांसारखा तेजस्वी ताराहि त्याच वर्षीं उदयास आला. देवलांचें 'विक्रमोर्वशीय' हें नाटकहि त्याच वर्षीं रंगभूमीवर चमकलें. तेरा वर्षांच्या काळांत देवलांनीं सात नाटकें लिहिलीं. त्यांतील तीन इंग्रजीचीं भाषांतरें असून तीन संस्कृत नाटकांचीं रूपांतरें आहेत. एक स्वतंत्र आहे तें म्हणजे 'शारदा.' तें एकच नाटक जरी देवलांनीं लिहिलें असतें, तरी त्यांचें स्थान मराठी नाटककारांत अढळ झालें असतें.

गुरु-शिष्याची जोडी

देवल दुय्यम शिक्षणासाठीं आपल्या वडील बंधूकडे बेळगांव येथें गेले.

त्यांचे एक बंधु नट होते व एक गवई होते. बेळगांव येथें अण्णासाहेब किर्लोस्कर एका शाळेंत शिक्षक म्हणून काम करीत होते. त्याच शाळेंत देवल गेले. शाळेंतील गुरु-शिष्याची ही जोडी नाट्यसृष्टींत चिरकाल यशवंत होऊन राहिली. "चिंतुनिया मनिं बलवंताला । गोविंद रची नव कवनाला" असा भाव देवलांनीं 'मृच्छकटिकांत' किर्लोस्करावद्दल प्रकट केला आहे. 'संशयकल्लोळां' तहि 'बलवत्पदनत गोविंदानें' अशी नम्र भूमिका त्यांनीं घेतली आहे. शारदेची नांदीहि तशीच. कविता व नाटकें लिहिण्याचा नाद देवलांना लहानपणापासून होता. त्यांनीं एक कविता करून किर्लोस्करांना दाखविली. त्यांनीं त्यांना शाबासकी दिली. अशा या वाङ्मयीन नादामुळें मॅट्रिकचें त्यांचें यश प्रथम हुकलें. तेव्हां देवल कोल्हापुरास गेले व १८७९ सालीं मॅट्रिक झाले. नंतर त्यांनीं बेळगांवच्या हायस्कुलांतच शिक्षकाची नोकरी धरली. तींत त्यांचें रसिक मन कसें रमणार? लवकरच त्यांनीं ती नोकरी सोडली. तेथून ते पुण्यास आले व शेतकी-शाळेंत दाखल झाले. शेतकीची परीक्षा १८९४ सालीं ते उत्तीर्ण झाले. दोन वर्षे ते न्यू इंग्लिशमध्यें वनस्पतिशास्त्राचे शिक्षक म्हणून राहिले. त्याच सुमारास त्यांनीं 'कादंबरी-कलाप' नांवाचें मासिक काढलें. मोरोपंत व वामन-पंडित यांचा व्यासंग त्यांनीं चांगला केला होता. 'पुणें वैभवांत' ते स्फुट लेख लिहीत. 'लंडन रहस्य' ही कादंबरी त्यांनीं भाषांतरिली.

भाषेंतील प्रसाद

भावे यांनीं मराठी नाट्यमंदिराचा पाया घातला, किर्लोस्करांनीं त्यावर संगीताचा पहिला मजला बांधला व देवलांनीं सामाजिक नाटकाचा दुसरा मजला उभारला. त्यापुढें कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी, अत्रे यांनीं निरनिराळ्या कलागुणांचे मजले एकावर एक चढवून मराठी नाट्यांची इमारत टोलेजंग बनविली. किर्लोस्करांनीं आपलें पहिलें नाटक कालिदासाच्या आधारावरच रचलें आणि दुसरें जरी स्वतंत्र असलें, तरी त्याची कथावस्तु महाभारतांतून उचलली आहे. पण देवलांचें 'शारदा' नाटक म्हणजे अगदीं स्वतंत्र कृति. संस्कृत खाणींतील मातीसुद्धां त्यांनीं घेतलेली नाहीं. स्वतःच्या

बुद्धीनें सारें कथानक रचून, संवाद व पदें हीं स्वतःच्या कल्पनेनेंच त्यांनीं घडविलीं आहेत, हें विशेष. त्यांच्या भाषेंतील प्रसाद हा गुण तर अलौकिक आहे. शुभ्र गंगाजलाच्या तळाशीं असलेलीं लहानशी वस्तुहि जशी स्वच्छ दिसते; तसा त्यांच्या स्फटिकासारख्या भाषेच्या अंतरंगांतील आशय शुद्ध स्वरूपांत व्यक्त होतो. चष्म्याचें पारदर्शक असें पातळ भिंग तयार करण्यासाठीं यंत्रावर गारगोटी जशी वारंवार घासली जाते, तशी देवलानीं आपली भाषा सोपी करण्यासाठीं पुनः पुनः परिश्रम घेतले. त्यांचा कलाकुशल हात शारदा नाटकाच्या भाषेवर आठ वर्षें फिरत होता. त्यामुळें त्या नाटकाची भाषा सुबोध व मनोरम आहे आणि पूर्ण अर्थवाहकहि पण आहे.

अभिनयाचे शिक्षक

नाटककार म्हणून जसें देवलांनीं यश कमावलें, तसेंच नट व नाट्य–शिक्षक म्हणूनहि नांव केलें. अश्वत्थामा, अथेल्लो, वगैरे भूमिका ते चांगल्या वठवीत. पण त्याहिपेक्षां त्यांची मोठी कामगिरी म्हणजे नाट्य–शिक्षकाची. नाटक मंडळींत ' तालीम–मास्तर ' म्हणून त्यांनीं जें काम केलें, तें मराठी रंगभूमीला फार उपयोगी झालें. त्यांच्याइतका वाकबगार तालीम मास्तर विरळा. शकुंतलेची भूमिका करणाऱ्या पुरुष नटानें कळशी कशी घ्यावी, शारदेची आई होणाऱ्या नटानें केर काढतांना डावा हात कोठें ठेवावा, फार काय, कोणत्या पात्रानें कसें बोलावें ? कसें चालावें ? कसें उभें रहावें ? याचेंहि शिक्षण देवलमास्तर फार बारकाईनें व मार्मिकतेनें देत. अभिनयाची एक शाळाच जणुं कांहीं ते चालवीत होते. त्यांच्या तालमींतूनच बालगंधर्वासारखें नट–रत्न निर्माण झालें. देवलमास्तरांचे हे उपकार नारायणराव राजहंस (बालगंधर्व) कृतज्ञपणें व प्रकटपणें आठवतात. स्वतंत्र सामाजिक नाटकांची परंपरा निर्माण करण्याचा देवलांचा मान जितका मोठा, तितकेंच अभिनय कुशल नटांची पिढी तयार करण्याचें त्यांचें श्रेयहि मोठें. नट, नाटककार व नाट्य–शिक्षक असा यशाचा तिपदरी हार कंठीं धारण करून देवल हे स्वर्गीं गेले व शारदेच्या चरणीं विलीन झाले. मिरज येथें ता. १४ जून १९१६ रोजीं मधुमेहानें

त्यांना मृत्यु आला. मृत्युपूर्वी त्यांनीं ' अनाथ बालिकाश्रमा 'स तीन हजार रुपयांची देणगी दिली. त्यांना ' शापसंभ्रमा 'नें हजार रुपयांचें बक्षीस दिलें होतें आणि ' शारदेचा ' मोबदला हजार रुपये मिळाला होता. त्याची तालीम शिकविण्यासाठीं त्यांना पांचशें रुपये निराळे देण्यांत आले होते.

संस्कृत-इंग्रजीचीं रूपांतरें

' दुर्गा ' हें नाटक देवलांनीं ' इझाबला ' या इंग्रजी नाटकावरून रचलें त्यांतील कुणबाऊ भाषा चांगली आहे. बक्षिसाच्या स्पर्धेंत खरे-शास्त्री यांच्या ' गुणोत्कर्षास ' पहिलें व देवलांच्या ' दुर्गेस ' दुसरें बक्षिस मिळालें. शेक्सपिअरच्या अथेल्लोचें रूपांतर ' झुंझारराव ' या नांवानें देवलांनीं सरस केलें. ' चंद्रकांत ' राजाची कन्या हें पद याच नाटकापैकीं. त्या पदावरूनच ' चंद्रकांत ' हें वृत्त जन्मास आलें. All in the wrong या मर्फीच्या प्रहसनावरून देवलांनीं ' फाल्गुनराव ' हें नाटक रचलें. त्याला १९१६ मध्यें संगीताची जोड देऊन, त्यांनीं ' संशयकल्लोळ ' नांवाचें आपलें अत्यंत हंसरें नाटक रंगभूमीवर उभें केलें. या नाटकाचा जन्म नाटककाराच्या मृत्यूनंतर झाला असल्यानें हरिभाऊ आपटयांनीं प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें " संशयकल्लोळ पहात असतां प्रेक्षकवृंदांत हास्यकल्लोळ निर्माण झाला, तरी त्यांच्या चित्तांत शोककल्लोळ उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं." ही तीन इंग्रजी नाटकांचीं भाषांतरें झालीं. संस्कृत नाटकांच्या भाषांतरास देवलांनीं ' मृच्छकटिका 'पासून सुरवात केली. परशुरामपंततात्या गोडबोले यांनीं मृच्छकटिकाचें भाषांतर केलेलें होतें, पण रंगभूमीच्या दृष्टीनें फेरफार करून देवलांनीं आपलें मृच्छकटिक नाटक रसिकांपुढें ठेवलें. ' विक्रमोर्वशीय ' हें दुसरें संस्कृत नाटक देवलांनीं मराठींत आणलें. तें करतांना आपल्या संस्कृतमधील शंकांचें समाधान करून घेण्यासाठीं देवलांनीं डॉ. भांडारकरांचेंहि साहाय्य घेतलें. तिसरें ' शापसंभ्रम ' हें नाटक बाणाच्या कादंबरीवरून त्यांनीं रचलें. इंदूरच्या महाराजांनीं ' कादंबरी'च्या कथानकावर उत्कृष्ट नाटक लिहिणारास एक हजार रुपयांचें बक्षिस लावलें होतें, तें देवलांना या नाटकामुळें मिळालें.

लवचिक भाषा-शैली

शेक्सपिअरच्या अथेल्लो नाटकाचें भाषांतर महादेवशास्त्री कोल्हटकर यांनीं केलेलें होतें. पण रंगभूमीला शोभेल असें रूपांतर देवलांनीं केलें. 'भाषणांचा झोक काळास व पात्रास साजेल असा ठेवला आहे संविधानकहि मुळांतलें सौंदर्य बिलकूल कमीं होऊं न देतां इकडील एका ऐतिहासिक स्थितीशीं जितकें जुळेल तितकें जुळेल.' अशी आपली भूमिका देवलांनीं 'झुंझारराव' या नाटकाच्या प्रस्तावनेंत मांडली आहे. सोपे शब्द व छोटीं वाक्यें वापरूनहि तें मुळांतला भावार्थ कसा प्रगट करतात पहा.

जाधव०—धनीसाहेब, पुरुषाला काय अगर बायकोला काय, अब्रू ही मोठी प्यार आहे. माझी संपत्ति कुणीं चोरली, तरी तिची मला बिलकुल हळहळ वाटायची नाहीं; कारण तिची किंमत ती काय ! आज माझी, उद्यां त्याची, अशी ती हजारांची बटीक. पण जो माझ्या अब्रूला बट्टा लावतो, त्यापासून स्वतः श्रीमंत न होतां मला मात्र सफाई बुडघतो. ''

झुंझारराव्याच्या कानांत जाधवराव अशा रीतीनें विष ओततो. त्यामुळें तो संशय-पिशाचाच्या तावडींत सांपडतो. 'संशयकल्लोळांत' हि 'संशय खट झोटिंगा'चाच सारा खेळ आहे. पण तो सामान्य माणसाशीं असल्यानें हास्याला कारण झाला. परंतु झुंझारराव शूर व मानी असल्यानें त्याचें पर्यवसान भीषण झालें !

केवळ घरगुती भाषा वापरून संसारांतील सुखदुःखांचे प्रसंग नाजुकपणें रंगविण्याचीच कला देवलांच्या लेखणींत आहे असें नव्हे, वीरश्रीचा आवेश व्यक्त करण्याची शक्तीहि तिच्या अंगीं आहे. पात्रानुरूप व प्रसंगानुरूप आपली भाषा ठेवण्याचें देवलांचें कौशल्य असामान्य आहे. संशयानें व संतापानें बेभान झालेल्या झुंझारराव्याची भाषा किती अर्थपूर्ण आहे पहा. '' फक्त हुकमाची वाट, कीं ज्यांनीं शत्रूवर एकदम तुटून पडावं, असे माझे रणबहादुर शूर शिपाई, तसेंच भालाबर्चीकमानवाले उमदे शिलेदार, ज्यांच्या रणमस्त घोड्यांचा खिंकाळा ऐकून शत्रूच्या फौजेची दाणादाण उडून जावी, त्या सर्वांना मी अंतरलों. त्याचप्रमाणें अंगांत वीरश्रीचा संचार व्हावा असा डंकेनौबतीचा 'धुडुं धुडुं' आवाज, कानटाळे

बसविणारा शिंगांचा शब्द, तसाच कर्ण्याचा घनघोर भुंकार पुनः माझ्या कानीं पडायचा नाहीं. तीं अफाट रणमैदानें, तो भगवा झेंडा, त्या भयंकर गडगडाट करणाऱ्या तोफा, तो लष्करी लवाजमा, डामडौल, ती वीरश्री, ती कीर्ति, या–सर्वांना–सर्वांना माझा शेवटचा रामराम !"

'मृच्छकटिका'चीं यशोबीजें

संस्कृतांत जसें कालिदासाचें 'शाकुंतल' व भवभूतीचें 'उत्तररामचरित', तसेंच शूद्रकाचें 'मृच्छकटिक' हें नाटक प्रतिष्ठा पावलेलें आहे. अर्थात् प्रत्येकाच्या मान्यतेचें कारण निरानिराळें आहे. 'वास्तव स्वरूपाचें' नाटक या दृष्टीनें सर्व संस्कृत–वाङ्मयांत मृच्छकटिक हें अद्वितीयच ठरेल. चोर–जुगारी, संन्यासी, वेश्या, राजपुरुष, क्रांतिकारक—अशा नानाविध वर्गांतील व्यक्तींच्या मूर्ति या नाटकांत एकत्र पहावयास सांपडतात. त्यांतील नायक चारुदत्त हा धीरोदात्त म्हणून प्रेक्षकांच्या चित्तांत खेळत राहतो. आणि मूर्ख व भित्र्या शकाराचें पात्र तर अगदीं विनजोड आहे. खाडिलकरांचा 'लक्ष्मीधर' हा त्याचा वंशज शोभतो. ही जशी पात्रांची विविधता, तशीच भिन्नभिन्न घटनांची गर्दीहि नाटकांत उसळली आहे.

नाटक हें मुख्यतः घटनाप्रधानच असतें. आणि त्या घटना विरोधांतून विकास पावणाऱ्या असल्या म्हणजे कथानकांत किती रंग भरत जातो, याचें उत्तम उदाहरण म्हणजे मृच्छकटिक. पाठीशीं जुगारी लागलेला संवाहक वसंतसेनेकडे येतो आणि ती त्याला सावकारी पाशांतून मुक्त करते. या एका घटनेचा उपयोग नाटकाचे अखेरपर्यंत किती कुशलतेनें करून घेतलेला आहे. हत्तीला ठार करून आलेला विजयी कर्णपूरक हा वसंतसेनेच्या कानीं चारुदत्ताचें औदार्य घालतो, हाहि प्रसंग वसंतसेनेच्या चारुदत्तावरील प्रेमाचें उद्दीपन करणाराच आहे. चारुदत्ताच्या घरूनच शर्विलकानें चोरून आणलेल्या दागिन्यांची उलटपुलट अदलाबदल करून त्याचा उपयोग अनेक प्रकारांनीं नाटककारानें करून घेतलेला आहे. गाड्यांची अदलाबदल हें तर या कथानकाचें कळसूत्रच आहे. शेवटीं खुनाचा प्रयत्न, खटल्याचा प्रवेश, वधस्तंभाकडे नेला जाणाऱ्या चारुदत्ता-

३७१३१५३

बद्दल पुत्राचा हृदयभेदक शोक आणि क्रांतिकारक आर्यकाली यशःप्राप्ति व बंधमुक्त झालेल्या चारुदत्ताची शकाराबद्दलची क्षमावृत्ति—इत्यादि एकापेक्षां एक हृदय हलविणारे प्रसंग या नाटकांत मोठ्या चातुर्यानें गुंफलेले आहेत. आणि या घडामोडी घडतात अवघ्या चार दिवसांत. त्यामुळें कथा–प्रवाहाला विलक्षण वेग आलेला आहे. वसंतसेनेचा शृंगार, शकाराचें हास्य व चारुदत्ताचें कारुण्य—या तीन रसांनीं सारें कथानक भिजून चिंब झालेलें आहे.

भाषांतराची कला

मूळचें संस्कृत नाटकच इतकें रसदार आणि त्याचें देवलांनीं केलेलें भाषांतर तितकेंच बहारदार. भाषांतर न वाचतां आपण स्वतंत्र मराठी नाटकच वाचत आहोंत, असें वाचकाला वाटण्याइतकी शुद्ध व सरस रचना देवलांची आहे. मूळचा आशय व्यक्त करण्यासाठीं जरूर तेथें त्यांनीं विस्तारहि केला आहे. आणि मराठीचा डौल सर्वत्र शाबूत ठेवलेला आहे. ‘ कोणी घर पाहून कांहीं ठेव ठेवत नाहीं, मनुष्य पाहून ठेवतें, ’ (पुरुषेषु न्यासा निक्षिप्यन्ते न पुनर्गेहेषु ।) ‘ पहिल्यानें ही सहज कला म्हणून शिकलों परंतु आतां तीच कला माझ्या उपजीविकेला साधन होऊन बसली आहे ’ (कलेति शिक्षिता आजीविका संवृत्ता) अशीं किती तरी सहजरम्य भाषांतरें या नाटकांत आढळतात. मुळांतील उपमाच आधीं मार्मिक आणि त्यांचा अनुवाद देवलांनीं खुबीनें केलेला–अशीं उदाहरणें अनेक आहेत. प्रारंभींच सूत्रधार ‘ थाटमाट सदनि नवा बघुनि ’ म्हणतो, ‘ जळकी कढई ओढल्यामुळें, भुईवर जी काळी रेघ उमटली आहे, तेणेंकरून वैष्णवाची मुलगी कपाळीं अंगाऱ्याची रेघ लावून जशी शोभते, तशी ही भूमि फारच शोभते आहे. ’

चारुदत्ताच्या वैभवकालीं आपण खाद्यपेयांवर कसें लोळत होतों हें सांगतांना मैत्रेयानें किती रम्य उपमा दिली आहे पहा. ‘ चिताऱ्याचीं बोटें जशीं अनेक प्रकारच्या रंगांनीं भरलेलीं असतात, तसे माझे हात नाना प्रकारच्या पक्वानांनीं भरलेले असत. कंटाळा आला म्हणजे बोटाचा

स्पर्श मात्र करून पात्रांतील पदार्थ पलीकडे सारीत होतों. ' साधा दिवा, तो वाऱ्यानें थरथरत असलेला पाहून मैत्रेयानें जी एक लहानशीच उपमा दिली आहे ती या नाटकाचा शेवट सूचित करणारी आहे. तो म्हणतो, ' प्रदोषकाळच्या मंद वायूनें हा दिवा पहा कसा कांपतो आहे ! वधस्तंभापाशीं नेलेल्या बोकडाचें काळीज असेंच कांपत असतें. ' शकाराला प्रतिकार करतांना मैत्रेय म्हणतो, 'आम्हांसारख्या दुर्दैव्यांच्या नशिबाप्रमाणें किंवा तुम्हासारख्या दुर्जनांच्या हृदयाप्रमाणें हें वांकडें लांकूड आहे, यानें तुझें डोकेंच फोडून टाकितों !' वसंतसेना व चारुदत्त हीं प्रेमानें एकमेकांची क्षमा मागूं लागतात व पाया पडूं लागतात, तेव्हां मैत्रेयानें किती गमतीच्या उपमा दिल्या आहेत. तो त्यांना म्हणतो, ' तुम्ही दोघेंहि सुखासुखी नम्र होऊन साळीच्या लोंबराप्रमाणें एकमेकांकडे डोकीं लवविता, हें आहे तरी काय ? मीसुद्धां आतां उंटाच्या ढोपराप्रमाणें आपलें डोकें लववून अशी प्रार्थना करितों कीं, '

पदांतील औचित्य

किर्लोस्करांप्रमाणें देवलांनींहि आपल्या नाटकांत पदांचा पाऊस पाडला आहे. मृच्छकटिकांत दीडशेंवर पदें ठेचून भरलीं आहेत. बोलणारी व्यक्ति व घडणारा प्रसंग यांना अनुरूप अशा भाषाशैलीनें हीं पदें नटलेलीं आहेत. त्यांच्या चाली संगीताच्या दृष्टीनें कर्णमधुर आहेत. त्यांतील कांहीं किर्लोस्करांच्याच आहेत. ' भूपति खरे ते ' ही चाल तर इतकी लोकप्रिय झाली कीं, त्या नांवाचें स्वतंत्र जातिवृत्तच मराठींत रूढ झालें. ' दासि ऐसें, ' ' जरि नाहिं कमल,' ' तोचि पुरुष भाग्याचे,' ' अधम किति पालकां ' इत्यादि पदें रसिकांच्या जिव्हाग्रावर खेळत असतात. चारुदत्ताचें गुणगान करणारें पद किती प्रौढ भाषेनें सजलेलें आहे पहा.

" दीनजनांचा कल्पतरुचि जो साह्य सज्जनांचा । विद्याविनयें नम्र सदा किति कोष सद्गुणांचा ॥ सदाचरण-रत जन-निकषचि आदर्श शिक्षितांचा । मर्यादेचा सागर आदर राखी सकलांचा ॥ सुहृज्जना संतोषदायि बहु निधि औदार्याचा । ऐसा सद्गुणमणिमंडित जो धन्य जन्म त्याचा ॥ "

उदात्त स्वभाव-रेखा

चारुदत्त हा तर नायकच. पण या नाटकांतील चोरसुद्धां किती थोर गुणांचा आहे. शर्विलक आपल्या चोरीच्या मर्यादा सांगतांना म्हणतो, " फुलें वेलीचीं । भूषणें तशीं युवतींचीं ॥ नाहीं कधिं मीं गे चोरिलीं । द्विजयज्ञधनें नच मीं हरिलीं ॥ बाळें वित्तार्थ न कधीं नेलीं । रीति चौर्याची धरिली ही सुविचाराची ॥ " किती सोप्या भाषेंत केवढा सात्विक विचार सांगितला आहे ! वेश्येची स्वभाव-रेखाहि उदात्तच दाखविली आहे. फार काय, फाशी देणारे मांगहि उदार मनाचे आहेत. नाटकाचें सारें वातावरणच उदात्त आहे.

वसंतसेना ही बोलून चालून वेश्या असली तरी ती धनाला तुच्छ मानणारी व गुणलुब्ध अशीच दाखविली आहे. ती आपल्या दासीला म्हणते, " भूपती खरे ते वैभवसुख सेवीती । बहु दास सेवनीं दक्ष सदा राहाती । अधिकारबळानें राज्यसूत्र चालिती । त्या प्रजा सकळ सन्मान थोर तो देती । म्हणुनी कां त्यासि सेवावे, सांग तूं । धनाचि कां अधिक मानावें, सांग तूं । गुण त्यांचे कां न बघावें, सांग तूं । संपत्तिबळाच्या मदें धुंद ते होती । स्वच्छंद वागती नाहिं तया नयरीती ॥ "

' मानापमानां'तील भामिनीचाच हा पूर्वावतार नव्हे काय ?

संगीताची रागदारी

भाषेच्या प्रसन्नपणालाच संगीत रागदारीची जोडहि देवलांनीं दिली आहे. त्यामुळें त्यांचीं पदें गुणगुणणारे रसिक असंख्य आहेत. " नोहे हा पवन जवन वारु भासतो । जलधारा शरभारचि काय वर्षतो । गर्जत घन-भेरि महा । चपलाध्वज झळकत हा । हरुनि मेघभूप पहा । नेतो शशिकर-समुहा । जेवि सबल नृप पर-कर-भार नेत तो । "

घरांतील दिवटीहि ' स्नेहशून्य ' झाली असल्यामुळें खिन्न झालेला चारुदत्त समोर आकाशांत चंद्रबिंब उगवतांना पाहतो. त्या चंद्राचें किरण अंधारामध्यें शिरत असतांना चारुदत्ताला वाटतें, दुधाच्या धवलधारांचा वर्षाव काळ्या चिखलावर जणुं होत आहे. पद-लालित्य, अर्थ-गौरव व

रागदारीची चाल या तिन्ही दृष्टींनीं सुंदर असलेलें हें पद असें-" रजनिनाथ हा नभीं उगवला । राजपथीं जणुं दीपाचि गमला ।। नवयुवतीच्या निटिलासम किती । विमल दिसे हा ग्रहगण भोंवति । शुभ्रकिरण घन तिमिरीं पडती ।। पंक्ती जेंवि पयाच्या धारा ।। "

रंगभूमीवरील कामगिरी

देवल हे निष्णात नाट्य–शिक्षक होते. त्यामुळें त्यांचीं नाटकें रंगभूमीवर विलक्षण परिणामकारक होतात. अंकाच्या सुरवातीस प्रेक्षकांची ये-जा चालू असते, म्हणून गौण पात्रांचा ' बळी '–प्रवेश कसा रचावा, नायकनायिकांचें आगमन औत्सुक्यपूर्ण रीतीनें कसें घडवावें, पडद्यामागील देखाव्यांच्या उभारणीसाठीं मधूनमधून लहानलहान प्रवेश कसे घालावेत, ही सारी कारागिरी त्यांना पुरी माहीत होती. तसेंच प्रेक्षक-वृंदाच्या बुद्धिची पातळी जाणण्याइतकें ' समुदायाचें मानसशास्त्रहि ' त्यांना स्वयंभूपणें अवगत होतें. त्यांची स्फटिकासारखी पारदर्शक भाषाशैली, त्यांची पारिजातकासारखी प्रसन्न पद्यरचना आणि प्रसंगनिष्ठ विनोदाचे सुगंधी फवारे या गुणांमुळें त्यांचें नाटक प्रेक्षकांच्या हृदयाचा कबजा नांदीपासून भरतवाक्यापर्यंत कसा घेतें, याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे 'संशयकल्लोळ.'

स्वतंत्र कृतीचीं साधनें

एका तसबिरीनें दोन जोड्यामध्यें जो गमतीदार घोटाळा उडविला, त्याची फक्त दोन दिवसांची मौजच या नाटकांत रंगविली आहे. नाटकाची रंगत एकसारखी वाढत जाते. ' फाल्गुनराव मूळचा विलायती " पण त्याला देवलांनीं अस्सल महाराष्ट्रीय बनविला आहे. फाल्गुनराव, अश्विनशेट, वैशाखराव इत्यादि भारतीय महिन्यांचीं नांवें पुरुषपात्रांना दिलेलीं आहेत, तर कृत्तिका, स्वाती, रोहिणी इत्यादि नक्षत्रांचीं नांवें स्त्रियांना लेवविलीं आहेत. कार्तिकनाथाच्या दीपोत्सवापासूनच नाटकाचें मंगलाचरण झालेलें आहे. आणि त्यांत तुळशीवृंदावन, सत्यनारायण वगैरे महाराष्ट्रीय वस्तु पेरून ठेवलेल्या आहेत. मुळांतील चहाचें येथें ' मसाल्याचें दूध ' झालें आहे. असें सारें बातावरण महाराष्ट्रीय आहे–परकें मुळींच

नाहीं. संवाद अत्यंत हुगम व सुटसुटीत आहेत. स्त्रियांच्या तोंडीं खेळणाऱ्या म्हणी कृत्तिकेच्या भाषणांतून जागोजाग सहज ओसंडत आहेत. 'चुलीपुढें शिपाई आणि दाराबाहेर भागुबाई,' 'नवी नवी नवलाची आणि वापरली कीं कवडीमोलाची,' 'नागीण पोसली आणि पोसणारालाच डसली,' 'आपण शेण खायचं आणि दुसऱ्याचं तोंड हुंगायचं,' 'कोण चाललं पुढं, तर कितक्याचं घोडं,' 'मुद्रा बावळ्याची आणखी नजर कावळ्याची,' अशा म्हणींचे तेजस्वी मणि सर्वत्र चमचम् करीत आहेत.

संशयी स्वभावाचे पुतळे

फाल्गुनराव रंगभूमीवर आला कीं, हास्याचा हौदच आला असें प्रेक्षकांना वाटतें. कोणत्याहि साध्या घटनेंतून संशयाचे वेडेवांकडे धागे काढण्यांत त्याची बुद्धि अत्यंत चपळ आहे. स्वतःला तो बुद्धिमान समजतो. 'आमचं शस्त्र म्हणजे विचार' अशी त्याची आढ्यता. पण खरोखर संशयाच्या शस्त्रावरूनच त्याचीं पावलें पडत असतातं. 'युक्तीयुक्तीनं पाऊल टाकायचं' असें तो आपल्या मनाला बजावतो, पण त्याचें पाऊल संशयाच्या घसरगुंडीवरून एकसारखें खालीं खालीं घसरतच येतें. हा बालिश खेळ पहातांना हंसूं येणार नाहीं, असा प्रेक्षक दुर्मिळ. आपल्याला 'पुराव्यावर पुरावा' मिळूं लागला, अशा समाधानांत तो असतो; पण खरोखर ते असतात सारे रबरी फुगे—संशयाच्या वाऱ्यानें खूप फुगविलेले—पण सत्यस्थितीची टांचणी लागतांच फुटणारे. 'चाललं सुताला सूत जुळत' असा आनंद फाल्गुनराव मानतो, पण वस्तुतः तीं असतात सारीं संशयाचीं भुतें. त्याला आपली पत्नी कृत्तिका हिचा जसा संशय, तसाच कृत्तिकेला त्याचाहि. त्यांत भर अश्विनशेटच्या संशयी स्वभावाची. उन्हानें घेरी येऊन रेवती आंब्याच्या झाडाखालीं पडली असतांना तिला फाल्गुनराव सावरतो आणि तेथें रेवतीच्या हातून अश्विनशेटची तसबीर खालीं पडते. या एका पराचे कैक कावळे नाटकाच्या पांच अंकांत उडत असतात. सारा दोन दिवसांचा घोटाळा पण त्यांत गुंतागुंती किती. 'एकदां मनुष्य

संशयाच्या डगरीवरून घसरायला लागलं कीं, चाललं घसरत खालीं खालीं. ज्या रंगाचा चष्मा त्याच रंगाची वस्तु, हेंच खरं.' हा प्रकाश फाल्गुनरावाच्या डोक्यांत पडतो, पण अगदीं अखेरीस.

संवादांचें कौशल्य

आपल्या पत्नीवरील संशयाचा छडा लावण्यासाठीं आपला नोकर भादव्या, याला वश करून घेण्याकरतां फाल्गुनराव त्याला आमिष दाखवितो. त्या आमिषाचें स्वरूप त्याच्या कंजूषपणामुळें कसें कमी कमी होतें हें पहातांना प्रेक्षकांमध्यें खसखस पिकल्यावांचून रहात नाहीं. फाल्गुनराव म्हणतो, "तूं खरं बोलणारा आणि इमानी नोकर आहेस, म्हणून माझ्या मनांतून या दसऱ्याला तुझ्या हातांत एक चांगलसं रुप्याचं कडं ठोकून घालायचं आहे. कडं चालेल कीं एक अशा मोठ्या पदराचं पागोटं बांधू? बोल. दोन्ही आवडत नसली तर छान त्रिधारी रेशमीकांठीच धोतर देतों हवं तर. कां तूर्त कांहींच नको? कांहीं हरकत नाहीं. पुढं पाहूं केव्हां तरी."

कृत्तिकेचहि स्वभाव फाल्गुनरावासारखाच घायकुती. ती आपल्या मोलकरिणीचाहि संशय घेऊन म्हणते, 'सांग खोटं. तुझी जीभ झडेल बघ. चांडाळणी, नवराबायकोंत असा बिघाड घालतेस, सात जन्म मुरळी होशील..... नवरे, नवरे, नवरे! असले कसले हे कसाब नवरे?" साध्या संवादांतून स्वभाव प्रगट करण्यांत देवलांचा हातखंडा आहे. रेवतीचा स्वभाव 'मी बरीच मत्सरी, थोडी मानी आणि जराशी रुसरी आहें' या तिच्या शब्दावरूनच प्रगट होतो. तिच्या थट्टेखोर स्वभावामुळें घोटाळ्यांत घोटाळा माजतो.

गद्यांतील काव्य

या नाटकांतील गद्य इतकें सरस आहे कीं तें पद्याप्रमाणें वाटतें, आणि पदें इतकीं कल्पकतापूर्ण आहेत कीं तीं काव्यंच वाटतात. गद्यांतहि 'प्रासाला प्रास' साधून देवलांनीं किती मौज केली आहे.

रेवती—अशी चूक म्हणून माझ्या हातून कधीं व्हायची नाहीं.

आश्विन—मी पुनः असा संशय येऊं द्यायचा नाहीं.

रेवती—खरंच मी अगदीं वेडेपणा केला.
आश्विन—माझ्याहातून हा मूर्खपणाच झाला.
रेवती—बरं, झालं तें झालं, आतां काय त्याच ?
आश्विन—हो. होऊन गेल्यावर मग काय करायचं ?
रेवती—पण हा अबोला चालायचा किती वेळ ?
आश्विन—पण तिहींचा आणि सहाचा बसायचा कसा मेळ ?

'शारदे' चे गुण

मृच्छकटिक व संशयकल्लोळ हीं दोन्ही नाटकें अत्यंत रसदार व रंगदार असलीं; तरी देवलांनीं तीं दत्तक घेतलेलींच. पण त्यांच्या प्रतिभेचें औरस नाटक म्हणजे शारदा. मराठींतील उत्कृष्ट नाटकें एखाद्या आंतर्राष्ट्रीय स्पर्धेंत पाठवावयाचीं झालीं, तर त्या पांचांत शारदेचें नांव नक्की असेल. तिचा बाप कांचनभट हा एक धनलोभी भिक्षुक आहे. पैशासाठीं तो आपल्या पोटचा गोळा भुजंगनाथ नांवाच्या श्रीमंत म्हाताऱ्यास विकावयास तयार होतो. हा बाला-जरठ-विवाह जमविण्याचें कामीं भद्रेश्वर दीक्षितांची चलाखी चालू असते. पण शंकराचार्यांचा एक ध्येयवादी व समाजसेवक शिष्य कोदंड हा त्यांचे बेत हाणून पाडतो आणि शारदा आत्महत्येस प्रवृत्त झालेली असतांना, तिला वांचविण्यासाठीं, शेवटीं तिचें पाणीग्रहणहि करतो. यांतील शारदेची मूर्ति म्हणजे करुण रसाची केवळ धारच आहे. उलट भुजंगनाथाचे म्हातारचाळे पाहतांना प्रेक्षकांचे पोट हंसून हंसून दुखूं लागतें. वल्लरीसारख्या शारदेच्या मैत्रिणींचीं स्वभावचित्रेंहि अगदीं रेखीव व रसपोषक आहेत. जसा प्रसाद; तसाच संयम हाहि देवलांच्या लेखणीचा अलौकिक गुण आहे. सबंध नाटकांत एक पात्र वायफळ नाहीं, एक प्रसंग निरर्थक नाहीं कीं एक शब्द जादा नाहीं. कोदंडाची व्याख्यान-बाजी आहे पण तिलाहि फारसा वाव दिलेला नाहीं. केवळ रसपूर्ण प्रसंग वेंचून व पात्रांचे स्वभाव ठसठशीत रंगवून सहजसुंदर भाषेनें देवलांनीं सारें कथानक रंगविलेलें आहे. यांतील गद्य काय, पद्य काय—सारेंच रमणीय आहे. 'विविध गुणीं जें खचिलें' ही या नाटकाची प्रशंसा सार्थच आहे. पदांची संख्या ९४ आहे. आणि तीं सारीं पदें सोपी व रसाळ आहेत.

बाल—मनाचीं चित्रें

शारदेचें वय अवघें चवदा वर्षांचें. तिला लहानपणचा काळ सुखाचा वाटतो. तिच्या मनाचें चित्र देवलांनीं किती थोड्या, सोप्या व रसपूर्ण शब्दांनीं रेखाटलें आहे ! शारदा म्हणते, " बाळपणींचा काळ सुखाचा, आठवतो घडि घडी ॥ तशि नये फिरून कधिं घडी ॥ किती हौसेनें टाकिलि असती त्यांत मागुती उडी ॥ परि दुबळी मानव कुडी ॥ मनिं नव्हति कशाची चिंता ॥ आनंद अखंडित होता ॥ आक्रोश कारणा-पुरता ॥ जें ब्रह्म काय तें मायबाप ही जोडी ॥ खेळांत काय ती त्याची गोडी ॥ " ' ते हि नो दिवसा गताः ' याप्रमाणेंच हे बोल हृदयंगम नाहींत काय ?

आपल्याबरोबरीच्या मैत्रिणींचीं लग्नें झालेलीं पाहून शारदेच्या मनांत येतें, " कधिं करती लग्न माझें तुज ठावें ईश्वरा ॥ वाढली उंच ही किती । हंसुनी बोलती ॥ नाक मुरडिती ॥ स्त्रिया परभारां ॥ मैत्रिणी वदति टोंचुनी ॥ शब्द ते मनीं ॥ जाति भेदुनि ॥ सुरीच्या धारा ॥ जनक तो नांव काढिना ॥ माय सुचविना ॥ हौस मग कुणा ? । कोण झटणारा ? ॥ "

मिस्किल विनोद

शारदेच्या मैत्रिणी तिला टोंचून कशा बोलतात, याचें सुंदर चित्र पुढील पदांत रेखाटलेलें आहे. " श्रीमंत पतीची राणी, मग थाट काय तो पुसतां ॥ बंगला नवा नवकोनी, फुलबाग बगीचा भवता ॥ किती दासी जोडुनि पाणी, " जी " म्हणतील कामाकरितां ॥ ही जात्या चतुर शहाणी, पति मुठींत ठेवील पुरता ॥ सुग्रास बसुनि खायाला ॥ मउ शय्या लोळायाला ॥ गुजगोष्टी काळ जायाला ॥ ना काम धाम ना चिंता ॥ ही फुगेल बघतां बघतां ॥ " यांतील भाषा, उपहास व प्रसंग हें सारेंच विनोदाला किती पोषक आहेत !

मातेची मूर्ति

ही झाली मैत्रिणींची थट्टा. पण आईला खरोखरीच काय वाटत

होतें ? आपल्या मुलीला कसा नवरा मिळावा ? याविषयीं ती आपली कल्पना आपल्या पतीला सांगते. ' माझ्या मनाजागा जांवई मिळाला तर कुळस्वामिनीला बत्तीस पुतळ्यांची माळ करून वाहीन. ' असा नवससुद्धां ती बोलते. मनाजोगा जांवई म्हणजे कसा ? तर ती सांगते, " तरुण कुलिन गोरा, हंसतमुख, तरुण कुलिन गोरा ॥ पाहिजे मुलीला चतुर सद्‌गुणी सुंदरसा नवरा ॥ पुरवील तिची जो हौस सदा बहुपरी ॥ घालील शाल जो मायेची तिजवरी ॥ तिळमात्र तिला जो दुःख न देइल घरीं ॥ विद्वानांत हिरा, चकाकत, विद्वानांत हिरा. "

' असा हिरा लाभावा इतकी योग्यता तुमच्या मुलीची आहे काय हो ? ' असा प्रश्न जर इंदिराकाकूंना कोणी केला, तर तें माउलीचें हृदय त्याला उत्तर देतें, " जरी कुणा श्रीमंताची सून होय शारदा ॥ तरी त्यास साजे ऐशी तिची रूपसंपदा ॥ बघुनि तीस आकाशींची चांदणी दिपावी ॥ नाहीं रूपवंती दुसरी हजारांत ठावी ॥ हंसत थोर सरदारांनीं मागणी करावी ॥ परि मला मनचे मांडे चुरुनि काय फायदा ? ॥ " इंदिराकाकूंची स्वभाव-रेखा अगदीं स्वाभाविक व रसदार अशीच देवलांनीं रेखाटली आहे. मुलीच्या कळवळ्यानें ती पतीशींसुद्धां भांडते--आणि पतीला वेड लागतांच त्याच्यासाठीं वणवण हिंडते. महाराष्ट्रीय गृहिणीचें किती रेखीव चित्र आहे हें !

शारदेचें करुण चित्र

अनुरूप वधूवरांचा जोडा न जमविण्याचीच विधात्याला मोठी हौस. सुदाम सावकाराचें म्हातारपणीं लग्न झालें. त्यावेळीं त्याच्या बालवधूची काय अवस्था झाली हें शारदेनें प्रत्यक्ष पाहिठें होतें. ती आपल्या मैत्रिणींना सांगते, " बघुनि त्या भयंकर भूता, फोडिली तिनें किंकाळी ॥ या हृदया चरका बसला, कळवळे मनहि त्या काळीं ॥ परि बाप तिचा तो कसला चांडाळ पूर्विचा वैरी ॥ तिळभरही द्रवला नाहीं ॥ उलट त्या बिचारिस मारी " ॥ या प्रसंगाचा परिणाम शारदेच्या कोमल मनावर काय होतो ? तर ' ती दीन भयाकुल मुद्रा रात्रंदिन दिसते बाई ॥ रडविलें तिनें मज कितिदां, दचकतें भिउनी शयेंनींही ॥ '

दुःखाची एक एक पायरी शारदेला चढावयाची आहे. देवलांनीं करुणरसाचा उठाव हळु हळु व हलक्या हातानें केला आहे. पैशाच्या पाशांत अडकलेला कांचनभट शारदेला भुजंगनाथाकडे दाखवायला नेतो. त्या भुजंगनाथाचें स्वरूप कसें आहे, हें वल्लरी आपल्या मैत्रिणींना शारदेच्या समक्ष सांगत आहे. त्यांत म्हातारपणचें शब्दचित्र किती उपरोधिकपणें काढलें आहे पहा. " म्हातारा इतुका न ॥ अवघें पाऊणशें वयमान । लग्ना अजुनि लहान ॥ दंताजीचें ठाणें उठलें, फुटले दोन्ही कान ॥ डोळे रुसले कांहीं न बघती ॥ नन्ना म्हणते मान ॥ तुरळक कोठें, केस रुपेरी, डोइस टक्कल छान ॥ भार वयाचा वाहुनि वाहुनि कंबर होय कमान ॥ काठी–वांचुनि नेट न पाया परि मोठें अवसान ॥ उसनी घेउनि ऐट चालतां काय दिसे तें ध्यान ॥

वास्तविक शारदा वयानें लहान, शिक्षणानें कमी आणि ऐश्वर्य तर भिक्षुकाचें; तरी तिच्या अंगीं निर्वाणीचें धैर्य उत्पन्न होतें आणि ती श्रीमंतांना स्पष्ट उत्तर देते कीं, " वाटुं न द्यावा विषाद चित्ता ॥ सत्य दिसे तें वदतें आतां ॥ वयें अजोबा माझे दिसतां ॥ नात दिसे मी ही ॥

भीति, दुःख, निराशा, धैर्य, असहाय्यता–इत्यादि नाना भावनांचे जे कल्लोळ शारदेच्या हृदयांत उसळतात, त्यांचें शब्दचित्र देवलांनीं अत्यंत कुशलतेनें काढलें आहे.

शोकाचा कडेलोट

शारदेच्या त्या धिटाईचा उपयोग काय होतो ? तिचा बाप तिला मारीत ओढीत घरीं नेतो. तेव्हां ती बिचारी घरीं मुळुमुळु रडत बसते— आईच्या गळा पडून रडत रडत ती तिला सांगतें, " आम्ही गाई जातीच्या ॥ नाहीं आम्हां वाचा ॥ ती असती तरि तुमच्या ॥ भेदितेचि हृदया ॥ अंतरीं जें जें सलतें सांगितलें मग असतें ॥ गुपित अशा मारातें नसतें सोशियलें ॥ हरिभाऊंची यमू अगदीं हीच भाषा काढते.

शारदेची समजूत काढण्यासाठीं तिची आई तिला म्हणते, " तुझ्या-सारख्या गरिबाच्या मुलीला चांगलं सोन्यासारखं पालखीपदस्थाचं स्थळ

मिळालं म्हणून मोठ्या आनंदानं असावंस, तें हं ग काय ? " तिला शारदा उत्तर देतें, " आई, पालखी खरी; पण ती मोडकीकिडकी पालखी. पाय ठेवल्याबरोबर मोड्नसुद्धां जाईल कदाचित्. अशा पालखींत मला जबरदस्तीनं कां बसवतां ? यापेक्षां असं करानात—

" तुम्हि गरिब म्हणुनि जरि माझा ॥ घरिं भार तुम्हांला झाला ॥ तरि मोट बांधुनी माझी ॥ विहिरींत नेउनी ढकला ॥ मग मजहि दुःख जगिं नाहीं ॥ तुमचाहि हेतु तो पुरला ॥ परि लोभ धरुनि पैशाचा ॥ विकुं नका पोटचा गोळा ॥ "

अखेर शारदेची पुरी निराशा झाली. आईची वकिली फोल ठरली. बापाची पैशाची ओढ अनावर झाली. ज्याच्या गोवऱ्या स्मशानांत गेल्या आहेत, त्याच्याशीं लग्न करण्याचें प्राणसंकट आतां आपल्याला कांहीं चुकत नाहीं अशी शारदेची खात्री झाली. तेव्हां तिच्या मनांत जें दुःखाचें काहूर माजलें, तें देवलांनीं शब्दरूपानें उभें केलें आहे. शारदा चिडून-वैतागून आपल्या आईला म्हणते,

" तूं टाक चिरूनि ही मान नको अनमान ॥ नउ मास वाहिलें उदरिं तिचा धरि, कांहीं तरी अभिमान ॥ तो कसाब झाला तात ॥ करूं सजे मुलीचा घात ॥ मग बरा तुझा मउ हात ॥ जा विसरूनि माया सारी, करीं घे सुरी, धरीं अवसान ॥ हें कठिण दिसे जरि आज ॥ विष तरी जरासें पाज ॥ परि ठेवूं नको जगिं आज ॥ जी दुःख मुलीचें निवारिना ती माय नव्हे दुस्मान ॥ " हें पद म्हणजे या नाटकाचें रसोत्कर्षाचें परमोच्च स्थान होय. तसेंच तें या नाटकाचें बीजहि आहे. वृद्ध संस्थानिकाचें विवाह-वृत्त ऐकतांच देवलांनीं प्रथम हें पद रचलें आणि मग पुढील सारें नाटक उभारलें.

मृदु शब्दांनीं कठोर टीका

भुजंगनाथाच्या साऱ्याच मर्कट-चेष्टा हशा पिकवणाऱ्या आहेत. त्याची नकली श्रीमंती व उसनें तारुण्य, त्याचे भाडोत्री भटजी व तोतये नोकर, फार काय दांतांतील कवळीहि-इत्यादि सारे प्रकार हास्यकारक आहेत.

उल्लू श्रीमंतांचें देवलांनीं खासें चित्र रंगविलें आहे. आपल्याला वधू कशी पाहिजे यांचें स्वप्न भद्रेश्वर दीक्षितांना सांगतांना श्रीमंत म्हणतात, " सुंदर खाशी सुबक ठेंगणी स्थूल न कृशहि न, वय चवदाची ।। नयन मनोहर वनहरिणीचे, नाक सरळ जशि कळि चांफ्याची ।। भृकुटि वांकड्या, केश सडक मृदु, दंतपंक्ति ती कुंद कळ्यांची ।। ओंठ पोंवळी, हनु चिंचोळी, लालि गुलाबी गालांवरची ।। "

सुबक शब्दयोजना आणि रेखीव वर्णनशैली या दोन्ही दृष्टींनीं हें पद लक्षांत रहाण्यासारखें आहे. या श्रीमंतांना शुद्धीवर आणण्यासाठीं कोदंड त्यांना उपदेश करतो कीं, " भल्या माणसा दसलाखाची गोष्ट सांगतों फोडूं नको ।। पन्नाशीची झुळुक लागली बाइल दुसरी करूं नको ।। भटें तटें ती फुगा फुगवितील त्यांच्या नादीं फुगूं नको ।। सगेसोयरे भीड घालतिल परी भरीला पडूं नको ।। कळी कोंवळी तुला कशाला पिशापरी ती खुडूं नको ।। थोडी उरली कळ सोसावी पोर कुणाची नाडूं नको ।। कुणी खुलविला खुलूं नको ।। तरणा म्हणतां झुलूं नको । फसव्या पाण्या भुलूं नको ।। तुझें तूंच अवसान ओळखी थाळ्यावरती चढुं नको ।। फुकट तमाशा लोक पाहतिल दहांत हांशा पिकवूं नको ।। " नाटकासारख्या ललित कृतींतून समाजांतील दुष्ट रूढीवर करावयाची ती टीका जातां जातां, न कळत, कलात्मक रीतीनें कशी करावी याचा नमुना म्हणजे श्रीमंतांचें स्वभाव-चित्र. तें पाहून हसतां हसतां प्रेक्षक संतापतात व संतप्त नेत्रांतून अश्रु गाळतात. हास्य व चीड या परस्पर–विरुद्ध भावना एकाच पात्राकडून निर्माण करण्याचें देवलांचें कौशल्य असामान्य आहे.

टीकेचें रौद्रस्वरूप

देवपूजेचें दंभ करणाऱ्या भद्रेश्वर दीक्षिताला पाहतांच कोदंडाच्या अंगाची लाही होते आणि तो म्हणतो, " जरि वरुनि धुवट सोंवळा, गळां माळा रुद्राक्षांच्या खरा ।। तरि तूं आंत मलिन ओंवळा ।। जरि वरुनि भक्तिचा निधी, अंतरीं कुधी, घेउनि सोंगें लक्षावधि ।। नट तो होईल का नृप कधीं ।। जरि करिशी शिवपूजना, नामगर्जना, तरि मनिं भलत्या रे कल्पना ।। दंभें ठकविसी भोळ्या जनां ।। "

शारदेच्या गळ्याला फांस लावणाऱ्या कांचनभटाला तर तो असा शाप देतों कीं, " मज गमे ऐसा जनक तो ॥ मांग साचा ॥ मुख सुरकुतलें, मस्तक पिकलें ॥ शरीर रोगांनीं पोखरिलें ॥ स्मशान ज्यानें सन्निध केलें ॥ त्या प्रेताला दुहिता विकितो। क्रूराधम हा जनक कशाचा ॥ व्याघ्रमुखाचा ॥ वास नसावा जगीं अशाचा ॥ नवल हेंच यम यास विसरतों ॥ "

सुविचारांची पखरण

कथानकाच्या ओघांत देवलांनीं मधून मधून सुविचार पेरलेले आहेत, आणि ते इतक्या सुंदर भाषेंत मांडले आहेत कीं, सुभाषितांप्रमाणें ते सर्वांच्या तोंडीं खेळत राहिले आहेत, त्यांतील दोन नमुने पहा. " स्वार्थीं जी प्रीति मनुजाची सहज ती ॥ परि साधे जो स्वार्थ परार्थीं उत्तम तो गणिती ॥ स्वार्थ परार्थाइतुका असता, मध्यम त्या म्हणती ॥ ज्यांत न जनहित त्या स्वार्थाला साधु अधम वदती ॥ "

" जो लोककल्याण ॥ साधावया जाण ॥ घेई करी प्राण ॥ त्या सौख्य कैंचें ॥ बहु कष्ट जीवास ॥ दुष्टान्न उपवास कारागृहीं वास ॥ हें भोग त्याचें ॥ निंदा जनीं त्रास ॥ अपमान उपहास ॥ अर्थीं विपर्यास ॥ हें व्हावयाचें ॥ "

हें पद रचलें गेलें १८९६ मध्यें आणि १८९७ सालीं लो. टिळकांना तुरुंगांची शिक्षा झाली. त्यामुळें हें पद रंगभूमीवर चालू झालें कीं, महाराष्ट्रीय प्रेक्षकांच्या डोळ्यांसमोर लोकमान्यांची मूर्ति उभी राहे. सरकारनेंहि हें पद गाळण्याचा देवलांना इषारा दिला होता म्हणतात. पण तो त्यांनीं जुमानला नाहीं.

बायकांची भाषा

स्त्रियांची भाषा लिहिण्यांत कादंबरीकार आपटे यांचा जसा हातखंडा, तसाच नाटककार देवलांचाहि. ' ठिकाण नाहीं लग्नाला, आणि कोण घेईल मुलाला,' 'उपाशी मागतो भाकर शिळी आणि देव देतो साखरपोळी' ' दाखविलं सोनं आणि हंसे मूल तान्हं ' अशा स्त्री–सुलभ म्हणी सर्वत्र

आहेत. शारदा व तिच्या मैत्रिणी यांची भाषा तर अत्यंत घरगुती, थट्टेची व स्वाभाविक आहे. वल्लरीचा मिस्किलपणा पहा–

" वल्लरी—काय चाललं आहे इंदिराकाकू ? वेणीफणी झाली कां ?

शारदा—(सानंद) या तुम्ही वल्लरीआक्का ! आज कुणीकडे आलं हें उंबराचं फूल ?

वल्लरी—अगबाई तूंच का शारदे ! केवढी मोठी दिसायला लागलीस ! अशी पाठमोरी उभी होतीस, मला वाटलं इंदिराकाकूच उभ्या आहेत ! "

याच्याहि पुढें जाऊन वल्लरी उपहासानें शारदेची ' साखरथट्टा ' करते, ती ऐकून शारदेच्या दुःखी हृदयाचें पाणी पाणी होतें आणि तिच्याशीं समरस झालेल्या सहृदय प्रेक्षकांचेंहि. वल्लरीच्या तिखट भाषणाचा एक मासला पहा—

वल्लरी—मंदाकिनी, अग तुग करून कुणाचं ग शहाणपण काढलंस तें ? शुद्धीवर आहेस कां ? कांहीं तरी मेला विचार ! आपली उचलली जीभ लावली टाळ्याला म्हणजे काय ! जिनं तिनं आपली पायरी ओळखून बोलावं.

मंदा०—हें काय ! मी पायरी विसरून कुणाला काय बोललें बाई ? आतां शारदेला उशीर कां केलास म्हटलं, त्यांत कांहीं चुकलं असेल तर सांग.

वल्लरी—आधीं कान पिळून जिभेला चांगला चिमटा घे, आणि नाकदुराई काढून चुकलें म्हणून बाईसाहेबांचे पाय धर.

मुली—(साश्चर्य) बाईसाहेब कोण ?

वल्लरी—दिसत नाहींत का कोण त्या ! त्रिवेणी जा आधीं बाईसाहेबांना बसायला, तो कमळाचा मखमाली गालिचा घेऊन ये.

अशा वाकड्या टीकेनें शारदेच्या काळजाला घरें पडतात. तेव्हां तिला धीर देण्यासाठीं शारदेची आई म्हणते,

" हा मेल्यांनो ! त्या काय म्हणून बोलतात ? त्यांचं तूं घोडं कां मारलं आहेस ? आणि तसं वाईट वाटण्यासारखं बोलतात तरी

काय ? अजून लग्न कां करीत नाहींत हेंच ना ? आज असं जी कोण विचारील तिला म्हणावं ' होय, मला जन्मभर कुंवार ठेवणार आहेत. त्यांत तुमचं काय खरचतं ? " किती सहज भाषा !

भाषेची तीक्ष्णता

' श्रीमंत तरणे आहेत, देखणे आहेत व शहाणे आहेत ' असें कांचनभट इंदिराबाईच्या चित्तावर टसवितो, पण ते काळे आहेत हा दोष कांहीं लपला गेला नाहीं. तेव्हां त्यावर रंगसफेती करण्यासाठीं कांचनभट पुराणांतील व निसर्गातील दाखल्यांचा आधार कसा घेतो पहा— " सांवळा वर बरा गौर वधुला ॥ नियम देवादिकीं हाचि परिपाळिला ॥ गौर तनु जानकी राम घननीळ तो ॥ रुक्मिणी गोरटी कृष्ण काळा ॥ शुभ्र गंगा नदी सागराला वरी ॥ वीज मेघास ती घालि माळा ॥" आपल्या द्रव्य-वेड्या बापाचा पाषाणहृदयीपणा पाहून व स्वतःची अगतिक अवस्था ओळखून शारदा जिवावर उदार होऊन त्याला तीक्ष्ण उत्तरें देतेः—

कांचन०—(येत येत) बाळे, काय करते आहेस ?

शारदा—प्रेम अधिक कीं पैसा अधिक, याचा विचार करतें आहे. पण बाबा, डोळे कां पुसतां ?

कांचन०—हा कन्याविरह मोठा कठीण आहे !

शारदा—बाबा ! किती कठीण असला, तरी तुमच्या मनापेक्षां तर कठीण नसेल ना ?

कांचन०—उद्यां गेलीस म्हणजे, बाळे ! माझं घर उदास दिसायला लागेल ! (रडूं लागतो)

शारदा—दिसायला लागेल खरंच; पण बाबा, एवढा सोन्याचा गोळा यायचा आहे, त्याच्याकडं पाहून कसं तरी दुःख गिळून टाका झालं ! काय करणार ! शिवाय त्याच सोन्याच्या प्रकाशानं घरहि चांगलं शोभिवंत दिसेल नाहीं ?

कांचन०—हें हें तुझं कुचकं बोलणं ! माझं अंतःकरण किती कोवळं आहे, हें तुला माहीत नाहीं. मी तुझं लग्नसुद्धां करणार नव्हतों, पण

ब्राह्मणांच्या मुलींचीं लग्नं झालींच पाहिजेत, असं शास्त्र आहे, तिथं इलाज नाहीं !

शारदा—आणि ब्राह्मणांच्या मुली म्हाताऱ्यांना विकाव्या, असंहि शास्त्र आहे, नाहीं बाबा !

विस्कळित स्वभाव-रेखा

चोहोंबाजूंनीं कोंडलेली गायहि जशी शिंगें उगारून धावून जाते, तसें हें शारदेचें निर्वाणीचें धैर्य आहे. तिच्या मनाच्या वेगवेगळ्या अवस्थांचीं शब्द-चित्रें देवलांनीं यथातथ्य काढलीं आहेत. त्यामुळेंच तिच्या दुःखाशीं प्रेक्षक समरस होतो. मात्र तिच्या उद्धारासाठीं झटणारा कोदंड भावनावश, वाचाळ व बावळट निघाला आहे. खलनायकाला तो उघड उपदेश काय करतो, पोकळ धाक काय घालतो आणि शेवटीं स्वतः तळघरांतील कैदेंत काय पडतो ! यांत प्रतिनायकाचें बुद्धि-चातुर्य नाहीं कीं प्रसंगावधानहि नाहीं. शेवटीं आपली प्रतिज्ञा मोडून तो शारदेशीं लग्न लावतो व आपल्या त्यागावर पाणी पाडतो. अडाणी प्रेक्षकांना नाटकाचा शेवट शोकपूर्ण झालेला आवडत नाहीं, म्हणून शारदेला मृत्यूच्या पाशांतून सोडवून लग्न-माळेंत अडकविणें देवलांना अवश्य वाटलें असेल. पण त्या-साठीं कोंदडाच्या तत्त्वनिष्ठेचा बळी देण्याचें कांहींच कारण नव्हतें. शिवाय तो लोक-निंदेलाहि भितो आहे असें दाखविलें आहे. हिरण्यगर्भाला बोहल्यावर उभा केला असता, तरी शारदा फारशी कुरकुरली नसती. आणि शारदेला ' अनुरूपवरप्राप्ति ' च घडवावयाची, तर तिच्या उदार व कर्तृत्ववान् मामानें पुढें होऊन तिचा हात कोदंडाच्या हातांत देणें प्रशस्त ठरलें असतें. कोदंडानें स्वतः केलेली लगीनघाई अश्लाघ्यच आहे.

रंगदेवतेची पताका

या नाटकांतील शारदा, भुजंगनाथ, कांचनभट व इंदिराकाकू या साऱ्याच स्वभाव-रेखा कमालीच्या सहज व सुंदर वठल्या आहेत. फार काय, भद्रेश्वरदीक्षित, सुवर्णशास्त्री व कांचनभट या तिघांच्या संवादांत प्रत्येकाचें पृथगात्मत्व–निराळेपण दाखविलें आहे. ' चकारीपकारी 'वाल्या

भटजींचीहि सूक्ष्म स्वभाव-भिन्नता बारकाईनें रेखाटली आहे. शारदेची प्रत्येक मैत्रीण म्हणजे स्वतंत्र व्यक्ति-रेखा आहे. 'बत्तिशी पार पडली असेल' असे श्लेष क्वचित्च आढळतात. कोदंड व त्याचा मित्र यांचें वेषांतरहि कृत्रिम वाटत नाहीं. स्वाभाविक प्रसंग, सुस्पष्ट स्वभाव-लेखन व घरगुती भाषा यांच्या साहाय्यानें देवलांनीं हें नाटक रसपूर्ण केलें आहे आणि त्याद्वारें समाजाची मोठी सेवा केली आहे. करुण रसाचा क्रमाक्रमानें उत्कर्ष करीत देवलांनीं तो उच्च बिंदूवर नेला आहे. शारदेपूर्वी बाला-वृद्ध-विवाहावर पांचसात नाटकें झालेलीं होतीं. पण प्रेक्षकांचीं मनें तळापासून गदगदा हालविण्याचें व त्यांच्या हृदयांना पाझर फोडण्याचें यश शारदेचेंच. खरोखर, शारदा म्हणजे मराठी रंगभूमीची एक विजयशाली पताकाच आहे.

श्री. कृ. कोल्हटकर : : : ३

आगरकरांनीं निबंधांतून, आपट्यांनीं कादंबऱ्यांतून आणि केशवसुतांनीं काव्यांतून सामाजिक सुधारणेचा जसा प्रचार केला, तसा विनोदाचार्य श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांनीं आपल्या नाटकांतून केला. विनोद आणि नाट्य—हीं केवळ रंजनार्चीं कोमल साधनें. पण कोल्हटकरांजवळ त्या जणुं दोन तोफा होत्या—त्यांतून निघणारे गोळे जीर्ण मताचे व दुष्ट रूढींचे किल्ले जमिनदोस्त करीत. अस्वल गुदगुल्या करून माणसाला ठार मारतें म्हणतात, तसें कोल्हटकरांचें टीकागर्भ विनोदी-लेखन विरोधकांना हसतां हसतां नामोहरम करीत असे. त्यांच्या लेखनाचें बाह्यांग



जितकें हास्यकारक, तितकेंच त्यांचें अंतरंग क्षोभकारक. त्यांच्या विनोदी लेखाच्या पोटींहि सामाजिक सुधारणेची तळमळ असे. विनोदी लेखाचा स्वतंत्र संप्रदायच त्यांनीं मराठींत निर्माण केला. आणि तशीच नाट्य-लेखनाचीहि पृथक प्रथा त्यांनीं पाडली. हास्यरसाचे ते बादशहा होते आणि गडकरी व अत्रे हे त्यांचे मांडलीक होत.

सामाजिक विषयार्चीं स्वतंत्र कथानकें

कोल्हटकरांनीं एकूण बारा नाटकें लिहिलीं. त्या सर्वांचीं कथानकें स्वतंत्र आहेत. महिनानुमहिने मेंदूला शीण देऊन ते आपल्या नाटकाचें

Poona 51

संविधानक रचीत. एकाद्या प्रमाणबद्ध इमारतीप्रमाणें त्यांच्या नाटकांची बांधणी डौलदार असते. त्यांच्या सर्व नाटकांचे विषय सामाजिक आहेत. अपवाद काय तो 'शिवपावित्र्य' हाच एक. बालविवाहाचा धिक्कार व प्रौढ विवाह, प्रेमविवाह आणि पुनर्विवाह ह्यांचा पुरस्कार हेंच बहुतेक कथानकांचें सूत्र आहे. सहा नाटकें तर निव्वळ विवाहविषयालाच वाहिलेलीं आहेत. बाकीच्या नाटकांतहि प्रेमविवाह आहेच; पण त्यावर कोठें स्त्री शिक्षणाचें; तर कोठें स्त्री-पुरुषांच्या समानतेचे अभ्रे चढविलेले आहेत.

रहस्याची जादू

स्वतंत्र कथानक व सामाजिक विषय या दोन अभिनव गुणांबरोबरच कोल्हटकरांच्या नाटकांतील तिसरा महत्त्वाचा गुण म्हणजे रहस्यपूर्णता. एखादा जादूगार रंगीबेरंगी कागदाचे कपटे मसाभर आपल्या तोंडांत कोंबतो आणि पटापट खाऊन दाखवितो, तेव्हां 'इतके कागद याच्या तोंडांत मावले तरी कसे ?' असें कुतूहल प्रेक्षकांच्या मनांत उत्पन्न होतें न होते; तोंच तो जादूगार त्या सर्व कागदांच्या तुकड्याची एकच एक सरळ सुरळी तोंडांतून बाहेर ओढून काढतो, तेव्हां प्रेक्षक आश्चर्यानें चकित होतात व आनंदानें टाळ्या पिटतात. तसाच गंमतीचा अनुभव कोल्हटकरांचीं नाटकें पहातांना प्रेक्षकांना येतो. कोणाचें जन्मावद्दलच रहस्य असतें, तर कोणी राजाच वेषांतर करून चमत्कृतिपूर्ण घटनांचा अनुभव घेतो. बुरखा व वेषांतर बहुधा त्यांच्या प्रत्येक नाटकांत आहेच; मात्र या बौद्धिक गारुडामुळें सर्व नाटक असत्य वाटतें, स्वप्न भासतें, नाटकच ठरतें. सत्याचा आभासहि न राहिल्यानें एखाद्या अद्भुतरम्य (Romantic) नगरींत संचार करून आल्यासारखें वाटतें. सत्यसृष्टीतील आपल्यासारख्या माणसांचीं खरीखुरीं सुखदुःखें आपण पहात आहोंत असें प्रेक्षकांना वाटतच नाहीं. रहस्याचा गुंडा आधीं गुंडाळण्यासाठीं व नंतर उलगडण्यासाठीं अस्वाभाविक व असंभाव्य घटनाहि कोल्हटकरांना आपल्या नाटकांत घालाव्या लागल्या आहेत. त्यांची कल्पनाशक्ति तरल व प्रसन्न असल्यामुळें काव्याचें चांदणें सर्व नाट्यकथावर पसरलेलें आढळतें.

विद्यालयीन व्यासंग

नाट्य व विनोद या दोन्ही क्षेत्रांत आपलें स्वतंत्र पीठ निर्माण करणारे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर नागपूर येथें ता. २९ जून १८७१ रोजीं जन्मले. त्यांचें बालपण बुलढाणा व अकोला येथें गेलें. सहावें वर्षीं त्यांची आई वारली. तथापि त्यांच्या सापत्न आईनें त्यांचें संगोपन मोठ्या वात्सल्यानें केलें. त्याचें स्मरण ठेवून श्रीपाद कृष्णांनीं आपलें पहिलें नाटक 'वीर-तनय' आपल्या सापत्न मातेस अर्पण केलें. त्यांचे वडील उमरावतीस प्रथम हायस्कूलमध्यें शिक्षक होते. पण पुढें सरकारी नोकरींत शिरले व कारकुना पासून असिस्टंट कमिशनरच्या जागेपर्यंत चढले. नाटकाचा नाद लहान-पणापासूनच त्यांना होता. मराठी पांचवींत असतांनाच त्यांनीं एक संगीत नाटक लिहिलें आणि इंग्रजी पांचवींत असतांना 'सुखमालिका' नांवाचें नाटक लिहिलें. शास्त्रीबुवांच्या 'निबंधमाले'चीं त्यांनीं पारायणावर पारायणें केलीं. त्यामुळें त्यांना मातृभाषेची सेवा करण्याची स्फूर्ति मिळाली. शास्त्री-बुवांचे बंधु लक्ष्मणराव हे त्यांना शिक्षक होते. इंग्रजी नाटकें व कादंबऱ्या यांचा फडशा हायस्कूलमध्यें असतांनाच त्यांनीं पाडला. १८८५ सालीं ते विवाहबद्ध झाले व १८८८ मध्यें ते मॅट्रिकमधून मुक्त झाले. नंतर ते पुण्यास आले व डेक्कन कॉलेजांत दाखल झाले.

दोन तात्या

तात्यासाहेब केळकरहि त्यावेळीं त्या कॉलेजांत होते. दोघांचीहि आवड एकच असल्यामुळें त्यांची मैत्री जमली व ती पुढें पुढें वाढतच गेली. दोघांनींहि कॉलेजच्या संमेलनांतील नाटकांत कामें केलीं. 'मृच्छकटिकां'-तील विटाचें काम कोल्हटकरांनीं केलें. दोघेहि खंदे टीकाकार, मार्मिक विनोदकार आणि सामाजिक विषयांत सारखेच पुरोगामी. केळकरांना लोकमान्यांचा सहवास लाभला आणि त्यामुळें राजकारणांत प्रतिष्ठाहि मिळाली. उलट कोल्हटकर १८९१ मध्यें बी. ए. झाल्यावर १८९७ सालीं एल्एल. बी. होऊन, अकोला-खामगांव-जळगांव अशा आड-गांवीं वकिलीकरितां राहिले. पण त्या कोपऱ्यांत राहूनहि त्यांनीं जी नाट्य-

निर्मिति केली ती स्वतंत्र संप्रदाय स्थापण्याइतकी महत्त्वाची ठरली. गडकरी हे तर त्यांचे चेलेच. त्याशिवाय खांडेकर, माडखोलकर वगैरे त्यांच्या तालमींत तयार झालेले कितीतरी नामवंत शिष्य आहेत. अत्रे, वरेरकर यांनाहि त्यांच्या गादीचाच थोडाफार वारसा मिळालेला आहे.

चौरंगी साहित्य-सेवा

नाटकाशिवाय कविता, लघुकथा व कादंबऱ्या याहि कोल्हटकरांनीं रचल्या आहेत. टीका-लेख तर पुष्कळच आहेत. मराठींतील टीका-लेखनाला त्यांनीं शास्त्रीय बैठक मिळवून दिली. त्यांचा पहिला टीका-लेख १८९२ सालीं त्यांनीं 'विक्रम-शाशिकला' नाटकाचें केलेलें परीक्षण होय. पुढें ते सूक्ष्म, सखोल व सविस्तर टीका लिहूं लागले. केळकरांच्या 'तोतयाचे बंडा'वर ११० मोठ्या पानांची टीका लिहून त्यांनीं नाट्य-शास्त्रावरील आपले विचार मांडले, तर वामनराव जोशांची 'रागिणी व तिचीं भावंडें' यावर १३५ पृष्ठांची टीका करून कादंबरी-शास्त्र विशद केलें. 'गरीब बिचारें पाडस' ही त्यांची लघुकथा हृदयस्पर्शी आहे. 'शामसुंदर' या कादंबरींत अस्पृश्यांचा कैवार घेतला आहे. 'बहु असोत सुंदर' हें सर्वतोमुखीं झालेलें महाराष्ट्र गीत कोल्हटकरांचेंच. ज्योतिषावरहि यांनीं एक ग्रंथ लिहिला आहे. सांगली येथें १९१८ सालीं भरलेल्या ज्योतिष-संमेलनाचे ते अध्यक्ष होते. पुणें येथें १९२२ सालीं भरलेल्या कवि-संमेलनाचे ते अध्यक्ष होते. नाट्य-संमेलनाचेंहि अध्यक्षपद त्यांना देण्यांत आलें होतें. १९२७ सालीं पुणें येथें भरलेल्या 'महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें'हि अध्यक्षस्थान त्यांनीं भूषविलें. त्यावेळीं स्वागताध्यक्ष होते तात्यासाहेब केळकर. याच प्रसंगीं 'दोन तात्या' हा आपला खुसखुशीत लेख 'संदेश'कार कोल्हटकरांनीं लिहून प्रसिद्ध केला. 'मराठी भाषा मरणोन्मुख झाली नसून उदयोन्मुख आहे' असा आशादायक संदेश तात्यासाहेब कोल्हटकरांनीं या अध्यक्षपदावरून सर्वांना दिला. मंदमंद होत चाललेली व अर्धांगवायूची काजळी धरलेली, त्यांची जीवन-ज्योत १९३४ सालीं विराम पावली.

रोमांचकारक घटना

कोल्हटकरांचें पहिलें नाटक म्हणजे 'वीरतनय'. किर्लोस्कर नाटक मंडळीनें उत्तम नाटकाकरितां एक बक्षिस लावलें होतें; तें 'वीरतनयानें' जिंकलें. १८९३ सालीं या नाटकाचा पहिला अंक व शेवटच्या अंकांतील अखेरचा प्रवेश एवढा भाग कोल्हटकरांनीं प्रथम लिहिला. बाकीचा भाग त्यांनीं एका महिन्यांत लिहून काढला, पण रंगभूमीचा पाळणा लाभण्याला 'वीरतनयाला' दोन वर्षें थांबावें लागलें. १८९६ सालीं नगर येथें किर्लोस्कर मंडळीच्या रंगभूमीवर कोल्हटकरांचें हें पहिलें नाटक चमकलें. 'मंडळीच्या आग्रहावरून' त्यांनीं तें आनंदपर्यवसायी बनविलें. विधुर-विवाह हा विषय या नाटकांत रंगविलेला दिसत असला, तरी कोल्हटकरांचें लक्ष शृंगार व वीर हे रस खेळविण्यावरच खिळलेलें दिसतें.

कोणत्या तरी सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करण्याची उर्मि कांहीं यांत दिसत नाहीं. 'रसिक जनांच्या मनोरंजनाकरितां' शूरसेन व शालिनी यांच्या प्रणय-भावनेचा विकास रंगविण्यांत आला आहे. त्या गोड कथा-भागाला तिखट प्रसंगाची जोड देण्यासाठीं, वाघाची शिकार, शूरसेनाचा बंदिवास, वीरसेनाची स्वारी, मारेकऱ्यांचा हल्ला, बकुलाचा पराक्रम इत्यादि रोमांचकारक घटना घातलेल्या आहेत. मालिनीनें शालिनीचा वेष घेणें आणि शालिनीनें पुरुषाचा वेष घेणें—अशा हिकमतीमुळें कोल्हटकरांनीं कुतूहल निर्माण केलें आहे. पण त्यामुळेंच कथानकांत कृत्रिमता येते व स्वाभाविकता जाते. 'आपण रंगभूमीवर जें पाहतों, तें सत्य आहे' ही भावना पार लोपते. त्यांतच शाब्दिक कोट्या, अनुप्रास, विरोधाभास इत्यादींची आतषबाजी आहे.

कोट्यांचा कृत्रिम खेळ

'ग्रास,' 'उटज' असे अपरिचित संस्कृत शब्द अकारण वापरले आहेत, एवढेंच नव्हें तर बकुलासारखा बालकसुद्धां 'मम लालसकर्णी' अशी प्रौढ भाषा वापरतो. 'शिरिं धरि खरि करि,' 'न जल पळें गळें,' 'शतपट अतिबिकट, निकट प्रकट होऊं आपदा' अशा शब्दांच्या लटपटी

करून वाचकाला अगदीं चीतपट करण्याचा जणुं कांहीं कोल्हटकरांनीं विडाच उचलला आहे. शोकानें हृदय विव्हळ झालेलें असतांनासुद्धां नायक कोटि करून म्हणतो, "मृत्यु हा स्वतः जर मृत्यूचा विषय असता, तर मला किती आनंद झाला असता." रागानें तुच्छतेची भाषा बोलणारी नायिकाहि अशी कोटी करते कीं, "त्याचा जीव नाहीं घेतला, पण आपला जीव घेऊन मात्र पळत सुटला खरें." राजा वीरसेनहि असाच कोटिबहादर दाखविला आहे. दुःखी झालेल्या बकुलाचें सांत्वन करतांना तो म्हणतो, "अशा प्रसंगीं वीरांनीं शत्रूला डोळ्यांचें पाणी दाखवावें कीं तरवारीचें पाणी?" मग चिल्लर पात्रांना उठतांबसतां साधतील तशा कोट्या करण्यास काय हरकत? "सुवर्णमालिनी हें नांव फत्तेसिंगांना इतकें आवडेल कीं ज्याचें नांव तें!" असें एक दासी म्हणते, तर शुंभसेन सोन्याचा गुण वर्णन करतांना म्हणतो, "स्वतः पिवळें असून लोकांचीं मनें मात्र कोळशापेक्षांहि काळी करतें." फत्तेसिंगहि म्हणतो, "हा सजीव मोहरा सोडून निर्जीव मोहरा घेऊन काय करावयाचें?" अशा शाब्दिक ठिणग्यामुळें तरुण वाचकांचे डोळे क्षणभर दिपतात, पण कलेला मात्र झळ लागल्याशिवाय रहात नाहीं.

पदांची आसक्ति

या नाटकांतील पदांची संख्या सुमारें शंभर आहे. पारशी व गुजराती चालीवर तीं बसविलेलीं असल्यामुळें प्रेक्षकांना फार चटकदार वाटलीं. "अंकित पदांबुजांची दासी," "अशी ही सगुण-खणी" इत्यादि पदें रसिकांच्या कानांत गुणगुणत रहात. नाटककाराला पदांचा सोस इतका कीं, वाघाच्या भीतीनें नायिका मूर्च्छित होऊन पडली असतांनासुद्धां तिला सावध करण्याचे उपाय योजण्याऐवजीं नायक तिच्या अवयवांचें सूक्ष्म वर्णन करणारें पदच म्हणत राहतो! दोनतीन द्वंद्व-गीतेंहि घातलेलीं आहेत. अर्थाच्या दृष्टीनें लक्षांत राहण्यासारखीं दोन पदें पुढें दिलीं आहेत.

ईश्वराला उद्देशून शूरसेन म्हणतो, "तुझी अन्यथा ती कराया कृति अह्मां मानवांची मुळीं ना गति ॥ अनंता अहोरात्र तारा-तति । त्वदा-

ज्ञेसि नम्रीं शिरीं मानिती ॥ दयाळा सुविश्वास तूझ्यावरी । सदा ठेवुनी साधु ते राहती ॥ ”

आपल्या लहान मुलानें आपली बंदीवासांतून सुटका केली हें पाहून शूरसेन म्हणतो, “ आजवरी जनक देइ जन्म सुताला । पुनर्जन्म तनयें मज आज दीधला ॥ आलिंगू तनु किती ही धूलि–धूसरा । चुंबुं किती म्लान मुखा मनोहरा । पाहुं किती नेत्र भरुनि मूर्ति सुंदरा । तृप्ति न हो सुमहोत्सव आजि लाधला ॥ ”

काव्याच्या कोंदणांत विनोद

कोल्हटकरांचें ‘ मूकनायक ’ हें नाटक म्हणजे ‘ अद्‌भुतरसाचे पेल्यावर पेले.’ या पेल्यांमधील अद्‌भुतरसाला काव्याची जी गोडी जडलेली आहे, ती अगदीं अवीट आहे. आणि वर विनोदाचा वास ! पूर्वीचें ‘संशयकल्लोळ’ किंवा पुढचें ‘मानापमान’ या नाटकाइतकेंच ‘ मूकनायक ’ हेंहि अत्यंत हंसरें नाटक आहे. त्याची प्रसन्नता सदाफुली आहे. सौभद्राप्रमाणें ‘ मूकनायक ’चा नायक वेषांतर करतो, राजवाड्यांत राहतो व अंतःपुरापर्यंत शिरतो. तेथील राणीला मात्र त्याचें सोंग माहीत असतें. या साम्यामुळें ‘ मूकनायकां’तील कांहीं प्रवेश पाहतांना सौभद्रांतील विनोदाचें स्मरण झाल्याविना रहात नाहीं. कथेच्या ओघांत मद्यपानाचा निषेध हा विषयहि नाटककारानें मिसळलेला असल्यामुळें त्याची तुलना खाडिलकरांचें ‘ विद्याहरण ’ व गडकऱ्यांचें ‘ एकच प्याला ’ या नाटकांशीं सहजच केली जाते. पण मद्यपान–निषेधाचा प्रचार हा कांहीं या नाटकाचा आत्मा नाहीं, हेतुहि नाहीं. “ मद्यापासून होणाऱ्या अपायांचें परोक्षतः थोडेसें आविष्करण करण्याचा प्रयत्न ” हा आहे, असें खुद्द नाटककारच प्रस्तावनेंत सांगतात. त्यांची दृष्टीच अशी कलात्मक कीं, “ मनोवेधक कथानक, चटकदार प्रवेश वगैरे मुख्य सामुग्री असली म्हणजे मग उपदेश नसला तरी त्यांस नाटक या दृष्टीनें गौणत्व येत नाहीं.” या भूमिकेवरून लिहिलेल्या ‘मूकनायक’ नाटकाची दृष्टि सौंदर्याची व वृत्ति काव्याची आहे. सौंदर्याच्या सरोवरांत उमललेलें हें एक कमनीय काव्य–कमल आहे.

स्मशानांतील फूलझाड

आश्चर्याची गोष्ट अशी कीं, इतकें हें रमणीय नाटक कोल्हटकरांनीं अत्यंत विषण्ण परिस्थितींत लिहिलेलें आहे. एखाद्या उकीरड्यावर पारिजातकाचें झाड उगवावें आणि त्याच्या धवल व कोमल फुलांचा सडा सर्वत्र पडावा व त्याचा सुगंध दशदिशां सुटावा; त्याप्रमाणें दुःखाच्या व निराशेच्या परिस्थितींत असलेल्या कोल्हटकरांच्या मुखांतून या नाटकांत विनोदी कोट्या व हंसरे प्रसंग ओतले गेले आहेत. या सुमारास त्यांना एलएल. बी. च्या परीक्षेंत अपयश आलेलें होतें. त्यामुळें त्यांचें मन खिन्न झालेलें होतें. 'किर्लोस्कर कंपनी'नेंहि यावेळीं त्यांना कांहींसें दूरपणानें वागविलें; त्यामुळें त्यांचा खिन्नपणा वाढला. तशांत त्यांचे वडील मृत्यु पावले. त्या सुतकांत असतांनाच कोल्हटकरांनीं नदीवरील स्मशानभूमींत बसल्या बसल्या मूकनायकांतील बरीचशीं प्रणयरम्य पद्यें रचलीं. जॉनसनची 'रासेलस' ही जगद्विख्यात कादंबरीहि त्यानें आपल्या आईच्या अशौचांतच लिहिली होती. तसेंच कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं 'मेघदूत' या शृंगारपर काव्याचें सरस भाषांतर केलें आहे, तेंहि अशाच उद्विग्न परिस्थितींतच.

नाटककारावरील ह्या आपत्तींप्रमाणेंच खुद्द नाटकालाहि बऱ्यांच संकटांतून जावें लागलें. त्याचा पहिला अंक 'किर्लोस्कर नाटक मंडळी'त वाचून दाखविण्यांत आला, तेव्हां सर्वांना तो पसंत पडला. तेव्हां कोल्हटकरांनीं उरलेलें नाटक उत्साहानें लवकर पूर्ण केलें. पण पुढें काय? तब्बल तीन वर्षें तें तसेंच दप्तरांत पडून राहिलें. शेवटीं 'विविध-ज्ञान-विस्तार' मासिकाच्या संपादकांनीं मागणी केल्यावरून, तें त्या मासिकांत प्रसिद्ध झालें. तें रंगभूमिवर आणलें गेलें कोणाकडून? तर डेक्कन कॉलेजांतील हौशी विद्यार्थ्यांकडून, आणि तेंहि संमेलनांत. शेवटीं १९०१ सालीं, फेब्रुवारी महिन्यांत, निपाणी मुक्कामीं, किर्लोस्कर मंडळींच्या राजशाही रंगभूमिवर तें एकदांचें झळकलें. पण त्यावेळींहि त्याला शोकाचें ग्रहण लागलेंच. तें म्हणजे त्या प्रयोगाचें आधीं आठदहा दिवसच, किर्लोस्कर

मंडळींतील श्रेष्ठ नट भाऊराव कोल्हटकर हे निधन पावले. अशी आहे या हंसऱ्या 'मूकनायका'ची दुःखी जन्मकथा.

उत्कंठापूर्ण रचना

प्रेक्षकाला विस्मयाचे धक्के देऊन व विनोदाच्या गुदगुल्या करून एकसारखें हंसतें ठेवावयाचें, हेंच एक धोरण कोल्हटकरांनीं संभाळलेलें दिसतें. त्यापायीं स्वाभाविकता, संभाव्यता, सुसंगतता इत्यादि धोरणें त्यांना फारशीं सांभाळतां आलीं नाहींत. एका राजाच्या महालांत दोन परके राजे येऊन बहिऱ्या-मुक्यांचीं सोंगें घेऊन नोकरी मिळवतात, त्यांतील एका राजाची आतेबहीण तर तेथली राणीच असते आणि ते दोन्हीहि राजे उलटसुलट दिशेनें राजधानीवर आपापल्या सैन्यांच्या चाली घडवून आणतात—असा अचाट कल्पनेचा अनिर्बंध खेळ या नाटकांत रंगविलेला आहे. विक्रांत हा सार्वभौम राजा. तो मुका म्हणून शरच्चंद्र राजाकडे नोकरीस राहतो. राजाची बहीण सरोजिनी हिच्यावर त्याचें प्रेम बसतें. पण तिचा पण असा कीं, राजाला मद्यपानाच्या व्यसनांतून सोडविणें. हा पण जिंकण्यासाठीं विक्रांत कांहींच चातुर्य दाखवीत नाहीं कीं प्रयत्न करीत नाहीं. तो नांवाचाच 'विक्रांत' दिसतो. तो मूकहि नाहीं आणि नायकहि नाहीं, असें वाटूं लागतें. मात्र त्याचा प्रवेश रंगभूमीवर मोठ्या कुशलतेनें केलेला आहे. त्यांत कोल्हटकरांचें नाट्य-कौशल्य खरें दिसून येतें. राजाला एका हल्ल्यांतून कोणा अज्ञात माणसानें सोडविलें, तो 'शूर व साहसी असा पुरुष—पुरुष कसला ? ईश्वरच तो.' असें वर्णन राजा शरच्चंद्र करीत असल्यानें त्या शूराच्या आगमनाबद्दल विलक्षण उत्कंठा राजस्त्रियांमध्यें—त्याबरोबरच प्रेक्षक वृंदामध्येंहि—निर्माण करण्यांत नाटककारांनें मोठें यश संपादिलेलें आहे. अशा रचना-चातुर्यामुळेंच सारें नाटक रंगदार झालें आहे.

सुंदर कोट्यांची खैरात

विनोदाची खसखस पिकविण्यासाठीं कोल्हटकरांनीं कोट्यांची पेरणी मुक्त हस्तानें केली आहे. बऱ्याच ठिकाणीं त्या कोट्या मार्मिक आहेत व

स्वाभाविकहि आहेत. कांहीं थोड्या ठिकाणीं मात्र त्या कृत्रिम व बालिश वाटतात. 'मुका' या शब्दावर शृंगारपूर्ण कोटी न साधतील तर ते कोल्हटकर कसले ? 'येतां जातां मुक्याशींच व्यवहार,' 'सुंदर चेहऱ्याचा मुका आवडत नाहीं कोणाला ?' अशा कोट्या म्हणजे तरुण प्रेक्षकांचीं अंतःकरणें काबीज करण्याच्या चोरवाटाच. सरोजिनीपुढें आपलें प्रेम व्यक्त करण्याचा निश्चय विक्रांतानें केलेला असतो. त्यावेळचा त्या दोघांचा संवाद फारच मजेदार आहे. सरोजिनीच्या मनांत मुक्याचा विचार येतांच तो मुका आलेला असतो. म्हणून ती त्याला म्हणते, 'तुझ्या मुकेपणाला शंभर वर्षें आयुष्य आहे.' तेव्हां विक्रांत उत्तर देतो, "छे :, एक पळभर-सुद्धां नाहीं." हें त्याचें बोलणें त्याच्या बोलण्यानेंच खरें ठरत नाहीं काय ? बहिरेपणाचेंहि भांडवल विनोदाच्या व्यापारासाठीं कोल्हटकरांनीं असेंच वापरलें आहे. केयूर व विकंठ यांचा पहिला संवाद ऐकतांना प्रेक्षकांचीं पोटें हंसून हंसून दुखूं लागतात. 'पण' किंवा 'मदिराक्षी' या शब्दांवर या नाटकांत सहजच कोट्या साधल्या आहेत. 'मार्मिकपणा' आणि 'मर्मभेदकपणा' यांना एकच लेखण्यांत नाटककारानें आपली सूक्ष्म बुद्धि वापरली आहे. 'अंगाची लवलव व तोंडाची बडबड करणाऱ्या' वेत्रिकेला दाढीवाल्या वकीलाचें सोंग घेतलेला विक्रांत समजावून सांगतो, 'मार्मिकपणा म्हणजे मर्म ताडणें आणि मर्मभेदकपणा म्हणजे सुद्धां मर्माचें ताडन करणें.'

काव्य-चंद्रावरील कलंक

कांहीं कांहीं कोट्या मात्र अगदीं पोरकट आहेत; त्या उथळ बुद्धीच्या प्रेक्षकांना हंसविण्यासारख्या आहेत. 'असें ढ पुढें येणार आहेत असें जर त्या कवीला माहीत असतें तर त्यानेंहि ट ला ट जुळविण्याचे श्रम घेतले नसते.' किंवा 'देवाशपथ मी नास्तिक बनण्याच्या बेताला आलों आहें' अथवा 'प्रतोदाची कल्पना अगदीं खोटी, खरी.' अगर 'एवढा मोठा हा किल्ला पण एवढ्याशा किल्लीच्या स्वाधीन' इत्यादि कोट्या लहान मुलांच्या मासिकांतच शोभण्यासारख्या नाहींत काय ? पण कांहीं कोट्या

सहजगत्या आलेल्या व पात्रांच्या स्वभावावर प्रकाश टाकणाऱ्या अशा आहेत. प्रधानाची रिकामी झालेली जागा मला देण्यांत आली, असें जेव्हां विकंठ सांगतो, तेव्हां प्रतोद उद्गारतो, "वा ! योग्य जागीं योग्य नेमणूक." आणि लगेच त्याचा खुलासा करतो कीं, "जागाहि रिकामी आणि डोकें पण रिकामेंच." मात्र जेव्हां विक्रांत सरोजिनीचा अखेरचा निरोप घेतो, तेव्हां विरहाच्या व निराशेच्या भावनेनें भरलेला असतांनाहि त्याच्या तोंडीं अशी सवंग कोटि घातलेली आहे कीं, "त्यानें त्या अष्टमीच्या चंद्राच्या मुहूर्तावर मलाहि अर्धचंद्र दिला." कोल्हटकरांच्या काव्यचंद्राला अशा कोट्यांचा कलंक शोभाच देतो काय ?

पद्यांतील माधुर्य

कथा-रचनेच्या चातुर्याइतकेंच या नाटकांतील पद्यांचें माधुर्य प्रशंसनीय आहे. अगदीं प्रारंभींचेंच पद प्रेक्षकांचें मन जिंकणारें आहे व त्यांची भावना ताब्यांत घेणारें आहे. झोंपाळ्यावर झोके घेत घेत राजस्त्रिया ईश्वराचें जें गुणवर्णन करतात, त्यांत स्फटिकाची सुबोधता आहे, गगनचुंबी कल्पकता आहे आणि उदात्त भावनाहि ओतप्रोत भरलेली आहे. 'नामी सुरवात म्हणजे अर्धीअधिक मात' या इंग्रजींतील म्हणीप्रमाणें, या नाटकाच्या यशाची मुहूर्तमेढ रोवणारें हें पद नागरी विद्वानांप्रमाणेंच नांगऱ्या शेतकऱ्याच्या मुखांतहि खेळत असतें. तें पद असें,—"हे प्रभो विभो अगाध किती तव करणी ।। मन चिंतुनि हो रत चरणीं ।। चांदवा नभाचा केला।। रविचंद्र लटकती त्याला ।। जणुं झुम्बर सुबक छताला ।। मग अंथरली ही धरणी ।। बाहुलीं मनुष्यें केलीं ।। त्या अनेक रूपें दिधलीं ।। परि सूत्रें त्यांचीं सगळीं ।। नाचविसी हस्तीं धरुनी ।। "

प्रसादाची उणीव

कोल्हटकरांची पद्यरचना काव्यपूर्ण असली तरी संस्कृतप्रचुर-किंबहुना क्लिष्टहि आहे. "बाळपणींचा काळ सुखाचा आठवतो घडीघडी" ही देवलांची सहजरम्य वाणी कोणीकडे आणि कोल्हटकरांचें त्याच विषयावरचें पद कोणीकडे ! त्यांत 'रम्य बालपण' हाच एक चरण सुगम आहे.

बाकी तें पद असें आहे. " होय संसारतरुमुग्धकोटक भुवनिं ॥ रम्य तें बालपण देई देवा फिरुनी ॥ कोण सुख हेतुविण ॥ शांत निश्चिंत मन ॥ शोक निमिषाहून ॥ नुरत मनिं पद भवनिं ॥ "

मद्यपानाचा निषेध करणारीं अनेक पदें या नाटकांत आलेलीं आहेत. ' सुरा सुरा जणुं उरा असे ही सुरासुरांचा चुरा करी ' या पदांत अनुप्रासांची गर्दी आहे. पण त्यापेक्षां प्रसादपूर्ण व अर्थपूर्ण पद म्हणजे, " सुरा मृदु नाम धरुनि नरांमाजिं असुरा शिरे ॥ आजवरी या राक्षसिणीनें नाशिलिं किती मंदिरें ॥ किती अबलांना अनाथ केल्या अनाथ किती लेंकरें ॥ "

कोल्हटकरांनीं कांहीं कांहीं पदें अगदीं सुबोध रचलीं आहेत, आणि त्यांत भावनांचा रसहि ओतप्रोत भरलेला आहे. त्यांचें एक उदाहरण—

" सुलभ मनिं गणा न भूपसुता ॥ करूं बघतां काशि ती वनिता ॥ पडले धरणीपालहि चरणीं ॥ प्रयत्न जाति वृथा ॥ सकलही ॥ वीरहि आले परतुनि गेले ॥ मुळीं यश न मिळतां तयांप्रति ॥ राजकुमारी उभी सामोरी ॥ त्यजा न किंकरता ॥ विसरुनी ॥ "

याच पंक्तींत बसणारीं पदें म्हणजे, ' सहज कशि खेळविते ललना ' ' उगिच कां कांता गांजितां दासी ', ' अवचित गेलें किंकर–करीं मी ' ' वळते अंजलि न कळत बघूनि तुम्हांलागि '

लवचिक भाषाशैली

या नाटकाची सर्वच भाषाशैली स्वाभाविक व लवचिक आहे. तिच्यांत विनोद म्हणजे दुधांत साखर ! याचा एक नमुना पहा.

" प्रतोद–केवढें हो त्याचें पोट ? दारूच्या सुरईनें आपल्या भक्ताला अगदीं आपल्यासारखेंच बनविलें आहे. म्हणजे वरचा भाग अगदीं पातळ, आणि खालचा खूप सुटलेला (हंसतो.)

विकंठ–(एकीकडे) अरे गाढवा, थांब तुझाही खालचा भाग चाबूक मारून चांगला सुजवितो.

प्रतोद–मी पैजेनें सांगतों कीं, कांहीं दिवसांनीं त्याची लांबी कोणती

आणि रुंदी कोणती हें सांगतां येणार नाहीं. इतक्या झपाट्यानें त्याची रुंदी वाढत चाललेली आहे. स्वारी चालतां चालतां तिच्या शरिराचा प्रवास सभोर होतो त्यापेक्षां आडवाच जास्ती होतो.

केयूर—त्याच्या अंगांत मेद जसा भरून गेला आहे, तसा हाडांतही मूर्खपणा खिळून गेला आहे.

प्रतोद—आतां लठ्ठपणामुळें हाडेंच दिसण्याची मारामार. मग हाडांत खिळलेला मूर्खपणा दिसण्याची गोष्ट लांबच राहिली.''

बायकांची नाजूक व घरगुती भाषासुद्धां कोल्हटकरांना कांहीं कांहीं ठिकाणीं उत्तम साधलेली आहे. त्याचा एक मासला—

''प्रमद्वरा—म्हटलें म्हणजे यांचे हे कांहींसे अल्लडपणाचेच दिवस. पण अंगीं किती तरी भारदस्तपणा ! आमच्यासारख्या बायकांनासुद्धां यांच्यादेखत बोलावयाची भीति वाटते. नाहीं तर आमच्या वेत्रिकाबाई-साहेबांकडे पहा. वयानें पाहूं गेलें तर एखाददुसरा पावसाळा जास्तीच लोटला असेल, पण सकाळपासून संध्याकाळपर्यंत सारखी अंगाची लवलव व तोंडाची बडबड चालावयाची, अंमळ पाठ फिरली म्हणजे झालीच सुरवात धांगडधिंग्याला, बरें इतकेंहि असून सरोजिनीबाईंचा इच्यावर जीव कीं प्राण.''

विचारांचे पडसाद

'गमन उद्धत दर्शवी क्षात्र तेजा' या कोल्हटकरांच्या पद्यपंक्तीमध्यें भवभूतीच्या 'नमयतीव गतिर्धरित्रीम्' या कल्पनेचा प्रतिध्वनि उमटलेला ऐकूं येतो. पण याहिपेक्षां अधिक स्पष्ट व सुरेख पडसाद खाडिलकरांनीं 'नमवी पहा, भूमि हा चालतांना' या शब्दांतून उमटविला आहे. मूक-नायकांतील कांहीं कल्पना—बीजाचा विस्तार गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' नाटकांत पहावयास सांपडतो. दारूनें बेहोष झालेला राजा आपल्या राणीला 'प्रिये' असें संबोधून लगेच संशय घेतो, ''माझ्या प्रियेला मघापासून 'प्रिये, प्रिये' म्हणून कोण हांका मारीत आहे बरें ?'' त्यानें मुक्यावर वहीम घेणें आणि 'एकच प्याल्यां'तील सुधाकरनें रामलालवर आळ घेणें

सारखेंच. सुधाकराप्रमाणेंच हा राजाहि दारूच्या तारेंत म्हणतो, 'मला अजून चढली नाहीं.' बहुतकरून गोड फळांनाच कीड लागलेली आपण पाहतो' ही कल्पना कोल्हटकरांप्रमाणेंच गडकऱ्यांनाहि शोभण्यासारखी आहे. 'इच्छा आणि तृप्ति ही जवळजवळ एकाच काळीं घडून येतात.' या विचाराचाहि पडसाद 'एकच प्याल्या'मध्यें ऐकूं येतो. अर्थात् ह्यांतील पहिला मान कोल्हटकरांचा. विनोदी कोट्या, मधुर पदें, सभ्य शृंगार, हास्यकारक कथानक आणि त्या सर्वांतून मद्यपानाच्या निषेधाचा सूर या सर्व गुणांमुळें 'मूकनायक' हें नाटक रसिकांचें अत्यंत लाडकें होऊन बसलें आहे.

त्रिवेणीचें स्वभाव-चित्र

'वधूपरीक्षा' हें कोल्हटकरांचें पहिलें गद्यनाटक—१९१३ सालीं लिहिलेलें. पुढें त्यालाहि संगीताचा वेष चढविण्यांत आला. या नाटकाचा 'मुख्य उद्देश मनोरंजक' हाच असला तरी 'माझ्या संगीत नाटकांतल्याप्रमाणें याहि नाटकांत कांहीं तत्त्वांचें मंडन करण्याचा प्रयत्न केला आहे.' अशी स्वच्छ कबुली नाटककारानें प्रस्तावनेंतच दिलेली आहे. हें तत्त्व म्हणजे प्रेमाचें, बाल-विवाह, विषम-विवाह, जातिभेद, यांच्यावर जातां जातां या नाटकांत टीका आलेली आहे. पण प्रेक्षकाच्या चित्तावर मुख्य विषय ठसतो, तो म्हणजे एका संस्थानिकानें स्वतः केलेली वधूपरीक्षा.

विलायतेहून आल्यानंतर राजेसाहेब धुरंधर ज्योतिष्याचा वेष घेतात आणि निरनिराळ्या मुलींची पारख करतात. त्यांना पसंत पडलेली त्रिवेणी म्हणजे अचल प्रेमाची मूर्तिच. राजाचा खून केल्याचा आरोप या ज्योतिषावर-म्हणजे खुद्द राजावरच-येऊन त्याच्यावर न्यायमंदिरांत खटला चालतो. 'आयुष्यांत एकदांहि दृष्टीस पडणार नाहीं' असा हा विलक्षण प्रसंग. त्यांतून राजाला सोडविण्यासाठीं त्रिवेणी न्यायाधिशाच्या घरीं जाऊन पाया पडते, भावी राजाची आर्जवें करतें आणि शेवटीं न्यायमंदिरांत उभें राहून स्वतःच खून केल्याचा खोटा आळ आपल्यावर घेते. परंतु राजमाता न्यायमंदिरांत येतांच तिच्या शब्दाच्या फुंकरीनें हे सारे पत्त्यांचे बंगले कोसळतात. त्रिवेणी ही एका कुणब्याची मुलगी असा भ्रम मध्यें

निर्माण झालेला होता, पण अखेर ती न्यायाधिशांचीच ठरली आणि राजाची राणी बनली. राजा व त्रिवेणी यांच्या गूढ वर्तनामुळें कथानकांत गमतीच्या गुंतागुंती झालेल्या आहेत.

भाषेचें गांभीर्य

विनोदपूर्ण व काव्यमय अशी भाषाशैली कोल्हटकरांची असली, तरी तिची मूळची प्रकृति गंभीरच दिसते. एखाद्या वक्ता जसा स्वतः स्थिर राहून श्रोत्यांना खदखदां हंसवितो, तशी कोल्हटकरांची भाषा निबंधासारखी ताठ असूनहि हास्याच्या लाटा उत्पन्न करते. राजा आपल्या आईवरील प्रेम प्रगट करतांनाहि सिद्धांतरूप ग्रंथाची भाषा अशी वापरतो, 'आटोकाट धोरण व अप्रतिम पुत्रवात्सल्य यांच्या साहाय्यानें आपण माझें गत चरित्र जसें ठरविलेंत. तसें भावी चरित्र ठरविण्याचाहि आपणाला अधिकार आहे.' तसेंच त्रिवेणीला तिचा पालक भावनेच्या भरांत म्हणतो, "केवळ दयेनेंच घेतलेला तुझा पत्कर दिवसेंदिवस तुझ्या सहवासानें प्रेमाचा वाटूं लागला; आणि आतां तर तो माझें जीवनच होऊन बसला आहे." आणि त्रिवेणी तर स्वतःशीं बोलतांनासुद्धां व्यासपीठावर उभ्या राहिलेल्या व्याख्यात्याचीच भाषा बोलते. ती म्हणते, "विषयसुख हीच ज्याच्या ऐहिक कर्तृत्वाची परमावधि, स्वसुखार्थ परपीडन हाच ज्याचा पवित्र धर्म व परमात्म्याशिवाय भिन्न असें स्वतःचें अस्तित्व नाहीं, याऐवजीं स्वतःशिवाय दुसरा परमात्मा नाहीं हें ज्याचें तत्त्वज्ञान, अशा पशूला ईश्वराच्या किंवा आत्म्याच्या उच्च कल्पना कोठून असणार?" तसेंच त्रिवेणी न्यायाधिशाची करुणा भाकण्यासाठीं गेली असतांना ती न्यायाधिशाच्या कामगिरीवर जी झोड उठविते, तीहि अस्वाभाविक आहे; मात्र त्यांत बाप-लेकीचा जो अभाषित उल्लेख येतो, तो 'पताका–स्थानाप्रमाणें' (Dramatic Irony) चमत्कृतिजनक आहे. "हें भाकित यांच्या उदार इच्छेचेंच अपत्य असावें" अशी इंग्रजी धर्तीची वाक्यरचना त्रिवेणी करते. आणि राजा धुरंधर तर कांय? "या घरांतील सगळ्या माणसांनीं जरी निंदेच्या तुफान वाऱ्यानें माझ्या हृदयसमुद्राला हलवून सोडलें, तरी

तुझा एक स्नेहयुक्त शब्दच त्याचें शमन करण्याला समर्थ आहे.'' अशी अलंकारमय वाक्यें लीलेनें फेकतो.

सरस-नीरस कोट्या

शब्दावर कोट्या करून व विरोधाभासात्मक वाक्यें रचून चमकृति निर्माण करण्यांत व हास्य उत्पन्न करण्यांत कोल्हटकरांचा हातखंडा आहे. '' मुलींना एकच उत्तम वर देवाला मागण्यासारखा असतो, आणि तोहि उत्तम वर हाच, होय ना ? '' अशी ' वर ' शब्दावरील कोटी प्रेक्षकांना हंसविणारी आहे. या कोटिबाजपणाचा अतिरेक झाला म्हणजे '' तुझ्या कपाळावरील आठी नाहींशी करण्याला मी आठीप्रहर तुझी मनधरणी करीन '' अशी कृत्रिम भाषा येते. भाषालंकारांचें सौंदर्य कोल्हटकरांच्या कृतींत जागजागीं आढळतें. '' देवळासमोरील या विस्तीर्ण तळ्यांत कमळांची फार दाटी आहे म्हणून आजपर्यंत कीर्ति होती. पण देवळांतील या मुखकमलांच्या गर्दीपुढें तर तीं कमळेंहि विरळ भासूं लागलीं. '' अशा सुंदर कल्पना कोणत्याहि पात्राच्या मुखांतून बाहेर पडतात. '' स्वतःची वंचना करून घेऊन जन्माचें नुकसान करून घेण्यापेक्षां याप्रमाणें कांहीं दिवस परवंचना करून स्वतःचें जन्माचें कल्याण करणें, '' असे शब्दांचे खेळ राजापासून कोतवालापर्यंत झाडून सारे लोक करतात.

सौंदर्याची मीमांसा

आदर्श पत्नीचें कार्य काय असावें हें सांगतांना राजानें जे उद्गार काढले आहेत, ते सुभाषितांप्रमाणें आहेत. ते असे—'' मी सुमार्गानें चाललों असतां आपल्या कृपाकटाक्षानें उत्तेजन देणारी व मी उन्मार्गगामी होऊं लागलों असतां मला प्रेमरज्जूनें आवरणारी स्त्री कोठें मिळणार ? ''

स्त्री-सौंदर्यानें तरुणाची कशी फसगत होते, हें भार्गवाच्या तोंडून नाटककारानें खुबीनें सांगितलें आहे. भार्गव म्हणतो, '' एखाद्या बालेचा शुभ्रवर्ण पाहिला कीं, तिच्यांत सोज्वळ गुणहि असावेसें त्याला भासूं लागतात; नाकाप्रमाणें वर्तनांतहि सरळपणा असावासा वाटूं लागतो;

शरिरांतील समतोलपणा पाहून तो मानसिक स्थितींतहि समतोलपणा कल्पूं लागतो; विशाल नेत्रांवरून तो मनाच्या उदारपणाचीहि कल्पना बांधतो; आणि मधुर हास्यावरून गोड वर्तनाचें अनुमान करून तो मिटक्या मारूं लागतो. ''

करुण रसाचे पाझर

अशा टणक भाषाशैलींतूनहि करुणरसाचे पाझर कोठें कोठें फुटलेले आहेत. मानलेल्या पित्यानें आपलें संगोपन किती आस्थेनें व प्रेमानें केलें, याची कृतज्ञ जाणीव व्यक्त करतांना त्रिवेणी विश्वेश्वरशास्त्रांना हृदय हलविणाऱ्या भाषेंत म्हणते, '' आजपर्यंत मला कधीं दुखलेंखुपलें, तेव्हां तुम्हींच ना माझा समाचार घेतला ? दुखण्यांत रात्रीचा दिवस करून माझ्या उशाशीं तुम्हीच जागलांत ना ? लहानपणीं माझ्या मनाला करमेनासें होई, तेव्हां मला परोपरीचीं खेळणीं देऊन माझें मन तुम्हींच रिझविलें ना ? मी उपाशी असतां तुमचेंच मन कळवळत असे ना ? मी रडूं लागलें असतां पदरानें तुम्हींच माझे डोळे पुसले ना ? मी एकदां मरणाच्या दारीं पडलें होतें, तेव्हां प्रेमानें मला अश्रुस्नान तुम्हीच घातलें ना ? ''

एक नीरस फार्स

'' रसिकांची चार घटका '' करमणूक करण्याकरितां कोल्हटकरांनीं १९१७ सालीं ' सहचारिणी ' हें नाटक लिहिलें. तें ' प्रहसन–वजा ' आहे, अशी कबुली त्यांनींच प्रस्तावनेंत दिली आहे. एक साधा ' फार्स ' असेंच त्याचें स्वरूप आहे. कोणताहि सामाजिक व तात्त्विक विषय आधाराला घेतलेला नाहीं. पण फार्स म्हणूनसुद्धां ही रचना यशस्वी झालेली नाहीं. त्यांतील विनोद पहिल्या प्रवेशांत तेवढा चांगला साधलेला आहे, पण पुढें पुढें कमी होऊन शेवटीं शून्यावर येतो. खानावळींतील ताकांत प्रत्येक पंक्तीमागें पाणी मिसळतां मिसळतां शेवटीं पांढरें पाणीच शिल्लक रहावें, असा हा प्रकार. '' हें नाटक अगदीं सपाट व रसहीन आहे. त्यांतील घटना सर्वस्वीं अतिशयोक्त, अतिरंजित, अस्वाभाविक आणि

अनैसर्गिक वाटतात.'' असे आक्षेप टीकाकारांनीं घेतले आहेत. पण खरा टीकाकार म्हणजे प्रेक्षक-वर्ग. त्याचाहि अभिप्राय तोच पडला. 'गंधर्व नाटक मंडळी'सारख्या बादशाही रंगमूमीवर बडोदें येथें तेथील रसज्ञ महाराजांसमोर १९१८ सालीं या नाटकाचा जो प्रयोग झाला, तो साफ पडला. तोच अनुभव मुंबईसहि. मोठ्या अपेक्षेनें एखाद्या रसिकानें संध्याकाळचा देखावा पहावयास जावें आणि ढगांवरील तांबडे-पिवळे रंग क्षणभर दिसतात न दिसतात तोंच त्याच्यापुढें अंधार पसरावा, असा निराशेचा अनुभव या नाटकानें प्रेक्षकांना दिला.

मोडक्या वाड्याचें नक्षीदार दार

'दोन बायकांच्या दादल्याची स्थिति' हा विनोदी विषय कोल्हटकरांनीं या नाटकासाठीं निवडला आहे. नुसत्या दोन बायकाच नव्हे, तर त्यांची असंख्य प्रजा हीहि त्यांनीं भरतीला घेतली आहे. आपल्यालां मुलें-मुली किती आहेत ? त्यांतील जिवंत कोण ? मृत कोण ? त्यांचीं नांवें काय ?- कशाचाहि पत्ता रंगराव जहागीरदारांना नसतो ! या एका विलक्षण घटनेवर कोट्यांमागून कोट्या व कल्पनेमागून कल्पना चालवून नाटकाचा पहिला प्रवेश रंगरावांनीं रंगविला आहे. तो पहातांना-किंवा वाचतांना-कोणालाहि खो खो हंसूंच येईल असा अत्यंत विनोदी हा भाग आहे. पण साऱ्या नाटकांत तेवढाच भाग श्रवणीय व वाचनीय आहे. एखादा सुंदर नक्षीदार दरवाजा पाहून आपण वाड्यांत पाऊल टाकावें आणि आंत जिकडेतिकडे मोडतोड व नासधूस दिसावी, त्याप्रमाणें आकर्षक आरंभ असलेल्या या नाटकाच्या पुढील भागांत विनोदाचा व स्वाभाविकतेचा अभावच आढळतो. रावजी व नाना हे दोघे चोर मुंबईला डल्ला मारून रंगरावाच्या घरीं वेषांतरानें आश्रयाला येतात आणि त्यांच्या मागावर असलेला गुप्त पोलिस विश्वासराव हाहि तेथें येतो. तो या चोरांचें बिंग फोडतो आणि त्याचें वत्सलेशीं लग्न होतें हें या नाटकाचें कथासूत्र.

कल्पक विनोद

आपल्या मुलामुलींच्या अमर्याद संख्येची कल्पना आणून देण्याकरतां

रंगराव विश्वासरावाला सांगतो, " गुडघ्यायेवढ्या मुलीपासून तुमच्याहिपेक्षां उंच आणि अस्थिपंजरापासून तुंदिलतनूपर्यंत सारे मासले तुम्हांला दाखवितों. बावनकशी सोनें आणि कोळशांतलें माणिक किंवा आगगाडिचा इंजनवाला साहेब आणि त्याचा कोळसेवाला यांमधील बहुतेक रंग येथें सांपडतील. त्यापैकीं वाटेल तो पसंत करा. काळे, हिरवे, घारे हे डोळ्यांचे प्रकार आणि पांढऱ्यांवांचून बाकीच्या वाटेल त्या रंगाचे केस दिसून येतील, एका मुलीचे डोळे आणि दुसरीचे केस तुम्हांला आवडत असतील तर दोघींशीं लग्न करा. "

रंगराव रावजीला म्हणतो, ' मला आपण दत्तक घ्या. ' तसें केल्यानें काय परिणाम होईल याचें चित्र रेखाटतांना रंगराव सांगतो, " मी, माझ्या मांडीवर दोन बायका, प्रत्येकीच्या मांडीवर बीसपंचवीस पोरें, अशा प्रकारें कसरतीचा खेळ तयार झाल्यावर निवेश होऊन संस्थान खालसा होण्याची भीति कशाला पाहिजे ! " आतां या मुलांच्या बहुसंख्येवर रंगराव कशा कोट्या लढवितो पहा. " नाटक मंडळींतील पोरें दुसऱ्या मंडळींत पळून तरी जातात, मी मात्र वैतागून पळून जाण्याच्या बेताला आलों आहें खरा.....इतर घरांत बाप मुलांना शहाणपण शिकवतात, मला मात्र मुलांनीं शहाणें केलें.....मी मुलांना संध्या शिकवावयाची ती त्यांनींच मला शिकविली आहे. (कारण संध्येंतील चोवीस नांवें मुलांना दिलीं.).....यापुढें मुलगा झाला कीं विष्णुसहस्र-नामाला सुरवात करावयाची.....(मुलींच्या नावांमुळें) साऱ्या नद्या आटून गेल्या.....माझ्या कुटुंबाचा विस्तार वाढल्यापासून मला कोणी कुंकुम-पत्रिकाच पाठवीत नाहीं. एखाद्यानें पाठविलीच तर "सहकुटुंब सहपरिवारें" हे शब्द खाडून मग पाठवितात.....नुकतेंच एकानें माझ्या सर्व कुटुंबाला जेवणाला बोलाविलें होतें. पण त्या दिवशीं त्याच्या घरांत इतकी गर्दी झाली कीं, तिच्यांत खुद्द यजमानच कांहीं वेळ नापत्ता झाला ! आणि त्या जेवणावळीचा त्याला इतका खर्च आला कीं, त्याला दिवाळें काढावें लागलें. " अतिशयोक्तीची अतिशयोक्ति करण्यांत कोल्हटकरांनीं ही केवढी मजल मारली आहे !

कथानकांतील कच्चे दुवे

अतिशयोक्तीप्रमाणेंच शाब्दिक कोट्यांचाहि पाऊस पाडून कोल्हटकर खसखस पिकवतात. 'मुलें अर्ध्या वचनांत आहेत' असें ऐकतांच रंगराव म्हणतो, "परवां मी एका मुलाला म्हटलें कीं, 'बाळ हा खाऊ घे आणि आपल्या बहिणीला नेऊन दे.' त्यानें तें ऐकून तो खाऊ घेतला आणि बहिणीला देण्याऐवजीं स्वतःच्याच तोंडांत टाकला." जेव्हां बचंभटजी तोंडपुजेपणानें रंगरावाला म्हणतात, "तोंडावर तेज कसें अग्निसारखें लखाखतें आहे!" तेव्हां रंगराव उत्तर देतो, "अग्निसारखें खरेंच, मात्र साध्या नाहीं, तर धुतलेल्या अग्निसारखें!" नबाब, निजाम वगैरे पदव्यांचे घोटाळे करून रंगराव आपल्याला शकाराच्या मालिकेंत बसवितो. जनूभाऊ तीनदां बुरखा घेऊन 'संशय-कल्लोळाची' आठवण करून देतो. त्यानें रावजीकडून आंगठी घेतली, तरी त्याचें आनंदीबाईचें सोंग कोणाच्या लक्षांत येत नाहीं, यावर प्रेक्षकांनीं विश्वास ठेवावा अशी नाटककाराची भलती अपेक्षा आहे. तसेंच अनत कुलकर्णी हा शेजारचा तरुण केवळ धोतरटोपीऐवजीं पाटलोण-हॅटमध्यें येतांच, आणि त्याच नांवानें तो वावरत असतांनाहि, कोणालाहि ओळखूं येऊं शकत नाहीं, असेंहि या नाटकाच्या प्रेक्षकांना मानावें लागतें. हे सारे कथानकांतील कच्चे दुवे होत.

कल्पकतेवरील कलंक

कांहीं कल्पना मात्र काव्यपूर्ण व रम्य आहेत. वत्सला आपल्या मनांत ज्या अज्ञात प्रियकराची अंधुक कल्पना करीत असते, त्यासारखाच विश्वासराव तिला दिसतांच ती म्हणते, "हवेंत तरंगत असलेल्या बाष्पाचें सुंदर दंव बनावें, किंवा चंचल पाण्यांत दिसणाऱ्या मोडक्या प्रतिबिंबाचें, पाणी स्थिरावल्याबरोबर सुंदर चंद्रबिंब व्हावें; त्याप्रमाणें माझी भावी पतीबद्दल जी मोघम कल्पना होती तिला यांना पाहिल्याबरोबर एकदम मूर्तस्वरूप आलें."

मात्र या कल्पकतेमुळें कांहीं ठिकाणीं दुर्बोधता व कृत्रिमता आली आहे. 'तुझ्या शरीर-नभावरून अलंकार-मेघ दूर करतांना' अशी अलंकारिक भाषा चोरसुद्धां वापरतो आणि 'राशीचक्रा'चाहि जोतिषशास्त्रीय

दाखला देतो. मग नायक असलेला विश्वासराव काय बोलत असेल ? त्याचा एक नमुना म्हणजे " निराशेच्या अंधकाराबरोबर आशेचे किरण मिश्र होत असल्यामुळें निदान संदेहाचा संधिप्रकाश तरी मला मिळत आहे. त्यास कंटाळून कृतार्थतेचा उज्ज्वल प्रकाश प्राप्त करून घेण्याचा जर मीं प्रयत्न केला."

कोटिक्रमांतील कोरडेपणा

कोल्हटकरांनीं आपल्या नाटकासाठीं सामाजिक विषयांचें क्षेत्र आंखून घेतलें होतें. १९०६ सालीं सर्व देशांत राजकीय असंतोषाच्या ज्वाला पसरलेल्या असतांनाहि त्यांची धग कोल्हटकरांच्या नाट्यसृष्टीला लागली नाहीं. " सुभगपण भरतभूवरिं वितरीं ईश्वरा ॥ स्वातंत्र्य म्हणुनि शिरीं । सौभाग्य-तिलक धरि । " अशी आशा " मति–विकार "च्या भरत-वाक्यांत त्यांनीं प्रदर्शित केली तेवढीच. पण ज्यावेळीं कर्झनशाहीवर कडाड-णारें " कीचक-वध " नाटक खाडिलकर रंगभूमीवर उभे करीत होते, त्याचवेळीं त्यांचे स्नेही असलेले कोल्हटकर " मति–विकार " महाराष्ट्राला सादर करीत होते. त्याचा मुख्य विषय आहे पुनर्विवाह. आनु-षंगिक म्हणून ' शारदे'तील बाला–वृद्ध–विवाहहि आलेला आहे. पुन-र्विवाह व केशवपन यासंबंधींचीं सनातनी व सुधारक वर्गांचीं उलटसुलट मतें या नाटकांतील निरनिराळीं पात्रें युक्तिवादानें मांडतात. पण हरिभाऊंच्या ' पण लक्षांत कोण घेतो ' मधील यमूच्या करुण कहाणीमुळें विधवांच्या केश-वपनाविरुद्ध जें प्रखर मत तयार होतें, त्याच्या शतांशसुद्धां कोल्हटकरांच्या या नाटकांतील कोरड्या कोटिक्रमानें होऊं शकत नाहीं.

पुनर्विवाहाची मीमांसा

वास्तविक या नाटकाचें नांव ' मति-विकार ' असण्याऐवजीं ' मति - विकास ' असणेंच योग्य. कारण पुनर्विवाहाच्या प्रगतिपर विचारांनीं मतीचा विकासच होतो, असें नाटककाराला दाखवावयाचें आहे. या नाटकांत सत्यसृष्टींतील पात्रें, वर्तमानकालांतील प्रसंग व वास्तव व्यवहारांतील विचार आलेले असल्यानें कोल्हटकरांच्या इतर नाटकांच्या मानानें यांत

पुष्कळच खरेपणा व जिवंतपणा आलेला आहे. पण काव्यप्रियता व चमत्कृतिप्रियता यांच्या मगरमिठींतून त्यांची प्रतिभा पूर्णपणें सुटलेली नाहीं. नाटकांतील पदांची संख्या १०८ आहे. जपानहून परत आलेला चकोर हा चंद्रिकेला भेटण्यासाठीं वेषांतर करतो, एवढेंच नव्हें तर पुढें तिच्याच गाडींत बसून जातो. त्याची बहीण तरंगिणी ही मेल्याची अफवा उठवून तिला बुरख्यामध्यें वावरण्यास नाटककारानें लावलें आहे. विशेष म्हणजे त्याच गांवांत विधवांच्या आश्रमांत ती अध्यापनाचें काम करते, आणि तिच्यासीं दीर्घकाळ संभाषण करूनसुद्धां तिचा पति तिला बुरख्यामुळें ओळखूं शकत नाहीं. प्रेक्षकांच्या विश्वास-शक्तीला नाटककारानें केवढा हा ताण दिला आहे! मनोहर या त्यागी व सत्यनिष्ठ समाज-सेवकाचें विरक्त स्वभावचित्र मात्र फारच उदात्त आहे. उलट हरिहरशास्त्री हा खलनायकासारखी नीच कृति करीत असला, तरी तो फारसा बुद्धिमान दाखविला नाहीं. केवळ सनातनी पुढाऱ्याची हिणकस बाजू समाजापुढें मांडण्याचें काम त्याच्या द्वारें कोल्हटकरांनीं साधलें आहे.

आनंदराव हा 'बोलका सुधारक' दाखविलेला आहे. पुनर्विवाहाची संधि आली असतांना "मावसकाकाच्या मेव्हण्याच्या सावत्र आईचा जो मामा, त्याच्या चुलत चुलत पुतण्याची सख्खी आजी" विरुद्ध आहे, या लंगड्या सबबीवर तो पुनर्विवाह टाळतो. आणि तरी सभेंत पुनर्विवाहावर सुंदर भाषण करून "श्रोत्यांना गारीगार" करण्यास तयार असतो. चकोर व चंद्रिका यांचा पुनर्विवाह करण्यास तो कचरतो. पण मोठें धैर्य दाखवून "त्या दोघांची गांठ पडावी अशी योजना करण्याचा प्रयत्न करण्याच्या मार्गाला लागण्याचें मनापासून वचन देतो."

मनोहर शब्द-लीला

नाटकाची भाषा सहज व लवचिक आहे. "मिथ्याध्यवसिति"-सारखे शब्द थोडेच आढळतात. तसेंच "कृष्णमेघरूपी राक्षसांची सेना विद्युद्रूपी राळेच्या प्रकाशांत आरोळ्या ठोकीत क्षितिजरूपी पडद्याच्या बाहेर सपाट्यानें पडत आहे. या भूमंडलरूपी कटाहास विद्युद्रूपी कथिलानें

विश्वंभर कल्हईच देत आहे असें वाटतें." अशी कृत्रिमताहि क्वचितच आहे. एरवीं विरोधाभासात्मक व श्लेषात्मक भाषा सर्वत्र आल्हाद देते. "वैद्य लोक कडू गोळ्या शर्करावगुंठित करून विकतात आणि वाणी शर्करा कटुपदार्थावगुंठित करून विकतात." किंवा "बायका आपल्या पतींना वाकवितात आणि दागिने त्यांना वाकवितात." अशी विरोधाभासाचीं उदाहरणें मधूनमधून आढळतात.

बायकांची सहज भाषा

मुलींची सहजसुंदर भाषाशैलीहि कोल्हटकरांना साधते, हें दाखविणारा एक संवाद आहे, तो असा —

हंसिका—ताई, तुला रुचत नसेल तर आम्हीसुद्धां गप राहतो हो ! आज तुला आमच्या खेळांत घेतल्यावांचून बरीक कांहीं सोडणार नाहीं.

चंद्रिका-तुम्हांला बरें वाटत असेल तर मीहि तुमच्या म्हणण्याबाहेर नाहीं.

हंसिका आता कसें आमच्या जिवाला समाधान वाटतें. बरें, आता खेळ खेळायचा तरी कोणता ? छपापाणी कीं फुगड्या ?

कमला—छे बाई ! हे दोन्ही धांगडधिंग्याचे खेळ काढलेस ! चंद्रिकेच्या कैकयी आईसाहेबांच्या कानांवर जर का इकडचा ब्र गेला तर त्या आकाशपाताळ एक करून सोडतील.

तारा—खरें पाहिलें तर त्या आपल्याच बरोबरीच्या ! पण रावसाहेबांच्या अर्धांगी झाल्यापासून नाकावर माशी कशी ती टिकत नाहीं !

विमला—आणि दागिन्यांनीं कशी सजली असते पाहिलीत ना ? गौरीसारखी.

हंसिका—असें असून आमच्या ताईचे केस बरीक तिच्या डोळ्यांत कसे खड्यासारखे खुपतात.

चंद्रिका—पुरे झाल्या बाई आईवरच्या तुमच्या टीका ! ती वयानें बरोबरीची असली म्हणून काय झालें ? मानानें तर वडील आहे ना ? ठीकच आहे.

कांहीं पडेल नाटकें

कांहीं कांहीं नाटकें कोल्हटकरांची कीर्ति साफ पुसून टाकणारीं आहेत. सहचारिणी, गुप्तमंजूष इत्यादींमध्यें कोल्हटकरांच्या सर्व नाट्यदोषांचें जणुं संमेलन भरलें आहे. ' गुप्तमंजूष ' हें नाटक १८९९ मध्यें लिहिलेलें असून त्यांत ११२ पदें आहेत. त्यांत तीन रहस्यैंहि गुंफलेलीं आहेत. पण क्लिष्ट भाषा व आचरट विनोद यापलीकडे कशाचाहि परिणाम श्रोतृगणावर होत नाहीं. स्त्रीशिक्षणासारखा जिव्हाळ्याचा विषय या नाटकाचा असूनहि कलाहीनतेमुळें तो वायां गेला आहे.

स्त्रियांच्या समान हक्काचा पुरस्कार करणारें ' परिवर्तन ' नाटक १९२२ मध्यें ' विविधज्ञानविस्तारांत ' क्रमशः प्रसिद्ध झालें. शीलरक्षक ताईताची अजब कल्पना यांत गृहीत धरली आहे. त्यामुळें त्याचा पायाच अस्वाभाविक झाला आहे. किशोराची भाषाहि तशीच त्याला न शोभणारी आहे. याच विषयाचा नाट्यरूप उठाव किती सुंदर होऊं शकतो, हें खाडिलकरांनीं आपल्या ' वायकांचें बंड ' मध्यें कौशल्यानें दाखविलें आहे.

दोन यशस्वी नाटकें

खुद्द नाटककाराला आपलें ' अत्युत्कृष्ट ' वाटणारें नाटक म्हणजे ' जन्मरहस्य. ' त्यांचें हें पाहिलेंच शोकान्त नाटक. प्रतिलोम–विवाह हा त्याचा विषय. रघुनाथ हा शूद्र असतो पण ब्राह्मणाच्या घरीं ब्राह्मणासारखा वावरतो. त्यावर कांता प्रेम करते, पण शेवटीं रघुनाथाचें शूद्रत्व उघड होतें आणि मग नायक–नायिका दोघे विषप्राशन करून आपल्या आयुष्याचा अंत करून घेतात असें या नाटकाचें कथा–सूत्र आहे. सात पात्रांतच सारें कथानक खेळत आहे; आणि त्यांत खल–नायक कोणीहि नाहीं हें विशेष. जातिभेद हाच विघ्नपुरुष आहे. 'अस्तुरी–इस्तरी'सारख्या कोट्या थोड्याच. 'चुंबनोन्मुख,' 'सौंदर्यपुष्प वयोज्वालेनें म्लान,' 'गगनरूपी सैकतांतील तारकारूपी गारगोट्या ' असे अवजड शब्द–प्रयोग आहेत, पण अत्यल्प. ' दासनृप किंवा नृपदास ' असणारा नोकर कल्याण आंधळी व बहिरी कोशिंबीर खेळतो, याशिवाय कोल्हटकरी विनोदाला

यांत वाव नाहीं. मालतीचें स्वभाव—चित्र जितकें करुण, तितकेंच रघुनाथाचें उदात्त दाखविलें आहे.

रसिकांनीं मात्र 'जन्मरहस्या'पेक्षां 'प्रेमशोधना'वरच आपल्या पसंतीचा शिक्का मारला आहे. याचा विषय विषमविवाह हा आहे. मार्क-ट्वेनच्या कथेचा आधार या नाटकाला घेतला आहे. याच्या तालिमी खाडिलकरांनीं घेतल्या आणि कोल्हटकरांनीं आपलें हृदय यांतील प्रत्येक पात्रांत ओतलें. त्यामुळें १९१० सालापासून किर्लोस्करांच्या रंगभूमीवर हें नाटक यशस्वी होत गेलें. यांतील पदें प्रासादिक, संवाद चटकदार व स्वभावलेखन मार्मिक असून विनोद सहजसुंदर आहे. त्यामुळें हें नाटक कोल्हटकरांच्या कीर्ति-किरिटावरील एक तेजस्वी तुरा ठरलें आहे.

प्रतिभेचें वार्धक्य

उतारवयांत कोल्हटकरांनीं लिहिलेल्या तीन नाट्यकृतींना रंगभूमीचें सौभाग्य लाभलें नाहीं. तीं तीन नाटकें म्हणजे 'शिवपावित्र,' 'श्रमसाफल्य' व 'मायाविवाह.' कल्याणीला मातुःश्री मानण्याचा प्रसंग शिवछत्रपतींच्या चमत्कृतिपूर्ण चरित्रांत अद्भुतरम्यच आहे. नव्या इतिहास-संशोधनानें तो प्रसंगच मिथ्या ठरविलेला असला, तरी त्यांतील कल्पना उदात्त आहे. पण कोल्हटकरांना या नाटकांतील पहिला व अखेरचा असे दोनच प्रवेश काय ते नाट्यपूर्ण रचतां आले. बाकी सर्व सपाट माळरान आहे. शिवाजीच्या तोंडीं दोन दोन पानें भाषणें घातलीं आहेत आणि तीं आजकालच्या भाषेचीं व विचारांचींहि. 'रणरूपी बोहल्यावर विजयश्रीचें पाणिग्रहण' असें रूपक शिवाजी कधीं योजतो, तर कधीं "जखमेकरितां शुश्रूषा व्हायची ती शुश्रूषेकरितां जखम करून घेतली." अशी कोल्हटकरी शब्द-लीला करतो. वास्तविक हरिभाऊ आपटे यांनीं आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांमध्यें रंगविलेली शिवाजीची रसवंती कोल्हटकरांच्या डोळ्यापुढें होती व शिवरामपंत परांजपे यांनीं त्याच्या स्वदेश-प्रेमाची उत्तुंग कल्पनाहि रम्य भाषेंत मांडलेली त्यांना माहीत होती. पण या दोघांहि वाग्भटांचा एकहि गुण कोल्हटकरांच्या शिवाजींत उतरलेला नाहीं. वृद्ध कोल्हटकरच

शिवाजीच्या मुखानें बोलत आहेत असें वाटतें. शिवाजीचा सावत्र व कपटी मामा शभूजी हा 'जगज्जिगीषु 'सारखे जड शब्द वापरतो आणि यवनी लष्कराचें वर्णन करतांना "पाणीदार तरवारी व पाणीदार घोडे, तोडेदार बंदुका आणि तोडेदार हत्ती, चक्रावर चढविलेल्या तोफा आणि चक्राकार फिरणारे रथ" अशा शब्दांच्या कोल्हांट्या उड्या मारतो. यांत वर्णिलेले हजामाचे गुण वाचतांना कोल्हटकरांच्या "सुदाम्याचे पोहे" यांतील विनोदी लेखाची आठवण होते.

विचारांचा पोक्तपणा

'श्रमसाफल्य' हें नव्या काळाला शोभेसें नाटक आहे. मुलाच्या उधळेपणामुळें दीड लाखांचें कर्ज झालेले दादासाहेब आत्महत्या करीत आहेत, तोंच पस्तीस वर्षे परागंदा झालेला त्यांचा भाऊ नानासाहेब अचानक प्रगट होऊन तें पिस्तूल वरच्यावर उडवितो व असा धक्का करून आठ दिवसांत सर्वांना श्रम–माहात्म्याची सक्रिय दीक्षा देतो. मध्यंतरीं प्रणयाचा व आगीचाहि प्रसंग घातलेला आहे. पण प्रेमापेक्षां जमाखर्चाच्या भानगडींनाच जास्त महत्त्व दिल्यानें नाटकाचें आकर्षण टिकून रहात नाहीं. भाषेमध्यें तारुण्यांतील कृत्रिमता नाहीं, उलट परिणत प्रज्ञेचे थोर विचार सांठविलेले आहेत. "सावकारांचें कर्ज ही एकच चीज अशी असते कीं, ती थकली तरी फुगतच जाते." अशी विरोधाभासाची मौज कोठें कोठें आहे. श्रमाचें महत्त्व विलासी तरुणांच्या चित्तावर ठसविण्यासाठीं, नाटककारानें दोनचार फटकाऱ्यांतच सुंदर शब्दचित्रें रेखाटलीं आहेत. नानासाहेब सांगतात, "भरजरी मंदिलानें लपेटलेल्या मस्तकापेक्षां तापलेल्या लोखंडावर घणाचे घाव घालण्यामुळें उडणाऱ्या ठिणग्यांच्या तेजोवलयांत तळपणारें लोहाराचें मुखमंडल खात्रीनें जास्त शोभिवंत दिसतें. हातांत ऐटबाज छडी नाचविणाऱ्या छाकट्यापेक्षां लाकूड करवतणाऱ्या आरेकसाची ऐट निःसंदेहपणें अधिक चित्ताकर्षक वाटते. इस्तरीच्या कडक गळेपटीमुळें ताठरलेल्या मानेपेक्षां शिरावरील हंड्यामुळें अवघडलेली पाणी वाहणाराची मान निखालस अधिक ऐटदार दिसते. मनगटपट्टीमुळें व घड्याळामुळें फुगीर

दिसणाऱ्या मनगटापेक्षां अस्तन्या सारून काम करणाऱ्या लाकूडफोडयाचें मनगट उघडउघड अधिक भरदार दिसतें. ”

कोल्हटकरांनीं 'मूकनायक' वीस दिवसांत लिहिलें, तर 'गुप्तमंजूष' दहा दिवसांत पुरें केलें; 'जन्मरहस्य' नऊ दिवसांत व 'मतिविकार' सात दिवसांत रचलें, तर 'प्रेमशोधन' सहा दिवसांच्या आंतच हातावेगळें केलें. याचा अर्थ ते नाटकें घाईघाईनें लिहीत असा मात्र नाहीं. उलट नाटकाचें चिंतन दीर्घकाळ व सूक्ष्मपणें करण्याबद्दलच त्यांची ख्याति आहे. कथानकाची रूपरेषाच नव्हे तर कोट्याहि, मोरोपंतांच्या यमकाप्रमाणें त्यांच्या बुद्धि-मंजुषेंत, पैलू पाडून, व्यवस्थितपणें रचून ठेवून दिलेल्या असत. त्या सर्व बौद्धिक मूर्तींचें केवळ प्रतिबिंब कागदावर पाडण्यास वरील अल्प काल पुरेसा होई.

-*- -*- -*-

रा. ग. गडकरी : : : ४

'गुरुसे चेला सवाई' असा आनंद कोल्हटकरांना मिळवून देणारा शिष्य त्यांच्या डोळ्यासमोरच उदयाला आला. किर्लोस्कर–देवल ही गुरु–शिष्यांची जोडी मराठी नाट्यसृष्टीच्या आरंभीं जशी चमकून गेली, तशी तिच्या माध्यान्हकालीं कोल्हटकर–गडकरी ही गुरु–शुक्राची युति तळपत होती. "तात्या, तुमचीं नाटकें शनिवार–रविवार-वरून बुधवारवर आणतों, पहा!" अशी विनोदगर्भ, प्रेममूलक व आत्मविश्वासपूर्ण धमकी गडकरी यांनीं कोल्हटकरांना हंसत हंसत दिली; आणि बोलबोल म्हणतां ती खरीहि करून दाखविली. अवघ्या सहा वर्षांत फक्त सहा नाटकेंच लिहून गडकऱ्यांनीं लोकप्रियतेचें इतकें उंच शिखर गांठलें कीं, तें पाहून कोणाहि साहित्यिकाला हेवाच वाटावा. 'शिष्यापासून पराजय' मिळण्याचें सुख गडकऱ्यांनीं कोल्हटकरांच्या पदरांत पुरेपूर घातलें. काव्याच्या क्षेत्रांत ते जसे केशवसुतांचे 'सच्चे चेले' होते, तसें नाट्य व विनोद यांच्या सृष्टींत ते कोल्हटकरांचें गुरुत्व मानीत. 'श्रीपादाची कलावती वाणी' त्यांना आदर्श वाटे. 'कृपाचि ज्यांची कारण केवळ मम पामरे वचनातें। वंदुन त्या श्रीपाद-पदाप्रति।' गडकऱ्यांनीं 'भावबंधनाची' नाट्यरचना



रा. ग. गडकरी

केली. 'प्रेमसंन्यासां'त तर त्यांनीं आपल्या लेखन-गुरूच्या चरणीं 'कृतज्ञतेचे अश्रु' वाहिले आहेत.

विद्येची मुलखागिरी

राम गणेश गडकरी यांचा जन्म १८८५ सालीं मे महिन्यांत झाला. किर्लोस्करांचें मृत्यु-वर्ष हेंच. मराठी नाट्यकलेचा उत्कर्ष करणारे किर्लोस्कर महाराष्ट्राच्या एका सरहद्दीवर जन्मास आले, तर त्या नाट्यकलेचा विकास करणारे दुसरे नाटककार गडकरी हे महाराष्ट्राच्या दुसऱ्या सीमेवर जन्मास आले. अशा रीतीनें कर्नाटक व गुजरात या दोन्ही प्रांतांनीं आपला शेजारधर्म पाळला आहे! गुजरातेंतील नवसारी तालुक्यांत गडकऱ्यांचा जन्म झाला. लहानपणींच त्यांचे वडील वारले. त्यामुळें गरिबीचे कांटेकुटे त्यांच्या मार्गावर पसरले गेले. त्यावरूनच रखडत-खरडत जाऊन गडकऱ्यांनीं मॅट्रिकची वेस वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं ओलांडली. पुढें फर्ग्युसन कॉलेजांत त्यांनीं एक वर्ष काढलें. तेथें हरिभाऊ आपट्यांप्रमाणेंच त्यांनाहि गणित विषयानें अगणित अडचणी आणल्या. पहिल्या वर्षाच्या परिक्षेंत त्यांना अपयश आलें आणि तेथेंच त्यांचें शिक्षण खुंटलें.

पण ज्ञानसंपादन कांहीं थांबलें नाहीं. मराठी, संस्कृत व इंग्रजी या तीनहि भाषांतील ललित वाङ्मयाचा अभ्यास त्यांनीं मोठ्या परिश्रमानें व सखोलपणें केला. भारत-रामायणासारखे राष्ट्रीय ग्रंथ व पांडवप्रतापासारख्या पोथ्या यांचीं त्यांनीं पारायणें केलीं. शेक्सपिअरचीं नाटकें त्यांनीं बारकाईनें अभ्यासिलीं व शेलेचीं काव्यें त्यांनीं पूर्णपणें पचाविलीं. मार्कट्वेनचा विनोदाचा खजिना त्यांनीं उघडला. कालिदासाचें सौंदर्य-भांडार त्यांनीं लुटलें व भवभूतीचा रसकल्लोळ त्यांनीं आपल्या हृदयांत सांठविला. मोरोपंतांच्या अफाट आर्या-सागराचें उल्लंघन करण्यासाठीं दररोज ग्रंथालयांत जाऊन पांचपांच, सातसात तास वाचन त्यांनीं केलें. बखरींतील गद्य भाषा त्यांनीं आपलीशी केली. कोल्हटकर, केशवसुत वगैरे आधुनिक मराठी लेखकांच्या साहित्याचें तर त्यांनीं आकंठ पान केलें. हीं सर्व द्रव्यें आपल्या मनाच्या मुशींत घालून त्या सर्वांचा एकजिनसी रस करण्याइतकी प्रखर भावना



त्यांच्या ठायीं होती. त्यामुळें त्यांना महाराष्ट्र-सारस्वतामध्यें आपल्या नांवाचें स्वतंत्र नाणें पाडतां आलें–नवें लेणें कोरतां आलें.

विनोदाची परंपरा

'बाळकराम' या टोपण नांवानें त्यांनीं विनोदी लेख लिहिले, 'गोविंदाग्रज' या उपनांवानें काव्य–रचना केली, आणि 'राम गणेश गडकरी' या उघड व उजळ नांवानें ते नाटककार म्हणून महाराष्ट्र रसिकांपुढें आले–चमकले–लाडके बनून राहिले. कोट्या पेरून विनोदाची खसखस पिकविण्यांत त्यांनीं आपल्या गुरूवरहि ताण केली. 'रिकामपणची कामगिरी' या लेखमालेंत ठकीच्या लग्नाचे जे विचित्र अनुभव त्यांनीं दिले आहेत. ते कोणाच्याहि हंसून हंसून मुरकुंड्या वळविण्यासारखे आहेत. अखेर तिंबुनाना न्यायाधिशाचेहि पाय धरतात; हा तर विनोदाचा कळस होय. 'कवीचा कारखाना' यांत जितका विनोद भरलेला आहे, तितकीच टीकाहि ठासलेली आहे.

गगनचुंबी कल्पकता

यापेक्षां गडकऱ्यांचें काव्यांतील यश अधिक उत्तुंग व उज्ज्वल. कोल्हटकरांच्या मानानें तर त्यांनीं काव्याच्या मुलखांत फारच मोठी मजल मारली. त्यांची कल्पकताच अनिवार, उच्छृंखल, गगनचुंबी. आकाशांतील चंद्रसूर्यांना गवसणी घालण्याइतकी तिची भरारी. रवि–किरणांचे दोर करून ती कधीं झोके घेते, तर कधीं चंद्र-सूर्यांच्या झांजा वाजवीत बसते. 'राजहंस,' 'मुरली,' 'गुलाबी कोडें,' 'घुंगुरवाळा' इत्यादि त्यांचीं कवनें म्हणजे महाराष्ट्र–शारदेच्या कंठांतील अमोल भूषणेंच होत. उज्ज्वल कल्पकता व उत्कट भावना यांचें स्वच्छंद नर्तन जसें गडकऱ्यांच्या काव्यांत दिसून येतें, तसेंच नाटकांतहि आढळतें.

नादमधुर शब्दरचना, रम्य काव्यकल्पना आणि हृद्य प्रेमभावना ह्या तीन गुणांनीं नटलेलीं त्यांचीं नाटकें तरुणांचें अंतःकरण सहज जिंकूं शकलीं. कोल्हटकरांप्रमाणेंच त्यांनींहि आपल्या नाटकांत बुरखा, वेषांतर इत्यादि

त्याक्रूप लढघून अद्‌भुत रस खेळविला. स्वाभाविकता व रसवत्ता यांना बाजूस सारून कृत्रिमतेचा लखलखाट करण्यांत ते गुरूच्या पुढें दोन पावलें आहेत. संयम व प्रमाणबद्धता यांच्या मर्यादा तर त्यांच्या उद्दाम भावनेला कधींच बांधूं शकल्या नाहींत. तथापि रंगभूमीशीं त्यांचें नातें निकटचें जडल्याकारणानें त्यांना आपलीं नाटकें यशस्वी करतां आलीं. 'किर्लोस्कर नाटक मंडळीं 'तील मुलांना शिकविण्याचें काम त्यांनीं सहा वर्षें केलें. कांहीं वेळां तर शेक्सपिअरप्रमाणें, नाट्यगृहाच्या दरवाजावर प्रवेशपत्रिका तपासण्याचेंहि काम त्यांनीं केलें. महाराष्ट्रीय रसिकांची नाडी त्यांनीं बरोबर ओळखली होती. त्यांचीं नाटकें अधिकाधिक लोकप्रिय झालीं.

नाट्यांतील यश

'प्रेमसंन्यास', 'पुण्यप्रभाव' 'एकच प्याला' व 'भावबंधन' हीं चार काय तीं त्यांचीं पूर्ण नाटकें. पण गेल्या सुमारें चाळीस वर्षांत त्यांच्या यशाचे निनाद सतत निघत आहेत. 'सुरसुंदरी' नांवाचें गुजराती नाटक त्यांनीं अगदीं लहानपणीं लिहिलें होतें; पण तें नष्ट झालें. 'राजसंन्यास' व 'चेंड्यांचा बाजार' हीं त्यांचीं नाटकें अपूर्ण आहेत. तसेंच 'तोड ही माळ' हें नाटकहि कालवश झालें. 'गर्व–निर्वाण' हें प्रल्हादाच्या कथेवरील नाटक अपुरेंच आहे. या अपूर्ण नाटकापैकीं 'राजसंन्यास' हें इतकें अपूर्व आहे कीं, त्याला तोड मराठी नाट्यसृष्टींत दुसरी नाहीं. गडकऱ्यांच्या काव्य-कल्पनेला येथें नुसती उधाण भरती आली आहे. पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें त्यांच्या प्रतिभेच्या सकल कला या नाटकांत विकसल्या आहेत. एकाच प्रवेशांत, एकाच वेळीं, चारचार रस खेळविण्याचें अजब सामर्थ्य या भाषा–प्रभूनें येथें दाखविलें आहे. गडकऱ्यांच्या कल्पनासृष्टींतून निर्माण झालेलीं गोकुळ, धुंडीराज व तळीराम हीं तीन पुरुष–पात्रें प्रेक्षकांना खदखदा हसावयास लावून जशीं अमर झालीं आहेत, तशींच सिंधु, शिवांगी व लतिका हीं तीन स्त्रीपात्रें रसिकांना ढळढळा अश्रु ढाळावयास लावून त्यांच्या हृदयांत कायमचें वास्तव्य करून राहिलीं आहेत. विशेषतः 'एकच प्याल्यां'तील सिंधूचा करुण स्वर तर महाराष्ट्राचें काळीज कापीत गेला

आहे. रत्नासारख्या सुधाकराची दारुमुळें माती होते आणि गरिबींत येऊन पडलेली त्याची साध्वी पत्नी सिंधु ही पोट भरण्यासाठीं दुसऱ्याचें दळण दळते हा केवढा करुण प्रसंग ! त्या प्रसंगीं बालगंधर्वांच्या स्वर्गीय कंठांतून 'चंद्र चौथीचा' ही एक ओळ निघतांच रसिकांचें हृदय किती स्तब्ध-स्तिमित होऊन जात असे, याचें वर्णन राजकवि यशवंतांनीं यथार्थपणें केलें आहे.

अशा मोलाची व कांतीची वैजयंती–माला महाराष्ट्र-शारदेला अर्पण करून राम गणेश गडकरी ता. २३ जानेवारी १९१९ रोजीं दिवंगत झाले ! याच वर्षीं सुप्रसिद्ध कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांचेंहि निधन झालें ! महाराष्ट्र-साहित्यांतील दोन रत्नें एकाच वेळीं गळून पडलीं.

प्रतिभेचा पहिला बहर

आंब्याच्या झाडाचा पहिला बहर तुरटच असतो ना ? तशा कच्च्या स्वरुपाचें ' प्रेमसंन्यास ' हें नाटक आहे. हें गडकऱ्यांचें पहिलें नाटक. पहिलेपणाचे सारे गुणदोष त्यांत दिसून येतात. या पहिल्या नाटकांतहि गडकऱ्यांनीं आपले शब्दलीलेचे चमत्कार जसे दाखविले आहेत, तसेंच हृत्कंपक पण असंभाव्य अशा प्रसंगांचीहि खेचाखेच केली आहे. हात धुणें, गांठ पडणें, नांवानें खडे फोडणें, पान हलणें, दत्यादि शब्दांवर कोट्या केलेल्या आहेत. " आतां दिव्याचा धूर नको म्हणून धुराचे दिवे आणणारच आहें मी." असें गोकुळनें म्हणण्याची खोटी कीं लगेच त्याची बायको मथुरा कडाडते, " दिवे ओवाळा धुराचे दिवे आणणारावरून ! घरांत अकलेचा उजेड—" गोकुळचा स्वभाव विसरभोळा दाखविला आहे. त्यामुळें तो " तोळाभर साखर व शेरभर केशर " आणूं पाहतो. या त्याच्या गुणाची गडकऱ्यांनीं इतकी अति-शयोक्ति केली आहे कीं, गोकुळ ही एक न विसरण्यासारखी व्यक्ति–रेखा होऊन बसली आहे. त्याच्या विस्मरणशीलतेमुळेंच तो अविस्मरणीय झाला आहे ! तो रंगभूमीवर आला कीं प्रेक्षकांत जोराचा हंशा पिकतो. या त्याच्या विसराळूपणाला आर्य धर्माच्या अंध अभिमानाची जोड दिल्यामुळें

विनोदांत भरच पडते. 'वेदांत विमानें आहेत, आगगाड्या आहेत, तारायंत्रें आहेत,' या त्याच्या उद्गारांनीं गडकऱ्यांनीं सनातनी, समाजाची टर उडविली आहे ! पण या नाटकांतील एकच एक संस्मरणीय व्यक्ति म्हणजे गोकुळच. बाकी सारी कळसूत्री बाहुल्यांची खिचडी आहे.

रहस्यकथेचा मालमसाला

तात्यासाहेब व बाबासाहेब यांचा, रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर, सामाजिक सुधारणेसंबंधीं वाद चालल्याचें दाखविलें आहे. हा प्रारंभ पात्रांचा परिचय करून देणारा असला, तरी, प्रेक्षकांना कंटाळवाणा वाटण्यासारखा आहे. प्रेक्षकांच्या अंगावर रोमांच उभे राहतील अशा प्रसंगांची दीप-माळ रचण्याचा निश्चय करूनच गडकरी हें नाटक लिहावयास बसले असावेत. एक प्रसंग आहे तो आगगाडी घाटांतील पुलावर उभी असतांना तिच्यांतून मनोरमा पातिव्रत्य-रक्षणासाठीं उडी घेते असा. आणि फांशींचा देखावा तर दोनदां दाखविला आहे. कमलाकर हा दुर्जन; तो दरोडेखोरांचें सहाय्य घेतो, विद्याधराला मारहाण करवितो, सुशीलेला पळवून नेऊं पहातो आणि स्वतः दुसऱ्याच शरिराचे तुकडे तुकडे करतो. शेवटीं त्याचा खून त्याचे उलटलेले साथीदार दरोडेखोर करतात. ही सामुग्री एखाद्या रहस्यकथेला पुरेशी आहे, नाहीं ? जयंत व लीला यांचीं प्रदीर्घ भाषणें म्हणजे निराशेनें बेहोष झालेल्या व्यक्तींचे काव्यात्मक उद्गार होत. जयंत निर्दोषी ठरला तरी, लीला विष पिते आणि ती विष पिते म्हणून जयंतहि विषप्राशन करतो, असा या नाटकाचा शेवट शोकपूर्ण केलेला आहे. कशासाठीं ? तर जयंत-लीला यांचा पुनर्विवाह दाखविण्याचें धैर्य त्यावेळीं गडकऱ्यांच्या अंगीं नव्हतें, असें त्यांचे ' विद्यागुरु ' प्रि. भाटे म्हणतात.

विनोदाचे खजिने

गोकुळचा विसराळूपणा दाखवून विनोद पिकविण्यांत गडकऱ्यांनीं कमाल केली आहे. स्वतःच्या विसराळूपणाचें वर्णन करतांना खुद्द गोकुळच म्हणतो, " आतां या विसराळूपणाला काय करावें ! अगदीं घटकेचीसुद्धा आठवण रहात नाहीं ! कोणकोणतीं कामें करावयाचीं आहेत त्यांची

आठवण रहाण्यासाठीं उपरण्याला या गांठीं मारून ठेवल्या. पण आतां कोणती गांठ कशासाठीं ? हेंच विसरलों. मला स्मरणशक्ति द्यावयाला ब्रह्मदेव अजिबात विसरला कीं काय ? चांगला पोशाख घालून कुठें जायला निघालों, तों कुठें जावयाचें याचाच विसर पडला ! म्हणून तिला तरी विचारून पहावें एवढ्यासाठीं पुनः परतून आलों; बाकी ती सांगेल कीं नाहीं याचा संशयच आहे. हा विसराळूपणा आणि ही कजाग बायको या दोहोंनीं माझ्या जन्माचें इथेंच सार्थक झालें आहे. कोणतीहि गोष्ट विसरावयाचें मी विसरत नाहीं ! आणि कोणतीहि गोष्ट विसरल्याबद्दल रागवावयाचें ती विसरत नाहीं ! ''

नाटक कीं काव्य ?

गडकऱ्यांचा मनःपिंड मुख्यतः कवीचा होता, हें सिद्ध करण्यास त्यांचें ' पुण्यप्रभाव ' नाटक पुरेसें आहे. त्यांतील सारे संवाद काव्यमय कल्पनांनीं नटलेले आहेत. त्यांनीं प्रस्तावनेंत '' प्रामाणिक मनमोकळेपणानें '' असें सांगून टाकलें आहे, '' ती० रा० तात्यासाहेब कोल्हटकर व रा० काकासाहेब खाडिलकर यांसारख्या वैभवशाली वाग्भटांनीं नामांकित केलेल्या प्रदेशांत पाऊल टाकण्याची माझी पात्रता नाहीं.'' हें न्यून नाहींसें करण्यासाठीं व या दोन्ही वाग्भटांना दूर सारून स्वतः पुढें सरसावण्यासाठीं, गडकऱ्यांनीं आपलें सर्व बुद्धि-वैभव व कल्पना-वैभव ' पुण्यप्रभाव ' नाटकांत जसें कांहीं पणास लावलें आहे. गडकऱ्यांनीं या नाटकांत आपल्या काव्य-कल्पनेच्या गरुड-भराऱ्या व चंडोल–लकेऱ्या जशा मारल्या आहेत, तशाच करुण व हास्य या रसांना डोंगर-लाटा आणल्या आहेत. त्यांनीं स्वतःच या नाटकाचें गुजराती भाषांतरहि केलें होतें.

काळीज करपविणारें कारुण्य

भूपाल व वसुंधरा यांचा संवाद दहा पानें चाललेला आहे. तो सर्व अत्यंत काव्यपूर्ण आहे. मात्र तो इतका दुर्बोध आहे कीं, रंग-भूमीच्या प्रेक्षकालाच काय, पण नाट्यग्रंथाच्या वाचकालाहि तो कळणें कठीण. अखेरीस खल-नायक वृंदावनाची साध्वी पत्नी कालिंदी दामिनीचा

बुरखा घेऊन तळघरांत येते, तेव्हां तिच्याशीं वसुंधरेचें जें बोलणें होतें, तें कारुण्यानें इतकें ओथंबलेलें आहे कीं, त्यामुळें कोणाच्याहि हृदयाचें पाणी पाणी व्हावें. आधीं प्रसंगच असा हृदयद्रावक कल्पिलेला आहे कीं, आपल्या पातिव्रत्याच्या रक्षणासाठीं वसुंधरा आपल्या अर्भकाचा बळी उघड्या डोळ्यांनीं देते. हा अनर्थ टळावा म्हणून कालिंदी आपल्या बालकाला वृंदावनाच्या कट्यारीखालीं धरते. दोन प्रेमळ व उदार मातांनीं आपापल्या मुलांचे मृत्यु स्वेच्छेनें घडवून आणावयाचें–असा हृदय जाळणारा प्रसंग गडकऱ्यांच्याच अघटित–घटनापटु कल्पनेंतून निर्माण व्हावयाचा. त्या प्रसंगीं त्या त्या मातांनीं संयमपूर्ण भाषेंत जो टाहो फोडला आहे, तो कोणाच्याहि अंतःकरणाची कालवाकालव करणाराच आहे आणि त्यांत ' पडिला अभिमन्यु ' या पौराणिक शोक–गीताची भर घातलेली—आणि तशीच ' शिवलीलामृतां 'तील पौराणिक दाखल्याची धार पाजलेली. त्यामुळें हा प्रसंग कोणाचेंहि काळीज कापीत जातो.

स्वाभाविकतेची पायमल्ली

बुरख्यांतील कालिंदी वसुंधरेला ओळखूं आली नसेल, पण ती जेव्हां तिच्याच सांगण्यावरून गाणें म्हणते, तेव्हां तिचा स्वर वसुंधरेला कसा ओळखतां आला नाहीं ? अशा कल्पित व अस्वाभाविक घटनांची गर्दी या नाटकांत झालेली आहे. या कृत्रिमतेमुळें या नाटकाचें महत्त्व बरेंच कमी झालें आहे. राजाचा भूपालावरील विश्वास वृंदावनाच्या चार शब्दांनीं उडतो, हा प्रसंगहि असाच अस्वाभाविक आहे. आणि तोच तर या सर्व कारस्थानाचा मध्यबिंदु आहे. नूपुर आणि कंकण यांच्या प्रेमवेड्या विनोदांत तर सत्याला व स्वाभाविकतेला स्थानच नाहीं. पिशाचासारखीं तीं पात्रें बोलतात व वागतात. स्त्रियांविषयीं संशय घेण्याला त्यांना कसलाच धरबंध नाहीं. कसेंहि बोलून व कांहींहि करून उथळ श्रोत्यांना खिदळत ठेवावयाचें, एवढीच निर्बुद्ध कामगिरी नाटककारानें त्यांच्याकडे सोंपविलेली दिसते. ' बायकांच्या बाबतींत बहकलेले हे बेवकूब ' नाटकांतून वगळले, तर त्याची सौंदर्यहानि खचित होणार नाहीं.

काव्याची दिवाळी

वसुंधरा ही नाटकाची नायिका पंचपातिव्रतांच्या पंक्तींत बसण्याच्या योग्यतेची. ती भूपालाची पत्नी. पण पूर्वी तिची अभिलाषा ईश्वर व वृंदावन या द्वेषांनीं धरली होती. त्यांत ईश्वर सुजन, तर वृंदावन दुर्जन, म्हणून प्रेम–भंगाचे परिणाम दोघांवर दोन तऱ्हांनीं होतात. ईश्वर काव्यमय भाषेंत वसुंधरेला आपलें समाधान पुढील शब्दांनीं बोलून दाखवितो. " विश्ववैभवाची वैजयंती लक्ष्मीवल्लभासारख्या लोकैक पुरुषाच्या कंठीं पडली, तर तिच्याकडे आशेनें पहाणाऱ्या भणंगानें आपल्या भिकारी भाग्यदेवतेला बोल लावावा, यांत वैजयंतीचा काय दोष ! आकाशांतून उतरलेल्या हिमवंतीनें फुलत्या फुलाच्या हृदयांत ठाव घेतल्याबद्दल, जमिनीशीं जखडलेल्या दगडानें दुर्दैवाला दोष देत बसावें ! " गद्य जर इतकें काव्यमय, तर काव्य किती प्रतिभासंपन्न असेल ! वसुंधरा व भूपाल यांचा संवाद चांदण्या रात्रीं चाललेला आहे. अशा वेळीं चंद्रप्रकाशावर किती मनोहर उपमा किती मधुर शब्दांनीं वसुंधरा बोलून दाखविते पहा— " नाचत ना गगनांत । नाथा । तारांची बरसात ॥ आणित होती । माणिक मोतीं । वरतुनि राजस रात ॥ नाव उलटली । माव हरपली । चंदेरी दरियांत ॥ ती ही वरची । देवा–घरची । दौलत लोक पहात ॥ "

'राजसंन्यासा'ची अपूर्वाई

अवघे दोनच अंक–आणि तेहि अपुरे ! तरीसुद्धां 'राजसंन्यास' हें नाटक अद्वितीय आहे. गवताच्या पात्यावरील चिमुकल्या दंवबिंदूंत इंद्रधनुष्याची शोभा दाखविण्याचें कौशल्य गडकऱ्यांनीं या नाटकांत साधलेलें आहे. भाषा, अलंकार, भावना, रस इत्यादि आपल्या सर्व नाट्यगुणांची दौलत त्यांनीं जणुं दोन्ही हातांनीं उधळून दिली आहे ! अष्टमीची चंद्रकोर अर्धीच असते, पण ती किती आल्हाद व शीतलता देते, तशी चारुता या नाटकांच्या अंगोपांगांत भरून राहिली आहे. याची नांदीच इतकी काव्यात्मक झाहे कीं, तिला मराठी वाङ्मयांत तरी तोड नाहीं. मालवणच्या सिंधुदुर्गातील दर्या तुफान खवळलेला आहे, सूर्य अस्तास

जात आहे, पांच देवी शिवनेरीच्या बाळांला निजविण्यासाठीं पाळणा गात आहेत, त्या अदृश्य झाल्यावर तुळशी होडी वल्हविते आणि होडी उलटल्यामुळें समुद्रांत पडते, तिला काढण्यासाठीं संभाजीराजे समुद्रांत उडी घेतात—इत्यादि पहिल्या प्रवेशांतील प्रसंग अचाट कल्पनेचे आहेत. ते कोणत्या रंगभूमीवर, केव्हां हुबेहुब उभे राहूं शकतील कोणास ठावें ! पण वाचतांना तरी वाचकाच्या डोळ्यापुढें चित्ताला थक्क करणारे देखावे दिसूं लागतात. त्यांना मूर्त स्वरूप देण्यास वॉल्ट डिस्नेसारखा अद्वितीय व्यंगचित्रकारच समर्थ ठरेल.

जसा प्रारंभ तसाच शेवटहि. तुळापूरच्या मोंगल छावणींत अडकलेल्या संभाजीला मुक्त करण्यासाठीं साबाजी येतो. त्यावेळचा त्या दोघांचा संवाद काळजाला घरें पाडणारा आहे. दूध-सागराचा धबधबा संभाजी-राजे पहात आहेत असाहि एक रम्य-भव्य प्रवेश 'राजसंन्यासां'त घाल-ण्याचें या कविराजाच्या तरल प्रतिभेनें योजलें होतें. पण त्यांच्या आयुष्याची दोरी मृत्यूनें कातरली, आणि त्यामुळें हें तेजाळ व रसाळ नाटक अपूर्णा-वस्थेतच पुढें आलें.

भाषेचा डौल

मराठेशाहीचा—त्यांतल्या शिवाजीमहाराजांचा—ज्वलंत अभिमान या नाटकाच्या पानापानांतून प्रकाशत आहे. त्या काळाला योग्य अशी बखरींतील भाषाशैली सर्वत्र वापरलेली आहे. त्या भाषेच्या पोटीं जी काव्यकल्पना व रसवत्ता भरून ठेवलेली आहे, तिला खरोखर मराठींत तरी उपमाच नाहीं. शब्दलीला तर डोळे दिपवणारीच आहे. "पंख मोडल्यावर मैना कसली ? गळा दाबल्यावर कोयळ कसली ? दांत पाडल्या-वर नागीण नाहीं, डोळे फोडल्यावर वाघीण नाहीं !" अशी सयमक वाक्यें पानापानावर आढळतात. "माना मोडतात, जिभा जखडतात, जीव जडावतात." अशा अनुप्रासांचा अतिरेक झालेला आहे. "नजर चळली नाहीं, पापणी ढळली नाहीं", "जीवाची प्रभा दाटली; कांटेरी सभा थाटली." असें काव्याला शोभेसें गद्य ठायींठायीं चमकत आहे.

"सरकारी सफाई, दरबारी दरोडा, रंगेल राजकारण, उद्यां उगवत उजळली," अशा अनुप्रासांच्या जोड्या फिरवतां फिरवतां, वेताच्या मल्लखांबावर सर्व शरिराचे लवचिक खेळ करून दाखविणाऱ्या मल्लाप्रमाणें, गडकऱ्यांनीं "सह्याद्रीचा सवाई सरजा सुताच्या सरक-गांठींत सांपडला." अशी सफाईदार वाक्यें च्या वाक्यें फेकून दिलीं आहेत !

रसांची विविधता व उत्कटता

हें सारें भाषेचें जडजवाहीर हिऱ्यामाणकाच्या मोलाचें असलें, तरी त्यांच्यासारखें कठीण नाहीं-तें फुलासारखें कोमल व फळासारखें रसाळ आहे. " मोत्यांची बिनसरांची मुंडावळ " इत्यादि काव्य-कल्पनांचे सुंदर रंग या सालंकृत भाषेवर चमकत आहेत. त्याहिपेक्षां विशेष गुण म्हणजे, सर्व प्रवेश विविध रसांनीं ओथंबलेले आहेत. संभाजी व तुळशी यांचा सफल श्रृंगार आणि रायाजी व शिवांगी यांचा विफल प्रणय एकीकडे; तर साबाजी व हिरोजी या वृद्ध स्वामिभक्तांच्या मृत्यूचा उदात्त करुणरस दुसरीकडे. तशाच कारुण्याचें पाट वाहतात येसूबाईच्या अटकेच्या वेळीं. त्यांच्या सोन्यांच्या सांखळ्या पायांत घालून शिवांगी उभी राहते व तिलाच येसूबाई समजून माने पकडून घेऊन जातात, हा साराच प्रवेश हृदय थरारविणारा आहे ! त्यांत एकाच वेळीं करुण, वत्सल, उदात्त, शांत, भक्ति इत्यादि नाना रसांच्या लाटा उचंबळत आहेत; त्यागामध्यें कोणीच हरत नाहीं-प्रेमवेडा रायाजीसुद्धां ! भाषावैभव, कल्पनासौंदर्य व रसमाधुर्य या तिन्ही दृष्टींनीं हा प्रवेश अप्रतिम आहे.

या प्रवेशांत साबाजी व हिरोजी यांची छत्रपतीवरील भक्ति जितकी गाढ दाखविली आहे, तितकीच त्यांच्यावरील येसूबाईची मायाहि अपार आहे. मोरे जेव्हां येसूबाईना पकडण्यासाठीं येतात, तेव्हांचा संवाद प्रेक्षकांच्या साऱ्या उदात्त भावनांना गदगदा हलवितो.

येसूबाईचा सात्त्विक संताप व शिवांगीचा भाबडा प्रेमळपणा यांना मूर्त स्वरूप देणारा संवाद पुढीलप्रमाणें आहे.

येसूबाई—सेनासागर, सेनासागर, निवळ मांगाची करणी केलीत !

गोड बोलून माझा गळा गुंतविलात ! बाई, काय ग तुझ्या संसाराची परवड ही !

शिवांगी—राया, मासाहेब रागावल्या वाटतें ? आतां कसें बरें करायचें ? थांब, मी घालते त्यांची समजूत. बाई, माझ्या रायावर अशा रागावूं नका; मासाहेब, आईसारख्या ना तुम्ही मला ? मग माझें कां बरें सांगणें मोडायचें ? माझा राया अगदीं भोळा आहे हो ?

[येसूबाई शिवांगीला पोटाशीं धरतात.]

रायाजी—मासाहेब, वचनाला बाध आला तर माझ्या राजेश्वरीच्या इज्जतीला बट्टा लागेल !

येसूबाई—ती राजेश्वरी नाहीं–पण खाटकाचा सुरा आहे. तिनेंच माझा गळा कांपलांत–या भावड्या, गरीब गाईचा गळा उतरलांत ! आणखी असें मिर्दयासारखे हंसतां आहांत–शुद्ध कसाब, कसाब आहांत !

प्रतिभेचें शेंडेफळ

' भावबंधन ' हें गडकऱ्यांचें अगदीं अखेरचें नाटक. हें व ' एकच प्याला ' या दोन नाटकांचे प्रयोग अत्यंत यशस्वी झाले; पण ते पाहण्यास गडकरी जगले नाहींत ही एक करुण सत्यकथा आहे. मृत्यूपूर्वी तीनचार घटका, गडकरी ' भावबंधनाचा ' अखेरचा प्रवेश लिहीत होते. त्या नाटकाची व त्यांच्या जीविताची समाप्ति एकाच दिवशीं झाली. रंग-भूमीच्या जगांत गडकऱ्यांच्या या शेंडेफळानें ज्यावेळीं प्रवेश केला, त्याच-वेळीं जगाच्या रंगभूमीवरून ते स्वतः निष्क्रांत झाले. यामुळें ' भावबंधन ' नाटकांतील पद्यविभाग रचण्याचें काम त्यांचे गुरु श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांना आपल्या अंगावर घ्यावें लागलें. खुद्द गडकऱ्यांनीं पांच-सहा पदें लिहून ठेवलीं होतीं; पण बाकी सारीं कोल्हटकरांनीं रचलीं आहेत–आणि तीं अत्यंत सुगम व सुरस आहेत हें विशेष. ' एकच प्याला ' लाहि पदांचें " ठिगळ " वि. सी. गुर्जर यांनीं जोडलें आहे. त्यांतील पदेंहि सुबोध व रसपूर्ण आहेत. गडकऱ्यांच्या कल्पनेचा चमचमाट मात्र या दोन्ही नाटकांच्या पदांत आढळत नाहीं.

अट्टल खल-नायक

एकदां 'सहचारिणी' नाटकावर गडकरी श्री. वि. सी. गुर्जरांशीं चर्चा करीत बसले होते. चर्चा करतां करतां त्यांच्या बुद्धींतून कल्पनेची एक ठिणगी उडाली. "एक भावडा म्हातारा आहे आणि तो एका अट्टल नीचाच्या तावडींत सांपडला आहे. असें कथानक किती परिणामकारक होईल नाहीं ? त्यावर एक सुंदर व चटकदार सुखांतिका मी लिहिणार." असें गडकरी बोलून गेले. त्या कल्पना-बीजाचा विस्तार म्हणजे 'भावबंधन' हें नाटक. धुंडिराज हा त्यांतील भावडा म्हातारा. अतिशय गोष्टी-वेल्हाळ पण तितकाच हृदयाचा प्रेमळ. वात्सल्यानें त्याचें अंतःकरण कसें अगदीं तुडुंब भरलेलें. त्याची मुलगी मालती. ती बुद्धिमान, सरळ, सुंदर व साधी आहे-"फुलासारखी नाजूक आणि ताऱ्यासारखी तेजस्वी." तिला मागणी घालावयास घनश्याम नांवाचा तरुण येतो. याला बुद्धीचा अहंकार फार. तो विचारतो, 'टीचभर उघड्या-नागड्या देहाच्या देणगीखेरीज मानवजातीनें आजवर या टकलकोंड्या घनश्यामवर काय उपकार केले आहेत ?" तो अगदीं हृदयशून्य आहे.

त्याची मागणी मालतीनें फेटाळली म्हणून तो दुखावलेल्या सापाप्रमाणें वागूं लागला. मालतीची मैत्रीण लतिका ही त्याला टाकून बोलली. "मालती कां भिक्षा आहे ? कां जोगवा आहे ? कां गोग्रास आहे ?" अशी तिनें त्याची हेटाळणी केली. लतिकेचे वडील धनेश्वरपंत. हे श्रीमंत असतात. त्यांचे पेढीवर घनश्याम हा मुनीम म्हणून नोकरीवर असतो. तो नाना हिकमती करून धुंडिराज व धनेश्वर या दोघां म्हाताऱ्यांना पेंचांत पकडतो आणि धनेश्वराला मालती द्यावयाचें व लतिका स्वतःला द्यावयाचें वचन त्यांच्या त्यांच्या वडिलांकडून सक्तीनें मिळवून घेतो. घनश्यामाच्या पाशांतून सुटण्यासाठीं धुंडिराज, मालती, लतिका व अखेर धनेश्वरहि एकमेकांसाठीं स्वसुखाचा त्याग करतात. पण घनश्यामाच्या पाषाणहृदयावर कशाचाच परिणाम होत नाहीं. शेवटीं त्याचें पापच उघडकीस येतें. त्यानें धनेश्वराचे चोरलेले कागद स्मशानांत पुरून ठेवलेले असतात, ते उजेडांत येतात आणि तो पोलिसांच्या ताब्यांत जातो. अशा खलपुरुषालाहि बंध-

मुक्त करण्यासाठीं धुंडिराज दया दाखवितो. तेव्हां घनश्यामहि विरघळतो आणि म्हणतो, " ही खरी दया ! ही निरपेक्ष दया ! प्राणिमात्र गोगलगाय बनतो तो याच दयेमुळें ! " या नाटकांतील सर्व अनर्थाला कारण लतिकेचा तोंडाळपणा आणि त्या अनर्थांचा परिहार करणारा धुंडिराजाचा प्रेमळपणा.

अद्वितीय स्वभाव-रेखा

धुंडिराज हें एक गडकऱ्यांच्या प्रतिभेचें अलौकिक अपत्य आहे. साऱ्या मराठी वाङ्मयांत त्याच्यासारखा तोच. त्याचें नांव मराठी वाचकांमध्यें सामान्य नामच बनून गेलें आहे. तो जितका बडबड्या तितकाच प्रेमळ. शकार किंवा शंभुसेन किंवा लक्ष्मीधर यांच्याप्रमाणें तो नुसता अजागळ नाहीं किंवा तो विनोदी पात्र नाहीं. तो थोर अंतःकरणाचा आहे. आपल्या व दुसऱ्याच्याहि, फार काय शत्रुत्वानें वागणाऱ्या सर्वच लहान मुलांवर व तरुणांवर तो आपल्या मायेची पाखर घालतो—त्यांच्यासाठीं हवा तो त्याग करण्यास तो तयार असतो. मालतीवरचें त्याचें प्रेम तर कण्व ऋषीच्या वात्सल्याला शोभण्यासारखें आहे. गडकऱ्यांची ही व्यक्ति-रेखा अत्यंत आकर्षक व संस्मरणीय झाली आहे. धुंडिराजाबद्दल आपलेपणा कोणास वाटणार नाहीं ? त्याचे प्रेमानें ओथंबलेले शब्द ऐकतांना कोणाच्या हृदयाला गुदगुल्या होणार नाहींत ? आणि त्याच्यावर कोसळणारी संकटपरंपरा पाहतांना कोणाचें आंतडें पिळवटून निघणार नाहीं ? त्याच्या उदार स्वभावामुळें जितके आनंदाश्रु प्रेक्षकांच्या डोळ्यांत उभे राहतात, तितकेच दुःखाश्रु त्याच्यावरील संकटामुळें त्यांच्या डोळ्यांतून वाहूं लागतात. पावसाळ्यांत आपण जसें " आलें आभाळ भरून !" असें म्हणतो, तसें त्याच्या चेहऱ्याकडे पाहून घनश्याम म्हणतो, " आला चेहरा खुलून ! " " साऱ्या पात्रांशीं सुरेख ओळख " करून देण्याचें कामीं पहिल्या अंकांत धुंडिराजाचा उपयोग गडकऱ्यांनीं केला आहे. हें शब्दशूर पात्र ' विषयांतरांतून पोटविषयांतर ' करीत जातें, तेव्हां कोणालाहि मौज वाटल्याशिवाय रहात नाहीं.

एकाच अर्थासाठीं तीन तीन शब्द वापरण्याची खर्चिक खोडहि धुंडिराजाला आहे. "परिचय नाहीं, ओळख नाहीं, जानपछान नाहीं" असें त्रिवार सांगितल्याशिवाय त्याला चैनच पडत नाहीं. "गंमत आहे, मौज आहे अन् मजाहि आहे" अशा तिहेरी शब्दांनीं तो आपला आनंद व्यक्त करतो. "छान, सुरेख, पसंत" अशा शब्दांचें त्रिदळ त्याच्या तोंडून बाहेर पडतें. "तें उक्त नव्हें, रास्त नव्हे, अन् बरें नव्हें, शिवाय तें ठीकहि नाहीं." अशी चौथ्या शब्दांचीहि फोडणी तो कोठें कोठें देतो. "रास्त आहे, हिशेबी आहे, अन् मुद्देसूद आहे." असें म्हणून तो आपलें मत श्रोत्याच्या मनावर ठसवितो. थट्टेच्या वेळीं तर काय ? "मालतीताईजवळ तर अगदीं अवाक्षर काढायचें नाहीं, चकार शब्द काढायचा नाहीं कीं ब्र काढायचा नाहीं." असें तो बजावतो. त्याचा स्वतःचा स्वभाव अत्यंत विसराळू. "कालची जमा कालच खर्ची." तसेंच इतर लोकहि विसराळू आहेत असें मानूनच कीं काय, तो आपल्या श्रोत्यांना पुनः पुनः ठासून सांगतो. "तें शिस्तवार नाहीं, बंदिस्त नाहीं, अन् व्यवस्थेशीर नाहीं." या साऱ्या सैल शब्दप्रवाहांत सहृदयता कांठोकांठ भरून राहिलेली आहे. "अहो, आहेत कुठें अशी गुणी बाळें... आशीर्वाद आहे आमचा आपला तुम्हांला !" असें प्रेमानें डबडबलेले शब्द त्याच्या मुखांतून सदैव वाहतात. मधाच्या सहस्रधारांचें कारंजेंच आहे तें ! इतकें असून स्वारी म्हणते, "फार बोलणें अन् तेंहि म्हटलें म्हणजे उगाच वाढवून बोलणें" उचित नाहीं." हॅम्लेटमधील पोलोनिअसची आठवण येथें होतें आणि हसूं येतें.

देवलांचा कित्ता

गडकऱ्यांनीं धुंडिराजाच्या भाषणांत कृत्रिमतेचा लवलेशहि ठेवला नाहीं. अगदीं देवलांना शोभावी अशी सरळ, प्रसादपूर्ण व लवचिक भाषा त्यांनीं त्याच्या तोंडीं घातली आहे. तो घनश्यामला लहानपणाची आठवण किती गोड शब्दांनीं सांगतो पहा. "काय सांगावें महाराजा ! घटका घटका आम्हीं आशाळभूतपणानें नव्या शाळेच्या दाराशीं जाऊन बसावें, अन् आंतल्या आंत तळमळावें, कीं देवराया, काय रे बाबा

तुझ्या घरीं असें पाप केलें होतें, म्हणून या तुझ्या देवळांत आम्हांला यायची अशी चोरी व्हावी? ते दिवस डोळ्यांपुढें उभे राहिले म्हणजे टपाटपा टिपें येतात वरें अजून डोळ्यांतून! मनांतली इच्छा मनांत गिळून टाकिली वरें त्या वेळीं! तेव्हांपासून मनाचा आपला कृतसंकल्पच, कीं हार्ती पैसा खेळूं लागला रे लागला कीं कुणा तरी गरीब मुलाला विद्या ही शिकवायची म्हणून!" तसेंच, आपल्या संसारांतील आनंद वर्णन करून सांगतांना तो म्हणतो, "थकूनभागून संध्याकाळीं असें घरीं येऊन पडावें, अन् भोंवताली या आनंदी पांखरांची एकदां गोड गजबज सुरू झाली म्हणजे सारा शीणभाग हरून जातो अगदीं! जीव कीं प्राण आहेत माझीं मुलें म्हणजे मला! आवतीभोंवतीं अशी किलबिल करूं लागलीं म्हणजे जीवाला गार वाऱ्यावर चांदण्यांत पडल्यासारखें वाटतें."

वात्सल्याचे झरे

धुंडिराजाची भाषा जितकी सरळ, तितकीच त्याची वृत्तिहि. नम्रता, निर्लोभिता, संतुष्टपणा, परोपकारीपणा इत्यादि त्याच्या अंगच्या गुण-संपदेवर त्याच्या पुढील चार शब्दांनीं स्वच्छ प्रकाश पडतो, "देवराया, तुझ्या राज्यांत असा काय रे अपराध आम्हीं केला, कीं आपल्या दाराशीं आज असें पतितांसारखें ओढून आणीत आहेस? कुणाच्या कपर्दिकेचा कधीं लोभ धरिला नाहीं, कुणाच्या मनाला कधीं दुखविलें नाहीं, मिळाली ती मीठभाकर खाऊन दुसऱ्यांना मोकळ्या मनानें आशीर्वाद दिल. दुसऱ्याचा पाय लागला तरीं आधीं आमचा नमस्कार घडला, त्या आमची कां रे अशी दैना व्हावी?"

अशा साध्या, सरळ, सात्त्विक म्हाताऱ्यावर घनश्यामनें केवढा बिकट प्रसंग आणला! जीव कीं प्राण अशी आपली मालती वृद्ध धनेश्वराला देणें त्याला भाग पडतें. त्यावेळीं मालतीला आपल्या पित्याचा नित्याचा प्रेमळपणा आठवतो; पण त्याबरोबरच त्या वेळचा निष्ठुरपणाहि जाणवतो. करुणरसानें थबथबलेला असा हा सारा प्रवेश आहे.

घनश्याम हा खल-नायक आहे, पण अतिशय बुद्धिमान आहे. तो मालतीच्या नकाराला तिच्याच भाषेंत कसें उत्तर देतो पहा—"आपला

नुसता हात धरल्यामुळें आपलें हृदय ज्याप्रमाणें माझ्या हातीं लागल्यासारखें नाहीं, त्याप्रमाणें नुसते माझे पाय धरल्यामुळें आपल्याला माझें मस्तकहि मिळायचें नाहीं; कारण हातापासून हृदय दोनच हात दूर असेल तर पायांपासून डोकें साडेतीन हात अंतरावर असतें !"

इंदु-बिंदु या दोन काळ्या व कुरूप मुलीसुद्धां गडकऱ्यांनीं महाराष्ट्राला चांगल्या ओळखीच्या करून दिल्या आहेत. त्यांच्या कृष्णवर्णाचें जें वर्णन महेश्वर करतो, तें किती विनोदी आहे ! कामण्णा व गिरसप्पा हीं वेषांतरेंहि विनोदाचे विषय झालेलीं आहेत.

शब्दांच्या विविध लीला

शब्दावर कोट्या करणें हा तर गडकऱ्याच्या तळहातचा मळ. "तोंड दुखेपर्यंत तोंडाची तारीफ करणें, तोंडापुरतें बोलणें, तोंडसुद्धां पाहूं नये" अशा कोट्या तर मामुलीच आहेत. पण शब्दांची उलटापालट करण्याचा खेळहि नायक-नायिका सदैव खेळत असतात. 'प्रेमामुळें कलह कीं कलहामुळें प्रेम' ? 'सौंदर्याच्या ठिकाणीं गुण कीं गुणाच्या ठिकाणीं सौंदर्य' ? 'प्रेमाचें बोलणें कीं बोलण्याचें प्रेम' ? 'बोलण्याची सोय कीं सोयीचें बोलणें' ? 'मायेचे शब्द कीं शब्दाची माया' ? 'विचार केल्यावांचून बोलणें आणि बोलण्यावांचून विचार करणें ?' 'भेटायची चोरी झाली तर चोरून भेट' अशी शब्दलीला विपुल आहे. त्याचप्रमाणें विशेषणें संक्रांत (Transfered Epithet) करण्याची इंग्रजी पद्धतहि गडकऱ्यांनीं उचलली आहे. 'उतावळी उद्यां, उर्मट अंदाज' 'भाग्यशाली आशा' 'आशाळभूत धीर' अशा शब्दांच्या जोड्या बहुतेक पात्रांच्या संवादांतून पेरलेल्या आहेत.

कारुण्याचा सिंधु

'एकच प्याला'मध्यें गडकऱ्यांनीं कारुण्याचा सिंधु सांठविला आहे. मद्यपानामुळें सुसंस्कृत मनुष्याच्या आयुष्याची कशी माती होते, याचें अत्यंत हृदयभेदक चित्र या नाटकांत रंगविलें आहे. सुधाकर हा केवढा बुद्धिमान् व स्वाभिमानी वकील, पण कोर्टात त्याचा अपमान झाल्यामुळें

त्याच्या 'मस्तकावर घणाचे घाव' बसूं लागले. तें दुःख विसरण्यासाठीं त्याचा व्यसनी नोकर तळीराम त्याला दारूचा पहिला पेला देतो. पुढें सुधाकराचें दारूचें व्यसन इतकें वाढतें कीं, तो आपली साध्वी पत्नी सिंधु हिचा अनन्वित छळ करतो आणि शेवटीं तिला व तिच्या मुलाला ठार मारतोहि. अखेरीस सुधाकर, सिंधु व त्यांचे मूल हे तिघेहि मृत्यु पावतात. असें हें शोकपर्यवसायी नाटक रंगभूमीवर विलक्षण परिणाम करणारें ठरलेलें आहे. दारूबंदीचा प्रचार करणारीं मराठींत प्रमुख नाटकें तीन— कोल्हटकरांचें 'मूकनायक', खाडिलकरांचें 'विद्याहरण' व गडकऱ्यांचें 'एकच प्याला'. या सर्वांत प्रभावी प्रचार करणारे आणि तरीहि उत्कट रसानें कांठोकांठ भरलेलें असें यशस्वी नाटक म्हणजे 'एकच प्याला'च ! या त्याच्या प्रचारकीय महत्त्वाची एक खूण म्हणजे स्वकीय सरकारनें त्यावरील करमणुकीचा कर माफ केला आहे.

वात्सल्याची जोड

सिंधूच्या सात्त्विक तेजानें उपरति होऊन सुधाकर कांहीं काळ दारू सोडतो. त्यावेळीं सिंधु आपल्या बालकाला "ऊठ गड्या । झणि टाक उड्या" असें म्हणून "ही आनंदाची गुढी घेऊन बाबाकडे, भाईकडे तुला दुडदुडा धांवत जायला नको कां ?" असें विचारते. त्यावेळीं वत्सल रसाचे किती शीतल तुषार उडतात ! तसेंच "घांस घेरे तान्ह्या बाळा" हें पदहि वात्सल्यानें ओथंबलेलें आहे. 'पुण्यप्रभावां'तील 'घुंगुरवाळ्या'चेंच हें भावंड ! "वन्सं, सांभाळा बाई तुमचं रत्न हें" अशी किर्लोस्कर-देवलांना शोभणारी अगदीं घरगुती भाषाहि सिंधूच्या तोंडीं आहे. सिंधूची स्वभाव-रेखा अत्यंत उदात्त व पराकाष्ठेची परिणामकारक वठलेली आहे. 'पुण्यप्रभावां'तील वसुंधरेप्रमाणें तिच्या स्वभावांत अद्भुत असें कांहीं नाहीं. आर्यस्त्रीचा आदर्शच आहे तो ! सर्वसामान्य हिंदुस्त्रीच्या ठायीं जी वृत्तीची सहिष्णुता, हृदयाची उदारता व चित्ताची सरलता असते, त्याचा परमोच्च बिंदु म्हणजे सिंधु. सीता-तारामतीची पवित्र परंपरा चालविणारी सती म्हणजे सिंधु. पतीला प्रतिकार करण्याइतकी ती सुशिक्षित किंवा बंडखोर नाहीं; तर पतीच्या अब्रूवर पांघरूण घालणारी व प्रसंगीं आत्मबलिदानहि

करणारी ती सत्त्वधीर साध्वी आहे. तिचें सारें जीवन त्यागानें व क्षमेनें ओथंबलेलें असून कारुण्यानें थबथबलेलें आहे.

उदात्त करुणरस

अवघ्या चार वाक्यांत कारुण्याचे कल्लोळ उठविण्याचें सामर्थ्य गडकऱ्यांच्या लेखणींत कसें होतें, हें पुढील लहानशा संवादावरून दिसून येतें.

" गीता—हें बघा, मी सांगेन तिथं याल का ?

सिंधू—कुठं यायचं ? सांगाना तरी ?

गीता—अमृतेश्वरीं !

सिंधू—तिथं कशाला यायचं ?

गीता—तिथं आज चार दिवस लक्षभोजनं चाललीं आहेत ! चार दिवस तिकडे गेलांत तर गोडाधोडाचें घास तरी पोटभर मिळतील. तुम्हांला उपाशींतापाशीं पाहिलं म्हणजे माझ्या किनई पोटांत तटतट तुटतं अगदीं.

[सिंधु तोंड फिरवते व पदरानें डोळ्यांतील आंसवें पुसते.] "

शब्दांचें लीला-लाघव

हें करुण कथानक रंगवितांना गडकऱ्यांची काव्यात्मक व लीला-लाघवी अशी भाषा त्यांच्या सेवेला सिद्धच आहे. " नांव टाकणें, हांक मारणें, पाषाणहृदयावर शिलालेख कोरणें, हात दाखविणें, डोळे उघडणें, " इत्यादि वाक्संप्रदायावर त्यांनीं भरपूर कोट्या केलेल्या आहेत. धूळ, तोंड, कोड, मात्रा, कडी, सत्त्वें, भस्में इत्यादि शब्दांवर त्यांनीं श्लेष साधले आहेत. " करुण शोभा, हरामखोर हंसणें, तरुण इच्छा, उपाशी आशा, भित्रा ओशाळेपणा," इत्यादि 'संक्रांत विशेषणें'हि मधून मधून चमकतात. " मुलासकट माणुसकीला, सिंधुसकट संसाराला, सद्गुणासकट सुखाला, जगासकट जगदीश्वराला, निर्वाणीच्या निराशेंतला प्रणाम " दुर्दैवाचे दशावतार पाहणारा सुधाकर करतो.

त्याचें शेवटचें तीन पानांचें व्याख्यान आणि त्यांतील संमोहावस्था, उमान्दावस्था व प्रलयावस्था यांचें तपशीलवार वर्णन रंगभूमीला वावडें असलें, तरी त्यावरून नाटककाराच्या हृदयाची तळमळ व तडफड दिसून येते. मात्र

दारू सोडल्याचा एकदां निश्चय केल्यावर सुधाकरासारख्या हुशार वकिलानें बंडगार्डनवर जाणें व तेथें चरितार्थाचें कांहीं साधन हातीं लागत नाहीं म्हणून पुनः मद्याच्या मगरमिठींत सांपडणें, हें परिवर्तन अकारण, आकस्मिक व अयोग्य वाटतें.

हास्याचा प्रकर्ष

कारुण्याचा ताण प्रेक्षकांच्या मनाला फार बसूं नये, म्हणून गडकऱ्यांनीं तळीराम व त्याचे दारूबाज दोस्त यांच्या बेहोष बडबडींतून अमाप हास्यरस निर्माण केला आहे. वैद्य व डॉक्टर यांच्या परस्पर–विरोधी संवादांतूनहि हास्याचे हिमकण उडविले आहेत. भगीरथ व शरद यांचें उपकथानक गुंफून पुनर्विवाहाच्या प्रश्नाला गडकऱ्यांनीं स्पर्श केला आहे, पण तो एकंदर कथानकाला अनावश्यक आहे. मुख्य रस करुण आणि त्याला पोषक म्हणून हास्य व वत्सल एवढेच रस गडकऱ्यांनीं या नाटकांत खेळविले आहेत, पण ते अत्यंत उत्कटत्वानें व कमालीच्या कौशल्यानें. त्यामुळें हें नाटक वीस–वीस वेळां वाचणारे वा पहाणारे रसिक अनेक आहेत.



आचार्य अत्रे : : : ५

लेखक असून खंदे वक्ते, कवि असून झुंझार वादकर्ते आणि साहित्यिक असून राजकारणी प्रचारक—असे विलक्षण आचार्य अत्रे आहेत. 'केशवकुमार' या टोपण नांवानें त्यांनीं आधीं विडंबनपर व नंतर प्रसादपूर्ण अशा कविता लिहिल्या. रसिकांच्या मान्यतेस पावलेल्या 'रवि-किरण' मंडळावर उपहासाचें शस्त्र चालविणाऱ्या त्यांच्या कविता, 'झेंडूचीं फुलें' या पुस्तकांत संग्रहीत केलेल्या आहेत आणि त्यांची स्वतंत्र काव्य-संपदा 'गीत-गंगा' या पुस्तकांत सांठविली आहे. विनोदाचा तर धबधबाच त्यांच्या वाणींतून व लेखणींतून वहात असतो. कोल्हटकर यांनीं विनोदाची जी नवी पायवाट रुळविली, तिचा गडकऱ्यांनीं राजमार्ग बनविला आणि अत्र्यांनीं तो राजमार्ग सर्वसामान्य लोकांनाहि खुला केला.



शिक्षण-क्षेत्रांतील कामगिरी

प्रल्हाद केशव अत्रे यांचा जन्म १८९८ सालीं सासवड येथें झाला. पुरंदर किल्ल्याच्या नैसर्गिक सौंदर्यावर व ऐतिहासिक अभिमानावर त्यांचें बालपण पोसलें गेलें. त्यानंतर शिक्षणासाठीं ते पुणें येथें आले. भावेस्कूल-

मध्यें त्यांनीं दुय्यम शिक्षण घेतलें व १९१४ सालीं ते मॅट्रिक झाले. पुढें पांच वर्षांनीं फर्गसनमधून ते बी. ए. झाले. त्यांनीं काव्य व नाटकें या विषयांचें सपाटून वाचन केलें. त्यावेळीं मराठी वाङ्मयांत कवि व नाटककार म्हणून प्रकर्षानें तळपणारे गडकरी यांचा परिचय त्यांना घडला. लवकरच ते त्यांचे मित्र झाले व भक्त बनले. बी. टी. च्या परिक्षेंत अत्रे पहिला नंबर मिळवून उत्तीर्ण झाले. इंग्लंडला जाऊन ते टी. डी. होऊन आले. शिक्षणशास्त्राच्या या पदव्या पाठीशीं बांधून त्यांनीं पुणें येथील 'कँप एज्युकेशन सोसायटीच्या' हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून सुमारें वीस वर्षें काम केलें. त्या हायस्कूलचे कांहीं वर्षें ते प्रिन्सिपलहि होते. नंतर त्यांनीं केवळ स्त्रियांकरितां 'आगरकर हायस्कूल' नांवांची संस्था रास्ता पेठेंत स्थापन केली. शाळेंतील विद्यार्थ्यांकरतां त्यांनीं 'अरुण वाचन माला' व 'नवयुग वाचन माला' काढल्या. पुणें नगरपालिका व मुंबई महापालिका यांचे सदस्य म्हणून त्यांनीं लोक-सेवा केली. नाशिक येथील साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद त्यांना १९४२ सालीं मिळालें आणि मराठी पत्रकार संमेलनाचें अध्यक्षस्थान त्यांनीं कोल्हापूर येथें १९४८ सालीं भूषविलें.

विनोदाचा हुकुमी पत्ता

बोलपटांचें ग्रहण लागलें असतांहि मराठी रंगभूमि सुमारें पंधरा वर्षें तेजस्वी व प्रभावी ठेवण्याची कामगिरी अत्रे यांनीं पार पाडली. पडती पेशवाई सावरण्यासाठीं निर्वाणीनें लढणाऱ्या 'बापू गोखल्यां'ची हिंमत त्यांनीं दाखविली. 'वीरवचन' व 'गुरुदक्षिणा' ही त्यांचीं शालेय नाटकें सोडलीं, तर त्यांचें सार्वजनिक स्वरूपाचें पहिलें नाटक "साष्टांग नमस्कार" हें १९३३ सालीं रंगभूमीवर आलें आणि 'कवडीचुंबक' हें त्यांचें ताजें नाटक १९५१ सालीं साहित्यिकांनीं उभें केलें. अठरा वर्षांत त्यांनीं (सात वर्षांची डुलकी घेतली तरी) सुमारें दहा नाटकें लिहिलीं आणि तीं केवळ विनोदाच्या बळावर लोकप्रिय करून दाखविलीं. 'घराबाहेर' किंवा 'उद्यांचा संसार' यासारखीं गंभीर स्वरुपाचीं व करुण रसाचीं

नाटकें त्यांनीं फारशीं लिहिलीं नाहींत. विनोद हाच त्यांच्या यशाचा हुकमी पत्ता आहे. त्यांचा पक्ष एकच आणि तो म्हणजे साहित्याचा; त्यांचा विषय एकच आणि तो म्हणजे विनोदाचा; त्यांचें ध्येय एकच आणि तें म्हणजे रंजल्यागांजलेल्यांना क्षणभर हंसविणें.

लोकांच्या दृष्टीपुढें असणाऱ्या व्यक्ति किंवा संस्था अथवा श्रद्धा यांना गुद्दे देऊन प्रेक्षकांना गुदगुल्या करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. दुष्ट रूढि, जीर्ण परंपरा आणि निर्बुद्ध व अन्यायी चालीरीती यांच्यावरच आपल्या हास्यरसाचा हल्ला करून ते थांबत नाहींत, तर त्यांना स्वतःलाहि जें सत्य-शिव-मंगल वाटतें; त्यालाहि विनोदासाठीं ते खचीं घालतात. श्रोत्याला खो खो हंसविणें हें त्यांचें एकमेव साध्य. त्यासाठीं ते स्वतःचेंहि विडंबन करण्यास कमी करीत नाहींत, मग इतरांची कथा काय? आपल्या बुद्धीची चमक दाखविणाऱ्या कोट्या करून ते जसा शब्दनिष्ट विनोद साधतात, तसाच चमत्कृतिजनक घटनांची सांगड घालून ते प्रसंगनिष्ठ विनोदहि निर्माण करतात. स्वभावनिष्ठ विनोदहि केव्हां केव्हां फुलविण्याइतकी सहृदयता त्यांचें ठायीं आहे.

गडकऱ्यांचें गुरुत्व

'साष्टांग नमस्कार' हें आपलें पहिलें नाटक अऱ्यांनीं आपले 'गुरु' राम गणेश गडकरी यांना अर्पण केलें आहे. श्रीपाद कृष्णांचा जो विनोदी संप्रदाय गडकऱ्यांनीं चालविला, तोच अत्रे आपल्या नाटकांनीं वाढवीत आहेत. काळाच्या पुढारलेपणामुळें अत्रे गडकऱ्यांपेक्षां व्यक्तींची वा संस्थांची चेष्टा अधिक स्पष्टपणें करण्याची धिटाई दाखवीत असतात. "बाबांच्या कपाळीं होता म्हणून चष्मा सांपडला," किंवा "तोंडावर स्तुति नसून तोंडाची स्तुति आहे." अशा 'कपाळ', 'तोंड' वगैरे शब्दांवरील गडकरीछाप कोट्या अत्रे मनमुराद करतात. पण त्याहिपेक्षां विशेष म्हणजे 'साष्टांग नमस्कारां'तील रावबहादुरांचें पात्र रंगवितांना त्यांनीं आपल्या गुरूचा कित्ता सहीसही गिरविला आहे—रावबहादुर म्हणजे धुंडिराजाचीच नवी आवृत्ति! तसाच गोष्टीवेल्हाळ, तसाच

विसराळू आणि तितकाच प्रेमळ. "मौज म्हणजे काय, अगदीं मजा!" "गांठ म्हणजे काय अगदीं गोळाच!" "गामा म्हणजे काय अगदीं कल्लूच," "नमस्कार म्हणजे काय अगदीं साष्टांग नमस्कार" अशी शब्दांची उधळपट्टी रावबहादुर हे धुंडिराजाप्रमाणेंच करतात. धुंडिराजाप्रमाणेंच रावबहादुरांचाहि स्वभाव सहृदय दाखविलेला आहे. मीरेला पळवून नेणाऱ्या बदमाष मल्लीनाथाला पोलीस पकडून आणतात, तेव्हां रावबहादुर त्याच्यावरची फिर्याद परत घेतात व त्याला मोकळें करतात, एवढेंच नव्हे, तर त्याला पांच रुपये देऊन त्याची बोळवण करतात.

आधुनिक कवींचें विडंबन

या 'सवाई धुंडिराजा'च्या द्वारें अत्रे यांनीं सूर्य–नमस्काराची रेवडी उडविली आहे. व्यायामाचा हा प्रकार हास्यास्पद आहे असें अत्रे यांनाहि वाटत नसावें; फक्त त्याचा अतिरेक त्यांना दोषास्पद वाटत असावा. म्हणून त्यांनीं एका व्यायामप्रेमी सुजन संस्थानिकाचें विडंबन करून हें पात्र निर्माण केलें आहे. त्याप्रमाणेंच कविवर्गाचेंहि विडंबन नाटककारानें यथेच्छ केलें आहे. 'यशवंत–येरवडा' या चालीवर 'भद्रायु भाडघर' असें एका उथळ कवीचें पात्र त्यांनीं रंगविलें आहे. काव्यगायनाचे वेळीं त्याची स्थिति "मी आपला कविता गातों आहें, आणि रडतों आहें–गातों आहें नि रडतों आहें!" अशी झाली. गडकरी–संप्रदायाचीच चेष्टा अत्रे करीत आहेत कीं काय, अशी शंका येण्यासारखे उद्गार त्यांनीं भद्रायूच्या तोंडीं घातले आहेत. तो म्हणतो, "पोटांतल्या कावळ्याची कर्कश कोलाहल शांत करण्यासाठीं हा शिक्षकाचा पेशा पत्करला! पण काळजांत किलबिलणाऱ्या कोकिळांच्या कुहू संगीताच्या मादक माधुर्यानें मस्तक इतकं मस्त होऊन जातं कीं, त्यापुढं त्या कठोर कोलाहलाची ओझरती आठवणदेखील अंतःकरणांत उरत नाहीं."

एक नामी प्रहसन

'भ्रमाचा भोपळा' हें बोलूनचालून प्रहसन. १९३५ सालीं तें अत्र्यांनीं लिहिलें. त्यांत अस्वाभाविकता किती आणि अतिशयोक्ति किती

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दां. क्र. ६९०३

याकडे एकदां कानाडोळा करण्याचें आपण ठरविलें, म्हणजे मग यासारखें मजेदार नाटक मराठींत विरळाच ! 'साष्टांग नमस्कारा'पेक्षां यांच्या कथानकाचा पाया अधिक भक्कम आहे आणि सुप्रसिद्ध व्यक्ति वा संस्था यांच्या निंदेचें प्रमाण कमी आहे. जाफराबादचे जहागीरदार लग्नासाठीं कचेश्वराच्या घरीं येतात. पांच दिवसांत त्याला वेड लागायची पाळी यावी, इतक्या भानगडी तेथें घडतात. तो 'बोका–इ–बंगाल' नांवाचा दरोडेखोर ठरतो आणि त्यामुळें घोटाळ्यामागून घोटाळे माजतात. शेवटीं कचेश्वराप्रमाणें प्रेक्षकहि म्हणतो, "हें काय नाटक आहे, कां स्वप्न आहे ? एखाद्या चक्रव्यूहांत अडकल्यासारखं वाटतं आहे मला." कचेश्वराच्या दोन मुलींचे प्रियकर डॉक्टर व भैय्या यांचीं सोंगें घेऊन त्याच्या घरांतच त्याच्या संशयी डोळ्यापुढें वावरतात. त्यांचा गोंधळ व पुढें कानडी भाषा ऐकतांना प्रेक्षकाला 'भावबंधनां'तील कामण्णा–गिरसप्पाची आठवण सहजच होते. धुंडिराजाकडून घनश्याम जसा खोटा कबुलीजबाब नकली पोलिसाच्या धमकीनें लिहून घेतो, तसाच प्रकार या नाटकांतहि आहे.

"लहानपणीं दाढी होती" यावरील कोटीहि 'भावबंधनां'तील "लहानपणीं आजी मेली" या विनोदाच्या वंशांतीलच आहे. नागनाथ हा साऱ्या कारस्थानांचा सूत्रधार. तो वृद्ध पिता, फौजदार वगैरे सोंगामागून सोंगें घेतों आणि एका दिवसाच्या आंत त्यानें केलेलें हें वेषांतर त्या जहागीरदाराला कांहीं ओळखूं येत नाहीं असें प्रेक्षकांनीं समजावयाचें आणि मग यथेच्छ हंसावयाचें ! "माझं प्रेम आटायला कांहीं तो तुझ्या वडिलांचा काढा नाहीं." किंवा "अहो शील, चला मुकाट्यानें, नाहींतर फुटेल कानशील" असे शब्दांचे खेळ मधूनमधून हशा पिकवितात.

अतिशयोक्ति हा तर विनोदाचा प्राण. विद्यागौरीच्या बडबड्या स्वभावाचें वर्णन करतांना नागनाथ म्हणतो, "चोवीस तासांत तिच्या तोंडांतून जितकी वाफ जाते तितकी जमा करून ठेवली, तर तेवढ्या वाफेवर एका लग्नाच्या प्रयोजनाचा स्वयंपाक शिजून निघायला हरकत नाहीं ! महांकाळी तोफेला जर नाकडोळे आले आणि पाय उमटले तर ती हुबेहुब या बयासारखी दिसेल !"

संवादावर भर

अत्र्यांचीं बहुतेक नाटकें संवाद-प्रधान आहेत, कथानक-प्रधान थोडीं आहेत आणि स्वभाव-प्रधान जवळजळ नाहींतच. त्यांच्या नाटकाचें यश मुख्यतः त्यांतील खुमासदार संवादावरच आधारलेलें असतें. या संवादांतून खटक्याचे फटाके व विनोदाचे फुलबाजे जेव्हां उडतात, तेव्हां नाट्याचे सारें दारूकाम प्रेक्षणीय होतें. 'साष्टांग नमस्कार, भ्रमाचा भोपळा,' या नाटकांत असे वादयुक्त व विनोद-प्रचुर संवाद फुललेले आहेत. पण 'पराचा कावळा,' 'मी उभा आहें,' 'जग काय म्हणेल?' इत्यादि नाटकांत असे संवाद फारसे नाहींत, आणि हृद्य विनोदालाहि स्थान नाहीं. केवळ चार भांडखोर लोकांचा मोकाट शिवराळपणा तेवढा ऐकूं येतो. समाजाच्या एखाद्या अंधाऱ्या कोनाकोपऱ्यांत घडणाऱ्या प्रेमाच्या भानगडी व व्यसनांचीं लफडीं यांचीं भडक चित्रें अशा नाटकांतून अत्रे यांनीं काढलीं आहेत. तें सर्व समाजाचें वास्तव स्वरूप नाहीं आणि ध्येयस्वरूप तर नाहींच नाहीं. "दारूबाज वेताळांचा दरबार" असें वर्णन अत्र्यांचेंच एक पात्र १९३८ मध्यें रचलेल्या "पराचा कावळा" मध्यें करतें. तें त्यांच्या बहुतेक सर्वच नाटकांना शोभणारें आहे.

नगरपालिकेचें शब्द-चित्र

"मीं माझ्या आयुष्याची म्युनिसिपालिटी केली आहे" असें अत्रे म्हणत. आणि त्यांचीं नाटकें म्हणजे त्यांच्या आयुष्याचा आरसा! विद्यालय, म्युनिसिपालिटी, चित्रपटसृष्टी—इत्यादि क्षेत्रांत शिरून त्यांनीं जे जे भलेबुरे अनुभव घेतले, त्यांचें प्रतिबिंब त्यांच्या नाटकांत स्वच्छ पडलेलें आढळतें. नगरपालिकेंतील आपल्या अनुभवांचें छायाचित्र त्यांनीं 'मी उभा आहें!' या नाटकांत काढलें आहे. माधवराव जोश्यांच्या 'म्युनिसिपालिटी' इतकें तें वास्तव नाहीं व हिडीसहि नाहीं. निवडणुकीच्या नादानें श्रीमंत दादासाहेब इनामदार (गोवर्धन) कसे वहावत जातात आणि लुच्चेलफंगे लोक त्यांना कसें फसवितात व त्यांचा विश्वासघात करतात हें या नाटकांत दाखविलें आहे. हा विषय अगदींच गद्य असल्यामुळें त्यांत एकहि पद उचित

नव्हतें. दुष्काळ पत्राच्या संपादकानें बदनामीकारक मजकूर छापल्यामुळें त्याच्यापुढें दादासाहेबांची पत्नी उभी राहते, आणि त्याला छडीनें बडविते. हा नाटकांतील प्रसंग त्यावेळीं घडलेल्या एका सत्य घटनेचाच पडसाद आहे. हा काय, किंवा नाटकांतील इतर प्रसंग काय, ते रंगवितांना अत्र्यांनीं फारशी कला-चातुरी दाखविलेली नाहीं. नुसती धांवपळ व शिवीगाळ-यांतच पात्रांची सारी शक्ति खर्च होते. सर्वांची भाषा एकेरी व एकांतिक आहे.

निवडणुकीचें राजकारण

'मी उभा आहें' मध्यें अत्र्यांनीं नगरपालिकेचें राजकारण रंगविलें, तर 'वंदे मातरम्' मध्यें विधिमंडळाचें राजकारण रेखाटलें आहे. दिलीप हा कॉंग्रेस-कार्यकर्ता. त्याचेवर प्रेम करणारी अलका, हिचे वडील सर गुरुनाथ हंगामी मंत्रिमंडळाचे पंतप्रधान होतात. सोमेश्वर हें पुण्यांतील एका सनातनी पुढाऱ्याचें हुबेहुब शब्दचित्र आहे त्रिभुवन हा धर्मांतरवादी हरिजनांचा नमुना दाखविला आहे. स्वार्थासाठीं सारीं माणसें आपल्या तत्त्वांचा बळी देण्यास व पक्षाचा त्याग करण्यास कशीं तयार असतात, याचें विडंबन अत्रे यांनीं या नाटकांत सुरेख केलें आहे. सोन्यामारुती-प्रकरणीं पीतांबर नेसून येण्याचें सत्य नाटकहि त्यांत चित्रित केलें आहे. 'टि. म. चा वा. वि.' किंवा कल्याणचा अवधूतछाप विनोद— अशीं हास्यकारक स्थळें या नाटकांत थोडींच आहेत; पक्षोपपक्षांचे वादविवाद कथानकाचा मुख्य भाग व्यापून बसले आहेत.

बंडखोर गृहिणीचें चित्रण

सात वर्षें चित्रपटांत गुंतल्यामुळें अत्रे यांचें 'जग काय म्हणेल' हें नाटक १९४६ सालीं रंगभूमीवर आलें. आर्थिक स्वातंत्र्यासाठीं 'समाजाविरुद्ध बंड करणारी तेजस्वी गृहिणी' या नाटकांत चित्रित करण्याचा नाटककाराचा हेतु आहे. पण त्यांतील कथानकाच्या कमकुवतपणामुळें तो फारसा सफल झालेला नाहीं. उल्का व वर्षा या "पुण्याला पुरंदऱ्यांच्या वाड्यांत राहणाऱ्या अन् सोनचाफ्याच्या झाडाखालीं दणदणा

फुगड्या खेळणाऱ्या परकऱ्या पोरी." त्या प्रौढ वयांत एकमेकींना भेटतात. जणुं कृष्णा–कोयनेचा प्रीतिसंगमच हा. पहिल्या अंकांतील प्रसंग केवळ शिवा नोकराच्याच नव्हे तर प्रेक्षकांच्याहि डोळ्यांतून आनंदाश्रु काढतो. आपल्या संसारांतील दुःखाचा मुका मार लपवून उल्का सुखाचें सोंग आणते. पण तिचा व्यसनी नवरा तें सारें सोंग विस्कटून टाकतो. हीं परिवर्तनें नाट्यपूर्ण व रसपूर्ण असल्यामुळें पहिला अंक हृदय हलविणारा झाला आहे. कुलीन स्त्रीनें रंगभूमीवर प्रवेश करावा कीं नाहीं, हा वाद नाटकाचा मुख्य विषय म्हणून निवडलेला आहे. पण तो रांगणेकरांच्या 'कुलवधु' प्रमाणें परिणामकारक पद्धतीनें रंगविला गेला नाहीं, तसेंच 'नवरेशाहीचा निःपात' करण्याची नायिकेची घोषणा वरेरकरी आवेशाची वाटते. नायिका उल्का हिचा स्वभाव बंडखोर व तेजस्वी करण्याचें नाटककारानें योजलें आहे, तिची भाषा ठिणग्या पाडणारी आहे—पण तिला नाटककारानें योग्य संधि मिळवून दिलेली नाहीं. नाट्य–लेखक प्रकाश याच्याबरोबर रंगभूमीवर काम करण्यांत, स्वतःच्याच घरीं, आपल्या नवऱ्यासमोर, त्याच्या मनाविरुद्ध, दोघांनीं मिळून रंगीत तालीम करण्यांत आणि अखेर नवऱ्याला व मुलाला टाकून प्रकाशच्या घरीं रहाण्यांतच तिची सारी बंडखोरी खलास होते! तिचें किंवा तिच्या नवऱ्याचें—कोणाचेंच स्वभावचित्र प्रेक्षकांच्या सहानुभूतीस पात्र होण्यासारखें बठलेलें नाहीं.

समस्या–प्रधान कथानक

आपलें विनोदाचें राखीव कुरण सोडून अत्रे यांनीं कांहीं करुणरसात्मक नाटकेंहि लिहिलीं आहेत. 'घराबाहेर,' व 'उद्यांचा संसार' या नाटकांत विनोदाला फारसा वाव नाहीं. व्यसनी नवऱ्याच्या हिंदु स्त्रीचे हाल कारुण्यपूर्ण भाषेनें या नाटकांत रंगविले आहेत. 'उद्यांचा संसार'मधील करुणा म्हणजे 'एकच प्यालां'तील सिंधूची नवी आवृत्ति. अठरा वर्षे नवऱ्याचा छळवाद मुकाट्यानें सोसून शेवटीं ती नवऱ्याला फाडफाड बोलते आणि म्हणते, "संसाराचा सारा महाल कोसळला, आतां भिंती कशाला संभाळूं?" ती नवऱ्याला 'घुबड' म्हणते; राक्षस' म्हणते. पण त्या स्पष्टवक्तेपणानें कांहीं विस्कटलेल्या संसाराची घडी बसत नाहीं.

करुणा घरावरून उडी घेऊन आत्महत्याच करते. सिंधूच्या फार पुढें ती गेलेली नाहीं. रामलालसारखा असणारा गौतम म्हणतो, " हाच उद्यांचा संसार ! आयुष्याची जबाबदारी झुगारून जगांत जगणाऱ्या आज-उद्यांच्या पुरुषांचं हेंच प्रायश्चित्त." या नाटकाच्या शेवटामुळें सुशिक्षितांच्या संसारांतील एक समस्या फक्त लोकांपुढें मांडली गेली—सोडविली गेली असें मात्र नव्हे. या दुर्दशेचें मूळ जो व्यसनीपणा त्याचा निषेध नाटककारानें प्रेक्षकांच्या चित्तावर ठसविला असता, तर ती समस्या सोडविण्याचा तो एक मार्ग ठरला असता.

करुणेचें स्वभावचित्र संयमशील कारुण्यानें रेखाटलें आहे. तिचा मुलगा शेखर याच्या तरुण हृदयाचें शब्दचित्रहि सुंदर आहे. त्याचा रेशमी रुमाल व त्यावरील अत्तराचा घमघमाट यावरून त्याच्या प्रेमळ लबाडीचा अंदाज करुणा अचूक बांधते. यांत तिच्या बुद्धीची सूक्ष्मता दिसून येते. शेवटीं शेखरहि बापासारखाच दारूबाज निघतो, असें दाखविलें आहे. " आयुष्य हें जगून समजतें, पुस्तकें वाचून नव्हे " असें सिद्धांत सहजसुंदर भाषेंत या नाटकामध्यें मांडलेले आहेत.

स्त्रीची महती

' उद्यांचा संसार 'प्रमाणेंच शोकपर्यवसायी असें अन्यांचें दुसरें नाटक म्हणजे ' घराबाहेर '. आपल्या बापाला व पतीच्या दुबळेपणाला कंटाळून निर्मला घराबाहेर पडते. पण ती ज्या भल्यासाहेबांच्या आश्रयाला जाते, तोहि एक काळसर्पच निघतो. शेवटीं निर्मलेचा नवरा शुद्धीवर येतो व तिला घरीं घेऊन जातो. तो आपल्या पापी बापाला म्हणतो, " तुमच्या गुलामगिरीच्या शृंखला तोडून आज मी स्वतंत्र झालों आहें ! आजपर्यंत तुमच्याकडे गहाण टाकलेली माझी सारी अक्कल मी आतां परत मिळविली आहे." पत्नी व माता या दोन नात्यांनीं स्त्री भिन्न भिन्न कार्में करतें हें अत्रे यांनीं समर्पक शब्दांनीं सांगितलें आहे. पद्मनाभ म्हणतो, " स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत कालाची माता आहे. पत्नी ही एखाद्या व्यक्तीचें जीवन असली, तर माता ही साऱ्या वंशाचं जीवन आहे.

मनुष्याच्या कायद्यानं पत्नी निर्माण केली असली, तर निसर्गाच्या नियमांनीं मातेची निर्मिती केली आहे." 'उद्यांचा संसार 'मध्येंसुद्धां हाच फरक अलंकारपूर्ण भाषेनें दाखविला आहे. तो असा,–"आईच्या प्रीतींत गाईच्या दुधाची मधुरता असते, तर तरुणीच्या प्रेमांत द्राक्षासवाची मादकता असते. एकानें बुद्धीचें समाधान होतें, तर दुसऱ्यानें हृदयाची व्याकुलता वाढते."

कुटुंब–संस्थेची इष्टता

"बायकांनो, नवरे संभाळा" असा संदेश 'लग्नाची बेडी' या नाटकाच्या शेवटीं दिलेला आहे. कोणी ? तर रश्मि या उनाड नटीनें ! या नाटकांत गंभीर विचार व विनोदी आविष्कार यांचा सुंदर मेळ पडला आहे. अत्रे यांच्या लेखणींतून हास्य व करुण या दोन्ही रसांच्या धारा खवत असतात, त्यांचा संगम या नाटकांत झालेला आहे. 'लग्नाचें व्यसन' जडलेला व पांचवें कुटुंब बरोबर बाळगणारा गोकर्ण एकीकडे, तर लग्नासाठीं तडफडणारा अवधूत दुसरीकडे. या दोघांच्या मध्यें नुकतेंच लग्न झालेला डॉक्टर कांचन हा रश्मि या सिनेमा-नटीवर फिदा होतो. तिला पिटाळण्यासाठीं त्याची बायको व त्याचे हितचिंतक एक कारस्थान रचतात. यामुळें हें नाटक विनोदी असूनसुद्धां त्याच्या पाठीला कणखर कथानकाचा कणा लाभलेला आहे. क्षणोक्षणीं हास्याचे स्फोट करणारे संवाद आणि जिज्ञासा वाढविणारें कथानक या दोन्ही गुणांमुळें अत्रे यांचें हें नाटक म्हणजे त्यांच्या विविध नाट्यगुणांचा स्मारक-स्तंभच होय. 'संशय–कल्लोळा 'प्रमाणेंच हें नाटक अखेरपर्यंत एकसारखें रंगत जातें आणि श्रोतृवृंदाला सतत हंसत ठेवतें. "प्रेम हा प्लेगासारखाच एक संसर्गजन्य रोग आहे. फरक एवढाच कीं, एकांत रोग झाल्यानंतर गांठ येते आणि दुसऱ्यांत गांठ झाल्यानंतर रोग होतो.' अशी श्लेषात्मक व शृंगारात्मक वाक्यें तरुण प्रेक्षकांना गुदगुल्या करतात.

कवीचें विडंबन

'पाणिग्रहण' या १९४६ सालीं लिहिलेल्या नाटकाचा "प्रेम कीं

पैसा ?" हा विषय आहे. कवि चंडोल याच्या वात्सल्यपूर्ण उद्गारानें नाटकाचा आरंभ जितका आनंददायक वाटतो, तितकाच त्याच्यामागें लागलेल्या सावकारांचे तगादे खेद उत्पन्न करतात. मिलीटरी कंत्राटें घेऊन दहा लाखांचा धनी झालेला पापडवाला घोडके " पब्लिक माणूस, इंजेक्शन " वगैरे इंग्रजी शब्द भलतेपणानें वापरून हंशा पिकवितो. ह्या पैकेवाल्याला लाथाडून प्रभातदेवी चंडोलाचेंच पाणिग्रहण करते. " साष्टांग नमस्कारां " तल्या भद्रायूप्रमाणें चंडोलाच्या निमित्तानें कवीचें विडंबन अत्रे यांनीं केलेलें आहे. चंडोल म्हणतो, " अप्सरांच्या गळ्यांत हात घालून आम्ही नंदनवनांतून सांजसकाळ भटकत असतों. चंद्राबरोबर आणि चांदण्याबरोबर फेर धरून आम्ही ढगावर नाचत फिरतों. आणि अमृताचं निशापाणी करून आम्ही कल्पवृक्षाखालीं रात्रंदिवस असे बेहोष पडलेलें असतों. "

अतिशयोक्तीची मौज

' कवडीचुंबक ' हें अत्र्यांचें गद्य नाटक प्रहसनवजा आहे. फ्रेंच नाटककार मोलियर याच्या एका नाटकाचें हें रूपांतर आहे. ' भ्रमाचा भोपळा ' यालाहि त्या नाटककाराचा आधार त्यांनीं घेतलाच होता. पण दोन्ही रूपांतरें स्वतंत्र मराठी कृति वाटतात. ' कवडीचुंबक ' हें प्रहसन सत्तर पानांचें असून त्याच्या कथानकाचा काल पांच दिवसांचा आहे. तें नाटककारानें लिहिलें चार दिवसांत व साहित्यिकांनीं बसाविलें आठ दिवसांत. पंपूशेठ पैठणकर या कवडीचुंबकाची मुख्य भूमिका खुद्द अत्रे यांनींच केली होती. या पात्राचा कंजूषपणा इतका अतिशयोक्तीचा कीं, तो सांगतो, " साऱ्या आयुष्यांत मला एकदांच घेरी आली होती— देवापुढें मी आणेली ठेवायच्याऐवजीं पावली ठेवली तेव्हां." रामदास बोटी-बरोबर पंपूशेठ बुडत असतां त्याला केशरनें वाचवलें, त्याचें बक्षीस काय ? तर पंपूशेठ त्याला बजावतो, " त्या गडबडींत तूं माझा एक पंचा हरवला आहेस, त्याची किंमत कधीं तरी मी तुझ्या पगारांतून कापून घेणार आहें." त्यावर केशर उत्तर देतो, ' मी बिनपगारी नोकर आहें ! '

प्रसंगनिष्ठ विनोद

हा वृद्ध पंपूशेठ कस्तुरी नांवाच्या मुलीशीं लग्न करूं पहातो व आपली मुलगी गुलाब ही म्हाताऱ्या जंगूशेटाला देऊं करतो. प्रण चंदन व केशर नाना हिकमती करून त्या मुलीशीं अनुक्रमें विवाह करतात. कथानकांत सोंग वेषांतर, थापा इत्यादि विनोदाचा सारा खमंग मसाला भरलेला आहे. एके ठिकाणीं ' षष्ठी ' शब्दावर श्लेष केलेला आहे, पण त्याहिपेक्षां पंपूशेठ जेव्हां चंदनच्या मनांतील कस्तुरीविषयींची भावना जाणून घेण्यासाठीं बतावणी करतो तेव्हांच खरी खसखस पिकते. तशाच विशाल हंशाचा ताशा वाजतो, पंपूशेठ व केशर यांच्या लाखाच्या चोरीविषयींच्या संवादाचे वेळीं. लाख रुपये ही पंपूशेठाची ' सर्वस्वाची ठेव, ' तर केशर समजतो गुलाब हीच ती ठेव ! या गैरसमजामुळें प्रसंगनिष्ठ विनोद पिकतो आणि संशयकल्लोळ उठतो व विनोद पिकतो. अत्रे हे खरे विनोदाचार्य आहेत.



कृ. प्र. खाडिलकर : : : ६

रंगभूमि व राजकारण—किती भिन्न क्षेत्रें! एक क्रीडांगण तर दुसरें रणांगण. पण या दोन्ही क्षेत्रांत आपला पराक्रम गाजवून नाट्याचार्य श्री. काकासाहेब खाडिलकर यांनीं मोठें नांव केलें. त्यांनीं नाट्य–कलेची



मंजुळ सतार जितक्या कुशलतेनें वाजविली, तितक्याच हिंमतीनें स्वातंत्र्याची समशेरहि चालविली. गद्य व संगीत अशा द्विविध नाटकांच्या कोमल व सुगंधी फुलांच्या माला गुंफण्यांत ते जितके चतुर, तितकेच लो. टिळक व म. गांधी या दोन्ही राष्ट्रीय विभूतींच्या झेंड्याखालीं उभे राहून पारतंत्र्यासीं सामना खेळण्यांत शूर. या 'कवि कृष्णा' ला जी नाट्यकला वश झाली, तिलाहि त्यांनीं स्वातंत्र्याचे तपश्चर्येसाठीं, विश्वामित्राप्रमाणें, राबविलीच. खाडिलकरांची तत्त्वनिष्ठा जितकी प्रखर व स्वातंत्र्य–साधना जितकी उग्र; तितकीच त्यांची नाट्य–रचना शृंगारादि रसांनीं थबथबलेली व उत्कट प्रसंगांनीं नखशिखांत नटलेली. 'नाट्याचार्य' ही पदवी मराठींत त्यांनाच काय ती शोभते.

राजकारणाचे रण–घोष

सन १८९३ सालापासून चाळीस वर्षें खाडिलकर नाट्य–लेखन करीत होते–आणि त्यांतील निम्मा काळ तरी ते मराठी रंगभूमीचे प्रभु होते—

सार्वभौम नाटककार होते. त्यांचें नाटक रंगभूमीवर येणें ही रसिक महाराष्ट्राच्या जगांत एक ऐतिहासिक घटनाच बनत असे. त्याचें आकर्षण जबरदस्त असे आणि त्याचे पडसाद दूरवर निघत. पुण्यांतील 'केसरी'पासून इंग्लंडांतील 'लंडन टाइम्स'पर्यंत त्या नाटकाचे नाद–निनाद उमटत. 'मेनका' नाटक ही आपल्या कौन्सिल–प्रवेशावर टीका आहे असें ओळखून श्री. न. चिं. केळकर यांनीं प्रतिटीका लिहिण्यासाठीं 'केसरी'चे पांच–सात स्तंभ खर्ची घातले. दोघेहि एके काळचे 'केसरीचे'च संपादक–लो. टिळकांचे उजवे–डावे हात. पण त्या दोन्ही हातांनीं एकच टाळी वाजण्याऐवजीं भाऊबंदकी मात्र माजली. खाडिलकरांच्या 'कीचक–वधा'चा डंका तर थेट लंडनमध्यें वाजला! 'लंडन टाइम्स'चे एक वार्ताहर सर व्हॅलेंटाइन चिरोल यांनीं हिंदुस्थानांत येऊन त्या नाटकाची कमालीची लोकप्रियता स्वतः पाहिली आणि तिचें वर्णन 'लंडन टाइम्स'मध्यें करून त्यांनीं असें रहस्य उलगडून दाखविलें कीं, 'Every now and again, unmistakable clues are provided.' कीचक म्हणजे कर्झन असें रूपक या नाटकांत खाडिलकरांनीं साधलें असल्याचे हमखास पुरावे जागोजाग सांपडतात असें चिरोल यांनीं म्हटलें आहे. त्यांचें मत प्रमाण मानून सरकारनें हें नाटक जप्तहि केलें. महाराष्ट्रीय प्रेक्षकांना रंगभूमीवर खाडिलकरांच्या कीचकाचे जागीं अरेराव व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन दिसे, रामशास्त्रीचे ठायीं मंडालेंत कोंडलेल्या लो. टिळकांची मूर्ति भासे, गुलाम झालेल्या हरिश्चंद्राच्या ठिकाणीं हिंदुस्थान उभा राही आणि 'दासी' झालेली द्रौपदी वस्त्रहरणप्रसंगीं टाहो फोडूं लागली कीं, परतंत्र भारतमातेचाच आक्रोश कानीं येई.

प्रभावी टीका

पारतंत्र्याची भयंकर चीड, अन्यायाचा तीव्र तिटकारा व सत्याविषयीं जाज्वल्य निष्ठा, हे गुण नाटकाच्या प्रेक्षकांचे अंगीं सळसळावयास लावण्याचें खाडिलकरांचें सामर्थ्य अ–द्वितीयच आहे. प्रा. शिवरामपंत परांजपे जसे आपल्या अतुल वक्तृत्वानें श्रोतृवर्गामध्यें या गुणांना चेववीत, तसेच

* च. वं. १११
निवेदन

काकासाहेब खाडिलकर आपल्या नाट्यपूर्ण लेखणीनें तो विलक्षण परिणाम घडवून आणीत. 'केसरी'त अग्रलेख लिहून खाडिलकरांनीं भारतीय राजकारणाची जी सेवा केली, तिला पोषक अशीच प्रभावी व तेजस्वी नाट्य-रचना त्यांनीं केली. नाट्य-देवतेच्या नूपुरांतून रणवाद्यांचा गंभीर घोषच ऐकूं यावा अशी खुबी त्यांनीं केली आहे. सुरतेची काँग्रेस मोडली व मवाळ पुढारी 'आमचा जय झाला' अशी टिमकी वाजवूं लागले, पण तमाम जनतेनें लो. टिळकांच्याच गळ्यांत आपल्या नेतृत्वाची माळ घातली; ही सारी राजकीय घटना खाडिलकरांच्या 'स्वयंवर' नाटकांत किती कलात्मक रीतीनें प्रतिबिंबित झाली आहे ! तीच स्थिति कौन्सिल-प्रवेशाची. कांहींहि भरीव हक्क आपल्याला मिळालेले नसतांना साहेबाच्या होला हो म्हणण्यासाठीं कौन्सिलांत जाऊन बसणें किती हास्यास्पद आहे, हें शिवरामपंत परांजपे यांनीं 'मदन-दहन', 'ध्रुवाची गोष्ट' वगैरे कथांतून जितक्या तिखट भाषेनें मांडलें आहे, तितक्याच तीक्ष्ण रीतीनें खाडिलकरांनीं 'मेनका' नाटकांत रंगविलें आहे—आणि त्यामुळेंच कौन्सिलवादी पुढाऱ्यांच्या अंगाची लाही झाली ! हेंच खाडिलकरी नाट्याचें यश !

नटांचा वाटा किती ?

खाडिलकरांचें नाट्य-यश इतकें देदीप्यमान आहे, तें त्यांच्या विरोधकांनाहि नाकारतां येत नाहीं. म्हणून तें यश मान्य करून पण त्यांतील मोठा वाटा नटवर्गाकडे देऊन, खाडिलकरांच्या हातीं यशाचा पोखरलेला नारळच देण्याची फोल चलाखी कांहीं टीकाकारांनीं करून पाहिली. "ज्ञानेश्वरांनीं जसे रेड्याकडून वेद म्हणविले, तसें बालगंधर्व खाडिलकराकडून नीटस नाटकें लिहून घेत आहेत" हें मत्सरी मत खऱ्या टीकाकारालाहि शोभणारें नाहीं, असाच अभिप्राय निःपक्ष रसिकांचा पडला. 'कांहीं गुण सोन्याचा, तर कांहीं गुण सोनाराचा' या न्यायानें कोणत्याहि नाटकाचा दागिना घडविण्यास नाटककाराप्रमाणेंच नटवर्गाचाहि कसबी हात लागत असतो. पण मूळ सोनें मात्र नाटककाराचेंच. खाडिलकरांची नाट्य-वस्तुच तशी सकस व सरस आहे. तीं नाटकें

गंधर्वांशिवाय दुसऱ्या नटांनीं वठविली, तरी खूप रंगतात. फार काय, त्यांतील संगीत वर्ज्य करूनहि एकादा गुणी नटसंच तीं नाटकें बसवील, तरी तीं लोकप्रियच होतील, इतकी रसोत्कटता त्या नाटकांत कांठोकांठ सांठलेली आहे. उलट, गंधर्वांच्याच रंगभूमीवर खाडिलकरांशिवाय इतर अनेक नाटककारांचीं नाटकें आलीं, पण तीं दुसऱ्याच अर्थानें 'बसलीं!' या अन्वय-व्यतिरेकावरून खाडिलकरांचे स्वयंभू असे नाट्य-गुण अलौकिक स्वरूपाचे असल्याबद्दल कोणतीहि शंका रहाण्याचें कारण नाहीं.

गंधर्व मंडळींचें कोंदण

हिऱ्याला सोन्याचें कोंदण जसें शोभतें, तसें खाडिलकरांच्या अलौकिक नाटकांना गंधर्वांच्या अद्वितीय कला-कौशल्याचा लाभ पोषकच ठरला हें कोण नाकारील? तलवार कितीहि पाणीदार असली तरी शत्रूला तिचें पाणी चाखविण्यासाठीं तिची मूठ बळकटच असावयास पाहिजे. तसा सुंदर मेळ खाडिलकर व बालगंधर्व यांचा पडला व तो पंचवीस-तीस वर्षें सतत टिकून राहिला. "योद्ध्यांत आज श्रीकृष्ण ज्याप्रमाणें सर्वांत श्रेष्ठ, त्याप्रमाणें नटांत आम्ही सर्वांत श्रेष्ठ" अशी प्रौढी 'स्वयंवरां'तील सूत्रधार मिरवितो, ती 'गंधर्व नाटक मंडळी'ला साजणारीच आहे. अशा नटश्रेष्ठांच्या कला-गुणांना पैलू पाडण्याचें जिगाजिगीचें कामहि खाडिलकरांनीं केलें. देवलांप्रमाणेंच खाडिलकरहि यशस्वी तालीम-मास्तर होते. ते आपल्या नाटकाच्या प्रत्येक प्रसंगाचें, प्रत्येक शब्दाचें मर्म अडाणी नटालाहि बारकाईनें समजावून सांगत. त्यामुळें नाटककाराच्या मनांतील सर्वच्या सर्व भाव नटाच्या अभिनयांतून प्रगट होई. स्वच्छ व पातळ कांचेच्या रंगीबेरंगी हंडींतून चमचमणारा आंतील तेजस्वी ज्योतीचा जणुं रम्य, उज्ज्वल प्रकाशच! एकएका वाक्यानें सारा प्रेक्षकवर्ग हलून जाई- एकएका शब्दानें नाट्यगृह कोसळण्याइतका टाळ्यांचा कडकडाट होई!

मूळचे नाट्य-गुण

ही अजब जादू कोणाची? नाटककाराची कीं नटाची? याची अचूक फोड करून यशाची कांटेकोर वाटणी करणें चोखंदळ टीकाकारालाहि

कठीण. 'ते आले ना ? दादा, ते आले ना ?' या रुक्मिणीच्या सात शब्दांनींच सारा रसिक महाराष्ट्र रोमांचित झाला ! याचें श्रेय, ते शब्द-हीरक इतक्या औत्सुक्यपूर्ण व रसपूर्ण घटनेंत बसविणाऱ्या नाटककाराचें, कीं त्या चतुर राज्यकन्येचा प्रेमळ संभ्रम आपल्या सर्वांगांच्या अभिनयानें व्यक्त करणाऱ्या नटवराचें ? 'या दुंदुभि यादवसेनेच्या ?' या हर्षदायक पृच्छेचा किंवा 'खडा मारायचा झाला तर ?' या शृंगारपूर्ण स्वप्नाचा प्रभाव जन-मनावर जो इतका पडे, तो कशामुळें ? 'नरवर कृष्णासमान' किंवा 'मला मदन भासे' अशा पदांनीं महाराष्ट्रांतील घरन् घर अक्षरशः वेडें झालें होतें, तें गंधर्वांच्या गोडव्या गळ्यामुळें व लाडक्या अभिनया-मुळें हें तर खरेंच; पण त्या वेडेपणाची जबाबदारी खाडिलकरांच्या शहाण-पणावरहि पुष्कळच नाहीं काय ? बालगंधर्वाप्रमाणेंच श्री. गणपतराव बोडस व श्री. केशवराव दाते यांनींहि आपल्या कला-नैपुण्यानें साध्या गद्य शब्दांना-हि सजीव स्वरूप दिलें. 'त्या कोण ?' किंवा 'त्या दिवशीं' हे लक्ष्मी-धराचे छोटे शब्द म्हणजे हास्याचे कुलपी गोळेच ! छोटी भामिनी व मोठी भामिनी या शब्दांची नाटककारानें केलेली योजना जितकी विनोदाची, तितकाच त्याचा नटानें केलेला आविष्कार परिणामकारक. राम, राघोबा, भीम वगैरे दाते यांच्या भूमिकाहि अशाच मन-जिंक्या ! सुगंधाला वारा भेटावा तसा खाडिलकरांना गुणी नटवर्ग लाभला आणि त्यामुळें त्यांचीं नाटकें रंगदेवतेच्या कंठांतील ताईत बनलीं.

कृष्णाकांठीं बालपण

नाट्याचें भरघोस पीक देणाऱ्या कृष्णाकांठींच कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचा जन्म झाला. सांगली येथें ता. २५ नोव्हेंबर १८७२ रोजीं ते जन्मले त्यांचें बालपणहि तेथेंच गेलें. प्राथमिक व दुय्यम शिक्षणहि तेथेंच झालें. इंग्रजी पांचवींत असतांना त्यांनीं एक कादंबरी लिहिली व सहावींत असतांना एक नाटक रचलें. १८८९ सालीं ते मॅट्रिक उत्तीर्ण झाले व त्याच वर्षीं त्यांचें लग्नहि झालें. १८९० मध्यें पुणें येथें फर्ग्युसन कॉलेजांत एक वर्ष काढल्यावर १८९१ मध्यें ते डेक्कन कॉलेजांत गेले.

तत्त्वज्ञान या विषयाचा सखोल अभ्यास व्हावा या हेतूनें त्यांनीं कॉलेज बदललें. कॉलेज–जीवनांत त्यांनीं इंग्रजी व संस्कृत नाट्य–वाङ्मयाचा अभ्यास हौसेनें व बारकाईनें केला. शेक्सपीयर व कालिदास हे त्यांचे आवडते कवि. भवभूतीचें 'उत्तर–राम–चरित' तर त्यांनीं तोंडपाठच केलें होतें. नाटकें पहाण्याचा त्यांचा बालपणापासूनचा नाद पुण्यास चांगलाच पोसला गेला. न. चिं. केळकर हे त्यांचे सहाध्यायी होते आणि त्यावेळीं शिवरामपंत परांजपे हे उपप्राध्यापक असल्यानें त्यांचाहि सहवास खाडिलकरांना लाभला. ते न चुकतां तालीम करीत व खेळ खेळत. पोहणें व कुस्ती यांची त्यांना आवड असे. त्यामुळें त्यांचें शरीर कणखर बनलें. १८९२ सालीं ते बी. ए. झाले. नंतर. ते सांगली येथील हायस्कुलांत शिक्षकाचें काम करूं लागले.

लोकमान्यांचें गुरुत्व

' शाळेच्या चिमण्या जगांत ' खाडिलकरांचें महत्वाकांक्षी मन रमेना. ते मुंबईस गेले व एल्एल्. बी. चा अभ्यास करूं लागले. १८९३ सालीं त्यांचें पहिलें नाटक लिहून झालें. तें म्हणजे ' सवाई माधवराव यांचा मृत्यु. ' हॅम्लेट व अथेल्लो या शेक्सपीयरच्या दोन्ही नाटकांतील स्वभाव-चित्रें यांत एकत्र प्रतिबिंबित झालीं आहेत. हें नाटक १८९५ सालीं ' विविध–ज्ञान–विस्तार' मासिकांत क्रमशः प्रसिद्ध झालें. त्याच मासिकांत खाडिलकरांनीं ' ब्राह्मण व त्यांची विद्या ' या ग्रंथावर एक टीका-लेख लिहिला. तो लो. टिळकांना आवडला. त्यांनीं खाडिलकरांना राष्ट्रीय महोत्सवावर एक लेख लिहिण्यास सांगितला. एका दिवसांत माहिती मिळवून खाडिलकरांनीं तो लेख लिहिला आणि दुसरेच दिवशीं 'केसरी'त तो झळकला अग्रलेख म्हणून ! खाडिलकरांना केवढा आनंद, किती अभिमान वाटला ! या लेखन-तपस्येचें फल म्हणजे १८९७ च्या मेमध्यें लो. टिळकांनीं त्यांना 'केसरी'च्या संपादक–मंडळावर घेतलें. तेथें त्यांच्या जाज्वल्य राष्ट्रनिष्ठेचा व आवेशयुक्त लेखनशैलीचा पूर्ण विकास झाला. लो. टिळकांच्या कार्याशीं व त्या कार्यामागील तत्वज्ञानाशीं खाडिलकर जसे एकरूप झाले,

तसेंच त्यांच्या भाषासरणीशींहि समरस बनले. सहीसही लोकमान्यांचेच वाटावे असे एकाहून एक तेजस्वी व झुंझार लेख त्यांच्या लेखणींतून बाहेर पडूं लागले. त्यांचे प्रतिस्पर्धी केळकर स्वच्छ लिहितात, "खाडिलकर यांचे कांहीं लेख टिळकांनाहि मागें टाकण्याइतके तेजस्वी असत व बाहेर लेख कोणाचा हें नकळल्यामुळें त्याबद्दल टिळकांना स्तुतीचा अहेर मिळे." सरकारनें लो. टिळकांवर ज्या आक्षेपार्ह लेखावरून खटले भरले, ते सारे होते खाडिलकरांचेच ! गुरु-शिष्यांचें इतकें सामरस्य, असें अद्वैत क्वचित्च पहावयास मिळतें. दुष्काळी भागांतील जनतेस साहाय्य देण्यासाठीं लोकमान्यांनीं काकासाहेबांना विजापूर व सोलापूर जिल्ह्यांत पाठविलें होतें. तेथें त्यांनीं अंग मोडून जनतेची सेवा केली. विजापूरचा मोडकळीस आलेला किल्ला पाहून त्याचा उपयोग त्यांनीं 'कांचनगडची मोहना' या राष्ट्रभक्तीनें रसरसणाऱ्या आपल्या नाटकांत करून घेतला. हें नाटक १८९८ सालीं प्रसिद्ध झालें. नटसम्राट गणपतराव जोशी यांच्या 'शाहूनगरवासी नाटक मंडळीच्या' रंगभूमीवर तें नाटक १९०१ मध्यें दणाणलें. १९०४ सालीं त्याच नाटकाच्या प्रयोगानें "महाराष्ट्र नाटक मंडळी" जन्मास आली.

राजकारणाच्या आधाडीवर

लो. टिळकांनीं खाडिलकरांना कांहीं राजकीय संधान बांधण्यासाठीं १९०२ सालीं नेपाळला पाठविलें. आपला कौलांचा कारखाना आहे असें सांगून हे 'टाईल भट' नेपाळच्या सेनापतींना भेटले. कौलें द्यावयाचीं व शस्त्रें घ्यावयाचीं अशी दुहेरी कामगिरी काकासाहेब करीत. घोड्यावर बसणें, बंदूक उडविणें या विद्याहि त्यांनीं कमावल्या होत्या. १९०४ सालीं ते आजारीपणामुळें पुण्यास परत आले. केसरीची संपादकीय व्यवस्था खाडिलकर पुनः पाहूं लागले. १९१८ सालीं लो. टिळकांना काळे पाण्याची शिक्षा झाली. त्यांचे गैरहजेरींत 'केसरी'ची जबाबदारी मुख्य संपादक या नात्यानें खाडिलकरांनीं जोमानें संभाळली. १९०८ मध्येंच 'मराठा'चेंहि संपादकत्व त्यांचेकडे आलें. १९१० सालीं त्यांच्या मानी मनोला 'केसरी' संस्थेच

संबंध सोडणें भाग पडलें. पुढें लोकमान्य मंडालेहून मुक्त होऊन येतांच त्यांनीं काकासाहेबांना पाचारण करून 'केसरी'चीं सूत्रें १९१७ सालीं त्यांचे हातीं पुनः दिलीं. १९२० सालीं जूनमध्यें त्यांनीं 'केसरी'तून चार महिन्यांची रजा घेतली, पण लगेच लोकमान्य दिवंगत झाल्यामुळें, ती रजा म्हणजे राजीनामाच ठरला. १९२१ सालीं 'लोकमान्य' या मुंबईतील दैनिकाचे संपादक म्हणून खाडिलकर पुढें आले. १९२३ सालापर्यंत 'लोकमान्य' पत्र चालविल्यावर त्यांनीं स्वतःचें 'नवा काळ' नांवाचें दैनिक काढलें आणि त्यांतून गांधीजींच्या चळवळीचा जोरानें पुरस्कार केला. लो. टिळकांच्या कार्याची पूर्तता म्हणजेच म. गांधींची चळवळ, असें खाडिलकर मानीत. ते महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष झाले व पूर्ण खादीधारी बनले. १९२९ सालीं त्यांचेवर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना एक वर्षाची शिक्षा देण्यांत आली. तुरुंगांत त्यांनीं ज्ञानेश्वरीचा अभ्यास केला, 'सावित्री' नाटकहि लिहून काढलें.

वीर-कवि

कोल्हटकर व गडकरी यांचीं नाटकें आपल्या विलक्षण विनोदानें व रम्य काव्य-कल्पनेनें प्रेक्षकांना डोलवीत असतांनाच खाडिलकरांची तत्त्वनिष्ठ पण रसपूर्ण नाट्यसृष्टि रसिकांना मंत्र-मुग्ध करीत होती. नाट्य-संमेलनाच्या १९०७ व १९१७ या सालीं भरलेल्या दोन्ही अधिवेशनांचीं अध्यक्षस्थानें त्यांनाच अर्पण करण्यांत आलीं. १९३३ सालीं नागपूर येथें भरलेल्या 'महाराष्ट्र साहित्य संमेलना'चें अध्यक्षपदहि त्यांचेकडेच ओंलें. त्यावेळीं 'मराठीच्या या सेवेकऱ्यानें' आपल्या नाट्य यशाचें रहस्य सांगणारे पुढील उद्गार काढले, "राष्ट्राला सुखी करीन, हा पीळ वीरांना पडेल, तेव्हां कवीच्या अंतःकरणांत कालवाकालव होईल. तो काव्य बोलेल, तो रस ओतील, तो नाटक गाईल." खाडिलकर असे वीर होते व कविहि होते त्यांनीं सांगलीस कृष्णा कांठीं एक रम्य-प्रशांत दत्त-मंदिर बांधलें. त्यांत ते रुद्र, उपनिषदें इत्यादि धर्मग्रंथांवर प्रवचनें करीत. शेवटीं आपल्या गुरूच्या प्रयाण-कालाचाच महिना साधून, ते १९४८ च्या ऑगस्ट

महिन्याच्या २६ व्या तारखेस, राष्ट्राच्या स्वातंत्र्यलाभाचा आनंद मानीत, कैलासवासी झाले.

पंधरा पुष्पांची माला

खाडिलकरांनीं चाळीस वर्षांत पंधरा नाटकें लिहिलीं. हीं सारीं होना-मोहराच आहेत—खुर्दा असा फारसा नाहींच. एक एक नाटक आपल्या एकएका गुण-विशेषानें रंगभूमि रंगवी व महाराष्ट्र गाजवी. एकूण गद्य नाटकें त्यांनीं सात लिहिलीं, पण पांच गद्य नाटकें लिहून होतांच आपण 'पंचशरें गद्यवरें' नाट्यकला वश केली, असा विश्वास त्यांना आला आणि मग त्यांनीं "संगीतीं नवलीला" करून दाखविण्यास प्रारंभ केला. त्यांनीं आठ संगीत नाटकें रचलीं व तीं गंधर्वाच्या स्वर्गीय रंगभूमीवर फुललीं. मानस-सरोवरांतील सुवर्ण-कमलेंच तीं!

या पंधरा नाट्य-पुष्पांपैकीं तीन ऐतिहासिक आहेत. तीं म्हणजे सवाई माधवरावांचा मृत्यु, भाऊबंदकी व कांचनगडची मोहना. शेवटचें काल्पनिक असलें तरी त्यावर इतिहासाचा मुखवटा चढविलेला आहे. सामाजिक असें एकच नाटक—आणि तें म्हणजे 'मानापमान.' खरें म्हणजे तें सामाजिकहि म्हणतां येणार नाहीं—'अद्भुतरम्य' या कोटींतच तें बसतें. समाजांतील एकादा ज्वलंत प्रश्न घेऊन त्याला नाटकांतून वाचा फोडण्याची प्रवृत्तीच खाडिलकरांची नव्हती. त्यांचा पिंड राजकीय, त्यांची वृत्ति स्वातंत्र्य-प्रेमाची व त्यांना आवड क्रांतिवादाची. सूर्यासारखें तेजस्वी सत्य, सर्वस्वासह केलेला उज्ज्वल त्याग, मृत्यूलाहि अजिंक्य अशी ध्येय-निष्ठा—इत्यादि उग्र व जाज्वल्य दैवतांचेच ते कठोर उपासक होते.

लोकप्रियतेची मीमांसा

खाडिलकरांचीं नाटकें लोकप्रिय होण्याचीं मुख्य कारणें म्हणजे कणखर कथानक, स्पष्ट स्वभाव-रेखा व उत्कट भावनांचा प्रखर संघर्ष. त्यांची भाषा-शैली कोठें कोठें रसापकर्षक असली—बोजड वाटली, तरी ती अभिनयाला अत्यंत अनुकूल असते. राजकारणाचा जो ध्वनि त्यांच्या नाटकांतून निघे, त्यामुळें तर लोकांचीं मनें त्याकडे अधिकच खेचलीं

जात. पारतंत्र्याचा जाच असह्य झाला तरी तो मनांतल्या मनांत गिळून रहावें आणि स्वातंत्र्याची लालसा अनावर झाली तरीहि ती हृदयांतल्या हृदयांत दाबून ठेवावी–असाच दडपशाहीचा तो कराल काल होता. तेव्हां त्या जाचाला व लालसेला नाट्याच्या आवरणाखालीं तरी वाचा फुटलेली ऐकली कीं श्रोत्यांचीं अंतःकरणें उचंबळून येत. "सहानुभूति-सहानुभूति, कसली रे मेल्या सहानुभूति?" हे 'कीचकवधां'तील सैरंध्रीचे तिटकाऱ्याचे उद्गार कानीं पडले कीं, श्रोतृवर्गाला आपल्या हृदयांतील कर्झनसाहेबांना द्यावयाच्या शिव्यांचाच प्रतिध्वनि उमटल्या-सारखें भासे व हलकें वाटे. अंगावर येणाऱ्या वाघाला किंवा सापाला मारावेसें वाटतें, पण मारण्याचें धैर्य नाहीं–अशा लोकांना दुसऱ्या कोणी त्या वाघा-सापाला ठेचलें कीं हर्षाच्या उकळ्या फुटून ते आनंदानें नाचूं लागतात, तसा कांहींसा आनंद श्रोतृजनांना लाभे. तो आतां इति-हासजमा झाला असला, तरी स्वातंत्र्याच्या मुक्त वातावरणांतहि रसिकांचीं हृदयें भुलवील व मस्तकें डोलवील अशीच भावनापूर्ण व रसमय नव–सृष्टि या 'विश्वामित्रा'नें निर्माण केलेली आहे.

काव्याची गंधर्व-नगरी

एकादें चालतेंबोलतें रम्य स्वप्नच आपल्यापुढें तरंगत आहे, असें रसिकांना वाटण्यासारखी जादू खाडिलकरांनीं रुक्मिणीच्या स्वगत भाषणांत ओतली आणि गंधर्वांनीं ती जादू आपल्या कलेनें अधिकच खुलविली.

राजवाड्याबाहेर पडलेली व गौळण होऊं पहाणारी रुक्मिणी म्हणते, 'येथें कसें मोकळें वाटतें; माझी मी स्वतंत्र आहेसें वाटतें! आणि गाई चरायची नदीकांठची ही जागा काय कमी सुंदर आहे? सायंकाळच्या कोवळ्या आरक्त सूर्यकिरणांनीं नटलेले हे तरुवर—कोणत्या नागरिक मनुष्याला असली शोभा पहावयास मिळेल? तांबूस सूर्यकरांनीं आच्छा-दिलेला हा नदीचा प्रवाह–उगीच नाहीं त्यांना यमुनातीर इतकें आवडलें तें! आणि गाईचीं हीं खिल्लारें! मदिरेप्रमाणें धनहि मादक आहे म्हणून म्हणतात; असें म्हणणारांनीं या गोधनाकडे पहावें. ह्यांचें दर्शन उन्मादाला

शमवितें, ह्यांचा सहवास भांडणतंटे मिटवितो. त्यांच्या सेवेला अमृत–प्राशनाचें बक्षीस मिळून–खरेंच गोकुळ दुसरें वैकुंठ समजलें पाहिजे !'

रुक्मिणी आपल्या प्रणय–स्वप्नांत रंगून म्हणते, "देवा, आपलें व माझें लग्न झाल्यावर पुनः गोकुळांत कांहीं काळ रहावयाचें गडे ! मी किनई, डोक्यावर घागर घेऊन यमुनेचें पाणी भरून आणीन; घागर मला जड वाटायची नाहीं; आपल्या पदचिन्हांनीं पुनीत झालेल्या यमुनेच्या नाजूक वाळूवर घटकान् घटका चालतांना श्रम कोणाला होणार ? पण–पण मी साफ सांगतें हं, खडा मारायचा झाला तर माझ्या हातावर नाहींतर घागरीवर मारायचा–तसेंहि नको–खड्यानें घागर फुटून मी ओलीचिंब झालेलें मला नाहीं आवडायचें–निदान मी रागावलें म्हणजे हंसत मजकडे नाहीं पहावयाचें–हें काय हो, डोक्यावरची घागर फोडून–मला ओलीचिंब करून–असें काय म्हणून हंसत पहावयाचें ?–मला आपलेकडे पहातच उभी रहावेसें वाटतें ! किती वेळ मी अशी ओलेत्यानं उभी राहूं ?–इतर गौळी–गवळणी येथें जमल्या म्हणजे कसें ?–ही रुक्मिणी गवळण झाली असली तरी मूळची राजकन्या आहे; मला नाहीं गडे इतकें निर्लज्ज होतां येत." साधे गद्य शब्द पण किती काव्यसंपन्न !

'विद्याहरण' नाटक तर काव्यरसानें ओतप्रोत भरलेलें आहे. कच व देवयानी यांचे संवाद प्रेमाच्या माधुरीनें गोडावलेले आहेत. बुद्धिमान् व तत्त्वनिष्ठ युवयुवतींचा मुग्ध-शुद्ध शृंगार त्यांच्या शब्दाशब्दांतून मधाप्रमाणें ठबकतो. कचदेव म्हणतो, "देवयानी, तूं माझ्या गाण्याची तारीफ करतेस खरी, पण तुझ्या कोकिल रवांत आपला सूर मिसळतांना मीं शरमलों पाहिजे, ही माझ्या गाण्याची किंमत आहे; तुझा नाजूक हात हातांत धरितांना, फुलांच्या कोमल पाकळ्या लोखंडी कांबीच्या दाबांत चुरडल्या जातील कीं काय, अशी धास्ती वाटून मी माझा हात मागें घेतों, ही माझ्या रूपाची स्थिती आहे."

उलट, प्रणयानें धुंद झालेली देवयानीहि कचदेवाला आपल्या कोमल भावना उकलून दाखविते. शकुंतलेला नटण्याची हौस मोठी, तरी

ती पानेंफुलें तोडीत नसे; तसेच देवयानीचेहि हे बोल आहेत:—"कचदेवा, माझ्या सुखासाठीं या मधुकरांना फुलांवरून कां बरें उठवितां? मधुकराच्या वियोगामुळें कोमेजून गेलेलीं हीं फुलें पाहिलीं कीं, माझ्या मनांत चर्र होतें! दुसऱ्याचा वियोग करणाराच्चे कपाळीं संयोग नसतो.—हे कायहो कचदेवा, मी सांगतें ना तुम्हांला, अशा रीतीनें मधुकरांच्या आनंदाचे आड येऊन तोडलेलें एकहि फूल मीं वेणींत घालायची नाहीं."

प्रसादाचा अभाव

खाडिलकरांच्या या गुण—विशेषामुळेंच कांहीं ठळक दोषहि त्यांच्या नाट्य-कृतींत आले आहेत. सूर्याचा प्रकाश स्वच्छ, पण चंद्राप्रमाणें शीतल कोठें आहे? खाडिलकरांच्या उग्र प्रकृतीला गुलगुलीत विनोद कोठला मानवावयाला? शृंगाररस इतका ते खुलवूं शकले हेंच विशेष. त्यामुळें 'केसरी' कार खाडिलकर व 'नाटककार' खाडिलकर एकच होते काय? असा वाद पुढें निघणें जसा शक्य आहे, तसाच गंभीर नाटकें रचणारे व संगीत शृंगारमय नाटकें फुलविणारे खाडिलकर दोन होते काय? असाहि प्रश्न उपस्थित होणें संभवनीय आहे. पदांना रागदारीच्या चालींच्या चौकटींत बसविण्याचें जसें एक बंधन, तसेंच त्या पदांच्या चौकटींत आपल्या मनांतील काव्य—कल्पना बसविणें हें दुसरें बंधन. केवळ 'कर दूर करा तुम्ही' असें पाटणकरी 'काव्य' त्यांना करावयाचें नव्हतें. 'नमवी पहा भूमि हा चालतांना' किंवा 'नभिं विहरत भास्कर तापत' अथवा 'श्री—नवोनव' अशा गीर्वाण कविवरांच्या—आणि आपल्या स्वतःच्याहि—रम्य कल्पना पदांच्या लहानशा नळींत ठाकूनठोकून बसवितांना खाडिलकरांना फार क्लेश होत-आणि त्यामुळें त्यांचीं पदें क्लिष्ट झालीं आहेत. त्यांतील 'प्रेमा', 'मजा' वगैरे शब्दांचे हालहि अनुकंपनीय आहेत. 'पक्की मालकीण,' 'प्रेमाचा तगादा,' 'माझ्या नवऱ्याकडे न्या' इत्यादि पुष्कळ शब्द रसाला बाधक व कानाला कटु असे आहेत हें खरें, पण त्याचें कारण 'पिटा' धिष्ठित प्रेक्षकांची नाडी खाडिलकरांनीं बरोबर ओळखली होती हेंच असावें.

प्रणयाचे मंत्र

सोप्या शब्दांनीं पात्रांची मनोवृत्ति प्रगट करणारीं कांहीं कांहीं पदें खाडिलकरांनीं सुंदर रचलीं आहेत. त्यांतील सुप्रसिद्ध पदें म्हणजे—" सुजन कसा ? मन चोरी ! अग हा—चोरी—यदुकुलनंदन ॥ सहज नेत्र भिडे; सहज मोह पडे; सहजींच करी मम हृदय हें वेडें; विलीन—लोचन—मार्ग शिरत घरीं; मन चोरी ॥ " असें एकएक पद बालगंधर्व अर्धाअर्धा तास घोळघोळून गात व त्यांतील महत्वाचा एकएक चरण पन्नासपन्नास वेळां निरनिराळ्या ढंगानें म्हणत, त्यामुळें तीं तीं पदें श्रोत्यांच्या अंतःकरणांत अत्तराप्रमाणें दीर्घकाळ दरवळत. प्रणयाचा उत्कर्ष साधणारीं पद्यें तर तरुणांना अमृताप्रमाणें मधुर वाटत. उदाहरणार्थ, "एकला नयनाला विषय तो झाला॥ सकलहि स्थानीं अवघा भरला, न बघत इतरां डोळा ॥ अवयव सगळे नयनीं जमले, यदुवर दिसतां मजला ॥ "

पुढील पद तर रसिकांच्या रसनेवर सदैव नाचत आलेलें आहे. " नरवर कृष्णासमान । घेतसे जन्मा भाग्य उदेलें, हें शिकवी सुकर्मा ॥ बहुत नृपति ते आले-गेले, परि मनाला । यदुवर झाला । मंत्र महान ॥ "

तसेंच 'मानापमानां'तील भामिनी धैर्यधराचें वर्णन पुढील लालित्यपूर्ण पदांत करते, " नयनें लाजवीत बहुमोल रत्ना ! जणुं धैर्यधर धरित धनदास धना ॥ नमवी पहा भूमि हा चालतांना । सुचवीत तिज तूंचि मजपुढें निर्धना ॥ "

धन-वेष टाकून गरिबींचें सोंग घेतलेली भामिनी छावणीच्या आसपास रात्रीं फिरत आहे, याचें धैर्यधराला नवल वाटलें. तेव्हां गरिबांना चोरांचें भय काय ? असें ती त्याला कल्पनारम्य शब्दांनीं विचारते. " भी अधना, न शिवे भीति मना । योग्या धना चौरचिंतना ॥ रवि-हिमकरहि भययुत ग्रहणीं, भय नच तें; दीपमना, समयीं त्या दीपमना ॥ " ग्रहणाचें भय चंद्र-सूर्यांना, दिव्याला नव्हे; तसें चोरीचें संकट श्रीमंतांना, गरिबांना नव्हे.

निरपेक्ष प्रेमाची महती भामिनीच्या मुखांतून खाडिलकर पुढील अलंकारपूर्ण पदांत सांगतात. जातां जातां सुख व प्रेम यांचे सिद्धांतहि

सूत्ररूपानें ते मांडतात, " खरा तो प्रेमा ना धरि लोभ मनीं ॥ ध्रु० ॥ नभिं जनहितरत भास्कर तापत, विकसत पहा नलिनी ॥ पीडित जन देखतां, स्वसुखा त्यागी दया । जनभयहरण हेंचि सुख सदया देवराया॥ दर्शन गुणवंतांचें नाचवी प्रेमलहरी । गुणरसपान हेंचि सुख, प्रेम तया नांव जनीं ॥ "

पद-लालित्याचा नमुना

शब्द-लालित्य किंवा वाक्य-सौष्ठव या बाह्य गुणांकडे खाडिलकर फारसे लक्ष देत नाहींत हें खरें, पण मधून-मधून त्यांच्या लेखणींतून समतोल व लयबद्ध, अर्थपूर्ण व आवेशपूर्ण अशीं वाक्यें बाहेर पडतात. ' द्रौपदी 'तील भीम म्हणतो, " ह्या भीमाचा पाय जेथें पडेल, तेथें दैवानेंहि हात जोडून उभें राहिलें पाहिजे; ह्या भीमाची गदा जेथें संचार करील, तेथें दैवानेंहि खेळत राहिलें पाहिजे; ह्या भीमाला पाहिल्यावर फाशांत लपून बसणाऱ्या दैवानें पोबाराच केला पाहिजे.— मी जिवंत फांसा आहें; मी जिवंत जुगार आहें; मी जिवंत दैव आहें." समतोल वाक्य-रचनेचा आणखी एक नमुना ' सवती-मत्सरां 'त आढळतो. रामाची थोरवी सांगतांना दशरथ म्हणतो, " अयोध्येंत असा प्राणी नाहीं ज्याचें मन रामानें दुखविलें आहे, अयोध्येंत असें दुःख नाहीं जें माझ्या रामानें हलकें केलेलें नाहीं, अयोध्येंत असें सुख नाहीं जें माझ्या रामामुळें प्रफुल्लित झालेलें नाहीं, अयोध्येंत असा पराक्रम नाहीं ज्याचें तेज माझ्या रामामुळें चोहोंकडे फाकलेलें नाहीं, अयोध्येंत असा मोक्ष नाहीं ज्यांत माझ्या रामाची मूर्ति प्रत्यक्ष नाहीं.— अशा माझ्या रामाला, कैकेयी, वनवासाला कां पाठवितेस ? "

तशीच कौसल्येचीहि भाषा. हृदयांत करुणरसाच्या ऊर्मि उचंबळत असतांना ती म्हणते, ' देव आणि धर्म–हा नारायण साक्षी आहे, पूजेअर्चेत मीं कांहीं कमी केलें असेल तर–हा अग्नि साक्षी आहे, मी होमांत कांहीं कमी केलें असेल तर–पुरोहित, हे ब्राह्मण साक्षी आहेत, माझ्या भक्तिभावांत कांहीं कमी असेल तर–मग मला असें फळ कां ?—देवाला दोष द्यावासें वाटतें–अग्नीला विचारावेंसें वाटतें, गुरु पुरोहितांना बोलावेंसें वाटतें–माझेंच नशीब

खोटें, उगीच दुसऱ्याला बोल लावून काय उपयोग?—लक्ष्मणा, राम वनवासाला खरेच जाणार काय?"

अभिनय-पोषक भाषाशैली

विश्वामित्राच्या आश्रमांतील ऋषिकुमारांना अप्सरांचें नृत्य पाहून काय वाटलें, हें खाडिलकरांनीं 'मेनका' नाटकांत पुढील सहज व परिमित शब्दांनीं दाखविलें आहे. अभिनयाला अनुकूल अशा भाषाशैलीचा हा खासा नमुना आहे.

"माझ्या दरडावण्यानें ह्यांना नीट चालतांहि येईनासें झालें? कशा लंगडत लंगडत—ह्यांचें वांकडें पाऊल—बायका हा प्राणी मूळचाच लंगडा आणि वांकडा असतो वाटतें.—कशा वेड्यावांकड्या लंगड्या आहेत."

नाटकाच्या कथानकांतील मध्यवर्ति कल्पना नटी-सूत्रधाराच्या संवादांतूनच सूचित करण्याचें कौशल्य खाडिलकरांचे ठायीं आहे. 'सावित्री' नाटकाच्या प्रारंभीं नटी पुढील प्रवेशाचें सूचन करते. तिचे शब्द किती सहज-किती तुटक—किती अभिनययोग्य आहेत पहा—

"आणि सोन्याच्या रथांत बसून नवरी मुलगी आली तर—म्हटलें सोन्याच्या रथांत—सोन्याच्या रथांत—बाबूला तिच्यापुढें पार्यी चालविणार—हो, पार्यीच चालविणार—असें काय पाहतां?—बाबूला पार्यीच चालविणार—अंगाखांद्यावर कांहीं नाहीं. भिकाऱ्यासारखा उघडाबोडका माझा मुलगा पार्यी चालणार—होय ना—सांगा, सोन्याच्या रथांत बसून—[पडद्यांत—"आली सोन्याच्या रथांत बसून—आज तीन दिवस झाले, रोज याच वेळीं नेमकी सोन्याच्या रथांत बसून ही कोण येत असते बरें?"] कोण आली सोन्याच्या रथांत बसून?"

नाट्यपूर्ण उद्गार

'विद्याहरणां' तील देवयानी कचदेवाला आपल्यावर रागवावयास सांगत आहे. त्यावेळची तिची भाषा कोणत्याहि नटाला स्फुरण चढविणारी आहे. देवयानी म्हणते, "ही असली रागीट मुद्रा पाहिली—चढूं देत, अशाच त्या भिंवया वर चढूं देत, त्यामुळें माझ्या धिटाईला भरती येते.

फिरवा, असेंच तोंड फिरवा, विनंति करण्याच्या धाडसाकडे माझें मन आपोआप फिरतें–टाका, असेच क्रोधाचे दीर्घ श्वास टाका."

कच–दहनानंतर देवयानी शुक्राचार्यांस विचारते, " असे कावरेबावरे कां ?–असे भयभीत का ? कचदेव जिवंत होणें अशक्य हेंच ना तुम्ही मला सांगणार ? नका; इतक्यांत ते शब्द उच्चारूं नका;—

शुक्राः–घात झाला ! बाळे, घात झाला ! संजीवनी–विद्येमुळें सर्व देवांना धुळीस मिळविणारा हा शुक्र स्वतः धुळीस मिळाला ! मी कवडी-मोल झालों; देवयानी, मी कवडीमोल झालों ! "

त्याहिपेक्षां अभिनयाला अत्यंत अनुकूल व रसाचा उत्कर्ष घडविणारी भाषा शुक्राचार्यांच्या तोंडीं खाडिलकरांनीं घातली आहे. दारूमुळें आपली संजीवनी विद्या कचाला मिळाली हें कळून वैतागानें तो गरजतो, " हंसा, सर्व विद्यांनो, या मद्यपी शुक्राला हंसा ! थुंका, सर्व तपस्व्यांनो, या मद्यपी शुक्राचे तोंडावर थुंका ! धिक्कारा, ब्रह्मयज्ञ करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनो, या मद्यपी शुक्राला धिक्कारा ! आणि अखिल दुनियेंत द्वाही फिरवा कीं, दारू-मुळें बुद्धिनाश होतो, दारूमुळें शत्रूला पोटांत शिरायला मिळतें, दारूमुळें शत्रूला हृदयांत दबा धरून बसायला मिळतें, आणि दारूमुळें सर्व विद्या शत्रूच्या ताब्यांत जाऊन शत्रूच्या ओंजळीनें पाणी पिण्याची पाळी येते ! कार्यकर्ते तपस्वी हो, या शुक्राच्या अधःपातांचें उदाहरण नेहमीं डोळ्यापुढें ठेवून, कोणत्याहि मोठ्या कार्याचा नेतेपणा किंवा कारभार व्यसनी पुरुषा-कडे ठेवूं नका. "

चुटचुटीत वाक्यें

खाडिलकरांचें शेवटचें नाटक म्हणजे ' त्रिदंडी संन्यास '. पूर्वी किर्लो-स्करांनीं व पुढें वरेरकरांनीं हाताळलेला सुभद्रा-हरणाचा पौराणिक विषय खाडिलकरांनीं या नाटकांत रंगविला आहे. पण भाषेच्या सोपेपणाशिवाय व धावतेपणाशिवाय यांत दुसरे गुण फारसे नाहींत. सुभद्रा प्रारंभीं धनुर्बाणधारी व पुढें दंड–कमंडलूधारी बनते, मौन व उपोषण करते, अशा गांधीवादाच्या छटा दाखविल्या आहेत, पण त्या स्पष्ट व सुरेख साधल्या

नाहींत–विकृत व हास्यास्पद छाया मात्र त्या भासतात. बलराम तर 'स्वयंवरां'तील रुक्मीपेक्षां सवाई दाखविला आहे—अद्वातद्वा बोलणारा व क्षणांत पालटणारा असा रंगविला आहे. किर्लोस्करांप्रमाणें खाडिलकरांनीं कृष्णाच्या कपट–नाटकाला किंवा सुभद्रेच्या प्रेम–भावनेला महत्त्व दिलेलें नाहीं. यामुळें रंगभूमीच्या पडत्या काळांतील हें नाटक पडलेंच. मात्र यांतील भाषा चुटचुटीत आहे. हें कृष्णाच्या पुढील चार वाक्यांवरूनहि कळून येतें. "तसें नव्हे दादा—ह्यांची ही शिष्यीण—मौननाथांचें अनुकरण करून मौनव्रत घेतलें–गुरूचीं प्रसादचिन्हे–हे दंडकमंडलु आहे,–उगीच रागावूं नका दादा—पोर आहे—खेळांतला हा संन्यास—हें धनुष्य—हे बाण—तशांतलेच हे दंड—कमंडलु!"

विनोदशून्यतेचा शाप

जसा पदांत प्रसाद, तसाच नाटकांत विनोद आणणें खाडिलकरांना मुळींच साधलें नाहीं. हास्यरसाचें व त्यांच्या प्रतिभेचें जणु खडाष्टकच होतें. त्यांनीं आपल्या नाटकांत हास्यकारक पात्रांच्या जोड्या घातल्या आहेत, पण त्या हास्यास्पदच ठरल्या आहेत. त्यांच्या संवादांत स्वाभाविकता नाहीं व त्यांच्या कृतींत विनोद नाहीं. 'स्वयंवरां'तील दिनेश्वर–चंद्रेश्वर कोणापुढें काय बोलतील याचा नेम नाहीं. तसेंच 'भाऊबंदकी'तील चमकशास्त्री व नमकशास्त्री. त्यांतच देशस्थ-कोंकणस्थांचा क्षुद्र वाद मिसळलेला. 'मेनकें'तील बालमूर्ति व वृद्धानंद हे हजारों वर्षांचे तपस्वी नसून तमाशांतील उल्लू सोंगाडे वाटतात. 'विद्याहरणां'तील शिष्यवर व फुकट्या हेहि तसेच. 'त्रिदंडी संन्यासां'तील भैरवनाथ व मेघनाद या शिष्यांची जोडीहि त्याच मालिकेंतील. 'द्रौपदीं'तील जुगाऱ्यांचा राजा अक्षपाल हा 'निर्लज्जपणाचा अर्क' आहे आणि तशाच त्याच्या दोन बायका. 'या दोन कोंबड्या मी झुंजवीत आहें, तूं तिसरी कोंबडी व्हावयास तयार आहेस काय?' असा आचरट प्रश्न अक्षपाल शकुनीसारख्या राजकारण–धुरंधराला करतो व तो 'होय' असें उत्तर देतो! तें उत्तर आपलें काम साधून घेण्यासाठीं शकुनीनें

दिलें असें मानलें, तरी त्या वेळच्या राजवाड्यांत किंवा राजदरबारांत आजच्या चावडीइतका किंवा फरासखान्याइतकाहि दरारा व शिस्त नव्हती असा अर्थ निघतो. आणि 'सावित्रीं'तील मंत्री महामती व त्याचा पुत्र बहुबुद्धि यांच्या संवादांतील विनोद काय सांगावा ? " सावित्री होईल खुळी, द्या बाबा टाळी " अशी सयमक, मूर्खपणाचीं वाक्यें तो बोलतो व खाडिलकरांची विनोदाची अब्रू धुळीस मिळवितो ! ती सावरण्यासाठींच कीं काय, 'मानापमान'मध्यें खाडिलकरांनीं 'विनोद' या नांवाचेंच एक पात्र घातलें आहे आणि त्याला आपली शेंडी धरून इकडून तिकडे धावावयास लावलें आहे ! लहान मुलें आपल्या वेड्यावाकड्या चित्राखालीं 'गाय,' 'घोडा,' असें लिहितात, तसाच हा बालिश प्रकार नव्हे काय ?

'भाऊबंदकीं'तील कारुण्य व क्रौर्य यांचे तीव्र आघात सोसण्याचें बळ श्रोत्यांना यावें, म्हणून विनोदाची फुंकर नाटककारानें थोडथोडी घातली आहे. लाळघोट्या नमकशास्त्रीची आळ्यता पहा, " मोठ्या कडाक्याचा वाद झाला. बाईसाहेब होत्या, श्रीमंत होते, रामशास्त्री होते, आणि मी होतोः—मोठा कडाक्याचा वाद झाला—त्रिभुवन हालून गेलें असेल त्या वादाचे वेळीं—त्या वेळीं मी साफ जोरानें कडाडून बोललों. "

'बायकांचें बंड' या नाटकांत अर्जुन प्रमिलेच्या स्त्री-राज्यांत शिरतो व स्त्री-पुरुष-प्रेमामुळें तें स्त्रीराज्य संपुष्टांत येतें असें दाखविलें आहे. त्यांत विनोदाला सहजच पुष्कळ वाव आहे. त्याचा मासला पुढील संवादांत दिसतो.

" वाग्मती—पोटांत एक आणि चेहऱ्यावर भलतेंच, अशी ही पुरुषांची मेली फसवी जात !

रुद्रमाया—पुरुष मेले सोंगाडे ! त्यांचा लहानपणीं चेहरा बायकांसारखा असतो, तरुणपणीं मेले तोंड काळें करतात, आणि वृद्धपणीं तरुणपणच्या काळ्या पापावर सफेता चढवितात ! एका आयुष्यांत चेहऱ्यांचे तीन रंग !

बुद्धिमती—बायकांचा चेहरा कसा लहानपणापासून मरेपर्यंत जशाचा तसा ! मिशी नाहीं, दाढी नाहीं, काळें नाहीं, पांढरें नाहीं, कांहीं नाहीं.

पुरुष पक्के सोंगाडे ! " अर्जुन सोंग घेऊन स्त्रियांच्या दरबारांत आलेला असल्यानें ' सोगाडे ' शब्द विशेषच हास्य निर्माण करणारा झाला आहे.

लक्ष्मीधराची विनोद-मूर्ति

' तुला विनोद साधणार नाहीं ' असा जणु शापच नाट्य-देवीनें खाडिलकरांना दिलेला दिसतो; मात्र त्याचा उश्शाप म्हणूनच कीं काय, " लक्ष्मीधरासारखें एकच एक पण एकमेव विनोदी पात्र तुझ्या हातून घडविलें जाईल " असाहि आशीर्वाद त्यांना नाट्य-देवतेनें दिलेला असतो. ' मृच्छकटिकां 'तील शकारापेक्षांहि ' मानापमानां 'तील लक्ष्मीधर उजवा आहे. त्याच्या शब्दाशब्दाला नाट्यगृहांत हशाचा स्फोट होतो. ' संशय-कल्लोळां'तील फाल्गुनरावाप्रमाणें त्याच्या स्वभावांत अस्वाभाविक असें कांहीं नाहीं. खानदानी श्रीमंतांचा किंवा माजी संस्थानिकांचा ऐदीपणा व भित्रेपणा यांचा मूर्तिमंत पुतळा म्हणजे लक्ष्मीधर !

लक्ष्मीधराचा दागिन्यांचा सोस, ऐदीपणांतून जन्मणारा त्याचा भित्रेपणा आणि वर पुनः आढ्यतेची भाषा-या सर्व गुणांचें प्रतिबिंब पुढील संवादांत पडलेलें दिसतें. सेनापति धैर्यधराशीं आपली तुलना तो विलासधरापाशीं करतो.

लक्ष्मी०—अगोदर माझ्या हातांतील आंगठ्यांवर दृष्टि फेंका, नंतर त्याचीं बोटें न्याहाळा; त्याचे बुचे कान लक्षांत घ्या आणि नंतर माझा भिकबाळीचा कान धरा मनांत; म्हणजे मग श्रीमंतांत आणि गरिबांत किती अंतर असतें हें तुम्हांला समजेल.

विलास०—पाहून घ्या; हातांत सलकडे, पोची, कांहीं आहे ?

चंपा०—इश्श ! खरेंच बोटांत एकदेखील अंगठी नाहीं ! कुत्रेदेखील ज्या हाडकाला चघळणार नाहीं असल्या हडकासारखीं बोटें रुक्ष दिसतात !

मालती०—इश्श ! खरेंच गळा मोकळा आहे. एखाद्या विधवेच्या गळ्यासारखा अपशकुनी दिसतो बाई !

आपल्यावरून जग ओळखून लक्ष्मीधर विलासधराला म्हणतो, " मी भामिनी झालों असतों तर बरें झालें असतें ! मजकडे पाहून तुम्हांला

नाहीं वाटत भामिनी व्हावेसें ? तुम्हांला नाहीं वाटत ? अहो, असला मजसारखा नटलेला नवरा मिळण्याची पर्वणी साधावी म्हणून, या जन्मीं नाहीं तर पुढल्या जन्मीं तरी बायकांच्या जन्माला घाल म्हणून सर्व पुरुष परमेश्वराची प्रार्थना करण्यास चुकणार नाहींत !"

लक्ष्मीधराचा सारा आधार, सारें बळ काय तें त्याच्या श्रीमंतींत. भामिनीला वश करण्यासाठीं शौर्य गाजविण्याऐवजीं भारीभारी दागिने तिला दाखवावेत एवढेंच त्याला कळतें. तो विलासधरला आपला मोहनीमंत्र सांगतो, "अहो, ही पेटी म्हणजे छोटी भामिनी समजा. मोठी भामिनी पाहिजे असेल तर ही छोटी भामिनी पुढें केली पाहिजे. मोठी आहे तेथें छोटी आहे, छोटी आहे तेथें मोठी आहे, असें हें त्रांगडं आहे."

लक्ष्मीधराचा आळस इतका पट्टीचा कीं, 'लोळणहि भूमिवरी मोक्ष वाटे मना' अशी त्याची स्थिति. तो परमेश्वराला विचारतो, "आमच्या अंगावरील मांस लोण्याच्या गोळ्याप्रमाणें मऊ आहे, हें ठीक आहे; पण हीं हाडें इतकीं कठीण कशाला ? कशीं आंतून टोंचताहेत ! देवा, आमचीं हाडें सोललेल्या केळ्यासारखीं केलीं असतींस तर चाललें नसतें कां ? आंतून हे हाडांचे भाले आणि वरून हे हिऱ्याचे खडे कसे माझ्या अंगांत खुपताहेत ! देवा, हिरे फुलासारखे कोमल कां नाहीं केलेस ? श्रीमंतांच्या अंगाला चिकटून राहणाऱ्या पातळ तेलाचें रूप, देवा, सोन्याला कां नाहीं दिलेस ? या जाजमाखालची कठीण जमीन चढावाच्या आंतूनहि माझ्या पायांत सलते आहे !"

श्रीमंतहि पराक्रम गाजवितात, पण तो केव्हां व किती, हें लक्ष्मीधराच्या तोंडून ऐका—"सूर्य अस्तास जाईपर्यंत त्यांना झोंप काढावी लागते. सूर्य अस्ताला जातो आहे, रात्र पडते आहे, याच्या दरम्यान, घडी अर्धीघुडी, पावघडी, लढाई करणें आम्हांसारख्या श्रीमंतांच्या प्रकृतीला मानवतें. हे श्रीमंतीचे शोक शत्रूकडील सर्व सरदारांना माहीत आहेत. छाप्याची कल्पना दारिद्र्यांनाच सुचायची." शिळोप्याच्या वेळीं घरबैठें, बोलकें राजकारण करणाऱ्या नेमस्तपक्षाला लोकप्रियता भाळणार नाहीं—

ती त्यागी व पराक्रमी राष्ट्रीय पक्षालाच माळ घालील, असें खाडिलकरांना येथें सूचित करावयाचें असावें.

लक्ष्मीधरासारख्या ऐदी श्रीमंतांचें जन्म–कार्य पुढील शब्दांनीं सांगितलें आहे. " ठिकठिकाणीं पांगलेली संपत्ति एके जागीं गोळा करून पराक्रमी पुरुषाकडे ती वाहून नेण्याकरितां परमेश्वरानें उत्पन्न केलेलीं गोजिरवाणी गाढवें म्हणजे असले लक्ष्मीपुत्र होत. "

शाश्वत आदर्श

चालू राजकारण हें नदींतील पायाखालील वाळूप्रमाणें सतत घसरणारें असलें, तरी त्यांतील तत्त्वें चिरस्थायी असतात. अशा त्रिकालाबाधित स्वभावांचे शाश्वत टिकणारे थोर आदर्श खाडिलकरांनीं आपल्या नाटकामध्यें रंगविले आहेत. एकाद्या उद्यानांत मांडलेले कला–सुंदर व भव्य-प्रचंड असे अनेकानेक पुतळे आपण पहात आहों, असाच भास प्रेक्षकांना खाडिलकरांचीं नाटकें पाहतांना होतो. भास कवीनें आपल्या ' प्रतिमा ' नाटकांत रामाला पूर्वजांचे पुतळे दाखविले आहेत व त्याच्या अंतःकरणांत हर्षशोकादि भावना उठविल्या आहेत; त्याप्रमाणेंच ' कवि कृष्णानें ' आपल्या नाट्य–सृष्टींत उदात्त गुणांचे उच्च आदर्श मराठी प्रेक्षकजनांपुढें ठेवून त्यांच्या हृदयांत प्रेम, श्रद्धा, सेवा, सत्यनिष्ठा, तपस्या इत्यादि गुणांची भक्ति पेरली आहे. ही त्यांची कामगिरी मराठींत तरी अतुल्य आहे.

'सत्त्वपरीक्षे'तील हरिश्चंद्राला कोण विसरेल? 'दिलें हें पोट फेकून' म्हणणारा त्याचा पुत्र रोहिदास कोणाच्या स्मरणांतून जाईल ? ' सवतीमत्सरां 'तील सत्यप्रतिज्ञ रामचंद्र प्रेक्षकाच्या काळजावर कायमचाच कोरला जातो. ' उपभोगाची वेळ येतां स्वार्थत्यागी राहिला ' या गद्यमय पद्यांत वर्णिलेली ' द्रौपदी 'तील श्रीकृष्णाची त्यागी मूर्ति कोणाच्या मनांतून हलेल ? व्रतपालनार्थ स्वसुखाचा होम करणारा ' विद्याहरणां'तील कच कोणाच्या स्मृतींतून गळेल ? आणि तो रामशास्त्री, तो प्रतापराव, तो धैर्यधर, या साऱ्या व्यक्ति–रेखा आपापल्या ठसठशीत गुणांनीं महाराष्ट्राच्या मनोमंदिरांत कायमचें घर करून राहिल्या आहेत.

अशा आदर्श पुरुषापेक्षांहि खाडिलकरांच्या नायिका अधिक जिवंत व उदात्त आहेत. त्या नृपकन्या असोत, सुख-विलासी असोत, शृंगार-राजाला करभार देत असोत, तरीहि पण त्या 'विनयहीन' नाहींत, तर द्रव्यापेक्षां गुणांना भाळणाऱ्या, रूपापेक्षां पराक्रमाला पूजणाऱ्या आणि स्वजनासाठीं सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या तेजस्वी, बुद्धिमान्, करारी व 'स्व-कुल-तारक' अशाच आहेत. सावित्री आपला निर्धार अशा तीव्र शब्दांनीं सांगते कीं, "हें प्रेम, आई, मृत्यूमुळें असें असें बिलकुल वळायचें नाहीं. माझें प्रेम, मुनिवर, मृत्युसकट तिकडच्या चरणांचा स्वीकार करीत आहें." असाच अभेद्य निश्चय देवयानीचा, रुक्मिणीचा, द्रौपदीचा, मेनकेचा आणि मोहनेचा-व भामिनीचाहि. खाडिलकरांच्या नायिका म्हणजे त्यागपूर्ण, निश्चयी व उदार अशा घवघवीत प्रेमाच्या ठसठशीत मूर्तिच ! त्या सरस्वतीदेवीपेक्षां कालिदेवीच अधिक भासतात. कमलांतून निर्माण झालेल्या महालक्ष्मीपेक्षां महिषासुर-मर्दिनीचेंच तेज त्यांच्या अंगावर खेळत आहे.

रुक्मिणीचें स्वभाव-चित्र

कथेच्या ओघांत, संवादाच्या प्रवाहांत, मोठमोठीं तत्त्वें सहज गुंफून देण्याची कला खाडिलकरांइतकी दुसऱ्या कोणासच साधलेली नाहीं. रुक्मिणी म्हणते, "त्यांना जर समजलें मी बाबांचें मन दुखविलें, त्यांना जर समजलें, मी आईच्या डोळ्यांतून अश्रुधारा काढल्या, त्यांना जर समजलें कुंडिनपुरच्या वंशच्छेदास मी कारणीभूत झालें,-माझा स्वीकार ते कसा करतील ? सुकन्याच गृहिणीपदाला चढत असतात."

रुक्मिणी ही एक बुद्धिमान्, प्रेमळ व त्यागी अशी नायिका खाडिलकरांनीं दाखविली आहे. आपल्या घराण्याला रक्तपाताचा कलंक लागूं नये म्हणून ती आपला स्वयंवराचाहि हक्क सोडून देते. तेव्हां तिचा पिता तिची स्तुति करतो, "मुली, तूं असें बोलूं लागलीस म्हणजे हृदय भडभडून येतें !—'तुम्ही जसें सांगाल तसें ऐकेन.'—मुली, माझे सर्व अधिकार तुला प्राप्त झाले आहेत; तुझ्या शहाणपणानें ते सर्व अधिकार

तूं मिळविले आहेस. मीं सांगायचेऐवजीं तूं जसें सांगशील तसें मी ऐकेन. सांग, शिशुपालाशीं तुला लग्न करायचें आहे काय ?"

रुक्मिणीच्या दैवी गुणांचें वर्णन भीष्मकानें केल्यामुळें तिचा विनय व रुक्मीचा उद्दामपणा या दोन्ही वृत्ति कशा उचंबळून आल्या पहा—

भीष्मक—मला वाटतें, श्रीकृष्ण विष्णूचा अवतार असून महालक्ष्मीच माझी मुलगी आहे.

रुक्मिणी—बाबा, ही काय भलतीच स्तुति !—ते अवतार आहेत, हें खरें पण मी—मी त्यांच्या परसांतली पत्रीहि होण्यास योग्य नाहीं.

भीष्मक—नाहीं, मुली, तसें नाहीं; तूं महालक्ष्मीचाच अवतार असली पाहिजेस—

रुक्मिणी—नका बाबा, असें बोलूं नका !—दादानें हें जर ऐकलें तर तो रागानें लाल होईल.

भीष्मक—होईना लाल ! तुम्ही दोघेहि अवतार असून तुमचा छळ करणारे जरासंध, शिशुपाल, रुक्मि हे दैत्य— [रुक्मि येतो.

रुक्मि—आम्ही दैत्य ! तो गवळी देव आणि ही चुरूचुरू बोलणारी जीभ देवी !

मनःस्थितीचें शब्द-चित्र

श्रीकृष्णाच्या दर्शनानें रुक्मिणीची मनःस्थिति किती बावरली-गांगरली यांचें शब्दचित्र खाडिलकरांनीं 'स्वयंवरांत' बारकाईनें कसें काढलें आहे, पहा—

कृष्ण—रुक्मी, शिशुपाल, जा तुम्हांला सोडून दिलें आहे. ह्या शुभांगीच्या प्रथम दर्शनाचे महोत्सवाचे वेळीं तुम्हांला बंधमुक्त केलें आहे.

रुक्मिणी—(स्वगत) मी अशी गोंधळून कशी गेलें आहे !—बाबा येथें नाहींत—मी बोलूं तरी कशी यांच्याशीं ?

कृष्ण—जा, तुम्हांला बंधमुक्त केलें आहे—असे उभे कां ? असे भांबावल्यासारखे कां ? असे वेड्यासारखे—

रुक्मिणी—आपलें दर्शन कोणाला वेड लावणार नाहीं ?

कृष्ण—हें दर्शन सर्वांना वेड लावील.—जा, रुक्मी, तुझ्या बहिणीनें तुला बंधमुक्त केलें आहे. जा शिशुपाला, ह्या त्रैलोक्य-सुंदरीच्या कोमल अंतःकरणानें तुझ्यावर दया केली आहे. नाजुक अबलांनीं लावलेलें वेड कठोर वृत्तींना मर्यादित करीत असतें.

आपल्यालां श्रेष्ठ, पूज्य वाटणाऱ्या थोर माणसाची गांठ पडली, म्हणजे आपलें चित्त कसें गलबलून जातें व आपण काय बोललों हेंहि कसें पुढें आठवत नाहीं, या अनुभवाचें मानसशास्त्रीय दर्शन खाडिलकरांनीं पुढील उद्गारांनीं घडविलें आहे—

रुक्मिणी—ते काय बोललें तें मला आठवतें; पण मी काय बोललें, हें मला आठवतच नाहीं—त्यांचें पाहणें, त्यांचें वागणें, त्यांचें बोलणें सर्व सर्व आठवतें–आतां मी त्यांना पाहत आहेसें वाटतें, आतां ते माझ्याकडे येताहेतसें वाटतें, पण बाई, माझें मला कांहीं आठवतच नाहीं!—माझी स्वतःबद्दलची शुद्धच तेव्हांपासून नाहींशी झालेली दिसते; नाहींतर मी इतकी निर्लज्जपणानें वागले असतें कां?

आनंदानें बेभान झालेली रुक्मिणी आपल्या दासीला आपलें अंतःकरणच जणुं उघडून दाखवीत आहे. हा भावनेचा उकाला, हा रसाचा विस्तार त्या त्या प्रसंगाला किती उठाव देतो! रुक्मिणी दासीला सांगते, "अग, ते आल्याची बातमी सर्वांच्या अगोदर मला समजली; अग, हें बघ कीं नाहीं, सर्वांच्या अगोदर मीच त्यांना पाहिलें. आणि मी अगोदर ओळखलें तेच ते म्हणून. अगोदर ओळखलें; सर्वांच्या अगोदर मीं ओळखलें; दादाच्या अगोदर मी त्यांना पाहिलें; आईच्या अगोदर मीं त्यांना पाहिलें; बाबांच्या अगोदर मी पाहिलें; सर्वांच्या आधीं मीं पाहिलें. दुसरें कोणी नाहीं प्रथम पाहिलें; प्रथम मीं पाहिलें."

रुक्मिणीच्या प्रणयी मनांतील आंदोलनें खाडिलकरांनीं अत्यंत कौशल्यानें रेखाटलीं आहेत. 'कृष्ण जळाला!' अशी कुवार्ता कानीं येतांच तिच्या हृदयांत कल्पनेचे कोणते तरंग उठले हें तिच्या पुढील काव्यमय शब्दांनीं ध्यानीं येते. "त्यांचें दहन झाल्यावर ह्या लतांना नवीन पालवी कां फुटावी? ह्या नव्या कळ्या फुलझाडावर कशा दिसाव्या? आम्रमंजरीचें

सुगंधी द्रव्य वाहणारा वायु दिमाखानें कां फिरूं लागावा ? ती मदनमूर्ति जळून खाक झाल्यावर हा वसंतकाळ कसा जिवंत राहिला ?—काय म्हणतां, मी त्यांच्या प्रेमाशीं बेइमानी करून शिशुपालाच्या गळ्यांत माळ घालीन म्हणून मजवर सूड उगविण्याकरितां तुम्ही पृथ्वीवर रेंगाळत आहां ?—"

त्याच प्रेममय तन्मयतेंत रुक्मिणी निसर्गाला उद्देशून म्हणते, " फुलांनो, तुम्ही खुशाल फुला; श्रीकृष्णाच्या यशाच्या फैलावाशिवाय तुम्ही दुसरें-तिसरें कोणतें कार्य फुलून करणार ? वायो, खुशाल वाहा; श्रीकृष्णाच्या गुणाशिवाय दुसरें द्रव्य तुझ्यापाशीं कोणतें असणार ?—कोकिले, खुशाल गा; श्रीकृष्णाच्या लीलाच तूं गाणार ना ? ये वसंता, खुशाल ये; सर्व सृष्टि कृष्णमय झाली आहे, तेव्हां तूंहि कृष्णमयच असला पाहिजेस, आणि श्रीकृष्णाची आनंदाची बातमी तूं सांगणार असला पाहिजेस."

आपला प्रियकर खुशाल आहे हें कळतांच रुक्मिणीला जो हर्ष झाला, त्याचें चित्रण खाडिलकरांनीं पुढील संवादानें केलें आहे.

रुक्मिणी—चंद्रेश्वरा, तुम्ही आनंदाची बातमी सांगितली म्हणून तुम्हांला मी द्वारकेस तेथें सुवर्णाचें घर बक्षीस देईन.

स्नेहलता—आणि मला ग रुक्मिणी ?

रुक्मिणी—तुला हिऱ्यामोत्यांचें घर बक्षिस देईन; झालें ?

स्नेहलता—ह्यांना सोन्याचें, मला हिऱ्यामोत्यांचें, आणि तूं ग कोठें रहाणार ?

रुक्मिणी—द्वारकेस प्रेमाचे घरांत, श्रीकृष्णाचे प्रेममंदिरांत.

करिन यदुमनीं सदना, रुचिर सदन पति-मन सतींना ॥
अशुभ मणिमय भुवन अबलांना, जरी नाथ रमेना ॥

आपल्या बुद्धि-चातुर्यानें रुक्मिणी आपल्या भावाला वादांत कशी निरुत्तर करते, हें पुढील चार ओळीवरूनहि कळून येते, " दादा, तूं मनांत आणलेंस तर स्वयंवराच्या मंडपाचा विध्वंस होऊं देणार नाहींस. विदर्भ देशाचे शौर्य इतकें जाज्वल्य आहे कीं, माझ्या स्वयंवराचा मंडप जाळण्यापोळण्याच्या शिशुपालाच्या वल्गना माझा दादा क्षणांत फोल

करून सोडील. मंडपाचा विध्वंस होण्यानें आमच्या घराण्याची होणारी बेअब्रू वांचविण्याचें सामर्थ्य, दादा, तुझ्या मनगटांत असतांना, मंडपाचें संरक्षण कसें करावें, हें मला कां विचारतोस ? ”

प्रेम व वैराग्य यांची मूर्ति

‘स्वयंवरां’तील रुक्मिणीप्रमाणेंच आपल्या प्रेम-साफल्याच्या स्वप्नांत दंग झालेली सावित्री म्हणते, “ मला आमंत्रण — घरच्या घरीं कोण कोणाला आमंत्रण देणार ? जेथली मी मालकीण — मनानें झालेंच आहें, जनाच्या दृष्टीनें व्हावयाची आहे—जेथली मी मालकीण व्हावें म्हणून रोज जगदंबेची प्रार्थना करितें, तेथलें आमंत्रण मला कशाला ? मला कोणी बोलाविलें नाहीं म्हणून मीं म्हटलें, बरें झालें—बोलावलें नाहीं, जरूरी आहेंसें वाटतें ?—नाहीं हो नाहीं—रात्रंदिवस आपल्या पायाची सेवा करणें हाच जिला मोक्ष वाटतो तिला कशाला पाहिजे आमंत्रण ?—आमंत्रणाची जरूरी नाहीं असें आपण म्हटलेंत, पदरीं घेऊन मला पवित्र केलेत, महापूजेच्या मालकीचा हक्क सासूबाईंच्याइतकाच माझ्याहि पदरांत टाकलात आणि दुसऱ्यांना आमंत्रण देणारी आपल्या घरची मी मालकीण झालें—आपण परत आलां म्हणजे मीच पाहिजे तर आपणालाहि आजच्या महापूजेचें आमंत्रण देतें.” प्रेमी हृदयाचें हें ठळक छायाचित्रच नव्हे काय ?

सावित्री व सत्यवान यांचा एक प्रेम-संवाद नमुनेदार आहे. त्यांत दोघांच्याहि मनाची उतावीळ स्पष्ट झाली आहे. तो संवाद असा—

सावित्री—असली सून पाहिजे, असे उद्‌गार ज्यावेळीं ऋषिपत्नीच्या तोंडून निघाले त्यावेळीं त्या काय म्हणाल्या—आठवत नाहीं काय ?

सत्य० —मी त्यावेळीं गुरुजींशीं बोलत होतों. आई काय म्हणाली मला ऐकूं आलें नाहीं—सांग आई काय म्हणाली तें. सांगना आई काय म्हणाली—

सावि०—सांगूं ?—सांगूं ?—सासूबाई—म्हणाल्या—सासूबाई—

सत्य०—सासूबाई नको म्हणूं—माझी आई काय म्हणाली ?

सावि०—आपल्या मातुःश्री—माझ्या सासूबाई म्हणाल्या—होय, सासूबाई म्हणाल्या—ऐकायचे नाहीं वाटतें मी काय बोलतें तें—म्हणाल्या—सासूबाई म्हणाल्या—नाहीं ऐकावयाचें तर मी तरी कशाला सांगूं ?

सत्य०—सांग ना आई काय म्हणाली तें—सांग ना—

सावि०—सासूबाई म्हणाल्या—सासूबाई काय म्हणाल्या तें ऐकायचें असलें तर सांगतें, नाहीं तर माहीं—सांगूं सासूबाई काय म्हणाल्या तें ?

सत्य०—सांग ना—सांग—बरें सांग, सासूबाई म्हणाल्या—

सावि०—सासूबाई म्हणाल्या, अशी सून मिळायचें भाग्य कोठें आहे आमचें ? होय ना, असेंच म्हणाल्या ना ?—होय—त्यावेळीं ऐकणें झालें होतें—माझ्या तोंडून वदवायचें होतें म्हणून आठवण नाहींशी झाली होती होय ना ? असेंच ना ? ”

सावित्रीचा निर्धार म्हणजे वज्रलेप ! सत्यवानाच्या मृत्यूचे भयानेंहि तो भंगत नाहीं. ती आपल्या आईबापाशीं किती बुद्धि-चातुर्यानें युक्तिवाद करते पहा,

“ मृत्यूला न भिणें, हाच तर मृत्यू तरून जाण्याचा उपाय आहे—मृत्यु नाहीं कोणाला ? आम्हां सर्वांना मरण आहे; आमचा मरणाचा दिवस समजला नाहीं, तिकडचा समजला, एवढाच फरक ना ? त्या एवढ्या फरकासाठीं मी मृत्यूपुढें हार कां खाऊं ? ”

पुनः दुसरा कोटिक्रम—

“ त्यांना सोडून दुसऱ्या कोणालाहि मीं वरिलें तरी माझें सर्व आयुष्य दुःखांतच जाणार; मग सुखाचें एक वर्ष तरी मीं हातचें कां दवडूं ? ”

शेवटीं सावित्री असा सूक्ष्म प्रश्न टाकते,

“ एक वर्षानंतर मृत्यूनें त्यांना गांठल्यावर मीहि मृत्यूला माझे प्राण अर्पण करीन, ह्यांत आई, बाबा, जराहि संदेह मानूं नका.—एक वर्षानें मी मरावें का आजच मरून जावें ? बाबा, आपल्या मनांत येईल तें खरें ”

साबरमतीच्या तुरुंगांत शिक्षा भोगीत असतांना १९२९ सालीं खाडिलकरांनीं निर्माण केलेल्या सावित्रींचें तोंडून ‘ गोड सत्याचे धडे ’ ऐकूं यावे यांत नवल काय ? चातुर्य, निर्धार, श्रद्धा, भक्ति आणि त्याबरोबरच

प्रणय, वात्सल्य, इत्यादि गुणांची मूर्ति अशा नायिका निर्माण करण्यांत खाडिलकर यशस्वी झाले आहेत.

द्रौपदीचा तेजस्वीपणा

'द्रौपदी' हें नाटक १९२० सालीं खाडिलकरांनीं लिहिलें. नाना रसांचे कल्लोळ उठविणारा द्रौपदी-वस्त्र-हरणाचा प्रसंग ! त्यावर गोविंदराव टेंबे यांनीं 'पट-वर्धन' व बामणगांवकर यांनीं 'आत्म-तेज' हीं नाटकें लिहिलेलीं आहेत. पण त्यांच्यापेक्षां खाडिलकरांचें 'द्रौपदी' नाटक अधिक रसपूर्ण, तत्त्वनिष्ठ व परिणामकारक झालें आहे. द्रौपदीचा आत्म-विश्वास किती आहे, पहा. "बायकांना जसें कुंकूं, तसें पुरुषांना स्वातंत्र्य आहे. स्वतंत्र आणि सशस्त्र झालेले पांडव पुनः पराक्रम गाजवून नवें वैभव संपादन करतील." तशीच तिची कृष्ण-भक्तिहि. ती म्हणते, "श्रीकृष्णाच्या पूजेंतल्या फुलांच्या प्रत्येक पाकळीगणिक जीव खर्चावा लागला, तरी ही द्रौपदी जीव खर्ची घालील." कोणत्याहि स्त्रीची अब्रू ही सारखीच पवित्र, सारखीच महत्त्वाची, सारखीच रक्षणीय हें पुत्रप्रेमानें अंध झालेल्या धृतराष्ट्राच्या चित्तावर ठसवितांना खाडिलकरांची द्रौपदी चैतन्यपूर्ण उद्गार काढते. ती म्हणते; "मातेचा स्त्रीपणा–बहिणीचा स्त्रीपणा–कन्येचा स्त्रीपणा–सर्व स्त्रीपणा सारखाच;–त्या स्त्रीपणाच्या लाजेची मर्यादा ह्या राजसभेनें मानायची नाहीं तर कोणी मानायची ? आई, बहीण, मुलगी, धर्मपत्नी ह्यांच्या स्त्रीपणाची ओळखच नाहीं, आणि बाजार-बसवीच्या स्त्रीपणाची तेवढी माहिती आहे, इतकें नादान, भीष्मांनीं वाढविलेलें हें कुरूचें कूळ कधीं झालें ? धृतराष्ट्रमहाराज, आपल्या मातोश्रीचा आणि आपल्या आजीचा–सत्यवतीचा–जो स्त्रीपणा, तोच ह्या द्रौपदीचा स्त्रीपणा; सुयोधनमहाराज, गांधारी सासूबाईचा जो स्त्रीपणा तोच ह्या द्रौपदीचा स्त्रीपणा; ह्या राजसभेंतील सर्व पुरुषांनो, तुम्हां सर्वांच्या मातांचा जो स्त्रीपणा तोच माझा स्त्रीपणा; त्या स्त्रीपणाला ह्या लाजिरवाण्या स्थितींतून सुटून जाण्याची परवानगी द्या."

हें झालें सर्वसामान्य स्त्रीत्वाचें स्वरूप; पण स्वतःविषयीं बोलतांना तर

ही पिंजऱ्यांत कोंडलेली सिंहीण गर्जते, " मी दासी नाहीं, स्वतंत्र आहें.— मी जर दास्य कबूल केलें तर माझी पुण्याई,, हंबरडा फोडून आईला बोलावल्याप्रमाणें विश्वांतल्या पुण्याईला माझ्या मदतीला कशी आणील ? सर्व अणुरेणूंत भरलेल्या विश्वाच्या स्वतंत्र पुण्याईला दासांकडे पाहून पान्हा फुटत नाहीं; स्वतःचें तान्हुलें हें नव्हें, असें त्या विराटस्वरूपी स्वतंत्र शक्तीला वाटतें !—मातेला पान्हा न फुटेल असलें तान्हुलें ह्यां नव्या कृष्णजन्माचे वेळीं ह्या सभेच्या दृष्टीला कसें पडेल ? " भावना व तत्त्व-विवेचन यांचा किती सुंदर मेळ !

भामिनीची स्वभाव-रेखा

रुक्मिणी, द्रौपदी, तारामती या तर पुराणांतच तेजस्वी स्त्रिया म्हणून रंगविलेल्या आहेत. तेव्हां त्यांचीं छायाचित्रें आपल्या नाटकांत चमकदार रंगानें रंगविणें खाडिलकरांना सोपें होतें. पण कल्पित कथानकांतील ' धनी मी ' म्हणणारी ' मानापमानां 'तील श्रीमंत कन्या भामिनी हिचाहि स्वभाव त्यांनीं बाणेदार व उदार असाच रेखाटला आहे. ती स्वतःविषयीं म्हणते, " ही भामिनी दुसऱ्याचें उदाहरण पाहून वागणारी नाहीं. माझ्या वर्तनाचा कित्ता इतरांना घालून देण्याकरतां मी जन्मास आलें आहे. " भामिनीचा हा जसा स्वाभिमान, तसाच दुसऱ्याचाहि स्वाभिमान जपण्याइतका तिचा स्वभाव दिलदार आहे. दरोडेखोरांच्या वेषांत येऊन आपल्यावर हल्ला करूं पाहणाऱ्या लक्ष्मीधर-विलासधरांना ती सांगते,— " तुमच्या या अशा धमकावणीला मी भीक घालणार नाहीं; पण तुमचीच काय, कोणाचीच बेअब्रू चारचौघांत व्हावी अशी माझी इच्छा नाहीं. " भामिनीच्या पराक्रमामुळें खूष झालेला धैर्यधर तिला लक्ष्मीधराचे सारे दागिने बक्षीस देऊ करतो, तेव्हांहि तिचें औदार्य असेंच प्रगट झालें आहे. ती धैर्यधरास म्हणते, " सांप्रतच्या युद्धांत आपल्या घरचे कर्ते पुरुष पडल्यामुळें जीं कुटुंबें अनाथ झालीं असतील त्यांना मदत करण्याकडे हे दागिने विकून येईल ती रक्कम खर्च करण्याची मला परवानगी असावी."

खाडिलकरांची लेखणी संगीतांत कितीहि रंगली, शृंगारांत कितीहि

गुंगली, तरी ती धैर्य–औदार्य–सत्यादि गुणांचा गौरव करण्याचें आपलें कुलव्रत कधींच सोडीत नाहीं. भामिनीचा रंगभूमीवरील प्रथम प्रवेशच ऐटीचा व बाणेदारपणाचा आहे! 'मी साफ येणार नाहीं' अशी कुरेंबाज भाषा बोलतच ती पडद्याबाहेर येते. हेच शब्द आधीं नटीच्या तोंडीं खाडिलकरांनीं घातले आहेत. नाटकांतील मध्यवर्ती कल्पना नटीनें बोलावयाची व तोच धागा घेऊन नायिकेनें प्रवेश करावयाचा, अशी सांधे–जोड करण्यांत खाडिलकरांचा हातखंडा आहे. 'ही मी आलें जळायला' अशी निश्चयी वाणी उच्चारीत मेनकाहि येते. 'नेमली अबला–काया। पतित उद्धराया।' अशी स्त्रीत्वाची महति खाडिलकर सर्वत्र गातात.

वीर--रमणीचें चित्रण

'कांचनगडच्या मोहनें' तील प्रतापरावाची स्वातंत्र्य-निष्ठा जित्तकी अढळ, तितकीच त्याची पत्नी मोहनेची पति-निष्ठा अभंग. तिच्या असहाय स्थितींत तिच्या अब्रूवर उठलेल्या फितुरांना ती म्हणते, "कसायांनो, चांडाळांनो, हरामखोरांनो, दगा करून आमचा सर्वांचा केसानें गळा कापलात कां? चांडाळा, पाप्या, पतिव्रतेचा तूं छळ मांडिला आहेस. कांचनगडच्या पूर्वेच्या त्या बुरुजाप्रमाणें तुझ्या शरिराचे कळपे कळपे तुटून पडून मेल्या तुझा नाश होईल. दारूच्या कोठारांत सांपडून, जळून होरपळून, तुला मृत्यु येईल! जगदंबे, कांचनगडाबरोबरच्च तिकडचे सर्व बेत कोसळून गेले ना? आणि हें सर्व माझ्या पायीं!"

हा सर्वनाश आपल्यामुळें ओढवला हें जाणून मोहना शोक करते, "शत्रूला जिंकून तुम्ही गडावर परत आलां म्हणजे रत्नखचित निरांजनांची आरती हातांत घेऊन तुमच्या यशाचें शुभ्र तेज तुमच्यापुढें ही दुर्दैवी मोहना आतां आणीत नाहीं, तर मोहनेच्या पायीं तुमच्या गडाचे तुकडे तुकडे होऊन, त्यांतून निघणारा हा काळाकुट्ट धूर, ह्या भयंकर ज्वाळा आरतीचे ऐवजीं तुम्हांला पहाव्या लागणार! देवा, मला जन्माला घालून, माझ्यामुळें, माझ्यापायीं, त्यांच्यासारख्या नरवीरांच्या

हालअपेष्टेस प्रारंभ केलांस, त्यापेक्षां मला जन्मालाच घातली नसतीस तर फार बरें झालें असतें ! "

सेवेचा ध्येयवाद

क्रोधाचे आहारीं गेलेल्या विश्वामित्राला आपल्या भक्तीच्या व सेवेच्या बळावर जिंकूं पहाणारी ' मेनका 'हि उदात्त स्वभावाची दाखविली आहे. ती म्हणते, " नवी सृष्टि उत्पन्न करण्याच्या पायरीला ज्यांची तपश्चर्या चढली आहे, त्यांचें मन प्रसन्न करून घ्यायला सेवेशिवाय दुसरा मार्ग कोणता आहे ? " या सेवेचा, तिच्यांतील श्रमाचा आनंद स्वर्ग-सुखापेक्षांहि श्रेष्ठ कां आहे, याची मीमांसाहि मेनकेच्या तोंडीं खाडिलकरांनीं घातली आहे. ती अशी, " येथें शरीर राबविणें हेंच सुखाचें साधन मुख्य अहे. येथें मृत्युलोकीं क्षणाक्षणाला शरीर मरत असतें, आणि प्रत्येक क्षणाला मनुष्य स्वतःचे श्रमानें तें ताजेतवानें करतो; म्हणून स्वतःच्या पराक्रमाचें सुख मनुष्याला मिळतें.-स्वर्गीत पराक्रमाचें सुख नाहीं.····· सेवेकरितां राबवायला लागल्याबरोबर ह्या मानवी देहाच्या अणुरेणूंतहि स्वर्गसुख सांठलें आहेसें मला वाटतें. मनोभावें राबणें म्हणजेच पृथ्वीवरचा स्वर्ग. क्षीरसागरांतल्या सुखाला दूर सारून परमेश्वरहि मृत्यु लोकाच्या ह्याच राबण्याच्या सुखासाठीं अवतार घेत असतो. "

राजकीय रूपक

अशा तात्त्विक व शाश्वत विचारांची बैठक ' मेनके 'ला खाडिलकरांनीं जशी दिली आहे, तसेंच तात्कालिक राजकारणाचें रूपकहि त्यांत गोंवलें आहे. त्या वेळचीं पोकळ कौन्सिलें म्हणजे मायावी इंद्रसभा, त्यांत अप्सरांच्या नादीं लागलेले संधिसाधु पुढारी यांना वृद्धानंद. बालमूर्ति वगैरे शिष्यांच्या रूपानें खाडिलकरांनीं लुगडीं धुणारे, पाणी वाहणारे, बैल-रेडे-कुत्रीं इत्यादि स्वरूपें देऊन झणझणीत टीका केली. काँग्रेसनें बहिष्कार घातला हें विश्वामित्र अंतर्धान पावतो या घटनेवरून सूचित केलें. इंद्रासनावर बसण्याची शिष्यांची घाई म्हणजे मंत्रिपदें बळकावण्याची हावरी उतावीळ. पांढऱ्या दाढीचा त्यांनीं केलेला त्याग म्हणजे

संधिसाधूंनीं पांढरी गांधी-टोपी टाकणें. अशा सद्यःस्थितीच्या चौकटींत शाश्वततेचें तत्त्वज्ञान मांडणें आणि तरीहि कलापूर्ण कृति निर्माण करणें हें तिहेरी कौशल्य एकट्या खाडिलकरांचेंच !

सत्यनिष्ठेचीं दैवतें

सत्याचा महिमा खाडिलकरांनीं आपल्या नाटकांतून वारंवार गाइलेला आहे—गांधीजींचें शिष्यत्व स्वीकारण्यापूर्वीहि. त्यांतहि 'सत्त्वपरीक्षा' व 'सवती-मत्सर' हीं त्यांचीं दोन नाटकें म्हणजे तर सत्य-नारायणाचीं स्तुतिस्तोत्रेंच होत. सत्य-प्रतिज्ञ हरिश्चंद्राचें करुण चरित्र 'सत्त्व-परीक्षे'-मध्यें प्रेक्षकांच्या डोळ्यांतून पाणी काढतें, पण त्यांच्या कानामनांत 'प्रतिज्ञेसाठीं ! प्रतिज्ञेसाठीं ! प्रतिज्ञेसाठीं !' हा मंत्रघोष घुमवितें. तसाच 'सवती-मत्सरां'तील रामचंद्र. तो तर, स्वतांच्या नव्हे पण, पित्याच्या प्रतिज्ञा-पालनार्थ राज्यत्याग करतो. या अलौकिक प्रसंगावर किर्लोस्करांनीं 'राम-राज्य-वियोग' हें नाटक लिहिलें, पण तें अपुरेंच राहिलें. खाडिलकरांनीं तें कार्य पूर्णतेस नेलें—आणि अत्यंत प्रभावी रीतीनें. राम व लक्ष्मण या दोघांचींहि स्वभाव-चित्रें त्यांनीं इतकीं सुरेख रेखाटलीं आहेत कीं, किर्लोस्करांनींहि कौतुकानें मान डोलवावी. आपली अभंग सत्य—निष्ठा किती नम्र भाषेनें राम व्यक्त करतो आहे—"आई, ज्या सत्याच्या तपश्चर्येवर विश्वाची जोपासना अवलंबून आहे, तें सत्य इतकें सोपें आहे कीं, सत्याच्या पालनाकरितां दशरथमहाराजांसारख्या नामांकित वीरांनींच कंबरा कसल्या पाहिजेत, असें मुळींच नाहीं.—बाबांच्या तेजापुढें राम म्हणजे एक काजवा आहे—पण सत्याचें पालन काजवाहि सहज करूं शकतो !"

सामर्थ्यापेक्षांहि सत्याला राम अधिक किंमत देणारा आहे. तो म्हणतो, "लक्ष्मणा, माझ्या बाहूंतील शक्ति म्हणजे सत्याची शोभा होय.—मनुष्य मेल्यावर त्याच्या शरिरावरचे वस्त्रालंकार जसे टाकाऊ ठरतात; त्याप्रमाणेंच सत्य सोडल्यावर शक्ति टाकाऊ ठरते. सत्य सोडून शक्तीचा नाद धरणें म्हणजे प्रेतावरील कपड्याकरितां टपून बसणें होय. प्रसंग आला तर अलंकार काढून ठेवावेत, पण प्राण देऊन आत्महत्या करूं नये."

तसेंच राम दशरथाला आपल्या जीवनाचें तत्त्वज्ञान सांगतो, " बाबा, ह्या वनवासी झालेल्या रामाबद्दल दुःख करूं नका–जन्मापासून तुमचा राम तपस्वी आहे. अयोध्येचें सिंहासन आणि दंडकारण्यांतील वनवासाचें दर्भासन दोन्ही आपल्या रामाला सारखींच सुखाचीं आहेत. "

बंधुप्रेमाच्या छटा

भरताचें गुण-ग्रहण किती उदार भावनेनें राम करतो, " रामाच्या पराक्रमांतील दोष भरताच्या यज्ञानें पवित्र व सुशोभित होणारे आहेत. ब्रह्मादिकांनीं कष्टतर तपश्चर्येनें सिद्ध केलेलीं सर्व शस्त्रास्त्रें इक्ष्वाकु–कुलाची कीर्ति पराक्रमांत वाढावी म्हणून विश्वामित्र ऋषींनीं मला व लक्ष्मणाला दिल्यानंतर पुनः बजावून सांगितलें. राक्षसांचा संहार करतांना तुम्हां दोघांचें जर कोठें चुकलें तर ते न्यून भरून काढून तुमचा पराक्रम पवित्र करण्याचें सामर्थ्य पृथ्वीतलावर आज एकट्या भरतांत आहे. म्हणून म्हणतो आई, हा मुकुट भरताच्या मस्तकावर ठेवल्याशिवाय रामाला हा मुकुट पवित्र करील किंवा कसें हें समजणार नाहीं. "

जरूर तर, भरताशींहि वैर करून, रामाचा वनवास चुकविण्यासाठीं लक्ष्मणानें कंबर कसली आहे. त्यावेळीं रामाचा निर्धार चार वाक्यांतच पण वज्रप्रमाणें कसा असतो हें खाडिलकरच दाखवूं शकतात. राम-लक्ष्मणांचा संवाद असा—

लक्ष्मण–आई, आशीर्वाद देऊं नकोस–लक्ष्मणाचे बाण दादांना वनवासाला जाऊं देणार नाहींत–दादा, तुमच्या बाहूंतल्या पराक्रमापुढें ह्या लक्ष्मणाची शक्ति कांहीं नाहीं हें मला माहीत आहे; पण तुम्हांला अडथळा करतांना तुमच्यार्शी लढणाऱ्या ह्या लक्ष्मणाचें शिर एकबाणी रामानें धडापासून वेगळें करून, आपल्या ह्या सौमित्राचें मस्तक पायाखालीं ठेंचाळून, दंडकारण्याचा मार्ग आपणाला आक्रमावा लागेल—

राम०–तसें नाहीं व्हावयाचें–युद्ध करूनच मला अडथळा करावयाचा असेल–तुझ्या हट्टाला मी कोण आळा घालणार?–सौमित्रा, तुझ्या बाणांनीं विव्हळ झालेला राम वनाकडे तोंड करून जमिनीवर मरून पडलेला दृष्टीस

पडेल. रामाचा बाण, लक्ष्मणा, तुझ्यासाठीं लढण्याकरितां भात्यांतून बाहेर पडणार नाहीं, पण वनाकडे वळलेलें रामाचें पाऊल एक रेसहि मागें येणार नाहीं." लक्ष्मणावरील अपार प्रेम आणि त्याहून अधिक असें आपल्या प्रतिज्ञेवरील प्रेम रामानें किती योग्य शब्दानीं मूर्तिमंत उभें केलें आहे! अशी उग्र तत्त्वनिष्ठा केवळ खाडिलकरांचीच लेखणी रंगवूं शकते. त्यांनी रंगविलेला लक्ष्मण हा उत्तम पुरुष आहे, पण राम हा पुरुषोत्तमच आहे.

प्रतिज्ञा-पालनाचा आदर्श

हरिश्चंद्राचें चारित्र्य तर कोणाचेहि डोळे दिपविण्याजोगेंच आहे. सत्यनिष्ठेचा, प्रतिज्ञापालनाचा त्यानें अगदीं अतिरेक केला आणि त्यापायीं आपले हालहाल करून घेतले. ही सारी चिरपरिचित कथा खाडिलकरांनीं 'सत्व-परीक्षा' या नाटकांत अत्यंत परिणामकारक रीतीनें रंगविली आहे. वीर, करुण व उदात्त या रसांच्या अखंड धाराच जणुं या नाटकांतून वहात आहेत. 'प्रतिज्ञा पाळण्याकरितां!' हे शब्द घुमविणारा जणु हा गोलघुमटच आहे. द्रौपदीनें मयसभेंत दुर्योधनाला हिणविलें, म्हणून तिला पुढें वस्त्र-हरणाचा अपमान सोसावा लागला; त्याप्रमाणें वशिष्ठ-शिष्य हरिश्चंद्र काशीच्या विश्वामित्राची तपश्चर्या चंचल म्हणतो व 'जो कोणी स्वतःचे शब्दास जागणार नाहीं त्याला राज्यांतून हाकलून देण्यांत येईल' अशी आपली 'सत्याचरणाची द्वाही' पिटतो. त्यामुळें विश्वामित्र हरिश्चंद्राच्या राशीस लागला, असा कार्यकारणभाव नाटककारानें जोडला आहे.

"वज्र लवेल पण हरिश्चंद्राचें मन खंबीर राहील; हरिश्चंद्र एकच वाचा बोलेल व हरिश्चंद्राचे पाय एकच वाट चालतील" अशा अचल तत्वनिष्ठेचा पुतळा म्हणजे हरिश्चंद्र! त्याला दया नको, दान नको, भीक नको. 'स्वकष्टांची भाकरी' मिळविण्यासाठीं तो 'लाकडे फोडून हाडाचीं काडें करतो' दीनपणा, लाचारी, वचनभंग यांचा मार्ग तो प्राणांतीहि स्वीकारीत नाहीं. अशा खडकासारख्या कठीण हृदयांतून प्रेमाचे व वात्सल्याचे झरे कसे वहातात हें दाखविण्यांत खाडिलकरांची

सारी प्रतिभा पणास लागली आहे. बाल रोहिदासाचे एक एक उद्गार कानांवर पडले कीं श्रोत्यांच्या डोळ्यांतून टिपें गळतात ! करुणरसाची कमाल खाडिलकरांनीं या नाटकांत केली आहे–आणि तें कारुण्यहि उगाच केकाटणारें, छाती पिटणारें नाहीं; तर अत्यंत संयमी, त्यागपूर्ण व कलात्मक असें आहे.

कारुण्याची धार

"आई, आई, माणसें विकावयाचीं म्हणजे काय ग ?" हे रोहिदासानें तारामतीला पुनः पुनः केलेले सवाल म्हणजे त्यावेळीं तरुण भारतीयांच्या अंतःकरणांत गुलामगिरीची जी चीड पेटली होती, तिच्याच ज्वाला होत. काबाडकष्ट करून व स्वतः उपाशी राहून हरिश्चंद्रानें, आपण गुलामगिरींत शिरण्यापूर्वी, जी करपलेली भाकरी रोहिदास–तारामतीसाठीं आणलेली असते, ती कारुण्याची गंगोत्रीच वाटते. 'मातेच्या स्तनपानाहूनहि ' तिच्यांतून अधिक अमृत स्रवते. 'करपलेल्या भाकरीचे कोळसे मिष्टान्नाप्रमाणें मिटक्या मारीत ' तीन दिवसांचा भुकेला रोहिदास खातो व " माझी जीभ तर अमृताच्या झऱ्याला बिलगली आहे ! " असा आनंद दाखवितो, तें पाहून कोणाच्या हृदयाला पाझर फुटणार नाहीं ? त्याहून हृदय पिळून काढणारा त्या चिमुरड्याचा सवाल म्हणजे "आई, आज मी म्हटलें का ग तुला, मला भूक लागली आहे म्हणून ! मग तूं कां रडतीस ?" शेवटीं ' भूक ! भूक ! ' ' अन्न ! अन्न ! ' करीत रोहिदास मरतो. परतंत्र हिंदुस्थानांतील अन्नान्न करणाऱ्या बालकांचें हें चित्र त्यावेळीं कोणाचें हृदय भेदून जात नसेल ?

मरणाचें तत्त्वज्ञान

आपल्या मरणाचें दुःख आपल्या आईला वाटूं नये, म्हणून रोहिदास तारामतीला म्हणतो, " मातीनें पान व्हावें, पानानें फूल व्हावें, फुलानें फळ व्हावें, फळांतून पाखरूं निघावें, पांखरानें काजवा व्हावें, लहान काजव्यानें चांदणी व्हायचें, चांदणीनें चंद्र व्हावयाचें, चंद्रानें सूर्य व्हावयाचें, ह्यालाच मरण म्हणतात.—आई, मी मरत नाहीं, तर चिमुकला

रोहिदास थोरला हरिश्चंद्र चतुर्दिशीं होत आहे." आणि रोहिदासानें प्राण सोडल्यानंतर त्याचें कारण कोतवाल तारामतीला विचारतात. तेव्हां 'बाळ कसा मेला?' असा पुनः पुनः हंबरडा फोडून तारामती जो विलाप करते, तो दगडालाहि पाझर फोडण्यासारखा आहे. तसाच स्मशानांत तारामतीच्या तोंडून रोहिदासाच्या मृत्यूची वार्ता कळतांच हरिश्चंद्रानें केलेला शोकहि हृदयाचें पाणी पाणी करणारा आहे. "माझ्या बाबा रोहिदासा, गुरो रोहिदासा, देवा रोहिदासा!" असें म्हणून हरिश्चंद्रानें जो टाहो फोडला, तो कोणाचेंहि काळीज करपविणाराच आहे. तारामतीच्या लिलावाचे वेळींहि "माझ्या दुसऱ्या प्राणा, माझ्या दुसऱ्या मना, माझ्या दुसऱ्या शरीरा" अशा हरिश्चंद्रानें मारलेल्या हाका हृदय हलवून सोडतात. एकाहून एक मोठमोठ्या व उंच उंच अशा शोक-सागराच्या लाटा नाटकांत एकसारख्या उठत असतात. पार्श्वभूमि म्हणून काशींतील पंड्यांच्या लीला, गोसावी, भिक्षुक व गंपूशेठ यांचा खादाडपणा आणि चित्रगुप्ताचा कारकुनी कावा यांचा विनोद मांडलेला आहे. 'राजसंन्यासां'तील जिवाजीच्या कलमेश्वराच्या मानानें 'कारकुनी दौतीचा महिमा' सुमारच वाटतो. 'दुबळें शरीर, भित्रें मन आणि कुचकी बुद्धि' ही कारकुनी वृत्ति चांगली रंगविली आहे. पण मुख्य ठसा उमटतो हरिश्चंद्रादींच्या त्यागमूलक तत्त्वनिष्ठेचा. 'गुलामगिरी म्हणजे अब्रूला येणारा मृत्युच' हें आपलें राजकीय तत्त्वज्ञान खाडिलकरांनीं या नाटकांत गोवलें आहे आणि 'सत्यमय पृथ्वीची स्थापना' करण्याचें दिव्य स्वप्न रंगविलेलें आहे.

सेवा व प्रेम यांचें द्वंद्व

सत्यवानाचें स्वभाव-चित्र सुस्पष्ट आहे. पितृभक्त, सेवापरायण व पराक्रमी असा हा वनवासी तरुण सावित्रीच्या प्रेमपाशांत सांपडूं लागला, तेव्हां तो मनांत म्हणतो, "प्रदक्षणा वटवृक्षाला, पण दृष्टि एकसारखी माझ्याकडे! पण मी काय म्हणून येथें उभा रहावें? माझे पाय आश्रमाकडे वळलेले पण माझे डोळे वटवृक्षाकडे! उशीर कां झाला म्हणून बाबांनीं

मला विचारलें, तर मी काय सांगूं ?—आईच्या सेवेंत अंतर पडलें, तर हा नवा संसार मला कसा तारील ?—पण ही कां प्रत्येक वळणाचे वेळेला मजकडे पाहून माझे प्राण माझ्या डोळ्यांतून बाहेर ओढून नेत आहे ?—नको, नको, सावित्री, संकटांत दिवस काढीत असलेल्या माझ्या वृद्ध आईबापांवर दया कर आणि प्रेमपाशांत मला बांधून त्यांच्यापासून मला दूर दूर नेऊं नकोस.—अजून संपल्या नाहींत. हिच्या प्रदक्षणा—प्रत्येक प्रदक्षणेला माझ्याभोंवतीं एक एक बंधनाचा वळसा पडत आहे व माझ्या शीलाचा कोंडमारा होत आहे, असें मला वाटतें."

सत्यवानाचे गुण सावित्रीच्या नजरेस पडले आणि म्हणून ती त्याचें वर्णन करते, " मातापितरांच्या सेवेला वाहून घेतल्यामुळें परपीडेच्या पापाचें भय ह्यांना पावलोंपावलीं वाटतें ! पृथ्वी पादाक्रांत करण्याची मनगटांत धमक, परोपकाराची स्वयंभू हौस, आणि परपीडेचें पातक लागूं नये म्हणून अहिंसेचें स्वीकारलेलें व्रत—असल्या गुणांचा समुच्चय म्हणजे पृथ्वीवरील स्वर्गच होय."

श्रीकृष्णाचें स्वभाव-चित्र

श्रीकृष्णाचें शौर्य व औदार्य हे दोन्ही गुण प्रगट करणारें त्याचें पुढील भाषण रसपूर्ण आहे. तो रुक्मिणीला म्हणतो, "राजकन्येची इच्छा असेल, तर शिशुपाल, जरासंध, किंवा रुक्मी, ह्या तिघांपैकीं, पाहिजे त्याच्याशीं, किंवा एकदम तिघांशीं मिळून ह्या मंडपांत द्वंद्वयुद्ध करण्यास मी तयार आहे. इतकेंच नव्हे तर ह्या तिघांपैकीं पाहिजे त्याच्या—किंवा तिघांच्याहि—रक्ताचा सडा ह्या मंडपांत घालून, किंवा तिघांच्याहि शरिरांतील एक बिंदुहि जमिनीवर न सांडतां, तिघांनाहि हतवीर्य करून, जमिनीवर पाडून, तिघांच्याहि डोळ्यांना स्वयंवराची माळ ह्या छातीवर लोळलेली पहावयास लावण्याचें मला सामर्थ्य आहे. पण रुक्मिणी, तुला जर हा शिशुपाल पसंत असला, तर खुशाल त्याच्या गळ्यांत माळ घाल; तुझा संसार दुःखाचा करावा म्हणून मी कोणाशींहि युद्ध करणार नाहीं, असें तुला आश्वासन देतो. "

श्रीकृष्णाचा सत्यप्रिय स्वभाव पुढील मोकळ्या शब्दांनीं व्यक्त झालेला

आहे. " महाराज, मी गवळ्यांत लहानाचा मोठा झालों, मी गवळ्यांत नाचलों बागडलों, मी गवळ्यांत पैलवानी करून धष्टपुष्ट झालों; तेव्हां मला गवळी म्हटल्यानें जितका आनंद होतो, तितका आनंद सम्राट किंवा देवेंद्र म्हटल्यानेंहि होणार नाहीं. "

तो अभिमानानें सांगतो, " माझा धंदा राजांचा आहे. उत्तम गवळी ज्याप्रमाणें गाईना सहज वळवितो, त्यांना बांधतो, त्यांचें दूध काढतो, त्याप्रमाणें मी राजांना सन्मार्गावर आणतों, नीतिबंधांनीं राजांना बांधून ठेवतों, आणि सौख्यशांतीच्या दुधाचे रतीब सर्वांच्या घरीं मी घालतों. मी गवळी म्हणून स्वयंवराला आलों नसून, माझा धंदा राजांचा ह्या नात्यानें रुक्मिणीच्या स्वयंवराला आलों आहें. "

नायक व नायिका हे कोणताहि नाटककार थोर गुणांचेच दाखवितो, पण खाडिलकरांनीं ' द्रौपदी 'तील विपक्षाचा कर्ण, हादेखील किती उदात्त दाखविला आहे, पहा. मत्स्यवेधाचें चित्र पाहतांना तो दुर्योधनास सांगतो, " चित्रांतल्याहि बायकांवर हा कर्ण शरसंधान करीत नसतो. "

तसेंच, कौरवांचा कैवारी असूनहि तो म्हणतो, " मी कृष्णाची निंदा आजपर्यंत कधींच केली नाहीं, आणि करण्याचेंहि प्रयोजन मला नाहीं. कंस, जरासंध आणि शिशुपाल ह्यांना साहसानें मारणाऱ्याची किंमत ओळखण्याइतकी वीरवृत्ति ह्या कर्णाच्या अंगांत खात्रीनें आहे. "

ओजोगुणाचा पुतळा

' कांचनगडची मोहना ' हें नाटक गद्य असूनहि काव्यपूर्ण आहे. सोळावे शतकाचे अखेरीस प्रतापराव आपला किल्ला स्वतंत्र ठेवण्याचा प्राणपणानें प्रयत्न कसा करतो, पण तो घरभेद्याच्या फितुरीमुळें तो धुळीस कसा मिळतो याची ही वीर–करुण–मिश्रित कहाणी आहे. १८९८ सालीं स्वातंत्र्याचें वारें पर्यायानें पसरून देण्यास प्रतापरावाचीं एकाहून एक आवेशपूर्ण व कल्पनापूर्ण भाषणें उपयोगीं पडलीं. त्यांतील शब्दन्‌शब्द ओजोगुणानें कसा रसरसलेला आहे–निखारेच आहेत ते जणु ! प्रतापराव छातीठोक मार्गानें जाणारा तेजस्वी तरुण. तो उसळून म्हणतो,

" मानगुटीवर बसून शत्रूचें नरडें दातांनीं कडाकड फोडण्याची जी वेळ, त्यावेळीं कसला गनिमी कावा ? खानाच्या छावणींत एकटा सांपडलों असतों, तरीदेखील आमचें रक्तशोषण करून फुगलेल्या ह्या विजापूरच्या दुष्मनापुढें माझें डोकें केसभरहि लवलें नसतें. गनिमी कावा लढवून ह्या चोरांना पंचवीसतीस वर्षें विजयनगरचे उरावर थयाथया नाचूं दिलेंत— बस्स झाली इतकी गुलामगिरी ! "

त्याच्या वाणींतून अग्निकण कसे निघतात, पहा—

" माने, कोण कोणाला भाकरी चारतो ? विजापुरास ठेचून खेचलेली संपत्ति ह्या चोरांच्या बापजाद्यांनीं आपल्याबरोबर आणिली होती वाटतें ! अहो, ही आमचीच संपत्ति ! तो सोनेरी महाल, तें हिरेजडित सिंहासन— सर्व—सर्व—आमचें, आमच्या आजांपणजांनीं कित्येक वर्षे श्रम करून संपादन केलेलें ! तो गोलघुमट बांधतांना किती हिंदु गुलामांना त्या चोरांच्या चाबकांचा मार दररोज खावा लागे, हें तुम्हांस माहीत आहे काय ? त्या भव्य मशिदीच्या छतावर सोन्याचा मुलामा चढवितांना, तुमच्या आमच्या आयाबहिणींना भ्रष्ट करून त्यांचे किती दागदागिने ह्या चोरांनीं हिसकावून घेतले ह्याची तुम्हांला कल्पना तरी करितां येते काय ? माने, तुम्ही स्वतःचेच नोकर आहां ! विजयनगरच्या तक्काचे तुकडे तुकडे जरी झाले, तरी अद्याप त्याच तक्ताची तुम्ही भाकरी खात आहां हें विसरूं नका. "

भाषेचा कडवेपणा

आपला पोलादी निर्धार निश्चयी शब्दांनीं व्यक्त करतांना प्रतापराव गरजतो, " संताजीराव, आमची मान तुटेल, आमचीं हाडें चिंबून चिंबून जाऊन त्यांचा चुराडा होईल, पण संकटांना केंसभरहि आम्ही हार जाणार नाहीं, हें शत्रूला आज पक्कें समजूं द्या. म्हणजे आम्ही जिवंत राहून जें कार्य आमच्या हातून पार पडणें अशक्य आहे, तें काम आमच्या मरणानें आपोआप होईल. आमचा काटकपणा, आमचें शौर्य, शरिरांत जिवाची धुगधुगी असेंतों आमची लढण्याची हौस, हीं विजापुरच्या पादशहाला

कळूं द्या. लाखो फौजेनें विजापुरास गराडा दिला असतां पादशहास जी भीति वाटेल त्याहून अधिक भीतीनें आमचें नांव निघण्याबरोबर पादशहा कापूं लागेल !"

तोच वज्रकठोर निर्धार प्रतापराव पुनः जाहीर करतो ! " माझा हाच निश्चय, हीच प्रतिज्ञा, कीं तलवारीच्या तीक्ष्ण धारांनीं माझ्या शरिराचे तुकडे तुकडे होवोत, भाल्यांच्या माऱ्यामुळें माझ्या शरिरांतून रक्ताचे हजारों प्रवाह वाहोत, बंदुकीच्या गोळ्यांच्या तडाक्यानें माझ्या मस्तकाचे कळपे कळपे तुटून पडोत; ही माझी भयंकर तलवार वज्राप्रमाणें शत्रुसैन्यावर पडेल, आणि ह्या चोरांची रांखरांगोळी झालेली ह्या डोळ्यांनीं पाहिल्याशिवाय किंवा कानांनीं ऐकल्याशिवाय प्रतापरावांचीं हाडें कांचन-गडच्या मैदानावर कधींच पडावयाचीं नाहींत. " मराठी भाषेंतून वीररस वाहविण्याची शिकस्त खाडिलकरांनीं केलेली आहे.

अपयश आ वासून पुढें आलें, तरी राष्ट्रस्वातंत्र्यावर प्रतापरावाची भक्ति इतकी अलोट कीं, तो प्रार्थना करतो, " परमेश्वरा, आज आमची सर्वांची कत्तल झाल्यावर माझ्या या शूर, प्रामाणिक, पुण्यवान् सेनेला ज्या ठिकाणीं जन्मास घालशील, त्याच ठिकाणीं ह्या अभागी, दुर्दैवी प्राण्यालाहि पुनः जन्माला घाल, अशी माझी मरणापूर्वीची तुला प्रार्थना आहे. माझ्या पदरीं जर कांहीं पुण्य असेल तर त्याबद्दल मला स्वर्गसुख नको, नंदनवनांतील सुखोपभोग मला नकोत; पादशहाचे जाचांतून विजया-नगरास मुक्त करण्याचे कामीं माझें सर्व पुण्य खर्च होऊं दे. पुढील जन्मीं पुढारी–सरदार होण्याइतकें जर माझें पुण्य नसेल, तर मराठ्यांचें जें सैन्य विजापूरची राखरांगोळी करील, त्या सैन्यांतल्या अतिशय क्षुल्लक दर्जाच्या नोकराचे जन्माला, मला देवा घाल. परमेश्वरा, मनुष्यकोटींत पुनः जन्मास घालण्याची जर माझी योग्यता नसेल, तर ज्या घोड्यावर स्वार होऊन मराठे विजापूरचा दरवाजा फोडतील, त्या घोड्याच्या तरी जन्माला मला जाऊं दे. हा मानहि पुढील जन्मीं जर मला मिळावयाचा नसेल तर विजापुरावरील मराठ्यांच्या स्वारीची सामग्री वाहून नेणारा बैल तरी निदान मला कर." शिवरामपंत परांजपे यांच्या विचारांचेंच हें जुळें भावंड !

भाऊबंदकीतील रूपक

'भाऊबंदकी'चा पहिला अंक तर नमुनेदारच आहे. तो स्वयंपूर्णहि आहे. नारायणरावाचा खून हा कथानकाचा उत्कर्ष–बिंदु पहिल्या अंकांतच खाडिलकरांनीं गांठला आहे. त्यापुढें प्रेक्षकांच्या जिज्ञासेची तार खेचून धरणें हें कलेचें केवढें कसब ! पण त्या खुनापेक्षांहि उत्कंठापूर्ण समर-प्रसंग खाडिलकरांनीं निर्मिले आहेत. रामशास्त्री राघोबाला देहांत प्रायश्चित्त सांगतो व नाना बारकाईचा कारभार सुरू करतो हे दोन प्रसंग अधिकाधिकच रंगत जातात. शृंगार, वीर, करुण, हास्य व उदात्त या पांची रसांच्या लाटा या नाटकांत एकसारख्या आदळत-गर्जत असतात.

हें नाटक विलक्षण परिणाम घडविणारें आहे. तें पाहिल्यावर–वा वाचल्यावर–त्याची छाप दीर्घकाळ मनावर राहते. १९०९ सालच्या भीषण कालांत हें नाटक रंगभूमीवर आलें. लो. टिळकांची रवानगी सरकारानें मंडालेच्या तुरुंगांत केलेली होती. निःस्पृह व स्पष्टवक्ते रामशास्त्री प्रभुणे रंगभूमीवर आले कीं, प्रेक्षकांना लोकमान्यांचेंच दर्शन झाल्यासारखें वाटे आणि त्यांचे सत्याचे व निर्भयतेचे एकएक भीमशब्द ऐकले, म्हणजे प्रेक्षकांचे हात सहजस्फूर्तीनें टाळ्यांचा कडकडाट करीत. ज्यावेळीं सखाराम बापू–"खून, अन्याय, व पाप यांच्या पायावर उभारलेल्या सत्तेचा वरून परमेश्वर व खालून लोक धिक्कार करीत असतात." असा सिद्धांत बोलतात, तेव्हांहि श्रोत्यांना 'केसरी'च्या गर्जनेचाच हा पडसाद आहे असें वाटे. आणि जेव्हां राघोबा, "राज्यसत्तेला निर्माल्यवत् करण्याची शक्ति एखाद्या बुद्धिवान तपस्व्याच्या अंगीं असावी, अं !" असें आश्चर्य व्यक्त करतो, तेव्हां तें दडपशाही करणाऱ्या ब्रिटिश सरकाराच्या मनःस्थितीचेंच चित्र आहे असें श्रोतृवृंदाला वाटत असे.

रामशास्त्र्याच्या न्यायनिष्ठुरतेनें आनंदीबाईचें महत्त्वाकांक्षी मन चडफडून जातें. तेव्हां ती शास्त्रीबुवांना टाकून बोलते, "स्वतःच्या मोठेपणाच्या फाजील गर्वानें, तुमची बुद्धि कुजली आहे. मुख्य न्यायाधीशाची जागा मिळाल्यामुळें तुमचें मन नासलें आहे.....तपश्चर्या आतां अंधारकोठींत !" हे कुत्सित शब्द ऐकतांना महाराष्ट्रीय श्रोत्यांना न्या. दावरच

लो. टिळकांना उद्देशून अकारण उद्दाम उद्गार काढीत आहे असा भास झाल्यास नवल काय ? आणि दावरांची सारी तुच्छता गिळून टाकणारी जी नृसिंह-वाणी लोकमान्यांनीं न्यायमंदिरांत काढली, तिची स्मृति होण्यासारखी भाषा रामशास्त्री काढतात. " बाईसाहेब, ह्या जिभेनें ह्यावेळीं सत्य भाषण केलें आहे; पुढें कदाचित् खोटें बोलण्याचा मोह तिला उत्पन्न होईल; तेव्हां ह्याचवेळीं तिला काटून टाकून सत्य बोलण्यांत ह्या जिभेची समाप्ति आपण केली तर त्यांत मला समाधानच आहे— राघोबा, पेशव्यांच्या गादीचा नोकर नसलेला हा रामशास्त्री तुला देहांत प्रायश्चित्त सांगत आहे. " यावेळीं दहा वेळां 'देहांत प्रायश्चित्त' हा शब्द नाटककारानें पुनःपुन घुमविला असल्यानें प्रेक्षकांच्या हृदयाचे गाभाऱ्यांत त्याचाच प्रतिध्वनि एकसारखा होत रहातो. " न्याय, निःस्पृहता व विद्वत्ता यांचा प्रत्यक्ष अवतार ' असणारे रामशास्त्री आपली मृत्युंजयी सत्यनिष्ठा पुनः घोषितात, " बाईसाहेब, पाहिजे तर माझी जीभ छाटून टाकण्याचा हुकूम करा, पाहिजे तर अंधारकोठडींत कांट्यांच्या पिंजऱ्यांत मला कोंडून ठेवा, पाहिजे तर ज्या ह्या तलवारींनीं नारायणरावाचे तुकडे तुकडे केले त्याच ह्या तलवारी माझ्याहि शरिरावर पाहिजे तशा चालवा; मला कोठेंहि न्या, कसाहि ठेवा, शब्द उच्चारण्याची जिमेंत शक्ति असे तों मोठमोठ्यानें ओरडून सर्व दुनियेला मी जाहीर करणार, ' नारायण-रावांचा खून राघोबानें केला आणि या पातकाला देहांत प्रायश्चित्ता-शिवाय दुसरें प्रायश्चित्त नाहीं. '

' डोंगरी किल्यावरील अंधारकोठडी ' असा स्पष्ट उल्लेखच आनंदीबाई करते, तेव्हां मुंबईजवळील डोंगरीच्या तुरुंगांत एकशेएक दिवस काढलेले लोकमान्य प्रेक्षकांच्या डोळ्यासमोर उभे कसे न राहतील ?

कीचकवधांतील राजकारण

' कीचकवध ' नाटकाचें राजकीय कर्तृत्व इतिहाससिद्धच आहे, पण नाट्यकलेच्या दृष्टीनेंहि त्याचें महत्त्व असामान्य आहे. अत्यंत बांधेसूद असें संविधानक, त्यांत एकाहून एक तीव्रतर संघर्ष-प्रसंग साधलेले, प्रवेशा-

प्रवेशाला रसाचा परिपोष वाढत गेलेला आणि दासीपासून द्रौपदीपर्यंत सर्वांचे स्वभाव सुस्पष्टपणें व सुसंगतपणें रेखाटलेले-यामुळें हें नाटक मराठी नाट्य-सृष्टींत उच्च स्थान मिळवून बसलें आहे. कर्झनशाहीवरील आपलें रूपक सत्य भासविण्यासाठीं खाडिलकरांनीं प्रस्तावनेंत विराट पर्वांतील आधार सविस्तर दिले आहेत आणि "माझें पदरचें कांहींच नाहीं, जें कांहीं आहे तें सारें मूळ महाभारतांतलेंच" असें भासविलें आहे.

असा पारदर्शक पडदा आरंभीं सोडून, मग त्यांनीं तत्कालीन स्थितीचे पडसाद नाटकांत खूपच उमटविले आहेत. 'इभ्रत,' 'सहानुभूति' या ब्रिटिशांच्या लाडक्या शब्दांची चेष्टा त्यांनीं केली आहे. "राज्यकर्ते ते ते राज्यकर्ते आणि दास ते दास' ही कर्झनशहाची आढ्यता त्यांनीं कीचकाचे तोंडीं घालून चव्हाट्यावर मांडली आहे व निंद्य अशी दाखविली आहे. 'नवीन राज्यें भरभराटीस आणणें आणि जुनीं नांवाजलेलीं लयास नेणें, ही ज्यांची रोजची सहज लीला' असा डलहौसीचा उद्धार केला आहे. "माझ्या नाटकशाळेंत सर्वांना सारखाच मान व सारखाच दर्जा दिलेला आहे." ही कीचकाची गर्वोक्ती ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या कांगावखोर समतेचाच पडसाद नव्हे काय? "प्रजेनें कितीही मुकाट्यानें जुलूम सोसला, तरी परमेश्वराचे दरबारांत त्या जुलमाच्या प्रायश्चित्तापासून राज्यकर्त्यांची सुटका होणें शक्य नाहीं.' हें धर्मराजाचें आश्वासन तेव्हांच्या त्रस्त भारतीय जनतेस किती समाधानाचें वाटत होतें! "अमर्याद वाटणारी तुझी सत्ता हां हां म्हणतां ढासळून पडेल, सर्वांचा न्याय करण्यास परमेश्वर बसला आहे." ही द्रौपदीची भविष्यवाणी परतंत्र भारतीयांना किती आशादायक वाटे! अथपासून इतिपर्यंत अखंडपणें वाढत्या श्रेणीनें रंगत जाणारीं जीं पांचसात नाटकें मराठींत आहेत, त्यांत 'कीचकवधा'चें स्थान उच्च आहे.

खलनायकाचें चित्र

'सवाई माधवरावांचा मृत्यु' हें खाडिलकरांचें पहिलें नाटक असूनहि सरस आहे. शेक्सपीयरचा हॅम्लेट जसा संदेहावर आंदोलनें घेतो, तसा

माधवरावांचा स्वभाव दाखविलेला आहे. त्यांचें मन नाना फडणिसाविषयीं कलुषित करण्यासाठीं केशवशास्त्री श्रीमंतांच्या कानांत भलभलते संशय ओततो. शेक्सपीयरच्या आयोगाचींच ही मराठी आवृत्ति. १८९३ सालीं खाडिलकरांनीं लिहिलेलें हें नाटक प्रथम 'विविध–ज्ञान–विस्तारां'त प्रसिद्ध झालें. पुढें रंगभूमीसाठीं दोन-तृतीयांशाहून अधिक भाग खाडिलकरांनीं नव्यानें लिहून काढला. माधवरावांच्या मनाचे हेलकावे कसकसें वाढत गेले, हें अत्यंत कौशल्याचें कार्य तरुण खाडिलकरांनीं उत्तम प्रकारें पार पाडलें आहे. आयागोचा मिष्किलपणा व दुष्टपणा केशवशास्त्र्यामध्यें भरला आहे. खल-नायक रंगविण्याकडे खाडिलकरांनीं इतकें लक्ष दुसऱ्या कोणत्याच नाटकांत पुरविलें नाहीं.

"सर्व जग नानांचा शब्द झेलते आहे! नानांनीं वटारून पहाण्याबरोबर सर्व पृथ्वी कांपते आहे !"असें केशवशास्त्री म्हणतो आणि दुसऱ्या बाजीरावांच्या पक्षाचे लोकांना नानाविरुद्ध चिथवतो. पण त्याचें खलत्व हें कीं, माधवरावांची मातोश्री व सासू या दोघींशीहि नानांचा अनैतिक संबंध होता असें विष तो माधवरावांच्या कानांत हलकेहलके ओततो. त्या विषाचे परिणाम माधवरावांच्या कोवळ्या मनावर कसकसे होत गेले हें त्यांच्या उद्गारावरून स्पष्ट दिसतें. त्यांचे सासरे बाबासाहेब यांचा निरोप म्हणून केशवशास्त्री विषाचा पहिला थेंब टाकतो. माधवरावांच्या हृदयाला डिवचणारा तो निरोप असा– " श्रीमंतांप्रमाणें मी कांहीं नानांच्या ताटाखालचें मांजर होऊन राहणार नाहीं—ज्यांना गादीची हाव असेल त्यांनीं पाहिजे तर नानाची थुंकी झेलून रहावें, वेसणीच्या बैलाला वळवितात त्याप्रमाणें नाना वळवितील तिकडे पेशव्यांनीं पाहिजे तर वळावें. "

निरोपाप्रमाणेंच एक खोटें पत्र रचून केशवशास्त्री विषाचा दुसरा थेंब श्रीमंतांच्या कानांत टाकतो. त्याच्या मतें, " ही चिठ्ठी म्हणजे नानाच्या वाड्याला लागणारी मूर्तिमंत आग, शनिवारवाड्याला चाटून जाणारा प्रत्यक्ष विजेचा लोळ, —माधवाच्या शरिरांतील सर्व रक्त तापविणारे रसरसलेले हे निखारे संधि साधून माधवाच्या डोक्यावर मी ठेवणार ! "

ही चिठी आपण नाखुषीनें दाखवीत आहों अशी बतावणी कपटी

केशवशास्त्री करतो, त्यामुळें तर माधवरावाच्या हृदयांतील आग भडकतेच. तो संवाद पुढीलप्रमाणें—

माधव—कोठें आहे तें पत्र मला दाखवा, माझ्याहि संशयाची शहानिशा होऊं द्या.

केशव०—स्त्रीजातीसंबंधानें पुरुषांचीं मनें स्वभावतः संशयखोर असतात, —तेव्हां म्हणतों महाराजांना काय करावयाची ही उठाठेव करून ?

मा०—दाखवा, तें मला अगोदर दाखवा.

के०—नको सरकार, मी नाहीं दाखविणार.

मा०—आमचा हुकूम आहे; जर पत्र दाखविलेंत नाहीं, तर नागनाथाची अवस्था झाली ती तुमची होईल.

के०—आणि सरकारांना पत्र दाखविलें व नानांना कळलें, तर पत्र दाखविल्याबद्दल मला देहांत शिक्षा भोगावी लागेल.

मा०—पेशव्यांच्या गादीवर मी आहें, नाना नाहींत. माझा हुकूम पाळल्याबद्दल जर तुम्हांला नाना शिक्षा करूं लागले, तर प्रथम ह्या माधवाला हत्तीच्या पायांत चिरडून मारणें नानांना भाग पडेल, मग तुमच्या केसाला ते धक्का लावतील–दाखवा तें पत्र."

मार्मिक मनोविश्लेषण

नानांनीं हत्तीच्या पायाखालीं दिलेल्या नागनाथाच्या तोंडून, सुग्रीव–ताराच्या पौराणिक दाखल्यांतून, पोवाडेवाल्याच्या कवनांतून–चोहोंकडून नानाविरुद्ध कंड्या पिकविण्याचा सपाटा केशवशास्त्री लावतो. त्यामुळें माधवरावांची दृष्टि विकृत होते व नानांचें प्रत्येक चांगलें कृत्यहि त्यांना विपरीत भासूं लागतें. आपल्या विवाहाच्या टोलेजंग समारंभाची जुनी आठवण होऊन माधवराव म्हणतात, " माधवा, वरात ? नव्हे ती वरात, एखादा नीच मुत्सद्दी आपल्या पापाची घाण धन्याच्या अंगाला कशी सारवतो ह्याचें प्रदर्शन करण्याकरितां ती धिंड काढली होती धिंड !— पेशव्यांच्या दरबारांत भयंकर अपराधी शिक्षेबांचून कसा निसटतो, तें पाहून घेतल्याबांचून मी राहणार नाहीं."

प्रत्येक संवादांतून माधवरावांच्या मनाची स्थिति नाटककारानें उभी केली आहे.

जन्माआधींपासून नानांनीं आपल्याला पित्याप्रमाणें संभाळलें—वाढविलें हें जाणून माधवराव त्यांच्याविरुद्ध जीभ उचलत नसत. पण नाना हे दुष्ट आहेत असा त्यांचा ग्रह झाल्यामुळें हळुहळु ते त्यांना विरोधहि करूं लागले. प्रथम ते चाचरत म्हणतात, "मला वाटतें, मी सांगतों—माझा असा हुकूम आहे कीं—खासगी व्यवस्थेंत आपण कोणत्याहि प्रकारची ढवळा ढवळ करतां कामा नये."

पुढें सरदारांच्या दरबारांत जाऊन माधवराव त्यांना स्पष्टच बजावतात, "सरदार हो, तुम्ही मला पेशवा समजूं नका. बाजीराव ज्याप्रमाणें शिवनेरीस कैदेंत आहेत त्याप्रमाणें—मी जिवावर उदार आहें.—उघड उघड तुमच्या तोंडावर बोलतों—शनवारवाड्यांत मी नानांचा कैदी आहें, आणि माझ्यावर पहारेकरी कोण म्हणाल ? तर आमच्या त्या मानलेल्या सासूबाई !—त्या बाईची परवानगी घेतल्याशिवाय मला कोठें जातां येत नाहीं, येतां येत नाहीं, माझी कोणाची गांठ पडत नाहीं !—मी दरबारला येणार नव्हतों, पण माझ्या सरदारांना माझ्या कैदखान्याची गोष्ट सांगण्यास पुनः संधि आईसाहेब व नाना देणार नाहींत म्हणून मुद्दाम आलों."

शेवटीं 'आपलें जीवित व्यर्थ' असें माधवरावांना वाटूं लागलें. ते स्वतःशीं म्हणतात, "ह्या बागेंतल्या झाडांप्रमाणें निश्चळ व स्थिर असा मी जन्माला आलों असतों,—कैदखान्यांत असतांनाहि ह्या वेलीप्रमाणें मीं हात हलविले असते; ह्या फुलांप्रमाणें आनंदानें हसलों असतों !—मनुष्याचा जीव माझ्या शरिरांत ओतला असता. ह्यांना काटणाऱ्या, कापणाऱ्या, तोडणाऱ्या माळ्याकडे पाहून हीं फुलझाडें जशीं डोलतात, बागडतात, हंसतात, तसें मींहि नानांना, आईसाहेबांना खूष केलें असतें !"

अखेर आपलें जीवित व आपला संसार—सारेंच घाणींतलें आहे, अशा भ्रमानें पछाडल्यामुळें माधवरावांचें मन आत्महत्येस प्रवृत्त होतें. त्यांना सर्वांचाच वीट किती आला होता, हें खाडिलकरांनीं पुढील शब्दांनीं

दाखविलें आहे. "हें घाणेरडें पुणें शहर सोडून–मला लांब कोठें तरी गेलें पाहिजे.—ही पापी जागा जाळून राखरांगोळी केली तर?–छे–कोठून हा वाडा स्वच्छ व्हावयाला?—जाळल्यावर राहणारी ती राख, ते कोळसे, त्यांच्या काळ्याकुट्ट पापाचा तो अस्सल गाळ अजीबात नाहींसा कसा करतां येईल?—गंगेसारख्या महानदींत ती राख टाकली, तर तो पवित्र ओघ पापमय होऊन जाईल, जमिनींत त्या राखेला गाडून टाकलें तर वसुंधरेच्या पोटांत असलेले सर्व हिरे काळेकुळकुळीत कोळसे बनतील, आकाशांत ही राख फुंकली तर तेजोमय तारे काळेठिक्कर पडतील!"

उत्कट पेंचप्रसंग

रसोत्कट प्रसंग निर्मिण्यांत खाडिलकरांची प्रतिभा यशस्वी आहे. आनंदीबाई म्हणजे मूर्तिमंत राक्षसी महत्त्वाकांक्षा! तीच 'भाऊबंदकी'ची खल-नायिका. आपल्या पित्या अर्भकालाहि दगडावर ठेचून मारण्यास धजावणाऱ्या लेडी मॅक्बेथची बहीणच! ती तुळाजीपासून राघोबापर्यंत सर्वांना प्रेमानें, लोभानें, धाकानें नारायणरावाच्या खुनास प्रवृत्त करते. कधीं सरळ तर कधीं छद्मी बोलून, कधीं पडतें घेऊन तर कधीं कुरेंबाजी गाजवून, राघोबाला कधीं शृंगाराची भुरळ घालून तर कधीं आपल्या कपाळींचें कुंकू पुसूनहि, ती आपल्या मनाप्रमाणें नारायणरावाचा खून घडवून आणते. प्रत्यक्ष खुनाचे वेळीं राघोबाच्या कमरेला एकीकडे नारायणराव विळखा घालतो व प्राणांची भीक मागतो, तर दुसरीकडे आनंदीबाईहि मिठी मारून त्याला ठार करण्याचा हट्ट धरते–हा प्रसंग किती नाट्यपूर्ण! तसाच 'विद्याहरणां'तील शुक्राचार्याच्या कमरेला एका बाजूस देवयानी व दुसऱ्या अंगास राजपुत्र लगटून कचाच्या प्राणाविषयीं परस्पर–विरुद्ध मागणी करतात हा केवढा पेंच-प्रसंग! असे संग्राम (Confliets) उभे करण्यांत खाडिलकरांचें यश आहे, असा अचूक अभिप्राय लो. टिळकांनींहि एकदां दिला होता.

आनंदीबाईचा कपटी व क्रूर स्वभाव शब्दाशब्दांतून प्रगट होतो. 'आम्ही कैदेंत आहों तेंच चांगलें' असें आरंभीं उपरोधिकपणें बोलून ती तुळाजीला खुनास चिथावते. पुढें नाना फडणीस आले. तर लगेच

कांगावखोरपणानें म्हणते, —" जाणाराचें काय ? तो सुखानेंच स्वर्गात जातो; त्याला नेण्याला स्वर्गातून विमानें आलीं असतील; आम्ही हतभागी येथें राहिलों. लोक आम्हांला काय म्हणतील; ही भीति इकडे मरणाहून अधिक वाटते."

मनाच्या आंदोलनांचीं चित्रें

पण खुद्द राघोबादादांची स्थिति काय झाली होती ? खून चढलेल्या त्यांच्या मनांत नाना तऱ्हेचीं भुतें नाचत असतात. आरशांत त्याला तींच भुतें दिसतात. तो आनंदीबाईला म्हणतो,

" पहा, अजून त्या आरशांत पहा—इंगळासारखे लाल झालेले बाबांचे डोळे मजकडे रागानें पहात आहेत—पहा, अजून पहा—आनंदी, रणांगणावर एकट्या मजवर चालून आलेल्या हजारों पठाणांच्या तलवारी म्यानांतून बाहेर झळकलेल्या पाहिल्यावर भीतीचा लवलेशहि माझ्या मनांत कधीं शिवलेला नाहीं. पण लहानपणीं बाबांना रागावलेले पाहिल्यावर जसा मी भित्र्या मुलीप्रमाणें कांपत असें, तसा आतांहि—ते आरशांतले त्यांचे–ते पहा–ते गुंजेसारखे लाल डोळे पाहून मी गर्भगळित झालों आहें."

खून झाल्यावर तर राघोबाची मनोवृत्ति बेभानच झाली. तिचें चित्रण खाडिलकरांनीं ठसठशीतपणें केलें आहे. राघोबा म्हणतो, " काय वरच्या सर्व देवता नारायणस्वरूपी होऊन ' काका, काका ' म्हणून मला हांका मारीत आहेत !–ह्या पृथ्वीच्या पोटांतूनहि तोच शब्द कसा येतो !–अहो, कोणी तरी मी राघो भरारी पेशवा झालों म्हणून माझ्या नांवाची द्वाही फिरवा; माझ्या नांवानें कर्णे कुंका, माझ्या नांवानें तासे बडवा, डंके, नौबदा, सर्व रणवाद्यें खूप जोरानें पिटा; तुमच्या ह्या नव्या पेशव्याच्या नांवाचा जयजयकार ह्या वाड्याभर, सर्व पुणे शहरभर, सर्व महाराष्ट्रभर एवढ्या मोठ्यानें करा कीं, माझ्या ह्या फितुर कानांच्या किंकाळ्या बसून 'काका, काका' हे शब्द मला ऐकविण्याची त्यांना शक्तीच राहूं देऊं नका."

' काका ! मला वांचवा ! ! ' ही नारायणरावाची–त्या निष्पाप कुमाराची–किंकाळी कोणाचेंहि काळीज करवतीप्रमाणें कापतच जाते.

न. चिं. केळकर : : : ७

खाडिलकर व केळकर–दोघेहि 'केसरी'चे संपादक–राजकीय कार्यकर्ते—लो. टिळकांचे दोन हातच ! पण या दोघांनींहि आपली लेखणी ललित क्षेत्रांत चालविली व कीर्ति कमावली. खाडिलकरांची लेखणी मुख्यतः नाट्य-लेखनांत रमली व मोठी प्रतिष्ठा पावली; केळकरांचें कलम साहित्याच्या सर्व शाखांना स्पर्श करून गेलें व विविध फळें देऊन गेलें. 'नाटककार' या एकाच नात्यानें खाडिलकरांनीं गरुडाप्रमाणें सर्वांत उच्च असें उड्डाण केलें; तर प्रत्येक विषयांत थोडथोडे गुण मिळवून एकूण बेरजेंत अधिक गुण कमावणाऱ्या कष्टाळू विद्यार्थ्याप्रमाणें, केळकरांनीं ललित वाङ्मयाच्या सर्व भागांत यश संपादिलें.



केळकर मुख्यतः 'टीकाकार,' पण ते कवि होते, कादंबरीकार होते व नाटककार पण होते.

केळकरांची नाट्य-सृष्टि अष्टकोनी आहे. त्यांच्या आठ नाटकांपैकीं 'नवरदेवाची जोडगोळी' हें एका इंग्रजी नाटकाचें व 'सरोजिनी' हें एका बंगाली नाटकाचें भाषांतर होय. चंद्रगुप्त, अमात्यमाधव व तोतयाचें बंड हीं ऐतिहासिक असून कृष्णार्जुनयुद्ध, वीर विंडबन व संत भानुदास हीं पौराणिक म्हणतां येतील. यांतील शेवटचीं दोन नाटकेंच त्यांनीं संगीत रचलीं. पुढें 'कृष्णार्जुनयुद्धा'लाहि संगीताचा पोशाख चढविण्यांत आला.

कृष्णार्जुनयुद्ध व तोतयाचें बंड हीं दोन नाटकें म्हणजे केळकरांच्या नाट्य-गुणांचे स्मारक-स्तंभच होत. पैकीं पहिलें नारदाच्या कळलाव्या भूमिकेमुळें जितकें हसरें झालें आहे, तितकेंच दुसरें नाना फडणिसांच्या कुशाग्र चातुर्यामुळें बुद्धीला हलवून सोडणारें झालें आहे. दोन्ही नाटकांची रचना अत्यंत बांधेसूत व प्रमाणबद्ध आहे आणि दोन्ही नाटकें रंगभूमि अखंड फुलवीत असतात. सूक्ष्म बुद्धीचा रम्य विलास या दोन्ही नाटकांत पाहतांना रसिकांची सुसंस्कृत अभिरुचि संतृप्त होते.

नाट्याला अवश्य तो भावनांचा उत्कटपणा केळकरांच्या हृदयांतच नसल्यामुळें त्यांचीं नाटकें पहातांना प्रेक्षक कधीं खो खो हसत नाहीं किंवा घळघळघळ अश्रु ढाळीत नाहीं-त्यांच्या सभ्य व संयमित विनोदानें तो गालांतल्या गालांत हसेल व परिमित करुणरसानें तो आपल्या डोळ्याच्या कडा पुसण्यासाठीं खिशांतील हातरुमाल बाहेर काढील इतकेंच ! त्यांतले त्यांत, 'तोतयाचे बंड'तील नानांच्या स्वभावाशीं केळकर बरेचसे एकरूप असल्यामुळें त्या नाटकांत भावनेचे चिमणे झरेहि कोठें कोठें झुळझुळतात ! एकाद्या पटाईत बॅरिस्टरानें प्रतिपक्ष्याचे मुद्दे आपल्या तीक्ष्ण बुद्धीनें खोडून आपली बाजू सिद्ध करून दाखवावी, त्याप्रमाणें केळकरांचे नाना फडणीस हे तोतयाची सारी लबाडी उघड करून आपलें मत स्थापित करतात. भूमितींतील दोन समान त्रिकोणाप्रमाणें नाना व तोतया यांच्या पक्षांची रचना केळकरांनीं सुव्यवस्थित केलेली आहे. भाऊसाहेबांचा हुजऱ्या हैबती व तोतयाची पत्नी अमला हीं नानांचीं हुकमी शस्त्रें, तर पार्वतीबाईचा भोळाभाबडा स्वभाव, रामचंद्र नाईकांची स्वामिनिष्ठा व इंग्रज-हैदर वगैरे शत्रूंचा पाठिंबा या तोतयाच्या यशाच्या पायऱ्या. या दोन्ही बाजू केळकरांनीं मोठ्या कुशलतेनें मांडल्या आहेत. विशेष हें कीं, या नाटकाचे चार अंक केळकरांनीं अवघ्या दहा दिवसांत लिहिले.

अलौकिक स्वभाव-चित्रें

'तोतयाच्या बंडांतील' नाना फडणीस, 'अमात्य माधवांतील' माधवाचार्य व 'चंद्रगुप्तांतील' चाणक्य या केळकरांनीं रंगविलेल्या तीन

स्वभावरेखा समानधर्मी आहेत व त्या साऱ्या मोठ्या मार्मिकतेनें व कुशलतेनें रेखाटलेल्या आहेत. याचें एक कारण म्हणजे हे तिघेहि जसे कुशाग्र बुद्धीचे मुत्सद्दी होते, तसेंच खुद्द केळकरहि होते. त्यामुळें त्यांना हा 'पर-काया-प्रवेश' लीलेनें व यशस्वितेनें करतां आला. या सर्वांचे संवाद केळकरांच्या सूक्ष्म बुद्धिमत्तेनें व प्रखर तर्कशक्तीनें लखलखणारे आहेत. कोटीवर प्रतिकोटी करण्यांत व खलनायकाचें कारस्थान हाणून पाडण्यांत या तिघांहि मुत्सद्यांचें अलौकिक बुद्धिचातुर्य प्रगट होतें. त्यांचें प्रत्येक वाक्य युक्तिवादानें धारदार झालेलें आहे. फार काय? 'बंडांतील' हैबतीसारखा हुजऱ्यासुद्धां 'शहाणा, धूर्त व कारस्थानी' असाच दाखविला आहे. भटजी घ्या, दासी घ्या, पहारेकरी घ्या,– सर्वांचें बोलणें कसें रेखीव व कोटिक्रमानें फुललेलें. आणि नाना व पार्वतीबाई यांचा बुद्धिभावनासंपन्न संवाद तर मराठी नाट्य–वाङ्मयांत अद्वितीयच आहे.

नानांचें शब्दचित्र

नानांच्या थोर स्वभावाला पार्श्वभूमि शोभण्यासारखें काळेकुट्ट असें त्यांचें चित्र बगंभट पार्वतीबाईजवळ काढतो. तोहि पुरावे देत देत म्हणतो, "एवढें म्हणे नाना कारस्थानी! एवढे धूर्त! सुतानें स्वर्गाला जाणारे! सगळ्या जगाची डाक बसल्या बैठकीला आणविणारे! जसे काय त्रिकालवेत्ते साधु! अतींद्रिय ज्ञानी! महंत! खोलींतलं नवराबायकोचं कुजबुजणं म्हणे यांना समजतं! मुंगीनं मुंगीच्या कानांत हळूंच बातमी सांगितली तर तिचा डंका म्हणे यांच्या खलबतखान्यांत ऐकूं येतो! आणि नाना सहस्राक्ष! यांना एवढे कान! सरकारवाड्यापासून हातभर अंतरावर, केवळ पेशव्यांच्या हिताकरतां घर बांधून हे राहिले! आणि यांना आपल्या पाठीशीं फंद-फितूर-कट होतात ते कळत नाहींत! गारदी वाड्यापुढं जमतात तें दिसत नाहीं ना!"

पण खरोखर पहातां, कोसळत्या पेशवाईला हात देऊन सावरणारे नानाच होते. पानिपतच्या प्रलयानंतर सुमारें पंधरा वर्षांनीं भाऊसाहेबांच

तोतया उपटला. त्याचें नांव सुखनिधान. कनोजकडील कुप्रसिद्ध कवजी कलुशाचा हा वंशज. त्याचा चेहरामोहरा भाऊसाहेबांसारखा आणि पार्वतीबाईच्या अंधश्रद्धेला तर तोच खरा भाऊसाहेब वाटे. तोतयाच्या बाजूला बडीबडी मंडळी जमूं लागली. त्यांचें पारिपत्य करणें हा केवढा बोजा आहे याचा विचार करतांना नाना आपल्या मनाशीं म्हणतात, "एकूण होय नाहीं म्हणतां म्हणतां या थराला गोष्टी आल्या अं! हरिश्चंद्राच्या फुटक्या रांजणासारखी या पेशवाईच्या यशाची गत मला तर दिसते. दुष्ट दुर्दैवरूपी विश्वामित्रानं त्याला जें एकदां भोंक पाडून ठेवलं आहे त्यामुळं पुण्य, मेहनत आणि पराक्रम या तिहींचें गंगोदक त्यांत कितीही ओतलं तरी तो भरण्याचं चिन्हच दिसत नाहीं! पानपतापासून एकदां जी घडी बिघडली ती अजून बसत नाहीं. आणि सर्वांत आश्चर्य हें कीं, या सर्वाला घरची भाऊबंदकी कारण!"

खाडिलकरांनीं नारायणरावाच्या खुनाचा भीषण प्रसंग भाऊबंदकींत रंगविला. त्या अनर्थाला कारण होणाऱ्या आनंदीबाईचा समाचार घेण्यास रामशास्त्रीसारखा निःस्पृह न्यायाधीश भेटला. पण केळकरांनीं निवडलेल्या कथानकांत नानांना पार्वतीबाईचा विरोध समजुतीनें, युक्तीनें मोडून काढावयाचा होता. "पतिव्रतेच्या प्रेमाची विटंबना" करतांना तोतयाचेंहि मन कचरतें, मग 'सत्त्ववीर' नानांना पार्वतीबाईशीं किती कोमलपणानें वागावें लागे! पार्वतीबाई व आनंदीबाई या दोन स्त्रियांच्या स्वभावांतील भेद नाना सांगतात, "आनंदीबाई जितकी तामसी, तितक्या पार्वतीबाई सात्त्विक. आनंदीबाई जितकी स्वार्थसाधु, तितक्या पार्वतीबाई निःस्पृह आणि परोपकारी, एकीला खोट्याची जितकी आवड, तितकीच दुसरीला सत्याची चाड! एक जितकी उद्दाम व गर्विष्ठ, तितकीच दुसरी मर्यादशील आणि विनयसंपन्न! एक आपल्या पतीवर करडा अंमल चालविणारी राक्षसी, तर दुसरी मृत पतीला अहर्निश डोळ्यापुढं ठेवून त्याच्या स्मृति–समागमांत सुख मानणारी देवता! अहाहा! कोण तरी या दोन स्त्रियांत तफावत! पण एकीच्या अवगुणांनीं राज्यशकटाला जितकीं विघ्नं आणलीं, तितकीं दुसरीचे गुण आणणार! कोण हें दुर्दैव!"

चित्ताकर्षक प्रारंभ

नाटकाचा प्रारंभच मुळीं अत्यंत चित्ताकर्षक आहे. रत्नागिरी किल्ल्याच्या तटावरून तोतया उडी घेत आहे. त्यामुळें तेथील किल्लेदार रामचंद्र नाईक यांना तोतया हाच भाऊसाहेब वाटतो आणि म्हणून ते स्वामिभक्तीमुळें त्याच्या पायांतील बेड्या काढतात व स्वतः पुण्यास पार्वतीबाईच्या समोर जाऊन उभे राहतात. ही बंडखोरी व ही धिटाई सहन करण्याइतके नाना भेकड किंवा लेचेपेचे नाहींत. 'अर्धे शहाणे' असलें तरी ते राज्यशासनांत अत्यंत कठोर आहेत. पार्वतीबाईच्या डोळ्यांदेखत ते त्या रामचंद्र नाईकाना तडातडा बोलतात. एखाद्या कडव्या सेनापतीप्रमाणें कडक शब्दांचें आसूड नाना उडघतात. ते रामचंद्र नाईकांना म्हणतात, "नाईक, तुम्हांला शरम नाहीं वाटत असलीं कांगावखोर मायावी भाषणं बोलायलां ? तुम्हीं भाऊसाहेबांना पानपताला जाण्याच्या आधीं पाहिलं होतं काय ?.....किल्लेदार नेमतात ते हुकमाची तामिली करायला नेमतात; दयाधर्माची नसती उठाठेव करायला नेमीत नाहींत. तोतया कांहीं आजकालचा कैदेंत नाहीं. आज बारा वर्षें कैदेंत आहे. या अवधींत या कृत्याच्या पापपुण्याचा भार ज्यांनीं आपल्या माथ्यावर वाहिला ते तो यापुढंहि वाहायला समर्थ आहेत, समजलां ? शेषाचा भार हलका करायला सरड्यानं धावण्याचं कारण नाहीं. लांडे कारभार करून त्यांना मोठें प्रतिष्ठित नांव दिल्यानं गुन्हेगारी कमी होत नसते. उलट ती वाढते मात्र. समजलं नाईक !"

भावनेच्या छटा

नुसते करडे शब्द बोलूनच नाना थांबत नाहींत तर, पार्वतीबाईच्या समक्ष; त्यांच्या विश्वासास पात्र झालेल्या व पेशवाईचा एकनिष्ठ आधार असलेल्या रामचंद्र नाईकास ते तेथल्या तेथेंच बेड्या घालून कैदेंत टाकतात. पण हा सारा कठोरपणा पार्वतीबाईशीं बोलतांना मावळतो. भाऊसाहेबांविषयींची कृतज्ञता आणि पार्वतीबाईविषयींची आदरबुद्धि-यामुळें नाना फारच जपून व नमून वागतात. 'मधांत पडलेली माशी हलक्या हातानें

वर काढावी, तशी ही नाजुक कामगिरी आहे.' नानाच्या राजकारणावर असंतुष्ट झालेल्या पार्वतीबाई त्यांना संयमानें पण मार्मिकतेनें टोंचून बोलतात. तरीहि नाना आपला शांतपणा न सोडतां त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करतात. या स्वभावरेखेच्या छटा पुढील संवादांत दिसून येतात.

पार्वती०—नाना, तुमच्या कुटुंबासारखा स्वभाव मिळायाचा नाहीं ! तुम्हांला मोठं दुःख झालं, नाना ! त्या इथं असतांना त्यांची मला मोठी करमणूक होती. तुमचं धोरण संभाळून त्यांतल्या त्यांत माझ्याशीं त्या मोठ्या मोकळ्या मनानं वागत.

नाना—(स्वगत) या बोलण्यांत किती नाजूक खोंच आहे हें ज्याचं त्यालाच कळणार. (उघड) ती मोकळ्या मनाची तर खरीच. पण तिनं सांभाळण्यासारखं असं माझं धोरणं म्हणून मात्र कांहींच नव्हतं ! मीहि बाईसाहेबांशीं होईल तितक्या मोकळ्या मनानंच वागत असतों. मग बाईसाहेबांना कसंही वाटो ! "

संवादाची तार चढतां चढतां पार्वतीबाई असेंहि म्हणाल्या, " मरण हातचं असतं तर मी तरी अशी ही विटंबना करून घ्यायला कशाला जगलें असतें ?.....ते जिवंत होऊन आले, तरी त्यांची वाट काय लागणार, हें दिसतच आहे उघड. " पार्वतीबाईचे हे दोन घाव नानांच्या अगदीं जहरी लागला. त्यांच्या हृदयांतील साऱ्या भावना खळबळून उठल्या व उसळल्या. डोळ्यांना पाणी आणून, भावनापूर्ण भाषेनें, नाना पार्वतीबाईंना विचारतात,

"—हा नाना इतका नीच अधम झाला काय ? मी लहान असतांना पोटच्या मुलाप्रमाणं माझ्यावर प्रेम कुणीं केलं ? भाऊसाहेबांनींच ना ? मला माधवरावांबरोबर आस्थेनें शिक्षणं कोणीं दिलं ? ' हा नाना पुढं मोठा होईल ' म्हणून मला शाबासकी देऊन ममतेनं पाठीवरून हात कोणी फिरवला ? पानपतच्या स्वारीवर निघतांना मुद्दाम हौसेनं विश्वासरावाबरोबर मला कोणी मागून घेतलं ? वाटेंत नर्मदा तीरावर मी आजारी पडून अत्यवस्थ झालों असतां, " काकी, तुम्ही घाबरूं नका. " असं माझ्या

मातोश्रीला आश्वासन देतांना स्वतःच्या प्रेमामुळं घाबरून जाऊन डोळ्याला पाणी कोणीं आणलं ? "

असे अनेक पूर्वीचे अनुभव सांगून, शेवटीं, " मी कृतघ्न, उलट्या काळजाचा मांग आहें असं आपण कसं मानतां ? " असा सरळ प्रश्न जेव्हां नानांनीं टाकला, तेव्हां पार्वतीबाई म्हणतात, " नाना, तुमचे शब्द मला पटतात." नानांच्या चातुर्याचा व चारित्र्याचा हा विजय होय. तसेंच, नानासारख्या थोर पुरुषाच्या मनांतील अंतःसंघर्ष दाखविणें हा केळकरांच्या नाट्य-चातुर्याचाहि स्मारक-स्तंभ होय.

कोमल स्वभाव-रेखा

पार्वतीबाईचा स्वभाव अतिशय सरळ, भोळा व उदार असा दाखविलेला आहे. वैधव्याच्या संशयामुळें त्यांचें मन अधिकच हळुवार झालेलें. त्यांची नानांकडे मागणी तरी किती सरळ ! त्या म्हणतात, " मी तेव्हांच सांगितलं कीं, तोतया पुण्याला आणा. चारचौघांसमक्ष परीक्षा होऊं द्या; त्याचा फडशा करा; मग आहेच बसलेली मी वैधव्याच्या दारांत. सारंच खोटं ठरलं, तर मग मीं नाहीं म्हणून तरी काय होणार ? मग तेव्हां तसं कां नाहीं झालं ? संशयाचं मूळच खणून निघालं असतं, म्हणजे मग कशाला पडला असतां हा इतका गोंधळ ! "

तोतयाची बायको अमला हिच्याशींसुद्धां पार्वतीबाईचें वर्तन अत्यंत प्रेमळपणाचें—सख्या बहिणीसारखें. " आपल्या प्रेमामुळें मी माझं दुःख जवळ जवळ विसरून गेलें." असें ती पार्वतीबाईना म्हणते. शेवटीं हीच अमला तोतयाला आपला पति म्हणून ओळखतें. तसेंच तोतया उत्तर हिंदुस्थानचा असल्यामुळें त्याचे कान भिकबाळीसाठीं टोचलेले नाहींत हेंहि गुपित नानांचा नोकर हैबती उघडकीस आणतो आणि तोतयाचें सारें कारस्थान धुळीस मिळवण्यांत " भले बुद्धीचे सागर नाना " यशस्वी होतात.

संमिश्र स्वभाव-चित्र

विजयनगरचे संस्थापक माधवाचार्य किंवा विद्यारण्य यांचें स्वभावचित्र

म्हणजे परस्परविरुद्ध गुणांचें संमिश्रण होय. त्यांचें आयुष्य ब्रह्मचाऱ्याचें व वृत्ति संन्याशाची पण वर्तन राजकारणी मुत्सद्याइतकें कारस्थानी. एकीकडे जगद्गुरु होण्याची पात्रता तर दुसरीकडे कौटिल्य-नीतीचा अर्कच—असें हें दुरंगी स्वभाव-चित्र केळकरांनीं कुशलतेनें रेखाटलें आहे. "शठाशीं शठासारखें" वागूनहि आपली बुद्धि स्थिर व अलिप्त ठेवण्याची तयारी माधवाचार्यांची आहे. "राजकारणातील कारस्थानाचा आनंद ब्रह्मानंदाहून गोड" मानणारा हा विजयनगरच्या प्रधान साध्या होमशाळेंत ऋषीप्रमाणें राहतो. आणि 'जन्मभर विद्यासाधन व परोपकार' करीत असतो. राजा हरदेवराय हा दुबळा असल्यामुळें त्याची राणी, तिचा भाऊ कृष्णदेवराय व एक कारस्थानी खल रुद्रदाम हे तिघेजण अमात्याविरुद्ध कारस्थान रचतात, किंबहुना म्लेच्छ शत्रूंना स्वारी करण्यास पाचारण करतात. हा कट अमात्य उघडकीस आणतात आणि आपल्यावरील मारेकऱ्यालाच मित्र बनवून सोडतात. त्यांचा हस्तक हनुमान हा निरनिराळीं वेषांतरें करून त्यांचे बेत सिद्धीस नेतो. अमात्यांचें आपल्या मानलेल्या मुलीवर किती वात्सल्य होतें, याचें प्रतिबिंब पुढील उद्गारांत पडलेलें आहे.

"तुझी प्रेमळ आई व मायाळू पिता हीं दोन्ही मीच ना? पण एवढंच काय? तुझा विनोदी भाऊ आणि थट्टेखोर बहीणहि मीच असं समज. बाळे, या जगांत एका विजयानगरीखेरीजकरून प्रेमाचं स्थान जशी तूं मला आहेस, तसाच सर्व जगांत, निदान आज तरी, तुझ्या प्रेमाचं स्थानहि मीच आहें कीं नाहीं?"

अपूर्व नारद

केळकरांचें अत्यंत हंसरें व यशस्वी नाटक म्हणजे 'कृष्णार्जुन-युद्ध.' त्यांत त्यांचा सारा खेळकरपणा खेळत आहे, मिस्किलपणा मिसळलेला आहे; त्यांची सारी रसिकता आणि कुशाग्र बुद्धीमत्ता संवादासंवादांतून ओसंडत आहे. एकापेक्षां एक अधिक उत्कंठतेचे प्रसंग गुंफण्यांत त्यांनीं मोठें कौशल्य दाखविलें आहे. दक्षिण हिंदुस्थानांतील देवालयाच्या गोपुराप्रमाणें या नाटकाच्या कथानकाचें बांधकाम डौलदार झालें

आहे. नारदाची भूमिका तर केवळ अप्रतिम आहे. इतर कैक नाटकांतून नारद म्हणजे केवळ एक उंचशेंड्या व कळलाव्या विदूषक दाखविलेला असतो. पण केळकरांनीं त्याला फारच वरच्या दर्जाला नेऊन ठेवलें आहे. मुत्सद्याचें बुद्धिचातुर्य, साधूची विश्व-कल्याण-बुद्धी व बालकाचा खेळकर विनोद या तिन्ही गुणांचा संगम नारदाच्या स्वभावांत केळकरांनीं घडवून आणला आहे. त्याच्या कारस्थानांची यादीच कौशिक ऋषी नाटकाचें शेवटीं गालव ऋषींना सांगतात, ती अशी, "चित्ररथानं अपराध केला त्याला मूळ कारण नारद; श्रीकृष्णाकडं जायला आपणाला सुचविलं तें नारदानं; श्रीकृष्णाकडून प्रतिज्ञा पक्की करविली नारदानं; इंद्रलोकांत जाऊन चित्ररथाला भूलोकावर आणून सोडला नारदानं; देवी द्रौपदीकडून चित्ररथाच्या स्त्रीला अभयवचन देवविलं नारदानं; आणि श्रीकृष्णानं अजून आपली प्रतिज्ञा खरी केली नाहीं म्हणून आपल्याला चिडवायलाहि नारदच आला होता."

कथेची रंगत

कौरव-पांडवांचें युद्ध संपल्यानंतर पांडवांच्या श्रमपरिहाराकरितां वनदेवतांनीं त्यांना व श्रीकृष्णाला आपल्या क्रीडावनांत बोलाविलें व मोठा उत्सव सुरू केला. तेथें यादव-पांडवांच्या स्त्री-पुरुषांचीं प्रेम-संभाषणें चालू असतांना नारदमुनि अवतरले आणि तत्त्वज्ञान सांगूं लागलें कीं, कोणाचेंहि दुसऱ्यावर प्रेम असतें तें स्वतःचे सुखासाठीं. छाननी करतां करतां कृष्णाचें प्रेम निरपेक्ष असल्याचें इतरांनीं ठरविलें. तेव्हां 'कृष्णाचं आत्मप्रेम' कसोटीला लावण्याच्या कामाला नारदमुनी लागले. ऋषीचा अपमान मद्यपी चित्ररथ गंधर्वानें केला व त्याचा बारा प्रहरांत शिरच्छेद करण्याची प्रतिज्ञा श्रीकृष्णानें केली. उलट चित्ररथाच्या पत्नीनें करुणा भाकल्यामुळें, त्याचा अपराध माहीत नसतांना, त्याचें रक्षण करण्याची प्रतिज्ञा द्रौपदीनें केली व ती तडीस नेण्याचें वचन अर्जुनानें दिलें. त्यामुळें परिणाम मात्र विचित्र झाला. चित्ररथाचा प्राण घेऊं पाहणारा श्रीकृष्ण एका बाजूस व त्याचा प्राण वाचवूं पाहणारा अर्जुन दुसऱ्या बाजूस—असा बिनतोड प्रसंग

निर्माण होऊन मित्रामित्रांचें युद्ध सुरू झालें. तेव्हां आपलें कारस्थान यशस्वी झालें या आनंदानें मोठमोठ्यानें हंसून नारद म्हणतो, " नारायण ! नारायण ! द्रौपदी, बोल आतां कृष्णविजय कसा काय आहे तो ! हा श्रीकृष्ण आणि हा अर्जुन–एका आत्म्याचीं हीं दोन शकलं ! असं असतां अभिमानानं आणि आत्मप्रीतीनं कशीं निकरावर आलीं आहेत पहा ! बस्स झालं ! माझं काम संपलं ! "

रहस्यपूर्ण गुंतागुंती

संस्कृतांतील विशाखदत्ताचें मुद्राराक्षस आणि इंग्रजींतील स्कॉटची एक कादंबरी या दोघांच्या आधारानें केळकरांनीं ' चंद्रगुप्त ' नाटक रचले. तें कोल्हटकरांच्या नाटकाप्रमाणें रहस्यपूर्ण व गुंतागुंतीचें आहे. त्यांत मुख्य स्वभावचित्र चाणक्याचेंच आहे. पण त्याहिपेक्षां उदात्त स्वभाव दाखविला आहे बळिरामाचा. चाणक्य, चंदनदास व बळिराम हे तिघे गुरुबंधु. पण, चाणक्यानें नंद घराण्याचा अंत करण्याची प्रतिज्ञा केली आणि चंद्रगुप्ताला हाताशीं धरलें. उलट चंदनदासाची नंद घराण्याविषयींची राजनिष्ठा अलौकिक होती. त्याचा मुलगा नंद घराण्यांतील शेवटच्या पुरुषाला–हरनंदाला–आपल्या घरीं स्त्रीवेषानें ठेवतो. त्याचें रक्षण चंदनदासाची मुलगी तारिणी प्राणपणानें करतें. तिचें प्रेम असते चंद्रकांतावर–आणि चंद्रकांत म्हणजेच चंद्रगुप्त व चंद्रगुप्त म्हणजे नंद घराण्याचाच वंशज ! अशी एकांतून एक गूढें उकलत जातात. हरनंदाचा शिरच्छेद करण्याची प्रतिज्ञा करणारा चंद्रगुप्तच तारिणीच्या आग्रहामुळें, नकळत, स्त्रीवेषधारी हरनंदाचें प्राणरक्षण करण्याची प्रतिज्ञा करतो आणि ती शेवटास नेतो. कृष्णार्जुनयुद्धासारखाच हा बिनतोड प्रसंग आहे.

' सरोजिनी ' या शोकांतिकेचें मूळ बंगाली आहे. मेवाडचा राणा लक्ष्मणसिंह आपली कन्या सरोजिनी हिलाच देवीच्या यज्ञांत बळी द्यावयास निघतो. तेव्हांचा त्याचा व त्याहून त्याच्या राणीचा शोक या नाटकांत बऱ्या प्रकारें व्यक्त झाला आहे. रहस्यपूर्ण कारस्थानें या नाटकाच्या कथानकांत गुंफलेलीं असलीं, तरी नाटकांतून कोणताच रस प्रभावीपणें निर्माण होत नाहीं.

विसंगतींतील विनोद

केळकरांचा स्वभाव जितका तार्किक, तितकाच विनोदी; जितका व्यासंगी, तितकाच रसिक. त्यांच्या विनोदप्रिय रसिकतेला खाद्य होण्यासारखा-विषय त्यांच्या चिकित्सक बुद्धीनें शोधून काढला. तो म्हणजे उत्तराच्या युद्धाचा. 'बायकांत बहु बडबडला' अशी ख्याति या विराट राजाच्या पुत्राची. तोच वीर या नाटकाचा नायक. संगीत व संग्राम—केवढी विसंगति! तिचें चित्र केळकरांनीं सुरेख रेखाटलें आहे. उत्तराला सदासर्वदा ध्यान संगीताचें व नर्तनाचें. आपल्या भित्र्या स्वभावावर तो वीरश्रीच्या भाषेचें पांघरूण घालतो. विराट-नगरींतील गुप्त पांडवांचा शोध लावण्यासाठीं कौरवांनीं व त्रिगर्त राजानें गौळवाडा लुटला अशी युद्ध-वार्ता ऐकल्यावर शब्दशूर उत्तर म्हणतो,

"अग आई, अशी घाबरतेस काय म्हणून? कीचकमामा गेले म्हणून काय झालं? त्रिगर्ताचा हा काळ, हा सवाई कीचक जिवंत असतांना भीति कशाची? बाबासाहेब, हाच पहा मी आतांच्या आतां त्रिगर्तावर स्वारी करून आपल्या पायाशीं बांधून आणतों." युद्ध जवळ जवळ आल्याची एकएक वार्ता कानीं पडतांच उत्तर धडधडत्या अंतःकरणानें पण जोरदार शब्दांनीं आपल्या नोकरांना एकच उत्तर पुनः पुनः देतो. तें म्हणजे "जा, उत्तर जीवंत आहे एवढा निरोप शत्रूला कळीव, तेवढा बस्स आहे."

संगितांत रंगलेल्या उत्तराला रण-वाद्यांतून संगीत-वाद्याचे ध्वनि ऐकूं आले, तर स्वयंपाकघरांत बल्लवाचार्य होऊन राहिलेल्या अज्ञातवासांतील भीमाला प्रत्येक वस्तूंत युद्धच दिसूं लागलें. तो म्हणतो,

"स्वैंपाक करितांना प्रत्येक गोष्टींत मला युद्धचमत्कार दिसूं लागले आहेत. भाजी चिरून झाली म्हणजे रक्तपाताशिवाय मी कौरवांचे कंठनाळ कसे चिरले अशा भ्रमानं मी भांबावून जातों. आमटी रटरट शिजतांना डाळीचे दाणे वर उसळूं लागले म्हणजे मी मारलेल्या कौरवांचीं शिर-विरहित कबंधेंच रणनृत्य करूं लागलीं आहेत कीं काय असं मला वाटतं."

एकाच प्रसंगीं दोघांच्या दोन भिन्न वृत्ति केळकरांनीं मार्मिकतेनें रंगविल्या आहेत.

विनोदाचें वातावरण

'तोतयाचें बंड' या नाटकांत करुणरसाबरोबरच हास्यरसहि समांतर दिशेनें वहात आहे. बगंभटाचें सोंग घेतलेला हैबतराव तोतयाला म्हणतो, "बुंदीचे लाडू हेच आमचे तोफांचे गोळे. दर्भाच्या काड्या याच आमच्या तरवारी, भाले न् बरच्या! चौघड्याचा नगारा हेंच आम्हीं आजवर ऐकलेलं रणवाद्य! आम्हालाहि चांगला नेम मारतां येतो; पण आंतरपाटाच्या आड लपलेल्या वधूवरांच्या डोक्यावर अक्षता नेमक्या टाकण्यापुरता!"

विनोदाचा दुसरा प्रकार बगंभट व विठाई यांच्या संवादांत व संबंधांत दिसून येतो. शब्दावर कोट्या करून बगंभट विठाईस म्हणतो, "तुला यथमान करतां येतं हें मी रोज पाहतों, पण पवमान म्हणतां येतो का? तुला पुरुषाला सुक्तवितां येतं, पण पुरुषसूक्त येत नाहीं! तूं स्वतः चंडी आहेस, पण तुला शतचंडी कुठं करतां येते?"

भटजींचे सारेच संवाद खुसखुशीत आहेत. त्याचा विशेष गुण म्हणजे त्यांच्या भाषेचें अस्सल कोंकणी वळण. मराठी वाङ्मयांत अशी प्रादेशिक भाषा-वैशिष्ट्यें क्वचितच दाखविलीं जातात. त्यामुळें केळकरांच्या या बारकाव्याचें महत्त्व अधिकच. कोंकणांतील भटांचा एक संवाद ऐका.

पिकटंभट–अरे चिकटंभट, तूं मेल्या करीत तरी काय होतास? मी तुला एक शंभर हाक मारली असेल, पण आंतून कोणी ओ देईल तर राम-शिवा-गोविंदा.

चिकटंभट–अरे, मी आगरांत होतों नारळींच्या आणि पोफळींच्या झाडांना पाटाचें पाणी लावीत. तुझ्या साऱ्या हाका मीं ऐकिल्या; आणि ओही देत होतों दर हाकेगणिक. पण तुला ऐकूं येईल तर ना! अरे चिकटंभट, तूं आपल्या कानांतला मळ काढ जरा मळ.

पिकटंभट–एकूण तूं ओ देत होतास तर? पण तूं ओ देस ते कळेना कीं रेडकूं ओरडे तें कळेना, कीं रहाट करकर वाजे तें कळेना. अरे चिकटंभट, तूं जरा आपल्या घशास औंगण घाल औंगण.

तसेंच,

चिकटंभट—आमच्या निऱ्या बंदरांत शत्रूचें एखादें आरमार तर आलें नाहीं ? तसें असेल तर खा-खाडींतून बसून हो-होडींतून पळून जाईल.

पांडित्य-प्रदर्शनाचें विडंबन

'वीर-विडंबन' हें पौराणिक प्रहसन, तर 'नवरदेवाची जोडगोळी' हें काल्पनिक प्रहसन त्याचें कथा-बींज विलायती आहे. केवळ करमणूक करणें हाच त्याचा हेतु. त्यांत प्रणय-लीला, वेषांतरें, द्वंद्वयुद्धें इत्यादि मालमसाला भरपूर आहे. विनोदासाठीं माणकुबाई हें पात्र घातलें आहे. नसलेलें पांडित्य दाखविण्यासाठीं ही बाई अत्यंतऐवजीं अंत्यज, अंतःस्थ-ऐवजीं पांथस्थ असे चुकीचे प्रौढ शब्द वापरते.

'संत भानुदास' हें नाटक रसपूर्ण आहे. अनागुंदीच्या राजानें पंढरीच्या विठ्ठल-मूर्ति द्रव्याच्या बळावर आपल्या राजधानींत नेल्या व भानुदासानें त्या आपल्या भक्तीच्या बळावर परत आणल्या, असें हें रसाळ कथानक आहे. त्यांत भानुदासाच्या सुळाचा पुष्पवृक्ष होण्याचा चमत्कार आहे, भक्तीचा जिव्हाळा जाणणारे वारकरी आहेत आणि साक्षात् विठोबाहि प्रगट होतात. पण केळकरांच्या लेखणींतून भक्तिरसापेक्षां हास्यरसच निर्माण झाला आहे. पोटभरू बडव्यांचा पैशाचा हव्यास व आप्पयाची कानडी वळणाची मराठी भाषा यामुळें नाटकांत विनोद निर्माण होतो. पण विठ्ठल-भक्तीनें भानुदास रंगून गेले आहेत—तन्मय झाले आहेत, असा भक्तिरसाचा उत्कर्ष मात्र फारसा नाहीं. भानुदासाचा प्रथम प्रवेश पंढरपुरांत होतो, तेव्हां स्वार्थी बडव्यांनीं उपटसुंभपणानें जो कर बसविला, त्यासंबंधीं पुढील हास्यकारक संवाद होतो.

"भानुदास—काय हो, हा कर तुम्हीं कुणाच्या हुकुमानं वसूल करतां ?

दग०—संस्थानच्या.

भानु०—संस्थान कुणी स्थापलं ?

दग०—पंचांनीं.

भानु०—आणि पंच कुणीं नेमले ?

दग०—संस्थाननं ! " सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवियला " असा अभंगच आहे. कट म्हणजे दाराजवळची तिठ्याची माऱ्याची जागा ! " या नाटकाच्या जन्मवेळींच आळंदीस नवा कर बसला होता.

शाब्दिक कोट्या व मार्मिक युक्तिवाद हे बुद्धिचातुर्याचे खेळ केळकर हवे तितके दाखवूं शकतात, पण प्रेक्षकांची हृदयें हालवील, पाझरवील, प्रसंगीं फोडीलहि; असे भावनोत्कट प्रसंग निर्मिणें केळकरांच्या कक्षे-बाहेरचेंच होतें. बुद्धि-विलासाच्या दृष्टीनें त्यांचीं नाटकें वाचनीय आहेत.



वासुदेवशास्त्री खरे : : : ८

शिवनेरीच्या किल्ल्यावर, दरबारच्या दिवाणखान्यांत, शहाजी, जिजाबाई, स्वामी इत्यादि मंडळी जमली आहेत. रत्नजडित पाळण्यांत बाल-शिवाजी पहुडले आहेत. स्त्रीपुरुषमंडळी " जो जो जो जो रे । शिवराया । मुख पावो तव काया ॥ धर्मध्वज कडाडला । जन गडबडला । मोहमहार्णवीं पडला । तो तूं ताराया । असहाया । येसि महाराष्ट्रा या । " हा पाळणा आनंदानें, अभिमानानें, आशेनें गात आहेत आणि 'महाराष्ट्राच्या या छत्रपतीला मींच प्रथम मुजरा करतों ' असें म्हणून जाधवराव पाळण्यांतील बाल-मूर्तीला वंदन करतो—



हें रंगभूमीवरील दृश्य पहातांच, तें खरेंच आहे असें मानून, कोल्हापूरचे छत्रपति शाहूमहाराज, आपल्या पहिल्या रांगेंतील खुर्चींवरून उठून उभे राहिले आणि उचंबळत्या स्वाभिमक्तीनें त्यांनीं पाळण्यांतील शिवछत्रपतीला मुजरा केला ! इतका विलक्षण परिणाम घडविणारें नाटक म्हणजे ' शिव-संभव. ' अर्थात् नाट्याचा विषय, रसिकाची भावना व नटांचें अभिनय-कौशल्य हेहि या यशाचे भागीदार आहेतच, पण त्या यशाचे मुख्य घटक म्हणजे नाटकाचे निर्माते—वासुदेवशास्त्री खरे.

इतिहासाचें संशोधन

नाटक म्हणजे काव्याचें एक रम्य अंग, आणि इतिहास हा तर प्रबंधाचा रुक्ष प्रकार. पण या दोहोंची सांगड खरेशास्त्री यांनीं सुंदरपणें घातली. षटवर्धनीं दप्तराचें संशोधन करून त्यांतील कागदपत्र त्यांनीं ' ऐतिहासिक लेखसंग्रह ' या आपल्या मासिकांतून प्रसिद्ध केलें. त्यापायीं त्यांना मोठी झीज़हि सोसावी लागली. तरी ऐतिहासिक लेखसंग्रहाचे बारा खंड त्यांनीं छापून प्रसिद्ध केलेच. पानिपतच्या युद्धापासून बाजीरावाच्या अखेरीपर्यंतचा इतिहास टीपा-प्रस्तावासहित त्यांनीं उजेडांत आणला. याशिवाय ' अधिकार-योग ' हें नाना फडणिसावरचें पुस्तकहि त्यांनीं प्रसिद्ध केलें. इचलकरंजी संस्थानचा इतिहास, हरिवंशाची बखर, मालोजी व शहाजी इत्यादि संशोधनपूर्ण व चिकित्सापूर्ण ग्रंथहि त्यांनीं रचिले.

नाट्यांतील ध्येयवाद

डोंगरांत बोगदे पोखरण्याचें हें विकट काम करणारे खरेशास्त्रीच तेथें नाट्यकलेची सतारहि वाजवीत होते हें विशेष. ऐतिहासिक किंवा ऐतिहासिकासारखीं कल्पित अशीं आठ नाटकें लिहून त्यांनीं ललित लेखन केलें. इतिहासांतील अद्भुत घटनांच्या पायावर खरेशास्त्र्यांनीं आपलें नाट्य-मंदिर उभारलें आहे. ' शिवसंभव ' हें तर प्रत्यक्ष इतिहासावरील नाटक होय. पण बाकीच्या कल्पित नाटकांतहि ऐतिहासिक वातावरणच त्यांनीं निर्माण केलें आहे. ते जसे इतिहास-संशोधक, तसेच कवीहि होते. आणि या दोन्ही गुणांचें प्रतिबिंब त्यांच्या नाट्यसृष्टींत पडलेलें आढळतें. ' यशवंतराव ' नांवाचें त्यांचें महाकाव्य प्रसिद्ध आहे आणि ' जन्मभूमि ' या कवितेंतील ' पोटासाठीं भटकत जरी ' इत्यादि पंक्ति तर शाळकरी मुलाला आनंदानें व बेकार तरुणाला दुःखानें सदैव आठवतात. ' आंबे, पोफळी, साग, नारळि तटीं ' इत्यादि त्यांनीं केलेलें कोंकणचें वर्णनहि मराठी वाचकांना सुपरिचित आहे. सुदृढ संविधानक, प्रौढ भाषा व उत्कट रस या गुणांनीं त्यांचीं नाटकें रंगभूमीवर लोकप्रिय झालीं. शृंगाररसाला फारसा अवसर शास्त्रीबुवांनीं दिलेला नसला, तरी वीर, अद्भुत व करुण हे रस

त्यांनीं चांगलेच खेळविले आहेत. पतिभक्ति, राष्ट्रनिष्ठा, धर्मभक्ति, बुद्धि-चातुर्य इत्यादि गुणांचे पुतळे त्यांनीं आपल्या नाट्य–सृष्टींत उभारले आहेत. तेजस्वी स्त्रियांचे उज्ज्वल आदर्श त्यांनीं, खाडिलकरांइतक्या कौशल्यानें नसले तरी, तितक्याच प्रमाणांत निर्मिले आहेत. रंजन व उद्बोधन हीं दोन्ही कार्यें करण्यास समर्थ अशींच त्यांचीं नाटकें रंगेल व रंगेल आहेत. त्यांच्या नाटकांचें एक गंमतीचें लक्षण असें कीं, सर्व नाटकांचीं नांवें पांच–अक्षरीं असून दोन चरणांचीं आहेत व तिसऱ्या अक्षरावर अनुस्वार असतो. ' गुणोत्कर्ष ' हें पहिलें नाटक तेवढें अपवाद आहे.

विद्येसाठीं कष्ट

कृष्णाकांठावर नाट्याचें पीक काढणारे वासुदेव वामन खरे यांचा जन्म समुद्रकांठच्या गुहागर गांवीं ता. ५ ऑगस्ट १८५८ रोजीं झाला. 'समुद्र' या काव्यांत त्यांनीं कोंकणचें सृष्टिसौंदर्य रंगवून आपल्या जन्मभूमीचें ऋण फेडलें. त्यांचे वडील शास्त्री होते. प्राथमिक शिक्षण झाल्यावर वासुदेवशास्त्री वयाचे अठरावें वर्षीं साताऱ्यास आले. तेथील एका साप्ताहिकांत ते अग्रलेख लिहून देत. त्याचा मोबदला काय ? तर एक भाकरी व वाटीभर आंबील ! गरिबी त्यांच्या पांचवीसच पुजलेली ! वयाच्या आठव्या वर्षींच शाळेंत बसल्याबसल्या त्यांनीं मोरोपंती थाटाची एक आर्या रचून आपल्या मित्रांना चकित केलें होतें. संस्कृत पंडित होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा. त्यासाठीं ते बरोबर फक्त सहा आणे व थोडे पोहे घेऊन गुहागराहून पायीं निघाले. शंभर मैलांची मजल मारून ते मलकापुरास गेले. तेथें आपली कवित्व-शक्ति दाखवून उपाशी पोट भरलें व कोल्हापूरला कूच केलें. कोल्हापुरास संस्कृतचें अध्ययन करीत असतां श्रीमंत कागलकरांच्या दरबारांत वासुदेवानें आपल्या कविता म्हणून दाखविल्या. त्या ऐकून संतुष्ट झालेल्या श्रीमंतांनीं त्याला शालजोडी-दक्षिणा वगैरे देऊन बहुमान केला. हें सारें कर्तृत्व झालें १५।१६ वे वर्षींच. साताऱ्यास त्यांनीं संस्कृतचें विशेष अध्ययन केलें. त्या भांडवलावर त्यांनीं पुणें येथें संस्कृत शिक्षकाची नोकरी मिळविली.

शास्त्रीबुवांच्या ग्रहमालेंत

शिक्षक झाले तरी त्यांची विद्यार्थि-वृत्ति सुटली नाहीं. व्याकरणशास्त्राचा सखोल अभ्यास त्यांनीं चालविला. त्याच वेळीं ' मालाकार ' विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या कर्तृत्वाचे किरण महाराष्ट्राला प्रकाशित करीत होते, सचेतन करीत होते. त्यांच्या लेखनांतून खरेशास्त्री यांना इतिहास-संशोधनाची स्फूर्ति मिळाली. 'मालाकारांच्या' न्यू इंग्लिशस्कूलमध्यें प्रारंभींच ते शिक्षक म्हणून गेले. तेथें एक वर्ष काम केल्यावर ते लो. टिळकांच्या शिफारशीनें मिरजेस शिक्षक म्हणून गेले—आणि आमरण तेथेंच अध्यापन, संशोधन व लेखन करीत राहिले. फक्त पंचेचाळीस रुपये पगारावर तीस वर्षें त्यांनीं शिक्षकाचें काम केलें. काव्य, नाटकें व ऐतिहासिक ग्रंथ अशी त्रि-विध साहित्य-सेवा करून यांनीं मोठा लौकिक मिळविला आणि ता. ११ जून १९२४ रोजीं इहलोकीचा निरोप घेतला. विष्णुशास्त्र्यांच्या ' केसरी ' पत्रावरील ' गजालिश्रेष्ठा या ' या श्लोकाचें समवृत्तांतलें भाषांतर वासुदेवशास्त्र्यांचेंच. त्यांनींच मूळ संस्कृत श्लोक सुचविलेला. ' केसरी ' हें नांवसुद्धां त्यांच्याच मेंदूंतून निघालेलें. शाळेंतहि ते संस्कृत श्लोकाचें समवृत्त मराठी भाषांतर हां हां म्हणतां करून देत. संगीत कलेचा व बुद्धिबळाचा नाद त्यांना होता.

इंग्रजीचा अभ्यास

ध्येयनिष्ठा, उद्योगप्रियता, बहुश्रुतता व रसिकता या चार गुणांचा आदर्श शास्त्रीबुवांच्या जीवनांत पहावयास सांपडतो. मिरजेस गेल्यावर, प्रौढ वयांत, इंग्रजी शिकण्याची जरूरी त्यांना जाणवली. लगेच रात्रींचा दिवस करून, केवळ स्वतःच्या प्रयत्नानें, त्यांनीं इंग्रजीचा अभ्यास केला; इतका कीं, पुढें ते इंग्रजीतून व्याख्यानेंहि देऊं लागले. त्यांची स्मरणशक्ति जबर होती. शाळेंत संस्कृत नाटकाचा सबंध अंक ते म्हणून दाखवीत. मिरजेतील ग्रंथालयांमधील चारशें इंग्रजी ग्रंथ त्यांनीं वाचले. प्रसंगीं उपास काढून, पायपिटी करून, पांच लाख ऐतिहासिक पत्रें वाचून, महत्त्वाच्या कागदपत्रांच्या नकला स्वहस्तानें करून, गरिबींत राहून, शास्त्रीबुवांनीं पंचवीस वर्षें जें

इतिहास-संशोधनाचें प्रचंड कार्य केलें आहे, त्यामुळें त्यांना राजवाडे–पारसनीसप्रभृतींच्या श्रेष्ठ श्रेणींत स्थान मिळालें आहे.

पहिल्या सलामीलाच मात !

'गुणोत्कर्ष' हे शास्त्रीबुवांचें पहिलें नाटक. कोल्हापूरच्या शाहू-महाराजांच्या राज्यारोहणानिमित्त कॉलेज-विद्यार्थ्यांना एक नाटक करावयाचें होतें. त्यासाठीं बक्षीस जाहीर करण्यांत आलें होतें. या बक्षिसाच्या स्पर्धेसाठीं १८८५ सालीं त्यांनीं तें रचिलें. त्या स्पर्धेत देवलांच्या 'दुर्गे'वर मात करून या नाटकानें पहिलें बक्षिस मिळविलें. विद्यार्थ्यांसाठीं रचलेल्या या नाटकांत स्त्रीपात्र एकच आहे. स्वामिभक्त जिवाजीपंताचें साधेंभोळें पण इमानी स्वभावचित्र आपल्या या पहिल्या नाटकांतहि शास्त्रीबुवांनीं चांगलें रंगविलें आहे. त्याचबरोबर त्याचा मुलगा कृष्णराव याचाहि शूर व दिलदार स्वभाव स्पष्टपणें रेखाटला आहे. चांगले आणि वाईट अशा दोन्ही प्रवृत्तींचे प्रवाह संभाजीच्या पात्रांत त्यांनीं कुशलपणें खेळविले आहेत. तरीहि सर्वांत ठसठशीत स्वभाव-रेखा म्हणजे शिवाजीमहाराजांची. वास्तविक नाटकाच्या कथानकांत त्यांचें स्थान गौण आहे. पण तरीहि महाराजांचें शब्द-चित्र शास्त्रीबुवांनीं उत्तम रेखाटलें आहे. 'धर्म्या' या नांवानें मोतद्दाराची नोकरी करणारे महाराज लढाईचा प्रसंग येतांच कृतांतकाळ बनतात आणि आनंदाचा प्रसंग येतांच आपल्या सेवकांचा मुक्तकंठानें गौरव करून आपलें औदार्य अखंड उधळीत असतात. त्यांच्या या दुहेरी गुणसंपदेचें वर्णन मोरोपंत पेशवे पुढील शब्दांनीं करतात, "जिवाजीपंत, महाराज जसे रणशूर आहेत तसेच ते दानशूरही आहेत. रणामध्यें शत्रूवर प्रहारांचा वर्षाव करीत असतां तो "नको, नको" म्हणूं लागला कीं, महाराज दयावंत होऊन आपला हात लागलाच थांबवितात; परंतु तीच कृपा दानामध्यें याचकावर होत नाहीं. तो "नको, नको" म्हणूं लागला कीं, उलटा त्याजवर देणग्यांचा वर्षाव मात्र होतो." शास्त्रीबुवांचें हें पहिलेंच नाटक असल्यामुळें त्यांत खटकेबाज व सुटसुटीत संवाद फारसें नाहींतच, उलट नाट्याला बाधक व कादंबरीला शोभेशी लांबलचक वर्णनें, क्वचित क्लिष्टहि, आलेलीं आहेत

रहस्यपूर्ण कथानकें

रहस्यपूर्ण कथानकें रचून त्यांत उत्कंठापूर्ण प्रसंग गुंफण्यांत शास्त्रीबुवांचा हातखंडा आहे. 'उग्रमंगल' या नाटकांत तर रहस्याच्या गुंतागुंती अधिकच आहेत. शृंगार, वीर, करुण, हास्य व अद्भुत या रसांचे शिडकाव करणाऱ्या प्रसंगांनीं या नाटकाचें कथानक गजबजलेलें आहे. राणी पद्मावतीला आपल्या पतीवर एका महिन्यांत प्राणसंकट येऊन कोसळणार असें भविष्य कळतें आणि म्हणून ती त्याला त्या काळापुरतें प्रेम-विलासांत गुंतवून ठेवते. परंतु त्रस्त प्रजेनें त्या वसंतोत्सवांतून राजाला बाहेर पडावयास लावलें. तेव्हां राणी तपश्चर्या करते, राजाला शत्रूनें विश्वासघातानें कैद केल्यानंतर ती स्वतः नर्तकीचा वेष घेऊन शत्रूला कैद करते आणि शेवटीं सेनापतीचा अधिकार हातीं घेऊन शत्रूचा निःपात करण्याचें शौर्य गाजविते. कपटास कपट व शठास शाठ्य अशा मुत्सद्दीगिरीनेंहि ती वागते. विलासिनी, तपस्विनी व रणरागिणी या तिन्ही नात्यांनीं राणीनें जो स्वभाव प्रगट केला आहे, त्याचें मनोहर चित्रण 'उग्रमंगल' नाटकांत केलें आहे. स्त्रिया व राजकारण, विग्रहवाद व संधिवाद यांची मीमांसाहि संवादांतून प्रसंगोपात्त सहजगत्या केली आहे. रुप्याची बेडी, कट्यारीचा नाच, मानभंगासाठीं ठेंगणा दरवाजा, कंडेलोटासाठीं आणलेला राजा इत्यादि चित्त थरारविणारे प्रसंग या नाटकांत ठेंचून भरलेले आहेत.

संग्रामांतील नाट्य

शास्त्रीबुवांच्या नाट्य-रत्नहाराचा मेरुमणी म्हणजे 'शिवसंभव.' ज्याला ज्याला म्हणून शिवरायाचा व त्याच्या स्वराज्याचा अभिमान वाटतो, त्या प्रत्येकाच्या अंगावर क्षणाक्षणाला रोमांच उभे करील असेंच हें नाटक आहे. अटीतटीचे पेंचप्रसंग चढत्या श्रेणीनें त्यांत गोंवलेले आहेत आणि कडोविकडीच्या संवादांनीं ते रंगविलेले आहेत. पहिला प्रवेशच मुळीं 'आनंदाला पारावार नाहीं.' असा रसपूर्ण आहे. त्यांत जिजाऊचें स्वप्न आहे, देवीचा दृष्टांत आहे, स्वामींचें श्रीफल आहे—चमत्कारांनीं भरलेले प्रसंग त्यांत जसे आहेत; तसेंच पतीची

मार्गप्रतिक्षा करणाऱ्या साध्वींच्या हृदयाची हुरहुरहि मूर्तिमंत उभी केलेली आहे. त्यानंतर शहाजी आपल्या सासऱ्याकडे--जाधवरावाकडे--अखेरचें बोलणें करण्याकरतां जातो, तोहि प्रसंग तडातडीचा आहे. 'मोंगल-बादशहांना शरण या' असा उपदेश जाधवराव आपल्या जावयाला करतो, तर त्यांना शहाजी भावी स्वराज्याचें दिव्य दर्शन घडवितो. या विचार-संग्रामाचें मूर्तिमंत चित्र शास्त्रीबुवांनीं काढलें आहे. यापेक्षां अधिक निकराचा संघर्ष दुसऱ्या अंकांतील दुसऱ्या प्रवेशांत आहे. जाधवराव निजामाच्या दरबारांत जातो आणि त्याला बजावतो, 'शहाजीला वजीर पदावरून काढून मला त्या जागीं काम करूं द्या.' त्यावेळचा तिहेरी शाब्दिक संग्राम नाट्याला अत्यंत पोषक आहे. शेवटीं जेव्हां जाधवराव 'शहाजीचा भावी पुत्र छत्रपती होणार' अशी धमकी निजामशहाला घालतो, तेव्हां कोटीनें कोटी झाडून निजाम उत्तरतो, "जर माझ्या वजिराचा मुलगा बादशहा होईल तर मी शाहेनशहा, म्हणजे बादशहांचा बादशहा होईन." शाब्दिक चकमकीचा हा कळस पाहतांना श्रोत्यांच्या टाळ्यांचा कडकडाट सहजच होतो.

जिजाबाईची ओटी भरण्याचा प्रसंग या नाटकांत मोठा रमणीय आहे. त्यावेळीं सर्व स्त्रिया आनंदानें गाणें म्हणतात. पण या आनंदाची प्रतिक्रिया करण्यासाठीं जाधवराव तेथें येतो आणि जिजाबाईची ओटी पुनः पुनः उधळतो! तो आपल्या कन्येशींहि विश्वासघात करतो!! या प्रसंगाप्रमाणेंच पुढें जाधवराव व जिजाई यांची रणसंग्रामावरील भेटहि रोमांचकारक आहे. अखेर तिचें रणचातुर्य पाहून जाधवरावांच्या भ्रांत स्वामिभक्तीचा डोंगर कोसळतो आणि गहिंवरून 'ये, वीरकन्ये! ये!' असें म्हणून तो तिला आलिंगन देतो. अशा रसपूर्ण प्रसंगांची मालाच या नाटकांत शास्त्रीबुवांनीं गुंफली आहे.

शहाजीचें स्वभाव-चित्र

'शिवसंभवां'तील शहाजीचें स्वभावचित्र अत्यंत धीरोदात्त आहे. छत्रपतींच्या जनकाला शोभेल असेंच वैराग्य त्यांच्या अंगीं आहे. ते म्हणतात,

" बापाच्या लहरीपासून जिनें लहरी स्वभाव घेतला ती चंचल लक्ष्मी ! तिच्या पाठीस कोण लागला आहे ? केवळ इंद्रियार्थांची तृप्ति करणारे पण वस्तुतः रोगांचें आगमन सुचविणारे जणूं काय त्यांचे भालदारच, असे ते तुच्छ विषयभोग ! त्यांचा कोणाला हव्यास आहे ? जिथें मुळीं सुलतानाच्याच अधिकाराची शाश्वती नाहीं तेथें वजिरीच्या अधिकाराला काय किंमत आहे ? जिथें मुळीं देवच देव्हाऱ्यांत रहाण्याची भ्रांति, तिथें पुजाऱ्याची वतनदारी कशी चालेल ? "

शहाजीचें वैराग्य व्यवहाराला विन्मुख नाहीं, त्याचप्रमाणें त्याची निजामसेवाहि स्वराज्याला बाधक नाहीं. तो जिजाबाईला आपला निश्चय सांगतो, " आपलेंच असें निराळें स्वतंत्र मराठी राज्य निर्माण करण्याच्या उद्योगाला एव्हांपासून लागलें पाहिजे. त्याकरतां मराठ्यांची बुद्धि व पराक्रम एकत्र करून त्यांचा ओघ या कार्याकडे वळवला पाहिजे. एकंदर मराठमंडळांत आत्मविश्वास, साहसाची प्रीति व दृढनिश्चय हीं उत्पन्न केलीं पाहिजेत. "

त्यागाची तयारी

स्वराज्य-संस्थापनाच्या कार्यांत साऱ्या मराठ्यांना एकत्र आणावें, यासाठीं शहाजीची स्वार्थत्यागाची तयारी फार मोठी आहे. तो जाधवरावांना आश्वासन देतो, " मी सुलतानाचा वजीर होईन आणि आपल्या तेजाला मालिन्य येईल, असें भय असेल, तर आपणच वजीर होऊन राज्य संभाळा, माझी हरकत नाहीं. मराठ्यांचें नेतृत्व मी संपादन केलें याबद्दल मत्सर वाटत असेल, तर आपणच आपल्या समाजाचे अग्रणी व्हा ! मी आपला आज्ञाधारक होऊन सांगाल तसें वागेन. जाधव-भोसल्यांनीं एकमेकांवर चढाओढ करण्याची झटापट आजपर्यंत केली, ती पुरे झाली ! माझ्या कुळाचा अभिमान मला आहे, माझ्या पराक्रमाचा अभिमान मला आहे, परंतु एका देशप्रेमाच्या पायीं मी सर्व प्रकारच्या अभिमानावर पाणी सोडायला तयार झालों आहें."

पण खोट्या स्वामिभक्तीनें अंध झालेल्या जाधवरावांच्या डोळ्यांना हें नवें दिव्य तेज दिसूं शकलें नाहीं. त्यांची वृत्ति कशी होती याचें वर्णन शहाजीनें पुढील अलंकारिक शब्दांनीं केलें आहे.

"तरवारीला पोलादाचें पाणी पाजण्यापूर्वीच त्यांनीं स्वभावाला द्वेषाचें पाणी पाजलें आहे! धनुष्याला वक्रता येण्यापूर्वीच कौटिल्यानें त्यांच्या मनाला वक्रता आली आहे! समरांगणांतल्या धुळीनें बहिरंग मलिन होण्यापूर्वीच राज्यलोभानें त्यांचें अंतरंग मलिन झालें आहे! रणवाद्यांच्या कर्कश नादांनीं कानठळ्या बसण्यापूर्वीच ते हितोपदेशाला बधिर झाले आहेत!"

स्वराज्याचें नव-चैतन्य

असे कांहीं अपवाद शहाजीच्या वाटेंत धोंड म्हणून आले असले, तरी एकंदरींत सारा महाराष्ट्र त्यांच्या स्वराज्य-संपादनाचे पाठीशीं उभा होता. महाराष्ट्रांतील या नवचैतन्याचे चटके मोंगल सरदाराला बसूं लागले; तेव्हां तो म्हणूं लागला,

"या मुलखांत शहाजी भोसल्यानें जी धामधूम उठविली आहे तिला आगा ना पिच्छा! हजारोंलाखों मराठ्यांनीं झोपेंतून एकदम जागें झाल्याप्रमाणें खडबडून उठावें, अतोनात आवेशानें आणि घाईनें लढाईच्या तयारीला लागावें, शहाजी भोसल्यांचा केव्हां काय हुकूम येतो इकडे उत्कंठेनें डोळे लावून बसावें, असें झालें आहे तरी काय? काय या लोकांना एकदम वेड लागलें म्हणावें, कीं भुतानें पछाडलें म्हणावें, कीं जादूनें मारलें म्हणावें? शहाजीनें असें कोणचें आमिष तमाम मराठ्यांच्या डोळ्यापुढें धरलें आहे, कीं जें मिळविण्यासाठीं त्यांनीं बेफामपणानें आगींत उडी घ्यायला तयार व्हावें?"

शहाजीप्रमाणेंच जिजाऊचेंहि स्वभावचित्र शास्त्रीबुवांनीं मोठ्या तन्मयतेनें रेखाटलें आहे. अथपासून इतिपर्यंत जिजाऊचें जीवन म्हणजे पतिनिष्ठा, धर्मश्रद्धा, स्वातंत्र्यभक्ति, बुद्धिचातुर्य, रणशौर्य, सेवकांविषयीं वात्सल्य इत्यादि अनेक गुणांची जणुं पुष्करिणी आहे. आपल्याला झालेला देवीचा दृष्टांत सांगतांना ती शहाजी राजांना म्हणते, "वाटे कीं, देवीच्या अंगावर हिऱ्यामोत्यांचे दागिने झळकत आहेत, त्यांच्याच प्रकाशाचा हा लखलखाट नसेल ना? अथवा तिनें शुभ्र वस्त्रें परिधान केलीं आहेत तीं

विजेच्या तंतूंनीं विणलीं असावीं, आणि त्यांचाच हा देदीप्यमान प्रकाश असावा ! अथवा तिच्या कोमल हास्याचें तें चांदणेंच फांकलें असावें ! ”

धीरोदात्त स्वभाव-चित्रें

‘ गुणोत्कर्षा ’तील तरुण संभाजी भावनाशील व विकारवश असा दाखविला आहे, तसाच शौर्य-औदार्यादि आनुवंशिक गुणांचा पुतळा रंगविला आहे. कुसंगतीमुळें त्याचें पाऊल वाममार्गावर पडलें असलें, तरी त्याचे संस्कार त्याला अनाचाराच्या टोकापर्यंत जाऊं देत नाहींत. तो खलनायकाला क्रोधानें म्हणतो, “ दुष्टा ! ज्या वीराचें मन एवढें उदार कीं, ज्यानें मी निःशस्त्र झालों असतां मजवर हत्यार धरण्याचें नाकारलें; तो मूर्च्छित पडला असतां त्याचा खून करणें हें मांगाचें काम, तें तूंच करशील ! माझ्या हातून ही गोष्ट कदापि घडणार नाहीं ! ”

‘ तारामंडळ ’ या नांवाचा रत्नहार सेनापतीच्या मुलानें जिंकून आणला असतांना दुर्जनसिंगाच्या कारवाईमुळें सेनापतीवर फितुरीचा आरोप येतो आणि राजा त्याला देहांत शासनाची शिक्षा ठोठावतो. या दुष्ट चक्राचा भेद करण्यासाठीं शालिनी निरनिराळे व्यूह रचते. प्रीताई ही दाई वेडीचें सोंग घेऊन खलनायकाचें कारस्थान उलथण्यास मदत करतें आणि शेवटीं राजाला सत्य कळून येऊन शेवट गोड होतो. या नाटकांतील सेनापती इतबारराव याचें स्वभावचित्र उदात्त आहे.

दुर्बोध भाषा-शैली

बहुतेक सर्वच नाटकांतील शास्त्रीबुवांची भाषाशैली संस्कृतप्रचुर व निबंधाजोगी आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं तर ती दुर्बोधहि आहे. ती वापरतांना त्यांनीं पात्रापात्रविचारहि फारसा केलेला दिसत नाहीं. पुरुष असो-स्त्री असो, विद्वान असो-अडाणी असो, सर्वांची भाषा एकसारखी-म्हणजे शास्त्रीबुवांसारखी ! “ असुख, महदन्याय, सौरस्य, महोदार, पुरुषायत्त, स्वाधीनभर्तृका, देशोच्छेद, दुर्मार्गाचे उच्छेदक, हतभागी फलत्यागी जीवित ” असे जाडे जाडे शब्द शहाजीच काय, पण जिजाऊ, आणि जिजाऊच काय, पण एखादी दासीसुद्धां सहज बोलून जाते.

गडकऱ्यांनाहि अचंबा वाटावा अशा कल्पना-सौंदर्यानें नटलेलें वाक्य 'शिवसंभवां' तील जिजाबाई बोलते. ती म्हणते, 'विवेक-सिंधूचा पोहणारा, शेवटीं स्त्रीमोहानें मूढ होऊन, क्षुद्र ममतेच्या गोष्पदांत बुडाला.'' याच्याहि पुढे मजल मारून ती म्हणते, '' अनेक अनर्थ व भयें बगलेस मारून व तीं झांकण्याकरतां अंधाराचें जगद्व्याळ वस्त्र पांघरून ही असंख्य वर्षें वयाची खोडसाळ म्हातारी-ही रात्र. '' त्याचप्रमाणें ती आपल्या माहेरचा महिमा '' धर्माचे सागर, धैर्याचे मेरु, प्रतापाचे सूर्य '' अशा अलंकारिक शब्दांनीं वर्णन करते. त्याचप्रमाणें स्वामींच्या वचनावरील आपली श्रद्धा व्यक्त करतांना एखाद्या संस्कृत पंडिताप्रमाणें जिजाऊ म्हणते, '' नद्यांचे ओघ परत फिरतील, पर्वत चालू लागतील, सूर्य पश्चिमेस उगवेल.....''

जिजाबाईचे वडील जाधवराव हे तर पट्टीच्या शास्त्र्याचीच भाषा बोलतात, '' हें भोसले भारी भारीच घमेंडखोर ! वेड्यांच्या व्याकरणांत प्रथम आणि मध्यम पुरुष नाहींच ! इथून तिथून उत्तम पुरुष ! जिथें तिथें मीं केलें ! मीं जिंकलें ! मीं मिळविलें ! अहं ! आणि पूर्वीपासून पहातों आहें, हे भोंसले फार फार लबाड ! लोकांवर पगडा बसविण्यासाठीं आणि स्वतःचें स्तोम माजविण्यासाठीं काय काय कादंबऱ्या रचतील याचा नेमच नाहीं !'' खुद्द शास्त्रीबुवांच्या मनावर संस्कृत विद्येचा पगडा मोठा होता हें एक यांचें कारण असूं शकेल. तसेंच, त्या काळीं संस्कृतचा प्रसार घरीं दारीं, बायकापोरांतहि आतांपेक्षां पुष्कळच होता हेंहि आणखी एक कारण असूं शकेल. पण नाटकाच्या सहजपणाला ही भाषा बाधकच ठरते.

शब्द-लीलेचे चमत्कार

शास्त्रीबुवांनीं आपल्या अडाणी पात्राकडूनहि केवळ संस्कृत शब्दच वदविले आहेत असें नव्हे, तर एखाद्या नवथर कवीप्रमाणें शब्दलीलाहि करून दाखविल्या आहेत. '' सूर-भरणा-असुर-भरणा, '' असा श्लेष हुजऱ्यासुद्धां करतो. '' सैन्याचा गोट—राणीच्या हातांत गोट '', '' बंदुकीचा तोडा-हातांतील तोडा '' '' फौजेच्या बाजू बंद करणें-

बाजूबंद दृष्टीला पडणें", "खजिन्याच्या पेट्या—गळ्यांतील पेट्या," इत्यादि श्लेषांची गर्दी मराठमोळा स्त्रीपुरुषांनीं उडवून दिलेली आहे. एवढेंच नव्हे तर, "ककार—चकार," "समोर—मोर," अशा बालिश कोट्याहि विनोदाच्या निमित्तानें कांहीं पात्रें करतात. "गाण्यांतला राग सारंग, साथ करणारी सारंगी, ती वाजविणारा सारंग्या आणि श्रोतेसुद्धां सारंगच! असें हें सारंगांचें चतुरंग सैन्य पहातांच तिथल्या सारंग—नयनांची मोठी तारांबळ होईल." इत्यादि शाब्दिक कसरती नाटकाच्या स्वाभाविकपणाला बाधक व रसाळपणाला मारक आहेत.

'देशकंटक' या नाटकाचा प्रारंभ किती रसपूर्ण प्रसंगानें होतो! दोन बहिणी माहेरीं आलेल्या आहेत आणि आपापल्या संसारांतील सुखदुःखें सांगत आहेत. पण त्यांचे संवाद म्हणजे रसशून्य चिपाडें आहेत. एवढेंच नव्हे तर, अस्वाभाविक शब्दलीलाहि त्यांत आहेत.

मंदाकिनी म्हणते, "जशी ईश्वराची माया, जशी सूर्याची छाया, जशी जीवाची काया, तशी मी तुमची जाया आहें—निरपराध, निष्पाप जाया आहे."

मालती तर आपत्तीच्या वेळींहि म्हणते, "संभावना ज्याच्या त्याच्या योग्यतेनुरूप होते, ती केवळ नात्यावरून होत नसते. समुद्रापासून जन्म पावलेले चंद्र आणि शंख हे भाऊभाऊ खरे, पण चंद्र हा गौरीच्या शिखरावर आरूढ होऊन पूजेचा सत्कार पावतो. आणि शंख त्या पूजेच्या वेळीं जणू काय मत्सरामुळेंच—स्वतःचा ध्वनि करीत असतो!

भुजंग०—एकाला विनाकारण चंद्र म्हणून डोक्यावर घ्यावें आणि दुसऱ्याला शंख ठरवून कोकलायला लावावें, हा तुम्हां बायकांचा केवळ स्वच्छंदीपणा आहे!

'देशकंटकां'तील एक संवाद या शब्दलीलेचा अतिरेक दाखवितो. खलनायकावर चडफडतांनाहि हा संवाद होतो ही खेदाची गोष्ट होय.

भुजंग०—ते केवळ तपस्तेजाचे भास्कर!

मंदा०—स्त्रियांच्या पातिव्रत्याचे तस्कर!

भुजंग०—दयाशांतीचे सागर!

सं. नं. १८३

मंदा०—मायामदिरेची घागर !

भुजंग०—सुकृताचे मूर्तिमंत राशी !

मंदा०—पेंढारपूरचे रहिवाशी ! धांदलगांवचे मिराशी ! अंधारनगरीचे रामोशी !

प्रसंगोचित अलंकार

''अलंकारांनीं तुझ्या सौंदर्याला शोभा येत नसून, तुझ्या सौंदर्यामुळें अलंकारांनाच उलट शोभा येते.'' असे समयोचित अलंकार राजाच्या भाषेमध्यें आनंदाच्या प्रसंगीं जेव्हां येतात, तेव्हां ते शोभून दिसतात. ''सरकारची तरवार आणि 'शत्रुपीडा' हा शब्द—हीं दोन्हीं आतां कोशांतच राहूं द्या.'' या वाक्यांतील 'कोश' शब्दावरील श्लेष तें बोलणाऱ्या पात्राला शोभेसाच आहे. 'उग्रमंगलां'तील हिरासिंग गवयांच्या हालचालींना मजेशीर उपमा देतो, तो म्हणतो, ''मूर्खाचे कान पिळवटल्याप्रमाणें हे गुणी लोक गाणें सुरू करतांना तंबुऱ्याच्या खुंट्या पिळवटीत असतात आणि दक्षिणेसाठीं पुढें घुसणाऱ्या उतावीळ आगंतुकाच्या तोंडावर चापट्या माराव्या, त्याप्रमाणें तबल्याच्या तोंडावर थापट्या मारीत असतात.''

' चित्र-वंचना ' हें शास्त्रीबुवांचें मोठ्या मौजेचें नाटक आहे. आपल्या पाणिग्रहणासाठीं आलेल्या राजपुत्राची परीक्षा करण्याकरितां राजकन्या आपल्या मैत्रिणीला राजकन्येचा वेष देते. प्रभावती व मदयंती यांचें प्रेम अलौकिक होतें. तें व्यक्त करतांना मदयंती म्हणते,—'' आणि माझे वडील म्हणत असतात, माझ्या मदयंतीला उन्हाची तिरीप लागली, तर राजकन्येचें तोंड कोमेजून जातें, आणि राजकन्येला कांटा लागला तर मदयंतीच्या डोळ्याला पाणी येतें ! '' शृंगारात्मक विनोदानें हें सारें नाटक फुललेलें आहे. चपळा-कंक यांचा व आचाऱ्यांचा विनोद स्थूल अपला, तरी सर्व दर्जाच्या प्रेक्षकांना हसविणारा आहे.

विनोदाचे प्रकार

शास्त्रीबुवांचा विनोद कांहींसा ओबडधोबडच असतो. 'उग्रमंगलां'तील

घटर्खपराचा विनोद याच मासल्याचा आहे. ' शिवसंभवां 'तील गांजेकस कमालखानाचा उपयोग विनोदासाठीं तर होतोच, पण त्याशिवाय कथानकाची घडामोड करण्यालाहि तो कारणीभूत होतो हें ठीक आहे. ' तारामंडळांतील ' वेशकरावाचा मूर्खपणा, मार्तंडभटाचा हावरेपणा व भामिनीचा हट्टीपणा यामुळें बराच विनोद निर्माण होतो. विनोद-निर्मितीसाठीं वेशांतर अनेक नाटकांत योजलेलें आहे आणि शब्दलीला तर सर्वत्र फुटाण्याप्रमाणें उडत आहेत. ' तिस्मारखान-चाळीस्मारखान ' अशा शाब्दिक कोट्याहि पुष्कळच आहेत.

' उग्रमंगलांतील ' गणक आपल्यावरील आरोप उडवून टाकतांना अशी विनोदी कैफियत देतो कीं, " माझा पहिला मुद्दा असा आहे कीं, यानें माझ्या हवालीं मुलगी मुळींच केली नाहीं. सबब ती देण्याला मी पात्र नाहीं. माझा दुसरा मुद्दा असा आहे कीं, यानें माझ्या हवालीं जी मुलगी केली होती ती आपोआप याची याच्याकडे पळून गेली आहे, सबब ती देण्याची जोखीम माझ्यावर राहिली नाहीं. माझा तिसरा मुद्दा असा आहे कीं, यानें जी मुलगी म्हणून माझ्या हवाली केली ती खरोखरीची मुलगी नसून मुलगा होता. "

स्वतंत्र रस

देशाभिमान हा जर स्वतंत्र रस मानला गेला, तर त्याचा उत्कृष्ट परिपोष करणारें नाटक म्हणून ' शिवसंभवा ' कडे बोट दाखवावें लागेल. सारे संवाद, सारे प्रसंग, सारें वातावरण, या एकाच रसानें ओतप्रोत भरलेले आहेत. स्वराज्यासाठीं तळमळणाऱ्या महाराष्ट्रीय जनतेला हें स्वराज्याचें उज्ज्वल दर्शन घडविणारें आशादायक नाटक अत्यंत प्रिय व्हावें यांत नवल काय ? त्याचे सुरवातीस लागोपाठ पन्नास प्रयोग झाले व त्यांनीं नाटकमंडळीला तारलें. 'कृष्ण-कांचन' या नाटकांतहि राष्ट्रधर्माचाच प्रकर्ष केलेला आहे. उज्ज्वला ही राज-भगिनी राष्ट्रासाठीं आपल्या प्रेमाचा होम करते. शास्त्रीबुवांच्या प्रत्येक नाटकांत राष्ट्रभक्ति, सत्यनिष्ठा इत्यादि गुणांचाच कलात्मक आविष्कार आहे आणि त्याचाच ठसा प्रेक्षकांच्या अंतःकरणावर

ठसठशीतपणें उमटतो. इतिहाससंशोधक शास्त्रीबुवांनीं नाटकें लिहिलीं, तीं मुख्यतः स्वतःच्या द्रव्यार्जनासाठीं व रसिकाच्या रंजनासाठीं हें जरी खरें, तरी समाजाच्या स्थैर्याला व प्रगतीला मूलाधार असणाऱ्या सद्गुणांचें सिंचन करण्यास ते कधीं चुकले नाहींत. नाट्यकलेमार्फतहि त्यांनीं राष्ट्र-मातेचीच सेवा केली. ते जसे तत्त्वज्ञ व संशोधक होते, तसे कवि व नाटककार होते—पण सर्वत्र होते देशभक्त !

भा. वि. वरेरकर : : : १

'कादंबरीकार' म्हणून वरेरकर जितके प्रसिद्ध आहेत, त्याहून अधिक 'नाटककार' म्हणून ते विख्यात आहेत. सुमारें पस्तीस नाटकें लिहून त्यांनीं मोठी कीर्ति कमावली आहे. विशेष हें कीं, त्यांची नाट्यसृष्टि बहुरंगी आहे. गेल्या शंभर वर्षांत मराठी नाट्यकलेचीं जीं जीं म्हणून स्थित्यंतरें झालीं; त्या सर्वांचीं प्रतिबिंबें वरेरकरांच्या नाट्यसृष्टींत दृष्टीस पडतात. कलेकलेनें विकास पावणाऱ्या चंद्राचीं प्रतिबिंबें एखाद्या स्वच्छ सरोवरांत दिसावींत, त्याप्रमाणें पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक वगैरे भिन्नभिन्न विषयांचीं नाटकें वरेरकरांच्या लेखणींत प्रतिबिंबित झालीं आहेत. नाटकाच्या बाह्यांगांतहि एकांकिका, एक-प्रवेशी नाटिका, श्रुतिका वगैरे जे जे बदल मराठींत झाले, त्या सर्वांचीं प्रतीकें वरेरकरांच्या नाट्यसृष्टींत पहावयास सांपडतात. किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं, नाटकाचा विषय व स्वरूप या दोन्ही बाबतींत जें जें कांहीं नवें असेल, तें तें प्रथम हस्तगत करण्याची धडाडी वरेरकरांची आहे. मराठी नाट्यकलेचे ते आघाडीचे वीर आहेत. राष्ट्रीय विचार किंवा समाजवादी तत्त्वज्ञान नाटकांतून मांडणारे ते बिनीचे स्वार आहेत. एकाद्या टेबलावर असलेला पृथ्वीचा गोल आपण हळूहळू फिरविला म्हणजे पृथ्वीवरील सर्व



स्थळांचें दर्शन होतें, तसें वरेरकरांच्या नाट्य-सृष्टीचीं विविध अंगें पहाणा-ऱ्याला मराठी रंगभूमीचीं बहुतेक सारीं बदलतीं स्वरूपें पहावयास सांपडतात.

विषयांची विविधता

'कुंजविहारी' हें वरेरकरांचें पहिलें नाटक १९०७ सालीं रंगभूमीवर आलें व खूप गाजलें. त्यांतील 'त्यजी भक्तासाठीं लाज' यासारखीं कृष्णाचीं पदें दीर्घकाळ रसिकांच्या जिव्हाग्रावर खेळत होतीं. 'करीन ती पूर्व' या नाटकांत त्यांनीं शिवाजीचें उज्ज्वल चरित्र झगझगीतपणें रेखाटलें आहे. 'सत्तेचे गुलाम' व 'सोन्याचा कळस' यानाटकांत मालक-मजुरांचा लढा आवेशपूर्ण रीतीनें मांडलेला आहे. हुंड्यासारख्या दुष्ट चालींचा निषेध 'हाच मुलाचा बाप' या नाटकांतून त्यांनीं केला आहे. पतितपरावर्तनाला वाचा फोडणारें त्यांचें 'संन्याशाचा संसार' हें नाटक फार यशस्वी झालें. स्त्रियांच्या दुर्दशेला तर त्यांनीं आपल्या बहुतेक सर्व नाटकांतून अग्रस्थानच दिलेलें आहे. खेड्यांतील देवस्कीचे दुष्परिणाम रंगविणारें एक नाटक त्यांनीं रचिलें. 'सारस्वत' हें केवढें चिमुकलें नाटक! पण त्यांतहि साहित्यानें श्रीमंत परंतु द्रव्यानें दरिद्री अशा लेखकाची करुण कहाणी त्यांनीं हृदयद्रावक रीतीनें मांडली आहे. त्यांच्या डोळ्यापुढें अन्नान्नदशेस पोंचलेले कैक वृद्ध साहित्यिक होते. त्यांचें जीवन, नाट्य-स्वरूपानें, परिणामकारक रीतीनें त्यांनीं समाजापुढें उभें केलें. १९५२ सालच्या दिवाळीमध्यें 'भूमि-कन्या सीता' नांवाचें नाटक लिहून वरेरकरांनीं वार्धक्यांतहि आपली प्रतिभा ताजीतवानी असल्याची साक्ष पटविली आहे. घरगुती भाषा, संग्रामपूर्ण प्रसंग, खटकेबाज संवाद, आणि जिव्हाळ्याच्या विषयासंबंधीं जळंजळीत विचार, या गुणांनीं वरेरकरांची नाट्य-सृष्टी नटलेली आहे.

धंदा व छंद

श्री. भार्गवराम विठ्ठल वरेरकर यांचा जन्म १८८३ सालीं चिपळूण येथें झाला. मालवण, दापोली व रत्नागिरी येथें त्यांचें शिक्षण झालें. मॅट्रिक होण्यापूर्वीच त्यांनीं पोस्टखात्यांत नोकरी धरली. पगार तीस रुपये.

१९०५ सालीं ते रोहें येथें पोस्टमास्तर होते. पुढें ती नोकरी सोडून ते मुंबईस गेले तेथें नाटकें, कादंबऱ्या, लघुकथा, पटकथा, रहस्यकथा असें विविध व सहेतुक वाङ्मय त्यांनीं लिहिलें. तोच त्यांचा जीवनाचा छंद व तोच त्यांचा चरितार्थाचा व्यवसाय. केवळ लेखनावर पोट कसें व किती भरूं शकतें याचें उदाहरण म्हणून वरेरकरांकडे बोट दाखवितां येण्यासारखें आहे. 'दुनिया' नांवाचें साप्ताहिकहि त्यांनीं कांहीं काळ चालविलें. त्यांना १९४५ सालीं धुळें येथील साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान देण्यांत आला. त्याशिवाय मुंबई सरकारच्या 'कला-पथका'चीं सूत्रें त्यांच्या हातीं देण्यांत आलीं होतीं. भारत सरकारच्या 'नभोवाणी सल्लागार मंडळांत' हि त्यांचा समावेश करण्यांत आला आहे.

कोल्हटकरी संप्रदाय

खाडिलकर-कोल्हटकरांसारख्या पदवीधर व प्रतिभाशाली नाटककारांच्या ऐन अमदानीचा तो काळ ! त्या वेळीं, कोणतीहि पदवी नसलेले व 'कड-कट्ट'ची नोकरी केलेले वरेरकर आपलें एकेक विशिष्ट गुणांचें नाटक घेऊन महाराष्ट्रीय रसिकासमोर उभे राहिले व त्यांनीं मोठें यश कमावलें, हें विशेष. गडकऱ्यांनीं सहा वर्षांच्या अल्पकाळांत आपल्या नाटकांतील प्रतिभेनें सारी मराठी रंगभूमि झळाळून टाकली, तरी वरेरकरांच्या नाट्याची दीप्ति कांहीं कमी झाली नाहीं. कोल्हटकरांच्या संप्रदायांतील कांहीं गुण-दोष वरेरकरांच्याहि नाटकांत शिरणें हा त्या कालाचा प्रभावच ! मात्र पुढें पुढें शब्दलीला करणें, अवजड भाषा वापरणें—इत्यादि कृत्रिमतेचीं कवचें त्यांनीं पार फेकून दिलीं आणि देवल-हरिभाऊंसारखी साधी, सरळ, घरगुती भाषा ते लिहूं लागले. हीच स्वाभाविकता कथानकांतहि त्यांनीं पुढें पुढें आणली.

गडकरीय भाषाशैली

'कुंजविहारी' नाटकाची भाषा संस्कृतप्रचुर आहे. श्रीकृष्णानें केलेल्या कालिया-मर्दनाचा विषय त्यांत रंगविला आहे आणि कृष्णा-पेंद्यांच्या गोकुळांतील क्रीडा व खोड्या त्यांत खुलविल्या आहेत. पेंद्या

नारदाचें वर्णन ज्या पद्धतीनें करतो, ती कोल्हटकर–संप्रदायाला साजणारी आहे. तो म्हणतो, " असल्या या साधु म्हणवून घेणाऱ्या लोकांवर विश्वासायचा हा काळ नव्हे. .दर्शनीं दिसतात बिनदांतांचे, पण मांजरीच्या मऊ पंजांतल्या नखांसारखे यांचे दांत मऊ दाढीखालीं छपविलेले असतात. दातांच्या बनतात दाढा, जटेची होते सटा, विण्याची होते तरवार आणि हे साधु नसून नुसते कार्यसाधु असल्याचें उघडकीस येतें."

'करीन ती पूर्व' या ऐतिहासिक नाटकाची बहुतेक भाषा गडकरी थाटाची आहे. 'राजसंन्यासां'तील उत्तुंग कल्पकता गडकऱ्यांची गड· कऱ्यांनाच लाभली, पण त्यांच्या भाषेचा डौल वरेरकरांनीं उचलला आहे. पुतळा गजरेला म्हणते, " हें पहा वहिनी, तुझा स्वभावच अगदीं थंड. अगदीं पंचगंगेच्या डोहाच्या पाण्यासारखा. खळ नाहीं कीं खळबळ नाहीं. वहायचा पण वाजायचा नाहीं. म्हणूनच दादाचं आणि तुझं एवढं जमलं आहे."

'फुक्या फुंकरीचे भक्कम मनोरे,' 'पुण्याईचें पाप' इत्यादि विरोधा-भासात्मक शब्दांचे खेळहि वरेरकरांनीं पुष्कळ केलेले आहेत.

हिरोजीला शिवाजीच्या वेषानें गनिमाच्या छावणींत तहाच्या वाटाघाटीस पाठवावयाचें म्हणजे उघड्या डोळ्यांनीं त्याला मृत्युमुखांत लोटावयाचें. ती भीक बाजींनीं मागितली असतां हिरोजीची स्वराज्यभक्त पत्नी गजरा गडकऱ्यांच्या भाषेंत उत्तर देते,

" घरचा लोभ तोडला–घरवालीचा हात सोडला–दौलतीची साथ सोडून धन्यांनीं वैऱ्याशीं हात जोडला, पण या पायांच्या कृपेनं फिरून आज धनी थाऱ्यावर आले. ते जर दौलतीच्या रक्षणाला कारण होत असतील, तर काय सांगूं सरदार?—डोळीं आंसवं येतात, बोली जीभ ढळते, पण घरीं आल्या धन्याला दौलतीच्या मोली पुनः आपल्या पदरांत घालते. "

आपले व आपल्या पतीचे प्राण स्वराज्यासाठीं कुरवंडून टाकणाऱ्या गजरेचा गौरव करतांना बाजी जी भाषा वापरतो, ती 'राजसंन्यासां'त सहज खपून जाण्यासारखी आहे. तो म्हणतो,

" अहाहा ! धन्य ! धन्य !! मुली. या अलौकिक स्वार्थत्यागानं तूं रणधुरंधरांनाही लाजिवलंस ! वडीलकीच्या मायरक्ताची ओंजळ वाहून पुढच्या पिढीची आई झालीस—महाराष्ट्राच्या उघड्या राउळींची रखुमाई राई झालीस. वीराच्या वीर पत्नी, हा बाजी प्रभु तुला साष्टांग दंडवत करतो."

शब्दांचें जंजाळ

'संन्याशाचा संसार'मधील डेव्हिड कशी अतिशयोक्तीची भाषा वापरतो पहा. "निराशेच्या प्रलयकाळाला तोंड देण्याइतकं चिरंजीव मार्कंडेयाचं धैर्य माझ्या अंगीं असतं, बारा योजनं जळतं रान गिळून टाकणाऱ्या कृष्णाइतका मी हिमहृदयी असतों, असंख्य योजनं समुद्र ओलांडणाऱ्या मारुतीसारखा मी एखादा बलभीम असतों; तर एका शब्दानं—एकाच निःशब्द शब्दानं मी तुमची वाचा बंद करून टाकली असती."

तोच डेव्हिड निराशेमध्यें शब्दांच्या अशा कांहीं उलटापालटी करतो कीं, त्यांतील अर्थ कोणालाहि कळणें कठीण. तो म्हणतो,

"धांव धांव निराशे, धांव. आणि आशेच्या दुबळ्या बळानें बलवान होऊं पाहाणाऱ्या या सजीवाला निर्जीव करून टाक. आशा म्हणते, आशा नाहीं. पण बाई निराशे, तूं कां मला थांबवून धरतेस ? जगणं संपावं म्हणून मी जिवंत होऊं पहात होतों; पण जिवांत जीवच कां रहात नाहीं ? काय करूं ? मरावं तर जगण्याचं भय वाटतं ! जगावं म्हटलं तर जगायला जागाच राहिली नाहीं. "

शिवाजीची व्यक्ति-रेखा

'करीन ती पूर्व' या एकाच ऐतिहासिक नाटकानें वरेरकरांनीं यशाचा गड जिंकला. खरेशास्त्री यांनीं 'शिवसंभव' नाटक लिहून आपला विजयध्वज नाचविला होता आणि गडकऱ्यांचें 'राजसंन्यास' सुवर्ण-कमलाप्रमाणें फुललेलें होतें. तरीहि १९२७ सालीं जन्मास आलेलें वरेरकरांचें 'करीन ती पूर्व' हें नाटक रसिकांचीं मनें जिंकीत चाललें होतें. शिवछत्रपतींचें नुसतें नांवहि महाराष्ट्रीय भावनांच्या तारा छेडण्यास पुरेसें आहे. ज्या पुण्यश्लोकाच्या स्मृतीभोंवतीं मालाकारांनीं आपल्या निबंधांचीं निरांजनें

लावलीं आहेत, हरिभाऊ आपट्यांनीं आपल्या कादंबऱ्यांचीं कमलें वाहिलीं आहेत, वॅ. सावरकरांनीं आपल्या काव्याची कस्तुरी माखली आहे व प्रा. शिवरामपंत परांजपे यांनीं आपल्या वक्तृत्वाचें वीणा–वादन केलें आहे; त्याच्यावर महाराष्ट्राचें पित्यासारखें प्रेम, गुरुसारखी श्रद्धा व देवासारखी भक्ति जडलेली आहे. या साऱ्या भावनांना भरती आणणारे एकामागून एक प्रसंग वरेरकरांनीं आपल्या या ऐतिहासिक नाटकांत घातलेले आहेत. फार काय, 'संन्याशाचा संसार' या सामाजिक नाटकांतहि महाराष्ट्राच्या या आराध्य दैवताविषयीं त्यांनीं भावना उचंबळविणारे उद्गार काढले आहेत. त्या नाटकांतील साक्षात् शंकराचार्यच म्हणतात, "जे शंकराचार्य तेच:श्रीशिवाजीमहाराज. त्या श्रीशिवरायाची स्मृति हीच आमची स्मृति, त्याचं गुणश्रवण हीच आमची श्रुति, त्याचा इतिहास हींच आमचीं पुराणं आणि त्याची प्रत्येक कृति हेंच आमचं मानवधर्मशास्त्र. एवढ्याच आधारावर डेव्हिड जोशी याचं परिवर्तन झालं पाहिजे."

वीर-रसाचा उठाव

शिद्दी जोहारानें पन्हाळ्यास वेढा दिला आणि त्यांतून शिवाजीमहाराज हिकमतीनें निसटून गेले व त्यांच्या रक्षणार्थ बाजी प्रभूनें पावनखिंड लढविली, हा रोमांचकारक कथाभाग 'करीन ती पूर्व' या नाटकांत वरेरकरांनीं कौशल्यानें रंगविला आहे. ऐतिहासिक दृष्टीनें 'यथातथ्य' ठरणारेच प्रसंग त्यांनीं निवडले आहेत, पण त्यांची गुंफण उत्कंठा वाढविणारी केली आहे. एकापुढें एक संघर्ष ठेवून त्यांनीं उत्सुकता वाढविली आहे. हिरोजीचा उपयोग तोतया शिवाजी बनविण्यासाठीं करावयाचा हें रहस्य शिवाजीनें आगाऊच फोडलें नसतें, तर नाटकांतील औत्सुक्य आणखी वाढलें असतें. एका बाजूला फितूर काळूजी व त्याची महत्त्वाकांक्षी बायको पुतळा, तर दुसऱ्या बाजूला स्वामिनिष्ठ हिरोजी व त्याची पत्नी गजरा यांचें द्वंद्व जिज्ञासा वाढविणारें आहे. शिवाजी-बाजी-प्रभृतींचीं शब्द-चित्रें उठावदार आहेत. भाषा वीरश्रीची व परिणामकारक आहे. शिवाजीची वाणी ठिणग्या पाडणारी कशी आहे

पहा—"समशेरीला समशेर, हाताला हात, खांद्याला खांदा भिडवून वैऱ्याशीं निकराचं तोंड देत देत या झुंजेंत एक जयश्री तरी मिळवूं किंवा जगदंबेची तशीच इच्छा असेल तर दोघेहि इथंच धारातीर्थी देह तरी सांडूं. पण माघार ?—केव्हांही नाहीं."

असा राजा-आणि असे सेवक ! त्यांचें मोठेपण कोणी, कसें वर्णावें ? जिजाबाई मोजक्या चार शब्दांतच त्या उभयतांचा गौरव पुढीलप्रमाणें करतात, "तुमचीं माणसं तुमच्याइतकींच मोठीं आहेत. तीं मोठीं आहेत म्हणूनच तुमच्यासाठीं जीव टाकतात. आणि मोठीं माणसं अशीं तुमच्यासाठीं जीव टाकतात म्हणूनच तुम्ही सर्वांहून मोठे आहांत."

स्वामिभक्तीचा कळस !

'राजसंन्यासां'तील केवळ भाषाच नव्हे, तर कांहीं कांहीं प्रसंगहि 'करीन ती पूर्व'मध्यें अवतरल्यासारखे वाटतात. तेथें शिवांगी येसूबाईचें सोंग घेतांना बावरते, येथें हिरोजी शिवाजीचा वेष परिधान करतांना बिचकतो. ती त्याची मनाची गजबज वरेरकरांनीं कुशलतेनें रेखाटली आहे. हिरोजी विचारतो, "आणि ही पैजार ! बाजी प्रभूजी, काय हा प्रसंग ? या आमच्या देहाचं कातडं सोलून ज्यांच्या पायींची पैजार करावी—त्या राजांच्या पायांनीं पावन झालेली ही पैजार—बाजी प्रभूजी, हिला पाय कसा लावू ? अशी उराशीं कवटाळावी, डोळ्यांनीं न्याहाळून भाळीं धरावी—पादुका म्हणून पूजा करावी—तो ही मराठ्यांच्या मायबापाची पैजार माणसा-पायींच्या चढावागत पायीं कशी तुडवूं ? नाहीं, संरदार ! नाहीं.—सर्वी-परीस ऊर फुटतो तो इथं !" शिवछत्रपतींच्या भक्तीचें दुसरें स्तोत्र कोणतें असूं शकेल ?

स्त्री-मनाचें चित्रण

स्त्री-हृदयाचे पापुद्रे हलक्या हातानें उलगडण्याची कला जशी वरेर-करांच्या ठायीं आहे; तशीच त्या हृदयांतील भावनांचें चित्रण यथार्थपणें करण्याची शक्तीहि त्यांच्या साध्यासोप्पा व घरगुती भाषेमध्यें आहे. 'सत्तेचे गुलाम' मधील रेखा स्त्री-मनाचें वर्णन करतांना म्हणते, "मनाची

राखरांगोळी करावी आणि दुसऱ्याच्या दारीं तिची कणारांगोळी घालावी. दुसऱ्याचं अंगण रंगवावं आणि आपलं भंगलेलं घर मनांत उभारावं. मला विधवेला हें वैभवाचं कुंकूं काय करायचं आहे ? त्यापेक्षां संसाराच्या उगवत्या क्षितिजावर पाऊल ठेवूं पाहणाऱ्या त्या प्रेमळ पोरीच्या वांट्याला तें आलेलं बरंच नव्हे कां ? उगवत्या वैभवसूर्याची प्रभा बिचारीचं निढळ उजळ करो. ”

तसेंच नलिनीच्या घरीं काम करणारीं वैकुंठाची वहिनी रेवा हिला लागण्यासारखें कांहीं शब्द नलिनीच्या तोंडून जातात. तेव्हां नलिनी तिचें सांत्वन पुढील हृदयस्पर्शी शब्दानें करते. “ कां डोळे पुसतेस ? क्षमा करा वहिनी. तुमच्या दुःखाची किंमत मी कमी समजतें असं समजूं नका गडे. पण दुःखाच्या गोष्टीच मुळीं मला ऐकवत नाहींत. हें काय ? असं ओक्सा-बोक्सी रडूं नका गडे. उगी–उगी. माफ करा म्हणतें ना ? चूक झाली माझी. हें पहा–अगदीं आनंदांत रहावं—अगदीं हंसतखेळत असावं. तुम्हांला काय वरं कमी आहे इथं–अगदीं तुमच्या गळ्याची शपथ. हें वैभव माझं नव्हे, तुमचंच आहे. असं समजा. आतां जरा हंसा पाहूं–अस्सं–अस्सं–आतां कसं गोड वाटलं ! ” आणि तें वैभव खरें असतें रेवाचेंच !

कज्जेदलालीमुळें साफ बुडालेला हेरंब अखेर वेडा होतो–बेपत्ता होतो. तेव्हां त्याची पत्नी रमा त्याची वाट पहात उपाशी राहते. वैकुंठानें तिला जेवावयाचा आग्रह केला असतांना ती जें उत्तर देते, तें किती स्वाभाविक, किती करुण आहे पहा. “ तिकडे काय स्थिती आहे हें कळल्याशिवाय मला अन्न कसं गोड लागेल ? मीं इथं सुखानं चार घास खावे आणि तिकडे उपाशीच असावं ! भावोजी, मी त्यांची पत्नी आहें. उष्ट्या ताटांतलं माझं जेवण माहेरवासाशिवाय कधीं चुकलं नाहीं. तुम्ही कितीही समजूत घातली तरीं येणं झाल्याशिवाय मी अन्नाचा घास तोंडाशीं नेणार नाहीं. ”

वेषांतराचा अस्वाभाविक प्रकार

प्रेक्षकांची उत्सुकता वाढविण्यासाठीं नाटकांत कांहीं तरी गूढ ठेवावें,–रहस्य ठेवावें, ही कोल्हटकरांची परंपरा. त्यासाठीं कोल्हटकरांचे नायक

असलेले राजे वेषांतर करून दुसऱ्या राजाच्या घरीं नोकर म्हणून राहतात. तसाच असंभाव्य प्रकार वरेरकरांनीं 'सोन्याचा कळस' या नाटकांत घडविला आहे. मुंबईतील एका कापड–गिरणीच्या लक्षाधीश मालकाचा मुलगा विठ्ठलदास हा काश्मीरच्या सफरीवर जाण्यासाठीं म्हणून निघतो. पण तो जातो परळच्या गिरणगांवांत–विठू कृष्णा या नांवानें तो तेथील गिरणींत मजूर म्हणून काम करतो–मजुरांच्या चाळींत राहतो, जेवतों, वावरतो. एका प्रवेशांत तो ज्या बिजलीशीं मजूर म्हणून भाषण करतों, तिच्याशींच दुसऱ्या प्रवेशांत, गिरणी–मालकाच्या बंगल्यामध्यें, विठ्ठलदासाच्या पोशाखांत बोलतो–आणि कोणी कोणाला ओळखीत नाहींत, असें प्रेक्षकांनीं मानावयाचें !

मामांची मानस-कन्या

हा अस्वाभाविकतेचा दोष सोडला, तर 'सोन्याचा कळस' हें नाटक वरेरकरांच्या नाट्यमंदिरावर सुवर्ण-कळस शोभण्यासारखेंच आहे. 'धांवता धोटा' या त्यांच्या कादंबरीचेंच हें यशस्वी नाट्यरूप आहे. प्रारंभींच विठू-कृष्णाचा प्रवेश होतो तो औत्सुक्यपूर्ण भूमिका तयार झाल्यानंतर. तसाच बिजलीचा प्रवेश. प्रेक्षकांच्या अपेक्षा आधीं खूपच उंचावून ठेवलेल्या असतात. आणि मग ती येते ती विजेप्रमाणें कडाडतच ! ती मामांची मानस-कन्या शोभते खरी ! अथपासून इतिपर्यंत सर्व नाटकांत एकाहून एक चढ असे संग्राम आहेत. खटक्याशिवाय संवाद व संघर्षाशिवाय प्रसंग फारसा नाहींच. हंसा व बिजली हीं श्रीमंतीचीं दोन टोकें. तीं एकत्र आणण्यांत नाटककाराचें चातुर्य दिसून येतें. हंसाच्या अंगावरील विलायती माल पाहून त्यावर बिजली जी टीका करते, ती फारच मार्मिक आहे. हें नाटक जेव्हां रंगभूमीवर आलें तेव्हां, १९३२ सालीं, गांधीजीची कायदेभंगाची चळवळ देशांत दुमदुमत होती. विदेशी मालावरील बहिष्काराचे नगारे सर्वत्र जोरजोरानें वाजत होते. त्यामुळें त्या वेळच्या प्रेक्षकांना बिजलीची ही टीका विशेषच आवडे आणि ती त्यांच्या हृदयाला जाऊन भिडे. बिजलीचा हंसाशीं झालेला संवाद असा.—

" बिजली—(तिच्या साडीचा पदर पाहून) काय छान माल निघतो हा तुमच्या गिरणींत !

हंसा—आमच्या गिरणींत ? ही साडी आमच्या गिरणींतली नव्हे.

बिजली—तुमच्या गिरणींतली नव्हे ? तर मग कुठली ?

हंसा—मला वाटतं–मँचेस्टरची असेल किंवा पारिसची.

बिजली—मँचेस्टर आणि पारीस ? कुठलीं गांवं हीं ? गुजरात–काठेवाड, कीं कच्छांतलीं ? (हंसा मान खालीं घालते) हंसाबेन, तुमच्या गिरणींतलं कापड तुमच्या अंगावर नसावं, हें तुम्हांला कसंसंच नाहीं वाटत ? कापडाच्या गिरणीचे मालक तुम्ही–तुमच्या अंगावर परदेशींचं कापड ? एकूण आम्ही गरीबच बरे म्हणायचे ! "

खल-नायकाचा नमुना

वरेरकरांच्या साऱ्या नाटकांत खलनायकाची कोरीव मूर्ति म्हणजे केरोपंत. खादीचे अभ्रे अंगावर चढवून व देशभक्तीची भाषा मुखांतून काढून केरोपंत वकिलीचे सर्व वाममार्ग चोखाळीत असतो. असा अट्टल खलनायक असलेले ' सत्तेचे गुलाम ' हें नाटक १९२२ सालीं रंगभूमीवर आलें. तो असहकारितेचा काळ ! असहकारितेच्या लाटेमुळें भलेबुरे सारेच लोक वाहून गेले होते. शेंकडों वकिलांनीं वकिली सोडली होती. आणि न्यायमंदिरांऐवजीं कारागृहांत ते सक्तमजुरी करीत होते. पण सबंध कळपांत एखाददुसरी ' काळी मेंढी ' असावयाचीच. कांहीं ढोंगी वकिलांनीं देशभक्तीच्या या वाहत्या गंगेंत आपलें हात धुऊन घेतले. त्यांचें प्रतीक म्हणजे केरोपंत. उलट, वकिलीची परीक्षा झालेली असूनहि सनद न घेतलेला वैकुंठ हा सच्चा देशभक्त आहे. गांधीजींप्रमाणें तो स्वतःला ' नांगऱ्या कोष्टी ' म्हणवतो. तो स्वतः शेतींत राबतो व हातसुताची खादी वापरतो. त्याची भाषा फटकळ असली तरी ती सत्याची व हिताची असते आणि त्याचें हृदय तर त्यागानें व प्रेमानें तुडुंब भरलेलें आहे. त्यावेळीं असहकारितेच्या वृक्षाला जीं अमृतफळें व विषफळें आलीं, त्यांचे नमुने म्हणजे वैकुंठ व केरोपंत.

केरोपंताच्या पाषाण-हृदयाची कल्पना पुढील संवादावरून येते. नलिनीला पस्तीस लाखांची जिंदगी मिळत नाहीं असें कळतांच तो तिच्याकडे पाठ फिरवितो, पूर्वीचीं वचनें मोडतो आणि तिला खडखडीतपणें व तुच्छतेनें नकार देतो.

" नलिनी—केरोपंत, या तुमच्या शब्दप्रहारांनीं माझ्या हृदयाच्या कशा चिंधड्या उडताहेत, याची तुम्हांला कल्पना तरी आहे कां ?

केरोपंत—त्या चिंधड्या गोळा करून मी घाणीच्या मोरींत फेंकून देईन. जा. वेडे पोरी, झालें एवढं नाटक पुरें झालं. तुला देशभक्ताशीं लग्न करायचं आहे ना ? जा, वैकुंठाशीं लग्न कर. "

खऱ्या देशभक्ताचें शब्द-चित्र

केरोपंताच्या कुटिल कारवाईमुळें वैकुंठाचे वडील भाऊ धुळीस मिळाले. वकिलीच्या या अनर्थाचें वर्णन वैकुंठानें मूर्तस्वरूपांत केलें आहे. ' एकच प्याला ' मध्यें सुधाकर ज्याप्रमाणें दारूच्या दुर्दशेचें दारुण चित्र रामलालच्या डोळ्यापुढें उभें करतो, त्याचप्रमाणें कज्जेदलालीमुळें कोणकोणते अनर्थ ओढवतात, त्यांचें चित्र वैकुंठ पुढील शब्दांनीं काढतो, " हें पहा सॉलिसिटरचं ऑफिस. हीं त्यांचीं बिलं. हे पांढऱ्या टोपीचे बेलीफ. हे त्यांचे ग्वाल्हेरच्या गंगाजळीसारखे खिसे. हे त्या खिशांत गेलेले दादांचे पैसे. ही पहा वकिलांच्या काव्याचीं काळीकुट्ट काव्यं. ही त्या काव्यांची प्रतिभा. हीं पहा मारवाड्यांचीं दुकानं. या त्यांच्या खातेवह्या. हें त्यांच्या व्याजाचं निर्व्याज भूत-प्रत्यक्ष दादांच्या मानगुटीला बसलेलं.' हे रमा-वहिनीचे गहाण पडलेले दागिने. लिलांबाला काढलेलीं हीं घरांतलीं हांडी-मडकीं. ही पहा कान्होबाच्या वीस हजारांची तिरपिट-त्रेधा. किती हुबेहुब —ही सर्वांना गिळून बसलेली नारळाची आई ! "

प्रभावी प्रचार

'लोक-जागृतीसाठीं कला' या मताचे वरेरकर आहेत, हें त्यांच्या प्रत्येक कृतींतून दिसतें. 'संन्याशाचा संसार' या १९१९ सालीं लिहिलेल्या नाटकांत त्यांनीं पतितांच्या परावर्तनाचा विषय ठाशीव रीतीनें मांडला

आहे. आंग्लविद्या शिकलेले शंकराचार्य आपल्या मठांत 'मानवसमाजाला मुक्तद्वार' ठेवतात. त्यांचेविरुद्ध सनातनी शास्त्रीपंडित बंड करतात. तेव्हां शंकराचार्यांच्या गादीचाहि त्याग श्री करतात आणि पुढें 'लोकनियुक्त शंकराचार्य' म्हणून निवडून येतात व धर्ममंडळाच्या सहाय्यानें जन-सेवेचें कार्य करतात. नदीला पूर येऊन हजारो लोक निराश्रित झाले, तेव्हां त्यांच्या साहाय्याला ख्रिश्चन मिशनरी धावले, तसेच हे श्रीहि धावले. त्यासाठीं त्यांनीं आपला मुकुट, आपले हत्तीघोडे, आपला देव्हारा, फार काय, सोन्या-चांदीचे देवसुद्धां विकले. या क्रांतीचें स्वरूप वर्णन करतांना श्री म्हणतात, "शंकराचार्यांच्या मठाचा तुरुंग कोसळला जाऊन फल-पुष्पित लतावृक्षांचं निसर्गरमणीय असं हें उद्यान बनलं. कडी-कुलपांचीं दारं कोसळून पडलीं, भिंतीचं व्यवधान नाहींसं झालं, सिंहासनाचा उंचपणा जमीनदोस्त झाला, मुकुटाचा घोंडा हवेंत उडाला, भालदार चोपदारांचीं ओरड बंद झाली, भरदिवसा पाजळलेली अभिमानाची दिवटी मालवली, वैभवाचा शृंगार सजविणारे हत्तीघोडेदेखील बंधमुक्त होऊन स्वैरसंचार करूं लागले."

खेड्यांत अद्याप गुलामगिरी कशी घर करून राहिली आहे, याचें भीषण चित्र वरेरकरांनीं 'स्वयंसेवक' नाटकांत रंगविलें आहे. 'चिमणी' कादंबरी याच कथानकाची. कॉलेजमध्यें शिकत असलेल्या जगन्नाथाला तीनशें रुपयांच्या कर्जापायीं त्याचे आईबाप रघोजीला एका वर्षापुरते विकतात आणि रघोजी त्याला चाबकानें बडवून काढतो असें या नाटकांत दाखविलें आहे. वारली लोकांवरील खोतांचे अत्याचार आतां उजेडांत आल्यानें वरेरकरांनीं रघोजीचें पात्र रंगविण्यांत अतिशयोक्तिक केली असें कोण म्हणेल ? 'आम्ही कसाब्यांनीं तुला गहाण टाकलं' हा जगन्नाथाचा आईचा करुण स्वर 'सत्वपरीक्षे'तील तारामतीच्या आक्रंदनाप्रमाणेंच काळीज कापीत जातो.

समाजवादाचा पुकार

मजुरांच्या यातनांनीं जळणारी 'सोन्याचा कळस'मधील बिजली ही

केरोपंताच्या पाषाण-हृदयाची कल्पना पुढील संवादावरून येते. नलिनीला पस्तीस लाखांची जिंदगी मिळत नाहीं असें कळतांच तो तिच्याकडे पाठ फिरवितो, पूर्वीची वचनें मोडतो आणि तिला खडखडीतपणें व तुच्छतेनें नकार देतो.

" नलिनी—केरोपंत, या तुमच्या शब्दप्रहारांनीं माझ्या हृदयाच्या कशा चिंधड्या उडताहेत, याची तुम्हांला कल्पना तरी आहे कां ?

केरोपंत—त्या चिंधड्या गोळा करून मी घाणीच्या मोरींत फेंकून देईन. जा. वेडे पोरी, झालें एवढं नाटक पुरें झालं. तुला देशभक्ताशीं लग्न करायचं आहे ना ? जा, वैकुंठाशीं लग्न कर. "

खऱ्या देशभक्ताचें शब्द-चित्र

केरोपंताच्या कुटिल कारवाईमुळें वैकुंठाचे वडील भाऊ धुळीस मिळाले. वकिलीच्या या अनर्थाचें वर्णन वैकुंठानें मूर्तस्वरूपांत केलें आहे. ' एकच प्याला ' मध्यें सुधाकर ज्याप्रमाणें दारूच्या दुर्दशेचें दारुण चित्र रामलालच्या डोळ्यापुढें उभें करतो, त्याचप्रमाणें कज्जेदलालीमुळें कोणकोणते अनर्थ ओढवतात, त्यांचें चित्र वैकुंठ पुढील शब्दांनीं काढतो, " हें पहा सॉलिसिटरचं ऑफिस. हीं त्यांचीं बिलं. हे पांढऱ्या टोपीचे बेलीफ. हे त्यांचे ग्वाल्हेरच्या गंगाजळीसारखे खिसे. हे त्या खिशांत गेलेले दादांचे पैसे. ही पहा वकिलांच्या काव्याचीं काळीकुट्ट काव्यं. ही त्या काव्यांची प्रतिभा. हीं पहा मारवाड्यांचीं दुकानं. या त्यांच्या खातेवह्या. हें त्यांच्या व्याजाचं निर्व्याज भूत-प्रत्यक्ष दादांच्या मानगुटीला बसलेलं.' हे रमा-वहिनीचे गहाण पडलेले दागिने. लिलांबाला काढलेलीं हीं घरांतलीं हांडी-मडकीं. ही पहा कान्होबाच्या वीस हजारांची तिरपिट-त्रेधा. किती हुबेहुब -ही सर्वांना गिळून बसलेली नारळाची आई ! "

प्रभावी प्रचार

'लोक-जागृतीसाठीं कला' या मताचे वरेरकर आहेत, हें त्यांच्या प्रत्येक कृतींतून दिसतें. 'संन्याशाचा संसार' या १९१९ सालीं लिहिलेल्या नाटकांत त्यांनीं पतितांच्या परावर्तनाचा विषय ठाशीव रीतीनें मांडला

आहे. आंग्लविद्या शिकलेले शंकराचार्य आपल्या मठांत 'मानवसमाजाला मुक्तद्वार' ठेवतात. त्यांचेविरुद्ध सनातनी शास्त्रीपंडित बंड करतात. तेव्हां शंकराचार्यांच्या गादीचाहि त्याग श्री करतात आणि पुढें 'लोकनियुक्त शंकराचार्य' म्हणून निवडून येतात व धर्ममंडळाच्या सल्ल्यानें जन-सेवेचें कार्य करतात. नदीला पूर येऊन हजारो लोक निराश्रित झाले, तेव्हां त्यांच्या साहाय्याला खिश्चन मिशनरी धावले, तसेच हे श्रीहि धावले. त्यासाठीं त्यांनीं आपला मुकुट, आपले हत्तीघोडे, आपला देव्हारा, फार काय, सोन्या-चांदीचे देवसुद्धां विकले. या क्रांतीचें स्वरूप वर्णन करतांना श्री म्हणतात, "शंकराचार्यांच्या मठाचा तुरुंग कोसळला जाऊन फल-पुष्पित लतावृक्षांचं निसर्गरमणीय असं हें उद्यान बनलं. कडी-कुलपांचीं दारं कोसळून पडलीं, भिंतीचं व्यवधान नाहींसं झालं, सिंहासनाचा उंचपणा जमीनदोस्त झाला, मुकुटाचा घोंडा हवेंत उडाला, भालदार चोपदारांचीं ओरड बंद झाली, भरदिवसा पाजळलेली अभिमानाची दिवटी मालवली, वैभवाचा शृंगार सजविणारे हत्तीघोडेदेखील बंधमुक्त होऊन स्वैरसंचार करूं लागले."

खेड्यांत अद्याप गुलामगिरी कशी घर करून राहिली आहे, याचें भीषण चित्र वरेरकरांनीं 'स्वयंसेवक' नाटकांत रंगविलें आहे. 'चिमणी' कादंबरी याच कथानकाची. कॉलेजमध्यें शिकत असलेल्या जगन्नाथाला तीनशें रुपयांच्या कर्जापायीं त्याचे आईबाप रघोजीला एका वर्षापुरते विकतात आणि रघोजी त्याला चाबकानें बडबून काढतो असें या नाटकांत दाखविलें आहे. वारली लोकांवरील खोतांचे अत्याचार आतां उजेडांत आल्यानें वरेरकरांनीं रघोजीचें पात्र रंगविण्यांत अतिशयोक्तिक केली असें कोण म्हणेल ? 'आम्ही कसाब्यांनीं तुला गहाण टाकलं' हा जगन्नाथाचा आईचा करुण स्वर 'सत्वपरीक्षे'तील तारामतीच्या आक्रंदनाप्रमाणेंच काळीज कापीत जातो.

समाजवादाचा पुकार

मजुरांच्या यातनांनीं जळणारी 'सोन्याचा कळस'मधील बिजली ही

बाबा शिगवण या पहारेकऱ्याची शिष्यीण. त्याचा स्वभाव जितका करडा, तितकाच संयमी दाखविलेला आहे. 'खरें बोलण्याचा गुन्हा' केल्यामुळें तो हलक्या दर्जाची नोकरी करतो, पण त्याला सारे मजूर सर्वांत उच्च मान देतात. भांडवलदारांच्या निर्दय हृदयाची त्याला पक्की चीड आहे. तो हंसाला म्हणतो, "नाहीं उघडायचें बरं पोरी! तुम्हां लोकांचे डोळे उघडांयलां नुसतं बोलणं पुरेसं होत नाहीं. चांगला चिमटा घ्यावा लागतो तुमच्या काळजाला! आणि तुमचं काळीज असतं तुमच्या खिशांत? खिशाला चिमटा घेतल्याशिवाय श्रीमंतांच्या मस्तकाला कळ पोंचत नाहीं."

केवळ भांडवलदाराचीच चीड त्याला आहे असें नव्हे, तर श्रीमंतांचे नाना अनाचार पाहिल्यामुळें श्रीमंतीचाच त्याला तीव्र तिटकारा वाटतो. तो म्हणतो, "सोन्याची पिवळी चकती समोर आली, कीं डोळ्यांवर लाली चढते, दिसेनासं होतं, आठवणी बुजतात, उपकार मरतात, जुन्या गांठी सुटून पडतात. हंसाबेन, हें जसं आमचं गरिबाचं भाग्य आहे, तसंच तुम्हां श्रीमंतांचं दुर्भाग्य आहे."

संप होण्याच्या आधीं बाबा जेव्हां मजुरांचें शिष्टमंडळ घेऊन गिरणी-मालकांच्या घरीं जातो, तेव्हां एक 'गृहस्थ' या नात्यानें तो तेथल्या खुर्चीवर बसतो. एका मजुराचें हें 'अतिक्रमण' कारखानदारांच्या दृष्टीला असह्य वाटते. तेव्हां 'श्रम हेंच खरें भांडवल' आणि 'गिरणीवर खैरी मालकी मजुरांचीच' हीं समाजवादी तत्त्वें बाबा त्या कारखानदारांना सडेतोड शब्दांनीं पढवितो. तो त्यांना बजावतो, "गिरणींचा मालक भी! हा हरबा-हा शिवबा-हा धोंडू-रामा-सोमा-हेच खरे गिरणीचे मालक! तुम्ही आमचे नोकर आहांत. आमची गिरणी तुम्हांला चालवायला दिली आहे. तुम्ही ती चालवतां आहांत. चालवायचा मेहनताना वाजवीपेक्षां फाजिल घेऊन तुम्हीं गबर झाला आहांत. आम्हां मालकांना कंगाल करून ठेवतां आहांत, म्हणून ही भाषा तुम्हांला सुचते आहे."

या नाटकांतील बाबा, बिजली, हंसा, विठू इत्यादि स्वभावचित्रें अत्यंत ठसठशीत व परिणामकारक आहेत.

सामाजिक प्रश्नाला वाचा

देवलांच्या शारदेनें बाला-वृद्ध—विवाहाची रूढि चव्हाट्यावर मांडली. तशीच स्त्रियांना जाचक असणारी दुसरी रूढि म्हणजे लग्नांतिल हुंड्याची. तिच्यावर वरेरकरांनीं आपलें नाटकाचें हत्यार उचललें आणि 'हाच मुलाचा बाप' हें नाटक रचलें. मात्र 'शारदे'प्रमाणें हें नाटक हृदयाला पीळ पाडणारें नसल्यानें समाजांत तितकी खळबळ उडवूं शकलें माहीं. उलट गुलाबची दीड लाखांची थापेबाजी, वसंतानें केलेली बापाची चोरी आणि बँक बुडाल्याची खोटी तार—यांमुळें या नाटकांतील सत्याचा आत्मा नाहींसा होतो आणि हें एक कल्पनारम्य रंजनप्रधान 'प्रहसन' आहे असा ग्रह बळावत जातो. त्या दृष्टीनें रंगभूमीवर तें नाटक चांगलें रंगलें. वास्तविक या नाटकाचें सुमारास सर्व देशाला धक्का देणारी एक शोकजनक घटना घडून आली होती. स्नेहलता नांवाच्या चवदा वर्षे वयाच्या एका बंगाली मुलीनें केवळ हुंड्यापायीं स्वतःला जाळून घेतलें होतें! ही हृदयद्रावक घटना घडली १९१४सालीं. आणि वरेरकरांनीं हें नाटक लिहिलें १९१६ सालीं. पण त्यांत यावा तितका जळजळीतपणा आलेला नाहीं. १९१८ सालीं या नाटकाला संगीत जोडण्यांत आलें. प्रेक्षकांच्या अभिरुचिमुळें आपण हें नाटक आनंदपर्यवसायी केलें अशी कैफियत वरेरकरांनीं एके ठिकाणीं दिलेली आहे. पण ती फारशी समाधानकारक नाहीं. 'शारदे'चाहि शेवट आनंदीच दाखविलेला असला तरी त्याचें सर्व कथानक करुणरसानें ओलेंचिंब झालेलें आहे; उलट 'हाच'चें सारें वातावरण विनोदानें थबथबलेलें आहे.

हुंड्यासारख्या दुष्ट चाली नाहींशा करण्याचा प्रयत्न करणें हाहि एक देशभक्तीचाच मार्ग आहे, हें सांगतांना गुलाब आवेशानें विचारतो, "आमच्या उपवर वधूंचा उद्धार कोण करणार? भारतभूमींतील पुढील पिढ्यांच्या मातांची आज सुखासमाधानानें लग्नें लावून कोण देणार? हुंड्याच्या पायीं जर्जर झालेल्या मुलींच्या बापांना कुठल्या मोफत दवाखान्यांतलं औषध देणार! कसायाप्रमाणं मुलींच्या बापांचा छळ करणाऱ्या

बाबा शिगवण या पहारेकऱ्याची शिष्यीण. त्याचा स्वभाव जितका करडा, तितकांचसंयमी दाखविलेला आहे. ' खरें बोलण्याचा गुन्हा ' केल्यामुळें तो हलक्या दर्जाची नोकरी करतो, पण त्याला सारे मजूर सर्वांत उच्च मान देतात. भांडवलदारांच्या निर्दय हृदयाची त्याला पक्की चीड आहे. तो हंसाला म्हणतो, " नाहीं उघडायचें बरं पोरी ! तुम्हां लोकांचे डोळे उघडांयलीं नुसतं बोलणं पुरेसं होत नाहीं. चांगला चिमटा घ्यावा लागतो तुमच्या काळजाला ! आणि तुमचं काळीज असतं तुमच्या खिशांत ? खिशाला चिमटा घेतल्याशिवाय श्रीमंतांच्या मस्तकाला कळ पोंचत नाहीं."

केवळ भांडवलदाराचीच चीड त्याला आहे असें नव्हे, तर श्रीमंतांचे नाना अनाचार पाहिल्यामुळें श्रीमंतीचाच त्याला तीव्र तिटकारा वाटतो. तो म्हणतो, "सोन्याची पिवळी चकती समोर आली, कीं डोळ्यांवर लाली चढते, दिसेनासं होतं, आठवणी बुजतात, उपकार मरतात, जुन्या गांठी सुट्टून पडतात. हंसाबेन, हें जसं आमचं गरिबाचं भाग्य आहे, तसंच तुम्हां श्रीमंतांचं दुर्भाग्य आहे."

संप होण्याच्या आधीं बाबा जेव्हां मजुरांचें शिष्टमंडळ घेऊन गिरणी-मालकांच्या घरीं जातो, तेव्हां एक ' गृहस्थ ' या नात्यानें तो तेथल्या खुर्चीवर बसतो. एका मजुराचें हें ' अतिक्रमण ' कारखानदारांच्या दृष्टीला असह्य वाटते. तेव्हां ' श्रम हेंच खरें भांडवल ' आणि ' गिरणीवर खरी मालकी मजुरांचीच ' हीं समाजवादी तत्त्वें बाबा त्या कारखानदारांना सडेतोड शब्दांनीं पढवितो. तो त्यांना बजावतो, " गिरणींचा मालक भी ! हा हरबा-हा शिवबा-हा धोंडू-रामा-सोमा-हेच खरे गिरणीचे मालक ! तुम्ही आमचे नोकर आहांत. आमची गिरणी तुम्हांला चालवायला दिली आहे. तुम्ही ती चालवतां आहांत. चालवायचा मेहनताना वाजवीपेक्षां फाजिल घेऊन तुम्हीं गबर झाला आहांत. आम्हां मालकांना कंगाल करून ठेवतां आहांत, म्हणून ही भाषा तुम्हांला सुचते आहे. "

या नाटकांतील बाबा, बिजली, हंसा, विठू इत्यादि स्वभावचित्रें अत्यंत ठसठशीत व परिणामकारक आहेत.

सामाजिक प्रश्नाला वाचा

देवलांच्या शारदेनें बाला–वृद्ध—विवाहाची रूढि चव्हाट्यावर मांडली. तशीच स्त्रियांना जाचक असणारी दुसरी रूढि म्हणजे लग्नांतिल हुंड्याची. तिच्यावर वरेरकरांनीं आपलें नाटकाचें हत्यार उचललें आणि 'हाच मुलाचा बाप' हें नाटक रचलें. मात्र 'शारदे'प्रमाणें हें नाटक हृदयाला पीळ पाडणारें नसल्यानें समाजांत तितकी खळबळ उडवूं शकलें माहीं. उलट गुलाबची दीड लाखांची थापेबाजी, वसंतानें केलेली बापाची चोरी आणि बँक बुडाल्याची खोटी तार—यांमुळें या नाटकांतील सत्याचा आत्मा नाहींसा होतो आणि हें एक कल्पनारम्य रंजनप्रधान 'प्रहसन' आहे असा ग्रह बळावत जातो. त्या दृष्टीनें रंगभूमीवर तें नाटक चांगलें रंगलें. वास्तविक या नाटकाचें सुमारास सर्व देशाला धक्का देणारी एक शोकजनक घटना घडून आली होती. स्नेहलता नांवाच्या चवदा वर्षे वयाच्या एका बंगाली मुलीनें केवळ हुंड्यापायीं स्वतःला जाळून घेतलें होतें! ही हृदयद्रावक घटना घडली १९१४सालीं. आणि वरेरकरांनीं हें नाटक लिहिलें १९१६ सालीं. पण त्यांत यावा तितका जळजळीतपणा आलेला नाहीं. १९१८ सालीं या नाटकाला संगीत जोडण्यांत आलें. प्रेक्षकांच्या अभिरुचिमुळें आपण हें नाटक आनंदपर्यवसायी केलें अशी कैफियत वरेरकरांनीं एके ठिकाणीं दिलेली आहे. पण ती फारशी समाधानकारक नाहीं. 'शारदे'चाहि शेवट आनंदीच दाखविलेला असला तरी त्याचें सर्व कथानक करुणरसानें ओलेंचिंब झालेलें आहे; उलट 'हाच'चें सारें वातावरण विनोदानें थबथबलेलें आहे.

हुंड्यासारख्या दुष्ट चाली नाहींशा करण्याचा प्रयत्न करणें हाहि एक देशभक्तीचाच मार्ग आहे, हें सांगतांना गुलाब आवेशानें विचारतो, "आमच्या उपवर वधूंचा उद्धार कोण करणार? भारतभूमींतील पुढील पिढ्यांच्या मातांची आज सुखासमाधानानें लग्नें लावून कोण देणार? हुंड्याच्या पायीं जर्जर झालेल्या मुलींच्या बापांना कुठल्या मोफत दवाखान्यांतलं औषध देणार! कसायाप्रमाणं मुलींच्या बापांचा छळ करणाऱ्या

व्याघ्ररूपी मुलांच्या बापांच्या अजस्र जबड्यांतून आमच्या उपवर गरीब गाईचं रक्षण कोण करणार ? ज्या पुढील पिढीसाठीं सर्वांची सारी खटपट चाललेली आहे, तिच्या मातांच्या दीनवाण्या स्थितीकडे कुणीहि नजर देत नाहीं. ”

विनोदाचीं साधनें

भक्ति व हास्य या दोन रसांनीं ‘ कुंजविहारी ’ हें नाटक तुडुंब भरलेलें आहे. पेंद्याचें स्वरूप, वर्तन व भाषण हें सारेंच प्रेक्षकांना हसविणारें आहे. नंदमहाराजांच्या भर दरबारांत कृष्णाविरुद्ध एक एक गोप गाऱ्हाणें सांगत असतां कृष्णाच्या बाजूनें बचाव करण्यासाठीं पेंद्या तेथें टपकतो. तो कसा ? तर–तो सांगतो,

“ महाराज, ह्या आमच्या ग्रामस्थ मंडळींनीं सुंगीचादेखील रिघाव होणार नाहीं इतका दरवाजा गच्च भरून टाकिला आहे. तेव्हां गर्दी करून आंत शिरतांना माझ्यासारख्या गरीब लंगड्या प्राण्याची हत्या त्यांच्या माथीं बसून राजद्वारीं आतांच प्रेतयात्रेचा समारंभ होऊं नये, म्हणून छपरावरून वळचणींतून उतरून खालीं आलों. ”

याहिपेक्षां विनोदाचा उठाव वरेरकरांनीं केला तो ‘संन्याशाचा संसार’ या नाटकांत. बाटून खिस्ती झालेल्या हिंदूंना परत हिंदुधर्मांत घेण्याचा विषय त्यांनीं या नाटकांत तीव्रतेनें मांडला आहे. बाट्यांच्या बेंगरूळ भाषेंतून त्यांनीं खूप विनोद निर्माण केला. रेव्हरंड गुलेलू म्हणतो, “ हिंदुधर्माची महंती मला सांगूं नका. कां कीं मी खिस्ती आहें; आणि खिस्तच जगाला तारणारा असून त्यालाच देव प्रीत झाला आहे. त्यालाच गायनवादन करा. ” तो जेव्हां जेव्हां ‘ बुद्धीला हाय हाय ’ म्हणतो, तेव्हां हशाच्या लाटा उसळतात. तसेंच त्याचें प्रेम ज्या मुलीवर बसलें आहे, तिचें वर्णन तो आपल्या मोडक्यातोडक्या भाषेनें पुढीलप्रमाणें करतो, “ ही सौंदर्यदेवता उंचावलेली आहे. हिचें भजन करा. गौरवानें गौरवित होत असलेली ही. हिच्यापुढें गुडघे टेंकायास मी आनंदानें, प्रीतीनें मला जन्मविलें आहे. म्हणून मी माझ्या पाविऱ्याला कुजूं देणार नाहीं. पहा, या

सौंदर्यिकेला स्तोत्र करा. यासाठीं कीं, तिनें प्रसन्नवून माझी अनुकारी व्हावें. " पुढें तो म्हणतो, " भटकलेल्या कोंकरें, हें काय भाषण ? तूं मला शिकवण द्यावी काय ? मी तुझें केव्हांही न ऐकावें. जा–घरीं जा. आव्यता मिरवूं नकोस. कां कीं, मी तर प्रभू येशू खिस्त याच्या वधस्तंभाच्या आव्यतेशिवाय कशाचीहि आव्यता मिरवावी असें न होवो. त्याकडून मला जग व जगाला मी वधस्तंभीं दिलेला आहे. " ही सारी धेडगुजरी मराठी ऐकतांना श्रोतृवृंदांतून हास्याच्या लाटावर लाटा उसळत. त्यावेळीं मराठी बायबलची भाषाच मुळीं अशी हेंगाडी होती. या नाटकांतील टीकेमुळें ती पुढें कांहींशी सुधारली गेली.

विनोद–साधनाच्या पायऱ्या

' सत्तेचे गुलाम ' मध्यें विनोदाचीं लहानमोठीं हत्यारें वरेरकरांनीं वापरलेलीं आहेत. ' चहा, ' ' समर्थ, ' ' वैकुंठवासी, ' ' अशील, ' इत्यादि शब्दांवर तर मामुली कोट्या आहेतच. पण त्याशिवाय ' मॅन–मॅनर, ' ' कोर्टींगसाठीं कोर्ट–फी, ' इत्यादि इंग्रजी शब्दहि त्यांनीं विनोदासाठीं राबविले आहेत. ' नर्सोपंत 'सारख्या संकर शब्दांतून हीन व्यंजना व्यक्त करूनहि त्यांनीं हंशा उत्पन्न केला आहे. यापेक्षां वरच्या दर्जाचा विनोद म्हणजे कान्होबा व मार्तंडराव यांचा. कान्होबा हा वैकुंठाचा भाऊ पण धंद्यानें मास्तर–अगदीं भोळाभाबडा, किंबहुना बावळट. ' दादा काय म्हणतील ? ' हें त्याचें भित्रें पालुपद. ' सेंटिमेंट ' या शब्दाचा भलता उपयोग करणाऱ्या कान्होबाच्या रूपानें वरेरकर लो. टिळकांच्या निष्क्रिय अनुयायांवर टीका करीत आहेत, असें दिसतें. कान्होबा जेव्हां आपले एकामागून एक मुद्दे सांगतो आणि शेवटीं, ' बाबासाहेब म्हणून कोणी व्यक्ती होतीच कीं नाहीं ? ' असा बिनतोड मुद्दा मांडतो, तेव्हां त्याच्या बावळटपणांतून विनोदाचे फवारे उडूं लागतात.

मार्तंडराव मंगळमूर्ती हा एक अर्धवट बुद्धीचा वकील आहे. त्याला हाताशीं धरून केरोपंत आपली कारवाई लढवीत असतो. मार्तंडराव आपली पांचवी बायको बरोबर घेऊन प्रवेश करतो, तेंच मुळीं हास्याला

कारण होतें. याच विनोदी कल्पनेवर अत्रे यांनीं आपलें 'लग्नाची बेडी'–मध्यें गोकर्णाचें पात्र उभारलें आहे. घरावर जती आली असतांना मार्तंडराव म्हणतो, " अहो रमाबहिनी, तिला जरा जागी करा. नाहीं तर या ताबेगहाणांत तीहि सामील केली जायची. "

याहिपेक्षां श्रेष्ठ प्रतीचा विनोद हेरंबरावाच्या संवादांतून निर्माण होतो. पूजेचा एकएक संस्कृत मंत्र तो म्हणत असतो आणि त्याचवेळीं केरोपंतांशींहि बोलत असतो. या दोहोंचा उत्कृष्ट मेळ नाटककारानें घातला आहे. ' त्वमेव शरणं मम ' हे हेरंबाचे उद्गार देवापेक्षां त्या सैतानालाच अधिक लागू होतात ! त्याचप्रमाणें हेरंबाचें वैकुंठाशीं जें बोलणें होतें आणि शेवटीं ' शंखानं शंखाला मारलं, ' असा जो प्रकार होतो; तो संतापाचा व दुःखाचा असूनहि हास्य निर्माण करतो हें विशेष.

आपल्या भावानें रागाच्या भरांत देव्हाऱ्यांतील शंखानें मारलें असतां वैकुंठ विचारतो, ' कुणी विचारलं तर शंखानं मारलं असं कसं सांगूं ? ' यांतील श्लेष हास्यकारक आहे. ' मला तुमची क्षमा मागावयाची आहे ' यांतील क्षमा शब्दावरील श्लेषहि सुंदर आहे.

नाटिकांचा नवसंप्रदाय

पाश्चात्य पद्धतीचीं, थोड्या वेळांत आटोपणारीं, नाटकें लिहिण्याची प्रथा वरेरकरांनीं रूढ केली. सदा बंदिवान, नामानिराळा अशा नाटिका त्यांनीं रचल्या. 'तुरुंगाच्या दारांत' या नांवानें लिहिलेलें त्यांचें नाटक अवघ्या पंचावन्न पानांचें आहे. आठ वर्षांनीं, १९३१ सालीं, ' पतित-पावन ' या नांवानें तेंच नाटक ' ललित-कलादर्श मंडळी 'च्या पुरोगामी रंगभूमीवर उभें राहिलें. अस्पृश्यता–निवारणाचा प्रश्न या नाटकांत मांडला आहे. ' पुण्याच्या पांडुरंगानें '–लो. टिळकांनीं–अस्पृश्यांचा गणपती मिरवणुकींत घेतला, याचा उल्लेख वरेरकरांनीं मोठ्या आदरानें केला आहे. शेवटीं सर्वजण खादीचा पोशाख घालतात आणि गांधीजींचा अस्पृश्यता–निवारण्याचा मंत्र आचरणांत आणतात, असें दाखविलें आहे. पण एकंदर नाटकांत विशेष प्रसंग नाहींत, उत्कट भावना नाहींत व

समर्पक युक्तिवादहि नाहींत. यापेक्षां याच विषयावरील बॅ. सावरकरांचें 'उश्शाप' हें नाटक अधिक परिणामकारक आहे. कलेची झिलई कमी झाली म्हणजे केवळ प्रचार कसा उघडा पडतो, याचा हा नमुना आहे. मात्र एकांतिक प्रचार ठाशीव भाषेनें करण्यांत वरेरकर कुशल आहेत. या नाटकांतील संतु चांभाराच्या तोंडीं त्यांनीं पुढील विचार घातले आहेत, "दुसऱ्याच्या नांवावर मोठेपणा मिरवणं, हें आमच्या हिंदूंच्या ब्रीदाला शोभत नाहीं. चांभार असलों तरी मी हिंदु आहें आणि स्वर्गीचं राज्य जरी कुणी माझ्यासमोर आणून ठेवलं तरी चांभारपणा लपविण्यासाठीं मी माझा हिंदूपणा केव्हांही सोडणार नाहीं."

'सारस्वत' हें नाटक तर दोन-अंकीच आहे—आणि ते दोन्ही अंकहि आहेत स्वतंत्र व स्वयंपूर्ण ! साहित्य-संमेलनाचें अध्यक्षपद पावलेले व डॉक्टर ही पदवी लाभलेले बाबासाहेब हमालाला दोन आणे देण्यासहि समर्थ नसतात. कारण, 'मुकेमिळ्यांच्या' कादंबऱ्या किंवा नोटस् लिहिण्यांत ते आपली लेखणी खर्चीत नाहींत. त्यांचा गरीब जावई त्यांना लेखणीचा विक्रा करण्याचा सल्ला देतो, तेव्हां तो ते झिडकारतात व म्हणतात, "मी निर्ढावलोंय-माजलोंय-मस्ती आलीय मला.....मला विक ना !" साहित्यिकांच्या दारिद्र्याचें करुणरम्य चित्र या छोट्या नाटिकेंत वरेरकरांनीं अत्यंत कौशल्यानें काढलें आहे.

नव्या चौकटींत जुनें चित्र

'सौभद्रा'ची अवीट गोडी कोणाहि दुसऱ्या नाटककाराला हेवा वाटण्यासारखी आहे. त्याच कथानकावर खाडिलकरांनीं 'त्रिदंडी संन्यास' लिहिलें आणि तसेंच वरेरकरांनींहि 'सन्याशाचें लग्न' रचलें. त्याला रंगभूमीचें सौभाग्य लाभण्यापूर्वी ध्वनिमुद्रिकेचें नवें वाहन मिळालें. तीन ध्वनिमुद्रिकांवर सुभद्राहरणाचें वरेरकरी कथानक कोरलें गेलें. अवघ्या बीस मिनिटांत सारें नाटक ! १९४५ सालीं वरेरकरांनीं जें नाटक रंगभूमीवर आणलें, तेंहि असें सुटसुटीत आहे. त्याचे तिन्ही अंक एकप्रवेशी असून, एकाच स्थळीं व एकाच दिवशीं घडलेले आहेत. किर्लो-

स्करांनीं सुभद्रेला प्राधान्य दिलें, तर वरेरकरांनीं अर्जुनाला अधिक वाव दिला. खाडिलकरांचा अर्जुन आध्यात्मिक आहे, तर वरेरकरांचा अर्जुन नृत्यकलाप्रेमी आहे. अर्जुन, नारद, बळराम यांपैकीं कोणाचाच स्वभाव-परिपोष वरेरकरांना नीट साधला नाहीं. त्यामुळें हें नाटक नासलें ! खाडिलकरांच्या विद्याहरण नाटकाच्या कथेवरच रचलेलें 'संजीवनी' हें वरेरकरांचें नाटकहि असेंच हिणकस आहे. 'मी उणा पडलों' अशी कबुली खुद्द वरेरकरांनींच दिली आहे. त्यांचा हुकमी प्रांत म्हणजे सामाजिक विषय आणि त्यांचें विजयी शस्त्र म्हणजे खटकेबाज संवाद. समाज-सुधारणेची, राष्ट्रीय स्वातंत्र्याची व समाजवादी अर्थकारणाची त्यांना मनस्वी तळमळ आहे. ती त्यांच्या नाटकांतून ओसंडत असते.



मो. ग. रांगणेकर : : : १०

एखाद्या बागेंतील फुलें व फळें थंडीच्या कडाक्यानें करपून गेलीं, म्हणजे कागदी फुलांवर व लांकडी फळांवर त्या बागेच्या मालकानें संतोष मानण्याची पाळी येते, तशी स्थिती मराठी रंगभूमीची १९४० सालापासून झाली. चित्रपटांचें आक्रमण इतक्या झपाट्यानें व जबरदस्तीनें नाट्य-कलेवर झालें कीं, त्यामुळें नाट्यदेवतेच्या नाड्याच आंखडल्या गेल्या. ज्या महाराष्ट्रांत एका वेळीं चाळीस-पन्नास नाटकमंडळ्या खेळ करीत असावयाच्या, तेथें पांचसात कंपन्याहि टिकाव धरूं शकत नाहींत. मराठी रंगभूमि जिवंत ठेवण्यासाठीं ज्या दोनचार नाटककारांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली, त्यांत श्री. रांगणेकर यांची गणना होते.



नवें नाट्य-तंत्र

'मृतप्राय रंगभूमीला नवजीवन' देणारें आपलें 'कुलवधु' नाटक रांगणेकरांनीं १९४२ च्या ऑगस्टमध्यें रंगभूमीवर उभें केलें. त्याचे ओळीनें शंभर प्रयोग झाले. १९४३ मध्यें त्या नाटकाचा सुवर्ण-महोत्सवहि झाला. रसिकांच्या झुंडी खेचण्याची जी जादू प्रथम 'सौभद्रानें' व

नंतर ' स्वयंवरा 'नें दाखविली, तीच यावेळीं ' कुलवधू 'नें प्रगट केली. सदैव रंगणारें असें हें नाटक नव्या नाट्यतंत्राप्रमाणें लिहिलेलें आहे. एका प्रवेशांतच एक अंक संपविणें हें या तंत्राचें एक वैशिष्ट्य आहे. पूर्वीच्या ' सौभद्रा 'दि नाटकामध्येंहि कांहीं कांहीं अंक एकप्रवेशात्मक आहेत, पण ते अपवाद म्हणून; सहजगत्या साधलेले. नव्या नाट्यतंत्रांत तो काटेकोर सक्त नियमच होऊन बसला आहे. कांहीं वेळां त्याचा अतिरेक होऊन, एका प्रवेशांतील पात्रें जेवणाची वेळ झाली म्हणून किंवा कांहींतरी आठवलें असें भासवून, रंगभूमीवरून एकदम पसार होतात व दुसऱ्या पात्रांना जागा करून देतात! अशा एकप्रवेशी अंकांच्या मांडणीमुळें रंगभूमीवरील देखाव्यांचा खर्च पुष्कळ वाचतो आणि त्याबरोबरच वास्तवतेचें वातावरण निर्माण होतें.

वास्तवतेवर भर

वास्तवता वाढविण्यासाठीं नेपथ्याच्या सूचना (Stage directions) प्रत्येक अंकाच्या आरंभीं सविस्तर देण्याची पद्धत आहे. शॉ--इब्सेन प्रभृति नाटककार तर पानपानभर अशा नेपथ्य-सूचना देतात. त्यामुळें नाटक-मंडळीला तर मार्गदर्शन होतेंच, पण शिवाय नाट्यग्रंथाच्या वाचकापुढेंहि तो तो देखावा मूर्तिमंत उभा राहतो. या वास्तवतेला शोभेल अशीच अगदीं ताजी, व्यवहारांतील बोली पात्रांच्या तोंडीं घातलेली असते. कथानकाचे विषयहि चालू घडीचे गरमागरम असतात. माणूस नित्याचे व्यवहार कांहीं गात गात करीत नाहीं--क्वचित् हर्षाच्या वा शोकाच्या उद्रेकाच्या क्षणीं त्याचे तोंडून करुण सूर निघतात. हें जाणून नव्या नाट्य-तंत्रांत पदांना अत्यंत संक्षिप्त स्वरूप दिलेलें असतें. किर्लोस्कर-देवलांचीं दोन शतकापर्यंतची पदांची धाव आतां अत्रे-रांगणेकरांच्या नाटकांत आठ-दहावर येऊन ठेपली आहे.

कारागिरीवर भर

चिमूटभर कथानक, त्रुटित संवाद आणि माफक स्वभावपरिपोष--असा सारा आटोपशीर संसार रांगणेकरांच्या नाट्यसृष्टीचा आहे. भाषेची झग-

झगीत आतषबाजी, कल्पनेची गगनचुंबी गरुड-भरारी, किंवा रसांचें तुफान कल्लोळ यांचा मागमूसहि त्यांच्या नाट्यसृष्टींत आढळत नाहीं; मग एखाद्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार किंवा एखाद्या प्रमेयाचा उलगडा कोठून येणार ? तीन तासांत नाटक आटोपण्याकडे त्यांची दृष्टी आणि प्रेक्षकांचें मनोरंजन हा त्यांचा हेतु. कलेपेक्षां कारागिरीवरच त्यांचा भर. दीर्घ चिंतनानें, निस्सीम तन्मयतेनें, अनुभवाच्या दंशानें कलेचा जो सहज व सामर्थ्यशाली उद्गार अकस्मात् बाहेर पडतो; तो रांगणेकरांच्या कोठल्याहि नाटकांतून ऐकूं येणार नाहीं. तीन मिनिटांत फोनोवर वाजणारी जशी ध्वनिमुद्रिका; तशींच तीन तासांत आटोपणारीं त्यांचीं नाटकें. धावत्या जीवनांत त्यांची चहा या सोपेपणामुळें सहजच झाली. तीं बहुतेक सारीं एकएका आठवड्यांत लिहून काढलेलीं आहेत. आधीं कथानकाचा आराखडा नाहीं किंवा नंतर साफसुफीचा हातहि नाहीं, असें आपलें लेखन-तंत्र रांगणेकर सांगतात; बिचारा गटे !-आपलें फौस्ट नाटक साठ वर्षे लिहीत बसला होता म्हणे ! तो रांगणेकरांची चपळाई पाहून चकितच होईल ! त्यांनीं ' कुलवधु ' पांच दिवसांत, ' आशीर्वाद ' पंधरा दिवसांत, ' माझें घर ' तीन आठवड्यांत व ' नंदनवन ' एक महिन्यांत लिहिलें. ' नाटक हें वाचण्यासाठीं लिहावयाचें नसून पहावयासाठीं लिहावयाचें असतें ' हें त्यांचें सूत्र.

वृत्त-सृष्टींतून नाट्य-सृष्टींत

मराठी रंगभूमीच्या पडत्या काळांत यशाला व वैभवाला चढलेले रांगणेकर यांना परिस्थितीची किंवा शिक्षणाची अनुकूलता लाभलेली नव्हती. मोतिराम गजानन रांगणेकर यांचा जन्म १९०७ सालीं झाला. १९२४ सालीं ते मॅट्रीक झाले. पुढें ते वृत्तव्यवसायांत शिरले. ' अरुण ' नांवाचें मासिक व ' तुतारी ' नांवाचें साप्ताहिक त्यांनीं मुंबई येथें खुसखुशीतपणें चालविलें. छपाईच्या सजावटीपासून लेखाच्या मांडणीपर्यंत सर्व अंकांत चटकदारपणा आणण्याचा प्रयत्न ते करीत. १९२९ सालीं हीं नियतकालिकें बंद पडल्यानंतर त्यांनीं ' वसुंधरा ' नांवाचें साप्ताहिक सुरू केलें. तें चार वर्षे चालविल्यावर ' चित्रा ' नांवाचें साप्ताहिक त्यांनीं

काढलें. त्याच्या समाप्तीनंतर १९३९ सालीं, ते 'आशा' नांवाचें साप्ताहिक घेऊन मराठी वाचकांपुढें आले. त्यानंतर मात्र त्यांनीं वृत्त-सृष्टींतूनं नाट्यसृष्टींत उडी मारली. त्याच्या आधीं ते ग्रामोफोन कंपनीला छोटी छोटी पदें तयार करून देतच होते. शिवाय 'औट घटकेचा राजा' 'प्रल्हाद' वगैरे चित्रपटांच्या कथाहि लिहून देत होते. 'सीमोल्लंघन' नांवाची कादंबरी त्यांनीं लिहिली आहे. पण त्यांना सोन्याची खाण गवसली ती म्हणजे 'कुलवधु.'

कलेचा कोमटपणा

सौ. ज्योत्स्ना भोळे यांसारख्या कुशल नटवर्गाच्या साहाय्यानें त्यांनीं आपली नाटकी कारागिरी यशाच्या कळसास पोंचविली. त्यांत भाषा, कल्पना, विनोद, किंवा कथानक—हें सर्वच कांहीं कोमट आहे. पतिपत्नीचे शृंगारिक खटके ऐकण्याची चटक ज्यांना लागलेली, असा श्रोतृवृंद त्यांच्या या नाटकावर पुनः पुनः उड्या घेतो. बाकीच्या नाटकांना 'कुलवधू'च्या लोकप्रियतेचा चतकोरहि लाभला नाहीं. कारण कथानकाचें कुतूहल किंवा रस-निर्मितीचें आकर्षण असें त्यांच्या नाटिकांत फारसें नसतें. जी कांहीं अल्पस्वल्प कथा रांगणेकरांच्या डोक्यांत असेल, ती बहुतेक सारी पहिल्या अंकांतच संपून जाते.—पुढें पुनरुक्तीच ऐकत श्रोत्यांना बसावें लागतें.

सिनेमांत गेलेली स्त्रीसुद्धां कुलीन गृहिणी राहूं शकते, असें मत 'कुलवधू'-मध्यें मांडलेलें आहे. नवनाट्याचा प्रणेता इब्सेन याच्या 'नोरा'प्रमाण भानुमतीहि आपल्या घराचें दार ढकलून बाहेर जाते. पण, नोराच्या धक्क्यानें युरोपांतील घरें हादरलीं, तसा कांहीं परिणाम भानुमतीच्या कृतीनें महाराष्ट्रांत घडून आला नाहीं. रांगणेकरांच्या लेखणींत ती शक्तीच नाहीं, कारण त्यांच्या हृदयांत तशी आंचच नाहीं—किंवा तसें कांहीं समाजकार्य करण्याची इच्छा त्यांनीं आपल्या मनाशीं धरली आहे असें दिसत नाहीं. माफक भावनांचे दोनचार खेळ करून प्रेक्षकांचे प्रहरभर चित्तरंजन करणें, हीच त्यांची धांव! त्यांत मात्र त्यांना सोळा आणे यश आलें आहे.

'कुलवधू'त सिनेमामध्यें स्त्रीनें जाण्याचा प्रश्न घेतलेला आहे; तर 'अलंकार'मध्यें कुलीन स्त्रीनें रंगभूमीवर जाण्याचा विषय रंगविलेला आहे. दुष्काळासाठीं होणाऱ्या एका कार्यक्रमांत वत्सला भाग घेते. म्हणून तिचा व्यसनी नवरा तिला रंगभूमीवरून फरफरा ओढून आणतो असें हें प्रसंगप्रधान (Action play) नाटक आहे. त्यामुळें स्त्रियांना घटस्फोट मिळण्याची आवश्यकता किती आहे हें समाजाला पटेल, असा विश्वास नाटककाराला वाटत आहे. पण तसा ठसठशीत परिणाम घडविण्याचें सामर्थ्य नाटकाच्या अंगीं मात्र नाहीं.

कथाविषयांचा सूर

'माझें घर' या नाटकानें 'कुलवधू'खालोखाल यश मिळविलें आहे. एकत्र कुटुंबांतील माणसांच्या व्यक्तित्वाचा कोंडमारा कसा होतो हें या नाटकांत हंसतखेळत दाखविलें आहे. त्यांतील बाजीराव म्हणतो, "म्हणजे पहा ना ! अखंड हिंदुस्थान तर व्हायला हवं आणि सर्वांना समान हक्क मात्र द्यायला नकोत ! त्यांतलाच प्रकार हा !" पण राष्ट्राचें रूपक नाट्य-कथानकावर बसविण्याचे श्रम रांगणेकरांनीं घेतलेले नाहींत. नटश्रेष्ठ पृथ्वीराज यांनीं आपल्या 'दीवार' नाटकांत एकत्र कुटुंबाचाच विषय घेतलेला आहे, पण तो किती प्रभावीपणें मांडलेला आहे-आणि त्यांतून राष्ट्राच्या अखंडत्वाचा संदेश किती कलापूर्णतेनें दिला आहे. खाडिलकरांचीच स्मृति होते त्यावेळीं ! रांगणेकर त्या बाजूस फिरकावयाचेच नाहींत. त्यांच्या लेखणीनें प्रेक्षकाच्या हृदयावर कोणत्याच विचारांचा ठसा उमटत नाहीं—रंजन तेवढें होतें.

सुशिक्षित कुमारिकांच्या प्रश्नाला 'आशीर्वाद' या नाटकांत रांगणेकरांनीं वाचा फोडली आहे; पण विभावरी शिरूरकराचा तो जोस कोणीकडे आणि रांगणेकरांचा दुबळेपणा कोणीकडे ! घबघबा व ओहोळ इतका फरक ! आर्थिक कुटुंबाच्या स्वास्थ्यासाठीं सुमित्रा आपल्या प्रेमाचा होम करते असें या नाटकांत दाखविलें आहे; पण तें अगदीं बेताबेतानें. समाजांतील जीर्ण मतांचे किल्ले जमीनदोस्त होण्याला तोफा डागाव्या

काढलें. त्याच्या समाप्तीनंतर १९३९ सालीं, ते 'आशा' नांवाचें साप्ताहिक घेऊन मराठी वाचकांपुढें आले. त्यानंतर मात्र त्यांनीं वृत्त-सृष्टींतूनं नाट्यसृष्टींत उडी मारली. त्याच्या आधीं ते ग्रामोफोन कंपनीला छोटी छोटी पदें तयार करून देतच होते. शिवाय 'औट घटकेचा राजा' 'प्रल्हाद' वगैरे चित्रपटांच्या कथाहि लिहून देत होते. 'सीमोल्लंघन' नांवाची कादंबरी त्यांनीं लिहिली आहे. पण त्यांना सोन्याची खाण गवसली ती म्हणजे 'कुलवधु.'

कलेचा कोमटपणा

सौ. ज्योत्स्ना भोळे यांसारख्या कुशल नटवर्गाच्या साहाय्यानें त्यांनीं आपली नाटकी कारागिरी यशाच्या कळसास पोंचविली. त्यांत भाषा, कल्पना, विनोद, किंवा कथानक--हें सर्वच कांहीं कोमट आहे. पतिपत्नीचे शृंगारिक खटके ऐकण्याची चटक ज्यांना लागलेली, असा श्रोतृवृंद त्यांच्या या नाटकावर पुनः पुनः उड्या घेतो. बाकीच्या नाटकांना 'कुलवधू'च्या लोकप्रियतेचा चतकोरहि लाभला नाहीं. कारण कथानकाचें कुतूहल किंवा रस-निर्मितीचें आकर्षण असें त्यांच्या नाटिकांत फारसें नसतें. जी कांहीं अल्पस्वल्प कथा रांगणेकरांच्या डोक्यांत असेल, ती बहुतेक सारी पहिल्या अंकांतच संपून जाते.--पुढें पुनरुक्तीच ऐकत श्रोत्यांना बसावें लागतें.

सिनेमांत गेलेली स्त्रीसुद्धां कुलीन गृहिणी राहूं शकते, असें मत 'कुलवधू'-मध्यें मांडलेलें आहे. नवनाट्याचा प्रणेता इब्सेन याच्या 'नोरा'प्रमाण भानुमतीहि आपल्या घराचें दार ढकलून बाहेर जाते. पण, नोराच्या धक्क्यानें युरोपांतील घरें हादरलीं, तसा कांहीं परिणाम भानुमतीच्या कृतीनें महाराष्ट्रांत घडून आला नाहीं. रांगणेकरांच्या लेखणींत ती शक्तीच नाहीं, कारण त्यांच्या हृदयांत तशी आंचच नाहीं--किंवा तसें कांहीं समाजकार्य करण्याची इच्छा त्यांनीं आपल्या मनाशीं धरली आहे असें दिसत नाहीं. माफक भावनांचे दोनचार खेळ करून प्रेक्षकांचे प्रहरभर चित्तरंजन करणें, हीच त्यांची धांव ! त्यांत मात्र त्यांना सोळा आणे यश आलें आहे.

'कुलवधू'त सिनेमामध्यें स्त्रीनें जाण्याचा प्रश्न घेतलेला आहे; तर 'अलंकार'मध्यें कुलीन स्त्रीनें रंगभूमीवर जाण्याचा विषय रंगविलेला आहे. दुष्काळासाठीं होणाऱ्या एका कार्यक्रमांत वत्सला भाग घेते. म्हणून तिचा व्यसनी नवरा तिला रंगभूमीवरून फरफरा ओढून आणतो असें हें प्रसंगप्रधान (Action play) नाटक आहे. त्यामुळें स्त्रियांना घटस्फोट मिळण्याची आवश्यकता किती आहे हें समाजाला पटेल, असा विश्वास नाटककाराला वाटत आहे. पण तसा ठसठशीत परिणाम घडविण्याचें सामर्थ्य नाटकाच्या अंगीं मात्र नाहीं.

कथाविषयांचा सूर

'माझें घर' या नाटकानें 'कुलवधू'खालोखाल यश मिळविलें आहे. एकत्र कुटुंबांतील माणसांच्या व्यक्तित्वाचा कोंडमारा कसा होतो हें या नाटकांत हंसतखेळत दाखविलें आहे. त्यांतील बाजीराव म्हणतो, "म्हणजे पहा ना ! अखंड हिंदुस्थान तर व्हायला हवं आणि सर्वांना समान हक्क मात्र द्यायला नकोत ! त्यांतलाच प्रकार हा !" पण राष्ट्राचें रूपक नाट्य-कथानकावर बसविण्याचे श्रम रांगणेकरांनीं घेतलेले नाहींत. नटश्रेष्ठ पृथ्वीराज यांनीं आपल्या 'दीवार' नाटकांत एकत्र कुटुंबाचाच विषय घेतलेला आहे, पण तो किती प्रभावीपणें मांडलेला आहे-आणि त्यांतून राष्ट्राच्या अखंडत्वाचा संदेश किती कलापूर्णतेनें दिला आहे. खाडिलकरांचीच स्मृति होते त्यावेळीं ! रांगणेकर त्या बाजूस फिरकावयाचेच नाहींत. त्यांच्या लेखणीनें प्रेक्षकाच्या हृदयावर कोणत्याच विचारांचा ठसा उमटत नाहीं—रंजन तेवढें होतें.

सुशिक्षित कुमारिकांच्या प्रश्नाला 'आशीर्वाद' या नाटकांत रांगणेकरांनीं वाचा फोडली आहे; पण विभावरी शिरूरकराचा तो जोस कोणीकडे आणि रांगणेकरांचा दुबळेपणा कोणीकडे ! घबघबा व ओहोळ इतका फरक ! आर्थिक कुटुंबाच्या स्वास्थ्यासाठीं सुमित्रा आपल्या प्रेमाचा होम करते असें या नाटकांत दाखविलें आहे; पण तें अगदीं बेताबेतानें. समाजांतील जीर्ण मतांचे किल्ले जमीनदोस्त होण्याला तोफा डागाव्या

लागतात—दिवाळींतील फटाके पेटवून तें काम होत नाहीं—त्यानें क्षणभर मौज तेवढी वाटते–आणि तेवढीच अपेक्षा रांगणेकरांची दिसते.

ठरीव मालमसाला

'रंभा' हें रांगणेकरांचें अगदीं अलीकडचें नाटक आहे. इतर नाटकांपेक्षां यामध्यें कथानकाचें नावीन्य आहे. व्यसनी नवऱ्याच्या बायकोचा चडफडाट, हा रांगणेकरांच्या बहुतेक नाटकांचा कथाविषय. आणि त्याला विनोदाची फोडणी देण्यासाठीं संपादक किंवा बातमीदार यांची टवाळी हे ठरीव ठशाचे प्रसंग. वात्सल्य – रसाचे शिंतोडे उडविण्यासाठीं एखादी लहान मुलगी कांहीं नाटकांत आणली आहे तेवढाच पालट. कलह–त्यांतले त्यांत पती-पत्नींचे–ऐकण्याला निंदाप्रिय माणसांना केवढी हौस वाटते ! हें ओळखून रांगणेकरांनीं आपल्या बहुतेक नाटकांत संसारी जोडप्यांचे खमंग खटके दाखविले आहेत. पण 'रंभा' या नाटकाचा सारा पिंडच भिन्न द्रव्यांनीं घडलेला आहे.

कलावंताचें कार्य

तेरा वर्षांच्या एका मुलीला आपल्या मागल्या जन्माची आठवण होते आणि ती आपल्या पूर्वजन्मांतील घर, त्यांतील माणसें, तेथील वस्तु–सारें कांहीं अचूक ओळखते, अशी छोटी बातमी वर्तमानपत्रांत एकदां आली–आणि लोकांच्या स्मरणांतूनहि गेली. पण कलावंताचें कार्य हेंच असतें कीं, अशा धांवत्या घटनांना रम्य व शाश्वत स्वरूप देणें. सायंकाळचा देखावा किती क्षणभंगुर. पण चित्रकार तो आपल्या कलमाच्या कसबानें चितारून कायम स्वरूपांत ठेवतो. आणि शब्द-चित्रकार तरी दुसरें काय करतो ? कन्या-विरहाचें वर्णन 'शाकुंतलां'त कालिदास करतो, तर पत्नी-विरहाची व्यथा भवभूति 'उत्तर-राम-चरितांत' मूर्तिमंत उभी करतो. क्षणिक अनुभवाला चिरकालिक स्वरूप देणें व त्यांतून त्रिकालाबाधित तत्त्व शोधून काढणें हेंच कलावंताचें कार्य. भाऊसाहेब पेशव्यांचा तोतया खोटा आहे हें नाना फडणिसानें सिद्ध करून दाखविलें, असें चार ओळींचें वृत्त इतिहासांत वाचावयास मिळतें; पण त्याच्या पोटांत भावनांचीं किती

आंदोलनें लपलेलीं होतीं; हें पहावयास मिळतें केळकरांच्या 'तोतयाचें बंडांत'. त्याचप्रमाणें पुनर्जन्माची स्मृति असलेल्या बालिकेची वार्ता किती साधी. पण त्यामुळें एका कुटुंबांतील माणसांच्या मनांत भावनांची केवढी वादळें निर्माण झालीं, याचें मनोवेधक चित्र रांगणेकरांनीं 'रंभा' नाटकांत रंगविलेलें आहे.

कथानकाचें नावीन्य

पूर्वजन्माची आठवण असलेली रंभा विजापुराहून मुंबईस येते, तिचा प्रथम प्रवेश नाटककारानें मोठ्या कुशलतेनें घडविला आहे. मुंबई हायकोर्टाचे जज बापूसाहेब यांची पत्नी तेरा वर्षांपूर्वी दिवंगत झालेली. तिचा स्मृति-दिन दरवर्षी ते आपल्या घरीं पाळतात. आजहि ते आपल्या तीन मुलांसह 'मातृ-दिन' साजरा करीत होते. अशावेळीं रंभेला घेऊन तिचा गरीब बाप तेथें येतो. त्याची बावचळलेली मनोवृत्ति नाटककारानें फारच बारकाईनें रेखाटलेली आहे. 'मागल्या जन्मीं ही या घरांत रहात होती' एवढें एकच वाक्य सांगण्याला त्याला सहा पानें लागलेलीं आहेत. त्या संवादांत सर्वांच्याच मनाचा विभ्रम कसा होतो हें कुशलतेनें दाखविलें आहे.

बंडखोर स्त्रीचीं शब्दचित्रें

'कुलवधू'तील भानुमतीचा स्वभाव जितका चातुर्याचा तितकाच शांतपणाचा दाखविला आहे. आणि तसाच तो बंडखोरहि आहे. ती आपल्या नवऱ्यालाहि स्वतंत्र बाण्यानें बजावते,

"देवदत्त : तसं म्हणत नाहीं भानू, मी. पण मी त्यांना पत्र पाठवून बोलवूं नकोस म्हणून सांगितलं होतं कीं नाहीं ?

भानु० : पण मला ती तुमची चूक वाटली. नवरा झाला म्हणून तो कधीं चुकतच नाहीं कीं काय ? अशा वेळीं बायकोनं त्याचं मुळींच ऐकायचं नसतं—तरच ती खरी पतिव्रता !"

भानुमतीला आपल्या निर्मल चारित्र्याची खात्री असल्यामुळेंच तिनें आपल्या क्रुद्ध सासुसासऱ्यांना, आपल्या नवऱ्याचे इच्छेविरुद्ध, आपले घरीं

रहावयास बोलाविलें. खरें सोनें अग्नीला भीत नाहीं हेंच तिनें आपल्या कृतीनें दाखविलें. कारण तिचे सासरे मुंबईस आले ते फणफणतच.

स्त्री-स्वभावाचे नमुने

त्यांना घरीं भानुमतीचें वर्तन शंभर टक्के कुलीन दिसून आलें, तरी सासुसासऱ्यांचें समाधान होईना. तिच्या सरळ वागण्याचाहि ते वाकडाच अर्थ करूं लागले. तो प्रकार असा—

" बनी : (हळूच आईला) बघ कशी आर्किटग करते आहे !

भानु० : (थोडा वेळ वाट पाहून) हे भेटले नाहींत स्टेशनवर ?

बनी : अगबाई ! "हे" का ? नांव नाहीं वाटतं घेत नवऱ्याचं ?

भानु० : (निष्कपटपणानें) कोंकणांत घेतात ?

राधा : कोंकणांत घेत नाहींत; पण म्हटलं मुंबईत फासन असेल ती !

बनी : आणि त्यांत सिनेमांतल्या बायका !

भानु० : सिनेमांत गेलं म्हणजे बायकांनीं मर्यादा सोडायला हवी, असं थोडंच आहे ! (बाप्पास) घर शोधायला त्रास पडला असेल !

बाप्पा : छेः, तुझं घर म्हटल्यावरोबर गाडीवाल्यानें बरोबर इथं आणून सोडलं ! फार नामांकित माणसं तुम्ही ! "

पण शेवटीं भानुमतीनें आपल्या सौजन्यानें व सहिष्णुतेनें त्यांचें मन जिंकलें. आणि प्रत्यक्ष सिनेमाच्या स्टुडिओंत जाऊन आल्यानंतर तर तिच्याबद्दल सासऱ्याला आदरच वाटूं लागला. तो म्हणतो, " काय विशाद आहे हिच्याशीं कुणी चावटपणा करील ! ही आली म्हटल्यावरोबर सगळे कसे चूपचाप ! केवढ्या आदरानं वागवतात हिला ! थेट अगदीं मालकापासून तों साध्या नोकरापर्यंत सगळे मोठा मान देतात हिला ! "

आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न

भानुमतीचें शुद्ध चारित्र्य पाहून खेडवळ सासुसासऱ्यांचें शुद्ध मन लगेच निवळलें. पण त्यांनीं केलेल्या जखमांचें वण कांहीं तिच्या नवऱ्याच्या अंतःकरणांतून बुजले गेले नाहींत. ' आपल्या बायकोला पंधराशें रुपये

पगार आणि आपल्याला मात्र फक्त साठच रुपये !—तिच्या पैशावर आपली चैन अवलंबून !' असा विषमतेचा विचार देवदत्ताच्या मनांत येतो आणि त्याच्या मनांतील नवरेपणाचा 'मालक' जागा होतो. त्यामुळें त्या दोघांमध्यें खडाष्टक उडते.

"देव०:—मी एकट्यानंच नाहीं म्हणून कसं चालेल ? एवढे मोठे बाप्पा तुला डोक्यावर घेऊन नाचूं लागले, भानू.

भानु०—म्हणून तुमच्या डोक्यार मी बसणार नाहीं.

देव०—काय नेम त्याचा ?

भानु०—हो. काय नेम त्याचा ? शंकराच्या डोक्यावर नाहीं कां गंगा बसली होती ? आपण तरी काय, शंकराचेच अवतार ! तिसरा डोळा नाहीं म्हणून बरं; नाहींतर माझं केव्हांच भस्म करून टाकलं असतं !—बरं तें जाऊं दे. उद्यां परवां केव्हांतरी आमच्या कंपनीचे मालक येणार आहेत तुम्हांला आमंत्रण द्यायला.

मनोविभ्रमाचें चित्रण

'कुलवधू' मध्यें चित्रपटांत उत्तम काम केल्याबद्दल भानुमतीचा जाहीर सत्कार होतो. ती पुष्पहार, पुतळा, पदक व पारितोषिक घेऊन घरीं आनंदानें येते. तिच्या आनंदी वृत्तीचें चित्रण रांगणेकरांनीं मोठ्या कुशलतेनें केलें आहे. तिचा आपल्या मोलकरणीशीं झालेला संवाद पुढीलप्रमाणें—

भानु०—" तसं नको ग. तूं कुठून तरी चोरून बघ. (खिडकीकडे जाऊन बाहेर पहात) पण केव्हां येणार ग ते ?

पार्वती०—मला सांगून गेले आहेत वाटतं ?

भानु०—आतां आल्यावर मी त्यांच्यावर प्रथम खूप रागावेन—

पार्वती०—(मध्येंच) पण तुम्ही पुतळ्यासारख्या गप्प बसणार म्हणाला होता ना त्या खोलींत ?

भानु०—अग हो—विसरलेंच मी ! काय करूं—रागावूं का गप्प बसूं ?—रागावणं नको बाई ? किती आनंदांत आहें मी यावेळीं

आपल्याच माणसावर काय रागवायचं ?—पण ते कां आले नाहींत ग थिएटरांत ? ''

घटस्फोटाचा पुरस्कार

'अलंकार' या नाटकांत व्यसनी नवऱ्याची अरेरावी दाखविली आहे. त्या अरेरावीविरुद्ध बंड करून उठणारी वत्सला म्हणते, ''एवढ्याशा ह्या टीचभर दोरीची अरेरावी आतांपर्यंत मी फार सोसली, फांसाच्या दोरी-पेक्षांहि ह्या वीतभर दोरीनं मला जन्मभर मरणाच्या असह्य यातना भोगायला लावल्या. पण आतां मला त्या सहन होत नाहींत. रत्नहाराला-देखील तुच्छ मानून आजपर्यंत मी ह्या अलंकाराला दिमाखानं मिरवीत आलें. पण आज ह्या सोन्याची तुम्हीं माती केलींत—ह्या फुलांचा पाचोळा करून टाकलात. ह्या वीतभर दोरीनं तुम्ही आम्हां बायकांना जन्मभर जखडून टाकतां आणि आम्ही त्यांतच स्वतःला धन्य मानून घेतों.''

द्विभार्या–विवाहाचा प्रश्न 'नंदनवन' नाटकांत रांगणेकरांनीं हाताळला आहे. पण घरांत सवत आलेली दिसतांच मनोरमा आपल्या पतीच्या सुखासाठीं 'घराबाहेर' पडण्याचें औदार्य दाखविते. एखाद्या पौराणिक सती साध्वीप्रमाणें ती आपल्या भावी सवतीला म्हणते, '' अवंतिकाबाई, जगाच्या दृष्टीनं सवत म्हणून तुम्हीं आलां असलां, तरी मला तुम्ही बहिणी-सारख्या आहांत. माझ्या बहिणीच्या हातीं मी माझ्या संसाराचा देव्हारा विश्वासानं देऊन जाते आहें–अशा वेळीं जातांना तरी माझ्यावर रागावूं नका. आतां मला गोड शब्दांनीं तुम्हीं निरोप दिला नाहीं, तर जन्मभर ही गोष्ट खात राहील.''

वात्सल्याचा पुतळा

जुन्या पिढींतील करारी म्हाताऱ्याचें शब्दचित्र रांगणेकरांनीं जसें 'कुलवधूं'त, तसेंच 'माझें घर'मध्येंहि रेखाटलें आहे. दोन्ही म्हातारे जितके कडवे तितकेच प्रेमळ आहेत आणि म्हणूनच त्यांचें हृदयपरिवर्तनहि झटदिशीं होतें. 'कोणे एके काळीं' व 'एक होता म्हातारा' या नाटकांतहि अशींच स्वभावचित्रें आहेत. त्यांतहि 'एक होता म्हातारा'मधील नानांचा

स्वभाव पहिल्यापासूनच प्रेमळ दाखविला आहे—वात्सल्याचा पुतळाच आहे तो ! मुलाच्या कल्याणासाठीं म्हणून तो, आपल्या इच्छेविरुद्ध, स्वतः म्हातारपणीं लग्न करतो आणि तें लग्न मुलाचे कल्याणाचे आड येतें असें कळतांच गांगरून-गोंधळून जातो. नानांचें आपल्या मुलावर प्रेम किती गाढ होतें याचें सुरेख वर्णन उमा करते. ती म्हणते, " ज्यांनीं तुला तळहाताच्या फोडासारखं वागवलं, तुला वाईट वाटूं नये म्हणून आजपर्यंत विरक्तपणानं आयुष्य काढलं—ज्यांनीं तुला जिवाभावाचा मित्र मानून तुझ्या सुखदुःखांत आपलं सुखदुःख मिसळून टाकलं, त्यांच्या आयुष्याचा आतां एका फटकाऱ्यानं निकाल लाव."

प्रेमाची पायमल्ली

'आशीर्वाद' नाटकांतील तात्या यांचा स्वभाव कांहीं कडवा किंवा व्यसनी नाहीं. उलट त्यांनीं आपल्या पोटाला चिमटा घेऊन आपल्या मुलीला—सुमित्रेला डॉक्टरीपर्यंतचें शिक्षण दिलें. पण ती एका डॉक्टर बरोबर लग्न करून आपल्या घराबाहेर जाणार ही बातमी कळतांच त्यांना दुःखाचा धक्का बसतो. आपलें म्हातारपण झालेलें, त्यांत नोकरी गेलेली, आणि आतां कमावती मुलगीहि जाणार—यामुळें पुढें आपली काय दुर्दशा होईल याचें दारुण चित्र त्यांच्या डोळ्यांपुढें उभें राहतें व त्यामुळें ते वैतागानें सुमित्रेला टाकून बोलतात व तिच्या लग्नाला पर्यायानें अडथळा आणतात.प्रेमावर परिस्थिती कशी मात करते हें सांगतांना ते म्हणतात, "पण अंतःकरणाच्या खालीं पोटहि आहे हें विसरूं नकोस. उपाशी अंतःकरणापेक्षां उपाशी पोटाचींच कळ असह्य होते माणसाला ! लग्न काय-केव्हांहि होईल. आजच कांहीं तूं म्हातारी झाली नाहींस." परंतु तात्यांची मोठी मुलगी अक्का ही त्यांच्या वात्सल्य-भावनेला गदगदा हालवते.

कथानकाचा ताकडेपणा

'माझें घर'मधील नारायण व बाजीराव यांनीं आपापल्या पत्नीसह घरांतून पाय काढला. याचा झटका नानांना चांगलाच जाणवला. त्यांनीं आपल्या घरांत लोकशाही सुरू केली, किंबहुना मुलाच्या संसारांत ते जाऊन राहिले

व सर्वांशीं समानतेनें राहूं लागले. 'फॅमिली ग्रूप'चा फोटो काढण्याचें वेळीं लक्ष्मी नव्या वेषानें आली म्हणून नाटकाच्या प्रारंभीं खटका उडतो. पण कुटुंबांतील प्रत्येकाचें व्यक्तिमत्व मान्य केलें गेल्यामुळें नाटकाच्या शेवटीं सर्वांचा 'फॅमिली ग्रूफ'चा फोटो निघतो. असें हें चुटपुटतें कथानक आहे. दुसऱ्या अंकांत एका बहिऱ्या प्राध्यापकाचें विनोदी पात्र आणल्यामुळें कथानकाची उणीव कांहींशी भरून निघते. पण एकंदरींत कथानकाच्या तोकडेपणामुळें हें नाटक प्रेक्षकांच्या जिज्ञासेची तार सतत खेंचून धरूं शकत नाहीं.

— — —

गोष्टीची गोडी नाहीं कोणास ? आजीच्या तोंडून गोष्ट ऐकतां ऐकतां लहानपणीं कोण झोपीं गेलें नाहीं ? वेदकालापासून आतांपर्यंतच्या वाङ्मयांत गोष्टीच गोष्टी ! राक्षसांच्या, भुतांच्या, पऱ्यांच्या गोष्टी. कुऱ्यामांजराच्या, पोपटमैनाच्या, वाघसिंहाच्या गोष्टी. ठकसेनाच्या गोष्टी, बिरबलच्या गोष्टी, अरबी भाषेंतील गोष्टी—नाना प्रकारच्या गोष्टी ! त्या ऐकण्याची चटक लहान-थोर सर्वांसच. इतिहासांतील सर्व काळांत व पृथ्वीवरील सर्व स्थळांत ही गोष्टींची आवड जबर आहे, कायम आहे. कथा म्हणून, लघुकथा म्हणून, लघुतमकथा म्हणून,— नाना वेषांनीं गोष्टीचें वाङ्मय सर्वत्र मोहिनी घालीत असतें.



लघुकथांचे प्रकार

लहान मुलांची कल्पनाशक्ति जशी तरल असते तशीच अमर्याद पण असते; तिला गगनापर्यंत धाव घ्यावीशी वाटते. अटक अशी तिला माहीतच नसते. नसतें तें असतें करावें, हीच तर त्या कल्पनाशक्तीला अनिवार ओढ. तिची भूक भागविण्यासाठीं 'अद्भुत कथा' तयार असतात. त्यांना स्थलकालाचें बंधन नसतें कीं सत्यासत्याचे निर्बंध नसतात. तरुणपणीं प्रेमाच्या व पराक्रमाच्या भावना हृदयांत उचंबळतात,

त्यांचे पडसाद ऐकविणाऱ्या ' प्रणय कथा ' साहाजिकच युवकांचीं मनें वेधून घेतात. तिरंगी चित्राखालीं बहुरंगी प्रणय रंगविणाऱ्या कथा–कादंबऱ्यावर युवकांच्या उड्या पडतात याचें कारण हेंच. त्यापुढील वर्ग सांसारिकांचा. सत्यसृष्टीचे धक्के–चपेटे व कोपरखळ्या–चिमटे त्यांना बसतात. निराशा व निर्धनता, अपमान व अपयश, मत्सर व द्वेष इत्यादि वास्तव जगांतील कटु अनुभवांनीं ते भगभगलेले व कावलेले असतात. दुःख–दैन्यानें त्रस्त–तप्त झालेल्या त्यांच्या मनाला विरंगुळा मिळावा, म्हणून कोठें तरी ' पलायन ' करावें असें वाटतें. त्यांच्यासाठीं ' कल्पित कथां ' ची टांकसाळ चालू होते. जें आपल्याला सत्य-सृष्टींत लाभत नाहीं, तें हस्तगत केल्याचें समाधान संसारी वाचकाला ' कथा-सृष्टीं ' त गवसतें आणि म्हणून त्यांत तो रमतो. याच ' कल्पिता ' ला उदात्त स्वरूप देऊन ध्येयवादाची सृष्टि वाचकांच्या डोळ्यापुढें उभी करणाऱ्या कांहीं कथा असतात. दोन्हीहि मृगजळेंच. पण एकानें दुःखांचा विसर पडतो, तर दुसऱ्यानें आशेचा विसार मिळतो.

पाश्चात्यांचा स्पर्श

अशा अद्भुत, नीतिपर, वास्तव गोष्टींचा भरणा मराठी साहित्यांत पुष्कळच आहे. भारत–रामायण किंवा पंचतंत्र-हितोपदेश इत्यादि संस्कृत वाङ्मयांतील कथांना तर ' देशीकार लेणें ' दिलेलें आहेच. पण त्याशिवाय इसापनीति, अरबी भाषेंतील गोष्टी, बुद्धांच्या जातक कथा इत्यादि परभाषांतील कथांचे पाटहि मराठीच्या मुलखांत आणून सोडलेले आहेत. ' आटपाट नगरां 'तील गोष्टी सांगणाऱ्या कहाण्या म्हणजे तर अस्सल देशी नाणें. तशाच लोक–कथाहि. वेताळ–पंचविशी व विक्रम–बत्तीशी यांतील गोष्टी खेड्यापाड्याच्या कोनाकोपऱ्यापर्यंत जाऊन पोंचलेल्या आहेत. पण इंग्रजांचें राज्य आलें व पाश्चात्य संस्कृतीचा स्पर्श घडला. त्यामुळें स्त्री–पुरुषांच्या पोशाखांत जसा फरक पडत गेला, तसाच साहित्यांतहि पडला. लघुकथा, लघुनिबंध, भावगीत इत्यादि नव्यानव्या शाखा ललित वाङ्मयाला फुटूं लागल्या.

कथा व कादंबरी

पूर्वीच्या कथा आणि आधुनिक लघुकथा यांमध्यें चक्री पागोटें व टोपी यांच्याइतकें अंतर आहे. हरिभाऊ आपटे किंवा शिवरामपंत परांजपे यांनीं दुष्काळासारख्या विषयावर कथा लिहिल्या आहेत आणि त्या कादंबरीपेक्षां लहानहि आहेत. पण त्यांना अर्वाचीन तंत्राप्रमाणें 'लघुकथा' म्हणतां येत नाहीं. लघुकथा म्हणजे छोटी कादंबरी नव्हे. या दोन वाङ्मय-प्रकारांची भिन्नता प्रा. फडके यांनीं मोठ्या बहारीनें वर्णिली आहे. 'लघुकथा लेखन–मंत्र आणि तंत्र' या आपल्या ताज्या ग्रंथांत ते म्हणतात, "कादंबरीला घवघवीतपणा असूं शकतो. उलट लघुकथा निमुळती असायला हवी. कादंबरी म्हणजे एक भव्य प्रासाद असतो. लघुकथा काश्मीरमधल्या सफेता झाडासारखी किंवा सुरूच्या अथवा पोफळीच्या झाडासारखी सरळ उंच जाणारी असते. कादंबरीला जाडपणा, डेरेदारपणा असतो; लघुकथेला तो नसतो. कादंबरी आडव्या अंगानं वाढूं शकते. लघुकथा वाढून चालणार नाहीं. कादंबरीचा आघात एखाद्या भल्या-मोठ्या हातोड्याच्या आघातासारखा व्हायला हवा. लघुकथा एखाद्या तीक्ष्ण टोंकाच्या सुईप्रमाणें टोंचायला हवी. एखाद्या टोलेजंग इमारतीवर विजेचे दिवे लावल्यावर जी रोषणाई दिसते तिची उपमा कादंबरीला साजेल. लघुकथेला उपमा द्यायची झाली तर लखकन् उजळून, क्वचित् काडकाड आवाज करून लुप्त होणाऱ्या विद्युल्लतेचीच शोभेल. एखाद्या गवयानं तासभर एखादी रागिणी गाऊन दाखवावी, आणि सहज बोलतां बोलतां एखाद्या रागांतली सुंदर तान घेऊन दाखवावी, यांत जो फरक आहे; तोच कादंबरी आणि लघुकथा यांत आहे."

लघुकथेचें स्वरूप

असें असलें तरी लघुकथा ही सामान्यतः लघु असतेच-तीनशें ते तीन हजारपर्यंत शब्दांत ती आटपावी असा संकेत आहे. एवढ्या लहानशा क्षेत्रांत कमींत कमी पात्रें घेऊन आणि कमींत कमी प्रसंग वापरून, ऐकणा-

ऱ्याच्या मनावर एकच एक संस्कार ठसठशीतपणें घडविणें हें आधुनिक लघुकथेचें उद्दिष्ट असतें. संस्काराचें एकत्व हाच लघुकथेचा आत्मा. अशा आधुनिक लघुकथांची परंपरा मराठींत १९२० सालानंतर सुरू झाली. त्यांपूर्वी वि. सी. गुर्जर यासारखे लेखक 'मासिक मनोरंजना'मधून चटकदार लघुकथा लिहीत होते. गुर्जरांनीं तर सुमारें पन्नास वर्षें असें लेखन करून सहाशेंवर लघुकथा लिहिल्या. पण रेखीव रचना करून, पात्रें व प्रसंग काटकसरीनें वापरून, सूचक भाषाशैलीनें, मनाचीं आंदोलनें चित्रित करणाऱ्या लघुकथा १९२० सालानंतरच मराठींत चमकूं लागल्या. संध्यकाळचे वेळीं आकाशांत एक एक चांदणी येऊन लुकलुकूं लागते आणि थोड्याच वेळांत सारें आकाश चांदण्यांनीं भरगच्च भरून जातें, तसा तेजस्वी विस्तार मराठी साहित्यांत लघुकथांचा झाला. १९२० ते १९४० हीं वीस वर्षें 'लघुकथांचें युग' म्हणून माजलीं. पूर्वीं मिशाबरोबर मतें व मतांबरोबर कविता तरुणांना जशा येत असत, तशा या कालखंडांत लघुकथा रचण्याचा छंद युवकांमध्यें वाढत गेला. कोणत्याहि नवीन लेखकानें हातांत लेखणी घेतली कीं, आपल्या साहित्य-सेवेचा प्रारंभ लघुकथेनें करावा, अशी जणुं रूढि पडत चालली. अशा लघुकथाकारांमध्यें फडके यांनीं आपलें स्थान निर्माण केलें आहे. त्यांचें आतांपर्यंत पंधरा कथा संग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

फडके हे 'कादंबरीकार' म्हणून जितके यशस्वी झाले, तितके लघुकथाकार म्हणून झाले नाहींत. मात्र 'नाटककार' म्हणून त्यांना जितकें अपयश मिळालें, तितकें कांहीं कथाक्षेत्रांत आलें नाहीं. कारण नाटकापेक्षां लघुकथेची सरहद्द कादंबरीच्या जवळ आहे. कथेच्या निवेदनाला योग्य अशी सफाईदार व लालित्यपूर्ण भाषा तर त्यांच्यापुढें हात जोडून उभीच आहे. त्याचप्रमाणें निरनिराळ्या पात्रांना व प्रसंगांना शोभेसे व स्वाभाविक संवाद घालण्यांत त्यांचा हात कोणीच धरूं शकत नाहीं. आणि मनोगाहन-शास्त्रांत निष्णात असल्यामुळें, ते पात्रांचा स्वभाव-परिपोष उत्कृष्ट करूं शकतात. परंतु नाटकांप्रमाणेंच लघुकथेंतहि जो संयम व संघर्ष असावा लागतो, तो फडक्यांच्या लेखणींत फारसा नाहीं. त्यामुळें त्यांच्या

लघुकथांमध्यें लघुत्व येत नाहीं व संस्काराचें एकत्व साधत नाहीं. 'झक मारतात एम. ए., पी एच. डी.' या नांवाची त्यांची लघुकथा चोवीस पानें पसरलेली आहे, या नांवाचा आंतील विषयाशीं नांवापुरतासुद्धां संबंध नाहीं आणि विनोद पिकविण्याचा जो प्रयत्न त्यांत केलेला आहे, तोहि फारसा यशस्वी झालेला नाहीं. हास्यरस निर्माण करण्यासाठीं साध्या प्रसंगावर विनोदाचें खोगीर त्यांनीं चढविलें आहे. त्याचा एक नमुना म्हणजे—" मोरूच्या डोक्यांत खाडकन् प्रकाश पडला ! तीन पिढ्या हाडवैर संपण्याच्या तयारीनं हातीं चंची घेऊन सनातनी विठ्ठलराव कां शरण आला होता त्याचा एकदम उलगडा झाला ! गहूं, तांदूळ, साखऱ्या इत्यादि भरपूर साहित्य काबीज करायचं होतं. युद्धसाहित्य वळकावण्यासाठीं हिटलर ज्याप्रमाणं रशियाच्या युक्रेन प्रांतांत घुसला, त्याप्रमाणं समेटाच्या भाषेनं त्यांच्या पोटांत शिरून मिष्टान्नाच्या केवळ एका भोजनाच्या मोबदल्यांत अडीचशें पानं उठवतां येतील इतकं साहित्य लाटण्याच्या या लबाड विठू शेवड्याचा धूर्त डाव होता काय ? आवळा देऊन कोहळा काढायचा इरादा आहे तर याचा ? आलं ध्यानांत सारं तुमचं कपट, मिस्टर विठ्ठलराव शेवडे ? पण घेवड्यांच्या मोरूशीं गाठ आहे तुमची..... !"

समाजवादाचे शिंतोडे

'चंद्रा' या गोष्टींत गुन्हेगार जमातीच्या जीविताचें रुक्ष वर्णन आरंभींच्या दोन पानांत आलें आहे पुढील कथेबद्दल जिज्ञासा उत्पन्न करण्यास तें मुळींच पोषक नाहीं. त्याचप्रमाणें 'जागृतीचें स्वप्न' या कथेंत एका शिक्षकाचें व्याख्यान दिलें आहे. 'राम आणि रहीम' या कथेंत समाजवादी विचार मांडला आहे. तो असा—" हिंदूंचे खरे शत्रु मुसलमान नाहींत किंवा मुसलमानांचेहि खरे शत्रु हिंदु नाहींत. जगांत दोनच जाती आहेत, काम करणारा मजूर आणि मजुरांच्या मेहनतीवर गबर होणारा पैसेवाला. हिंदु कामगार आणि मुसलमान कामगार दोघांनाहि हा पैसेवाला सारखाच रगडतो आहे." असाच अर्थ-प्रधान विचार, 'दादा पुरते डोळे उघडा !' या कथेंतील दुर्गी सांगते. 'दारूबंदी' या गोष्टीचेंहि पालुपद 'वर्गभेद नाहींसा करा' हेंच आहे. पण समाजवादाच्या

तळमळीनें या कथांचे अणु-रेणु भरून गेलेले नाहींत. मुलीला मिठाई देतां येत नाहीं, म्हणून चंद्रा क्रांतीच्या सैन्यांत दाखल झाली, असा ओढून-ताणून आणलेला समाजवाद कथेला चिकटविल्यासारखा दिसतो.

व्याख्यानाची धोंड

कादंबरींत काय किंवा कथेंत काय, शुष्क चर्चा किंवा नीरस व्याख्यानें नसावींत. हा नियम कांटेकोरपणें कोणी पाळत असतील तर फडकेच. पण आश्चर्य हें कीं, कादंबरीच्या राज्यांत असतांना असे कायदे कसोशीनें पाळणारे फडके कथेच्या क्षेत्रांत शिरतांच मात्र कायदेभंग करूं लागतात ! वधूपरीक्षेच्या अपमानकारक रूढीचें चित्रण करणाऱ्या त्यांच्या कथेंतील नायिका त्रिवेणी, जणुं कांहीं महिला परिषदेंत उभी असल्याप्रमाणें, लांबलचक व्याख्यान झोडते आणि विचारते, " बापांनीं मुली दाखवाव्या, चांगल्या शिकल्यासवरलेल्यांनीं त्या पहाव्या आणि पदवीधर मुलींनीं या गलिच्छ प्रकारापुढं मान वांकवावी असं चाललं आहे म्हणून तुमचे डोळे उघडत नाहींत होय ? मुलींच्या मनाला आधिक संतोषाची आणि सन्मानाची वाटेल अशी लग्नं जुळविण्याची पद्धति रूढ करायला पाहिजे हें तुमच्या कधीं लक्षांतच येणार नाहीं, होय ? "

चित्तवेधक प्रारंभ

पाल्हाळिक वर्णन किंवा अरसिक विवेचन हे दोष वगळले, तर फडक्यांची लघुकथा नाकींडोळीं नीटस आहे आणि तिचे इतर अवयवहि सुंदर आहेत यांत शंका नाहीं. लघुकथेचा प्रारंभ चित्तवेधक असणें जितकें आवश्यक, तितकाच तिचा शेवट विस्मयकारक असणें अगत्याचें असतें. पहिलें वाक्यच असें चटकदार पाहिजे कीं, वाचकानें पुढें पुढें वाचीतच जावें. आणि शेवटचें वाक्य असें असलें पाहिजे कीं, एखाद्या झोपेंत चालणाऱ्या माणसाला धक्का लागून त्यानें खाड्दिशीं जागें व्हावें, त्याप्रमाणें भावनेच्या तंद्रींत गुंगलेल्या वाचकाला खडबडून जाग यावी आणि त्याला कांहींतरी चुटपुट लागावी. असा आकर्षक आरंभ आणि अखेरीस

कलात्मक कलाटणी ही दोन्ही साधण्यांत फडके पुष्कळ वेळां यशस्वी होतात. " प्लॅटफॉर्मच्या फरशीवर टाप टाप असा बुटांचा आवाज करीत करीत धिम्या लयींत येरझारा घालणाऱ्या त्या उंच मजबूत गृहस्थाकडे दृष्टि जातांच कुणाचीहि जिज्ञासा जागृत होण्यासारखी होती. " असें ' माझा देश ' या कथेचें आरंभींचें वाक्य वाचलें कीं, कोणाची जिज्ञासा जागृत होणार नाहीं ? तसाच ' दारुबंदी ' या गोष्टीचा आरंभहि उत्कंठा उत्पन्न करणारा आहे. तो असा, " कुणी तरी मागून येऊन माझ्या पाठीवर इतक्या जोरानं थाप मारली, कीं हातांतली छत्री मीं पुढें टेकली नसती तर मी पडलोंच असतों.

मी रागानं वळून पाहिलं अन् पाहतों तों जालची स्वारी माझ्यापुढें उभी !

माझा सारा राग एकदम मावळला अन् हस्तांदोलनासाठीं हात पुढें करीत मीं हसून विचारलं, "

एकजिनसी वातावरण

एकंदर लघुकथेमध्यें एकच एक वातावरण निर्माण करणेंहि अगत्याचें असतें. 'माझा देश' या कथेंत युद्धकालीन वातावरण सर्वत्र भरून राहिलें आहे सहज भेटलेला माणूसहि बोलून जातो– " आमच्या बायकापोरांना पाऊण शेर साखऱ्यासाठीं आणि अर्धी बाटली रॉकेलसाठीं तास तास रांग धरावी लागते. पाहुण्याला मलिदा आणि धन्याला धत्तुरा असा न्याय चालला आहे जगांत आजकाल !" तसेंच स्टेशनवरच्या उपाहारगृहांत कथा– नायक गेला असतांना तेथील पोऱ्याच्या तोंडूनहि जे शब्द बाहेर पडतात, ते या युद्धकालीन वातावरणाला पोषक असेच असतात. तो पोऱ्या व नायक यांचा संवाद असा–" मान हलवून नोकर म्हणाला, 'आतां केकस कुठल्या साहेब ? हा कंट्रोल सुरू झालाय ना ? मुंबईच्या मोठमोठ्या युरोपियन हॉटेलांतसुद्धां आतां केक कसल्या मिळतात माहीत आहे ? बाजरीच्या ! '

' बरं टोस्ट तरी करून देतोस काय पोटभर ? '

'दोन तुकडे देतो साहेब, तेच पोटभर म्हणा. फार खराब दिवस आले साहेब..."

कल्पनेची ठिणगी

एक प्रसंग किंवा एक कल्पनाहि लघुकथेचें भांडवल होऊं शकतें. 'धंद्यानं शिंपी पण मनानं?' या कथेंत फडक्यांनीं एकच कल्पना फुलविली आहे. स्वतंत्र धंदा करणारा एक शिंपी आरंभीं कलादृष्टीनें काम करीत असतो. पण कर्ज फेडण्यासाठीं तो लष्करी कंत्राटदाराकडे नोकरीस राहतो. त्यामुळें त्याच्या वृत्तींतील कला मरते आणि त्याचें जीवन यांत्रिक होतें. ही क्रांति फडक्यांनीं कुशलतेनें रेखाटली आहे. त्या शिंप्याचें प्रारंभीचें स्वतंत्र जीवन कसें होतें? तर--"बाबूराव म्हणजे कापडांतून सुईदोरा घालणारा साधा शिंपी नव्हता. आपल्या हातून होणारं काम पहिल्या दर्जाचं असावं अशी त्याला हौस होती. कपड्यांच्या नव्या नव्या तऱ्हा शिकण्यासाठीं तो नेहमीं उत्सुक असे. नुसत कॅटलॉग पाहून आपली कल्पकता लढवून एखादा कपडा मनपसंत शिवून झाला कीं त्याला मोठा हर्ष होई. स्वच्छतेची, टापटिपीची आणि सौंदर्याची त्याला जन्मसिद्ध आवड होती. एखाद्या तंतुकारानं आपलं वाद्य ठेवावं त्याप्रमाणें तो आपलं शिवण्याचं यंत्र कमालीचं स्वच्छ ठेवीत असे. त्या यंत्रावर त्याची केवढी माया! तो शिंपी नव्हे, कलावंत होता!"

लष्करी कंत्राटदाराकडे नोकर बनल्यानंतर आपलें जीवन कसें यांत्रिक बनलें याचें वर्णन करतांना तो शिंपी म्हणतो, "रोज तीन रुपये मिळविणारं यंत्र झालों होतों मीं. कर्ज फेडण्यासाठीं माझी सारी कलाकुसर गाडून घाण्याच्या बैलाप्रमाणें यंत्रावर पाय मारीत होतों मी आठ आठ तास! कुणाच्या गळ्याचं, छातीचं, हातापायाचं कसलंच माप घ्यायचं नसे. हजारो माणसांची कळसूत्री बाहुलीं लढाईवर जायचीं असत! साऱ्यांचे हात, पाय, गर्दन एकाच मापाची! घे कापड, कर कात्रीनं तुकडे, अन् चालू दे पाय मारणं!"

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्रों. नं. २२५
३७/३/५३

बाल-मनाचीं चित्रें

बालकांचें मानसशास्त्र फडके उत्तम जाणतात. त्याचा उपयोग मराठींत तरी त्यांच्याइतक्या कौशल्यानें दुसरा कोणताच ललित-लेखक करूं शकत नाहीं. ' दौलत ' कादंबरींतील छोट्या अकल्पितेचे बोबडे बोल व अल्लड कृति कोण विसरू शकेल ? तसेंच ' कोंडमारा ' या कथेंतील नानूचें स्वभावचित्रहि चित्ताला चटका लावणारें आहे. 'लहान मुलें म्हणजे देवाचे लाडके दूत, त्यांचे विचार सुतासारखे सरळ व भावना स्फटिका-प्रमाणें निर्मळ ' असें मानण्याचा भाबडेपणा फडके करीत नाहींत. बाल-कांच्या आवडीनिवडी, हर्षखेद, मानअपमान, इत्यादींचें स्वरूप ते यथार्थ-तेनें जाणतात आणि त्यांचीं कारणेंहि अचूकपणें ओळखतात.

चित्रपटासंबंधीं नानूला काय वाटत होतें, हें सांगतांना फडके लिहितात, " त्याच्या तात्यांनीं त्याला पांचसहा चित्रपट दाखविले होते. आणि ते सगळे त्याला आवडले होते. त्यांतल्या सर्व गोष्टी त्यानं स्मरणांत ठेवल्या होत्या. अमुक एक चित्रपट वाईट आहे असं मोठीं माणसं कां म्हणतात हेंच त्याला कळत नसे. त्याचा स्वतःचा हिशेब असा होता कीं, चित्रपट म्हटला कीं चांगला असलाच पाहिजे. पैसे वांचवायचे असले आणि लहान मुलांना पाठवायचं नसलं म्हणजे चित्रपटांच्या वाईटपणाची सबब मोठीं माणसं निर्माण करतात. तात्यांच्याइतकं मोठं झाल्यावर ज्या अनेक गोष्टी तो करणार होता त्यांतला एक बेत असा होता कीं, प्रत्येक चित्र-पटाला आपण तर जायचंच पण साऱ्या मुलांनासुद्धां धाडायचं. " मुलांची महत्त्वाकांक्षा अशीच असते.

नानू शेजारच्या घरीं खेळावयास जात असे. तेथील बिऱ्हाडकरू जागा सोडून गेले होते. त्यांच्या जागीं बरेच दिवस दुसरें कोणी आलें नव्हतें. तेव्हां नानूची खेळण्याची कुचंबणा होऊं लागली. म्हणून त्यानें वडिलांना एक फक्कड तोड सुचविली व्यावहारिक अडचणींचा विचार तो कशाला करतो ?

' नानू वडिलांना म्हणाला, ' तात्या, परांजपे रहात होते ती शेजारची बंगली तशीच मोकळी पडली आहे. आपण घेऊं या ती ! अं ? '

पण त्याचे तात्या नुसते हंसले आणि त्याच्या आईनं त्याला विचारलं, 'अरे नानू, वेडा कां तूं? अरे ४५ रुपये भाडं कुठून आणायचं?' तें ऐकून नानू अगदीं खजील झाला. अवघे ४५ रुपये आणणं इतकं कठीण असूं शकतं हें त्याला कांहीं केल्या खरं वाटेना. त्याला वाटलं होतं, आपण सुचविल्याबरोबर तात्या म्हणतील, 'असं म्हणतोस? ठीक आहे. जाऊं त्या शेजारच्या बंगलींत रहायला.' तसं उत्तर त्याला मिळालं नाहीं म्हणून त्याचा मोठा हिरमोड झाला." बालाचे जग किती साधे–सरळ!

अखेर त्या रिकाम्या जागेंत एक बिऱ्हाड आलें. नुसतें बिऱ्हाडच नव्हें, तर त्याच्याशीं खेळण्याजोगीं मीरा नांवाची मुलगीहि पण आली. आणि नुसती मुलगीच नव्हे, तर तिचे वडीलहि मोठे गोड बोलणारे, ममताळू स्वभावाचे, मुलांच्या खेळांत भाग घेणारे आणि शाळेंतील अवघड विषय सोपे करून शिकविणारे. पण ते नट होते–दारुडे होते–दुर्गुणी होते. त्यामुळें नानूला त्यांच्या घरीं जाण्यास त्याच्या वडिलांनीं बंदी केली. तरी तो जाई. तेव्हां वडिलांनीं त्याला एकदां चांगलें चापलें. त्यावेळीं नानूची स्थिति काय झाली, हें एखाद्या शिल्पकाराप्रमाणें फडक्यांनीं उभें केलें आहे. नानूचें शब्दचित्र त्यांनीं मोजक्या शब्दांनीं पुढीलप्रमाणें रेखाटलें आहे; "त्यांच्या बोलण्याच्या तऱ्हेचा नानूला फार राग आला. तोंड गच्च आवळून धरून आणि भुंवयांना आठी घालून भिंतीला दाबून पांठ लावून तो अगदीं गप्प उभा राहिला."

बालकाची उत्कंठा

तसेंच, "तुरुंगांतून सुटका" या कथेंतहि बाल–मनाचें चित्रण फडके यांनीं उत्तम केलें आहे. बारा वर्षांचा रघुनाथ आपल्या भावाची किती उत्कंठेनें स्टेशनवर वाट पाहतो याचें वर्णन त्यांनीं चार पानें केलें आहे. तें इतकें हुबेहूब आहे कीं, वाचकाच्या डोळ्यापुढें फलाटावर इकडे तिकडे वेड्यासारखा हिंडणारा रघुनाथ मूर्तिमंत उभा राहतो. तुरुंगांतून सुटलेला आपला दादा गाडींतून उतरला नाहीं पण गाडी मात्र पुढें निघून गेली, याचें वर्णन लेखकानें किती सूक्ष्मतेनें केलें आहे पहा.—"स्टेशनवरचा पोर्टर

रुळाचा एक तुकडा टांगलेला होता त्याच्यावर टोले मारून घंटा देई, गाडीची शिटी वाजे, आगगाडीचा भोंगा होई आणि डब्यांचीं चाकें व जोडसांखळ्या यांचा विचित्र आवाज होऊन, उंदीर खाल्ल्यानें जडावलेल्या एखाद्या अजस्र सर्पाप्रमाणें, गाडी चालू होई. तिच्यांतून निघालेल्या धुराच्या धांदोट्या कांहीं वेळ तिन्हीसांजाच्या त्या धूसर आकाशांत फडफडलेल्या अस्पष्ट दिसत, आणि कांहीं वेळानें गाडी वळण घेऊन दिसेनाशी होई. मग छोटा रघुनाथ सुस्कारा टाकून परत फिरे."

'जगांतलें पहिलें पाऊल' या लघुकथेमध्येंहि पांच वर्षांच्या एका बालकाची मनोवृत्ति चित्रित करण्यांत आली आहे. मावशीचा लळा लागलेला आनंद जेव्हां आपल्या श्रीमंत बापाच्या घरीं जातो, तेव्हां तेथील थाटमाट पाहून तो गडबडून जातो. त्या श्रीमंतींत त्याचें मन कांहीं रमत नाहीं. उलट कारखान्यांतील कामगार वडिलांच्याविरुद्ध जें जें बोलतात, तें ऐकून आनंद कष्टी व कुढा होतो. "आपल्या हृदयांतील कसली तरी नाजूक भावना चिरडली जात आहे" असें त्याला वाटूं लागलें. हें सारें मनोविश्लेषण फडक्यांनीं नाजूक हातांनीं केलेलें आहे.

एक नमुनेदार कथा

फडक्यांची कथा-सृष्टि सदाफुली व चिरतरुण आहे. नाटक, सिनेमा व कॉलेज यांतील प्रणय-लीलांचेच झंकार त्यांच्या बहुतेक कथांतून ऐकूं येतात. त्यांच्या यशाचें शिखर म्हणजे एकाद्या निष्पाप बालाच्या किंवा अभागी स्त्रीच्या मनाचे पदरामागून पदर उलगडून ते व्यवस्थितपणें मांडून दाखविणें हें होय. 'मोहोर' ही त्यांची अलीकडील कथा या दृष्टीनें अभ्यसनीय आहे. वत्सल पित्याच्या रागाची, संभ्रमाची व शेवटीं प्रेमाची अवस्था त्या कथेंत किती नाजूक कलमानें रंगविली आहे!

लघुकथेचा आरंभ कसा करावा, तिचा शेवट कसा साधावा, त्या दोहोंची साखळी जोडणारें वातावरण कसें निर्माण करावें, आणि संवाद, वर्णन, स्वभाव परिपोष, भाषाशैली, इत्यादि सर्व अंगोपांगांतून एकच एक भावना कशी खेळवावी; म्हणजे त्या सर्वांचा संकलित असा एकच एक

परिणाम घडून लघुकथेचें सर्वांगसुंदर पुष्प कसें फुलतें, यांचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे फडक्यांची 'वत्सला!' ही कथा. या कथेंत फक्त दोनच पात्रें आहेत.—विश्वनाथ व वत्सला. त्यांपैकीं एकट्या वत्सलेचीच मनःस्थिति सर्व कथेंत ओतप्रोत भरून राहिली आहे. वत्सला कुरूप पण तिचा कंठ मधुर आणि विश्वनाथ देखणा पण डोळ्यांनीं आंधळा. या दोघांची आकस्मिक भेट आगगाडीच्या डब्यांत होते.

'कामाचं काय होतं, तें कळवीन मी तुम्हांला' असें वत्सला आपल्या वडिलांना आरंभींच म्हणते, त्यामुळें 'हें काम कोणतें?' अशी जिज्ञासा वाचकांच्या मनांत उत्पन्न होते. 'सृष्टीच्या सुखमंडलावरील रम्य वनश्रीचें' शब्दचित्र पांचसात वाक्यांत काढल्यानंतर 'पण सुखाचा अन् आनंदाचा दसरा सर्वांनाच लाभणार होता काय?' असा प्रश्न करून लेखकानें वाचकांच्या जिज्ञासेची तार अधिकच ताणली आहे. आगगाडींत वत्सलेला त्या सुंदर तरुणाचे डोळे एकसारखे मिटलेले दिसले. त्यामुळेंहि तिची—आणि तिच्याबरोबर वाचकांचीहि—जिज्ञासा सहजच वाढते. आणि मग तिला कळून येतें कीं, तो आंधळा आहे. पण तो एका ग्रामोफोन कंपनीचा मालक असतो. त्यानें वत्सलेचीं गाणीं ध्वनिमुद्रित करविलीं. पुढें त्याच्या आजारीपणांत तिनें त्याची शुश्रूषा केली. अखेर त्यानें तिच्याशीं लग्न करण्याची गोष्ट काढली. वत्सलेनें आपल्या कुरूपतेमुळें नकार दिला. पण 'अंतःकरणांतील भावनांचें सौंदर्य' त्याला महत्त्वाचें वाटलें आणि त्या दोघांचें जीवन एकजीव झालें. हें सारें कथा-सूत्र भावनेचे पदर उलटसुलट गुंफणारें व जिज्ञासा वाढविणारेंच आहे.

भाषेचा सहजपणा

कथेची भाषा किती सोपी व सहज असावी, याचाहि नमुना 'वत्सला' या कथेंत पहावयास सांपडतो. पुढील चारच वाक्यें पहा. "बोलतां बोलतां तिच्या भावना अनावर झाल्या आणि ती रडूं लागली. तिला वाटलं, झालं, आटपलं सारं! भ्रम संपला! सुखहि संपलं! आतां विश्वनाथाला आपला स्पर्शसुद्धां नकोसा वाटेल."

सहज संवाद पात्रांच्या तोंडीं घालण्यांत फडक्यांचा अगदीं हातखंडा आहे. 'वत्सला' या गोष्टींत आंधळ्या विश्वनाथाशीं झालेला तिचा संवाद किती स्वाभाविक व विनोदपूर्ण आहे.

ती म्हणाली, "पुण्याला. आपण?"

'मी मुंबईला जाणार आहें."

"आपल्याबरोबर तर कुणीं दिसत नाहीं.—"

"नेहमीं कसं कोण बरोबर मिळेल? मिरजेला एका स्नेह्यांनीं गाडींत बसवून दिलं. आतां पुण्याच्या स्टेशनवर एक स्नेही येतील, ते मला मुंबईच्या गाडींत बसवून देतील. मग मुंबईच्या स्टेशनवर उतरून घ्यायला कुणी तरी येईलच."

"पण वाटेंत मदत नाहीं लागत?"

'लागते. पण बहुधा ती मिळते. आतांच पहा कशी मिळाली!' असं म्हणून तो हसला.

भाषेच्या कृत्रिमतेपासून फडके अगदीं अलिप्त आहेत. कोल्हटकर—गडकरी—खांडेकर यांच्या अगदीं दुसऱ्या टोंकाला ते उभे असतात. शब्द-लीला त्यांना वावड्या वाटतात. श्लेष, कोटी, अनुप्रास,—त्यांच्या लेखनांत सहसा आढळत नाहींत. अपवाद म्हणून, 'लक्ष्मीपूजन' (लक्ष्मीचें किंवा लक्ष्मीनें केलेलें,), 'भाल्याची (भालचंद्राची) शिकार,' 'निरोगी (ज्याकडे रोगी येत नाहींत असा) डॉक्टर' असें शब्दांचे खेळ तुरळक आढळतात. 'शिंप्यांचा धंदा शिवायचा असून त्याच्या मनाला हा उद्देश शिवत नाहीं.' किंवा 'त्रिवार (अर्थात् कापड मोजण्याचाच वार) सत्य होय.' असें श्लेष तर विरळाच! प्रारंभींच्या कथांतच ते थोडेफार सांपडतात.

वर्णन-शैलींत फडके यांचा हात कोण धरील? नुसती फुलांची वेणी; पण तिचें स्तवन तें किती मिष्टास शब्दांनीं करतात पहा—"वेणींतील एकेक मोगऱ्याची कळी अशी टपोरी होती! छे! असा बटमोगरा कधीं कोणी पाहिला नसेल! एकेक कळी म्हणजे शुभ्र सौंदर्याचा जणु बुंदच होता! आणि त्या कळ्यांची गुंफा करणारी रंगीत लोकर आणि

चमचमणारी कलावतू इतक्या बेतानें मधून मधून डोकावत होती कीं, जणुं त्या कोंवळ्या कलिकांना सांवरण्यापुरतेंच आपल्याला पुढें झालें पाहिजे हें तिला कळत होते ! आणि वेण्यांची आजची मुरडहि कांहीं निराळीच होती. एकेक वेणी अशी गेंदेबाज आणि लाडकी दिसत होती कीं, तिच्यापुढें मोत्यांचे सर फिके पडावे आणि हिऱ्यांनींहि गर्वगलित होऊन श्वास टाकावा ! " अशीं सहज–सुंदर व कथा–पोषक वर्णनें फडके लीलेनें करतात.

विनोदासाठीं कृत्रिमता

मात्र कथानकाच्या रचनेंत फडके पुष्कळ वेळां कृत्रिमपणा आणतात. ' पुरुषस्य भाग्यं ' किंवा ' उपाशी प्रेम ' अशा लघुकथांमध्यें असंभाव्य प्रकार दडपून विनोद निर्मिण्याचा प्रयत्न फडक्यांनीं केला आहे. पण तो विनोद ' ठकसेनाच्या गोष्टी 'सारखा उथळ वाटतो. वर्तमानपत्राच्या कचेरींतील अनंतासारखा धास्तावलेला जीव सिनेमाचा नट होतो हें ' अरबी गोष्टी ' इतकेंच ' सुरस व चमत्कारिक ' आहे. तीच स्थिति शांताच्या बंगल्यापुढें प्रेमासाठीं उपास करणाऱ्या भावड्याची. बगळ्यांच्या बगुताईनें प्रतिउपास करून त्याला पलायन करावयास लावलें ही कदाचित् अद्भुत कथा ठरेल—लघुकथा नव्हे. मात्र या कथेंतील विनोद व उपरोध खुमासदार व धारदार आहे भाषाशैली व अतिशयोक्ति या दोन्ही दृष्टींनीं नमुनेदार ठरणारा विनोद पुढील चार ओळींतहि पहावयास मिळतो.

" अशीसुद्धां गप्प उठली, कीं प्रेमासाठीं प्राणान्तिक उपोषण करणाऱ्या या असामान्य तरुणाचं अभिनंदन करणारी तार डबूक ऑफ विंडसरकडून आली असून त्या तारेंत लिहिलं होतं, ' शाबास पठ्ठ्या ! माझ्याहि पुढं तूं गेलास ! मी प्रेमासाठीं सिंहासन सोडलं, पण तूं प्राणसुद्धां सोडायला तयार आहेस. मी डोक्यावरची टोपी काढून तुला अभिवादन करतों ! "

या कथेचा शेवटहि एकंदर कथानकाला साजेसा विनोदपूर्ण आहे. तो असा—" भावड्या पुनः त्या कॉलेजांत परत आला नाहीं !

कोणी म्हणे तो कराचीच्या कॉलेजांत गेला. कुणी म्हणत, कीं त्यानं कलकत्त्यास उपासाला चालणाऱ्या पदार्थांचं दुकान काढलं आहे. अन् एकदां तर गप्प उठली कीं, आपल्या एकंदर उपाशी प्रेम-प्रकरणाचा चित्रपट करून द्यायच्या करारानें तो थेट हॉलिवुडला जायच्या खटपटींत आहे !"

नवें दर्शन

दिवाळी म्हणजे लघुकथांची सिंहस्थ पर्वणी. नियतकालिकांच्या विशेष-अंकासाठीं दहादहा वीसवीस लघुकथांच्या लाह्या भाजून देण्याची पाळी लेखकावर येते. अर्थात् त्यांत गणंगच फार असतात. पण फडक्यांची लेखणी विशिष्ट पातळीच्या खालीं कधींच उतरत नाहीं. हापूसचा आंबा लहानमोठा केवढाहि असो, त्याचा विशिष्ट स्वाद व चव त्याला असावयाचीच, तोंच थाट फडक्यांच्या लघुकथेचा. कांहीं कांहीं कथा तर अशा प्रासंगिक असूनहि सुरेख उतरल्या आहेत. 'पहिली भाऊबीज' हें एक उदाहरण सांगण्यासारखें आहे. चित्रपट कंपनीचा मालक चंद्रकांत हा तरुण व श्रीमंत होता. पण त्याला सख्खी किंवा मानलेली बहीण कोणीच नव्हती. त्याच्या हृदयाला बहिणीच्या प्रेमाची ओढ लावण्यासाठीं लेखकानें कथेच्या आरंभींच दिनूला आणलें आहे. तो भाऊबीजेसाठीं बहिणीकडे जाण्यास आतुर आहे. मालकानें दिवाळींतहि कंपनीचें काम चालू ठेवलें होतें, म्हणून तो चंद्रकांताकडे रजा मागावयास आला—आणि 'रजा नाहीं' म्हणतांच त्यानें राजिनामा पुढें केला—इतकी त्याला बहिणीच्या भेटीची ओढ ! प्रेमाच्या या नव्या पैलूचें दर्शन चंद्रकांतांना घडलें. त्यानंतर आगगाडींत त्यांना एक तरुणी भेटली. तिच्या घरीं दारिद्र्य होतें आणि तिच्या बहिणीचें ऑपरेशन करावयाचें होतें. त्या कामीं चंद्रकांतांनीं तिला गुप्तपणानें पण सहानुभूतीनें इतकी मदत केली कीं, ती त्यांना भाऊबीजेच्या दिवशीं आपल्या घरीं ओवाळावयास घेऊन गेली. हृदयांतील भावनेचा एक नवा साक्षात्कार, जगांतील अनुभवाचें एक नवें दर्शन, मनांतील गुंतागुंतीचा एक नवा उलगडा—हें उत्तम लघुकथेचें जन्म-कार्य फडक्यांच्या ह्या लघुकथेनें साधलें आहे.

प्रचाराचें शीड

एखाद्या तीक्ष्ण अनुभवाचें ओझरतें दर्शन लघुकथेंतून झालें तरी पुरें होतें—त्यांतून बोध किंवा प्रचार झालाच पाहिजे असें नाहीं—आणि फडके तर त्या वाटेला सहसा जाणारे नव्हेत. परंतु कांहीं कांहीं कथांत, त्यांच्या कलादृष्टीचा पहारा चुकवून, थोडेफार सुविचार घुसले आहेत. 'चोर व साळसूद' या लघुकथेंत ढोंगी सदानंदमहाराज आपल्या शिष्याकडून पैसे लुबाडतात, पिंच्या मांग त्यांच्या पैशावर दरोडा घालतो आणि खंडेराव वकील पिंच्या मांगाचे पैसे गडप करतो—अशी समाजांतील गुप्त चोऱ्यांची सांखळी या कथेंत फडक्यांनीं दाखविली आहे. शेवटीं महाराजांना हजार रुपयांची दक्षणा देऊन बसलेले वकील म्हणतात, "बराय म्हणायचा हा साधूचा धंदा. आम्ही रात्रंदिवस मेंदू शिणवून, अन् कोर्टात हाडाचीं काडं करून पैसा मिळवावा, अन् या बेट्या महाराजांनीं सहजासहजीं हजार रुपयांचं उदक आमच्याकडून हातावर घ्यावं! हं:! काय न्याय आहे पहा!"

तसेंच 'उलटें शाकुंतल' या कथेंत पति-पत्नींचें कर्तव्य फडके यांनीं कुशलतेनें सांगितलें आहे. दुष्यंतरावांना गरिबी आली म्हणून त्यांना सोडून निघालेल्या शकुंतलाबाईंना आगगाडींत गरीब पण प्रेमळ जोडप्यांचें दृश्य दिसतें, आणि माहेरीं गेल्यावरहि त्यांना विविध अनुभवामुळें पटतें, "गरिबीची लाज कसली? गरिबींतच पति-पत्नींनीं एकमेकांस आधार द्यावयास हवा."

लघुकथेंत स्वभावदर्शन घडविणें एकपट कौशल्याचें असलें, तर स्वभावपरिवर्तन दाखविणें दसपट चातुर्याचें आहे. असें चातुर्य फडक्यांनीं 'सुप्रभात' या कथेंत दाखविलें आहे. "तें विलक्षण ओरडणें ऐकून ओबायदुल्ला एकदम दचकून जागे झाले." असा या कथेचा प्रारंभच मुळीं जिज्ञासा उत्पन्न करणारा आहे. तें ओरडणें कां होतें याची माहिती चार पानें दिल्यानंतर मग मियासाहेबांचा परिचय लेखकानें करून दिला आहे. त्यांचा स्वभाव शूर व उदार दाखविला आहे. पण त्यांवर धर्म-

द्वेषाची काजळी चढलेली आहे. ती झाडून टाकणारा प्रसंग या कथेंत रंगविला आहे. स्वप्नांत पैगंबरानें इशारा देणें व नंतर आगगाडींत सोजिरांच्या मारामारींत हिंदु साधूनें आपल्या रक्षणासाठीं पुढें येणें, या धक्क्यामुळें त्यांचा धर्मद्वेष कोलमडून पडतो, आणि बकरीदच्या दिवशीं गाई मारण्यासाठीं त्यांनीं जीं पांच हजार रुपयांची देणगी दिलेली होतीं, ती ते रद्द करतात. कथेची मांडणी व तिच्याद्वारें केलेला प्रचार या दोन्ही गोष्टी फडक्यांना यांत चांगल्या साधल्या आहेत. ही लघुकथा त्यांनीं १९२६ सालीं लिहिलेली आहे. पुढें पुढें त्यांच्या कलेनें लोक-जागृतीचें बंधन पार झुगारून दिलें आणि त्यामुळें शीड मोडलेल्या नावेप्रमाणें त्यांची कला हवे तसे झोके खाते.

स्वभावाचीं प्रतिबिंबें

स्वभाव–परिवर्तनाच्या दृष्टीनें 'शांता' ही कथाहि नमुनेदार आहे. तिचा निम्मा भाग तिच्या रोजनिशींतील उतार्‍यांनीं व्यापला आहे. त्यामुळें निवेदन–पद्धतींत वैचित्र्य निर्माण झालें आहे. शंतनूच्या प्रशंसेमुळें शांताच्या मनाची कळी कशी खुलली तें ऐका, "त्याचे ते शब्द ऐकून शांताला सुखातिशयानें गुदमल्यासारखें झालें. प्रशंसेचा अनुभव तिच्या मनाला पूर्वी कधीं मिळालाच नव्हता. आणि या घरांत मात्र तिला तिच्या प्रशंसेखेरीज कांहीं ऐकूंच येत नव्हतें. ओसाड रानांत राहिलेल्या माणसानें प्राजक्ताच्या झाडाखालीं योगायोगानें येऊन बसावें, आणि जोराच्या वाऱ्यानें झाड गदगदा हालल्यामुळें त्याच्या अंगावर सुकुमार, सुगंधी फुलांचा सारखा वर्षाव व्हावा, तशी तिची अवस्था झाली होती!"

'जसें मन, तसें जन' या न्यायानें संतुष्ट शांताला आतां सारें जगच निराळें भासूं लागलें. स्वतःच्या बदलाविषयीं ती लिहिते, "या पंधरा दिवसांत मला वाटतं मी सारखी बदलत होतें, आणि ज्या क्षणीं त्यांनीं माझा हात धरला त्या क्षणीं मला वाटतं, तो बदल अगदीं परिपूर्ण झाला. मी बुद्धीनं जड आहें, अंतःकरणानें रुक्ष आहें, स्वभावानं कुढी आहें अन् रूपानं अगदीं सामान्य आहें, असं मला पूर्वी वाटत असें. हें वाटणं

परिस्थितीनं माझ्या मनांत अगदीं कायमचं रुजायच्या बेताला आलं होतं. पण मला आतां कळलं कीं, त्या माझ्या वाटण्यांतली एकसुद्धां गोष्ट खरी नाहीं ! माझी मीच ती खरी मानून घेतली होती ! मी हुषार आहें, रसिक आहें, मनमोकळी आहें अन् सुंदरसुद्धां आहें ! ”

जीविताशीं समरसता

१९२६ सालींच लिहिलेल्या ‘ वैभव ’ या कथेंत फडक्यांनीं श्रीमंतीपेक्षां माणुसकीचें महत्त्व अधिक दाखविलें आहे. “ प्रफुल्लता, आत्मविश्वास इत्यादि भावनांचें सूक्ष्म तेज गिरिजाबाईंच्या चेहऱ्यावर त्याक्षणीं दिसत होतें. तें कितीही पाहिलें तरी त्यांना पुरेसें वाटेना. एखाद्या जवाहिऱ्याच्या संग्रहींचा हिरा चारचौघांच्या दृष्टीस पडला, आणि त्याच्या पाण्याची प्रशंसा सर्वांनीं केली म्हणजे जसें त्या जवाहिऱ्याला वाटतें तसें नानांस त्या वेळीं वाटलें. ” अशी एखादीच साधी पण समर्पक उपमा देऊन सारा प्रसंग उजळून टाकण्याची हातोटी श्री. फडके यांची आहे. ‘ मनोहर स्वप्न ’ या कथेतील चित्रकार नायकाचा राग नाहींसा झाला हें सांगतांना फडके लिहितात, “ स्वस्त रंगाप्रमाणें त्याच्या मनांतला राग एकदम उडून गेला. ” लेखनासाठीं कागदाला पुनः पुनः टाक लावणाऱ्या तरुणाला काय लिहावें हें सुचत नाहीं, आणि त्यामुळें तो पुनः पुनः थांबतो, हें शब्दचित्र काढतांना फडके यांनीं असा दृष्टांत दिला आहे कीं, “ सोसाट्याचा वारा सुटावा आणि माणसानें काडी ओढून पेटवावी, पण ती दिव्याच्या वातीला लावीपर्यंत पुनःपुन विझावी तसेंच त्याचें होत होतें.”

हा तरुण लेखक मुंबईतला आहे, पण मुंबईत घडणाऱ्या घडामोडीवर काय लिहावें हें त्याला कळत नाहीं, म्हणून तो आपल्या कल्पनेंतून एक ऐतिहासिक कथा निर्माण करतो. तिच्यांत सहजच अनेक चुका होतात, ब तो फजीत पावतो. तशीच स्थिति पन्हाळगडाजवळील शाळा-मास्तराची होते. त्यांना आपल्या डोळ्यासमोरील ऐतिहासिक वैभव ओळखतांच येत नाहीं, आणि म्हणून ते मुंबईतील घटनेवर एक कल्पित कथा लिहितात, त्यांत त्यांचें साहजिकच हसें होतें. “ धोबी तलावाच्या नीलवर्ण पाण्याचें ”

त्यांचें कल्पित वर्णन चेष्टेचा विषय बनतें. या "दोन गोष्टींची कथा" फडके यांनीं सुंदर गुंफिली आहे, आणि तिच्या शेवटीं इसापनीतींतल्या-प्रमाणें 'तात्पर्य' हि सांगून टाकलें आहे, तें असें:—

"आपल्यासमोर जें जीवित घडत आहे त्यांतच समरस होऊन व त्याचें चिकित्सक दृष्टीनें निरीक्षण करून लिहावयाची योग्य दिशा टाकून लिहिलेल्या सर्व वाङ्मयाची हीच कथा असावयाची!" असाच संदेश 'दृष्टीआड सृष्टी' इत्यादि कथांतून फडके यांनीं दिला आहे. तो भावी कथा-लेखकांना गुरु-मंत्रासारखा महत्त्वाचा वाटण्याजोगा नाहीं काय?

— — —

वि. स. खांडेकर : : : १२

आधीं फूल उमलतें आणि नंतर गुच्छ तयार होतो, त्याप्रमाणें खांडेकरांनीं प्रथम लघुकथा लिहिली आणि नंतर कादंबरी रचली. त्यांची पहिली लघुकथा 'घर कोणाचें ?' ही १९२३ सालीं प्रसिद्ध झाली; तर त्यांची पहिली कादंबरी "हृदयाची हांक" १९३० सालीं उजेडांत आली. गेलीं तीस वर्षें ते लघुकथा सतत लिहीत आहेत. या अवधींत त्यांनीं सुमारें तीनशें लघुकथा लिहिल्या असतील. त्या कथा व पुढील कादंबऱ्या यांचा मूळ पिंड एकच. अंतरंगांत समाजाच्या उद्धाराची तळमळ आणि बहिरंग पद-लालित्यानें व काव्य-कल्पनेनें नटलेलें असा त्यांच्या कथा-कादंबऱ्यांचा थाट असतो. त्यांचें लेखन हेतुपूर्ण असतें व त्याची सजावट कलापूर्ण असते. आरंभीच्या कथावर भाषेच्या कृत्रिमतेची दाट छाया पडलेली आहे. अलंकारांच्या मुसळधार पावसामध्यें कथेंतील सारी भावना धुऊन जाते. पण खांडेकरांची प्रतिभा सारखी विकास पावणारी आहे. तिनें हीं कृत्रिमतेचीं कवचें लवकरच फोडून टाकलीं आणि रसपूर्णतेकडे अधिक लक्ष पुरविलें. या बाबतींत त्यांना लघुकथामध्यें कादंबऱ्यापेक्षां अधिक यश मिळालें.



लघुकथेचे पैलू

ललित भाषाशैली, रम्य कल्पना आणि समाजहिताचा प्रचार-या त्रिगुणांनीं नटलेल्या त्यांच्या कांहीं कांहीं कथा मराठीला भूषण होऊन राहिल्या आहेत. कांहीं थोड्या कथा तर सूक्ष्म मनोविश्लेषण करणाऱ्याहि आहेत. वाचकांच्या चित्ताला एखाद्या करुण भावनेचा स्पर्श करून जाणाऱ्या त्यांच्या कांहीं लघुकथा संस्मरणीय आहेत; तर कांहीं कथा उदात्त विचारांमुळें व कांहीं कथा एखाद्या तेजस्वी कल्पनेमुळें किंवा रमणीय उपमेमुळें रसिकांच्या ध्यानांत चिरकाल राहणाऱ्या आहेत. एखाद्या उत्तम गवयाचें गाणें मैफलींत ऐकल्यानंतर तें पुढें दीर्घकाळ श्रोत्यांच्या कानांत घुमत राहावें, तसा परिणाम घडविण्याचें सामर्थ्य खांडेकरांच्या कांहीं कांहीं लघुकथांमध्यें आढळतें. त्यांनीं स्वतःच आपल्या कथालेखनाची प्रगति तीन टप्प्यांनीं कशी झाली, तें सांगितलें आहे. त्यांत जसा फाजील गर्व नाहीं, तसाच दांभिक विनयहि पण नाहीं. प्रांजल बुद्धीनें सत्य निवेदन करतांना ते लिहितात, " कोल्हटकर व गडकरी यांच्या वाङ्मयाची त्या-काळीं त्यांच्या मनावर फार मोठी छाप होती. त्यामुळें त्यांच्या पहिल्या बहुतेक कथांतून कोट्यांचा हव्यास व अलंकारांचा सोस दिसून येतो. या लेखनपद्धतीमुळें त्या गोष्टींत जसा एक प्रकारचा कृत्रिमपणा आला आहे तशा त्या थोड्याफार पाल्हाळिकहि झाल्या आहेत. दिवाकर कृष्णांच्या नवीन रेखीव आणि भावपूर्ण कथेच्या पद्धतीची व तोडीची एकहि गोष्ट त्यांच्या या काळांतल्या लेखनांत आढळून येणार नाहीं. खांडेकरांची प्रवृत्ति केवळ मनोरंजक गोष्टी लिहिण्याकडे जशी नव्हती, तशी केवळ व्यक्तीच्या नाजुक भावभावना व सूक्ष्म सुखदुःखें काव्यात्म रीतीनें प्रगट करूनहि त्यांचें समाधान होण्यासारखें नव्हतें. सामाजिक सुखदुःखें चित्रित करण्याची त्यांना पाहिल्यापासून इच्छा असलेली दिसते." आपल्या कथा पुरोगामी असतात कीं नाहीं याची चर्चा टीकाकारांनीं खुशाल करावी असें म्हणून खांडेकर स्वतःची भूमिका सांगतात. ती म्हणजे, " मानवी जीवनांतील कांहीं उदात्त, उन्नत, उत्कट आणि उद्बोधक क्षणांचें पूजन करण्याचा प्रयत्न मी करतों. "

अशा सत्त्वप्रधान, कलारुचिर व काव्यपूर्ण लघुकथा लिहिणाऱ्या खांडेकरांचा दर्जा मराठींत कोणता आहे हें प्रा. अदवंत एका टीकालेखांत पुढील मार्मिक शब्दांनीं सांगतात, " लघुकथेचा दरबार मोठमोठ्या सरदारांनीं फुलून गेला आहे. वि. स. खांडेकर हे मुख्य प्रधानाच्या मानाच्या आसनावर बसले आहेत.....पण लघुकथा सम्राटाचें सिंहासन अद्याप मोकळें आहे ! !

स्वार्थी संसारांचें चित्रण

आपलें घर हेंच जग मानणारीं संसारी माणसें किती तरी असतात. त्यांनीं आपल्या घराबाहेरील सुखदुःखें जाणावींत, अशी प्रेरणा देणारी ' घरट्याबाहेर ' ही लघुकथा आहे. त्यांतील राजाराम हा संस्कृतचा प्रोफेसर आहे आणि तो आपल्या बायकोच्या कानांत हिऱ्याच्या कुड्या लटकविण्यासाठीं आसुसलेला आहे. सहा वर्षांनीं मावस-बहिणीच्या लग्नासाठीं त्याची पत्नी परगांवीं निघाली असतां तो आठदहा दिवसांचा विरहहि राजारामाला असह्य झाला होता. कारण "एखाद्या उंच झाडाच्या फांदीवर मऊ मऊ कापसानें आणि लहान लहान गवताच्या काड्यांनीं सजविलेल्या घरट्यांत एखाद्या पांखराच्या जोडप्यानें आनंदानें चिवचिव करीत काळ काढावा, एकमेकांच्या चोंचींत चोंच घालून सूर्योदय आणि सूर्यास्त, आटलेली नदी आणि पूर आलेली नदी, लग्नसमारंभ आणि प्रेतयात्रा, किंबहुना जगांतल्या साऱ्या घडामोडी—जणूं कांहीं आपण या जगांतले कोणी नव्हे अशा समजुतीनें पहाव्या, तसा राजाराम व कालिंदी यांचा संसार गेलीं सहा वर्षें चालला होता. "

चार दिवस झाले तरी पत्नीचें पत्र आलें नाहीं, तेव्हां राजाराम तळमळूं लागला. पांचवे दिवशीं कालिंदीचें पत्र आलें, पण त्यांत तिनें काय लिहिलें होतें ? स्वार्थी प्रेमाच्या गुलगुल गोष्टी त्यांत नव्हत्या, तर तिला तीन दिवसांत समाजांतील जीं सुखदुःखें दिसलीं त्यांचें वर्णन होतें. समाजांत कोठें अज्ञान आहे, कोठें दारिद्र्य आहे, तर कोठें रोगराई आहे. या दैत्यांच्या दाढाखालीं सांपडलेल्या असंख्य जिवांच्या किंकाळ्या

कालिंदीला ऐकूं येऊं लागल्या. त्याच तिनें आपल्या पत्रांत लिहिल्या आणि शेवटीं असा निष्कर्ष काढला कीं, " आपल्यासारख्या माणसांच्या घरट्यांत सुदैवानें गारवा आहे; पण त्या घरट्याबाहेर केवढा वणवा पसरला आहे ! या वणव्यांत आपलीं माणसें होरपळून जात असतांना आपण गप्प बसायचें ? छे !

दोनच वाटा मला पुढें दिसताहेत. तो विझवण्याचा प्रयत्न करावा, नाहीं तर इतरांच्याबरोबर जळून तरी जावें ! "

सामाजिक जाणीव

वाचकाच्या मनांत सामाजिक जाणीव निर्माण करणाऱ्या अशा कथा खांडेकरांनीं पुष्कळ लिहिल्या आहेत, ' मनुष्य, पशु आणि दगड ' या कथेंत रघुनाथ शांतारामला लिहिलेल्या पत्रांत म्हणतो, " मन मात्र अधिकच अस्वस्थ झालें...तुझ्या घराबाहेर गांवांत जें दैन्य आणि दारिद्र्य पसरलें आहे तें पाहून, विषमता जो नंगा नाच घालीत आहे तो पाहून, अन्यायाला न्याय मानणाऱ्या खालच्या समाजाचा दुबळेपणा पाहून, वरच्या वर्गातलीं तुझ्यासारखीं हळवीं पण आंधळी माणसें पाहून !" शांतारामच्या घरीं आरामांत असलेला रघुनाथ कलकत्यांतील मजुरांच्या संपाची बातमी वाचून तिकडे गेला. कारण त्याच्या मतें, " दगड म्हणून अमर होण्यापेक्षां, पशू म्हणून सुखानें जगण्यापेक्षां, मनुष्य म्हणून मरण्यांत अधिक आनंद आहे ! " सामाजिक व वैयक्तिक अशी दोन मनें असतात हा खांडेकरांचा लाडका सिद्धांत आहे. ' समाधी-वरलीं फुलें ' या कथेंत ते लिहितात, " मनुष्याला दोन मनें असतात हेंच खरें ! त्याचें सामाजिक मन लोकांना सहज दिसतें; पण त्या सामाजिक मनाच्या आड, अगदीं अंग चोरून कां होईना, वैयक्तिक मन लपून बसलेलें असतेंच कीं ! "

विषमतेचें कलात्मक चित्र

समाजांतील विषमतेचें दारुण स्वरूप खांडेकरांनीं दोन चार फटकाऱ्यांनीं सहजासहजीं पण भेदक रीतीनें रंगविलें आहे. फुलें आणि चुरमुरे–

हे नित्याचे जिन्नस. पण 'दोन भास' या लघुतम कथेंत त्यांतूनच समाजांतील विषमतेच्या दरीची कल्पना त्यांनीं आणून दिलेली आहे. 'ड्रायव्हर–' मोटारींतील तरुणी ओरडली...' मोगरीच्या कळ्या घे!' पण डायव्हरनें हिरमुसल्या चेहऱ्यानें परत येऊन सांगितलें, 'बाईसाहेब, त्या मोगरीच्या कळ्या नाहींत! चुरमुरे आहेत!' भरल्यापोटीं सहल करावयास निघालेल्या श्रीमंत तरुणीची निराशा झाली.

—आणि तशीच निराशा झाली एका भिकारणीचीहि. "वस्त्रापेक्षां अंधारच तिच्या लज्जेचें अधिक चांगल्या रीतीनें रक्षण करी." भूक भागविण्यासाठीं रस्त्यावरील केळाची सालहि तिनें आपल्या झोळींत टाकली. आणि तिला दूर दिसला एक चुरमुरेवाला. विडी पेटविण्यासाठीं तो दुकानापासून दूर गेलेला पहातांच 'तिनें एकाद्या गिधाडाप्रमाणें त्या राशिवर झडप घातली. भरलेली मूठ तिनें तशीच तोंडांत कोंबली. लगेच थूः–थूः–थूः करून तिनें तोंडांतला लगदा थुंकला. ते चुरमुरे नव्हते; मोगरीच्या कळ्या होत्या!" समाजांतील तीव्र विषमता सौम्य शब्दांनीं प्रगट करणाऱ्या या एकपानी लघुकथेंतील प्रत्येक शब्द वेचक व भरीव आहे.

'गवसणी' या छोट्या रूपक-कथेंतून परस्पर-सहकार्याचा सूर कलासुंदर रीतीनें खांडेकरांनीं काढला आहे. त्या कथेचा शेवट असा—"कोपऱ्यांतून सतार स्फुंदत म्हणत होती—'मला गवसणींतच घालून ठेवा. मघांशी गवसणी असती तर माझी अशी दुर्दशा!—'

दुसऱ्या कोपऱ्यांतून उद्गार आले—'मघांशी एक गडी आला नि मला म्हणाला—उद्यां सकाळीं पेतेरें घालायलाच तुला नेतो!' असें पेतेरें होऊन पडण्यापेक्षां मी सतारीला संभाळीन, हवी तेव्हां तिच्यापासून दूर राहीन—" सतार व गवसणी परस्पराला उपकारच असतात.

निर्वासिताचें मनाश्चित्र

विद्यमान परिस्थितीच्या नाडीवर हात ठेवून समाजाच्या प्रकृतीची योग्य चिकित्सा करणें हें श्रेष्ठ ललित लेखकाचें कार्य असतें. तें खांडे-

करांनीं कांहीं कांहीं कथांमध्यें उत्तम रीतीनें साधलें आहे. अशा कथांचा एक नमुना म्हणजे 'नवा माणूस' ही गोष्ट. १९४८ सालीं गांधी-हत्येनंतर लिहिलेल्या या गोष्टींत एका निर्वासित डॉक्टराचें करुणरम्य चित्र नाजूक हातानें रेखाटलेलें आहे. कराची येथें डॉक्टरी व्यवसाय करणारा मेघश्याम आगबोटींतून मुंबईस चाललेला होता. त्याची "दीड तपाची सेवा धर्म-वेडाच्या वणव्यांत अर्ध्या दिवसांत जळून खाक झाली!" देशाच्या फाळणीपूर्वी हिंदु-मुसलमानांचे दंगे उसळले होते, तरी "मरणाच्या दारीं पडलेल्या एका लांबच्या मुसलमान रोग्याला पहायला" डॉक्टर गेले, आणि त्यांच्या पाठीमागें त्यांची बायको, त्यांची मुलगी, त्यांचा मुलगा–सर्वांची सररहा कत्तल झाली. त्यामुळें त्यांचें मन किती उदास व भकास झालें असेल, याची कल्पना खांडेकरांनीं नाना रीतींनीं आणून दिलेली आहे. प्रशांत सागरावर शुभ्र चांदणें पसरलेलें दिसलें, तर डॉक्टरांना "प्रेतावर घातलेल्या पांढऱ्या चांदरीसारखें वाटलें तें!" मुंबईस आल्यावर मुलें–मुली आनंदांत हिंडतांना पाहिलीं, तरी "त्यांच्या मनाच्या जखमांना धक्का बसे." त्यांच्या मनाचा चडफडाट इतका झालेला कीं, एका हॉटेलांत गप्पा चालू असतां तो मध्येंच म्हणतो, "धरणीकंपानें सारी मुंबई कोसळून तिच्या खालीं तीस लाख लोक एका क्षणांत पुरले गेले तर काय मौज होईल!"

आपली प्रीति–स्थानें नाहींशीं झाल्यामुळें तो माणसाचा द्वेष कसा करूं लागला हें स्वभाव–दर्शन खांडेकरांनीं कुशलतेनें केलें आहे. आणि तितक्याच कौशल्यानें त्याचें स्वभाव–परिवर्तनहि दाखविलें आहे. गांधीजींच्या फोटोसमोर उभे राहून 'हंसताय काय असें?' असें विचारणारा मेघश्याम त्यांच्या हत्येची वार्ता ऐकतांच शुद्धीवर येतो व मनानें उदार होतो. ती वार्ता ऐकतांच आगगाडींतील निरनिराळ्या थरांतील उतारूंची अवस्था काय झाली याचे वर्णन खांडेकरांनीं खुबीनें केलें आहे, तें असें,

"सारा डबा आपल्याभोंवतीं घरगर फिरत आहे असा मेघश्यामाला भास झाला. डब्यांतल्या साऱ्या माणसांच्या मुद्रांवर स्मशानाची कळा आली. त्या

संन्याशाचे अश्रु हातांतल्या गीतेवर ठिबकूं लागले. ती खिडकीजवळची बाई गळा काढून देवाला शिव्या देऊं लागली.

मेघश्यामला रडें येईना ! पण आंत कुणीतरी आपल्या काळजाचे लचके तोडीत आहे असें त्याला वाटलें. साऱ्या गाडींत ही अमंगल वार्ता आतां पसरली होती. अश्रु, हुंदके, तावातावाचीं बोलणीं, यांनीं सारें वातावरण भरून गेलें. गांधीजींच्या जीवनाचें रहस्य मेघश्यामच्या ध्यानीं आलें. हिंदु-मुसलमान या भेदाच्या वर जाऊन तो मानवधर्माचा पूजक बनला.

त्याचें मन उजळलें होतें. इतके दिवस मनानें निर्माण केलेल्या तुरुंगांत तो खितपत पडला होता. आज आतां त्याच्या पायांतल्या सूड आणि द्वेष यांच्या शृंखला गळून पडूं लागल्या होत्या." तो गाडींतील मुसलमान उतारूच्या घरीं औषधी उपचार करण्यासाठीं गेला, असा या कथेचा शेवट दाखविलेला आहे. सत्य-सृष्टींत इतक्या झटपट स्वभाव बदलत नसला, तरी ध्येयवाद म्हणून कथा-सृष्टींत तसें परिवर्तन दाखविणें इष्टच ठरतें.

दारूबंदीचा प्रचार

दारूबंदीची आवश्यकता पटविणारी लघुकथा खांडेकरांनीं लिहिली आहे. तिचें नांव 'विजय कोणाचा ?' शिशु-सप्ताहासारखीं समाजोपयोगी कार्यें करणारा एक राजा दारूबंदी मात्र करीत नाहीं. तेव्हां त्याला एक संपादक उपदेश करतो, "सरकारी खजिन्यांत दारूवरील कराच्या रूपानें जमा होणारा प्रत्येक पैसा कुठून येतो ? दारूबाजाच्या निढळाच्या घामांत, त्याच्या बायकोच्या अश्रूंत व त्याच्या पोरांच्या रक्तांत भिजून तो आलेला असतो ! लाखों बायकापोरांचीं पोटें जेव्हां रिकामीं रहातात तेव्हां सरकारची तिजोरी भरते ! हजारों पतिव्रतांचीं अंगें बेफाम नवऱ्याच्या मारानें एकीकडे सुजत असतात व दुसरीकडे सरकारी जमाबंदीची रक्कम फुगत असते ! पोटांतल्या आगीनें जळणारीं व बाहेरच्या थंडीनें कुडकुडणारीं दारूबाजांचीं लक्षावधि मुलें देशांत तडफडत असतात, म्हणूनच शिशु-

सप्ताह साजरे करण्याला पाहिजे असलेला पैसा सरकारला मिळत असतो. दारूचें व्यसन सर्वांस चालू ठेवून प्रजा सुखी करूं पाहणें म्हणजे वेलीच्या मुळाशीं निखारे घालून तिच्या फुलांची अपेक्षा करीत बसण्यासारखें आहे."

दारूमुळें उडणारे अनर्थ विरोधाभासाच्या अलंकारांनीं खांडेकर पुढील-प्रमाणें वर्णितात. "या दारूच्या पायीं दररोज किती पोरें भाकरीच्या तुकड्या-साठीं तळमळताहेत, या दारूच्या आगीनें किती आईबापांच्या आशांची राखरांगोळी केली आहे, या तांबड्या पाण्यामुळें स्वभावतः गंगाजलाप्रमाणें निर्मळ असणाऱ्या किती लोकांना काळें पाणी पहावें लागलें आहे."

'दादू', 'दुसरें सरकार' वगैरे कथांमध्येंहि खांडेकरांनीं दारूची भीषणता मांडली आहे. कला व प्रचार यांचा मेळ 'हिरा जो भंगला' अशा कथांमध्येंहि चांगला साधला आहे.

विनोदाची खुलावट

खांडेकर जसें कवि आहेत, तसेच विनोदी लेखक पण आहेत. त्यामुळें त्यांच्या लघुकथांमध्यें जशी काव्याची कल्पकता चमकते, आणि ती कल्पकता रूपक-कथा रचण्यापर्यंत धाव घेते, त्याप्रमाणें त्यांच्या कांहीं कांहीं कथांमध्यें विनोदाची लकेर घुमत राहते; किंबहुना, शब्द-योजना, वर्णन-शैली व एकंदर कथानक हें सर्वच कांहीं हास्यरसानें ओथंबलेलें असतें. याचें ठळक उदाहरण म्हणजे "जांभळीची शाळा-तपासणी". खेड्यांतील प्राथमिक शाळेंत हरहमेश घडणारा एक प्रसंग या कथेमध्यें खांडेकरांनीं बहारीनें रंगविला आहे.

जांभळी, निंबगांव, आंबेगांव हीं गांवांचीं नांवेंच किती मजेशीर आहेत. तशींच मास्तरांचीं नांवें गुळमुळे व भडभडे. एका विद्यार्थ्याचें नांवहि आडमुठे. कथेचा प्रारंभहि किती विनोदी आहे पहा—"आज जांभळ गांवांतील सूर्य पूर्वेला न उगवतां पश्चिमेलाच उगवला होता असें म्हटलें पाहिजे; कारण तेथील मराठी चार यत्ताच्या महाविद्यापीठाचे आचार्य व अधिकारानें त्यांच्या हाताखालचें पण व्यवहारांत त्यांच्या डोकीवर चढून बसलेले त्यांचे असिस्टंट, शाळेंतल्या म्हाताऱ्या घड्याळानें

कण्हत सात अंक मोजले न मोजले तोंच शाळेंत येऊन दाखल झाले होते. हा प्रसंग इतका अभूतपूर्व होता कीं, तो शाळेच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं नसला तरी शिऱ्याच्या शाईनें अवश्य लिहिला गेला असता; पण पण त्याला एक अट होती—व ती शाळेंत शाई सांपडणें ही होय !"

प्रसंगनिष्ठ विनोद

भडभडेमास्तरांना कोर्टाचा नाद; तर गुळमुळ्यांना चटक भिक्षुकी करण्याची. त्यासाठीं ते दोघेहि शाळेबाहेर पडले असतांना, एक नवे निःस्पृह व तरतरीत इन्स्पेक्टर शाळा तपासावयास आले. वाटेंत त्यांना चुकविण्यासाठीं भडभडे मास्तर छत्रीची ढाल कशी करतात हें पाहतांना कोणालाहि हंसूंच लोटेल. इन्स्पेक्टरांनीं जांभळीचा रस्ता विचारला असतांना भडभड्यांनीं निंबगांवचे रस्त्याकडे बोट दाखविलें. या आपल्या गनिमी काव्यावर भडभडे स्वतःच किती खूष झाले हें लेखकानें पुढील गंमतीदार शब्दांनीं सांगितलें आहे.—

"इन्स्पेक्टरसाहेबांना निंबगांवची वाट दाखवितांच पन्हाळ्यावर शिद्दीजोहाराच्या हातावर तुरी देणाऱ्या शिवाजीइतकेंच प्रसंगावधान आपण दाखविलें अशी अभिमानाची ऊर्मि धांवणाऱ्या मास्तरांच्या मनांत उसळली. पण तो सिद्दीजोहार पाठलाग करूं लागला तेव्हां बाजीप्रभूनें त्याला मध्येंच अडविलें. आपला बाजी प्रभु यावेळीं कुठें आहे ? तो स्मशानांत यावेळीं पिंडाच्या गोळ्यांना तोंड देत बसला असेल, हाहि विचार त्याच्यापाठोपाठ त्यांच्या मनांत आला."

इन्स्पेक्टर येणार म्हणून शाळेंत किती उलथापालथी झाल्या, याचें मजेशीर वर्णन खांडेकरांनीं केलेलें आहे; तें असें—"तत्काळ शाळेच्या कोपऱ्यांत कित्येक दिवस हक्काची रजा घेत पडलेल्या केरसुणीला आपल्या कामावर रुजूं व्हावें लागलें. दुष्काळांत सांपडलेल्या मनुष्याप्रमाणें टेबलावरील दौतीची स्थिति होती; तिला पोटभर अन्न वाढण्यांत आलें. मास्तरांच्या कपाटांतील जरीचा रुमाल सणावारीं अगर लग्नीघरीं प्रगट होणाऱ्या आजीबाईंच्या नव्या मुकट्याप्रमाणें प्रगट झाला. शाळेंतील विद्येचें विश्व

चालविणारें परब्रह्म दैवत–शिक्षारूपी पुरुषाची प्रकृति–सकलसौभाग्यवती वज्रचुडेमंडित मातोश्री छडीबाई आपलें सगुणरूप टाकून निजधामाला गेल्याहि. " या धरणीकंपाचा आणखी एक परिणाम म्हणजे आडमुठे या आडदांड मुलाला मास्तर म्हणून खुर्चीवर बसावें लागलें.

घोटाळ्यांत घोटाळा !

अशा प्रसंगांतून हास्याच्या एकाहून एक मोठ्या लाटा निर्माण होतात शेवटची डोंगरलाट म्हणजे आडमुठ्याची ' शिराळशेटी मास्तरकी ' चालू असतांना स्मशानांत भटकीसाठीं गेलेले गुळमुळे मास्तर परत येतात आणि आपल्या खुर्चीवर बसलेल्या विद्यार्थ्यांला बडवतात ! ' मी ' या कादंबरींत हरिभाऊ आपट्यांनीं असाच एक शाळेंतील प्रसंग रंगविला आहे. खांडेकरांनीं शेवटीं अशी गंमत केली आहे कीं, गुळमुळे मास्तर इन्स्पेक्टरना ओळखीत नाहींत व इन्स्पेक्टर त्या मास्तरांना ओळखीत नाहींत, त्यामुळें घोटाळ्यांत घोटाळा होतो, कसा तो पहा—" दंग्याची चाहूल लागतांच इन्स्पेक्टर खोलींत येऊन म्हणतात, अहो हें काय ? मास्तरांना मारतां काय असें ? "

गुळमुळे चिडून उत्तरतात, " तुम्हांला कुणी सांगितलें आहे मधें तोंड घालायला ? हा मास्तर काय ? घे लेका हा मास्तरकीचा पगार." ' पगार ' शब्दाबरोबर आडमुठ्याच्या पाठीवर धम्मक लाडू पडूं लागले.

" अहो, हे मास्तर आहेत, सोडा त्यांना. "

इन्स्पेक्टरसाहेब गयावया करून म्हणाले, पण गुळमुळे दाद देईनात. "

कृत्रिम विद्वत्तेची चेष्टा

शिक्षकापेक्षां वरच्या पायरीवर बसणारा प्रोफेसर. त्यालाहि खांडेकरांनीं आपल्या विनोदाचा विषय केलेला आहे. ' परीक्षकाची परीक्षा ' या कथेंत एका विद्वत्ताजड प्राध्यापकाची अनुप्रासप्रियता दाखविली आहे.

विनोदाची बैठक उभारण्यासाठीं आरंभींच त्या प्राध्यापकाचें वर्णन पुढील-प्रमाणें केलें आहे, " म. गांधींचा दररोज चरक्यावर सूत काढण्याचा नियम एखादे वेळीं चुकेल, श्री. शिवरामपंत परांजप्यांच्या लेखांत उपरोधिक वाक्य यावयाचें चुकून राहून जाईल, श्री. चिंतामणराव वैद्यांच्या व्याख्यानांत महाभारताचा उल्लेख कदाचित् येणार नाहीं, पण प्रो. पणशीकर यांच्या वर्गांतील अगर बाहेरील व्याख्यानांत नवा शब्द आला नाहीं असें कधींही होणार नाहीं, अशी त्यांची ख्याति होती. "

क्लिष्ट व विस्तृत प्रस्तावना लिहिणारे कांहीं प्राध्यापक महाराष्ट्रांत गाजलेले होते. त्यांचें विडंबन करतांना खांडेकरांनीं किती अतिशयोक्ति केली आहे, पहा—" त्यांच्याकडे जोडाक्षरविरहित इतापनीति एका मासिकाच्या संपादकानें अभिप्रायाकरितां पाठविली होती म्हणे ! स्वारीनें ज्ञानकोशाचे पांचदहा भाग भरतील एवढा अभिप्राय लिहिला. तो अभिप्राय छापायचा म्हटला तर निदान पांच वर्षे त्या मासिकाला इतर सर्व विषय बंद ठेवावे लागले असते. शेवटीं प्रोफेसरसाहेबांनीं त्या अभिप्रायाची अतिसंक्षिप्त आवृत्ति काढली ती मूळ पुस्तकाच्या सातपट झाली. "

प्रा. पणशीकर यांना अनुप्रासाचा छंद किती विलक्षण होता, हें पटविण्यास त्यांचें एक वाक्यहि पुरें आहे. तें वाक्य असें,—" या ग्रंथकर्त्यांत कोल्हटकरांची कोमल कला नाहीं, गडकऱ्यांचें गोड गुंजन नाहीं, देवलांची दयाशील दृष्टि नाहीं अथवा खाडिलकरांची खुमासदार खुलावट नाहीं. "

शिक्षकीचा गौरव

' जांभळी 'च्या कथेवरून खांडेकरांना शिक्षकवर्गाचे दोष दाखविण्यांत हौस वाटते असें कोणी म्हणेल, तर तें साफ चुकीचें ठरेल. ते स्वतः शिक्षक होते–आणि ध्येयवादी शिक्षक होते. शिक्षकाच्या पेशाची थोरवी त्यांनीं अनेक कथामध्यें गाइलेली आहे. शिक्षकांवरील विद्यार्थ्यांची भक्ति त्यांनीं सहृदयतेनें चित्रित केलेली आहे. " फत्तर व्हावें पण मास्तर होऊं नये " असे उद्‌गार त्यांच्या कथेंत जे ऐकूं येतात, ते त्यांचे स्वतःचे नव्हेत.

पूर्वपक्ष म्हणून, समाजांतील विकृत समजूत ते व्यक्त करीत असतात. पण शिक्षकाचें श्रेष्ठत्व त्यांनीं अनेक कथामध्यें घवघवीतपणानें मांडलें आहे. " वकील कीं शिक्षक ?" या कथेमध्यें तर एलूएल्. बी. झालेला तरुण शिक्षकच होतो, किंबहुना श्रीमंतीला भाळणाऱ्या आपल्या पत्नीलाहि तें पटवितांना तो विचारतो, " भव्य वाड्यापेक्षां उत्तम शरीरसंपत्ति कमावणारा मुलगा, दागदागिन्यांनीं भरलेल्या पेटीपेक्षां उदात्त विचारांनीं भरलेलें त्याचें मन, पायावर लोळण घेणाऱ्या लक्ष्मीपेक्षां त्याच्या हातून होणारी जनसेवा या गोष्टी पित्याला अधिक आनंददायक होतात ना ? "

श्रीमंत वकील व तरुण शिक्षक यांच्यामध्यें झालेल्या संवादांतहि खांडेकरांनीं हाच सिद्धांत अलंकारिक भाषेनें मांडलेला आहे. तो संवाद असा—

" वकिलीच्या धंद्यांत कुबेर व्हायची संधि मिळते हें खरें—'

' मग आणखी काय पाहिजे ? '

' कुबेर हाच कांहीं सर्वश्रेष्ठ देव नाहीं.'

' कुबेर नसेल; विष्णु असेल, पण तो तरी कुठें लक्ष्मीला सोडून रहायला तयार आहे ? '

' तुम्ही कांहीं म्हणा. देवांच्या न्यायकचेरींत विष्णु वकीलीच करीत असला पाहिजे. उगीच कांहीं लक्ष्मी त्याची दासी झाली नाहीं.'

' पण विष्णुपेक्षांही श्रेष्ठ असा देव आहेच. शंकर—'

' शंकर ! दिगंबर शंकर ! गांवांत रहायला घर नाहीं म्हणून स्मशानांत जाऊन तळ देणाऱ्या या देवासारखें व्हावें असं तुम्हांला वाटतं कीं काय ? मग खास तुम्हांला शिक्षक होण्याची अवदसाच आठवली असली पाहिजे.'

' पण हालाहल विष घेण्याची पाळी आली तेव्हां शंकरानेंच तें घेतलें; विष्णूनें नाहीं. '

विनोदाची बैठक उभारण्यासाठी आरंभींच त्या प्राध्यापकाचें वर्णन पुढील-प्रमाणें केलें आहे, " म. गांधींचा दररोज चरक्यावर सूत काढण्याचा नियम एखादे वेळीं चुकेल, श्री. शिवरामपंत परांजप्यांच्या लेखांत उपरोधिक वाक्य यावयाचें चुकून राहून जाईल, श्री. चिंतामणराव वैद्यांच्या व्याख्यानांत महाभारताचा उल्लेख कदाचित् येणार नाहीं, पण प्रो. पणशीकर यांच्या वर्गांतील अगर बाहेरील व्याख्यानांत नवा शब्द आला नाहीं असें कधींही होणार नाहीं, अशी त्यांची ख्याति होती. "

क्लिष्ट व विस्तृत प्रस्तावना लिहिणारे कांहीं प्राध्यापक महाराष्ट्रांत गाजलेले होते. त्यांचें विडंबन करतांना खांडेकरांनीं किती अतिशयोक्ति केली आहे, पहा—" त्यांच्याकडे जोडाक्षरविरहित इतापनीति एका मासिकाच्या संपादकानें अभिप्रायाकरितां पाठविली होती म्हणे ! स्वारीनें ज्ञानकोशाचे पांचदहा भाग भरतील एवढा अभिप्राय लिहिला. तो अभिप्राय छापायचा म्हटला तर निदान पांच वर्षे त्या मासिकाला इतर सर्व विषय बंद ठेवावे लागले असते. शेवटीं प्रोफेसरसाहेबांनीं त्या अभिप्रायाची अतिसंक्षिप्त आवृत्ति काढली ती मूळ पुस्तकाच्या सातपट झाली. "

प्रा. पणशीकर यांना अनुप्रासाचा छंद किती विलक्षण होता, हें पटविण्यास त्यांचें एक वाक्यहि पुरें आहे. तें वाक्य असें,—" या ग्रंथकर्त्यांत कोल्हटकरांची कोमल कला नाहीं, गडकऱ्यांचें गोड गुंजन नाहीं, देवलांची दयाशील दृष्टि नाहीं अथवा खाडिलकरांची खुमासदार खुलावट नाहीं. "

शिक्षकीचा गौरव

' जांभळी 'च्या कथेवरून खांडेकरांना शिक्षकवर्गाचे दोष दाखविण्यांत हौस वाटते असें कोणी म्हणेल, तर तें साफ चुकीचें ठरेल. ते स्वतः शिक्षक होते–आणि ध्येयवादी शिक्षक होते. शिक्षकाच्या पेशाची थोरवी त्यांनीं अनेक कथामध्यें गाइलेली आहे. शिक्षकांवरील विद्यार्थ्यांची भक्ति त्यांनीं सहृदयतेनें चित्रित केलेली आहे. " फत्तर व्हावें पण मास्तर होऊं नये " असे उद्‌गार त्यांच्या कथेंत जे ऐकूं येतात, ते त्यांचे स्वतःचे नव्हेत.

पूर्वपक्ष म्हणून, समाजांतील विकृत समजूत ते व्यक्त करीत असतात. पण शिक्षकाचें श्रेष्ठत्व त्यांनीं अनेक कथामध्यें घवघवीतपणानें मांडलें आहे. " वकील कीं शिक्षक ?" या कथेमध्यें तर एलूएल्. बी. झालेला तरुण शिक्षकच होतो, किंबहुना श्रीमंतीला भाळणाऱ्या आपल्या पत्नीलाहि तें पटवितांना तो विचारतो, " भव्य वाड्यापेक्षां उत्तम शरीरसंपत्ति कमावणारा मुलगा, दागदागिन्यांनीं भरलेल्या पेटीपेक्षां उदात्त विचारांनीं भरलेलें त्याचें मन, पायावर लोळण घेणाऱ्या लक्ष्मीपेक्षां त्याच्या हातून होणारी जनसेवा या गोष्टी पित्याला अधिक आनंददायक होतात ना ? "

श्रीमंत वकील व तरुण शिक्षक यांच्यामध्यें झालेल्या संवादांतहि खांडेकरांनीं हाच सिद्धांत अलंकारिक भाषेनें मांडलेला आहे. तो संवाद असा—

" वकिलीच्या धंद्यांत कुबेर व्हायची संधि मिळते हें खरें—'

' मग आणखी काय पाहिजे ? '

' कुबेर हाच कांहीं सर्वश्रेष्ठ देव नाहीं.'

' कुबेर नसेल; विष्णु असेल, पण तो तरी कुठें लक्ष्मीला सोडून रहायला तयार आहे ? '

' तुम्ही कांहीं म्हणा. देवांच्या न्यायकचेरींत विष्णु वकीलीच करीत असला पाहिजे. उगीच कांहीं लक्ष्मी त्याची दासी झाली नाहीं.'

' पण विष्णुपेक्षांही श्रेष्ठ असा देव आहेच. शंकर—'

' शंकर ! दिगंबर शंकर ! गांवांत रहायला घर नाहीं म्हणून स्मशानांत जाऊन तळ देणाऱ्या या देवासारखें व्हावें असं तुम्हांला वाटतं कीं काय ? मग खास तुम्हांला शिक्षक होण्याची अवदसाच आठवली असली पाहिजे.'

' पण हालाहल विष घेण्याची पाळी आली तेव्हां शंकरानेंच तें घेतलें; विष्णूनें नाहीं. "

'पूजास्थान' 'केवड्याचे कांटे' इत्यादि कथांमध्येंहि शिक्षकाचें सहृदय व उदात्त जीवनच खांडेकरांनीं रंगविलेलें आहे.

शब्द-लीलांची मौज

विनोदी कथानकाच्या वेलीवर श्लेषादि शब्दालंकारांचीं फुलें खांडेकरांनीं लीलेनें लटकविलीं आहेत. 'अक्षराच्या बाबतींत अवाक्षर न काढणारे', अशा शब्द-लीला खांडेकरांना सहजच साधतात. दुसऱ्या कथामध्येंहि "शिव्याचें काम, सरस्वती-पूजन" इत्यादि शब्दांवर त्यांनीं कोट्या केलेल्या आहेत. "पंक्तिपठाणांशीं कुटुंबांतल्या भानगडीविषयीं बोलणें हें पठाणांकडून कर्ज काढण्यापेक्षांहि भयंकर" अशा कोट्या सर्वत्र उधळलेल्या आढळतात. "हात जोडून बसणाराच्या हातावरल्या रेषा त्याला कसा हात देणार?" असे शब्दांचे खेळ म्हणजे तर खांडेकरांच्या हातचा मळ होय. तरी खांडेकर स्वतःच्या लेखनाची चिकित्सा करून म्हणतात, "माझ्या कथांमध्यें अश्रूंच्या मानानें हास्य फार कमी आहे..... लेखनांत स्वच्छंद विनोदाचें व माझें फारसें सूत जमत नाहीं एवढें खरें. आम्ही दोघे मित्र आहोंत; पण कांहीं केल्या आम्ही जानी दोस्त होऊं शकत नाहीं."

अलंकारांचा खजिना

'साक्षी, सबबी आणि साधु यांत खऱ्यापेक्षां खोट्यांचाच भरणा अधिक आढळतो,' 'विद्यार्थ्याला सुट्टी आणि वायकांना माहेर कधीं नकोसें झालें आहे काय?' इत्यादि सिद्धान्त अलंकारांच्या कोंदणांत बसवून खांडेकर वाचकांना सादर करतात. हरघडीच्या व्यवहारांतील रुक्ष अनुभव खांडेकर अलंकारांच्या कोंदणांतून मांडून दाखवितात, तेव्हां ते किती आकर्षक वाटतात, यांचीं कांहीं उदाहरणें त्यांच्या लघुकथांमधून पुढें दिलीं आहेत.

"कालासारखा प्रवासी जगांत दुसरा कोणींच नाहीं. कोट्यवधि वर्षांपासून तो एकसारखा चालत आहे. पण तो क्षणभरदेखील विश्रांति-

करतां कुठें थांबत नाहीं. त्याच्या मार्गावरील वृक्ष सुखाच्या वसंतानें पल्लवयुक्त झालेले असोत वा दुःखाच्या हेमंतानें निष्पर्ण झालेले असोत, लष्करी शिस्तींत रुळलेल्या शिपायाप्रमाणें काळ प्रमाणबद्ध पावलें टाकीत पुढेंच जातो. ''

'' विनायक, जगांत आंधळ्यापेक्षां पांगळ्याचेंच दुःख अधिक असतें. आंधळ्याला चांदणें दिसत नाहीं, टेकडी दिसत नाहीं. पांगळ्याला हे सारे सुंदर देखावे दिसतात, तिथें जावेंसें वाटतें; पण— ''

' शंकरावर वाहिलेल्या कमळापेक्षां चपलेचे डोळे, देव्हाऱ्यांतील जाई-जुईपेक्षां चपलेनें मंदस्मित केलें कीं तिचे अर्धस्फुट दिसणारे दांत, बेलाच्या तिकट्यापेक्षां तिच्या डोक्यावरील पिंपळपान, दूर्वांकुरापेक्षां तिचे काळे-कुरळे केस आणि घंटानादापेक्षां तिचा मधुर स्वर मेघनाथाला अधिकाधिक आकर्षूं लागला. ''

उन्हाळ्याच्या प्रखरतेचें शब्द-चित्र किती थोड्या शब्दांनीं खांडेकर रेखाटतात पहा, '' एरव्हीं तो भयंकर उन्हाळाच होता. आभाळांतून एकसारखी निखाऱ्यांची वृष्टि होऊं लागली. त्या निखाऱ्यांनीं जमिनीवरील हिरवळ जळून तिची राखरांगोळी झाली ! वृक्षवेलींचे निष्प्राण सांगाडे पाहून पूर्वी त्यांच्याशीं कुजबुज करणारा वारा उष्ण निःश्वास टाकूं लागला. आपण पृथ्वीवर नसून एका उलट्या कढईत कोंडले गेलों आहोंत— आणि त्या कढईच्या खालीं बणवा पेटला आहे, असें प्रत्येकाला वाटूं लागलें.''

कौटुंबिक चित्रांचे नमुने

अपापाचा पैसा आपल्याला नको म्हणून हातीं आलेले महत्त्वाचे कागदपत्र फाडून टाकणारी सुधा पतीच्या व पित्याच्या–दोघांच्याहि क्रोधास कशी पात्र झाली, हें 'आक्का' या प्रपंच–कथेंत रंगविलें आहे. शेवटीं ''बाहेर येऊन सुधा पायऱ्या उतरूं लागली. समोर भयाण अंधार पसरला होता; पण नवऱ्याच्या हृदयांतील काळोखाच्या मानानें तो कमी भीतिप्रद होता. बाहेर रातकिड्यांची किरकिर ऐकूं येत होती; पण तात्यांच्या मनांतील

पापी विचारांपेक्षां ती कमी कर्णकटु होती. सुधेनें वर पाहिलें, मेघांच्या पदराआड एका ताऱ्याला पोटाशीं घेऊन रजनी त्याचें कौतुक करीत होती. तात्या रागानें बेफाम होऊन ओरडले, " मूर्ख मुलगी "! रंगराव पिसांळूनं गर्जले, ' बेफाम बायको' ! "

चंद्रकांतानें कण्हत हांक मारली, " आक्का, आक्का ! "

' संसाराच्या उन्हाळ्यांतहि सात्विक प्रीतीच्या वायुलहरी नाचत असतातच ! ' हें आशादायक तत्त्व खांडेकरांनीं ' गार वारा 'मध्यें गोंवलें आहे. संसारांतील साधेसुधे पण लपलेले आनंद उलगडून दाखविण्याची ' य. गो. 'ची कला खांडेकरांना या कथेंत सुंदर साधली आहे. रात्रीं दोन दोन वाजेपर्यंत कचेरींतील काम घरीं करीत बसणारा कारकून प्रथम असें मानतो कीं, आपण मरमरेतों राबतों पण आपली बायको मात्र खुशाल ताणून देते. पण पुढें त्याला कळते कीं, आपली बायको आपल्या तापकरी मुलाची शुश्रूषा करीत, अलोचन जागरण करीत बसली होती-स्वतःच्या जेवणाखाणाकडे लक्ष न देतां संसाराचा भार उचलीत होती. तेव्हां वसंत-रावांना रखरखीत उन्हाळ्यांतहि गार वारा सुटल्याचा भास झाला आणि पटलें कीं, "पुरुषाचें दुःख हें वरून तापणाऱ्या धरणीच्या पृष्ठभागावरील एकाद्या खडकासारखें आहे. पण स्त्रीचें दुःख हें धरणीच्या अंतरंगांत वाढणाऱ्या लाव्हा-सारखें आहे. तें चटकन् दिसत नाहीं म्हणून काय त्याचे चटके कमी तीव्र बसतात ? " गांधीजींच्या उपवासाचाहि खांडेकरांनीं कथानकाला पार्श्व-भूमीप्रमाणें खुबीनें उपयोग करून घेतला आहे. अंतर्बाह्य उकाड्याचें वातावरण कथेच्या अणुरेणूंत भरून राहिलें आहे. आणि पत्नीची शांत, प्रेमळ, संयमी व सात्विक मूर्ति किती कुशलतेनें खांडेकरांनीं उभी केली आहे. प्रत्यक्ष शब्दांनीं वर्णन न करतां बारीक बारीक कृतींतूनच तिचें थोर व्यक्तिमत्त्व त्यांनीं प्रगट केलें आहे. ही लघुकथा वाचून कांहीं तापट नव-ऱ्यांचा मेंदू कांहीं काळ तरी शांत होणार नाहीं काय ? विशेष हें कीं, हें बोधप्रद व कलापूर्ण कौटुंबिक चित्र खांडेकरांनीं रंगविलें आहे तें अगदीं साध्या-सरळ भाषेनें-जवळजवळ य. गो. जोशी यांच्या पद्धतीनें. त्यांत कोट्या-उपमांचे रबरी फुगे नाहींत कीं कल्पनांचीं फुलपांखरें नाहींत.

कादंबरीच्या क्षेत्रांत फडके व माडखोलकर यांच्या मधला दुवा म्हणून खांडेकर जसे शोभतात आणि लघुनिबंधांच्या विभागांत फडके व काणेकर यांचा सांधा ते जसा जोडतात, त्याचप्रमाणें लघुकथांच्या प्रांतांत ते फडके व य. गो. जोशी यांच्यामधला पूल ठरतात.



"प्रसाद" हीं ठसठशीत अक्षरें दारावर असलेला एक बंगला पुण्यांतील नातूबागेंत उभा आहे. तो साधासुधा दिसत असला, तरी विशाल व मजबूत आहे. तसाच साधा, विशाल व मजबूत देह धारण करणारे



जोशीबुवा मनानेंहि ह्याच गुणाचे आहेत. त्यांच्या जीवनांत प्रसाद हा गुण भरगच्च भरलेला आहे आणि तोच त्यांच्या वाङ्मयांतहि ओतप्रोत उतरलेला आहे. त्यांच्या मासिकाचें नांवहि आहे 'प्रसाद.' 'तुझा प्रसाद–चंद्रमा। करूं मज पूर्णिमा' हें त्या मासिकाचें ब्रीद आहे. त्याचे एक संपादक ह. भ. प. सोनोपंत दांडेकर यांचें वर्णन करतांना जोशीबुवांनीं त्यांना म्हटलें होतें, "सोनियाचा पिंपळ!" त्याच रीतीनें खुद्द जोशीबुवांचें वर्णन करावयाचें झालें, तर त्यांना म्हणतां येईल, "पारिजातकाचें झाड!"

जसें लेखन, तसें जीवन

"व्यायाम केल्यानंतर मनुष्याच्या अंगांतून जसा घाम निघतो, तसें वाङ्मय हें लेखकाच्या जीवनांतून सहज निघालें पाहिजे." हें जोशीबुवांचें लेखन–सूत्र. आणि त्याचा कित्ता म्हणजे त्यांचें चारित्र्य व साहित्य. साधा पंचा नेसून उघड्या अंगानें वावरत असणारी त्यांची धिप्पाड मूर्ति,

आल्यागेल्याचें सस्मित स्वागत करण्यास सदैव सिद्ध असते. स्वाक्षरी मागावयास आलेला एखादा बाल–लेखक असो किंवा साहित्य–संमेलनाचें अध्यक्षपद भूषविलेला एखादा वृद्ध वाग्भट असो–सर्वांशीं हसतहसत ते बोलतात आणि बोलतां बोलतां तासन्‌तास निघून जातात. छापखान्यांतील एखादा जुळाऱ्या येवो किंवा दूरचा एखादा फंडवाला येवो–जोशीबुवांच्या कपाळाला कधीं आंठी पडलेली असावयाची नाहीं किंवा भुवई कधीं वर चढलेली दिसावयाची नाहीं. कवि व लेखक, वकील व व्यापारी, डॉक्टर व वैद्य, शिक्षक व प्राध्यापक, नट व दिग्दर्शक–नाना वर्गांतील लहान–थोर, गरीब–श्रीमंत, अडाणी–विद्वान अशा लोकांची ये–जा जोशीबुवांच्या घरीं सतत चालू असते. आणि तेथें येऊन गेलेला प्रत्येक माणूस, पारिजातकाची सावली व सुगंध लाभल्याप्रमाणें, आनंदित होऊन परत जातो. दुःख व दारिद्र्य यांनीं जोशीबुवांना एके काळीं खूप छळलेलें आहे. तरी त्यांच्या मनाचें समाधान कधींहि भंग पावलें नाहीं. दहिंवरानें भिजलेल्या पारिजातकांचीं फुलें जमिनविर टप्‌टप् पडावींत; त्याप्रमाणें हास्यामध्यें घोळलेले गोड संवाद त्यांच्या मुखांतून अष्टौप्रहर निघत असतात. गोड गप्पांचें गुऱ्हाळ त्यांच्या घरीं निरंतर चालू असतें. तेंच त्यांचें चिंतन आणि तोच त्यांचा अनुभव !–त्यांतूनच निर्माण होतें त्यांचें वाङ्मय ! प्रेम, जिव्हाळा, सहानुभूति या गुणांनीं त्यांचें अंतःकरण तुडुंब भरलेलें आहे. साधेपणा व मोकळेपणा हे त्यांच्या स्वभावाचे जणु उजवे–डावे हातच. अहंकार, मत्सर, द्वेष इत्यादि क्षुद्र विकारांना त्यांच्या स्वभावांत थाराच नाहीं. त्यांचें लेखन जितकें प्रेमळ व निर्भळ आहे, त्याहिपेक्षां अधिक त्यांचें जीवन सरळ व जिव्हाळ्याचें आहे.

जिव्हाळ्याची जादू

आपल्या स्वतःच्या जीवनांत अखंड आनंद भरून ठेवण्याची जी गुरुकिल्ली जोशीबुवांना गवसलेली आहे, तीच ते इतरांच्या जीवनालाहि लावीत असतात–आणि त्यांत दडलेली दौलत बाहेर काढून दाखवीत

असतात. सर्वसामान्यच माणसें, त्यांचें साधेसुधेंच आयुष्य, आणि त्यांतील मामुलीच घडामोडी–पण त्यांतून प्रेमाचे व आनंदाचे लपलेले झरे जोशीबुवा शोधून काढतात व वाचकांना दाखवितात. तेव्हां वाचक आपल्या मनाशीं चकित होऊन म्हणतो, " अरे, हें कसें बुवा आतांपर्यंत आपल्या लक्षांत आलें नाहीं. हा आनंदाचा ठेवा तर आपल्यापाशींच होता कीं ! " मुलाबाळांचें, भाऊबहिणींचें, मायलेकाचें, भावाभावांचें प्रेम किती मधुर असूं शकतें, आणि तें प्रत्येकाच्या संसारांत कसें लपलेलें असतें, हें जोशीबुवा साध्या-सोप्या शब्दांनीं वाचकांना सांगतात आणि म्हणतात, " हें पहा तुझें सौख्याचें गाठोडें–तुझें तुझ्यापाशींच होतें. त्याकडे कानाडोळा करून तूं बाहेर सुखाचा पाठलाग उगाच करीत होतास. आतां हें गांठोडें नीट संभाळून ठेव म्हणजे झालें ! " साध्या प्रपंच–कथांतून अद्‌भुत रस निर्माण करण्याची जादू जोशीबुवांजवळ आहे. ही जादू कोणती ? तर जिव्हाळा ! जोशीबुवांच्या या जिव्हाळ्याच्या जादूनें सामान्यांना असामान्याचें व नीरसांना रसपूर्णतेचें स्वरूप प्राप्त होतें. आणि त्यामुळें " आपल्याहि आयुष्यांत इतकी गोडी आहे तर ! " असें वाचकांना वाटूं लागतें. रानावनांतून व उन्हातान्हांतून पायपिटी करून शिणलेल्या मुशाफिराच्या दृष्टीस झाडावर मधाचें मोहोळ व झाडाखालीं झुळझुळ वाहणारा स्वच्छ पाण्याचा झरा अवचित दृष्टीस पडावा, तसा अकल्पित आनंद जीवनाच्या भगभगीस कंटाळलेल्या जीवांना देण्याची शक्ती जोशीबुवांच्या लघुकथांमध्यें आहे.

अनुभवाचें शिक्षण

श्री. यशवंत गोपाळ जोशी यांचा जन्म पुणें जिल्ह्यांतील डिकसळ या खेड्यांत ता. १७ डिसेंबर १९०१ रोजीं झाला. वडील कोर्टांत रजिस्ट्रारचें काम करीत. त्यांचा स्वाभिमानी व निःस्पृह स्वभाव यशवंतरावांच्या अंगीं उतरलेला आहे. घरची गरिबी. त्यांत नाना अडचणी. त्यामुळें यशवंतरावांच्या शिक्षणाची मजल इंग्रजी चौथीपाशींच खुंटली. पुढें त्यांनीं इंग्रजीचा अभ्यास ' टाईम्स ' वाचण्याइतका केला, तरी इंग्रजी

ग्रंथांचें वाचन बेताबाताचेंच आहे. त्यामुळें त्यांच्या कांहीं कथांवर वाङ्मय-चौर्याचा आळ आला असतांना, भिंतीवर आपटून परत गेलेल्या चेंडूप्रमाणें, तो सहजच खालीं पडला !

शिक्षण बेताचें व घरची गरिबी, त्यामुळें जोशीबुवांचें पूर्व-आयुष्य पोटाच्या पाठीमागें लागण्यांतच गेलें. सरकारचें लष्करी खातें असो किंवा येरवड्याचा तुरुंग असो-कोठलीहि व केवढीहि नोकरी त्यांनीं खुशीनें पत्करली. छापखान्यांतील कंटाळवाणें कामहि ते आनंदानें पार पाडीत. दारिद्र्याबरोबरच मृत्युहि त्यांच्या घराच्या राशीस लागलेला होता. एका पंधरवड्यांत घरांतील सात-आठ मृत्यु त्यांना पहावे लागले. या नानाविध दुःखांच्या भट्टींत त्यांच्या मनाची वीट पक्की भाजली गेली. त्यांच्या भाषेला विलक्षण धार आली. त्यांना मनुष्य-स्वभावाचें बरेवाईट अनुभवहि पुष्कळ आले. तशाहि अवस्थेंत त्यांच्या चित्तांत एकच ऊर्मि उसळत होती-आणि ती म्हणजे लेखक होण्याची !

आपंचिक कथा

त्यांनीं स्वतःचेच अनुभव व स्वतःच्याच भावना, आपल्याला सुचतील त्या शब्यांनीं व जमतील त्या पद्धतीनें लिहून काढल्या-आणि त्या लघुकथा म्हणून निरानिराळ्या मासिकाकडे पाठविल्या. त्यांना बक्षिस काय मिळालें ? तर " साभार परत ! " एक नव्हे, दोन नव्हे, पंधरा कथा नापसंत होऊन परत आल्या. पण आपल्या रत्नांची किंमत जोशीबुवा बरोबर जाणत होते. 'यशवंत' मासिकानें लघुकथांच्या स्पर्धेंत शंभर रुपयांचें पारितोषिक लावलें. त्यासाठीं जोशीबुवांनीं आपल्या "परती"च्या कथांतील एक गोष्ट उचलली व ती त्या मासिकाकडे पाठविली. तिला पहिला क्रमांक मिळाला ! जोशीबुवांचें यशवंत नांव जिकडेतिकडे गाजलें. त्या गोष्टीचें नांव 'शेवग्याच्या शेंगा!' त्यांची प्रथम प्रसिद्ध झालेली गोष्ट म्हणजे 'एक रुपया दोन आणे.' आतां रुपेरी पडद्यावर सोन्यासारख्या चमकणाऱ्या 'वहिनीच्या बांगड्या' पूर्वी एका संपादकानें कवडीमोल मानून परत केलेल्या होत्या. या साऱ्या कथा 'परत' आलेल्याच होत्या. साधेपणाचें सौंदर्य कळण्यास वेळ लागतो हेंच खरें.

य. गो. च्या लेखन-शैलीवर प्रारंभीं गडकऱ्यांच्या कृत्रिम भाषेची विलक्षण मोहिनी पडलेली होती. पण त्या मोहिनेंद्रतून ते लवकर जागे झाले आणि देवल-आपटे यांच्या घरगुती भाषेची माधुरी व मातब्बरीच त्यांना अधिक वाटूं लागली. आणि तेहि तसेंच लिहूं लागले. त्यांनीं आतांपर्यंत सुमारें दीडशें लघुकथा लिहिल्या आहेत. तंत्राची फिकीर ते करीत नसल्यामुळें, त्यांतील कांहीं स्वभावा-चित्रांप्रमाणें आहेत, कांहीं उपहास-प्रचुर टीका-लेखाप्रमाणें आहेत, तर कांहीं भाव-निबंधाप्रमाणें आहेत, पण कांहीं मात्र शुद्ध, प्रमाणबद्ध व सर्वांगपूर्ण लघुकथाहि आहेत. 'होमकुंड' व पडसाद' या दोन कादंबऱ्या त्यांनीं लिहिल्या आहेत. पैकीं 'पडसाद' या कादंबरीवरून 'माझा मुलगा' हा बोलपट 'प्रभात' नें तयार केला. भोळा शंकर, श्रीमुखांत व बोलका सिनेमा हीं नाटकेंहि त्यांनीं रचलीं आहेत. शिवाय "अनौपचारिक मुलाखती" सारखा अभिनव लेखन प्रकारहि त्यांनीं सुरू केला. साध्या पण धारदार शब्दांनीं प्रखर टीका करणारे 'विद्वान भाड्यानें देणें आहेत.' यासारखे लेखहि त्यांनीं अनेक लिहिले आहेत.

ध्येयवादी प्रकाशक

'लेखका' इतकाच 'प्रकाशक' म्हणूनहि जोशीबुवांनीं लौकिक कमावलेला आहे. दोन्ही क्षेत्रांत त्यांनीं आपलें चोखटेंपण राखलें आहे. स्वतःप्रमाणेंच इतरांच्या जीवनांतीलहि आनंद ते जसा शोधून-उलगडून दाखवितात, त्याचप्रमाणें ते स्वतःप्रमाणें इतरांचेंहि वाङ्मय प्रकाशांत आणतात. शें-दीडशें कथा-कादंबऱ्या प्रकाशित केल्यानंतर त्यांनीं ध्येय-वादी व कोशस्वरूपी वाङ्मय प्रसिद्ध करण्याचा वाग्यज्ञ सुरू केला. पाठीशीं विद्वत्ता नसतांहि त्यांनीं जसें यशस्वी लेखन केलें, तसेंच गांठीशीं द्रव्य-राशि नसतांहि त्यांनीं प्रचंड स्वरूपाचे समाजोपयोगी ग्रंथ प्रकाशित केले. नवीन तत्त्वज्ञानांचा परिचय मराठी वाचकांना करून देण्यासाठीं त्यांनीं 'वाद-विवेचन-माला' चालविली व तिच्यामार्फत तेरा पुस्तकें काढलीं. त्यांतच मार्क्सच्या 'कॅपिटल' ग्रंथाचा समावेश होतो. विद्या-

पीठासारख्या संस्थेनें करावयाचीं प्रकाशनें या एका व्यक्तीनें लीलेनें पार पाडलीं आहेत. 'काळांतील निवडक निबंध' हे प्रा. शिवरामपंत परांजपे यांचें तेजस्वी वाङ्मय जतींतून मोकळें झालें. तेव्हां काळाच्या उदरांतून पुनः बाहेर आलेलें हें वाङ्मय प्रसिद्ध करण्याचें धाडस केलें जोशीबुवांनींच. ज्ञानकोशाची सुधारलेली व संक्षित आवृत्ति शोभेल असा 'सुलभ विश्वकोश'हि त्यांनीं प्रकाशित केला. ज्ञानेश्वरी, महाराष्ट्र परिचय, संस्कृत कोश इत्यादि महत्कार्यांचें कंकण त्यांनीं बांधलें आहेच. महाराष्ट्र शारदेची सेवा लेखक व प्रकाशक या दोन्ही नात्यांनीं इतक्या विपुल प्रमाणांत व विमल स्वरूपांत करणारे महाभाग थोडेच सांपडतील ! १९४७ सालीं " मुंबई मराठी साहित्य संमेलना 'चें अध्यक्षस्थान त्यांना देण्यांत आलें होतें.

लेखनाची प्रेरणा

प्रत्यक्ष डोळ्यासमोर घडणाऱ्या जीवनाकडे कानाडोळा करून कल्पित कथा–कादंबऱ्यांत रमण्याची प्रवृत्ति वाचकामध्यें वाढत आहे. तिची टर उडविण्यासाठीं जोशीबुवा मिष्किलपणें लिहितात, " कांहीं कांहीं लोकांचा वाङ्मयावर आतां इतका विश्वास आहे कीं, चांगला किंवा वाईट असा एखादा असामान्य अनुभव प्रत्यक्ष आयुष्यांत आला तर तो लोकांना काल्पनिक वाटतो आणि वाङ्मयांतले अनुभव खरे वाटतात ! " पण आपलें वाङ्मय सत्यसृष्टीचें प्रतिबिंब दाखवितें काय ? सध्यांच्या मराठी ललित साहित्याविषयीं जोशीबुवांनीं आपलें प्रांजल मत स्पष्टपणें दिलें आहे. ' मी कां लिहितों ? ' या लेखांत ते सांगतात, " आपलें मराठी सामाजिक वाङ्मय वाचून आपल्या समाजाकडे पाहावें, तों वाङ्मयांतलीं चित्रें आणि आपलीं प्रत्यक्ष समाजचित्रें यांत किती तरी तफावत वाटूं लागली. आपलीं म्हणून लिहिलेलीं समाजचित्रें साहेब आणि मडम यांच्या चित्रांना गंध आणि कुंकूं लावून देशीं चित्रें म्हणून विकण्याचा अट्टाहासच मराठी वाङ्मयांत चाललेला मला वाटला ! "

' यशवंत गोपाळ जोशी ' या स्वतःच्या नांवाचीच गोष्ट लिहिण्याची गंमत त्यांनीं केली आहे. त्यांतील एका वृद्ध गृहस्थाच्या मुखानें जोशीबुवा

इतर साहित्यिकांना कानमंत्र देतात, " थापा नकोत, खरं लिहा ! ती तुमची कला–टेक्निक थोड कमी झालें तरी चालेल; पण खरं बोला ! अरे बेड्यांनो, ज्या गोष्टी तुम्ही सामाजिक गोष्टी म्हणून लिहितां, तो तुमच्या सामाजिक गोष्टींत सामावलेला समाज आहे कुठं ? " कलेचा आत्मा म्हणजे भावना. त्या व्यक्त करण्याचें अनुभवसिद्ध शास्त्र आहे. तें निरुपयोगी आहे असें कोण म्हणेल ? पण पावशेर उपमा, अच्छेर वर्णनें व शेरभर संवाद असें भावनाविष्काराचें कोणी कोष्टक मांडूं लागला, तर त्या अतिरेकाचें मात्र हंसें होतें. तसें हंसें ' ग्यानबा तुकाराम आणि टेक्निक ' या आपल्या गाजलेल्या कथेंत जोशी यांनीं केलें आहे. तींत शेवटीं ते निष्कर्ष सांगतात, " एका भक्तीच्या जिव्हाळ्याखेरीज याला कसलं आलं आहे टेक्निक् ? जिव्हाळा असेल तर टेकनिक्ची जरूरी नाहीं आणि जिव्हाळा नसेल तर टेक्निक पाहिजेच !! "

कला व तंत्र

हें झालें अन्य साहित्यिकांच्या वाङ्मयासंबंधीचें मत. ' पण तुम्ही स्वतः कां लिहितां ? कसें लिहितां ? कोणता हेतु मनांत धरून लिहितां ? ' असे सवाल त्यांना कोणी केले, तर जोशीबुवा त्यांना उत्तरतात, " मी फक्त पाहतों आणि त्यांत स्वतःचें अंतःकरण मिसळून लिहितों ! त्यांत माणुसकी सांपडेल–प्रामाणिकपणा सांपडेल–' मी ' सांपडेन. " त्यांच्या लघुकथांपैकीं निम्म्याहून अधिकांचीं कथानकें त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवांतून निघालेलीं आहेत. आणि बाकीचीं बहुतेक आपल्या मित्रांच्या सत्यकथांतून जन्मलेलीं आहेत. त्यांची कला म्हणजे त्यांत ' अंतःकरण मिसळण्याची.' ते स्पष्टच सांगतात, " मी, माझें कुटुंब आणि माझे स्नेहीसोबती याबाहेर माझी दृष्टीच पोंचत नाहीं ! बाकी एकंदर जिव्हाळ्याचे आणि जागतिक महत्त्वाचे प्रश्न म्हणजे ' हवापाण्या ' च्या चौकशीसारखे वाटतात मला. " मात्र खऱ्याखुऱ्या अनुभवाचें जीवंत चित्रण करणाऱ्या लेखकाची भूमिका किती उच्च पाहिजे हें सांगतांना ' यशवंत गोपाळ जोशी ' या कथेंत ते म्हणतात, " लिहिल्याशिवाय राहवत नाहीं तें लेखन ! लिहायला बसतांना

देवाच्या पूजेला बसल्यासारखा मनाचा उल्हसितपणा पाहिजे ! लेखनाच्या जागेतसुद्धां पवित्रपणा पाहिजे !...लेखक म्हणजे चांगल्या विचारांचा मार्गदर्शक दिवा असला पाहिजे ! ''

साहित्याचें जीवित-कार्य

सत्य घटना कलात्मक रीतीनें मांडण्याची ऊर्मि जोशी यांना लहानपणापासूनच आहे. तिचें वर्णन साध्या सुंदर भाषेनें करतांना ते म्हणतात, '' लहानपणीं मुलांना जसे कांहीं कांहीं नाद लागतात, तसा मला लेखन-वाचनाचा नाद लागला. तो नाद कांहीं वर्षांनीं इतका वाढला कीं, एखाद्या दिवशीं जेवण मिळालें नाहीं तर आपण ज्याप्रमाणें बेचैन होतों, त्याप्रमाणें लेखनवाचन ही माझ्या जीवनाची भूक ठरली ! '' केवळ कल्पित, निव्वळ अद्‌भुत असें कांहीं तरी लिहून वाचकांची पोकळ करमणूक करणे हें वाङ्मयाचें जीवित-कार्य आहे असें ते मानीत नाहींत. साहित्यानें परिस्थिति पालटण्याचा प्रयत्न केला पाहिजे, हें उच्च तत्त्व जोशी किती साध्या दाखल्यानें पटवितात पहा. '' रस्त्यावर पाणी सांचलें म्हणून मुलांनीं त्यांत कागदाची होडी टाकणें असाच आपल्या लेखनाचाही खेळ आहे-त्यापेक्षां आपल्याला पाऊस व्हायला पाहिजे-वारा व्हायला पाहिजे-म्हणजे आहे त्या परिस्थितीशीं खेळण्यापेक्षां परिस्थिती बदलण्याचें सामर्थ्य आपल्याला यायला पाहिजे. ''

वास्तव जीवनाचा आरसा

काडीची माडी करण्याचें कसब जोशीबुवांना चांगलेंच साधलें आहे. एखादा गारुडी जसा चिमूटभर माती हातामध्यें घेतो आणि हां हां म्हणतां तिचा रुपया बनवून दाखवितो; तसा चमत्कार जोशीबुवा आपल्या लघुकथेमध्यें करतात. त्यांची अगदीं प्रथम (म्हणजे १९२९ सालीं) प्रसिद्ध झालेली गोष्ट घ्या. तिचें नांवच मुळी 'एक रुपया दोन आणे !' इतर कल्पना-विलासी कादंबरीकारांप्रमाणें, त्यांचे नायक बड्या हॉटेलांत उतरत नाहींत, त्यांचें बिल पांच-सहाशें रुपये होत नाहीं, आणि तें बिल, दांत कोरून टाकलेल्या काडीप्रमाणें, सहजासहजीं फेकून देणारे मित्र किंवा

मैत्रिणी भेटत नाहींत. सारा कारभार साधा नि रोकडा; सत्यकथाच त्या. कला काय असेल ती केवळ मांडणींत. ' एक रुपया दोन आणे ! ' या पहिल्या लघुकथेंतील नायक काय करतो ? तर हॉटेलांत ' एक मिसळ व पाव मागवितो, ' तोंच त्याची ' ती ' माहेराहून येऊन टांग्यांतून घरीं चाललेली त्याला दिसते. दोघांचें लग्न लागून एकच वर्ष झालेलें. विरहानंतरची ती भेट ! पण तींत ' रोमान्स ' काय आहे ? कांहींच नाहीं. पुढें कथेंतील ' पेचप्रसंग ' निर्माण होतो; तो कोणता ? तर एकतीस तारखेचा! त्याच्या खिशांत एकहि पैसा नसतो आणि तिचा लंकडा 'लांकडें आणा.' तेवढ्यावरून बोलाचाली झाली, चिडाचिडी झाली, रुसवारुसवी झाली, उणींदुणीं उत्तरेंहि झालीं. पण अखेर वडिलांची मनीआर्डर आली— तीहि फार मोठी नव्हे, फक्त पंचवीस रुपयांची, पण तेवढ्यानें त्यांची अडचण निभावली गेली. झाली—कथा संपली. शेंकडा नव्वद वाचक ज्या गरिबीचा आणि त्या गरिबींतील ज्या अडचणींचा हरघडी अनुभव घेत असतात; त्यांचेंच हें वास्तव चित्र पाहतांना त्यांना एखादा मित्र भेटल्याप्रमाणें आनंद कां वाटणार नाहीं ? शिवाय जुन्या काळांतील वडिलांचें प्रेमळ स्वभावचित्रहि आकर्षक आहे. सोप्या भाषेनें, सहज संवादानें, स्पष्ट स्वभाव-चित्रें रेखाटण्यांत जोशीबुवांची लेखणी तरबेज आहे. ' संसार-प्रवेश ' या कथेंतहि १ रुपया १३ आणे मध्यें सुखासमाधानानें दिवाळी साजरी करणारें मानी कुटुंब दाखविलें आहे.

कलेची किमया

ही कथा सजविण्यासाठीं एक रुपया दोन आणे तरी जोशीबुवांनीं खर्च केले, पण ' शेवग्याच्या शेंगा ' ही त्यांची सुप्रसिद्ध कथा रचण्यास त्यांना काय खर्च आला ? अवघ्या पंधरावीस शेंगा—त्याहि घरांतल्या झाडाच्या, पण त्या शेंगांनीं तीन भांडखोर भावांचें मेतकूट जमविलें आणि ' दिवाळींचें रहस्य' या कथेंत तर रुपया नाहीं, शेंगा नाहींत, कांहीं नाहीं. फक्त वडील आपल्या एक-एक मुलाला बोलावून त्याच्या कानांत हळूच सांगतात, ' हट्ट करायचा नाहीं, हं. ' बस्स ! तेवढी मधाची धार कानांत

पडतांच सारीं मुलें खूष. सारें कुटुंब आनंदानें नाचूं लागलें. त्या प्रेमाच्या दिवाळींत गरिबीचा अंधार राहतो कशाला? नुसत्या 'सुपारींत' सुख कसें असतें हेंहि त्यांनीं सुंदर रीतीनें सांगितलें आहे. कलेची किमया म्हणतात ती हीच. साध्या विषयांत मोठा आशय पहाणारी व सामान्यांतून असामान्य तत्त्व शोधणारी कला-दृष्टि जोशीबुवांच्या ठायीं आहे.

कौटुंबिक प्रेमाचें चित्र

शंभर रुपयांचें पहिलें बक्षिस मिळविण्यासारखी कोणती जडीबुट्टी "शेवग्याच्या शेंगां'त जोशीबुवांनीं भरली आहे? तर करुण रसांत घोळलेलें भावाबहिणींचें प्रेम! "वडिलांच्या अस्थि आळंदीला पोंचवून श्रीनिवास आतांच आला होता." ही पहिलीच ओळ कारुण्याचा सूर लावणारी आहे. त्या कारुण्याची कमान चढविणारीं वर्णनें मधून मधून पेरलेलीं आहेत. जिला नायिका म्हणतां येईल ती कशी आहे? तर "तारका साधी, सुंदर, एकमार्गी मुलगी होती, वय सुमारें चवदा, वयाच्या आठव्या वर्षींच मातृवियोग! तेव्हांपासून तिचें निम्में बोलणें कमी झालें. जें आईजवळच बोलायचें तें ती आतां कोणाजवळ बोलणार? आईजवळ बोलायचे विचार मनांत तसेच पडून रहात. तशा विचारांची तिच्या मनांत बरीच अडगळ झाली आणि त्यामुळें तिच्या स्वभावांत थोडासा कुढेपणा आला!"

आईबापांवेगळी तारका. तिचें जीवन किती दुःखी झालें याचें करुण चित्रण पुढील दोनचार ओळींत कसें केलेलें आहे पहा. "हालतेचालते वडील दिसेनासे झाले होते, आणि तिच्या वडिलांच्या-दामोदरपंतांच्या दिवाण-खान्यांत त्यांचा 'लाइफ साइज' फोटो लावलेला होता. तारकेला परिस्थिती असह्य झाली म्हणजे ती वेड्यासारखी आपल्या वडिलांची तसबीर कुशींत घेऊन उभी राहिल्यासारखी तसबिरीला बिलगे, अश्रू ढाळी आणि परत फिरे!"

श्रीनिवासनें तारकेला आपल्या घरीं ठेवलें; पण या अटीवर कीं, दुसऱ्या दोघा भावांच्या घराचा उंबरठा चढायचा नाहीं. हा कोंडमारा

तारकेला असह्य झाला आणि ती घरांतील शेवग्याच्या शेंगा तोडून घेऊन दुसऱ्या भावाकडे गेली. तेथें तिला दोघेहि भाऊ भेटले आणि "प्रसंगानें दगडालाहि पाझर फुटतो, असें आपण म्हणतों, मग नारायण कांहीं अगदींच दगड नव्हता. त्यांच्या डोळ्यांत–काय–पाणीच म्हणायचें ना?" त्याचवेळीं श्रीनिवासहि तेथें आला. "मला माझे तीनहि भाऊ पाहिजे आहेत" असें तारका हृदय पिळवटून म्हणाली. तेव्हां 'कपाळांवर बुक्की मारून घेत श्रीनिवास म्हणाला "तारे—तारके! .....तूं कुणाकडेहि जात जा आणि कुणाकडेहि राहा." छोट्या बहिणींच्या प्रेमरसानें भावा-भावांचीं फुटलेलीं हृदयें सांधलीं गेलीं.

करुण व हास्य

जोशीबुवांच्या बहुतेक कथा करुणरसानें ओथंबलेल्या आहेत. कांहीं थोड्या कथांमध्यें मात्र विनोद असतो, पण तो तीक्ष्ण उपरोधांतून निर्माण झालेला असतो. साध्या, गरीब, मध्यमवर्गीय कुटुंबांतील अगदीं सामान्य घडामोडी घेऊन त्यावर त्यांनीं आपल्या कथांचें मंदिर उभारलेलें आहे. कोणाचें तरी दारिद्र्य, कोणाचें तरी आजारीपण, कोणाचें तरी निधन–हें त्यांच्या बहुतेक लघुकथांमध्यें आढळतें. आणि त्यांतून ते करुणरस निर्माण करतात. पण त्यांची खरी बहार आहे, ती त्या करुणरसावर उदात्त रसाचे किरण पाडण्याचे कामीं. दुःखाच्या प्रसंगीं दुसऱ्याच्या अंतःकरणांतील माणुसकी कशी जागी होते आणि ती त्याग, सेवा, प्रेम इत्यादि रूपांनीं कशी प्रगट होते, हें जोशी-बुवांच्या कथेंत वाचलें म्हणजे वाचकाचें मन सहजच उंच पातळीवर चढतें. जोशीबुवांचा विशेष गुण आहे तो हाच. उपरोधाच्या नाजूक शस्त्रानें समाजांतील दंभावर जोशीबुवा तीक्ष्ण आघात करीत असतात. 'साहित्यिकांची सफर' हें सारें पुस्तकच अशा उपहासपर विनोदानें खदखदणारें आहे. साहित्यांतील कृत्रिमपणा, आधुनिक सुधारणेचा नकली-पणा, शहरी जीवनाचा यांत्रिकपणा इत्यादींवर त्यांनीं कैक उपहासप्रचुर लघुकथा लिहिल्या आहेत.

उपरोधाचें शस्त्र

उपरोधिक लिहिण्यांत जोशी यांचा हातखंडा आहे. 'ग्यानबा तुकाराम आणि टेक्निक' या कथेंत त्यांनीं साहित्यांत तंत्राचा भलता बडिवार माजविणाऱ्यांचा खरपूस समाचार घेतला आहे. 'दुधावरची साय' या करुण-रम्य कथेंतहि ते उपरोधानें लिहितात, "मी मनांत म्हणें, काय तर्कशास्त्राची अजब जादू आहे! खऱ्या गोष्टीहि त्यामुळें चक्क खोट्या ठरतात! मला मानसशास्त्र वगैरे अजिबात कळत नव्हतें, म्हणूनच मी तें इतरांना कळतें असें गृहीत धरीत असें!"

'कलेकरितां कला' कीं 'जीवनाकरितां कला?' या प्रश्नावर एकदां महाराष्ट्रांत जोराचें वादळ माजलें होतें. वादळांतील होडीप्रमाणें, कांहीं साहित्यिकांचीं मतें, आज एक उद्यां दुसरें, अशी उलटसुलट होत होतीं. त्यांची चेष्टा करतांना जोशीबुवांचें 'घरचीं फुलझाडें' या कथेंतील एक पात्र उपदेश करतें,

"साहित्यविषयक बोलण्यांत दर पांच मिनिटाला 'जीवन' आणि सहाव्या मिनिटाला 'कला' असा ठेका धराल, तर तुमच्या लेखनाचा जलसा चिकार गर्दीचा व्हायला बिलकूल अडचण पडणार नाहीं!"

तसेंच, 'पायाचे दगड' या कथेंत जोशी यांनीं शहरांतील तकलुपी मैत्रीचें विडंबन पुढीलप्रमाणें केलें आहे, "मैत्रीची व्याख्या—सिगारेट ओढायला एकत्र जमणें,—फिरायला जाणें,—सौंदर्यचर्चा!—बंधनाच्या पलीकडील सामाजिक मतांच्या उष्ट्या पत्रावळी चोखणें!—आत्मप्रौढी करण्याचा गुत्ता!"

'राधेकृष्ण गोपालकृष्ण' ही कथा म्हणजे चित्रपट-सृष्टीवर चाल-विलेली विडंबनाची कुऱ्हाडच! जो चित्रपट पहावयास एकहि प्रेक्षक येत नाहीं, त्याचा "५४७५ वा अभेद्य आठवडा" चालू! म्हणून पट-गृहाचें देवालय बनलें—पण देवाविरहित!

नवथरांचें विडंबन

शहरी तरुण-तरुणींच्या तकलुपी प्रणय-चेष्टांची कुचेष्टा जोशी यांनीं

'सर्कस' या कथेंत भरपूर केलेली आहे. प्रेम-भंगामुळें आत्महत्या करूं पहाणाऱ्या हळव्या युवकांवर उपरोधाचें हत्यार जोशी यांनीं चौफेर चालविलें आहे. सर्कस पहातां पहातां 'तो' व 'ती' यांचें प्रेम जमतें, त्या प्रेमाचें पर्यवसान लग्नांत करण्याचें ते दोघें ठरवितात; पण—पण कांहींच नाहीं! त्या दोघांचे वडील त्या लग्नाला संमति देतात. पण 'बिनविरोधी प्रेमां'त काय राम? म्हणून 'तो' बेशुद्ध पडतो, तें पाहून 'ती' हृदय बंद पडून मरते आणि शुद्धीवर आलेला 'तो' तिचा मृत्यु पाहून तिच्यासकट जल-समाधि घेतो; असें उथळ प्रेम-कथांचें विडंबन जोशी यांनीं केलेलें आहे. 'लोखंड,' 'पांजरपोळांतली गाय' इत्यादि कथांत आधुनिक सुधारणेचें विडंबन त्यांनीं अतिशयोक्तीनें केलें आहे. बहुतेक सारें विडंबन-पटु लेखक सनातन चालीरीतींवरच स्थानींअस्थानीं शस्त्र चालवितांना आढळतात; पण जुन्या पक्षाच्या बाजूनें लढणारा झुंझार वाग्वीर ललित साहित्यांत जोशी हे एकटेच होत! 'गजरा मोतियाचा' या अलीकडील कथेंत त्यांनीं सध्यां मध्यम वर्गाची दैना कशी उडते याचें चित्रण तिखट उपरोधानें केलें आहे.

कथेची नांदी

कथेच्या प्रारंभीं इकडच्या-तिकडच्या गप्पा किंवा निसर्गातील एकाद्या देखाव्याचें वर्णन अथवा एकादें व्यावहारिक तत्त्वाचें विवेचन करून त्याला कथानकाचा धागा जोडण्याची जोशी यांना संवय आहे. 'भिकोबा आणि धनाजी' या सत्तरी उलटलेल्या दोन वृद्धांच्या कथेंत 'नांदी'च्या या सर्व प्रकारांचा संगम झालेला आहे. त्यांतील कांहीं वेचे पुढें देतों. "उन्ह एकसारखें रखरखत होतें आणि त्या रखरखणाऱ्या उन्हांत एखाद्या योग्यानें विस्तवावर चालावें त्याप्रमाणें तीं हिरवींपिवळीं कोंवळीं पिंपळपानें भर उन्हांत नाचत बागडत होतीं! का उन्हाला, सूर्याला हिणवींत होतीं—वांकुल्या दाखवित होतीं—देव जाणें!

तें नयनरम्य आणि मनोहारी दृश्य पाहून मला वाटलें, जगांत नवीन नवीन तत्त्वज्ञानें उजळत राहतात त्याप्रमाणें तीं नवी पिंपळपानें त्या पिंपळाचीं नवीन तत्त्वज्ञानें असावींत!

नवीन तत्त्वज्ञानें चकाकतात-चमकतात-आणि कांहीं कालावधीनें वाळून जातात-गळून जातात.''

अनुकंपेचे विषय

मधुकरी, शिक्षक, कारकून अशा दीनदलित वर्गाविषयीं जोशी यांना गाढ सहानुभूति वाटते. इतर कथाकार वेश्या, विधवा, मजूर वगैरेंच्या दुःखांना वाचा फोडीत असतात; तर जोशीबुवांच्या कथ तून दारिद्र्यांमध्यें भरडल्या जाणाऱ्या मध्यम वर्गाचे उसासे ऐकूं येतात. पिलू मराठे, दादा साठे यांच्या दरिद्र कथाहि चटकदारपणें सांगाव्यात जोशी यांनींच. शिक्षक हा समाजाचा किती उपयुक्त घटक ! त्याचा व्यवसाय साधुसंताइतका पवित्र. पण समाजांत त्याला ना धन, ना मान. सत्तेच्या व श्रीमंतीच्या अडणीवर बसलेले पालक गरीब शिक्षकाची कशी हेटाळणी करतात याचें सुंदर चित्रण जोशी यानीं ''बक्षीस रुपये १०१'' या कथेंत केलेलें आहे. त्यांतील विद्यार्थी शशिकांत हा एका मामलेदाराचा मुलगा. त्याची आई सावत्र. त्याला आवड चित्रकलेची. पण वडिलांचा आग्रह त्यानें एल्एल्. बी. व्हावें असा. सुमारें चार वर्षें तो फरारी झालेला. म्हणून वर्तमानपत्रांत बक्षिसाची जाहिरात दिलेली. त्या जाहिरातीनें होणारा कथेचा प्रारंभ उत्कंठा वाढविणारा आहे. त्यानंतर नगरकर मास्तराचें स्वभावचित्र दोन पानें विस्तारानें रंगविलेलें आहे—'अगदीं दुसरे दत्तो वामन पोतदार म्हणानात !'' या वाक्यानें त्या वर्णनाची अखेर केली आहे. ते जितके प्रेमळ व परोपकारी, तितकेच स्वाभिमानी व स्पष्टवक्ते. ते आपण होऊन शशिकांताच्या वडिलास भेटावयास गेले. तेव्हां ते वडील मामलेदारीच्या तोऱ्यांत म्हणाले, 'शशिकांताला शिकवणी ठेवायची आहे !' पण मास्तरांनीं सांगितलें, 'त्याला शाळेंतून काढा.' तेव्हां ते वडील मामलेदारी थाटांत म्हणतात ''काय गाढव आहांत हो !'' त्यावर ''आज आपण दिवसाच 'घेतली' आहेत वाटतं ?'' असें सडेतोड उत्तर देऊन मास्तर तेथून निघून गेले. मास्तरांच्या अपमानानें जखमी झालेला शशिकांतहि त्याच क्षणीं घरांतून बाहेर पडला. तीन वर्षांनीं वडील अत्यवस्थ आहेत,

ही जाहिरात वाचून तो त्यांना भेटावयास गेला, पण " अगोदर माझ्या मास्तरांची माफी मागा" असें म्हणाला. शिक्षकीचा केवढा गौरव! 'विलोरी काचांचा चक्काचूर' या कथेंतहि जोशी यांनीं 'शिक्षकाचा मानभंग व मनोभंग' यांचेंच चित्र रंगविलें आहे. 'दिनकर दिवेकर' या कथेचाहि सूर तोच. 'शिक्षकाच्या जगांत' नांवाची स्वतंत्र कथा-मालाच त्यांनीं सुरू केली होती. तींत शिक्षकाच्या जीवनांतील सत्य असे कटु अनुभव कलेच्या साखर-पाकांत घोळून मांडले आहेत. आपल्याच मुलाचा ज्ञानदाता-शीलकर्ता जो शिक्षक, त्याला दिवाणखान्यांत चहा नेण्यास सांगणें किंवा मंडईतून भाजी आणावयास लावणें, हें अंतीं आपल्या मुलाच्याहि आयुष्याचें मातेरें करणारें कसें आहे, हें जोशी यांनीं परिणामकारकपणें दाखविलें आहे.

कलेतील सहजपणा

सहजता हा त्यांच्या कलेचा आत्मा. त्यांची भाषाहि नेहमींच्या बोल-ण्यांतीलच असते. डोंगर-पहाडांतून खळखळत धावणाऱ्या झऱ्याचें पाणी किती जीवंत असतें? तो जीवंतपणा जोशीबुवांच्या भाषेमध्यें भरून राहि-लेला आहे. निसर्गातील ते पाणी जसें स्पर्शाला थंड व चवीला गोड असतें; तशीच जोशीबुवांची भाषाशैली निसर्गसुंदर असूनहि अर्थवाहक व परिणामकारक असते. मृदुमंजुल शब्द, विस्तारानें सजविलेले अलंकार व अंतराळांत उड्डाण करणारी कवि-कल्पना-या साऱ्या कृत्रिमतेवर जोशी यांनीं बहिष्कारच घातलेला आहे. या कृत्रिमतेचा उपहास करतांना मात्र ते आपली कल्पकता अशी दाखवितात, "खालीं डोळ्यांचीं सुंदर तळीं-त्यांत बुबळांचे हंस नाजूक फडफड करीत असतील ते तुम्हांला तिथून हालूं देणार नाहींत!"

आणखी एक कल्पकतेचें उदाहरण—" दिवस डोळे मिटीत होता, आणि रात्र डोळे उघडीत होती. आकाशांत रंगीबेरंगी शिडकाव्यांचा रंग-पंचमीचा खेळ चालला होता." पण हीं वर्णनें अपवादच समजलीं पाहिजेत.

जोशी यांची नेहमींची भाषा पराकाष्ठेची साधी, सोपी, सरळ. दाखले दिले तरी ते नित्याच्या व्यवहारांतील, घरोघर आढळणाऱ्या घटनांचे.

' पारिजातकाचीं फुलें ' या सुंदर व बोधपर कथेंत ते शहरी जीवनाचें वर्णन पुढील शब्दांनीं करतात, " आमच्या सुखाची गाय आमच्या अंतःकरणाच्या गोठ्यांत सुखानें सांवलीला बसलेली क्वचितच आढळे ! नेहमीं हिसकाफिसक चाललेली आणि दावें तोडण्याच्या तयारींत असलेली." अशाच घरगुती दाखल्यानें त्यांनीं ' दुधावरची साय ' या गोष्टींत पावसाचें वर्णन केलें आहे, तें असें, "पावसाच्या धारा झपाट्यानें खालीं येत होत्या. गाईच्या आचळांतून दूध काढावें तसें मला वाटत होतें तें ! आकाश-गाईच्या आंचळांतून दूधपाणी पृथ्वीच्या चरवींत सांडत होतें ! सर्वत्र फेंसाळलेल्या पाण्याची संतत धार सुटली होती ! दूध काढतांना गाईनें लाथ झाडावी किंवा कान फडफडावे त्याप्रमाणें सोसाट्याचा वारा मधून-मधून या अचाट गोदोहनाला अडथळा आणीत होता. गोदोहनाच्या वेळेला वासरानें मधें मधें आंचळाला तोंड लावण्याचा प्रयत्न करीत जिभल्या चाटाव्यात, त्याप्रमाणें उंच झाडें वरच्यावरच पावसाची धार चाटीत होतीं ! "

नुसती वीज कडाडत गेली, त्याचें वर्णन किती कौशल्यानें त्यांनीं केलें आहे पहा. " इतक्यांत एकदम पांचपन्नास आसूड एकदम वाजवावेत, अशा आवाजानें सुरवात होऊन वीज कडाडली आणि-अशी-ही अशी-सरपटणाऱ्या सर्पाप्रमाणें तेजानें चकाकत, सर्रकन् माझ्या डोळ्यासमोरून ती नाहींशी झाली. "

सविस्तर वर्णनशैली

' वस्ताद ' या कथेंत एका तालीमबाज तरुणाचें वर्णन मोजक्या शब्दांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे, " सहा फूट उंचीच्या आरशांत पहात एक तरुण उभा होता. त्याच्या अंगांत फक्त एक गंजीफ्रॉक-तो घामानें भिजलेला. एक पंचा वेढून घेतलेला-तो तालमींतील मातीनें लाल झालेला. रोजच्या व्यायामानें शरीर पोलादी बनलेलें. गळ्यांत एक काळा गंडा. नुकतीच त्यानें तालीम केलेली असल्यामुळें अंग घामानें निथळत होतें. आणि एका टॉवेलानें घाम पुशीत और मिजाशीनें तो समोरच्या आरशांत पहात होता ! "

'विकास' या लघुकथेंत एक उंच माणूस व त्याच्या भोंवतालचीं ठेंगणीं माणसें यांचें वर्णन किती विनोदप्रचुर उपमांनीं जोशी यांनीं केलें आहे, पहा. "हा उंच मलखांब मधें आरती करीत उभा आणि हातांनीं फिरवायच्या तालमींतील जोड्यांप्रमाणें ती सर्व खुर्जी माणसें—मोठें चमत्कारिक दिसें तें! एखाद्या दिवशीं तीं सर्व माणसें एकदम बाहेर पडलीं आणि हाही त्यांच्यांत असला कीं, रस्त्यानें मेंढरें वळीत चाललेल्या धनगराची मला आठवण होते!"

सध्यां मोडकळीस आलेल्या खेड्यांतील भकासपणाचें चित्र जोशी यांनीं 'संसार-प्रवेश' या कथेंत जातां जातां कसें काढलें आहे, पहा. "त्या खेड्यांतील कित्येक घरें ओस पडलेलीं होतीं! कित्येकांवरचीं छपरें नाहींशीं झालीं होतीं. कित्येक घरांच्या दगडी विटा आल्यागेल्यांनीं बाहून नेल्या होत्या. कांहीं घरांचे चौथरे आणि दगडी पायेच फक्त शिल्लक राहिले होतें. ठिकठिकाणीं फडक्या निवडुंग माजलेला होता. कित्येक ठिकाणीं कोरांटी—कोरफड उगवली होतीं. कांहीं पडीक घरांतून औदुंबराचे वृक्ष उभे होते. तर कांहीं घरांतून बाभळी वाढल्या होत्या. कावळ्यांची कावकाव कर्कशपणानें ऐकूं येत होती!"

रेखीव शब्द-चित्रें

एकाद्या पात्राचें वर्णन करायला जोशी बसलेच, तर ते किती सुंदर व यथार्थ असतें, याचा पुरावा 'कोथिंबिरीच्या काड्या' या कथेंत पहावयास मिळतो. त्यांनीं रेखाटलेलें द्वारकाबाईचें शब्द-चित्र असें, "वय पन्नाशीचा सुमार! सुंदर बागेवर सूर्याचे मावळते किरण जो एक मलूल पण बोलका तजेला आणतात, तसेंच द्वारकाबाईकडे पाहून वाटे! ती सात्त्विक मूर्ति, तो प्रेमळ चेहरा, तो चेहऱ्यावरचा सात्त्विक तजेला, वीतभर कांठाचें तें रेशमी लुगडें, तें अंगाखांद्यावरचें दागिन्याचें वैभव—द्वारकाबाईना शोभत होतें. उलट द्वारकाबाईहि त्या वैभवाला वैभव आणीत होत्या!...चित्रांतली श्रीलक्ष्मी चित्ररूप टाकून वावरते आहे असें वाटे."

तसेंच एक शब्द-चित्र ' घरचीं फुलझाडें ' या कथेंत दृष्टीस पडतें. तें असें—" आज कांहीं तरी सणाचा दिवस होता. गौरी न्हालेली होती. ओले केस पाठीवरच ऐटीनें रुळत होते. पाऊस पडल्यानंतर सृष्टिसुंदरीवर जें सौंदर्याचें सिंचन होतें, त्याचप्रमाणें गौरीचें नाहणें झाल्यामुळें गौरीच्या देहावर एक प्रकारची सतेजता फाकलेली होती; आतां ती एखाद्या देवते-सारखी दिसत होती ! "

अंतःसृष्टीचे चितारी

खऱ्या ललित लेखकाचें लक्ष बाह्य चित्रणापेक्षां आंतर वर्णनाकडेच अधिक असतें. तसें तें जोशी यांचें आहे. एकाद्या इमारतीचें, तिच्या दिवाणखान्याचें, त्यांतील सामानसुमानाचें, पात्रांच्या पोशाकाचें, हाव-भावाचें, शरीराचें—अशा बाह्य वर्णनांची कोरीव कलाकुसर ते फारशी करीत बसत नाहींत. पण साध्या प्रसंगांतून व सहज संवादांतून व्यक्तींच्या स्वभावांतील छटा व मनांतील खळबळी यांचें चित्रण ते सफाईनें करून जातात. कांहीं कांहीं कथांमध्यें मात्र त्यांनीं बाह्य परिस्थितिहि चितारली आहे—पण तीहि अगदीं अकृत्रिमतेनें. पाऊस पडूं लागल्यावेळच्या बालांच्या लीला त्यांनीं ' आयुष्यांतील एक अनुभव ' या निखालस सत्य-कथेंत पुढीलप्रमाणें वर्णिल्या आहेत. " आमच्या दारासमोर सांच-लेलें पाऊसपाणी त्यानें पायांतील वहाणेनें वर उडवलें. माझ्या मुलानें तयार केलेली एक कागदी होडी त्यानें त्या सांचलेल्या पाण्यांत नेऊन टाकली—आणि एखादें अगदीं लहान मूल वडिलांच्या हातीं सांपडूं नये म्हणून जशी एखादे बाळ-झुकांडी देऊन पळतें त्याप्रमाणें—तितक्याच बालसुलभ अभिनयानें तो निघून गेला. "

दोन म्हाताऱ्यांची केविलवाणी अवस्था वाचकांच्या डोळ्यापुढें उभी करण्यासाठीं जोशी हे ' भिकोबा आणि धनाजी ' यांचें वर्णन करतांना अशी उपमा देतात कीं, " एकाच पिंजऱ्यांत दोन उंदीर सांपडावेत त्याप्रमाणें ते दोन म्हातारे संध्याकाळच्या त्या मळूल वेळीं एकमेकांकडे केविलवाण्या आणि कावऱ्याबावऱ्या डोळ्यांनीं पाहतांना दिसत होते. "

याहिपेक्षां करुण वर्णन 'पैसे कसे संपणार?' या कथेंत साध्यासाध्या शब्दांनीं व हरघडीच्या दासल्यांनीं जोशी यांनीं केलें आहे. आपल्या अपत्यांच्या मृत्यूचें दुःख उकलून दाखवितांना वृद्ध बाप म्हणतो,—"पण बरं का भाऊसाहेब, गंमत ही कीं, एकाही आमच्या मुलानें आपल्या भावंडाचा चेहरा पाहिला नाहीं! एखाद्या विसरभोळ्या माणसाची या पावसाळ्याची छत्री जशी दुसऱ्या पावसाळ्याला टिकूं नये--हरवायचीच त्याची कुठं तरी--तसं आमच झालं बघा!"

स्वभावाचें प्रतिबिंब

'वहिनींच्या बांगड्या' या हृदय--द्रावक लघुकथेंतहि वहिनीचें शब्द-चित्र जातां जातां जोशी यांनीं काढलें आहे, तें असें—"भर बारांचें उन्ह, पायांत कांहीं नाहीं! सबंध चेहरा घामानें डबडबलेला. केससुध्दां घामानें चिंब झालेले. कपाळावरील घामाच्या ओघळानें कुंकवाचा रक्तवर्ण रंगाचा सडा गालांवर झाला होता. त्या धापा टाकीत माझ्या-जवळ आल्या." हें झालें वहिनींच्या बहिरंगाचें चित्रण, पण त्यांच्या स्वभावाचेंहि वर्णन जोशी यांनीं किती कुशलतेनें केलें आहे पहा. "आमच्या वहिनींचा स्वभाव मधमाशीसारखा होता! सांपडेल तिथून निर्मल–निष्पाप आनंद गोळा करावयाचा आणि त्याचा सुगंध कुटुंबांत पसरायचा! पण कांहींच्या नशिबीं असा आयता आनंद घेण्याचेंहि नसतें, किंवा ते घेत नाहींत! ते नुसते सुखाचे पहारेकरी!"

वहिनीचा बाळ देवाघरीं गेला. त्याचें वर्णन किती हलक्या हातानें, सहृदय भावनेनें जोशी यांनीं केलें आहे. तें करतांना सहज स्फुरणारें तत्त्व-ज्ञानहि सहज आठवणाऱ्या दाखल्यानें त्यांनीं सांगितलें आहे. तें असें—"इकडचा मुलगा तिकडे झाला! एका खळगींतून बाहेर आला आणि दुसऱ्या खळगींत पुरला गेला! त्याचें नांव काय? त्याचें काम काय? आमच्या दादा-वहिनींना त्याचा उपयोग नुसता तुरटीच्या खड्यासारखा झाला? तुरटीचा खडा डोळ्यांतून फिरवला म्हणजे डोळे साफ होतात—डोळ्यांतून पाणी येतें."

प्रभावी संवाद

काळजाला घरें पाडतील असे संवाद लिहिण्याची शक्ति जोशी यांच्या लेखणींत आहे. वहिनीवर आईसारखी माया करणारा नायक. पण त्याचें लग्न झालें. त्याची बायको स्वभावानें कोती व कुढी. तिच्या बाळाला वहिनीचा लळा लागला; तर वहिनीची दृष्ट लागेल म्हणून ती बायको आपल्या मुलाला वहिनीपासून दूर ठेवूं लागली. उदार स्वभावाच्या वहिनींनीहि आपली ममता आवरली व त्या बाळाला दूर ठेवण्यास सुरुवात केली. त्या दोघां प्रेमळ जीवांची ताटातूट नायकाला पहावेना. तेव्हां तो वहिनीला चारच वाक्यांत आपल्या हृदयाचे उमाळे उकलून दाखवितो.

" मी गहिंवरून म्हणालों, " वहिनी-ए आई, माझ्यावरची आणि माझ्या बाळावरची माया अशी काढून घेऊं नकोस—वहिनी, मी भावडा आहें—सगळं मोकळ्या मनानं बोलतों मी तुझ्या जवळ ! म्हणून का तूं अशी निष्ठुर झालीस ? तें कांहीं नाहीं. घे—घे या बाळाला आणि मला वचन दे, कीं मघांपासून जसं तूं त्याच्याशीं निष्ठुर वर्तन केलंस, तसं यापुढं कधींहि करणार नाहींस ! "

कलात्मक बोध

पारिजातकाच्या झाडाचें वर्णन त्यांनीं किती सहज—रम्य केलें आहे. " शेजारींच कोंपऱ्यावर केराची पेटी होती आणि त्या पेटींत व तिच्या सभोंवतालीं पारिजातकाच्या फुलांचा तुरळक सडा पडला होता. सहज नजर वर गेली. फुलांचा शेला पांघरून पारिजातकाचें झाड डौलानें उभें होतें ! आणि जेव्हां डौलानें तें पारिजातकाचें झाड डुले त्या वेळीं त्याच्या त्या शेल्यांतील कित्येक फुलें खालीं पडत. " उकिरड्यावर उगवलेल्याहि पारिजातकाचीं फुलें प्रसन्नच असत, तसेच तीस रुपये पगारावर पोट भरणारें कुटुंब सदा आनंदी असे, असें तत्त्व ' पारिजातकाचीं फुलें ' या मनोज्ञ कथेंत मांडलेलें आहे. वाचकांच्या मनांतील क्षुद्र विकारांचीं जळमटें झाडून टाकून तेथें उदात्त विचारांचा सुगंध पसरविण्याचें सामर्थ्य जोशी यांच्या कथा-लेखनांत आहे. ' दोन श्रीमंत ' या कथेंतील कार-

कून बापू इतका बाणेदार व स्वाभिमानी दाखविला आहे कीं त्यापुढें श्रीमंतांनींहि मान लववावी. कल्पित दृश्यामुळें वाचकाच्या चित्तांत हुरहूर उत्पन्न करणाऱ्या कथांपेक्षां अशा सद्गुण पेरणाऱ्या कथा समाजाला अधिक उपयुक्त नाहींत काय ? कलेचा आस्वाद मिळून शिवाय मनाची उन्नति झाली आणि त्यायोगें आपल्या जीविताला रुचि व अर्थ प्राप्त झाला, तर तें काय्याला नको आहे ?

जीवनाचा मंत्र

कथेच्या ओघांत सुविचार गुंफण्यांत जोशी यशस्वी आहेत. 'पांजरपोळांतली गाय' या उपरोधिक कथेची नायिका आपल्या हळुवार पतिला धडा देते, "भारी किंमतीच्या कापडाच्या दुकानांत कपड्याच्या जाहिराती-करितां देहाचे लांकडी ठोकळे करून ठेवलेले असतात ना ? तशी तुम्ही बायकांना वागणूक देत आहांत हल्लीं. यंत्रासारखे त्यांचं आयुष्य करून ठेवलं आहांत आपण ! त्यांच्या मनाची रग नाहींशी करून आपण आपल्याहि मनाची रग नाहींशी करून घेतली आहांत ! . . .

"आपल्या सुशिक्षित समाजांत जर निरखून पाहूं लागलों तर कुणाच्याच 'लाईफमध्यें' स्प्रिंग' राहिलेली नाहीं, तर नुसती मान हलविणारीं चित्र बाजारांत मिळतात तशी आपली निर्जीव हालचाल करणारी स्थिति झाली आहे !"

'वहिनीच्या बांगड्या' मध्यें तर जीवनांतील सुखाचा मंत्र लेखकानें सांगितला आहे. तो असा—"मनमिळाऊपणा ह्याच गुणाला मी शंभर मार्क देतों; इतर किरकोळ हजार दुर्गुण अंगांत असले, तरी एक मनमिळाऊपणा जर अंगांत असेल तर—

—पण तो नाहीं, म्हणून हल्लीं कुटुंबपद्धति—छिन्नविच्छिन्न झालेली दिसते आहे !"

माणुसकीचें दर्शन

मानवी जीवन हें केवळ धनानें, स्वार्थानें, भोगानें सुखी होणार नाहीं; त्यासाठीं श्रद्धा, प्रेम, सहिष्णुता इत्यादि गुण अवश्य असतात, हा सिद्धांत

जोशी यांनीं वाचकांना न कळत, आपल्या कलेच्या द्वारां, कैक कथांतून दिला आहे. 'धर्म ही अफू आहे' या कथेंत मानवी जीवनाला विसावा व ओलावा मिळण्यासाठीं श्रद्धेय स्थानांची आवश्यकता किती आहे हें कलासुंदर पद्धतीनें सांगितलें आहे. 'माणसांनाच माणूस नकोसा झाला' अशा एकाकी अवस्थेंत 'दुःखीकष्टी जीवांना धर्माची अफू हवीच आहे' हें सनातनी भासणारें तत्त्व जोशी यांनीं अशा कलाचातुर्यानें मांडलें आहे कीं, नवनीतिवाद्यांनींहि क्षणभर तें मान्यच करावें. वकील झालेला व पंचेचाळीस वर्षें वयाचा एक सधन रसिक माणूस आपल्या 'जीविताची आतषबाजी' करतो–नीतिनियम लाथाडून शेजाऱ्यांच्या सुखाची राखरांगोळी करतो. त्यांचे शाप बाधल्यामुळेंच कीं काय, त्याला दुर्दशा येते, त्याचे मित्र सोडून जातात आणि "एकाद्या झाडावरचीं एकाद्यानं सर्व फुलं टिपून न्यावींत त्याप्रमाणें, त्या एकाच प्लेगनं माझ्या घरांतल्या सर्व चांदण्या आणि नक्षत्रं हिरावून नेलीं' अशी कहाणी तो लेखकाजवळ सांगतो. अशा असहाय्य स्थितींत, 'तोच देवाधर्माविरुद्ध मतप्रचार करणारा माणूस आज जीवन–विश्रांतीकरितां देवळाच्या चौथऱ्यावर येऊन बसला आहे–चौथऱ्याचाच भाग झाला आहे.' एकटेपणाची आग विझविण्यासाठीं त्यानें नसलेल्या बायकामुलासाठीं जेवणाचीं ताटें वाढलीं, हा साधा प्रसंग अत्यंत भावनापूर्ण आहे! तसेंच तो लेखकाच्या घरीं जातो आणि पोटउकाला झाल्यामुळें व तेथें माणुसकी सांपडल्यामुळें 'उदयाचळीं मित्र आला' अशी भूपाळी गातो, हें अतिशय सूचक आहे! साऱ्या बदलत्या आयुष्याचा आढावा कलात्मक रीतीनें घेणाऱ्या या कथेंत विविध घटनांचीं बीजें रुजलेलीं आहेत.

तंत्राच्या उपेक्षेचें फल

सामान्यतः जोशी यांच्या कथेचा प्रारंभ रेंगाळणारा असतो. कधीं बाह्यसृष्टींतील एकादें लांबलचक वर्णन करून, कधीं एकादा अप्रस्तुत संवाद रंगवून, तर कधीं अगदीं मामुली विचार पाल्हाळपणें मांडून ते आपल्या कथांची सुरवात करतात. त्यांतील सैलपणा सहजता उत्पन्न करूं

शकत असला तरी चित्तवेधकपणाला तो बाधक ठरतो. 'लोखंड' ही कथा २१ पानें व्यापते, तर 'वहिनीच्या बांगड्या'साठीं ४२ पानें खर्ची पडलीं आहेत. हा पाल्हाळ लघुकथेला बाधक ठरतो. कांहीं कांहीं कथांचे प्रारंभ तंत्राच्या कसोटीस उतरणारे आहेत. 'नवराबायकोंनीं सांगितलेली गोष्ट' या कथेचा प्रारंभ जिज्ञासा उत्पन्न करणारा आहे. तो असा—

"त्यावेळचें तें दृश्य पाहून माझ्या मनाला आनंदाचा आणि उत्साहाचा इतका कमालीचा आवेग आला कीं, मीं एकदम बेफामपणें हांक मारली—

"विश्वनाथपंत—"

"ओ, या ना!"

साधारण लावून घेतलेला दरवाजा मीं खाडकन् उघडला आणि त्या घरांत शिरलों."

सहज चूळ भरावी आणि तींतून आकृति उमटावी, तशी ही तंत्रशुद्ध व परिणामकारक रचना जोशी यांच्या कथा-सृष्टींत कोठें कोठें आढळते. पण एरवीं तंत्राची उपेक्षाच त्यांनीं केलेली असल्यानें त्यांच्या सर्वच लघुकथा रसिकांना पूर्ण समाधान देऊं शकत नाहींत. दीर्घकाळ 'आ-ऊ' करणाऱ्या गवयानें मध्येंच एकादी मधुर व दाणेदार तान मारावी, त्याप्रमाणें त्यांच्या कथेंत एकादाच गुण उत्कटत्वानें प्रगट होतो. कोणत्याहि इमारतीचा पाया, भिंती, छप्पर हे तिन्ही भाग खंबीर असावयास हवेत, तसेंच लघुकथेच्या कथानकाचा आदि, मध्य व अंत व्यवस्थितपणें संकल्पिलेला व प्रमाणशुद्धतेनें मांडलेला असला पाहिजे. चंदनी लाकडाचा एकच खांब कितीहि बारकाईनें व कसबानें कोरला, तरी तो खांब म्हणजे कांहीं राजवाडा नव्हे. आपल्या शरिराचाहि एकच अवयव पुष्ट केला, तर त्याची काय शोभा? 'वहिनीच्या बांगड्यां'चा उल्लेख अगदीं अखेरीस एकदां येतो; पण तो आधींपासून सूचकपणें यावयास हवा होता. इतर कथांचीहि वस्तु मोलाची आहे, पण तिची सर्वांगीण घडण करण्याचें चातुर्य लेखकानें दाखविलें नाहीं. तें दाखविलें असतें, तर 'य. गो.'चें नांव हरिभाऊ व शरद्बाबू यांच्या प्रथम पंक्तींत झळकलें असतें—झळकेलहि पुढें कदाचित्! आज-देखील त्यांच्या कथा जुन्या-नव्या अभिरुचीच्या वाचकांना आवडतातच.

कारण त्यांत माणुसकीचा जिव्हाळा ओतप्रोत भरलेला असतो. त्याचा विद्युत्स्पर्श होतांच वाचकाचा कंठ गहिंवरतो, डोळे अश्रूंनीं भरून येतात आणि हृदयावरं कायमचा ठसा उमटतो—आणि तो शुभ, मंगल व पवित्र असतो, हें विशेष.



ग. ल. ठोकळ : : : १४

मराठींतील लघुकथेच्या प्रवाहांत ग्रामीण जीवनाचा ओघ मिसळण्याचें श्रेय ज्या चार-पांच लेखकांना आहे, त्यांत श्री. ग. ल. ठोकळ यांचें स्थान वरचें आहे. अस्सल ग्रामीण वातावरणानें जिचा अणुरेणु भरलेला आहे, अशा कथा व एक कादंबरीहि त्यांनीं लिहिलेली आहे. इतर लेखकांच्या कथा-कादंबऱ्यांचीं बहुतेक कथानकें शहरी असतात. आतां जगांतील बहुतेक शहरें एकछापीच असल्यामुळें इंग्लंड-अमेरिकेंतील लघुकथांचे टिप-कागदच वाऱ्यानें उडून महाराष्ट्रांत आले आहेत कीं काय, असा भास होण्यासारख्या ठरीव प्रेम-लीलांच्या व शहरी वातावरणाच्या कथा मराठींत पुष्कळ आहेत. पण येथलींच पात्रें, येथलेच प्रसंग व येथलेच प्रश्न घेऊन मराठी मनानें त्यांचें चित्रण करणारे कथा-लेखक विरळा. त्यांतहि खेड्यांची सय फारच थोड्यांना होते. शब्दाशब्दांतून व प्रसंगाप्रसंगांतून जानपद जीवन प्रगट करणाऱ्या कथा रचणारे लेखक मराठीमध्यें हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत. त्यांपैकीं श्री. ठोकळ यांची कथालेख-नाची कला उच्च दर्जाची आहे. बँडच्या घोषांत शिंगाची सूक्ष्म-तरल ललकारी ऐकूं यावी, तसा अनुभव त्यांच्या कथा वाचतांना येतो.



विद्येचें वातावरण

श्री. गजानन लक्ष्मण ठोकळ यांचा जन्म अहमदनगर येथें ता. २६ मे १९०९ रोजीं झाला. त्यांना विद्येचा वारसा वडील व आई या उभयतांकडून भरपूर मिळाला. वडील हे शिक्षण-खात्यांत इन्स्पेक्टर होते आणि मातुःश्री या शाळेच्या मुख्याध्यापिका होत्या. त्यामुळें त्यांच्या घरांत शैक्षणिक वातावरण सतत खेळत असे. गजाननरावांना वाचनाचा छंद सहजच लागला. १९२६ सालीं ते मॅट्रिक झाले. पण वाचनाच्या अतिरिक्त छंदामुळें त्यांना बी. ए. ची पदवी पदरांत पाडण्यास नऊ वर्षें लागलीं. या काळांत त्यांनीं इंग्रजी कादंबऱ्यांचें वाचन मनसोक्त केलें. हार्डी, वुडहौस, मो पां सा, ओ. हेन्री, टॉलस्टॉय इत्यादींच्या कथा-कादंबऱ्यांचा त्यांनीं फडशा पाडला. लावण्या-पोवाडे-बखरी या मराठींतील जुन्या वाङ्मयाचाहि त्यांनीं अभ्यास केला.

ग्राम-गीतांचे संग्रह

बी. ए. ची परीक्षा १९३५ मध्यें उत्तीर्ण झाल्यावर दोन वर्षांनीं ठोकळ बी. टी. झाले. शिक्षकीचा हा शिक्का घेऊन ते पुणें येथील 'शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल'मध्यें अध्यापनाचें कार्य करूं लागले. तेरा वर्षें शिक्षकीचा व्यवसाय ठोकळांनीं केला. पण त्याबरोबरच त्यांचा लेखन-वाचनाचा छंद वाढत होता. त्यांचें जीवन खेड्यांत गेलेलें असल्यानें जानपद गीतांचा संग्रह काढण्याची कल्पना त्यांचे मनांत बराच काळ खेळत होती. तिला मूर्त स्वरूप आलें, ते कॉलेजमध्यें असतांनाच-१९३३ सालीं. 'सुगी' या नांवाचा विविध कवींच्या ग्रामीण कवितांचा हा संग्रह रसिकांच्या प्रशंसेस पात्र ठरला. त्यानंतर केवळ आपल्याच ग्राम-गीतांचा संग्रह ठोकळांनीं प्रसिद्ध केला. त्याचें नांव 'मीठ-भाकर'. त्याची तिसरी आवृत्ति निघाली व त्यांतील बऱ्याच कविता शाळेच्या पाठ्य पुस्तकांत घेतलेल्या आहेत, यावरून ठोकळांच्या काव्याची लोकप्रियता कळून येते.

काव्य व कथा यांची मिठी

बालपण खेड्यांत गेलेलें, वाचन इंग्रजी कथा-कादंबऱ्यांचें आणि

व्यवसाय पुण्यासारख्या शहरांत. या सर्वांचा ठसा ठोकळांच्या संस्कारक्षम मनावर खोल उमटला. ते प्रकृतीनें जसें कवि, तसेंच विनोदीहि आहेत. १९२६ ते १९३८ या बारा वर्षांत काव्य-रचना करून त्यांनीं एक तप पूर्ण केलें. त्यानंतर त्यांनीं आपला मोहरा लघुकथाकडे वळविला. 'हिंमत मर्दा' ही त्यांची पहिली लघुकथा 'किर्लोस्कर'मध्यें प्रसिद्ध झाली. नंतर किर्लोस्कर, वसंत वगैरे मासिकांत त्यांच्या कथा प्रसिद्ध होऊं लागल्या. त्यांच्या तीस-चाळीस कथांपैकीं कांहीं अस्सल ग्रामीण आहेत, तर कांहीं रहस्य–कथांप्रमाणें अद्‌भुतरम्य वा विनोद-सुंदर आहेत. त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें तर, 'काव्य व कथा यांची गच्च हातमिठी' बहुतेक कथांमध्यें वाचकांच्या दृष्टीस पडते. एकाद्या काव्य–कल्पनेच्या नशेंत दिवसानुदिवस गुंगत पडलेले असतांना ते लघुकथा लिहितात. त्यामुळें पाल्हाळ हा दोष त्यांच्या कांहीं कांहीं कथांत डोकावतो. साधारणपणें दहाबारा पानांच्या आंत त्यांची गोष्ट अशी नाहींच. 'गोफणगुंडा' सत्तावीस पानांची आणि 'मोत्यांचा चारा' तर अठ्ठावीस पानांची आहे.

सविस्तर वर्णनशैली

'गोफणगुंडा' वगैरे गोष्टींची भाषा गोफण-फेकीच्या लयीची आहे. शब्दांची निवड व प्रसंगांचें चित्रण यथायोग्य करण्यांत त्यांची लेखणी कुशल आहे. चमत्कृतिपूर्ण घटनांचें बाह्य वर्णन तेवढें ते सुरेख करतात. मनोविश्लेषण करून स्वभाव-परिपोष साधण्याची आणि त्यामुळें वाचकाच्या भावना हलवून रसोत्कर्ष करण्याची सूक्ष्म व अंतर्मुख कला अद्याप त्यांना वश व्हावयाची आहे. कलेच्या गाभाऱ्यांत त्यांचा अद्याप प्रवेश व्हावयाचा आहे. त्यांनीं लिहिलेल्या 'गांवगुंड' या कादंबरींत अंगावर शहारे आणणारे प्रसंग एकामागून एक रंगविले आहेत. ती कादंबरी बोलपटाच्या रुपेरी पडद्यावर चित्रित झाली आहे. तसाच 'सोन्याची लंका' हा त्यांचा बोलपटहि ग्रामीण जीवन रंगविणाराच आहे. शाळेंतील विद्यार्थ्यांसाठीं त्यांनीं श्री. वि. स. खांडेकर यांच्या सहकार्यानें 'मंगल-वाचनमाला' काढली. पुस्तकांचें प्रकाशन करण्याच्या धंद्यांत ते १९४७

सालीं शिरले आणि आपल्या जीवनांतील छंदाला अनुरूप असें नांव त्यांनीं आपल्या पुस्तकाच्या दुकानास दिलें. तें म्हणजे 'श्री–लेखन–वाचन–भांडार.' अद्याप त्यांना आपल्या शालेय व काव्यात्मक लेखनांतूनच प्रकाशनापेक्षांहि अधिक 'श्री'चा लाभ होतो. त्यांची मनोवृत्ति उमदी व उसळणारी असल्यानें त्यांच्या हातून वैशिष्ट्यपूर्ण कथा-कादंबऱ्या यापुढेंहि पुष्कळच लिहून होतील अशी आशा वाटते.

ग्रामीण गुण–दोषांचें चित्रण

'गोफणगुंडा' ही एकच कथा ठोकळांनीं लिहिली असती, तरी ग्रामीण कथा–लेखकांत त्यांना सहज स्थान मिळालें असतें. आतांहि त्यांनीं सातच ग्रामीण कथा लिहिल्या आहेत. त्या सर्वांत 'गोफणगुंडा' ही नमुनेदार आहे. खेड्यांतील दुफळी, अटीतटीचें वातावरण, पिढ्यानुपिढ्यांचें हाडवैर तरी स्वाभिमानी व उदार स्वभाव, तेथील खेळ व कष्ट, प्रेम व द्वेष, भोळेपणा व क्रूरपणा या सर्वांचा चित्रपट या एका कथेंत ठोकळांनीं ठसठशीतपणें दाखविला आहे.

बाणगंगा नांवाची नदी. तिच्या दोन कांठावरील चरोली व मनोली या खेड्यांतून विस्तव जात नसे. हिंमतराव व भवानराव एकमेकांना पाण्यांत पहात–एकमेकांचें तोंड पाहण्याचें टाळीत. पण योग असा कीं, हिंमतरावाचा मुलगा खासेराव व भवानरावाची मुलगी चांदणी यांचें प्रेम जमलें. त्या प्रेमाचा प्रारंभहि खेडूतांना शोभेसा वीररसात्मकच आहे. खासेराव पानमळ्यांत बसला असतांना त्याच्या डोक्यावर गोफणींतील धोंडा येऊन आदळतो. तो चांदणीच्या हातून न कळत सुटलेला असतो. नायकाला जखम होऊन व रक्त वाहून सुरू झालेल्या या प्रेम–कथेंत गोफणगुंड्यांची व लाठ्याकाठ्यांची लढाई होऊनच नायक–नायिकांची लग्न–गांठ बसते. वधू–पित्यानें पांच हजार रुपयांचा हुंडा कबूल करून शब्द मोडला आणि वरपक्षाला निःशस्त्र करून शस्त्राच्या धारेखालीं लग्न पार पाडलें. यामुळें या कथेंत आणखीच क्षोभक (Stunt) प्रसंग निर्माण झाला. तो म्हणजे चांदणीचें आपल्या विश्वासघातकी

पित्याशीं गोफणीनें युद्ध. शेवटीं भवानराव पस्तावा पावतो, हुंडा देतो व सख्य जोडतो असें दाखविलें आहे. नदीच्या पुरांत चांदणी पडली असतांना खासेराव तिला वाचविण्यासाठीं उडी घेतो, त्याच वेळीं त्या पुरांतच त्या दोघांना जल–समाधि मिळाल्याचें दाखविलें असतें, तर तें आधुनिक तंत्राला जमणारें, वास्तव स्वरूपाचें व परिणामकारक झालें असतें.

गांवरान भाषाशैली

उन्हाळ्यामध्यें खेड्यांत कशी स्थिति असतें याचें वर्णन ग्रामीण शब्दांनीं ठोकळ पुढीलप्रमाणें करतात, "उन्हाळा कडकूं लागला. गव्हाचा हंगाम संपला. घरोघर पोत्यांच्या ठिक्या लागल्या. कणग्यांत टाकोटाक गहूं भरून शेतकऱ्यांनीं त्यांचीं तोंडें लिंपून टाकलीं. शेताशेतांतून निचीतीनें नांगरणी सुरू झाली. जमीन दांत वासून ऊन खाऊं लागली. चरोली व मनोली या दोन गांवांमधून वाहणाऱ्या बाणगंगेचें पाणी ढोपरांना लागूं लागलें.' ढोपराइंतकेंच पाणी असलेल्या बाणगंगा नदीच्या कांठचा देखावा ठोकळांनीं वाचकांच्या डोळ्यापुढें कसा उभा केला आहे. पहा. " बाणगंगेचें पाणी खडकाळींतून झुळझुळ वाहत होतें. पाणकणसांच्या अडोशाला तीनचार बगळे माशांवर डोळा ठेवून स्तब्ध होते. इतक्यांत ' ड्रब ' असा आवाज झाला आणि ते बगळे एकदम उडाले. पाण्यावर वर्तुळाकार लाटा उठल्या. खासेराव बाणांप्रमाणें उडणाऱ्या त्या बगळ्यांकडे पाहूं लागला. "

शेतकीजीवनांतील निरनिराळ्या अवस्था अस्सल ग्रामीण शब्दांनीं व समर्पक दाखल्यांनीं रंगविण्यांत ठोकळ तरबेज आहेत. पावसाळ्याचे परिणाम त्यांनीं पुढीलप्रमाणें वर्णिले आहेत, " मृगाचे शिपकारे सुरू झाले. शेतकऱ्यांनीं पेरणीला सुरवात केली. दोनचार पाऊस खाल्ल्यावर जमिनीनें कात टाकली. चोहीकडे हिरवेंगार दिसूं लागलें. बाणगंगेनें बाळसें धरलें. तिचा फिकटपणा जाऊन ती लालसर दिसूं लागली. पावसामुळें खासेरावाच्या फिरण्यांत खंड पडूं लागला. बऱ्याच दिवसांनीं उघाड पडली. आकाश ठिगळें लावलेल्या निळ्या गोधडीप्रमाणें दिसत होतें. "

एकाद्या खेडयांत सकाळीं तुम्ही गेला, तर घरोघर कोणतें दृश्य दिसतें, याचें चित्र 'गिरणबाबू' मध्यें ठोकळ ग्रामीण रंगांनीं रंगवितात, तें असें—" भिमाजीची बायको रखमाई भल्या पहाटें उठून कुरुंदाच्या जंगी जात्यावर बसे व दोन पायल्या दाण्यांचे धाणे दळून त्याचें भुसकट करी. तिची थोरली सून सईबाई चुलखंडाच्या जाभाडांत डोंगरावरून तोडून आणलेले खैराचे खांडके खुपसून जाळ करी व पुढ्यांतल्या काठचटींत भाकरी ठोकायला बसे. दिवस हातभर चढण्याच्या अवसरीं हातभर उंचीच्या भाकरीच्या दोन चवडी तयार होत! धाकटी सून गहूबाई गोठ्यांतला शेणामुताचा खातेरा आवरून बैलांना व गाईम्हशींना चारापाणी देई व धार काढायला बसे. बैलावरच्या भल्याथोरल्या पातेल्यांत चार चरव्या रिचवल्यावर ती हुश्श करी. असा होता भिमाजीच्या घरचा बारदाना!"

नागपंचमीचा सण खेडयांत मोठ्या उत्साहाचा. त्याचें वर्णन दोनचार वाक्यांत लेखकानें कसें केलें आहे, पहा—" नागपंचमी आली. लोकांनीं फांद्याफांद्यावर झोके बांधले. गारुडयांच्या पुंग्या वाजूं लागल्या. झोक्यांबरोबर नागांच्या फडा झुलूं लागल्या. बायकांनीं धरलेले फेर पहाण्यासाठीं ढगांच्या खिडकींतून सूर्याचे किरण बाहेर डोकावूं लागले."

"दौलतजादा" या गोष्टींतहि खेड्यांतील विविध ऋतूंची दौलत एकएका वाक्यांत लेखकानें वर्णिली आहे. तें वर्णन अस्सल ग्रामीण शब्दांत केलें आहे. तें असे. "'त्या वेळीं कोपरगांवच्या पंचक्रोशींत धुव्वाधार पाऊस पडे. सारीं शेतं ज्वारीबाजरीच्या धाटांनीं फुलून जात. सरत्या पाणकळ्यांत गहूं-हरभऱ्यांचा पेरा होई. थंडीची हुडहुडी सुरू झाली कीं, दहिखदाण्यांची पखरण पडे आणि ओंब्याओंब्यांतून व धाट्याधाट्यांतून दाणे मस्त पोसत. शेतकरी भारी आनंदांत असत."

रेखीव शब्द-चित्रें

वार्षिक जत्रेच्या वेळीं गोफण-फेकीचे खेळ त्या खेड्यामध्यें होत. त्याचेळचें दृश्य लेखकानें कौशल्यानें चितारलें आहे. तें असें,—" दोन्ही

गांवांतले शंभर शंभर जवान पुढें सरकले व दगडांच्या ढिगारांच्या अवधानानें जागा व दबा धरून उभे राहिले. वाळूंत पाय भाजूं नयेत म्हणून त्यांनीं पायतणें घातलीं होतीं; डोक्यांना चारी बाजूंनीं मुंडाशीं गच्च आवळून बांधलीं होतीं. धोतराचे काचे गुडघ्यापावेतों कसलेले होते; आणि पैरणी धोतराच्या आंत खोचलेल्या होत्या. सुंभांच्या दणकट गोफणी त्यांच्या हातांत सापाप्रमाणें लोंबत होत्या. मुखानें कर्ण्याला तोंड लावलें. कर्ण्याचा आवाज होतांच लढाईला तोंड लागलें. गोफणी हवेंत भिरभिरूं लागल्या. दगड सूं सूं करीत सुटूं लागले."

गोफणींचे ते सामने पाहण्यासाठीं हिंमतराव आले होते. त्यांचें शब्दचित्र ठोकळांनीं सुरपष्ट काढलें आहे. तें असें, " हिंमतरावांनीं चुण्याचुण्यांचा मांडचोळणा चढवला होता—व पायांत पंजाबी चढाव घातले होते. अंगांतल्या पांढऱ्याशुभ्र लांब अंगरख्याच्या आंतून त्यांनीं हिरव्या रंगाचें किनखापाचें जाकीट घातलें होतें. त्यांच्या डोक्यावर पिळाची पगडी शोभत होती. त्यांच्या भरदार चेहेऱ्यावर गालमिशा व कल्ले एकमेकांत मिसळले होते. ते घोड्यावरून उतरले व काखेंत शाल व तरवार धरून आपल्या जागेवर जाऊन बसलें."

सामने सुरू झाले. खासेरावानें गोफण फिरविण्यास आरंभ केला. त्याचें चित्रण ठोकळांनीं बोलक्या शब्दांनीं तपशीलवार केलें आहे. तें असें, " त्याची गोफण इतक्या जोरानें फिरूं लागली कीं, जणूं काय दोरखंडाची छत्रीच त्यानें आपल्या डोक्यावर धरली होती. नेम धरून त्यानें गोफणीचा पदर सोडला. दगड वाऱ्याला कापीत बाणगंगेच्या पात्रावरून उडाला आणि नेमका भवानरावांच्या पुढ्यांतल्या हुक्क्यावर जाऊन आदळला. हुक्क्यांतले निखारे भवानरावांच्या अंगावर सांडले. म्हातारा ताडदिशीं उभा राहिला आणि खासेरावाकडे पाहून हातवारे करूं लागला. हिंमतराव आनंदानें बेहोष होऊन ओरडले, " शाबास रे मेरे पठ्ठे ! " खासेरावानें दुसरा दगड गोफणींत भरला. दगड गुंईगुंई करीत जो निघाला तो भवानरावांच्या पगडीला लागला."

अलंकारहि शेतकीचेच

' गाभुळी चिंच ' या कथेंतहि गोफण–फेकीचें वर्णन आलें आहे. तें असें, " एका शेतांत आमच्या गड्याची मुलगी भीमा गोफण फिरवून पांखरांना हाकारा घालीत होती. मी तिच्याजवळ जाऊन तिच्या हातांतली गोफण घेतली व दोनचार गोफणीच्या केकी केल्या. सूं सूं करीत माझ्या गोफणींतून पळणारे धोंडे आणि ' हर्र हर्र हू हू ' असा मी उंच आवाजांत केलेला पुकारा यानें शेतावर आलेलीं सर्व पांखरें हां हां म्हणतां उडून गेलीं. "

सूर्योदयाचें वर्णन कैक ललित लेखकांनीं केलें आहे, पण ' तुफानी तांडेल'मध्यें ठोकळ तेंच वर्णन कसें करतात, पहा. " समुद्राच्या कुशींतून सूर्याचें तांबडें वर्तुळ वर सरकूं लागलें. पाणविस्तवाच्या नवकोट ठिणग्या एकदम फुलून, उफाळून वर उठाव्यात त्याप्रमाणें समुद्राचें पाणी लालीलाल झालें. क्षितिजाशीं भिडलेल्या मचव्यांचीं शिडें लालटून जाळाच्या शेंड्याप्रमाणें दिसूं लागलीं. "

कथेच्या प्रवाहांत जातां जातां ज्या उपमा व दृष्टांत ठोकळ देतात, तेहि ग्रामीण भूमींतीलच असतात. त्यांचे कांहीं नमुने—"धारोष्ण दुधाचा प्याला फेस फुंकून फुंकून सावकाश प्यावा, त्याप्रमाणें लखूजी तिला हळुवारपणें वागवीत होता. " " सुगीच्या दिवसांत भरलेल्या कणसांवर चिवचिव करीत झेपावणारीं पांखरें खळ्याचें काम संपवून जमीन उघडी पडल्यावर तिकडे फिरकतील कशाला ? " " उमद्या मनाच्या गाभाऱ्यांतून बाहेर पडलेल्या त्या मोकळ्यासाकळ्या हास्यांची खुदखुद हवेंत उंच चढून आकाशाच्या सालीला जाऊन भिडली. "

' गाभुळी चिंच ' मधील नानानें चार वर्षें आपलें प्रेम आटोक्यांत ठेवलें. पण खेड्याचें मोकळें वारें लागतांच तें अनावर झालें. त्याची मनःस्थिति खेडूत उपमेनेंच निवेदिली आहे. " बाजरीचें शेत पिकून त्याला गच्च फुलवरा यावा, तसें माझें मन तिच्या विचारांनीं भरून गेलें होतें. पण तिचें मन ? खोल पाणी असलेल्या चिंचोळ्या विहिरीचा तळ जसा कधींच दिसत नाहीं, तसें होतें तिचें मन. एखादा सूर्यकिरणाचा

कवडसा येऊन तो तळ दिसावा, यासाठीं माझी केवढी धडपड !" मात्र शेवटीं नायक-नायिकांच्या प्रेमाचा जो आविष्कार दाखविला आहे, त्यांत कला अशी फारशी नाहीं. शहरी नखरा किंवा लज्जा न दाखविली, तें योग्यच आहे; पण अगदीं रानटी माणसाचे जे चाळे दाखविले आहेत, ते रंगेल प्रेमाचेहि सुंदर नमुने म्हणतां येणार नाहींत. रहस्यमय चित्रपटांतल्याप्रमाणें धावपळ व चावाचावी यांत कला काय आहे ? व त्यांच्या स्वभावाची उकल तरी काय आहे ? केवळ बाह्य कृति दाखवूनच ललित लेखकाचें कार्य संपत नाहीं.

शेतकरी-जीवनाच्या दोन बाजू

खेड्यांतील प्रेमाचे प्रवाहहि शहरांतल्या इतकेंच वाकडेतिकडे असतात— आडमुठेपणामुळें ते गढूळहि दिसतात. हरबा हा वारकरी. तो पंढरीच्या वारीला गेला. ही संधि साधून त्याची बायको एकानें पळवून नेली. त्याला बडवून हरबानें आपली बायको परत आपल्या घरीं आणली. एवढेंच कथानक ' म्होतूर ' या कथेचें आहे. खेड्यांत अशीं लफडीं नेहमींचीं असतात. या कथानकाचा विस्तार व रंगभरणी ठोकळांनीं सूक्ष्मतेनें केली आहे. 'प्रारंभींचें लग्नाचें वर्णन घेतलें तरी तें आटोपशीर असून डोळ्यापुढें दृश्य उभें करणारें आहे. ग्रामीण भाषा व सर्वांगीण वर्णन हे त्यांचे दोन्ही ठळक गुण या वर्णनांत उठून दिसतात. तें वर्णन असें—" गांवोगांवचे लोक लग्नाला लोटले. बैलगाड्यांची रीघ लागली. धूमधडाक्यानें लगीन लागलें. खंडीखंडी गव्हाचा भरडा शिजून निघाला. लापशीचें डोंगराएवढे ढीग पडले. पंगतीवर पंगती उठल्या. वाढून वाढून गांवकऱ्यांच्या कमरा खिळखिळ्या झाल्या. पडगांवला हें लगीन चांगलेच गाजलें. झालझेंडा झाल्यावर आडगांवचें लग्नाचें वऱ्हाड परत फिरलें. नवरीच्या पाठराखणीला तीन करवल्या निघाल्या. घुंगुरमाळांच्या तालावर बैल मोठ्या हिरीरीनें धावत सुटले. "

लग्नानंतर हरबा पंढरीच्या वारीस निघाला. वारकऱ्याचें शब्दचित्र ठोकळांनीं किती थोडक्यांत पण किती ठसठशीत काढलें आहे पहा.

" डाव्या खांद्यावर पडशी, गळ्यांत टाळ अडकविलेले, उजव्या खांद्यावर भगवें निशाण व डाव्या हातांत चिपळ्या अशा थाटांत हरबा दाराबाहेर पडला. त्यानें हरणीकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं. "

पालखी हलली. वारकऱ्यांचा तांडा भजन करीत तिच्यामागून निघाला. कांहीं दायका डोक्यावर तुळशीचीं रोपें घेऊन निघाल्या होत्या. गांवकरी पालखीला पोंचवायला वेशीपर्यंत गेले.

मानवी कर्तृत्वाला प्रेरणा

वारीहून परतल्यावर हरबाला आपल्या संसारावरची संक्रांत कळली. तो वारकरी असला तरी स्वाभिमानी होता, कणखर होता. नुसता " टाळकुट्या " नव्हता. तो तालीमबाज बनला. त्यापूर्वी " ताठरलेल्या डोळ्यांनीं हरबा सकाळीं उठला, तेव्हां त्याच्या चेहऱ्यावर निश्चयाची झाक होती. तुकारामाचा गाथा आणि ज्ञानेश्वरी या ग्रंथांना रुमाल गुंडाळून त्यानें ते माळ्यावर ठेवून दिले; टाळ आणि चिपळ्या त्यानें अडगळीच्या खोलींत फेकून दिल्या; जोत्याच्या दगडावर त्यानें आपली एकतारी दात खाऊन आपटली—तिचे तुकडे तुकडे झाले ! गळ्यांतल्या तुळशीच्या माळेला त्यानें जोराचा हिसाडा दिला. माळेंतले दाणें घरंगळत घरगंळत चौकांत जाऊन पडले." ईश्वरावरील श्रद्धा बाजूस पडली व मानवी कर्तृत्व जागें झालें. अन्यायाच्या प्रतिकारासाठीं झगडण्यास हरबा तयार झाला. म्हणून त्यानें व्यायाम करून शरीर सुदृढ बनविण्यास आरंभ केला असें कथा–लेखकानें सांगितलें आहे, पण सूड इतका संयमी असतो का ? शरीर–सामर्थ्याशिवायहि सूड उगविल्याचीं उदाहरणें थोडीं नाहींत. पण ठोकळांचा हरबा सनदशीरपणें व उघडपणें सूड घेतो. त्यानें प्रथम काय केलें ? तर " हरबाच्या वाड्यांतले भजनाचे सूर विरून गेले. त्याजागीं मेहनतीच्या डरकाळ्या घुमूं लागल्या. निवृत्तीनें माघार घेतली. प्रवृति पुढें सरकली. देवभक्तीचीं राख उडून गेली. जातिवंत मराठशाहीचा निखारा धगधग करूं लागला. अवघ्या तीन महिन्यांत हरबाची कळा पालटली. त्याच्या तोंडावरल पिवळेपणा जाऊन तो लालबुंद दिसूं लागला. त्याची

छाती पेलदार झाली, दंडावरल्या बेटकुळ्या फुगल्या आणि त्याच्या मांड्याचे पट फिरले. बोलतांना त्याचा आवाज एडक्याच्या हुंकाराप्रमाणें येऊं लागला.'' तालीम बाजाचें हें शब्दचित्र किती हुबेहूब आहे !

कुस्त्यांचें शब्द-चित्र

हरबानें आपल्या सामर्थ्याची कसोटी कुस्त्यांच्या फडांत लावली आणि साऱ्या गांवकऱ्यांना चकित केलें. खेड्यांतील कुस्त्यांचा देखावा कसा असतो ? तर '' पहिलवानाच्या कुस्त्या सुरू झाल्या. सलामी झाली रे झाली कीं, त्यांचीं तुळतुळीत शरिरें एकमेकांना भिडत व डावपेचांना सुरवात होई. दंडावर दंड, मांडीला मांडी किंवा छातीला छाती घासतांना शेराचे फोक एकमेकांवर घासल्यासारखा आवाज होई. चितपट करणाऱ्या पहिलवानाला त्याच्या कुवतीप्रमाणें मुंडासें अगर चांदीचें कडें मिळें. ढोलकी जोरजोरानें वांजत होती. लोकांचा जमाव अधाशीपणानें कुस्त्या पहात होता. एखाद्या पहिलवानाची पाठ जमिनीला लागली कीं, ते कसून टाळ्या पिटीत व एकच गलका होई. ''

अशा कुस्त्यांच्या हगामांत झिंग्या हा अजिंक्य ठरला होता. त्याच्याशींच दोन हात करण्याची हिंमत हरबानें दाखविली. त्या दोघांच्या लढतीचें वर्णन ठोकळांनीं वीरश्रीच्या भाषेंनें केलें आहे. '' एक काळाझार व दुसरा पिवळाधमक असे दोन नागच जणूं काय फुसफुस करीत एकमेकांशीं भिडले होते.....झिंग्याची पोलादी छाती लोहाराच्या भात्याप्रमाणें खालींवर होऊं लागली. हरबालाहि चांगलाच दम लागला होता. दोघांचीं शरीरें घामानें न्हावून निघालीं. ओल्या अंगाला ठिकाठिकाणीं माती चिकटल्यामुळें हरबा बिबव्या वाघासारखा दिसत होता. ''

कोल्हाट्यांचें शील

खेड्यांतील अडाणी, भोळ्या, भित्र्या व कंगाल जनतेवर ' खानदानी ' श्रीमंत व सत्ताधारी लोक किती प्रकारांनीं अन्याय व जुलूम करतात याची कल्पना शहरांत वाढलेल्या सुशिक्षितांना कदापि येणार नाहीं. ती कल्पना आणून देण्याचें श्रेय ठोकळांसारख्या कलावंतांना आहे. खेडूत

जनतेचे अज्ञान–दारिद्र्यादि दोष जितके मोठे; तितकेंच इमान–अब्रू इत्यादि गुणहि उंच. गांवोगांव खेळ करीत भटकणारे उघडेवाघडे कोल्हाटी; पण तेहि आपल्या शीलाला किती जपतात हें ' कडू साखर ' या कथेंत ठोकळांनीं दाखविलें आहे. साखरी ही कोल्हाट्याची मुलगी. ती रस्त्यावर कसरतीचे खेळ करून दाखवी. तिच्या सौंदर्यावर बाळासाहेब इनामदार भाळले. त्यांनीं साखरीबरोबरच्या लिंबाजी वगैरे साथीदारांना आपल्या वाड्यांत रात्रीं जेवावयास बोलावलें आणि खूप दारू पाजली. ते स्वतः कोल्हाट्यांच्या वस्तींत गेले व साखरीवर हात टाकूं लागले. याचा सूड म्हणून दुसरे दिवशींच्या खेळांत, बाळासाहेबांना गोड बोलण्यानें झुलवून, साखरीनें पेटाऱ्यांत बसविलें आणि आडवेतिडवे सुरे मारून त्यांना ठार केलें. असें हें रोमांचकारक कथानक आहे. कोल्हाट्यांच्या वस्तीचें वर्णन ठोकळ पुढीलप्रमाणें करतात, " गांवाबाहेरच्या मैदानांत कोल्हाटी लोक मेखा ठोकून, त्यांना दोर बांधून, पालें उभीं करीत होते. त्याच मेखांना शेळ्या, बोकड आणि एडके बांधले होते. पलीकडच्या बाजूला बैलगाड्या सोडल्या होत्या. आजूबाजूच्या झाडांना घोडे बांधले होते. बैलांच्या आणि घोड्यांच्या पुढ्यांत वैरण टाकली होती. कुत्रीं इकडे तिकडे भटकत आणि भुंकत होतीं. कोंबड्या फडफड करीत दाणे टिपीत होत्या. "

ठसठशीत स्वभाव-चित्रें

कोल्हाट्यांचे खेळ पहाण्यास खेड्डूत किती उत्सुक असतात, हें सांगतांना ठोकळ म्हणतात, " इतक्यांत ' साखरी, साखरी ' असा कल्लोळ सुरू झाला. चार हजार माना करंदिशीं वळल्या. लिंबाजीच्या खांद्यावर उभी राहून साखरी येत होती. तें दृश्य मोठें पाहण्यासारखें होतें. तंग कसलेल्या लंगोटांत लिंबाजीचा उंचापुरा पिवळाधम्मक देह त्याच्या नांवाप्रमाणेंच चमकत होता. त्याच्या उमद्या चेहऱ्यावर हसूं खेळत होतें. आपली आवडती मैना उडून खांद्यावर येऊन बसावी ना, तितकीच त्याला साखरीच्या ओझ्याची दखल होती. लांबलांब ढांगा टाकीत तो खेळाच्या जागेकडे येत होता. " लिंबाजीची सामर्थ्यवान मूर्ति लेखकानें

वाचकापुढें कशी सहज उभी केली आहे. तिच्याप्रमाणेच साखरीची मूर्तिहि त्यानें कौशल्यानें रंगविली आहे. तिचें सौंदर्य कसें तीक्ष्ण होतें, हें तिच्या नुसत्या डोळ्यांच्या वर्णनावरून ठोकळांनीं सांगितलें आहे. ते लिहितात.

" ते तिचे काळेटपोरे डोळे—पिवळी जर्द तल्लख नागीणसुद्धां नजर टाकतांच थबकेल असें पाणी होतें त्या डोळ्यांत. बहिरी ससाण्यानें झेप टाकावी तशी तिच्या डोळ्यांतलीं बुबुळें इकडे तिकडे फिरून जमलेल्या लोकांच्या अंतरांचा ठाव घेत होतीं. त्यांत मार्दव होतें का ? छे, मुळींच नाहीं ! सौंदर्य ? नव्हतें असें कसें म्हणतां येईल ? पण तिच्या नांवाची गोडी तिच्या डोळ्यांत खास नव्हती. चार क्षण तिच्या डोळ्यांकडे टक लावली, तर आपल्या डोळ्यांत मिरची गेली असें वाटत असें लोकांना. "

कौल्हाटी वाड्यांत जेवावयास बसले असतांना ' मागल्या बाजूनें एक व्यक्ति अंधारांतून बाहेर पडली ' असा मोघम उल्लेख करून ठोकळांनीं कथेंत रहस्यपूर्णता आणली आहे. मात्र साखरी सूड घेण्यासाठीं एक दिवस थांबते व दुसरे दिवशीं प्रेमाचें नाटक करते आणि त्याला बळी पडून बाळासाहेबासारखा मातबर माणूस 'मंत्रानें भारल्याप्रमाणें' पेट्यांत बसून स्वतःला खेळणें करतो, हे सारे प्रकार अस्वाभाविकच वाटतात. सूड किंवा प्रेम यांना कांहींहि शक्य असते, अशीच लेखकाची कैफियत असल्यास कोण जाणे !

विनोदाचा स्थूलपणा

ग्रामीण भाषा व सर्वांगीण वर्णन या दोन ठसठशीत गुणांमुळें ठोकळांच्या जानपदकथा विशिष्ट महत्त्व पावल्या आहेत. पण त्याशिवाय त्यांनीं शहरी प्रेमाच्या व विनोदी वृत्तीच्या म्हणून ज्या कथा लिहिल्या, त्यांत त्यांचें तें विशिष्ट महत्त्व तर दिसत नाहींच, पण दुसरेंहि कांहीं वैशिष्ट्य आढळत नाहीं. ' जो तो आपल्या आखाड्यांत भारी ' हा पैलवानांचा ठोकताळा ठोकळांनीं ध्यानीं ठेवला पाहिजे. प्रणयी अंतःकर-

णाच्या नाजूक तारा छेडण्याचें कसब त्यांच्या कलमांत नाहीं, किंबहुना कोणत्याच अंतःकरणाला त्यांचें कलम स्पर्श करूं शकत नाहीं. तें वरवरच फिरतें. विनोदी कथांत तर सायकलीचे धक्के लागणें, धावपळ करणें वगैरे शारीरिक कसरतींचेच प्रयोग फार आहेत. बुद्धीचा विनोद करण्याची सूक्ष्मता त्यांच्या लेखणींत आलेली नाहीं. बाह्य क्रियांचा स्थूल विनोद निर्माण करतांना शक्याशक्यतेच्या व सभ्यतेच्या मर्यादाहि ते नेहमींच संभाळूं शकत नाहींत. 'संसारांतील मीठ' या कथेंत त्यांनीं स्त्रीला पतीकडून मिळणारा मार सुखाचा वाटतो असें दाखविलें आहे, आणि त्यांत कलाहि फारशी नाहींच. य. गो. जोशी यांची 'पांजरपोळांतली गाय' किंवा सौ. मुक्ताबाई दीक्षित यांची 'शिकारी' या कथांत त्यांच्यासारखाच विचार किती सूक्ष्मतेनें व सूचकतेनें मांडला आहे हें पहावें.

शब्द-लीलांचा मोह

विनोद निर्माण करण्यासाठीं शारीरिक कवायतीबरोबरच शाब्दिक कसरतीहि करण्याचा मोह ठोकळांच्या पात्रांना होतो, ही त्यांच्या लेखनाची प्राथमिक अवस्था होय. 'बा'ची (म्हणजे बायकोची व B. A. बी. ए. ची), धक्कबाला आगबोट लागली, जोडा जमणें-जोडा मारणें, इत्यादि श्लेष ओढूनताणून आणलेले दिसतात. विनोदासाठीं त्यांनीं 'ठेच' या कथेंतील नायकाचें वर्णन बीजगणिताच्या भाषेंत केलें आहे. तें पुढीलप्रमाणें,

" शिदू या नांवाचें समीकरण :—

श्रीधर = श्री + धर

श्री = श + री

श्रीधर = (र + र) = शीध

शीध = इ + ऊ = शिधू

बोलतांना धूचा दू करतात.

∴ (एतदर्थ) शिदू

शिदू या व्यक्तीचें समीकरण :—

सर्व साधारण चेहरा + दाढी व मिशा (बोडल्यामुळें) + डोक्यावर केस (ठेवल्यामुळें) + चार पांच फुटकुळ्या + थोडासा गंभीरपणा (बावळटपणाच्या सदरांत मोडणारा) = शिदूचा चेहरा.

पपलिनचा सदरा (मळका) + रिपकॉर्डाचा कोट (बिनइस्तरीचा) + फिनले मिलचें पातळ धोतर (तांबूस रंग चढलेलें) + बनातीची टोपी + चपला (कोल्हापुरी) = शिदूचा पोषाख, शिदूचा चेहरा + शिदूचा पोषाख = शिदू ही व्यक्ती."

हा विनोद कोणत्या प्रतीचा आहे, हें सांगावयास हवें आहे काय ?

अस्वाभाविकतेचा दोष

स्वाभाविकपणाला तर ठोकळांनीं आपल्या विनोदी कथांत हद्दपारच केलेलें दिसतें. ' पहिलें चुंबन ' या गोष्टींतील नानासाहेब व भाऊसाहेब या वृद्धांच्या कॉफीत नायक भांग घालतो व त्यामुळें त्या तिघांचें पेटी-वादन, काव्य--गायन व नृत्य सुरू होतें असें दाखविलें आहे ! भांगेच्या तारेंतीलच साऱ्यांचें बोलणें ! मग त्यांचे गुणावगुण कोण पहाणार ? 'फिटं-फाट ', ' हिंमत मर्दा ', ' पाऊस व प्रेम ' इत्यादि कथांत प्रत्यक्ष भांग नसली, तरी पात्रांचें वर्तन भांग प्याल्यासारखेंच वाटतें. प्रेमपत्रें व प्रेमभेटी गुपचूप पळविणारा गोपाळ जितका काल्पित सृष्टींतील, तितकेंच तालमीवर खूष होणारे दादासाहेबहि ! बिचाऱ्या बहिरू गवळ्याच्या भावनेकडे लक्ष देण्यास कथा-लेखकाला सवड कोठें आहे ? रेशन ऑफिसांत कारकुनी करणारे सुधीर व सुधा यांचें प्रेम व लग्न ' चिमणा-चिमणीं 'त दाखविलें आहे. त्यांतहि लेखक त्या त्या पात्राशीं समरस होतांना दिसत नाहीं. दूर उभें राहून, दुर्बिणींतून दुसऱ्याच्या प्रेमलीला पाहणें व त्या मिस्किलपणें खुलवून सांगणें हीच भूमिका त्यानें घेतलेली दिसते.

रचना-सौंदर्याचा नमुना

प्रामीण कथा लिहिण्यांत ठोकळ यांचें दिघे यांच्याशीं जसें साम्य आहे, तसेंच अद्‌भुतरसात्मक कथा लिहिण्यांतहि आहे. ' मोत्यांचा चारा ' या संग्रहांतील बहुतेक कथा अशा गूढ-रम्यच आहेत. पण त्यांत प्रमाणबद्ध रचनेच्या दृष्टीनें प्रशंसनीय अशी लघुकथा म्हणजे ' मोत्यांचा चारा ' हीच. शिंदुर्णी या खेडयाजवळील एका ओढ्याच्या गुल्बशीच्या डोहांत सहा पुरुष पाणी होतें. त्यांत दर बारा वर्षांनीं मोती तयार होत. ते मोती कसे ? तर " संध्याराणीनें आपल्या शलाकांनीं या मोत्यांना कुरवाळलें असेल कां ? कीं डोहाच्या सभोंवार दाटलेल्या कण्हेरी व गुल्बशी या रानझुडपांच्या फुलांचा गर्द तांबडा रंग पाण्याच्या जाड थरांतून ओघळून खालीं जातांना फिकट होऊन गुलाबी झाला ? गवताच्या हिरव्यागार, नाजूक पात्यावर तरळणारे दंवाचे थेंब, अरुणाची प्रभा पोटांत घेतांना, अकल्पितपणें गोठून खालीं पाण्यांत तर नाहीं ना सांडले ? " एकजात गोल, गुलाबी व गोळीबंद मोती !

अशा मोत्याच्या खाणीपाशीं नायक एकदां बसला असतांना त्याला तेथें विलक्षण सौंदर्य अकस्मात् पहावयास मिळालें. " भुरभुरती श्रावण-सर नुकतीच येऊन गेली होती. ढगाच्या चाळणींतून गळणारे सूर्याचे ओलावलेले कवडसे डोहाच्या पाण्यावर पडून उलटत होते. गवतार्ची हिरवीगार बेटें, झाडझडोऱ्यांच्या हिरव्याजर्द फांद्या, कण्हेरीचे तांबडेलाल गेंद आणि गुल्बशीचे नाजुक, लाल झुबके हे एकांत एक मिसळून अशी रंगीबेरंगी, सुंदर शोभा निर्माण झाली होती कीं, कुणाला वाटावें, भरीस भर म्हणून, पाचूच्या खाणींत माणकांची खाण फुटली आहे ! मी मात्र माझ्या मोत्यांच्या खाणींत पूर्णपणें रममाण झालों होतों. अशा वेळीं एक तरुण मुलगी मुकाट्यानें माझ्या शेजारी येऊन उभी राहिली. मी तिच्या-कडे पाहिलें आणि माझ्या हिशेबीं या तिन्ही खाणींचा भाव खाडदिशीं उतरला. " या लहानशा उताऱ्यांतहि ठोकळांनीं पर्जन्यवृष्टीचें, वनस्पति-सृष्टीचें आणि मानवी सौंदर्याचें वर्णन किती बहारीनें केलें आहे ! केशव

व बाबी यांच्या प्रेमाची ही शोककथा मांडली आहे, तीहि वाचकाची जिज्ञासा सतत वाढत राहील अशा रचना–कौशल्यानें.

कारुण्याचा स्पर्श

' सुगंध ' या कथेंत कारुण्याचे थोडेसे स्वाभाविक सूर ऐकूं येतात. या एका कथेंत चौघांचे मृत्यु कोंबले आहेत. प्रेमभंग झालेल्या हृदयाची कथा हृदयस्पर्शी आहे. कथेचा विनोदी प्रारंभ, पार्श्वभूमीसारखा उपयोगीं पडतो. लेखकानें चांदण्या रात्रींचे छोटेसें पण सुरम्य वर्णन केलें आहे. तें असें, " आकाशाच्या निळ्याभुऱ्या अंगणांत जाई–जुई–मोगऱ्याचीं इवलीं इवलीं पांढरीं पांढरीं फुलें विखुरलीं होतीं. पश्चिमेनें आपल्या कपाळीं चंदनाचा ढळढळीत टिळा लावला होता. "

चांदण्या रात्रीं गप्पा मारणाऱ्या मित्रमंडळींत फौजदाराचा भावशून्य व अधाशी स्वभाव पुढीलप्रमाणें दाखविला आहे. " मुरकुटे फौजदारांनीं अत्तरदाणींत बच्चदिर्शी बोट घातलें व तिच्यांतला अर्धा फाया काढून तो आपल्या कानाच्या बेचक्यांत खुपसला. बोटाचा वास घेत ते म्हणाले, " अहो वखारवाले, या हीन्याला ' नाहीं ' म्हणूं नका अं ! " आपण फार विनोद केला या कल्पनेनें मुरकुटे जोरांत हसले."

शहरी जीवनावर टीका

खेडें व मुंबई–दोन टोकें ! तीं जोडणारी कथा म्हणजे ' वाघाचा डोळा ! ' खेड्यांतील दुकानदार लालचंद काटकसरीनें, कंजूषपणानें रहातो; पण त्याचा मुंबईतील भाऊ मोटारी उडवितो. त्या मोटारीच्या धुळींतील सुवर्णकणानें लालचंदच्या नोकरांचे डोळे दिपतात व ते मुंबईस जातात. पण तेथें माणुसकीला वाव कोठला ? व्यसनाचा नाच मात्र चाल ! ही शहरी जीवनाची काळी बाजू लेखकानें चांगली रंगविली आहे. आपला मुंबईकर श्रीमंत भाऊ आज आपल्या खेड्यांतील दुकानांत पायधूळ झाडणार, या आनंदानें लालचंदचा दिनक्रम सुरू झाला, तो असा, " लवकर आंघोळ आटोपून लालचंद आंतल्या घरांतून बाहेरच्या

दुकानांत आले. फुलछाप साबू लावून धुतलेला मलमलचा खमीस त्यांच्या अंगांत होता. धोतरावरून चढवलेली चांदीची जाड साखळी खमिसाच्या आंतून चमकत होती. मुसार मालाच्या व्यापाराची काळजी करून त्यांचें शरीर कृश झालें होतें. सोन्याच्या जाडजूड बाळ्यांनीं त्यांच्या कानाचीं पाळीं लोंबूं लागलीं होतीं. केशरी पागोट्याखालीं आठ्यांनीं दुमडलेल्या अरुंद कपाळपट्टीवर त्यांनीं केशराचें गंध लावलें होतें. डोळे किलकिले करून त्यांनीं दुकानाची साफसूफ पाहिली व ते खूष झाले."

त्या दुकानाचें वर्णन बारीकसारीक तपशिलांनीं लेखकानें अगदीं कोरलें आहे. तें पुढीलप्रमाणें—" एका कोनाड्यांत बालाजीची तसबीर ठेवलेली होती. कोनाड्याच्या एका बाजूला 'शुभ' व दुसऱ्या बाजूला 'लाभ' अशीं अक्षरें कुंकवाच्या बोटानें काढलेलीं होतीं. लालचंदनें बालाजीची पूजा केली व मुद्दाम बनवून आणलेला दोन पैशांचा हार तसबिरीवर चढवला. पूजा संपल्यावर रोजच्याप्रमाणें उदबत्ती विझवून न ठेवतां त्यांनीं ती तशीच पेटत राहूं दिली. गादीवर परीटघडीची चादर टाकून त्यांनीं तक्क्यावर शुभ्र अभ्रा चढवला."

मुंबईत गेलेल्या खेडूत रंगनाथला काय दिसलें ? लक्ष्मी ही ज्यांची बटीक झाली आहे, ते सट्टेबाजारांतील शेटये म्हणजे संपत्तीच्या 'अत्तराच्या कुप्याच.' पण त्या सट्टेबाजारांतील देखावा, रंगनाथाला, दारुड्यांच्या किंवा वेड्यांच्या जमावासारखाच वाटला. त्यांचें शब्द-चित्र पहा,

" रंगनाथला वाटलें, मुंबई म्हणजे एक झाड, भुलेश्वर ही एक फांदी, समोरची इमारत हें मधाचें पोळें आणि हे सटोडिये म्हणजे मधमाशांचा थवा. टेलिफोनच्या शेंकडो घंटा एकसुरी, एकमेळी किणकिणत, ठणठणत होत्या. रंगनाथनें बंबखान्यांतल्या आगीच्या बंबाकडे पाहिलें. त्याला वाटलें, त्या बंबाची घंटा झक मारते आहे ! भावांच्या विचारणा चालल्या होत्या. भाव येत होते. भाव जात होते. तेजीमंदी तालातालानें पुढेंमागें सरकत होतीं. पिसाटल्याप्रमाणें तें शेंकडो सटोडिया हो हो करून ओरडत होते. रंगनाथला वाटलें, बेलापूरच्या मराठी शाळेंतले झाडून सारे वर्ग एकत्र जमून परवचा म्हणत आहेत. "

शहरी जीवनाची हीन बाजू व खेडूत जीवनाची उजळ बाजू दाखविणाऱ्या लघु-कथा ठोकळ उत्तम प्रकारें लिहूं शकतील. कारण त्यांना दोन्ही जीवनांचा अनुभव आहे आणि तो अनुभव कलेच्या द्वारां प्रगट करण्याचें कौशल्य त्यांच्या अंगीं भरपूर आहे.



सौ. मुक्ताबाई दीक्षित : : १५

भारतीय भाषांतील वाङ्मयाची तोंडओळख करून देणारें 'पेन'चें एक इंग्रजी पुस्तक नुकतेंच इंग्लंडांत प्रसिद्ध झालें. त्यांत मराठींतील ठळक लेखिका म्हणून जीं दोन नांवें घेण्यांत आलीं आहेत; तीं म्हणजे विभावरी शिरूरकर व मुक्ताबाई दीक्षित. यांपैकीं कादंबरींच्या क्षेत्रांत विभावरीबाईनीं किती क्रांतिकारी कामगिरी केली, याचें दिग्दर्शन 'सौ. मालतीबाई बेडेकर' या प्रकरणांत पूर्वी केलेलें आहे. आतां सौ. मुक्ताबाई दीक्षित यांनीं लघुकथेच्या प्रांतांत कोणती करामत करून ठेवली आहे, हें येथें पहावयाचें आहे.



श्री. हरिभाऊ आपटे किंवा प्रा. फडके या प्रतिभाशाली कथाकारांनीं परकायाप्रवेश करून स्त्रियांचीं मनें कुशलतेनें रेखाटलीं यांत शंकाच नाहीं. पण किती झालें, तरी तो पर-काया-प्रवेशच! प्रत्यक्ष अनुभवापेक्षां कल्पनेवरच अधिक भिस्त. बालगंधर्वांनीं स्त्री-वेष करण्यांतलाच प्रकार. त्यांचें रुक्मिणीचें किंवा भामिनीचें सोंग कैक नवशिक्या नटींपेक्षां अधिक सरस, अधिक स्वाभाविक सजत असे, हें खरें; पण नाट्यकलेचा प्रसाद लाभलेली प्रत्यक्ष स्त्रीच जर तो तो अभिनय करूं लागली; तर त्यांत किती सहजता, किती जीवंतपणा येईल! रंगभूमीवर बालगंधर्वांला हार

खावयास लावणारी रूपसंपन्न, अभिनयसंपन्न व गानसंपन्न नटी अद्याप निर्माण झाली नाहीं; तथापि कथेच्या प्रांतांत मात्र, कांहीं कांहीं गुणांचे बाबतींत, आपटे किंवा फडके यांच्यावर ताण करणाऱ्या लेखिका पुढें आल्या आहेत. त्यांपैकीं सौ. मुक्ताबाई दीक्षित यांच्या लघुकथा, त्यांतील प्रांजलपणामुळें व मनोविश्लेषणामुळें, रसिकांच्या निरंतर स्मरणांत राहण्यासारख्या आहेत.

शारदेची उपासना

मुक्ताबाईंचा जन्म मुक्ताबाईंच्या गांवींच झाला. 'निवृत्ति-ज्ञानदेव-सोपान-मुक्ताबाई' या चार भावंडापैकीं मुक्ताबाई विजेच्या कडकडाटांत गुप्त झाल्या, त्या खानदेशांतील एदलाबादला. त्या गांवीं त्यांची समाधि असून त्यांचें नांव भक्तीनें तेथें घेतलें जातें. म्हणूनच मूळचें पाळण्यांतलें नांव कृष्णाबाई असतांहि, करंदीकरांनीं आपल्या कन्येचें नांव मुक्ताबाई असेंच रूढ केलें. माहेरीं व सासरीं-दोन्हीकडे 'मुक्ताबाई' हेंच नांव चालू झालें, तरी त्या नांवाच्या व्यक्तीला मात्र पाळण्यांतील नांव लाडकें असावें. कारण लघुकथा लिहितांना मुक्ताबाईंनीं 'कृष्णाबाई' या टोपण नांवानेंच त्या लिहिल्या.

मुक्ताबाईंचा जन्म १९०१ सालच्या डिसेंबर महिन्यांत झाला. त्यांच्या मनावर लेखनाचे संस्कार आनुवंशिकच होते, असें म्हटलें तरी चालेल. सुप्रसिद्ध कवि विनायक हे त्यांचे चुलते. त्यांचे बंधु श्री. ना. वि. करंदीकर धुळ्यास वकिली करीत असले, तरी ग्रंथ–लेखनाचा त्यांना छंद आहे. पं. नेहरू यांच्या 'भारताचा साक्षात्कार' या ग्रंथाच्या अनुवादांत साने-गुरुजींइतकाच त्यांचाहि हात आहे. इतरहि कोणी कवि, कोणी लेखक– असें विद्येचें वातावरण करंदीकरांच्या कुटुंबांत होतें.

प्राध्यापकाच्या खुर्चीवर

हुजूर डेप्युटी कलेक्टर या मानाच्या जागेवर वडील होते. ही जागा त्यांनीं आपल्या मनगटाच्या जोरावर कमावली होती. त्यांनीं नोकरीला आरंभ केला, तो पंधरा रुपये पगाराचा नाक्यावरील कारकून म्हणून. पण

आपल्या अंगच्या गुणांनीं ते वरवर चढले. जत संस्थानांत 'ॲडमिनिस्ट्रेटर' म्हणूनहि त्यांनीं काम केलें. त्यानंतर ब्रिटिश राजवटींत त्यांच्या कर्तृत्वाचें प्यादें पुढें सरकतां सरकतां डेप्युटी कलेक्टरच्या कटीवर जाऊन बसलें. पण वडिलांच्या ऐश्वर्याचा लाभ मुक्ताबाईंना फारसा झाला नाहीं. कारण त्या सात-आठ वर्षांच्या असतांनाच त्यांच्या शिरावरील पितृप्रेमाचें छत्र हिरावलें गेलें. आई तर त्याआधींच देवाघरीं गेलेली होती. पण चुलत्यांनीं मुक्ताबाईंचा प्रतिपाळ चांगल्या रीतीनें केला. नुसता प्रतिपाळच नव्हे, तर शिक्षणहि त्यांनीं त्यांना चांगलें दिलें.

पुणें येथील हुजूरपागेंत मुक्ताबाईंचें दुय्यम शिक्षण झालें. १९२२ सालीं त्यांनीं मॅट्रिकचें प्रवेशद्वार ओलांडलें व स. प. कॉलेजांत पाऊल टाकलें. कॉलेजच्या खुल्या वातावरणांत त्यांच्या जिज्ञासेचे दरवाजेहि खुले झाले. बी. ए. ला त्यांनीं 'तत्त्वज्ञान' हा विषय घेतला व मानस-शास्त्राचा अभ्यास विशेष आवडीनें केला. १९२६ सालीं बी. ए. ची परीक्षा त्या उत्तीर्ण झाल्या. बी. टी. झाल्यानंतर बडोदें येथील 'महाराणी हायस्कूल'-मध्यें त्यांनीं शिक्षिकेची नोकरी धरली. मराठी विषय घेऊन त्या नागपूर विद्यापीठाच्या एम. ए. १९३५ सालीं झाल्या. बडोद्यांतील शिक्षकी त्यांनीं सात वर्षें केली. त्यानंतर पुणें येथील ठाकरसी कॉलेजांत मराठीचे प्राध्यापक म्हणून त्यांनीं काम केलें. त्यांचें आयुष्य 'वाऱ्यावादळाशीं झगडा' करण्यांत गेलें. 'पांढरपेशा वर्गातल्या सुशिक्षित एकाकिनीचें भावजीवन' कंठतांना त्यांना जे अनुभव आले व त्यांचें जें मानसं-मंथन झालें, तेंच त्यांच्या लेखनाचें खरें भांडवल.

तर्खड पारितोषिक

कथा-लेखनाकडे मुक्ताबाई योगायोगानेंच वळल्या असें म्हटलें पाहिजे. पदवीधर होऊन त्या अध्यापनाचें कार्य करीत होत्या, तेव्हां १९२७ सालीं त्यांच्या वाचनांत श्री. बरेरकरांची एक गोष्ट आली. तिचें नांव 'आमचे मालक' त्यांतील विचार मुक्ताबाईंना नापसंत वाटले-बेचैन करूं लागले. म्हणून, त्याची दुसरी बाजू दाखविण्यासाठीं त्यांनीं एक लघुकथा लिहिली

आणि तिला नांव दिलें ' आमचे दास ' म्हणून. त्या म्हणतात, ' अगदीं अनपेक्षितपणें मी लेखिका झालें ! ' या दोन्ही गोष्टी 'गृहलक्ष्मी' मासिकांत प्रसिद्ध झाल्या होत्या. मुक्ताबाईंच्या भाषेची तडफ व विचारांचा प्रांजलपणा पाहून ' रत्नाकर ' मासिकाचे श्री. गोखले यांनीं त्यांचेकडे लघुकथेची मागणी केली—किंबहुना, लकडाच लावला. त्यामुळेंच मुक्ताबाईंच्या हातून कथा-लेखन झालें. त्यांच्या बहुतेक कथा ' रत्नाकर ' व ' प्रतिभा ' या उच्च दर्जाच्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या व त्यांनीं चिकित्सक कथा-वाचकांचें चित्त वेधून घेतलें. ' मानस-लहरी ' या त्यांच्या पहिल्या कथा-संग्रहानें त्यांना कीर्ति मिळवून दिली आणि ' अनिरुद्ध प्रवाह ' या दुसऱ्या कथा-संग्रहानें तर त्यांनीं १९३९ मध्यें 'तर्खड पारितोषिक'हि हस्तगत केलें. हें बक्षीस टीकात्मक ग्रंथांनाच बहाल करण्याची प्रथा आहे. त्या बक्षिसास पात्र होण्याचा पहिला मान मुक्ताबाईंच्याच ललित लेखनाचा. त्यांच्या लघुकथाहि सामाजिक टीका करणाऱ्याच आहेत, अशी परीक्षकांना खात्री पटली; म्हणूनच त्यांनीं हें पारितोषिक त्यांना दिलें. यानंतरहि त्यांच्या सुमारें दहा लघुकथा प्रसिद्ध झाल्या आहेत. चार-पांच कथा तर इंग्रजी, हिंदी, गुजराती व ऊर्दू या भाषांत अनुवादित झाल्या आहेत. थोड्याच कथा लिहून मोठी कीर्ति मिळविणाऱ्या लेखकांमध्यें मुक्ताबाईंची गणना होण्यासारखी आहे.

यशवंत नाट्य-लेखन

लघु-कथानंतर नाट्य-लेखनाकडे मुक्ताबाईंची लेखणी वळली. 'जुगार' हें त्यांचें पहिलें नाटक १९५० सालीं रंगभूमिवर आलें आणि त्याचे नाद-निनाद महाराष्ट्रभर उमटले. सपत्नीक स्त्रीचें मनोविश्लेषण या नाटकांत मार्मिकतेनें, सूचकतेनें व हलक्या हातानें केलें आहे. त्या गुणाला कोंदणहि मोलाचें लाभलें. रंगभूमिवर तें नाटक उभें रहाण्यासाठीं नटश्रेष्ठ श्री. केशवराव दाते यांनीं जिवापाड परिश्रम घेतले. त्यांच्या अनुभवसिद्ध मार्ग-दर्शनाचा लाभ झाल्यानें ' जुगार 'च्या यशांत भरच पडली. इंदूरच्या " महाराष्ट्र साहित्य परिषदेचें " ' यशवंत नाट्य पारितोषिक ' या नाट-

काला मिळालें त्या नाटकाचें हिंदी व कानडी या भाषांत अनुवाद झाले आहेत. याशिवाय त्यांचीं आणखी दोन नाटकें प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. त्यांचे पति श्री. विठ्ठलराव हें 'इंटर नॅशनल बुक सर्व्हिस' या संस्थेचे मालक असल्यामुळें ग्रंथांच्या समुद्रांतच जणुं मुक्ताबाई बसल्या आहेत व त्यामुळें त्यांच्या चिकित्सक वृत्तीला वाचनाचें आकंठ पान करणें सुकर झालें आहे.

खऱ्या टीकाकारच

'टीकाकार' म्हणूनहि त्यांचें स्थान वरचें आहे. 'चांदरात,' 'जागत्या छाया' वगैरे ग्रंथावरील त्यांची टीका तात्त्विक मीमांसा करणारी असून गुणग्राहक अभिप्राय देणारी आहे. 'घराबाहेर' नाटकाचें परीक्षण तर अत्यंत सडेतोड आहे. तसेंच 'माधव ज्यूलियन' च्या काव्याचें मूल्य-मापन. त्यांचा स्वभावच चिकित्सक असल्यानें त्या स्वतःच्याहि टीकाकार सदैव असतात. साहित्यावर व समाजावरहि अचूक व तीक्ष्ण टीका करण्यांत मुक्ताबाईंची लेखणी यशस्वी आहे. थोड्या व साध्या शब्दांत पुष्कळ व गहन अर्थ सांगण्याचा गुण त्यांच्या लेखणींत किती आहे, हें एका वाक्यावरूनहि कळून येण्यासारखें आहे. काणेकरांच्या 'चांदराती' विषयीं लिहितांना त्या म्हणतात,

"चांदरातींतील कित्येक भावगीतें, भावगीतांचें उदाहरण म्हणून देण्यासच नव्हेत, तर भाव-गीतांची व्याख्या ठरविण्यास उपयोगीं पडण्याइतकीं सरस आहेत. त्यांतील भावना त्यांच्या आहेत, उत्कट आहेत; त्या जणुं काय त्यांना बेचैन करीत आहेत. शब्द साधे आहेत, नाद-माधुरी आहे, विकाराबर भर आहे, भावनेंत एकपिंडता आहे. तिच्या प्रकटनांत मनोज्ञपणा आहे व सर्वांच्या शेवटीं आटपशीरपणा आहे. भावनेचा भर ओसरला कीं, लेखणी हातांतून खालीं ठेवल्यासारखी वाटते." इतका अर्थ-गौरव किती मराठी टीकाकारांच्या लेखनांत सांपडेल? मुक्ताबाईंच्या लेखनांतील मुख्य दोष एकच-आणि तो म्हणजे तें अल्प आहे हा! त्यांचें वर्णन त्या स्वतःच, 'कासव-गति' या एका शब्दानें करतात!

स्वभाव-वैशिष्ट्याचा उठाव

लघुकथेची शास्त्रीय भूमिका टीकाकार मुक्ताबाई किती यथार्थपणें जाणतात, हें ' जागत्या छाया ' वरील त्यांच्या परीक्षणावरून कळून येतें. " एकाद्या व्यक्तीच्या स्वभाव-वैशिष्ट्याचें वर्णन समर्पक शब्दांत केलेलें असलें, तरी तें शब्द-चित्र होईल, लघुकथा नव्हे. त्यांच्या त्या स्वभाव-वैशिष्ट्यामुळें जेव्हा एकाद्या घटनेला उठाव मिळेल, त्या वेळेसच लेखकाला लघुकथेची वस्तु सांपडली असें म्हणतां येईल. " ही त्यांची मीमांसा मूलग्राही आहे. या कसोटीला त्यांच्या बहुतेक कथा उत्तम प्रकारें उतरतात. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, ' आमचे दास ' ह्या पहिल्याच कथेंत लेखिकेचें कथा-लेखनाचें सारें कौशल्य प्रतिबिंबित झालें आहे. तींत सुशिक्षित तरुणांच्या प्रेमभावनेचीं आंदोलनें हळुवारपणें चित्रित केलीं आहेत, त्यासाठीं योजिलेल्या घटना स्वाभाविक आहेत, वायफळ शब्द शोधूनहि सांपडावयाचा नाहीं, त्यांचे सारे संवाद सूक्ष्म बुद्धिमत्तेनें लखलखणारे असतात. या सर्व गुणांचें प्रतिबिंब या पहिल्या कथेंत पडलेलें असून ती कथा पात्रमुखी आहे. नव्या काळांतील तरुणी स्वतःच आपल्या मनाचें हेलकावे या कथेंत सांगत असल्याकारणानें ती विलक्षण परिणामकारक झाली आहे.

मॅट्रिक झालेली मुलगी 'लग्न करून परतंत्रता पत्करायची नाहीं' असा निर्धार करते आणि " आदर्शभूत स्वतंत्र स्त्री " होण्याचें मनोरथ रचते. पण तिचें लग्न एका प्राध्यापकाशीं होतें. त्या प्राध्यापकाचा स्वभाव शांत, समजूतदार व निश्चयी असा शेवटपर्यंत दाखविला आहे. आस्थेनें, आपलेपणानें तो तिला कांहीं गोष्टी करावयास सांगतो, तेव्हां तिला तो " धैर्यधराचा हुकमीपणा " वाटतो. "बरोबरीचे हक्क याचाहि अर्थ एकाच प्रकारचे हक्क असा नाहीं. " हा त्याचा सयुक्तिक विचार तिच्या बंडखोर मनाला रुचत नाहीं. त्यामुळें ती माहेरीं रागावून जाते. तेथें ती चार वर्षे राहते आणि बी. ए. होते. पण तिला लवकरच कळून येतें कीं, " मी पतीच्या दास्याला न जुमानतां ज्ञानार्जन केलेली बाणेदार स्त्री होतें, पण

घराच्या मर्यादा सोडून जगाच्या आखाड्यांत पाऊल घातल्यापासूनच माझा दुबळेपणा मला जास्त जाणवत चालला होता. आपल्याला संरक्षणाची जरुर आहे ही गोष्ट नकळत मला पटत चालली होती."

स्वभावाचें परिवर्तन

आपल्या मनाचें एकाकीपणाचें असमाधान लपविण्यासाठीं तिनें एका खाजगी शिक्षणसंस्थेंत काम करण्यास सुरवात केली. पण ही "समाजसेवा म्हणजे निव्वळ आत्मवंचना आहे." हेंहि तिला पटलें. तिच्या आईचें स्वभावचित्र पार्श्वभूमीसारखें रंगविलेलें आहे. पतीच्या सुखासाठीं ती आत्मसमर्पण करते. तिच्या प्रत्यक्ष उदाहरणानें मुलीच्या मनांतील अहंकाराच्या गांठी हळूंहळूं सुट्टूं लागतात. त्यांतच कौपर, टेनिसन् वगैरे कवींचे आत्मसमर्पणाचें विचार तिच्या वाचनांत येतात. एका कवयित्रीचाहि सूर तोच ! हें पाहून ती थक्क होते व तिच्या मनाची तटबंदी ढासळून जाते. ती मनांत म्हणूं लागते, " मला त्यांनीं 'गृहाची गृहिणी' केली होती, पण मला त्यांना 'मदतनीस' शोभायला हवं होतं. 'मनाचा ताबा' नको होता, तर मेंदूची बरोबरी हवी होती. व म्हणूनच त्या अंतःकरणाच्या राज्यांतून माझी हकालपट्टी झाली होती."

तरुणींचीं मनश्चित्रें

त्यानंतर तिनें आपल्या पतीच्या स्वभावाचें जें विश्लेषण केलें आहे, तें अत्यंत मार्मिक आहे. " बुद्धिवैभवाच्या जोरावर मन ताब्यांत ठेवूं पाहणाऱ्या त्या शास्त्रज्ञाला प्रीतिवैभवानं जग विसरायला लावीन " अशी प्रतिज्ञा करून ती पतीच्या घरीं परत जाते. तिचा स्वीकार प्राध्यापक शांतपणें करतात. फरक इतकाच कीं, " पूर्वीच्या प्रत्येक ' कर 'ची जागा आतां परकेपणाच्या ' कराल कां ? ' नीं पटकावली होती." या परकेपणामुळें, तुटकपणामुळें, दूरपणामुळें तिचा कोंडमारा झाला—आणि तो तिला असह्य झाला. शेवटीं ती त्यांना शरण गेली, पण ही शरणागती जुन्या काळच्या आईप्रमाणें आंधळी नसून ' ज्ञानोत्तर ' आहे असें

समाधान तिनें मानून घेतलें. हे मनाचे झोके कोणत्या सुशिक्षित तरुणीला वाचनीय व मार्गदर्शक वाटणार नाहींत ?

असेंच आणखी एका तरुणीचें मनश्चित्र " वर्षाव " या कथेंत लेखिकेनें रेखाटलें आहे. गणिताची प्राध्यापिका असणारी एक तरुणी अगदीं एकटी असते. तिच्यावर तीन प्राध्यापकांचें प्रेम असतें. पण अखेर मानसशास्त्राचा प्राध्यापक तिचें मन जिंकतो. हें या कथेंत चित्रपटाच्या वेगानें दाखविलें आहे. गणिताचें पुस्तक लिहिण्यासारखा तिचा रुक्ष उद्योग चालू असतांना बाहेर सृष्टींतील उकाडा वाढत असतो, आणि जेव्हां तिचें प्रेम जमतें तेव्हां पुस्तक संपतें–आणि सृष्टीहि पावसानें भिजून निघते–असे ' निसर्गाचें संवादित्व ' दाखविलें आहे. शृंगारिक संवादाची बारीकशी लकेरहि या कथेंत उमटली आहे.

विनोदाचा परिमल

" अज्ञात मार्ग," " शांत वादळ," " दोन म्हातारे," इत्यादि कथांतूनहि शृंगाररसाचे बारीक बारीक थेंब उडत असतात. ' अज्ञात मार्गात ' तर शृंगाराच्या तरंगाला विनोदाचा वास लावलेला आहे. लोणावळा येथें हिरकणीचें हृदय जिंकू पाहणारा व तिच्याबरोबर टेनिस खेळूं पाहणारा दिनकर साठे, आपला मित्र माधव याला तिच्यापासून दूर ठेवण्यासाठीं किती युक्त्या-प्रयुक्त्या करतो हें पाहतांना वाचकाला हंसू हेतें. " तो खेळ बंद पाडण्याकरितां कैवल्यधामच काय, पण चारी धामांची यात्रा मी दोन्ही पाय सुरगळले असते तरीसुद्धां केली असती " अशी त्याची हिंमत, पण त्याचा गनिमी कावा फुकट जातो आणि माधव हिरकणीशीं लग्न करतो.

" निंदक ", " पुराण पुरुष " व " पत्ता हरवला " या तीन कथा केवळ विनोदी आहेत. पसतीस वर्षें वयाचा जमादार आपल्या प्रवासाच्या थापा इतक्या मारतो कीं, तो प्रवास करण्यास साठ वर्षें लागावीं ! एरवीं शब्दांची काटकसर करणाऱ्या लेखिकेनें येथें विनोदासाठीं शब्दांची यथेच्छ उधळपट्टी केली आहे व ती योग्यहि आहे. प्रो. नारिंगे यांची धांदल व

विसराळूपणा यांचें विनोदी चित्र 'पत्ता हरवला' या गोष्टीमध्यें पहावयास मिळतें. त्यांना पार्श्वभूमि शोभण्यासारखें शब्दचित्र श्यामकांतांचें रंगविलें आहे. 'पत्त्याचा कागद हरवला तर स्मरणानें तो पत्ता आठवा,' एवढाच काय तो सल्ला श्यामकांतानें प्रोफेसरांना दिला. पण तो त्यांना मोलाचा वाटला.

"शांत वादळ" या कथेंतील श्रीरंग व चंदन या प्रेमी युवकांना आपल्या लग्नाला आईवडिलांचा विरोध होत नाहीं म्हणूनच धक्का बसतो. त्यामुळें बंडखोरी करण्याची संधि गमावल्याचें त्यांना दुःख होतें. याच कल्पनेवर य. गो. जोशी यांनीं 'सर्कस' ही कथा किती विडंबनपर व हास्यकारक रचली आहे तें पहाण्यासारखें आहे.

जुन्या-नव्याचा संघर्ष

'कळ्यांचे निःश्वास कीं सुवास ? या कथेंतील श्रीनिवासचा बुजरा स्वभाव आरंभापासून अखेरपर्यंत सुसंगतपणें लेखिकेनें रेखाटलेला आहे. सुशिक्षित तरुणीची त्याला धास्तीच वाटे. घरीं त्याला ज्या मुली दिसल्या होत्या, त्या जुन्या वळणाच्या होत्या. त्यांचें वर्णन लेखिकेनें मोजक्या शब्दांनीं रेखीवपणें केलें आहे. तें असें:—"वडील बहिणी होत्या, पण त्या अगदींच अशिक्षित त्या जोडवीं घालीत, तुळशीची पूजा करीत, चातुर्मासांत नेमधर्म करीत व सौंदर्यशास्त्रापासून शक्य तों अलिप्त रहात! शेजारीं पाजारीं कांहीं तरुण अर्धवट शिकलेल्या पोरीसोरी असत, परंतु त्या घट्ट अंबाडा बांधीत, लोकरीचें विणकाम करीत, नवऱ्याच्या नांवाला लाजत व आपल्या खुळचट रोमान्सचें मैत्रिणींजवळ वर्णन करीत!"

संवादांतील चातुर्य

श्रीनिवासची ही स्त्री–विन्मुख वृत्ति व्यक्त करणारी घटना लेखिकेनें कथेंत गुंफली आहे. त्याच्या लग्नाच्या वाटाघाटी चालू असतांना एके दिवशीं संध्याकाळीं तो फिरावयास गेला. त्यावेळीं कॉलेज–कन्यकांचा संवाद सहजगत्या त्याच्या कानीं पडला. संवाद चालला होता विभावरी शिरूरकर यांच्या "कळ्यांचे निःश्वास" या कथा—संग्रहावर. हा संवाद

वाचतांना वामनरावांच्या " रागिणी "ची आठवण कोणासहि व्हावी इतका तो बुद्धीच्या तेजानें लखलखणारा आहे. त्याचा एक नमुना असा-

" तुला तुझ्या आईबापांनीं अविवाहित ठेवली-अगदीं स्वार्थाकरितां ठेवली तरी, वाङ्मयाच्या स्वरूपांत कां होईना, जनतेच्या न्यायासनासमोर आपल्या आईबापांना आरोपी म्हणून तूं उभं करशील का ? "

" पण असं म्हटलं तर सहेतुक वाङ्मयाची वाढच कठीण होईल-उलट आत्मप्रत्ययाच्या अनुभूतीचा आधार हाच वाङ्मयांत महत्वाचा आहे."

" कळ्यांचे निःश्वास " या लघुकथांनीं श्रीनिवासची मनोवृत्ति पालटली आणि त्यानें ललितेशीं लग्नगांठ बांधिली, असें लेखिकेनें दाखविलें आहे. वाङ्मयाचा जीवनावर इतका सत्वर प्रभाव खरोखर पडूं लागला, तर वाङ्मयसेवकांना उचीचे ग्रह येण्यास कितीसा उशीर लागेल ? पण विचाराची वावटळ वळायला कोणतें निमित्त पुरेल हें सांगतां येत नाहीं.

कथेच्या द्वारें टीका

" कळ्यांचे निःश्वास " हा विभावरींचा कथा-संग्रह, " जादूगार " ही फडक्यांची कादंबरी आणि "आई" ही यशवंतांची कविता-या तीन वाङ्मय-प्रकारांवर, आपल्या कथेच्या ओघांत मुक्ताबाईनीं मार्मिक टीका केली आहे. चित्रकाराच्या कुंचल्यानें शस्त्र-क्रिया करण्यासारखेंच हें कसब आहे. " अभिनव स्त्रीराज्य " या कथेंतील राजा काव्यात्म वृत्तीचा असतो. ऐदीपणानें श्रीमंतीवर लोळत लोळत तो फडक्यांच्या गंधर्वनगरींत गुंगत असतो. त्याची ती तंद्री उतरविण्यासाठीं जोगळेकर त्याला आपली नवी कादंबरी वाचावयास देतात. तींत शब्दमाधुर्य, कल्पनासौंदर्य, भावना-विलास, वगैरे सर्व कांहीं असते; पण " वृद्ध आजीबायांचा-पंजीबायांचा घोळका " व त्यांचें कीर्तन यांचेंच कथानक त्या कादंबरींत असतें. तें वाचून उल्लू राजाचा तळख मेंदू इतका भडकला कीं, " कीर्तनानें सुरवात करून प्रेतयात्रेनें कादंबरीचा शेवट करणाऱ्या त्या नवकल्पनावादी कादंबरीकाराच्या डोक्यांत, कोपऱ्यांतल्या दांडग्या " अभिनव " काठीचा

अगदीं " नावीन्यपूर्ण " तडाखा देऊन, त्याला कधीं पाहिली होती का नव्हती अशा " नवनवोन्मेषशाली " तिरमिरीचा " क्रांतिकारक " अनुभव आणून द्यावा, असा अगदीं " प्रतिभापूर्ण " मोह राजाला वाटला—"

कारुण्याचा स्पर्श

या विनोदापेक्षां साहित्याचा भावनेवर कसा करुण परिणाम होतो हें " आई " या कवितेंत नाजूक कलमानें त्यांनीं चितारलें आहे. कवि यशवंतांची भावपूर्ण गानमोहिनी सर्वत्र पसरत होती. पण दोन महिन्यांपूर्वीच आईविरहित पद्मावतीला तें काव्य ऐकवेना. म्हणून ती दिवाणखान्याबाहेर आली आणि ' फुलून फुलून हुंदके ' देऊं लागली. हा अनुभव शेकडों महाराष्ट्रीय रसिकांना आलेला आहे. पण लेखिकेचें कौशल्य हें कीं, तेरा वर्षांनंतर त्याच कवीची तीच कविता ऐकत असतांना पद्मावतीची वृत्ती स्थिर होती, असें तिनें दाखविलें आहे. काव्यसृष्टींतून ती सत्यसृष्टींत उतरली होती. अश्रु ढाळून भावनेला वाट करून देण्याइतकीहि स्वस्थता तिच्या अंतःकरणाला नव्हती. ती भावानिक चैन तिला परवडत नव्हती. आतां पद्मावती म्हणजे " तरुण अंतःकरणाच्या चेपल्या गेलेल्या महत्वाकांक्षा आणि कोंडल्या गेलेल्या भावना यांचें मूर्तिमंत प्रतीक होती. " तिच्यावर कुटुंबाची जबाबदारी पडलेली होती. ती पार पाडण्यासाठीं पद्मावती अविवाहित राहिली होती. तिची मनोवृत्ति बधिर झाली होती–तिची भावना करपून गेली होती. हा फरक मुक्ताबाईंनीं मोठ्या कलात्मकतेनें मांडला आहे.

" मातृऋणाची फेड " ही कथाहि हृदयस्पर्शी आहे. नायकाची आई पुनर्विवाहित असते, म्हणून तिला लोक ' पतित ' समजतात—बहिष्कृताप्रमाणें वागवितात. तिनें मृत्युशय्येवर असतांना आपल्या मुलाला हा नसता ' कलंक ' पुसायचें काम सांगितलें. तिचें तें प्रदीर्घ व व्याकरणशुद्ध भाषण अस्वाभाविक वाटतें आणि आतां पुनर्विवाह इतका वर्ज्यहि मानला जात नाहीं. पण पंधरा वर्षांच्या मुलाची त्यावेळची मनः-

स्थिति वाचकाच्या चित्ताला चटका लावणारी दाखविली आहे. पुढें मुलगा इंग्लंडला जातो, बॅरिस्टर होतो, इंग्रज मुलीच्या प्रेमांत सांपडतो आणि तिच्याशीं लग्न करण्याचें ठरवितो. ' विवाहांत धर्माचा प्रश्न गौण आहे ' असाहि सिद्धांत तो ठोकून देतो. पण आपल्या असल्या विवाहामुळें आजूबाजूच्या बायका आपल्या आईची बदनामी करतात, हें ऐकल्यावर मात्र त्याचें मन एकदम पलटी खातें व म्हणतें, " मी धर्मघातकी व्हायला तयार होतों, समाजघातकी व्हायला तयार होतों, फार काय आत्मघातकी व्हायला तयार होतों—पण मातृघातकी ! "

' मनु पालटला ' या गोष्टींत लग्न-विधीच्या इतर अंगांमध्यें पिढ्यापिढ्यांना फरक पडत गेला, तरी लग्नमंडपापुढें 'माई अन्न वाढा व पोराला' हा भिकाऱ्यांचा कोलाहल कांहीं पालटला नाहीं, ही समाजांतील विषमता लेखिकेनें सूक्ष्मतेनें मांडली आहे.

विचारांची शास्त्रीयता

जगांतल्या कटु सत्याची ओळख पटल्यामुळें येणारा तिरस्कारमिश्रित कडवटपणा " ' पावित्र्य-विडंबनां 'तील निर्मलेच्या स्वरांत आहे. तो मुक्ताबाईंच्या लेखणींतून सदैव वाहत असतो. समाजाची काळी बाजू त्यांनीं उघड्या डोळ्यांनीं पाहिलेली दिसते. ' रूढ नीति—कल्पनांचे पाटबंधारे जीवनाचा अनिरुद्ध प्रवाह थोपवून धरायला असमर्थ ठरतात " असा सिद्धांत त्यांनीं एखाद्या समाजशास्त्रज्ञाप्रमाणें " शिकारी " या गोष्टींत मांडला आहे. पण विवाहसंस्थेचा पाटबंधारा नसलेला समाज कसा काय टिकूं शकेल याचा विचार त्यांनीं केलेला आहे काय ? समाजाच्या पायाखालील विवाहसंस्थेचें अधिष्ठान काढून घेतल्यानंतर त्याला दुसरें कोणतें अधिष्ठान मिळवून द्यावें, हाहि विचार विद्वान कथा-लेखकांनीं करावयास हवा. साऱ्याच जुन्याचा विध्वंस करण्याची बंडखोर वृत्ति डोळे दिपविणारी असते; पण समाज-नेत्यांना शांतपणें, दूरवर, सारासार—विचार करावा लागतो.

द्वि-पत्नी विवाहाचा प्रश्न

विचारांचा असाच एकांगीपणा ' पुण्यात्मे ' या कथेंतहि आढळतो. आनंदरावांनीं मंजूला टाकलें आणि परजातींतील पदवीधर सुधेशीं लग्न केलें. त्यांची भेट मंजूच्या वडील बहिणीनें घेतली. तेव्हां ती त्यांचेवर आपला राग कसा काढते, हें लेखिकेनें पुढील शब्दांनीं दाखविलें आहे— " तापलेली सळई कानांत घालावी असा मला भास झाला ! आपल्या सुखाच्या वेळीं तिच्याकडे लक्ष दिलं नाहीं आणि आतां तिच्या सुखाच्या आड येताहेत ! संतापामुळें डोळ्यांत येऊं म्हणणारा अश्रूंचा कढ आंवरून मी म्हणालें, " बरोबर आहे, तुमचा फायदा नाहींच. उलट तोटाच आहे. कारण आजच्या समाजांत तो तुमच्या अब्रूला कमीपणा आहे ! आनंदराव, एका जिवाचा जिवंत बळी घेतलांत, आतां त्याला अन्य तऱ्हेनें सुख मिळेल तर तेंही मिळूं देऊं नका ! किती पापी आहांत ! " बोलतां बोलतां माझ्या डोळ्यांत अश्रू आलेच ! "

पण हा रागाचा व शोकाचा भर ओसरल्यावर ती वडील बहिण आनंदरावांच्या द्वि-पत्नी-विवाहाचा निषेध न करतां विनायकरावांच्या विषम विवाहाचा तेवढा निषेध करते,—त्याला ' सैतान ' म्हणते. याचें आश्चर्य वाटतें. विनायकरावाचा अपराध हा कांहीं आनंदरावाचा बचाव होऊं शकत नाहीं. रोगाचें निदान बरोबर न झाल्याकारणानें लेखिकेवर आपल्या भगिनींना निराशेचाच सल्ला देण्याची पाळी येते. तो सल्ला असा- " भूतदयेचं अधिष्ठान सोडलेल्या धर्मकल्पना, आणि निषेधांत विराम पावणाऱ्या सुधारणेच्या निर्जीव, निष्क्रिय वल्गना, अशा दुहेरी पेचांत आंतून—बाहेरून कुजलेल्या समाजांत, स्त्रीजातींत जन्म घेतलास ! आतां सुखाच्या आशेवर पाणी सोडशील तर त्यांतच तुला जास्त सुख लाभेल."

जीवनाचा अर्थ

" शास्त्रज्ञाचा शोध " ही लघुकथा लघुनिबंधाच्या वळणावर गेली आहे. Love या शब्दाचा अर्थ छोटूनें विचारतांच जयंतानें जेम्स, रेसल, मॅक्डूगल, फ्राईड, गार्डीनर, वूल्फ इत्यादि आंग्ल पंडितांची पलटण उभी

करून त्यांच्या वचनांचे बार काढण्यास सुरवात केली. या पहिल्या फैरीनंतर कॉलेजांत वादविवाद झाला तोहि प्रेम याच विषयावर. त्या सभेंत विवाहोत्तर प्रेमाचा पुरस्कार जयंतानें केला. पण प्रत्यक्ष कृतीची वेळ आली असतांना त्याचेवर विवाहपूर्व प्रेम करणाऱ्या अजितेकडेच त्याचें मन कलतें. हा उच्चाराआचारांतील विरोध या कथेंत दाखविलेला आहे. पण त्यांवर विचाराचीं व चिकित्सेची इतकी दाट छाया पडली आहे कीं, त्यामुळें भावनेचा मूळचा रंग दिसेनासा होतो. मात्र जयंताचा अलेरच्या सिद्धांत वाचकाच्या मनांत गुणगुणत राहतो, तो सिद्धांत म्हणजे " त्या शब्दाचा अर्थ पुस्तकांत सांपडत नाहीं—जीवनांत सांपडतो, आणि तो अर्थ शिकून कळत नाहीं—अनुभवावा लागतो. " तसेंच, ' मूलभूत स्त्रीसुलभ भावना त्याच आहेत ' असाहि सिद्धांत लेखिकेनें बऱ्याच कथांमध्यें मांडलेला आहे. नव्या स्त्री–पुरुषांमध्यें समानता असावी असा लेखिकेचा आग्रह आहे, पण समानता म्हणजे एकरूपता नव्हे आणि समानतेला सहिष्णुता व प्रेम यांचें वावडें नाहीं असा समतोल विचार सर्वत्र सांगितलेला आहे.

स्त्रीचा दर्जा

आधुनिक सुशिक्षित तरुणीची मनोवृत्ती ' शिकारी ' या कथेंत मुक्ताबाईनीं मूर्तिमंत उभी केली आहे. त्या कथेंतील एक विद्यार्थिनी अर्वाचीन स्त्रीचें वर्णन करतांना म्हणते, " लता म्हणा, देवता म्हणा, पण निर्जीव वस्तु म्हणून दुसऱ्याच्या—केवळ तो पैसा मिळवतो आणि त्यावरून स्वतःची लायकी ठरवतो म्हणून—दुसऱ्याच्या हातचं खेळण होण्यापेक्षां माणूस म्हणून ओळखलं जाणं हेंच अधिक चांगलं ! "

हाच सिद्धांत " संरक्षक " या कथेंत लेखिकेनें सोदाहरण मांडून दाखविला आहे. त्याचा वस्तुपाठ म्हणून त्या कथेंत त्रिवेणीची हकीकत सांगितली आहे. " लहानपणच्या त्रिवेणींत एकट्या गंगेची विशुद्धता होती. आतांच्या त्रिवेणींत यमुनेची गंभीरता आणि सरस्वतीचा छद्मीपणा येऊन ती अगदीं सार्थनाम झाली आहे ! " पण प्रौढ वयांत " तिच्या

वृत्तीनें सागराची गंभीरता आणि प्रक्षुब्धता या दोहोंनाहि सामावून घेतलें होतें. " हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांत ती सांपडली, असें कळतांच तिच्या संरक्षणासाठीं विनायकानें मुंबईहून किस्मदाबादेकडे धाव घेतली. त्यानें तिला मुंबईस चलण्याचा आग्रह केला, पण तिनें नकार दिला. तिला भीति वाटत होती विनायकाची—त्याच्या प्रेमाची—त्याच्या प्रेमांत आपण सांपडूं याची. " भोंवतालच्या परिस्थितीचें सर्वस्वीं आकलन केलेल्या एखाद्या तत्वज्ञान्याप्रमाणें त्रिवेणी किंचित् हंसली. तूं तूं माझं संरक्षण करणार ? "

" कां ? असं कां विचारतेस त्रिवेणी ? "

" विनायक, अगदीं खरं सांगू ? मला परदेशांत भीति नाहीं, दंग्यांत भीति नाहीं, उभ्या जगांत मला एकाच व्यक्तीपासून धोका आहे, त्या व्यक्तीपासून माझं संरक्षण करशील ? "

" कुणापासून ? कुणापासून सांग ? "

विनायकानें अधीर प्रश्न केला. तिच्या उत्तराकडे त्याचे कान अगदीं लागून राहिले होते.

" कुणापासून ? " त्रिवेणी एकदम म्हणाली " तुझ्यापासून ! " आरामखुर्चीवर बसल्या जागीं एकदम विनायकानें मागें मान टाकली ! "

स्त्री-मनाचें चित्रण

अशी स्वाभिमानी व स्वावलंबी, निग्रही व बंडखोर स्त्री आधुनिक काळांतील आहे, असें दाखवीत असतांनाच तिच्या हृदयाची तृष्णा आणि तिच्या वृत्तीची पराधीनता ही दाखविण्यासहि मुक्ताबाई विसरल्या नाहींत हें विशेष. " स्त्री-स्वातंत्र्यवादी " या कथेंतील जगदीश वृंदेच्या व्याख्यानाची मुक्तकंठानें स्तुति करीत असतो, पण त्यावेळीं वृंदेच्या मनांत कोणते विचार खेळत होते याचें विश्लेषण त्यांनीं जसें केलें आहे; तसें मराठींतील फारच थोड्या कथा-लेखकांना साधतें. तें वर्णन असें—

" त्यावेळीं, त्या क्षणाला, तिला त्याच्याकडून तिच्या बौद्धिक जीवनाचा गौरवपूर्वक उल्लेख अप्रिय वाटत होता ! त्याच्याकडून आपल्या वैयक्तिक जीवनाची कातर पृच्छा व्हावी अशी आकांक्षा कुठेंतरी खोल मनांत अस्तित्वांत होती. आणि तीं जों जों तृप्त होत नव्हती, तों तों तिच्या मनोवृत्ति अस्थिर होत होत्या. तिला त्याच्या ध्येयनिष्ठेचें कौतुक वाटलें; पण मुळांत ध्येयवादी असलेल्या तरुणाला आपल्या सहवासांत कांहीं क्षण आपल्या ध्येयाचा विसर पडावा व त्याला आपण पुन्हां ध्येयप्रवृत्त करावें, अशी तरुणींची आकांक्षा असते–तिची ती आकांक्षा अतृप्त राहिली."

बाह्यसृष्टीचें वर्णन करण्याकडे किंवा उपमादृष्टांतादि अलंकार घडविण्याकडे मुक्ताबाईंचें फारसें लक्ष नाहीं. असें अंतःसृष्टीचें चित्रण करण्यांत त्या चतुर आहेत.

बाह्यांगाची उपेक्षा

जगदीश व वृंदा ही सुशिक्षित तरुण–तरुणी रात्रीं चांदण्यांतून चाललीं असतांना त्यांचें वर्णन कोणता ललित लेखक सोडील ? पण मुक्ताबाईंनीं तें वर्णन अगदीं त्रोटकपणें केलें आहे; तें असें—" त्यांनीं चालायला सुरवात केली तोंपर्यंत आकाशांत पूर्णचंद्राचा उदय झाला. टिपूर चांदण्यांतून गांवाबाहेरच्या निवांत रस्त्यांतून तीं दोघें चालत असतां, रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं असलेल्या बंगल्यांच्या बागांतून येणारा निशिगंधाच्या, रातराणीच्या परिमलाचा झोत त्यांच्या अंगावरून जात होता. हळूहळू तिच्या वृत्तींत कसली तरी पर्याकुलता येत होती." दुसऱ्या एखाद्या रससिद्ध लेखकानें हा प्रसंग किती घोळून घोळून लिहिला असता. मुक्ताबाईंच्या साऱ्या लघुकथांमध्यें दहा–पांच उपमा तरी सांपडतील कीं नाहीं याची शंका आहे. मात्र ज्या थोड्या आहेत त्या सविस्तर व समर्पक आहेत. " शास्त्रज्ञाचा शोध " या कथेंतील जयंताच्या मनांत अजितेबद्दलचें प्रेम नकळत कसें उत्पन्न झालें हें सांगतांना लेखिका दृष्टांत देते, " हें केव्हां झालें त्याचें त्यालाच कळेना ! क्षितिजाच्या बर सूर्य केव्हां येतो तें नक्की कळतें, पण पहांटेच्या अंधुक अंधाराचें बाराच्या तेजाळ

प्रकाशांत कसकसें रूपांतर होतें तें कळत नाहीं. पहांटें आपण चांचपडतों, थोड्या वेळानें म्हणतों, 'उजाडलेंच आतां,' आणि बारा वाजतां म्हणतों, 'किती लख्ख प्रकाश पडला आहे.' पण तो कुठून येतो, कसा येतो, अणुरेणूला कसा व्यापतो तें कळतें कां ?"

केवळ ललित कथा-लेखक ही मुक्ताबाईंची भूमिका नाहीं. त्या मुख्यतः टीकाकार आहेत. वाङ्मयावर, समाज-स्थितीवर सूक्ष्म बुद्धीची व खोल व्यासंगाची टीका करण्यांत त्या यशस्वी आहेत. कोणत्याहि प्रश्नाची बारीक चिकित्सा करून त्याचा धागा न् धागा पिंजून काढण्याचा त्यांचा गुण असामान्य आहे. त्यांच्या कथा भावनापेक्षां विचारांचेच कल्लोळ उठवितात.

ध्येयाची तळमळ

मुक्ताबाईंच्या कथा-सृष्टीचें बाह्य रूप प्रा. फडक्यांसारखें दिसत असलें, तरी तिचें अंतरंग मात्रं भिन्न आहे. पुण्या-मुंबईतील वातावरण, कॉलेजांतील तरुण-तरुणींचीं पात्रें, वकील-डॉक्टर-प्रोफेसर अशा संपन्न वर्गांची उंची रहाणी, मोटारी, बंगले, टेनिस इत्यादी विलास–साधनांची गर्दी, प्रेम, लग्न, स्त्री-स्वातंत्र्य, इत्यादि आधुनिक विषयांचें जाळें-हाच कच्चा माल मुक्ताबाई व फडके या दोघां कथा-लेखकांनीं गोळा केला आहे. पण मुक्ताबाईंच्या लेखनांत नवध्येयाची तळमळ आहे, स्वभावाचा कणखरपणा आहे, सामाजिक विचारांत समतोलपणा आहे-आणि त्या सर्वांवर मनोविश्लेषणाचा झगझगीत प्रकाश पडला आहे. त्यामुळें वाचकाच्या भावनेला तृप्ति व बुद्धिला चालना मिळते. अजंठ्याचीं लेणीं पहावयास जाणाऱ्या माणसाला प्रथम डोंगरावर चढावें लागतें व अंधारांत वावरावें लागतें, पण तो विजेच्या दिव्याचा प्रकाश चोहोंकडे फिरवूं लागला, म्हणजे एकएक भव्य व भावदर्शक मूर्ति दृष्टीस पडते आणि मन आश्चर्यचकित होऊन जातें, तसा कांहींसा अनुभव मुक्ताबाईंच्या सरळ भाषेंतील चिकित्सात्मक कथा वाचतांना रसिकांना येतो. भाषेचे अलंकार किंवा कल्पनेचें वैभव यांनीं त्यांची कथा-सृष्टि नटलेली नाहीं, उलट विद्वत्ता व चिकित्सा यांनीं

तिचें बाह्यांग डोंगरासारखें खडबडीतच आहे. पण मनो-मीमांसेच्या शोध-ज्योतींत तिचें अंतरंग जों जों आपण निरखून पाहू, तों तों आपण विस्मयानें व आनंदानें स्तब्ध होतों. किंबहुना आपल्या मनावर भावनेचा खोल ठसा उमटतो व विचारांचें दाट दडपण पडतें. थोर कला-कृतीचें लक्षण हें नव्हे काय ?



बहीण-भावाच्या पाठशिवणीचा खेळ चालतो ना ? तशी मौज लघुकथा व लघुनिबंध यांनीं मराठींत उडवून दिली. साधारणपणें १९२० ते १९३० या दशकांत लघुकथा लोकप्रियतेच्या लाटेवर चढत होती, तर १९३० ते १९४० या काल-खंडांत लघुनिबंधांची कमान चढती होती. दिवसेंदिवस जनतेचें जीवन अधिकाधिक धावपळीचें, धांदलीचें होत आहे. क्षणभर थांबून, श्वास टाकायला किंवा चिंतन करायला उसंत आहे कोठें ? मुंबईतील लोकांचें विश्रांति-स्थळ म्हणजे बस्-स्टॉप हेंच. एकाग्र गहन तत्त्वाचें किंवा सूक्ष्म विचाराचें शांतपणें चिंतन करण्यास फुरसद आहे कोणास ? वाचन केलें तरी तें धांवतें-उडतें; आणि तेंहि बहुधा उथळ लेखनाचेंच. ही परिस्थितीची भूक भागविण्याचें कार्य आरंभीं लघुकथेनें व तिच्या पाठोपाठ लघुनिबंधानें मराठी साहित्यांत केलें. कादंबरीपेक्षां लघुकथा ही लिहिण्यास व वाचण्यास लहान व सोपी; पण त्याहूनहि लहानसर व सुकर असें लेखन लघुनिबंधाचें. म्हणून लघुनिबंधाकडेच नवीन लेखकांचा ओढा होता व त्यांची वाचकवर्गामध्यें चांगली चलती होती. आजहि कोणत्याहि मासिकांत लघुकथा व लघुनिबंध यांना हक्काचें स्थान व मानाचें पान मिळाल्याशिवाय रहात नाहीं.



या दोन्ही अभिनव वाङ्मय-प्रवाहांचे प्रारंभींचे पूर आतां ओसरले असून त्यांचे नित्याचे संथ प्रवाह चालू आहेत.

लघुनिबंधाचा आत्मा

छोटी कादंबरी म्हणजे लघुकथा नव्हे. तसाच छोटा निबंध म्हणजे लघुनिबंध नव्हे. लघुनिबंधांच्या विषयांत चमत्कृति असते, भाषेंत खेळकरपणा असतो आणि मांडणींत सैलपणा दिसतो. पूर्वी स्वास्थ्याच्या काळांत, संध्याकाळच्या वेळेस, अंगणांत घोंगडी टाकून, कामधाम आटोपून आलेले लोक गार वाऱ्यांत शिळोप्याच्या गप्पा मजेमजेनें, हसतखेळत मनमानेल तशा मारीत असत; त्यांची जागा आतां छापील लघुनिबंधांनीं घेतली आहे, असें म्हटलें तरी चालेल. आतांहि पुण्या-मुंबईसारख्या शहरांत, रात्रींचें जेवण झाल्यावर, प्रशांत व धवल अशा चांदण्यांत, टेकडीवर किंवा समुद्रकांठावर, तरुण मित्रमंडळी, धोतराचा सोगा हातावर टाकून किंवा किल्ल्यांची सांखळी गरगरा तर्जनीभोंवती फिरवीत, रमतगमत गप्पासप्पा छाटीत जातात ना? ती त्यांची त्यावेळची मनोवृत्ति, हाच लघुनिबंधाचा पाया आहे, गाभा आहे, आत्मा आहे. लघुनिबंधांत काव्य असतें, विनोद असतो व तत्वज्ञानहि असतें-पण सारें कळत-न-कळत आलेलें. या सर्वांचें प्रमाण लघुनिबंधांत किती असावें हें श्री. वि. स. खांडेकर यांनीं आपल्या सुरम्य भाषेंत निवेदन केलें आहे. ते म्हणतात, "लघुकथा, निबंध, गद्यकाव्य आणि विनोदी लेख या लघुनिबंधाच्या चतुःसीमा आहेत असें म्हटलें तरी तें फारसें चुकीचें होणार नाहीं. मात्र एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. लघुनिबंधांतला काव्यविलास म्हणजे बागेंतली सहल नव्हे. शेतांतल्या पायवाटेनें जातांना मधून-मधून जशीं रानफुलें दिसतात, तसें लघुनिबंधांतलें काव्य असायला हवें. या लेखनप्रकारांतला विनोद वळवाच्या पावसासारखा असून चालणार नाहीं. पहाटे पडणाऱ्या दंवाप्रमाणें त्याचें स्वरूप असलें म्हणजे तो फार खुलून दिसतो. कांहीं कांहीं लघुनिबंध गोष्टीवजा वाटले तरी त्यांत कथेला आवश्यक असणारी एकाग्रता नसावी हेंच बरें. निबंधांप्रमाणें लघुनिबंधालाहि तात्विक

बैठकीनें उठावदारपणा येतो. पण त्यांतलें तत्वप्रतिपादन हें तळ्यांत फुलणाऱ्या कमळासारखें मोहक वाटलें पाहिजे; रानांत उगवणाऱ्या झाडांप्रमाणें तें भासतां कामा नये."

लघुकथा व लघुनिबंध

लघुकथेला सामान्यतः कथानक असतें, पात्रांचे स्वभाव–विशेष असतात आणि आदि-मध्य-अंत यांची मर्यादा पण असते. परंतु लघुनिबंधाचें सारें जीवन स्वैर. अनियम हाच त्याचा नियम. कोणत्याहि एकाच चौकटींत बसणारें तें चित्र नव्हे. जिवलग मित्राची सलगी ही त्याची जीवन-ज्योत आहे. त्यामुळें त्याला बंधनें नाहींत. पण त्यामुळेंच त्यांचें लेखन अवघड ठरतें. पायाला चाकें लावून रस्त्यावरून धावणाऱ्याला गाडींत बसून जाणाऱ्यापेक्षां अधिक तोल संभाळावा लागतो.

लघुकथा व लघुनिबंध यांमधील हा फरक सांगतांना खांडेकर म्हणतात, " लघुकथेला कथासूत्राची आवश्यकता असल्यामुळें, कठड्याचा आधार घेऊन जिना उतरणाऱ्या मुलाप्रमाणें नवखा लेखक तिची रचना थोडीफार व्यवस्थित करूं शकतो. पण जिन्याला कठडा नसला म्हणजे लहान मूल ठेचाळलें कीं तें गडगडत खालीं जातें. सध्याच्या लघुनिबंधांतहि असेच अपघात होत असावेत. संपन्न व आकर्षक व्यक्तित्वाशिवाय आणि तें स्वाभाविकपणें प्रगट करणारी वैशिष्ट्यपूर्ण लेखनशैली साध्य झाल्याशिवाय या लेखन-प्रकारांत लेखकाला यश मिळणें कठीण आहे. "

सायकल सावकाश चालविणें कठीण असतें, व सोपें लिहिणें अवघड असतें, तसेंच लघुनिबंध लिहिणें हें एका दृष्टीनें निबंध किंवा लघुकथा यांच्यापेक्षां बिकट असतें. सर्कशींतील विदूषकाच्या आडव्यातिडव्या उड्या सहज साधलेल्या दिसल्या तरी त्यांना कौशल्य कमालीचें लागतें.

आत्मनिष्ठ लेखन

निबंध हा पोक्त पंतोजीप्रमाणें उपदेश करतो, तर लघुनिबंध हा जानीदोस्ताप्रमाणें कानगोष्टी करतो. निबंधामध्यें भर दुपारचें ऊन रखरखत असतें, तर लघुनिबंधावर अरुणोदयाची शीतलता, प्रसन्नता व गुलाबी रंग

पसरलेला असतो. निबंध हा जर दोन तटांमधून संथपणें वहाणारा, पांथस्थांची तहान भागविणारा व पिकांना पोसणारा नदीचा प्रवाह मानला, तर लघुनिबंध म्हणजे दृष्टि सुखविणारें व मन रिझविणारें असें थुइथुइ उडणारें कारंजें होय. निबंधांत तर्कशुद्ध विचारसरणी, मुद्देसूत मांडणी, प्रौढ भाषा, गंभीर विषय आणि त्या विषयाचें सांगोपांग व वस्तुनिष्ठ (Obejctive) विवेचन आवश्यक असतें, तर लघुनिबंधामध्यें चमत्कृतिपूर्ण प्रतिपादन, सैल रचना, खेळकर भाषा, क्षुल्लक विषय व त्या विषयाच्या एका कोपऱ्यावर आत्मनिष्ठ (Subjective) वृत्तीनें प्रकाश टाकावयाचा असतो–स्वतःच्या आवडीनिवडी, लकबी–लहरी, विचार–विकार अगदीं सलगीनें सांगावयाचे असतात. निबंधकार उपदेश करून शिष्यवर्ग निर्माण करतो, तर लघुनिबंधकार गप्पा मारून मित्र जोडतो. निबंधाचा संबंध लेखकाच्या मेंदूशीं असतो, तर लघुनिबंधाचा संबंध हृदयाशीं असतो–किंबहुना लेखकाचा सारा आत्माच त्यांत प्रतिबिंबित झालेला असतो.

समाज-क्रांतीचीं साधनें

निबंध व लघुनिबंध या दोहोंचीं स्वरूपें व कार्ये भिन्न असलीं, तरी त्या दोहोंचाहि साहित्याला मोठा उपयोग आहे. इंग्रजींत बेकन व मेकॉले यांनीं आपल्या विचारांची छाप निबंधाचे द्वारांच पाडली. फ्रेंचमध्यें निबंध लिहून रुसो व व्हॉल्टेअर यांनीं सबंध राष्ट्राला राजकीय क्रांतीचे सुरुंग लावले, तर जर्मनींत ल्यूथर व नीत्शे यांनीं सर्व युरोपभर धार्मिक क्रांतीचा वणवा पेटविला, तो विचारप्रधान निबंध लिहूनच. मराठींतहि 'मालाकार' चिपळूणकर व लो. टिळक या जोडीप्रमाणेंच प्रा. परांजपे व बॅ. सावरकर या युतीनेंहि स्वराज्याचा संग्राम निबंधाच्या शस्त्रांनींच चालविला आणि प्रिं. आगरकर यांच्या तीक्ष्ण लेखणींतून जळत्या निखाऱ्याप्रमाणें बाहेर पडलेल्या निबंधांनींच महाराष्ट्रांत सामाजिक सुधारणेचा अग्नि पेटविला. राजकीय असो, सामाजिक असो, धार्मिक असो–सर्व प्रकारच्या क्रांतीची प्रेरणा जन–मनांत उत्पन्न करण्याचें कार्य निबंधांनीं केलें आहे.

लघुनिबंधाचे जनक

इंग्रजी भाषेंत लँब, लिंड, ल्यूकस वगैरे लेखकांनीं सुंदर लघुनिबंध लिहिलेले आहेत. पण पहिल्या महायुद्धाच्या प्रारंभीं गार्डिनर यांनीं जे गंमतीदार व आशावादी लघुनिबंध लिहिले, त्यावर उल्हासाची व सलगीची कांहीं वेगळीच झाक आहे. डास, आगगाडी वगैरे साध्यासाध्या विषयावर या कुशल ललित लेखकानें आपलें कसबी कलम हलक्या हातानें चालविलें. 'हवेंत तरंगणारीं पानें,' 'समुद्र–किनाऱ्यावरील शिंपले' इत्यादि त्यांचे लघुनिबंधसंग्रह विशिष्ट संप्रदाय निर्माण करणारे आहेत. मराठी भाषेमध्यें लघुनिबंधाचा प्रारंभ करण्याचा मान प्रा. फडके यांचा आहे. १९२६ सालीं 'रत्नाकर' मासिकांत 'सुहास्य' ही आपली पहिली 'गुजगोष्ट' लिहून त्यांनीं वाचकांना साहित्यांतील एक नवेंच मिष्टान्न चाखावयास दिलें. कादंबरीच्या स्वरूपावर अभिनव व मनोरम अशी कांति चढविण्याचें श्रेय त्यांनीं पूर्वीच मिळविलें होतें, त्यांत या नव्या वाङ्मय प्रकाराच्या उद्घाटनानें त्यांनीं रुचिर भर घातली. "मार्मिक आणि नवे विचार, आणि ते पुढें मांडण्याचें लालित्य ही गुजगोष्टी लिहिण्याची मुख्य सामुग्री होय." असें लघुनिबंधाचें वर्णन फडके यांनीं केलें आहे. लघुनिबंधाचा विषय 'सामान्य दृष्टीला क्षुद्र अगर उपेक्षणीय' असतो, पण त्यांतूनच लपलेलें सौंदर्य शोधून–उकलून दाखविणें हेंच लघुनिबंधकाराचें कसब. "अज्ञानाची महती, पांचामुखी सैतान, व्यवस्थितपणाचें वेड, वाट चुकल्याचा आनंद," इत्यादि नुसत्या नांवावरूनहि लघुनिबंधाचा खेळकरपणा व विचित्रपणा सहज लक्षांत येण्यासारखा आहे. छत्री, छबी, पत्रें, लिफाफे, सिगारेट, खिडकी, फाटका शर्ट, पांढरा केस– असलेहि विषय लघुनिबंधाला चालतात–किंबहुना असलेच !

सौंदर्याचे पूजक

लघुनिबंधकाराला जे गुण अवश्य, ते फडके यांच्या अंगीं विपुल आहेत. त्यामुळें ते जसें क्रमानें तसेंच पात्रतेनेंहि 'आद्य लघुनिबंधकार'च ठरतात. ते तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक असल्यानें सूक्ष्म विचार व मनोगाहन

हे दोन गुण त्यांच्या लेखनांत उतरले आहेत. त्यांनीं नाना शहरांत वास्तव्य केल्यानें व दूर दूर प्रवास केल्यानें त्यांच्या ज्ञानाला अनुभवाचा सुगंध लाभलेला आहे. नृत्य, संगीत, क्रिकेट,–इत्यादि कलांची आसक्ति त्यांचे ठायीं असल्यानें त्यांच्या लेखनांत प्रसन्नता खेळते. 'जीवन म्हणजे धूर (Life is a smoke)' हें त्यांचें जीवन-विषयक तत्त्वज्ञान असल्यानें जीवनांतील सौंदर्याचे दाणे टिपून सदैव आनंदी रहाण्याची त्यांची वृत्ति आहे. म्हणून त्यांचे लघुनिबंध हसरे आहेत. आणि सहजसुंदर भाषाशैली व यथातथ्य वर्णनशैली यांची किमया तर त्यांनीं कादंबरीच्या सृष्टींत पूर्वीच करून दाखविलेली. त्यामुळें, नाटक व लघुकथा या क्षेत्रांत फारशा धावा न काढणारे फडके कादंबरीप्रमाणेंच लघुनिबंधाच्या क्रीडांगणावरहि सीमापार टोले मारूं लागले व प्रेक्षकांच्या टाळ्या मिळवूं शकले.

जीवनाची रूपरेषा

ता. ४ ऑगस्ट १८९४ रोजीं प्रा. नारायण सीताराम फडके यांचा जन्म झाला. नगर जिल्ह्यांतील कर्जत या खेडेगांवीं ते जन्मले. तरी दहाव्या वर्षापासून पुढील सारें शिक्षण पुण्यास झालें. १९१० सालीं त्यांनीं मॅट्रिकचें प्रवेशद्वार ओलांडलें. नंतर ते फर्गसन कॉलेजांत गेले. क्रिकेट व टेनिस खेळण्यांत ते पुढें असत. पत्ते खेळण्यांत ते पटाईत होते. नाटकांत भाग घेण्यास ते उत्सुक असत. या खेळाबरोबरच बौद्धिक विकासांकडेहि त्यांचें लक्ष असे. सभेंत सफाईदार भाषणें ते करीत. १९१४ सालीं बी. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गांत ते उत्तीर्ण झाले. त्यानंतर १९१७ सालीं त्यांनीं एम. ए. च्या परीक्षेंतहि तसेंच भरघोस यश मिळविलें. तत्त्वज्ञान विषयाचीं विद्यापीठाचीं पारितोषिकें त्यांनीं पटकाविलीं. ही दुसरी पदवी त्यांच्या हातांत पडण्यापूर्वीच 'प्राध्यापकी' त्यांच्या गळ्यांत पडली. १९१६ सालीं न्यू पूना कॉलेज निघालें. त्याबरोबर फडके तेथें गेले व तर्कशास्त्र शिकवूं लागले.

विविध व्यवसाय

१९१९ सालीं म. गांधींनीं असहकारितेचें रणशिंग फुंकलें. तें

ऐकतांच फडके यांनीं प्राध्यापकाचा झगा झुगारून दिला व 'मराठा' या इंग्रजी साप्ताहिकांत सहसंपादकाचें काम केलें. 'केसरी'तहि ते हौसेनें 'विविध–विचार–तरंग' लिहीत. १९२० च्या जूनपर्यंत वृत्तपत्रीय सृष्टीमध्यें फडके वावरत होते. पण त्यांना गांधीजींच्या चळवळीची गोडी वाटेना आणि त्यांचें मन वृत्तपत्रीय लेखनांत रमेना. ते थेट दिल्लीच्या एका खिश्चन कॉलेजमध्यें तत्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून गेले. तेथें त्यांचें वास्तव्यहि होतें एका खिश्चन कुटुंबांत. ही जागा हंगामी होती. एक वर्ष पुरें होतांच ते परत पुण्यास आले. १९२२ च्या जूनमध्यें सिंध–हैद्राबाद–मधील कॉलेजांत ते प्राध्यापक म्हणून गेले. तेथें ते सुमारें चार महिनेच राहिले. तेथून ते नागपूरच्या कॉलेजमध्यें १९२४ च्या जूनमध्यें दाखल झाले. तीनचार महिन्यांत तीहि नोकरी त्यांना, त्यांच्या विशिष्ट मतांमुळें, सोडावी लागली. पुनः ते वृत्तसृष्टीच्या आश्रयास आले. १९२५ पासून सुमारें वर्ष दीडवर्ष ते मुंबई येथील एका इंग्रजी पत्राचे संपादक होते. १९२६ च्या जूनपासून ते कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजांत प्राध्यापकाच्या खुर्चीवर जे जाऊन बसले, ते १९५१ सालीं सेवानिवृत्त होईपर्यंत.

त्यांच्या कथा, त्यांच्या कादंबऱ्या, त्यांच्या गुजगोष्टी, त्यांचीं चरित्रें, त्यांचीं नाटकें या सर्वांचा सत्कार महाराष्ट्रानें मोठ्या प्रेमानें केला आहे. द. म. साहित्य संमेलनानें त्यांच्या "प्रतिभा–साधन" ग्रंथास पांचशें रुपयांचें पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केला. १९३९ सालीं भिरज येथें भरलेल्या 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें' अध्यक्षपद त्यांना देण्यांत आलें. एवढेंच नव्हे, तर रत्नागिरी येथें १९४० सालीं भरलेल्या 'महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे' अध्यक्षस्थानींहि त्यांची निवड झाली.

सहलींतील खेळकरपणा

लघुनिबंध म्हणजे बौद्धिक सहलच म्हणाना. आणि सहल कशी असते? फडके यांनीं आपल्या एका उत्कृष्ट गुजगोष्टींत सहलींतील सलगी, मनाचा मोकळेपणा व वृत्तीचा खेळकरपणा या सर्वांचें वर्णन फार बारकाईनें व बहारीनें केलें आहे. " चांदण्या रात्रीं तर फिरण्याची मिजास कांहीं

औरच असते. दिवस संपला असल्याळें शिष्टाचारार्चीं बंधनें शिथिल झालींशी वाटतात. " हें जें स्वातंत्र्य सहलवाल्याला, तेंच लघुनिबंधकाराला. तो सहज म्हणून बोलतो पण त्यांतून विनोद फुलतो, काव्य उमलतें, तत्त्वज्ञानहि विकास पावतें; पण कसें ? तर दिवाळींत मुलें पाण्यांत बारीक बारीक चकल्या टाकतात, आणि त्यांतून रंगीबेरंगी फुलें निघतात तसें. लघुनिबंधाचा जसा प्रारंभ, तसाच शेवटहि चित्ताकर्षक करण्याची कला 'जादूगार' फडक्यांना वश आहे यांत नवल काय ? ' पोरखेळ ' या लघुनिबंधाची सुरुवात करतांना ते म्हणतात, " मला लाज वाटली. मी अगदीं शरमून गेलों. माझा सारासार विचार मला म्हणाला, ' तुला हें शोभतं कां ?' अन् त्या प्रश्नाला मला उत्तर देतां येईना. " अशी इतकी लाजिरवाणी गोष्ट ती कोणती ? अशा संशयांत वाचक बुडाला म्हणजे मग फडके हळूच, हसतहसत, विस्तारानें वर्णन करून सांगतात कीं, कचेरींतून घरीं जातांना मी क्रिकेट पहात उभा राहिलों.

चित्तवेधक प्रारंभ

अशा शरमिंधेपणाऐवजीं कधींकधीं शूरपणाचें अवसान निबंधकाराला येतें व त्यामुळें वाचकाचें चित्त त्याकडे वेधतें. ' कारागीर ' या लेखाचा प्रारंभ असा शौर्यपूर्ण व हास्यपूर्ण आहे. " कधीं कधीं वाटतं, खुशाल दाढी वाढवावी आणि या दैनिक श्मश्रूच्या गुलामगिरींतून कायमचं मोकळं व्हावं ! गुलामगिरी नाहीं तर काय हो ? कोण हा खटाटोप, अन् कसली ही हनुवटीवर धरलेली दैनिक कर्तव्याची धार ! "

विचार, मांडणी, भाषा सारें कांहीं विनोदी. ' शाई ' या निबंधाला तोंड लागतें तें अशा गंमतीदार लेखनामुळेंच. त्यामुळें वाचकाला पुढें वाचण्याची सारखी ओढ लागते. ' शाई ' ची सुरुवातच अशी आहे— " अतिपरिचयात् अवज्ञा ! नाहीं तर ' शाई ' या विषयावर ग्रंथ लिहिण्यांतच किती तरी शाई खर्च करतां येण्यासारखीं आहे ! निदान मला त्या वेळीं असें वाटलें खरें ! मी सकाळीं कायसें लिहावयासाठीं टेबलाजवळ बसलों आणि दौतींत लेखणी—भलतेंच ! टांक बुडवितों तों शाई

नाहीं. मुंबईतल्या चाळींतल्या एखाद्या स्त्रीनें मोठ्या आशेनें नळावर जावें आणि पाणी गेल्यावर कोणीतरी खोलून ठेवलेल्या नळाचें कोरडें ठणठणीत तोंड तिच्या दृष्टीस पडावें म्हणजे तिला जसें होतें तसेंच थोडें फार मला झालें ! उठलों, शेल्फवर शाईची मोठी शिशवी होती ती काढली, व दौतींत शाई ओतून व्यावयासाठीं तिचें तोंड उघडूं लागलों. शिशवीच्या आंत डौलानें चमकणाऱ्या त्या मनोहर जांभळ्या द्रवाकडे पहातच रहावेसें मला वाटलें. " किती सुंदर शब्द-चित्र काढलें आहे फडके यांनीं ! कादंबरीकारच आहेत ते ! यापुढें शाईचें जें माहात्म्य त्यांनीं गाइलें आहे, तें वस्तुतः साहित्याचेंच आहे. साहित्याचें एक साधन म्हणजे शाई. याच रीतीनें दौत, टाक, कागद वगैरेंचेहि हेंच गुणवर्णन करतां आलें असतें. आणि तें तितकेंच प्रस्तुत—किंवा अप्रस्तुत—ठरलें असतें. तीक्ष्ण तर्काची कठोर कसोटी लघुनिबंधाला लावून चालत नाहीं. आपल्या गप्पांना, खेळांना, छंदांना आपण ती कोठें लावतो ? ती लावली तर तर्कशुद्ध प्रतिपादनाचे, गंभीर भाषाशैलीचे व महान विषयावरचे ते तात्त्विक निबंधच ठरतील. पण त्या ' दादाचे ' गुण या ' छोट्या भाई ' च्या अंगीं कसे येणार ? तशीच चटकदार सुरुवात ' पत्रें ' या निबंधाचीहि आहे. ती अशी—" मानवी संस्कृतीला आलेल्या विविध फळांचीं तुलना केली तर पत्रांना चिमुकल्या, रसदार, मधुर काबुली द्राक्षांचीच उपमा द्यावी लागेल. काबुली द्राक्षांचें असें आहे कीं ती पाहिल्याबरोबर मनाला मोह होतो; आणि शिवाय तीं सबंधच्या सबंध चटदिशीं खातां येतात. आपल्याला पत्रें आलीं कीं, तींदेखील विलक्षण मोह घालतात. तीं घाईनें वाचल्याखेरीज आपल्याला दुसरें कांहीं सुचत नाहीं. आणि तीं चटकन् साद्यंत संपवितां येण्यासारखीं असून त्यांतील कोणताही भाग त्याज्य नसतो."

लघुनिबंधाच्या प्रारंभाचा आणखी एक नमुना पहाण्यासारखा आहे. ' ऐन पंचविशी ' याची सुरुवात फडक्यांनीं कादंबरीला साजेशा वर्णनानें केली आहे. ती अशी, " समुद्र अतिशय खवळलेला होता. वारा असा सोसाट्याचा सुटला होता, कीं किनाऱ्यावर उभ्या असलेल्या स्त्रियांना आपले पदर व केंस सांवरतां सांवरतां पुरेवाट झाली होती; आणि त्यांच्या

त्या संभ्रमाकडे पुरुषमंडळींच्या चोरट्या नजरा-पुनः पुन्हां धांवत होत्या. समुद्राच्या उसळत्या लाटा धांवत येत त्या किनाऱ्याच्या फरशीवर हापटत, तेव्हां मोठी गर्जना होई, आणि सफेत फेंसाच्या मोत्यांचे सरच्या सर हवेंत उंच उडत !"

अखेर साधली !

मेजवानी-पानसुपारी आटोपल्यावर पाहुण्यांच्या हातावर अत्तर लावावें व त्यांना निरोप द्यावा; त्याप्रमाणें फडके आपल्या निबंधाच्या अखेरीस एकादा मधुर विचार ठेवून देतात. 'नव्या इमारती'ची अखेर ते अशी करतात, "मीं त्या चित्रपटगृहांत प्रथम पाऊल टाकलें तेव्हां अशाच कांहींशा विचारांची माझ्या मनांत गर्दी झाली होती. आणि नंतर थिएटरांतले दिवे विझले, पडदा दूर सरकला, आणि आंतल्या रजत-पटावर वेणीचा शेपटा जिच्या खांद्यावर खालीं रुळत आहे अशी स्त्री प्रगट होऊन तिनं तुतारीचे उच्च स्वर काढलेले मीं ऐकले, तेव्हां अंतः-करणांतलं सगळं विषादशल्य नाहींसें होऊन मीं मनाशीं म्हटलं, बरोबर आहे, नव्या कालाचं असंच स्वागत केलें पाहिजे !"

प्रारंभाप्रमाणेंच शेवटहि सहजसुंदर भाषेनें व गंमतीदार विचारानें करण्याकडे फडके यांचें लक्ष असतें. 'पोरखेळ' या निबंधाचा समारोप करतांना ते प्रतिज्ञापूर्वक म्हणतात, "पण मी आतां स्वतःची वचना करून घेणार नाहीं. लोकल गाडीची मी वाट पाहणार; इतकंच नाहीं तर ती आली, कीं आरोळीसुद्धां ठोकणार, आणि वाजवितां आली तर शिटीसुद्धां वाजविणार ! पाहीना मला कोणीं पाहिलं तर आणि ठेवीना नांवं ! स्वतःची शरम वाटण्याऐवजीं मला त्यांचीच कींव येईल !"

विनोदाचें वातावरण

जसा आरंभ, तसाच शेवट-आणि तसाच सारा निबंधहि-गंमतीचा, सलगीचा करण्याचा कटाक्ष फडके ठेवतात. त्यांच्या निबंधाचा देह आपादमस्तक रमणीय व कांतिमान् आहे. वास्तविक त्यांची वृत्ति श्लेष-अनुप्रासादि शब्दालंकार करण्याची नाहीं, किंबहुना उपमा-उत्प्रेक्षांचा

षाऊस पाडण्याचीहि हौस त्यांना नाहीं. पण लघुनिबंधाचें सारें वातावरण विनोदी रहावें म्हणून ते त्या सवंग साधनांचाहि मधून मधून उपयोग करतात. 'गंध,' 'शाल,' वगैरे शब्दांवर ते जातां जातां श्लेष करतात. 'बाजार' या निबंधांत ते म्हणतात, "शाल अंगावर असूनहि मी थंडच झालों! शालीऐवजीं शालजोडीतले मिळाल्यासारखा चेहरा खचित झाला असेल माझा पैसे देतांना!" तशीच शब्द-लीला "न वाचलेल्या ग्रंथांची गोडी" या निबंधांत त्यांनीं पुढीलप्रमाणें केली आहे, "पुस्तकांनीं कपाटें भरलीं कीं अंतःकरणाच्या कपाटांतला त्याजविषयींचा आपुलकीचा ग्रंथ आटोपलाच म्हणून समजावें."

'नको असलेलीं पुस्तकें' हा लघुनिबंध तर अथपासून इतिपर्यंत विनोदानें दरवळलेला आहे. इंद्रधनुष्यांतील रंगाप्रमाणें अशा लघुनिबंधाची सीमा कोठें संपते व लघुकथेची हद्द कोठें सुरू होते हें सांगणेंच कठीण! 'राशीला ग्रह आला,' 'साडेसाती' इत्यादि शब्दावरील श्लेष तर हास्यकारक आहेतच, पण पुस्तक देणाऱ्याला त्याचेंच पुस्तक 'दुसरें' म्हणून परत करणें ही घटनाहि विनोदी कथेला शोभण्यासारखी आहे. त्यावेळीं नायकाची जी धांदल उडते ती कोणाच्याहि मुरकुंड्या वळविणारी आहे. तसाच 'छबी' हा निबंध हास्यरसानें थबथबलेला आहे. लो. टिळकांना Steady, Smile सांगण्यांतील विरोध किती सूक्ष्म आहे.

बहुमोल अलंकार

सुंदर व समर्पक उपमा देण्यांत तर त्यांचा हातखंडाच आहे. 'सुहास्य' या आपल्या पहिल्याच निबंधांत ते लिहितात, "खरें पाहतां हंसतमुख हें उमलत्या कळीप्रमाणें किंवा चतुर्थीच्या चंद्रकलेप्रमाणें आहे. तें कोठेंही दिसलें तरी पाहणाराची वृत्ति प्रसन्न झालीच पाहिजे."

समर्पक उपमाच काय, अन्वर्थक शब्दहि शोधण्याची दक्षता फडके घेतात. तें काम किती कठीण आहे हें त्यांनीं किती मौजेनें सांगितलें आहे. "डोंगरमाथ्याच्या अगदीं कडयावर, धोक्याच्या जागीं फुललेल्या रानगुलाबाचें गेंद दिसावेत व मग ते हस्तगत करण्यासाठीं साहस करावं,

किंवा दुसऱ्याच्या परडयांत पारिजात फुलांचा सडा पडलेला असावा व तिथें पोंचण्यासाठीं कांटेरी कुंपण तुडवीत जावं, किंवा तळ्यांतल्या नील-कमलांनीं मोहनी घालावी, अन् त्यांच्यापर्यंत पोंचायसाठीं कमरेइतक्या पाण्यांत उतरणं भाग असावं, तद्वत हवे ते शब्द हुडकावे लागतात. ''

' पोरखेळ'मध्यें पुढील उपमा किती चपखल आहे, '' उन्हाळ्यांत सांचलेला पाचोळा पावसाच्या पहिल्या सरीनं वाहून जावा तशी फाट-काच्या दोन्ही बाजूस थोपलेली रहदारी दोन्ही दिशांनीं वाहून गेली. '' तशीच ' ताज कलम'मधील उपमा– '' थिएटरांतल्या सगळ्या जागा भरल्यावर गयावया करणाऱ्या फुकट्यांना मॅनेजर जागा दिसेल तिथें उभा करतो. त्याप्रमाणें त्यांच्या पत्राच्या भोंवतालीं मजकूर गर्दी करून उभा राहिलेला असायचाच ! '' पण पुढेंपुढें ही अलंकारिक भाषाशैली फडके यांनीं टाकून दिली आणि दोन मित्रांच्या सुखसंवादांतील सहजसुंदर भाषाच तेवढी वापरली.

भाषेची ऐट

' ऐन पंचविशी ' या निबंधांत तारुण्यांतील उमेद व उत्साह यांचें वर्णन फडके यांनीं सहजतेनें पण ऐटदारपणें कसें केलें आहे, पहा— '' ऐन पंचविशी ती ऐन पंचविशी ! तिची सर दुसऱ्या कोणत्याच वयाला यावयाची नाहीं ! पंचविशी हें एक असें वय आहे कीं, त्या वयांत क्षितिज लांब वाटत नाहीं, आकाश आटोक्याच्या पलिकडचें वाटत नाहीं, सागर अथांग वाटत नाहीं–सृष्टींतील कोणतीही वस्तु किंवा व्यक्ति आप-ल्याला मिळवितां येणार नाहीं अशा स्वरूपाची भासत नाहीं ! तें वयच असें आहे कीं, त्या वयांत जगाच्या दृष्टीला कदाचित् वेडेपणाच्या वाटतील असल्या गोष्टी आपल्याला कराव्याशा वाटतात, आणि त्या करण्याची धमक आपल्या शरिरांत असते. त्या वयांतच नदीच्या पुरांत उड्या टाकून पोहण्याचें सौख्य त्यांना उपभोगतां येतें; कोठें आग लागलेली ऐकली तर ती विझविण्यासाठीं दोन दोन मैल आपण धांवत जातों; उत्तम क्रिकेट सामना पहावयास मिळावा म्हणून झाडांच्या फांद्यावर चढून बसण्यांत

शरम वाटत नाहीं. लोकांना दिसणाऱ्या अडचणी दिसत नाहींत, पर्वता-एवढालीं संकटें ठेंगणीं वाटतात व शत्रूंच्या छळाचा समुद्र गुडघ्याइतकाच खोल वाटतो ! ”

मनोहर वर्णनशैली

साधाच विचार पण तो मनोहर भाषेनें खुलवून मांडला कीं, तो चित्तांत कसा दरवळत रहातो, याचे नमुने फडके यांच्या लघुनिबंधांत अनेक आहेत. ‘ एक रात्र आणि पहाट ’ याचा श्रीगणेशा करतांना ते लिहितात . “ पुस्तकांच्या तीन जाती आहेत. कांहीं अशीं असतात कीं, ती भर्रकन् वाचून टाकावीं. आपण गाडी थांबल्या वेळांत स्टेशनवरचें आइस्क्रीम नाहीं का संपवीत ? तशीं कांहीं पुस्तकें अशीं असतात कीं, उगाच चाळावीं आणि ठेवून द्यावीं. भरल्या पोटावर आपल्यापुढें कोणीं बशीभर चिवडा ठेवला म्हणजे त्यांतल्या दोन काजूबिया खाऊन जशी ती बशी आपण बाजूला सारतों ना ? त्याप्रमाणें. पण कांहीं पुस्तकें मात्र आपल्या मनाला अत्यंत आवश्यक अन्न देणारीं असतात व तीं त्या अन्ना-प्रमाणें सावकाश चघळून पचविलीं पाहिजेत. ”

‘ बाजार ’ या निबंधांतहि वर्णन व विचार यांचा सुंदर मेळ बसला आहे. मंडईचें वर्णन करतांना फडके लिहितात,

“ पुण्याच्या मंडईत घटका अर्धी घटका रेंगाळण्यांत विलक्षण मौज वाटते. हरत-हेच्या ताज्या ताज्या भाज्यांचे ते प्रचंड ढीगच्या ढीग अन् कपड्यानं वरचेवर पुसून ज्यांची कांति वाढविली आहे व झिरझिरीत रंगीबेरंगी कागदाच्या बैठकींत ज्यांची स्थापना केली आहे, अशा सतरा प्रकारांच्या फळांनीं शिगोशिग भरलेले ते करंडे पाहिले कीं, डोळ्यांचं पारणं फिटल्या-सारखं वाटतं. धरित्रीच्या उदरांतून बाहेर आलेल्या त्या फलसृष्टीचा सुगंध मिळाला कीं, चित्तवृत्ती ताज्यातवान्या होतात. ”

नाट्यपूर्ण रीतीनें फडके मंडईतील दृश्यें उभीं करतात, तीं अशीं—“ ती पहा ती माळीण आपल्या भाजीची टवटवी कायम राहावी म्हणून तिच्यावर पाणी शिंपतां शिंपतां किती उल्हासानं “ पैशाला दोन

लावल्या " म्हणून ओरडते आहे ! कोंवळ्या लुसलुशीत खिऱ्यांच्या ढिगामागं बसलेला तो माणूस बघा कसा हसतो आहे व ऐटीनें तागडी झुकवितो आहे ! लालसर, पिवळसर टपोरीं बोरं विकणारी ती बाई पाहिलीत कशी उच्च रवानं सांगते आहे "साखरलाडू ! सस्ते लावले !" अशीं नुसतीं सुरेख शब्द-चित्रें काढून फडके थांबत नाहींत, तर त्यांच्या कृतींतून ते सिद्धांत मंथन करून काढतात, तो असा—" गर्दी, गलबला, धावपळ या गोष्टी माणसाच्या जीवनाला आवश्यक आहेत. त्यांच्या योगानंच अंतःकरणाचा कोठा साफ रहातो. एकान्तात मनुष्य चिंतन करूं शकतो, अन् बाजाराच्या उल्हासी गर्दींत त्याच्या चिंता निवळतात. "

आपलें मत वाचकाला आतां पटलें असेल, अशा आत्मविश्वासानें फडके शेवटीं वाचकांना असा सवाल टाकतात, " जिथें आपण एकमेकांचे धक्के मनावर घेत नाहीं, ओळख नसतांहि एकमेकांकडे पाहून हसतों, नसत्या चौकशी करूं शकतों, गर्दींत व गलग्यांत सामील होतों, त्या स्थलाचा मोह कुणाच्याहि मनाला पडावा, नव्हे काय ? ".

पुनःप्रत्ययाचा आनंद

' हरवली म्हणून सांपडली ' या विरोधाभासात्मक शीर्षकाच्या निबंधांत फडके लिहितात, " माझी टेबलाच्या खणाची किल्ली हरवली खरी; पण या केवळ्या सौख्यागाराची किल्ली मला सांपडली ! किंबहुना, ती हरवली म्हणूनच ही सांपडली ! " किल्ली शोधतां शोधतां फडताळांतील अडगळीच्या ज्या जुन्या वस्तु लेखकाच्या दृष्टीपुढें आल्या, त्यांनीं त्याची स्मृति जागृत केली, त्याला पुनःप्रत्ययाचा आनंद दिला आणि तीं अलगुजें, तीं सुवर्णपदकें, तो जाई कुत्रीचा पट्टा-या सर्वांशीं चिकटलेल्या भावना उसळून आल्या. त्यामुळें लेखकाच्या हृदय-कपाटाचेंच दार वाचकांना खुलें झालें—आणि हेंच लघुनिबंधाचें यश !

विचारांची चमत्कृति

एकच विचार, पण तो उलटा करून मांडला कीं, चमत्कृति उत्पन्न करतो, नाहीं ? ' खालीं डोकें वर पाय ' केलेल्या माणसाप्रमाणें त्याकडे

जो तो पहातो व हसतो. ' पहाटे उठा, वक्तशीर वागा, व्यवस्थित रहा ' इत्यादि आदेश पोक्त स्वभावाचे निबंध देत असतातच, पण त्याच्या उलट अपवाद म्हणून, ' उशीरा निजा, घड्याळाची गुलामगिरी टाका, मनमानेल तसें हिंडा ' असें कोणी सांगितलें तर किती गंमतीचें वाटेल ! ' रविवार ' या निबंधांत फडके असा उफराटा सिद्धांत सांगतात, " काम न करण्याचा रविवार आहे म्हणून सारीं कामं सुरळीत चाललीं आहेत ! विश्रांतीचं आश्वासन देणारा रविवार यायचा असतो म्हणून तुम्ही-आम्ही सहा दिवस कष्ट करतों. "

' न वाचलेल्या ग्रंथांची गोडी ' हा विचारहि असाच उफराटा आहे. फडके म्हणतात, " हाच आनंद न वाचतां ठेवलेल्या माझ्या संग्रहांतल्या त्या पुस्तकांत आहे. तीं पुस्तकें म्हणजे माझ्या ललाटीं मीच आपल्या हातांनीं आगाऊ लिहून ठेवलेल्या हर्षभराच्या घटकाच मला वाटतात. आपल्या नशिबांत भरपूर संपत्ति असल्याचें ज्योतिष्यानें सांगितलें म्हणजे जो आनंद होतो, तसलाच आनंद त्या पुस्तकांपासून मला पुनः मिळतो. वाचन-सौख्याचा विशुद्ध आनंद माझ्या नशिबांत भरपूर असल्याची ग्वाही तीं पुस्तकें मला हंसतमुखानें देतात. पुढें केव्हां उपयोगी पडावी म्हणून कृपण ज्याप्रमाणें संपत्ति सांचवून ती न खर्चितां तिच्याकडे नुसता वारंवार पाहतो, तद्वत् माझे भावी सुखाचे क्षण ज्यांत भरलेले आहेत तीं ही पुस्तकें पुनः पुनः पाहण्यांत व पुसून साफ करून जागच्या जागीं ठेवण्यांत मला अनिवार आनंद होतो. "

अमावास्येला पूर्ण चंद्र कोणी पाहिला आहे ? पण लेखकानें तो 'अंधारी रात्र' या आपल्या निबंधांत उत्पन्न केला आहे. देवतेनें प्रसन्न होऊन दोन चंद्र निर्माण केले व त्यांना आळीपाळीनें काम दिलें, ही लेखकाची कल्पना जितकी चमत्कृतीची, तितकीच सदैव चांदणें असणेंहि उद्वेगाचें ठरेल, हा तर्कहि विचित्रपणाचाच नव्हे काय ? अंधाऱ्या रात्रींच्या असंख्य चांदण्यांशीं 'बोलल्यावांचून बडबडतां येते'. हें काव्य चंद्रप्रकाशांत कोठून येणार ? असा सवाल लेखक करतो.

सुविचारांची गुंफण

लघुनिबंध म्हणजे केवळ साबणाच्या पाण्यांतून रंगीबेरंगी फुगे उडविण्याचा खेळ नव्हे. खेळकरपणा त्यांत अवश्य हवा, पण त्याच्या पोटीं सुविचारहि हवा. तो विचार जो तो लेखक आपापल्या 'प्रकृती'प्रमाणें मांडतो. फडके यांचा पिंड श्रीमंती, विलासी, ऐषआरामी; त्यामुळें त्यांच्या लघुनिबंधांत तसलेच विचार विखुरलेले आहेत. काचेच्या फुलदाणींत गुलाबाचीं फुलें ठेवावींत त्याप्रमाणें ते आपले आनंदी विचार लघुनिबंधांत मांडतात. सोन्याच्या तबकांतून मेवामिठाई ठेवावी तसें आयुष्याकडे सुखाच्या, महत्त्वाकांक्षेच्या, प्रवृत्तीच्या, दृष्टीनें पहावयास शिकणाऱ्या सिद्धांताची पखरण ते आपल्या लघुनिबंधांत करतात.

घड्याळ या लघुनिबंधांत ते सांगतात, " कोणत्या एका तरी गोष्टीची अशी वेडी आवड असायला पाहिजे, कीं जिच्या नादानं त्याला घड्याळाचा पूर्ण विसर पडेल. "

ग्रंथाला ' सुगंध ' लावण्याच्या अमेरिकन क्लृप्तीचा फोलपणा दाखवून, फडके उपदेश करतात, " ग्रंथाच्या पानागणिक लेखकाच्या लालित्याचा, विद्वत्तेचा अन् श्रद्धेचा परिमल येत असला म्हणजे त्या ग्रंथाला कृत्रिम सुगंध न लावतांही वाचकवृंद भ्रमरासारखे त्यावर लुब्ध होतात. सतत अभ्यासानं व दीर्घ परिश्रमांनीं हा टिकाऊ सुगंध आपल्या लेखणींत येईल अशा कटाक्ष लेखकानं ठेवला पाहिजे. हा परिमल इतका दिव्य आहे कीं, हजारों वर्षे झालीं तरी तो उडून जात नाहीं किंवा कमीही होत नाहीं. "

' नव्या इमारती' पाहून प्रथम आश्चर्याचा व खेदाचा धक्का बसला, तरी लेखक असें तत्त्वज्ञान निवेदन करतो, " चौफेर पसरत चाललेल्या पुणें शहरांतल्या नव्या शोभिवंत इमारतींकडे पाहून उत्पन्न झालेला विषाद नाहींसा करणारा असाहि एक विचार माझ्या मनांत येतो, ठिकठिकाणीं माझा मृत्यु घडत आहे. घडे ना ? मरतांमरतांच नव्या परिस्थितीचे नवे ताजे कोष धारण करून मी जगत आहें. याचा प्रत्यय मला पुनःपुन्हां येत असतांना त्या विनाशाचं दुःख मी काय म्हणून करावं ? होय, मी

मनाशीं अशीच समजूत धरली पाहिजे, कीं अंशतः मेल्यावांचून जीवनाची क्रिया सतत चालू राहत नाहीं. छायेवाचून प्रकाश नाहीं तद्वत् मेल्यावांचून जगतां येत नाहीं. ''

जीवनाचें तत्त्वज्ञान

' घरकुलांतलीं दुःखं ' या निबंधाच्या शेवटीं तर एकाद्या तत्त्ववेत्याप्रमाणेंच फडके उपदेश करीत आहेत—मात्र तो किती मनोहर रीतीनें पहाः—

'' आपली दृष्टि आकुंचित असली कीं, आपल्या लहानशा घरकुलांतलीं दुःखं आपल्याला मोठीं वाटूं लागतात, भेडसावूं लागतात. पण तेंच आपल्या घराचं छोटं अंगण सोडून हजारों माणसांच्या सुखदुःखांच्या विस्तीर्ण क्रीडांगणावर आपण पाऊल टाकलं, कीं सूर्य डोक्यावर येतांच पायाखालची सावली बिंदुमात्र व्हावी, त्याप्रमाणें भेसूर वाटणाऱ्या आपल्या क्षुद्र दुःखांची सांवली आपल्याला जवळजवळ दिसेनाशी होते !''

तसाच सुविचार ' आरसेमहाल ' या निबंधांत आहे. तो किती समतोल व लयबद्ध भाषाशैलीनें निवेदिला आहे पहाः—'' ज्याच्या अंतःकरणांत सौंदर्य असेल त्याच्या दृष्टीस सुंदर वस्तू पडतात, ज्याच्या अंतःकरणांत संगीत असेल त्याला मधुर स्वर ऐकूं येतात, ज्याच्या अंतःकरणांत स्नेह असेल त्याला मित्र मिळतात, ज्याच्या अंतःकरणांत प्रेम असेल त्याला प्रेमिकांची जोड होते. माणसाच्या अंतरंगाचीं प्रतिबिंबेंच त्याच्या भोंवतालच्या वस्तूंत अन् व्यक्तींत पडत असतात. जग म्हणजे एक विलक्षण आरसेमहाल आहे ! ''

' पोरखेळ ' पहाण्यांत गेलेला वेळ वायां जात नाहीं, त्याचाहि आपल्या आयुष्याला उपयोग असतो, याची मीमांसा फडके यांनीं सूक्ष्मपणें केली आहे, ती अशीः—

'' अशा पोरखेळांच्या मसाल्यावांचून जीवितांत गोडी उरायची नाहीं. तें रुचिहीन होईल. त्याचा लवकरच वीट येईल. माणूस आंबून जाईल. त्याचं तारुण्य आणखी त्याचा उत्साह फार दिवस टिकणार नाहीं.

सुविचारांची गुंफण

लघुनिबंध म्हणजे केवळ साबणाच्या पाण्यांतून रंगीबेरंगी फुगे उडविण्याचा खेळ नव्हे. खेळकरपणा त्यांत अवश्य हवा, पण त्याच्या पोटीं सुविचारहि हवा. तो विचार जो तो लेखक आपापल्या 'प्रकृती'प्रमाणें मांडतो. फडके यांचा पिंड श्रीमंती, विलासी, ऐषआरामी; त्यामुळें त्यांच्या लघुनिबंधांत तसलेच विचार विखुरलेले आहेत. काचेच्या फुलदाणींत गुलाबाचीं फुलें ठेवावींत त्याप्रमाणें ते आपले आनंदी विचार लघुनिबंधांत मांडतात. सोन्याच्या तबकांतून मेवामिठाई ठेवावी तसें आयुष्याकडे सुखाच्या, महत्त्वाकांक्षेच्या, प्रवृत्तीच्या, दृष्टीनें पहावयास शिकणाऱ्या सिद्धांताची पखरण ते आपल्या लघुनिबंधांत करतात.

घड्याळ या लघुनिबंधांत ते सांगतात, " कोणत्या एका तरी गोष्टीची अशी वेडी आवड असायला पाहिजे, कीं जिच्या नादानं त्याला घड्याळाचा पूर्ण विसर पडेल. "

ग्रंथाला ' सुगंध ' लावण्याच्या अमेरिकन क्लृप्तीचा फोलपणा दाखवून, फडके उपदेश करतात, " ग्रंथाच्या पानागणिक लेखकाच्या लालित्याचा, विद्वत्तेचा अन् श्रद्धेचा परिमल येत असला म्हणजे त्या ग्रंथाला कृत्रिम सुगंध न लावतांही वाचकवृंद भ्रमरासारखे त्यावर लुब्ध होतात. सतत अभ्यासानं व दीर्घ परिश्रमांनीं हा टिकाऊ सुगंध आपल्या लेखणींत येईल अशा कटाक्ष लेखकानं ठेवला पाहिजे. हा परिमल इतका दिव्य आहे कीं, हजारों वर्षे झालीं तरी तो उडून जात नाहीं किंवा कमीही होत नाहीं. "

' नव्या इमारती' पाहून प्रथम आश्चर्याचा व खेदाचा धक्का बसला, तरी लेखक असें तत्त्वज्ञान निवेदन करतो, " चौफेर पसरत चाललेल्या पुणें शहरांतल्या नव्या शोभिवंत इमारतींकडे पाहून उत्पन्न झालेला विषाद नाहींसा करणारा असाहि एक विचार माझ्या मनांत येतो, ठिकठिकाणीं माझा मृत्यु घडत आहे. घडे ना ? मरतांमरतांच नव्या परिस्थितीचे नवे ताजे कोष धारण करून मी जगत आहें. याचा प्रत्यय मला पुनःपुन्हां येत असतांना त्या विनाशाचं दुःख मी काय म्हणून करावं ? होय, मी

मनाशीं अशीच समजूत धरली पाहिजे, कीं अंशतः मेल्यावांचून जीवनाची क्रिया सतत चालू राहत नाहीं. छायेवाचून प्रकाश नाहीं तद्वत् मेल्यावांचून जगतां येत नाहीं. "

जीवनाचें तत्त्वज्ञान

' घरकुलांतलीं दुःखं ' या निबंधाच्या शेवटीं तर एकाद्या तत्त्ववेत्त्याप्रमाणेंच फडके उपदेश करीत आहेत—मात्र तो किती मनोहर रीतीनें पहाः—

" आपली दृष्टि आकुंचित असली कीं, आपल्या लहानशा घरकुलांतलीं दुःखं आपल्याला मोठीं वाटूं लागतात, भेडसावूं लागतात. पण तेंच आपल्या घराचं छोटं अंगण सोडून हजारों माणसांच्या सुखदुःखांच्या विस्तीर्ण क्रीडांगणावर आपण पाऊल टाकलं, कीं सूर्य डोक्यावर येतांच पायाखालची सावली बिंदुमात्र व्हावी, त्याप्रमाणें भेसूर वाटणाऱ्या आपल्या क्षुद्र दुःखांची सांवली आपल्याला जवळजवळ दिसेनाशी होते !"

तसाच सुविचार ' आरसेमहाल ' या निबंधांत आहे. तो किती समतोल व लयबद्ध भाषाशैलीनें निवेदिला आहे पहाः—" ज्याच्या अंतःकरणांत सौंदर्य असेल त्याच्या दृष्टीस सुंदर वस्तू पडतात, ज्याच्या अंतःकरणांत संगीत असेल त्याला मधुर स्वर ऐकूं येतात, ज्याच्या अंतःकरणांत स्नेह असेल त्याला मित्र मिळतात, ज्याच्या अंतःकरणांत प्रेम असेल त्याला प्रेमिकांची जोड होते. माणसाच्या अंतरंगाचीं प्रतिबिंबेंच त्याच्या भोंवतालच्या वस्तूंत अन् व्यक्तींत पडत असतात. जग म्हणजे एक विलक्षण आरसेमहाल आहे ! "

' पोरखेळ ' पहाण्यांत गेलेला वेळ वायां जात नाहीं, त्याचाहि आपल्या आयुष्याला उपयोग असतो, याची मीमांसा फडके यांनीं सूक्ष्मपणें केली आहे, ती अशीः—

" अशा पोरखेळांच्या मसाल्यावांचून जीवितांत गोडी उरायची नाहीं. तें रुचिहीन होईल. त्याचा लवकरच वीट येईल. माणूस आंबून जाईल. त्याचं तारुण्य आणखी त्याचा उत्साह फार दिवस टिकणार नाहीं.

म्हाताऱ्याला तारुण्याची पुनः प्राप्ति करून देणारीं रसायनं शोधून काढण्यांत शास्त्रज्ञ गुंतले आहेत. पण, माणसाची जवानी अखंड टिकवणारं 'पोरखेळ' हें एकच रसायन आहे ! त्याचं महत्त्व जो ओळखील त्याला कधीं वृद्धत्व येणार नाहीं."

तोच विचार शहरांतील नेहमींच्या एका दृश्याचें वर्णन करून, फडके पुढीलप्रमाणें मांडतात. "खेड्यांतून भाजीनं भरगच्च भरलेले हारे डोक्यावर घेऊन शहराकडे लगबग जाणाऱ्या माळिणी तोंडानं गाणीं म्हणतात, अन् वाटेंत मधून मधून डोक्यावरचं ओझं खालीं ठेवून घाम पुसतात. त्याप्रमाणेंच ओझं दूर करून घटकाभर मनाला विरंगुळा घेण्याची संधि साधलीच पाहिजे."

विश्रांतीची हिरवळ

फडके हे सौंदर्यशोधक व आनंदसेवक आहेत.त्यामुळें विश्रांतीचा हा विचार ते पुनः पुनः मांडतात. 'सुहास्यां'त ते लिहितात," त्या त्या वस्तूविषयीं त्या त्या वेळेपुरतें तादात्म्य ठेवून आनंदाचा उपभोग घेण्याच्या या बालवृत्तीमुळेंच संसार सुखमय होत असतो. ही बालवृत्ति ज्याच्याजवळ नसते त्याला संसारांत आनंद असूनही सांपडत नाहीं. संध्याकाळच्या तिरप्या उन्हांत पदार्थांच्या छाया दसपट मोठ्या दिसाव्या; त्याप्रमाणें त्या मनुष्याला संसारांतील लहानसहान दुःखेंही प्रचंड व असह्य भासूं लागतात. पत्र्याच्या छपरावर पडलेली लहानशी सरही मुसळधार पावसासारखी वाटावी, त्याप्रमाणें लहानशी निराशाही त्याला भेवडावूं लागते. भयाण देवळाच्या सभामंडपांत घोंटाळणारा वाऱ्याचा लहानसा झोत सूं सूं आवाज होऊन झंझावातासारखा वाटावा, त्याप्रमाणें दुर्दैवाचा विरुद्ध वारा जरासा वाहूं लागतांच त्याला भयंकर वादळांत सांपडल्यासारखें वाटून तो गांगरून जातो व हतबल आणि हतबुद्ध होतो. अशीं माणसेंच म्हणतात, संसार निःसार आहे."

तोच आशय रूपक अलंकारानें सजवून 'सुहास्य'मध्यें पुढीलप्रमाणें

मांडलेला आहे. " लहान मुलांच्या भोळ्या वृत्तींची कींव करणाऱ्या प्रौढ माणसांची स्थिति त्या मुलांहून निराळी नाहीं. या संसारांत लहान-मोठा प्रत्येक मनुष्य कोणत्या तरी एखाद्या खेळण्याच्या नादीं लागलेला असतो. कोणी काव्याचा खुळखुळा करून त्याच्या नादांत असतो; कोणी शास्त्रीय शोधाची बाहुली घेऊन ती जन्मभर उलटीसुलटी फिरवीत असतो, कोणी वेदान्ताचा आरसा घेऊन त्यांत आपलें स्वरूप सारखें पहात असतो; कोणी राजकारणाचीं घरकुलें बांधण्यांत, मोडण्यांत आणि पुन्हां उभीं करण्यांत दंग असतात; आणि कोणी जिवंत बाहुलीच्या नादीं लागून तिला वस्त्राभरणांनीं सजविण्यांत, तिच्याशीं प्रेमकलह करण्यांत आणि तिचें परोपरीनें कौडकौतुक करण्यांत रमून जातात."

सौंदर्यप्रेमी दृष्टि

रमतगमत जाण्याचा सल्ला देतांना फडके ' सहल ' या निबंधांत म्हणतात, " बहुतेक माणसांच्या दुःखांचें कारण तीं एकमार्गीं असतात हेंच असतें. त्यांना आपल्या धंद्याखेरीज कांहीं दिसत नाहीं. मुक्काम गांठायसाठीं ती धांवत असतात, घामाच्या धारा पुशीत असतात, आणि अजून मजल किती उरली तें पुनःपुन्हां टांचा उचलून व मान उंच करून पहात असतात. अशा सर्वांना त्यांच्या हिताची एकच गुजगोष्ट सांगतों, कीं त्यांनीं जीविताच्या रस्त्यावरून धांवतपळत जाण्याऐवजीं रमतगमत स्वच्छंदानें सर्व सुंदर वस्तूंचा उपभोग घेत सहल करावी. मग सुखाचा शोध निराळा करावयास नको."

महाबळेश्वराला असतांना आपली वाट चुकली, तरी त्यापासून आपला फायदाच कसा झाला हें सांगून फडके प्रतिपादतात, " वाट चुकली कशी हें जसं मला कळलं नाहीं त्याप्रमाणं ती अचानक सांपडली कशी तेंही मला कळलं नाहीं. अन् वाट पुन्हां सांपडल्याच्या आनंदापेक्षां वाट चुकल्यामुळं सृष्टीतल्या अत्यंत उग्र अन् अत्यंत नाजूक अशा दृश्यांचं दर्शन घडून ज्या आनंदानं माझं अंतःकरण डवरलं होतं तो किती तरी मोठा होता ! " गार्डिनरच्या ' आगगाडी चुकल्यावर ' या लघुनिबंधापेक्षांहि

फडक्यांच्या या निबंधांतील काव्य व तत्त्वज्ञान यांचे पराग अधिक सुगंधी आहेत.

वाङ्मयाचा महिमा

'शाई'चें नांव घेऊन वाङ्मयाचा महिमा गातांना फडके लिहितात, "राष्ट्राराष्ट्रांमधील तहनामे हिच्याच पोटीं जन्माला येणार आणि गुलामाच्या मुदतबंदीचे करारही हीच प्रसवणार! लाखों अनाथांच्या योगक्षेमासाठीं दिल्या जाणाऱ्या धर्मादायांचीं दानपत्रें हिनेंच मुद्रांकित होणार आणि अज्ञ सनाथांना अनाथ करून दारोदार फिरावयास लावणारीं खोटीं गहाणपत्रेंही हीच कायम करणार! सुधा आणि हलाहल एकाच कोट्यांत सांठविणारा किती अजब द्रव पदार्थ हा!" साहित्यिकाची लेखणी आग लावूं शकते, तशीच ती विझवूंहि शकते. याच कल्पनेवर त्यांनीं एक कथाहि लिहिलेली आहे. शेवटीं ते सूचना करतात, "वास्तविक दारूगोळा किंवा समशेर हातीं घेणाऱ्या इसमाइतकीच दौतींत शाई ओतून घेणाऱ्या इसमावरही सरकारनें करडी नजर ठेवावयास हवी. शाई ही-- देखील समशेरीसारखीच शक्ति आहे."

'मित्रा' ची महती फडके पुढील उपमेनें सांगतात व शेवटीं 'मित्र' शब्दावर श्लेषहि साधतात. "मित्र म्हणजे केवळ आपल्या जीविताचे अलंकार नव्हेत. आपल्या जीवितप्रवाहाला योग्य वळण देणारे ते तट आहेत. काजव्यांचे थवेच्या थवे जर आपल्याला दिसले तर त्यांची शोभा मोठी रमणीय वाटल्यावांचून राहात नाहीं. पण त्या शोभेचा उपभोग घेण्यासाठीं आपल्याला अंधःकारांत राहावें लागतें. आपल्याला वाम-मार्गाच्या अंधःकारांत टाकून केवळ आपल्याला क्षणभर सौख्य देणाऱ्या या काजव्यांप्रमाणें खरे मित्र नसतात. खरा मित्र सूर्यासारखा असतो."

ऋतूंचें शब्द-चित्र

"पाऊस" हा निबंध म्हणजे फडके यांच्या भाषा-वैभवाचें, काव्य-शक्तीचें व वर्णन-शैलीचें एक सुंदर कोरीव लेणेंच. 'वर्षाकाल हाच सौंदर्याचा

पर्वकाल ' अशी वकिली करण्यासाठीं त्यांनीं आपलें सारें लालित्य, जणु कांहीं पणास लावलें आहे. वसंत ऋतूचींच स्तुतिस्तोत्रें रचणाऱ्या कवीवर लटका राग काढून फडके त्याच्या भावंडाला–'ग्रीष्माला'–आपल्या टीकेनें जाळून-पोळून टाकतात. ग्रीष्माचा ताप वर्णन करतांना त्यांची ललितरम्य लेखणी लिहिते, " नीच प्रकृतीच्या मंत्रिमंडळाची चिथावणी मिळाली, कीं ज्याप्रमाणें एखाद्या जुलमी राजाच्या छळाला भर यावा; त्याप्रमाणें ग्रीष्मांतल्या चंडांशूचा ताप साऱ्या सृष्टीला असह्य झालेला असतो, व सृष्टीचा जीवनरसाचा सांठा संपत आलेला असतो. संत्रस्त प्रजेनें एखाद्या उद्धारक महात्म्याची वाट पहावी तद्वत् सारी सृष्टि जलधारांसाठीं आ वासून बसलेली असते. आईच्या सहवासाला फार दिवस अंतरल्यावर बालकाचें तोंड सुकावें तद्वत् वृक्षशाखांवरचीं चिमुकलीं पानें म्लान आणि दीन दिसत असतात. सौभाग्याचिन्हांनीं भरलेला असला तरच सुंदर दिसणारा सुवासिनीचा हात त्यावांचून रिकामा आणि अशुभ वाटावा तशी नदीच्या पात्रांची अवस्था झालेली असते. राजमार्गांतून आणि मातीच्या ढेकळांनीं विखुरलेल्या शेताभातांतून वाफा निघत असतात, त्या जणूं काय जलवृष्टीसाठीं धरणीनें केलेल्या आर्तस्वरांतल्या प्रार्थनाच वाटत असतात ! "

उन्हाळ्याच्या अशा कडक दाहानंतर पावसाची जी पहिली सर येते, तिचें सौंदर्य काय वर्णावें ? त्या सरीनें सृष्टीमध्यें किती मनोहर क्रांति होते याचें वर्णन करून, त्यावेळीं पृथ्वींतून उडणाऱ्या गंधाची कल्पना देण्यासाठीं फडके लिहितात, "जलधारांच्या पहिल्या घुटक्याबरोबर हवेंत दरवळणाऱ्या त्या मृत्तिकागंधाला स्तनपान करतांच मस्त आनंदानें चळवळणाऱ्या बालकाच्या निःश्वासाचीच उपमा साजेल ! त्या निःश्वासाइतकाच तो गंध पवित्र व आल्हादकारक वाटतो. मृग नक्षत्रांतील ती पहिली सर कोसळते व तो अनुपमेय गंध भूपृष्ठांतून उठतो, त्या वेळीं लहान मोठ्या पक्षांची फडफड व चिवचिव होते ती तरी किती गोड असते ! व जीर्ण तृणांकुर कुरतडून शिणलेलीं गाईवांसरें अंगें भिजतांच हंबरतात तीं तरी किती गोड ! "

पावसाचे भिन्न भिन्न प्रकारहि फडक्यांनीं मिटक्या मारीत वर्णन केले आहेत. मोकळ्या मैदानावर पडणाऱ्या वळिवाची सर फडके यांनीं वाचकांच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभीच केली आहे. सुंदर उपमा देऊन ते म्हणतात, " भूगोल व खगोल सांधणारा तो अजस्र कृष्णवर्ण जलस्तंभ वेगानें आपल्याकडे सरकत येतांना व आपल्याला भिजवून पलीकडे दुसऱ्या क्षितिजापर्यंत धावून अदृश्य होतांना दिसला कीं बाह्यांगाप्रमाणेंच अंतरंगही आनंदानें न्हाऊन निघतें. एखाद्या बागवानानें हातांत झारी घेऊन ती सहज झरदिशीं हिरवळीवर फिरवावी, तद्वत् वरुणानें गमतीनें पाण्याचा फवारा फिरविल्यासारखें अशा वेळीं वाटतें. "

सृष्टीचीं रम्य रूपें

पावसाची भुरभुर किती गंमतीची असते, हे फडके खुबीदार शब्दांनीं सांगतात, तें असें, " मांजराचीं अलगद पावलें कधीं चाहूल देत नाहींत म्हणतात. तितकीच निःशब्द याची चाहूल असते. हा लबाड, चोरट्या चालीचा पाऊस विनोदनिर्भितीचें उत्कृष्ट उदाहरण म्हणून समजावयास हरकत नाहीं. कारण याच्या तयारीचें अवडंबर पहावें तो थेट प्रलय-पर्जन्याला शोभेल असें; पण प्रत्यक्ष अवतार पहावा तो जसा कांहीं सुदामदेवानें आपल्या पुरचुंडीतले पोहे फुंकरून श्रीकृष्णाच्या हातावर ठेवले त्या वेळीं उडालेला कोंडाच ! "

' सारी सृष्टि फलपुष्पांच्या वैभवानें भरघोस नटलेली ' असतांना पुण्याहून मुंबईस आगगाडीनें जाणाऱ्या मुशाफराला निसर्गाचें ऐश्वर्य ओसंडतांना दिसतें. त्याचें शब्दचित्र फडके किती कुशलतेनें काढतात, पहा, " घाटमाथ्यावर पोचतांच पर्जन्य व वायु यांची सृष्टीदेवीचें प्रियाराधन करण्यासाठीं चाललेली चढाओढ पाहण्यांतच गुंतलेले तटस्थ गिरिराज किंचित् भुंवया वक्र करून आपल्या कन्येच्या लग्नाचा सोहळा हंसतमुखानें पाहणाऱ्या पित्यासारखे वाटतात. घाटांत तर वर्षाऋतूची ऐन जवानी गर्जना करीत कड्याकड्यांवरून कोसळतांना दिसते; आणि कर्जतपासून

नों. नं. ३७१३१

कल्याणपर्यंतच्या सपाट भूमिभागावर गुडघाभर पाण्यांत बुडून वर डोकें करून वांकुल्या दाखविणारे भाताचे लोंबर, वय झालें तरी रसिक वृत्तीनें उत्सवप्रसंगीं माना डोलविणाऱ्या वृद्धांप्रमाणें वाटणारे उंच उंच तालवृक्ष आणि प्रेमवेड्या आईनें हृदयाशीं क्षणमात्र धरून पुन्हां खेळायला सोडलेल्या खेळकर मुलांप्रमाणें खळखळणारे लहानमोठे जलौघ—असल्या हृदयंगम दृश्यांची जिकडे तिकडे गर्दी उसळलेली दिसते ! " हुबेहुब वर्णन आणि तें समर्पक शब्दांनीं व समुचित अलंकारांनीं करण्याचा फडक्यांचा गुण या लहानशा उताऱ्यांतहि उठून दिसतो.

लालित्यांतील क्रीडा

निसर्गातील या गंमतीजमतीबरोबरच निबंधकारानें आपल्या तारुण्यांतील गोड अनुभवहि या लघुनिबंधांत सांगितला आहे. कॉलेजांत असतांना लेखकाला क्रिकेटची मॅच पहाण्याचे वेळीं 'वरुणानें भलेमोठे जलकुंभ आकाशांत हारीनें मांडून ठेवलेले दिसावयाचे.' तेव्हां लेखक पाऊस न पाडण्याबद्दल वरुण देवाची प्रार्थना करी. " आणि काय आश्चर्य ? एखादे वेळीं ही आमची प्रार्थना मान्य व्हावयाची ! खरोखरच आकाशांतल्या त्या अजस्र मेघांच्या सिंहासनावर बसून वरुणदेव मोठ्या कौतुकानें जणुं काय आमची मॅच पहात बसायचा, आणि वृष्टि करायचें भानच त्याला उरायचें नाहीं ! " याहून निराळा पुरावा पावसाच्या रसिकतेचा लेखकानें काय द्यावा ? पण अखेरीस हुकमी पत्ता म्हणून फडके 'मृच्छकटिक' नाटकाचा आधार देतात. त्या अखेरीच्या सवालांत फडके यांची साहित्याची ऐट व आवेश इतका मनोज्ञ आहे कीं, तो वाचतांना 'मानापमानां'-तील भामिनीच्या नाजूक शौर्याची व समशेरीच्या पट्ट्याचीच स्मृति व्हावी. शेवटचा निकराचा हल्ला करण्याच्या पवित्र्यांत उभे राहून फडके रसिकांना लडिवाळ त्वेषानें जाब विचारतात, " कवींचा लाडका वसंत रसिक खराच; पण वर्षाऋतु कांहीं कमी रंगेल नाहीं. आणि इतकें सांगूनही कवींना हट्ट सोडावासा वाटत नसेल तर मीं विचारतों, अहो, वसंतसेनेच्या आलिंगनाचें परमसौख्य चारुदत्तास अकल्पित मिळवून देणारा,

आणि " तेचि पुरुष दैवाचे " असे धन्योद्गार त्या महाभागाच्या तोंडून वदविणारा आमचा वर्षाऋतुच ना ? " लालित्याच्या लाटांवर अशा प्रकारें स्वच्छंदानें प्रा. फडके पोहत असतात— आणि म्हणूनच ते रसिकोत्तम ! आणि त्यांचे निबंध ललितोत्तम !



वि. स. खांडेकर : : : १७

फडके व खांडेकर—हे दोन देदीप्यमान तारे मराठी साहित्यामध्यें एकाच वेळीं तळपत आहेत हें विशेष. दोघांनींहि कादंबरी, लघुकथा व लघुनिबंध या तिन्ही प्रांतांवर आपापला प्रकाश पाडला आहे. नाट्य-



सृष्टि उजळण्याइतके त्यांचे किरण पसरूं शकले नाहींत, हें त्या दोघांतील साम्य जाणवण्यासारखें आहे. पण कथा-कादंबरी-निबंध या 'त्रि-भुवनांत' त्यांनीं झगझगीत प्रकाश टाकलेला आहे. दोघांची भाषा लालित्यपूर्ण आहे, कल्पकता काव्यमय आहे आणि सारी लेखन-संपदा तरुण वर्गाला आकर्षित करणारी आहे. विपुल व कलासंपन्न साहित्य सतत निर्माण करण्यांत दोघांचाहि हातखंडा आहे. मराठी वाचकवर्गाला या जोडीनें मोठा चटका लावलेला आहे.

दोन दृष्टिकोन

आविष्काराप्रमाणें आशयांतं मात्र या दोघांमध्यें फारसें साम्य नाहीं—'दोन ध्रुवच' आहेत ते, म्हटलें तरी चालेल. फडके 'काश्मिरी गुलाब' असले, तर खांडेकर 'हिरवा चाफा' ठरतील. 'धूम्रवलय' या लघु-

निबंधांत फडके सिगारेटची जितकी तरफदारी करतात व 'सुपारीच्या खांडालाहि न शिवणाऱ्या 'माणसाचा तिटकारा करतात; तितकाच 'सारेच गुलाम!' या लघुनिबंधांत खांडेकर सिगारेटचा तिटकारा व सुपारी–खांडाला न शिवणाऱ्याचा गौरव करतात. पत्रें, पर्जन्य, ऐन पंचविशी, पहिला पांढरा केस, इत्यादि किती तरी विषय दोघांनीं समानच निवडलेले आढळतात. पण ते दोघांनींहि हाताळले आहेत आपापल्या प्रकृतीनुसार व संस्कृतीनुसार. दोघांच्याहि मनोबुद्धीचें व भावनांचें स्पष्ट प्रतिबिंब त्यांच्या त्यांच्या लघुनिबंधामध्यें पडलेलें दिसतें–आणि म्हणूनच दोघेहि यशस्वी लघुनिबंधकार ठरतात–पण दोघांचीं तीं प्रतिबिंबें किती वेगवेगळीं आहेत!

फडके आपल्या सौंदर्यशोधक दुर्बिणींतून केवळ ऐश्वर्याचें व यौवनाचेंच निरीक्षण करतात; पण त्या संकुचित क्षेत्रांतील अनुभवांशीं कां होईना, ते संपूर्ण समरस होतात, आपल्या संवेदनांत ते अनुभव मिसळतात, आपल्या भावना ते घोळवितात आणि मग ते आपल्या अकृत्रिम, प्रवाहशील व मृदुमधुर शब्दांनीं व्यक्त करतात व यथावत् वर्णनांनीं ते सजीव करून वाचकापुढें मूर्तिमंत उभे करतात, किंबहुना वाचकांनाच जणु ते अनुभव व्यावयास लावतात. सहृदयता व सहजता हे त्यांच्या कलेचे प्राण होत. त्यांच्या जोरावर ते रसिकांचीं हृदयें जिंकतात.

खांडेकरांची संवेदनक्षमता

खांडेकरांनाहि भावनेची, बुद्धीची व कल्पकतेची देणगी मोठ्या प्रमाणावर मिळालेली आहे. एका व्यक्तीचींच सुखदुःखें, मान-अपमान, हर्षामर्ष यांचें कातणीचें घर विणीत ते बसत नाहींत, तर सर्व समाजांतील आशा-आकांक्षा, यश-अपयश, आनंद-व्यथा यांचा दंश त्यांच्या हृदयाला होतो व तो ते आपल्या अलौकिक कला-चातुर्यानें प्रगट करतात. त्यांच्या अंतःकरणाचा हा विशालपणा व संवेदनक्षमता किती आहे हें सांगतांना प्रा. वि. बा. आंबेकर लिहितात, "आक्रोश ऐकला कीं कावरेंबावरें होऊन जावें, दैन्य पाहिलें कीं पाझरून जावें, अनाठायीं आक्रमण पाहिलें कीं, अशरण चीड येऊन तापून जावें, अन्यायाचा संचार भोंवतीं पाहिला

कीं तळमळून उठावें, अनीतीचें थैमान दिसलें कीं विमनस्क होऊन जावें, अशी त्यांच्या मनाची घडण आहे. ''

दुसऱ्याचें दुःख व अन्याय पाहतांच संताप व चीड यावी हें साहजिक आहे. पण ते सर्व भाव पुरेपूर व परिणामकारकपणें व्यक्त करण्याचें चातुर्य असतें केवळ कलावंतापाशींच. तें खांडेकरांजवळ भरपूर आहे. त्यांचें भाषा-वैभव अलौकिक आहे, कल्पना-सौंदर्य रमणीय आहे व वर्णन-चातुर्य आल्हादकारक आहे. उपमांमागून उपमा देण्याचा तर त्यांना छंदच आहे. कल्पनामागून कल्पना त्यांना सुचतात आणि फुलपाखरें धरूं पहाणाऱ्या बालकाप्रमाणें ते त्यांच्यामागें धावतात. विशेष म्हणजे त्यांचें लेखन कलात्मक असूनहि विचार–जागृति करणारें असते; आणि ते विचार सात्त्विकतेचे व समाजहिताचे असतात. प्रिय व पथ्यकर लेखन करावें खांडेकरांनींच.

पुस्तकांत कोंडलेला आत्मा

'प्रकृतीच्या कायमच्या अस्वास्थ्याला' कंटाळलेलें असूनहि ते रम्य–मधुर असेंच लिहितात. आपल्या बहुश्रुतपणाची छाया ते आपल्या लघुनिबंधावरहि पाडतात. वास्तविक लघुनिबंध म्हणजे दोन दोस्तांचें सलगीचें संभाषण–संध्याकाळच्या शिळोप्याच्या गप्पा-चांदण्यांतील सुख-संवाद. त्यावेळीं कोणी कितीहि विद्वान असला, तरी तो आपल्या पांडित्याचें प्रदर्शन कांहीं करीत नाहीं. पण खांडेकरांचा कोणताहि लघु-निबंध उघडा, त्यांत त्यांचें स्वतःचें व्यक्तिमत्व दिसण्याऐवजीं कालिदास व भवभूति, तांबे व गडकरी, स्कॉट व शेक्सपीयर, ब्राउनिंग व इब्सेन, ल्युकस व लुई, टॉलस्टॉय व गॉर्की, फार काय व्यास व शंकराचार्यहि— यापैकीं कोणी ना कोणी हजर असलेले सांपडावयाचेच ! यावर खांडेकर असेंहि म्हणूं शकतील कीं, माझ्या लघुनिबंधांतील व्यक्ति इतक्या उच्च आहेत कीं, त्यांचे सहज संवादहि विद्वत्तापूर्णच असावयाचे–त्यांचे ''स्वैरालाप''हि 'शास्त्रें' बनण्याच्या योग्यतेचे ठरावयाचे. असतीलहि असे जाडे व बडे विद्वान. पण सर्वसामान्य वाचक त्या उताऱ्यांचा

शस्त्रसंभार पाहून बिचकून जातो एवढें मात्र खरें, एकादा खेडवळ माणूस मुंबईतील सातमजली 'समशीतोष्ण' इमारतींत पाऊल टाकतांना बिचकतो ना? तशी अवस्था साधारण वाचकाची खांडेकरांचा लघुनिबंध वाचतांना होते—आणि म्हणून ते वाचकांना आपल्या विश्वासांत घेऊं शकत नाहींत, आपल्याशीं समरस करूं शकत नाहींत—जीवश्चकंठश्च मित्र बनवून सोडूं शकत नाहींत. त्यांच्या उपमा व उतारे या बीज-पावसांच्या तडाख्यांत सांपडलेला वाचक दिपतो, दचकतो व गांगरून जाऊन आडोसा शोधूं पहातो. त्यांच्या लघुनिबंधाला विनोदाचें अस्तर लावलेलें असतें, पण तो विनोदहि पुस्तकी असतो—सहज, खेळकर, मोकळा नसतो.

अनुभवाचें मर्यादित क्षेत्र

खांडेकरांजवळ भावनेचें भांडार मोठें आहे, पण त्याला कोटिबाजपणाचें कुलुप लावलेलें आहे. कवीप्रमाणें त्यांचें मन संवेदनक्षम आहे; पण त्यांची कल्पकता त्या संवेदनावर मात करते. 'विरह' म्हणतांच त्यांच्या अंतःकरणांतील भावना उसळतात, पण लगेच त्यांच्या डोक्यांत कालिदास—भवभूति नाचूं लागतात आणि मेघदूत, शाकुंतल, उत्तररामचरित यांतील कथा व वचनें यांचा पाऊस पडूं लागतो. त्यांतील कोट्यांच्या गार गारा वेचण्यांत वाचकाला बालकाइतकाच आनंद वाटतो हें खरें, पण त्यामुळें त्याची वृत्ति अंतर्मुख होत नाहीं, अंतःकरण हलत नाहीं आणि विरहाची वेदना त्याला जाणवत नाहीं. खांडेकरांचे लघुनिबंध उणे पडतात ते यामुळें.

त्यांच्या अनुभवाचें क्षेत्र व विचारांचे विषय मर्यादित आहेत. त्यामुळें दाढी व सिनेमा, पत्रें व पुस्तकें हेच ठराविक विषय पुनः पुनः येतात आणि त्यांतून संयमीची व संकेताची गुलामगिरी, संशय व अहंकार यांचे दुष्परिणाम—याच विचारांचे सूर बहुधा निघतात. रम्य कल्पकतेचें, बहुमोल अलंकारांचें व सात्त्विक विचारांचें-असें लेखन एकसारखें विपुल प्रमाणांत करण्यांत खांडेकरांची बरोबरी दुसरे कोणी मराठींत सध्यां तरी करूं शकत नाहीं. त्यांनीं दोनशेवर लघुकथा जशा लिहिल्या, तसेंच शंभरावर लघुनिबंधहि रचले. 'हजारों सामान्य लोकांच्या बुटक्या आयुष्यांतील तोटके आनंद

इलक्या हातानें व्यक्त व्हावेत' ही आपली मनीषा त्यांनीं लघुनिबंधांत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. 'जीवनांतल्या चिमण्या पण अविनाशी आनंदार्शी ओळख' करून देण्याचें कार्य त्यांचे बरेच लघुनिबंध पार पाडतात. 'साऱ्याच माणसांना परिचित आयुष्यक्रमापलीकडे थोडा वेळ नेण्याची समाजांत व्यवस्था होईल तर काय बहार होईल!' याचें वर्णन 'एक तास' या आपल्या लघुनिबंधांत त्यांनीं केलें आहे. लपलेला आनंद शोधण्याची, दुसऱ्याच्या दुःखार्शी सहानुभूति बाळगण्याची, घराबाहेर पसरलेल्या अफाट समाजाकडे आत्मीयतेनें पहाण्याची नवी दृष्टि खांडेकरांचे लघुनिबंध देतात.

वाचनांचा छंद

खांडेकरांचा जन्म सांगली येथें ता. १९ जानेवारी १८९८ रोजीं झाला. त्यांचें मूळचें नांव गणेश व वडिलांचें नांव आत्माराम. वडील सांगली संस्थानांत मुनसफ होते. ते १९११ सालीं वारले. खांडेकरांच्या कुटुंबाला खडतर दिवस आले. १९१६ सालीं कोंकणांतील एका जमिनदार चुलत्यानें खांडेकरांना दत्तक घेतलें. त्यामुळे "गणेश आत्माराम"चा "विष्णु सखाराम" झाला.

त्यांचें मराठी व इंग्रजी शिक्षण सांगलीस झालें. इंग्रजी चौथ्या इयत्तेपासून ते शिष्यवृत्ति मिळवीत गेले. १९१३ सालीं ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि तेहि मुंबई विद्यापीठाच्या हजारों विद्यार्थ्यांत आठवा क्रमांक कमावून. त्यांनीं इतर वाचनहि मनसोक्त केलें. हरिभाऊंची 'उषःकाल' कादंबरी त्यांनीं एका रात्रींत वाचून संपाविली; देवलांचें 'शारदा' नाटक तोंडपाठच केलें. तसेंच कोल्हटकरांचें विनोदी वाङ्मय. 'सुदाम्याचे पोहे' ते मोठ्या चवीनें सेवन करीत. कोल्हटकरांचें 'वधूपरीक्षा' नाटक पहाण्यासाठीं खांडेकर सांगलीहून मिरजेस पायीं चालत गेले. मराठींतील इतर ग्रंथांचेंहि वाचन ते आवडीनें करीत होते. नाटककादंबऱ्यांत तर ते रंगून जात.

मॅट्रिक झाल्यावर खांडेकर पुण्यास आले आणि फर्गसन कॉलेजांत दाखल झाले. पुस्तकांखालोखाल क्रिकेटचें त्यांना व्यसन. गडकऱ्यांचा सहवास त्यांच्या स्फूर्तीला पोषक झाला. त्यांना एक शिष्यवृत्ति मिळाली होती. पण पुण्याची रहाणी, कॉलेजची फी, यांचा खर्च कसा भागणार ? दोन शिकवण्या त्यांनीं धरल्या. तरी पैशाची ओढाताण चालूच होती. दत्तक-विधानानंतर ती थांबेल अशी खांडेकरांना आशा होती. पण दत्तक-घराण्यांतून त्यांच्या शिक्षणाला आर्थिक मदत कांहीं मिळाली नाहींच, उलट त्यांचें मानसिक स्वास्थ्य मात्र हिरावलें गेलें. दत्तक वडिलांचा स्वभाव खांडेकरांच्यापेक्षां अगदींच निराळा होता. त्यामुळें त्या दोघांत खटके उडूं लागले. सावंतवाडीला दोनतीन वर्षें खांडेकरांना काढावीं लागलीं. हा काळ केवळ काळजी करण्यांत गेला. तेथें त्यांच्या पाठीस मलेरिया लागला. गरिबी पांचवीला पूजलेलीच होती. त्यांत भर दत्तक घराण्याच्या कटकटीची, आणि आतां तिला साथ मिळाली रोगाची !

ध्येयवादी शिक्षक

चरितार्थ चालविण्यासाठीं खांडेकरांनीं शिक्षकाचा पेशा पत्करला. १९२० सालीं कोंकणांतील शिरोडें येथील इंग्रजी शाळा त्यांनीं चालवायास घेतली. शाळेंत विद्यार्थी ५०-६० आणि शाळेचे प्रमुख म्हणून खांडेकरांना पगार २० रुपये. घरांत भांड्याच्याऐवजीं गाडगी व कंदिलाच्याऐवजीं दौत वापरून दारिद्र्याचें विष खांडेकर पचवीत होते, पण शाळेंत विद्यार्थ्यांना ज्ञानामृत देत होते. पुढें त्या शाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या दोनशेंवर गेली.

खांडेकरांच्या लेखनाचा प्रारंभ वयाच्या सोळाव्या वर्षीं झाला. १९१४ सालीं 'रमणी-रत्न' नांवाचें नाटक लिहून त्यांनीं तें वासुदेवशास्त्री खरे यांना दाखविलें. १९१९ सालीं त्यांचा पहिला टीकालेख 'नवयुग' मासिकांत प्रसिद्ध झाला. तो कवि केशवसुतांसंबंधीं होता. १९२३ सालीं 'घर कोणाचें ?' ही त्यांची पहिली गोष्ट प्रसिद्ध झाली. १९२७ सालीं 'निकाल द्या' हा त्यांचा पहिला लघुनिबंध वाचकापुढें आला.

विपुल व विमल साहित्य

त्यांनीं आतांपर्यंत सुमारें २१ लघुकथा-संग्रह प्रसिद्ध केले, १०० लघु-निबंध लिहिले, १६ कादंबऱ्या रचल्या, ६ नाटकें रंगविलीं, ५० रूपक-कथा चितारल्या आणि टीका–लेख तर २००।३०० लिहिले आणि हें सारें निरामय, निर्मल व प्रसन्न वाङ्मय त्यांनीं निर्माण केलें, तें मानसिक, शारीरिक किंवा आर्थिक स्वास्थ्य बिलकूल नसतांना; उलट गारिबीशीं, रोगाशीं, प्रतिवादीशीं झगडत असतांनाच त्यांनीं ही साहित्याची सुरंगी व सुगंधी बाग फुलविली.

१९३४ सालीं बडोदे येथील साहित्य–संमेलनाच्या कथा-विभागाचें अध्यक्षपद त्यांना देण्यांत आलें. पुढील वर्षीं पुणें येथें भरलेल्या 'शारदो-पासक संमेलनाचें' अध्यक्षस्थानहि त्यांना अर्पण करण्यांत आलें. मडगांव व मुंबई येथील प्रांतिक संमेलनांच्या अध्यक्षपदाच्या माळा त्यांच्या गळ्यांत घालण्यांत आल्या. १९४० सालीं जमखिंडी येथें भरलेल्या 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें' अध्यक्षत्व त्यांना बहाल करण्यांत आलें. आणि मराठी साहित्यांतील मोठा मान त्यांना त्याच्या पुढील वर्षीं लाभला. १९४१ सालीं सोलापूर येथें भरलेल्या 'महाराष्ट्र साहित्य संमेलना'च्या सिंहासनावर त्यांना अध्यक्षपदाचा अभिषेक करण्यांत आला.

कथेचें मिश्रण

'लघुनिबंध' हा एक मध्यमपदलोपी समास आहे असें खांडेकरांच्या लेखनावरून वाटतें. 'कथा' हें मध्यमपद त्या नांवांत आलें नाहीं इतकेंच. बाकी 'लघुकथा सामावणारा निबंध' असेंच त्यांच्या लघु-निबंधाचें स्वरूप असतें. 'हरवलेले कागद,' 'साडेनऊ रुपये' हे त्यांचे लेख त्यांच्या कथा-संग्रहाच्या पुस्तकांत आले असते, तर वाचकांनीं लघु-कथा म्हणूनच त्यांचा आस्वाद घेतला असता. गोष्टीचे कागद हरवले, तेव्हां ते पुनः लिहिले पण नंतर पहिले कागद सांपडले–या घडामोडीमुळें मनाची किती धांदल उडाली याचें सुरेख वर्णन पहिल्या लेखांत केलेलें आहे आणि माणसांनीं हरवलेल्या गोष्टीसाठीं रडत न बसतां आशेनें व श्रद्धेनें

भविष्यकाळ घडवीत असावें असा विचार मांडला आहे. प्रश्न इतकाच कीं, या विचाराला ती कथा जोडलेली आहे कीं त्या कथेला विचाराची ही किनार लावलेली आहे ?

असाच संमोह 'साडेनऊ रुपये' या लेखांतहि उत्पन्न होतो. सिनेमाचें आठ आण्यांचें तिकीट काढणाऱ्या 'मी'नें दहा रुपयांची नोट तिकीटवाल्याला दिली; पण 'मध्यंतरा'पर्यंत मनाला सारखी चुटपूट लागली कीं, तिकिट-वाला ते उरलेले पैसे देईल कीं नाहीं ? मग मनुष्याच्या सचोटीविषयीं संशय येतो आणि 'जगांतलीं निम्मी दुःखें मनुष्य आपल्या कल्पनेनें निर्माण करतो' असें तत्त्व स्फुरतें. 'दहा अंकाऐवजीं साडेनऊ रुपये मोजून राग शांत होतो, हा नवा अनुभव आला मला' अशी कोटी शेवटीं करून लेख चटकदार केलेला आहे. त्यांत मानवी मनाचे पापुद्रे हलक्या हातानें उलगडले आहेत. ही एक मनोविश्लेषणपर कथा म्हणूनहि रसिकांनीं मान्य केली असती.

विचारांचे सुवर्ण-कण

अर्धनारीनटेश्वराप्रमाणें लघुनिबंधाचें अर्धांग 'कथा' हें असलें, तरी 'निबंधा'ला त्याचें अर्धें अंग व्यापावयास मिळतेंच. म्हणून कादंबरी किंवा लघुकथा या दोहोपेक्षां लघुनिबंध हें विचार पेरण्याला अधिक अनुकूल क्षेत्र. आणि सुंदर भाषेंत उदात्त विचार हें तर खास खांडे-करांचें वैशिष्ट्य ! त्यानें चमकणारे लघुनिबंध किती तरी आहेत. शब्द-सौंदर्य व विचार-सौंदर्य यांचा 'माणि-कांचन-योग' झाल्याचीं कांहीं उदाहरणें पहा—

सुखाचें रहस्य उकलून दाखविण्यासाठीं खांडेकर 'सुखाचा शोध'-मध्यें असें तत्त्व सांगतात, "विश्वमोहिनी सुवर्ण–रथांतून येत असलेली पाहून आपण हुरळून जातों. पण पुढें येऊन तिनें हात पसरला कीं आपण मुलखाचे कृपण होतों. कमींत कमी काय देतां येईल हें आपण पाहूं लागतों. आणि द्यावें तसें घ्यावें हा तर सुखाचा मूलमंत्र आहे, किंबहुना आधीं दुसऱ्याला दिल्याशिवाय–त्यागाच्या अग्निदिव्यांतून पार

पडल्यावांचून–मिळत नाहीं अशी जगांत एकच अपूर्व गोष्ट आहे—सुख !"

'त्यागांत सुख' हें तत्त्व ठीक असलें, तरी सर्वांची प्रवृत्ति कशी आहे ? याचें उत्तर 'पुढें–पुढें' मध्यें खांडेकर देतात, तें असें,—"जो तो हातांतल्या सुखाकडे दुर्लक्ष करून पळत्या आनंदाच्या मागें धांवत असतो ! प्रत्येकाचा मंत्र एकच–'पुढें–पुढें !' भविष्यांतला अमर्याद आनंद लुटण्याकरितां मनुष्यप्राणी ही जी धावपळ करतो तिच्यांत वर्तमानाच्या मर्यादित आनंदाला मात्र तो निश्चितपणें मुकतो."

'सुख जवापाडें । दुःख पर्वताएवढें' हा निवृत्तिपर सिद्धांत खांडेकरांना मान्य नाहीं. त्यांच्या कलावादी दृष्टीला जगांत चोहोंकडे सुखाचीं कारंजीं उडत असलेलीं दिसतात. 'शास्त्रीय सत्य' यांत ते म्हणतात, "पहिल्या झोपेनंतर थोडीशी जाग आली असतांना गंधर्व-नगरीप्रमाणें दिसणारी चांदणी रात्र, प्रातःकालीं आपल्याबरोबर डोळे उघडून आनंदानें हंसणारें आकाश, दुपारच्या वेळीं रुसून बसणाऱ्या पोटाची समजूत घालणारी गोड भाकरी, यांपैकीं एक एक गोष्ट म्हणजे सुखाचें कारंजेंच नाहीं का ?"

आनंदी तत्त्वज्ञान

क्षणोक्षणीं जगांत नावीन्याचे व सौख्याचे झरे वाहत असतात, असा उमदा विचार 'अविनाश' मध्यें मांडलेला आहे. तो असा—"जग कितीहि जुनें झालें तरी प्रत्येक क्षणाला त्यांतून नावीन्याचे झरे पाझरत असतात हें लहान मूलच आपल्याला शिकवितें. आपल्याला अत्यंत सामान्य वाटणारें दृश्य किती अद्भुतरम्य आहे हें कळायला त्याच्याकडे बालकाच्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. जगांतल्या सौंदर्याला नाश नाहीं, साहसाला नाश नाहीं आणि साधुत्वाला नाश नाहीं हें लहान मुलांच्या सहवासांतच प्रौढांना पटतें."

'सर्व आनंदमय आहे' असा सिद्धांत खांडेकर 'अशोकाचीं फुलें' या निबंधांत पुढील शब्दांनीं मांडतात, "चांदण्या रात्रीइतकीच अंधारी

रात्रहि सुंदर वाटते, अशोकाच्या फुलाइतकेंच तेरड्याच्या फुलांतहि काव्य दिसूं लागतें. देवमाणूस होण्यापेक्षां माणूस म्हणून जगण्यांतच सार्थक आहे!" प्रेमपूर्ण अंतःकरण बाळगणाऱ्या माणसाला सर्वत्र आनंदच आनंद! जगांतील प्रत्येक वस्तु आनंददायक कशी होते हें 'दोन चित्रें' या निबंधांत खांडेकर पुढील शब्दांनीं सांगतात, "जग हेंहि एक आदि नि अंत नसलेलें चित्रमंदिर आहे. या मंदिरांतला संपूर्ण आनंद एका चित्रांत रंगून दुसऱ्या चित्राकडे ढुंकूनहि न पाहणाराला कधींच मिळत नाहीं. गांधीजींचे सत्याचे प्रयोग वाचण्यांत आल्हाद आहे आणि ठगाची जबानी वाचण्यांत काय मौज नाहीं? लहान मुलांचे पापे घेतांना ओठामध्यें जो लुसलुशीत उन्माद उत्पन्न होतो त्याच्यार्शी, आजारी आईचे पाय चेपतांना होणाऱ्या सुखाची तुलना करणें काय सर्वस्वीं चुकीचें ठरेल?"

सात्त्विक गुणांचा प्रचार

सात्त्विक गुणांचें जीवनांतील महत्त्व खांडेकरांनीं 'एक कात्रण' मध्यें जातां जातां वर्णिलें आहे. तें असें—"कीर्ति, संपत्ति, पराक्रम, प्रतिभा हे कांहीं झाले तरी मानवी जीवनाचे वस्त्रालंकार आहेत. क्षणभर प्रेक्षकांचे डोळे दिपविण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत आहे. पण मानवी जीवनाचा आत्मा या असामान्य वस्त्रालंकारांत नाहीं. तो सर्वांना सामान्य असणाऱ्या प्रेम, वात्सल्य, भूतदया इत्यादि भावनांत आहे."

प्रेम, सेवा, त्याग इत्यादि सात्त्विक गुणांपासून किती आनंद लाभतो, हें खांडेकरांनीं 'होळी' या निबंधांत काव्यमय रीतीनें सांगितलें आहे. तें असें—"शुभ्र संगमरवरी दगडांचा भव्य ताजमहाल आनंददायक तर खराच; पण सुंदर कल्पनांनीं नटविलेलें रवींद्राचें काव्यमंदिर त्याहिपेक्षां आनंददायक नाहीं का? हिमालयाच्या शुभ्र गगनचुंबी शिखरापेक्षांहि महात्माजींनीं दीनांच्या परित्राणाकरितां पसरलेले पवित्र बाहु अधिक भव्य नाहींत असें कोण म्हणेल? दरींत उडी घेऊन खदखदां हांसणाऱ्या गिरसप्पाच्या धबधब्याचा देखावा अद्भुतरम्य यांत शंका नाहीं; पण हांसत हांसत देशासाठीं मृत्यूच्या दरींत उडी घेणाऱ्या तरुणांची मूर्ति त्यापेक्षांहि

अद्भुतरम्य भासत नाहीं काय ? " यांतील वाक्य-रचना किती प्रमाण-बद्ध व लययुक्त आहे ! तसेंच, 'एकवचन' या निबंधांत प्रीतीची उत्कटता वर्णन करतांना खांडेकर म्हणतात, " पर्वताची उंची जशी शिखराच्या रूपानें प्रगट होते, गायकाची गाण्याची तयारी जशी तानेंतून बाहेर पडते, त्या-प्रमाणें प्रीतीची उत्कटताहि एकवचनांतून प्रतिबिंबित होत असते. जणूं कांहीं एकवचनांत बालमित्रांचा निर्मळ स्नेह, वडील माणसांची निरपेक्ष माया, पतिपत्नींची एकान्तांतील प्रीति आणि लहान बालकांची भावपूर्ण भक्ति, या सर्वांचें सुंदर संमेलनच झालेलें असतें." लहानमोठ्या सर्व वस्तूंतून सुख शोधून घेण्याची वृत्ति माणसानें कशी ठेवावी हें खांडेकरांनीं 'रबरी फुगे' या निबंधांत नेहमींच्या दाखल्यानें सांगितलें आहे. ते म्हणतात, " विद्या, मैत्री, कीर्ति, प्रीति हेसुद्धां वेळोवेळीं जीवनाला शोभा आणणारे सुंदर रबरी फुगेच नाहींत का ? आपण ते फुगवून फार मोठे करूं लागलों तर ते फुटूनहि जातात. पण ते फुटून गेले किंवा शोभेच्या वस्तु म्हणून आपल्यापाशीं राहिले, तरी हे फुगे फुगवितांना झालेला आनंद कांहीं खोटा ठरत नाहीं !"

तात्त्विक मीमांसा

बाह्यांगावर भाळण्याची जगाची प्रवृत्ति आहे आणि म्हणूनच तें दुःखांत पडतें असा विचार ' कपड्याची किंमत ' या निबंधांत सांगून खांडेकर म्हणतात, " जगांतील सर्व दुःखाचें मूळ अंतरंगापेक्षां बहिरंगाला महत्त्व देण्याच्या प्रवृत्तींत आहे. ज्याचे कपडे अधिक छानछोकीचे त्याला अधिक मान हा अनुभव कुणाला आलेला नाहीं ? कपड्यापेक्षां मनुष्या-कडे आणि देहापेक्षां माणुसकीकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे, हें तत्त्व जगाच्या पचनीं पडेल तेव्हांच तें सुखी होईल. "

सामान्य माणसें रूढ चाकोरींतूनच जातात, हा अनुभव ' संकेत 'मध्यें खांडेकरांनीं पुढीलप्रमाणें मांडला आहे. " संकेत हे राजमार्गाप्रमाणें प्रशस्त असतात. त्यामुळें धोपट मार्गानें जाणारांना आणि सोबतीची अपेक्षा करणाऱ्यांना ते आवडावेत हें स्वाभाविकच आहे. राजमार्गाच्या बाजूला असलेलीं तींच तींच घरें आणि तींच तींच दुकानें पाहून कंटाळा आला,

तरी नव्या पाऊलवाटेनें जाण्याचा धीरच होत नाहीं बहुतेक माणसांना ! त्यांना वाटतें आपण कुठें तरी चुकूं ! बिचाऱ्यांना हें कळत नाहीं कीं, जो चुकतो तोच शिकतो ! ”

माणूस शरीराचा गुलाम असतो. ‘ इंद्रियांचीं दीनें । आम्ही केलों नारायणें ’ असें तुकोबा सांगून गेले. खांडेकर ‘ सारेच गुलाम ’ मध्यें म्हणतात, “ व्यसन आणि मर्यादा हें जोडपें पदोपदीं भांडणारेंच असायचें! माणसाच्या शरीराइतकें छांदिष्ट जगांत दुसरें कांहींच नाहीं. बालहट्ट, स्त्रीहट्ट आणि राजहट्ट हे पुरविल्याशिवाय माणसाला गत्यंतर नसतें अशी एक समजूत आहे. पण शरिराच्या हट्टांत या तिन्ही हट्टांचा अर्क उतरलेला असतो, असें म्हणायला हरकत नाहीं. शरीराला लहान मुलाप्रमाणेंच कुठल्याही गोष्टीच्या परिणामांची जाणीव असत नाहीं. उलट स्त्रीची आकर्षकता आणि राजाची सत्ता यांचा संगम मात्र त्याच्यांत झालेला असतो.” मात्र निसर्गाची गुलामागिरी इतकी असली, तरी मानवाला इच्छा-स्वातंत्र्य आहे हें तत्त्वज्ञान विशद करतांना खांडेकर लिहितात, “ निसर्गानें मनुष्याच्या रक्तांत गुलामगिरीची आवड ठेविली असेल. पण आपण कशाचें गुलाम व्हायचें तें ज्याचें त्याला ठरवितां येतेंच कीं ! ”

जीवनाचें तत्त्वज्ञान

व्यक्ति व समाज यांच्या संबंधांतील तत्त्व एका सुंदर दृष्टांतानें खांडेकर सांगतात. ‘ साडे नऊ रुपये ’ मध्यें ते लिहितात, “ समुद्राला मिळणाऱ्या नदीचें पाणी कितीहि गोड असलें तरी संगमाच्या ठिकाणीं तें खारटच होतें. मनाचेंहि तसेंच आहे. व्यक्तिदृष्ट्या आपलें मन कितीहि पुढें गेलें तरी समाजाशीं संबंध आला कीं, तें सामाजिक मनाइतकेंच मागासलेलें होतें ! ”

जगाचा विकास करण्यासाठीं मानवानें सतत लढत राहिलें पाहिजे— आयुष्य ही एक लढाई आहे, हा खांडेकरांचा लाडका सिद्धांत आहे. तो “विसरलेला संदेश”मध्यें मांडतांना ते लिहितात, “ज्योतीचा जन्म जसा अंधार उजळण्याकरितां असतो, त्याप्रमाणें व्यक्तीचा जन्म हें जग अधिक पवित्र,

अधिक मंगल, अधिक उदात्त करण्याकरितां आहे. म्हणून जगांत जें जें अपवित्र असेल, जें जें अमंगल असेल, जें जें अनुदात्त असेल; तें त नाहींसें करण्याकरतां लढत राहणं, पराजय झाला तरी लढत राहणं, प्रसंगीं गुप्तपणानं प्रसंगीं उघड, जरूर लागेल तेव्हां शस्त्रानं–जरूर लागेल तेव्हां बुद्धीनं, पण एकसारखं जगांतल्या राक्षसी शक्तींशीं लढत राहणें हेंच माझं जीवित–कर्तव्य होतं !"

अलंकारिक भाषेची कैफियत

स्वतःच्या आवडीनिवडीचें रम्य प्रतिबिंब लघुनिबंधांत पडावयास पाहिजे. पण आपल्या व्यक्तित्वाचे असे ठसे उमटण्याऐवजीं कोट्या, कथा व कविता यांचे कण एकत्र जमविण्याचींच खांडेकरांना अधिक हौस दिसते. जणुं कांहीं 'उपमा' निबंधाच्या नायकाप्रमाणें खांडेकर वाचकांना आव्हानच देत आहेत, "ज्यांत बिलकूल साम्य नाहीं अशा दोन गोष्टी सांगा मला. त्यांतल्या एकीची उपमा दुसरीला देतां येते, हें मी सिद्ध करून दाखवितों. 'एक तास' मधील मंदाकिनीनें चष्म्याची काडी मोडतांच 'चाळिशीशीं माझी अक्षरशः काडीमोड झाली' अशी कोटि ते करतात. 'प्रेम–कलह कीं कलह–प्रेम' अशी शब्दाची उलटापालट करण्याचा गडकरीय गुण त्यांचे अंगीं आहे, फार काय, Where There is a will या इंग्रजी म्हणींतिल will चे 'इच्छा' व 'मृत्युपत्र' असें दोन अर्थ करून त्यांनीं श्लेष साधला आहे !

अर्थात्, अशी अलंकारिक भाषा समर्पक असते तेव्हां वाचकांचें चित्त रिझवते. पण तिचा अतिरेक झाला तर ? खांडेकरांना एका लघुनिबंधांत आपल्या "अलंकारिक भाषेची" कैफियत द्यावी लागली आहे. "ती रसाचा गळा दाबते, स्वाभाविकपणाचा खून करते, बुद्धीला भटकेपणाची संवय लावते" इत्यादि आरोप अलंकारिक भाषेंतच त्यांनीं मांडले आहेत. ते खोडून काढतांना त्यांनीं कुशल वकिलाप्रमाणें आपला बचाव केला आहे. "अलंकारिक भाषेची निंदा ही जुन्या वाङ्मयांत आढळणाऱ्या शरीराच्या अगर स्त्रीच्या निंदेइतकीच खरी मानायची !" असें ठाम मत त्यांनीं

आरंभीं सांगितलें, पण पुढें योग्य तें तारतम्य संभाळण्याचा इषारा देतांना ते म्हणतात, " दागिने शोभादायक असतात म्हणून वाटेल तो दागिना वाटेल तिथें शोभतो असें मात्र नाहीं. कानांत सरी आणि गळ्यांत साखळ्या घालून एकादी बाई मिरवायला निघाली तर कौतुकाऐवजीं तिचें हंसेंच होईल. भाषेच्या बाबतींत असले वेडेचार नित्य घडतात. "

नव्यानव्या म्हणी बनवून त्या मधूनमधून वापरण्याची हौस खांडेकरांना आहे. " उतावळा शिकारी स्वतःला ठार करी, ' ' दान द्यावें झांकून आणि डायरी पहावी उघडून, ' ' जितक्या कुडी तितक्या आवडी ' इत्यादि कांहीं म्हणी सुटसुटीत, अर्थपूर्ण व अलंकारिक आहेत. त्या म्हणी म्हणजे लघुनिबंधाच्या कंठांतील सुवर्ण-मणीच !

कल्पकतेचें स्वरूप

साधा विचारहि कल्पकतेच्या जादूनें मनोहर रीतीनें मांडण्याची खांडेकरांची हातोटी असामान्य आहे. खुद्द कल्पकतेवरच आपली कल्पना चालवून ते म्हणतात, " कल्पकता ही शुक्राच्या चांदणीसारखी असते हेंच खरें ! तर्पेच काय, पण शतकें, किंबहुना युगें लोटलीं तरी तिचें स्निग्ध तेज अणुमात्रहि मंद होत नाहीं. खांडेकरांची कल्पकता अचपळ आहे. ती विजेप्रमाणें आकाशांत संचार करणारी आहे—क्षणांत येथें, क्षणांत तेथें, अशी चंचल आहे. प्रा. शिवरामपंत परांजपे यांच्याप्रमाणेंहि कांहीं कांहीं वेळां ते कल्पनारम्य व वक्रोक्तिपूर्ण लिहूं शकतात. ' माझ्या ' या प्रा. परांजपे यांना अर्पण केलेल्या आपल्या लघुनिबंध-संग्रहांतील बहुतेक सारे लेख असेच काव्य-कल्पनेनें नटलेले आहेत-निरनिराळे आभास दाखविणारे आहेत. एके ठिकाणीं त्यांची काळपुरुषाशीं भेट होते व त्याच्या पोतडींत गांधीजी व लेनिन यांचे फोटो आणि कोयता व टकळी हीं त्यांचीं आयुधें त्यांना दिसतात. आणि काळपुरुषाची सारी धांदल कशासाठीं ? तर ' नवा मनुष्य ' निर्मिण्यासाठीं. ' कवि, चोर आणि पोलिस ' यामध्यें पंढरीचा विठोबा रेशनकार्डासाठीं धांवपळ करीत आहे, दत्ताला मार्ग विचारीत आहे असा भास दाखविला

आहे. 'विसरलेला संदेश' मध्यें श्रीकृष्णाची तकार निवेदिली आहे. खांडेकरांची देवावर श्रद्धा नसल्यानें त्यांनीं अनेक ठिकाणीं देवाला विनोदाचा विषय बनविलें आहे. त्यांचे गुरु श्री. कृ. कोल्हटकर यांचा हाहि वारसा त्यांनीं मिळविला आहे. 'गोष्ट जुनीच आहे.' या निबंधांत इसापची भेट झाल्याचा आभास त्यांनीं निर्माण केला आहे. त्यांनीं कोठें रेशन नाकारणाऱ्या फैजपूरच्या गजराजाला निमित्त करून मानवावर टीका केली आहे, तर कोठें लखनौच्या सर्पराजास अनावृत पत्र पाठवून माणूस सापापेक्षांहि भयंकर बनला असल्याचें सूचित केलें आहे.

शिवरामपंती रूपकें

'कुठं आहे तो मेघ?' हा लघुनिबंध प्रा. परांजपे यांची आठवण करून देण्याइतका देशभक्तिपूर्ण व कल्पनासंपन्न आहे. त्याचा लेखनकालहि विचारांत घेण्यासारखा आहे. १९४४ सालीं जगांत युद्ध पेटलें होतें, देशांत दडपशाही थैमान घालीत होती, गांधीजीप्रभृति राष्ट्रनेते तुरुंगांत डांबलेले होते आणि बंगालच्या दुष्काळांत लाखो लोकांची आहुति पडली तरी व्यापारीवर्ग आपला जीवघेणा काळाबाजार चालवीतच होता. या सर्व परिस्थितीचें प्रतिबिंब प्रस्तुत निबंधांत खांडेकरांनीं मोठ्या कौशल्यानें उमटविलें आहे. प्रारंभीं उन्हाळ्याचें वर्णन करतांना ते लिहितात, "त्या दिवशींच्या उकाड्याचा साराच नूर न्यारा होता. वाऱ्याचा सृष्टीशीं घटका दोन घटका चालणारा प्रेमकलह झाला नसून घटस्फोटाची मजल गांठण्याइतकें त्या दोघांचें कडाक्याचें भांडण झालें असलें पाहिजे अशी कल्पना माझ्या मनांत पुनः पुन्हां येऊं लागली. अंगांतून गळणाऱ्या घामाच्या धारा पाहून कुणीतरी टांचणीनें आपल्या शरीराला शेंकडों भोंकें पाडलीं असावींत असाहि विचित्र भास मधून-मधून होई." अशा स्थितींत माशाएवढा दिसणारा एक मेघ हत्तीएवढा झाला आणि तो आपलें सैन्य घेऊन आकाशभर तळ देऊन राहिला. त्यानें विमानाप्रमाणें घराघरावर जाऊन तेथें धान्याची सांठेबाजी आहे काय, तें पाहिलें. ती दिसतांच त्यानें पोबारा केला. कारण जोंवर

समाजांत विषम वाटणी आहे, तोंपर्यंत आपण आपली जल-संपत्ति या मानवप्राण्यावर उधळून कांहीं उपयोग नाहीं–मूठभर श्रीमंत आधिक श्रीमंत होतील व बाकीचे लोक भुकेनें तडफडतच राहतील असा विचार करून तो ढग परत गेला. या निबंधांत खांडेकरांची तरल कल्पकता, सूक्ष्म टीका, पुरोगामी विचार, इत्यादि सारे गुण एकवटलेले दिसतात.

'काळे आणि गोरे' या निबंधांतहि शिवरामपंती काव्य आहे. त्यांत डोक्यावरील केसांचीं भाषणें देऊन युरोपियन व इतर लोक यांच्या वैषम्यावर टीका केली आहे. काळे केस द्वयर्थी भाषेनें म्हणतात, "आम्ही आमच्या मालकीच्या प्रदेशांत पाहुणा म्हणून याला प्रथम राहूं दिलें. पण या गोऱ्या पाहुण्यानें लवकरच आपला गोतावळा गोळा करायला सुरवात केली. हळू हळू पांढऱ्या केसांची या मस्तक प्रदेशांत भयंकर गर्दी होऊं लागली. आपल्याला ऐसपैस राहायला जागा मिळावी म्हणून किती काळ्या केंसाचे या गोऱ्यांनीं खून केले असतील याची गणतीसुद्धां करतां येणार नाहीं."

निबंध कीं गद्य काव्य?

खांडेकरांचे लघुनिबंध म्हणजे रम्य कल्पनेचीं कमळें फुलविणाऱ्या वायुलहरी. 'वायुलहरी' हा निबंध म्हणजे तर एक गद्यकाव्यच. आरंभापासून शेवटपर्यंत कल्पनामागून कल्पनांनीं तो निबंध शृंगारलेला आहे. वृत्तांच्या ठोकळ्यांत बसविला कीं तोच मजकूर 'काव्य' म्हणून खुशाल खपेल! वाऱ्याचा खेळकरपणा वर्णन करतांना खांडेकर लिहितात, "वायुलहरीचें तसें नाहीं. त्या आतां कानगोष्टी करतील, तर आतां कानशिलांत लगावतील. वायुकुमार घटकेंत जलदेवीच्या खेळण्यांतील गुलाबदाणी आणून तिच्यांतील सुवासिक शीतल तुषार अंगावर उडवील; तर दुसऱ्या घटकेला तेजाच्या हातांतील ऊन पाण्याची झारी अंगावर ओतून चांगले चटकेहि देईल.....मेघांच्या पालखींतून मिरवत आणि विजेच्या चवऱ्या ढाळून घेत वर्षादेवी ज्यावेळीं पृथ्वीवर उतरूं लागते, त्या वेळीं तिच्या आगमनाची ग्वाही वाराच फिरवीत नाहीं कां?"

जसा वायु, तसेंच जल. या निसर्गाचीं विविध रूपें किती सुंदर असतात, हें 'महापूर' या निबंधांत वर्णन करून खांडेकर सांगतात, 'जलदर्शनानें होणारा आनंद कांहीं निराळाच आहे हें कांहीं खोटें नाहीं. दंवबिंदूंच्या रूपानें अवतरलेलीं तान्हुल्याचीं चुंबनें, अल्लड तरुणतरुणींच्या हृदयाप्रमाणें खळखळत धांव घेणारे निर्झर, सुखवस्तु सांसारिकांसारखी दिसणारीं सरोवरें, आणि भोंवतालच्या रुक्ष प्रदेशाला आपल्या मातृहृदयानें नंदनवनाचें स्वरूप आणणाऱ्या नद्या यांच्या दर्शनानें आनंदित न होणारा अभागी आज उभ्या जगांत तरी सांपडेल कां ?"

निसर्गाचा महिमा गातांना खांडेकर 'चांदण्यांत' गुणगुणतात, "निसर्ग म्हणजे तर नावीन्याचें निधान, भव्यतेचें भांडार, सौंदर्याचा सागर, रमणीयतेचा रसनिधि !"

चांदणें हें निसर्गाचें रत्नखचित लेणेंच होय. त्याची जादू सांगतांना खांडेकर म्हणतात, "भावना हेंच जीवनांतलें चांदणें आहे. चंद्रिका मातीच्या घरांत संगमरवरी सौंदर्याचा साज चाढवेते आणि बाभळीच्या झाडांना नंदनवनांतील पारिजातकाइतकी मोहकता प्राप्त करून देते, नाहीं कां ? अमावास्येलाच सारी भुतावळ बाहेर पडते ही जुनी कल्पना कांहीं अगदीं अर्थशून्य नाहीं. चांदण्यांत पिशाच्चें बाहेर पडतील तर त्यांचें चटकन् यक्षगंधर्वांत रूपांतर होईल."

कल्पनेचे विलास

नित्याचा पाऊस. पण त्यांचें शब्दचित्र खांडेकर किती उंची रंगांनीं रंगवितात, तें 'पुनर्जन्म' मध्यें पहावयास सांपडतें. तें असें, "पांढऱ्याशुभ्र मोत्यांच्या राशींनीं भरलेल्या मेघांच्या नौका आंतील मौल्यवान् माल कुणालाहि दिसूं नये म्हणून काळ्या पडद्यानें आच्छादित आकाशांतून जात आहेत, आपल्या हक्काचें हें ऐश्वर्य आपल्याला मिळणार नाहीं या भीतीनें पृथ्वीच्या तोंडचें पाणी पळालें आहे, इतक्यांत मूर्तिमंत न्यायदेवताच वाटणारी वीज एकदम प्रगट होते आणि त्या नौकांना भराभर भोंकें पाडून पृथ्वीवर मोत्यांचा वर्षाव करते."

' सायंकाल ' चें वर्णन अगदीं काव्याला शोभेशा कल्पकतेनें खांडेकर करतात, तें असें—" गंगा–यमुनांच्या संगमामुळें प्रयागला जें पावित्र्य आलें आहे, त्याचें दर्शन सायंकालांतल्या प्रत्येक रंगछटेंत होत असतें. सौम्य होत जाणारा सूर्यप्रकाश आणि लाजत लाजत येणाऱ्या रजनीची छाया यांचें हें मधुर मीलन म्हणजे सृष्टिमंदिरांतलें विविध रंगांनें रंगविलेलें सर्वोत्कृष्ट चित्रच होय. "

इतकें कशाला ? नुसतें कोळ्याचें जाळें ! पण त्याला खांडेकरांची प्रतिभा राजवाड्याचें सौंदर्य कसें मिळवून देतें पहा— " त्या दिवशीं टेंकडीवरच्या रस्त्यावर कोळ्याचें केवढें घर पाहिलें मी ! घर कसलें राजवाडाच होता तो. सूर्यकिरणांनीं चमचमणारे त्या राजवाड्याचे चिमणे स्तंभ किती आकर्षक दिसत होते. सूत काढण्याच्या शर्यतींत जर कोळ्याला भाग घेतां आला असता, तर जास्तींत जास्त नंबराचें सूत काढून त्यानें पहिला नंबर खास पटकावला असता ! "

माणसाचे डोळे. त्यांतहि खांडेकरांची काव्य-दृष्टि किती गूढ अर्थ पाहूं शकते. ते म्हणतात, " रवींद्रनाथांची काव्यशक्ति डोळ्यांना लाभलेली आहे; एवढेंच नव्हे तर चंद्रशेखर रमणांची शास्त्रशक्तीहि त्यांच्या ठिकाणीं आहे." डोळे व नाक यांच्यांतील फरक खांडेकरांनीं किती गंमतीनें दाखविला आहे, " पापण्यांच्या दरवाजामुळें प्रत्येकाचे डोळे एखाद्या दुमदार बंदिस्त बंगल्याप्रमाणें सुरक्षित असतात. नाकाच्या धर्मशाळेंत अत्तराच्या सुगंधापासून माडी-दुकानांतल्या दुर्गंधीपर्यंत वाटेल त्यानें बिऱ्हाड करावें. नाकाला त्या बाबतींत हूं कीं चूं देखील करतां येत नाहीं. पण डोळ्यांच्या बंगल्यापाशीं अनिष्ट असा धुळीचा कण येतांच बंगल्याचे दरवाजे झटकन् झांकले जातात. "

तसाच आरसा. त्याला खांडेकर ' स्थितप्रज्ञ ' कां म्हणतात, तें ऐका, ' भंगुर कांच व चंचल पारा यांच्या मिश्रणानें उत्पन्न झालेल्या आरशाची तुलना मर्त्य शरीर व चंचल मन यांच्या पोटीं जन्म घेणाऱ्या प्रेमाशींच होऊं शकेल असें कवि–कल्पनेला वाटेल. वस्तु समोरून नाहींशी झाली कीं,

तिला पूर्णपणें विसरून जाण्याची शक्ति पाहून तत्त्वज्ञ त्याला स्थितप्रज्ञाच्या पंक्तीला बसवील. ''

रम्य वर्णन-शैली

तारुण्याचें गुण-गान कोणता कवि करीत नाहीं ? ' ऐन पंचविशी'चें स्तोत्र फडके यांनीं गाइलें आहेच. खांडेकर ' रम्य आणि रम्यतम ' या निबंधांत बालपणाची रम्यता मान्य करतात, पण तारुण्याविषयीं ते म्हणतात, '' उंचावरून पुरांत उडी टाकायची असो अथवा उच्च ध्येयासाठीं जीवित-संग्रामांत उडी टाकायची असो, तारुण्यच निधडेपणानें तें काम करूं शकतें.....तारुण्य ही पहांटेची स्वप्नसृष्टि आहे, मर्त्य जगाला विसगलेली यक्षभूमि आहे. ''

' दोन पाहुणे ' या निबंधांतहि खांडेकर तारुण्यावर असें रूपक रचतात कीं, '' तारुण्यांतील दहा वर्षें म्हणजे कांहीं सहारा वाळवंटांतील प्रवास नव्हे. आकांक्षांचे हिमाच्छादित पर्वत, आशेची रम्य वनश्री आणि कर्तृत्वाचीं फलपुष्पें यांनीं नटलेल्या प्रदेशांतील तें पर्यटन. ''

रोजचीं पत्रें !-पण खांडेकरांच्या कल्पकतेच्या किमयेनें त्यांना केवढें मोल चढविलें आहे, पहा—

'' पत्रें अपत्यासारखीं असतात. आयुष्यांत तीं नसलीं तर मनुष्याला अगदीं चुकल्याचुकल्यासारखें होतें. असलीं कीं, त्यांचा व्याप जिवाला पुरे पुरे करून सोडतो ! पत्रें या आपल्या आयुष्यांतील तारकाच होत यांत शंका नाहीं. तसें पाहिलें तर तारकांच्या तेजानें पृथ्वी कांहीं प्रकाशित होत नाहीं. पण भयंकर अंधारानें भिऊन गेलेल्या मनाला त्यांचा केवढा धीर असतो आणि आधार वाटतो. ''

तसेंच, दैनिक वृत्तपत्रांचें वर्णन करतांना खांडेकर आपली कल्पकता चालवितात व लिहितात, '' वर्तमानपत्र म्हटलें म्हणजे जगांतल्या साऱ्या सुखदुःखांचें प्रसूतिगृह ! दररोज थोडी थोडी अफू खाणाराला जसें कुठलेंहि विष बाधत नाहीं, त्याप्रमाणें दैनिकाच्या भक्ताला कुठलीहि बातमी भिववूं शकत नाहीं. ''

कादंबरीचें कला-वैभव

खांडेकर हे कादंबरीकार असल्याचा पडताळा त्यांच्या लघुनिबंधांतहि वारंवार येतो. 'भांडण' मध्यें त्यांनीं कोंकण व देश यांतील सृष्टि-सौंदर्याच्या भिन्नतेंतहि एकच आनंद कसा अनुभवास येतो हें विस्तारानें वर्णन करून सांगितलें आहे, तें असें —

" कोंकण व देश यांच्यांतील सामान्य मनुष्याला दिसणारीं विविध सौंदर्यें आलटूनपालटून माझ्या डोळ्यांपुढें नाचूं लागलीं. नारळी-पोफळीच्या रायांत रमतांना जी गंमत वाटते, तींच पुरुषभर उंचीच्या जोंधळ्यांतून खळखळत जातांना अगर उसाच्या मळ्यांतून पाठशिवणीचा खेळ खेळतांना आपल्या अनुभवाला येत नाहीं कां ? राताब्यांचें पन्हें पितांना काय अगर गुऱ्हाळावर जाऊन काकवी चाखतांना काय, जिभेला सारखेंच पाणी सुटतें. पिवळ्याजर्द बोंडूंनीं भरलेलें काजूचें झाड पिकलेल्या पेरूंनीं शोभणाऱ्या झाडापेक्षां कमी सुंदर दिसतें असें कोण म्हणेल ? वादळी समुद्र आणि महापूर आलेली नदी हीं दोन्हीं निसर्गाच्या भव्य सुंदर स्वरूपाची सारखीच जाणीव करून देतात. डोंगरावरील जाळ्यांतून करवंदें शोधून काढणें आणि भुईमुगाच्या शेतांत जाऊन ओल्या शेंगा काढणें यांत अधिक मौज कशांत आहे, हें सांगतां येणेंच शक्य नाहीं. किर्र रानांतून अपरात्रीं गाडी हाकीत असतांना घाटावरला गाडीवान जें गाणें गात असतो, त्याची मोहिनी रांपण घालण्याकरितां होडींत बसून गेलेल्या कोळ्याच्या तोंडचें गाणें ज्यानें ऐकलें असेल. त्यालाच बरोबर कळूं शकेल. घाटावरचा शेतकरी वाटसरूला मोठ्या प्रेमानें ओला हरभरा देतो, तर कोंकणांतला त्याचा भाऊ माडावरचें अडसर काढून त्याचें आदरातिथ्य करतो. "

त्याच निबंधांत थोर विभूति व सामान्य माणसें यांच्यांतील अंतर सुदर दृष्टांतांनीं दर्शविलें आहे. तें असें —" टिळक आणि गोखले-दोघेही अफाट समुद्र. आमच्या कागदी होड्यांनीं त्यांचा विस्तार मोजायला आम्हीं निघालों होतों ! कोल्हटकर आणि खाडिलकर ! महाराष्ट्र शारदेच्या उद्यानांतील कल्पवृक्ष ! त्यांच्या साली काढून त्यावरून आम्हीं त्यांच्या

फळांची गोडी अजमावीत होतो. खरेंच, गतायुष्यांतील साऱ्या वादविवादाकडे आणि भांडणांकडे पाहिलें कीं, डार्विनचा मनुष्याविषयींचा सिद्धांत खोटा वाटूं लागतो. वानरापेक्षां मांजरच मनुष्यजातीचें पूर्वज अधिक शोभेल यांत शंका नाहीं. ''

कादंबरीप्रमाणें लघुनिबंधाचा प्रारंभ खांडेकर कधीं कधीं चित्ताकर्षक करतात. ' रम्य आणि रम्यतम ' या निबंधाचा प्रारंभ पहा, '' मोटार सर्रकन् आवाज करून थांबली. माझ्या छातींत एकदम धस्स झालें. अपघाताच्या भीतीनें नव्हे ! मोटार किती नादुरुस्त झाली असेल या विचारानें ! एका संस्कृत सुभाषितकारानें भांडण नसलेलें गांव, लबाडी न करणारा दुकानदार, गुंजभरहि सोनें न चोरणारा सोनार वगैरे असंभाव्य गोष्टींची एक यादी केली आहे. त्याच्या वेळीं मोटारी असत्या तर या यादींत, वाटेंत न बिघडणाऱ्या मोटारीला अग्रपूजेचा मान त्यानें अगत्य दिला असता ! ''

मंदाकिनी या बालिकेचें पुढील अलंकारिक वर्णन कादंबरींत शोभणार नाहीं काय ? ' सुभाषितें ' या निबंधांत खांडेकर तें वर्णन पुढीलप्रमाणें करतात, '' मंदा अगदीं नटूनथटून आली होती. लहानलहान तरंगांनीं जलाशयाचा पृष्ठभाग जसा मोहक दिसतो, तसा तिचा निळा फ्रॉक चुण्यांमुळें मोठा सुंदर वाटत होता. मंद चांदण्यानें आकाशाचा निळसर रंग खुलून दिसावा, तशी बेतानें लावलेल्या पावडरीमुळें तिची सावळी मुद्रा दिसत होती. ''

सूक्ष्म विचारांचा आविष्कार

सूक्ष्म विचार सुंदर उपमेनें निवेदन करण्यांत खांडेकरांचें कौशल्य असामान्य आहे. ' एकवचन ' या निबंधांत ते लिहितात, ' तुझें ' आणि ' तुमचे ' या दोन शब्दांत किती विलक्षण फरक आहे ! पहिला शब्द उच्चारतांना किंवा लिहितांना आपण एखाद्या लताकुंजांत अथवा समुद्रतीरावर बसलों आहों असा भास होतो. उलट दुसऱ्या शब्दाचा उच्चार

करतांना आपण रहदारीच्या रस्त्यानें जात आहों असें चित्र डोळ्यापुढें उभें राहतें.....

'तुझें' आणि 'तुमचे'! पहिलें वचन प्रीतीचें तर दुसरें बहुमानाचें! जगांत दुसऱ्याला मान देणें सोपें आहे. पण प्रेम देणें? छेः! प्रेमाचीं फुलें लहर लागेल तेव्हांच हृदयाच्या वेलीवर फुलत असतात आणि बहुमानाचीं फुलें—कागदीं फुलें काय, हवीं तेव्हां बाजारांत मिळतात."

काळपुरुषाचें शब्दचित्र 'दोन पाहुणे' मध्यें खांडेकरांनीं पुढील शब्दांनीं काढलें आहे, "जगाच्या बागेंतील त्या माळ्याच्या कंबरेला चकचकीत कोयती चमकत असली; तरी त्याच्या हातांत पाण्याची झारी आहे."

सुभाषितांचें महत्त्व खांडेकर सांगतात, "वस्त्रांनीं मनुष्याच्या शरीराचें सौंदर्य वाढतें, फुलांनीं केसांचे सौंदर्य वाढतें. सुभाषितें हींहि सुंदर वस्त्रासारखीं अथवा मोहक फुलासारखींच नाहींत का? आपल्या मनाचें सौंदर्य वाढावें अशी मनुष्याला इच्छा नसती, तर त्याला सुभाषितें कधींच आवडलीं नसतीं! सुभाषितांची आवड ही मनुष्याच्या मनाला लागलेली पूर्णतेची तहान आहे."

गप्पांचा उपयोग सांगतांना ते म्हणतात, "गप्पा मारणें म्हणजे मनानें सुंदर मोकळ्या हवेंत फिरणें! हवा खाऊन कांहीं कुणाचें पोट भरत नाहीं. पण किती हुषारी येते मोकळ्या हवेंत फिरल्यामुळें! गप्पांनींहि तसेंच वाटतें! अर्थात् दूषित हवेंत फिरणें जसें धोक्याचें; त्याप्रमाणें बातांत रूपांतर होणाऱ्या गप्पा मारणें वाईट हें ओघानें आलेंच!" जें गप्पांना लागू, तेंच लघुनिबंधाला.

व्यावहारिक दाखले

व्यवहारांतील दाखलेहि खांडेकर मधूनमधून देतात. 'मी आहें कीं' या निबंधांत आपली निराशा त्यांनीं किती व्यावहारिक दृष्टांतांनीं सांगितली आहे, पहा—"माहेराहून आपल्या लवाजम्यानिशीं येणाऱ्या पत्नीचें स्वागत करण्याकरितां स्टेशनावर अगदीं वेळेवर हजर व्हावें आणि कड-

कट्टपार्शी बसलेल्या मद्रासी सद्गृहस्थांनीं 'गाडी दोन तास लेट आहे !' म्हणून सांगावें; किंवा एखादा लोकप्रिय चित्रपट पाहण्याकरितां मुद्दाम टॅक्सी करून आपल्या कबिल्यासह थेटराच्या दारांत उतरावें आणि 'बॉक्सचीं तिकिटं तेवढीं शिल्लक आहेत' हे व्यवस्थापकांचे शब्द कानांवर पडावेत; अगदीं तशी स्थिति झाली माझी !"

याहिपेक्षां सोपा दाखला 'तात्पर्य'मध्यें आहे. तो असा—

"गोष्टींत एखादें तत्त्व असणें निराळें आणि तिचें तात्पर्य सांगणें निराळें. जरदाळू आणि बदाम यांच्याइतका फरक आहे या दोन्हींत. जरदाळू खाणाराला प्रथमच धोंडा शोधावा लागत नाहीं. बरचा गर खाऊन तोंड गोड झाल्यावर वाटलें तर त्यानें आंतली बी फोडावी, वाटलें तर फेंकून द्यावी. फारसें कांहीं बिघडणार नाहीं त्यामुळें. पण बदामाचें सर्वच कांहीं आगळें ! फोडण्याची यातायात केली नाहीं तर तो आणि रस्त्यावरचे खडे सारखेच. बरें, फोडून तरी आंतली बी गोडच निघेल म्हणून काय नेम आहे ? मोठ्या आशेनें ती तोंडांत टाकावी आणि— आणि काय ? प्रेमभंग झालेल्या नायकाचें अगदीं सुरेख चित्र कुणाला पाहिजे असलें तर त्यानें त्या तोंडाचा फोटो घेण्याची झटपट व्यवस्था करावी."

विनोदाचीं साधनें

शब्दांचें लालित्य व कल्पनेचें रम्यत्व याप्रमाणेंच विनोदाचें चातुर्य— हाहि गुण खांडेकरांच्या लघुनिबंधांत विपुल प्रमाणांत आहे. त्यासाठीं शब्द, कल्पना, विचार—या सर्वांचें साहाय्य ते घेतात. लहानमोठीं, भलीबुरीं, कृत्रिम—नैसर्गिक अशीं सारीं साधनें वापरून ते विनोद निर्माण करतात. नवख्या लेखकाप्रमाणें शाब्दिक कोट्याहि ते कशा करतात, हें 'वेडा हत्ती' यामध्यें पहा—

"हे मूर्ख गजराजा, तुझ्या डोक्यांत मोत्याच्या राशी असतात ही कल्पना तुझ्याइतक्याच वेड्या कवींनीं आपल्या डोक्यांतून काढलेली दिसते ! या बातमीवरून तुझ्या डोक्यांत नुसते बटाटे भरलेले असावेत असा मला संशय येतो."

मल्याबुऱ्या उपमा-दृष्टांतांची भेळ किती खमंग लागते, हें 'काळे आणि गोरे 'मध्यें पहा— 'कुंकवावांचून जशी सवाष्ण नाहीं. लुटीवांचून जसं साम्राज्य नाहीं, थापांवाचून जसं राजकारण नाहीं, तशी सभापतीवांचून सभा नाहीं."

हाच विनोदाचा प्रकार 'उंबरांतील किडे' या निबंधांत पहावयास सांपडतो तो असा—" ठरलेल्या वेळीं सुटणारी मोटार ही शिकवणी न करणारा शिक्षक इंजेक्शन न देणारा डॉक्टर, पुढील तारीख न मागणारा वकील, कादंबरी, न वाचणारी कुमारिका, लघुकथा न लिहिणारा कॉलेजचा विद्यार्थी यांच्या मालिकेंतली अगदीं दुर्मिळ चीज आहे."

तसेंच, एका सूत्रांत कोणत्या तीन वस्तु गुंफल्या आहेत, तें पहा—

" चहा, गप्पा आणि मुलें हीं मर्यादित असतात तोंपर्यंतच सुखकारक होतात हा अनुभव आजकाल कुणाला नाहीं? पत्रांत या तिन्हींचेहि फायदे आणि तोटे एकवटलेले असतात."

'प्रेम-कलह कीं कलह-प्रेम?' यांतील शब्दांच्या उलटापालटीप्रमाणें कल्पनेची उलथापालथ 'माझे आवडते लेखक 'मध्यें केले आहे. ती अशी—

" त्यांच्या पदांचा अर्थ लावतां लावतां माझें संस्कृत सुधारलें कीं, माझें संस्कृत चांगलें असल्यामुळें त्यांच्या पदांचा अर्थ मला लागला हें कोडें मात्र मला कधींच उलगडलें नाहीं!"

घरगुती वातावरण

खांडेकरांच्या लेखनांतील जुने दाखले व नवे विचार यांचा सुंदर संगम 'दाढी आणि आरसा' या निबंधांत झालेला आढळतो. त्यांत प्राचीन संस्कृतींतून पुरोगामी विचार व्यक्त करून त्यांनीं विनोदहि साधलेला आहे. प्रवासाला जावयाचें तर बायकोनें भाराभर कपडे ट्रंकेंत कोंबले. तेव्हां झालेल्या पति-पत्नीच्या संवादांत सलगीची भाषा, घरगुती वातावरण, चलनी भाषा वगैरे लघुनिबंधाचें सारें साहित्य आलेलें आहे. तो संवाद असा—

" गाड्या कांहीं आपल्या सोईनं सुटत नाहींत ! एखाद्या वेळेलीं कपडे वाळवायला वेळ मिळाला नाहीं तर ? "

" तर तुझं अर्धं लुगडं मी नेशीन ! "

" इश्श ! "

" इश्श काय ? नळराजाच्या अर्ध्या वस्त्रावर दमयंतीनं दिवस काढलेच होते कीं नाहीं ? "

" प्रवासाला निघालं कीं लहान मुलासारखी अवस्था होते इकडली ! "

तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून मीं म्हटलें, " समान हक्कांचा काळ आहे हा ! तेव्हां बायकोचं अर्धं लुगडं नवरा नेसला तर त्यांत नवल नाहीं कांहीं. उलट फायदाच आहे त्याचा ! "

" फायदा ? "

" हो ! एरवीं गोल नेसायला कांकूं करणारी बायको लुगड्याची लांबी निम्मी झाल्यावर तरी गोल नेसेलच कीं नाहीं ? "

अतिशयोक्तीचे नमुने

अतिशयोक्ति हा तर विनोदाचा प्राणच. ' न आलेलीं पत्रें ' या निबंधांत खांडेकर लिहितात, " मीं दुसरें पत्र उचललें–तीन कादंबऱ्या, सात बोलपट कथा, एकशें एकवीस भावगीतें नि तीन खंडकाव्यें लिहिणाऱ्या इंग्रजी पांचवींतल्या विद्यार्थ्याचें होतें तें ! "

' प्रदर्शन ' मध्यें टांगेवाल्यांच्या आक्रमक वृत्तीचें वर्णन करतांना खांडेकरांनीं किती अतिशयोक्ति केली आहे, पहा–" टांगेवाल्यांनीं गराडा घातलेला गृहस्थ चोरी करतांना पकडलेल्या इसमासारखा दिसतो ! ' साहेब माझा टांगा आहे ! ' म्हणून एक त्याचा उजवा हात धरतो, तर ' साहेब चला.' म्हणून दुसरा त्याचा डावा हात पकडतो. देवानें माणसाला अवघे दोन हात देण्यांत फार मोठें चातुर्य प्रगट केलें आहे असें या वेळीं वाटूं

लागलें. सहस्रार्जुनाच्या काळीं जर टांगे असते आणि रथ मोडल्यामुळें अथवा दुसऱ्या कुठल्याहि कारणामुळें त्याच्यावर टांगा करण्याचा प्रसंग आला असता, तर–तर त्याचे हजार हात धरायलासुद्धां टांगेवाल्यांनीं कमी केलें नसतें !"

पौराणिक दाखले देण्यांत खांडेकर पटाईत आहेत. तसा पुराणांचा उपयोग न केल्याबद्दल त्यांनीं फडके यांना एके ठिकाणीं उणेपणाहि चिकटविला आहे पण फडके हे आपला वाचक पुराणप्रिय नसून पश्चिमेकडे तोंड करून बसलेला आहे असें मानीत असावेत. शिबि–नचिकेत–ययातीपेक्षां त्यांना खिस्त–रिपू व्हॅन् विंकल–नीरो हेच आपल्या वाचकांना परिचित आहेत असें फडके गृहीत धरीत असावेत.

विसंगतीचा विनोद

कल्पनेची चमत्कृति दाखवून 'पुनर्जन्म' मध्यें खांडेकरांनीं विनोद निर्मिला आहे; तो असा, "ज्या अमृताकरितां देवदानवांनीं समुद्रमंथन केलें तें बहुधा दह्यांत कालवलेलें मेतकूटच असलें पाहिजे अशी संशोधनाची कल्पनाहि त्यावेळीं माझ्या मनांत चमकून गेली !"

स्वतःचा बडेजाव सांगून खसखस पिकविण्याच्या पद्धतीचा उपयोग 'एक तप' मध्यें खांडेकरांनीं केला आहे. ते लिहितात, "जगांत देव असता तर हजारों निरपराधी लोकांना (या यादींत माझें नांव नेहमींच पहिलें असे हें सांगायला नको !) इतकीं विलक्षण दुःखें भोगावीं लागलीं असतीं कां ?"

पत्रावर 'लेखकु' नें तारीख घातली, तींत महिना चुकला. यांवर खांडेकरांच्या कल्पकतेनें 'झोका' मध्यें किती उंच उंच उड्डाणें घेतलीं पहा, "प्रत्येक पत्रावर १।५।३७ च्या ऐवजीं १–४–३७ ही तारीख आमच्या गजाननमहाराजांनीं घातली होती. ध चा मा करण्यापैकींच प्रकार होता हा ! मेची पहिली तारीख कामगार–दिनाची–म्हणजे पर्यायानें वीर-

रसाची. पण टांकाच्या फटकाऱ्यानें तिला ' एप्रिल फूल ' करण्याचें श्रेय सदरहू बाल-लेखकानें घेतलें होतें. तब्बल एक महिन्याचें अंतर ! एवढ्यांत किती घडामोडी होतात याची त्या विद्यार्थ्याला कल्पनाच नसावी ! चैत्री पौर्णिमेला मारुतीनें जन्मतःच सूर्यबिंब धरण्याकरितां बुभुःकार केला; पण आपण चुकीनें एक महिना मागें गेलों कीं, फाल्गुनी पौर्णिमाच गर्जून समोर उभी रहायची ! "

तसेंच, ' परीक्षक 'मध्यें एका विद्यार्थ्यानें ' तिच्या ' या शब्दांतील पहिलें अक्षर दीर्घ काढलें. त्यावर खांडेकरांची कल्पनाशक्ति काय म्हणते, ऐका, " तिच्या '—' तीच्या ' ! पहिली ती कशी खालीं पाहत चाललेली विनयशील स्त्री दिसते ! आणि दुसरी ? केसांना दगड बांधून दांखविणारी सर्कशींतील बाईच जणूं कांहीं ! ' तिच्या–तीच्या '–उद्‌गार चिन्हांची फौज पुढें उभी करावी एवढी अक्षम्य चूक ! एखाद्या सोवळ्या लेखकानें पाहिली तर–हां–हां म्हणतां हा गणिताचा पेपर अश्लील वाङ्मयांत जमा व्हायचा ! "

देवाचा व आपला संवाद, कल्पकतेच्या बळावर, घडवून आणून खांडेकर ' विरहा 'चें महत्त्व बिंबवितात; तें असें—'

" आणि म्हणून कधीं काळीं देव माझ्यापुढें उभा राहून " वत्सा, वर माग " म्हणून म्हणाला, तर, मी त्याच्यापाशीं एकच गोष्ट मागेन— " प्रिय जनांचा विरह ! " हें ऐकून देवसुद्धां बुचकळ्यांत पडेल ! कदाचित् तो माझी मूर्खांतहि गणना करील. पण मी मिस्किलपणानें त्याच्याकडे पाहात म्हणेन, " हे पहा देवा, तूं तरी स्वर्गसुख सोडून वारंवार पृथ्वीवर अवतार कां घेतोस ? विरहानें स्वर्गसुखाची गोडी वाढते म्हणूनच ना ?"

सहानुभूतीची दृष्टि

केवळ कल्पकता हा एकच गुण खांडेकरांच्या लेखनांत नाहीं. त्या साधनानें वाचकांचीं मनें जिंकून तीं विशाल करण्याइतकी समाज मनस्कताहि त्यांचे ठायीं आहे. " वाङ्मय–गुणांत कल्पकता मला जेवढी

लागलें. सहस्रार्जुनाच्या काळीं जर टांगे असते आणि रथ मोडल्यामुळें अथवा दुसऱ्या कुठल्याहि कारणामुळें त्याच्यावर टांगा करण्याचा प्रसंग आला असता, तर–तर त्याचे हजार हात धरायलासुद्धां टांगेवाल्यांनीं कमी केलें नसतें !"

पौराणिक दाखले देण्यांत खांडेकर पटाईत आहेत. तसा पुराणांचा उपयोग न केल्याबद्दल त्यांनीं फडके यांना एके ठिकाणीं उणेपणाहि चिकटविला आहे पण फडके हे आपला वाचक पुराणप्रिय नसून पश्चिमेकडे तोंड करून बसलेला आहे असें मानीत असावेत. शिबि–नचिकेत–ययातीपेक्षां त्यांना खिस्त–रिपू व्हॅन् विंकल–नीरो हेच आपल्या वाचकांना परिचित आहेत असें फडके गृहीत धरीत असावेत.

विसंगतीचा विनोद

कल्पनेची चमत्कृति दाखवून 'पुनर्जन्म' मध्यें खांडेकरांनीं विनोद निर्मिला आहे; तो असा, "ज्या अमृताकरितां देवदानवांनीं समुद्रमंथन केलें तें बहुधा दह्यांत कालवलेलें मेतकूटच असलें पाहिजे अशी संशोधनाची कल्पनाहि त्यावेळीं माझ्या मनांत चमकून गेली !"

स्वतःचा बडेजाव सांगून खसखस पिकविण्याच्या पद्धतीचा उपयोग 'एक तप' मध्यें खांडेकरांनीं केला आहे. ते लिहितात, "जगांत देव असता तर हजारों निरपराधी लोकांना (या यादींत माझें नांव नेहमींच पहिलें असे हें सांगायला नको !) इतकीं विलक्षण दुःखें भोगावीं लागलीं असतीं कां ?"

पत्रावर 'लेखकु' नें तारीख घातली, तींत महिना चुकला. यांवर खांडेकरांच्या कल्पकतेनें 'झोका' मध्यें किती उंच उंच उड्डाणें घेतलीं पहा, "प्रत्येक पत्रावर १।५।३७ च्या ऐवजीं १–४–३७ ही तारीख आमच्या गजाननमहाराजांनीं घातली होती. ध चा मा करण्यापैकींच प्रकार होता हा ! मेची पहिली तारीख कामगार–दिनाची–म्हणजे पर्यायानें वीर-

रसाची. पण टांकाच्या फटकाऱ्यानें तिला ' एप्रिल फूल ' करण्याचें श्रेय सदरहू बाल-लेखकानें घेतलें होतें. तब्बल एक महिन्याचें अंतर ! एवढ्यांत किती घडामोडी होतात याची त्या विद्यार्थ्याला कल्पनाच नसावी ! चैत्री पौर्णिमेला मारुतीनें जन्मतःच सूर्यबिंब धरण्याकरितां बुमुःकार केला; पण आपण चुकीनें एक महिना मागें गेलों कीं, फाल्गुनी पौर्णिमाच गर्जूत समोर उभी रहायची ! "

तसेंच, ' परीक्षक 'मध्यें एका विद्यार्थ्यानें ' तिच्या ' या शब्दांतील पहिलें अक्षर दीर्घ काढलें. त्यावर खांडेकरांची कल्पनाशक्ति काय म्हणते, ऐका, " तिच्या '—' तीच्या ' ! पहिली ती कशी खालीं पाहत चाल-लेली विनयशील स्त्री दिसते ! आणि दुसरी ? केसांना दगड बांधून दांखविणारी सर्कशींतील बाईच जणूं कांहीं ! ' तिच्या–तीच्या '–उद्‌गार चिन्हांची फौज पुढें उभी करावी एवढी अक्षम्य चूक ! एखाद्या सोवळ्या लेखकानें पाहिली तर–हां-हां म्हणतां हा गणिताचा पेपर अश्लील वाङ्मयांत जमा व्हायचा ! "

देवाचा व आपला संवाद, कल्पकतेच्या बळावर, घडवून आणून खांडेकर ' विरहा 'चें महत्त्व विंग्रवितात; तें असें---'

" आणि म्हणून कधीं काळीं देव माझ्यापुढें उभा राहून " वत्सा, वर माग " म्हणून म्हणाला, तर, मी त्याच्यापाशीं एकच गोष्ट मागेन— " प्रिय जनांचा विरह ! " हें ऐकून देवसुद्धां बुचकळ्यांत पडेल ! कदा-चित् तो माझी मूर्खीतहि गणना करील. पण मी मिस्किलपणानें त्याच्याकडे पाहात म्हणेन, " हे पहा देवा, तूं तरी स्वर्गसुख सोडून वारंवार पृथ्वीवर अवतार कां घेतोस ? विरहानें स्वर्गसुखाची गोडी वाढते म्हणूनच ना ?"

सहानुभूतीची दृष्टि

केवळ कल्पकता हा एकच गुण खांडेकरांच्या लेखनांत नाहीं. त्या साधनानें वाचकांचीं मनें जिंकून तीं विशाल करण्याइतकी समाज मनस्कताहि त्यांचे ठायीं आहे. " वाङ्मय–गुणांत कल्पकता मला जेवढी

आकर्षक वाटे, तेवढीच भोंवतालच्या सामाजिक अन्यायांची चीडहि माझ्या मनाला येई." हें त्यांचें स्वतःचें वर्णन नसत्या प्रशंसेचें नाहीं, सत्यस्थितीचेंच आहें. जगांतील दुःखाकडे सहानुभूतीनें पहाण्याची उदात्त शिकवण खांडेकर नेहमीं देतात. त्यांचें अनुकंपाशील अंतःकरण त्यांच्या लघुनिबंधांतून अनेकवार प्रगट झालें आहे. 'निकाल द्या' या आपल्या पहिल्याच निबंधांत ते म्हणतात, "शाळेंत एकाद्या मुलाचा अभ्यास झाला नसला कीं, त्याला उनाडपणाचें शेलापागोटें द्यावयाला आम्ही एका पायावर तयार! त्या चिमण्या जीवाला एखादी चिंता जाळीत असेल अगर घरांतील कामांमुळें त्याला आवंढा गिळायलाहि फुरसत मिळत नसेल, अशी कल्पनाहि आमच्या मनाला शिवत नाहीं. एखाद्यानें चोरी केली कीं, नाकानें वांगीं सोलणारा समाज त्याची छीःथू करूं लागतो, पण ती चोरी पोटच्या पोरीचा प्राण वांचविण्यासाठीं केली कीं श्रीमंतीची हांव धरून केली होती हें मात्र कोणी पाहत नाहीं."

प्रेमाची शिकवण

हाच सहानुभूतीचा, प्रेमाचा, सेवेचा मंगल संदेश मोठ्या कल्पकतेनें व आकर्षकपणें 'महात्म्याचे अश्रु' या लघुनिबंधांत खांडेकरांनीं दिला आहे. 'मी सुखी नाहीं' हे गांधीजींचे तीनच शब्द! पण त्यामुळें लेखकाचें कवि-हृदय हलून गेलें. त्या महात्म्याच्या अ-सुखाचा अर्थ काय? त्याचें कारण कोणतें? त्याचा संदेश कोणता? अशा नाना विचारांचीं चक्रें लेखकाच्या डोक्यांत फिरूं लागलीं–तो कल्पनेच्या पंखांनीं स्वर्गीतहि गेला. तेथें गांधीजींप्रमाणेंच बुद्ध व ख्रिस्त, टॉलस्टॉय व तुकाराम हे सारे महात्मे अश्रु ढाळीत असल्याचें त्याला आढळलें. त्याचें कारणहि त्यानें त्यांना विचारलें व त्यांच्या उत्तरावरून योग्य तो बोध घेऊन वाचकांना सांगितला. या अश्रूंचा महिमा वर्णन करतांना प्रारंभीं खांडेकर म्हणतात, "ज्यांच्या डोळ्यांत गंगेचें पावित्र्य आहे, ज्याच्या हृदयांत महासागराचें गांभीर्य आहे, ज्याच्या हृदयांत साऱ्या मंगल ध्येयांना धीर देण्याची शक्ति आहे अशा महात्म्याचे शब्द होते ते! गांधीजींनीं अंगदीं

अलीकडे जयकरांना लिहिलेल्या छोट्या पत्रांतले ते तीन शब्द–त्या तीन शब्दांत त्रिभुवनांतलें कारुण्य भरलें आहे असा मला भास झाला. मी सुखी नाहीं असें स्वतः महात्माजीच म्हणत होते. ''

अश्रूंचें कारण काय? असा प्रश्न लेखकानें केला असतां, '' बुद्धदेव गंभीरपणानें उद्गारले, ' मी स्वतःच्या संसाराचा त्याग केला तो जगाचा संसार सुखाचा व्हावा म्हणून. त्या आशेनं माझं मन त्यावेळीं फुलून गेलं होतं. आज ना उद्यां नवं सुखी जग निर्माण होईल असं मला वाटत होतं. पण ती आशा-तीं फुलं आतां कोमेजून गेलीं आहेत. '' हें नवें सुखी जग निर्माण करण्याचें महात्म्यांचें स्वप्न साकार कधीं होईल? याचें उत्तर देतांना लेखकानें एक पौराणिक दाखला दिला आहे. विराट राजाचे घरीं अज्ञातवासांतील धर्मराजाचे कपाळांतून रक्त सांडूं लागलें. तें त्या धर्मात्म्याचें रक्त जमिनीवर पडतां कामां नये, तसेंच महात्म्याचे अश्रु. म्हणून खांडेकर पटवून देतात, '' रक्त हें शरीराचे अश्रु असले तर अश्रु हें आत्म्याचें रक्त आहे. अलौकिक महात्म्यांचें हें अमोल रक्त जमिनीवर पडूं नये म्हणून जोंपर्यंत जगांतल्या सर्व उदात्त शक्ती धांव घेत नाहींत, हें पवित्र रक्त काढणाऱ्याला शिक्षा केल्याशिवाय आम्ही राहणार नाहीं अशी प्रतिज्ञा करणारे अर्जुन जोंपर्यंत प्रत्येक देशांत विपुल प्रमाणांत उत्पन्न होत नाहींत, तोंपर्यंत मुत्सद्यांची एक ठेवणींतली थाप किंवा कवींचें एक गोड स्वप्न यापलीकडे ' नवें जग ' या शब्दप्रयोगाला कांहीं अर्थ नाहीं! ''

तंत्रबद्ध लघुनिबंध

' रबरी फुगे ' हा खांडेकरांच्या लघुनिबंधाचा एक नमुनाच म्हणतां येईल. ' तूं रागावणार नसशील तर–' अशी कादंबरीसारखी सुरवात आहे, लेखक रबरी फुग्याबरोबर खेळत होता, हें पाहिल्यामुळें रावसाहेबांच्या मनांतील त्याचेविषयींचा आदर कमी होतो अशी कथा सांगितलेली आहे आणि शेवटीं '' आयुष्य हाच एक मोठा फुगा आहे!–धरणीसुद्धां एक

आकर्षक वाटे, तेवढीच भोंवतालच्या सामाजिक अन्यायांची चीडहि माझ्या मनाला येई." हें त्यांचें स्वतःचें वर्णन नसत्या प्रशंसेचें नाहीं, सत्यस्थितीचेंच आहें. जगांतील दुःखाकडे सहानुभूतीनें पहाण्याची उदात्त शिकवण खांडेकर नेहमीं देतात. त्यांचें अनुकंपाशील अंतःकरण त्यांच्या लघुनिबंधांतून अनेकवार प्रगट झालें आहे. 'निकाल द्या' या आपल्या पहिल्याच निबंधांत ते म्हणतात, "शाळेंत एकाद्या मुलाचा अभ्यास झाला नसला कीं, त्याला उनाडपणाचें शेलापागोटें द्यावयाला आम्ही एका पायावर तयार! त्या चिमण्या जीवाला एखादी चिंता जाळीत असेल अगर घरांतील कामांमुळें त्याला आवंढा गिळायलाहि फुरसत मिळत नसेल, अशी कल्पनाहि आमच्या मनाला शिवत नाहीं. एखाद्यानें चोरी केली कीं, नाकानें वांगीं सोलणारा समाज त्याची छीःथू करूं लागतो, पण ती चोरी पोटच्या पोरीचा प्राण वांचविण्यासाठीं केली कीं श्रीमंतीची हांव धरून केली होती हें मात्र कोणी पाहत नाहीं."

प्रेमाची शिकवण

हाच सहानुभूतीचा, प्रेमाचा, सेवेचा मंगल संदेश मोठ्या कल्पकतेनें व आकर्षकपणें 'महात्म्याचे अश्रु' या लघुनिबंधांत खांडेकरांनीं दिला आहे. 'मी सुखी नाहीं' हे गांधीजींचे तीनच शब्द! पण त्यामुळें लेखकाचें कवि-हृदय हलून गेलें. त्या महात्म्याच्या अ-सुखाचा अर्थ काय? त्याचें कारण कोणतें? त्याचा संदेश कोणता? अशा नाना विचारांचीं चक्रें लेखकाच्या डोक्यांत फिरूं लागलीं-तो कल्पनेच्या पंखांनीं स्वर्गीतहि गेला. तेथें गांधीजींप्रमाणेंच बुद्ध व खिस्त, टॉलस्टॉय व तुकाराम हे सारे महात्मे अश्रु ढाळीत असल्याचें त्याला आढळलें. त्याचें कारणहि त्यानें त्यांना विचारलें व त्यांच्या उत्तरावरून योग्य तो बोध घेऊन वाचकांना सांगितला. या अश्रूंचा महिमा वर्णन करतांना प्रारंभीं खांडेकर म्हणतात, "ज्यांच्या डोळ्यांत गंगेचें पावित्र्य आहे, ज्याच्या हृदयांत महासागराचें गांभीर्य आहे, ज्याच्या हृदयांत साऱ्या मंगल ध्येयांना धीर देण्याची शक्ति आहे अशा महात्म्याचे शब्द होते ते! गांधीजींनीं अंगदीं

अलीकडे जयकरांना लिहिलेल्या छोट्या पत्रांतले ते तीन शब्द–त्या तीन शब्दांत त्रिभुवनांतलें कारुण्य भरलें आहे असा मला भास झाला. मी सुखी नाहीं असें स्वतः महात्माजीच म्हणत होते. ''

अश्रूंचें कारण काय ? असा प्रश्न लेखकानें केला असतां, '' बुद्धदेव गंभीरपणानें उद्गारले, ' मी स्वतःच्या संसाराचा त्याग केला तो जगाचा संसार सुखाचा व्हावा म्हणून. त्या आशेनं माझं मन त्यावेळीं फुलून गेलं होतं. आज ना उद्यां नवं सुखी जग निर्माण होईल असं मला वाटत होतं. पण ती आशा-तीं फुलं आतां कोमेजून गेलीं आहेत. '' हें नवें सुखी जग निर्माण करण्याचें महात्म्यांचें स्वप्न साकार कधीं होईल ? याचें उत्तर देतांना लेखकानें एक पौराणिक दाखला दिला आहे. विराट राजाचे घरीं अज्ञातवासांतील धर्मराजाचे कपाळांतून रक्त सांडूं लागलें. तें त्या धर्मात्म्याचें रक्त जमिनीवर पडतां कामां नये, तसेंच महात्म्याचे अश्रु. म्हणून खांडेकर पटवून देतात, '' रक्त हें शरीराचे अश्रु असले तर अश्रु हें आत्म्याचें रक्त आहे. अलौकिक महात्म्यांचें हें अमोल रक्त जमिनीवर पडूं नये म्हणून जोंपर्यंत जगांतल्या सर्व उदात्त शक्ती धांव घेत नाहींत, हें पवित्र रक्त काढणाऱ्याला शिक्षा केल्याशिवाय आम्ही राहणार नाहीं अशी प्रतिज्ञा करणारे अर्जुन जोंपर्यंत प्रत्येक देशांत विपुल प्रमाणांत उत्पन्न होत नाहींत, तोंपर्यंत मुत्सद्यांची एक ठेवणींतली थाप किंवा कवींचें एक गोड स्वप्न यापलीकडे ' नवें जग ' या शब्दप्रयोगाला कांहीं अर्थ नाहीं ! ''

तंत्रबद्ध लघुनिबंध

' रबरी फुगे ' हा खांडेकरांच्या लघुनिबंधाचा एक नमुनाच म्हणतां येईल. ' तूं रागावणार नसशील तर–' अशी कादंबरीसारखी सुरवात आहे, लेखक रबरी फुग्याबरोबर खेळत होता, हें पाहिल्यामुळें रावसाहेबांच्या मनांतील त्याचेविषयींचा आदर कमी होतो अशी कथा सांगितलेली आहे आणि शेवटीं '' आयुष्य हाच एक मोठा फुगा आहे !–धरणीसुद्धां एक

फुगाच आहे " असें तत्त्वज्ञान जोडलेलें आहे. पतंग म्हटला कीं, तो रंगीत कागद, त्या बारीक कामट्या व तें शेपूट; अशी सामुग्री लहान मुलांच्या डोळ्यासमोर उभी राहते आणि तो त्याला दोरा लावून आकाशांत उंच उंच उडवीत तासन् तास रमत राहतो; तसाच प्रकार लघुनिबंधाचा झाला आहे. आरंभीं संवाद वा वर्णन, मध्यभागीं लघुकथेचें बीज व अखेरीस बारीकसें तत्त्वज्ञान, असें कोष्टकच सामान्य लेखकांनीं त्याचें बनविलें आणि छापाच्या गणपतीप्रमाणें, तसे ठोकळेबाज व ठरीव ठशाचे लघुनिबंध सर्वत्र आढळूं लागले.

या तकलुपी लघुनिबंधांच्या सुळसुळाटाचें वर्णन खुद्द खांडेकरांनींच एके ठिकाणीं पुढील शब्दांनीं केलें आहे. " रिकामटेकडीं पोरें चार धोंडे गोळा करून जशीं चिंचा पाडायला जातात त्याप्रमाणें कुणीहि उठावें, टांचणीपासून रणगाड्यापर्यंत आणि माकडाच्या शेंपटीपासून तरुणीच्या शेपट्यापर्यंत कोणताहि विषय घ्यावा आणि त्यावर सुचेल तें लिहून वर लघुनिबंधाचा छाप मारावा, असा अराजकाचा काळ या वाङ्मयक्षेत्रांत मध्यें थोडें दिवस निर्माण झाला होता. " तो अराजकाचा काळ संपून पुढें लघुनिबंधाचें राज्यच संपुष्टांत आल्यासारखें झालें म्हटलें तरी चालेल.

संपन्न व्यक्तित्वाचा रम्य आविष्कार

स्वैरपणा व सहजपणा हे त्याचे प्राण—पण तेच नाहींसे होऊन कडक इस्त्रीची भाषा, नियमबद्ध मांडणी व कृत्रिम, उसने विचार—यांच्या टांकसाळींत लघुनिबंधाचीं नाणीं भराभर पाडलीं जाऊं लागली. पण खांडेकर म्हणतात त्याप्रमाणें, " लघुनिबंध हा वैचित्र्यपूर्ण व्यक्तित्वाचा, विकसित रसिकतेचा आणि अनुभवसंपन्न आत्म्याचा आविष्कार आहे. " फडके यांनीं आपल स्वतंत्र व रम्य व्यक्तित्व आपल्या प्रत्येक लघुनिबंधांत ओतलें आणि म्हणून ते निबंध आकर्षक ठरले. खांडेकरांचे निबंध ठरीव ठशाचे असले तरी त्यांच्या उज्ज्वल कल्पनाशक्तीनें ते तेजस्वी बनले व वाचकांचे डोळे दिपवूं शकले. इतर बहुतेक लेखक मात्र साचेबंद, ठोकळेबाज, यांत्रिक

असेच लघुनिबंध लिहित गेल्यानें त्यांच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली. त्यांच्या निबंधांत लघुकथेची रम्यता नसते व निबंधाची विचारप्रेकताहि नसते. पण अशा खोट्या नाण्यांचा सुळसुळाट झाला, तरी फडके–खांडेकरांच्या खऱ्या नाण्यांचें मोल कधींच कमी होणार नाहीं.



प्रा. अनंत काणेकर : : १८

'आधुनिक लघुनिबंधाचा मराठी नमुना' कोणाला पहावयाचा असेल तर त्यानें प्रा. काणेकरांचे निबंध वाचावेत. चारदोन पानांचा छोटा आकार, अणकुचीदार भाषा व बुद्धिवादी दृष्टिकोनांतून समाजवादी विचारांची मांडणी—आणि या सर्वांवर उपहासजन्य विनोदाचा फुलोरा.—असा काणेकरांच्या निबंधांचा थाट आहे. त्यांनीं निर्मिलेले 'गणूकाका' हे सनातनी चाकोरींतून जाणारे असल्यानें पूर्वपक्षासारखे शोभतात. त्यांच्या चित्रणांत मनुष्यस्वभावाचें मार्मिक ज्ञान काणेकरांनीं ओतलें आहे. ते पेन्शनर असून प्रतिगामी विचारसरणीचे दाखविले आहेत. तथापि त्यांचें वर्तन परोपकारी व सुसंस्कृत दाखविलें आहे. कोल्हटकरांच्या पांडूतात्याइतके काणेकरांचे गणूकाका सुप्रसिद्ध आहेत.



विचारांची चमत्कृति

ठराविकाच्या पलीकडे जाण्याची काणेकरांची प्रवृत्ति आहे. अपवादाचें वैचित्र्य व सौख्य दाखविण्यांत त्यांची लेखणी तरबेज आहे. 'बेधडक खोटें बोलणें, हेंच केव्हां केव्हां खरें बोलण्यापेक्षां फार चांगलें' असें लांबलचक व चमत्कृतिजनक शीर्षक ते आपल्या निबंधाला देतात. यांतील 'केव्हां केव्हां' हे अपवादबोधक शब्द तरुण वाचकाच्या चित्तांतून सह-

जच निसटतात व त्याला उरलेला उरफाटा सिद्धांत आश्चर्यजनक वाटतो. 'घड्याळाचे गुलाम,' 'अज्ञानाचा आनंद,' 'व्यवस्थितपणाचें वेड,' 'पळण्याची कला,' इत्यादि निबंधांचे मथळेसुद्धां किती कुतूहल उत्पन्न करणारे आहेत ! आणि त्यांत 'थापा मारणें ही एक ललितकला आहे' किंवा 'जगाचा खरा उद्धार आळश्यांच्याच हातून होतो' अथवा 'अविचार हेंच इहलोकांतील क्षणभंगुर जीवन जगण्याचें एकमेव आणि अमोघ साधन आहे" अशीं विचित्र वाटणारीं वाक्यें वाचकाला भेटलीं कीं, त्याची जिज्ञासा वाढतेच. लेखाच्या शेवटीं त्या चमत्कारिक विधानांचा खरा अर्थ कळून त्याला निराळाच आनंद प्राप्त होतो. 'अतिपरिचित नियमाच्या अंधारकोठडींत खितपत पडलेलें सत्य अपवादाच्या चिमुकल्या झरोक्यांतूनच दृष्टीला पडतें.' अशी मीमांसा खुद्द काणेकरच एका निबंधांत करतात.

विशिष्ट व्यक्तिमत्त्व

'मालाकार' शास्त्रीबुवांचे ग्रंथप्राय निबंध सोडाच, पण प्रिं. आगरकरांचे स्त्री-स्वातंत्र्यावरील निबंध किंवा भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांचे 'अबलोन्नति'पर लेख यांच्याशीं काणेकरांच्या निबंधांची तुलना केली, म्हणजे मराठी निबंधांनीं किती मजल मारली आहे हें कळून येतें. आणि त्याबरोबरच भाषा, मांडणी, विषय व विचार या चारी अंगांनीं या दोन्ही प्रकारांत किती भिन्नत्व आहे हेंहि समजून येतें. शहरी जीवनाचा यांत्रिकपणा व विचारांचा भाडोत्रीपणा याबद्दल काणेकर आपल्या निबंधांतून चीड व्यक्त करतात. केवळ स्वतःच्याच विचारांत रंगणाऱ्या स्वार्थी व अहंकारी माणसांच्या मनोवृत्तींतील दोष ते कुशलतेनें व सडेतोडपणें दाखवितात. समाजाच्या विषम आर्थिक रचनेचे भीषण परिणाम तर ते जातांयेतां केव्हांहि वाचकापुढें ठेवतात. स्त्री-पुरुषांच्या संबंधांतील निरनिराळ्या प्रश्नांवर आपलीं ठाम मतें ते निर्भीडपणें मांडतात. काणेकरांचें मन मुख्यतः कवीचें आहे. त्यावर उच्च शिक्षणानें आधुनिक विचारांचे संस्कार खोलवर केले आहेत. शिवाय भारताच्या दक्षिणोत्तर

भागाचा प्रवास त्यांनीं केला आणि रशिया व युरोप हेहि प्रत्यक्ष नजरेखालीं घालण्याची संधि त्यांना लाभली. याशिवाय वृत्तसृष्टीशीं जडलेल्या संबंधामुळेंहि ताज्या घडामोडींशीं व नव्या विचाराशीं ते समरस होऊं शकतात. त्यांची भाषा सोपी व खोंचदार आहे. त्यांचा स्वभाव मार्मिक व निगर्वी आहे. विद्वत्ता, प्रवास, अनुभव व चिंतन–या सर्वांमुळें त्यांचें जें सहृदय, विवेचक व पुरोगामी असें रुचिर व्यक्तित्व बनलें आहे, त्याचीं विविध प्रतिबिंबें म्हणजेच त्यांचे लघुनिबंध.

कवि व नाटककार

श्री. अनंत आत्माराम काणेकर यांचा जन्म मुंबई येथें ता. २ डिसेंबर १९०५ रोजीं झाला. ते १९२७ मध्यें बी. ए. झाले व १९२९ सालीं एल् एल्. बी. झाले. सनद घेऊन ॲडव्होकेट म्हणून १९३० सालीं त्यांनीं कोर्टात वकिली सुरू केली. तीन वर्षें वकिलीच्या धंद्यांत त्यांनीं घालविलीं. पण त्यांचें मन कज्जेदलालीच्या कागदपत्रांऐवजीं ललित साहित्यांत रमत होतें. १९३३ सालीं त्यांचें 'चांदरात' हें कवितांचें पुस्तक प्रसिद्ध झालें व ते एकदम प्रसिद्धीस आले. १९३३ सालींच पांच कलाप्रेमी नवविद्वानांनीं 'नाट्य मन्वंतर' नांवाची नाट्य-संस्था स्थापन केली. तिचे काणेकर हे एक संस्थापक होते. नाटकें लिहून व नट म्हणून काम करूनहि काणेकरांनीं मराठी रंगभूमीची सेवा केलेली आहे.

परदेशचा प्रवास

वृत्तपत्र-सृष्टींत काणेकरांनीं १९३५ सालीं प्रवेश केला. 'चित्रा' या साप्ताहिकाचे संपादक म्हणून त्यांनीं लौकिक मिळविला. 'आशा' या साप्ताहिकाचे संपादक म्हणून ते व रांगणेकर यांनीं वाचकांची सेवा केली. पांच वर्षें वृत्त-सृष्टींत काढल्यावर कॉलेजांतील प्राध्यापकाचा झगा काणेकरांनीं आपल्या अंगावर घेतला. मुंबई येथील 'खालसा कॉलेजांत' १९४१ सालीं ते प्राध्यापक म्हणून काम करूं लागले. तेथें पांच वर्षें काढल्यावर 'सिद्धार्थ कॉलेजां'त ते अध्यापन करूं लागले. सध्यां ते

तेथेंच प्राध्यापक म्हणून काम करीत असतात. नियतकालिकांतून 'पांढऱ्यावर काळें' करून ते प्रासंगिक लेखन करीत असतात.

परदेशचा प्रवास करण्याचा योग काणेकरांना १९३७ सालीं लाभला. त्यावेळीं ते युरोप व रशिया यांतून मुशाफिरी करून आले. तिचे अनुभव 'धुक्यांतून लाल ताऱ्याकडे' या पुस्तकांत त्यांनीं कुशलतेनें रेखाटले आहेत. १९४९ सालीं उत्तर भारताचा प्रवास त्यांनीं केला व तो "आमची माती–आमचें आकाश" या पुस्तकांत वाङ्मयरूपानें चित्रित करून ठेवला. तसेंच १९५० सालीं दक्षिण भारताचा प्रवास करून त्याचें वर्णन "निळे डोंगर–तांबडी माती" या पुस्तकांत त्यांनीं करून ठेवलें आहे. त्यांचें लेखन तरुणांचें आवडतें आहे. त्यांतहि त्यांचे लघुनिबंध विशेषच प्रिय. १९३४ सालीं त्यांनीं प्रसिद्ध केलेलीं 'पिकलीं पानें' म्हणजे महाराष्ट्रांतील तरुण हृदयाच्या ठोक्यांचे पडसादच होत. 'जागत्या छाया' वगैरे त्यांचे कथा–संग्रहहि लोकप्रिय झालेले आहेत. १९४१ सालीं बडोदें येथील 'वाङ्मय परिषदे' चें अध्यक्षस्थान त्यांनीं भूषविलें आणि १९५० मध्यें ग्वाल्हेर येथील 'वाङ्मय–परिषदे' चें अध्यक्षस्थान त्यांनीं मंडित केलें.

ललित लेखकाचा मान

कवि, नाटककार, लघुकथाकार व लघुनिबंधकार–या चार नात्यांनीं काणेकर ललित साहित्यांत भर टाकीत आहेत. या आपल्या ललित लेखनानें आपण समाजाचें सुख वाढीस लावीत आहोंत आणि जनतेचें एक उपयुक्त कार्यच करीत आहों, असा यथार्थ अभिमान त्यांना आहे. ते स्वतःला 'सुखस्वप्नांचे कारखानदार' समजतात व तें योग्य आहे. त्या नांवाच्या निबंधांत त्यांनीं सर्वच ललित लेखकांची उत्तम कैफियत दिली आहे. 'हा कवि आहे' अशी आपली ओळख करून दिलेली ऐकतांच प्रथम आपल्याला शरमल्यासारखें वाटलें, पण पुढें विचारांतीं त्या शरमेचीच शरम वाटली, असें सांगून ते ललित लेखकाच्या भूमिकेविषयीं लिहितात, "क्षणभंगुर सुखस्वप्नाचें गुंगवून टाकणारें तरल सौंदर्य ललित-

कृतींत असतेंच असतें, पण अगम्य मानवी जीवनाच्या प्रतिभेच्या प्रकाशानें सुगम्य केलेला एक जिवंत खंड तिच्यांत असतो. ललितकृति म्हणजे मानवी जीवनांतला जिवंत धगधगीतपणा, पण त्यांतली अगम्यता नाहीं; आणि सुखस्वप्नांतलें तरल सौंदर्य, पण त्यांतली क्षणभंगुरता नाहीं! कागदाच्या कपट्यावर कायम ठसविलेलीं हीं सुखस्वप्नें आजच्याच मानवानें नव्हे, तर उद्यांच्या मानवानेंही वाटेल तेव्हां मनमानेल तशीं अवलोकावीं आणि आपलें अपुरें मानवी जीवन पूर्णांशानें जगावें. उपयुक्तता हीच जर मानवी व्यवहारांत अंतिम कसोटी असेल, तर ललित लेखकाला स्वतःची लाज वाटायला तर नकोच नको, पण अवनीतलावर कुठेंही ताठ मान करून चालावयाचा अधिकांत अधिक अधिकार त्यालाच आहे!"

कलेचा मातब्बरी

कलाप्रेम किंवा ध्येयवाद–हींच मानवाचीं खरोखर वैशिष्ट्यें होत. त्यांचें महत्त्व सांगतांना काणेकर त्याच निबंधांत लिहितात, "माणसांत व इतर जनावरांत फरक हाच, कीं इतर प्राण्याप्रमाणें माणूस खातो, पितो, औषधें घेतो; पण इतर प्राण्यापेक्षां त्याला आणखी एका गोष्टीची अत्यंत जरूर भासते आणि याचमुळें तो इतर प्राण्यांपेक्षां श्रेष्ठ ठरतो. मानवी प्राण्याला केव्हां केव्हां सुखस्वप्नांत रंगून जावेसें वाटतें."

या सुख-स्वप्नांचें महत्त्व काणेकर 'चमत्कारिक कल्पना' या निबंधांत पुढील शब्दांनीं निवेदन करतात. "चुकीची अगर बरोबर सुखस्वप्नें पहाण्याची दृष्टीच नसून आयुष्य सुखमय होण्यापेक्षां विरलेलीं का होईनात, पण दिव्य सुखस्वप्नें मनमुराद पहात आयुष्याची होळी झालेली मला परवडेल."

जीवनाचें तत्त्वज्ञान

काणेकरांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आशावादी आहे. 'अपवादांचे उपयोग' या निबंधांत तो दृष्टिकोन मांडतांना ते म्हणतात, "या सुंदर जगांत आपणाला मोजकेच दिवस काढावयाचे आहेत या तीव्र जाणीवेनें तें जितके कमी होत जातील तितके आपण शक्य तेवढा या

जगांतला अधिकच आनंद लुटण्याचा प्रयत्न करून आपलें परिमित आयुष्य पूर्णत्वानें जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे."

जीवनाकडे वीरवृत्तीनें पहाण्यास शिकविणारा झुंझार आशावाद काणेकरांच्या लेखनांत ओतप्रोत भरून राहिलेला आहे. 'मोठें शून्य'मध्यें ते म्हणतात, "जीवन म्हणजे लढा; काका, मोठं जीवन म्हणजे मोठा लढा; त्या लढ्यांतल्या जखमाही मोठ्या नी विजयही मोठा आणि अर्थात् त्या मोठ्या विजयाचं सुखही मोठं."

प्रगति झालेल्या मानवाला जास्त दुःखें असलीं, तरी त्याचें सुख वरच्या दर्जाचें असतें, हा विचार काणेकर विनोदी पद्धतीनें मांडतात, तो असा—"दगडाला दुःख नाहीं आणि सुखही नाहीं. मागासलेल्या मानवाला सुख थोडं, पण त्याबरोबर दुःखही थोडं. प्रगत मानवाला सुख मोठं आणि दुःखही मोठं. म्हणजे शेवटीं वजाबाकी शून्यच. मग प्रगति म्हणजे काय? अर्थात् मोठं शून्य!"

जीवनाची कसोटी कोणती? याला उत्तर काणेकर देतात, "कलेकरतां कलेचा कुणी कितीही आक्रोश करो, उपयुक्तता हीच मानवी जीवनांत कुठल्याही गोष्टीची अंतिम कसोटी होय."

आणखी एका निबंधांत ते म्हणतात, "माणसाच्या जीवापुढें मला तरी नाहीं खऱ्याची किंमत अधिक वाटत! खरें काय किंवा खोटें काय, त्याची खरी योग्यता जीवनाच्या कसोटीवरच ठरवायची."

विचाराचा समतोलपणा

कांहीं अहंकारी माणसांना स्वतःचीं दुःखें पाल्हाळानें सांगून लोकांचें कपाळ उठविण्याची खोड असते. त्यांच्याबद्दलचा आपला तिटकारा काणेकर किती तीव्र भाषेनें व्यक्त करतात, पहा. "प्लेगचा फैलाव करणाऱ्या उंदराचा ज्याप्रमाणें मिळेल तेथें पकडून आपण नायनाट करतों, त्याप्रमाणें सर्व जगभर दुःख पसरविणाऱ्या या लोकांचा कांहींतरी निकाल लावला पाहिजे, असें माझें प्रामाणिक मत आहे." जगाच्या काळजीनें सदासर्वदा सुतकी चेहरा धारण करणाऱ्यांचाहि असाच खरपूस समाचार

काणेकरांनीं घेतला आहे. त्यांना एका कोंडवाड्यांत कोंडावें अशी विनोदी सूचनाहि त्यांनीं केली आहे. पण सर्वसामान्य पहातां, काणेकर हे केव्हांहि आपले विचार दोन्ही बाजू नीट समजावून घेऊन, मगच मांडतात. ते समतोलपणानें म्हणतात, " ही एकांतिक गोष्ट झाली आणि स्वतःच्या दुःखाचे बांध प्रियजनांसमोर मोकळे सोडले म्हणजे खूप हलकें वाटतें हेंही खरें आहे. पण म्हणून उठल्यासुटल्या ' स्वतःच्या दुःखाचा मोबदला देऊन दुसऱ्याची सहानुभूति विकत घेण्याचा व्यापार ' करणें केव्हांहि क्षम्य ठरणार नाहीं ! "

आपलें जीवन सफल व सुखी करण्याची गुरुकिल्ली कोणती ? हें सांगतांना काणेकरांनीं मार्मिक विचार प्रगट केले आहेत. ' दुसऱ्याच्या डोळ्यांनीं पहाण्याची संवय ' या निबंधांत ते लिहितात. ' आपली किती तरी भांडणें अशाच प्रकारचीं असतात. दुसऱ्याची भूमिकाच समजून न घेतांच आपण बोलतों आणि केव्हां केव्हां याचा परिणाम परस्परांच्या अंतःकरणांत निष्कारण कडूपणा उत्पन्न करण्यांत होतो. मला वाटतें, दुसऱ्याच्या डोळ्यांनीं पाहण्याची थोडीशी तरी संवय आपण प्रत्येकानें लावून घेतली पाहिजे. " वेदांतांतील आत्मौपम्यबुद्धीचा उलगडा किती सोप्या शब्दांनीं येथें केलेला आहे आणि हेंच लघुनिबंधाचें विशिष्ट कार्य. लघुनिबंध हा मित्राप्रमाणें गहन तत्त्व सहज बोलतां बोलतां समजावून देतो.

प्रसिद्धिची अवास्तव हाव असलेलीं माणसें आपण पहातों. पण मुळांत प्रसिद्धी कांहीं वाईट नाहीं हें तत्त्व ' प्रसिद्धि आणि प्रसिद्धि ' या निबंधांत त्यांनीं गंमतीनें पटविलें आहे आणि शेवटीं सांगितलें आहे, " प्रसिद्धि—लोलुपता ही गोष्ट वाईट आहे, असं कुणीतरी म्हणतो. त्यांतली लोलुपता लुप्त होते आणि प्रसिद्धीच वाईट आहे, असं प्रत्येक जण म्हणूं लागतो. लोलुपता प्रसिद्धिचीच कां, कुठल्याही गोष्टीची वाईट आहे. "

मनुष्य–स्वभावाची अचूक परीक्षा करून त्यांचीं एकेक लक्षणें काणेकर सांगतात आणि मनांतील कोणता गुंता किंवा गंड काढून टाकला तर सुख लागेल हेंहि मानसशास्त्रज्ञाप्रमाणें निवेदन करतात. " माझा स्वभाव असा

आहे !" या निबंधांत ते म्हणतात, "प्रत्येक मनुष्य आपल्याभोंवतीं कांहींतरी नसत्या गुणाच्या चिनी भिंती उभारीत असावा. आपणांत नाहीं तें आहे, असें भासविण्याचा हा मनुष्यस्वभाव म्हणजे आत्मसंरक्षणाचें एक मनोमय चिलखत !"

सहानुभूतीचा दृष्टिकोन

इतरांच्या दोषांची कारण-मीमांसा करण्यास व त्या दोषाकडे सहानुभूतीनें पहाण्यास शिकविण्यास, काणेकरांचे निबंध समर्थ आहेत. 'कांहीं उपयोगी प्राणी' या निबंधांत ते कुत्सित टीकाकारांविषयीं असे उद्गार काढतात, "अंधपणाचें, बहिरेपणाचें किंवा असेंच दुसरें एखादें शारिरिक व्यंग असलेला दुःखीकष्टी मनुष्य ज्याप्रमाणें जगावर नेहमीं कातावतो आणि त्याच्या तोंडांतून अकारण कटु शब्द बाहेर पडतात, त्याचप्रमाणें वाङ्मयांतील विशुद्ध आनंद चाखण्याचें ज्याला इंद्रियच नाहीं, अशा माणसाच्या लेखणींतून कुत्सापूर्ण विषारी शब्द बाहेर पडतात. मग अशा प्राण्यांवर गहजब करावयाचा कीं त्याची कींव करावयाची ?"

एकादा थापाड्या भेटला, तरी काणेकर त्याच्या स्वभावावर आपल्या मानसशास्त्राचा शोधक प्रकाश पाडतील व त्याच्या थापाडेपणाची मीमांसा अशी करतील, "प्रत्येक मनुष्याच्या डोळ्यासमोर त्याच्या अगदीं जिव्हाळ्याचें असें कांहीं तरी एक ध्येय असतें; आणि बहुधा तें साधणें शक्य नसतें. तेव्हां तें साधल्यानंतर जो आनंद मिळणार असतो तो उपभोगण्याकरितां सत्यसृष्टींत तें साधत नाहीं तर नाहीं, निदान कल्पनासृष्टींत तें साधावें, आणि खरोखरीच सत्यसृष्टींत तें साधलें आहे असें लोकांना सांगून तो लोभनीय आनंद उपभोगावा, हाच निरागस हेतु थाप मारणाऱ्याचा असतो."

मनुष्य-स्वभावाचें ज्ञान

मानवी ज्ञानाची मर्यादा ओळखण्याइतकी विवेचकता बऱ्याच कविजनामध्यें नसते; पण काणेकरांच्या विवेकाचा ताजवा सदैव अचूक वजन

दाखवितो. ' प्रत्येकाचें वेड'मध्यें ते म्हणतात, " मानवी जीवन अजूनही इतकें अगाध आणि अगम्य आहे, कीं कुणाही एका व्यक्तीच्या इवल्याशा शहाणपणाची–किंवा वैयक्तिक वेडाची म्हणा पाहिजे तर–मोडकी किल्ली लावून जगाचें अफाट कोडें उलगड्याचा प्रयत्न करणें केव्हांही हास्यास्पदच ठरणार. "

मनुष्यस्वभावाचें ज्ञान काणेकरांना सखोल आहे हें खरें, तथापि तें ज्ञानहि किती अपुरें आहे, याची जाणीव त्यांना आहे. ' मुखवटे'मध्यें ते प्रांजलपणें म्हणतात, " खरोखरच माणूस म्हणजे विवेकशक्तीचा अंगरखा चढविलेलें जनावरच नाहीं तर काय ? हा अंगरखा जरा कुठें फाटला किंवा तुटला, कीं नुसतें जनावर दिसूं लागतें. भिन्न भिन्न स्वभावांचे चित्रविचित्र मुखवटे घालून निरनिराळीं माणसें फिरतात, पण त्या मुखवट्याच्या आंत दडलेल्या खऱ्या मनुष्यस्वभावाचा थांग कधीं कुणाला लागला आहे ? "

भौतिक सुधारणांना सामोरे जाणारे काणेकर असले, तरी त्यांच्या अतिरेकामुळें मानवाची मानसिक कुचंबणा होत आहे, हें जाणण्याइतकी त्यांची विचार–शक्ति समतोल आहे. ' गर्दी'मध्यें ते लिहितात, 'विसाव्या शतकांतला सुशिक्षित मनुष्य अत्यंत आत्मनिष्ठ झाला आहे. पैसा, पदवी, प्रतिष्ठा, पांडित्य, इत्यादिकांच्या संगमरवरी भिंती उभारून आपण एका गंधर्वनगरींतल्या राजवाड्यांत रहात आहों, अशा भ्रमांत तो अधिकाधिक समाजविन्मुख होत चालला आहे ! '

व्यापक दृष्टिकोन कां हवा ? याचें उत्तर एका घरगुती दाखल्यानें काणेकर देतात. ' जगाशीं संबंध ' या निबंधांत ते असा सिद्धांत मांडतात, " व्यवहारवादापुरती मनुष्यानें कितीही संकुचित दृष्टी ठेवली, तरी जगाचा आणि आपला किती जिव्हाळ्याचा संबंध आहे, ही गोष्ट त्यानें विसरून जातां कामा नये. कळत अगर नकळत आपण जगाशीं संबंध ठेवतो. कळत अगर नकळत आपणाला जग हवें आहे. "

हा सिद्धांत पटविण्यासाठीं ते असा दृष्टांत देतात कीं, " कप झेकोस्लोव्हाकियाचा झाला, चहांतली साखर जावा किंवा मॉरिशस् बेटांतली,

मी दार्जिलिंग चहा वापरतों, तेव्हां चहाची पावडर दार्जिलिंगची. तो दुधाचा 'जग' आहे तो मेड इन् चायना—चीनमधला. काय—एक कप चहा पितांना जगाच्या किती भागाशीं तुझा संबंध आला ?"

समाजवादाचा पुरस्कार

समाजवादानेंच सर्व मानवांना खरें स्वातंत्र्य लाभेल व त्यांची प्रगति होईल, असा काणेकरांचा ठाम सिद्धांत आहे. म्हणून 'मनाचे पिंजरे' या निबंधांत ते सांगतात, "परिस्थितीचे पिंजरे तोडून टाकल्याशिवाय मानवाची मुक्ति होत नाहीं म्हणतात. सामाजिक, आर्थिक, राजकीय, हरएक तऱ्हेच्या पिंजऱ्यांत मानवी व्यक्तित्व खुरटत चाललं आहे, आणि हे पिंजरे ताबडतोब तोडून फोडून टाकले पाहिजेत."

समाजवादाची शास्त्रशुद्ध भूमिका काणेकरांनीं अनेक लघुनिबंधांत मांडली आहे. 'एकाला जें अमृत, तें दुसऱ्याला विष' यांत ते लिहितात, "सर्व उत्पादनांच्या आणि समाजहिताच्या साधनांवर जोंपर्यंत सर्व समाजाची सत्ता नाहीं, आणि चढाओढीचें जीवन हेंच समाजाला शांतिप्रद आणि हितावह आहे असें जोंपर्यंत स्वतःला मानवतेचे मित्र म्हणविणारे, पण खरोखर बुद्धिवान् बदमाष असलेले समाजाचे नेते म्हणत आहेत, तोंपर्यंत असले हे प्रकार चालावयाचेच."

'बुद्धीला पटतें पण मनाला कसेंसेंच वाटतें' या निबंधांत ते प्रतिपादतात, "सारा समाजच जोंपर्यंत मालकी हक्कावर उभारला आहे, तोंपर्यंत ही प्रवृत्ती उघड अगर थोडीबहुत प्रच्छन्न राहणारच; आणि एखाद्या प्रामाणिक माणसाच्या बुद्धीला कितीही पटलें, तरी या प्रवृत्तीला विरोधक अशी एखादी गोष्ट घडतांच त्या साऱ्या प्रचंड ढिगांतून हा निखारा धगधगणारच. मानवी संस्कृतीचा आणि सुधारणेचा इतिहास म्हणजे मनुष्याच्या बुद्धीचा उत्तरोत्तर विकास, आणि या बुद्धिमत्तेच्या प्रकाशांत सहज प्रवृत्तीचें नियंत्रण आणि शुद्धीकरण !"

चित्तवेधक आविष्कार

हें समाजवादी तत्त्वज्ञान सुबोध व चटकदार करून मांडणें हेंच लघुनिबंधकाराचें कसब. तें काणेकरांच्या अंगीं चांगलें आहे. ' दुसऱ्याच्या डोळ्यांनीं पाहण्याची संवय ' या निबंधांत त्यांनीं पुढील दृष्टांत दिला आहे. " वाघाच्या आणि बकऱ्याच्या धडपडींत बकऱ्यानें ' प्राण वांचवा,' म्हणून आक्रोश केला असतां, आमचे सुवर्णमध्यवादी म्हणणार कीं, " थांबा ! बकऱ्याची बाजू समजली, आतां वाघाची बाजू काय आहे ती आपण शांतपणें समजावून घेतली पाहिजे ! आणि मगच काय करावयाचें तें ठरविलें पाहिजे."

याहिपेक्षां अधिक आकर्षकतेनें हाच विचार काणेकरांनीं आधिक ठसठशीतपणें मांडला आहे. ' निःपक्षपाती मतें ' या निबंधांत त्यांनीं समाजांतील तीन वर्गांचें जितकें मार्मिक शब्द-चित्र रेखाटलें आहे, तितकेच मर्मभेदक प्रहार, समान त्याग करावयास सांगण्याऱ्या प्रचारकावर केले आहेत. एका व्यंग–चित्राचें स्वरूप सांगतांना काणेकर लिहितात,

" एक काळाकाभिन्न पाण्याचा डोह काढला होता, आणि त्याला ' दुर्दशा ' असें नांव दिलें होतें. त्या डोहांत एक शिडी असून तिच्या बऱ्याचशा खालच्या पायऱ्या डोहाच्या पाण्यांत बुडालेल्या होत्या. शिडीच्या अगदीं तळाला एक मजूर उभा असून त्याच्या शरीराचा सर्व भाग पाण्यांत बुडालेला आणि फक्त डोकें तेवढें पाण्याच्या बाहेर होतें. त्या मजुराच्या वर एक मध्यमवर्गीय मनुष्य उभा असून, त्याच्याही वर शिडीच्या वरच्या टोंकाला धरून एक गलेलठ्ठ श्रीमंत मनुष्य उभा होता. " या तिघांनाहि एक उपदेशक सांगत होता, " बाळांनो, सर्व जग दुर्दशेच्या तडाख्यांत सांपडलें आहे. तेव्हां...तुम्ही प्रत्येकानें फक्त एकच पायरी खालीं उतरावी. " पण या " समान स्वार्थत्यागाचा " परिणाम काय झाला ? तर श्रीमंत वरच्यावर सुरक्षित राहिला, मध्यमवर्गीयाचे पाय पाण्यांत बुडाले आणि गरीब मात्र पाण्यांत पार बुडून मेला ! सौम्य भाषेनें किती तीक्ष्ण टीका आहे ही ! गोड गोष्टींतून तिखट उपदेश करण्याचें असें कार्य लघुनिबंधच करूं शकतो.

कौशल्याचा पुरावा

कला व प्रचार यांचा असा बेमालूम मेळ घालण्याच्या कौशल्याचा कळस काणेकरांनीं आपल्या 'दोन मेणबत्त्या' या निबंधांत केला आहे. "स्वतःसाठीं जगलास तर मेलास, दुसऱ्यासाठीं जगलास तरच जगलास" हें सामाजिक जीवनाचें तत्त्व या निबंधांत मांडलें आहे, पण किती खुबीनें? इन्कम टॅक्सच्या काळजीनें झोप उडालेला एक श्रीमंत आणि डोळे खोल गेलेला व बोटभर दाढी वाढलेला एक कंगाल मजूर-नेता-या दोन मित्रांच्या वृत्तींतील स्वार्थी व परार्थी जीवनांतील अंतर दाखवून. आणि त्या अंतरावर प्रकाश पाडण्यासाठीं दोन मेणबत्त्यांचा इतिहास सांगितला आहे. घरीं गेल्यावर लेखक फळीवरल्या मेणबत्त्या शोधूं लागतो. तेव्हां—"एक मेणबत्ती सबंध जळून गेलेली होती. मेणबत्ती अशी क्वचितच जळते. तिचें अस्तित्व दाखविण्यापुरता फक्त पैशाएवढा मेणाचा अवशेष शिल्लक होता. दुसरी मेणबर्त्ती कित्येक दिवस फळीवर धूळ खात पडल्यामुळें मुंग्या-झुरळांनीं ती सबंध कुरतडून अजीबात निरुपयोगी केली होती. तशा स्थितींत पडलेल्या त्या दोन मेणबत्त्या पाहून का कुणास ठाऊक, मला थोडेंसें हसूं आलें आणि दुसऱ्या क्षणीं एक चमत्कारिक विचार माझ्या डोक्यांत आला. ज्या दोन माणसांचा मी विचार करीत होतों तीं दोन माणसें या दोन मेणबत्त्यांसारखीं आहेत! आपला जीव निर्धोक ठेवण्यांत स्वतःच्या सुखाची राखण करण्यांत गुंतून पडलेल्या एकाचें आयुष्य कुरतडलें जात आहे आणि इतरांना मंद, सुखकर प्रकाश देत दुसऱ्याची जीवनज्योत जळत चालली आहे."

हा लघुनिबंध इतका परिणामकारक झाला आहे कीं, त्याच नांवाचा व त्याच विषयावरचा एक निबंध खांडेकरांनीं लिहिला आहे. दुसऱ्या मेणबत्तीला संधि मिळाली नाहीं म्हणून तिचें जीवन फुकट गेलें, असें उत्तरहि खांडेकरांनीं आपल्या निबंधांत दिलें आहे. आणि तेंच काणेकरांच्या निबंधाचें यश! हाच विचार वाचकाच्या चित्तांत उत्पन्न व्हावा हा त्यांच्या लेखनाचा हेतु—आणि तो सफल झाला. समाजांत गुणांच्या

विकासाला व विकसित गुणांच्या वापराला संधि मिळत नाहीं, हेंच सध्यांच्या समाज-रचनेंतील मोठें वैगुण्य आहे. तें काणेकरांनीं मोठ्या कौशल्यानें पुढें मांडलें, हें खांडेकरांच्या पुरवणीनें सिद्धच केलें !

भाषेची सहजता

लघुनिबंधाला साजेशी सोपी व खोंचदार भाषा काणेकरांची आहे. मधूनमधून कोठें संवाद, कोठें गोष्ट घालून ते आपला निबंध अधिकच चटकदार करतात. कथा-कादंबरीची भाषा ते कशी वापरतात, पहा. "मुलं कसलीं ? नष्ट कारटीं आहेत अगदीं ! गांवाचीं आडदांड. सगळं घर घेतात डोक्यावर. नाहीं तर तुमचीं मुलं. किती शांत, गरीब. घरचं वळणच मुळीं तसं !"

'घड्याळाचे गुलाम' या निबंधाचा शेवट किती खेळकर भाषेनें केला आहे, "नाहीं तर आपण आपले जातों आहोंत रोज वेळच्या वेळीं, आणि लोक लावताहेत आपलीं घड्याळें आमच्या जाण्यायेण्यावर !"

गणूकाका आतां रागावणार हें कळतांच कुतूहलानें आपली अवस्था कशी झाली, याचें शब्द-चित्र काणेकरांनीं असें रेखाटलें आहे, "आतां वीस वर्षांनीं आपणाला एक भयंकर, रोमहर्षक दृश्य पाहावयास मिळणार, म्हणून मीं श्वास कोंडून धरून वाट पाहात उभा राहिलों."

उपरोधाचें शस्त्र

उपरोधिक लिहून विनोद निर्माण करण्यांत काणेकरांचा हातखंडा आहे. 'जगाशीं संबंध' मध्यें ते सांगतात, "आलिकडे अलिकडे मला जिरवणें, हा गणूकाकांचा व्यवसाय झाला आहे. मी जिरलों आणि माझा चेहरा गोरामोरा झाला म्हणजे गणूकाकांना अपरंपार आनंद होतो ! काल असेंच झालें. गणूकाकांबरोबर मी बोलत बसलों होतों. मी अगदीं बोलण्याच्या रंगांत आलों होतों, "...मानवजातीच्या हिताकरितां सध्यांची विषम समाजपद्धति आमूलाग्र बदललीच पाहिजे....." मी एखाद्या पुढाऱ्यासारखा किंवा दारुड्यासारखा बोलत होतों."

याच उपरोधाच्या अंतर्गोल आरशामध्यें आळस हा गुणासारखा दिसूं लागतो. आळसाची कैफियत देतांना काणेकर लिहितात, " खऱ्या प्रतिभासंपन्न लेखकाला खरोखरच आठ आठ दिवस विचार करीत तडफडावें लागतें, तेव्हांच त्याच्या हातून एखादा सुंदर आणि अद्वितीय प्रवेश लिहिला जातो. तो जेव्हां एकदोन तासांत कांहीं तरी कागदावर लिहून काढीत असे; तेव्हां हे लोक त्याला उद्योगी समजत. उघडच आहे, कारण लिहिण्यामध्यें शारीरिक हालचाल होत असे. म्हणून तो उद्योग ! आणि मेंदूची हालचाल म्हणजे आळस ! " आळस म्हणजे चिंतन हें काणेकरांचें समीकरण किती आळशांच्या बाबतींत खरें ठरतें ? अपवादाचें कौतुक करून विनोद पिकविणें हाच त्यांचा हेतु.

उपरोधाची कमाल ' पुरुषांचा स्वभाव ' या निबंधांत काणेकरांनीं केली आहे. सनातनी लोकावर टीका करतांना नवमतवादी काणेकरांच्या लेखणीला सहजच स्फुरण चढतें. ती लेखणी पुढील जहरी टीका करते, " पुरुषाइतकाच गांठोडीं उचलण्याचा हक्क स्त्रीजातीला देण्याकरितां गांठोडीं वगैरे दरवाजापासून प्लॅटफॉर्मपर्यंत ते काकूंनाच न्यावयाला लावतात. बाकी आम्ही नवे लोक या बाबतींत ढिले खरे ! तत्त्वनिष्ठा आणि अर्थप्राप्ति यांचा सुंदर मिलाफ करणें शिकावयाचें असल्यास हे जुने लोकच आदर्श होत ! स्त्रियांना समान हक्क देऊनच्या देऊन त्यावर आणखी हमालाला द्यावयाच्या एका आण्याची ते बचत करतात. "

विनोदाचीं साधनें

अतिशयोक्ति करून प्रतिपक्षाची टर उडविण्यांत काणेकरांची लेखणी तरबेज आहे. ' नाट्य मन्वंतर 'चे हे संस्थापक साहजिकच पुराणमतवाद्यावर घसरतात व म्हणतात, " कुलीन स्त्रियांनीं रंगभूमीवर कामें करावीं, हीं मतें जर समाजांत प्रसृत झालीं, तर प्रत्येक कुलीन स्त्रीला गंचाडी धरून रंगभूमीवर खेंचण्यांत येईल, या भीतीनें या लोकांच्या पोटांत गोळा येतो, आणि आपल्या दीन, कुलीन बायकोचा " हे चांडाळ मला रंगभूमीवर ओढून नेत आहेत, मला वांचवा हो ! " असा आर्त, करुण स्वर यांच्या कानांत घुमूं लागतो ! "

अशीच अमर्याद अतिशयोक्ति करून काणेकर "व्यवस्थितपणाचें वेड" चेष्टेचा विषय करतात व म्हणतात, " एखाद्या दिवशीं सूर्य जर किंचित् एका बाजूला कलले‌ला या लोकांना दिसला, तर आकाशांत उडी मारून त्याला जागच्या जागीं ठेवण्याचा प्रयत्न करावयालासुद्धां हे लोक कमी करणार नाहींत ! "

निर्भेळ विनोद निर्माण करण्यांतहि काणेकर यशस्वी आहेत. ' मनाचे पिंजरे ' या निबंधांत ते सुरवातीलाच सांगतात, " मी दोन रुपयांना एक छत्री विकत घेतली. हो, हो, दोन रुपयांना छत्री. " दहाबारा रुपये छत्रीची किंमत बाजारांत असतांना दोन रुपयांना तुम्ही कसली छत्री घेतली व ती कशाला ? असे प्रश्न कोणी करील तर काणेकर उत्तर देतात.

" छत्री घेण्यांत आपला खरा उद्देश, ' का हो भिजतसे चाललांत ? छत्री नाहीं वाटतं ? ' असं कोणी विचारूं नये, किंवा भिजत चाललेल्याकडे इतर लोक, 'कोण वेडा हा !' अशा अर्थानं टकमक पाहतात, तसं– अर्थात् ते स्वतः छत्री असूनही भिजतच असतात,–आपणांकडे कुणी पाहूं नये, हाच असतो. " हा आपला ' शोध ' वाचकाच्या मनावर ठसविण्यासाठीं काणेकरांनीं गंमतीचा हिशेब मांडला आहे. चार महिन्यांच्या पावसाळ्यांत पाऊस पडतो निम्म्या काळांत. त्याचा अर्धा भाग रात्रीचा जातो, त्याचा अर्धा वेळ आपण घरांतच असतो आणि आपण पंधरा दिवस बाहेर पडलों, तरी जोराचा पाऊस चार वेळाच येतो, असा आयुष्याचा जमाखर्च देणारा ' हरिदासी ' हिशेब करून काणेकर विनोदानें म्हणतात, "चार महिन्यांतून केवळ चार वेळां छत्रीचा आपणाला उपयोग होतो आणि इतक्या जोराच्या पावसांत आपण छत्री असूनही भिजतोच ! आणि तरीहि आपण वाटेल ती किंमत देऊन छत्री विकत घ्यायची यातायात काय करतों, ती हरवल्यावर सुस्कारे काय सोडतों, ती उडाल्यावर तिच्यामागून चिखलपाण्यांतून वेड्यासारखे धांवतो काय आणि ती उलटी झाल्यावर भररस्त्यांत वेड्या-वांकड्या उड्या काय मारतों ! छे, छे, पुढल्या वर्षापासून—

" छत्री छप्पर मुर्दाबाद ! "

अशा खुसखुशीत विनोदानें खमंग झालेले, खोंचदार भाषेनें चटका लावणारे आणि सहानुभूतीची दृष्टि व समाजवादाची दीक्षा देणारे काणेकरांचे छोटेछोटे निबंध हे वाचकांच्या मनांतील गांठी व अढी यांचीं कोळिष्टकें व जळमटें झाडून टाकतात आणि आशेचा, धैर्याचा व आनंदाचा झगझगीत प्रकाश पाडतात.

डॉ. दांडेकर : १९

"सृष्टिसौंदर्याइतकाच सामाजिक प्रगतीशीं समरस होणारा एक मोठा दिलखुलास दोस्तच" अशी ओळख श्री. खांडेकरांनीं डॉ. दांडेकरांची एके ठिकाणीं करून दिलेली आहे. दांडेकरांच्या लघुनिबंधांत "प्रसन्न भाषेच्या द्वारें लेखकाचें जें व्यक्तित्व प्रकट होतें, तें जितकें वैचित्र्यपूर्ण तितकेंच आकर्षक आहे." अशीहि ग्वाही खांडेकरांनीं दिलेली आहे. दांडेकर हे बडोद्याचे, महाराष्ट्र-गुजरातच्या सीमेवर रहाणारे. त्यामुळें त्यांचें शिक्षण गुजरातींतून झालें. पुढेंहि त्यांनीं गुजराती साहित्याचा व्यासंग वाढता ठेवला. 'निवृत्ति-विनोद' या श्री. त्रिवेदी यांच्या गुजराती ग्रंथाचें भाषांतरहि त्यांनीं केलें आहे. मराठी, गुजराती, इंग्रजी व संस्कृत या चार भाषांत ते पारंगत आहेत. या बहुरंगी विद्वत्तेला चौरस प्रवासाचीहि जोड त्यांनीं दिली आहे. शिवाय ललित्यांत रमण्याची त्यांची वृत्ति आहे. या सर्व गुणांच्या परिपाकानें त्यांचें जें आल्हादक व्यक्तित्व निर्माण झालें, त्यांचें प्रतिबिंब त्यांच्या लघुनिबंधांमध्यें पहावयास सांपडतें.



विद्याभ्यास व ग्रंथलेखन

श्री. विश्वनाथ पांडुरंग दांडेकर यांचा जन्म १९०५ सालीं उत्तर गुजरातेंत म्हैसाणा येथें झाला. ते अठरा महिन्यांचे असतांनाच त्यांचे वडील वारले. आणि सोळावे वर्षीं त्यांना मातृ-वियोग घडला. वयाचे बारावे वर्षीं ते बडोद्यास शिक्षणासाठीं गेले. तेथें इंग्रजी तिसऱ्या यत्तेंत त्यांनीं आपलें नांव घातलें. काठेवाडांत व पुणें येथेंहि त्यांना शिक्षणासाठीं जावें लागलें. १९२३ सालीं ते मॅट्रिक झाले. मॅट्रिकमध्यें असतांनाच त्यांनीं 'सीमंतिनी' नांवाचें नाटक लिहिलें. नंतर ते अहमदाबाद येथील कॉलेजांत गेले. कॉलेजांत त्यानीं इंग्रजींतील नाटक-कादंबऱ्यांचा भरपूर आस्वाद घेतला. 'निर्मल प्रेम' नांवाचें एक नाटकहि लिहिलें. एक वर्षानें ते बडोदें येथील कॉलेजांत गेले. तेथें असतांना 'चारित्र्य-सुधा' नांवाची कादंबरी त्यांनीं लिहिली. १९२७ सालीं ते बी. ए. झाले. 'आजच्या कळ्या' हा त्यांचा कथासंग्रहहि याच वेळेस प्रसिद्ध झाला.

वाङ्मयविषयक दृष्टि

एक पदवी व चार पुस्तकें गांठीं लावून दांडेकर पुणें येथें आले. तेथें लेडी ठाकरसी यांचेकडे शिक्षक म्हणून त्यांनीं अडीच वर्षें काम केलें. १९३० सालीं ते एम्. ए. झाले—आणि बडोद्याच्या कॉलेजांत प्राध्यापकाच्या खुर्चीवर जाऊन बसले. पुढें मराठींतील सामाजिक नाटकावर एक प्रबंध लिहून, पीएच्. डी. ही पदवी मिळवून ते डॉक्टर झाले. बडोदें येथील 'सहविचार या नियतकालिकाचे संपादक म्हणून त्यांनीं काम केलें. १९३२ सालीं त्यांनीं "केळकरांचीं ६ नाटकें" हा टीकाग्रंथ लिहिला. त्यामुळें त्यांना विशेष प्रसिद्धि मिळाली. 'फेरफटका' हा त्यांचा लघुनिबंध-संग्रह १९३६ सालीं प्रकाशित झाला. त्याचें 'प्रत्येक पान न् पान लेखकाच्या रसिक बुद्धिमत्तेच्या सुवासानें दरवळतें आहे' अशी प्रशस्ती आचार्य अत्रे यांनीं केली. ललित वाङ्मयाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन काय आहे हें सांगतांना प्रा. दांडेकर म्हणतात, "ललित वाङ्मय हें हेमगर्भाच्या मात्रेप्रमाणें तात्काळ गुणकारी किंवा च्यवनप्राशाप्रमाणें

शक्तीची वाढ करणारें नसून डाळिंबाच्या सरबताप्रमाणें मनाला शांतवून ताजेतवानें करणारें आहे" मराठी नाट्य-सृष्टीवरील त्यांचीं पुस्तकेंहि सहृदय टीकेचे नमुने आहेत. "मराठी साहित्याची रूपरेषा" हा त्यांचा मोठा ग्रंथ १९५२ सालीं प्रसिद्ध झाला. त्यांत इ. स. ९८३ ते १९५० पर्यंतच्या ललित साहित्याचा धावता आढावा घेतलेला आहे. त्यांतहि त्यांची रसिकता व मार्मिकता दिसून येते. या त्यांच्या गुणांना स्वच्छंदानें क्रीडा करावयास मिळते लघुनिबंधांत. त्या निबंधांचे चार संग्रह आतांपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत.

आनंदी व आशावादी

एका रसिक, बहुश्रुत व सौंदर्य-लुब्ध अशा लेखकाची मूर्ति दांडेकरांच्या सर्व लघुनिबंधांमधून वाचकांच्या डोळ्यांपुढें उभी राहते. त्यांची आयुष्याकडे पाहण्याची दृष्टि आनंदी, आशावादी व प्रवृत्तिपर आहे आणि जगाकडे पाहण्याची दृष्टि सहानुभूतीची, समतेची व खेळकरपणाची आहे. त्यामुळें त्यांचे निबंध प्रो. फडके यांच्या परंपरेंत शोभतात. त्यांच्या लेखनांत नवमतवाद दिसत असला, तरी प्रा. काणेकरांइतका तो सखोल, शास्त्रीय व समाजवादी असा नाहीं. इंग्रज कवि टेनिसन् यानें रंगविलेल्या "कमल-भक्षी (Lotus-Eaters) तरुणां"चा संप्रदाय फडके-दांडेकर वाढवीत असतात. अर्थात् फडक्यांच्या तुलनेनें दांडेकरांची कल्पकता कोमट, विचार फिके व विनोद सपक असतो. पण आळसाची, विश्रांतीची, विलासाची व स्वैरपणाची काय मौज आहे हें सांगणारें त्या दोघांचें 'तत्त्वज्ञान' आहे. खरें पाहतां, तत्त्वज्ञान, ध्येयवाद, नीतिनिर्बंध इत्यादि शब्दच त्यांना वावडे वाटतात. 'मागें फिरून पाहिलें असतां' या आपल्या निबंधांचे अखेरीस दांडेकर खेळाडूपणानें म्हणतात, "येथें नकळत व अकारण मी तत्त्वज्ञानाच्या प्रांतांत ढवळाढवळ करूं लागलों असें आपणांस वाटत असेल, तर ही पहा ठेवली लेखणी खालीं."

जीवनाचें तत्त्वज्ञान

पण जें कांहीं 'तत्त्वज्ञान' म्हणून ते लघुनिबंधांत मांडतात, त्याचें सूत्र

'जगण्यांत मौज आहे' हें आहे. हें जगणें म्हणजे केवळ 'खाना पीना और मजा मारना' असें स्वार्थी व भौतिक सुखापुरतेंच मर्यादित आहे, असें ते मानीत नाहींत. आपल्या तत्त्वज्ञानाचीं लक्षणें दांडेकरांनीं स्वतःच 'जगण्यांत मौज आहे' या निबंधांत विस्तारानें सांगितलीं आहेत. ते लिहितात, "माझ्या अल्प समजुतीप्रमाणें कांहीं विशिष्ट जीवनविषयक तत्त्वज्ञान मी माझ्या लघुनिबंधांतून प्रतिपादन करीत असतों. मात्र तें जड वाटूं नये म्हणून त्याची मांडणी खेळकर शैलींत केलेली असते. मनुष्याचें ज्ञान वाढत आहे; जगाची प्रगति सतत होते आहे; मनुष्याच्या सुखसाधनांत प्रत्यहीं भरच पडत आहे; मानवी जीवन अधिकाधिक विशाल, सुखी, संपूर्ण, संस्कारी बनतें आहे; जगाच्या प्रगतीबरोबरच मनुष्याचें सुखहि यापुढें वाढणार आहे; पण आहे त्या परिस्थितींतही एकंदरींत पाहतांना जगण्यांत मौज आहे; मात्र जगांत वावरतांना मनुष्यानें रसिकतेनें व खिलाडू वृत्तीनें वागायला हवें. जगाच्या प्रगतीकडे पाहात असतांना तें नश्वर नसून शाश्वत आहे, त्यांत मौज आहे असें ठरतें."

दांडेकरांचा असा ठाम विश्वास आहे कीं, जगाची कूच प्रगतीकडे चालू आहे; त्याचा विकास होत आहे, तें सुधारणेच्या मार्गावर पुढें आणि पुढेंच जात आहे. तो आपला विश्वास ते पुढील शब्दांनीं प्रगट करतात, "जग अधिक सुखी, अधिक निरोगी, अधिक संपन्न, अधिक समतायुक्त होत चाललें आहे हें एक असून, त्याला अधिकाधिक चांगलें बनविण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञ व समाजसेवक करीत आहेत हें दुसरें होय. असल्या प्रयत्नांत ज्यांनीं अंशतः तरी भाग घेतला असेल, त्यांना जगण्यांत मौज वाटल्याखेरीज कधींच राहणार नाहीं."

सुखाचा मार्ग

संसार हा सुखदुःखमिश्रित आहे हें तत्त्व पटविण्यासाठीं ते असा दाखला देतात कीं, "आपला संसार हा द्राक्षाप्रमाणें निव्वळ गोड किंवा चिंचेप्रमाणें निव्वळ आंबट नसून बोराप्रमाणें आंबट-गोड असा आहे. द्राक्षें पुष्कळ खाववणार नाहींत, चिंच पुष्कळ खाववणार नाहीं,

परंतु बोरांचें तसें नाहीं. आपल्या संसाराचेंहि असेंच आहे. दुःखामुळेंच त्याची गोडी कांहीं और बनली आहे." अशा छायाप्रकाशाच्या, चढ-उताराच्या मार्गानेंच आपल्याला आपल्या आयुष्याचा गाडा न्यावयाचा आहे. तो कोणत्या वृत्तीनें न्यावा हें सांगतांना, 'नियमितपणां 'त ते सांगतात, "मला सांगावयाचें तें हें कीं, असली ऐट न दाखवितां आलेल्या प्रसंगांतून शक्य तेवढा आनंद, शक्य तेवढा फायदा, शक्य तितकें काव्य, हीं उपभोगावींत. आयुष्याची दिशा बदलावी लागली तर ती आनंदानें बदलावी. नदी नाहीं का वळणावळणानें वहात जात? मग आपल्याहि आयुष्यांत वळणें लागलीं म्हणून काय झालें? उलट आयुष्याचें सौंदर्य वाढेलच त्यानें. क्वचित् एखाद्या वळणावर बांबूचें बन लागेल आणि तिथलें संगीत ऐकून आपणालाच थांबावेंसें वाटेल. क्वचित् फळाफुलांनीं बहरलेल्या वृक्षांना वळसा घालून जावें लागेल, आणि मग पक्ष्यांचा मंजुळ रव व भ्रमरांचा गुंजारव हीं ऐकायला सांपडतील. याहिपेक्षां क्वचित् वाटेंत खडक आल्यानें पाणी जरी दुभंगलें; तरी हवेवर किती तरी मोती उधळलीं जातील, आणि त्यांवर किती तरी इवलालीं इंद्रधनुष्यें नाचतील."

जीवनांत आशा, उत्साह व आनंद फुलवावा असेंच आपलें ध्येय असल्याचें सांगतांना ते म्हणतात, "वाचकांना आपल्या जीवनाविषयीं आशा, उत्साह व आनंद वाटावा या हेतूनें मनुष्याच्या ठिकाणीं काम-क्रोधादि ज्या सहज भावना आहेत त्यांचा मुळींच तिरस्कार न करतां त्यांचें उदात्तीकरण कसें करावें हें मी सांगत आलों आहें."

जीवनांतील दुःख, संकटें, निराशा टाळून सुखच कसें वेचावें याचा धडा देतांना दांडेकर प्रगतीचा, चैतन्याचा, विकासाचा उपदेश करतात, तो पुढीलप्रमाणें—"ज्याला आपण आशावाद म्हणतो, आनंद म्हणतो, तें परिस्थितीच्या पुढें एक पाऊल टाकणें असतें. नैराश्यानें भरलेली कोणतीहि घटना घ्या, तिच्यापुढें एक पाऊल टाकलें कीं, आशेचीं सोनेरी किरणें चमकतांना आढळतील आशानिराशेचे किंवा सुखदुःखाचे सीमाप्रांत एकमेकांना लागून असतात. तुम्ही सीमोल्लंघन करावयाचें नाहीं असें म्हटल्यावर तुम्हांला आशेच्या अन् सुखाच्या साम्राज्यांत येतां कसें येणार?

दुबळ्यासारखे तुम्ही जुन्यालाच चिकटून बसावयाचें निश्चित केल्यास तुम्हांला नव्या अन् चांगल्या गोष्टी मिळणार तरी कशा ? ज्या स्थितींत असाल त्याच्यापुढें एक पाऊल टाकलेंत कीं तुम्हांला हवें तें मिळेल. "

दांडेकरांचा पुढील आनंदी व आशावादी दृष्टिकोन वाचकांना उत्साहदायक वाटेल असाच आहे. " ज्या आयुष्यांत आपणांला इतक्या विविध आनंदाचा उपभोग घेतां येतो तें आयुष्य नीरस नसून सरस आहे. सृष्टीकडे आणि आयुष्याकडे थोड्याशा रसिकतेनें व खेळाडू वृत्तीनें बघितल्यास असें खचित वाटेल कीं, जगण्यांत मौज आहे. "

उदात्त ध्ययवाद

'जाहल्या तिन्हीसांजा ' या निबंधांत ते आपल्या जीवनाचें उदात्त ध्येय रंगवितात. तें असें–" दिवसाचें कांहींदेखील रात्रींत शिल्लक राहात नाहीं. जिकडे तिकडे रजनीचा अंमल. दिव्य विस्मृतीचा अंमल. आपणहि सारें सारें विसरून जावें, सर्व भेदभाव विसरावेत. मानापमान गिळून टाकावेत. दुरुत्तरें पचवून टाकावींत. दुखविलेल्या जीवांजवळ क्षमेची याचना करावी. दुःख देणाऱ्या जंतूवर दयेची पांखर धरावी. प्रेमाची आरती घेऊन सर्वांसर्वांना ओवाळायला निघावें आणि मग पहावें सृष्टींत केवढी आलटापालट होते ती. "

हें समतेचें, प्रेमाचें व शांतीचें जीवन लाभण्यासाठीं मनुष्यानें कोणतीं दृष्टि ठेवावी हें ' सर्वं क्षणिकं ' या निबंधांत त्यांनीं पुढील शब्दांनीं सांगितलें आहे. " सौंदर्याचें, स्वातंत्र्याचे, सुखाचे क्षण जरी मिळवतां आले, तरी त्या क्षणाकरितां सर्व आयुष्य कुरबान करायला हरकत नाहीं. दगडासारखें शाश्वततेचें जीवन कंठण्यापेक्षां इंद्रधनुष्याचें क्षणिक जीवन पुरवलें. तें तरल असलें तरी सत्य आणि त्याहिपेक्षां सुंदर आहे. "

' पूर्णविराम ' या निबंधांत कार्याची निवड कशी करावी व निवडलेल्या कार्याशीं एकनिष्ठ कां रहावें, हें सांगतांना दांडेकर लिहितात, " कांहीं एक काम उत्कृष्टपणानं, शांतीनं करतां यावं म्हणून दुसरीं कांहीं काम आपण होऊन बंद करणं याचं नांव पूर्णविराम होय. आणि असला

पूर्णविराम हा निराशाजनक नसून उत्साहद्योतक आहे. वाक्य लिहीत असतांना आपण वाक्याच्या शेवटीं पूर्णविराम देतों. तो पुढें कांहीं न लिहिण्याकरितांच देतो असं नसून पुढील वाक्य लिहिण्याकरितांहि देतो."

चमत्कृतीची मांडणी

आतां अपवादांचा गौरव करून व विषयांचीं मूल्यें उरफाटीं मांडून दांडेकर लघुनिबंधांत आवश्यक ती चमत्कृति कशी निर्माण करतात तें पहा. 'रेल्वे लाईन्स 'मध्यें तें लिहितात, " सरळ मार्गानें कांहींहि करीत असतांना थोड्याशा आडरानांत शिरल्याशिवाय आपणाला बरेंच वाटत नाहीं–निदान मला तरी बरें वाटत नाहीं. त्या आडरानांत शिरून सरळ रस्त्याकडे बघण्यांत मला मौज वाटते. सरळ रस्त्याचें खरें स्वरूप–त्याचें खरें महत्त्वहि अशा वेळीं कळायला सुलभ जातें. शिवाय सरळ रस्त्याला साक्ष ठेवून आडमार्गानें जात असतांना खांचखळगे लागले तरी वाट चुकण्याची भीति मुळींच नसते."

रिकामपणामुळें पुढच्या कामाला उत्साह कसा मिळतो, हें 'विहार '-मध्यें त्यांनीं सांगितलें आहे, तें असें—" श्रम करणाऱ्या मनुष्यांकरितां रिकामपणाची व विश्रांतीची जरूरी आहे. रिकामपणानें मनुष्याची कार्य-क्षमता तर वाढतेंच; पण त्याहीपेक्षां अधिक म्हणजे नवनिर्मिती कांहीं तरी तो करूं शकतो. जगाच्या ज्ञानांत व आनंदांत तो आधिक भर घालूं शकतो. जगाकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन नावीन्यपूर्ण व प्रसन्न बनतो. नाहीं तरी बैलाप्रमाणें काम करणाऱ्या लोकांऐवजीं माणसाप्रमाणें काम कर-णाऱ्या बुद्धिमान लोकांचीच समाजाला अधिक गरज असते आणि ही गरज श्रम करणाऱ्यांना स्वच्छंदानें विहार जोंपर्यंत करतां येत नाहीं, तोंपर्यंत भागणें शक्य नाहीं."

तसेंच 'घर-घरटें'मध्यें ते म्हणतात, " शिष्टाचाराच्या बंधनाखालीं बाह्य जगांत वावरत असतांना आपल्या मनावर भयंकर ताण पडलेला असतो. तो ताण मोकळा झालाच पाहिजे–शिष्टाचाराच्या संरक्षणाकरितांहि झाला पाहिजे. कारण तसा तो न झाल्यास मनुष्य बाहेरहि वेडावांकडा वागूं

लागेल. मनुष्यानें मोकळेपणानें घरांत वागणें हें सामाजिक स्थैर्याच्या दृष्टीनेंहि योग्य आहे."

'नियमितपणा'मध्येंहि ते म्हणतात, "कांहीं काळ तरी प्रत्येकानें स्वच्छंदानें डोंगर-माथ्यावर-हुंदाडावें, रानांत भटकावें आणि लाटांची लीला पाहात समुद्रकिनाऱ्यावर खुशाल तासन्तास बसावें. जगांतील विविध अनुभव अवश्य घ्यावेत; आणि मग पाहावें कीं, आपल्या आयुष्यांत आनंदाचा अविनाशी झरा निर्माण झाला आहे किंवा नाहीं तें."

सूक्ष्म चिकित्सा

व्यवहारांत त्रास कोणाला होत नाहीं? पण तो मनांत रिचवून समाजांत आनंदाचा फुलबाग फुलविण्याचा सर्वांनीं प्रयत्न केला पाहिजे, असें तत्त्व 'घर–घरटें'मध्यें दांडेकरांनीं सांगितलें आहे. नुसतें तत्त्व मांडून स्वस्थ न बसतां त्याची कारण-मीमांसाहि त्यांनीं जातांजातां सांगितली आहे. ती अशी "आपणाला वाटतें, आपल्या खाजगी गोष्टी, खाजगी आवडी-निवडी, यांचें प्रदर्शन जनांत कशाला करा? लोकांना कुठें आहे आपल्या-विषयीं विचार करायला फुरसद? कुठें आहे त्यांना कळकळ? शिवाय त्यांनाहि त्यांचीं सुखदुःखें–मानापमानाचे प्रसंग–असणारच. अशा परि-स्थितींत कृत्रिम का होईना—आनंदाचें, प्रसन्नतेचें, सुखाचें वातावरण निर्माण करणें व करविणें हेंच इष्ट नाहीं का?"

निसर्ग कसा आहे आणि मानवानें आपली बुद्धि कशी वापरावी, याचा तात्त्विक विचार दांडेकरांनीं 'निसर्ग निसर्ग आहे, पण' या निबंधांत मांडला आहे, तो असा—"निसर्ग सुष्ट नाहीं आणि दुष्टहि नाहीं. निसर्ग निसर्ग आहे. बगळ्यानें मासे खाणें, कोळ्यानें मासे पकडणें इत्यादि प्राथमिक स्वरूपाची हिंसा हा निसर्गाचा किंवा जगाचा स्वभावच आहे मुळीं. एका जीवानें दुसऱ्या जीवावर जगणें हा निसर्गाचा क्रमच आहे. पण हा क्रम वाढवून त्यांत माणसानें माणूस खाणें, एका राष्ट्रानें दुसरें राष्ट्र गिळंकृत करणें यांचा अंतर्भाव करणें चुकीचें ठरेल. कारण मनुष्याला ईश्वरानें बुद्धि दिली असून, दुसऱ्यावर आक्रमण केल्यावांचून त्याला जगणें शक्य आहे."

समतोल विचार

मानवानें आपल्या बुद्धीचा एकदां उपयोग करावयाचें ठरविलें कीं, सुखापेक्षां कर्तव्याची व व्यक्तीपेक्षां समाजाची मातब्बरी त्याला सहजच अधिक वाटूं लागते. ' काळी पोत ' ' लेडीज रूम,' ' कोथिंबिरीच्या काड्या,' ' मी आणि तरुण स्त्रिया,' ' मिळवुनी त्रिभुवनींच्या ललना ' इत्यादि निबंधांतून दांडेकरांनीं व्यक्तिसुखाचा व भोगवादाचा प्रचार चालविला आहे असा भास होतो हें खरें आणि खेळ, विसावा, धूम्रपान, संगीत हेंच आयुष्याचें परमसाध्य असें वाटण्याइतका ठसा तरुण वाचकाच्या चित्तावर उमटतो हेंहि खरें; पण या साबणाच्या पाण्यांतील रंगीबेरंगी फुग्यांचें महत्त्व किती, हेंहि दांडेकर मधूनमधून पटविण्यास विसरत नाहींत हें विशेष. ' जगण्यांत मौज आहे ' या निबंधांत ते असा हितोपदेश करतात. " परोपकारापासून होणारा आनंददेखील आयुष्यांत रस उत्पन्न करूं शकतो. आपल्याजवळ दोन पैसे असल्यास त्यांतील एक गरिबाला दिल्यानें, आपणाला जी विद्या येत असेल ती अविद्य मनुष्याला शिकविल्यानें, आपलें सामर्थ्य बलहीनांच्या रक्षणार्थ वेचल्यानें, आपली वाणी दुसऱ्यांना आनंदविण्याकारितां वापरल्यानें, आपली लेखणी वाचकांची कळी उमलविण्याकारितां चालविल्यानें जो एक विशिष्ट प्रकारचा आनंद होतो तो मिळविण्याकारितां जन्मच्या जन्म कोणाला जगावेसें वाटणार नाहीं ? " विचारांच्या या समतोलपणाबरोबरच वाक्यरचनेलाहि किती समतोल आला आहे हें पाहण्यासारखें आहे. सुंदर विचार सुंदर भाषेनें व्यक्त झालेले येथें दृष्टीस पडतें.

सामाजिक जाणीव

' काळ खेळतो आहे ' हें निबंधाचें शीर्षक " कालः क्रीडति " या श्रीशंकराचार्यांच्या सूत्रावरून लेखकाला सुचलें आहे. पण या नांवांतील ' काळ खायला आलेला नसून खेळायला आला आहे ' अशी आपली खेळकर भूमिका लेखकानें मांडली आहे. घोड्याच्यां ट्रॅम जाऊन पेट्रोलच्या आल्या व आतां बस धांवूं लागल्या, पणत्या जाऊन विजेचे दिवे आले

इत्यादि बदल दाखवून व जर्मनी–जपानांतील क्रांति वर्णून लेखकानें सूचक प्रश्न विचारला आहे, "वैयक्तिक उन्नति, प्रगति, सुधारणा झाली, पण बहुजन-समाजाचें काय ? तो कुठें आहे ? " अशी सामाजिक जाणीव बारीक बारीक प्रसंगांतून हसतखेळत देणारे लेख लघुनिबंध या संज्ञेस अनेक अर्थांनीं पात्र ठरतात.

गहन विचार, सूक्ष्म चिकित्सा व आकर्षक मांडणी या तिन्ही दृष्टींनीं ' जाहल्या तिन्हीसांजा ' हा निबंध सरस आहे. त्यांत लेखक म्हणतो, " आपण आणि काळोख. जगांतील सर्व बंधनें गळलीं जाऊन कुठल्या-तरी महाशक्तीच्या समोर आपण उभे आहोंत, आणि त्या शक्तीच्या आंत आहोंत; ती शक्ति आपल्याभोंवतीं अगदी खेटून आहे; आपण तिच्याच-पैकीं एक अंश आहोंत, ह्या किंवा असल्या भावनेनें अंतःकरण उचं-बळून येतें. आणि मग जो कांहीं आनंद अनुभवायला सांपडतो तो केवळ अनिर्वचनीय. "

भाषेचा खेळकरपणा

लघुनिबंधाला योग्य अशी मनमोकळी, लवचीक व खेळकर भाषा-शैली दांडेकर सर्वत्र वापरतात. ' आळस ' मध्यें ते म्हणतात, " माझें आपणाला मनापासून आणि हात जोडून असें सांगणें आहे कीं, या फिकी-रींत आपण पडूं नका. कांहीं थोडें फाजील उद्योगी लोक आळसाला खुशाल आपला शत्रू मानोत. माझी तर दिवसानुदिवस अशी खात्री होत चालली आहे कीं, आळस हा मनुष्याचा शत्रू नसून मित्र आहे, दुष्मन नसून दोस्त आहे. कसा तें सांगतोंच आतां आपणाला. "

' मागें फिरून पाहिलें असतां ' या निबंधाचा प्रारंभ लघुकथेला साजेसा आहे. तो असा–" समजा, तुम्ही परगांवीं जायला निघाला आहांत. तुम्ही गाडीच्या खिडकीपाशीं उभे आहांत, गाडीनें शिटी वाज-विली असून उलट एंजिन ड्रायव्हरनें ' कुकुऽऽकु ' असें उत्तर दिलें आहे. पाणी प्यायला किंवा इतर कांहीं खाद्य खरीद करायला गेलेल्या

उतारूंची डब्यांत शिरण्याची तारांबळ उडून धाड्धाड् असे डब्यांचे दरवाजे लागले जात आहेत. गाडीला किंचित धक्का बसून गाडी हळुहळू चालायला सुरवात झाली आहे. आणि अशा वेळीं तुम्हीं मागें फिरून पाहिलेंत तर तुम्हांला काय दिसेल ? ''

' रेल्वे लाइन्स ' हा निबंधहि नावीन्यपूर्ण आहे. आगगाडीचे रूळ पाहून लेखक असें तत्त्व सांगतो, '' त्या चकचकणाऱ्या परंतु पुढें पुढें अस्पष्ट होत जाणाऱ्या रेल्वे लाइन्सकडे पाहिलें कीं दूरच्या आणि वेगळ्या मुलखाची सारखी आठवण होते, मनांत त्याच्याविषयीं कल्पनातरंग उभे राहातात.....प्रवास न करतां प्रवास केल्याचें श्रेय आपणाला मिळेल. ''

विनोदाचे तुषार

कांहीं रुक्ष, अरसिक शाश्वततावादी लोक समोरच्या सुखाला व सौंदर्याला पारखे कसे होतात, हें पटविण्यासाठीं दांडेकरांनीं एक गंमतीचें उदाहरण दिलें आहे. हे लोक आइस्क्रीम पुढें आले असतां म्हणतात, '' क्षणापूर्वी हें आइस्क्रीम निव्वळ साखरेचं दूध होतं. इतकंच नाहीं, तर अर्ध्या तासानं पुन्हां तें दूधच होणार. तस्मात् या क्षणिक गोष्टीचा आम्हांला स्वीकार करतां येत नाहीं. '' असा विनोदाचा झंकार मधून-मधून दांडेकरांच्या लघुनिबंधांतून उठत असतो. ' न्हावीदादा ' हा त्यांचा निबंध कोल्हटकरांच्या ' हजामती ' ची आठवण सहजच करून देतो. एका समर्पक उपमेचा उपयोग दांडेकरांनीं विनोदासाठीं कसा केला आहे पहा. '' तुळतुळीत डोक्याच्या अंगणांत घेऱ्याचें वृंदावन उभारून त्यांत शेंडीरूपी तुळशीची स्थापना एखाद्यानें केली, कीं तो शंभर टक्के सनातनधर्माभिमानी आहे असें मोळे लोक मानीत असत. ''

अशाच विनोदाची झालर ' आपण आहों गायी ' या निबंधांतहि लावलेली आढळते. आपला सिद्धांत गंमतीदार भाषेनें सांगतांना ते म्हणतात, '' पूर्वीच्या स्त्रिया गायी होत्या, म्हणून हल्लींच्या स्त्रियांनीं म्हशी व्हावें किंवा वाघिणी व्हावें असें कोणीच म्हणणार नाहीं. म्हशीं काय

आणि वाघिणी काय, शेवटीं पशुकोटींतीलच होत. स्त्रियांनीं तसल्या पशुकोटींत कधींच जाऊं नये. त्यांनीं मनुष्यकोटींत राहाण्याचा प्रयत्न करून त्यांतच आपली अधिकाधिक उन्नति करावी. "

वाचकांच्या ओठावर स्मिताची लकेर पसरेल न पसरेल इतका माफक विनोद करण्याच्या केळकरी परंपरेंत दांडेकर शोभून दिसतात. 'जमेचिना-घडेचिना' या निबंधांत ते मिस्किलपणानें म्हणतात, " सकाळीं मला उठविण्याच्या कामीं कपबश्यांच्या आवाजाखेरीज बाकीचे सर्व आवाज (म्हणजे प्रिय माणसांचे आवाजदेखील) अगदीं म्हणतां अगदीं निष्फळ ठरले आहेत. हा एकच आवाज असा आहे कीं, तो ऐकून मी खडबडून जागा होतों आणि ताज्यांतला ताजा चहा जो असेल तो मिळविण्याचा प्रयत्न करतों; म्हणजे दिवसांतला माझा पहिला महान् उद्योग म्हणजे चहा घेणें. आतां ही गोष्ट कांहीं मोठी सांगण्याजोगी नाहीं हें मला पटतें आहे. पण इतर गोष्टी आपणांला जमतच नाहींत तिथें काय करणार ? "

फसवी मांडणी

' निर्वासित माणसें ' या निबंधांत चमत्कृतिसाठीं ते अशीं कांहीं विधानें करतात कीं, तीं कच्च्या वाचकाला खरीं वाटावींत, पण तीं सत्याच्या वा विवेकाच्या कसोटीस उतरणारीं नसावींत. उदाहरणार्थ– "जगांत जर मला कोणाची अत्यंत भीति वाटत असेल तर ती निर्व्यसनी मनुष्याची ! त्याच्याइतका भयंकर प्राणी दुसरा कोणीहि नसेल ! त्याचें भयंकरत्व त्याच्या निर्व्यसनापासून निर्माण झालेलें असतें. "

तसेंच " एका दृष्टीनें निर्व्यसनी माणसांना मी समाजाचे शत्रु समजतों. वसुंधरेवर ज्या हजारों वस्तु निर्माण होतात, त्यांपैकीं कांहीं थोड्यांचाच ते स्वीकार करतात आणि बाकीच्यांचा स्वीकार करणें हें ते व्यसनाच्या सदरांत घालतात ! ते ज्यांचा स्वीकार करतील त्या जीवनोपयोगी चिजा व बाकीचीं सर्व व्यसनें ! किती भयंकर समीकरण आहे हें ? "

केवळ एक गंमत म्हणून असे विचार एका कानानें ऐकावयाचे व दुसऱ्या कानानें सोडावयाचे. त्यांची शास्त्रीय चिकित्सा केली कीं, त्याचें

स्वारस्य गेलें. फूल नुसतें हुंगावयाचें, त्याचें पृथक्करण करणें अरसिकपणाचें. 'उद्योगी मनुष्यां' तहि दांडेकर असेच विनोदी विचार लिहितात, "ज्या उद्योगीशीलतेपायीं ॲटमबाँबसारखे शोध लागून हिरोशिमा बेट किंवा नागासाकी बंदर यांतील लक्षावधि निरपराध मनुष्यप्राण्यांचा क्षणार्धात संहार होऊं शकतो, ती पुष्कळांच्या ठिकाणी नाहीं हेंच जगाचें भाग्य म्हणावयाचें. छे ! छे ! मनुष्य हा स्वभावतः आळशी आहे हेंच ठीक आहे." या त्यांच्या विधानांतील संहाराचें मूळ उद्योगांत नसून अविचारांत, स्वार्थांत, द्वेषांत आहे हें वाचकानें ओळखावयास हवें.

काव्यमय कल्पना

काव्यकल्पना व भाषालंकार यांचें भांडवल दांडेकरांजवळ बेतांचेंच आहे. पण त्या भांडवलाचा वापर योग्य ठिकाणीं करण्याचें कौशल्य त्यांचे ठायीं आहे. 'जाहल्या तिन्हीसांजा' मध्यें रात्रीचें वर्णन ते किती चातुर्यानें करतात पहा, "एखाद्या गारुड्यानें आपल्या पोतडींतून अनेक चित्र-विचित्र जिनसा काढून अद्भुतरम्य विश्व निर्माण करावें, आणि मग खेळ संपला कीं, पुन्हां सर्व वस्तु पोतडींत ठेवून द्याव्यात, त्याप्रमाणें प्रकृतिदेवी दिवसां आपल्या पोतडींतून सर्व वस्तु बाहेर काढते आणि रात्र झाली कीं पुन्हां तमाच्या पोतडींत त्या ठेवून देते."

'मध्यरात्र' हें कल्पना-विलासाला केवढें रम्य क्षेत्र. फडके यांनीं 'सहल' मध्यें व प्रा. कुसुमावती देशपांडे यांनीं 'मध्यरात्र' मध्यें आपापल्या शैलीनें तिचें वर्णन केलें आहे. दांडेकरांची वर्णनशैली पहा, "ती चांदणी मध्यरात्र होती. द्वादशीचा चंद्र पश्चिमेकडे कलत चालला होता. त्याच्या वरच्या अंगाला मृग नक्षत्र आकाशाची शोभा वाढवीत होतें. जरा पलीकडे व्याधाची तेजस्वी चांदणी एखाद्या रूपगर्वितेप्रमाणें आविचल आब्यतेंत उभी होती. जिकडे तिकडे नीरव अगाध शांतता होती. रात्रीं कुत्रीं ओरडतात, पण त्या वेळीं तींहि ओरडत नव्हतीं ! जिकडे तिकडे निःशब्द शांततेच पसरली होती. लख्ख पांढऱ्या चांदण्याच्या दुधानें न्हाल्यासारखीं घरें व सडका दिसत होत्या. चांदण्यांतील त्या सावल्या

फार मोहक, आकर्षक दिसत होत्या. जणूं कांहीं श्याम वर्णाच्या देव-कन्याच चांदण्यांत विहार करीत आहेत! तसल्या त्या मध्यरात्रींच्या सावल्यांतून जात असतांना एखाद्या यक्षाच्या नगरींतून तर मी जात नाहीं ना, असें मला वाटलें."

पर्जन्यकाळाचें अलंकारिक वर्णन 'आनंदाचे संकेत' मध्यें दांडेकरांनीं केलें आहे, तें असें—"एखादे वेळीं ढगांवर ढग जमा होऊन सैनिकांच्या रांगा लागल्यासारख्या दिसतात, तर एखादे वेळीं पातळ ढगांची धाबळी परिधान केल्यासारखें आकाश दिसतें. एखादे वेळीं बाणाच्या वेगानें पावसाच्या धारा पडतात, तर एखादे वेळीं फुलबाजीप्रमाणें मंद मंद भुरभुर सुरू असते. पण कांहींहि असलें तरी निसर्गाचें आनंदाचें सांघिक गाणें या ऋतूंत सुरू असतें.

मनोहर वर्णन-शैली

एका तळ्याचें शब्द-चित्र दांडेकरांनीं किती सुंदर व यथार्थ काढलें आहे, पहा—"त्यांत कांहीं पांढरीं व कांहीं लाल कमळें होतीं. कमळांच्या पानांवरून स्वतःच्या लहानग्या शरिरांचा तोल सांवरीत पाणकोंबड्या फिरत होत्या. रंगलेल्या ढगांचीं प्रतिबिंबें पाण्यांत पडून, त्यालाहि एक शोभा आली होती. जलाशयाच्या कांठावर बसून एक कोळ्याचा मुलगा गळानें मासे पकडण्याचें काम करीत होता."

'विहार' मध्यें नानाविध पांखरांचीं जीं वर्णनें दांडेकरांनीं रंगविलीं आहेत, तशीं मराठींत थोडींच सांपडतात. आकाशांत स्वच्छंदानें उडणाऱ्या पारव्यांचें वर्णन असें—"सुमारें दोन-अडीच तासांनीं ताऱ्याप्रमाणें लुकलुक करणारे पारवे पुन्हां पुष्पगुच्छाप्रमाणे दिसूं लागले, आणि थोड्या वेळानें ते खालीं आपल्या खुराड्याकडे आले. किती ताजे नि तेजस्वी दिसत होते! किती डौलदार त्यांची चाल होती. किती प्रेमानें ते एकमेकांशीं खेळत होते. क्रीडा केल्यानें, विहार करून आल्यानें, ते उल्हसित दिसत होते. निःस्वार्थी, निर्हेतुक विहारापासून किती आनंद होतो हें त्यांच्याकडे पाहिलें असतांना कळून येण्याजोगें होतें."

पांढऱ्याशुभ्र बगळ्यांची आकाशांतील माला तर कोणालाहि कवीच बनवील–कविगुरु कालिदासानें तर तिला " अस्तंभतोरणा " चीच उपमा दिली आहे. दांडेकर वर्णितात, " पांढरे बगळे आकाशांतून जात असतांना फार मनोहर दिसतात. अर्धचंद्राकृति किंवा सरळ रेषेंत व्यवस्थितणें आणि जलद उडणाऱ्या बगळ्यांकडे माझें लक्ष वेधलें जातें. फार सुंदर दिसतात ते. ताज्या मोगऱ्याच्या हारासारखी आकाशांत उडणारी बलाकमाला दिसते. "

जशीं पाखरें, तशीं फुलें–फार काय, पानें-पिकलेलीं पानेंहि. ' काळ खेळतो आहे ' मध्यें त्यांचें मनोरम वर्णन दांडेकरांनीं केलें आहे, तें असें- " विशेषत: हिंवाळ्याच्या शेवटीं व वसंताच्या पूर्वी या रस्त्यावर फारच शोभा दिसते. पिवळी, लाल, किरमिजी, भुरकट वडाचीं पानें जाणाऱ्या-येणाऱ्यांवर जणूं अभिषेकच करीत असतात. टप टप टप, अगदीं हळूवारपणें गमतीनें खालीं येणाऱ्या त्या पानांकडे पाहिलें कीं वाटतें, कांहीं गूढ संदेश घेऊन येणारे हे देवदूत तर नसतील ! त्या पिवळ्या पिवळ्या पानावरून चालत असतांना वाटतें, कीं आपण सोन्याच्या चुऱ्यावरून चाललों आहोंत किंवा सोनेरी कोरांटीच्या फुलांवरून चाललों आहोंत–आणि अशी कल्पना मनांत येतांच आपलीं पावलें आपल्या नकळत हलकीं होतात, मंदावतात आणि आपलें हृदय उदात्त भावनांनीं भरून जातें. "

अलंकारांच्या माला

आळसांत (वास्तविक चिंतनांत) घालविलेल्या वेळाचें फळ दांडेकर किती काव्यमय भाषेनें सांगतात पहा–" हृदयाचें कमळ उमलून त्यांतून पराग खवूं लागतात. आत्म्याचा गुंजारव सुरू होतो. आत्मा नाचूं लागतो, हृदय डोलूं लागतें. हा अपूर्व देखावा पाहून आपल्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागतात. आणि आपण आळसांत वेळ घालविला नसून आनंदांत घालविला असें वाटूं लागतें. असल्या आनंदाचा उपभोग घेतला आहांत का कधीं आपण ? "

आपला आशावादी संदेश देवालयाच्या दृष्टांतानें दांडेकर मांडतात तो

सं. नं. ३९९
नि० ९०

असा—" निराशेच्या सभागृहांतून आपण आंत गेलों, कीं आशेचें मंदिर दिसूं लागतें. त्या मंदिरांत एकदां जाऊन तर पाहा. आनंदाचा नंदादीप तेथें अनंत काळपर्यंत उत्साहाचीं किरणें फेंकीत असलेला आढळेल. "

तसेंच, ' कीर्ति 'वर दृष्टांतामागून दृष्टांतांच्या सुगंधी माला ते वहातात. त्या अशा—" पाण्यावर ओढलेल्या रेघेप्रमाणें किंवा वाळूवर काढलेल्या आकृतीप्रमाणें कीर्ति क्षणभंगुर नाहीं. तसेंच ती संगमरवरी दगडांवर किंवा ताम्रपटावर खोदलेल्या अक्षरांप्रमाणें चिरकाल टिकणारीहि नाहीं. कीर्ति ही दिव्याप्रमाणें आहे. एका दिव्यावर दुसरा दिवा लावला गेला कीं, मूळच्या दिव्याचें काम संपलें. तसेंच एकाच्या कीर्तीनें दुसऱ्याला कीर्तिकर बनविलें कीं तिचें कार्य संपलें. कीर्तींचीं फुलें प्रगतीच्या पारिजातकांवर येतात. भोंवतालचें वातावरण सौरभयुक्त करणें हें फुलांचें काम. समाज सुखी करणें हें कीर्तीचें काम. कीर्ति ही स्वतः टिकण्याकरितां नसते; समाजाला टिकविण्याकरितां असते. "

लेखन-प्रकारांचा संकर

दांडेकरांच्या कांहीं कांहीं लघुनिबंधांमध्यें इतर वाङ्मय-प्रकारांचेंच प्राबल्य झालेलें आढळतें. ' सारखे चेहरे 'मध्यें केवळ विनोदी उदाहरणेंच आहेत—निबंधाला अवश्य असा विचाराचा एखादा कण तरी त्यांत असावयास हवा होता. तसेंच ' जमेचिना, घडेचिना ' या निबंधांत कांहीं विफल योजनांची नुसती जंत्रीच दिली आहे. लवकर उठणें, कपडे नीटनेटके घालणें, पहिला नंबर मिळविणें, वक्तृत्व रंगविणें, इत्यादि कार्यांत आपल्याला यश आलेलें नाहीं हें त्यांत त्यांनीं चटकदारपणें सांगितलें आहे. पण सर्व लेखांतून विचाराचें बारीकसें सूत्र गुंफलेलें असावयास पाहिजे, तें नाहीं. ' सर्वं क्षणिकं 'मध्यें फुलें, दांपत्य, औदार्य, विद्याप्रेम, इंद्रधनुष्य इत्यादि जीवनांतील सौंदर्य-स्थळांची यादी दिलेली आहे. ' निर्व्यसनी माणसें ' दगडाप्रमाणें असतात, अनुदार असतात, समाजाचे शत्रु असतात असा एकांगी सिद्धांत चमत्कृतिजनक म्हणून दांडेकर मांडतात आणि हिटलर-चर्चिलचें साम्य-वैषम्य दाखवितात; पण शिवाजी-टिळक-गांधीजी

इत्यादि निर्व्यसनी नेत्यांचें जीवन काय दर्शवितें ? इतका गंभीर विचार लघुनिबंधांत करावयाचा नसतो, असें उत्तर दांडेकर देतील, हें उघड आहे.

' पूर्णविराम ' मध्यें आरंभापासून अखेरपर्यंत संवादच आहेत. तसाच प्रदीर्घ संवाद ' आपण आहों गायी ' यांत पसरलेला आहे. साठीच्या घरांत पोंचलेल्या दोन म्हाताऱ्या स्त्रियांच्या त्या संवादांतून स्त्रियांचें परावलंबन सूचित केलें आहे व आधुनिक स्त्रीचा स्वतंत्र बाणा चित्रित केला आहे. ' मिळवुनि त्रिभुवनींच्या ललना ' मध्यें एक भास निर्माण करून नानाविध सुंदर स्त्रियांच्या सहवासाची अतृप्त इच्छा लेखकानें काल्पनिक रीतीनें पूर्ण करून घेतली आहे. ' उपरण्याचे उपयोग ' स्वराज्य–प्राप्तीकरितांहि करा असा एकांतिक प्रचार करणाऱ्या संस्थानिकांचें सुमारें दहापानी व्याख्यान लघुनिबंधाला लोढणेंच ठरण्यासारखें नाहीं काय ! ' शक्तीचा अपव्यय ' यांतील कल्पना गडकऱ्यांच्या ' चिंतातुर जन्तु ' या कवितेसारखीच आहे. विजेचे पंखे, रानगुलाब, युवतींचे विभ्रम, मॅट्रिकचे विद्यार्थी इत्यादिकांच्या गुणांची उधळपट्टी चालली आहे, अशी कुरकुर त्यांत आहे. संवाद, वर्णन, शब्दचित्र--हा लघुनिबंधाचा एकएक अवयव ठरेल, पण त्यामुळें लघुनिबंधाला पूर्णता येत नाहीं. तसे सकल अंगांनीं परिपूर्ण असेहि लघुनिबंध दांडेकरांनीं लिहिले आहेत.



सौ. कुसुमावती देशपांडे : २०

'साहित्यिक दांपत्य' म्हणून देशपांडे-पतिपत्नींचा उल्लेख गौरवानें होण्यासारखा आहे. सौ. कुसुमावतीबाईंचे पति श्री. आत्माराम रावजी देशपांडे हे 'अनिल' या टोपण नांवानें नवकवींमध्यें मानाचें स्थान मिळवून बसले आहेत. न्यायाधीशाचे उच्चासनावर त्यांनीं अठरा वर्षें काम केलें असून नंतर 'समाज-शिक्षण-विभागाचे' संचालक म्हणून त्यांनीं सेवा केली. आतां 'समाज-विकास-योजने'मध्यें केंद्रीय सरकारचे विशेषाधिकारी म्हणून ते काम करीत आहेत. अशा विद्वान कार्यकर्त्याला शोभण्याजोग्याच त्यांच्या सहचारिणीहि आहेत. त्यांचें मूळचें नांव कुसुम जयवंत.



त्यांचे वडील रा. ब. रामकृष्णराव हे वकिलीचा व्यवसाय करीत असत. वऱ्हाडांतील अमरावती येथें ता. १० नोव्हेंबर १९०४ रोजीं कुसुमचा जन्म झाला. तेथेंच त्यांचें प्राथमिक व बरेचसें माध्यमिक शिक्षण झालें. पुढें त्या पुणें येथें हुजूरपागेंत शिक्षण घेण्यास आल्या. १९२१ सालीं मॅट्रिकमध्यें त्या उत्तीर्ण झाल्या, त्या 'लक्ष्मण जगन्नाथ वैद्य' शिष्यवृत्ति मिळवून. पुढें त्या फर्गसन कॉलेजांत दाखल झाल्या. तेथें चार वर्षें अध्ययन करून त्या नागपूर विद्यापीठाच्या बी. ए. च्या परीक्षेस १९२६ सालीं बसल्या. त्या परीक्षेंत त्यांनीं पाहिल्या वर्गांत पहिला क्रमांक पटका-

वून मोठा लौकिक मिळविला. त्यांना सरकारची एक शिष्यवृत्ति मिळाली व त्या इंग्लंडला उच्च शिक्षणासाठीं गेल्या. तेथें लंडन येथील वेस्टफील्ड कॉलेजामध्यें इंग्रजी वाङ्मयाचा अभ्यास करून त्यांनीं १९२९ मध्यें बी. ए. (ऑनर्स) ची पदवी संपादन केली. पदवीसह मायदेशीं परत आल्यावर त्यांचा विवाह त्याच वर्षी झाला.

प्राध्यापकाचें काम

नागपूर येथील कॉलेजांत १९३१ पासून इंग्रजीच्या प्राध्यापिका म्हणून कुसुमावतीबाई अध्यापनाचें काम करीत आहेत. अध्यापनाबरोबर लेखनाकडेहि त्या लक्ष पुरवीत असतात. ' दीपकळी,' ' दीपदान ' व ' मोळी ' या नांवाचे त्यांचे तीन लेख-संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांमध्यें कांहीं लघुनिबंध आहेत व कांहीं लघुकथा आहेत. त्यांच्या लघुनिबंधांमध्यें मोजके शब्द, रेखीव वर्णन व रम्य कल्पना यांच्या जोडीलाच सूक्ष्म तर्कशक्ति व खोल सहानुभूति हेहि गुण आढळतात. समाजांतील दीन-दुःखी अशा उपेक्षितांबद्दलची त्यांची प्रेमळ भावना त्यांच्या लघुनिबंधामध्यें, मंदसुगंधी वायुलहरीप्रमाणें, सर्वत्र पसरलेली असते. ' टीकाकार ' म्हणूनहि त्यांची कीर्ति आहे. ' मराठी कादंबरीचें पहिलें शतक ' या नांवाचा त्यांचा एक मोठा टीका ग्रंथ ' मुंबई मराठी साहित्य संघा'नें प्रकाशित केला आहे. नागपूर येथील ' विदर्भ साहित्य संघा'चें अध्यक्षपद त्यांना लाभलेलें आहे. मुंबईच्या १९५० सालीं भरलेल्या साहित्य-संमेलनाच्या टीका-विभागाचें अध्यक्षपद त्यांना देण्यांत आलें होतें.

काव्य-कल्पनेची चमक

स्त्री-मन म्हणजे कवि मन. त्याची साक्ष सौ. कुसुमावती देशपांडे यांचे लघुनिबंध वाचतांना ठायीं ठायीं पटते. त्यांची भाषाशैली कोरीव आहे-एखाद्या कवितेला शोभेशी आहे. वेचक शब्द योजून त्यांच्या द्वारां आपल्या मनांतील सर्वच्या सर्व भाव प्रगट करण्यांत त्या यशस्वी आहेत. त्यांची भावना जितकी उंच कल्पना करूं शकते, तितकीच त्यांची बुद्धी सखोल चिकित्सा करूं शकते.

नदींत दिवे सोडण्याचा एक प्रसंग. सामान्य लोकांना तो एक वार्षिक खेळच वाटतो. पण त्यांतून त्यांनीं कल्पकतेचा किती प्रकाश पाडला आहे पहा, 'पौर्णिमेचें चांदणें आणि-कुबेराच्या ऐश्वर्यानें लवथवत्या लाटांना आपल्या पदरावर' नाचविणारी नर्मदा. तिच्या घाटावरील दीपदानाच्या सोहळ्याचें मनोहर वर्णन करून लेखिका त्या दिव्यांच्या रांगेवर एकेक कल्पना कशा लडवीत आहे पहा. "आल्हाद व गूढता. काजव्याच्या स्फुलिंगाएवढा आपला प्रकाश घेऊन एकेक दीप डोलत डोलत निघाला कीं आपल्या भोवतालच्या वीतभर लहरींना तरी व्यक्त स्वरूप देई; त्या अखंड निळ्या प्रवाहांतून त्यांना उचलून धरी. त्याच दिव्याचें तें इवलेसें प्रतिबिंब आपल्या परीनें नदीच्या अंतरंगांत किती खोल खोल शिरायचा प्रयत्न करी. कित्येक दिवे पैलतीरावर जाऊन पोचले होते; तिथें ते विसावून इतरांना आपली निःशब्द हाक देत होते. त्या लुट्टपुट्टीच्या दीपस्तंभामुळें नदीच्या विस्ताराची, तिच्या गांभीर्याची आज जणूं नव्यानेंच जाणीव झाल्यासारखी वाटे. कित्येक दिवे त्या अखंड वाहत्या जीवनाचें क्षितिजापर्यंत संशोधन करायलाच जणूं निघाले होते!"

निसर्गाचीं शब्दचित्रें

कांहीं कवि अरुणाचें रम्य वर्णन करतात; तर कांहीं संध्यादेवीचें चित्र रंगवितात. परंतु ऐन मध्यान्हाचे किंवा मध्यरात्रीचें वर्णन करणारे कवि थोडे! आणि त्या निसर्ग-वर्णनांतून आपल्या मनःसृष्टीचें दर्शन घडविणारे कवि तर त्यांहूनहि थोडे. केशवकुमार (प्रा. अत्रे) यांनीं 'दुपार-वर' एक हृदयंगम कविता केली आहे, पण ती अपवादच. कुसुमावतीबाईनीं मात्र दुपारची निरनिराळ्या ऋतूमधील स्वरूपें गद्यांमध्यें पण काव्याला साजेशा शैलीनें रेखाटलीं आहेत. नागपूरकडील मे महिन्यांतील दुपारची अनिमिष स्तब्धता! तशा दुपारीं एकाद्या शेतांत आपण गेलों, तर तेथील निसर्ग कसा दिसतो, याचें रेखीव शब्दचित्र लेखिकेनें काढलें आहे, तें असें:— "दृष्टीच्या सीमेपर्यंत काळी शुष्क जमीन पसरली होती. शब्दांच्या पलीकडे जिचें दारिद्र्य गेलें आहे, अशा एखाद्या स्त्रीच्या अंगावरील

फाट्क्या चिंध्याप्रमाणें वाळून कोळ झालेल्या गवताचे अवशेष भाजणाऱ्या वाऱ्यानें उगीचच भुरभुरत होते. दूरवर नजर फेकली तर मधूनच मृग-जलाचे तरंग दिसत, मधूनच ती काळीभोर जमीनच तरळल्यासारखी—खालवर हालल्यासारखी वाटे. ”

आणि हिंवाळ्यांतील दुपारीचें वर्णन तर लेखिकेनें अत्यंत बहारीनें केलें आहे, तें असें —“ हिंवाळ्यांतली दुपार तरी काय कमी मनोरम असतें ? त्या वेळच्या ऊबदार हवेची गोडी अस्सल सुखवाद्यांनादेखील पटेल. तिचा आस्वाद घेत उन्हांत पडलें असतां डोळ्यांना चारी बाजूंना जणू समृद्धीची ऊब दिसूं लागते. हेमन्ताचें सोनें सगळीकडे पसरलेलें असतें. गव्हांवर सोनेरी तांबूसपणा चढायला सुरवात होते. कडूनिंबाच्या पानांचें सोनें होऊन तीं गरगरा शिवाशिवी खेळत हिंडूं लागतात. जसजशी शिशिराची कळा ओसरूं लागते, तशतश्या भिंगाऱ्यांच्या झाडावर निव्वळ सोनेरी शेंगाच शेंगा लटकूं लागतात, तर पिवळ्या कांचनाचें झाड एकेका फांदीवर एकाद-दुसरेंच सुवर्णमय फूल घेऊन डोलूं लागतें. ”

तसेंच “ माध्यान्हीच्या वेळेंत समतोलपणाचें स्वारस्य, गंभीरतेचा आनंद सांठवलेला आहे, तींत उच्छृंखलपणा नाहीं. भडकपणा नाहीं. अभिजातपणाला साजेसें तिचें सौंदर्य आहे. प्रगल्भ हृदयाप्रमाणें तिचीं दुःखें निःशब्द आहेत. त्याच्याप्रमाणेंच तिचा आनंद शांत आहे. ”

चंद्रास्ताचें वर्णन

एकादा कवि ज्याप्रमाणें निसर्गातील दृश्य आपल्या हृदयांत सांठवून घेतो आणि नंतर आपल्या प्रभावी शब्द-सामर्थ्यानें तें हृदयांतून जसेंच्या तसें बाहेर काढून वाङ्मयद्वारां रसिकापुढें ठेवतो, तसें कौशल्य लेखिकेनें ‘ चंद्रास्ता ’च्या बारीक व विस्तृत वर्णनांत दाखविलें आहे. मावळत्या चंद्राचीं बदलतीं स्वरूपें व शेवटीं दोन बिंदु मात्र दिसणें याचें साक्षात् दर्शनच त्यांनीं घडविलें आहे. प्रारंभीं त्या सांगतात, “ एक शब्दहि न

बोलतां त्या भयाण, काळवंडलेल्या पाण्यानें भरास आलेल्या तलावाच्या कड्यावर जाऊन बसणें व डोळ्यांदेखत त्या टेकडीच्या माथ्याजवळ..... माथ्याखालीं.....झराझर ओढल्या जाणाऱ्या चंद्रकलेकडे, पातें न लवूं देतां पहात राहणें, याशिवाय दुसरें काय करणें शक्य होतें? "

तळ्यावर बसून मावळती चंद्रकला कशी दिसत होती, हें सांगतांना लेखिका म्हणते, " मावळत्या चंद्रकलेच्या पायाशींच पसरलेला तो शांत जलाशय तिचें रूप आपल्या अंतरंगांत सांठवण्याचा प्रयत्न करतां करतांच काळवंडत चालला होता. ती खालीं सरकली. तिची कोर टेकडीच्या माथ्यावर क्षणभर विसांवली व खालीं गेली. चंद्रकलेचीं दोन शकलें झालीं ! जातां जातां तिनें त्या टेकडीला दोन सोनेरी शिंगांचें वैभव बहाल केलें, या विचारानें क्षणभर मौज वाटली, तरी खरोखरी तिच्या त्या विद्ध स्वरूपाच्या व्याकुळतेनेंच मन व्यापून गेलें. तीं टोकें झपाट्यानें खालीं...खालीं...जात होतीं. बोटभर...अर्धें बोट...आतां नुसतेच दोन बिंदु ! ! " बिंदुमात्र भासणारी ती चंद्रकलाहि क्षितिजाच्या कडेपलीकडे गेली. अंधार पसरला. पण त्यांतहि प्रकाश भरून राहिला होता. अशा विचित्र निसर्गाचें वर्णन लेखिकेनें मनोरम केलें आहे, त्यांतच राजकीय पुढाऱ्याच्या तुरुंगवासानंतरच्या देशांतील परिस्थितीचाहि रंग मिसळल्यानें त्या वर्णनाला विचाराची घनता व सखोलता प्राप्त झालेली आहे. तें वर्णन असे—" ती दिसेनाशी झाल्यावर, क्षणभर सारें जग अंधारून आलें, तरी पुन्हां त्या चंद्रकलेच्या आकृतींत तोंवर सामावलेला प्रकाश आतां अंधाराच्या कणाकणांतून प्रस्फुरित होऊं लागला. तमाचे कण कण उजळले, प्रकाश आला नाहीं; पण अंधारहि राहिला नाहीं. तिथें केवळ चैतन्यच राहिलें. एखाद्या विराट आंदोलनाच्या नेत्याला कांहीं काळ अज्ञातवास स्वीकारणें प्राप्त झालें, तर क्षणभर त्याचें सर्व कार्य लयाला गेल्यासारखें वाटतें, त्याची तपस्या वाया गेली, असें वाटूं लागतें. परंतु लवकरच त्याच तपस्येचें तेज समाजाच्या अनेक कणांतून स्फुरूं लागतें. त्याच्याच मंत्राच्या नादानें दशदिशा मुखरित होतात. तो पुनः मोकळेपणानें वावरूं लागेपर्यंत जीवनाची

प्रसन्नता नाहींशी झाली, तरी त्या मधल्या अंधकारांतहि धीरोदात्त वृत्तीचा विश्वास कायम राहतो. तसेंच त्या चंद्रकलेच्या विश्वांत झालें होतें.''

मानवतेची हाक

'अप्सरांची भेट' हा लघुनिबंध म्हणजे कल्पकता व विवेक यांचा संगमच. शहरांतील सधन व सुविद्य स्त्रिया खेड्यांत जातात; पण कशाला ? तर केवळ वन-भोजनाला. तेथील निसर्ग-सौंदर्याचें आकंठ पान त्या करतात, पण तेथील मानवाकडे पूर्ण दुर्लक्ष करतात. हा विरोध लेखिकेनें कौशल्यानें चित्रित केला आहे. तिनेंच 'चंद्रास' या निबंधांत म्हटल्याप्रमाणें, ''सृष्टीचीं कांहीं गुपितें, तिच्या जीवनांतले अत्युत्कट क्षण, तिच्याशीं वेळीं-अवेळीं साहचर्य ठेवणाऱ्या जीवांनाच अनुभवायला मिळतात हेंच खरें.''

'अप्सरांची भेट' या निबंधाचा प्रारंभहि लघुनिबंधाला अनुरूप असा आहे. खेड्यांतील एक शिक्षक मार्मिक व तटस्थ निरीक्षकाची भूमिका घेऊन म्हणतो, ''मी होय ? मी या पलिकडे दिसणाऱ्या खेड्यांतल्या शाळेंत शिक्षक आहे. मन फार वैतागलं म्हणून कोसभर चालत येऊन या तलावाच्या काठाशीं बसलों आहें जरा. मी कसला हो कवि ! मराठी सात इयत्ता व एक वर्ष ट्रेनिंगचं—एवढंच आमचं शिक्षण. त्यांत कुठें कविता करतां येतात ?''

निसर्गाचें सौंदर्य किती शांतिदायक ! त्याचा लाभ तरी गरीब ग्रामीण जनता कां घेत नाहीं ? असा प्रश्न त्या शिक्षकाला प्रथम पडतो. तो म्हणतो, ''काळोखांतल्या संधिप्रकाशांत तो कुंदाचा ओथंबला बहर अन् मोगऱ्याच्या उमलत्या कळ्या ढगाआडून डोकावणाऱ्या लहानशा चांदण्यांसारख्या चमकतात ! त्यांच्या सुवासानं मला तरी भोंवतालच्या वस्तुस्थितीचा थोडा वेळ पूर्ण विसर पडतो; पण त्याबरोबरच नेहमीं वाटतं, हें तरी सुख या इथल्या गांवकऱ्यांनीं कां लुटूं नये ? त्यांचा खरोखरच श्रमपरिहार होईल. या नाजूक, लाजाळू फुलांच्या सहवासांत राहून त्यांच्या अंतःकरणाचं स्वाभाविक मार्दव कायम राखलं जाईल; त्यांत आशेचा

जोम लुकलुकत राहील. रात्रीच्या त्या शांत आकाशाखालीं पडून त्यांना शांति लाभेल. त्यांचं हृदयाकाशही तसंच विशाल होईल !! " हा निसर्गाचा शांति-प्रेमाचा संदेश ग्रहण करण्याइतकीहि स्वस्थता खेडूत जनतेच्या ठायीं नाहीं हें लेखिकेनें सूचकपणें सांगितलें आहे.

ग्रामीण दुर्दशेचें चित्रण

खेड्यांतील तळें खेड्यांतील जनतेसारखेंच होतें. त्या दोघांचें साम्य तो शिक्षक पुढील शब्दांनीं सांगतो, " सध्याची त्याची ही स्थिती किती केविलवाणी आहे. अगदीं आमच्या खेड्यासारखी. तिथलंही जीवन असंच या डबक्यासारखं झालं आहे. परिस्थितीनं गति मारली—मनं मारलीं—उत्साहाच्या ज्योति मालवल्या. शेतीचे सर्व व्यवहार चालू असतात, पण किती निर्जीवपणें ! एकेकाचे चेहरे पहावे हर कसे विझल्यासारखे दिसतात. एकामागून एक वाईट हंगामाचीं इतकीं वर्षं गेलीं, कीं पुन्हां आशेचं रोपटं लागायला त्यांना मनंच राहिलीं नाहींत. त्यांचे दगड बनून गेले ! "

या दगडी जीवनांत, ' शिलावस्थें 'तील आयुष्यांत मानवतेची ज्योत पेटविणें किती अवघड ? याचें उत्तर लेखिका पुढील शब्दांनीं देते, " जिथं आशेला जागा आहे, जिथं कुठून तरी सहाय्याची अपेक्षा आहे, भोंवतालीं कुणाला तरी जाणीव होण्याचा संभव आहे, तिथं प्रयत्नवादाला जागा आहे. पण जिथं माणुसकीची नीचतम परिसीमा झाली, तिथं झगडून काय करतां ? तिथं मग निर्विकार, अचेतन शांतीच बरी ! "

वनभोजनासाठीं आलेल्या त्या अप्सरांचें, त्या पऱ्यांचें, त्या भूषा—सुंदरींचें लक्ष दीन-दरिद्री खेडूताकडे जातें कशाला ? ते खेडूत कसे होते ? " सहजसंवादी निसर्ग त्या वळवासारख्या चैतन्यौघानें प्रफुल्लित झाला; पण त्या लवलवत्या पानांच्या वृक्षांखाली मानवजात होती, त्या विहीरीच्या आसऱ्यानें मोटेच्या हौदावरही मानवी जात होती. कसे तरी होते त्यांचे चेहेरे ! कांहींसे दूरत्वाच्या भावनेनें व्यापलेले-तर कांहींसे विस्मयचकित कुतूहलानें, जिज्ञासेनें एकमेकांशीं बोलूं पाहणारे, तर संकोचानं, भीतीनें दडपलेले...अगदीं स्तब्ध, केविलवाणे, उभेच उभे...! ! " मानवांचेच

दोन समूह बंधुबंधूंचें व बहिणीबहिणींचें नातें ! पण श्रीमंतीची इतकी खोल दरी त्या दोन मानव-समूहांमध्यें निर्माण झालेली होती कीं, एकाची ओळख दुसऱ्यास नव्हती. " एकीनंही, आल्यापासून जाईपर्यंत, झाडांखालच्या मानवजातीकडे मान वळवून पाहिलं नाहीं. अप्सरा ना त्या ! " या शेवटच्या तीन शब्दांनीं, शहरांतील विलासी मानवावर लेखिकेनें किती तीक्ष्ण टीका केली आहे !

यांत्रिक जीवनाचे नमुने

शहरांतील यांत्रिक जीवनांतील नीरसपणा प्रकट करणारे दोन लघुनिबंध लेखिकेनें लिहिले आहेत. कचेरी व घर या दोन खुंटाभोंवतीं, घाण्याच्या बैलाप्रमाणें, दररोज फिरत रहाणाऱ्या एका कारकुनाचें मन त्या ठराविक जीवन-क्रमाविरुद्ध बंड करून उठतें, असें ' गवताचें पातें ' यांत दाखविलें आहे. त्याच्या जीवनांतील कंळीपणा व्यक्त करणारी सुरवातच अशी केलेली आहे कीं, " सदाशिवराव चालले होतें—एकच होते सारें. पावणे अकरा वाजतां ठराविक रस्त्याच्या एका कडेनें कचेरीकडे आपल्या चाकांचीं लोटांगणें घालणें व साडेपांच वाजतां त्याच रस्त्याच्या दुसऱ्या बाजूनें उलट लोटांगणें घालणें, हें तिला (सायकलीला) देखील आतां पुरतें माहीत झालें होतें. एखादा रस्ता ओळखीचा झाला कीं, गाडीवान झोपला, पानाच्या दुकानावर थांबला किंवा पाठीमागच्या खटाऱ्यांत जाऊन गप्पा मारीत बसला, तरी बैल नाहीं का सरळ जात ? त्यांतलीच एक पायरी पुढें गेलें कीं, सायकलनें सदाशिवरावांना बिनचूक कचेरींतून घरीं आणून सोडणें संभवतें." तेंच काम, तोच रस्ता, तेंच जेवण या तोच-तो-पणाचा कंटाळा येऊन सदाशिवराव मनांत म्हणतात,

" जगांत म्हणे काव्य आहे; सौंदर्य आहे. कुणाला दिसेल तें ? माझ्यासारख्या त्याच चाकोरींतून पिळवटून निघणाऱ्या प्राण्यांना ? आम्ही साधारणांत जन्मलों;—साधारणांत वाढलों; साधारणांत उदरनिर्वाह करणार. आमच्या मृत्यूंतदेखील कुणाला हेलावून सोडणारें कांहीं नसणार ! कशाला आहे हें जिणें.. आम्ही कारकुनांचीं मुलें-कारकुनांचेच बाप होणार."

या विचाराच्या कोंडमाऱ्यानें त्यांचें आयुष्य भकास झालें, आयुष्य आळणी बनलें. " परिस्थितीच्या ठराविकपणामुळें त्यांचें मन एकसारखें आकुंचन पावत होतें. त्यांतील हवा कोंदाटून विषारी बनली होती. त्याच विषानें त्यांची जीवनरुचि मारून टाकली होती. "

निसर्गाचा प्रभाव

मानवी जीवनाचें हें यंत्र घराबाहेर पडलें तें अगदीं त्रस्त-निराश स्थितींत. पण बाहेरील विशाल व प्रसन्न निसर्गाचा त्यांच्या मनावर परिणाम झाला. वर असंख्य तारकांनीं चमचमणारें अथांग आकाश आणि मागें प्रशस्त मैदानावर पसरलेला गवताचा ' काळसर हिरवा गालिचा.' हें सर्व सृष्टीचें वैभव पहातां पहातां सदाशिवरावांच्या मनांतील संकुचितता व निश्चेतनता नाहींशी झाली. एक गवताचें पातें पाहूनहि त्यांना त्यांतील रसरशीतपणाची जाणीव झाली—आणि ते घरीं परतले ते नव्या आशेनें, ताज्या उत्साहानें आणि जीवनाचा प्रसन्न दृष्टिकोन घेऊनच. हें विचार-परिवर्तन सहा पानांच्या लघुनिबंधांत स्वाभाविकपणें व चटकदारपणें वर्णन करण्यांत लेखिकेनें मोठें चातुर्य दाखविलें आहे.

तसेंच चातुर्य 'झिमझिम्' या निबंधांतहि दृष्टीस पडते. शाळेंत शिक्षकाचें काम करणारी शांता आपल्या एकाकी जीवनाला विटली होती त्या जीवनाची कल्पना लेखिकेनें एकदोन प्रसंगांवरून सहज आणून दिली आहे. शाळेंतून घरीं आल्यावर तिचें एकेरी व ठरीव आयुष्य कसें सुरू होई हें सांगतांना लेखिका म्हणते, " पांच वाजतां ती आपल्या दोन जोड-खोल्यांच्या बिऱ्हाडासमोर उभी राहून कुलूप काढीत होती. कडी निघाली व इहलोकींच्या तिच्या सबंध संसाराचें दार उघडलें गेलें. प्रत्येक वस्तु सकाळीं दहा वाजतां जिथें होती तिथेंच स्तब्धपणें उभी होती. टेबलावरच्या पुस्तकांची खडी ताजीम, वह्यांची बैठक, तिरकस ठेवलेल्या घड्याळाचा कोन जसाचा तसा कायम होता. त्यासमोरची खुर्ची अर्धी टेबलाखाली सरकवलेली होती. कोपऱ्यांतल्या पलंगावर घातलेल्या रंगीत आच्छादनावर एकसुद्धां सुरकुती पडलेली नव्हती. भिंतीवर एकदोन चित्रें,

एकदोन तसबिरी होत्या. त्यावर बसायला दिवसभरांत एक चिमणीदेखील आली नसावी. सर्व आपापले काटकोन राखून, सरळ लटकत होत्या. त्यांत एक तिच्या भावाची होती."

मानवतेचें दर्शन

शाळेंतील त्याच त्या कामाबद्दल शांतेला पुढें गोडी वाटेना, उलट औदासीन्य वाटूं लागलें—तिटकाराहि आला. तिचें मन बंड करून उठलें. 'आजारी' म्हणून तिनें शाळेंत चिठी पाठविली व मनमोकळेपणें, स्वच्छंदानें वागावयाचें ठरविलें. शांतेच्या मनाचीं हीं सूक्ष्म स्थित्यंतरें लेखिकेनें हळुवारपणें रेखाटलीं आहेत. तिच्या शाळेंतील गैरहजेरीचा परिणाम मुलींच्या मनावर काय झाला हेंहि कौशल्यानें दाखविलें आहे. 'बाई'च्या आजारीपणाची चर्चा करतां करतां त्यांना सुख देण्याचा विचार, त्या मुलींच्या मनांत उत्पन्न होतो आणि त्या सर्वजणी एका मुलीबरोबर कांहीं फुलें पाठवितात. तीं फुलें पाहतांच शांताबाईंचें मन 'कृतज्ञतेनें भरून आलें–' तिचें औदासीन्य पार गेलें. सदाशिवरावांच्या मनाचा कोंडमारा गवताच्या पात्यानें नाहींसा झाला, पण शांतेच्या चित्तवृत्तीची कोंडी फोडण्यास मुलींच्या मनांतील माणुसकी व तिचें प्रतीक बनलेल्या फुलांतील निसर्ग या दोहींचा उपयोग झाला. शिक्षकीच्या सहाऱ्यांतील हिरवळ म्हणजे विद्यार्थ्यांची भक्ति. तिच्यावरच सत्ता–वैभवशून्य असा शिक्षक कसा जगत असतो याचें मनोहर शब्दचित्र लेखिकेनें शांतेच्या रूपानें काढलें आहे. एक प्रकारें ही समाज–परिस्थितिवरच टीका नाहीं काय ?

'नवी स्त्री'

स्त्री-जीवनाच्या करुण-उदात्त छटा 'माउली' वगैरे लघुनिबंधांतून लेखिकेनें उमटविल्या आहेत. सरस्वतीची कर्तव्य-निष्ठा सूचक पद्धतीनें त्यांनीं वर्णिली आहे. नवऱ्यानें व्यसनी बनून तिला टाकलें व जिंदगीहि फुंकून टाकण्याचें ठरविलें, तरी सरस्वती साऱ्या घराण्याचा भार उचलीत होती, कारभार चालवीत होती, फार काय गांवकऱ्यांच्या अडीअडचणीहि

दूर करीत होती. "गांवांतल्या अगदीं क्षुल्लक माणसापासून सर्वांचे ससार सावरायचा प्रयत्न मी करतें–सर्वांना नीतीचा उपदेश करतें. माझा संसार कोण सावरून देईल?' असा प्रश्न तिचें मन तिला करतें. तिची मैत्रीण लीला तिला माहेरीं नेण्यास येते. तेव्हां ती आपल्या पतीचें घर सोडून जाण्यास नाखूष असते. पण 'कशि या त्यजूं पदाला' म्हणणाऱ्या सिंधूची अशरण अवस्था तिची नाहीं. ती पतीबरोबर आपली समान भूमिका मानते. त्या समानतेची जबाबदारी उचलण्याचें धैर्यहि ती दाखविते. ती लीलेला म्हणते, "एक भागीदार व्यवहार बुडवूं लागला, तर दुसऱ्यानें पळ काढायचा का त्याला बाजूला सारून आपल्या हातीं सूत्रं घ्यायचीं?...भागुबाईची वृत्ति, लतेचं जीवन मला कधींच पसंत नव्हतं," एक बाणेदार, स्वाभिमानी व कर्तबगार 'नवी स्त्री'च लेखिकेनें सरस्वतीच्या रूपानें वाचकापुढें उभी केली आहे. "मानवी मनाचें चैतन्य व जोम राखावयाला निसर्गाच्या सौंदर्याची किंवा उदात्ततेची आवश्यकता" असतें हें कुसुमावतींनीं 'गवताचीं पानें' वगैरे लघुकथा-मध्यें मार्मिकतेनें दाखविलें आहे. तसेंच 'माउली' सारख्या कथा-मध्यें "एकाद्या साध्या व्यक्तीच्या अंतःकरणांत आपल्याला अशा चैतन्याचे व जोमाचे अखंड झरे दिसून येतात," हा मानव–समाजांतील अनुभवहि सूचित केला आहे.

भावपूर्ण कथाच!

विचाराचें प्राधान्य असल्यानें अशा लेखांना 'निबंध' म्हणतां आलें, तरी त्यांत 'कथे'चा अंश पुष्कळच आहे. पिसारा, वादळ, पिटोरी अमावस्या, इत्यादि लेख तर शुद्ध लघुकथाच आहेत. उत्तम कथामध्यें जेवढें विचारसूत्र असतें, तेवढेंच त्यामध्येंहि आहे. खरे लघुनिबंध असे कुसुमावतीबाईंनीं थोडेच लिहिले आहेत. बहुतेक कथा–मिश्रित निबंध आहेत. कथेला अवश्य तें भावनांचें भांडार आणि निबंधाला जरूर ती विचारांची तार्किकता या दोन्ही गुणांचा सांठा त्यांचे ठायीं विपुल आहे. त्याचा वापर मात्र त्या फार जपून करतात एवढेंच.

कलाकाराचें कर्तव्य

कुसुमावतीबाईंच्या लेखणींत भावनापूर्ण लघुकथा व विवेकपूर्ण निबंध–दोन्हीहि यशस्वीपणें लिहिण्याचें सामर्थ्य असल्याचा 'विसार' तेवढा त्यांच्या आजवरच्या लेखनानें दिलेला आहे. "श्रेष्ठ कलाकाराला नेहमींच कांहीं तरी सांगायचें असतें. ज्याची त्याला प्रचीति आली, जें त्याच्या जिवाला जाऊन भिडलें, जें अव्यक्तपणें पण उत्कटपणें त्याला पटलें, तें व्यक्त करण्यासाठीं त्याची धडपड असते. निवेदन, अनुभवाचें दान, हें त्याचें मुख्य कार्य असतें." असें त्यांचें विचार–सूत्र आहे. त्यास अनुसरून आपल्या 'अनुभवाचें दान' करण्याचें कामीं त्या यापुढें औदार्य दाखवितील काय !



श्री. कृ. कोल्हटकर : : : २१

जेवणांत जसें मीठ, तसा साहित्यांत विनोद. एकाद्या उपवनांत चिमणासा झरा झुळझुळतांना दिसला म्हणजे जितका आल्हाद होतो, तितका वाङ्मयांत विनोदी भाग वाचावयास मिळाला म्हणजे होतो.



संसारांत बालकाचें मनोहर हास्य कोणाला रिझवीत नाहीं ? तेंच आनंद फुलविण्याचें कार्य विनोदाचें आहे. वाचकाच्या कपाळींची आठी मोडून त्याच्या ओठावर स्मिताची लकेर पसरविणारा विनोद सर्वांनाच आकर्षित करूं शकतो. मराठी–वाङ्मयांत विनोदाची शाखा पल्लवित होण्यास इंग्रजी साहित्याचा संपर्क कारण झाला. पाश्चात्य लोक जात्याच प्रवृत्तिपर दृष्टीचे, खेळाडू वृत्तीचे व विनोदी स्वभावाचे. इंग्रजींत डिकन्स, फ्रेंचमध्यें मोलियर, अमेरिकनमध्यें मार्कट्वेन–यासारखे हास्यरसाचे सम्राट त्या त्या साहित्यांत निर्माण झाले. 'युरोपियन वाङ्मयाचा पायाच विनोदावर उभारलेला आहे' असें मि. चेस्टर्टन म्हणतात. त्या मानानें मराठींतच काय, पण संस्कृतांतहि विनोदाला स्थान कमी. शृंगार, वीर व करुण हे तीन रसच प्रमुख मानले जातात. बाकीचे हास्यादि सहा रस आनुषंगिक–पांडवामधील नकुल-सहदेवाप्रमाणें गौण. " हास्य हा स्वतंत्र रसच नव्हे " असें म्हणण्यापर्यंत भरतमुनींनीं मजल मारली आहे. तथापि मनुष्यस्वभाव जात्याच थोडाफार

विनोदी असतो. 'हंसणारा प्राणी तो मानव' अशी व्याख्या करण्याइतकें तें त्याचें वैशिष्ट्य आहे.

लोकशाहींत विनोदाला वाव

पशु-पक्षी इत्यादि मानवेतर प्राण्यांना हास्याची देणगी देवानें दिलेली नाहीं. मानवाच्या जीवनांत मात्र ती उपजत प्रवृत्ति आहे. या प्रवृत्तीचा विकास मानवाच्या बुद्धीबरोबर होत असतो. ही बुद्धि जितकी स्वतंत्र व विकसित असेल, तितका मनुष्य आपल्या जीवनांत आशा व आनंद निर्माण करूं शकतो. वस्तुमात्रांतील विरोध शोधून काढणें हें विनोदाचें उगम-स्थान. हें विरोध शोधण्याचें काम सूक्ष्म व स्वतंत्र बुद्धिच करूं शकते. प्रत्येक व्यक्तीला बुद्धि-स्वातंत्र्य लोकशाहींत मिळतें. व्यक्ति-स्वातंत्र्य व समतेची भावना या तत्त्वांवर उभारलेल्या लोकशाहींत विनोदी वृत्तीला खूप वाव मिळतो. याचे पुरावे इंग्लंड व अमेरिका या देशांत आढळतात. तेथील वाङ्मयांत हास्यरसाला प्रमुख स्थान प्राप्त झालेलें आहे. किंबहुना, विनोद हें मानवी संस्कृतीचें विशिष्ट लक्षण आहे असें तेथें मानलें जातें. सुसंस्कृत माणूस विनोदी वृत्तीचाच असतो. तो जगाकडे विशाल व खेळाडू दृष्टीनें पहातो. अर्थात् या विनोदाचा स्फोट, ज्याच्यात्याच्या अभिरुचीप्रमाणें सातमजली हास्याच्या स्फोटापासून ओठावरील सूक्ष्म स्मितापर्यंत असेल.

प्राचीन वाङ्मयांतील हास्यरस

संस्कृतांतहि हास्याच्या आविष्काराचे सहा प्रकार कल्पिले आहेत. संस्कृत वाङ्मयांत हास्यरसाला स्वतंत्र व महत्त्वाचें स्थान दिलेलें नसलें, तरी त्या रसाचे ओघ, ओहोळ व पाझर थोडथोडे सर्वकालीं आढळतातच. ऋग्वेद हा जगांतील सर्वांत प्राचीन ग्रंथ. त्यांतील मंडूकसूक्त हास्यरसानें थबथबलेलें आहे. संस्कृत नाटकांतील 'विदूषक' हा तर हास्याचा ठेकेदारच. कांहीं स्वतंत्र विनोदी खंडकाव्येंहि संस्कृतांत आहेत. पण एकंदर प्रमाण पहातां, हास्यरस हा गीर्वाण वाणीचा नावडता पुत्रच दिसतो.

संस्कृत वाङ्मयांत विनोदाचा विभाग एकशतांशहि नाहीं—आणि जो अल्पस्वल्प विनोद आहे, तो शृंगारराजाचा चोपदार म्हणूनच आहे—त्याला खुलावट आणण्यापुरताच आहे. आणि मराठींत ? " याहि वाङ्मयांत संस्कृताप्रमाणेंच हास्यविनोद शोधून शोधून, खरवडून—खरवडून काढावा लागतो " असा निष्कर्ष श्री. न. चिं. केळकर यांनीं आपल्या " हास्य-विनोद-मीमांसा " या ग्रंथांत मांडला आहे. मराठींतील आद्य गद्य ग्रंथ म्हणजे महानुभावांचें ' लीलाचरित्र '. त्यांत विनोद आहे, पण अगदीं बिंदुमात्र. प्राचीन मराठी वाङ्मय मुख्यतः संतांनीं रचलेलें. त्याचे विषय अध्यात्मपर. त्यांत बडिवार भक्तीचा वा वैराग्याचा. विनोदाचा कोठला ? तरी तुकाराम—नामदेवांच्या कांहीं कांहीं अभंगांतून विनोदाची लकेर ऐकूं येते. एकनाथांनीं तर भारूड वगैरेमध्यें हास्याचे फवारे जोरानें उडविले आहेत. पण एकंदरींत मराठी मनच मुळीं तार्किक व गंभीर. खडकाळ प्रदेश व दरिद्री परिस्थिति यामुळें हिशेबी बनलेल्या मराठी मनाच्या बंदिस्त दालनांत हास्यविनोदाच्या खेळांना वाव कोठला ?

" मराठीचे विनोदाचार्य "

इंग्रजी वाङ्मयांतील स्वतंत्र विनोदी लेखन वाचून मराठी लेखकांना आपणहि तसें लिहावें अशी स्फूर्ति झाली. त्या-स्फूर्तीचा प्रकट प्रवाह वाहविण्याचें श्रेय श्री. कृ. कोल्हटकर यांनाच आहे. त्यांनीं मुख्यतः सामाजिक सुधारणेचा प्रचार करण्यासाठीं विनोदाचें शस्त्र वापरलें आणि हिंदु समाजांतील जुन्या चालीरीतींवर तें गोड हत्यार यथेच्छ चालविलें. त्यांच्यापूर्वी मालाकार चिपळूणकर किंवा प्रिं. आगरकर हे उपहासादि साधनांनीं आपल्या निबंधांना विनोदाचा खमंगपणा आणीत असत आणि नाटकांतहि विनोदी पात्रांचा धुडगूस चालू असे. पण विनोद हाच प्रधान विषय समजून त्याचा विस्तार आपल्या लेखांतून स्वतंत्रपणें करणारे कोल्हटकर हेच " मराठीचे विनोदाचार्य " ठरतात. त्यांची शुद्ध विनोदाची परंपरा गडकरी—अत्रे—प्रभृतींनीं पुढें चालविली आहे. शब्दनिष्ठ विनोद हा तर सर्वांना सुलभच असतो. पण प्रसंगनिष्ठ, स्वभावनिष्ठ व

कल्पनानिष्ठ अशा विनोदाच्या एकापेक्षां एक चढ पायऱ्याहि हे तीन विनोद–वीर चढलेले आहेत. कोट्या, श्लेष, अतिशयोक्ति, विसंगति, उपहास इत्यादि साधनांनीं विनोद निर्माण करणारीं स्वतंत्र पुस्तकेंहि थोडीफार फुलूं लागलीं. 'संशयकल्लोळा 'पासून ' अंमलदारा 'पर्यंतच्या नाटकांतील प्रसंगच मुळीं हास्योत्पादक आहेत. ' भावबंधनां 'तील प्रेमळ व खेळकर धुंडिराजाचा स्वभाव हा विनोदाचा सर्वश्रेष्ठ नमुना. त्याला कारुण्याची व उदात्तपणाची धार दिल्यानें तर तो विनोद रसिकांचें चित्त प्रसन्न व उन्नतहि करतो. विनोद–विषयाबद्दल तिटकारा उत्पन्न न करतां अनुकंपा निर्माण करणारें हास्य हेंच सुसंस्कृत होय. ' डोळ्यांत असूं व ओंठांत हसूं ' असा त्याचा दुहेरी परिणाम होतो.

विनोदाची उच्चनीचता

शृंगार व अश्लीलता यांच्या सरहद्दी जशा एकमेकींना लागून आहेत, तशाच विनोद व निंदा यांच्या सीमाहि संलग्न आहेत. हिमालयांतून वाट चालतांना एक पाऊल घसरलें कीं, खोल दरींत आदळून कपाळमोक्ष होण्याचेंच भय असतें; तसेंच सभ्यतेची रेषा ओलांडली कीं शृंगाराला अश्लीलतेची कळा येते व विनोद हा टवाळकींत जमा होतो. तसें होऊं न देण्याचें पथ्य मराठींतील फारच थोड्या विनोदकारांनीं पाळलें आहे. टोल्याला टोला आणि शिवीला शिवी देणारा लेखकच विनोदी म्हणून कैकवेळां मानला जातो किंवा दुसऱ्याची टवाळी व कुचेष्टा करणाराहि विनोदाचीं पिसें लावून मोराप्रमाणें हिंडतो. पण शुद्ध हास्य-रस याहून फार वेगळा आहे. जीवनांतील विरोध व विसंगति पाहून रागावण्याऐवजीं हसणें, अपयश आलें असतां निराश न होतां खेळकरपणानें त्याचा स्वीकार करणें आणि मनाचा तोल कायम राखून जीवनाचा रथ शांतपणें व आनंदीपणें हाकणें हें विनोदकारांचें कर्तव्य आहे. बुद्धीच्या चमत्कृतीपेक्षां व शब्दांच्या कसरतीपेक्षां भावनेच्या मोकळेपणावर व उल्हसितपणावरच खरा विनोद अवलंबून असतो.

विनोदाची फलश्रुति

विनोद ही एक जीवनाकडे पहाण्याची वृत्तिच आहे. केवळ बुद्धीच्या चापल्यानें, एका शब्दाचे अनेक अर्थ करून, हशा पिकविणें हें काम 'कोटी' (Wit) करते. पण विनोदाचें कार्य यापेक्षां व्यापक आहे. जगांतील घडामोडीमधील विसंगति बारीक नजरेनें हुडकून काढून ती लोकांपुढें मार्मिकपणें मांडण्याची कामगिरी विनोद करतो. आयुष्यांतील साऱ्या व्यवहाराकडे हसऱ्या, खेळकर वृत्तीनें पहाणें व त्या सर्वांतून आनंद वेचणें हें विनोदाचें कार्य आहे. समाजाच्या नानाविध कृतींतील लपून बसलेले दोष आपल्या बुद्धीच्या प्रकाशांत विनोदाच्या चिमट्यानें पकडून ते लोकासमोर हसतखेळत मांडणें व ते दोष दूर करण्यास त्यास प्रवृत्त करणें ही विनोदाची फलश्रुति मानली जाते. दांभिकपणा, जीर्ण रूढि वगैरे सामाजिक व्यंगावर शस्त्रक्रिया करण्यापूर्वी विनोदाचा क्लोरोफर्म देणें सुखाचें असतें. पण अगदीं अलीकडे, असा कांहींहि हेतु मनांत न धरतां विनोद करण्याचा संप्रदाय पाश्चात्य राष्ट्रांत उत्पन्न होत आहे. 'विनोदासाठीं विनोद' निर्माण करणाऱ्या या संप्रदायाला 'Nonsense' असेंच नांव दिलें जातें. चार घटका खो खो करून तुम्ही हसला कीं, त्या विनोदाचें काम झालें. त्यामुळें तुमच्या मनावरील कारुण्याचा ताण कमी झाला किंवा गांभीर्याच्या गांठी उलगडल्या कीं खलास ! टेकडीवरून किंवा समुद्रकिनाऱ्यावरून मोकळी हवा खाऊन येणें आणि अशा विनोदानें पोट धरधरून हसणें या दोहोंचा उपयोग सारखाच. सुट्टीच्या, सणाच्या वृत्तींत तेव्हां आपण प्रवेश करतो. त्यामुळें आपल्या आयुष्याला नवी गोडी, नवी उमेद, नवा मोकळेपणा, नवा उत्साह येतो.

समाज-सुधारणेचें साधन

आगरकरांनीं निबंधांतून, आपट्यांनीं कादंबऱ्यांतून आणि केशवसुतांनीं काव्यांतून सामाजिक सुधारणेचा जसा प्रचार केला, तसा विनोदाचार्य श्री. तात्यासाहेब कोल्हटकर यांनीं आपल्या नाटकांतून केला. विनोद

आणि नाट्य—हीं केवळ रंजनाचीं कोमल साधनें. पण कोल्हटकरांजवळ त्या जणुं दोन तोफा होत्या—त्यांतून निघणारे गोळे जीर्ण मताचे व दुष्ट रूढींचे किल्ले जमीनदोस्त करीत. अस्वल गुदगुल्या करून आपणाला ठार मारतें म्हणतात, तसें कोल्हटकरांचें, टीकागर्भ विनोदी लेखन विरोधकांना हसतां हसतां नामोहरम करीत असे. त्यांच्या लेखनाचें बाह्यांग जितकें हास्यकारक, तितकेंच त्यांचें अंतरंग क्षोभकारक. त्यांच्या विनोदी लेखाच्या पोटींहि सामाजिक सुधारणेची तळमळ असे. विनोदी लेखाचा स्वतंत्र संप्रदायच त्यांनीं मराठींत निर्माण केला. हास्यरसाचे ते बादशहा होते आणि गडकरी व अत्रे हे त्यांचे मांडलीक होत.

नाट्य व विनोद या दोन्ही क्षेत्रांत आपलें स्वतंत्र पीठ निर्माण करणारे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर नागपूर येथें ता. २९ जून १८७१ रोजीं जन्मले. त्यांचें बालपण बुलढाणा व अकोला येथें गेलें. सहावें वर्षीं त्यांची आई वारली. तथापि त्यांच्या सापत्न आईनें त्यांचें संगोपन मोठ्या वात्सल्यानें केलें. त्याचें स्मरण ठेवून श्रीपाद कृष्णांनीं आपलें पहिलें नाटक 'वीर-तनय' आपल्या सापत्न मातेस अर्पण केलें. त्यांचे वडील उमरावतीस प्रथम हायस्कूलमध्यें शिक्षक होते. पण पुढें सरकारी नोकरींत शिरले व कारकुनापासून असिस्टंट कमिशनरच्या जागेपर्यंत चढले. नाटकाचा नाद लहानपणापासूनच श्रीपादाला होता. मराठी पांचवींत असतांनाच त्यांनीं एक एक संगीत नाटक लिहिलें आणि इंग्रजी पांचवींत असतांना 'सुख-मालिका' नांवाचें नाटक लिहिलें. शास्त्रीबुवांच्या 'निबंधमाले'चीं त्यांनीं पारायणावर पारायणें केलीं. त्यामुळें त्यांना मातृभाषेची सेवा करण्याची स्फूर्ति मिळाली. शास्त्रीबुवांचे बंधु लक्ष्मणराव हे त्यांना शिक्षक होते. इंग्रजी नाटकें व कादंबऱ्या यांचा फडशा हायस्कूलमध्यें असतांनाच त्यांनीं पाडला. १८८५ सालीं ते विवाहबद्ध झाले व १८८८ मध्यें ते मॅट्रिकमधून मुक्त झाले. नंतर ते पुण्यास आले व डेक्कन कॉलेजांत दाखल झाले.

नाट्य व विनोद

तात्यासाहेब केळकरहि त्यावेळीं त्या कॉलेजांत होते. दोघांचीहि आवड

एकच असल्यामुळें त्यांची मैत्री जमली व ती पुढें पुढें वाढतच गेली. दोघांनींहि कॉलेजच्या संमेलनांतील नाटकांत कामें केलीं. 'मृच्छकटिकां-तील विटाचें काम कोल्हटकरांनीं केलें. दोघेहि खंदे टीकाकार, मार्मिक विनोदकार आणि सामाजिक विषयांत सारखेच पुरोगामी. केळकरांना लोकमान्यांचा सहवास लाभला आणि त्यामुळें राजकारणांत प्रतिष्ठाहि मिळाली. उलट कोल्हटकर १८९१ मध्यें बी. ए. झाल्यावर १८९७ सालीं एल्एल्. बी. होऊन, अकोला-खामगांव-जळगांव अशा आड-गांवीं वकिलीकरितां राहिले. पण त्या कोषन्यांत राहूनहि त्यांनीं जी नाट्याची व विनोदाची निर्मिति केली, ती स्वतंत्र संप्रदाय स्थापण्याइतकी महत्त्वाची ठरली.

नाटकाशिवाय कविता, लघुकथा व कादंबऱ्या याहि कोल्हटकरांनीं रचल्या आहेत. 'बहु असोत सुंदर' हें सर्वतोमुखीं झालेलें महाराष्ट्र-गीत कोल्हटकरांचेंच. 'सुदाम्याचे पोहे' हा बत्तीस विनोदी लेखांचा त्यांचा संग्रह लोकप्रिय झालेला आहे. ज्योतिषावरहि यांनीं एक ग्रंथ लिहिला आहे. सांगली येथें १९१८ सालीं भरलेल्या ज्योतिष-संमेलनाचे ते अध्यक्ष होते. पुणें येथें १९२२ सालीं भरलेल्या कवि-संमेलनाचे ते अध्यक्ष होते. नाट्य-संमेलनाचेंहि अध्यक्षपद त्यांना देण्यांत आलें होतें. १९२७ सालीं पुणें येथें भरलेल्या 'महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे' अध्यक्षस्थान त्यांनीं भूषविलें. मंदमंद होत चाललेली व अर्धांगवायूची काजळी धरलेली, त्यांची जीवनज्योत १९३४ सालीं विराम पावली.

आनंद-निर्मिति व समाज-सुधारणा

कोल्हटकरांनीं १९०२ पासून १९२२ सालापर्यंत वीस वर्षांत बत्तीस विनोदी लेख लिहिले. या लेख-संख्येवरून व एक श्लेष साधून या विनोदी लेखांच्या संग्रहाला "साहित्य-बत्तिशी" असें नांव देण्यांत आलें. त्याचप्रमाणें त्यांनीं सर्व लेखांत सुदामा नांवाची सनातनी व्यक्ति आपले अनुभव सांगत आहे, अशी भूमिका घेतली असल्यामुळें या लेख-संग्रहाला "सुदाम्याचे पोहे" असेंहि नांव दिलेलें आहे. पांडुतात्या व बंडूनाना

हे सुदाम्याचे दोन मित्र कल्पिलेले असून या त्रिकूटांच्या साध्याभोळ्या, बावळट, क्वचित् आचरटहि लीलांमधून कोल्हटकरांनीं हास्य-रस पिकविलेला आहे.

केवळ हास्य-रस पिकविणारे कुलूप, आमचे बैठे खेळ, चोरांचें संमेलन, साहित्य परिषदेची तयारी, म्हातारपणचे कायदे, मुंबईचा दीपोत्सव, मुंबईचें प्रदर्शन, साक्षीदार, गवई, इत्यादि लेख आहेत. 'लेखनकलेची स्थित्यंतरें,' यासारखे कांहीं लेख गंभीरच आहेत. ते लिहितांना लेखकानें आपला विनोदाचा मुखवटा काढून बाजूस ठेवलेला दिसतो.

या दोन वर्गांशिवाय कोल्हटकरांनीं आपल्या विनोदाचा जो तिसरा वर्ग पाडलेला आहे, तो दुहेरी स्वरूपाचा आहे. सामाजिक सुधारणाविषयक आपल्या विचारांचें वाहन म्हणूनच त्यांनीं विनोदाचा तेथें उपयोग केला आहे. हे प्रचारी लेख जितके विनोदी तितकेच जहरी आहेत. हे लेख म्हणजे दुधारी तरवार आहे. ती एकीकडे वाचकांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु काढते, पण त्याचवेळीं त्याच्या मर्मस्थानांतून रक्तबिंदुहि काढते. प्रिं. आगरकरांनीं 'हे भीषण, बीभत्स, अमंगल हिंदुधर्मा!' असे रोखठोक आव्हान सडेतोड भाषेंत देऊन त्या धर्मांतील खुळ्यावेड्या चालीरीतींवर सरळ व निकराचा हल्ला चढविला; तर कोल्हटकरांनीं तेच जळजळीत विचार हास्यानें खदखदणाऱ्या भाषेनें मांडले.

शिमगा, प्रेतयात्रा, परलोक, विधवांचें केशवपन इत्यादि किती तरी विषय दोघांचे समान आहेत आणि त्यांवरील दोघांचे विचारहि समानच आहेत. पण एकाच्या लेखणींतून त्वेषाच्या व आवेशाच्या ठिणग्या उडत आहेत; तर दुसऱ्याच्या कलमांतून वक्रोक्ति, उपहास वगैरेंची रंगीबेरंगी फुलें निघत आहेत. आगरकरांची छातीठोक टीका ऐकून सनातनी वाचक क्षुब्ध होईल व क्षोभ ओसरल्यावर विचारास प्रवृत्त होईल. कोल्हटकरांच्या टीकेचीं वाघनखें विनोदाच्या मखमली हातमोजाखालीं झांकलेलीं असल्यानें त्यांच्या ओचकाऱ्यांची जाणीव होत असतांहि वाचकाच्या हसून हसून मुरकुंड्या वळतील, पण हास्याचा पूर ओसरल्यावर त्याच्या डोक्यांत विचारांचीं चक्रें फिरूं लागतील. एकाचें धर्मयुद्ध

आहे, तर दुसऱ्याचा गनिमी कावा आहे. एकाला लोकक्षोभ सोसावा लागला, समाजाची अप्रियता पदरीं घ्यावी लागली पण नवविचारांचे प्रवर्तक म्हणून मह न कार्य करतां आलें; तर दुसऱ्याला लोकप्रियता लाभली, साहित्यांत प्रतिष्ठा मिळाली आणि ' विनोदाचार्य ' ही पदवी प्राप्त झाली. एकानें पुराणमताभिमानी समाजाची बुद्धि जागी केली, तर दुसऱ्यानें त्याच्या हृदयांत कालवाकालव निर्माण केली.

कोल्हटकरांची भूमिका

" मी आजपर्यंत आपल्या धर्मांतील व आचारांतील असमर्थनीय प्रकारसुद्धां नवीन व बिनतोड प्रमाणांनीं नटवून व अनेक वेळीं वडाची साल पिंपळास लावून सुधारकांपुढें मांडीत आलों आहें " अशी आपली भूमिका ' माझे टीकाकार ' या लेखांत सुदामा मांडीत आहे. सुदामा हा ' प्रच्छन्न सुधारक ' आहे हें बिंग लोकांनीं ओळखले. तेव्हां सुदाम्यानेंहि आपलें पांघरूण फेकून आपलें खरें मत स्वच्छ शब्दांनीं पुढीलप्रमाणें मांडलें आहे. " रूढि हीच आमच्या आचारांची नियामक होऊन बसली आहे ...प्रत्येक समाजाच्या चालीरीती त्याच्या तत्कालीन परिस्थितीस अनुरूप असाव्या लागतात....रूढीच्या सबबीवर तरुण जर रांगूं लागला...तर तें शोभेल कां ? " हा प्रमुख विचार मांडण्यासाठीं, कोल्हटकर म्हणतात, " माझ्या पुराणमताभिमानी वाचकांच्या शिव्याशापांचा उपसर्ग मला स्वतःस लागूं नये म्हणून ' सुदामा ' या नांवाचा मानसपुत्र उत्पन्न केला.' सुदाम्याच्या नकली मूर्खपणाचेंआड्न हिंदूच्या सनातनी रूढीवर आपण शर-संधान कां केलें याचें कारण त्यांनीं जें दिलें आहे, तें कोणासहि पटण्यासारखें आहे. पाश्चात्य वेडगळ चालीवर टीका कां करीत नाहीं ? या आक्षेपास उत्तर देतांना ते लिहितात, " आपलीं व्यंगें पाहून जसें अंतःकरण तुटतें, तसें इतरांच्या व्यंगांनीं तुटणें केवळ अशक्य आहे. " कोल्हटकरांचें अंतःकरण आपल्या समाजासाठीं तुटत होतें हें खरें, पण त्यांच्या विनोदाच्या शस्त्रानें कधींकधीं समाजाचें अंतःकरण तुटलें गेलें हें विसरतां कामा नये. आपल्या देवधर्मांतील न्याय्य, बुद्धिग्राह्य व हितकारी

भाग कोणता व वेडगळ चालीं कोणत्या याचा सहानुभूतिपूर्वक विचार त्यांनीं केला नाहीं. त्यामुळें कांहीं कांहीं लेखांना निष्कारण कटुता व तीक्ष्णता आली.

शाब्दिक कसरती

श्लेष, कोटया वगैरे शब्द-लीला करून खसखस पिकविणें हा कोल्हटकरांच्या हातचा मळ असे. "द्रौपदी ज्याप्रमाणें कर्णाला भाळली त्याप्रमाणें आम्हीहि लंबकर्णाला भाळणारच." 'मी आपल्या अंकगणितांत पित्याचा अंक शोधूं लागलों,' 'सुधारकांच्या दांत विचकण्याबद्दल आमचा एकदंत देव त्यांची बत्तिशी एक दिवस पाडील,' इत्यादि वाक्यांत कर्ण, अंक, दांत या शब्दांवर श्लेष साधून हास्य निर्माण केलें आहे. तसेंच एकट्या दांताचे निरनिराळे प्रयोग करून किती भिन्नभिन्न अर्थ साधतां येतात हें कोल्हटकरांनीं 'म्हातारपणचे फायदे' यांत दाखविलें आहे. ते लिहितात, "ठेंच लागून पडल्यास दांत पडण्याची म्हाताऱ्यास मुळींच भीति नसते. शिवाय म्हाताऱ्यावर 'दांत कोरून पोट भरण्याचा' कोणी आरोप ठेवीत नाहीं, किंवा 'यांच्यापाशीं दांतावर मारण्यास एक पैसाही नाहीं.' असा दारिद्र्याचाही आळ त्याजवर येत नाहीं. दुसऱ्यावर 'दांत ठेवण्याचा' किंवा 'दांतीं तृण धरून शरण जाण्याचा' संशयही त्याच्याबद्दल कोणी घेत नाहीं. त्यानें कोणाची कितीही आगळीक केली, तरी त्याला त्याजकडून 'बत्तिशी रंगविण्याची' धमकी मिळत नाहीं. त्यानें कोणाचा कितीही उपहास केला, तरी त्याला 'दांत कां विचकतोस?' असें म्हणण्याची छाती होत नाहीं. तसेंच त्यानें सांगितलेली गप्प केवळ 'दंतकथा' आहे असें त्याच्या तोंडावर कोणासही सांगतां येत नाहीं; व त्याचीं गालफडें बसलेलीं असल्यामुळें ती 'कपोलकल्पित' आहे असेंही म्हणवत नाहीं."

'वस्तादजींचें न येणें हेंच माझ्या रोगावर वस्ताद औषध' असे श्लेषहि मनमुराद आहेत. याशिवाय जोडा (पादत्राण, दांपत्य), महिषी

(राणी, म्हैस), समाचार (सांत्वन, पारिपत्य), व्हिक्टोरिया (राणी, वाहन) इत्यादि श्लेषांची खैरात सर्वत्र आहे.

अशा शब्दांच्या गंमती वाचतांना प्रथम एकदां वाचकांच्या बुद्धीला गुदगुल्या होतात. पण अशी बुद्धिनिष्ठ कोटी ही पुनः पुनः आनंद देऊं शकत नाहीं. शब्दाच्या अनेक अर्थांचा उपयोग कोल्हटकरांनीं विनोदासाठीं विविध प्रकारांनीं केला आहे. ' भाषा व इतिहास ' या लेखांत भ्रांतिष्ट व्युत्पत्ति शोधणाऱ्यांची त्यांनीं चेष्टा केली आहे. ' मचव्यांतून आले म्हणून मत्स्य' अशा मूर्खपणाच्या व्युत्पत्त्या, केवळ ध्वनिसाम्यावरून, जे बसवितात, त्यांची रेवडी उडविण्यासाठीं कोल्हटकरांनीं या लेखांत कांहीं शब्दांचीं कुळें अशीं सांगितलीं आहेत. हृदय (हृ = हरण करणें, दया = करुणा) = निर्दय, मस्तक (मस्त) = मादक पदार्थांनीं मस्त असणारा अवयव; श्वश्रू (श्व = उद्यां, श्रू = ऐकणें) = सुनेनें केलेली विनंति जिला उद्यां ऐकूं येते ती. छात्र (छत्र = छत्री) = गुरूवर छत्री धरणारा.

अपेक्षा-भंगांतून हास्य

अपेक्षा-भंग आणि अतिशयोक्ति या दोन पायांवरच विनोद बहुधा सर्वत्र चालत असतो. लहान मुलानें डोक्यावर आजोबाचें पागोटें घालून व हातांत काठी घेऊन, वाकत वाकत व खोकत खोकत चालण्यास प्रारंभ केला कीं, आजूबाजूची मंडळी खो खो हंसूं लागतात. 'शारदा' नाटकांतील वल्लरी म्हाताऱ्या नवऱ्याचें सोंग करते, तेव्हां प्रेक्षकांची हसून हसून मुरकुंडी वळते, याचें कारणहि हा अपेक्षा-भंगच. उलट एकादा म्हातारा लहान मुलाचें टोपडें घालून रांगूं लागला, ' घोडा, घोडा ' करूं लागला, तरीहि हशा पिकतोच. कारण लहानानें जें करावें अशी आपली अपेक्षा, ती पहिल्या प्रकारच्या दृश्यांत जशी फसते तशीच वृद्धाकडून आपण करीत असलेली अपेक्षाहि दुसऱ्या प्रकारांत भंग पावते-आणि म्हणून त्यांतून हास्य निर्माण होतें. असे अपेक्षा-भंगाचे सुखद धक्के कोल्हटकर जातां येतां देतात. मृच्छकटिकांतील शकाराप्रमाणें, जुन्या घडामोडींची उलथापालथ 'भाषा व

इतिहास' यांत त्यांनीं पुढीलप्रमाणें केली आहे. "शहाजीस मी एकदा अकबरशहाचा बाप बनविलें व त्याजकडून खर्ड्याची लढाई लढवून त्याच्या विजयी समशेरीच्या साहाय्यानें त्या लढाईत शिकंदर बादशहाचा फडशा उडविला!"

अमर्याद अतिशयोक्ति

विनोदासाठीं अतिशयोक्ति अलंकाराचा तर कोल्हटकर वर्षावच करतात. अंतर्गोल व बहिर्गोल आरशांत माणूस जसा खूप लठ्ठ किंवा खूप उंच दिसतो; तसा चमत्कार विनोदाच्या सृष्टींत होतो. स्वप्न-सृष्टि व विनोद-सृष्टि–या दोहोंतहि स्वाभाविकता व संभवनीयता पहावयाचीच नाहींत. हीं नेहमींचीं बंधनें तोडून, कल्पनेच्या पंखावर बसून लेखक किती उंच उंच जातो व काय काय गंमती दाखवितो हें पाहतांना हसूं येतें. अशी अतिशयोक्ति करण्यांत कोल्हटकर दुसऱ्या कोणास फारसे हार जाणार नाहींत. 'याचक' या लेखांत कोल्हटकर लिहितात, "एके समयीं नानांकडे चार भिक्षुक, तीन पुराणिक, दोन शास्त्री, दोन गवई, दोन कथेकरी, एक ज्योतिषी, एक अष्टावधानी व एक बहुरुपी इतके पाहुणे गोळा झाले होते; आणि त्यांनीं आपल्या अनियमितपणानें, भांडखोरपणानें, लोचट-पणानें व खादाडपणानें साऱ्या घरांत गोंधळ माजवून दिला होता."

'साक्षीदार' या पहिल्या लेखांत साक्षीदाराच्या अचाट स्मरण–शक्तीचीं उदाहरणें अतिशयोक्तीनें दिलीं आहेत. कोल्हटकर लिहितात, "दुसऱ्या एकानें लहानपणीं पाळण्यांत ऐकलेल्या वांटणीसंबंधाच्या गोष्टी चाळीस वर्षानंतर अचानक न्यायसभेपुढें आणिल्या! यापलीकडचें उदाहरण कृष्णाच्या भाषणास हुंकार देणाऱ्या गर्भस्थ अभिमन्यूशिवाय एकही आढळणार नाहीं अशी माझी खात्री आहे."

सुदामा टेनिस खेळूं लागला तेव्हां त्याचे प्रताप काय झाले, यांचें वर्णन 'आमचे बैठे खेळ'मध्यें कोल्हटकरांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे. "कोणाची बत्तिशी तर कोणाची चाळिशी, कोणाची पगडी तर कोणाची बरगडी; स्थानभ्रष्ट करण्याचा आमच्या चेंडूंनीं सपाटा लाविला. आमच्या

टेनिसच्या आखाड्यापासून अर्ध्या मैलाच्या टांपूत बॅट घेतल्याशिवाय कोणीही फिरकेनासा झाला. तेव्हांपासून मूल खोड्या करीत असल्यास आई आमच्या चेंडूचा धाक दाखवूं लागली, व घोडा पाणी पीत नसल्यास घोडेस्वार त्यास 'तुला पाण्यांत टेनिसचा चेंडू दिसतों कीं काय ? असा प्रश्न विचारूं लागला."

टेनिसनंतर बुद्धिबळ खेळण्याचा नाद या त्रिकूटाला लागला. तो नाद किती बेसुमार होता, याचें वर्णन कोल्हटकर पुढील अतिशयोक्त भाषेनें करतात, "एकदां मी खेळता खेळतां कुटलेली सुपारी तपकीर म्हणून ओढल्याचें व तपकीर सुपारी म्हणून तोंडांत टाकिल्याचें आठवतें; दुसऱ्यांदां तर मी विडी म्हणून उंटच तोंडांत धरून पेटवूं लागलों होतों. पांडूतात्यांनीं एकदां सबंध हत्ती सुपारी म्हणून तोंडांत टाकिला, आणि तो दांतांनीं फुटेना म्हणून दुसरा हत्ती अडाकत्त्यानें कातरून गट्ट केला."

विविध कलांचें ज्ञान

खेळाप्रमाणेंच चित्रकलेचाहि नाद या त्रिमूर्तीला लागला. एका गांवठी नाटकमंडळीच्या पडद्यावर हे तिघे मित्र खूष होते. त्या पडद्यावरील चित्रकला कशी होती ? तर–"उन्हाळ्यांत शाकुंतलांतील उपवनाचे पडदे दोन बाजूंना सोडून त्यांमध्यें बसल्यास आम्हांला उन्हाची मुळींच बाधा होत नसे, व हिंवाळ्यांत हरिश्चंद्र नाटकांतील वणव्याच्या पडद्यासमोर आम्ही प्रहारन्प्रहर हात शेकीत बसत होतों."

'चित्रकार' या लेखांत पांडुतात्यांच्या चित्रकलेची महती गमतीनें गाइली आहे त्यांच्या चित्रांचा परिणाम प्रेक्षकांवर किती जबरदस्त होई हें सांगतांना कोल्हटकर म्हणतात, "त्यांचीं देवादिकांचीं चित्रें पाहून लोक नास्तिक होण्याच्या बेताला आले. त्यांचीं सुंदर स्त्रियांचीं चित्रें पाहून भावी कवींच्या प्रतिभा बाल्यावस्थेंत करपून खाक होऊं लागल्या ! त्यांचें रतीचें चित्र पाहतांच प्रेक्षकांची बोबडी वळून 'रति' ऐवजीं 'हिडंबा' हा शब्द त्यांच्या तोंडांतून चुकीनें निघूं लागला."

सुदाम्यानें संगीताची साधना कशी केली याचा इतिहास ' गवई ' या लेखांत मौजेनें सांगितला आहे. टर्रेहुसेनखां सुदाम्याला संगीताचे धडे कसे देत, तें ऐका–" गाण्यांतील मूर्छना म्हणून जो प्रकार आहे तो मला चांगला साधावा म्हणून ते मला खरोखरीची मूर्छना येईपर्यंत यथेच्छ मार देऊन रडवीत असत, खटका यावा म्हणून माझी शेंडी धरून जोरानें हिसका देत व तान चांगली यावी म्हणून हिंवाळ्यांत सकाळीं पाठीवर थंड पाण्याच्या घागरी ओतीत असत. "

त्याच लेखांत गवयांना कांहीं सूचना केल्या आहेत. त्यांत शब्द-निष्ठ विनोदहि साधलेला आहे. तो भाग असा–" गाण्यापूर्वी दोन तास विण्याच्या किंवा सतारीच्या तारा जुळविण्यांत किंवा तबला लावण्यांत दवडावे. कारण तारा चढवितांना आपण श्रोत्यांची उत्कंठाही त्याच मानानें चढवित असतो हें पक्कें समजावें. कधीं कधीं ती अगदीं तुटण्याच्या बेतास येते. गवई तंबुऱ्याच्या खुंट्या पिळीत असतां किंवा तबल्यावर थाप देत असतां कितीकदां तरी त्याचे कान पिरगळण्याची किंवा गालावर थप्पड देण्याची इच्छा श्रोत्यांच्या मनांत झालेली दिसून येते ! "

अतिशयोक्तीचा कळस

' झोप ' या निबंधांत पांडूतात्यांच्या झोंपेचे विनोदी प्रकार अतिशयोक्तीनें वर्णिले आहेत. त्यांचें नुसतें घोरणें कसें असे हें कोल्हटकर पुढील शब्दांनीं सांगतात, " त्यांच्या घोरण्यामुळें त्यांच्या जवळपासच्या इसमांचा जरी डोळ्यास डोळा लागत नाहीं तरी त्यानें त्यांची स्वतःची कधींच झोंपमोड झाली नाहीं. त्यांच्या घोरण्याच्या आवाजांत चिलटांचें गुणगुणणें लोपून जातें, त्याचप्रमाणें घड्याळाचा गजरहि लोपून जातो... त्या स्वरांत कुत्र्यांचें भुंकणें व गस्तवाल्याचा साद दोन्हीहि गडप होतात."

नानांच्या घरांचें कुलूप फोडलें, त्यामुळें नानांच्या मनावर काय परिणाम झाला याचें अतिशयोक्तीचें वर्णन पहा—"आम्हीं स्वतः लोहारास बरोबर घेऊन नानांच्या घरीं गेलों व तें कुलूप एकदांचें फोडिलें. पण त्यामुळें नानांचा आमच्यावर इतका धुस्सा झाला कीं, ते पुढें पंधरा दिवस-

पर्यंत आमच्याशीं नीटपणें बोलेनातच ! तीन दिवस तर त्यांनीं त्या मोडक्या कुलपाकरितां अशौच्य धरिलें होतें ! ''

अतिशयोक्तीची कमाल मर्यादा कोल्हटकरांनीं '' वर्तमानपत्रकर्ता '' या लेखांत गांठली आहे. थापेबाज जाहिरातीवर सरळ टीका करण्याऐवजीं ते लिहितात, '' माझ्या छापखान्यांतील एका इसमास संधिवात झाला होता, तो त्यावरील औषधाच्या जाहिरातीवरून रूळ फिरविल्यानेंच बरा झाला. तसेंच माझ्या नोकरांपैकीं एक कुणब्याचा मुलगा तोतरे बोलत असे, त्याला त्यावरील औषध देऊन पाहिलें तेव्हां त्याचा तोतरेपणा समूळ गेला, इतकेंच नाहीं, तर तो मराठी भाषा शुद्ध बोलूं लागला. कोडावरील मलमाची जाहिरात माझ्या पत्रांत ज्या जागीं नेहमीं असते, ती जागा दर आठवड्यास कमी कमी पांढरी होत चालली आहे; आणि रक्तपितीवरील औषध एका महारोग्यास देऊन पाहिलें, तेव्हांपासून त्याचा रोग समूळ नाहींसा झाला आहे; कारण तें रामबाण औषध पोटांत जाण्याला व त्याचा प्राण बाहेर येण्याला एकच गांठ पडली. ''

वकिलींतील अनुभव

कोर्टांतील बहुतेक साक्षीदार थापेबाज असतात, पढविलेले असतात. त्यांची लबाडी वर्णन करून सांगतांना कोल्हटकर म्हणतात, '' कधीं कधीं चोरानें घरांत शिरून कडी लाविली असतांही साक्षीदाराची चाहूल ऐकतांच त्यानें कडी उघडून व त्याला आंत घेऊन नंतर त्याला साक्षी ठेवून चोरी केल्याचें आमच्या ऐकिवांत आहे ! ''

पोटांत खोटेपणा डाचत असल्यानें साक्षीदार वर पाहून जबाब देत असतो. त्याच्या या क्षुद्र कृतीला लेखकानें किती उच्च कारण जोडलें आहे, पहा—'' साक्षीदार जबानी देतांना बहुतकरून वर आब्याकडे पहात असतो; जणूं काय आपला खरेपणा जाहीर करण्याकरितां तो त्रिकालज्ञानी ईश्वरास आव्हानच करीत आहे. ''

भिन्नभिन्न साक्षीदारांच्या असत्यांतून किती गंमतीची विसंगति निर्माण होते, हें कोल्हटकर पुढील शब्दांनीं निवेदितात, '' विवक्षित प्रसंगीं

कोणती वेळ होती असें त्यांना विचारल्यास एकाचें प्रातःकाळ तर दुसऱ्याचें संध्याकाळ असें मत पडेल, व तिसऱ्याचें मत त्या वेळीं रात्र झाली असून प्रकृत साक्षीदाराशिवाय सर्व गाढ झोंपेंत होते असें पडेल ! तीन साक्षीदारांत अशी त्रेधा होण्यासारखें मतवैचित्र्य !.....आम्हीं चौघां साक्षीदारांस एका घडलेल्या प्रसंगाच्या काळाविषयीं विचारलें असतां एकानें शपथेवर (साक्षीदार शपथेशिवाय तोंडांतून ब्रही काढीत नाहींत.) असें सांगितलें कीं, त्या प्रसंगीं पावसाची मुसळधार सुरू होती; दुसऱ्यानें सांगितलें, थंडी पडल्यामुळें चोहींकडे आगट्या पेटल्या होत्या, तिसऱ्यानें वसंतपूजा चालली असून चांदण्यांत अगास उड्या लावीत असल्याचें निक्षून सांगितलें ! ”

स्वतः कोल्हटकर वकील असल्यानें कोर्टांतील लफडीं व कुलंगडीं त्यांना चांगलीं ठाऊक होतीं. तीं आपल्या सूक्ष्म बुद्धीनें वेचून व स्मृतीवर कोरून त्यांनीं अशा विनोदी शैलीनें वाचकापुढें ठेवलीं आहेत कीं, कोणालाहि त्या लबाड साक्षीदाराचा राग येण्याऐवजीं हसूच लोटावें.

काव्य-कल्पनेची रम्यता

केवळ एकाचे दहा व दहाचे शंभर-अशी अतिशयोक्ति करण्यास मोठेसें कौशल्य लागत नाहीं. ‘ एक हात लाकूड, दोन हात ढलपी ’ असें सोपळें बोलणें साधेभोळे खेडवळहि बोलतात, ‘ मिया मूठभर, दाढी हातभर ’ अशा अतिशयोक्तीनेंहि विनोद निर्माण होतो, पण तो उथळच म्हटला पाहिजे. त्याच्या पोटांत रमणीय काव्य-कल्पना, उदात्त विचार किंवा सहानुभूतीची भावना भरलेली असेल; तरच तो विनोद उच्च प्रतीचा समजला जातो. कोल्हटकर हे प्रतिभाशाली नाटककार असल्यानें त्यांच्या विनोदाचा प्रांतहि काव्य-कल्पनेनें झळाळलेला आहे. समाजसुधारणेचा प्रागतिक व बुद्धिवादी विचार तर बहुतेक सर्वच लेखांतून स्फुरण पावत आहे. सहानुभूतीनें थबथबलेले भाग मात्र कोल्हटकरी विनोदांत फारच थोडे आढळतात. आपल्या विरोधीपक्षीयांची खूप फटकाजिती करून त्यांचा पाणउतारा करण्याचीच त्यांची वृत्ति आहे.

प्रतिपक्ष्यासुद्धां सर्व जगाकडे प्रेमळ दृष्टीनें व आनंदी मुद्रेनें पहाण्याची संवय त्यांना फारशी नाहीं.

कल्पना-विलासाच्या दृष्टीनें 'आमचे बैठे खेळ' मधील राणींचें वर्णन पहा—"पत्त्यांच्या डावांतील एकटी राणी जरी घेतली तरी तिच्या डोळ्यांत मत्स्य, गतींत कूर्म, कटींत नारसिंह, बांध्यांत वामन, हृदयांत परशुरामाचा परशु, भिंवयांत रामाचें धनुष्य, काळ्या व कुटील केंसांत कृष्ण, गळ्यांत बौद्धाचा शंख व जिव्हेंत कलंकीची तरवार, याप्रमाणें बहुतेक सर्व अवतार तिच्या ठायीं वसत असतात."

"उचनीच कल्पनांतील विरोध हेंच विनोदाचें सर्वस्व" असें कोल्हटकरांचें मत होतें. 'हजामतीची नीतिमीमांसा' या नांवांतहि असा विरोध आहे. हजामतीच्या कलेंत इतर कलांचा त्रिवेणी-संगम कसा झाला आहे हें उसन्या गांभीर्यानें सांगतांना कोल्हटकर म्हणतात,—खरें म्हटलें तर हजामत ही चित्र, नाट्य, गायन इत्यादि कलांमध्यें एक उच्च व मूर्धस्थानापन्न कला आहे. हातीं वस्तरा घेऊन रक्तानें डोकें रंगविणारा न्हावी कुंचलें घेऊन रंगविणाऱ्या चिताऱ्यापेक्षां कमी आहे असें म्हणतां येणार नाहीं. तसेंच हातीं आरसा देऊन सगळ्या तोंडास साबणाचा फेंस लावणें व पात्रांच्या तोंडास रंग देऊन सजविणें यांतही फारसें अंतर नाहीं. डोक्यास पडणाऱ्या जखमांमुळें विव्हळणाऱ्या मनुष्याचें रडगाणें जर हिशेबांत घेतलें तर गाण्याचाही भाग श्मश्रूंत नसतो, असें कोणासही शपथ घेऊन म्हणतां यावयाचें नाहीं."

आमच्या स्त्रियांचें जीवन संकुचित असतें, हा विचार "माझ्या भीष्म-प्रतिज्ञेचा विजय" या लेखांत शास्त्रीय परिभाषेनें कसा मांडला आहे, पहा, "स्वैंपाकघर, माजघर हाच आमच्या बायकांचा खरा भूगोल आणि घरांतील गाऱ्हाणीं व शेजाऱ्यांच्या नालस्त्या हाच त्यांचा खरा इतिहास आहे. पक्कानें करणें हेंच त्यांचें रसायनशास्त्र, आणि कुंकूं लावणें व गोंदणें हीच त्यांची चित्रकला आहे. पतीचें हृद्गत जाणणें हें त्यांचें गणित, आणि चाळणें, पाखडणें, व निवडणें हें त्यांचें तर्कशास्त्र होय."

विरोधाभासाची मौज

'भविष्य-कथनाचीं साधनें' या लेखांतील विरोधाभासाचा पुढील नमुना हास्यकारक आहे—"वेधशालांसही अशी वांझ भाकितें करण्याची भारी हौस! त्यांची सगळी इमारत वातावणावर उभारलेली असावयाची. तेव्हां ती बऱ्याच वेळां वाऱ्याच्या हेलकाव्याबरोबर सत्यापासून दूर गेलेली आढळल्यास नवल नाहीं. जेव्हां वेधशाला अनावृष्टीचें भाकीत करते तेव्हां सर्व सृष्टि अतिवृष्टीमुळें जलमय झाली म्हणून समजावें; व तिनें पावसाचें भविष्य केलें म्हणजे लागलीच सगळे जग वायूशास्त्रवेत्त्याच्या डोक्याप्रमाणें कोरडें ठणठणीत पडतें."

'गवई' हा लेख शुद्ध विनोदी आहे. सतारीची तार वाजूं लागतांच श्रोत्यांना किती आनंद वाटतो, हें कोल्हटकर मार्मिक विरोधानें सांगतात, "तारायंत्राची तार एका ठोक्याबरोबर निराशेस हद्दपार करिते किंवा आनंदाचें उच्चाटन करिते. विद्युत्यंत्राची तार एका धक्क्यासरशी सजीवास निर्जीव करिते व निर्जीवास सजीव बनविते. इमारतीच्या वर डोकावून पहाणारी तार खुद्द विद्युल्लतेस जलसमाधि घ्यावयास लावते. सतारीची तार एका झणत्कारावरोबर हजारो श्रोत्यांस स्वर्गसुख देऊन तिच्या अगदीं उलट कृति करते."

'यांत्रिक चमत्कार' या लेखांत कोल्हटकरांनीं आपल्या कल्पनाशक्तीला स्वैर सोडलें आहे. शतपावली करणें, लहान मूल कडेवर घेणें, दांत घासणें, व्यायाम करणें, स्वयंपाक करणें, जेवण वाढणें, फार काय, 'शिंक आल्याबरोबर नाकांतील सगळा खजिना दुसऱ्यावर हजाऱ्याप्रमाणें न उडवितां नाकास पदर लावणें',—इत्यादि दैनंदिन कामाचीं यंत्रें कशीं काढतां येतील याच्या तपशीलवार योजना मोठ्या कल्पकतेनें या लेखांत दिलेल्या आहेत. यंत्रकलेचा पल्ला किती मोठा आहे हें विरोधाभासाच्या साहाय्यानें कोल्हटकर पुढीलप्रमाणें सांगतात, "एका मिनिटास शेंकडो प्राण घेणाऱ्या बंदुका आणि एका जांभईबरोबर शेंकडों शरीरें छिन्नभिन्न करणाऱ्या तोफा मनुष्याच्या कल्पकतेचेंच फळ असून त्या आग-

गाड्यांच्या व आगबोटींच्या सख्ख्या बहिणीच होत. एका वर्गांतील बहीण या जगांतल्या एका प्रदेशाहून दुसऱ्या प्रदेशास पोहोंचविते, व दुसऱ्या वर्गांतील बहीण या जगांतून दुसऱ्या जगांत पोहोंचविते, इतकेंच काय तें या दोन वर्गांमध्यें अंतर आहे."

यांत्रिक काव्यावर टीका

नमुन्यासाठीं सुदाम्याचें काव्य-यंत्र पहा. "कांहीं दिवसांनीं जर कवितेचेंही यंत्र निघालें तर त्यांत मोठेंसें नवल वाटावयास नको ! आतां एका पेटींत कोशांतील सारे शब्द घालून ते एकादा दांडा फिरविल्यानें निरनिराळ्या वृत्तांच्या सांच्यांत पडावें अशी योजना त्या यंत्रांत करावी लागेल.....अशा कवितेंत दांडा फिराविणाराच्या तोंडांतील तंबाखूच्या रसापेक्षां निराळा रस सांपडण्याचा संभव जरा कमी आहे हें मला कबूल आहे; पण या यंत्राबरोबरच रसिकांच्या डोळ्यांतून पाणी काढणारीं व त्याच्या बरगड्या हलविणारीं यंत्रें काढून तीं अनुक्रमें त्याच्या डोळ्यांस व कांखेंत अडकविल्यास ही उणीव दूर होईल अशी खात्री आहे." अशा यंत्रांतून कशा स्वरूपाचें काव्य बाहेर पडेल ? तर "पाला नाला जोडा फोडा । बाबा काका मामा आत्या ।" याचा अर्थ काय ? तर "बागेंत पुष्करिणीजवळ नायिका नायकाच्या काळ्या मिशा पाहून आनंदित झाली." हा अर्थ कसा निघतो ? याचें जें वर्णन कोल्हटकरांनीं केलें आहे, तें वाचकांच्या हसून हसून मुरकुंड्या वळविणारें आहे.

स्वभावांतील विसंगति

झोंप, लग्न, कुलूप—किती नित्याचे विषय. सर्वसामान्य लोक झोप घेतात, लग्न समारंभ पाहतात आणि कुलपें लावतात—उघडतात. पण त्या मामुली प्रसंगांतूनहि विसंगति कोठें दिसतें, हें कोल्हटकरासारखा एकादाच प्रतिभावान लेखक पाहतो आणि अतिशयोक्तीच्या, शब्द-लीलांच्या व काव्य-कल्पनांच्या साहाय्यानें नटवून—थटवून ती विसंगति अशा खुबीनें वाचकांच्या डोळ्यापुढें ठेवतो कीं, त्याला त्यांतून नवेंच सौंदर्य, नवाच अर्थ दिसूं लागतो.

एक झोप घेतली कीं तिचे भोक्ते किती नानाविध असतात हें कोल्हटकरांनीं सविस्तर सांगितलें आहे. त्याचप्रमाणें त्या झोपेचे शत्रु जे ढेकूण, त्यांच्या लीला कशा अजिंक्य आहेत हेंहि गंमतीनें वर्णिलें आहे. ढेकूण 'गनिमी काव्याची' लढाई कशी करतात, आणि त्या लढाईंत नामोहरम होऊन सुदाम्यानें सहकुटुंब काशीयात्रा कशी केली, परत आल्यावर ढेकणांनीं चवताळून मारा सुरू केल्यामुळें सुदाम्यानें घरोघर ढेकूण वाटण्यासाठीं दौरा कसा काढला, पण घरोघरचेच ढेकूण त्याच्या बंडीअंगरख्यांत कसे शिरले, शेवटीं 'आपल्या हातानें घरावर निखारा ठेवून' सुदामा बायकामुलांसह एकेका वस्त्रानिशीं घरांतून बाहेर कसा पडला—इत्यादि पराक्रमांचा बोलपट पहातांना कोणास हसूं लोटणार नाहीं ? बंडूनानांनीं तर ढेकणांना कंटाळून "आत्महत्येचा निश्चय केला. त्यांनीं एकदां मोठ्या कड्यावरून उडी मारली. पण उडी मारितांना कड्याच्या पायथ्याशीं पोहोंचेपर्यंत डोक्यास ऊन्ह लागूं नये (ते दिवस उन्हाळ्याचे होते.) म्हणून त्यांनीं जी छत्री उघडून हातांत घेतली होती तिच्यामुळें त्यांचा हेतु सिद्धीला गेला नाहीं. दुसऱ्या एका खेपेस तळ्यांत बुडून जीव देण्याचा निर्धार करून ते तळ्यापर्यंत गेलेही. ते दिवस हिंवाळ्याचे असल्यामुळें पाणी बर्फासारखें थंडगार झालें होतें. बंडूनानांनीं उडी मारण्यापूर्वीं पाण्यास हात लावून बघितला, तों त्यांच्या अंगावर शहारे आले. तें पाहून नानांनीं आपला बेत पुढील उन्हाळ्यापर्यंत तहकूब ठेविला." यांतील अतिशयोक्ति जितकी हास्यकारक, तितकाच नानांचा भोळेपणाहि. मनुष्य—स्वभावांतील भोळेपणा, विसरभोळेपणा, मूर्खपणा, छांदिष्टपणा-असे एकेक दोष म्हणजे विनोदाची एकएक खाणच होय.

जीर्ण चालींचा उपहास

सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रांत आपल्या मताविरुद्ध जे लोक होते, त्यांचा उपहास कोल्हटकरांनीं अनेक लेखांतून केला आहे. शिमग्यासारख्या बीभत्स चालीवर कितीहि सरळ व सडकून टीका केली, तरी सनातनी समाज ती चाल सोडीत नाहीं. तेव्हां उपहास करून कोल्हटकरांनीं त्या

रानटी चालींतील मूर्खपणा उघड केला आहे. 'शिमगा' या लेखाचा प्रारंभच उपहासप्रचुर आहे. तो असा–" आपल्या घोरणी पूर्वजांनीं आपल्या हिताकरिता ज्या कित्येक उपयुक्त संस्था काढल्या त्यांपैकींच शिमग्याचा सण ही एक आहे." हा सण पूर्वापार रूढीप्रमाणें पाळल्यानें कोणते फायदे होतात, हें शास्त्रीय स्वरूपांत मांडण्याचा आव आणून कोल्हटकरांचा मानसपुत्र सुदामा म्हणतो, " चोहोंकडे होळ्या पेटविल्यानें हवा स्वच्छ होते, पांचजन्य केल्यानें फुप्फुसें साफ होतात व शेणाच्या शिडकाव्यानें आरोग्य घाढतें हें कोणीही कबूल करील." शिमग्याचा कार्यक्रम जोरदारपणें व व्यवस्थितपणें पार पाडण्यासाठीं बंडूनाना काय करीत ? तर " गणपतीच्या मेळ्यांतील पोरांना जशी कवाईत शिकविली जाते, तशी शिमग्याकरितां पेरें तयार करितांनासुद्धां त्यांना एकेका रांगेत पांचपांच अशी उभीं करून मोहरक्यानें शीळ फुंकल्याबरोबर पांचजन्याची सरबत्ती एकदम कशी उडवावी याची तालीम चांगल्या रीतीनें देण्यांत येते."

या विषयाच्या विवेचनांत आजूबाजूच्या जुन्या चालीरीतींचाहि समाचार याच लेखांत घेतलेला आहे. रेशमी मुकट्यांत बीज असते, हें कळल्यापासून सुदाम्यानें काय युक्ति केली पहा, " जेवणाच्या पाटाजवळ एक लहानसें छिद्र पाडून त्यांत लांबवर पोहोंचेल अशी एक तार विकत आणिली. तेव्हांपासून ती तार माझ्या करगोट्याला अडकवून व छिद्रांत सोडून नंतर मी पाटावरच मुकटा नेशीत असें व हें रहस्य इतरांना समजूं नये म्हणून अंगावर शालजोडी घेऊन जेवावयास बसत असें." रेशमी वस्त्रांत बीज असते, या तत्त्वावर सोंवळ्याचें समर्थन कोणी करतात. त्यांचा फोलपणा अतिरेकानें (Reductio ad Absurdum) सिद्ध करतांना कोल्हटकर लिहितात,–" वाटे, कीं न जाणों निऱ्या करतां करतां बीज चमकून तिनें मला भस्म करून टाकिलें, तर माझे देशहिताचे विचार जागचे जागींच राहतील. माझ्या स्वतःच्या जिवाबद्दल मला मुळींच पर्वा नव्हती; पण माझ्या देशाबद्दल मला वारंवार हळहळ वाटे, असो. याप्रमाणें मीं विजेच्या भीतीनें दोन दिवस आजाराचें मिष करून ओवळ्यानेंच अन्न खाल्लें."

लोकभ्रमावर प्रहार

मांजर आडवें जाणें, विधवा समोर दिसणें वगैरे अपशकुन मानण्याच्या मूर्ख चालीरीतींवर 'मालाकार' चिपळूणकरांनीं कोरडे उडविले आहेतच, पण कोल्हटकरांच्या विनोदाचा रेशमी चाबूक कसा आहे पहा—"प्रथम युद्धाच्या रसद, तोफखाना, रिसाला, पायदळ या खात्यांच्या जोडीस शकुन व भाकीत हीं खातीं निर्माण केलीं पाहिजेत. पुनः शकुनखात्याचीं विधवाखातें, मांजरखातें, पालखातें, शिंकखातें इत्यादि पोटखातीं करून त्याजवर योग्य सर्कसवाल्यांच्या किंवा इतर अधिकाऱ्यांच्या नेमणुकी केल्या पाहिजेत. सैन्याच्या जशा कवायती होतात तशा विधवांच्या, मांजरांच्या, पालींच्या वगैरे झाल्या पाहिजेत. भाकीत–खात्यांत फलज्योतिष सामुद्रिक, रमल इत्यादि निरनिराळीं पोटखातीं करून त्यांवर हुषार तज्ञांच्या नेमणुकी केल्या पाहिजेत."

अशा पोकळ व आचरट रूढीबरोबरच, गणेशोत्सवासारख्या चैतन्यदायक प्रथेवरहि त्यांनीं आपलें उपहासाचें शस्त्र चालविलें. लो. टिळकांनीं सुरू केलेल्या या उत्सवांतील क्रांतिकारकता चिरोलनें ओळखली, पण तणाबरोबर फुलवेलीहि कापणाऱ्या माळ्याचा आवेश कोल्हटकरांच्या सुधारकी लेखणींत शिरला. गणपति-उत्सवांत तोंडपाटिलकी करणाऱ्या शब्दशूर व्याख्यात्यांची टर उडविण्यासाठीं कोल्हटकर 'गणेशचतुर्थी' या लेखांत लिहितात, "हल्लीं गणपत्युत्सवांत जे वक्ते धर्माभिमानाविषयीं नुसत्या तोंडाच्या हात हात लांब गप्पा मारतात, ते जर हातभर शेंपूट लावून व अंगावर काळेपिवळे पट्टे ओढून नाचूं लागतील तर धर्मास अधिक बळकटी येईल अशी माझी समजूत आहे."

बंडूनाना सनातनी, अस्पृश्यता पाळणारे. हें त्यांचें व्रत किती कांटेकोरपणें चाले याची माहिती 'धर्मांतर' या लेखांत पुढीलप्रमाणें दिली आहे, "आमचे बंडूनाना तर वर्णव्यवस्थेचे नियम पाळण्यांत इतके दक्ष आहेत, कीं ते अतिशूद्राचा स्पर्श झाल्यास ज्याप्रमाणें सचैल स्नान करितात; त्याप्रमाणें महार–मांगांच्या खात्यांत रकमा मांडिल्यावर लेखणीचें टोंकही

पाण्यानें धुवून टाकितात. त्यांनीं त्या कामाकरितां एका निराळ्या दौतीची योजना केली असून त्या अस्पृश्य दौतीची त्यांच्या कलमदानावर सावली पडणार नाहीं, इतक्या अंतरावर ती ठेवण्याची ते नेहमीं खबरदारी घेतात."

हुंड्याच्या चालीवर कितीकांनीं दांतओंठ खाऊन टीका केल्या आहेत. पण हिरव्या ताटानें गुराला मारावें म्हणजे मार खातां खातांहि तें ताट चाटीत असतें, त्याप्रमाणें सुदाम्याची विनोदी टीका सुखदायक आहे. 'लग्नसमारंभ' या निबंधांत सुदामा म्हणतो, "नुकतेंच मी महाराणी व्हिक्टोरियाचें चरित्र वाचलें होतें. त्यांत त्यांचे अलौकिक गुण वाचून माझ्या मनावर इतका कांहीं ग्रह झाला, कीं तेव्हांपासून मला त्यांच्या मुखवट्यांचा संग्रह करण्याचा फार नाद लागला. किती तरी वेळां कुळांकडून रक्कम आल्यावर मी तासचे तास राणीसाहेबांच्या मुखाकडे राजभक्तीनें सद्गदित होऊन पहात बसलों आहें ! राणीसाहेब तर आम्हांला सोडून गेल्याच, त्यांच्या रौप्यमय प्रतिभांचा तरी वियोग होंण्याचा मजवर प्रसंग न येवो !"

रूढीवर टीका

'चित्रगुप्ताचा जमाखर्च' या लेखांत श्रीगजाननासमवेत त्याच्या उंदरावरच बसून सुदामा परलोकाचा प्रवास करतो, तेव्हां त्याचे मित्र बंडूनाना व पांडुतात्या हेहि पापपुण्याचीं गांठोडी पाठशीं बांधून आलेले त्याला दिसतात. जप-तप, उत्सव-समारंभ, व्रत-वैकल्यें इत्यादि त्यांच्या धार्मिक कृत्यांच्या नांवानें चित्रगुप्ताच्या वहींत जमेच्या बाजूस एकहि आंकडा पडला नाहीं, उलट अतिशूद्राची मरणापासून केलेली मुक्तता व अनाथाश्रमास दिलेली देणगी या परोपकारांचीच गणना पुण्यांत झालेली होती; असें या लेखांत दाखविलें आहे. लेखांतील परलोक-प्रवासाची कल्पना व त्याची विनोदी भाषाशैली यामुळें वाचक शेवटपर्यंत हसत असतो--आणि लेख संपल्यावर व हंसें ओसरल्यावर त्याच्या बुद्धींत लेखकानें खऱ्या धर्माचें जें स्वरूप सूचित केलें आहे, त्याचा प्रकाश पडतो.

सनातनी समाजाची कुचेष्टा करण्याची पराकाष्ठा 'भविष्य-कथनाचीं

साधनें' या लेखांत कोल्हटकरांनीं केली आहे. ते भविष्य सांगतात, "आजपासून पांचशें वर्षांनीं हिंदुस्थान देशांतील प्रजासत्ताक राज्याच्या तर्फे शंकरमामंजी युरोपवर राज्य करतील व विधवा-केशवपन, असंमत वैधव्य वृद्ध-बाला-विवाह, सहगमन, जातिभेद वगैरे आर्यसंस्था तेथें स्थापून जारीनें अमलांत आणतील; स्त्रियांना शिक्षणामृत पाजल्यास जलसमाधीची व औंवळ्यानें जेवल्यास अग्निकाष्ठ भक्षण करण्याची शिक्षा सुनाविली जात जाईल, आणि गणपतीची थट्टा केल्यास हत्तीच्या पायीं तुडविलें जाईल."

विडंबनाचे नमुने

साधा कुळूपाचा विषय घेतला, तरी कोल्हटकर त्यावर विनोदाची इमारत उठवितात व त्या इमारतींत उपरोधाचा दारूगोळा ठासून भरतात. याचा एक नमुना—"इतर कुलपें मात्र विवाहाच्या बाबतींत आर्यभूमीस पूर्णपणें शोभण्यासारखींच असतात. म्हणजे प्रत्येक कुलपास एका वेळीं दोन दोन किल्ल्या विकत मिळतात. शिवाय दोन्ही हरवल्यास तिसरी करण्याचीही त्यांना धर्माज्ञा आहे."

वर्तमानपत्रांतील विक्षिप्त वार्तांचें विडंबन करतां करतांहि सनातन्यांना कोपरखळी देण्यास कोल्हटकर चुकत नाहींत. सुदाम्याच्या वृत्तपत्रांतील एक बातमी शेवटच्या टीकेसह वाचा—"लंबेडो येथें एक धरणीकंपाचा धक्का बसला. त्यामुळें जमिनीला जी एक मोठी भेग पडली तिच्यांतून शेषाचें मस्तक दिसत होतें. शेषाच्या मस्तकावरील मण्यामुळें त्या भेगेंत चोहोंकडे प्रकाशच प्रकाश झाला होता. याउप्पर आपलीं पुराणें खोटीं असें म्हणण्याचें धाडस कोण करील?"

ब्रिटिश सरकारवर टीका करण्याच्या बाटेस कोल्हटकर फारसे जात नसत. तरी 'हजामतीची नीतिमीमांसा' या लेखांत ते लिहितात, "वाटींतील व वस्तऱ्याचें पाणी आमच्या अंगांतील पाणी नेहमीं जिवंत ठेवीत असतें. हत्यारांच्या कायद्यांत वस्तरे व नराण्या यांचा समावेश केला नाहीं हे आमच्या इंग्रज प्रभूचे आमच्यावर डोंगराएवढे उपकार आहेत."

कोणत्याहि मताचा कैवार न घेतां केवळ मानवी वर्तनांतील विसंगति दाखवितांनाहि ते उपरोधाचा आश्रय करीत. आनंदासाठीं चाललेल्या गायनांत कांहीं कांहीं गवई किती कष्ट घेतात व देतात हें सांगतांना ते म्हणतात, " आवाज जन्मतांच कर्कश असेल तर फारच चांगलें. तसा नसेल तर रेंकून म्हणण्याचा अभ्यास ठेवावा. कारण तुमचा आवाज जितका कर्णकटु असेल तितकी तुमची तुमच्या गायनपटुत्वाबद्दल कीर्ति अधिक होणार हें निश्चित समजावें. "

व्याजस्तुतीचा उत्तम नमुना ' साहित्य-परिषदेची तयारी ' मध्यें आढळतो, तो असा—

" उरतां उरले सुधारक ग्रंथकार. हे बेटे मोठे विघ्नसंतोषी व घरबुडवे ! यांनीं विधवांचें केशवपन बंद करून व स्वतः डोक्यांवर छपरें ठेवून देशी न्हाव्यांचा धंदा बंद केला ! पुराणें बंद करून देशी वार्तीचा कारखाना सपशेल बुडविला.

भाषेची क्लिष्टता

विनोदाला अनुरूप अशी सहजसुंदर, लवचीक व प्रसन्न भाषाशैली कोल्हटकर यांची नाहीं. कदाचित् त्या काळच्या पांडित्य-प्रदर्शनाच्या संवयीचा हा प्रभाव असेल किंवा चिकित्सा करण्याच्या त्यांच्या लेखन-शैलीचाहि हा परिणाम असेल. " स्मृतिपटावर उमटणाऱ्या चित्राचें स्पष्टत्व बहुधा काल-सान्निध्यार्शी व्यस्त प्रमाणावर असतें. " या वाक्यांतील अर्थ, मौजेनें विनोदी लेख वाचणाऱ्या, किती वाचकांच्या डोक्यांत उतरेल ? तसेंच, " जी बीभत्स गोष्ट प्रतिक्रिया म्हणून हटकून होणार ती जर आपण आपखुषीनें व स्वीकारली तर ती क्रियेच्या ठिकाणीं होऊन बसेल व तिची प्रतिक्रिया अर्थात् सभ्य वर्तन, सभ्य भाषण हीं होऊन बसतील. " या वाक्याचा ' गद्यपदार्थबोध ' तयार झाल्यावरच सामान्य वाचक त्यांतील हास्यरसाचे घोट घेणार ! ' हा उंदीर हिमालयाच्या धाकट्या भावाचें अपत्य असल्यामुळें गणपतीचा (म्हणजे गिरिजेच्या मुलाचा) मातुलहि ठरतो ! ' इत्यादि कल्पनेची गुंतागुंतहि उकलणें विनोदप्रिय

वाचकाला कठीणच. 'याचक' वगैरे कांहीं लेखांचा बराचसा भाग तात्विक चर्चेनें रुक्ष झालेला आहे. 'लेखनकलेचीं स्थित्यंतरें' या लेखांत विनोद एकाददुसऱ्या वाक्यांत लपून बसला असेल तेवढाच ! अतिशयोक्तिपूर्ण कल्पना व अलंकारपूर्ण वाक्यरचना साधण्याच्या हव्यासामुळेंहि कोल्हटकरांच्या लेखनांत कृत्रिमता व क्लिष्टता आलेली असावी. तथापि कांहीं कांहीं स्थळें मात्र केवळ अलंकारिक लेखन-शैलीचे नमुने म्हणूनहि वाचनीय आहेत.

अलंकारिक भाषाशैली

'चित्रगुप्ताचा जमाखर्च' हा सारा लेखच प्रा. शि. म. परांजपे यांच्या कल्पना-शक्तीला शोभण्यासारखा आहे. त्यांत कोल्हटकर लिहितात, "त्यांच्या जमाखर्चाच्या वह्यांचे कागद सज्जनांच्या धवल कृत्यांचे केलेले असून ते प्रणयीजनांच्या प्रेमरज्जूंनीं एकत्र बांधलेले होते. त्याच्या दौतींतील शाई दुर्जनांच्या कृष्णकृत्यांच्या कषायापासून बनविली होती. त्याच्या तराजूची दांडी पापपुण्याची पर्वा न बाळगणाऱ्या मनुष्यांच्या मगजांची घडविली असून ती पारड्यांतील वजनांस मुळींच दाद न देण्यासारखी भक्कम होती. त्या तराजूंचा कांटा चंचल मनुष्याच्या स्वभावापासून निर्माण केला होता."

'मुंबईचा दीपोत्सव' पाहण्यासाठीं गेलेल्या सुदाम्याला गाड्यांची रांग कशी दिसली ? तर "ही गाड्यांची रांग म्हणजे मुंबई शहरानें आपल्या गळ्यांत घातलेली इंद्रनील मण्याची एक विस्तीर्ण मालाच दिसत होती व या मालेमध्यें त्याच्या रथ्यारूप असंख्य हस्तांकडून क्षणोक्षणीं नवीन रत्नें ओंविलीं जात होतीं."

'कुलूप' या लेखांत किल्लीचें वर्णन कोल्हटकरांनीं मार्मिकपणें केलें आहे, तें असें--"मानवजातीच्या मूळ पुरुषाचा अधःपात झाला तो केवळ स्त्रीमुळें. कुलपाचा अधःपात होण्यासही त्याची स्त्री कारणीभूत होते; व चमत्कार हा, कीं ॲडमचा नाश जसा ईव्हच्या फाजील जिज्ञासेमुळें झाला तसा कुलपाचा स्थानभ्रंशही किल्लीच्या अतिजिज्ञासेमुळेंच होतो.

ही विचित्र स्त्री पतीच्या पोटांत शिरून आंतील खांचाखोचांची पूर्ण माहिती करून घेते, व अंतीं हृदय काबीज करून पतीच्या निश्चळपणाचा भंग करून टाकिते. फार काय सांगावें, या स्त्रीचा पतीवर इतका पगडा असतो, कीं ती अंतरल्यास कुलूप आपल्या धन्यालासुद्धां दाद देत नाहीं!"

'साक्षीदारा' चें वर्णन कोल्हटकर पुढीलप्रमाणें करतात, "या प्राण्याचे मातापितर 'पुराव्याची गरज' व पोटगी भत्ता' हे होत. गरज ही कल्पकतेची आई, हें नातें तर प्रसिद्धच आहे. आई एक असल्यामुळें साक्षीदार व कल्पकता हीं अर्थात् बहीणभावंडें झालीं."

युक्तिवाद करतांनाहि कोल्हटकर अलंकाराचा उपयोग कसा करतात पहा, "शनीची साडेसाती सुरू झाल्याबरोबर जर मनुष्यावर अनर्थांची पर्णाळिका येत असेल, तर मुळामुठा नदीस पूर आल्यानें आकाशगंगा गढूळ कां होऊं नये?"

युद्धाचें रूपक

डांसाढेकणाच्या चावण्याला युद्धाचें मोठें स्वरूप देऊन कोल्हटकरांनीं विनोद खेळविला आहे. त्याचा एक नमुना–"ढेंकूण हें माणसांशीं जमिनीवर लढतात तर त्याचे साथीदार त्याच्यावर वैमानिकांप्रमाणें आकाशांतून हल्ला करितात. रणवाद्यें वाजविण्याचें कामही या साथीदारांकडेच असतें. तुम्हीं आपल्यां कानांचीं रंध्रें कोणत्याही बाजूस फिरवा, त्यांनीं तिकडे आपला मोर्चा फिरविलाच म्हणून समजावें. त्यांच्या वाजविण्याकडे तुमचा कान नव्हता अशी सबब पुढें करण्याला ते तुम्हांला जागाच ठेवीत नाहींत, कधीं कधीं तर नाकालाच कान समजून ते त्यांत आपल्या तुताऱ्यांसह प्रवेश करितात, व मनुष्याला शिंक येऊन त्यांची झालेल्या चुकीबद्दल खात्री होईपर्यंत ते त्यांतून बाहेर पडत नाहींत. सामान्य गाण्याबजावण्यांत चिजेंतील मुख्य अवसान ज्या स्वरावर असतें, त्या स्वराचें ठिकाण दर्दी माणसांखेरीज इतरांना सहसा उमगत नाहीं. पण ढेंकूण आपलें वायुवाद्य मनुष्याच्या रक्तांत खुपसून जोरानें फुंकीत बसला असतां त्याचें साथीदार बादनांतील बहारीच्या स्थलीं त्याच्या (मनुष्याच्या, ढेंकणाच्या नव्हे.)

गालाचा पापा घेऊन त्याला इतका प्रेमळ इशारा करितात, कीं तो नुस्ती मानच हलवून न राहतां त्या गालावर जोराची थापही मारतो. या प्रकारें वादनास जरी नाहीं तरी गालास चांगलाच रंग चढवितो."

निर्भेळ विनोदाचे मासले

कोल्हटकरांच्या निर्भेळ विनोदाचे सुरेख नमुने म्हणजे 'चोरांचें संमेलन' व साहित्य-परिषदेची तयारी.' तो काळ संमेलन–परिषदांच्या प्रारंभाचा होता. इंग्रजी शिकलेले तरुण निरनिराळ्या कार्यासाठीं सभा भरवीत, संस्था स्थापीत आणि व्याख्यानें–ठराव वगैरेंचे बुडबुडे उडवीत. स्वतःच्या क्षुल्लक कृतीचेहि मोठे नगारे वाजवून 'अहो रूप अहो ध्वनिः' असा परस्पर–प्रशंसेचा सहकारी व्यवहार चाले. राजकीय, सामाजिक, धार्मिक, व्यावसायिक, जातिविषयक सभांना ऊत आला होता. जो उठतो तो संमेलन भरवितो, भाषण करतो, ठराव मांडतो आणि सरकाराकडे मागण्या व समाजाला सूचना करतो. या पोकळ कार्यावर आपल्या विनोदाचे फवारे कोल्हटकरांनीं या दोन लेखांतून सोडले आहेत.

गांवांत चोरांचा सुळसुळाट झाला; त्याच्या संगतीचा परिणाम आपल्यावरहि काय झाला हें सांगतांना सुदामा म्हणतो, "एखादा चोर जवळून जात असल्यास मीं नुसतें आपलें अंगच चोरावें. नंतर मी स्वतःच्याच पैशाची चोरी करूं लागलों; म्हणजे असें, कीं या पेटींतला पैसा त्या पेटींत ठेवावा आणि त्या पेटींतला दागिना या पेटींत दडवावा; आणि हें कृत्य चाललें असतांना कोणी मजकडे पहात आहे कीं, काय म्हणून चोहींकडे सभय दृष्टीनें पहावें. होतां होतां मी बंडूनानांच्या घरचा फाटका जोडा चोरण्यापर्यंत मजल आणिली. बंडूनानांनाही मजप्रमाणेंच चोरीची संवय जडूं लागली होती. मी जो जोडा त्यांचे घरून चोरून आणिला म्हणून सांगितलें, तो वास्तविक मूळचा माझाच असून त्यांनीं चोरीच्या लहरींत माझ्या घरून पळविला होता." होतां होतां गांवकऱ्यापेक्षां चोरांचीच संख्या त्या गांवांत जास्त झाली. चोरांनीं आपल्या संमेलनासाठीं लागेल ती वस्तु कोणाच्याहि घरांतून बिनबोभाट आणली. सुदामा

व बंडूनाना यांच्या रुमालाचा उपयोग मंडपाच्या छतासाठीं झाला, आणि बंडूनानांची शेंडी मंडपाच्या दाराशीं ठेवलेल्या बोकडाच्या चित्राला लावली होती ! अशा प्रकारें 'आमचे गांवकरी अगदीं नखाशिखांत पाहुण्यांच्या आदरातिथ्यांत गुंतलेले होते.

स्वागताध्यक्षांनीं आपल्या भाषणांत चौर्यविद्येचा महिमा कथन करतांना मोठ्या गांभीर्यानें सांगितलें, " अर्थशास्त्राचा एक मोठा सिद्धान्त आहे, कीं देशाची भरभराट होण्यास त्यांतील संपत्ति देशांतले देशांत फिरत राहिली पाहिजे. चोरीचा धंदा नसता तर हें तत्त्व पुस्तकांतल्या पुस्तकांतच राहिलें असतें. संपत्तीचें स्थलांतर होण्यास अनुकूल असा, चोरीशिवाय दुसरा एक तरी धंदा दाखवितां येईल का ? "

चौर्यविद्येचा महिमा

अशा अपूर्व संमेलनाला अध्यक्षहि तसाच नको कां ? त्याचें गुणवर्णन करतांना स्वागताध्यक्ष संभ्या रामोशी यांनीं विशेष गोष्ट ही सांगितली कीं, " हातून चोरी झाली नाहीं अशी त्यांची एकही रात्र वायां गेली नाहीं. अध्यक्षमहाराजांनींही तेच व्रत चालू ठेविलें आहे हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. यांचें हें व्रत चालण्याला या संमेलनामुळें विघ्न येईल असें कोणी समजूं नये. कारण आज रात्रीं येथल्या रहिवाश्यांना आपलें हस्त-लाघव दाखविण्याचा यांचा निश्चय झाला आहे. "

शेवटीं अध्यक्ष सराप्पा भिल्ल याची हातचलाखी सांगून स्वागताध्यक्षांनीं सर्वांना चकित केलें. एका बड्या खटल्यांतून त्यांना वकिलानें वाचविलें. तेव्हां " यांनीं आपल्या वकिलास उदार होऊन ज्या पन्नास हजार रुपयांचें बक्षीस दिलें, ते रुपये वकीलसाहेबांच्याच घरीं चोरी करून मिळविले होते."

' चोरांच्या संमेलनांत ' अकरा ठराव झाले. त्यांतील कांहींमध्यें उप-हासाची दारू ठासून भरलेली आहे. ब्रिटिश सरकारनें विनापरवाना हत्यारें बाळगण्यास सर्वांना बंदी केली, याचा निषेध राजकीय पक्ष आपापल्या सभापरिषदांतून जोरजोरानें करीत. पण चोरांच्या संमेलनांत संमत झाला तो ठराव असा—" चोरी होतांना घरमालकाकडून चोरांना हत्यारांनीं

इजा होण्याचा फार संभव; परंतु हत्यारांचा कायदा करून ती भीति दूर केल्याबद्दल ही सभा सरकारचे मनःपूर्वक आभार मानिते." यापेक्षां दुसऱ्या कोणत्या शब्दांनीं सरकारची शोभा करतां आली असती ? गुदगुल्या करून माणसाला ठार मारणाऱ्या अस्वलासारखीच ही विनोदाची पद्धत नाहीं काय ?

जशी सरकारावर, तशीच साहित्यिकावरहि चोरांनीं एका ठरावान्वयें चोरटी टीका केली. तो ठराव असा—" चोर व ग्रंथकार या उभयतांचा हेतु अर्थचौर्याचाच असल्यामुळें दोघांचें एकच संमेलन भरविण्यांत यावें अशी ग्रंथकारांच्या संमेलनास विनंति करण्यांत यावी. "

या लेखाचा शेवटहि बहारीचा केला आहे. ' पाहुण्यांना बिदा करून ...आम्ही जड अंतःकरणांनीं पण हलक्या खिशानिशीं घरोघर परत आलों ' असा गंमतीचा विरोधाभास लेखाच्या कळसासारखा शोभत आहे. असाच अनुरूप शेवट ' कुलूप ' या लेखाचा केलेला आहे. बंडूनानांच्या कुटुंबानें दिलेल्या टोमण्यानें ' त्यांच्या तोंडाला आपोआप कुलूप बसलें,' ही अखेर किती मनेची आहे ! अशीच विनोदी समाप्ति ' साहित्य–परिषदेची तयारी ' या लेखाचीहि केलेली आहे.

साहित्यिकांचें व्यंग–दर्शन

'साहित्य-परिषदेची तयारी' हा लेख तेवीस पानांचा आहे. तो आरंभापासून शेवटपर्यंत निर्भेळ विनोदानें भरलेला आहे. साहित्य–परिषदेची तयारी करण्यासाठीं सुदामा,बंडूनाना व पांडुतात्या या मित्र–त्रयाला प्रथम साहित्यिक बनावें लागलें. प्रत्येकानें एका महिन्यांत एक एक बडा ग्रंथ लिहून छापूनहि प्रसिद्ध केला ! सुदाम्यानें एका इंग्रजी कादंबरीचें भाषांतर केलें आणि " स्वतंत्र ग्रंथ " म्हणून जाहीर केलें. मूळ कादंबरींतील सुधारकी विचार हाणून पाडण्यासाठीं सुदाम्यानें कादंबरीचा शेवट असा केला, " हें सुधारकी जोडपें आगगाडींतून एका पुलावरून प्रवास करीत असतां एकाएकीं पूल मोडून त्यांचा डबा पुढील एंजिनासह पुलावरून खालील नदींत पडला, आणि तो व मागील डबे जोडणारी सांखळी धक्क्यानें त्या डब्यां-

पासून अलग झाली. इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें एक भयंकर धरणीकंप होऊन मागील डब्यांपुढें एकाएकी एक टेकडी उभी राहिली व यामुळें त्या डब्यांचा बचाव झाला. त्या डब्यांत एकूण एक उतारू सनातनधर्माभिमानी होते ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ''

कृत्रिम प्रसंगांची गर्दी करून सनातनी विचार पुरस्कारणाऱ्या कादंबरीकारावर किती तिखट टीका आहे ही ! नवल हें कीं, असे अकल्पित प्रसंग त्यांच्याच शिष्यानें कल्पून 'प्रेम–संन्यास' नाटकांत दडपून घातले ! आणि नाटकाचा शेवट स्वाभाविकपणें सुधारकी तत्त्वज्ञानाप्रमाणें होणें योग्य असतां, लोकमताला वश होऊन, नायक–नायिकांचे पुनर्विवाहाऐवजीं मृत्यु घडविले ! गुरूची ही टीका प्रसिद्ध झाली १९१४ सालीं आणि शिष्याचें नाटक रंगभूमीवर आलें १९१२ सालीं ! तें नाटक पाहून त्याचें विडंबन करण्यासाठीं तर कोल्हटकरांनीं वरील मजकूर लिहिला नसेल ना ?

सुदाम्यानें कादंबरी लिहिली, तर बंडूनानांनीं अंकलिपीच उलटीसुलटी करून छापली आणि ' शुद्धिपत्राला शुद्धिपत्र ' जोडून ग्रंथाचें वजन वाढविलें ! त्यांहूनहि ' वजनदार ' ग्रंथ पांडूतात्यांनीं तयार केला, तो म्हणजे डायरी !–तीहि जुन्या सालची ! तरी पांडुतात्या ग्रंथकार बनलेच ! त्या उच्च पदावरून ते आपल्या दोघां दोस्तांना कृपाळूपणें म्हणतात, ''तुमचा हा पहिलाच प्रयत्न आहे हें मला ठाऊक आहे. मी तुमच्यापासून फारशी अपेक्षा करीत नाहीं. '' आणि आपल्या अनुभवाचें सार म्हणून ते पोक्तपणानें सांगतात, '' एकंदरींत ग्रंथकर्तृत्व ही कांहीं मोठीशी गोष्ट नाहीं. आपण लक्ष पुरवीत नाहीं तोंवरच त्याचा बाऊ वाटतो. पण तें काम हातीं घेतलें कीं हातच्या मळासारखें वाटूं लागतें.'' अंगीं प्रतिभा नसतांना कवि म्हणून आणि ज्ञान नसतांना लेखक म्हणून समाजांत मिरविणाऱ्या व वर्तमानपत्रांत झळकणाऱ्या साहित्यिकांची हीं विडंबन–चित्रें जितकीं हास्यकारक तितकींच टीकापूर्णहि नाहींत काय ?

अशा तीन प्रचंड ग्रंथांच्या जनकांनीं प्रास्ताविक सभा घेतली. गर्दी झाली तर ती मोडण्यासाठीं दोन पोलिसहि बोलावले. पण त्या '' दोन

पोलिसांचें घोरणें वर्ज्य केल्यास सारी सभा चित्राप्रमाणें स्तब्ध राहिली होती. " कारण सभेकडे कोणी फिरकलेंच नाहीं ! वर्गणी गोळा करण्यासाठीं ' आम्ही ज्या ज्या रस्त्यांनीं जावें, ते ते रस्ते ओसाड होऊन गांवाचे इतर भाग माणसांनीं गजबजून जावे ! " गांवांत प्लेग पसरल्याच्या बातमीसह साहित्यिकांना निमंत्रणें पाठविलीं गेलीं. त्यांना संमेलनाच्या दिवशीं कडक उपास घालण्याचाहि निर्धार कळविला गेला ! पण निमंत्रण-पत्रिकांचें उत्तर आलें नाहीं कीं एकाहि साहित्यिकानें येण्याचें केलें नाहीं. कारण ?-निमंत्रणांच्या पाकिटावर पत्ते लिहावयाचे राहिले होते-म्हणून त्या पाकिटांचा गठ्ठा ' डेड लेटर ऑफिस'मधून या त्रिमूर्तींकडे परत दाखल झाला !

बोध व विनोद

' यशःसिद्धीचे सोपे व अचूक मार्ग ' या गंभीर व लांबलचक नांवानें जो लेख कोल्हटकरांनीं लिहिला आहे, त्यांत नवस, दृष्ट, शकुन, जादू, तोडगे, वशीकरण, सत्यनारायण, इत्यादि लोकभ्रमावर खरपूस टीका आहे आणि ती सारी हास्य उत्पन्न करणारी आहे. बुवाबाजीच्या चमत्कारिक प्रकारावरहि त्यांनीं आपल्या विनोदी शस्त्राचे हसरे प्रहार केले आहेत. पाण्याचें दुर्भिक्ष झालें असतांना कोणकोणत्या आपत्ति लोकांवर येतात व त्या कशा निवाराव्यात याचें वर्णन करतांना त्यांनीं कल्पनामागून कल्पना लढविल्या आहेत. फार काय, ' धर्मांतर'मधील नुसत्या तीन खुर्च्या मोडक्या कशा होत्या याचें वर्णन त्यांनीं केलें आहे, तेंहि खसखस पिकविणारें आहे. रोग-निवारणासाठीं एक मुलगा खिस्ती व दुसरा मुसलमान होतो-आणि अखेरीस दोघेहि परत हिंदुधर्मांत येतात, या साऱ्या उलथापालथी जितक्या हास्यकारक तितक्याच बोधप्रद आहेत. आपल्या विनोदी लेखांचें साध्य काय? हें खुद्द कोल्हटकरांनीं पुढील शब्दांनीं सांगितलें आहे व तें सर्वांसच पटण्यासारखें आहे.

"या लेखनपद्धतींत लेखकाची भिस्त अन्वयापेक्षां व्यतिरेकावर, सादृश्यापेक्षां विरोधावर व बुद्धीपेक्षां कल्पनेवर असल्यामुळें तिचा वाचकावर

उत्कट ग्रह होतो. तिनें वाचकास प्रथम जरी राग आला तरी त्याचें चित्त शांत व स्थिर होतांच त्याच्या कल्पनेसमोर टीकाविषयीभूत प्रकारांतील विरोध उभा राहून त्याच्या बुद्धीसही त्याचीं हास्यास्पदता पटूं लागते; रागाची जागा लाजेकडून घेण्यांत येते; व टीकाकार आपणांस हिणविण्यांत आनंद मानणारा आपला हितशत्रु नसून आपलीं वैगुण्यें हंसतहंसत दाखविणारा आपला निस्सीम मित्र आहे अशी शेवटीं त्याची खात्री होते."

रा. ग. गडकरी : : : २२

"माझ्या अंगीं विनोद नसता, तर मला आत्महत्याच करावी लागली असती" असे उद्‌गार म. गांधीनीं काढले होते. महात्म्या-इतकीच अल्पात्म्यांनाहि विनोदाची गरज नसते. नाहीं तर, एकारलेलीं,



त्रासलेलीं व आंबलेलीं आयुष्यें कंठण्याची पाळी त्यांचेवर येते–किंबहुना त्या आयुष्याचा अंत लहानसहान कारणावरूनहि केल्याचें आढळतें. यंत्राला जशी स्प्रिंग किंवा बैलगाडीला जसें वंगण; तसें मानवी जीवनाला हास्य होय. "गालांतल्या गालांत हसण्याच्या तलम सुतापासून घोड-हशाच्या राकट दोरखंडापर्यंत" सर्व प्रकारचे हास्य–पट विणण्यांत गडकरी चतुर आहेत.

गडकरी हे कवि, नाटककार व विनोदी लेखक या तिन्ही नात्यांनीं मोठें यश मिळवून गेले. नाट्य व विनोद या दोन क्षेत्रांत ते कोल्हटकरांचे चेले होते—'सवाई चेले' होते. काव्यांत कोल्हटकरांपेक्षां त्यांची कल्पना-शक्ति अधिक उत्तुंग आणि रमणीय. नाटकामध्येंहि पद–लालित्य व रसोत्कटता या दोन गुणांचे बाबतींत त्यांनीं गुरूवर ताण केली. तसेंच विनोदाच्या क्षेत्रांत गुरूपुढें मजल मारून त्यांनीं उपमा–उत्प्रेक्षा–श्लेषादि अलंकारांच्या 'धावांचीं शतकें' काढलीं, अतिशयोक्तीचे सीमापार टोले लगावले, काव्य–कल्पनेची गोलंदाजी तर त्यांनीं प्रेक्षकांना तोंडांत बोट

घालावयाला लावण्याइतक्या चपलतेनें केली आणि प्रतिपक्ष्याचा उपहास करून त्याला वाचकाच्या चित्तांतून 'बाद' करण्यांतहि ते अधिक यशस्वी ठरले. या गुरू-शिष्यांच्या विनोदाची तुलना करून "हास्य-विनोद-मीमांसा" कार श्री. न. चिं. केळकर यांनीं असा निर्णय दिला आहे कीं, "विनोदी लेखक या नात्यानें गडकरी यांची प्रतिभा कोल्हटकरांच्या प्रतिभेपेक्षां अधिक पैलूदार व पल्लेदार आहे."

प्रांतांचा शेजारधर्म

राम गणेश गडकरी यांचा जन्म ता. २४ मे १८८५ रोजीं गणदेवी येथें झाला. किर्लोस्करांचें मृत्यु-वर्ष हेंच. मराठी नाट्यकलेचा उत्कर्ष करणारे किर्लोस्कर महाराष्ट्राच्या एका सरहद्दीवर जन्मास आले, तर त्या नाट्यकलेचा विकास करणारे दुसरे नाटककार गडकरी हे महाराष्ट्राच्या दुसऱ्या सीमेवर जन्मास आले. अशा रीतीनें कर्नाटक व गुजरात या दोन्ही प्रांतांनीं आपला शेजारधर्म पाळला आहे ! गुजरातेंतील नवसारी तालुक्यांत गडकऱ्यांचा जन्म झाला. लहानपणींच त्यांचे वडील वारले. त्यामुळें गरिबीचे कांटेकुटे त्यांच्या मार्गावर पसरले गेले. त्यावरूनच रखडत-खरडत जाऊन गडकऱ्यांनीं मॅट्रिकची वेस वयाच्या एकोणिसाव्या वर्षी ओलांडली. पुढें फर्गसन कॉलेजांत त्यांनीं एक वर्ष काढलें. तेथें त्यांना गणित विषयानें अडविलें. पहिल्या वर्षाच्या परीक्षेंत त्यांना अपयश आलें आणि तेथेंच त्यांचें शिक्षण खुंटलें.

तरुणांचे लेखक

'बाळकराम' या टोपण नांवानें त्यांनीं विनोदी लेख लिहिले, 'गोविंदाग्रज' या उपनांवानें काव्य-रचना केली, आणि 'राम गणेश गडकरी' या उघड नांवानें ते नाटककार म्हणून महाराष्ट्र रसिकांपुढें आले व चमकले. कोट्या पेरून विनोदाची खसखस पिकविण्यांत त्यांनीं आपल्या गुरूवरहि ताण केली. 'रिकामपणची कामगिरी' या लेखमालेंत ठकीच्या लग्नाचे जे विचित्र अनुभव त्यांनीं दिले आहेत, ते कोणाच्याहि हंसून

हंसून मुरकुंड्या वळविण्यासारखे आहेत. 'कवीचा कारखाना' यांत जितका विनोद भरलेला आहे, तितकींच टीकाहि ठासलेली आहे. यापेक्षां गडकऱ्यांचें काव्यांतील यश अधिक उत्तुंग व उज्वल. कोल्हटकरांच्या मानानें तर त्यांनीं काव्याच्या मुलखांत फारच मोठी मजल मारली. त्यांची कल्पकताच अनिवार, उच्छृंखल, गगनचुंबी. नादमधुर शब्दरचना, रम्य काव्यकल्पना आणि हृद्य प्रेमभावना ह्या तीन गुणांनीं नटलेलीं त्यांची नाटकेंहि तरुणांचें अंतःकरण सहज जिंकूं शकलीं.

तीन विनोद-मूर्ति

'प्रेमसंन्यास', 'पुण्यप्रभाव' 'एकच प्याला' व 'भावबंधन' हीं चार काय तीं त्यांचीं पूर्ण नाटकें. पण गेल्या सुमारें चाळीस वर्षांत त्यांच्या यशाचे निनाद सतत निघत आहेत. 'सुरसुंदरी' नांवाचें गुजराती नाटक त्यांनीं अगदीं लहानपणीं लिहिलें होतें; पण तें नष्ट झालें. तसेंच 'तोड ही माळ' हें नाटकहि कालवश झालें. 'राजसंन्यास' व 'वेड्यांचा बाजार' हीं त्यांचीं नाटकें अपूर्ण आहेत. 'गर्व-निर्वाण' हें प्रल्हादाच्या कथेवरील नाटक अपुरेंच आहे. या अपूर्ण नाटकांपैकीं 'राजसंन्यास' हें इतकें अपूर्व आहे कीं, त्याला तोड मराठी नाट्यसृष्टींत दुसरी नाहीं. गडकऱ्यांच्या काव्य-कल्पनेला येथें नुसती उधाण भरती आली आहे. पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें त्यांच्या प्रतिभेच्या सकल कला या नाटकांत विकसल्या आहेत. एकाच प्रवेशांत, एकाच वेळीं, चारचार रस खेळविण्याचें अजब सामर्थ्य या भाषा-प्रभूनें येथें दाखविलें आहे. गडकऱ्यांच्या कल्पनासृष्टींतून निर्माण झालेलीं गोकुळ, धुंडीराज व तळीराम हीं तीन पुरुष-पात्रें प्रेक्षकांना खदखदा हसावयास लावून जशीं अमर झालीं आहेत, तशीच सिंधु, शिवांगी व लतिका हीं तीन स्त्रीपात्रें रसिकांना ढळढळा अश्रु ढाळावयास लावून त्यांच्या हृदयांत कायमचें वास्तव्य करून राहिलीं आहेत. अशी विविध व बहुमोल साहित्य-सेवा करून गडकरी ता. २३ जानेवारी १९१९ रोजीं निधन पावले.

शाब्दिक लीलांचें पीक

गडकऱ्यांनीं आपल्या नाटकांत विनोदाचा शिडकाव मुक्तहस्तानें केलेला आहे. 'वेड्यांचा बाजार' हें तर बोलूनचालून प्रहसनच. 'गिळ, गिळ, कोटी गिळ' अशी सक्ती एका पात्रानें दुसऱ्यास करावी, इतकी बेसुमार उधळपट्टी त्या नाटकांत कोट्यांची केलेली आहे. कोट्या करण्याचें गडकऱ्यांचें वेड या नाटकांत मोकाट सुटलें आहे. आणि शब्द-लीलांचें वेडें पीक सर्वच नाटकांत आहे. 'एकच प्यालां'तील तळीरामाचा, 'भावबंधनां'तील इंदु-बिंदूचा, पुण्यप्रभावांतील 'नुपूर–किंकिणी व सुदाम–दामिनी यांचा, 'प्रेमसंन्यासांत' गोकुळचा आणि राजसंन्यासांतील जिवाजी–देहूचा हे सारे कथाभाग हास्यरसानें थबथबलेले आहेत. त्यांतहि भावबंधनांतील धुंडिराजाच्या विनोदाला कारुण्याची व उदात्ततेची जोड मिळाल्यानें तर तो अलौकिक साधला आहे.

लग्न-पद्धतीवर टीकास्त्र

नाट्य किंवा काव्य यांमध्यें गडकऱ्यांचा विनोद वावरतो, पण तो कसा ? तर, मोठ्या माणसांच्या दिवाणखान्यांत लहान मुलांनीं दबून, थबकून चालावें तसा. तींच मुलें मोकळ्या पटांगणावर गेलीं म्हणजे स्वच्छंदानें उड्डंबागडं लागतात; तसा गडकऱ्यांचा विनोद त्यांच्या विनोदी लेखांत मोकळेपणानें विहार करीत असतो. त्यांच्या विनोदी लेखांचा संग्रह 'बाळकराम' या नांवानें प्रसिद्ध झालेला आहे. 'रिकामपणाची कामगिरी' व 'कवींचा कारखाना' या दोन लेखमाला त्या पुस्तकांत प्रमुख आहेत. पहिल्या लेखमालेचा विषय 'ठकीचें लग्न' हा आहे. ठकी म्हणजे कुरूपतेचा अर्क. तिचें लग्न जमविण्यासाठीं तिचे वडील तिंबूनाना, आबाभटजी आणि लेखक बाळकराम हे तिघेजण जिवापाड श्रम कसे करतात, समाजाचा कोपरा न कोपरा कसा धुंडाळतात आणि त्यावेळीं लग्नांतील रूढी व माणसांचे स्वभाव-दोष या दगडधोंड्यावर ते कसे ठेचाळतात यांचें वर्णन बारकाईनें, कोटीबाजपणानें व कल्पकतेनें गडकऱ्यांनीं केलें आहे. तें वाचून ज्याचें पोट दुखणार नाहीं असा रसिक वाचक विरळा,

आणि हंसता हंसता लग्नपद्धतीवर दांत ओंठ खाणार नाहीं असाहि वाचक विरळाच सांपडेल. कोल्हटकरांचे पांडुतात्या व बंडूनाना हे मानसपुत्र जितके चिरंजीव; तितकेच गडकऱ्यांचे बाळक्या व तिंबूनाना.

एखाद्या शालजोडीला छिद्र पडून आंतील अंग उघडें दिसावें त्याप्रमाणें गडकऱ्यांनीं केलेल्या लग्नपद्धतीच्या या विडंबनामध्यें क्वचित् त्यांचें अंतरींचे विचार सरळपणें उघड झाले आहेत. ते असे:— " माझ्या दयाशील वाचकभगिनींनो ! स्त्रीजातीचा अभिमान धरा ! अगदीं नाइलाजामुळें कां होईना-पण अशा रीतीनें आपल्या पोटच्या गोळ्यांचें प्रदर्शन करावयाला तयार होणाऱ्या ' घरं'च्या मंडळींच्या आड या, आणि दुसऱ्याच्या आंतड्यांची अशी हेटाळणी करावयास सरसावणाऱ्या आपल्या उच्छृंखल मुलाबाळांना आळा घाला ! "

विसंगत वस्तूंची गल्लत

" लग्न पहावें करून " या लहानशा म्हणींत वधूपित्याच्या हालांचें ब्रम्हांड सांठवलेलें आहे. नुसत्या नकटीच्याच नव्हे, तर प्रत्येक मुलीच्या ' लग्नाला सतराशें साठ विघ्नें ' येतात. त्या विघ्नांचा आरंभ वरसंशोधनापासून होतो. लग्नाचे मुहूर्त वैशाखांत असतात, त्यावेळीं वसंतऋतू असतो. वसंतऋतूंत कोणकोणते फेरफार होतात, त्या रम्य व क्षुद्र घटनांची गंमतीदार गल्लत या लेखाचे आरंभींच दिली आहे, ती अशी— " वसंतऋतूंत आपल्या या सृष्टीमध्यें केवढाले फेरफार घडून येतात हें नव्यानें कशाला सांगावयाला पाहिजे ! झाडांना पालवी फुटते, आंब्याला मोहोर येतो, वेलींना फुलें येतात, ठिकठिकाणच्या वक्त्यांना शब्द फुटतात, पांढऱ्या सशांना पोरें होतात, मेंढ्यावरची लोंकर कातरतात, कोकिळेला कंठ फुटतो, छत्र्यांवर नवे अभ्रे चढतात, शहरबाजारांतून खेडेगांवच्या पाहुण्यांना ऊत येतो, मोराला नवा पिसारा फुटतो, कुत्र्यांना लूत लागते, तोरणांकरवंदांचें पेंव फुटतें, कलिंगडें विकावयास येतात. "

या साऱ्या बऱ्यावाईट घडामोडींमध्यें वरपक्षाचीं माणीं फिरतात ही महत्त्वाची घटना गडकऱ्यांनीं सांगितली आहे. एरवीं फडतुस मानला

जाणारा ' नवरत्नाप ' लग्नाच्या मोसमांत स्वतःला काय समजतो याचें वर्णन करतांना गडकऱ्यांनीं अतिशयोक्तीची तार पुढीलप्रमाणें छेडली आहे. " महंमद गिजनीच्या धनलोभानें तो स्वार्थपरायण होतो, नेपोलियनच्या महत्त्वाकांक्षेनें तो आपल्या मुलाकडे पाहतो, नाना फडणिसांच्या व्यवहारकौशल्यानें तो मुलाची किंमत ठरवितो, शिवछत्रपतींच्या धाडसानें चाटेल त्या विजापूरकरावर तो त्या रकमेचा मारा करतो आणि नादिरशहाच्या क्रूरपणानें ही रक्कम वसूल करून घेतो. "

कंगालाची आढ्यता

थोरथोर ऐतिहासिक पुरुषांच्या सद्गुणांचें संमेलन आपल्या अंगीं मानणारा हा वरपिता किती कंगाल असतो, याचें वर्णन तर गडकऱ्यांनीं फार मजेशीर केलेलें आहे. एका वरपित्याचें घरीं बाळकराम व तिंबूनाना गेले असतांना " एका मूळच्या चौकोनी, पण जुनेपणामुळें कोपरे फाटून जवळजवळ लंबवर्तुळ होत आलेल्या सतरंजीवरील केर एका बुरणुसानें झाडून आम्हां दोघांना लोडवजा ठेवलेल्या वळकटीजवळ मोठ्या मानानें नेऊन बसविलें. तिंबूनानांना, वळकटीशीं टेंकून बसवून मी सतरंजीवर शक्य तितकीं भोकांचीं बेटें चुकवून बसण्याचा प्रयत्न केला. वळकटींतल्या कापसाचाहि सपाट पसरटपणा जाऊन हजारों गुठळ्यांमुळें ठिकठिकाणीं त्यांचे संघ निर्माण झाले होते. वळकटीच्या या उंचसखल पृष्ठभागाशीं आपल्या सपाट पृष्ठभागाचा कसातरी सलोखा संभाळून तिंबूनाना स्वस्थ बसण्यासाठीं सारखे चळवळ करीत होते. "

' फाटकी सतरंजी, वळकटीची बेबंदशाही, मोडकी खुर्ची, अंगठे तुटलेल्या वहाणा '—अशा वैभवाच्या वरपित्यानें शेवटीं मोठ्या आढ्यतेनें तिंबूनानांना सुनावलें, ' या जन्मीं आम्हांस कर्तव्य नाहीं. ' वरपित्याच्या तोंडीं ' यंदा आम्हांस कर्तव्य नाहीं. ' हें उद्दाम उत्तर इतकें रुळलेलें असतें कीं, विचार न करतांच ते त्याचा उच्चार करतात; आणि म्हणूनच ' यंदा'च्या ऐवजीं ' या जन्मीं ' असे हास्यास्पद शब्द वरपित्याच्या तोंडून निघाले. वरपित्याची कंगाली दरीइतकी खोल आहे, तर त्याची

आढ्यता पर्वतासारखी उंच आहे. या विषमतेंतूनच विनोद निर्माण होतो.

उपहासाची धार

वधूपरीक्षेची चाल किती लज्जास्पद आहे याचें चित्र वरेरकरांनी 'हाच मुलाचा बाप!' या नाटकांत रंगविलें आहे. गडकरीहि आपल्या या विनोदी लेखमालेंत उपहासानें लिहितात—"या वधूपरीक्षेंत साधारणतः गाय, म्हैस किंवा घोडी घेतांना दाखविण्याइतकीच व्यावहारिक अपूज्यबुद्धि दाखवावयाची असते. मात्र ही परीक्षा नवऱ्यामुलाच्या बापानें किंवा दुसऱ्या कोणीतरी करावयाची असते. स्वतः वराचा यांत कांहीं एक संबंध असतां कामा नये! आणि तें गैर आहे, असें धर्मलंड सुधारकांखेरीज कोण म्हणणार?"

वरपक्षाच्या कुरेंबाजपणाइतकेंच विघ्न आकाशांतील ग्रहांचें. त्यांचें प्रतिबिंब कागदावरील पत्रिकेंत उमटतें. त्या पत्रिकेंतील ग्रहांचें वास्तव्य कशा प्रकारचें असतें हें गडकरी पुढील विनोदी शब्दांनीं सांगतात: "एखाद्या वेळीं सारे ग्रह दोनतीन घरांतच दाटीवाटीनें वसति करून व बाकीचीं घरें ओसाड पाडून, पत्रिकेला विजापूर–हंपीसारख्या उजाड पडलेल्या प्राचीन शहरांचें वैभव आणतात; तर एखाद्या वेळीं, इंग्लिशमनप्रमाणें एकेका घरांत एकेकजण राहून पत्रिकेला लोणावळें–महाबळेश्वर यांसारख्या हवेशीर ठिकाणाचा नकाशा बनावितात."

सातमजली अतिशयोक्ति

लग्नाचा एक जोडा जमविण्यासाठीं वधूपक्षाला अनेक जोडे फाडावे लागतात–किंबहुना वरपक्षांकडून जोडे खावेहि लागतात! यामुळें मुलीचा जन्म झाल्याचें कळतांच तिच्या बापाचें तोंड आंबट होतें. अर्थात् आतां हा काळ बराचसा पालटला आहे. स्त्री–शिक्षणाच्या प्रसारापाठोपाठ प्रौढविवाह आले आणि त्यांच्यामागोमाग प्रेमविवाहहि येत आहेत. प्रौढ व सुशिक्षित वधूवर आपापले विवाह स्वतःच ठरवित आहेत. त्यामुळें हुंडा, करणी, पत्रिका, मुहूर्त किंबहुना जात, धर्म इत्यादि निर्बंधांचे

साखळदंडहि आतां रेशमी फितिप्रमाणें सहज कातरले जाऊं लागले आहेत. स्त्रीपुरुषांना समानता राज्यघटनेनेंच प्राप्त झाली आहे. व्यवहारांतहि ती दृष्टीस पडत आहे. पण अजून ही समता व लग्नाची निर्विघ्नता समाजाच्या सर्व थरांमध्यें मुरलेली नाहीं. गडकऱ्यांच्या वेळीं तर तिची चाहूलहि फारशी ऐकूं येत नव्हती. हुंड्यासाठीं स्वतःला जाळून घेणारी स्नेहलता आणि सासुरवासानें गांजल्या गेलेल्या बालवधू शेंकडों होत्या. त्यामुळें कन्येचा जन्म तें तिच्या पित्याला प्राणसकट वाटे. अशा परिस्थितींत बंडूनानांनीं एका नववधूला चुकून 'अष्टकन्या सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद दिला. त्याचा परिणाम किती भयंकर झाला हें गडकरी अतिशयोक्तीनें वर्णन करून सांगतातः—

"या आशीर्वादामुळें—आशीर्वाद कसला? शापच तो!—त्या टिकाणीं ताबडतोब केवढा गोंधळ उडाला, याची तुम्हांला कल्पना करतां येणार नाहीं! त्या जातींत कन्याप्राप्तीमुळें आईबापांच्या घरादाराचें वाटोळें होण्याचा खात्रीचा संभव असतो, आणि तिंबूनानांच्या तोंडून ते अभद्र शब्द असल्या मंगल प्रसंगीं निघालेले! मग काय विचारतां! बायकामंडळींत रडारड सुरू होऊन पोक्त्यापुरवत्या बाया नवऱ्यामुलीला पोटाशीं धरून कुरवाळूं लागल्या. इकडे पुरुषमंडळी रागानें लाल होऊन आमच्याशीं लगट करून दंगल करूं लागली. तिंबूनाना एखाद्या निर्ढावलेल्या 'डांबिसा'प्रमाणें कावऱ्याबावऱ्या नजरेनें इकडेतिकडे पाहात होते. मी मधूनमधून ओरडत होतों कीं, "अंगाला हात लावूं नका! कायदेशीर इलाज करा!" पण माझें म्हणणें त्या गर्दींत ऐकतो कोण? अखेर मोकळ्या मनानें व मोकळ्या हातानें धक्काबुकी सुरू होऊन माझी व तिंबूनानांची कणिक चांगलीच तिंबून निघण्याचा रंग दिसूं लागला."

टीकेचीं गुप्त शस्त्रें

शेवटीं तिंबूनानांवर खटला भरण्यांत आला. त्या खटल्यांत त्यांना न्यायाधीशानें कोणत्या शिक्षा सुनावल्या हें गडकऱ्यांनीं मार्मिकपणें सांगितलें आहे, त्या शिक्षा अशाः—'मानापमान' नाटकांतील प्रत्येक

पदाचा अन्वयार्थ लावण्याची शिक्षा फर्मावितों. हें सर्व वाचन होईपर्यंत तुम्हांला पुण्यांतल्या एखाद्या खानावळींतच जेवावें लागेल. आणि दर आठवड्यास 'वीकएंड' तिकीट काढून सदर्न मराठा रेल्वेच्या तिसऱ्या वर्गांतून पुण्याहून मिरजेपर्यंत प्रवास करावा लागेल. यापेक्षां कमी शिक्षा तुम्हांला करतांच येत नाहीं !"

खाडिलकरांच्या पदांतील क्लिष्टतेवर, पुण्याच्या खाणावळींतील भिकार जेवणावर आणि एस. एम. आर च्या गाडींतील गर्दीवर जातां जातां पण किती तीक्ष्ण टीका गडकऱ्यांनीं केली आहे ! या भयंकर शिक्षा रद्द करून न्यायमूर्तींनीं अपिलांत दयाळूपणानें "तिच्या मानानें कांहींच नाहीं" अशी शिक्षा तिंबूनानाना दिली. ती कोणती ? तर "तीन वर्षें सक्त मजुरी व एक हजार रुपये दंड !" बाळकरामाच्या प्रार्थनेमुळें तिंबूनानांना मुलीचें लग्न जमेपर्यंत मोकळें सोडलें.

ठकीचें स्वरूप-वर्णन

रूप, पैसा, जात, कुल, गोत्र-इत्यादि नाना चाळण्यांतून अनुरूप वर मिळणें ठकीला जड गेलें हें स्वाभाविकच आहे. कारण " ठकीची अंग-कांति सुवर्ण रंगाची आहे; मात्र ही सुवर्णरचना सोनेरी किंवा तांबड्या शाईनें करून भागावयाचें नाहीं. या रंगामुळें ठकीच्या बहुतांशीं गैरहजीर भौंवयांची उणीव, किंवा धांदरटपणानें डोळ्याबाहेर येऊन भौंवतालच्या प्रदेशांत बागडणाऱ्या काजळाचा फाजीलपणा, हीं दोन्हीहि तिन्हाइतांच्या चटकन् लक्षांत येत नसत. महाकवि कालिदासानें शकुंतलेच्या सौंदर्यसर्व-स्वाची जी लतिकेशीं तुलना केली आहे, तीच ठकीच्या बाबतींतहि सत्याला न सोडतां करून दाखवितां येईल; इतकेंच नव्हें, तर एखाद्या लतेशीं पूर्ण सदृश न व्हायला शकुंतलेच्या ठिकाणीं जी एक मोठी उणीव होती, तीसुद्धां ठकीच्या वर्णनांत भरून निघाली आहे कारण, शकुंतले-प्रमाणेंच ठकीचे ' बाहू ढापे लतिकेचे ' व ' कर पल्लव साचे ' असून शिवाय एखाद्या लतिकेप्रमाणें ठकीच्या एका डोळ्यांत फूलहि आहे !"

अशा ठकीच्या लग्नाचे मोहिमेवर तिंबूनाना व बाळकराम निघाले.

'मुलाला सासू नाहीं' अशी अडचण एका ठिकाणीं दाखविण्यांत आली. तेव्हां ती दूर करण्यासाठीं नानांनीं पहिल्या मुहूर्तालाच स्वतःला चतुर्भुज करून घेतलें. त्यांतून एक नवीच अडचण दुसऱ्या स्थळीं उपटली. ती म्हणजे वरपक्षानें नानांच्या नूतन पत्नीलाच उपवर वधू समजून लग्नाला होकार दिला!

अतिशयोक्तीच्या सरी

ठकीचें लग्न जमविण्यासाठीं ही मंडळी पुण्यास आली तेव्हां नवा पोषाख करण्याची सूचना बाळकरामानें केली. त्याच्या खर्चाचा अंदाज पाऊणशेच्या घरांत गेला. तो ऐकतांच नानांचा जीव गुदमरला व ते म्हणाले, 'बाळकराम वेड्या, उगीच पैसे पाण्यांत घालण्यांत काय हंशील? तुझ्या पोषाखाचा खर्च म्हणजे निव्वळ बुडीत खर्च! जावई पोषाखाबरोबर ठकीलाहि पत्करील हें तूं विसरतोस! तेव्हां त्याच्यासाठीं कां नाहीं हवा तसा खर्च करणार!

चल, पत्कर तूं ठकीला आणि —

नंतर चार दिवसांनीं मी सावध झालों!" अतिशयोक्तीची तार याहून लांब कोणाला खेचतां येईल? पावसाच्या सरीवर सरी कोसळाव्या, तशी अतिशयोक्त विधानें करण्यांत गडकरी चतुर आहेत. बाळकरामानें आपलें नाजूक हृदय वरसंशोधनाच्या कामाला अपात्र असल्याचें ठरविलें. आणे त्याचें जागीं दुसरें बळकट हृदय बसाविण्यासाठीं एका दवाखान्यांत त्याला नेण्यांत आलें. तेथें तिघांचीं प्रेतें त्या दिवशीं आली होतीं. त्यांपैकीं कोणाचें काळीज अधिक कठीण, यावर टीका करतांना गडकरी लिहितात, "सूक्ष्मदर्शक यंत्रानें शोधून पाहतांहि शास्त्रीबुवांच्या हृदयाचा थांग न लागल्यामुळें त्यांना हृदयच नव्हतें असें सिद्ध झालें; आणि दरोडेखोराचें हृदय काळजासकट उफराटें लोंबकळत असलेलें आढळून आलें. अखेर सर्वानुमतें त्याचीच निवड झाली. पुढें मला दोन दिवस कोकाईनच्या पिपांत भिजत घातल्यावर माझें हृदय कापून काढून त्याच्या जागीं त्या दरोडेखोराचें उफराटें हृदय सुलट करून चिकटवून दिलें." या विनो-

दाच्या मखमली हातमोज्यामध्यें टीकेचीं किती तीक्ष्ण वाघनखें लपवून ठेवलेलीं आहेत !

याहिपेक्षां अधिक अतिशयोक्ती करण्याची सुरसुरी गडकऱ्यांच्या कल्पना-शक्तीला आली. नानांचे पागोटें दीडशें हात लांबीचें होतें. आणि त्यांचा अंगरखा ?—" नानांनीं स्वतःसाठीं जुन्या दक्षिणी तऱ्हेचा गुडघ्याशीं गोष्टी सांगणारा मलमलीचा अंगरखा बरोबर आणलेला होताच. त्याचे हात चुण्यांचे असून त्यांपैकीं एकेकाची लांबी इतकी होती, कीं दोहींचे नेहमींच्या हाताएवढाले तुकडे पाडले असते तर हजार हातांच्या सहस्रार्जुनालाहि त्या अंगरख्याच्या बाहेरची तसूभर धांदोटी लावल्यावांचून उपयोग करून घेतां आला असता. नानांच्या फार तरुणपणीं त्यांनीं एकदां ' विदाऊट तिकीट ' प्रवास करून पाहिला होता. त्या प्रसंगीं ' मशारनिल्हे ' अंगरखा त्यांच्या अंगांत होता. बोरीबंदर स्टेशनवर तिकीट-कलेक्टरला ' पास ' असें सांगून झटक्यासरशीं बाहेर येतांना त्यानें आपला हात धरल्याचें गिरगांवांत येईपर्यंत नानांना कळलें नाहीं, असें ते सांगत असतात ! "

लग्नाचें बाजारी स्वरूप

पैज मारून व कंबर बांधून बाळकराम व तिंबूनाना लग्नाच्या मोहिमेवर निघाले. आपल्या आगमनाची वर्दी तमाम पुणेकरांना देण्यासाठीं त्यांनीं नाटका-सिनेमाप्रमाणें मोठमोठ्या जाहिराती 'झाडून साऱ्या भिंताडावरून व बुरुजावरून फडकावून दिल्या.' औषधांच्या जाहिरातीची चेष्टा करण्यासाठीं त्यांनीं वर्तमानपत्रांतील जाहिरातींत अशीहि सवलत जाहीर केली कीं, "दोन मुली एकदम करणारांस एक मुलगी इनाम ! ही सवलत तिंबूनानांच्या धाकट्या चारी मुलींचीं लग्नें होईपर्यंत देण्यांत येईल. " अशा जाहिराती फडकवून मोठ्या जाम्यानिम्यानें त्यांनीं शाळेंत व धर्मशाळेंत—फार काय गोशाळेंत व चित्रशाळेंतहि वरसंशोधन चालू केलें. वेड्यांच्या दवाखान्यांतहि ते गेले. तेथील डॉक्टरांनीं त्यांचा मेंदू तपासण्यास सुरवात केली, तेव्हां " डॉक्टरमजकूर नानांचा मेंदू तपाशीत असतां त्यांचें डोकें एका

तरुण हिंदु विद्यार्थ्यानें धरून ठेविलें होतें; तेवढ्यांत नानांनीं त्याचे पाय धरून पोरीला पदरांत घेण्याची विनंति करावयाला सुरवात केली."

मोहिमेंतील मौजा

बाळक्याची मोहीम जोरांत सुरू झाल्यामुळें सर्व पुणेकरांना त्यांची माहिती मिळाली व धास्ती वाटूं लागली. त्यांना चुकविण्याचा जो तो प्रयत्न करूं लागला. त्यामुळें पुणें शहरांत कोणते अनर्थ ओढवले तें ऐका, "एखाद्या शाळेच्या दाराशीं आमची गाडी उभी राहतांच सर्व शाळाभर एकदम शुकशुकाट होऊन इन्स्पेक्टरची तपासणी आल्याप्रमाणें शाळेंत शांतता होत असे. कित्येक कच्च्या दिलाचे तरुण तर रात्रीं-अपरात्रीं दडपल्यासारखें होऊन आमच्या नांवानें बरळत दचकून उठत. आमच्या तोंडाला तोंड देण्यापेक्षां वाटेल त्या संकटाला तोंड देण्याची तरुणांची तयारी दिसूं लागली. एकदां तर नदींत बुंबत असलेल्या एका तरुणानें आम्हांला घाटावर पाहातांच तोंड चुकविण्यासाठीं तळाशीं बुडी मारून कायमची जलसमाधि घेतली."

शेवटीं फर्गसन कॉलेजांतहि ही मंडळी आपल्या बैलगाडींतून गेली. तेथें फारच गंमतीचे प्रसंग घडले. "गाडीवाल्यानें कॉलेजसमोरच्या सुंदरशा बागेंत बैल चारणीला घातले होते; नानांचा चिमण्या गांवढळ मूर्खपणाच्या बेफिकीरपणानें प्रत्येक वर्गांत जाऊन, कमरेवर हात ठेऊन त्याची तपासणी करीत होता. आणि आबाभटजींनीं तोंडाच्या तोफेंत तंबाखूचे सारखे बार भरून पांढऱ्यास्वच्छ भिंतीवर इंग्रजी राज्याचा रंग चढविण्याचा सपाटा चालविला होता. आमच्याबरोबरच्या पशूंचा आणि नरपशूंचा हा आचरटपणा पाहून मला मनस्वी राग आला; पण मी त्या लोकांना कांहीं हाटकणार तोंच विद्यार्थ्यांचें थवेच्या थवे उतावळ्या उत्कंठेनें आमच्या दालनांत जमूं लागले." कॉलेजांतील तरुण विद्यार्थी या विक्षिप्त मंडळीकडे पाहून हंसूं लागले. त्यांच्या हंसण्याच्या निरनिराळ्या तऱ्हांचें वर्णन गडकरी पुढीलप्रमाणें करतात.—"ठिकठिकाणीं सहकारी तत्त्वावर निरनिराळ्या प्रकारच्या हंसण्याचे छोटेखानी कारखाने सुरू होऊन त्यांतून गालांतल्या गालांत हंस-

ण्याच्या तलम सुतापासून घोडहंशाच्या राकट दोरखंडापर्यंत सर्व प्रकारच्या मालाची पैदास होऊं लागली. ''

सनातनी चालींचा उपहास

पुरुषासारखे पुरुष असणाऱ्या तिंबूनानांना व बाळक्याला ठकीच्या लग्नाची इतकी यातायात; मग ज्या मायभगिनींवर आपल्या मुलींचें लग्न जमविण्याची पाळी येत असेल, त्यांचे हाल किती होत असतील ! 'उन्हातान्हांतून दारोदार उंबरठे झिझविणाऱ्या' एका म्हातारीची करुण कहाणी सांगून शेवटीं गडकरी उपरोधानें लिहितात—'' आम्ही आमच्या बायकांना घरांतच कोंडून ठेवितों, त्यांच्या शहाणपणाला चुलखंडांतच होमून टाकतों, वगैरे बाष्कळ बडबड करण्याऱ्या ,चारगट सुधारकांनीं या गोष्टीकडे जरूर लक्ष द्यावें. त्या आईच्या शहाणपणाला गांवगन्ना मोकळें सोडून व त्रिखंड धुंडाळायला लावून सारी गंमत निर्विकार मनानें पाहणाऱ्या समाजानें बायकांवर आणखी कोणतीं जबाबदारीचीं कामें टाकावयाला पाहिजेत ? ''

रबरी फुगे कीं बाँबगोळे ?

ठकीच्या लग्नाची काळजी वाहणाऱ्या व जबाबदारी पतकरणाऱ्या बाळक्यानें तिच्या संसाराची घडी बसवून द्यावयास नको काय ? ' स्वयंपाकघरांतील गोष्टी ' या नांवाच्या लेखांत विनोदाचा मालमसाला ठेचून भरला आहे. '' झाऱ्यापळ्यांच्या शस्त्रास्त्रांनीं सायुध झालेली आचारी, पाणके, वाढपी आणि खटपटी यांची चतुरंग सेना '' स्वयंपाकघराच्या किल्ल्यांत कोणती मर्दुमकी गाजवितात, या क्षुद्र वस्तूचें वीरश्रीयुक्त वर्णन करून गडकऱ्यांनीं चांगला विनोद निर्माण केला आहे.

स्वयंपाकघरांतील निरनिराळ्या पदार्थांच्या नांवावर कोट्या करूनहि गडकऱ्यांनीं हास्यरस उत्पन्न केला आहे. '' चापटपोळ्या, धम्मकलाडू, बर्फीची चटणी, विहिणीची रेवडी, कणिक तिंबणें, पोळ्या लाटणें, अंगाचा तिळपापड, पाटीचें धिरडें, मनांतले मांडे, थंडा फराळ, माणसांचें मेतकूट,

घरादारांचें खोबरें" इत्यादि शाब्दिक कोट्या म्हणजे केवळ हास्याची हवा भरलेले रबरी फुगे नव्हेत, तर स्त्रीवर्गाच्या असहाय्य अवस्थेवर केलेल्या टीकेचे ते बाँबगोळे आहेत. कांहीं पदार्थांत स्त्रियांचे दोषहि मार्मिकतेनें सूचित केले आहेत. उदाहरणार्थ 'थंडा फराळ' पहा—" दुपारचीं जेवणें झालीं म्हणजे खुशाल तणावून द्यावें व चुलीला वाटाण्याच्या अक्षदा द्याव्या. संध्याकाळीं 'तिकडून' कामकाज करून कंटाळून घरीं येणें झाल्यावर आजाराची सबब सांगावी. 'तिकडे' बहुतकरून चुलीची आराधना करण्याचा कंटाळा असतोच ! अशा वेळीं हजार हिश्शांनीं 'थंडा फराळ' करून वेळ भागवावी लागते. हा पदार्थ उपासालासुद्धां चालतो."

नकली कवींचें विडंबन

गडकऱ्यांच्या विनोदाचा दुसरा प्रमुख विषय म्हणजे 'कवींचा कारखाना.' ते स्वतः उज्ज्वल प्रतिभेचे कवि होते. 'ट ला ट व प ला प' करणारे इतर लुंगेसुंगे कवि त्यांच्या डोळ्यापुढें होते. 'सालोमालो' कांहीं तुकारामाच्याच वेळीं होते असें नव्हे, ते वर्तमानकाळांतहि आहेत. त्यांच काव्याचें आणि काव्य-गायनाचें वेड यांचें गडकऱ्यांनीं निर्भीड विडंबन केलें आहे. आपल्या या विडंबनाच्या शर-संधानांतून आपण सत्कवींना वगळतों असें त्यांनीं प्रारंभींच गांभीर्यानें व विनयानें सांगितलें आहे. किंबहुना, त्यांचा कैवार घेऊन, नव्या कवींची तरफदारीहि केली आहे. 'जुनें काव्य तेवढें चांगलें, नवें हिणकस आहे' असे आरोप करणाऱ्यांचा त्यांनीं खरपूस समाचार घेतला आहे. पण त्यानंतर मात्र "गणदासांची व प्रासपुत्रांची' यथेच्छ रेवडी उडवली आहे.

विरोधाभासाचे नमुने

काव्याच्या विविध विषयांचें वर्णन गडकऱ्यांनीं विरोधाभासानें पुढीलप्रमाणें केलें आहे, " कवितेनें वीरांना आणि प्रणयीजनांना उत्साह दिला आहे आणि वीरांनीं व प्रणयीजनांनीं कवितेला विषयांचा पुरवठा केला

ण्याच्या तलम सुतापासून घोडहंशाच्या राकट दोरखंडापर्यंत सर्व प्रकारच्या मालाची पैदास होऊं लागली. "

सनातनी चालींचा उपहास

पुरुषासारखे पुरुष असणाऱ्या तिंबूनानांना व बाळक्याला ठकीच्या लग्नाची इतकी यातायात; मग ज्या मायभगिनींवर आपल्या मुलींचें लग्न जमविण्याची पाळी येत असेल, त्यांचे हाल किती होत असतील ! 'उन्हातान्हांतून दारोदार उंबरठे झिझविणाऱ्या' एका म्हातारीची करुण कहाणी सांगून शेवटीं गडकरी उपरोधानें लिहितात—" आम्ही आमच्या बायकांना घरांतच कोंडून ठेवितों, त्यांच्या शहाणपणाला चुलखंडांतच होमून टाकतों, वगैरे वाफ्कळ बडबड करण्याऱ्या ,चारगट सुधारकांनीं या गोष्टीकडे जरूर लक्ष द्यावें. त्या आईच्या शहाणपणाला गांवगन्ना मोकळें सोडून व त्रिखंड धुंडाळायला लावून सारी गंमत निर्विकार मनानें पाहणाऱ्या समाजानें बायकांवर आणखी कोणतीं जबाबदारीचीं कामें टाकावयाला पाहिजेत ? "

रबरी फुगे कीं बाँबगोळे ?

ठकीच्या लग्नाची काळजी वाहणाऱ्या व जबाबदारी पतकरणाऱ्या बाळक्यानें तिच्या संसाराची घडी बसवून द्यावयास नको काय ? ' स्वयंपाकघरांतील गोष्टी ' या नांवाच्या लेखांत विनोदाचा मालमसाला ठेचून भरला आहे. " झाऱ्यापळ्यांच्या शस्त्रास्त्रांनीं सायुध झालेली आचारी, पाणके, वाढपी आणि खटपटी यांची चतुरंग सेना " स्वयंपाकघराच्या किल्ल्यांत कोणती मर्दुमकी गाजवितात, या क्षुद्र वस्तूचें वीरश्रीयुक्त वर्णन करून गडकऱ्यांनीं चांगला विनोद निर्माण केला आहे.

स्वयंपाकघरांतील निरनिराळ्या पदार्थांच्या नांवावर कोट्या करूनहि गडकऱ्यांनीं हास्यरस उत्पन्न केला आहे. " चापटपोळ्या, धम्मकलाडू, बर्फीची चटणी, विहिणीची रेवडी, कणिक तिंबणें, पोळ्या लाटणें, अंगाचा तिळपापड, पाटीचें धिरडें, मनांतले मांडे, थंडा फराळ, माणसांचें मेतकूट,

घरादारांचें खोबरें" इत्यादि शाब्दिक कोट्या म्हणजे केवळ हास्याची हवा भरलेले रबरी फुगे नव्हेत, तर स्त्रीवर्गाच्या असहाय्य अवस्थेवर केलेल्या टीकेचे ते बाँबगोळे आहेत. कांहीं पदार्थांत स्त्रियांचे दोषहि मार्मिकतेनें सूचित केले आहेत. उदाहरणार्थ 'थंडा फराळ' पहा—" दुपारचीं जेवणें झालीं म्हणजे खुशाल तणावून द्यावें व चुलीला वाटाण्याच्या अक्षदा द्याव्या. संध्याकाळीं 'तिकडून' कामकाज करून कंटाळून घरीं येणें झाल्यावर आजाराची सबब सांगावी. 'तिकडे' बहुतकरून चुलीची आराधना करण्याचा कंटाळा असतोच ! अशा वेळीं हजार हिश्शांनीं 'थंडा फराळ' करून वेळ भागवावी लागते. हा पदार्थ उपासालासुद्धां चालतो."

नकली कवींचें विडंबन

गडकऱ्यांच्या विनोदाचा दुसरा प्रमुख विषय म्हणजे 'कवींचा कारखाना.' ते स्वतः उज्ज्वल प्रतिभेचे कवि होते. 'ट ला ट व प ला प' करणारे इतर लुंगेसुंगे कवि त्यांच्या डोळ्यापुढें होते. 'सालोमालो' कांहीं तुकारामाच्याच वेळीं होते असें नव्हे, ते वर्तमानकाळांतहि आहेत. त्यांच काव्याचें आणि काव्य-गायनाचें वेड यांचें गडकऱ्यांनीं निर्भीड विडंबन केलें आहे. आपल्या या विडंबनाच्या शर-संधानांतून आपण सत्कवींना वगळतों असें त्यांनीं प्रारंभींच गांभीर्यानें व विनयानें सांगितलें आहे. किंबहुना, त्यांचा कैवार घेऊन, नव्या कवींची तरफदारीहि केली आहे. 'जुनें काव्य तेवढें चांगलें, नवें हिणकस आहे' असे आरोप करणाऱ्यांचा त्यांनीं खरपूस समाचार घेतला आहे. पण त्यानंतर मात्र "गणदासांची व प्रासपुत्रांची" यथेच्छ रेवडी उडवली आहे.

विरोधाभासाचे नमुने

काव्याच्या विविध विषयांचें वर्णन गडकऱ्यांनीं विरोधाभासानें पुढीलप्रमाणें केलें आहे, "कवितेनें वीरांना आणि प्रणयीजनांना उत्साह दिला आहे आणि वीरांनीं व प्रणयीजनांनीं कवितेला विषयांचा पुरवठा केला

आहे. सुंदर स्त्रियांनीं कवितेला वरच्या दर्जाला चढविलें आहे, तसेंच कवितेनें सुंदर स्त्रियांना चढवून ठेविलें आहे. कवितेनें किती तरी लोकांना शुद्ध वेडें केलें आहे, तर शुद्ध वेड्यांनीं किती तरी कविता केली आहे !"

एकंदर वाङ्मयांत सत्काव्य व भिकार कविता यांचें प्रमाण काय असतें हें लहानमोठ्या विषयांच्या उपमा देऊन गडकऱ्यांनीं मौजेनें सांगितलें आहे, तें असें, " मिठाईच्या पुड्यांत पेढ्यांचें बत्ताशाशीं, मोरीसाठीं केलेल्या मिश्रणांत फेनाइलचें शुद्ध पाण्याशीं, माळ्याच्या पुड्यांत गुलाबाचें कण्हेर फुलांशीं, पूना मेलच्या प्रवासांत थांबावयाच्या स्टेशनांचें न थांबावयाच्या स्टेशनांशीं, मोठमोठ्या ऑफिसांतून वरिष्ठ अधिकाऱ्यांचें कारकुनांशीं, क्लबांच्या बैठकींतून 'त्या' बाटल्यांचे सोडा-लिमलेटच्या बाटल्यांशीं, प्रेम-याचनेच्या संवादांतून रमणीच्या शब्दांचे वल्लभाच्या शब्दांशीं, किंवा एकंदर समाजांत शहाण्यांचें मूर्खांशीं, जें प्रमाण असतें, तेंच पहिल्या प्रकारच्या कवितेचें दुसऱ्या प्रकारच्या कवितेशीं असतें. "

काव्य-गायनाचें वेड

अशा दुसऱ्या प्रकारची आपली कविता वाचून दाखविण्यासाठीं आपल्या एका कविमित्रानें 'भर बुधवारांत' बैठक कशी मारली आणि तेथें 'तमासगिरांचा तांडा' कसा जमूं लागला व सत्राव्या कडव्याचे स्पष्टीकरणार्थ सोळावें, सोळाव्यासाठीं पंधरावें-करीत सारें शोक-काव्य त्यानें बाळक्याला कसें पाजलें, त्यामुळें बाळक्यानें " दुःखावेगाच्या भरांत बेशुद्ध झाल्याचें सोंग करून धाडकन् धरणीवर अंग टाकलें ! " अशी अतिशयोक्ति करून गडकऱ्यांनीं काव्य-गायनाचे परिणाम कथन केले आहेत. तसेंच, मोरबांना मूल झालें व तें मेलेंहि—अशा हर्षशोकमिश्रित प्रसंगींहि भांबूराव कविता प्रसवले नाहींत. म्हणून स्मशानांत गांवकरी आनंदानें जमले. जत्राच भरली जणूं तेथें. पण सभा चालू असतां भांबूराव कविता घेऊन आला, तेव्हां "विसूनाना धाडकन् खालीं पडले. अध्यक्षांनीं डोळे पांढरे केले ! दिशा धुंद झाल्या ! दिवसां उल्कापात होऊं लागले ! अशनिपात सुरू झाला ! "

कवीच्या टोपण नांवावर टीका करतांना गोविंदाग्रजांनीं नांव शब्दावर पुढील कोट्या केल्या आहेत; " नांव मिळविण्याइतकी अक्कल नसल्यामुळेंच कवीला सग्यासोयऱ्यांच्या नांवावर भिस्त ठेवावी लागत असेल, अशी क्षुद्र कल्पना लढवून कोणी कोणी या प्रघाताला नांवें ठेवण्याचा प्रयत्न करतात, परंतु त्यांत नांवापुरतेंसुद्धां तथ्य नसतें. "

तसेंच ' रम्य तें बालपण ' म्हणून नेहमीं मिटक्या मारणाऱ्या साहित्यिकांची चेष्टा करतांना उपरोधानें गडकरी म्हणतात, " अहाहा ! तें बाळपण आणि त्या लीला ! ते अर्ध्या तिकिटानें प्रवास करणें ! तें निम्या दरानें नाटक पाहणें ! तें सर्वांनीं कौतुक करणें ! माझ्या लहानपणीं शेजारपाजारच्या बायकांनीं पटापट चुंबनें घेऊन माझे लाड पुरवावेत; पण तेंच आतां— ! वाचकहो, बाळपणींचें सुख अवर्णनीय आहे, असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं ! "

हास्य निर्माण करण्याजोग्या उपमा गडकरी कशा देतात याचा एक नमुना पहा. " जीं गुजराथी अक्षरें देशावरच्या धाब्याच्या घरांसारखी दिसतात तींच कवितेंत या खुणांच्या योगानें, रिकाम्या टोपल्या वाहणाऱ्या मुंबईतल्या हेलकऱ्यांसारखी किंवा नारळीच्या चोंडाचीं ने–आण करणाऱ्या मलबारी मजुरांसारखीं दिसावयाला लागतात. "

मानवी स्वभावाचें निरीक्षण

काव्यापाठोपाठ नाट्याचाहि विषय गडकऱ्यांनीं आपल्या विनोदासाठीं निवडला. ते स्वतः यशस्वी नाटककार होतेच, पण त्याशिवाय नाट्यगृहाच्या दारावर उभें राहून तिकिटें तपासण्याचेंहि काम त्यांना कांहीं काळ करावें लागलें होतें. त्यांच्यासारख्या तल्लख कल्पनाशक्तीच्या व सूक्ष्म निरीक्षण–शक्तीच्या माणसाला त्या नाट्य–द्वारा–भोंवतीं मानवी स्वभावांचे किती तरी मजेशीर मासले पहावयास मिळत. त्या सर्वांवर बारीक टीकेची छिनी चालवून त्यांनीं ' नाटक कसें पहावें ' ही लेखमाला

लिहिली. 'नाटक कसें लिहावें' ही लेखमाला 'सवाई नाटकी' या नांवानें लिहून त्यांनीं मराठी नाटकांतील ठोकळेबाजपणा व कृत्रिमपणा यावर शस्त्र धरलें. सूत्रधार-नटी यांच्या प्रवेशावर टीका करूनच त्यांनीं ही लेख-माला संपविली. सूत्रधाराकडे विसराळू अजागळ, नाटकाच्या जाहिरातीचा मक्तेदार, देवाची प्रार्थना करणारा व रसिकांपुढें नाटकाची तरफदारी करणारा वकील, उपवर पोरीचा बाप व नाटकद्वेष्ट्या हटवादी बायकोचा निश्चयी नवरा-अशा पांच भूमिका असतात, हें सांगतांना गडकरी एका उपमेनें सांगतात, "बार्शी लाइट रेल्वेचा अर्धगौर गार्ड, गाडी चालत असेपर्यंत गार्ड, स्टेशनवर उभी राहावयाचे वेतांत असतांना उतारूंजवळून तिकिटें घेणारा तिकिट कलेक्टर, गाडी उभी असेपर्यंत स्टेशनावर झपाट्यानें येरझारा घालणारा स्टेशनमास्तर व शेवटीं गाडी सुटावयाचे वेळीं बावटा दाखविणारा पोर्टर, हे चार निरनिराळे हुद्दे संभाळून असतो. सकृद्दर्शनीं याची कर्तबगारी मोठीशी वाटते खरी; परंतु नाट्यसृष्टीमधील गौरमुख सूत्रधार त्याच्या उज्ज्वलतेस काळिमा लावल्याखेरीज राहणार नाहीं." पैसे न खर्चतां नाटक पाहणाऱ्या फुकट्यांचा एक वर्ग असतो. त्याचा उपहास करण्यासाठीं त्यांना राष्ट्रीय नेत्यांच्या दर्जाला पोचवून गडकरी म्हणतात, "नाटकवाल्यांनीं आपल्याला नाटकाला फुकट सोडलेंच पाहिजे ही यांची स्वराज्याची कल्पना, गांवच्या गडबड्या लोकांचा धुमाकूळ ही यांची स्वदेशी चळवळ, लोकांना नाटकाचीं तिकिटें न घेण्याचा उपदेश करणें हा यांचा बहिष्कारयोग आणि नाटक चाललें असतां दंग्याधोप्यांना उत्तेजन देणें हेंच यांचें राष्ट्रीय शिक्षण! क्वचित् प्रसंगीं नाटकगृहामोंवतीं लोकांना न येऊं देण्याचें 'पिकेटिंग'-सुद्धां अंमलांत येतें!"

नाटक फुकट पहावयास मिळावें म्हणून हे आंबटशोकी लोक नटाच्या, मॅनेजराच्या ओळखी कशा जोडतात, त्यांच्यापुढें लाचारीचें लांगूलचालन कसें करतात; हें सांगून गडकरी म्हणतात, "रजपुतांचें साहस, इंग्रजांची चिकाटी, कोंकस्थांचा कावा, मिशनऱ्यांचा मुर्दाडपणा वगैरे यच्चयावत् विशिष्ट गुणांचा या वेळीं नाटकगृहासमोर बाजार भरतो!"

कल्पकतेची मौज

एक आठवडा म्हणजे किती दीर्घकाळ आहे, हें ठसविण्यासाठीं गडकरी विनोदानें लिहितात, " त्या दिवशीं ज्यांना प्लेगची नुसती गांठ आली असेल त्यांपैकीं बऱ्याच माणसांच्या नांवामागें आज रा. रा. ऐवजी कै. झळकूं लागलें असेल. त्या संध्याकाळीं होऊं घातलेल्या नाटकाच्या जाहिराती आजला फाटून कर्त्यांच्या कीर्तिध्वजांप्रमाणें भिंताडावर फडकत असतील. त्या वेळीं घड्याळजीकडून दुरुस्त करून आणलेलीं घड्याळें आज पुन्हां दुरुस्तीला लायक होऊन बसलीं असतील. तत्कालीन शिल्लक राहिलेलीं ताजीं भजीं आज इतकी शिळीं झालीं असतील कीं, निर्बुज गिऱ्हाइकांना देण्यासाठींसुद्धां ताज्या भज्यांच्या प्लेटींत एकांद-दुसऱ्यापेक्षां जास्त घुसडून देण्याची निर्ढावलेल्या हॉटेलवाल्याची हिंमत होत नसेल. त्या सकाळीं एखाद्या श्रीमंत दिवाणखान्यांतील संगमरवरी फरशीप्रमाणें तकाकणारे घोटणारे चेहरे आजमितीस एका गांवच्या गुरेचारणीची सोय करण्याइतक्या कुरणासारखे झालेले असतील. "

जीवनावर प्रकाश

मनुष्य स्वभावांतं लपून बसलेली विसंगति आपल्या मार्मिक दृष्टीनें वेचून काढून ती हास्यकारक रीतीनें मांडण्यांत गडकरी कुशल होते. तर्कालंकारचूडामणि प्रो. कोटिबुद्धे हे जाडे विद्वान; पण त्यांना आपल्या आठ-दहा महिन्यांच्या बाबूला कांहीं खेळवितां येत नाहीं, हें ' दीडपानी नाटकांत ' त्यांनीं चातुर्यानें दाखविलें आहे. दहाबारा वर्षांची मनुताई मात्र ' बाबुड्या रे छकुल्या रे ' करून बाबूचें रडें थांबविते असें दाखवून शेवटीं ' गंभीर तत्त्वज्ञाना'ची हास्यास्पदता स्पष्ट केली आहे.

याहिपेक्षां मधुर असें ' दीडपानी नाटक ' म्हणजे ' संगीत मूकनायक ' त्याच्या प्रथम पृष्ठावर " रूढीच्या शिळाछापांत छापिलें ' व ' मनुस्मृतीच्या ॲक्टान्वयें सर्व हक्क हिंदुसमाजासाठीं कायमचे राखून ठेवले आहेत. " असें वर्णन आहे. लेखकाचें नांव ' दीड शहाणा ' आणि नाटकाची प्रस्ता-

वना ' नाटक हें संसाराचें चित्र आहे ' एवढीच. श्री. कृ. कोल्हटकरांच्या नाटकाचें नांव घेऊन व त्यांतीलच पात्रें उचलून मध्यमवर्गातील तरुणाचा जन्म कारकुनीची पखाल वहातां वहातां निरर्थकपणें कसा जातो याचें सुंदर चित्र या नाटिकेंत आहे. शाळेंतील विनोदी संवाद पहा—

दिपोटी—काळीचा वसूल करण्याची अकबराची रीत काय होती ?
विक्रांत—(काळा पडतो.)
दिपोटी—छट्टू कधीं मेला ?
विक्रांत—(त्याला मेल्यापरीस मेल्यासारखें होतें.)
दिपोटी—पेशवाई बुडविल्याचें खापर कोणाच्या माथीं फुटतें ?
विक्रांत—(डोकें खाजवितो.)
दिपोटी—पिवळा समुद्र कुठें आहे ?
विक्रांत—(त्या समुद्रांत बुडाल्याप्रमाणें गुदमरतो.)
दिपोटी—पाणलोट कशाला म्हणतात ?
विक्रांत—(डोळ्यांतून घळघळां पाण्याचे लोट वाहूं लागतात.)

कोल्हटकरांचा विक्रांत ' मूकनायक ' असला, तरी तो पुढें बोलका नायक होतो; परंतु गडकऱ्यांचा नायक हा जन्मापासून मरेपर्यंत एक अक्षरहि तोंडावाटें न काढून खरोखर मूकच राहतो. त्याच्या जीवितार्चे गुण-वर्णन त्याच्या मृत्यूनंतर करतांना स्मशानांत जमलेली मंडळी म्हणतात, " एक चांगला मनुष्य गेला ! कोणाच्या अध्यांत ना मध्यांत ! कधीं खटखट नाहीं कीं कधीं ठकठक नाहीं ! उभ्या जन्मांत याच्या हातून चारचौघांनीं नांवें ठेवण्यासारखें कांहीं झालें नाहीं तेवढ्या आठ मुलांखेरीज. (चिता धडकते. तिच्या जाळानें पेटून पडदा जळतो.) "

' सकाळचा अभ्यास ' या प्रहसनांत घरांतील मुलें अभ्यास करतांना त्यांचें चित्त कसें वावडत असतें हें गडकऱ्यांनीं मजेशीरपणें रंगविलें आहे.

विनोदी लेखामध्यें गडकऱ्यांचा कोटीबाजपणा स्वच्छंदानें विहार करीत आहे. ' चेहरा व पडदा पडतो,' ' नाकीं गमन करतों,' इत्यादि

शब्दांवर कोट्या करून गडकऱ्यांनीं खसखस पिकाविली आहे. अर्थात्च या विनोदी लेख-संग्रहांत कोठेंकोठें कृत्रिमता व क्लिष्टताहि आली आहे. पण कल्पना-शक्तीचा स्वैर विलास आणि तिच्या पोटीं समाज-सुधारणेची तळमळ हे दोन्ही गुण या लेखांत प्राचुर्यानें तळपतात.

* * *

"सभ्य गृहस्थहो !" हे किती मामुली शब्द ! पण ते व्यासपीठावर उभे राहिलेले आचार्य अत्रे यांच्या मुखांतून बाहेर पडले, तरी श्रोत्यांमध्ये हशा पिकतो. "आज संध्याकाळीं" असें ते पुढें म्हणाले कीं पुनः हशा ! "आपण येथें" पुनः हशा; "कां जमलों" तरी हशा ! गंभीर विषय असला तरी हशा ! शोकसभा असली तरीसुद्धां !! असा अकारण व अमर्याद हशा वाक्या-वाक्याला निर्माण करण्याची सिद्धि अत्रे यांना वश झाली आहे. सर्वांना सहज कळणारी सफाईदार भाषा, कोटीला प्रतिकोटी लढविण्याचा हजर-जबाबीपणा आणि विसंगति शोधून काढणारी सूक्ष्म दृष्टि या तीन गुणांमुळें अत्रे यांचें सारें लेखन व भाषण विनोदानें बहरलेलें असतें. त्यांच्या विनोदांत जशी व्यक्तिनिंदेची धुळवड असते, तशीच काव्य-कल्पनेची रंग-पंचमीहि असते. कोल्हटकर-गडकऱ्यां-प्रमाणें ते आपल्या विनोदाचा उपयोग सामाजिक सुधारणेच्या प्रचाराचें साधन म्हणून फारसे करीत नाहींत. "विनोदासाठीं विनोद" हेंच त्यांचें ब्रीद—आणि तो विनोदहि 'पोटफोड्या'. नरसोपंत केळकर किंवा वामन-राव जोशी यांच्याप्रमाणें विनोदाचा मंद सुगंध सर्व लेखभर दरवळत



ठेवण्याइतका सूक्ष्मपणा अत्रे यांच्या अंगीं नाहीं. ते स्वतःसकट सर्वांना ' खर्ची ' घालून विकट हास्याचें अमाप धन जमा करतात.

दोन घटका मनोरंजन

' नाताळ ' म्हटलें कीं खिस्ती लोकांना गर्दी, मौज, दंगा यांचीं दृश्यें दिसतात; त्याप्रमाणें ' अत्रे ' म्हटलें कीं, महाराष्ट्रीयांना स्वैरपणा, खेळाडूपणा व आनंदीपणा यांच्या मूर्ति दिसूं लागतात. 'सुटी' म्हटलें कीं शाळेंतील मुलें जशीं हरखतात आणि क्रिकेटचा सामना पाहण्यासाठीं क्रीडांगणाकडे धाव घेतात; तसें ' अत्रे ' यांचें व्याख्यान आहे असें कळतांच श्रोतृवर्ग ' आज हसून हसून आपल्या बरगड्या दुखणार ' अशा अपेक्षेनें सभागृहाकडे जातो. ढोलगें वाजूं लागलें, पेटारा उघडला आणि मुंगूस–अजगराची लढाई किंवा माकडाची कारवाई सुरू झाली कीं, तो गारुड्याचा खेळ पहात शेकडों प्रेक्षक तासन् तास उभे रहातात ना ? त्याच भावनेनें हजारो श्रोते अत्रे यांचें विनोदप्रधान भाषण ऐकत असतात. त्यांचेकडून आपण कांहीं विचार मिळवावयाचा आहे किंवा स्फूर्ति घ्यावयाची आहे अशी कल्पना चुकूनहि कोणाच्या डोक्यांत नसते.

संसारांतील भगभगी, कचेरींतील कटकटी, राजकारणांतील उलाढाली इत्यादि डोक्यांतील सारा माल घरीं ओतून ठेवूनच श्रोतृवृंद अत्रे यांच्या व्याख्यानाला जातो व आपल्या मनाची झोळी हास्याच्या चिंचाबोरांनीं भरगच्च भरून आणतो. त्यांच्या लेखना–भाषणांत एकाद्या विषयाची आंकडेवार माहिती किंवा युक्तिपूर्ण मुद्दे अथवा तर्कशुद्ध प्रतिपादन यांची अपेक्षा फारशी कोणी करीतच नाहीं. ' दोन घटका मनोरंजन ' व्हावें या हेतूनेंच लोक त्यांच्या लेखा-भाषणांची चव चाखतात. आणि त्यांतच अत्रे यांनाहि सार्थक्य व साफल्य वाटत असावें. त्यांनीं स्वतःच विनोदाचें कार्य काय असतें हें पुढील शब्दांनीं सांगितलें आहे, " दुःखांना हंसावयाचें, तीं हंसण्यावारीं न्यावयाचीं, हंसून हंसून तीं विसरून जावयाचें, हा विनोदाचा खरा हेतु आहे....जीवनसत्त्वें शोषून घेणारे चिंतेचे आणि दुःखाचे जे अनंत जंतु आहेत, ते विनोदाच्या पिचकाऱ्यांनीं मारले

जातात; एवढेंच नव्हे तर जीवनाच्या अभिवृद्धीस हर्ष, आनंद, खेळकरपणा, तारुण्य हीं जीं द्रव्यें आवश्यक असतात, त्याचा पुरवठादेखील विनोदामुळेंच होतो.'' दुःख–नाश व आनंद–लाभ ही विनोदाची दुहेरी कामगिरी अत्रे आपल्या लेखणीनें व वाणीनें बजावीत असतात. ' महाराष्ट्राला हसावयास मींच शिकविलें ' हें त्यांचें कांहींसें आत्मप्रौढीचें वचन पुष्कळ अंशीं सत्य आहे असें म्हणावें लागतें. विनोदाचा धबधबाच त्यांच्या वाणींतून व लेखणींतून वहात असतो. त्यांचा स्वभाव, त्यांची वृत्तिच विनोदी, खेळाडू, दिलदार आहे.

कोल्हटकर यांनीं विनोदाची जी नवी पायवाट रुळविली, तिचा गडकऱ्यांनीं राजमार्ग बनविला आणि अत्र्यांनीं तो राजमार्ग सर्वसामान्य लोकांनाहि खुला केला.'केशवकुमार'या टोपण नांवानें त्यांनीं आधीं विडंबनपर व नंतर प्रसादपूर्ण अशा कविता लिहिल्या. रसिकांच्या मान्यतेस पावलेल्या ' रविकिरण' मंडळावर उपहासाचें शस्त्र चालविणाऱ्या त्यांच्या कविता, 'झेंडूचीं फुलें' या पुस्तकांत संग्रहीत केलेल्या आहेत आणि त्यांची स्वतंत्र काव्यसंपदा ' गीत–गंगा ' या पुस्तकांत सांठविली आहे.

शिक्षण–शास्त्रांत निष्णात

प्रल्हाद केशव अत्रे यांचा जन्म १८९८ सालीं सासवड येथें झाला. पुरंदर किल्ल्याच्या नैसर्गिक सौंदर्यावर व ऐतिहासिक अभिमानावर त्यांचें बालपण पोसलें गेलें. त्यानंतर शिक्षणासाठीं ते पुणें येथें आले. भावेस्कूल मध्यें त्यांनीं दुय्यम शिक्षण घेतलें व १९१४ सालीं ते मॅट्रिक झाले. पुढें पांच वर्षांनीं फर्मसनमधून ते बी. ए. झाले. त्यांनीं काव्य व नाटकें या विषयांचें सपाटून वाचन केलें. त्यावेळीं मराठी वाङ्मयांत कवि व नाटककार म्हणून प्रकर्षानें तळपणारे गडकरी यांचा परिचय त्यांना घडला. लवकरच ते त्यांचे मित्र झाले व भक्त बनले. बी. टी. च्या परिक्षेंत अत्रे १९२९ सालीं पहिल्या वर्गांत पहिला नंबर मिळवून उत्तीर्ण झाले. इंग्लंडला जाऊन ते टी. डी. होऊन आले. शिक्षणशास्त्राच्या या पदव्या पाठीशीं बांधून

त्यांनीं पुणें येथील 'कँप एज्युकेशन सोसायटीच्या' हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून सुमारें वीस वर्षें काम केलें. त्या हायस्कूलचे कांहीं वर्षें ते प्रिन्सिपल होते. नंतर त्यांनीं केवळ स्त्रियांकरितां 'आगरकर हायस्कूल' नांवांची संस्था रास्ता पेठेंत स्थापन केली. शाळेंतील विद्यार्थ्यांकरितां त्यांनीं 'अरुण वाचन माला' व 'नवयुग वाचन माला' काढल्या. पुणें नगरपालिका व मुंबई महापालिका यांचे सदस्य म्हणून त्यांनीं लोक-सेवा केली. १९३० सालीं पुणें येथें भरलेल्या पहिल्या कवि-संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. नाशिक येथील साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद त्यांना १९४२ सालीं मिळालें आणि मराठी पत्रकार संमेलनाचें अध्यक्षस्थान त्यांनीं कोल्हापूर येथें १९४८ सालीं भूषविलें.

विनोदाचे प्रकार

'वीरवचन' व 'गुरुदक्षिणा' ही त्यांचीं शालेय नाटकें आहेत. त्यांचें सार्वजनिक स्वरुपाचें पहिलें नाटक 'साष्टांग नमस्कार' हें १९३३ सालीं रंगभूमीवर आलें आणि 'कवडीचुंबक' हें त्यांचें ताजें नाटक १९५१ सालीं साहित्यिकांनीं उभें केलें. अठरा वर्षांत त्यांनीं सुमारें दहा नाटकें लिहिलीं आणि तीं केवळ विनोदाच्या बळावर लोकप्रिय करून दाखविलीं. त्यांचा पक्ष एकच आणि तो म्हणजे साहित्यिकाचा; त्यांचा विषय एकच आणि तो म्हणजे विनोदाचा;त्यांचें ध्येय एकच आणि तें म्हणजे रंजल्यागांजलेल्यांना झणभर हंसविणें. श्रोत्याला खो खो हंसविणें हें त्यांचें एकमेव साध्य. त्यासाठीं ते स्वतःचेंहि विडंबन करण्यास कमी करीत नाहींत, मग इतरांची कथा काय ? आपल्या बुद्धीची चमक दाखविणाऱ्या कोट्या करून तें जसा शब्दनिष्ठ विनोद साधतात, तसाच चमत्कृतिजनक घटनांची सांगड घालून ते प्रसंगनिष्ठ विनोदहि निर्माण करतात. स्वभावनिष्ठ विनोद केव्हां केव्हां फुलविण्याइतकी सहृदयता त्यांचें ठायीं आहे.

शब्द-लीलांचे तुषार

विनोद पिकविण्यासाठीं कोट्या श्लेषादि शब्द-लीलांचा पाऊस पाड-

ण्याची सवय कोल्हटकर–गडकऱ्यांप्रमाणें अत्रे यांना नाहीं. तथापि माफक बुद्धीच्या वाचकांना व श्रोत्यांना सहज कळणारा तो विनोदाचा प्रकार असल्यानें त्याचा मधूनमधून अत्रे वापर करतात. 'भ्रमाचा भोपळा' हें त्यांचें नाटक म्हणजे शुद्ध प्रहसनच आहे. त्यांत हास्यरस सर्व दिशांनीं उसळत आहे. शब्दावरील कसरतीहि त्यांत बऱ्याच आहेत. जगद्गुरु डॉ. कुर्तकोटी यांच्या सत्कारप्रसंगीं अत्रे यांनीं एक अशी कंठाळी कोटी केली की—" या जगद्गुरूंना कोणी शालजोडी द्या किंवा शालजोडींतले द्या, त्यांना त्याचा आनंद वाटणार नाहीं किंवा रागही येणार नाहीं."

कोट्यांचो खैरात

कविवर्य तांबे यांच्या साठीसमारंभाचे वेळीं भाषण करतांना अत्रे यांनीं " तांबे नांवानें तांबे असले तरी गुणानें सोनें आहेत. " अशी सहज सुचणारी पण गौरव गाणारी कोटी केली. कवितेंतील 'अन्' ची चेष्टा करतांना ते एकदां म्हणाले, " एकानें कवितेंत 'अन्' शब्द वापरला कीं बाकीच्यांनीं कवितेची 'अन्नान्नस्थिती' करून टाकली म्हणून समजा. " एका सभेंत रा. फाटक आले असतांना " प्रत्येक मनुष्य जर 'फाटकांतून' शिरू लागला तर पंचाईतच व्हायची." अशी कोटी अत्रे यांनीं करतांच टाळ्यांचा कडकडाट ठेवलेला. 'काँग्रेसचा भय्या' म्हणून हिंदुसभेवर अत्र्यांनीं जेव्हां सोटा उगारला होता, त्यावेळीं स्वा. वीर सावरकरांवर टीका करतांना ते म्हणाले, " त्या एका इतिहास–प्रसिद्ध उडीवर या मंडळीच्या साऱ्या उड्या आहेत." याहिपेक्षां अधिक कोटीबाजपणा पंढरपूर येथील भाषणांत त्यांनीं केला. सानेगुरुजींचें उपोषण चालूं असतांना केलेल्या भाषणांत ते असें म्हणाले, " नरसोपंत केळकर व सोनोपंत दांडेकर म्हणतात कीं, विठोबापुढें एक नवीन दांडा बांधावा आणि तेथपर्यंत स्पृश्य-अस्पृश्य भक्तांना येऊं द्यावें. आमची ह्या 'दांडे' कर मंडळींना विनंती आहे कीं, मेहेरबानी करा आणि हिंदुधर्माच्या पायांत आणखी नवीन कोलदांडे घालूं नका ! "

साठी शब्दांवर कोटी करुन ती विशेष चातुर्याची नसल्याची कबुली

स्वतः अत्रेच देतात. ते म्हणतात, " सामान्य माणसाच्या वयास साठ वर्षे उलटलीं म्हणजे त्याची बुद्धि नाठी होते. मला वाटतें, तरुणांनीं म्हाताऱ्या मंडळींशी भांडण्यासाठीं ही युक्ति प्रचारांत आणली असावी. परंतु कवींच्या बाबतींत बुद्धीचा प्रश्नच नसतो. तांबे यांच्या वयाला साठी; पण त्यांची भावना मोठी. कांहीं फारशी चांगली नाहीं कोटी ! "

सहोक्ति अलंकार साधून अत्रे यांनीं एका कविसंमेलनांत हंशा पिकविला होता. सर्वत्र चलन पावलेलें अत्रे यांचें तें विधान असें— " प्रेम, खोकला व स्फूर्ति या तीन गोष्टी कधींहि दाबून ठेवतां येत नाहींत. उलट त्या जितक्या दाबाव्यात तितक्या अधिक जोरानें उसळून प्रकट होतात. तेव्हां संमेलन भरविण्याची स्फूर्ति आमच्या कांहीं मंडळींना झाली तिचें अपत्य म्हणजे प्रस्तुत संमेलन ! "

विसंगतीचें दर्शन

एका व्यासपीठावर एकदां अत्रे व खांडेकर हे दोघेहि ललित लेखक बसलेले होते. दोघांचीहि लोकप्रियता समान असली तरी दोघांच्या शरीर-यष्टीमध्यें मात्र दोन ध्रुवांचें अंतर आहे. अत्रे यांनींच जाहीरपणें सांगितल्या-प्रमाणें ते " बेरड वृत्तीचे व ठणठणीत प्रकृतीचे " साहित्यिक आहेत. त्यांचें वजन पूर्वीं १२८ पौंड होतें पण पुढें तें १९० पौंड झालें आणि अलीकडे तर २२० वर गेलें. याच्या उलट स्थिती खांडेकरांची. या विरोधाचा उपयोग अत्रे यांनी विनोदनिर्मितीसाठीं कसा करून घेतला पहा–" 'वृद्ध कवि' म्हणजे शुद्ध विरोधाभास आहे. याचप्रमाणें विरोधा-भासाचें आणखी कांहीं नमुने आहेत. कवि हा कधींही वृद्ध नसतो; मुत्सद्दी हा केव्हांही तरुण नसतो; (हंशा) मास्तर हा केव्हांही लठ्ठ नसतो. (प्रचंड हंशा, वक्त्यासह सर्व लोक श्री. वि. स. खांडेकर यांच्या कृश देहयष्टीकडे पाहतात; पण त्याच वेळीं श्री. खांडेकर हे हंसत हंसत श्री. अत्रे यांच्या सुदृढ देहाकडे बोट दाखवून ' हाही एक विरोधाभासच ' असें म्हणतात; त्यामुळें पुन्हां हंशा व एकदीड मिनिटपर्यंत सारखा हंशा व स्टॅपिंग.) "

कवीच्या लेखनांतील व परिस्थितींतील विसंगति रंगवितांना अत्रे यांनीं असा मौजेचा विरोधाभास निर्माण केला आहे कीं-" फुलावर पुडेच्या पुडे लिहिणारा कवि चुकून पैशाचेंद्रेखील फूल विकत घेतांना आढळत नाहीं. समाजांत फार चिखल माजला आहे, म्हणून केविलवाणा हंबरडा फोडणाऱ्या कवीच्या अंगणांत गुडघाभर चिखल सांचला तरी तें त्याच्या गांवींदेखील नसतें. रस्त्यावर एकादा दगड पडला तर तो बाजूला फेंकण्याची तो तसदी घेत नाहीं. उलट तो दगड कोणाच्या तरी कोमल चरणतळाला लागावा म्हणजे तो चरण रक्तबंबाळ झाल्यावर आपल्याला कविता करायला संधि मिळेल अशी त्याची कल्पना असते. ' तुंगगिरीची उशी करून इंद्रधनुष्याची तुतारी फुंकण्याच्या ' गप्पा मारणारा हा कवि त्याच्या घरीं गेलों तर, विड्या फुंकीत पडलेला असतो. "

अतिशयोक्ती करतांना विनोदी वक्त्याला सारासार–विचार कुठून राहणार ? कविसंमेलनाचीं महती गातांना अत्रे गरजतात, " दर गांवीं आणि दररोज जरी कविसंमेलनें भरलीं तर तीं नको कुणाला आहेत ? "

अतिशयोक्तीचा आणखी एक नमुना––" शंकराचार्य शीख होण्यास तयार आहेत ही बातमी ऐकतांच कांहीं शीखांचें सर्व केस आनंदातिशयानें सायाळीच्या पाठीवरील केसांप्रमाणें ताठ उभे राहिले असतील, तर कांहीं सनातन्यांच्या शेंड्या मागल्यामागें गळून पडल्या असतील. "

अन्य रसांचें साहाय्य

अत्रे यांच्या वाङ्मयांतील सिंहासनावर हास्यरस बसलेला आहे. त्यावर चवऱ्या वारण्याचें कार्य वीर व शृंगार या दोन रसांकडेच बहुधा असते. क्वचित् बीभत्स रसालाहि वेठीस धरलें जातें. ' साष्टांग नमस्कारा'ची जन्मकथा सांगसाना ते म्हणतात, "ऐन संकटाचे वेळीं दगा देणाऱ्या खात्रीच्या मित्राप्रमाणें माझ्या आळसानेंहि माझ्याशीं दगलबाजी केली व सांगावयाला संकोच वाटतो—अखेर मला प्रस्तुतचें नाटक 'झालें !' याचप्रमाणें ' मी वक्ता कसा झालों ' या लेखांत आपल्या वक्तृत्व कलेचा इतिहास निवेदन करतांना त्यांनीं शाळेंतील आपल्या व्याख्यानाचा शेवट पुढील-

प्रमाणें वर्णिला आहे. " लहान मूल आपल्या आईला कांहीं विशिष्ट प्रसंगीं ' झालं ' म्हणून ज्या स्वरांत सूचना देतें तशा केविलवाण्या स्वरांत झालं म्हणून किंचाळून मी बाकाबर जाऊन बसलों. मुलांचीं तर हंसतां हंसतां पोटें दुखून आलीं. पुढें कित्येक दिवस वर्गांतल्या मुलांनीं माझें ' झालं ' असें टोपण नांव ठेवलें होतें. "

एका सभेंत " मी पेट्रोलचा पंप आहें " असें म्हणून स्वतःलां खर्ची घालून अत्रे यांनीं हशा पिकविला; तर एकदां गोविंदाग्रज स्मृतिदिनाचे वेळीं ते म्हणाले, " ही अत्र्यांची पुण्यतिथी आहे कीं गडकऱ्यांची ? "

भाषेंतील प्रसाद

अत्रे यांच्या लेखणींतून प्रसन्न भाषा सरसर उतरत असते. लो. टिळकांच्या वक्तृत्वाचें वर्णन चारच सफाईदार वाक्यांमध्यें त्यांनीं केलें आहे, तें असें– " लोकमान्य टिळक यांचें व्याख्यान म्हणजे साक्षात् सिंहगर्जनाच होती. त्यांचें व्यक्तित्वच असें थोर होतें कीं, व्याख्यानाला उभें रहातांच समोर द्रोणागिरीचा कडाच उभा राहिल्यासारखें सभेला वाटे. त्यांचा आवाज कर्कश असे. बोलतांना मधूनमधून ते डोळे मिचकावीत असत. तथापि त्यांचा एकएक शब्द म्हणजे घणाचा घाव. प्रत्येक वाक्याच्या अखेरीस ते सभेकडे असे गुरकावून पहावयाचे कीं, श्रोते आपल्या जागच्या जागेवर गार." तसेंच राष्ट्रीय नेत्यांच्या नांवावर त्यांनीं पुढील प्रसन्न व सहजसुंदर कोट्या केल्या आहेत. " मोहनदास गांधी ! स्वातंत्र्याची मुरली वाजवून चाळीस कोटी जनतेला जो मोहनी घालतो तो मोहन ! जवाहरलाल ! हिंदी जनतेचा गळ्यांतलें पृथ्वीमोलाचें जवाहर म्हणजे एक रत्न आहे तें ! जयप्रकाश ! त्यांच्या नांवांतच मुळीं जय आणि प्रकाश भरलेला आहे ! "

हजरजबाबी भाषण

" या हलव्याच्या कविता वाचल्या कीं, माझ्या अंगावर कांटा उभा राहतो " अशी सुंदर अलंकारांनीं नटलेलीं व सूक्ष्म टीका करणारीं वाक्यें अत्रे आपल्या लेखा–भाषणांत मधूनमधून पेरतात. तसेंच " अत्रे एक कीं दोन ? " अशी शंका एका वर्तमानपत्रानें प्रदर्शित केली असतांना अत्र्यांनीं

त्या शब्दावर कोटी करून असें उत्तर दिलें कीं, " वर्तमानपत्राच्या बातमीदारांना एकाचे दोन करून सांगण्याची संवय असते. " टोल्याला टोला देऊन शाब्दिक मारामारी करण्याची खुमखुमी अत्रे यांना खूपच आहे. कांहीं अस्पृश्य बांधवांनीं शंकराचार्यांना पाद्यपूजेसाठीं बोलाविलें असतांना " मठ अस्पृश्य वस्तींत जात नाहीं. " असा श्रीकङ्कून जबाब आला. त्याला उत्तर देतांना अत्रे खोचकपणानें म्हणतात, "बरोबर आहे तें. कारण मठ फक्त ओंकारेश्वरावर जातो. " तसेंच एका सनातनी वैद्यांच्या दवाखान्यांत उद्यां अस्पृश्य येऊन बसतील अशी भीति कांहीं सनातनी लोकांनीं प्रगट केली. तेव्हां अत्रे यांनीं असा सूचक व भेदक विनोद केला कीं, " हरिजन शास्त्रीबुवांच्या दवाखान्यांत जाणार नाहींत, कारण त्यांना कांहीं दिवस जगावयाचें आहे. "

टीकेचें फल

सनातनी समाजावर टीका करतांना अत्रे यांच्या भाषणांत ' राणा भीमदेवी ' आवेश संचारलेला दिसतो. " धर्म मेला, शास्त्रें जाळा " वगैरे एकांतिक विधानें करूनच न थांबतां ते अशींहि बेछूट वाक्यें उच्चारतात कीं, " वरातीपुढें कोपऱ्याकोपऱ्यानें जसे नारळ फोडतात तशाच प्रकारें असले कुजके मेंदू धारण करणारीं सनातनी टाळकीं धरून कचाकच फोडावींत ! " असा नाटकी आवेश समाजसुधारकाला शोभतो काय ? न्या. रानडे किंवहुना प्रि. आगरकरसुद्धां सामाजिक सुधारणेचा तीव्रतेनें प्रचार करीत आणि विरोधी मतांचें जोरानें खंडनहि करीत. पण तें युक्तीवादाच्या आधारानें. अत्रे मात्र युक्तीवादाचे शस्त्र टाकून असली डोकेफोडीची भाषा बिनदिक्कत वापरतात. तिची फलश्रुती क्षणभर टाळ्या मिळविण्यापलीकडे दुसरी काय असणार ? समाजाचें मन हातीं घेऊन एखाद्या कळीप्रमाणें हलके हलके शांतपणें उमलवित राहणें हेंच खऱ्या समाज-सुधारकाचें ब्रीद असतें.

रुक्षतेलाहि रमणीयता

रम्य विषयाची विनोदी मांडणी करणें फारसें कठीण नाहीं; पण रुक्ष

विषयहि विनोदी पेंद्धतीनें मांडणें ही जातिवंत विनोदी लेखकाचींच बहादुरी. पाहुणे, खानावळी, थापा, विसराळूपणा इत्यादि विषय म्हणजे विनोदाचे मक्तेदार. ते कोणी कसेहि रंगविले तरी त्यांतून थोडाबहुत हास्यरस ठिबकावयाचाच; पण हुंडणावळ, मॉटफर्ड सुधारणा किंवा सायमन कमिशनचा वृत्तांत असे नीरस विषयहि हास्यरसांत घोळून केळकर मांडीत असत. अत्रेहि या कामीं मोठे कसबी आहेत. शुष्क लाकडी ओंडक्यांना ते हिरवी पालवी फोडूं शकतात. पुणें येथें घरभाडेकरूंचें संमेलन भरले असतांना अत्रे अध्यक्ष होते. दुसरा एखादा अध्यक्ष असतां तर त्यानें भाडेकरूंच्या हालांचे व दारिद्र्याचे कंठाळी व कंटाळवाणें भाषण करून श्रोत्यांस रडकुंडीस आणलें असतें. पण अत्रे हे श्रोत्यांना कधींच रंजीस आणत नाहींत—उलट त्यांचें रंजन मात्र भरपूर करतात. त्या संमेलनांतील अत्रे यांचें भाषण आरंभापासून शेवटपर्यंत हास्यरसानें दुथडी भरलें होतें, त्यांची विनोदशक्ति व कल्पनाशक्ति या दोघांचा सुंदर नमुना म्हणून पुढील उतारा संस्मरणीय आहे.

" आतां माझ्या वयाला पन्नास वर्षें होत आलीं. तरी मालकींचें घर असूं नये याचा मला राहून राहून विषाद वाटतो. मी मनांत नेहमीं म्हणतों कीं, देवा, मी जन्मभर असाच भाडेकरू रहाणार काय रे ? जगांत दरिद्री माणूस तोच कीं, एवढ्या विशाल पृथ्वीतलावर ज्याच्या मालकीची एक टीचभर जागा असत नाहीं ? उद्यां स्वर्गांत गेल्यावर—अर्थात् ही नुसती कविकल्पनाच आहे !—देवानें जर विचारलें कीं, " लेका, माझ्या पृथ्वीवर एवढी तुझी हयात गेली, तुला स्वतःच्या मालकीचें एक घरदेखील बांधतां आलें नाहीं ! चिमण्या अन् कावळेदेखील स्वतःचीं घरटीं बांधतात. एवढें देखील तुला कसें साधलें नाहीं रे ? ' तर देवाला आपण काय उत्तर द्यावें ! "

सहृदयतेचा ओलावा

" मला मारामारीची फार आवड आहे " असें जरी अत्रे सांगत असले; तरी त्यांचें हृदय प्रेमळ आहे. भल्याभल्या वाग्वीरांशीं ते निकरानें

दीर्घकाल झुंज खेळत आलेले असले, तरी त्यांचें अंतःकरण सरळ व विशाल आहे. त्यांत द्वेष, मत्सर, असूया, अहंकार, तुच्छता-बुद्धी इत्यादि क्षुद्र विकारांना वाव नाहीं. समोरासमोर उभे राहून 'दोन द्यायचे व दोन घ्यायचे' असा त्यांचा मर्दानी बाणा आहे. थोर व्यक्तींचा गौरव करतांना तर त्यांची सहृदयता व कृतज्ञता उचंबळून येते. सानेगुरुजींच्या उपोषणाच्या वेळीं तर त्यांच्या अंतःकरणातले सारे सात्त्विक भाव आषाढींतील चंद्रभागेप्रमाणें वाहूं लागले. तसेंच श्री. लक्ष्मीबाई टिळक यांच्या 'स्मृतिचित्रांचें' प्रकाशन-समयीं त्यांनीं जें भाषण केलें त्यांत त्यांचा दिलदारपणा कांठोकांठ भरून ओसंडत आहे. ते अत्यंत नम्र भावानें म्हणतात, "पूर्वी ज्याप्रमाणें देवलोक वर विमानांत बसून पराक्रमी पुरुषांवर 'साधु साधु' म्हणून पुष्पवृष्टि करीत असत, त्याप्रमाणें आमची वृद्ध मंडळी आम्हां तरुणांच्या पराक्रमाचें जर कौतुक करतील तर अशा वृद्धांच्या पायांवर आम्ही आनंदानें डोकीं ठेवूं."

हरिजनांच्या मंदिरप्रवेशासाठीं पंढरपुरांत प्रायोपवेशनाचें निर्वाण मांडून बसलेल्या साने गुरुजींवर, कांहीं क्षुद्र जंतु भलते आरोप करीत होते. तेव्हां अत्रे यांनीं आंतडें पिळवटून अत्यंत हृदयस्पर्शी उद्गार काढले, ते असे—"देश हेंच माझें घर, अशा वृत्तीनें राहणारा हा माणूस. दुसऱ्याच्या तुळशीपत्रालादेखील शिवायचा नाहीं. चंदनाप्रमाणें यानें महाराष्ट्राकरितां आपला देह झिजवला आहे. ह्यानें काग्रेसकरितां आपल्या रक्ताचें पाणी केलें आहे आणि हाडांचीं काडें केलीं आहेत. निवडणुकीचीं व्याख्यानें देऊन हा माणूस उरीं फुटला आहे हो! नका हें महाराष्ट्रांतलें मोलाचें धन असें वायां घालवूं! फुलपांखरांच्या पंखाला धक्का लावायलादेखील ज्याला भय वाटतें, अशा ह्या निष्पाप आणि निरागस जीवाबद्दल नका असें भलतें सलतें बोलूं!" अशीं सहृदयतेनें थबथबलेलीं व प्रसादपूर्ण भाषाशैलीनें बहरलेलीं अत्रे यांचीं भाषणें थोडीं असतात हें खरें, पण तीं हजारों श्रोत्यांना मंत्रमुग्ध करूं शकतात व त्यांचीं अंतःकरणें हलवूं शकतात.

हास्यपूर्ण कथा

अत्रे यांच्या लेखांत व भाषणांत तर जागोजाग विनोद पेरलेला असतोच; पण त्याशिवाय कांहीं खास विनोदी गोष्टीहि त्यांनीं रचलेल्या आहेत. लघुकथेच्या कसोटीस त्या फारशा उतरणार नाहींत. विनोदाचें गाठोडें अडकविण्यासाठीं त्यांनीं कथेची खुंटी आपल्या लेखनांत बसाविली आहे इतकेंच. रहस्यकथेप्रमाणें एखादें गुपित अत्रे आपल्या गोष्टींत दडवून ठेवतात आणि अखेरीस ते उलगडून दाखवितात, तेव्हां वाचकाला अपेक्षाभंगाचा सुखदायक धक्का मिळतो.

'गुत्त्यांत नारद' या गोष्टींत नारदाचें बिडंबन इतकें केलें आहे कीं, तें वाचतांना एखाद्या सनातनी वाचकाची शेंडी संतापानें नारदाप्रमाणेंच ताठ उभी रहावयाची ! नारदाच्या तोंडीं शिवीगाळ घातली आहे, त्याला सिगारेटचा झुरका मारावयास लावला आहे. फार काय एका वैदू बाईकडे पाहतांच त्याच्या काळजाचा 'फालूदा' झाला आहे. पण अखेरची कलात्मक कलाटणी अत्रे यांनीं अशी दिली आहे कीं, तो नारद म्हणजे एक सिनेमांतील नट होता ! तेव्हां संतापाऐवजीं हास्याचे कल्लोळ वाचकाच्या चित्तांत उठतात. 'संदेश'कार कोल्हटकरांच्या 'माधवाश्रमांत शिवाजी' या विनोदी लेखाची आठवण करून देणारी अत्रे यांची ही गोष्ट आहे. शिवाजीच्या आगमनाचे परिणाम कोल्हटकरांनीं एका प्रकारें वर्णिले आहेत, तर नारदाच्या येण्यामुळें उडालेला हल्लकल्लोळ अत्रे पुढील शब्दांनीं सांगत आहेत, "नारदमुनी आंत शिरतांच एकच हलकल्लोळ उडाला ! 'नारदमुनी आले !' 'नारदमुनी आले !' अशी एकच आरोळी उठली ! खेडवळ गिऱ्हाइकांचे 'गल्लास' तडातड हातांतून गळून पडले ! पांढरपेशी मंडळी आपलीं ग्लासें बांकाखालीं दडपून तोंडें उपरण्याच्या बोळ्यानें पुसूं लागलीं. वैदु लोकांची कैकाडी कचकच एकदम थांबून त्यांची निशा निम्मी उतरल्यासारखी झाली !"

विनोदाच्या क्लृप्त्या

'माधुरी' या गोष्टींतहि अशाच एका सोंगांतून अत्रे यांनीं विनोद

निर्माण केला आहे. चिंचवडच्या ' चंद्रिका ' या मासिकाचे संपादक चिंतामणी चंद्रचूड हे आपली लेखिका माधुरी हिच्यावर भाळले होते. पण त्यांना पुढें कळून आलें कीं, माधव मराठे या तरुणानेंच माधुरी हें टोपण नांव घेऊन आपल्याला चकविलें व लुबाडलें. 'अज्ञात सुंदरीस' या गोष्टींतील विनोद तर अगदीं शालेय आहे. स्त्री, दौत, फणी व वहाण या चार वस्तूंना उद्देशून चार कवींनीं केलेल्या कविता एका साप्ताहिकांत गल्लतीनें एकत्र छापल्या गेल्या, त्यामुळें एकीचें वर्णन दुसरीस चिकटून विनोद निर्माण झाला आहे, तो असा——

" किती वानूं सौंदर्य तुझे बाले,
सदा बाई गे तोंड तुझें काळें
दांत अर्ध्याहुन अधिक भंगलेले
चामड्याचे तुज बंद लाविलेले ! "

'मृच्छकटिकां'तील शकाराच्या जातीचा हा विनोद उच्च प्रतीचा नाहीं.

समाजाचें निरीक्षण

यापेक्षां ' धंद्याची अदलाबदल ' या गोष्टींत लेखकानें केलेलें समाज-स्थितीचें सूक्ष्म निरीक्षण दृष्टीस पडतें. बुद्धिजीवि वर्ग उद्योगधंद्यामध्यें शिरत आहे, तर बहुजनसमाज बौद्धिक शिक्षणाचें दार ठोठावीत आहे, हें समाजां-तील संक्रमण बरोबर हेरून अत्रे यांनीं चिंतोपंत कारकून व शिदोबा न्हावी यांचीं चित्रें रंगविलीं आहेत. केस या शब्दावर कोटी करतांना ते म्हण-तात-" केस कापणारा मनुष्य आपल्या मित्राचा केसानें गळा कापूं शकतो याची मला कल्पना नव्हती. "

पण या शाब्दिक विरोधापेक्षां अधिक उच्च प्रतीचा विनोद केला आहे तो विसंगतींतून. शिदोबाचा मुलगा पदवीधर होतो आणि चिंतोपंताचा मुलगा सलून काढतो, या परस्पर-विरोधी घटनांचे परिणाम समाजा-वर काय होतात हें अत्रे यांनीं पुढील प्रसंगांनीं मार्मिकतेनें दाखविलें आहे, " शिदोबाचा मुलगा बी. ए. झाला त्याच दिवशीं चिंतोपंतांनीं शिदो-बाचें सलून आपल्या ताब्यांत घेतलें व दुकानावर लावलेल्या नांवाच्य

पाटीवर " शिदोबा तळेगांवकर " ह्या अक्षरांऐवजी ' गजानन चिंतो भोपळे यांचें विश्वामित्र हेअर कटिंग सलून ' अशा अक्षरांचा फरक जाणाऱ्यायेणाऱ्यांना दिसूं लागला. शिदोबाचा मुलगा बी. ए. झाला म्हणून मागासलेल्या वर्गाच्या पुढाऱ्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव त्यांजवर होऊं लागला, तर चिंतोपंतांच्या चिरंजीवांच्या ' विश्वामित्र हेअर कटिंग सलून ' वर सनातनी ब्राह्मणांकडून शिव्यांच्या लाखोल्यांची व पुरोगामी सुधारकांकडून उत्तेजनपर संदेशांची वृष्टि होऊं लागली. "

' कावळा व रिपोर्टर ' या लेखांत हृद्य विनोद फारसा नाहीं. बातमीदारांवर उपहसपर टीका मात्र आहे आणि ती बातमीदारांपेक्षां टीकाकारांनाच अधिक शोभणारी आहे. " पवित्र वस्तूंना आपल्या घाणेरड्या स्पर्शानें विटाळणारी या रिपोर्टरांची काळी कर्तबगारी कावळ्यांनादेखील काळीठिक्कर पाडील ! " हें वर्णन टीकाकाराला किंवा व्यंग–शब्द–चित्रकारालाच साजणारें नाहीं काय ? "

रम्य कथा–सप्तक

' साखरपुडा ' या संग्रहांतील शेवटच्या सात कथा म्हणजे अत्रे यांच्या लेखनकलेचा एक तेजस्वी व रमणीय असा पैलूच होय. त्यांनीं शालेय जीवनाचा साक्षात अनुभव वीस वर्षें उघड्या डोळ्यांनीं व कवीच्या मनानें घेतला होता. त्यामुळें शाळेंतील यांत्रिक अभ्यासक्रम आणि उमलत्या मुलांचा सदाफुली उत्साह यांमधील विसंगति त्यांनीं अचूक शोधून काढली आणि अत्यंत रेखीव भाषेनें व्यक्त केली. ' कुणी बोलायचं नाहीं ' अशी करडी ताकीद देऊन मास्तर कॅटलॉग लिहित होते. त्यांचा उग्रपणा व मुलांचा हळुवारपणा यांचीं विरोधी दृश्यें त्यांनीं किती वेचक शब्दांनीं रंगविलीं आहेत पहाः—

" टर्र र्र ! टर्र र्र ! " ताशावर छडी वाजवितात तशी मास्तरांनीं टेबलावर छडी वाजविली आणि वर्गाकडे पाहून डोळे फिरविले. बटबटीत होते त्यांचे डोळे. लालही पण दिसत होते. कपाळावर आठ्यांचें जाळें पसरलेलें. ओंठावर मिशा पिंजारलेल्या.

झाडाच्या फांदीवर चिमण्या बसाव्यात तशी पोरें बांकावर एकमेकाला बिलगून बसलीं होतीं. गुलाबाच्या गेंदाप्रमाणें गोजिरवाणीं त्यांचीं तोंडें, चिमणेसे ओंठ, चिमणेसे गाल आणि हरणासारखे काळेभोर टपोरे डोळे. भित्र्या डोळ्यांनीं बिळांतून ससा बघतो तसे त्यांनीं मास्तरांकडे पाहिलें. बांधावरचें कोंवळें गवत उघड्या वाऱ्यांत कापतें, तशीं तीं कांपत होतीं."

मुलांच्या विकासशील मनाला स्वस्थ बसणें कसें आवडेल ? पण मास्तरांनीं बजाविलें, " कुणी बोलायचं नाहीं !" "कुंणी हलायचं नाहीं!" " कुणी हंसायच नाहीं ! " बिचारी मुलें स्वस्थ बसलीं. पण "फळ्याच्या मागें कोपऱ्यांत एक बीळ होतें. त्यांतून एक उंदराचें पिल्लूं डोकावत होतें. इवलेंसें त्याचें तोंड आणि इवलेसे त्याचे डोळे. चिमुकल्या टिकल्यासारखे लकलक करीत होते. हळूच तोंड बाहेर काढी आणि हळूच मागें आंत जाई. कुणी तरी पाहिलें तें आणि सोबत्याला खुणाविलें पायाच्या चिमुकल्या करंगुळीनें. साऱ्या मुलांना कळलें तें. चोरट्या डोळ्यांनीं तीं बघूं लागलीं तिकडे. पिल्लूं बाहेर आलें चांगलें. एवढासा जीव. पण किती धीट ! मास्तरांच्या खुर्चीपर्यंत आलें तें. मास्तरांनीं पाहिलें तर मारतील ना त्याला ते ! मुलें घाबरून बघूं लागलीं. पण तें कसें लबाड ! भरकन् पुन्हां परत पळालें बिळाकडे. "

किती साध्या सुटसुटींत शब्दांत अत्रे यांनीं हें गद्यकाव्य फुलविलें आहे. साने गुरुजींच्या शैलीचीच जणुं दुसरी आवृत्ति ! श्री. मोडकांचें खारीचें वर्णन जसें संस्मरणीय आहे; तसेंच अत्र्यांचें हें उंदराचें. त्याचप्रमाणें पतंग उडविणाऱ्या मुलाचेंहि वर्णन बोलकें आहे. तें असें, " चिमुकला त्याचा हात. कर्दळीच्या कोंबासारखा. निमुळता व नाजूक. पतंगाला हिसके देतांना वरखालीं नाचे, आणि तोंडही किंचित् वर उचललेलें. अर्ध्या उमलत्या फुलांच्या गेंदाप्रमाणें. गालांवर लालभडक ठिपके. जशा कांहीं जास्वंदींच्या कळ्या चिरडलेल्या त्यांजवर. पतंग वर उडाला कीं, गालांवर हंसू उमलें. खालीं आला कीं हसूं मावळें. पतंग गिरक्या खाई, तशी याची चिमुकली मानही ऐटींत हले कमळाच्या देंठासारखी मागेंपुढें. "

जीवन व निसर्ग

" ठोकळ्याचें चित्र, कविता, फुलांचे विभाग, कुत्र्याचें पिल्लूं " या गोष्टींत मुलांची नैसर्गिक भावना व प्रौढांची यांत्रिक: शिस्त यांचा विरोध खुबीनें वर्णिला आहे. जिवंत निसर्गावर मुलांचीं स्वतंत्र मनें मोहून जातात, पण त्या निसर्गाकडे पाठ फिरवून व वेळापत्रकांवर डोळे लावून शिक्षक आपला ठराविक अभ्यास ठराविक पद्धतीनें घेतात आणि त्यांत ज्यांचें मन रमत नाहीं अशा विद्यार्थ्यांना ठोकतात. हें चित्रित करून अत्रे यांनीं प्रचलित शिक्षणपद्धतीवर किती तीव्र टीका केली आहे! डॉ. टागोर यांच्या 'शांतिनिकेतनां'तील शिक्षण-पद्धतीचा पुरस्कारहि त्यांनीं सहजतेनें केला आहे.

वर्गातील ठोकळ्याचें चित्र न काढितां दत्तूनें पोपटाचें काढिलें, म्हणून मास्तरांनीं त्या चित्राचें तुकडे केले हें एका कथेंत सांगितलें आहे; तर दुसऱ्या कथेंत असें दाखविलें आहे कीं, मास्तर वर्गात " पिक म्हणजे कोकिळ, गाणारा काळा पक्षी ' असें टिपून घ्यावयास सांगत होते. पण शाळेबाहेर कूजन करण्याऱ्या कोकिळेकडे त्यांचें लक्ष नव्हतें. निर्सग व शाळागृह यांतील हा विरोध अत्रे यांनीं किती बारकाईनें व बहारीनें वर्णिला आहे पहा—

' " कुऊऽ–कुऊऽ–कुऊऽ–!

आंब्याच्या फांदीवर बसून कोकिळा गात होती. झाडावर मोहोर बहरला होता. त्याचा घमघमाट चोहींकडे दरवळला होता. वाऱ्याच्या गार झुळकेंत हिरवींपिवळीं पानें सळसळत होतीं. आभाळ अगदीं निळेंभोर होतें. कुठें मधून एखादा लहानसा पांढरा ढग तरंगत होता. ऊन लख-लखीत पडलें होतें. वेलींवर ओंठ उघडून फुलें हंसत होतीं. कळ्या डोळे मिटून डोलत होत्या. जाईचा मांडव फुलून पांढरा दिसत होता. त्यावर चिमण्या इकडून तिकडे नाचत होत्या. त्यांची मंजुळ चिवचिव कानाला गोड लागत होती.

शाळेच्या अंधाऱ्या खोलींत मास्तर मुलांना कविता शिकवित होते. डोळे मंदावले होते. भिंती मळकटलेल्या होत्या. कांहीं ठिकाणीं त्यांचा गिलावा पडून गेला होता. शाईचे शिंतोडे जागोजाग उमटलेले होते.

फाटक्या पुठ्ठ्यावर चिकटविलेलें वेळापत्रक वर लोंबत होतें. जमिनीवर धूळ सांचलेली होती. कागदाची चिटोरीं इकडे तिकडे पसरलेलीं होतीं. बांकाखालून शेंगांचीं फोलपटें पडलेलीं होतीं. "

विद्यार्थ्यांनीं सभेंत गोंगाट न करतां विषयाची दुसरी बाजू शांतपणें ऐकून घ्यावी असें तत्त्व जे हेडमास्तर सांगतात; तेच विद्यार्थ्यांला कांहीं बोलूं न देतां छडी लगावतात. मानवी स्वभावांतील अशीच विसंगति 'कुत्र्याचें पिल्लू' या कथेंतहि अत्रे यांनीं दाखविलें आहे. बाबांनीं कुत्र्याच्या पिल्लाला घराबाहेर पावसांत फेकून दिलें आणि त्या पिल्लावर प्रेम करणाऱ्या चिंतूला पाठ करावयास लाविलें, 'प्राण्यावर दया करा.' अशा विसंगतीचें दर्शन विनोदी पद्धतीनें जो घडवितो; तो लेखक मानवाचा हितकर्ताच ठरत नाहीं काय ?

विडंबक कवितांचें दालन

विडंबनपर काव्यें रचूनच अत्रे यांनीं प्रथम मोठा लौकिक कमावला. त्यांचेंपूर्वी कांहीं कांहीं कवींनीं विडंबन–कविता केलेल्या होत्या. पण अत्रे यांची कल्पनेची भरारी मोठी, विनोदाची तानहि उंची आणि काव्य-संख्याहि विपुल. प्रसन्न रसिकता आणि सफाईदार भाषा यांच्या तटांतून अत्रे यांची हास्य-सरिता दुथडी वाहत आहे. त्यांच्या विडंबनपर काव्यांत टीकेची तीक्ष्णताहि आहे. " वाङ्मयाच्या वरातींत कोतवाली घोड्याप्रमाणें पुढें पुढें नाचणाऱ्या घोडकवींच्या गळ्यांत सणासुदीचे दिवशीं माळा करून घालावयाला उपयोगी पडावीं," म्हणून अत्रे यांनीं 'ना वास, ना रंग' अशीं " झेंडूचीं फुलें " फुलविलीं. १९२५ सालीं त्यांच्या विडंबन–काव्याचा हा संग्रह प्रसिद्ध झाला, तेव्हां मराठी काव्याचें एक नवेंच दालन आपण पहात आहों असें हास्य–रसिकांना वाटलें.

कविवर्गावर टीका

तो काळ 'रवि-किरण-मंडळा'च्या जयजयकाराचा होता. यशवंत–गिरीशांची जोडी शहरोशहरीं काव्य-गायन करून तरुणांचीं हृदयें काबीज

करीत चाललीं होतीं. पंडित–कवि डॉ. माधवराव पटवर्धन हे 'माधव ज्यूलियन' हें चमत्कृतिजनक नांव धारण करून आपल्या काव्यानें दिपवीत होते. त्यांचें उच्चारानुसारी लेखन, बोलीप्रमाणें 'अन्' 'चा उपयोग, फारशी शब्दांचा वापर, नियमक पद्य-पंक्ति, निःसंकोच व निर्बंधरहित प्रणयवर्णनें इत्यादि नावीन्यानें युवकवर्गाला वेड लावलें होतें. आणि विडंबन होतें तें अशाच लोकप्रिय वाङ्मयाचें. सर्वसामान्य कविवर्गाची निष्क्रियता, व्यवहारशून्यता, अनुकरणप्रियता आणि तरी स्वतःविषयीं अमर्याद आढ्यता - इत्यादि दोष–संभारावर आपल्या कल्पकतेनें अत्रे यांनीं विडंबनाचा हिरवा प्रकाश फेकला आहे. सुप्रसिद्ध अशा महान व मंगल विषयाला क्षुद्र व बीभत्स स्वरूप देण्यांत विडंबनकाराचें चातुर्य दिसून येतें. तें अत्रे यांनीं विपुल प्रमाणांत दाखविलें आहे.

श्रीसमर्थांचे 'मनाचे श्लोक' यांचें विडंबन अत्रे यांनीं केलें आहे. तसेंच केशवसुत, गडकरी, बालकवि, माधव ज्यूलियन, तिवारी, अनंततनय इत्यादि कवि–गुरूंना व कवि–बंधूंनाहि त्यांच्या विडंबनाची साडेसाती लागली आहे. 'जें आपल्याला प्रिय असतें, त्याचेंच आपण विडंबन करतों' (We parody what we love) या न्यायानें अत्रे यांनीं आपल्याला प्रिय व पूज्य असणाऱ्या गडकरी–केशवसुतांच्या काव्यांचें विडंबन केलें आहे. त्यांच्या विडंबक कवितांमध्यें कविवर्गाची चेष्टा करणाऱ्या कवितांचीच बहुसंख्या आहे. विनोदाचार्य कोल्हटकरांनीं भलावण करतांना म्हटल्याप्रमाणें, "सुंदर मनुष्यानें दुसऱ्यास वेडावण्याकरितां स्वतःचें मुख कितीहि विकृत केलें तरी तें सुंदरच दिसतें." विडंबनासाठीं लिहिलेली असूनसुद्धां अत्रे यांच्या कवितेची शैली प्रसन्न व रमणीय आहे. सर्कशींतील विदूषकाच्या उड्या वेड्यावाकड्या दिसल्या, तरी इतर खेळाडूपेक्षां त्याचें कसब कांहीं कमी नसतें. 'राजहंस माझा निजला' या गडकऱ्यांच्या अमर विलापिकेचें विडंबन 'कादरखां काबुलवाला' म्हणून करतांनाहि अत्रे यांनीं आपल्या काव्य--शक्तीचें प्रदर्शन केलें आहे. 'जडजंबाला'ची एकवाक्यी प्रस्तावना म्हणजे एका संस्कृतप्रेमी प्राध्यापकापुढें धरलेला आरसाच होय. तसेंच दुसऱ्या एका विद्वज्जड प्राध्यापकाच्या

क्लिष्ट काव्य-रचनेचें विडंबन ' कषाय-पेय-पात्र-पतित मक्षिकेप्रत ' (म्हणजे चहाच्या कपांत पडलेल्या माशीस) या कवितेंत अत्रे यांनीं गंमतीनें केलें आहे.

प्रसिद्ध काव्यांचीं विडंबनें

' दंवाचे थेंब ' ही केशवसुतांची करुणरसपूर्ण कविता आहे. तिचें विडंबन करून केशवकुमारांनीं ' पाहुणे ' ही कविता लिहिली आहे. ओटीवर पसरलेले पाहुणे पाहून बाळ्यानें आईला विचारलें, " हे कोठून आले ? " तेव्हां आईनें दिलेलें उत्तर कोणालाहि हंसूं आणील असेंच आहे. तें असें—" कावळे गिधाडें घारी । येतीं हीं जेथुनि सारीं । डोंगळे, डांस, घुंगरटीं । बाळा रे जेथुनि येतीं; । खोकला, ताप हीं दुखणीं । आपणांस येती जेथुनि; । तेथुनींच आले येथें । हें छळावया आम्हांतें ! " ' दंवाचे थेंब ' मधील आई गहिंवरली याचें कारण तिचीं बालें दिवंगत झालीं होतीं आणि हा एक मुलगा तरी जिवंत राहील कीं नाहीं अशी तिला चिंता पडली होती. पण अत्र्यांच्या विडंबनांतील आई गहिंवरते ती कां ? तर ' जाणार न लौकर सदनीं ! । वदतां गहिंवरली जननी; । पाहुणे मागले स्मरले, । डोळ्यांतुन पाणी आलें. ।....." देवा रे " मग ती स्फुंदे । " एवढा तरी जाऊं दे ! '

' पांखरा, येशिल कधीं परतून ? ' ही रे. टिळकांची कविता वत्सल व करुण या रसांनीं थबथबलेली आहे. तिचें विडंबन अत्रे यांनीं दोन कविता-मध्यें केलें आहे. एकांत ' परिटा, येशील कधीं परतून ? ' असा प्रश्न केला आहे, तर दुसऱ्यांत इंदूरच्या ' होळकरां, येशील कधीं परतून ? ' असें विचारलें आहे. पहिली कविता अशी आहे—" कोट रेशमी लग्नामधला मानेवर उसवून । उरल्या सुरल्या गुंड्यांचीहि वासलात लावून । बारिक सारिक हातरुमाला हातोहात उडवून । सद्ऱ्यांची या इस्तरिनें तव चाळण पार करून । खमिसांची हीं धिरडीं खरपूस भटि-मध्यें परतून । तिच्या भरजरी पैठणिची या मच्छरदाणि करून । "

माधव ज्यूलियन यांच्या प्रेमगीतांचें विडंबन करतांना, अत्रे यांनीं

रम्य व क्षुद्र उपमांची मुसळधार ओतली आहे. त्यांचा नमुना असाः— "आषाढिंचा अंधार मी । तूं फाल्गुनी मधुशर्वरीं ॥ खग्रास चंद्र मलिन मी । तूं कोर ताशिव सिल्व्हरी ॥ माजूम मी, तूं याकुती । मी हिंग काबुलि, तूं मिरी । अन् भांग तूं, चंडोल मी । गोडेल मी तूं मोहरी !"

याचप्रमाणें बालकवि व गडकरी या दोघांनीं लिहिलेल्या 'अरुणां'चें विडंबन करितांनाहि अत्रे यांनीं पन्नास कविता रचून उत्प्रेक्षांचा पाऊस पाडला आहे आणि शेवटीं म्हटलें आहे, "थकलों आतां ! ! उत्प्रेक्षांची संपत ये कथा । मान लचकली म्हणतां म्हणतां ही लांबट संथा ॥ "

क्षुद्र विषयाला मोठी उपमा दिल्यानें वाचकांचा अपेक्षाभंग होतो आणि त्यांतून विनोद निर्माण होतो. आपल्या सखीची प्रार्थना करतांना कवि म्हणतोः—"द्रोणगिरीसह जसा हनुमन्त येई, । बाजार आणिन इथें उचलून तेवी ! ॥ कीं आणसी उसनवार सदा म्हणून । शेजारणी तुजवरी पडल्या तुटून ॥ "

रामदासांनीं मनाला सरळ नीतिबोध केला आहे, तर अत्रे विडंबनाच्या उफराट्या भाषेंत आजकालच्या तरुण विद्यार्थ्याला कानमंत्र देतात कीं:— " सदा खाद्यपेयावरी हात मारी । बिलें देइ सारून मित्रासमोरीं ॥ " अरेरे, घरीं राहिले आज पैसे "। खिसे चांचपोनी मना बोल ऐसें ! ॥ इथें पायगाडी तिथें वाद्यपेटी । इथें पुस्तकें ना तिथें हातकाठी । अशी सारखी भीक मागीत जावें । स्वतःचें न कांहीं जगीं बाळगावें ! "

चहाच्या कपांतील माशीला उद्देशून निरानिराळ्या कल्पना करतांना अत्रे यांनीं 'माशा मारणें' या शब्दांवर कोटी केली आहे आणि जातां जातां आमदारांच्या आळशीपणावर एका ओळींतच शिंतोडे उडवले आहेत. ती ओळ अशीः—'कौन्सिलांत, सभासद आणी । मारतील कवणा तुजवांचुनी ? ॥

कवींवर कटाक्ष कां ?

कवि हाच अन्यांच्या विडंबनाचा प्रमुख विषय झालेला आहे. कवित्व-शक्तीचा महिमा गातांना केशवसुतांनीं 'आम्ही कोण ?' या कवितेंत अतिशयोक्ति केली आहे. तींच बिरुदें आपल्या अंगीं लावून कांहीं क्षुद्र

कवि मिरवतात हें पाहून अत्रे यांना चीड आली. आणि म्हणून त्यांनीं 'आम्हीं कोण ?' या कवितेचें खासें विडंबन केलें आहे. तिचा शेवट त्यांनीं पुढील ओळीनें केला आहे–"आम्हांला वगळा-गतप्रभ झणीं होतील साप्ताहिकें ! आम्हांला वगळा-खलास सगळीं होतील ना मासिकें ! ॥ "

दोन कवि एकत्र आले तर कसें वागतील याचें मजेदार वर्णन अत्रे यांनीं 'सांग कसे बसले ?' या कवितेंत केलें आहे. 'सांग कसें बसलों ?' या गोविंदाग्रजांच्या कवितेचा सांगाडा घेऊन त्यांत अत्रे यांनीं आपल्या विनोदाचा प्राणवायु फुंकला आहे, त्यामुळें ती सारीच कविता किती विनोदपूर्ण झाली आहे, पहा—ओळख होतां पहिल्या दिवशीं । पूर्व-जन्मिची मैत्री जशी ! मिठ्या मारुनी परस्परांशीं । जवळ जवळ बसले ॥ दुसऱ्या दिवशीं प्रसंग पाहुन । हळुच काढितीं बाड खिशांतुन । म्हणतां " दाखुं जरा का वाचुन ? " दूर-दूर-सरले ! ॥ " हवें काव्य तव भिकार कोणा ? । चोरितोस माझ्याच कल्पना " । असें बोलतां परस्परांना—। सांग कसे बसले ? ॥ "

एक चोर एका कवीच्या घरीं चोरी करावयास गेला, तेव्हां कवि त्याला आपला थोरला बंधू म्हणून संबोधतो. त्याचें कारण चोरानें विचारलें असतां तो सांगतो कीं, " सोनियाचे दागिने चोरसी तूं; । कल्पनांचे शिणगार मीं परंतू ! । हिऱ्यामोत्यावर सदा तुझा डोळा, । शब्द-मौक्तिक मी सदा करित गोळा ! । "

' प्रेमाचें अद्वैत ' या काव्यांत भाषा व कल्पना या दोन्ही साधनांनीं अत्रे यांनीं खुमासदार विनोद निर्मिला आहे सायकलीवरून दिवा न लावतां तो व ती चालले असतांना पोलिसानें त्यांना अडविलें. तेव्हां कवि त्या पोलिसालाच ऐटीनें म्हणतो–" अरे, प्रीतीच्या या प्रकाशापुढें । तुझ्या बिझलिच्या लाख बत्त्या फिक्या ! ॥ कशाचे दिवे घेऊनि बैससी । कुठें नौबती अन् कुठें ढोलक्या ! ॥ जरी आकृती दोन या पाहसी । असूं एक आम्ही तरी अंतरीं ! ॥ न ठावा कसा प्रीतीचा कायदा । कुड्या वेगळ्या एक आत्मा तरी ! ॥ "

कविमंडळी स्वत:ला अतिमानुष समजत आणि देवादिकांचे अव-

तार मानीत. त्यांचें शब्दचित्र अत्रे यांनीं चारच ओळींत काढलें आहे, तें असें—" आहें मी तर वाल्मिकी, वसतसे श्रीशारदा मन्मुखीं ! ' बोले एक, तया दुजा वदतसे, ' मी व्यास-प्रत्यक्ष कीं ! ' । हा येथें कवि कालिदास असतां बाता नका या करूं ! ' बोले गर्जुनी वीर एक तिसरा वाग्युद्ध झालें सुरू. ॥ " क्षुद्र कवींच्या अशा पोकळ बढाया ऐकून त्यांचा दंभस्फोट करण्याचा आवेश अत्रे यांच्या लेखणींत संचरतो आणि ते म्हणतात— " मस्त झालीं आहेत बडी धेंडें । एकएकांचीं फोडतोंच तोंडें ! " ॥

आपल्या विडंबनाचें अंतिम साध्य काय आहे हें सांगतांना अत्रे एका कवितेंत म्हणतात–" जेव्हां होतिल शब्द धेडगुजरी भाषेंतुनी नाहिंसे । बुद्धीचे ' अरबी ' समुद्र सगळे जातील कीं आटुनी ! ॥ स्फूर्तीच्या गिरण्याहि बंद सगळ्या होतील काव्यांतुनी । शांतीचे झरतील निर्झर तदा स्वच्छंद पीयूषसे ! ॥ "

अत्रे यांच्या विनोदाचेंच काय पण त्यांच्या सर्व वाङ्मयाचें, किंबहुना त्यांच्या सर्व जीवनाचेंच ध्येय त्यांनीं एका कवितेंत सांगितलें आहे, तें असें—" आनंदाची सर्व सुखाची जीवित ही खाण । हंसेल आणि जगेल त्यातें नच कसली वाण ! " ॥

— — —

प्रा. चिं. वि. जोशी : : २४

'विनोदाचार्य' कोल्हटकर यांनीं मराठींत जो हास्य-रसाचा नवाच प्रवाह सुरू केला, त्याची खोली व वेग वाढविण्याचे प्रयत्न गडकरी व अत्रे यांनीं केले. पण या तिघांहून निराळा असा आपला स्वतंत्र प्रवाह



निर्माण करण्याचें श्रेय प्रा. चिं. वि. जोशी यांना आहे. त्यांचा प्रवाह संथ असेल, खडकाळ जमिनींतून वहाणारा असेल आणि त्याच्या दोन्ही कांठावर रम्य वनश्री फुललेली नसेल; पण तो शीतल आहे, मधुर आहे आणि येणाऱ्याजाणाऱ्या सर्व पांथस्थांना सहज सेवन करतां येण्यासारखा आहे. कोणीहि यावें, त्या हास्य-प्रवाहांत बुड्या माराव्या, आणि चार घोट प्राशन करून प्रसन्न मनानें निघून जावें असा जोशी यांचा विनोद-प्रवाह आहे. त्यांत कोट्या-श्लेषादि शब्दलीलांचे भोंवरे फारसे आढळणार नाहींत, काव्य-कल्पनेचा खळखळाट ऐकूं येणार नाहीं आणि सामाजिक क्रांतीचा फसफसाटहि दिसणार नाहीं. साध्यासुध्या संसारांतील नेहमींचे प्रसंग व साधीभोळीं पात्रें यांचे मनोरंजक अनुभव सुबोध भाषेनें व सरळ मांडणीनें सांगूनच जोशी यांनीं महाराष्ट्राला हसविलें आहे. आपल्या विनोदाचा पिंड कसा आहे हें सांगतांना जोशी म्हणतात, "आम्हीं कथा प्रधान

करून सहज जमली तर एखादी कोटी, वाचकाला बोंचक वाटणार नाहीं अशी व्याजोक्ति आणि अशक्य प्रकारांत जमा होणार नाहीं अशी अतिशयोक्ति प्रसंगोपात्त वापरूं लागलों. कथेंत अनपेक्षित प्रसंग आणि विचित्र स्वभाव यांच्या वर्णनाचा मीठमसाला घालून, ती चटकदार करण्याचा आम्हीं यत्न केला. बहुतकरून प्रत्येक हास्यकथेंत तत्त्व ग्रथित करण्याचा माझा प्रघात आहे." मौज ही कीं, तत्त्वज्ञान हा त्यांचा कॉलेजांतील विषय, पाली वाङ्मयाचें संशोधन हें त्यांचें जीवित–कार्य आणि स्वभाव पाहिला तर गंभीर व विचारी; पण त्यांनीं कल्पनेनें निर्माण केलेले चिमणराव व गुंड्याभाऊ हे उपद्व्यापी पण उपकारी मावसभाऊ मात्र मराठी–भाषकांचे हसरे मित्र बनून राहिलेले आहेत.

स्वभाव–दोषांचें दर्शन

"मराठ्यांच्या वाङ्मयोद्यानांतील हास्यनिर्झर ज्यांच्या प्रतिभेंतून उद्भवला," त्या श्री. कृ. कोल्हटकरांना 'गुरुवर्य' मानून जोशी यांनीं आपलें 'एरंडाचें गुऱ्हाळ' अर्पण केलें आहे. पण कोल्हटकरांचे विनोद–गुण निराळे व जोशी यांचे वेगळे. कोल्हटकर–गडकऱ्यांनीं विनोदी लेख लिहिले आणि समाजांतील व्यंगांवर व रूढींवर विडंबनाचें शस्त्र धरलें; पण जोशी यांनीं आपल्या विनोदाला गोष्टींचें रूप दिलें, आणि त्यांतून हसतां हसतां वाचकाला मनुष्यस्वभावांतील दोष दाखवून व्यक्ति-सुधारणेचा मार्ग दाखविला. 'एरंडाचें गुऱ्हाळ' या आपल्या पहिल्या विनोद–ग्रंथाला त्यांनीं टोपणनांव दिलें आहे, तें "प्रोफेसरांच्या आणि संपादकांच्या गोष्टी" असेंच आहे. अर्थात् या गोष्टी म्हणजे कांहीं लघु–कथांच्या चौकटींत बसणाऱ्या नाहींत. पण कथानकाचा बारीकसा धागा घेऊन दोनचार पात्रांकरवीं त्यांतून गोष्ट विणून दाखविण्याची करामत जोशी यांची आहे. पांडुतात्या व बंडूनाना हे कोल्हटकरांचे बौद्धिक पुत्र जितके सुसंस्कृत मराठी–भक्तांचे लाडके आहेत किंवा बाळकराम व तिंबूनाना हे गडकऱ्यांचे प्रतिभा–पुत्र जितके तरुण मराठी वाचकांना आवडते आहेत, तितकेच चिमणराव व गुंड्याभाऊ हे जोशी यांचे मानस-

पुत्र महाराष्ट्रांतील घरादारांत आज पंचवीस वर्षे वावरत आहेत, बाल-वृद्ध, ज्ञानी–अज्ञानी स्त्रीपुरुषांना रिझवीत आहेत आणि त्यांच्या स्वभावांतील दंभ, लोभ, अहंकार इत्यादि लुप्त दोष मजेमजेनें दाखवून देत आहेत. निरुपद्रवी टीका निर्मल मनानें करून मनुष्याचें कल्याण यथाशक्य साधावयाचें, हें जोशी यांच्या लेखनाचें सूत्र आहे. त्यांनीं स्वतःच आपलें ब्रीद पुढील शब्दांनीं निवेदिलें आहे, " आपल्या यष्टेच्या योगें जनतेचें कल्याणच करायचें हा नारदाचा बाणा प्रत्येक तत्त्वशील विनोदप्रिय मनुष्याच्या अंगीं बाणला पाहिजे, मग तो लेखक असो कीं वक्ता असो किंवा साधासुधा मनुष्य असो ! "

विविध साहित्य

चिंतामणरावांचा जन्म पुणें येथें ता. १९ जानेवारी १८९२ रोजीं झाला. नूतन मराठी विद्यालयांत शिक्षण घेऊन ते १९०९ सालीं मॅट्रिक झाले. फर्गसन कॉलेजांतून १९१३ सालीं ' तत्त्वज्ञान ' विषय घेऊन ते बी. ए. झाले. पुढें दोन वर्षांनीं, पाली व इंग्रजी हे विषय घेऊन ते एम्. ए. झाले. पाली भाषेचा व त्या भाषेच्या द्वारां बौद्ध धर्माचा त्यांच्या मनावर चांगला पगडा बसला. पालीचे आचार्य प्रा० धर्मानंद कोसंबी हे त्यांचे गुरु. त्यांना ते फार मानतात. त्यांच्या विचारांची छाप चिंतामणरावांचे चित्तावर खूप पडली. पालीभाषेंत त्यांनीं बरेच ग्रंथहि लिहिले असून परदेशांतील मासिकांतहि त्यांचे लेख मान्यतेनें प्रासिद्ध केले जातात. ' जातकांतील निवडक गोष्टी ' किंवा ' मॅन्युअल ऑफ पाली ' अशीं परिचयात्मक पुस्तकें तर त्यांनीं लिहिलीं आहेतच, पण त्याशिवाय पालींतील पुराण–ग्रंथांचें संशोधन व संकलन करणारे अभ्यासक विद्वान म्हणूनहि त्यांचा लौकिक आहे. ' संशयाचें जाळें ', ' इंग्रजी शिष्टाचार ', ' अडीच हजार वर्षांपूर्वीचा समाज ', बालवाङ्मय, चरित्र, इतिहास इत्यादि विविध विषयांवर त्यांनीं पुस्तकें लिहिलीं असलीं, तरी मराठी वाचक त्यांना ओळखतो व चाहतो, तो त्यांच्या चिमणराव–गुंड्याभाऊंच्या विनोदी ग्रंथावरूनच. इंग्रजीतील मार्क ट्वेन, लीकॉक व

चेस्टर्टन हे " हाशाळ लेखक " त्यांचे आवडते ग्रंथकार होत. ' सत्याचे प्रयोग ' ' लग्न पहावं करून ' व ' सरकारी पाहुणे ' हे त्यांचे तीन बोलपट हास्यरसपूर्ण आहेत.

सरस्वतीची उपासना

लेखनाचा नाद चिंतामणरावांना लहानपणापासूनच लागला. पुण्यांत कथा-कीर्तनें ऐकावींत व त्यांतील अभंग-पदाप्रमाणें आपणहि रचना करावी असा त्यांना छंद होता. एकदां अभ्यासाच्या वहींत त्यांनीं अभंग लिहिले होते. ते पाहून वडिलांनीं त्यांना बक्षीस कोणतें दिलें ? तर चौदावें रत्न ! शाळेंत असतांना चिंतामणरावांनीं ' सुदर्शन ' नांवाची एक पौराणिक कादंबरीहि लिहिली. तिची फलश्रुति म्हणजे वडिलांनीं ती पाणी तापविण्याच्या बंबांत टाकून दिली ! आपल्या मुलानें खूप अभ्यास करावा, वर नंबर पटकवावा आणि जाडा विद्वान म्हणून नांवलौकिक कमवावा-अशी त्यांची मनीषा. ' केवळ अभ्यासवादी ' अशा त्यांच्या दृष्टीला आपल्या चिरंजीवांचे ललित साहित्यांतील चाळे अप्रिय वाटत. पुढें पुढें चिंतामणरावांनीं इतकें लोकप्रिय विनोदी लेखन केलें, तरी त्या जुन्या पिढींतील वृद्धाची तशा लेखनाविषयींची अढी कांहीं कमी झाली नाहीं. पण चिंतामणरावांना लिहावें व छापून यावें ही मोठी हौस. ते सांगतात, " आनंद मासिकाच्या दुसऱ्या वर्षी, मीं लिहिलेली एक गोष्ट माझ्या संपूर्ण नांवासह त्यांत छापून आली, तेव्हां माझ्या अभिमानास व आनंदास सीमा उरली नाहीं. " आपल्या दोघां मामांच्या मदतीनें चिंतामणरावांनीं ' तरवार ' नांवाचें हस्तलिखित वर्तमानपत्र १९०५ सालीं काढलें व तें तीन वर्षें चालविलें. त्यांत गोष्टी, चुटके वगैरे मनोरंजक विभाग लिहिण्याचें काम चिंतामणरावांकडे असे. ' संपादक व न्हावी ' हा गंमतीदार लेख चिंतामणरावांनीं इंग्रजी पांचवींत असतांनाच लिहिला व हरिभाऊ आपटे यांच्या ' करमणूक ' पत्राकडे धाडला. त्या लेखाला प्रसिद्धीचा योग आला पांच वर्षांनीं-आणि तो कॉलेजच्या त्रैमासिकांत. १९२६ पर्यंत ते गंभीर व विनोदी अशा दोन्ही प्रकारचें

लेखन करीत. पण मासिककर्त्यांनीं विनोदी लेखांचीच मागणी सतत केल्यानें चिमणराव–गुंड्याभाऊंचे पराक्रम त्यांच्याकडून लिहून झाले. आतां वयोमानामुळें मूळची प्रकृति अधिकच गंभीर झाली आहे, तरी संपादकांच्या मागणीमुळें ते 'नातीची करमणूक करण्यासाठीं तिच्यापुढें वेडीवाकडीं तोंडें करावींत त्याप्रमाणें' विनोदी लेखांचा पुरवठा करीत असतात.

पालीचे प्राध्यापक

उमरावती व रत्नागिरी येथें शिक्षकाचें काम करण्यांत चार वर्षें घालविल्यानंतर चिंतामणराव १९२० सालीं बडोदें येथील कॉलेजांत प्राध्यापक म्हणून गेले. तेथें मराठी, इंग्रजी व पाली यांपैकीं दोन भाषा ते आलटून-पालटून शिकवीत. १९२८ सालापासून 'राजदप्तरदार' (Director of Archives) म्हणून त्यांची नेमणूक बडोदें सरकारनें केली. जुनी हस्तलिखितें जमवून त्यांचें संशोधन करणें हें त्यांचें काम. तें करीत असतांहि त्यांच्या अंगावरील झगा कायमच होता. १९२९ पर्यंत ते कॉलेजांत पूर्ण वेळ शिकवीत होते आणि पुढें फक्त बी. ए., एम्. ए.-च्या विद्यार्थ्यांना पाली हा एकच विषय ते शिकवीत राहिले. १९४२ सालीं ते उज्जयिनी येथील 'मध्यभारत साहित्य संमेलना' चे अध्यक्ष होते. १९४९ सालीं सेवा-निवृत्त होऊन ते पुणें येथें आले आणि लघुकथा-कार य. गो. जोशी यांच्यासन्निध बंगला बांधून राहूं लागले. नातूबागेला या जोशी-द्वयानें साहित्यिक महत्त्व प्राप्त करून दिलें आहे. जोशी यांच्या या जोडीची लेखनशैली घरगुती, विनोदी व सात्त्विक अशीच आहे.

मामा–भाच्यांची जोडी

'बडोद्याचे चिंतामणराव' अशीच जोशी यांची ओळख महाराष्ट्रीय वाचकवर्गाला असली, तरी ते जन्मानें, शिक्षणानें व वास्तव्यानें 'पुणेकर'-च आहेत. ते नुसत्या पुण्याचेच नव्हे, तर त्यांतील 'सदाशिव पेठेचेहि' अभिमानी आहेत. 'सदाशिवपेठी' हा शब्द कांहीं विद्वानांच्या कोशांत

शिवीसारखा होऊन बसला होता, तर जोशी यांनीं आपलें 'गुंड्याभाऊ' हें पुस्तक "आई सदाशिव पेठे" सच अर्पण केलें आहे. "मला सदाशिवपेठी वाणाचा अभिमान आहे" असेंहि त्यांनीं आपल्या अर्पण-पत्रिकेंत नमूद केलें आहे. त्यांच्या पांच पिढ्या पुण्यासच होऊन गेल्या. चिंतामणरावांचे वडील विनायकराव यांनीं पुण्यांतील निरनिराळ्या हायस्कूलामध्यें शिक्षकाचें काम केलें. 'केवळ स्वार्थापायीं' नांवाची कादंबरी त्यांनीं लिहिली. प्रि. आगरकर यांच्या 'सुधारक पत्राचें संपादन चौदा वर्षें करण्याचा मानहि त्यांना लाभला होता. त्यांच्या घरीं वृत्तपत्रें, मासिकें व पुस्तकें यांचा पाऊस पडे आणि वाङ्मय-चर्चाहि चाले. त्याचा फायदा चिंतामणराव मनसोक्त घेत. 'निबंधमाले' ची गोडी तर त्यांना विलक्षण लागली. त्यांचे मामा कॅ. लिमये हे त्यांचे सहधर्मी. दोघेहि विनोदी लेखक. दोघांनीं एकत्र बसून वाचावें, विचार करावा व लेखनाची चर्चा करावी. त्यांच्या मातुल घराण्यावरच सरस्वतीचा वरदहस्त होता. ना. गं. लिमये हे कवि म्हणून प्रासिद्ध आहेत, तर पां. गं. लिमये यांच्या 'चतुरगडच्या विनोदी स्त्रिया' महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. वडील व मामा यांनीं आराधिलेल्या सरस्वतीचा कृपा-प्रसाद चिंतामणराव यांना सहजच लाभला.

बहुविध अनुभव

वास्तवता व विविधता हे चिंतामणरावांच्या विनोदाचे विशेष गुण होत. वास्तव सृष्टींतील हाडामांसाचीं माणसें घेऊन खऱ्याखुऱ्या प्रसंगीं तीं काय बोलतील, कशीं वागतील, हें त्यांनीं बारीकसारीक तपशिलासह रंगविलें आहे. 'चिमणराव म्हणजे चिंतामणरावच' असें वाटण्याइतक्या स्वभावांतील बारीकसारीक लकबी व खोंचा जोशी यांनीं रेखाटल्या आहेत. 'कलावंत नसलेला कारकून' तो असून साठ रुपये पगारांत आपला बायकामुलांचा संसार नेकीनें चालवीत आहे. त्याची भाषा बाळ-बोध, ओबडधोबड असते; पण सत्याचा आभास निर्माण करणारी असते. त्याचा मित्र गुंड्याभाऊ दांडेकर याचें शब्द-चित्र जोशी यांनीं बडोद्याचे

प्रो. ना. का. आपटे यांच्यावरून रंगविलें आहे. व्यायामप्रेमी, परोपकारी व निर्भय वृत्तीचा हा पुतळा आहे. बुद्धीनें दोघेहि ढिले असल्यानें व हवी ती उलाढाल करण्याची हिंमत अंगीं असल्यानें या जोडीचे पराक्रम वाचतांना कोणाचेंहि पोट दुखल्याशिवाय रहात नाहीं. या हसऱ्या जोडीच्या अनुभवांत गंमतीदार विविधता आहे. लेखकाला नोकरीच्या निमित्तानें खूप अनुभव आले व तेच त्यानें या दोन पात्रांत ओतून वाचकापुढें ठेवले. 'राजदप्तरदार' या नात्यानें जोशी यांना बडोद्याच्या सुविद्य व संपन्न अशा राजघराण्यांत जसें वावरतां आले, तसेंच खेड्या-पाड्यांतील भोळ्याअडाणी स्त्रीपुरुषांतहि मिसळतां आलें. खैबर घाटा-पासून कन्याकुमारीपर्यंत आणि कलकत्त्यापासून कराचीपर्यंत देशभर त्यांनीं पर्यटन केलें. थोर थोर साहित्यिकाशीं व महान महान मुत्सद्यांशीं बोलण्या-चालण्याचे प्रसंग त्यांना सहजच लाभत. त्या सर्वांचें टिपण त्यांनीं आपल्या बारीक नजरेनें आपल्या बुद्धीवर कोरून ठेवलें–आणि नंतर तेंच कलेचे थोडेफार रंग भरून महाराष्ट्राला सादर केले. झोपड्यापासून राज-वाड्यापर्यंतच्या विविध क्षेत्रांतील घटना गंमतीदार रीतीनें सांगण्यांत जोशी कुशल आहेत.

माफक शब्द-लीला

विनोद पिकविण्यासाठीं शाब्दिक कोट्यांचा पाऊस पाडण्याचा हव्यास जोशी यांना नाहीं. 'चौकसले,' दिलगिरला, 'दुजोरले' 'जमीनलों' अशीं क्रियापदें घडवून आणि 'शेकहण्डी,' 'बीज–दिवटी,' 'छत्रुकली,' इत्यादि कांहीं विचित्र शब्द बनवून नव–शब्दांची टांकसाळ पाडणाऱ्यांचें त्यांनीं कोठें कोठें विडंबन केलें आहे. चहा, (= पेय; वाहवा), कॉफी (= पेय, संगीतांतील राग) इत्यादि श्लेष जातां जातां साधले आहेत. दिवे लावणें, हवालदारांच्या नांवाचा हवाला देणें, वगैरे शब्दांवरील कोट्या तुरळक आहेत. दामले (= आडनांव, पैसे घे) किंवा 'मुलांचें तें मौलिक' अथवा रामभाऊ पटवर्धन (= व्यक्तीचें नांव, राम म्हणजे बलिराम, त्याचा भाऊ श्रीकृष्ण, त्यानें द्रौपदी–वस्त्रहरणाचे वेळीं पटाचें

म्हणजे वस्त्रांचें वर्धन केलें) अशा हरिदासी कोट्याहि थोड्याच. 'शेंड्याची बायको शेंडी' व 'सराची बायको सरी' अशा कोट्या बालांना हसविण्याजोग्या आहेत. ठोकोस्लाव्हियाचे बादशहा, वांदरलाल पोपट, चिवडाखान, डॉ. यमाजी भास्कर, प्रो. रुधिरप्रिय इत्यादि नुसतीं नांवेंहि खसखस पिकविणारीं आहेत. कांहीं कोट्या साधण्यासाठीं लेखक पर-भाषांकडेहि धाव घेतो हें आश्चर्य आहे. 'कार बेकार झाली.' अशी आंग्ल-मराठी-मिश्रित कोटि आढळते, तर Sundry (=संकीर्ण) याचा उच्चार 'सुंद्री' करून तिच्यासाठीं खर्च केला जातो, अशी गैरसमजूत लेखकानें निर्माण केली आहे. सून व soon या शब्दावरहि अँग्लो-मराठी कोटि त्यानें केली आहे. 'वाती' याचा अर्थ गुजरातींत 'गोष्टी' आहे, याचा फायदा घेऊन कीर्तनाचे वेळीं बायका दोन्ही अर्थांनीं वाती चळतात असें सांगितलें आहे. 'अॅस्ट्रॉय फट्' सारखे संस्कृत शब्दाचे इंग्रजी उच्चारहि हास्यकारक आहेत. 'वेलकम्' हा इंग्रजी शब्द म्हशीकडून वदविण्याचा 'चमत्कार' करून ज्ञानेश्वरांचें अल्पसें अनुकरण लेखकानें केलें आहे. 'आमचा पण गांव' या संशोधनपर ग्रंथांत चि. मोरूनें हरणगांवच्या पहाणीचा वृत्तांत दिला आहे. त्यांत तो म्हणतो, "म्हशींनीं तारवटलेल्या डोळ्यांनीं तिच्याकडे पाहून बँक ह्या शब्दानें तिला सलामी दिली. मला वाटलें बँक हा वेलकम् शब्दाचा अपभ्रंश असावा."

'दिवाणसाहेबांचें घड्याळ' या हास्य-कथेंत मद्रासी लोकांच्या लोचटपणावर टीका करतांना सर शब्दावर जोशी यांनीं कोटी केली आहे, ती अशी "सर, सर, करून उदयाला चढणाऱ्या मद्रासी लोकांच्या रेल्वेच्या नांवाचीं आद्याक्षरें देखील एस. आय. आर, असावीं ह्या योगायोगाच्या कल्पनेनें रघुवीरसिंहाला हसूं आलें."

वेचक उपमा

उपमा-दृष्टांतादि अलंकार देऊन जोशी कृत्रिमता आणीत नाहींत. क्वचित् एखादी उपमा ते जेव्हां देतात, तेव्हां ती किती समर्पक असते याचें

उदाहरण ' स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग ' या लेखांत पहावयास मिळतें, तें असें, " लग्नाच्या मिरवणुकींत ब्यांडची गर्जना थांबल्यावर जशी वाजंत्र्यांची पिरपिर चालू होते, त्याप्रमाणें आईची सरबत्ती बंद पडल्यावर सौ. ची पिरपिर चालू झाली. "

तसेंच ' कंपॉझिटरचा सूड ' या हास्यकथेंत पुढील गांवरान उपमा आढळते. " वयांत आलेला नवा गोऱ्हा जसा म्हाताऱ्या पोळास हुंदाडून हुंदाडून शिवेपार घालवितो, त्याप्रमाणें चरक्यानें देवगडसमाचाराची अवस्था केली. '

श्लेषाची चुणूक

' माझा सेकंड क्लासचा प्रवास ' कसा घडला हें सांगून चिमणरावांनीं एका शाळेंतील स्वागत गीतांतील शब्दांची मौज वर्णिली आहे. हैबतखान पठाण यांचेऐवजीं चिमणराव अध्यक्षस्थानीं बसले असतांना मुलें पद म्हणत होतीं, " पठाण हैबत–खान पाजी । अहो किति तरि पाजी चा विद्यामृत सगळ्यांला आजी मंगलदिन आला ॥ "

पहिला चरण पुनः पुनः घोळून तीं मुलें गात होतीं व त्यामुळें 'पाजी'चा दुसराच अर्थ श्रोत्यांच्या चित्तावर जास्तजास्त ठसत होता ! तसेंच आजीचे दोन अर्थहि हशा पिकवीत होते.

' गुंड्याभाऊचें दुखणें ' दूर करण्यासाठीं थुंकी, रक्त, दांत वगैरेंची तपासणी ' क्ष ' किरणानें करते वेळीं झालेल्या संवादांत ' खाणें ' यावर लेखकानें कोटि केली आहे. तो संवाद पुढीलप्रमाणें—

" माझ्या बोलण्याकडे लक्ष न देतां प्रोफेसर पुणें म्हणाले, ' पोटांत सुई, टाचणी, चवली, पावली मिळाली गेली असली, तरी ती ' क्ष ' किरणाच्या फोटोंत ताबडतोब स्पष्ट दिसते. "

' तर मग आमच्या म्युनिसिपालिटीचे जकात–इन्स्पेक्टर खवखवे म्हणून होते. त्यांना पैसे खाण्याची फार संवय होती; त्यांनीं खाल्लेले पैसे देखील 'क्ष' किरणांनींच उघडकीस आले असतील ? '

' आली ' या साध्या शब्दांवर कोटी करून जोशी यांनीं किती विनोद निर्माण केला आहे, हें ' आमचा पण गांव ' यांत दिसून येतें. त्यांतील

एका शिक्षकाचें सर्व लक्ष शाळेच्या कामांत गढलेले असतें. त्याची पत्नी म्हणते, " माझ्या मोठ्या मुलाच्या पाठीवर मुलगी झाली, हें शाळेंतून परत आलें तेव्हां सासूबाईंनीं सांगितलं नांव घेऊन, मुलगी आली रे बाबा घरांत. लगेच हे म्हणतात, ' दे घालवून परत ! आम्ही आपल्या शाळेंत मुली घेत नाहीं...."

तसेंच, ' स्टेशनस्टाफची मेजवानी ' या लेखांत ' तेल ' वर कोट्या करण्यांत आल्या आहेत. प्रत्येक पात्राची विशिष्ट भाषा योजून रचलेला तो संवाद असा--

" रामप्रसाद-अपने रामभाऊला हा तेलाचा मिठाई लई आवडतो.

रामभाऊ (गुडस क्लार्क) म्हणूनच मी तैलबुद्धि झालों आहें.

नथोबा-म्हणून नाहीं कांहीं. मागें तूं बर्मा ऑईल कंपनीच्या टाकींतलं तेल लांबवलंस, तेव्हांपासून तैलबुद्धि—"

ठरीव ठशाचें वक्तृत्व करण्याची नाटकी पद्धत कांहीं व्याख्यात्यांची असते. एकाच अर्थाचे तीन तीन शब्द निरर्थकपणें वापरून ते टाळ्या मिळवितात. या यांत्रिक वक्तृत्वाचें विडंबन 'माझा सेकंड क्लासनें प्रवास ' या लेखांत जोशी यांनीं केलें आहे, तें असें—

" आणखी या वडगांवच्या रणभूमीची आठवण झाली, स्मरण झालें, स्मृति आली कीं प्रत्येक मराठ्याचें अंतःकरण, प्रत्येक महाराष्ट्रीयाचें हृदय प्रत्येक दक्षिण्याचें मन थरारून येतें, छाती भरून येते, ऊर फुटूं लागतो."

पोकळ पांडित्याचें विडंबन

तसेंच कांहीं विद्वानांना समेंत भाषण करतांना उगाचच जाडेजाडे शब्द घालण्याची खोड असते. तिची थट्टा करणारें भाषण वरील लेखांतच हेडमास्तरांच्या तोंडीं घातलें आहे. संस्कृतप्रचुर शब्दरचना आणि शब्दालंकार व अर्थालंकार यांची योजना यांच्या अकारण व अवास्तव वापरांमुळें तें भाषण किती हास्यास्पद झालें आहे पहा—" हे समस्तमावलप्रांतस्थ कृषीवल-पट्टवान्-सावकार-श्रेष्ठी-आदिकरून सज्जनवृंद हो ! या दीन चातकाच्या आर्तरवानें द्रवून चंद्राप्रमाणें या मंडपांत

उदय पावलेत, या चक्रवाकाच्या आमंत्रणाचा आदर करून भगवान् सहस्र-रश्मीप्रमाणें या शाळेच्या भावी, भव्य, भपकेदार कोनशिला बसविण्याच्या शुभप्रसंगीं विद्यमान राहिलेत, इंद्रायणीथडीच्या या इटांच्या इमारतीचा इमला उठविण्यासाठीं इंद्राप्रमाणें नटून सादर झालेत, हे तुमचे महदुपकार आहेत. ''

उपमांचा अस्थानीं सडा पाडणाऱ्या लेखकांचें विडंबन ' बाप्यान्ला नाहीं तें समजायचं ' या लेखांत जोशी यांनीं केलें आहे. तें असें— '' पिवळ्या सोनचाफ्यासारखा मंजुळेचा रंग फिकट होऊन ती आतां पांढऱ्या चाफ्याच्या फुलासारखी दिसूं लागली होती, तिचे चमकणारे डोळे विहिरीच्या पाण्यावर पडलेल्या चंद्राच्या पडछायेगत खोल दिसूं लागले. तिचं गुटगुटीत अंग सुकलेल्या दोडक्यावाणी खोल दिसूं लागलं. ''

तसेंच ' पेटींतील गौप्य ' या विनोद-कथेंतहि नायकाला नायिकेचें सौंदर्य सर्वत्र कसें भासमान होत असें हें सांगतांना सुंदर विडंबन साधलें आहे. तें असें —'' अब्दुल गवळ्याचा रेडा डुलत डुलत जाई तेव्हां त्यास फतिमेच्या गजगतीची आठवण होई, व जर तो रस्त्यानें धांवत चालला तर त्यास वाटे, फतिमेनें याची गजगति चोरल्यानेंच हा अशा द्रुतगतीनें चालला आहे कीं काय ? बाजारांतील बटाटे पाहून त्यास फतिमेच्या ठळक डोळ्यांची, दुकानांत टांगलेलीं गंगावनें पाहून तिच्या केंसाची, बांबूचे भारे पाहून तिच्या सुंदर व कृश हातापायांची त्यास आठवण होऊन त्याचा कलिजा व्यथित होऊं लागला. ''

बहुरंगी भाषाशैली

भिन्नभिन्न विभागांतील व व्यवसायांतील माणसांची भाषा वेगवेगळी असते. तिचा फायदा जोशी यांनीं विनोदासाठीं जितका करून घेतला, तितका दुसऱ्या कोणी क्वचित्च घेतला असेल. 'जसा उच्चार, तसें लेखन' केल्यानें ' असॉल, ' ' दिखीत ' ' नशीब काहाडलें, ' ' किन्न्न्चित ' 'कोण्ण्ण्णाच्या' इत्यादि शब्द विचित्रपणें डोळ्यापुढें वावरतात. निरक्षरांचे उच्चार, स्त्रियांचे उच्चार, बालांचे उच्चार हे नुसते जसेच्या तसे लिहिले

तरी हशा उत्पन्न करतात. विशिष्ट धंदेवाल्यांची भाषा तर हेंगाडीच असते. 'खेडेगांवांतील घरगुती धंदे' या लेखांत बाळशेट वापरतो ती भाषा अशी:— " नाणीं पाडायचा नि णोटा शापायचा मक्ता सरकारणीं घेतला आहे; टाकसाळींतून पुरते रुपय टाकत णाहींत म्हणून णोटा शापायचा शेपखाणा घातला णाशकास—" यांतील विनोद स्पष्ट करण्यासाठीं लेखकानें पुढें ' शेपखाणा ' वर ' शेतखाना नव्हे ' असें भाष्य जोडलें आहे !

जुन्या काळांतील जहागिरदाराचा तिरसटपणा एका छोट्याशा उपमेनें जोशी यांनीं प्रगट केला आहे, तो असा:—

" 'नो, म्हैसूर स्टेट,' हे तीनच शब्द भिकाऱ्याच्या अंगावर फेकलेल्या तीन दिडक्यांप्रमाणें त्यांनीं गुंड्याभाऊच्या अंगावर फेकले. "

खेड्यांतील कारागिराची भाषा कशी असते हें पुढील वाक्यावरून कळून येते. " ' खोटं बोलत असेन तर ह्या वस्तऱ्यानीं माझ्या पोटच्या पोराचा गळा कापीन मालक ! ' वस्तरा उंच करून खेडवळ रीतीची प्रतिज्ञा करीत बापू म्हणाला. त्याला पोरगा नव्हता ही गोष्ट वेगळी." शेवटच्या लहानश्या वाक्यांत किती विनोद सांठवला आहे !

खेड्यांतील अडाणी माणसाची भाषा कशी असते हें ' कंपाझिटरचा सूड ' या हास्यकथेंतील पुढील एका वाक्यावरून कळून येणार आहे:— " म्हातारपणान् चांगलं दिसत नाय म्हणून सांगतों. भलतीच चूक राहून जायची ! " लिंबाजीरावांनीं बजाविलें."

बायकांची घरगुती बोली कशी असते याचा मासला ' त्यानें लग्न कां केलें नाहीं ? ' या लेखांत पुढीलप्रमाणें पहावयास मिळतो:— " थेट इकडचा नमुना ! एकदां आपल्या स्नेह्याला जेवाला म्हणून बोलवाला जाचं झालं, त्यांच्याशीं दोन तास गोष्टी बोलत बसले नि जेवाला सांगाचं विसरून आले ! आम्ही वाट पाहा पाहा पाह्यली नि त्यांच्याकडे निरोप पाठविला, तर ते जेवून बसले होते. ' मला कधीं जेवायला बोलावलं ? ' असं ते म्हणाले, त्यांतलाच हा मासला ! "

' प्रामाणिकपणाविषयीं ' (किंवा ' नांवाविषयीं ') ' आजीबाई ' या

लेखांत एका वृद्ध खाणावळवाईचा स्वभाव तिच्या भाषणांतून लेखकानें मार्मिकपणें प्रगट केला आहे. जगांतील कोणताहि विषय असो, त्यावर आजीबाईचें मत नाहीं असें नाहीं–आणि जें मत असावयाचें तें अगदीं ठाम व विसंगतीनें गोडाविलेलें ! त्यांच्या तोंडच्या दोन–तीन वाक्यांवरूनहि त्यांच्या मनोवृत्तीची कल्पना कोणासहि येईल. उदाहरणार्थ, " जोशी बुवा, फुटबॉल घ्या,' एक फुगलेली ताजी पोळी पानांत टाकून आजीबाई म्हणाल्या, ' आहो, या नांव ठेवायला कांहींच ताळतंत्र राहिला नाहीं. ..... ' वाः आज आमटींत भुईमुगाचे दोन दाणे सांपडले बुवा ! ' आमटीचा भुरका घेत नाडकर्णी म्हणाले. ..... म्युनिसिपालिटीच्या एखाद्या मिरासदार अध्यक्षाप्रमाणें पोळपाटावर लाटणें आपटून त्यांनीं फर्माविलें, ' आरडर आरडर ! "

अल्पशी अतिशयोक्ति

कोल्हटकर–गडकऱ्याइतकी बेसुमार अतिशयोक्ति चिंतामणराव टाळात असतात, तरी अतिशयोक्ति हा हास्याचा हुकमी एक्का. तो ते केव्हां केव्हां वापरतात. ट्रॅमला वीस वर्षे उशीर झाला असे तेहि कॅ. लिमयेप्रमाणें लिहितात. ' मोटारउड्डाण ' या लेखांत ते सांगतातः––" एकदां एक अर्धांगवायूनें पांगळा झालेला रोगी गुंड्याभाऊच्या मोटारीपासून आपला बचाव करण्यासाठीं इतक्या जोरानं उडाला, कीं त्यावेळीं शरीरांत झालेल्या विद्युत्संचारामुळें त्यांचे दुखणें नाहींसें होऊन तो साफ बरा झाला अशी आख्यायिका आहे. "

' तिहेरी पेंच ' मधील शालिमार कवीच्या कवितांनीं सचेतन-अचेतन सर्व सृष्टीला वेड लागलें होतें, हें पुढील शब्दांनीं लेखकानें वर्णिलें आहे, " कोकिळेचें कूकू, कावळ्यांची कावकाव, चिमण्यांची चिवचिव, बेडकांचें डरांव डरांव, मांजरांचें म्यांवम्यांव, सर्वांतून शालिमारचीं प्राणिगीतें उमटत होतीं. मांजरीचीं लहान पिलें अहमहमिकेनें एकावर एक सप्तकांत मियांव मियांव करूं लागलीं कीं, शालिमारचा करुणरस मूर्तिमंत अवतरला

आहे असें वाटे. जंगली वाघ आपल्या डरकाळ्यांत शालिमाराचें 'ऊठ मराठ्या, फेक खराट्या, घे हातीं तलवार !' या वीररसप्रधान पोवाड्याचें चौक गागत असत, तर पहांटच्या वेळीं बडबड बडबड करून लोकांची झोपमोड करणारे बुलबुल शालिमारच्या प्रणयगीतांनीं बुलबुलणींस आराधूं लागले. सजीव सृष्टीप्रमाणें निर्जीव सृष्टीहि शालिमारच्या वाङ्मयाच्या जादूनें भारली गेली. आगगाडी वेगांत चालू असतां तिचा तो ठठय् ठमक ठठय् ठमक आवाज बदलून जाऊन ती वेगांत असतांना शालिमारचीं उत्स हगाणीं आपल्या चाकांतून काढूं लागली. गिरण्यांच्या घडम् घडम् आवाजांतून शालिमारचीं समतापद्यें उमटूं लागलीं. निदान स्नेहलतेला तरी तसें वाटत होतें. "

त्याच गोष्टींतील आणखी एक अतिशयोक्ति म्हणजे मासिकाच्या लोकप्रियतेची. शालिमारच्या कविता छापणाऱ्या मासिकाचें आकर्षण कोणाला किती असें, हें सांगतांना चिंतामणरावांनीं मार्क ट्वेनला शोभेशी अतिशयोक्ति केली आहे.–" घरांतील माणसांत तो अंक वाचण्यासाठीं भांडणें लागत व अंकाच्या खेचाचेचींत श्रीगणेशा शिकणाऱ्या मुलापासून अर्ध्या गोवऱ्या दहनभूमींत गेलेल्या आजीबाईपर्यंत सर्वजण भाग घेत. रात्रीं अंक वाचून उशाशीं ठेवण्याचीसुद्धां सोय राहिली नाहीं. कां कीं मांजर किंवा उंदीर हळूच येऊन अंक लंबे करूं लागले. "

उपहासाचें हत्यार

उपहास हेंहि विनोदाचें एक अमोघ शस्त्र आहे. तें कोल्हटकर—गडकऱ्यांइतकें सरीस जोशी वापरीत नसले तरी क्वचित् तेहि त्याचा उपयोग करतात. 'स्टेशनस्टाफची मेजवानी' या लेखांतील शास्त्रीबुवा म्हणतात– " अहो मास्तर, हे सुधारक हॉटेलांत जाऊन काय खातात–पितात, किती बहकले आहेत हें पहायला मला त्यांच्यावर नजर ठेवायला मधून मधून युरोपियन हॉटेलांत जावं लागतं. त्याशिवाय वस्तुस्थितिदर्शक प्रवचनं मला कशीं करतां येतील ? फार तर काय, युरोपियन लोकांचा धिंगाणा अन् त्यांचा सुधारणांचा पिंगा पहायला मी मधून मधून बॉल्सनादेखील जातों

खरा; पण श्रीकृष्णांनीं सांगितल्याप्रमाणें माझी आसक्ति मात्र या धर्मावर नाहीं. काय समजलां ? शंकराचार्यांनींसुद्धां परकायाप्रवेश करून संसाराचीं सुखं अनुभवलींच कीं नाहीं ? ”

शब्दनिष्ठ विनोदापेक्षां कल्पनानिष्ठ विनोदावर जोशी यांचा भर आहे आणि उपहासाच्या शस्त्रानें कोणाचें हृदय रक्तबंबाळ करण्याऐवजीं संसारांत जखमी झालेल्या हृदयावर सहानुभूतीची फुंकर घालण्याकडे त्यांचा ओढा आहे. तरी लेखकवर्गाला उपहासाचा बारीकसा चिमटा घेतांना ते ‘ कंपाझिटरचा सूड ’मध्यें लिहितात—“ मात्रा जुळवितां न येणारे कवी, उदाहरणें बरोबर सोडवितां न येणारे अंकगणितकार आणि खोट्या बातम्या देणारे वर्तमानपत्रकार यांचा तो केवढा उपकारकर्ता आहे ! स्वत: अपराध करून नामानिराळे होणाऱ्या लेखकांना कंपॉझिटरसारखा त्राता नाहीं. ”

प्रत्येकाला आपल्या घराण्याचा अभिमान सहजच असतो. पण जेव्हां कांहीं लोक आपल्या वंशाची मुळी सूर्यचंद्रापर्यंत नेऊन पोचवतात तेव्हां तो थट्टेचा विषय होतो. हें तत्त्व सांगण्यासाठीं ‘ आमचा पण गांव ’ यांतील सुतार म्हणतो:—“ ‘ भटब्राह्मणांचा पितामह ब्रह्मदेव जलमला न् मग त्याच्या बारशाच्या दिवशीं आम्हीं त्याचे कान टोचले म्हणून आम्ही ब्रह्मदेवाच्याही अगोदरचे असं दैवज्ञ म्हणतात; आम्ही म्हणतों ब्रह्मदेवाला ज्या पाळण्यांत घातला तो पाळणा आम्हीं केला होता—’ ”

“ परिटा, येशिल कधिं परतून ? ” हें अत्रे यांचें विडंबन-काव्य प्रसिद्धच आहे. तसेंच विडंबन जोशी यांनीं गद्यांत केलें आहे. हरणगांवच्या परिटाला पुढील मार्मिक प्रश्न विचारण्यांत आले.—

“ ‘ भाऊराव, मला एक शंका आहे. तुम्हीं धुवायला दिलेल्या कपड्यांला भोंकं पाडून जाळीदार कोणत्या हत्यारानं बनवतां तें हत्यार मला पहायचं आहे,’ मी म्हणालों.

“ ‘ कोटांचीं अन् विजारींचीं बटनं तुम्ही हातोड्यांनीं फोडतां कां तीं फोडायचं एखादं यंत्र असतं तुमच्याजवळ ? ’ राघूनें विचारलें.”

समाज जीवनावर टीका

सार्वजनिक जीवनांतील अप्रामाणिकपणा दाखविणारी 'स्टेशन स्टाफची मेजवानी' ही कथा जितकी विनोदी तितकीच टीकात्मक आहे. रेल्वे-खात्यांशीं ज्यांचा कोणत्या ना कोणत्या नात्यानें संबंध आला असेल, त्यांना तेथील बारीकसारीक घटनांचेहि जोशी यांनीं केलेलें स्पष्ट व सत्य चित्रण आल्हाददायक वाटल्याशिवाय राहणार नाहीं. चिरीमिरी व चोरा-पोरी हे रेल्वे-राज्यांतील महामंत्र होत. सनातनी शास्त्रीबुवांच्या दांभिकपणाची यथेष्ट चेष्टा लेखकानें केली आहे. हैदराबादच्या लग्नांतील मेजवानीमधील जी-उष्टी खरकटी मिठाई भंग्यांना मिळाली. तिचा कांहीं भाग त्या भंग्यांनीं आपल्या सग्यासोयऱ्यांना रेल्वेपार्सलनें पाठविला. तें पार्सल फोडून खाण्याची चोरी स्टेशनावरील साऱ्या नोकरांनीं केली आणि शास्त्रीबुवा-सकट साऱ्या लोकांनीं त्या मिठाईवर ताव मारिला अशी ही कथा आहे.

'भक्त-कसोटी' ही सारी गोष्टच उपहासप्रचुर आहे. आजकाल भौतिक सुधारणांची चलती असली, तरी त्या आमच्या अध्यात्मविद्येपुढें फोल ठरतील, असें मत बाळगणाऱ्या सनातनी लोकांचे विचार नारदाच्या मुखानें लेखकानें हास्यास्पद करून मांडले आहेत. नारद बेकार गरुडाला आश्वासन देतांना म्हणतात, "अखेर पौर्वात्य आध्यात्मिक संस्कृतीचाच विजय होऊन या आधिभौतिक सुधारणा आमच्या वडिलांनीं चतुर्मुखांनीं वर्णिलेल्या वेदांच्यापुढें लोटांगण घालतील! अरे मूढा! खनिज तेलें संपल्यावर या फटफट्या ओढायला आज अडगळींत टाकलेले अश्व आणि बलीवर्द यांचींच आर्जवें करणें भाग पडेल."

जोशी यांनीं आपलें कर्तबगारीचें आयुष्य एका मोठ्या संस्थानांत घालविलें. त्यामुळें लहानमोठ्या संस्थानांतील बऱ्यावाईट गुंतागुंती व गमती त्यांना पुऱ्या माहीत आहेत. क्रिकेटपटु गुंड्याभाऊ धरमगडच्या ठाकूर-साहेबाकडे नोकरीस गेला. तेव्हां त्याला एक संस्थानी अधिकारी सांगतातः—"आम्हां संस्थानी अंमलदारांना सिनेमांतल्या नटापेक्षांदेखील वेगळाल्या प्रकारचीं सोंगं करावीं लागतात. दरबारला जातांना नाना

फडणीस बनून जावं लागतं, ऑफिसला जातांना साहेब व्हावं लागतं, क्लबांत खेळायला जातांना तरुण खेळाडूसारखा छचोर पोषाक करणं भाग पडतं, तर शिकारीला जातांना फील्ड मार्शलचा आव आणावा लागतो."

कल्पनानिष्ठ विनोद

विसंगत कल्पनेंतून पाझरणारा हास्यरस अधिक मधुर असतो. सरकार नाशिकास बडा छापखाना चालवून व हजारों रुपये दरमहा खर्चून नोटा छापतें; त्यापेक्षां आपण एका पेटाऱ्यांत थोड्या खर्चांत नोटा व नाणीं छापतों, ही बाळशेटची बढाई किती विनोदी आहे ! मानवी स्वभावांतील असा इरसाल मूर्खपणा व आचरट हावरेपणा हे विनोदाचे सर्वकाळींचे व सर्वस्थळींचे विषय होत. कल्पनानिष्ठ विनोद फुलविण्यांत जोशी यांनीं मोठें यश कमावलें आहे. त्यांचा मानसपुत्र गुंड्याभाऊ म्हणजे 'सुदृढ खांद्यावर युक्तिबाज डोकें.' त्याचें परोपकाराचे व तत्त्वनिष्ठेचे पराक्रम वाचून कोणाच्याहि पोटांत दुखूं लागेल. कोणत्याहि चांगल्या तत्त्वाचा अतिरेक झाला म्हणजे तो कसा हास्यास्पद होतो, याचें हृदयंगम चित्रण जोशी यांनीं 'स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग' या लेखांत केलें आहे. काळवेळ न पाहतां व सारासारविचार न करितां सत्य बोलण्यानें किती अनर्थ ओढवतात हें त्यांत दाखविलें आहे. कु. तरुणीबाईंचें व्याख्यान ऐकून चिमणरावाच्या अंगांत स्पष्टोक्ति संचारली. ही एक कल्पना जोशी यांनीं हलके हलके फुलवली आहे. चिमणरावानें आपला भिडस्तपणा टाकला आणि तो ज्याला त्याला सत्य सांगत सुटला. त्याचा मेव्हणा किडमिडे हा क्षयानें अंथरुणाला खिळला होता. त्याच्या प्रकृतीबद्दल चिमणरावानें डॉक्टरला खोदूनखोदून विचारलें. तेव्हां डॉक्टरांनीं त्याची आशा नसल्याचें सांगितलें. हें सत्य कानीं पडतांच "स्पष्टवक्तृत्वाचें वारें प्यालेला" चिमणराव ताडकन् त्या रोग्याजवळ गेला आणि—

'काकासाहेब' वीररसप्रधान गद्य नाटकांतील नायकाप्रमाणें हेल काढीत मी उद्गारलों, 'आतां कसची कादंबरी अन् कसचं नाटक ! ह्या बिचाऱ्या शंकर किडमिड्याचं आयुष्य म्हणजे शोकांत कादंबरीच होणार

आहे. ह्याला कादंबरी वाचून दाखविण्याऐवजीं गरुडपुराण किंवा महाभारतांतलें स्वर्गारोहणपर्व वाचून दाखवलं तर बिचाऱ्याला परलोकांत तरी त्याचा कांहीं उपयोग होईल !'

आपलें मरण ओढवल्याची वार्ता ऐकून रोग्यावर व त्याच्या आप्तेष्टांवर काय परिणाम झाले, पहा—" तो ऐकतांच शंकरनें 'अरे बाप रे!" असे उद्गार काढून डोक्यावरून पांघरूण घेतलें. काकासाहेबांनीं 'श्रीराम श्रीराम' करीत शेजारच्या खुर्चीवर डोकें टेकिलें आणि काकूबाई " अरे माझ्या बाळा ! " असें ओरडत मुलाला मिठी मारून ओक्साबोक्शीं रडूं लागल्या. हा अनपेक्षित प्रकार पाहून मीं तेथून हळूच पाय काढिला. "

ढोंगीपणावर टीका

' वर–पित्याचा घोटाळा ' ही कथा म्हणजे एका विनोदी कल्पनेचा बहारदार विस्तार होय. प्राप्तीवर कर आकारणारा अधिकारी हा ओक व एका वधूचा पिताहि ओकच. त्यांच्या ओळखीची अदलाबदल झाल्यामुळें चिमणरावाचें सोंग अंगाशीं येतें. आपला दर्जा आतां किती वाढला आहे हें सांगतांना चिमणराव म्हणतात, " मी आतां मिलिटरी हिशेब खात्यांत पाऊणशें टिकल्यासाठीं खर्डेघाशी आणि ' यस्सर, एक्सक्यूज सर ' करणारा कारकून राहिलों नसून ' टू फिफ्टी ' मिळविणारा 'व्हेरी–गुड–मिस्टर–आय मीन–मेजर–कुरतुड–सिंघ ' असें बरोबरीच्या नात्यानें अंमलदारांना ठणकावणारा सुपरवायझर (निरीक्षक) झालों आहें. " चिमणराव ' आयपतकर अधिकाऱ्याला ' चुकून वधू-पिता समजून आपल्या श्रीमंतीची नसती बढाई सांगतो आणि त्यामुळें त्याचेवर इन्कम टॅक्स माल बसतो, उलट खऱ्या वधू–पित्याला कर–अधिकारी समजून आपल्या कंगालीचा पाढा वाचतांना चिमणराव म्हणतो, " छे हो, लेक्चरर कोण नेमतं आहे त्या शंखाला ? डिमॉन्स्ट्रेटर नेमलं आहे दरमहा साठ रुपयांवर. त्यांतूनच एम्. एस्सी च्या फीचा न् पुस्तकांचा खर्च करावयाचा म्हटला म्हणजे शिल्लक काय राहतं आहे ? " अशी हलाखी ऐकल्यावर कोणता वत्सल पिता आपली पोर त्या घरांत लोटील ? त्यानें

नकार दिला. समाजांत नेहमीं आढळणाऱ्या दुतोंडीपणावर ही टीका किती मार्मिक आहे !

मजेशीर विडंबन

'माझे दत्तक वडील' या विनोदी लेखांत एका वृद्ध भामट्याच्या लीला वर्णिल्या आहेत. बिचारा चिमणराव साठ रुपयांमध्यें संसाराचा गाडा कसाबसा हाकीत होता. त्याची वडिलार्जित तुटपुंजी जिंदगी रत्नागिरीस होती. तिचा वसूल आणण्यासाठीं चिमणराव रत्नागिरीस गेला असतांना त्याला एक म्हातारा भेटला. तो दिसण्यांत अगदी भोळाभाबडा होता. "चिमण ! बाळ चिमण !" असें म्हणून त्यानें चिमणरावाला प्रेमानें कडकडून मिठी मारली. आपण फार मोठे श्रीमंत आहोंत पण आपलीं सारीं मुलें देवाघरीं गेलेलीं आहेत आणि स्वप्नांत गुरूनें दत्तक घेण्याचा आदेश दिला व त्या दृष्टांतांतील दत्तक मुलगा म्हणजेच चिमणराव अशी कहाणी त्या म्हाताऱ्यानें सांगितली. त्याच्या जिनगीमुळें चिमणरावाच्या तोंडाला पाणी सुटलें आणि म्हणून तो म्हातारा जेव्हां रत्नागिरीहून चिमणरावाच्या घरीं राहावयास आला तेव्हां त्याची बडदास्त चिमणरावानें एखाद्या सरदारासारखी ठेवली. त्यापायीं चिमणरावाला कर्जहि झालें. संशय येतांच चिमणराव रत्नागिरीस जाऊन चौकशी करून आला. तेव्हां त्या म्हाताऱ्याचा थापेबाजपणा त्याला कळून आला. पण आतां कळून काय उपयोग ? म्हाताऱ्यानें केव्हांच पळ काढला होता. चिमणराव मात्र पैशाच्या टंचाईत आला. म्हणून तो शेवटीं म्हणतो, "गेल्या चार महिन्यांतील देणीं फेडण्यासाठीं वाचकांनीं मला पर्स अर्पण करावी अशी विनंती आहे. नाहीं तर तरुणांचे मूर्खपणाचे प्रकार निस्तरणारा परमेश्वर जो सासरा, तो माझा पाठीराखा आहेच."

गवयांच्या मैफलींचें वर्णन अतिशयोक्तीनें लिहिण्यांत कांहीं लेखकांची महाराष्ट्रांत जणू चढाओढ लागलेली होती. तिचें विडंबन 'ह्याहि कलावंतांच्या सान्निध्यांत' या लेखांत जोशी यांनीं खुमासदारपणें केलें आहे. आचारी—पाणके वगैरे कलावंतांच्या मुलाखती त्यांनीं विस्तारानें वर्णिल्या

आहेत. एके ठिकाणीं ते असें वर्णन करतात कीं, " दुधाबरोबर सदोबांचें हृदयहि ढवळलें जात होतें. चारपांच वेळां ढवळल्यावर त्यांनीं अल्लाद उचलून एक थेंबहि उतूं जाऊं न देतां नैपुण्यपूर्वक रीतीनें चीज संपतांच गायिका ज्याप्रमाणें आपल्या हातांतला तंबोरा जणूं काय तो नुक्ता तासापूर्वी जन्मलेला मुलगा आहे असें समजून हलक्या हातानें जपून शेजारीं ठेवून देते, त्याप्रमाणें भुईवर ठेवलें. "

मालाची जाहिरात आणि गोष्टीचें कथानक या दोहोंची खिचडी किती खमंग होऊं शकते हें जोशी ह्यांनीं " जाहिरातीसंबंधीं १८३२ शब्द " या लेखांत दाखविलें आहे. पूर्वी ' करमणूक ' पत्रांत ' पिंकपिल्स ' च्या जाहिरातीचा मजकूर गोष्टीरूप असे. तिचें खासें विडंबन या जाहिरातमिश्रित गोष्टींत लेखकानें केलें आहे.

मुद्रण-दोषांच्या मौजा

वर्तमानपत्रांतील मुद्रण-दोष कोणा वाचकाला बोचत नसतील ? पण त्या दोषाच्या चिखलांतून हास्याचें कमळ फुलविण्याचें चातुर्य जोशी यांनींच दाखिवलें आहे. ' कंपॉझिटरचा सूड ' हा त्यांचा विनोदी लेख खूपच गाजला. ' महाराजांच्या ' ऐवजीं ' महाराच्या ' किंवा 'विधानाचा' याऐवजी 'निधनाचा' अशा नुसत्या छपाईच्या सत्य चुकांची माळ गुंफली तरी ती हास्य उत्पन्न करते. पण तेवढ्यावरच जोशी थांबले नाहींत. या विसंगतीच्या धाग्यानें त्यांनीं एक लहानसें कथानकच विणलें. अशा चुकांची गर्दी होण्यास कारण चिडलेला कंपॉझिटर दाखविण्याचें त्यांनीं ठरविलें. आणि तो कंपॉझिटर चिडण्याचें कारण त्यांनीं असें कल्पिलें कीं, एक संपादकच दुसऱ्या संपादकाच्या स्पर्धेमुळें कंपॉझिटरचें काम करूं लागला आहे आणि त्या नोकर बनलेल्या संपादकाला तो दुसरा संपादक मालकशाहीच्या गुर्मीनें धुडकावून लावीत आहे. अशी दुर्दशा पहिल्या संपादकावर येण्याचें कारण त्याचें अज्ञान हें आहे. अशी सयुक्तिक कारणमालिका आधीं गुंफल्यामुळें पुढील मुद्रणदोष स्वाभाविक वाटतात व त्यामुळें वाचकांना त्यांतील हास्यरसाचा आस्वाद

निर्भेळपणें घेतां येतो. एका लग्नपत्रिकेंत ' माजी हुजूर डेप्युटी कलेक्टर'ला जुळाऱ्यानें फट्‌दिशीं 'पाजी मजूर' बनविलें आणि रावसाहेब र. वा. भागवत यांचें नांव 'रासभा खा गवत' असें पडलें. शेवटीं ' लग्न–समारंभा '–ऐवजीं 'नग्नसमारंभ ' व ' गंधें ' ऐवजीं ' गध्ये ' अशीं अक्षरें पडल्यामुळें संपादकाच्या डोक्यांत सोटे पडण्याची पाळी आली. ' सलगी ' ऐवजीं ' मुलगी ', ' प्रेमाच्या ' ऐवजीं 'प्रेताच्या', 'जोराची' ऐवजीं 'चोराची', ' कविवर्य ' ऐवजीं ' कपिवर्य ', ' माडीवर ' ऐवजीं ' मांडीवर ', 'भगिनी' ऐवजीं 'भंगिनी', 'वीरांगना' ऐवजीं 'वारांगना'–अशा मुद्रण–दोषामुळें किती घोटाळा उडाला हें वाचतांना कोणाला हसूं येणार नाहीं?

जीवनांतील भावनेचें महत्त्व

" त्यानें लग्न कां केलें नाहीं? " ही जोशी यांची एक बहारीची कथा आहे. तींत विनोद आहे, कल्पकता आहे, सहृदयता आहे व सूक्ष्म टीका पण आहे. तिशींच्या आंतबाहेर असणारे प्रो. हणमंतराव हे अविवाहित राहून इतिहासाचें संशोधन करण्यांत जन्म घालवीत होते. एकदां ते लोणावळें येथें जहागिरदार सराटे यांचेकडे रहाण्यास गेले. जहागिरदारांची कन्या प्रभावती हणमंतरावांच्या 'कडकडीत देशाभिमानानें, जाड्या विद्वत्तेनें आणि कमावलेल्या शरीर—सौष्ठवानें ' दिपून गेली. त्यांचा बोलण्यांतील आवेश, रसाळपणा, बहुश्रुतपणा इत्यादि गुणांनीं तिच्यावर मोहिनी पाडली. तिचें त्यांच्यावर प्रेम बसलें. तिनें त्यांच्याशीं लग्न करण्याचें मनांत आणिलें. पण हणमंतरावांना त्याचा दाद ना पत्ता! त्यांना तिनें " मला एक प्रश्न विचारायचा आहे, गडे! " असें लाडीकपणानें म्हटलें. तरी त्या प्रोफेसराच्या डोक्यांत कांहीं प्रकाश पडला नाहीं. तेव्हां प्रभावतीनें अधिक स्पष्टपणा पत्करून त्यांना विचारलें, " माझ्या मैत्रिणीचें प्रेम एका इतिहासाच्या अभ्यासकावर बसलेलें आहे. पण वडिलांनीं एका श्रीमंत अधिकाऱ्याबरोबर तिचें लग्न ठरविलें आहे, तर तिनें काय करावें? " तेव्हां हा गंभीर पुतळा निर्विकारपणें एखादें पुस्तकी उदाहरण सोडविल्याप्रमाणें म्हणतो–" ठीक आहे. या मनु-

ष्याला आपण अ हें नांव देऊं. अ हा बहुगुणसंपन्न आहे, बहुधनसंपन्न आहे, स्वरूपानं गोमटा आहे, 'क्षी 'वर त्याचें प्रेम आहे, परंतु क्षीचें त्याच्यावर प्रेम नाहीं," काचेचा एक पांढरा कागद-दडपणाचा गोळा प्रभावतीपुढें जोरानें आदळून ते म्हणाले, "हा समजा अ. आणखी," निळ्या रंगाचा दुसरा गोळा तिच्यापुढें ठेवून ते म्हणतात, "हा समजा आ, म्हणजे तुमच्या मैत्रिणीला ज्याच्याविषयीं पेंच पडला आहे असा दुसरा पुरुष." तो 'आ' आपल्या मैत्रिणीचें प्रेम ओळखीत नाहीं अशी तक्रार प्रभावतीनें केली, तरी ती आपल्याला उद्देशून आहे हें न कळल्यामुळें प्रोफेसरमहाशय म्हणतात, "अरे, वा! तर मग ती मुलगी फारच स्पृहणीय असली पाहिजे यांत शंका नाहीं. आणखी तिच्यासारख्या मुलीचं प्रेम आपल्यावर असून तें न समजणारा हा मनुष्य अगदींच अरसिक, मठ्ठ, करंटा असला पाहिजे! समर्थीना तो माहीत असता तर करंट्याच्या लक्षणांत त्यांनीं त्याचं वर्णन गोवण्याचं बाकी ठेवलं नसतं! अगदींच शतमूर्ख दिसतोय!" प्रोफेसर त्या व्यक्तीविषयीं तिरस्कारानें पुढें उद्गारले, "तर मग ज्या ठोंब्याला एका मुलीच्या प्रेमार्द्र अंतःकरणांतल्या जिवंत भावना उलगडत नाहींत तो मृत इतिहासांतले मोठाले शोध काय लावणार? तें दिसतच आहे! असल्या व्यवहारशून्य शंखांशीं तिचें लग्न लावण्यांत कांहीं अर्थ नाहीं."

शेवटीं क्षी व अ यांच्या मस्तकांवर आनें अक्षता उधळल्या. ज्ञानाचा गोळा हा केवळ कांचेचा गोळा ठरला. भावनेला पारखे असणाऱ्यांचें जीवन नीरस व दुःखमय कसें होतें हेंहि यांत सूक्ष्मपणें दाखविलें आहे.

केवळ विनोदार्थ

कांहीं कांहीं गोष्टींत केवळ विनोद निर्माण करण्यासाठीं जोशी यांनीं चुकामूक व गैरसमज यांचा उपयोग केला आहे. केवळ रेल्वेचें रिटर्न तिकिट वायां जाऊं नये म्हणून दुसरें लग्न करणारे शेटजी त्यांनीं चित्रित केले आहेत. संपादक बाबूराव हॉटेलांतील ज्या खोलींत राहिला त्याच खोलींत बाबू चष्मेवाला हा दरोडेखोरहि पूर्वी राहिला होता. या योगायोगामुळें एका

बातमीदारानें दरोडेखोराची म्हणून घेतलेली संपादकाची मुलाखत द्व्यर्थी कशी झाली आणि तिच्यामुळें जो तो दचकून व वचकून कसा पाहूं लागला याचें गमतीदार वर्णन जोशी यांनीं केलें आहे. सर्कशींतील वाघ-सिंह भीमरावाला भितात, तो भीमराव आपल्या बायकोला भितो आणि ती बायको झुरळाला घाबरतें असे विनोदी प्रकार एका कथेंत वर्णन करून चिंतामणरावांनीं हंशा पिकविला आहे.

सुशिक्षितांचीं दोष-स्थळें

"गुंड्याभाऊचें दुखणें" हा लेख जितका हास्यपूर्ण आहे तितकाच टीकागर्भहि आहे. "अख्या मुंबईत तुझ्यासारखा निरोगी माणूस दुसरा कोणीहि नाहीं." हें डॉक्टरांनीं गुंड्याभाऊस सांगितलें पण दोनशें रुपये खर्च झाल्यानंतर. शहरांतील सुशिक्षित म्हणविणारे डॉक्टरलोकहि आपल्या ज्ञानाचा काळा बाजार कसा करतात आणि भोळ्याबापड्या जनतेच्या पैशावर दिवसाढवळ्या कसें दरवडे घालतात, हें विनोदी पद्धतीनें चिंतामणरावांनीं या लेखांत सांगितलें आहे. एक डॉक्टर गुंड्याभाऊची थुंकी तपासतो तर दुसरा रक्त तपासतो आणि तिसरा क्ष किरणानें फोटो काढतो. चौथ्यानें तर गुंड्याभाऊऐवजीं चिमणरावाचेच तीन दांत काढून टाकले, इतकी त्याला कामाची घांदल! बलभीमाची मूर्ति असलेल्या गुंड्याभाऊला क्षयाची भावना झालेली आहे असाहि संशय डॉक्टरानें प्रगट केला.

प्रोफेसर पागलगांवकर शास्त्रीय ज्ञानाचा काळाबाजार करून खेड्यांतील लोकांना कसें लुबाडतात हें एका कथेंत गंमतीनें दाखविलें आहे. मंगळ, गुरु, शुक्र वगैरे आकाशांतील ग्रह मी दुर्बिणींतून दाखवितों, असें म्हणून हे प्रोफेसर कुंभारवाड्यांतील गाढवें व गांवांतील ड्रेनेज, तांबडा कंदील वगैरे दाखवून लोकांना चकवितात, असें विस्तारानें वर्णिलें आहे.

पहिली पत्नी हयात असतांना आपली बौद्धिक भूक भागविण्यासाठीं दुसरी बायको करण्याचा संप्रदाय कांहीं प्रोफेसरांनीं सुरू केला. त्या वेळीं त्यांवर तीक्ष्ण टीकेचे मोठे हल्ले झाले. जोशी यांनींहि आपलें विनोदाचें शस्त्र परजलें आणि 'सुमनचें सामाजिक संशोधन' या नांवाचा लेख

लिहिला. त्यांतील प्रा. दिघे यांच्या सपत्नीक विवाहाचा बोजवारा त्यांच्या विद्यार्थ्यांनीं कसा उडविला हें सांगून जोशी यांनीं जणुं कांहीं शाब्दिक निषेधापलीकडील मार्गच आपल्या वाचकांना दाखवून दिला.

नानाविध पैलू

श्री. चिंतामणराव जोशी यांना बडोद्यासारख्या सुविद्य, संपन्न व पुरोगामी संस्थानांत मानाची, ऐश्वर्याची व स्वाध्याची नोकरी लाभली. याचा उपयोग लेखनाकडे करून समाज—हित साधण्याइतकी उदारबुद्धि त्यांचे ठायीं आहे. बहुश्रुतपणाची व अनुभवाची बैठकहि त्या लेखनाला सहजच लाभली. मुख्य म्हणजे ते निर्भेळ बुद्धिवादी असल्यानें बुद्धीला न पटणाऱ्या विषयावर आपलें विनोदाचें हत्यार ते निर्भीडपणें चालवूं शकतात. त्यांच्या प्रत्येक लेखांत त्यांचें बुद्धि–स्वातंत्र्य तळपतांना दिसतें. बहुश्रुतता, अनुभव, बुद्धिस्वातंत्र्य व समाजहिताची कळकळ हे गुण अंगीं असल्यामुळें जोशी यांनीं विनोदी लेखन विपुल प्रमाणांत केलें. त्यांत कांहीं बत्तासे असतील, कांहीं पेढे असतील, तर कांहीं चुरमुरेहि असतील. कांहीं लेख वाच्यार्थानें लिहिलेले आढळतात, तर कांहींमध्यें नांवांचीं किंवा धंद्यांची नुसती जंत्री दिलेली असते. कांहीं लेखांना गोष्टीचें कौंदण बसाविलेलें आहे, तर कांहीं लेखांना लघुनिबंधाचा मुखवटा आहे. कैक लेखांत शुद्ध विनोद खेळत आहे, तर कांहींमध्यें तात्त्विक विचार नीरस पाल्हाळानें व गंभीरपणानें सांगितलेले आहेत. रस्त्यावरील एका कुत्र्याच्या पिल्लाचें रक्षण गाय—म्हशी करतात, पण माणसांची मोटार त्याचा चुराडा करते, असें सांगून त्यांनीं एका कथेंत " मानवतेचें स्तोम " माजविणाऱ्यांना योग्य इषारा दिला आहे, " आरोग्यमातेचें मंदिर " हा लेख तर चटकदार प्रचाराचा नमुना आहे.

साधेपणाचें सौंदर्य

' शेंकडा शंभरांतला साधा माणूस ' कसा असतो व त्याचे नित्याच्या व्यवहारांत कोणते दोष दिसतात, हें दाखवून जोशी वाचकांच्या डोळ्यांत नकळत अंजन घालतात. ' स्टेशनस्टाफची मेजवानी, ' ' कंपॉझिटरचा

सूड ' ' त्यानें लग्न कां केलें नाहीं ? ' इत्यादि त्यांचे लेख म्हणजे मराठी-तील विनोदाचे विजय-ध्वजच होत. गुंड्याभाऊविषयींच्या लेखांत चरित्राचा एक धागा गोवलेला असल्यानें त्याचा उपवास व त्याचें दुखणें, त्याची दरबारी नोकरी व त्याचा संस्थानी पाहुणचार-या सर्वाविषयीं वाच-काचे मनांत आधींपासूनच आपोआप सहानुभूति उत्पन्न होते. सर्वसामान्य वाचकाला रुचेल व पचेल असाच चिंतामणरावांचा विनोद असतो. विनोदाची शिकार करण्यासाठीं ते उपहास अतिशयोक्ति यांचीं बंदुका— पिस्तुलें जशीं घेत नाहींत, तशींच श्लेषकोट्यांचीं वाघनखेंहि फारशी घालीत नाहींत. उघड्या अंगानें व मोकळ्या हातानें दाट जंगलांत शिरून वाघासिंहाची शिकार करण्याइतकी हिंमत व करामत चिंतामणराव जोशी यांनीं विनोदाच्या क्षेत्रांत दाखविली आहे. साधासुधा पण स्वतंत्र असा आपला पंथ काढून मराठी वाचकांना हसतहसत चार सुविचार सांगणारे जोशी यांनीं सरस्वतीच्या दरबारांतहि ' राजदप्तरदारा'सारखेंच मानाचें स्थान कमावलें आहे.



प्रा. चिं. वि. जोशी यांनीं सुरू केलेला विनोद-प्रवाह वाढविण्याचें काम त्यांचे मामा कॅ. लिमये यांनीं यशस्वीपणें केलें आहे. गुरु-शिष्य, पिता-पुत्र किंवा बंधु-बंधु अशा जोड्या मराठी साहित्यिकांमध्यें मधूनमधून



आढळतात. परंतु मामा-भाच्यांची एकाच विषयांतली, एकाच चेहऱ्या-मोहऱ्याची साहित्यसेवा फारशी आढळत नाहीं. कोल्हटकर—गडकरी—अत्रे यांच्याहून वेगळ्या धर्तीचे लेख लिहून प्रा. जोशी व कॅ. लिमये यांनीं महाराष्ट्रांत हास्याची लागवड केली. विशेष हें कीं, कॅ. लिमये यांचा जीवनांतील व्यवसाय साहित्य-सेवेला फारसा पोषक नव्हता; किंबहुना हास्याच्या अगदीं उलट अशा रौद्र-करुण-बीभत्सादि रसांचें तांडवनृत्य पहातच त्यांना कांहीं काळ काढावा लागला. 'हेलकावे' या पुस्तकांतील त्यांच्या चारहि कथा केवळ कारुण्यपूर्णच आहेत. त्यांत मनोविश्लेषणाची कला चांगली साधली आहे. पण त्यांचें मुख्य ललित लेखन आहे विनोदी.

शस्त्रधारी साहित्यिक

लेखणी हें एक शस्त्र आहे असें आपण म्हणतों, पण तें लक्षणेनें. जातिवंत लेखक साहित्य लिहितो, तें शाईनें नव्हे तर आपल्या रक्तानें, असें जें

म्हणतात, तें अलंकारिक अर्थानेंच खरें असतें. लाल लाल व कढत कढत रक्त वीररस उचंबळविणाऱ्या वाग्भटानेंहि किती वेळां पाहिलेलें असेल ? पाहिलें असेल तर बहुधा त्याला घेरीच आली असेल ! पण कॅ. लिमये यांनीं दुहेरी नात्यानें खरेखुरें शस्त्र वापरलें आहे. डॉक्टर म्हणून तर त्यांनीं रोग्यावर शस्त्र-क्रिया अनेकवार केलीच, पण पहिल्या महायुद्धांत आफ्रिकेंतील प्रत्यक्ष रणांगणावर जाऊनहि त्यांनीं आधुनिक शस्त्र-देवतेचें दर्शन घेतलें. क्रिकेटची बॅट व फिडलचा गज हे ते जितक्या सफाईनें चालवितात, तितक्याच कुशलतेनें डॉक्टरचा चाकू व सैनिकाचें पिस्तूलहि वापरूं शकतात—आणि ही चतुरंग ' शस्त्र-क्रिया ' करतां करतांच आपली विनोदी लेखणीहि ते चालवूं शकतात. त्यांच्या डोक्यावरून बंदुकीच्या गोळ्या सूं सूं करीत चालल्या असतांनाहि, त्यांच्या डोक्यांत हास्यरसाचें कारंजें उडत असे. समोर मृत्यु उभा असतांनाहि ते स्मितमुखानें सरस्वतीची पूजा बांधीत होते. क्रीडांगण कलांगण व रणांगण—या तिन्ही क्षेत्रांत त्यांनीं प्रशंसनीय यश संपादिलें आहे.

विविध कलांचा नाद

श्री. गोपाळ गंगाधर लिमये यांचा जन्म ता. २ सप्टेंबर १८९१ रोजीं पुणें येथें झाला. त्यांचे वडील बेळगांव येथें सबजज्ज होते. त्यामुळें त्यांचें प्राथमिक शिक्षण तेथेंच झालें. पुढें वडिलांची बदली पुण्यास झाल्यामुळें गोपाळरावांचें दुय्यम व उच्च शिक्षण पुणें येथें झालें. वयाच्या सोळावे वर्षी ते मॅट्रिकमध्यें उत्तीर्ण झाले. शाळेंत असतांना आपले भाचे श्री. चिंतामणराव जोशी यांच्या सहकार्यानें त्यांनीं 'तलवार' नांवाचें हस्तलिखित साप्ताहिक चालविलें. वाङ्मयाचें वाचन, चिंतन व चर्चा करून लेखनापर्यंत हे मामा-भाचे हातांत हात घालून मजल मारीत. दोघांनाहि विनोदाची हौस. गोपाळरावांचा हात साहित्याप्रमाणें चित्रकलेंत व तंतुवाद्यावरहि चालत असे. त्यांचा स्वभाव उमदा व आनंदी. कॉलेज-मध्यें ' त्राटिका ' नाटकांत त्यांनीं काम केलें होतें. मेडिकल कॉलेजांतील अभ्यासक्रम पूर्ण करून ते एम्. बी. बी. एस्. झाले. पहिल्या महायुद्धाचे

वेळीं १९१७ सालीं त्यांना कमिशन मिळालें व पूर्व आफ्रिकेंत त्यांची नेमणूक झाली. त्या ' लष्करी डॉक्टरी 'च्या नोकरीचा राजीनामा त्यांनीं १९२१ सालीं दिला. नंतर त्यांनीं पुणें येथें स्वतंत्र दवाखाना काढला. पण पुढें मुंबई कार्पोरेशनची नोकरी मिळाल्यामुळें ते तिकडे गेले. साहजिकच त्यांच्या कांहीं लेखांत मुंबईतील घटनांवर विनोद उभारलेला आहे, तर कांहींमध्यें डॉक्टरी व्यवसायांतील गमतींतून हास्य-रस पाझरत आहे. लष्करी वातावरणाचेंहि भांडवल त्यांनीं विनोदाचा व्यापार करण्यासाठीं वापरलें आहे. त्यांच्या विनोदाची भाषा साधी असून प्रसंगांत विविधता आहे. विरोधाभास व अतिशयोक्ति या स्फोटक द्रव्यांनींच त्यांनीं आपले हास्याचे बाँबगोळे मुख्यतः भरलेले आहेत.

विरोधी वाक्यांची गुंफण

विरोधी वाक्यांची वीण गुंफण्यांत लिमये यांची लेखणी चतुर आहे. सर्वांना सहज कळेल असे विरोधाभासाचे नमुने त्यांच्या लेखनांत सर्वत्र विखुरलेले आहेत. त्यामुळें साधाच विचार पण गंमतीनें मांडल्याचें पाहून वाचकाचें मन उल्हसित होतें. सोपी भाषा, हरघडीचे प्रसंग व आटोपशीर मांडणी या बाह्यांगाचे पोटीं विरोधाभास व अतिशयोक्ति हे दोन बहुमोल अलंकार लिमये जपून ठेवतात. 'आमची (आळंदीची) सायकलट्रिप' व 'छकडा, सिंहगड आणि कुत्रें ' हीं दोन प्रवास-वर्णनें तर वाचकाला हसून हसून हैराण करणारीं आहेत. निर्भेळ विनोदाचे निर्मळ नमुने ते आहेत. आपल्या नातलगाच्या अस्थि टाकण्यासाठीं बाबूराव आळंदीस सायकलीवरून गेले. तेव्हां त्यांना ज्या अडचणी आल्या व त्यामुळें त्यांची जी धांदल उडाली, ती आपल्या डोळ्यापुढें उभी रहात असतांना कोणाहि वाचकाच्या मुरकुंड्या वळल्याशिवाय रहाणार नाहींत. गुंड्याभाऊच्या सायकलीचा अगडबंब थाट चिंतामणराव जोशी यांनीं दाखविला आहेच. आतां लिमये बाबूरावांच्या सायकलीचें वर्णन करतात तें असें:—" त्या सायकलला फक्त टायरट्यूज नव्या घालून नवी फ्रेम टाकली असती तर सायकल कोरी करकरीत नाहीं असें म्हणण्याची कोणाची छाती नव्हती.

रिम्स इतक्यांतच बदलावयास नको होत्या व ॲक्सल नुकतेंच नवें बसविलें होतें." अशा सायकलीवरून मागेंपुढें पुढेंमागें करीत, आस्ते आस्ते प्रवास करून जात असतांना, वाटेंत अपघात किती तरी झाले. त्यांचा परिणाम काय झाला हें सांगतांना लिमये अशी अतिशयोक्ति ठोकून देतात कीं, "बाब्याची सायकल अशी मजबूत होती कीं एकदां तीच एका मोटार लॉरीवरून गेल्यामुळें लॉरीचे तुकडे तुकडे झाले होते!" मोटार लॉरीलाहि तोंड देणारी सायकल बैलगाडीपुढें मात्र दीन झाली. 'पुलावरून जात असतां समोरून येणाऱ्या एका खटाऱ्याचे बैल उधळले. पुलाचा कठडा व खटारगाडी यांच्या सांपटींत बाबूरावांची सायकल सांपडली व अस्थींचें गांठोडें कठड्याला अडकलें! कठड्याच्या फटींतून सायकलसकट बाबूराव पुलाखालीं पडणार अशी स्थिति आली!' ही स्थिति जो वाचक आपल्या डोळ्यापुढें उभी करील, त्याला हसूं लोटल्याशिवाय कसें राहील? शेवटीं लेखकाला प्रश्न एवढाच पडला कीं, "बाबूरावांनीं नातलगाच्या अस्थि इंद्रायणीत टाकल्या कीं नातलगाच्या अस्थींनीं बाबूरावांच्या अस्थींना जलसमाधि दिली?"

"हें वर्णन वाचून एकाच्या मनांत जरी सायकल–ट्रिपचा बेत फिसकटविण्याची स्फूर्ति झाली, तरी लेखकाला या लेखाचें श्रेय आल्यासारखें वाटेल." असा विडंबनपर समारोप लेखकानें केलेला आहे.

हास्यकारक प्रसंग

आळंदीची सहल सरळ; तरी तिला छपन्न अडचणी आल्या; मग सिंहगडची सफर किती त्रिकट! तिला सत्त्राशें साठ विघ्नें यावयास नकोत काय? रात्रीं नऊ वाजतां पुण्याहून बैलगाडीनें सिंहगडला जाण्याचा व्यूह लेखक, जोशीबुवा वगैरेंनीं ठरविला. वक्तशीरपणा त्यांनीं इतका राखला कीं, बरोबर पहांटे साडेचार वाजतां गाडीचीं चाकें फिरूं लागलीं! याचें कारण काय? तर गाडीवाल्यांनीं आपल्या मनाशीं तीच वेळ ठरवून ठेवली होती आणि म्हणून रात्रभर त्यांनीं ताणून दिली होती! त्यांना उठवून वेळेवर गाडी जोडण्यास लावावें, म्हणून लेखक व जोशीबुवा

सं. नं.

त्यांच्या वस्तीकडे गेले. पण जातांना वाटेंत एक कुत्रें आढळलें. त्यामुळें जोशीबुवा भेदरले. कारण " श्वापदांमध्यें रात्रींच्या रस्त्यावरील निजलेल्या कुत्र्याला ते फारच भीत असत. याचें कारण असें कीं, त्यांची आत्या कुत्रा चावून मेली होती. तेव्हांपासून चित्रांतील कुत्र्याकडेही ते साशंक दृष्टीनें पाहात व घरांतील मुलांना खेळांतील कुत्रा विकत घेण्याचीही मनाई होती. एकदां मुलांच्या मामानें मुलांना एक खेळांतील कुत्रा बक्षीस दिला होता. पण जोशीबुवांनीं त्याची शेपटी सरळ करून त्यांचें मांजर बनविलें होतें. "

सुदैवानें तें कुत्रें मेलेलें आहे असें त्यांना आढळलें. " कुत्रें मेलेलें पाहून जोशीबुवांच्या जिवांत जीव आला. त्यांची आत्या जिवंत कुत्रा चावल्यामुळें मेली होती. पण त्या आतेचा भाचा आज मेलेलें कुत्रें न चावल्यामुळें मरण्याच्या बेतांत आला होता. " असा विरोधाभास लेखकानें सहज साधला आहे.

ते दोघेजण कसेबसे गाडीवाल्यापाशीं जाऊन पोंचले. पण ते डाराडूर झोपलेले ! तें वर्णनहि विरोधाभासाच्या मौजेनें करतांना लेखक म्हणतात, " त्या जिवंत गाडीवाल्यापेक्षां ती निर्जीव गाडीच अधिक हालचाल करीत होती; कारण वाऱ्यानें तिचा फाटका तट्टया तरी फाडफाड उडत होता. " शेवटीं एकदांच्या गाड्या घरापाशीं आल्या. पण जसे गाडीवान, तशाच घरच्या बायका–अगदीं झोपाळू. या दुहेरी झोपाळूपणामुळें कर्त्या पुरुषांची धांदल कशी उडाली पहा—" बायकांना जाग्या करून व मुलांना कसेबसें उठवून आम्ही सामान गाडींत ठेवण्याकरितां बाहेर घेऊन आलों. पाहातों तों गाडीवाले पुन्हां निद्रिस्त ! त्यांना उठवून आंत गेलों तों पुन्हां बायका निजलेल्या ! याप्रमाणें आलटून–पालटून बायकांना व गाडीवाल्यांना उठविण्यांतच किती तरी वेळ निघूं लागला. "

अशा बायकांना घेऊन सिंहगड चढणें किती जोखमीचें, हें सांगतांना लेखकानें पुनः असा विरोधाभास निर्माण केला आहे कीं, " घोरपडीच्या साहाय्यानें तानाजी वर चढला, तर या घोरपडी आमच्या साहाय्यानें वर चढूं लागल्या. शिवाजीच्या वेळच्या घोरपडींत व आतांच्या घोरपडींत

एक मात्र साम्य होतें. घोरपड खेंचली की ती जमिनीला घट्ट बिलगून धरते, तशा आमच्या घोरपडीही आम्ही घाई करूं लागलों कीं–मुळीं जागच्या हलेनाशा होत !"

ठरीव ठशाचीं प्रवास-वर्णनें पुरविणारें 'साहित्य–निर्माण–मंडळ-' लेखकानें एका लेखांत वर्णिलें आहे. त्यांच्या 'काव्य मॅन्युफॅक्चरिंग कंपनी' इतकेंच तें मनोरंजक आहे.

अनिष्ट रूढींवर टीका

'जुना बाजार' हा आपला विनोदी लेख–संग्रह लिमये यांनीं कोल्हटकरांचे पांडुतात्या व गडकऱ्यांची ठकी यांना विभागून अर्पण केला आहे. ही जी विनोद–बुद्धि अर्पण–पत्रिकेंत, तीच पोकळडोके व चोंबडे यांच्या प्रस्तावना–पुरस्कारांत! त्यांतील आरंभींचाच लेख 'पंत जेवावयास जातात' हा इतका प्रसंगनिष्ठ विनोदानें यथथवलेला आहे कीं,तो वाचतांना न.चिं.केळकर यांच्या 'माझी गाडी कशी चुकली?' या सुप्रसिद्ध गोष्टीचीच स्मृति व्हावी. लग्न–समारंभाचे वेळीं जेवणास किती बेसुमार उशीर होतो व त्यामुळें पाहुण्यांचे प्राण कंठाशीं कसे येतात पण त्याची खंत यजमानास कशी वाटत नाहीं, या सर्वांचें सुंदर चित्र लिमये यांनीं रेखाटलें आहे. जेवणाचें निमंत्रण होतें अकरा वाजतांचें, पण दोन वाजेपर्यंत जेवणाचा पत्ता नाहीं ! यजमान मात्र सावकाश घरीं येऊन नापिताकडून 'कारागिरी' करवून घेतात व त्यांचीं मुलेंबाळें पिठलेंभात खाऊन आंचवावयासाठीं पंतापुढें येतात. पंतांना मात्र फक्त झोपेचीच मेजवानी मिळते.

मनोहर विरोधाभास

अशाच विरोधाभासाची मौज 'कवि आणि चोर' यांच्यांतील साम्य वर्णितांना लेखकानें केली आहे. तो म्हणतो, "चोर रात्रीं काम करतात तर कवीही 'रात्रीं १२ वाजून १३ मिनिटांनीं' काव्य लिहीत बसतात. चोर दिवे मालवून अंधार करतात तर कवीही पांढऱ्यावर काळे करतात. चोर श्रीमंत असला तरी गरिबीचीं सोंगें आणतो. कवि श्रीमंत असला तरी फाटकेंतुटकें नेसतो. (कवि गबाळ्या दिसला नाहीं, तर त्याचा

काव्यासक्तीचा व सौंदर्योपासकत्वाचा वेडेपणा कसा जगजाहीर होणार ?) चोर लोकांच्या सह्या करतात तर कविही नेहमीं एखाद्या प्रेमवेड्याची किंवा विधवेची भूमिका घेतात. चोर व कवि दोघेही अलंकार चोरतात. चोर कित्येकदां व कवि नेहमींच वेडाचें पांघरूण घेतात. चोर कोणाच्याही घरांत शिरूं शकतो. कवि वाटेल त्या युवतीच्या अंतःकरणावर दरोडा घालूं पाहातो. 'अर्थांतर–न्यासा' बद्दल दोघांची प्रसिद्धी महशूरच आहे. दोघेही बहुतकरून 'छांदिष्ट' असतात. 'पदनिक्षेपां'त दोघांनाही सफाई लढवावी लागते. कवि आणि चोर यांच्यांत अगदींच फरक नाहीं असें नाहीं. एक दिंडी बनवितो. तर दुसरा ती फोडतो." अलंकार, अर्थ, छंद, पद, दिंडी या शब्दांवरील श्लेष किती मौजेचे आहेत !

कोटिबाज संवाद

विरोधाभासाची मय–सभा निर्माण करण्यास बुद्धि–चातुर्य अंगीं असावें लागतें. तें लिमये यांच्या ठायीं भरपूर आहे. याचें आणखी एक प्रमाण म्हणजे त्यांच्या संवादांतील कोटिबाजपणा. दोन हुशार वकिलाप्रमाणें, त्यांच्या हास्य–कथांतील कांहीं कांहीं पात्रें मार्मिक व चतुर संवाद करीत असतात. ' न्यायाधिशाचें चातुर्य ' या कथेंतील विनायक नुकताच बी. ए. झालेला असतो. त्याचे गळ्यांत आपली गंगू गुंतविण्याची अन्नपूर्णाबाईची खटपट असते. एकदां आपल्या सुनेनें घरांतील बासुंदी चोरून खाल्ली असा आळ त्यांनीं घेतला. त्यावेळीं अन्नपूर्णाबाई व विनायक यांच्यामध्यें झालेला संवाद कुशाग्र बुद्धीचा आहे.

विनायकानें खरा चोर शोधून काढण्यासाठीं एक हिकमत केली. त्यानें कासंडीभर बासुंदी आणली–आणि आग्रह करकरून ती सर्वांना पाजली. गंगूनें चमचाभर बासुंदी घेतली न घेतली तोंच तिला ओकारी आली–आणि चोरून प्यालेली तीन वाट्या बासुंदी तिच्या पोटांतून बाहेर पडली ! ' कांट्यानें कांटा व बासुंदीनें बासुंदी ' काढण्याची विनायकाची युक्ति सफळ झाली. लघुकथेला शोभण्याइतकी प्रमाणबद्ध रचना या गोष्टीची साधलेली आहे.

विनोदावगुंठित टीका

लेखकाचें बुद्धि-कौशल्य त्यानें व्यक्त केलेल्या विचारावरूनहि दिसून येतें. आपल्या विनोदी लेखांतहि, कोणाला न खुपेल अशा बेतानें, मधून-मधून लिमये यांनीं मार्मिक टीका केली आहे. 'पुण्यावर हल्ला' या लेखांत, प्लेगची स्वारी येणार हें कळतांच वकील, डॉक्टर, भटजी वगैरे लोकांनीं बचावाची कडेकोट तयारी कशी केली याचें विनोदी वर्णन केलेलें आहे. तें करतां करतांच, दोनचार वाक्यांतच लेखकानें स्त्रीवर्गाच्या पारतंत्र्यावर सूक्ष्मशी पण अणकुचीदार टीका केली आहे. स्त्री-जीवनाची सारी कहाणी या चारदोन वाक्यांत सांठविलेली आहे. तीं वाक्यें अशीं— "स्वतः ढमळाकाकूंना या हल्ल्याचें कांहींच वाटलें नाहीं. लहानपणीं सासूचे, जाणतेपणीं विधवा नणंदेचे व मोठेपणीं शेजारणी-पाजारणींचे किती तरी हल्ले त्यांनीं परतविले होते ! मुंग्या, मुंगळे यांनीं त्यांच्या स्वयंपाकघराला कितीदां तरी गराडा घातला होता. शिवाय, 'आपल्याला काय ?' त्या म्हणाल्या 'कोणाच्या तरी गुलामगिरींतच राहायचं ! हा राजा आला काय आणि त्याचा बाप दुसरा कोणी आला काय, बायकांच्या पाठचें बाळंतपण चुकत नाहीं किंवा हातचा स्वयंपाक टळत नाहीं."

कोर्टांतील पक्षकारांचा नाहक भांडकुदळपणा, वकिलाचें अस्थानीं बुद्धिचापल्य आणि कंटाळलेल्या सरकारी अधिकाऱ्यांचा गाफिलपणा या सर्वांचें छानदार विडंबन 'पाण्याच्या बादलीचा विलक्षण खटला' या लेखांत लिमये यांनीं केलें आहे. "कोर्टांत गडबड झाली. मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं मिटलेले डोळे किलकिले केले व एकदम वटारले. खंडेरावांना डोळा घालून खालीं बसविलें. पट्टेवाले पट्टे सांवरीत जागेपणाचीं लक्षणें दाखवूं लागले." असें म्हणून मॅजिस्ट्रेट व पट्टेवाला या दोघांचीहि सुस्ती आपल्या विनोदी चिमट्यानें पकडून लेखकानें जगासमोर कौशल्यानें मांडली आहे. 'पाण्याची बादली' यांत महत्त्व कोणाला ? याचें वकिलसाहेबांनीं केलेलें विवेचन कोणाला हंसूं आणणार नाहीं ? 'बाजाची पेटी' किंवा 'नथेची डबी' यामध्यें मुख्य वस्तु पेटी किंवा डबी नाहीं, तर त्यांतील

बाजा किंवा नथ यांनाच खरें मोल आहे; त्याचप्रमाणें 'पाण्याची बादली' यांत महत्त्वाची वस्तु पाणी आहे, बादली नव्हे असा युक्तिवाद वाकिलांनीं केला. त्यावेळीं मुंबईत तीन दिवस पाण्याची हाकाहाक झालेली असल्यानें बादलीभर पाणी चोरणें म्हणजे आठ माणसांचा खून करणेंच होय, असा हिशेब करून मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं खटला 'सेशन कमिट' केला. कजेदलालीच्या विविध अंगांवर लेखकानें या लेखांत स्वच्छ प्रकाश पाडला आहे.

अतिशयोक्तिचा कळस

अतिशयोक्ति हा विनोदाच्या खेळांतील सुलभ व हुकमी पत्ता. 'पुण्यावर हल्ला' येणार ही मौघम बातमी ऐकतांच खंडेरावांची अवस्था काय झाली हें लिमये पुढील अतिशयोक्तिपर शब्दांनीं सांगतात, "ऑफिसांत कांहीं हिशेबी काम करीत असतां खंडेरावांनीं आपल्या अंगठ्याइतक्याच लांब पेन्सिलींचें टोंक जिभेवर ठेविलें होतें, तोंच ही बातमी त्यांच्या कानावर येऊन आदळली; व त्या झटक्यासरशीं ती संबंध पेन्सिल गटदिशीं त्यांच्या घशाखालीं उतरली. आज त्यांच्या कामाच्या तपासणीला साहेब येणार असल्यामुळें त्यांना दुःखांत सुख इतकेंच वाटलें कीं, या लढाईच्या गडबडींत साहेब कसला येतो ? साहेबाऐवजीं फक्त शत्रूचा हल्ला येणार अशा आनंदाच्या एका उमाळ्यासरशीं त्यांची पेन्सिल बुकदिशीं पुन्हां बाहेर पडली."

लिमये यांनीं आपल्या अतिशयोक्त लेखनाची अतिशयोक्ति 'मुंबईतील उद्योगधंदे' या लेखांत केली आहे. तेथील ट्रॅमची दिरंगाई वार्णितांना ते म्हणतात, "एका मारवाड्यानें पाहिलें कीं, ट्रॅम येईपर्यंत भाड्याची आणेली खिशांत लोळत पडण्यापेक्षां व्याजबट्ट्यांत गुंतविलेली बरी ! डोहाळ जेवणाला निघालेली एक बाई चक्क बारसेंच जेवून आली ! एका बाईच्या खुपऱ्या ट्रॅमकरितां थांबता थांबतांच आपोआप बऱ्या झाल्यामुळें डॉक्टरचा सल्ला घेण्याची तिला जरूर पडली नाहीं. आणखी एक बाई आपली चार वर्षांची लेक व दीड आणा घेऊन अशीच ट्रॅमची वाट पाहात उभी होती. एकदांची आली ट्रॅम; पण पाहाते तों कंडक्टर त्या

मुलीला अर्ध्या आण्याच्या तिकिटावर सोडीना. कारण ट्रॅमची वाट पाहातां पाहातां ती चार वर्षांची लहानगी मुलगी एव्हांना चांगली वयांत आलेली दिसत होती. ''

माफक अलंकार

शाब्दिक चमत्कार करून खसखस पिकविण्याकडे लिमये फारसें लक्ष देत नाहींत. '' बैलाऐवजीं आम्हांसच पाणी पाजणार काय ? '' ''तोंडाला पाणी सुटलें, '' '' स्वसंरक्षणाची तयारी ' जोरांत ' चालली, '' ' खालीं पहावयास लावलें' अशा श्लेषांची मौज तुरळकपणें आढळते. ''पैज हजार मोहरांची नव्हे, मोहऱ्यांची'' अशा शब्द-लीलाहि कोठेंकोठें दिसून येतात. डॉ. रोगव्हेर M. D. (म्हणजे महादेव दामोदर) अशा कोट्याहि क्वचित् आहेत. चीनमधील राजा च्यांव-म्यांव, सेनापति शिकेकाई, कवि काऊ चिऊ, शुकशुक बाग इत्यादि साधीं नांवेंहि हास्य-तरंग उमटविणारीं आहेत.

असे शब्दांचे खेळ जसे लिमये यांच्या लेखनांत थोडे, तसेच उपमा-दृष्टांतादि साम्यदर्शक अलंकारहि अल्पच. ' पंत नवा बूट घेतात ' या लेखांत बूट व पाय यांच्यामधील पायमोजा कसा फाटला हें ते पुढील उपमेनें सांगतात, '' नवरा-बायकोच्या भांडणांत मुलाला मार बसावा, त्याप्रमाणें पायमोजांची बिचाऱ्यांची मधल्यामध्यें ओढाताण झाली होती!''

' डॉ. लिमये यांचा जगप्रसिद्ध उपाय ' म्हणजे वेळ जाण्यासाठीं विनोदी वाङ्मय वाचणें. त्या लेखांत लिमये अशा उपमा देतात,-''नांवाच्या सार्थकतेकरितां लेखांक वाढविणें, म्हणजे शंकर नांवाच्या मनुष्यानें मुद्दाम जटा वाढविण्यासारखें आहे व लेखांची संख्या कमी करणें म्हणजे छापून आलेली पण खोटी निधनवार्ता खरी करण्याकरतां आत्महत्या करण्यासारखें आहे. ''

'नंबर' या एका शब्दावर लिमये यांनीं 'महाबळेश्वर-दर्शन' या लेखांत किती कोट्या केल्या आहेत पहा. ''इकडल्या पोलीसांना जी गाडी जाईल तिचा नंबर टिपून घेण्याचें भयंकर वेड दिसलें. प्रथमच्च पुढील कोपऱ्या-

वरील पोलीस जो जाईल त्याचे नंबर टिपून घेण्यांत चूर झालेला लांबून दिसला. या नंबर घेण्याच्या नादांत तो इतका गढलेला दिसला कीं, त्याच्या अंगाला खेटून एखादा मारेकरी जरी गेला तरी त्याच्या लक्षांत आला नसता व नाग दिसला असतां तर त्याच्या फणीवरील १० नंबर उतरून घेण्यापलीकडे त्यानें कांहींच केलें नसतें ! आमच्या मनांत मात्र धास्ती उत्पन्न झाली. हा आमचेही नांव-नंबर टिपून घेणार कीं काय ? आणि आम्हांस भिण्यास सबळ कारण होतें. कारण, पांडूतात्यांच्या आरशीला नंबर नव्हता ! ''

छांदिष्टपणाचें विडंबन

गर्विष्ठपणा, विसरभोळेपणा, अजागळपणा, एकांतिकपणा इत्यादि मानवी स्वभावांत लपून बसलेले दोष लिमये यांनीं विनोदाच्या ' क्ष-किरणां 'नीं पाहून ते वाचकापुढें मांडलेले आहेत. छांदिष्टपणा हाहि विनोदाचा असाच एक विषय आहे. एक काळ असा होता कीं, महाराष्ट्रांतील रसिकांना बालगंधर्वांचें विलक्षण वेड होतें. डोक्यावर गंधर्व कॅप, तोंडांत गंधर्वांचीं गाणीं, डोळ्यापुढें गंधर्वांचे लाडिक हावभाव—असें ' गंधर्वमय ' जीवन जगणारे तरुण त्यावेळीं थोडथोडके नव्हतें. त्याचें विडंबन करण्यासाठीं लिमये यांनीं चंपूताई निवडली व तिचें ' बालगंधर्वांचें वेड ' हास्यरसानें भिजवून काढलें. गंधर्वांचीं पदें चंपूताई घोळीत, पण '' बालगंधर्वांच्या घोळण्यांत व चंपूताईंच्या घोळण्यांत फरक इतकाच होता कीं, पहिल्याचें घोळणें कॅलिऑडोस्कोपसारखें वाटतें व चंपूताईंच्या घोळण्यांत एकाच स्टँपानें उठविलेल्या हजार ठशांची विविधता भासते. ''

केवळ गंधर्वांचीं पदें गाणें एवढ्यापुरतेंच चंपूताईचें वेड मर्यादित नव्हतें. त्यांचें सारें जीवनच गंधर्वस्वरूप झालें होतें. घरांत सर्वत्र फोटो गंधर्वांचेच. '' चंपूताईंच्या तोंडीं सारा दिवस बालगंधर्व बसले होते. पहिले फोटो निघून त्या ठिकाणीं बालगंधर्वांचे फोटो आले, शेवटीं खंडेरावांच्या आईबापावर गदा आली. लवकरच त्यांचे भाऊही बळी पडले. अखेर

खुद्द (लग्नांतील फोटोरूपी) पति-पत्नींचेंहि त्यांच्याच राहत्या घरांतून बालगंधर्वांनीं उचाटन केलें!" चंपूताईच्या दृष्टीनें बालगंधर्व हें नांवच किती अर्थपूर्ण होतें! "बा-ल-गं-ध-र्व या अक्षरांतच किती गुण सांठले आहेत व दोषांना गचांडी मिळाली आहे, पहा. बालगंधर्वांत रम्य तें 'बाल' पण आहे, त्यांत 'बाग' आहे, 'धवल' ता आहे. 'बा. गं.' हीं आद्याक्षरें असलेल्या एका थोर पुरुषाचें नामसाद्दश्य आहे, पण 'गर्वा' चा गंधही त्यांच्या ठिकाणीं नाहीं." चंपूताई गंधर्वांशीं बोलल्याहि होत्या-केव्हां? तर नाटकांत 'वन्स मोअर' म्हणून!

रेडिओ किंवा टेलिफोन घेतल्यावर शेजाऱ्यांचा उपद्रव किती होतो आणि शहरांत गडी मिळण्याची मारामार कशी पडते हें त्यांनीं कांहीं विनोद-कथांत मार्मिकपणें दाखविलें आहे. कॅ. लिमये यांच्या विनोदी लेखनाचे जे गुण 'पुरस्कार-पंडित प्राचार्य आनंदी आनंद' यांनीं मांडले आहेत, ते यथार्थच आहेत. लेखाची लघुता, विषयांची विविधता व वर्णनाची स्वाभाविकता हे त्यांचे ठळक गुण होत. 'चोरीचा नग किंवा खुर्दा चुकूनहि सांपडायचा नाहीं' ही त्यांची प्रतिज्ञा साधार आहे.

'युग-प्रवर्तक' ही उच्च पदवी मराठीच्या नव-काव्य-सृष्टींत 'केशवसुतां'स यथार्थपणें लावली जाते. मराठीचे 'आद्य कवि' म्हणून ज्ञानदेवांना प्रतिष्ठा लाभलेली आहे, 'आद्य निबंधकार' असा मान मालाकार चिपळूणकरांना प्राप्त झालेला आहे, 'आद्य कादंबरीकार' असा गौरव हरिभाऊ आपटे यांचा झाला आहे, 'आद्य विनोदकार' हें स्थान श्री. कृ. कोल्हटकर यांनीं मिळविलें आहे, 'आद्य इतिहास-संशोधक' हें पद राजवाडे यांना अर्पण करण्यांत येतें, 'आद्य कोशकार' हा किताब डॉ. केतकरांना चिकटलेली आहे, 'आद्य नाटककार' या नात्यानें आण्णासाहेब किर्लोस्करांनीं कामगिरी बजावली आहे; 'आद्य लघुनिबंधकार' म्हणून प्रा. फडके यांनीं कीर्ति कमावली आहे, त्याचप्रमाणें 'आद्य-नवकवि' ही थोरवी केशवसुतांना लाभलेली आहे. आपल्या काव्याचें स्वतंत्र लेणेंच त्यांनीं कोरलें आहे. भाषा, विषय, विचार-या सर्व बाबतींत अगदीं अभिनव असा एक काव्यप्रवाह सुरू करण्याचें श्रेय त्यांना आहे. गडकऱ्यासारखे कैक कवि आपण केशवसुतांचे "सच्चे चेले" आहोंत, म्हणून अभिमानानें सांगतात.

सहा काव्य-खंड

सुमारें सहाशें वर्षांच्या काळांत मराठी काव्य-सृष्टीमध्यें स्थूल मानानें सहा युगें निर्माण झालीं, म्हटलें तरी चालेल. ज्ञानदेवादि संत-कवींनीं

[केशवसुतांनीं आपलें छायाचित्र कधींच काढूं दिलें नाहीं; म्हणून तें येथें देतां आलें नाहीं.]

संस्कृतविरुद्ध बंडाचा झेंडा फडकवून मराठी काव्याचें स्वराज्य स्थापन केलें. संत-काव्याचे विषय पारमार्थिक, भाषालंकारादि बाह्यांगाकडे कांहींसें दुर्लक्ष पण भावनेची तळमळ तीव्र, त्यामुळें जिवंत झऱ्याचा खळखळाट त्या काव्यांत ऐकूं येतो. ज्ञानेश्वर व तुकाराम यांच्या अमृतमधुर काव्याला तर जगाच्या वाङ्मयांतहि तोड क्वचित्च सांपडेल. दुसरा काल-खंड पंडित-कवींचा. वामन, मोरोपंत, रघुनाथ वगैरे पढिक विद्वानांनीं पौराणिक आख्यानें सुसंस्कृत मराठीमध्यें रंगवून महाराष्ट्र-शारदेला बहुमोल अलंकारांनीं नटविलें. त्यानंतर आले शाहीर. प्रभाकर-होनाजी-परशराम वगैरे स्वराज्यांतील या कवींनीं आपल्या काव्यांत एकीकडे वीरश्रीचें रणशिंग फुंकलें, तर लावण्यामध्यें अस्सल मराठी शृंगारानें वारें खेळविलें; इंग्रजी अंमलामध्यें आंग्ल व संस्कृत काव्याचे पडसाद मराठीमध्यें उठविण्याचे कार्य चौथ्या कालखंडांत कृष्णशास्त्री चिपळूणकर, कुंटे, लेंभे, मोगरे, इत्यादि कवींनीं केलें. पांचवा काव्य-विभाग उघडण्याचें श्रेय केशवसुतांकडे आहे.

निबंधद्वारें आगरकरांनीं सामाजिक सुधारणेचा पुरस्कार जसा हिरीरीनें केला, तसाच केशवसुतांनीं आपल्या काव्याच्या 'तुतारी' तून आवेशानें केला. गडकरी, माधव ज्यूलियन, यशवंत इत्यादि नवकवींनीं तोच सामाजिक क्रांतीचा संदेश आपापल्या काव्यांतून दिला. त्याच वेळीं तांबे, बालकवि, टिळक, बोरकर इत्यादि सौंदर्यवादी कवींच्या काव्याचा प्रवाहहि समांतर वहात होता. या नवकाव्याचे विषय पारमार्थिकांऐवजीं लौकिक असून त्यांत देवाऐवजीं मानवाला महत्त्व दिलेलें आढळतें. मानवाचें सुखदुःख, त्याचे शृंगार-पराक्रम, त्याचे न्याय-अन्याय या सर्वांवर आपल्या काव्याचें मंदिर नवकवींनीं उभारलें आहे. त्यानंतरचा काल-खंड नुकताच सुरू झालेला दिसत आहे. मर्ढेकर, करंदीकर, भावे, रेगे, मुक्तिबोध इत्यादि 'अत्याधुनिक कवीं' च्या कृति क्षितिजावर लुकलुकूं लागल्या आहेत. त्यांचें तेज अद्याप पूर्णपणें प्रगट व्हावयाचें आहे, त्यांचा आकार अजून निश्चित व्हावयाचा आहे व त्यांची दिशा यापुढें नक्की होणार आहे.

कीर्तिमान बंधु

केशवसुत हें टोपण नांव धारण करणाऱ्या कवीचें खरें नांव कृष्णाजी केशव दामले. 'कुणी तरी', 'जगन्मित्र' अशींहि टोपणनांवें कृष्णाजी-पंतांनीं आपल्या प्रारंभींच्या कवितांखालीं दिलीं होतीं. पण 'केशवसुत' हेंच टोपणनांव अखेर तरलें. कृष्णाजिपंतांचा जन्म कोंकणांत झाला. रत्नागिरी जिल्ह्यांतील मालगुंड हें त्यांचें जन्म-ग्राम. त्याचाच गौरव त्यांनीं 'माल्यकूट' या नांवानें आपल्या एका कवितेंत केला आहे. त्या गांवीं ता. १५ मार्च १८६६ रोजीं कृष्णाजीपंत जन्मले. त्यांचे वडील मराठी शाळेंत शिक्षक होते. त्यांना बारा मुलें झालीं. त्यांत केशवसुत पांचवे. त्यांचे तीन बंध बुद्धीनें चलाख व शिक्षणानें अग्रेसर असून नांवालौकिकास चढले होते. वडील बंधू श्रीधरपंत यांनीं मॅट्रिकच्या परीक्षेंत 'जगन्नाथ शंकरशेट' ही संस्कृतची शिष्यवृत्ति संपादन केली व ते पुढें बडोदें कॉलेजांत प्राध्यापक झाले. दुसरे दोघे बंधूहि प्राध्यापकाच्या पदापर्यंत जाऊन पोचले होते, त्यांपैकीं मोरोपंतांनीं "शास्त्रीय मराठी व्याकरण" हा प्रचंड व महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहून कीर्ति कमावली; तर सीतारामपंतांनीं राजकारणांत भाग घेऊन 'सी. के. दामले' हें आपलें नांव मान्यतेस चढविलें. 'राष्ट्रमत' हें दैनिक व 'राजकारण' हें साप्ताहिक-अशीं दोन वृत्तपत्रें त्यांनीं चालविलीं; शिवाय काव्य, कादंबरी, विनोद, चरित्र इत्यादि क्षेत्रांतहि त्यांनीं भर घालून लौकिक संपादिला. पण या तिन्ही भावांपेक्षां शिक्षणांत मागें, लेखनांत कमी व ऐश्वर्यांत उणे असूनहि केशवसुतांनीं सर्वांच्या आदरास पात्र व स्फूर्तीस कारण व्हावी अशी अलौकिक काव्य-संपदा निर्माण करून आपलें नांव चिरंजीव केलें.

निराशेचें मूळ

केशवसुतांना आपल्या आयुष्यांत शिक्षणाचा, धनाचा वा मानाचाहि लाभ झाला नाहीं. त्यांचा कविता-संग्रह त्यांच्या मृत्यूनंतर बारा वर्षांनीं प्रसिद्ध झाला-आणि मग त्यांच्यावर स्तुतिस्तोत्रांच्या सहस्रधारा कोसळूं लागल्या. शिक्षणाची मजल पाहिली, तर मॅट्रिकच्या परीक्षेनेंच त्यांची

तीन वर्षें खाल्लीं. दोनदां अपयश पदरांत पडलें, तरी ते तिसऱ्यांदा मॅट्रिकला बसले व एकदांचे उत्तीर्ण झाले. शाळेंत त्यांचें वर्तन एकलकोंडें व वृत्ति अबोल असे. त्यामुळें संस्कृतचे प्रिं. आपटे यांनीं त्यांना 'दुर्मुखलेला' असें म्हणून एकदां हिणविलें. त्याबरोबर त्यांच्या अंगांतील काव्य-शक्ति डिवचली गेली व तिनें सिंह–गर्जना केली कीं, " माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनी या चालावयाचा पुढें । आहे सुंदर तो सदा सरस वाङनिष्यन्द चोहींकडे. ॥"

बडोदें, वर्धा व नागपूर येथें शिक्षणाची त्रिस्थळी यात्रा त्यांना घडली ! नागपूर येथें रे. टिळकांची मैत्री त्यांनीं जोडली. १८८४सालीं केशवसुत पुणें येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्यें विद्यार्थी म्हणून आले. तेथें त्यांना टिळक–आगरकरांसारखे गुरु लाभले. त्या शाळेतून ते वयाचे २३ वे वर्षीं, १८८९ सालीं, मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्या वेळीं त्यांचे धाकटे बंधु मोरोपंत बी. ए. च्या वर्गांत होते ! नंतरचीं सात वर्षें केशवसुतांनीं मुंबईस नोकरी करण्यांत घालविलीं. आपले लहानमोठे बंधु शारदेच्या दरबारांत मानाचें स्थान मिळवीत आहेत, पण आपल्याला मात्र मॅट्रिकच्या प्रवेश–द्वाराशींच टकरा द्याव्या लागत आहेत, यामुळें केशवसुतांच्या चित्तांत निराशेचा जो अंधार पसरला, तो घनदाट करण्यासारखाच कटु अनुभव त्यांना मुंबईस आला.

नोकरीच्या बेड्या

शिक्षणाचे पंख कापून त्यांनीं नोकरीच्या बेड्या पायांत अडकाविल्या. पण ती नोकरी तरी एकच रहावी कीं नाहीं ? सात वर्षांत ते कधीं मिशनच्या शाळेंत शिक्षक म्हणून काम करीत होते, तर कधीं 'ज्ञानोदय' कचेरींत कारकुनी करीत, तर कधीं कमीसीरएट ऑफिसमध्यें हंगामी नोकरी पार पाडीत. मुंबईची महागडी रहाणी. आणि हंगामी नोकरीचा पगार पंचवीस–तीस रुपये. त्यामुळें आर्थिक ओढाताणहि या कवीला सोसावी लागली. शिक्षण नाहीं, संपत्ति नाहीं, स्थिर व्यवसाय नाहीं, मान नाहीं—अशा विपरीत परिस्थितीमुळेंच कीं काय त्यांचें मन कधीं कधीं असे खिन्न उद्गार काढी—

" जन्मा येऊनि मीं उगा शिणविलें आई ! तुला हाय गे ।
ताता ! भागविलें तुला फुकट मी मत्पोषणीं हाय रे ॥

पुढें मुंबईस प्लेग झाला. त्यामुळें आमच्या कवीला खो बसला. ते खानदेशांत गेले. तेथें १९०३ सालपर्यंत त्यांनीं नोकरी केली. नंतर धारवाड येथील हायस्कूलांत शिक्षक म्हणून ते लागले. कोठें खानदेश व कोठें कर्नाटक ! पण पोटासाठीं त्यांनीं तेथें धांव घेतली. तिकडेहि प्लेगनें कहर उडविला. हुबळी येथें गेले असतांना केशवसुतांना प्लेगनें गांठलें; आणि ता. ७ नोव्हेंबर १९०५ रोजीं, आपलें केवळ काव्य-धन मागें ठेवून, ते स्वर्गी निघून गेले. त्यांची पत्नीहि त्यांच्या पश्चात् प्लेगनें आठ दिवसांनींच दिवंगत झाली. आपलें छायाचित्रसुद्धां केशवसुतांनीं आपल्या मागें ठेवलें नाहीं.

नवा संप्रदाय

केशवसुतांना अवघें ३९ वर्षांचेंच आयुर्मान लाभलें. प्रिं. आगरकरांप्रमाणेंच त्यांनीं सामाजिक क्रांतीचें निशाण हातीं धरलें, तीव्र तळमळीनें जीर्ण रूढीवर हल्ले चढविले आणि आवेशानें व आत्मविश्वासानें समाजांत नवचैतन्य संचरून दिलें. हें सुदैवी साम्य येथेंच संपतें तर ? पण दुर्दैव असें कीं, हे दोघेहि श्रेष्ठ वाग्वीर आपल्या वयाच्या अवघ्या ३९ वे वर्षींच मृत्युमुखीं पडले. या आपल्या अल्पायुष्यांत केशवसुतांनीं एकंदर सतरा वर्षें काव्य-लेखन केलें. विद्यार्थीदशेंत त्यांनीं एक नाटक लिहिलें होतें पण तें अप्रसिद्ध आहे. त्यांची पहिली कविता 'खिडकीकडे मौज पहावयास' ही १८८५ सालीं प्रसिद्ध झाली आणि 'हरपलें श्रेय' ही शेवटची कविता १९०५ सालीं, निधनापूर्वी सुमारें सहा महिने, रसिकांच्या हृदयांत प्रविष्ट झाली. त्यांनीं एकूण १३२ कविता लिहिल्या. त्यांपैकीं सुमारें वीस संस्कृत व इंग्रजी भाषांतरें आहेत. उरलेल्या कवितांपैकी वीस सृष्टिवर्णनपर असून पस्तीस कवि व काव्य यांना वाहिलेल्या आहेत. केशवसुतांच्या कवितांची संख्या थोडी असली तरी त्यांचे गुण नावीन्याचे व बहुमोलाचे आहेत. कांहीं प्रासंगिक व वैयक्तिक कविता सोडल्यास त्यांच्या इतर कविता

महाराष्ट्र शारदेला चिरकाल भूषणभूत ठरणाऱ्या आहेत. 'सतारीचे बोल' 'तुतारी' 'झपूर्झा,', 'म्हातारी' 'हरपलें श्रेय'—अशीं एकाहून एक सरस, अभिनव, आवेशपूर्ण व तत्त्वगर्भ कवनें त्यांच्या लेखणींतून निघालीं.

सुभाषितांच्या सरी

हीं केवळ पांच कवनें पाहिलीं तरी ती पंचनद्यासारखीं भव्य व गंभीर वाटतात. महाबळेश्वराहून उगम पावणाऱ्या कृष्णा, वेण्या, सावित्री इत्यादि पांच नद्या जशा महाराष्ट्राची जमीन सुपीक बनवून त्याच्या धारण–पोषणास आधारभूत होतात; तशाच केशवसुतांच्या या पांच कवितांनीं आधुनिक मराठी काव्याचा प्रांत पुष्ट व समृद्ध बनविला आहे. त्यांच्या तुतारीचे पडसाद गेलीं साठ वर्षे मराठी काव्य–सृष्टींत उमटत आहेत. गडकऱ्यांचा 'दसरा' किंवा रे. टिळकांचें 'रणशिंग' म्हणजे त्या 'तुतारीचीं'च अपत्यें होत. रे. टिळक, गोविंदाग्रज, बालकवि ठोमरे, रेंदाळकर वगैरे आधुनिक कवि केशवसुतांना गुरुस्थानींच मानीत. त्यांनीं 'तुतारी मंडळ' नांवाची संस्थाच त्यांच्या स्मारकार्थ स्थापिली होती. हरिभाऊ आपटे, प्रा. वा. ब. पटवर्धन, किरात, विन्नायक वगैरे थोर थोर रसिकांनीं त्यांना वर्डस्वर्थ, कीटस्, शेले या आंग्ल कवींच्या उज्ज्वल मालिकेंत बसविलें. 'हजारांतुनी एकादा' असाच हा युग–प्रवर्तक कवि होऊन गेला, अशीच ग्वाही अनेक कवींनीं व रसिकांनीं दिली. त्यांनीं निर्माण केलेला काव्य–संप्रदाय आपल्या तेजानें अधिकाधिक उज्ज्वलच होत गेला. त्यांच्या काव्यांचे कांहीं चरणांना तर सुभाषिताची लोकप्रियता व महति लाभली. त्याचे कांहीं नमुने पुढें देतों.

"प्रौढत्वीं निज शैशवासि जपणें बाणा कवीचा असे।"
"साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे।"
"जें रम्य तें बघुनियां मज वेड लागे।"
"आम्ही कोण म्हणूनि काय पुसतां? आम्ही असूं लाडके–।"
"एक शब्द बोलेन जरी। सकलां कुंठित करिन तरी।"
"त्रिखंड हिंडुनि धुंडितसें। न परि हरपलें तें गवसे।"

" कंटक–शल्यें बोथटलीं । मखमालिची लव वठली ॥ "
" व्यर्थीं अधिकचि अर्थ असे । तो त्यांस दिसे । ज्या म्हणति पिडे॥ "
" शारदेनें जो मंत्र दिला कानीं । तसें लिहिलें मी, काव्य तिचें मानीं ॥"
" या उत्तेजन हो कवीस न करा गाणें तयाचें मुकें ॥
" गाण्यानें श्रम वाटतात हलके, हेंही नसे थोडकें ॥ "
" प्रीती नसे बाजारीं । प्रीती नसे शेजारीं ।
प्रीतीचा असा असे गे सौदा । प्रीतीनें प्रीति संपादा ॥ "
" वैर तयाला, जे गरिबी शिकवितात बालांस ॥ "
" बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे ।
उडवुनि देउनि जुलमाचे या करूं पहा तुकडे तुकडे ॥ "
" पृथ्वीचा सुरलोक कीं बनवुनी टाकीन मी सत्वर । "
" प्रातःकाल हा विशाल भूधर । सुंदर लेणीं तयांत खोदा ।
निजनामें त्यांवरतीं नोंदा ॥ "

लौकिक विषय

केशवसुतांच्या काव्यांत सर्वसामान्य माणसाचें हृदय हलविणारे विविध विषय गुंफलेले आहेत. संत–कवींनीं मराठी कवितेला वारकरीण बनविलें असलें तर शाहीरांनीं तिला नर्तकीचें स्वरूप दिलें होतें, पण केशवसुतापासूनच्या आधुनिक कवींनीं तिला खरीखुरी गृहिणी केलें आहे. मुख्यतः काव्याचा महिमा, निसर्गाचें प्रेम, प्रणयाची भावना व राष्ट्रमातेची भक्ति या चार विषयांनींच त्यांची सारी काव्य–सृष्टि व्यापलेली; तरी एकाद्या बारीक फुलापासून व लहानशा खेड्यापासून ज्ञानाच्या कुंपणापलीकडे असलेल्या गूढ शक्तीपर्यंत व दिव्य तेजापर्यंत केशवसुतांची प्रतिभा भरारी मारीत असे. त्यांच्यापूर्वी कृष्णशास्त्री चिपळूणकर, मोगरे, लेंभे इत्यादि कवि संस्कृत काव्याचे पाट मराठींत आणून सोडीत; तसेच केशवसुतांनींहि रघुवंश, किरातार्जुन वगैरे संस्कृत काव्यांचे अनुवाद कांहीं कांहीं कवितांत केलेले आहेत. त्याचप्रमाणें कच–देवयानी, शांतनु इत्यादि आख्यानांतील रसपूर्ण प्रसंगावरहि काव्य–रचना केली आहे. अशा बऱ्याच कवितांचा वेषहि

संस्कृतमयच आहे. "विकसित-तरुमाला-केश-पंक्तींत," 'चेतोनिबद्ध-जनचित्र' 'तन्मस्तिष्कपिंडावरी' 'आनंद-निधान-शैल-शिखरीं' 'चलद्देवझषकीं,' 'द्युत्याविष्कृति,' 'विपत्समाकुल' इत्यादि क्लिष्ट सामासिक शब्दांची चवडच्या चवडहि त्यांच्या काव्य-पंक्तींत ठेवून दिलेली आढळते. मात्र त्यांची सर्वसामान्य भाषाशैली साधी, सोपी, व आवेशपूर्ण अशीच आहे.

संस्कृतच्या या ओघाप्रमाणेच आंग्ल वाङ्मयाचाहिओघ त्यावेळीं मराठींत प्रवेश करीत होता. कुंटे, महाजनि, कीर्तिकर वगैरे कवींनीं इंग्रजी कवितांना मराठीचा साज चढविला होता. ती कारागिरीहि केशवसुतांनीं बऱ्याच कवितांत करून दाखविली आहे. कांहीं कवितांवर तर त्यांनीं आधारभूत इंग्रजी कवितांचा स्पष्ट उल्लेखच केला आहे. पण त्याशिवाय इतर कैक कवितांना आंग्ल कवीपासून स्फूर्ति मिळाल्याचें उघड दिसतें. वर्डस्वर्थ-शेले इत्यादि थोर थोर आंग्ल कवींच्या काव्यापासून स्फुरलेल्या पण स्वतंत्रपणें रचलेल्या त्यांच्या कविता मान्यता पावल्या आहेत.

वृत्तांची विविधता

जशी विषयांची विविधता; तशीच वृत्तांचीहि. ओवी-अभंगापासून शार्दूलविक्रीडित-भुजंगप्रयातापर्यंतचीं नाना वृत्तें त्यांनीं योजलीं आहेत. त्याचप्रमाणें विविध जातींतहि त्यांनीं काव्य-रचना केली आहे. उद्धव, बालानंद, मेघावलि वगैरे जातींतील त्यांचीं कवनें पदाप्रमाणें गेय व रम्य आहेत. इंग्रजींतल्याप्रमाणें त्यांनीं निर्यमक कविताहि बरींच लिहिली आहे. कांहींमध्यें यमक साधलें आहे, तें एक-तीन, दोन-चार अशा चरणांचें. चौदा ओळींचें सुनीत हा काव्य-प्रकार तर त्यांनींच मराठींत आणला. क्वचित् ओबडधोबड भाषा, क्वाचित् यतिभंग तर क्वचित् निरर्थक शब्द-असे कांहीं दोष त्यांच्या काव्यांत आढळतात. पुनः पुनः घासून-पुसून कवितेचा परिष्कार करण्याइतकें स्वास्थ्य केशवसुतांना, आर्थिक वा मानसिक या दोन्ही दृष्टींनीं, होतें कोठें ? निराशेनें तापलेलें मन गूढ अध्यात्म-

वादांत मरारी मारी. गूढगुंजनात्मक कवितांचा संप्रदाय त्यांनीं मराठींत नव्यानेंच सुरू केला म्हटलें तरी चालेल.

नवयुगाची आशा

विषयांचें वैचित्र्य, वृत्तांचें वैविध्य, आणि गूढ–गुंजनाचे, निसर्ग–भक्तीचे व कुटुंब–प्रेमाचे विचार या वैशिष्ट्यांपेक्षांहि केशवसुती काव्याचें एक लक्षण महत्त्वाचें आहे. तें म्हणजे नव्या युगाविषयींचा आशावाद. आपल्या कवित्व–शक्तीविषयीं अभेद्य आत्मविश्वास अंगीं बाळगून, जुन्या दुष्ट रूढींना ' मरणालागुनि ' टाकून ते ज्ञान, समता व स्वतंत्रता यांच्या नवयुगाची तुतारी पंचप्राणांच्या आवेशानें फुंकीत आहेत. " स्फूर्ति, तुतारी, गोफण, नवा शिपाई " इत्यादि काव्यांच्या ओळीओळींतून हा आत्मविश्वास व आशावाद मोठ्या आवेशानें उसळ्या मारीत आहे. " म्हातारी, सतारीचे बोल, झपूर्झा, हरपलें श्रेय " या कवितांतील गूढगुंजन सूक्ष्म भावनेनें बहरलेलें, मधुर भाषेनें सजलेलें व खोल विचारानें नटलेलें आहे. केशवसुतांच्या या आठ–दहा कविता म्हणजे क्रांतीच्या तुताऱ्या होत, नवयुगाच्या निशाण्या होत, मानवधर्माच्या पताका होत.

कवित्वाची आढ्यता

कवित्व-शक्तीचा महिमा केशवसुत मोठा मानीत, याचा अर्थ ते स्वतःला महत्त्व देत असा मात्र नव्हे. बिचाऱ्याच्या उभ्या हयातींत स्तुतीचा एक शब्द किंवा मोबदल्याचा एक पैसा कांहीं पत्रा–मासिकाकडून त्यांना लाभला नाहीं. ते स्वतःविषयीं नम्र भावच प्रगट करीत. ज्ञानेश्वर–तुकारामादि संतांसारखीच ही दुहेरी भूमिका आहे. वैयक्तिक दृष्ट्या ते स्वतःला धुळीच्या कणाची किंमत देत, पण ब्रह्मस्वरूपाचा अंश या दृष्टीनें ' तुका ब्रह्मांडाएवढा ' वगैरे व्यापक सत्तेची भाषा काढीत. त्याचप्रमाणें " कवि आम्हांलागुनि म्हणणें । कविशब्दार्था लोळविणें " असा विनय धारण करणारे केशवसुतच " आम्ही कोण म्हणूनि काय पुसतां ? " असें आढ्यतेनें हटकीत आहेत. एकीकडे स्वतःचा व्यक्तिविषयक विचार आहे,

तर दुसरीकडे कविवर्गाची तरफदारी आहे ' गणमात्रा जुळणारे ' असें स्वतःचें शालीन वर्णन करणारे केशवसुत शारदेच्या अंकावर, प्रतिभेच्या तेजोवलयामध्यें, काव्याच्या उन्मादांत बसून टीकाकारांना विचारतात, "अशी असावी कविता, फिरून । तशी नसावी कविता म्हणून । सांगावया कोण तुम्ही कवीला । अहांत मोठे ? पुसतो तुम्हांला ॥ " रसिकांपुढें काव्य आणणें हा दुय्यम हेतु; काव्य-रचनेचा प्रधान हेतु आत्मानंद. अध्यात्मांतील समाधि-सुखासारखाच हा आनंद. त्याचें वर्णन करतांना केशवसुत म्हणतात, " करूनिया काव्य जनांत आणणें । न मुख्य हा हेतु तदीय मी म्हणें । । करूनि तें दंग मनांत गुंगणें, । तदीय हा सुन्दर हेतु मी म्हणें. " ॥

प्रेतांनाहि खडबडून उठविण्याइतकी सामर्थ्यशाली कविता निर्माण करणारा कवि समाजाच्या उपयोगीं पडत नाहीं, असें कोण म्हणेल ? जणु कांहीं स्वतःच्याच भूमिकेचें चित्र रेखाटतांना केशवसुत ' कवितेचें प्रयोजन ' सांगतात, " हातीं घेउनियां निशाण कवि तो पाचारितो बान्धवां-। ' या हो या झगडावयास सरसे व्हा मेळवा वाहवा ! ' । प्रेतेंही उठवील जी निजरवें, ती तो तुतारी करी । आतां नादवती, निरर्थ तर ती त्याची कशी चाकरी ? " ॥ कवीचें अपार सामर्थ्य समर्थ रामदासांनींहि ' नसता कवीचा व्यापार । कैसा असता जगदुद्धार " या सूत्रांत वर्णिलें आहे. वर्डस्वर्थसारखे आंग्ल कविवर तर आपल्या काव्याची तरफ करून सारें जग उलथण्याची ईर्षा धरतात. त्याच भाषेंत केशवसुतहि काव्य-महिमा गातात; तो असा—" पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे टेकुनि ती जनता-शीर्षावरि जग उलथुनियां देउं कसे ! " नुसतें जगच काय, पण कवि आपल्या प्रतिभेची नौका आकाशाच्या सागरावर नेईल आणि तेथील तारकांचीं रत्नें या ' गरिब ' पृथ्वीवर फेकून देईल असा विश्वासहि केशवसुत प्रगट करतात.

खऱ्या कवीचा महिमा

" आम्ही कोण ? " हें केशवसुतांचें सुनीत चिरंजीव आहे. त्यांत जातिवंत काव्याचा महिमा व सामर्थ्य वर्णिलें आहे. प्रतिभेच्या बळावर

विश्वभर संचार करणारे व दिक्कालांतून आरपार पहाणारे कवि देवाचे लाडके होत. त्यांच्या स्पर्शाच्या जादूनें वस्तुमात्र सुंदर बनतें; प्रत्येक वस्तूंतील सत्त्व ते शोधून काढूं शकतात. ते आणखी काय करतात ? " शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या बरें ? पृथ्वीला सुरलोक-साम्य झटती आणावया कोण ते ? । ते आम्हीच सुधा कृतींमधुनिया ज्याच्या सदा पाझरे; । ते आम्हीच शरण्य मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभतें ! ॥ " अशा सामर्थ्यवान कवींचा जगाला किती उपयोग आहे ? याचें उत्तर देतांना कवि आत्मविश्वासानें बजावतो, " आम्हांला वगळा—गतप्रभ झणीं होतील तारांगणें; । आम्हांला वगळा—विकेल कवडी-मोलावरी हें जिणें ! "

खऱ्या कवीच्या जातिवंत काव्याचा हा बडिवार झाला. याचा अर्थ स्या स्तुतीच्या साऱ्या माळा केशवसुत स्वतःच्या गळ्यांत घालून घेत आहेत व त्या प्रशंसेच्या पंचारतींनीं स्वतःला ओवाळून घेत आहेत, असा मात्र मुळींच नाहीं. तें केवळ काव्याचें ध्येय आहे. व्यक्तिशः स्वतः किती नम्रता केशवसुत धारण करतात पहा—' अस्मद्दान नव्हे ' गान ' । तें गाना चिंध्यादान ! ॥ चंद्राला जुन्या कपड्याची चिंधोटी दान करावी तसें आमचें काव्य, अशी विनयाची वृत्ति प्रगट करून केशवसुत 'भृंगा'स म्हणतात, " परंतु भृंगां ! तव गान । परमानंदें परिपूर्ण ! । उदासीन ही जगाविशीं । तव तन्मयता सृष्टीशीं ! " निसर्गाचें माहात्म्य येथें किती सूचकतेनें वार्णिलें आहे !

निसर्ग व काव्य

निसर्गाच्या सहवासानेंच आपल्या कवनांत कांहीं काव्य आलें तर येतें, हें कबूल करतांना ते लिहितात, " प्रत्येक मेघ वरता फिरतां नभांत । एकेक शब्द लिहितों मम पुस्तकांत । " निसर्गाचें प्रतीक म्हणून एक पुष्प घेऊन केशवसुत म्हणतात, " पुष्पामध्यें प्रकट होय न जें जराही । सृष्टींत एकहि रहस्य असें न कांहीं; । ज्याचा ध्वनी न उमटे खगकूजितांत । नाहीं निगूढ इतिहास असा जगांत ॥ "

आपलें ' हरपलें श्रेयहि ' निसर्गांतच आढळतें, असें सांगतांना ते गुणंगुणतात, " जेथें ओढे वनराजी । वृत्ति रमे तेथें माझी; । कारण कांहीं साक्ष तिथें । मज त्या श्रेयाची पटते । "

काव्य म्हणजे रसात्मक वाक्य. या रसाचें स्थान म्हणजे हृदय. हृदयांतील शक्तिशाली भावनांचा सहज उद्रेक म्हणजे काव्य. हा आशय व्यक्त करतांना ' दूर कोठें ऐकला जाउनियां ' या कवितेंत केशवसुत म्हणतात, " हृदय आत्म्याला जधीं खेळवीतें, । हृदय आत्म्याला जधीं आळवीतें; । तधीं तुमचें तें नको कलाज्ञान, । तधीं हृदयासम नसे तानसेन ॥ "

शारदेचा देव्हारा

' शब्दांनो ! मागुते या ! ' या कवितेंत कवीनें अशी रम्य कल्पना लढविली आहे कीं, तेजाचे पंख हालवीत शब्दपंक्ति शारदेचा देव्हारा घेऊन चालली होती. त्या शब्दांना कवीचें विकसित हृदय दिसलें, त्याबरोबर त्यांनीं तो देव्हारा त्या हृदयावर ठेवला. " शब्दांहीं चित्तभूमी विकसित हिरवी तों मदीया बघूनी । देव्हारा माझिया तो उतरुनि हृदयीं स्थापिला गौरवूनी ॥ " शारदेचा वरदहस्त लाभलेला कवि जेथून चालत जातो, तेथील धुळीचें सोनें होतें. "चाले तो धरणीवरी तर पहा! जेथूनि तो चालिला, । धूली तेथिल होतसे कनकिता ।–घेऊं नका भ्रान्तिला ॥ " अशा कवीला पाहण्यासाठीं स्वर्गांचे देवहि पृथ्वीवर येतात; " राही तो, तर देव भूमिवरतीं येतात. हिंडावया, । जातां स्वर्ग सवें धरेस उतरे त्यालागि धुंडावया ! ॥ "

काव्याचें कार्य काय ?

पृथ्वीवरील दिवा आपल्या उजेडाची बढाई मारूं लागला, तेव्हां आकाशांतील तारा त्याला आपल्या तेजाचें महत्त्व समजावून सांगतो. जड शास्त्रें जगांतील बाह्यसुखें वाढवितात, पण काव्य हें मानस-सृष्टीचा विकास करतें, हा भेद दाखवितांना कवि ताऱ्याच्या मुखानें म्हणतो,

" भांडीं, तीं मडकीं, डबे, ढकलिसी अंधार यांपासुनी, । ब्रह्मांडास परन्तु मी उजाळितो, गेलीं युगें होउनी; । तेजानें वरुनी दिव्या । खुलविसी तूं मानवी चेहरे, । आत्मे उज्ज्वल आंतले पण गड्या ! होतात माझे करें !॥" 'निशाणाची प्रशंसा' त्यांनीं जी केली, तीच जातिवंत कवितेला लागू पडणारी आहे. निशाणांचें महत्त्व व कार्य कोणतें ? " भाक्ति जिथें, दिव्यत्व जिथें, उत्सव जेथें फार । तेथें तेथें दिसे तुझा प्रोत्साहक आकार ! "

खरा कवि हा तत्ववेत्ता असतो-जगाचा मार्गदर्शक असतो—मानवतेचा उपकारकर्ता असतो. या उच्च भूमिकेची ओळख केशवसुतांनीं आपल्या अनेक काव्यांतून प्रभावी रीतीनें करून दिली आहे. 'स्फूर्ति' या कवितेंत तर ते कवितेच्या साहाय्यानें व जनतेच्या पाठिंब्यानें सारी पृथ्वी उलथून देण्याची हिंमत व्यक्त करतात. ते म्हणतात, " पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे । टेंकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुन या देऊं कसें । बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे । उडवुनि देउनि जुलुमाचे या करूं पहा तुकडे तुकडे । "

काळाचें प्रतिबिंब

काव्याच्या महिम्याप्रमाणेंच राष्ट्राच्या स्वातंत्र्याविषयींहि केशवसुतांच्या आशा-आकांक्षा उत्तुंग होत्या. ते पुण्यास आले, तेव्हांपासूनच त्यांच्या अंतःकरणावर राष्ट्रीय जागृतीचे संस्कार होऊं लागले होते. पारतंत्र्याच्या झोपेंतून राष्ट्राचा आत्मा जागा होऊं लागल्याच्या खुणा त्यांना दिसत होत्या. १८८५ सालीं त्यांनीं पहिली कविता लिहिली; तो काळ जागृतीनें व चैतन्यानें रसरसलेला होता. 'मालाकार' चिपळूणकर १८८२ सालीं आपल्या कर्तृत्वाची उष्णता व कीर्तीची प्रभा पसरवून दिवंगत झाले होते. टिळक-आगरकर हे तरुण 'केसरीकर्ते' 'डोंगरीच्या तुरुंगाची' हवा खाऊन 'लोककल्याण साधावया'साठीं सरसावले होते. १८८५ सालींच राष्ट्रीय सभेचा जन्म झालेला या राजकीय क्रांतीबरोबरच सामाजिक क्रांतीचेंहि रण-शिंग फुंकलें गेलें, त १८८८ मध्यें. त्या वर्षी प्रिं. आगरकर यांनीं आपल्या स्वतःच्या 'सुधारक' साप्ताहिकांतून सामाजिक सुधारणेचा

पुरस्कार घडाक्यानें सुरू केला. तेंच कार्य कादंबरीच्या द्वारें करण्यासाठीं कमर कसलेले हरिभाऊ आपटे यांची ' पण लक्षांत कोण घेतो ? ' ही समाजाला धक्के देणारी कादंबरी १८९३ सालीं प्रकाशित झाली. नाट्य-क्षेत्रांतहि हे क्रांति-किरण पाडणारें 'शारदा' हें देवलांचें नाटक १८९९ सालीं रंगभूमीवर आलें. अशा राजकीय व सामाजिक उलथापालथीच्या काळांत मराठी कवितेची ' तरफ ' हातीं घेऊन केशवसुत मोठ्या आशेनें व बळानें पुढें झाले. पारतंत्र्याची चीड व स्वातंत्र्याची आस या राजकीय भावना त्यांच्या कांहीं कांहीं कवनांत तीव्रतेनें व्यक्त झाल्या आहेत; त्याचप्रमाणें बुद्धिप्रामाण्य व व्यक्तिस्वातंत्र्य हीं सामाजिक ध्येयेंहि त्यांच्या कांहीं काव्यांतून ध्वनिक्षेपित झालीं आहेत. 'नवसमाजनिर्मितीचा आशावाद' केशवसुतांच्या कवनांतून ओसंडत आहे.

स्वातंत्र्यासाठीं तळमळ

' गोष्टी घराकडिल मी वदतां गड्या रे ' या १८८७ सालीं रचलेल्या कवितेंत केशवसुतांनीं आपल्या घराचें, ओसरीवरील घड्याळाचें, माच्यावर निजलेल्या पित्याचें—असें कौटुंबिक जिव्हाळ्यानें ओथंबलेलें वर्णन करतां करतां आपल्या धाकट्या बंधूविषयीं जे उद्गार काढले, त्यांत त्यांची सारी स्वातंत्र्यलालसा प्रगट झाली आहे. आपला भाऊ बाल आहे, अज्ञान आहे, तरी ' त्याचेविशीं मम मनीं अतिलोभ राहे ' अशी आपली भावना व्यक्त करून केशवसुत त्याचेकडून कोणती अपेक्षा करतात ? तर " बापू ! गड्या ! ध्वज उभा करशील काय ?। तूं देशकारण करूं झटशील काय ?" बापू ! जनांत दिवटी धरशील काय ? । स्वातंत्र्यदेव मनसा भजशील काय ? ॥ या चार ओळींत कवीच्या जिवींची आर्तता किती ठासून भरली आहे ? आपल्या आयुष्यांतील एकमेव साध्य हस्तगत करून घेण्यास आपण असमर्थ ठरलों, या निराशेनें हृदय फाटून गेलेल्या कवीनें आपल्या धाकट्या भावापाशीं हें मागणें मागितलें आहे—याचना केली आहे. त्याच उदात्त भावनेचा करुण आविष्कार " गांवीं गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून " या काव्यांतहि झालेला आहे. विद्यार्थि-दशेंत कवि

आपल्या मित्राबरोबर कोणत्या गोष्टी बोलत होता ! तर " तेव्हां आम्हीं म्हटलें—'ही चहासाची । रजनी केव्हां जाइल विरूनि साची ? । स्वतंत्रतेची पहाट ती येईल । उत्कर्षाचा दिन केव्हां सुचवील ? ॥ "

" या डोळ्यांनीं पहाट ती बघण्याचें । असेल का हो नशिबीं दुर्दैव्यांचें?। किंवा "तीतें आणावयाचे कांहीं । यत्न आमुच्या होतिल काय करांहीं?॥" टिळक-आगरकरांचा कॉलेजांतील जो देशभक्तिपर संवाद प्रसिद्ध आहे, त्याची आठवण हे श्लोक वाचून कोणास होणार नाहीं ? बॅ. सावरकर यांनीं ' वहिनीस लिहिलेल्या पत्रांत ' 'वैशाखिंचा कुमुदनाथ नभांत हासे' अशा रम्यकालीं सर्व कुटुंबीय मंडळी राष्ट्रोद्धाराच्याच कथा कशा सांगत हें पुढें वर्णिलें; त्याची स्मृति करून देण्यासारख्या पंक्ति केशवसुतांच्या याच काव्यांत आहेत. त्या अशा—" देशाविषयीं गोष्टी बोलत येथें । बसलों, विसरुनि कितीकदां निद्रेतें । श्वासीं अमुचे श्वास मिळाले तेव्हां । अश्रूंमध्यें अश्रु गळाले तेव्हां ॥ "

संध्याकाळची कांति पाहिली, तरी हाच विचार आणि प्रातःकालीं वरवर चढणारा सूर्य पाहिला, तरी विचार हाच—अशी आपली अवस्था केशवसुतांनीं ' एका भारतीयाचे उद्गारां ' त वर्णिली आहे. वेलींचीं फुलें पाहिलीं, तरी या कवीचें रसिक मन, राजकीय दृष्ट्या जागृत झालेलें असल्यानें, कळवळून म्हणतें, वल्लीं ! हीं सुबक सुमनें काय आम्हांस होत?। युष्मद्गानें मधुर, खग हो ! या जनां काय होत ?—। आम्हां डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळें हो ! । ऐकायला श्रुतिहि नसती पारतंत्र्यामुळें हो ! ॥

आणि शेवटीं स्वातंत्र्यासाठीं तळमळणारा कवि ईश्वराचा धावा करतो, " देवा ! केव्हां परवशपणाची निशा ही सरून । स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून ? । केव्हां आम्ही सुटूनि सहसा पंजरांतूनि, देवा, राष्ट्रत्वाला फिरुनि आमुचा देश येईल केव्हां? ॥" आज आपण पारतंत्र्यांतून मुक्त व स्वातंत्र्यानें संपन्न झालों, म्हणून गेलेल्या संकटाचें व आलेल्या सौख्याचें तितकेंसें स्मरण नाहीं व महत्त्वहि वाटत नाहीं. पण त्या काळीं पारतंत्र्याचा तिटकारा व स्वातंत्र्याचा हवास प्राणापलीकडे कसा होता, हें हें या कवितेवरून स्पष्ट होतें.

निराशेवर उतारा

खुद्द केशवसुतांना 'नैराश्यें पुरें घेरिलें' होतें. त्यांचें जीवनच निराशेनें ग्रासलेलें होतें. 'आंतिल विषण्ण वृत्ति' त्यांना सतत जाळीत होती. पण त्यांचा मोठेपणा हाच कीं, सांसारिक सुखाकडे व वैयक्तिक आशांकडे पाठ फिरवून त्यांनीं सामाजिक प्रपंचाकडे लक्ष दिलें व समाजाला ओजस्वी संदेश दिला. तरी त्यांच्या चित्तांतील निराशा मधूनमधून डोकें वर काढीच. 'पुष्पाप्रत' या कवितेंत ते म्हणतात, " चिरतरुणा रे । चिररुचिरा रे ! तुज सन्निध तो वास बरा रे ! । तुजमजमध्यें परी केवढी—आहे रुंद दरा रे ! ॥. काळोखाच्या जगामध्यें या, । मृत आशांच्या चित्तावरूनि या । पिशाच माझें भटकत आहे—शांति नसेचि तया ! " पिशाचाप्रमाणें भटकणाऱ्या कवि-मनाला घुबडाची सोबत आवडावी हें योग्यच नव्हे काय ? 'घुबड' या कवितेंत केशवसुत म्हणतात, " खाशी सोबत ! " कवी म्हणाला । " माझ्या विरहव्यथित मनाला । वाटे मनुजांचा कंटाळा; । दुःख करीत बैसणें आवडे, जेथें राहे अंधार । "

पण आपल्या दुःखाची मीमांसा करतां करतां कवीला हें तत्वज्ञान उमगलें कीं, जग हेंच मुळीं सुखदुःखमिश्रित आहे—' जगीं सर्वसूखी ' कोणीच नाहीं. हेंच तत्व काव्यात्मक भाषेनें ते मांडतात, " कांट्यावाचुनी गुलाब नाहीं हें धर हृदयीं साच; । नैराश्याचा मग तुजला तो होइल न कधीं जाच ॥ सुखदुःखें हीं मिश्रित ऐशीं असती नित्य जगांत; सुखाकारणें झटतां पडतें दुःख पहा पदरांत ॥

स्वतःच्या वाट्यास आलेल्या दुःखाचाहि उपयोग समाज-हितासाठीं करावा, असा सुविचार सांगतांना केशवसुत म्हणतात, " अमुचा पेला दुःखाचा । डोळे मिटुनी प्यायाचा । पितां बुडाशीं गाळ दिसे, । त्या त्या अनुभव हें नांव असे । फेंकुनि द्या तो जगावरी, । अमृत होऊं तो कुणावरी। " अखेर 'दिनानाथ देवाकडे' धांव घेऊन केशवसुत प्रार्थना करतात, "भिकार या जगीं । इच्छित न मिळे कांहीं । म्हणूनी तुझे पायीं । भिक्षांदेही. ॥ "

निसर्गाचीं गीतें

'निसर्ग-काव्य' ही मराठी वाङ्मयाला आंग्ल भाषा-भगिनीची एक सुंदर देणगी आहे आणि ती वाहून आणण्याचा मान केशवसुतांच्या लेखणीला लाभला आहे. त्यापूर्वीच्या मराठींत मुक्तेश्वरासारख्या प्रतिभाशाली कवींनीं निसर्गाचें वर्णन आपल्या काव्यांत केलेलें आहे, नाहीं असें नाहीं. कालिदासासारख्या प्राचीन गीर्वाण कवीनेंहि सृष्टि-सौंदर्याचीं शब्द-चित्रें मनोहरपणें रेखाटलीं आहेत. पण तें सारें मुख्य कथेला पार्श्वभूमीप्रमाणें असे—मानवाचीं कृत्यें प्रधान व निसर्गाची लीला गौण, असा भाव त्या कवींचा असे. पण पाश्चात्य कवींना निसर्ग हाच प्रधान वाटे, स्वतंत्र व जीवंत वस्तु भासे, आणि त्याचें सान्निध्य मानवाचें मन विशाल करतें अशी त्यांची समजून असे. सूर्योदय व सूर्यास्त, पर्वत व नदी, आकाश व समुद्र, वृक्ष व वेली—इत्यादि सृष्टींतील नानाविध प्रसंग व पदार्थ हे सचेतन आहेत, बोलके आहेत, दिव्यत्वानें नटलेले आहेत—असें आंग्ल कवींना भासे. आकाशांत पडलेलें इंद्रधनुष्य पाहतांच वर्डस्वर्थसारख्या कवीचें हृदय तर झेंपावें ! त्याला ओढ्यांच्या खळखळाटांतून प्रेमाच्या ऋचा ऐकूं येत आणि पाषाणांतून भाषणांचे प्रवाह पाझरतांना दिसत. सृष्टीशीं ही तन्मयता साधण्याचा योग केशवसुतांनीं आरंभिला.

'एक खेडें' या काव्यांत केशवसुतांनीं सृष्टीचें हृदयंगम शब्द-चित्र रेखाटलें आहे. दापोली तालुक्यांतील 'वळणें' गांवीं त्यांचे वडील होते. त्या गांवाचेंच वर्णन या कवितेंत तपशीलवार केलें आहे. शहरोशहरीं पोटासाठीं भटकण्याऐवजीं त्या निसर्ग-रम्य खेड्यांत आपल्याला रहावयास मिळावें ही आपली मनीषा ते पुढील शब्दांनीं व्यक्त करीत आहेत. "अहा ! अज्ञात स्थळीं अशा मातें । एक गवतारू खोप रहायातें, । शेतवाडी एक ती खपायला, । लाधती, तर किति सौख्य मन्मनाला ! ॥ तरी नसतों मी दरिद्री धनानें, । तरी नसतों मी क्षुद्र शिक्षणानें । तरी होतीं तीं स्वर्गसुखें थोडीं, । तरी नसती कीर्तिची मला चाडी ! ॥"

"स्वर्ग-सुखाचा आनंद खेड्यामध्यें तुम्हांला का वाटतो ?" असा

प्रश्न कोणी कवीला केला असता, तर कवीचें उत्तर तयार होतें; तें असें, "स्तोत्र ओढे थांबल्यावीण गाती, । सूर-वारे आपुला नित्य देती, । वृक्षगण तो हालुनी डुलताहे; । अशा भक्तीच्या स्थळीं देव राहे ! ॥ उंच डोंगर ते, उंच कडे भारी, । पडे धो ! धो ! ज्यांचियावरुनि वारी, । भोंवतालें रान तें दाट आहे; । अशा ठायीं देव तो स्वयं राहे ! ॥ "

देव जेथें राहतो तें स्थान स्वर्गच नव्हे काय ? आणि देव राहतो शांत-प्रसन्न अशा निसर्गामध्यें. सूर्य, वृक्ष, पक्षी इत्यादि निसर्गाचीं बालकें रोज रोज आपल्याला दिसतात आणि तरीहि त्यांचें आकर्षण कमी होत नाहीं, याचें कारण सांगतांना 'अढळ सौंदर्य' या कवितेंत केशवसुत म्हणतात, "म्हणूनि कथितों निःशंक मी तुम्हांते,— । असे सुन्दरता अढळ जरी कोठें । तरी ती सृष्टींत मात्र वास —। पहा मोहिल सर्वदा ती तुम्हांस. ॥"

प्रणयाचें मानवी स्वरूप

निसर्ग–काव्याप्रमाणें प्रणय–गीतांचीहि देणगी केशवसुतांनीं इंग्रजी वाङ्मयांतून मराठींत आणली, असें म्हटलें तरी चालेल. त्यापूर्वी मराठींत प्रणय नव्हता असें कोण म्हणेल ? शृंगार हा तर रसराज. त्याचा गौरव सर्व जगाच्याच वाङ्मयांत केलेला आहे. पण संस्कृत किंवा मराठी काव्यांत राधा–कृष्णादि देवादिकांच्या, फार झालें तर, दुष्यंत–शंतनूसारख्या राजे-रजवाड्यांच्या प्रेमाला स्थान मिळें; पण सर्वसामान्य माणसाच्या हृदयांतील प्रेम–भावनेला वाचा फोडणें हें पूर्वी काव्याला कमीपणा आणणारें वाटे. पाश्चात्य कवि इहलोकवादी असल्यामुळें तेथील हमाला–मजुरापासून सर्वांच्या प्रीति–भावनेवर त्यांनीं आपल्या काव्याचीं फुलें वाहिलीं आहेत. ही मानवता केशवसुतांच्या अंतःकरणाला सहजच पटली; आणि म्हणून त्यांनीं वैयक्तिक प्रेमाचीं पस्तीस गाणीं रचलीं. 'नसे प्रणय तो माझियाहि कां अंतरीं ? ' असा सरळ सवाल त्यांनीं 'संध्याकाळ' या कवितेमध्यें केला आहे. 'प्रीति' हें त्यांचें प्रेम–गीत तर सर्वतोमुखींच झालें आहे—चित्र-पटांतहि निनादत आहे. " प्रीती मिळेल कां हो बाजारीं ? । प्रीती मिळेल कां हो शेजारीं ? । " असे प्रश्न करून कवि प्रीतीच्या निर्मितीची काव्य-

मय मीमांसा अशी करतोः—" नंदनवनामधीं आला । कल्पलतेला बहर भला; । तिची हृदयिं बीजें पडलीं, । प्रीति त्यांतुनी अवतरली ! । प्रीतिची असे अशि ग मात; । पहा आपुल्या हृदयांत ! ॥ प्रेमळ कृत्यांची माळ । प्रियजनकण्ठीं तूं घाल; । द्विगुणित मग तो प्रीति तुला । देइल, न धरीं शंकेला. । प्रीतिचा असा असे ग सौदाः— । प्रीतिनें प्रीति संपादा ! ॥ "

' फिर्याद,' ' स्मरण आणि उत्कंठा ' यामध्यें त्यांनीं शृंगाररस खेळविला आहे. प्रेमाचें अद्वैत कसें असतें, याचें वर्णन करतांना ' –प्रत ' या कवितेंत कवि सांगतो, "नाडि माझी तव करीं वाहताहे, । हृदय माझें तव उरीं हालताहे । करा आपुल्या तूं पहा चांचपून, । उरा आपुलिया पहा तपासून ॥" केवळ तरुण-तरुणींचें प्रेम म्हणजेच प्रीति, अशी संकुचित व्याख्या केशवसुत करीत नाहींत. त्यांच्या प्रीतीच्या जगांत आईबाप, बंधुभगिनी, आप्तमित्र वगैरे सारे येतात.

कौटुंबिक जिव्हाळा

कौटुंबिक जिव्हाळ्यानें ओसंडणारीं कांहीं रसाळ व रमणीय कवनें केशवसुतांनीं रचलीं. नोकरीनिमित्त खानदेशापासून कर्नाटकापर्यंत त्यांना दूरदूर जावें लागे. त्यावेळीं त्यांचें प्रेमार्त हृदय आपल्या घराकडे सहजच धाव घेई. ' एक खेडें ' यामध्यें आपल्या गांवाचें सुंदर शब्द-चित्र त्यांनीं रेखाटलें. त्या गांवांतील आपलें घर व त्या घरांतील आपली नातलग माणसें–यांच्याभोंवतीं प्रेमाच्या भावनेचे जे रेशमी धागे त्यांनीं गुंफले आहेत, ते अतिशय हृदयस्पर्शी आहेत. ' गोष्टी घराकडिल मी वदतां गड्या रे ' ही सारी कविताच अशा भावनेनें भिजलेली आहे. घराच्या पडवींत बांधलेली ती म्हैस, तें ओसरीवरील घड्याळ, तो माच्यावर निजलेला आपला पिता, ती माता, तो भाऊ, त्या बहिणी, ती कांता, ती तुळस–या सर्वांचें दर्शन कवीनें इतक्या बारकाईनें व जिव्हाळ्यानें वाचकांना घडविलें आहे कीं, जणुं कांहीं तो हातांत विजेची दिवटी घेऊन वाचकाला प्रत्यक्ष आपल्या घरांतूनच फिरवून आणीत आहे असें वाटावें. आणि प्रत्येक आप्ताच्या स्मृतीभोंवतीं त्यानें भावनांचें जें जाळें

विणलें आहे, तें किती नाजूक व मनोहर आहे ! " तातास या बधुनिया हृदयांत खातें । होऊन हें हृदय विव्हळ सर्व जातें " अशी आपली अवस्था कवीनें मूर्तिमंत उभी केली आहे. आपल्या इतर बंधूंप्रमाणें आपण ज्ञान, धन, सत्ता, मान यांपैकीं कांहींच मिळविलें नाहीं, त्यामुळें ' त्याचा खरोखर न मी क्षण पुत्र शोभे ' अशी निराशा त्याचे चित्ताला वाटत आहे.

मातृप्रेमाचें चित्र

पण हा व्यावहारिक मोठेपणा हा हिशेबी प्रीतिभाव आईजवळ कोठला ? तिच्याजवळ केवळ निरपेक्ष प्रेमच ! म्हणून कवि आधींपासूनच बजावतो, " मित्रा, असा हळुच ये उजवे कडेस." दुष्यंतराजाहि कण्वाच्या आश्रमांत शिरतांना म्हणाला, ' तपोवनांत नम्र वेषानेंच गेलें पाहिजे.' आणि माता म्हणजे तपांचें तप, तीर्थांचें तीर्थ व पुण्याचें पुण्य ! याच भावनेनें कवि आईच्या खाटेजवळ 'हळूंच' जातो. तिच्याकडे पाहतांना त्याचे मनांत विचार येतात, " आतां आपली आई निजली आहे; पण निजण्यापूर्वी तिनें काय केलें असेल ? देवाची प्रार्थना ? कशासाठीं ? माझ्या कल्याणासाठीं. तिचे उपकार माझ्या हातून थोडे तरी कधीं फिटतील काय ? " या मातृ-प्रेमाचें चित्रण कवीनें अवघ्या चार ओळींत किती कौशल्यानें केलें आहे, पहा—" मत्कारणें स्तवुनि देव, निजावयातें । आलीस तूं खचित गे असशील मातें ! । मोठे त्वदीय उपकार, जरा तरी ते । जातील कां फिटुनियां तव पुत्रहस्तें ? ॥ " किती थोडक्यांत, किती सोप्या शब्दांनीं, केशवसुतांनीं आपल्या अंतःकरणांतील कोमल भावनांचें भांडार खोललें आहे !—आणि म्हणूनच ते थोर कवि !

पुढें दोन बहिणी निजलेल्या दिसतात. त्यांचें प्रेम किती सूचकतेनें रंगविलें आहे. " गोष्टी जयांस कथितां न पुऱ्याच झाल्या ! " या एका ओळींत आई आपल्या मुलींना गोष्टी सांगते व त्यांची गोडी मुलींना अवीट वाटते, हा सारा आशय येऊन गेला ! अशीच आपल्या पत्नीची अवस्थाहि कवीनें दोन ओळींतच रेखाटली आहे. " ती कोण

नों. नं.

दूर दिसते ?–निजली असूनी । जी श्वास टाकित असें मधुनी मधूनी " या दोन चरणावरूनहि पत्नीची विरह--व्यथा, मेघदूतांतील यक्षाच्या कांते-सारखी, व्यक्त होत नाहीं काय ?

कोंकणचें वर्णन

याच कौटुंबिक प्रेमाचा विस्तृत व रमणीय आविष्कार "नैर्ऋत्येकडील वारा " या कवितेंत केशवसुतांनीं केला आहे. सर्व वाऱ्यांत नैर्ऋत्येचा वारा आपल्याला सुखदायक वाटतो असें प्रथम सांगून त्याचें कारण कथन करतांना कवि म्हणतो, " तो वारा मम जन्मभूमिवरूनी येतो जवें वाहत।" तो वारा अंगावरून वाहूं लागला कीं, कवीच्या डोळ्यापुढें कोंकणांतील तीं उंच गिरिशिखेंर, तें विस्तीर्ण सागराचें तरंग-तांडव, ते खळखळा वाहणारे निर्झर व ते जुनेपुराणे किल्ले–हें सारें वैभव उभें राहतें. वळणें गांवाजवळून जगबुडी नांवाची नदी वाहते. तिचेंहि वर्णन कवीनें केलें आहे. पण कुरूपाला सुरूप देणें हें तर कवीचें कर्तव्यच. म्हणून केशव-सुतांनीं आपल्या त्या लोकमातेला ' जगदुद्धरा ' असें सोज्वळ नांव दिलें आहे. आईबापांच्या प्रेमाची आठवण होऊन कवि म्हणतो, " आईच्या नयनांत नित्य मग मी स्वर्गास त्या पाहतों, तातांकांवरि नित्य मी मग जगद्राज्यासना भावितों " ॥ बापाच्या मांडीवर लोळतांना सर्व पृथ्वीचें राज्य आपल्या हातीं आलें असें बालकाला वाटतें आणि आईचे ते प्रेमळ डोळे ?—स्वर्गसुखाचींच बरसात करीत असतात, ते !

अनुतापाची तळमळ

मातापित्यांच्या या अमोल उपकाराची फेड आपल्या हातून केव्हां, कशी होणार ? याचा विचार करून कवि दुःख प्रगट करतो, " कां हो यापरि वाढलों फुकट मी ? हा-हंत ! मी नष्ट हा ! " ही टोंचणी केशव-सुतांना आमरण राहिली होती. " जन्मा येउनि मीं उगा शिणविलें आई! तुला हाय गे । ताता ! भागविलें तुला फुकट मीं मत्पोषणीं हाय रे ! ॥ " असे सुस्कारे ते शेवटपर्यंत सोडीत राहिले. आपल्या आयुष्याचें ' सिंहाव-

लोकन ' करतांनाहि असे आंतरिक तळमळीचे बोल केशवसुतांनीं काढले आहेत. जुन्या स्मृतींचें सुख व विद्यमान निराशेचें दुःख यांनीं विणलेल्या आपल्या भावना त्यांनीं पुढील हृदयस्पर्शी शब्दांनीं रंगविल्या आहेत, " प्रदेश किती मागुते रुचिर ते बरें टाकिले, । कितीक तटिनीतटें श्रम जिथें अम्हीं वारिलें; । किती स्मृतिस धन्यतास्पद वनस्थली राहिल्या । जिथें धवलिता निशा प्रियजनासवें भोगिल्या ! ॥ सुखें न मिळतील तीं फिरुनि !–तीं जरी लाविती, । मनास चटका, तरी नयन त्यांवरी लोभती. । परन्तु हृदयास जे त्वरित जाउनी झोंबती, । प्रमाद दिसतां असे, नयन हे मिटूं पाहती " ! ॥

रेखीव शब्दचित्र

एकाद्या प्रसंगाचें सूक्ष्म व रम्य वर्णन केशवसुत कांहीं कांहीं कवितांत करतात. ' रांगोळी घालतांना पाहून ' या प्रसन्न काव्यांतील बालिकेचें शब्द–चित्र ते पुढील शब्दांनीं रेखाटतात. " होती मंजुल गीत गात वदनीं अस्पष्ट कांहीं तरी, । गेला दाटुनि शान्त तो रस अहा तेणें मदभ्यन्तरीं; । तीर्थे, देव, सती, मुनी, नरपती, देवी तशा पावना, अन्तर्दृष्टिपुढुनियां सरकल्या, सन्तोष झाला मना ! ॥ रांगोळींतील चित्रांचा भावार्थ काय हें आपल्या कल्पकतेनें कवि सांगतो, ' आदित्यादिक आकृती सुचविती दिव्यत्व तें उज्ज्वल, । तैसें स्वस्तिक सूचवी सफलता धर्मार्थकामांतिल; । पावित्र्याप्रत गोष्पदें तुळसही, शोभेस ह्रीं सारसें, । पुष्पें प्रीतिस, चक्र हें सुचवितें द्वारीं हरी या असे ! ॥ घराघरापुढें रोजरोज दिसणाऱ्या रांगोळींतून इतका अर्थ कवीनें काढला आणि त्यावरून असा सिद्धांत बांधला कीं, " साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे । नित्याच्या अवलोकनें जन परी होती पहा अंधळे ॥ "

' दिवाळी ' या कवितेंतील वीस श्लोकांत त्या सणाचें तपशीलवार वर्णन आहे. त्याचा नमुना–"भिंती रंगविल्या नव्या फिरुनिया, केलीं नवीं अंगणें । वीथी (=रस्ते) झाडुनि, रान काढुनि, दिसे सर्वत्र केराविणें । दारीं उंच दिले दिवे चढवुनी, हंड्या घरीं लाविल्या । लोकीं शक्त्यनुरूप

आत्मसदनीं भूषा नव्या जोडिल्या " हें झालें साधें-सरळ निवेदन. पण कवीला वक्रोक्तीची आवड असते. तो दिवाळींतील फराळ, खेळ, जागरण यांचें वर्णन किती खुबीनें करतो पहा—" आतां भार नसे कुणास, पण तो शिक्क्यास भारी असे । हातां काम नसे, परंतु पडतें तोंडास तें फारसें । कोणा मार नसे, तरी पण शिरीं तो सोंगट्यांच्या बसे । कोणा त्रास नसे, परंतु नयनां तो जागरें होतसे । "

कल्पनेचा रम्य विलास

सकाळचें वर्णन नाना कवींनीं नाना रीतींनीं केलेलें आहे. ' फुलांची पखरण' मध्यें केशवसुत कोमल उपमा मंजुळ शब्दांनीं देतात; त्या अशा— " किती सकाळ ही सुंदर । जसें मुलींचें माहेर । जगाचे ते व्याप । दुरि तैसे संताप । मनिं न शिरे मुळिं पाप ॥ पुण्याची ही वेळ पहा गे । सूर्यानें उजळीली । आशेचिया वेलीवरती । गाणी तीं फुललीं । तर मौजेनें या वेलीखालीं । टिप् फुलें टिप् ॥ " जणुं कांहीं अंगणांतील दाणे चिमणी टिपीत आहे, असा भास या शब्दांनीं कवीनें निर्माण केला आहे. संसारांतील घटनांचें वर्णन नैसर्गिक दाखल्यांनीं नेहमीं केलें जातें; पण सृष्टि-सौंदर्याचें वर्णन सांसारिक उपमांनीं करण्याचें कौशल्य केशवसुतांनीं ' कर्तव्य आणि प्रीति ' या कवितेंत दाखविलें आहे. वेलींचीं फुलें म्हणजे गृहिणीचीं मुलें व वनांतील सुगंध म्हणजे कुटुंबांतील प्रेम, हें सांगतांना ते म्हणतात, " तृणाची गे खालीं रुचिर हिरवी चादर बरी । लतांची वृक्षांची निबिड फुगडी शोभत बरी । फुलें तीं वल्लींचीं नव किसलयीं शोभत किती । तुझ्या ओंच्यामध्यें जशिं नीज अपत्यें विलसती ॥ सुगंधें तें होतें स्थल भरुनि गेलें अतिशय । तुझ्या प्रेमानें हे भरुनि असतें जैंवि निलय (=घर) ॥ "

हवेंत तरंगणारी ' म्हातारी ' पाहून कवीला अशी कल्पना सुचते कीं, " वा गंधर्वाचें । विमानच सूक्ष्मरूप साचे । वद अससी का । तूं तरंगत वातावरणांतुन । सूक्ष्म देह धरुनी । असति का तुजवरि ते बसुनी ? ॥ दिव्य असें गाणें । गात ते असतिल सौख्यानें । ते मज पाप्याला । कशाचें

ये ऐकायाला ॥ परि मम वत्सेतें । गमे तें परिसाया मिळतें । म्हणुनिच उल्हासें । अशी ही वेडावुनि हासे । ”

‘ एक खेडें ’ मध्यें ते म्हणतात, “ कीर्ति म्हणजे काय रे ?—एक पीस । शिरीं लोकांच्या त्यास चढायास, । छरे पडती पक्ष्यास खावयास । मागुनी तें गळणार हेंहि खास ॥ ”

“पाशांला जो तोडायाला पाही । स्वदेशासाठीं अपणा बांधुनि घेई ॥” असे विरोधाभास त्यांनीं क्वचित् गुंफिले आहेत. ‘ दिवस आणि रात्र ’—मध्यें ते असें मौजेचें वर्णन करतात, “ नक्षत्रें जगतीवरलीं । दिवस फुलवितो; असे खरें । पुष्पें आकाशामधलीं । रात्र खुलविते, पहा बरें ॥”

वात्सल्य व कारुण्य

‘ दंवाचे थेंब ’ ही कविता रम्य व रसाळ आहे. साध्या–छोट्या शब्दांतून वत्सल व करुण हे रस वहात आहेत. एका बाईची अनेक मुलें मेलेलीं असतात आणि एकच बाळ वाचलेला असतो. तो बागेंत सकाळीं गेला असतांना वेलीच्या पानापानावर दंव पडलेलें पहातो. तें पाहून तो आपल्या आईला बालसुलभ जिज्ञासेनें विचारतो, ‘ कोठुनि हे आले येथें ? ’ वर बोट करून आई उत्तर देते, “ जेथून चंद्र–नक्षत्रें, प्रकाश–पाऊस येतो, तेथूनच हे आले आणि तूंहि पण आलास तेथूनच.” पुढें ती त्याला बजावते “ कौतुक कर बघुनी त्यांतें । असती ते जोंवरि येथें । सूर्य त्यांस अपुल्या किरणीं । नेईलाचि लौकर गगनीं ” पण आईच्या अंतःकरणांत दुसरेच तरंग उठले. “ जातिल ते लौकर गगनीं । बदतां गहिंवरली जननी । गतबालें तिजला स्मरलीं । डोळ्यांत आंसवें आलीं ॥ “ देवा रे । ” मग ती स्फुंदे —। “ एवढा तरी लाभूं दे । ” म्हणुनि तिनें त्या बाळासी । धरिलें दृढ निज हृदयाशीं ॥ ”

केशवसुतांचीं कांहीं कांहीं काव्यें अत्यंत रसाळ आहेत. “ आईकरितां शोक ’ कवितेमध्यें कवि म्हणतो, “ फिरुनि तुझें कोठें तें तीर्थरूप पांहूं । पादरजीं लोळुनि तव धन्य केंवि होऊं । जनकामागें जाग्रत जननी गे तूं दैवत । उरलिस तीहि साम्प्रत । गेलीस सोडुनि आम्हां दीन बालकांतें ॥

अंतरले पाय तुझे हाय हाय माते ॥ " आईच्या विरहानें कवीची अवस्था किती शोचनीय झाली याचें रेखीव शब्द--चित्र पुढील श्लोकांत काढलेलें आहे. कष्ट दिले तुजला मी फार फार आई । त्यांची मजकडुनि फेड जाहली न कांहीं । दुर्भग मी असा असें । म्हणुनि दुःख वाटतसे । कंठ फार दाटतसे । रडतो गुडघ्यांत म्हणुनी घालुनी शिरातें । अन्तरले पाय तुझे हाय हाय माते । "

सतारीची मोहिनी

काव्याचें, गायनाचें, कोणत्याहि कलेचें रहस्य काय, कार्य काय व महत्त्व काय, याचें मनोरम वर्णन केशवसुतांनीं ' सतारीचे बोल ' या हृदयंगम कवनांत केलें आहे. त्याचें पद-लालित्य मधुर आहे, वर्णन-कौशल्य प्रशंसनीय आहे, कल्पना-वैभव मोहनी घालणारें आहे आणि त्याच्या अंतरंगींचें तत्त्व तर उदात्त आहे. गूढगुंजनाचें सूक्ष्म वलयहि या कवितेभोंवतीं आहे. रात्रींच्या वेळीं कवि विमनस्कपणें चाललेला असतांना त्याच्या कानीं सतारीचे ध्वनि येतात, हें आरंभीं सांगतांना केशवसुत म्हणतात, " काळोखाची रजनी होती, । हृदयीं भरल्या होत्या खंती; । अंधारांतचि गढलें सारें । लक्ष्य, न लक्षी वरचे तारे, । विमनस्कपणें स्वपदें उचलित । रस्त्यांतुनि मी होतों हिंडत; । एका खिडकींतुनि सूर । तदा पडले-दिड दा दिड दा, दिड दा । "

पण कवि निराश झालेला होता. जग जड आहे, हृदयहि जड आहे-अशा स्थितींत विष खावें असा विचार ज्या कवीच्या चित्तांत खेळतो, तो सतारीचे मंजुळ ध्वनि कशाला ऐकत बसतो ? ' बाह्य भैरवीं धरिते प्रीती ' अशीच त्याची वृत्ति. म्हणून ' पिरपिर कसली खुशालचंदा ? ' असें तो त्या सतारवाल्यावर खेकसतो. पण जसजसे तो ते बोल ऐकतो, तसतसे—" आकर्षुनि घे; हृदय निवालें, । तन्मय झालें, द्रवलें; आलें । लोचनांतुनी तोय कितिकदां । ऐकत असतां-दिड दा दिड दा "

कलेनें हृदयाचा दरवाजा खोलला, अंतचक्षु उघडले आणि " आशाप्रेरक निधूं लागले । सूर तधीं मीं डोळे पुशिले; । वरती मग मी नजर

फिरवली, । नक्षत्रें तों अगणित दिसलीं; । अस्तित्वाची त्यांच्या नव्हती । हा वेळवरी दादच मज ती । " तम अल्प-द्युति बहु " या शब्दां । वदती रव ते-दिड दा दिड दा ॥ "

सतारीचे उदात्त सूर ऐकतां ऐकतां आपलें व्यक्तित्व विरलें व विश्वामध्यें पसरलें असें कवीला वाटूं लागलें. प्रत्येक बोलाबरोबर स्वर्ग-सुखाचा आनंद त्याला होऊं लागला. त्याला असा भास झाला, " स्वर्ग घरेला चुम्बायाला । खालीं लवला-मजला गमला । अशा वितरिती अत्यानंदा । ध्वनि ते-दिड दा, दिड हा, दिड दा " अखेर सर्व वृत्तींचा लय झाला व शांतीचा लाभ विषण्ण कवि-मनाला झाला. " शान्त वाजली गती शेवटीं । शान्त धरित्री, शान्त निशा ती, । शान्तच वारे, शान्तच तारे । शान्तच हृदयीं झालें सारें । "

हें जें परिवर्तन सतारीनें केलें, तेंच कवीचें काव्य करितें, नाहीं का ? तुकाराम-एकनाथापासून मोरोपंतापर्यंत कवींच्या काव्यावर आक्षेपकांनीं प्रथम नाराजी प्रगट केली, पण त्या काव्यांचें दिव्य सौंदर्य पाहतांच ' निंदक तेच स्तवक ' झाले. हाच आशय केशवसुतांनीं आपल्या या रमणीय कवनांतून व्यक्त केला आहे काय ?

ब्रह्मानंदाची स्थिती

हर्ष-शोकाच्या व सुख-दुःखाच्या पलीकडे मानवी मनाची कांहीं अवस्था असते. मग तिला समाधि म्हणा, एकतानता म्हणा किंवा तंद्री म्हणा. या अवस्थेचें वर्णन ' झपूर्झा ' या कवितेंत केशवसुतांनीं केलें आहे. गूढगुंजनाचा उत्कृष्ट नमुना म्हणून हें गीत प्रसिद्ध आहे. त्याचा प्रारंभच संतकवीच्या समाधि-वर्णनासारखा आहे, तो असा-" हर्षखेद ते मावळले, हास्य निमालें । अश्रु पळाले । कण्टकशल्यें बोंथटलीं । मखमालीची लव वठली; । कांही न दिसे दृष्टीला । प्रकाश गेला । तिमिर हरपला । काय म्हणावें या स्थितिला ? । झपूर्झा ! गडे झपूर्झा ! "

लहान मुली एक खेळ खेळतात व तो खेळतांना ' जा पोरी जा ' म्हणतात; त्या शब्दांचा अपभ्रंश म्हणजेच ' झपूर्झा ' ध्येयवादी महा-

त्म्यांच्या अंतःकरणांतील चिद्घनचपला ज्ञानाच्या कुंपणावरून उड्डाण करून जाते, आणि मग ' आंतला आवाज ' ऐकून ते ' निगूढ गीती ' गातात. असा महात्मा ' मनुष्याणां सहस्रेषु ' एकादाच, हें सत्य सांगतांना केशवसुत म्हणतात, " नांगरल्याविण भुई बरी । असें किति तरी, । पण शेतकरी । सनदी तेथें कोण वदा ?-। हजारांतुनी एकादा ! तरी न, तेथूनि चनमाला । आणायाला, । अटक तुम्हांला । मात्र गात हा मंत्र चला-। झपूर्झा ! गडे झपूर्झा ! "

अशा दिव्य भूमिकेवर चढलेल्या महात्म्याला सारे ' प्रेमभरें ' नाचत आहेत अशी जाणीव होते आणि ' खुडित खपुष्पें ' तो सर्वत्र संचार करतो. ' वाचे बरवें कवित्व । कवित्वीं रासिकत्व । रसिकत्वा परत्व-। स्पर्शु जैसा ' या ज्ञानदेवांच्या आध्यात्मिक भूमिकेचेंच चित्र केशवसुतांनीं आधुनिक शब्दांनीं, नव्या चालीनें रेखाटलें आहे, असें वाटतें.

मानवतेचा महामंत्र

' जिकडे जावे तिकडे माझीं भावंडें आहेत ' असें विश्वबंधुत्व केशवसुतांचा ' नवा शिपाई ' उद्घोषितो. स्वतःच्या कुटुंबावर त्यांचें प्रेम आहे, आपल्या कोकणावर त्यांची प्रीति आहे, आपल्या राष्ट्रमातेची त्यांना भक्ति आहे; पण या संकुचित मर्यादेपलीकडेहि पहाण्याची व्यापक दृष्टि त्यांचेठायीं आहे. ' मळ्यास माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे ' अशी त्यांची मानवताप्रेमी वृत्ति आहे. आणि ती प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याचीहि त्यांची तयारी आहे. ' ब्रह्मदृष्ट्या सर्व समान, पण व्यवहारदृष्ट्या भेदाभेद आहेतच ' अशी दुटप्पी भाषा त्यांचेपाशीं नाहीं. श्रीमंत-गरीब, मजूर-मालक, स्पृश्य-अस्पृश्य, स्त्री-पुरुष असले भेदभाव ते मुळींच मानीत नाहींत. ' समतेचा ध्वज उंच ' धरून ते मानवतेचा मंत्र पढवीत आहेत. ' अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न ' १८८८ सालीं त्यांनीं आपल्या कवितेच्या द्वारें समाजापुढें मांडला. रस्त्यावर महारमांगांचीं मुलें खेळत असतांना एक ब्राह्मण त्यांचेवर खेकसतो, " सरा रे दुरी पोर हो म्हारड्यांचें । चला ! खेळ हे मांडले डोंबलाचे । निघा !

वाट द्या लौकरी ब्राह्मणातें " । पळालीं मुलें;—कोण राहील तेथें !॥" तरी एक राहिलाच. तेव्हां त्याचेवर सोवळ्या ब्राह्मणानें काठी उगारली व ' म्हणे–गाढवा ! सांवली ना पडेल ? ' तेव्हां तो मुलगा घरीं गेला व आईला विचारूं लागला, " जरी त्यावरी सांवली माझि गेली । तरी काय बाधा असे ठेवलेली ? " या प्रश्नाला उत्तर काय ?–कांहींच नाहीं—आणि म्हणूनच आतां अस्पृश्यतेची रूढि नामशेष झाली. पण साठ वर्षांपूर्वी असा प्रश्न कवितेंतून विचारणें हें मोठें धाष्टर्याचें काम होतें. तें केशवसुतांनीं हिंमतीनें केलें.

दलिताविषयीं अनुकंपा

धर्म--व्यवस्थेंत अस्पृश्य; तसेच अर्थ–व्यवस्थेंत मजूर;-दीन, दलित व उपेक्षित. त्यांचेकडे लक्ष वेधण्यासाठीं केशवसुतांनीं ' मजुरावर उपासमारीची पाळी ' ही कविता १८८९ सालीं लिहिली. साऱ्या दिवसांत हातांत कवडीहि आली नाहीं, तेव्हां एक मजूर आपल्या मनाशीं प्रश्न करतो, " हीं मंदिरें हो खुलतात चांगलीं; । माझ्या वडीलींच न काय बांधिलीं ? । मी मात्र हो आज मरे भुकेमुळें; । श्रीमंत हे नाचति मन्दिरीं भले ! ॥ " तो आपली अल्पसंतुष्ट मागणी देवाकडे करतांना म्हणतो, " हे वा तयांचा मजला मुळीं नसे, । जाडी मला भाकर ती पुरी असे; । कष्टांत देवा ! मरण्यास तत्पर, । कां मारिसी हाय ? भुकेमुळें तर ?॥ "

घरीं गेल्यावर आपल्या कारभारिणीला व मुलाबाळांना खावयास आपण काय देणार ? या विचारानें त्या मजुराचें आंतडें तुटतें व तो निराशेनें मनांत म्हणतो, " हे लाडके ! आणिक लाडक्यांनो ! । दावूं तुम्हां तोंड कसे फिरोन ? । जन्मास मी काय म्हणोनि आलों ? । येतांच वा कां न मरोनि गेलों ? ॥ "

शाळेच्या चिमण्या जगांतील अन्यायांचीहि अशीच चीड केशवसुतांना येई. " मुलांस झोडपणाऱ्या पंतोजीस " ते रागारागानें विचारतात, " कोणें मूर्खपणें गुरुपण तुला क्रूरा असे रे दिलें ? । कां खाटीक न जाहलास !—तुजला तें शोभतें चांगलें । या बाळांप्रत फार निर्दयपणें कां

तूं असा मारिसी ?। केला रे अपराध काय असला यांनीं ?-वदें रे मशीं॥" मौज ही कीं, असे सवाल करणारे केशवसुत हे स्वतः तापट व मारकट शिक्षक होते असें म्हणतात. पण निवांत वेळीं शांत विचार करीत ते बसले; म्हणजे त्यांना आदर्श शिक्षक कसा असावा याचें योग्य ज्ञान होई. त्याच कवितेंत ते खऱ्या गुरूचें वर्णन करतात, "केव्हां धाकहि, पारितोषिक कधीं, गोडीगुलाबी कधीं। शिक्षा योग्य कधीं करुनि गुरु ते नांवास येती सुधी ॥"

समाजावर टीका

" आगबोटीच्या कांठाशीं समुद्राच्या क्षोभेकडे पहात उभ्या असलेल्या एका तरुणीस " हें एका कवितेचें शीर्षक किती प्रदीर्घ व गद्य वाटतें ! पण ती सारी कविता निसर्ग-वर्णनानें व कल्पकतेनें नटलेली आहे. 'पृथ्वी-वरील जिणें जड ' कां वाटतें हें सांगतांना केशवसुत त्या कवितेंत म्हणतात, " इथें न्यायस्थानीं अनय उघडा स्वैर फिरतो। नरालागीं येथें नरच चरणांहीं तुडवितो ॥ "

देव-दैत्यांचा झगडा

" गंगौघापरि भव्य केशवसुता, सावेश वाणी तुझी " अशी प्रशस्ति कवि रेंदाळकर यांनीं केली आहे. ती यथार्थ ठरविणारीं त्यांचीं कवनें म्हणजे स्फूर्ति, गोफण, नवा शिपाई, तुतारी इत्यादि. " कांठोकांठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या ' असा स्फूर्तिदायक आवेश त्या कवितांतून खळाळत आहे. " जोर मनगटांतला पुरा घाल घाल खर्चीं। हाण टोमणा चळ न जरा, अचुक मार बर्ची॥" अशा प्रेरक शब्दांचे घावामागून घाव ते घालीत आहेत. जगांत सर्वत्र द्वेष, अन्याय व विषमता यांचें थैमान चालू आहे. त्याचाच अर्थ मानव अपूर्ण आहे. पण त्याच्या आत्म्याची धडपड पूर्णतेकडे जाण्यासाठीं आहे. म्हणून तो प्रेम, न्याय व समता यांचें राज्य स्थापूं पाहतो. त्यासाठीं त्याला दुष्टत्वाशीं झगडा करावा लागत आहे. या आसुरी व दैवी संपदांच्या संग्रामांत ' देवांच्या मदतीस चला तर !'

अशी जोराची हाक केशवसुत देतात. देव म्हणजे प्रेम, न्याय व समता या गुणांचा सागर–' मंगल मंगलानां ' हें त्याचें स्वरूप. द्वेष–हिंसादि सैतानी प्रवृत्तींशीं सामना देणारा तो देवांचा पक्ष. पण हें सत्य स्वरूप न ओळखतां देवांना स्वार्थाचें व धर्माला रूढीचें सोंग जर देण्यांत आलें, किंबहुना सैतानाच्याच पक्षाला ' देवाचा पक्ष ' म्हणून संबोधण्यांत आलें; तर–? साऱ्या जगाला कणसाप्रमाणें कापूं निघालेला हिटलरहि आत्मचरित्रांत लिहितो कीं, " मी प्रभूचेंच कार्य करीत आहें. ' अशा ढोंगी देवाधर्माची धोंड मानवाच्या प्रगतीचे आड आली, तर, केशवसुत एकाद्या सेनापतीप्रमाणें गरजतात, " अडवितील देव जरी । झगडूं त्यांच्याशीं निकरीं । हार न जाऊं रतीभरी । "

तुतारीचे सूर

याच सत्पक्षाच्या भूमिकेवरून त्यांनीं आपली तुतारी फुंकली, काव्याचा वेला स्फूर्तीनें कांठोकाठ भरला आणि गोफणींतून जोराची हाणाहाण केली. ' सगळीं गगनें ' भेदून टाकणारा आवाज काढणारी तुतारी ' फुंकीन मी स्वप्राणानें ' असें ते म्हणतात. या तुतारीची ललकारी ऐकतांच ' मुके पडसाद वाचाळ ' होतील असा आत्मविश्वास त्यांना वाटतो. सध्यांची वेळ क्रांतीची आहे, उलथापालथीची आहे, जुनें टाकून नवें घेण्याची आहे,—अशा वेळीं काव्य–गायनाचे जलसे कसले करतां ? असा प्रेरक प्रश्न करून त्यांनीं तरुणांना व शूरांना समतेचा ध्वज धरण्यास व नीतीचा प्रसार करण्यास पाचारण केलें आहे. ' पुढें सरा रे ' असा प्रगतीचा संदेश त्यांनीं इतक्या आवेशपूर्ण भाषेनें दिला आहे कीं, मराठी काव्यांत तरी त्याला तोड मिळणें कठीण ! आरंभापासूनच तिसऱ्या सप्तकांतील सूर लावून ते म्हणतात,

" एक तुतारी द्या मज आणुनी, । फुंकिन मी जी स्वप्राणानें, । भेदुनि टाकिन सगळीं गगनें–। दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें; । अशी तुतारी द्या मजलागुनि ॥ " कोणी म्हणेल, ' तुतारीसारखें रण–वाद्यच तुम्हांला कां हवें ? ' त्याला उत्तर कवि देतो, " सारंगी ती सतार सुन्दर । वीणा,

बीनहि, मृदंग, बाजा, । सूरहि, सनई, अलगुज माझ्या–। कसचीं हीं हो पडतिल काजा ?। एक तुतारी द्या तर सत्वर ॥ " हीं कोमल-मंजुल वाद्यें आपल्याला कां नकोत हें सांगतांना कवि म्हणतो, " रूढी–जुलूभ यांचीं भेसुर । सन्तानें राक्षसी तुम्हांला । फाडुनि खाती, ही हतवेला–। जल्शाची का ? पुसा मनाला । तुतारिनें ह्या सावध व्हा तर ! "

धर्मावर रूढीचीं पुटें बसून त्याचें मूळचें स्वरूप लोप पावलें आहे, हें केशवसुतांनीं काव्यपूर्ण वाणीनें सांगितलें आहे. तें असे, " अवडम्बरवेलीं ढगें कितीतरि, । रविकिरणांचा चूर होतसें, । मोहर सगळा गळुनि जातसें, । कीड पिकांवरि सर्वत्र दिसे । गाफीलगिरी तरिहि जगावरि । " टाकाऊ ठरलेल्या जुन्याला कवटाळून न धरतां इष्ट तें नवें स्वीकारण्यास तयार रहा, असा आदेशहि अलंकारिक भाषेनें त्यांनीं दिला आहे, तो असा—" जुन्या नभीं या ताजे तारक, । जुन्या भूमिवर नवी टवटवी, जुना समुद्रहि नव रत्नें वीं; । जुन्यांतून जी निष्पत्ति । नवी काय नव्हे ती श्रेयस्कारक ? "

अलंकाराचा आडपडदा टाकून आतां ते स्पष्टच म्हणतात, " जुनें जाउं द्या मरणालागुनि, । जाळुनि किंवा पुरुनि टाका, । सडत न एक्या ठायीं ठाका, । सावध ! ऐका पुढच्या हांका ? । खांद्यास चला खांदा भिडवुनि ! " घरकोंबड्यासारखे स्वस्थ बसून न रहतां मानवानें कायमची कीर्ति मिळण्यासारखीं सत्कृत्यें करावींत, हें ध्येय कवीनें किती सुंदर दृष्टांतानें सांगितलें आहे, पहा, ' प्रातःकाल हा विशाल भूधर, । सुन्दर लेणीं तयांत खोदा, । निजनामें त्यांवरती नोंदा । बसुनी कां वाढवितां मेदा ? । विक्रम कांहीं करा, चला तर ! " वर्तमानकाळ हाच एक पर्वत आहे अशी कल्पना केली, तर त्यावर आपल्या नांवाची नोंद करा, त्याच्या पोटांत कलायुक्त लेणीं खोदा आणि पराक्रम करून लौकिक कमवा.

स्त्रियांना पुरुषांइतकें स्वातंत्र्य व समता द्या, अस्पृश्यतेचा मानवतेवरील कलंक पुसून टाका, इत्यादि आगरकरी विचारांचे स्फोट ' तुतारी ' मध्यें कशवसुतांनीं पुढील शब्दांत केले आहेत:–" स्त्रीवर्गाला दास्यीं दडपुनि,। दासीपुत्राचि मानव होतो, । स्त्रीला अज्ञानांत ठेवितो । परिणामीं दुर्दशेस

जातो, । धिक्कार अशा चालीलागुनि । पत्नीनिधनीं अन्य वरी नर, । परि पति मरतां स्त्रीचा, तीतें । बळेचि देतो संन्यासातें । पडली छाया मनुजाची जर । विटाळ होतो तर मनुजाला, । व्हावें स्नानचि सचैल त्याला; । काय म्हणावें या मूर्खाला ?—नरेंच केला हीन किती नर ! "

नीतीची मीमांसा

आगरकरप्रभृतींनीं पुरस्कारलेल्या समाज—सुधारणेचा आत्मा समता हा आहे—' सारे मानव समान' हा युग-मंत्र आहे. तो तरुणांच्या चित्तावर बिंबवितांना केशवसुत हाकारतात, " हल्ला करण्या तर दंभावर-तर बंडांवर, । शूरांनो ! या, त्वरा करा रे ! समतेचा ध्वज उंच धरा रे । नीतीची द्वाही पसरा रे :। तुतारिच्या ह्या सुराबरोबर ! " धर्माच्या आज्ञा, नीतीचे निर्बंध, या नांवाखालीं दुष्ट रूढि व घातक चालीरीती यांचेंच दडपण मानवावर पडतें. तें दूर करण्यासाठीं कवि असा सिद्धांत सांगतो कीं, " नियमन मनुजासाठीं, मानव- । नसे नियमनासाठीं जाणा प्रगतिस जर ते हाणी टोणा, । झुगारूनि तें देउनि, बाणा । मिरवा निज ओजाचा अभिनव " गाईसाठीं दावें, दाव्यासाठीं गाय नव्हे; पतंगासाठीं दोरा, दोऱ्यासाठीं पतंग नव्हे; जहाजासाठीं नांगर, नांगरासाठीं जहाज नव्हे; त्याप्रमाणें मानवाच्या स्थैर्यासाठीं व प्रगतीसाठीं नीतीचे नियम, त्या नियमासाठीं मानव नाहीं, त्या नियमानें तो स्वतःला जखडून घेणार नाहीं हें तत्त्व सर्वमान्य होण्यासारखेंच आहे. पण मानवसमाजानें कोणतेंहि बंधन न पाळतां ' मनःपूत ' वागावयाचें ठरविलें, तर दावें तोडलेल्या गाईप्रमाणें तो समाज उधळेल, दोरा तुटलेल्या पतंगाप्रमाणें गोते खाईल आणि नांगर सुटलेल्या जहाजाप्रमाणें रसातळास जाईल. शाश्वत तत्त्वें व चंचल चालीरीति यांचा विवेक करण्याची बुद्धि समाज-नेत्यांनीं नीट वापरली, तरच समाजाची प्रगति योग्य दिशेनें होते. कारण, शेवटीं ' प्रगति ' म्हणजे तरी काय ? याचा विचार येतोच. तो करूनच प्रगतीला पोषक अशीं तत्त्वें शांत—दांत व निर्लोभी—निर्मळ ऋषिमुनींनीं एकत्र केलीं. त्यांचा समुच्चय म्हणजेच नीति. अर्थात् त्या प्राचीन ज्ञानवंताइतका व

नीतिमंताइतकाच अधिकार आजच्या थोर पुरुषांना देशकालानुरूप नवी नीति घडविण्याचा आहे. म्हणून सत्य व शाश्वत तत्त्व कोणतें, देवांची बाजू कोणती, याचा स्वतंत्र बुद्धीनें पक्का निश्चय करून मग आपली सारी शक्ति त्या सत्पक्षाच्या पाठीशीं उभी करावी, असा उपदेश करतांना कवि शेवटीं म्हणतो, " पूर्वीपासुन अजुनि सुरासुर । तुंबळ संग्रामाला करिती;। सम्प्रति दानव फार माजती, । देवांवर झेंडा मिरविता । देवांच्या मदतीस चला तर ॥ "

शांतीचा संदेश

' तुतारी 'सारखें रण-वाद्य ज्यांनीं आणलें, त्यांनींच रणांगणावरील सैनिकहि उभे केले. केशवसुतांनीं आपला नवा शिपाई' नव्या निशाणाखालीं उभा केला आहे. तो आपलें वर्णन करतांना म्हणतो, ' नव्या मन्वंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहें, । कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें । ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा, । तेच पतित कीं जे आंखडिती प्रदेश साकल्याचा " या नव्या शिपायाची वृत्ति विश्वबंधुत्वाची आहे. मानवता-धर्माचा जयजयकार करतांना तो आपला अनुभव सांगतो, " जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत, । सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत; । कोठेंही जा–पायांखालीं तृणावृता भू दिसते; । कोठेंही जा–डोईवरतें दिसतें नीलांबर तें ! " हिरवी शेतें व निळें आकाश सर्वत्र समान आहे.

जगांतील तंटे-कलह नष्ट करून, आक्रमण व शोषण गाडून टाकून, युद्धें व महायुद्धें नामशेष करण्याचें ध्येय या शिपायाच्या डोळ्यापुढें आहे. तो म्हणतो, " शान्तीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जो आहे, । प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे ! "

प्रगतीची प्रेरणा

' तुतारी ' किंवा ' नवा शिपाई ' यांच्याइतकेंच आवेशपूर्ण काव्य ' स्फूर्ति ' हेंहि आहे. त्याचा प्रारंभच किती उत्साहजनक व आशा-

दायक आहे, पहा—" कांठोकांठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या। प्राशन करितां रंग जगाचे क्षणोक्षणीं ते बदलूं द्या ॥ " अमर्याद महत्त्वाकांक्षा व अकुंठित कर्तृत्व यांचा चैतन्यदायी संदेश त्या वेळच्या परतंत्र भारतीयाला केशवसुत देत आहेत. काव्याच्या नौकेंत बसून, आकाशापर्यंत आपण जाऊं व तेथून सारीं नक्षत्रें पृथ्वीवर, झाडावरून बोरें टाकावींत त्याप्रमाणें, फेकून देऊं, अशी कल्पनेची भरारी मारतांना ते म्हणतात, " क्लप्तीची मग करुनी नौका व्योमसागरावरि जाऊं, । उडुरत्नें या गरिब घरेला तेथुनि फेंकुनियां देऊं। अडवतील जर देव, तरी झगडूं त्यांच्याशीं निकरीं, । हार न खाऊं रतीभरी ! ॥ "

हाच प्रगतीचा संदेश व आशावादाचा उपदेश, केशवसुतांनीं ' गोफण केली छान ! ' या कवितेंत जोरदार शब्दांनीं केला आहे. त्या कवितेच्या शब्दाशब्दांतून आवेश कसा उसळत आहे. आळशी, लोचट, बोलघेवडे अशा लोकांशीं झुंज खेळण्यासाठीं आवाहन करतांना कवि म्हणतो, " गांठ मारुनी वैराची । गोफण केली छान; । कठिण शब्द या धोंड्यांनीं । करितों हाणाहाण ॥ वैर तयाला, बसती जे । स्तिमितचि आलस्यांत । वैर तयांला पोकळ जे । बडबडती तोऱ्यांत । वैर तयांला वैरी जे । त्यांच्या पायधुळींत । लोळुनि कृतार्थ जे । प्राप्त तूपपोळींत । "

शब्दाची प्रेरक शक्ति किती असूं शकते, हें ' उत्तेजनाचे दोन शब्द ' या कवितेंत दिसून येते. पानपतचे भाऊसाहेब किंवा सिंहगडाचे शेलार-मामा यांच्या वीरश्रीनें रसरसणारे शब्द या कवितेंत भरलेले आहेत. आरंभच मुळीं असा जोरदार आहे, " जोर मनगटांतला पुरा । घाल घाल खर्चीं; । हाण टोमणा, चळ न जरा अचूक मार बर्ची ! ॥ दे टोले जोंवरी असे । तप्त लाल लोखंड; । येइल आकारास कसें । झाल्यावर तें थंड ? ॥ "

आगरकरांच्या सुधारकी विचारांचा एक प्रवाह केशवसुतांच्या काव्यांतून जसा खळाळत वाहत आहे, तसाच दुसरा प्रवाह हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांतून पाझरत आहे. विशेषतः स्त्रियांच्या उद्धारासाठीं

त्यांनीं आपल्या प्रतिभासंपन्न कादंबऱ्या लिहिल्या. त्यामुळें आनंदून जाऊन केशवसुत " पण लक्षांत कोण घेतो 'च्या कर्त्यास " अभिनंदनपूर्वक म्हणतात, " धीरा ! उन्नतिचे पथांत उमदा राऊत तूं चालसी ! । नाहीं काय ? करूनि चीत अगदीं ही रूढिका–राक्षसी, । टांकानें अपुल्या दुराग्रह जुना मर्मी तसा विंधुनी, । स्त्रीजातीस असाच काढ चरती !–घे कीर्ति संपादुनी ! ॥ "

मानवी कर्तृत्वाला हाक

मानवाच्या अंगचें कर्तृत्त्व त्याला जाणवून देण्याचें कार्य केशवसुतांनीं केलें आहे. ' विद्यार्थ्याप्रत ' या कवितेंतील विचार किती उत्तेजनपर आहेत पहा— ' महत्व भारी आहे या पृथ्वीचें, । त्याहुनि अतिशय या सगळ्या विश्वाचें; । परि तुजमध्यें महतीचें जें बीज । त्याहुनि कांही मोठी नाहीं चीज ॥ अग्नि असे हा तेजस्वी रे फार, । त्याहुनि भारी सूर्य नभींचा थोर, । परी किरण जो तुजमध्यें सत्याचा । प्रकाश सर्वोत्तम तो आहे त्याचा ॥ पृथ्वीमध्यें रत्नें बहु आहेत; । आकाशीं तर असंख्य दिसताहेत; । परि एक रत्न तुजमध्यें जें सच्छील । कोणाला नच सर त्याची येईल ॥ "

सत्य व शील यांनीं संपन्न असलेला मनुष्य हा बलाढ्य राजालाहि भारी आहे, हा सिद्धांत मांडतांना अखेरीस ते म्हणतात, " स्नायूमध्यें पुष्कळ आहे शक्ति, । नृपवेत्रीं तर फारच आहे म्हणती; । परि एक एक जो नवा शब्द तूं शिकसी । शक्ति तयाची उलथिल सर्व जगासीं ॥ "

प्रगतीची आशा दाखविली, तशीच कृतीची प्रेरणाहि केशवसुतांनीं दिली आहे. प्रवृत्तिवादाचा उपदेश त्यांनीं अनेक कवितांतून केला आहे. ' सतत उद्योग ' हा मंत्र त्यांनीं शिकविला आहे. ' घड्याळ ' या कवितेंत ते म्हणतात, " वार्द्धक्य जर सौख्यांत जावया । व्हावें, पश्चात्ताप नुरुनियां तर तरुणा रे ! मला वाटतें, । ध्यानीं संतत आपुल्या आण घेड्याळ जें हें अविरत वदतें–। ' आला क्षण–गेला क्षण ॥ भिंतीवरील घड्याळाचा लंबक इकडून तिकडे व तिकडून इकडे येतो; त्याप्रमाणें प्रत्येक

कडव्याच्या शेवटचे 'आला क्षण—गेला क्षण' हे शब्द हेलकावे खातात,—नाहीं ?

'निघतील तयांचे चेले'

लौकिकी विषय, विविध चाली, देशभक्तीचे विचार, गूढगुंजनाचें तत्त्वज्ञान, निसर्गाचें प्रेम, प्रणयाची भावना, निर्यमक रचना इत्यादि नवीं लेणीं महाराष्ट्र शारदेच्या अंगावर केशवसुतांनीं चढविलीं. सुनीतें हा काव्य-प्रकार त्यांनींच रूढ केला. त्यांनीं जीं आठ सुनीतें रचलीं, त्यांतील "मयूरासन आणि ताजमहाल" हें आदर्शभूत आहे. सहा कोटि रुपये खर्चून केलेलें मयूरासन चोरानें पळविलें, पण त्याच्या निम्या खर्चांतच यमुनातीरावर बांधलेलें प्रेम-मंदिर-तो ताजमहाल, मात्र तेथें कायम आहे. स्वार्थापेक्षां प्रीतीचें हें श्रेष्ठत्व 'मत्त भ्रांत नरा'स पटवून कवि शेवटच्या दोन ओळींत सालंकृत भाषेनें असा सिद्धांत सांगतो, "काडी एकच गंध-युक्त, नमुनी प्रीतीस तूं लाव ती। तीचा वास सदा जगीं पसरुनी देईल तो तुष्टिला ॥" सारींच सुनीतें अशीं 'औट श्लोकी' आहेत असें नाहीं.

ललित शब्दरचना किंवा अलंकारांची सजावट या बाह्यांगाकडे केशव-सुत फारसें लक्ष देत नाहींत. गोफणींतील धोंड्यांनीं हाणाहाण करण्याचाच त्यांचा बाणा—श्रीसमर्थ रामदासांच्या संप्रदायास शोभणारा. तथापि 'सतारीचे बोल' यासारखीं कवनें बाह्यांगानेंहि रमणीय आहेत. 'फुलपांखरूं', 'गुलाबाची कळी' 'दंवाचे थेंब' इत्यादि कविता तर धावत्या-बागडत्या भाषा-शैलीनें नटलेल्या आहेत-'बालकवी'नाहि शोभण्यासारख्या आहेत. 'नाहीं ज्यापरि डोंगळा' या एका चतुःश्लोकीं कवितेंतील चौदा ओळींत बारा उपमा केशवसुतांनीं गुंफिल्या आहेत. तसेंच 'वियुक्ताचा उद्गार' या सुनीतावर आठ उपमांची माळ घातली आहे. पण अशीं बहिरंगाची खुलावट हें कांहीं केशवसुतांचें वैशिष्ट्य नव्हे. नव्या युगाचें स्वागत करून त्याचा मंत्र वाचकांच्या कानीं स्वतंत्र रीतीनें व आवेशानें त्यांनीं घातला, यांत त्यांची थोरवी आहे. या त्यांच्या कार्याचें गुण-गान त्यांचे 'सच्चे चेले' गोविंदाग्रज पुढील सूचक व वेधक शब्दांनीं करतात,

निजलेल्या जागृति आली । हो ताजे जें थकलेलें ।
तों शब्द मुक्याला सुचलें ।
गूढास रूप सांपडलें ।
स्वच्छंद अचेतन हाले ।
नश्वर ते ईश्वर केलें । केशवसुत गाउनि गेले ॥

अशा जागृतिकारक, चैतन्यदायक व नावीन्यपूर्ण कवितांचा संप्रदाय निर्माण करणारे केशवसुत "सर्वांच्या हृदयीं भरले । सर्वांच्या जीवीं भिनले । निघतील तयांचे चेले । केशवसुत गाउनि गेले ॥"

' प्रतिभासंपन्न कवि ' म्हणून गडकऱ्यांनीं अर्वाचीन मराठी कविवर्गामध्यें अत्युच्च स्थान संपादिलें आहे. विनोदकार म्हणून त्यांनीं अलोट लौकिक कमावला व नाटककार म्हणूनहि असामान्य यश मिळविलें, पण



कवि म्हणून त्यांनीं जी कीर्ति प्राप्त करून घेतली, तिला आधुनिक मराठी साहित्यांत तोडच नाहीं. ते हाडाचे कवि होते आणि त्यांचा पिंड भावनोत्कट होता. हास्यपूर्ण विनोद करण्यांत ते जितके यशस्वी झाले, त्याहून कारुण्यपूर्ण नाटकें रचण्यांत त्यांना अधिक सिद्धि लाभली; पण सर्वांत श्रेष्ठ पद त्यांनीं पटकावलें तें प्रेम-कवि म्हणूनच. शब्दांचें नाद-माधुर्य, कल्पनेचें सौंदर्य व भावनेची तीव्रता या तीन गुणांचे बाबतींत त्यांचा हात धरणारा दुसरा कवि अर्वाचीन मराठींत निर्माण व्हावयाचा आहे. आधुनिक मराठी काव्याचे ' गडकरी ' अद्याप तेच आहेत. त्यावर आपल्या यशाचें नवें निशाण चढविणारा वाग्वीर अद्याप जन्मास यावयाचा आहे.

केशवसुतांचा सच्चा चेला

केशवसुती काव्य—संप्रदाय गडकऱ्यांनीं आपल्या कवनांनीं पुष्ट व रम्य केला. आधुनिक काव्याचा गाडा मराठीच्या मुलुखांत गडकऱ्यांनीं पुष्कळच पुढें नेला. आंग्ल काव्यांतील प्रवृत्तिवाद केशवसुतांनीं मराठींत

रोकड्या भाषेनें पुरस्कारला, तोच त्यांच्या 'सच्या चेल्यानें' अधिक काव्यमयतेनें मांडला. गुरूपेक्षां चेल्याला कल्पकतेची देणगी आधिक प्रमाणांत लाभली होती ह निःसंशय. राष्ट्रीय व सामाजिक विषयांची तळमळ मात्र केशवसुताइतकी गोविंदाग्रजांमध्यें दिसत नाहीं. पण त्याची भरपाई त्यांच्या उज्ज्वल प्रतिभेनें भरून काढली आहे. पहिल्याची ' तुतारी,' तसा दुसऱ्याचा ' दसरा '; पहिल्याचा ' झपूर्झा ' तशी दुसऱ्याची ' फुटकी तपेली,' पहिल्याची ' सतार ' तशी दुसऱ्याची ' मुरली.' अज्ञेयाचा शोध करीत गूढ-गुंजनामध्यें रमण्याची वृत्तिहि केशवसुतांप्रमाणें गोविंग्रजांमध्यें आहे, पण कमी प्रमाणांत. प्रतिभेची भरारी मारण्यात मात्र शिष्यानें गुरूचा पराजय केला आहे. अल्पायुष्यांतहि गडकऱ्यांनीं केशवसुतांवर ताण केली आहे. केशवसुतांना ३९ वर्षेंच आयुष्य लाभलें म्हणून हळहळणाऱ्या रसिकांच्या डोळ्यांना गोविंदाग्रज अवघ्या ३४ व्या वर्षींच जगाच्या रंगभूमीवरून, काळाच्या पडद्याआड जाऊन, अंतर्धान पावल्याचें दुःखद दृश्य पहावें लागलें. यामुळें साहित्याची विपुलता दोघांच्याहि गांठीं नाहीं. केशवसुतांनीं १३५ कविता रचल्या. तर गोविंदाग्रजांनीं सुमारें १५० कविता लिहूनच आपल्या आयुष्याचा ग्रंथ आटोपला !

गडकऱ्यांचे गुण-विशेष

ऐन जोमाचें व जोसाचें काव्य-लेखन गडकऱ्यांनीं १९११ ते १९१६ या पांच वर्षांतच केलें. आतां हें खरें कीं, तारुण्याच्या भावनोत्कट काळांतच खरें काव्य स्फुरतें. कोकिळा वसंतांतच कूजन करते, इतर दहा महिने तिच्या दृष्टीनें व्यर्थच. आणखी पन्नास वर्षें गडकरी जगते, तरी " राजहंस, प्रेमपाठ, गुलाबी कोडें, गोड निराशा, गोफ " अशा काव्य-रत्नें त्यांच्या कल्पकतेच्या खाणींतून निघालींच असतीं, अशी ग्वाही कोण देऊं शकेल ? कदाचित् भाषेची सहजता वाढली असती, दृष्टीला व्यापकपणा लाभला असता, भावनेला विवेकाची जोड मिळाली असती; पण पूर्ववयांतील भावनेची उधाण भरती शिल्लक राहिली असती काय ? आणि लाटांचा खुळखुळ आवाज व मोत्यासारखा फेस यांना लाजविणारें

मंजुळ व रेखीव पद-लालित्य तरी पुढें कायम राहिलें असतें कीं नाहीं ? शब्द-माधुर्य, कल्पना-सौंदर्य व भावना-तीव्रता या त्रिगुणांची चमक तारुण्यांत एकदां लकाकून गेली ती गेली ! गोविंदाग्रजांच्या या अलौकिक गुणांचें वर्णन त्यांच्यापेक्षां अधिक सरस रीतीनें दुसरें कोण करूं शकेल ? त्यांनींच एका कवितेंत योजलेले शब्द त्यांच्या लालित्यपूर्ण, कल्पनासंपन्न व भावनोत्कट काव्याचें यथार्थ गुण-वर्णन करूं शकतील. ते शब्द असे–

" नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी।
नाचत डोलत करि शिणलेलीं मनें पुन्हां ताजीं ॥
शब्दांचा चढविला क्षणोक्षणीं फुलता पोशाख ।.....
तुरा शिरावर डुलतो पवनीं तरल कल्पनांचा ॥

निराशेची कारण-मीमांसा

अल्पायुष्याप्रमाणेंच निराशेच्या बाबतींतहि गोविंदाग्रज केशवसुतांशीं ' समानधर्मी ' आहेत. केशवसुतांना मॅट्रिकनंतर शिक्षणाचा दरवाजा बंद झाला, तर गोविंदाग्रजांना कॉलेजच्या पहिल्या वर्षाचें वारें अंगावर घेतां आलें, इतकेंच. स्वतःच्या बुद्धिमत्तेबद्दल गोविंदाग्रजांना पराकाष्ठेचा अभिमान होता–आणि त्यामुळें तर त्या बुद्धीला शिक्षणाच्या अंतराळांत उड्डाण करावयास न लाभल्यानें त्यांना निराशेचें दुःख अधिकच जाणवलें. त्यांत भर आर्थिक आपत्तींची. चरितार्थासाठीं केशवसुतांना कोणतीहि नोकरी, कोठें तरी करावी लागली आणि खानदेशापासून कर्नाटकापर्यंत धांव मारावी लागली. गडकऱ्यांना सामान्यतः पुणें हें एकच मायपोट ठरलें, तरी कांहीं काळ न्यू इंग्लिश स्कूलमध्यें काढावा लागला, तर कांहीं काळ ' किर्लोस्कर नाटक मंडळी 'तील बाल-नटांना शिकविण्यांत कंठावा लागला. क्वचित् नाट्यगृहाच्या प्रवेशद्वाराशीं उभें राहण्याचाहि प्रसंग आला. काव्यापेक्षां नाटक अधिक द्रव्य-दायक. ' प्रेम-संन्यास ' या पहिल्या नाटकाचा मोबदला त्यांना पांचशें रुपये मिळाला. पण उभ्या आयुष्यांत त्यांनीं नाटकें लिहिलीं किती ? चार पूर्ण व दोन अपूर्ण.

आयुष्याच्या शेवटीं शेवटीं त्यांना नाटकापासून भरीव अर्थ-प्राप्ति झाली. पण तोंपर्यंत दारिद्र्यानें त्यांच्या जीवनाची फरफटच चालविली होती !

प्रेम-भंगाचें रहस्य

विद्या व व्यवसाय या दोन्ही क्षेत्रांतील निराशेला कडवटपणाची धार पाजण्याचें काम गोविंदाग्रजांचे बाबतींत आणखी एका घटनेनें केलें. ती घटना म्हणजे प्रेम-भंग ! त्यांचें ज्या मुलीवर प्रेम बसलें होतें, तिचें लग्न दुसऱ्याशीं झालें आणि गडकऱ्यांनींहि हताश मनःस्थितींत १९१७ सालीं, मरणापूर्वीं दोनच वर्षें दुसरा विवाह केला. या नाखुषीच्या बंधनाचें वर्णन ते करतात, ' नवीं बंधनें तुला लाभलीं-आणि लाभतील तशीं मला । परंतु गेली पहिली प्रीति ... । '

ही पहिली प्रीति कोणती ? तर ' गडकऱ्यांचें अंतरंग ' या टीका-ग्रंथांत प्रा. वाळिंबे सूक्ष्म चिकित्सा व गाढ संशोधन करून असें उत्तर देतात कीं, पंधराव्या वर्षीं गडकऱ्यांनीं एका बालेवर प्रेम केलें होतें. लॉर्ड बायरन या आंग्ल कवीनेंहि पंधराव्या वर्षींच एका मुलीला आपल्या प्रेमाचा विषय बनविलें होतें—आणि पुढें ती मुलगी त्याच्या अनेक काव्यांचा विषय होऊन बसली ! गडकऱ्यांची ही हृदय-शारदा' कोण ? याचाहि बारीक तपास त्यांच्या काव्याच्या चरणावरून करून, प्रा. वाळिंबे यांनीं त्या मुलीचें नांव ' तारा ' असल्याचा छडा लावला आहे. "माझी तारा, माझा वारा, तुझ्या प्रेमधार्मी " असे सूचक उद्गार गडकऱ्यांनीं अनेक कवनांत खुबीनें पेरलेले आहेत, हा त्यांचा पुरावा. सात वर्षें त्या प्रेम—मूर्तीचा जो निदिध्यास गडकऱ्यांना लागला व अखेर जो दारुण निराशेचा तीव्र घाव त्यांच्या हळुवार हृदयावर बसला, त्या सर्वांचे पडसाद त्यांच्या वेळोवेळींच्या काव्यांतून उमटले आहेत. ' एकांतीं तच्चिंतन करणें दुःखावेगीं विस्मरणें ' या निराशेचे आर्त सूर त्यांच्या काव्याच्या गोलघुमटांत एकसारखे ऐकूं येतात.

अल्पायुष्यांतील महत्कार्य

गुजरातेंतील नवसारी तालुक्यांत गणदेवी या गांवीं गडकऱ्यांचा जन्म

ता. २४ मे १८८५ रोजीं झाला. लहानपणींच त्यांचे वडील वारले. त्यामुळें दारिद्र्य त्यांच्या शिक्षणाच्या वाटेंत आड आलें. वयाच्या १९ व्या वर्षीं ते मॅट्रिक झाले आणि कॉलेजांतील पहिल्या वर्षी अपयश पावून त्यांनीं शिक्षणाला पूर्णविराम दिला. न्यू इंग्लिश स्कूलमध्यें त्यांनीं कांहीं दिवस शिक्षकाचें काम केलें व कांहीं काळ 'किर्लोस्कर नाटक मंडळी'तील मुलांना शिकविलें. चार पूर्ण व दोन अपूर्ण नाटकें लिहून त्यांनीं द्रव्य व कीर्ति संपादिली. हा प्रतिभाशाली कवि वयाचे ३४ वे वर्षीं, ता. २३ जानेवारी १९१९ रोजीं दिवंगत झाला.

प्रेमाचा शाहीर

गोविंदाग्रजांनीं जीं दीडशें कवनें रचलीं तीं नादमाधुर्य, कल्पनासौंदर्य व भावोत्कटता या तिन्ही गुणांमुळें महाराष्ट्र रसिकांच्या जिव्हाग्रावर नाचत राहिली. त्यांतील निम्याहून अधिक कविता तर प्रेमविषयकच आहेत. प्रेमाचा विषयच मुळांत मधुर. तो गोविंदाग्रजांनीं मधुरतर भाषेनें नटवून व मधुरतम कल्पनेनें फुलवून मांडलेला. प्रेमाचे जे निरनिराळे पैलू-प्रकार आहेत ते त्यांनीं घोळघोळून गायलेले आहेत. कोठें प्रेमाचा अंकुर आहे, कोठे प्रेमाचें साफल्य आहे तर कोठें प्रेमभंग आहे. हे सर्व सूर त्यांच्या काव्यसृष्टींत निनादत असलेले ऐकूं येतात. 'गोफ' 'गोड निराशा' 'गुलाबी कोडें' 'पहिलें चुम्बन,' 'प्रेमपाठ,' 'प्रेम आणि मरण,' 'भीमकबाळा' इत्यादि त्यांच्या कविता म्हणजे रसपूर्ण प्रेमगीतें होत. मराठींतील शृंगार-रसाचीं सभ्य व सुंदर उदाहरणें म्हणून या प्रेमगीताकडे कोणाहि अभिमानानें बोट दाखवावें.

रसांची विविधता

'घास' 'घुंगुरवाळा' इत्यादि कांहीं थोड्या कवितांमधून त्यांनीं जो वत्सलरस खेळविला आहे, तो अत्यंत कोमल व हृदयस्पर्शी आहे. आणि करुणरसांत तर त्यांचा हात धरणारा कवि क्वचितच ! 'राजहंस माझा निजला' हें त्यांचें शोकगीत म्हणजे त्यांच्या काव्यमालेंतील

' कौस्तुभ 'च होय. महाराष्ट्र–शारदेच्या कंठांत गोविंदाग्रजांनीं घातलला ही ' वैजयंती ' माला नवरत्नहाराहून अधिक मोलाची आहे. जसा कारुण्यांत तसाच हास्यांत गडकऱ्यांचा हातखंडा होता. रसिकांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रु वहावयास ते जसे लावीत तसेंच त्यांना खोखो हसावयासहि ते लावीत. करुण व हास्य या दोन रसांच्या गंगा–यमुना त्यांच्या नाटकांतून जशा मोठ्या वेगानें दुथडी भरून चाललेल्या आढळतात, तशाच त्यांच्या निरनिराळ्या काव्यामध्येंहि दिसून येतात. ' चिन्तातुर जन्तु ' ' विहिर्णींचा कलकलाट ' ' काय करावें ? ' इत्यादि कवितांमध्यें त्यांनीं विनोद निर्माण केला आहे. गडकऱ्यांच्या मनांत अमर्याद इच्छा खेळत असल्यानें आणि त्या तृप्त न झाल्यानें निराशेचें वादळ तुफान वेगानें सदैव वहात असे. त्या वादळाचे पडसाद त्यांच्या काव्यांतून सहजच ऐकूं येतात. समाजांतील द्वेष व दंभ, दैन्य व दारिद्र्य, वंचना व वैफल्य हें पाहून तर त्यांच्या निराशेला भरती येत असेच, पण त्याशिवाय मानवी जीवनाची अपूर्णता ध्यानांत आल्यानेंहि त्यांच्या बुद्धीची तडफड होई. त्या तडफडींतूनच ' फुटकी तपेली,' ' स्मशानांतलें गाणें ' ' मुरली ' वगैरे तात्त्विक काव्यें बाहेर पडलीं. गडकऱ्यांना महाराष्ट्राचा किती जाज्वल्य अभिमान होता–आणि त्यांतहि शिवरायावर त्यांची किती गाढ भक्ति होती हें 'श्रीमहाराष्ट्रगीत,' ' पांच देवींचा पाळणा' वगैरे कविता-वरून दिसून येतें. तसेंच लो. टिळक, ना. गोखले अशासारखे राष्ट्र–नेते आणि केशवसुत, बालकवि यांसारखे काव्यांतील संप्रदाय–निर्माते यांज-विषयींचा आदरभाव प्रगट करणारीं काव्येंहि त्यांच्या भाक्तिपूर्ण अंतः-करणांतून झुळझुळत आहेत.

मराठीचा ताजमहाल

संस्कृत वाङ्मयांत कालिदासाचा अज–विलाप जितका प्रसिद्ध आहे, तितकाच गोविंदाग्रजांचा 'राजहंस' मराठींत प्रशंसा पावलेला आहे. १९१२ सालीं मनोरंजन मासिकाच्या जुलै महिन्यांच्या अंकांत ज्या वाचकांनी ही कविता प्रथम वाचली, त्यांचीं अंतःकरणें जशीं कारुण्यानें तशीच विस्मयानें

भरून गेलीं. एखाद्या व्यापाऱ्यानें एकाहून एक अधिक तेजस्वी असें जडजवाहीर दाखवावें, त्याप्रमाणें गोविंदाग्रजांनीं एकाहून एक सरस अशीं कडवीं या नाट्यगीतांत गोवलेलीं आहेत. तीं पाहतांना चकित व मुदित न होणारा रसिक विरळा. एका प्रतिभाशाली कवीनें कोरलेलें हें 'कैलास लेणें' आहे. ही बालगंधर्वांची करुणरम्य तान आहे—हें अर्वाचीन मराठी काव्याचें गौरीशिखर आहे. यांतील शब्दाचें शिल्प, भावनांचें तेज, कल्पनेची चमत्कृति आणि भाषेची मोहिनी इतकी असामान्य आहे कीं, खरोखर या काव्याला 'साहित्यांतील ताजमहाल'च म्हटलें पाहिजे. ताजमहाल म्हटला कीं, सर्वत्र संगमरवराचें शुभ्र सौंदर्य विलसत असतें, त्यावरील ताजेपणा अखंड फुललेला असतो आणि मेहरपीपासून मनोऱ्यापर्यंत त्याचे अंगन्‌अंग कांतिमान्, प्रमाणबद्ध व आकर्षक असते, तेंच तेज,तेंच वैभव, तोच डौल 'राजहंस' या काव्यांत गडकऱ्यांनीं आणलेला आहे. ताजमहालाला उठाव आणणारी पार्श्वभूमि म्हणजे काळी यमुना; तशीच करुणरसाची धार राजहंस काव्यामध्यें आरंभापासून अंतापर्यंत चढत्या वेगानें वहात आहे. ताजमहाल म्हणजे एका बादशहानें उभारलेलें आपल्या पत्निप्रेमाचें करुणरम्य काव्य; तर 'राजहंस' म्हणजे 'राम बादशहानें' रचलेलें शोक-काव्याचें शिल्पच !

या काव्यांत दोष असलाच तर अतिरेकाचा आहे—अल्पत्वाचा नाहीं. त्यांतील भावनेचा उद्रेग कोणाला अस्वाभाविक वाटेल तर कोणाला त्यांतील अलंकारांचा वर्षाव नकोसा होईल. कण्वाश्रमांतील शिष्यांना दुष्यंताचा लखलखीत राजवाडा पाहून आग लागल्यासारखें वाटलें ना ? कांहीं साध्याभोळ्या लोकांना पंचपक्वानांची मेजवानी पाहूनच जिभेला मिठी बसते आणि कांहींना तर अत्तराचा वासहि उग्र वाटून खपेनासा होतो. अशा साध्यासुध्या अभिरुचीच्या रसिकांनाहि मान डोलावयास लावण्याजोगी पुष्कळ कडवीं राजहंसाच्या रत्न-मालेंत गुंफलेलीं आहेत. ज्याची अभिरुची सूक्ष्म व सुसंस्कृत आहे, त्याला तर हें काव्य म्हणजें अमृतरसानें भरलेलें सुवर्णपात्रच वाटेल. यांतील एकेक ओळ म्हणजें. रसवत्तेचा तरंग आहे. "तें हृदय कसें आईचें । मी उगाच

सांगत नाहीं ॥ " ही ओळ किती साधी ! पण तिच्यांत मातृप्रेमाचें केवढें भाण्डार लपलेलें आहे ! "जें आनंदेंही रडतें । दुःखांत कसें तें होई ? ॥" या सात शब्दांत मातृप्रेमाचे सप्तसमुद्र सांठवलेले नाहींत काय ? जसें परमेश्वराचें स्वरुप, तसेंच मातेचें प्रेम !–दोन्हीहि शब्दांच्या पलीकडे ! म्हणूनच कवि हवाला देतो " हें कुणि कुणा सांगावें ? । आईच्या बाळा ठावें । प्रेमाच्या गांवा जावें । मग ऐकावें या बोला ॥ "

कथानकांतील कारुण्य

' राजहंस माझा निजला ! ' हे बोल कोणी काढले आहेत ? एंका विधवा मातेनें ! तिचा पति नुकताच निधन पावलेला. तिच्या आशेचा तंतु म्हणजे तिचें तें चिमुकलें मूल, पण तेंहि देवाघरीं गेलें आणि तिच्या भावी जीवनाचा आधार तुटला ! त्यामुळें तिच्या शोकाचा कळस झाला-तिच्या मनाला भ्रम झाला–तिचें हृदय बधिर झालें–" अति दुःख थिजवि चित्ताला. " त्यामुळें तिच्या मांडीवर मेलेलें मूल असतांनाहि तिला वाटतच होतें कीं, माझा बाळ केवळ निजला आहे. पण–" जन चार भोंवतीं जमले । मृत बाळा उचलायाला । तो काळ नाथ-निधनाचा । हतभागि मना आठवला । तो प्रसंग पहिला तसला । हा दुसरा आतां असला ॥ तें चित्र दिसें चित्ताला । हें चित्र दिसें डोळ्यांना । निज चित्र चित्तनयनांला, । मंग रडुनि वदे ती सकलां । " राजहंस माझा निजला ! " । आपल्या पतीच्या मृत्यूचा प्रसंग तिच्या मनापुढें उभा राहिला, मुलाच्या मरणाचें दृश्य तिच्या डोळ्यापुढें दिसूं लागलें आणि पति नाहीं, पुत्र नाहीं, कोणताच आधार नाहीं अशा असहाय्य स्थितींत आपण आपलें जीवन एकाकीपणानें कंठीत आहोंत, हें स्वतःचें चित्र तिच्या मनापुढें व डोळ्यापुढें खडें झालें.

पण तिच्या हृदयाला पुनःपुनः शोकाचे झटके येत होते आणि तिच्या प्रेमान्ध बुद्धिला वाटत होतें कीं, आपला बाळ नुकताच झोपीं गेला आहे. त्याची झोपमोड होऊं नये म्हणून ती वत्सल माता इतर लोकांना विनवीत आहे, " करुं नका गलबला अगदीं । लागली झोंप मम बाळा । आधींच

झोप त्या नाहीं । खेळाचा एकच चाळा । जागतांच वाऱ्यासरसा । खेळाचा घेइल आळा ॥ वाजवूं नका पाऊल । लागेल तया चाहूल । झोंपेचा हलका फूल । मग झोपायाचा कुठला । " राजहंस माझा निजला ! "

भावनेची तरलता

आणि तें बालक किती मनोहर होतें ? आई सांगते " हे काळे कुरळे केस । खेळतात डोक्यावरती । ही दृष्टि पहा मम वदनीं । नेहमीं अशी हीं असती । हें तेज अशा रत्नाचें । झालें का आहे कमती ? ॥ कानांत नाचती डूल । तोंडावर हंसरें फूल । जीवाची घालुनि झूल । मी असाच झांकिन याला । राजहंस माझा निजला " विचारीला असें पुनः पुनः वाटत होतें कीं, आपला बाळ मेलेला नाहीं—जिवंतच आहे. इंदुमतीचे कुरळे केंस वाऱ्यानें हालतांच अज राजाला नाहीं का भास झाला ती जिवंत असल्याचा ? "कुसुमोत्खचितान्वलीभृतश्चलयन् भृंगरुचस्तवालकान् । करभोरु करोति मारुतस्त्वदुपावर्तनशंकि मे मनः" (रघुवंश ८ वा सर्ग ५३ वा श्लोक) आणि ही तर बोलूनचालून अल्पवयी माता ! शोकसागरांत तिचें मन पार बुडालें आहे. खऱ्याखोट्याचें तिचें भानच नाहींसें झालेलें. तीच इतरांना पुनः पुनः विचारीत आहे, " या अर्ध्याउघड्या नयनीं । बाळ काय पाहत नाहीं ? । या अर्ध्यामिटल्या तोंडीं । बाळ काय बोलत नाहीं ? । अर्थ या अशा हंसण्याचा मज माझा कळतो बाई ॥ हें हसें मुखावर नाचे । जणुं बोल दुग्धपानाचे । कीं मुक्या समाधानाचे । इतुकेंहि कळे न कुणाला—। " राजहंस माझा निजला ! "

कल्पनांची मोहनमाळ

" बाळाचे हे काळेभोर डोळे, त्याचें हें कोवळें मुखकमल, त्यावर नाचणारें हें मुक्तहास्य—नेहमींसारखें जसेंच्या तसेंच अखंड आहे. तो केवळ निजलेला आहे हो ! मानस-सरोवरामध्यें पोहणारा राजहंस मोती खाऊन जसा झोपी जातो, तसा माझ्या प्रेमानें पोट भरलेला हा माझा

बाळ निजून राहिला आहे, असें इतरांना परोपरीनें समजावून सांगण्यासाठीं ती शोकानें वेडी झालेली आई म्हणते, "या माझ्या मानस-सरसीं । सारखें प्रेमजल वाही । त्या तरंग-लहरीवरतीं । राजहंस पोहत राही । सारखा पोहुनी दमला । मग मला भुकेला बाही । नयनांच्या शिंपामधुनी । अश्रूंचे मौक्तिकसुमणी । मीं दिले तया काढोनी । मोत्यांचा चारा असला । राजहंस खाउनि निजला !' तिला मुळीं पटतच नाही कीं, आपला बाळ काळमुखीं गेलेला आहे ! आणि लोकांच्या सांगण्यावरून तो मृत्यु पावला असें मानले तरी यमदूत त्याला उचलून नेणार नाहींत अशी तिची खात्री आहे. कारण, " जरि दूत यमाचे आले । लाडक्यास या न्यायाला । ते निष्ठुर असले तरिही । भुलतील पाहुनी याला । हृदयाचें होउनि पाणी । लागतील चुंबायाला । मी मुका असा घेतांना—। हा पहा--पुन्हा हंसला ना ? । कां अशा फिरवतां माना ? । सुख खुपे काय डोळ्याला ? । राजहंस माझा निजला ! " कोणतें वत्सल हृदय गहिंवरणार नाहीं हें ऐकून ?

ती शोक-वेडी माउली विचारते, " मी इतकी वेडी कां हो ? " पुढें लोकांचें म्हणणें ऐकून मूल मेल्याचें तिनें क्षणभर गृहीत धरलें तरी ती त्या मुलाला आपल्या मांडीवरून नेण्याला व पुढें जमिनींत पुरण्याला कशी संमती देइल ? अंगाई गाऊन आईनें पाळण्यांत अलगद निजविलें तरी त्यांतील मऊ गादी ज्याला रुतते, त्याचा कोवळा लुसलुशीत देह—छे, तिला कल्पनाच करवत नाहीं. ती निर्धारानें बजावते, "जरि होउं नये तें झालें । तरि सोडणार या नाहीं । पाळणाहि रुततो ज्याला । प्रेमें जरि निजवी आई । तो देह खांच—दगडांत-। छेः, नको नको ग बाई । हृदयाची खणुनी खांच । झाकिन मी बाळ असाच । दुःखाचे फत्तर साच । जा ! जाउनि सांगा काळा । " राजहंस माझा निजला " कालिदासानेंहि अज राजाच्या तोंडीं अशीच कल्पना घातलेली आहे. अज म्हणतो, " मृदुपल्लवसंस्तरेऽपि ते मृदु दूयेत यदंगमर्पितम् । तदिदं विषहिष्यते कथं वद वामोरु चिताधिरोहणम् ॥ (रघुवंश-सर्ग ८ श्लोक ५७)

पण मृत्यु अटळ आहे—जग दुःखमय आहे—व्यवहार कठोर आहे.

त्या मृत बाळाला उराशीं धरून त्याच्या मुखावर आपलें मुख ठेवून त्याचें अखेरचें चुंबन घेऊन व डोळ्यांत सारा जीव एकवटून, त्याच्याकडे निरखून पाहून, तीहि निजून गेली. बाळ आणि आई—दोघेंहि धरणीमातेच्या अंगावर कायमचीं पहुडलीं. तें पाहून माणसेंच काय, पण वृक्ष-लता, पशु-पक्षी, फार काय दगडहि दुःखी झाले त्यांचें वर्णन करतांना कवि शेवटीं म्हणतो, " मग मातापुत्रावरि त्या । तरु गाळिति कोमल पानें । ढाळिती लता । निजसुमनें । पशुपक्षिहि रडती गाने । दशदिशा दगडही कढती । मन दुभंगुनी शोकानें ! दुमदुमतें स्थळ तें अजुनी, । त्या एकाच करुणा-गानीं । जा जाउनि ऐका कानीं ! ऐकाल याच बोलाला - " राजहंस माझा निजला ! "

प्रभु रामचंद्रानें सीतेसाठीं जो आक्रांत केला तो ऐकून " अपि ग्रावा रोदित्यपि " अशी स्थिति झाल्याचें भवभूतीनें संस्कृत भाषेंत जें हृदय-भेदक वर्णन केलें आहे, त्याचाच हा मराठी प्रतिध्वनी तितकाच हृदय-द्रावक नाहीं काय ? खरोखर कालिदास-भवभूतीनींहि माना डोलवाव्या अशाच थोर योग्यतेचें 'राजहंस' हें मराठी काव्य आहे.

अन्य रसांची जोड

' राजहंस ' म्हणजे चंदनी पेटींत ठेवलेलें करुणरसाचें अत्तरच पण करुणाला शृंगार, वत्सल, हास्य इत्यादि रसांची जोड देऊन त्याचा विलक्षण उठाव करण्याची शक्तिहि गोविंदाग्रजांच्या ठायीं आहे. 'भीमकबाळा' हें छोटेसें कवन म्हणजे शृंगार मिश्रित करुणाचें उदात्त उदाहरण होय. ' माझी स्वतःची एवढीच कविता मला आवडते ' अशी शिफारस खुद्द कवीनें केली आहे. तींत रुक्मिणी श्रीकृष्णाचा धावा करतांना म्हणते,

" कधिं पाहिनसें झालें मजला सांवळि ती काया । कधिं वाहिन ही काया माझी देवा तव पायां । कधीं सांठविन रूप मनोहर या नयनीं देवा । मिळेल केव्हां अभागिनीला प्रेमाचा ठेवा । नका करूं छळ याहुनि माझा अजुनी घननीळा । वाट बघूं किती घेउनी हातीं अश्रूंची माळा । किती आळवूं परोपरीनें ? कंठ किं हो सुकला । तरी यावया अजुनी माझा माधव

कां चुकला ?। सर्वसाक्षि भगवंता ! आतां अंत नका पाहूं । कीं विष–पानें प्राण तरी हा पदकमला वाहूं ? ''

शोकरसाच्या लाटा प्रत्येक चरणाचरणाला कशा उंचावत–हेलावत आहेत, हें येथें पहाण्यासारखें आहे. रुक्मीनें आपलें लग्न शिशुपालाशीं लावण्याचें ठरविलें, म्हणून रुक्मिणीनें आपल्या प्रिय श्रीकृष्णाला निमंत्रण केलें. पण तो आला नाहीं, तेव्हां विरहानें व्याकुल होऊन, हातीं अश्रूंची माळ घेऊन ती टाहो फोडीत आहे. तिच्या हृदयाची आर्तता, प्रेमाची एकनिष्ठता आणि मनाचा निर्धार हे सारे गुण या साध्या शब्दांच्या माळेंत कवीनें किती कौशल्यानें गुंफले आहेत ! साधी भाषा, तीव्र भावना व उदात्त प्रेम यांचा मनोहर संगम आहे हा !

शृंगार व वात्सल्य यांचा संगम ' घुगुरवाळा ' मध्यें दिसतो. सातआठ महिन्यांच्या मुलाच्या पायांतील वाळा खुळखुळ वाजला कीं, ' अल्लड मातेला ' पोटांत मावेनासा आनंद कसा होतो, याचें नादमधुर शब्दांनीं कवीनें वर्णन केलें आहे. ते शब्द व ती चाल इतकी अनुरूप आहे कीं, कविता वाचतांना वाळाच वाजत आहे असें वाटते ! ती म्हणते, '' हृदयीं खळबळलें । दरवळलें । विना ऐकिल्या कळलें । गाणें मंजुळ तें । झुळझुळतें । तुझिया वाळ्यांभवतें । वाळा हालूं दे । बोलूं दे । आनंदें डोलूं दे । एकच हा चाळा । वेल्हाळा । घेरे तान्ह्या बाळा । एकच पायाचा । वाळ्याचा नाच गोड बाळाचा । ऐकुनि आनंदें । त्या छंदें । घर सगळें नाचूं दे । ' गोविंदाग्रज ' ही । कवनांहीं । त्या छंदावर गाई !

प्रेमाचें तत्त्वज्ञान

' शृंगाररसाचे शाहीर ' अशी पदवी मिळण्याइतकें प्रेमरसानें थबथबलेलें विपुल व मधुर काव्य गोविंदाग्रजांनीं रचलें आहे. '' मी प्रेमाचा बंदा माझा हाच असे धंदा ! '' अशी आपली भूमिका त्यांनींच 'प्रेमपाठ' या कवितेमध्यें मांडली आहे. हा ' प्रेमाचा भाट ' निरानिराळ्या रूपांनीं प्रेमाचा महिमा गात आहे. एकच चीज निरानिराळ्या रागांत गवयानें गाऊन दाखवावी तशी करामत गोविंदाग्रज करून दाखवितात. कवि व

प्रीति यांचा अन्योन्यसंबंध स्पष्ट करण्यासाठीं गोविंदाग्रजांनीं 'हृदयशारदेस' या कवितेमध्यें असें रूपक बसविलें आहे कीं, " प्रीतिदेवीच्या पायांमधला कवि घुंगुरवाळा ! प्रीतिदेवता जरा हालतां कवि करि गानाला ! "

' प्रेम आणि मरण ' या कवितेंत आपलें प्रेमाचें तत्त्वज्ञान त्यांनीं एका कथेच्या द्वारें निवेदिलें आहे–आणि ती कथा आहे एका वृक्षाची–देवा-मानवाची नव्हे ! एक मोकळें मैदान. त्यांत एकच थोर वृक्ष. एकदां आकाशांत वीज लखलखली. तिच्यावर त्याची प्रीति जडली. ती ' गगनांतिल चंचल बाला ' त्याला हवीशी वाटूं लागली. तिच्या प्राप्ती-साठीं त्यानें ' हठयोग ' आरंभिला. ' टोकाविण चालू मरणें । हृदयाला फसवुनि हसणें । जीवाला नं कळत जगणें । ' अशी प्रेम–विव्हलता त्याचे जीवनांत उत्पन्न झाली. शेवटीं त्याची तपश्चर्या फळाला आली. देवता म्हणाली " वर माग. तुला स्वर्गींचा कल्पवृक्ष करूं कां ? प्रळयकाळचा वटवृक्ष करूं कां ? " पण त्याचें मागणें एकच–" देवि ! एकदां मला ती वीज भेटव." देवांनीं त्याला पुष्कळ समजावून सांगितलें कीं, " तिच्या स्पर्शानेंच तुला मरण येईल," पण त्याचा निर्धार एक–" क्षण एक पुरे प्रेमाचा । वर्षांव पडो मरणांचा । " शेवटीं देवांनीं ती ' गगनांतिल चंचल बाला ' त्याच्या भेटीस पाठविली. तिचा स्पर्श होतांच तो वृक्ष दुभंगून खालीं पडला, ' परि पडतां पडतां हंसला.' कारण त्याची प्रीति सफल झाली. त्याचीं सारीं पानें फडफडलीं, साऱ्या कळ्या फुलल्या– ' खुलल्या त्या कायम खुलल्या ! ' अशा त्या एकनिष्ठ प्रेमाचा गौरव करण्यासाठीं ' बोलांची रानपालवी ' कवीनें वाहिली आहे. ' निष्प्रेम चिरंजीवन ते । जगिं दगडालाहि मिळतें । " हें तत्त्व कवीनें वृक्षाच्या रूपकानें निवेदिलें आहे.

प्रेमगीतांचा सुवर्णकळस

गोविंदाग्रजांनीं आपल्या सर्व प्रेमकाव्यांचा कळसच ' प्रेमपाठ ' या कवितेच्या रूपानें उभारला आहे. सुमारें दोनशें ओळींचें हें काव्य म्हणजे प्रभावी भाषाशैली, उत्तुंग कल्पनाशक्ति आणि रम्य निसर्गप्रेम यांचा

त्रिवेणी संगम होय. एकाहून एक सरस अशा कल्पनांचा कवीनें नुसता पाऊस पाडला आहे. कवीच्या हृदयाचा वसंत खुललेला आहे आणि चित्ताचा कोकीळ पंचप्राणाचा पंचम स्वर लावीत आहे. तेव्हां त्याला आकाशाच्या लग्नमंडपामध्यें कोणतें मंगल दृश्य दिसतें पहा–"आकाशाच्या लग्नमंडपीं लता करवल्या वा । वृक्षबालकां लाजुनि पल्लव सांवरितां दमल्या । कळ्या कौंवळ्या, हलतीं कानीं डूल मजेदार । उषा–वधूवरि सुमाक्षतांही करिती भडिमार ॥ " तुकारामांनीं आकाशाला नुसत्या मंडपाचीच उपमा दिली होती, पण गडकऱ्यानीं लग्नमंडपाचे रूपक रचलें आहे आणि तें विस्तारानें व बहारीनें रंगविले आहे. उषा ही वधू आणि तिचें लग्न सूर्याशीं झालें. पण नवरदेव नाचरा निघाला. तेव्हां आतां पृथ्वीचें चंद्राशीं लग्न लावावयाचें. त्यासाठीं कवि सर्व निसर्गदेवतांना हाक मारीत आहे. " दिशेदिशेच्या दिक्पालांनो । सावधान सगळे । संध्यापट–पीतांबर काढा ताराबल जमलें । प्रेममंगलाष्टकें जगीं गाजवा हो । नक्षत्रांच्या करा अक्षता शुभ मंगल बोला । मेघांचा चौघडा गगनिंचा जगीं वाजवा हो । सप्तपदीची चाल चालवा सप्तभुवनिं सकलां । दुग्ध–चंद्रिका जिकडेतिकडे नवरदेव ओती । पुष्परेणु–शर्करा–कणांची पृथ्वी करि भरती । "

निसर्ग जिवंत केला

त्याचप्रमाणें या मंगल समारंभासाठीं लतांना आणि फुलांना कवि निमंत्रण देत आहे. " वनांत लपलेल्या वेलींनों । या ग बाहेर । वृक्षांचे कर धरुनी घ्या मग प्रेमाचे घेर । गवताचा गालिचा कौंवळा, हळूहळू चाला, । पायघड्या पसरल्या फुलांचा सडा वरति घाला । वाऱ्यावरती वरात काढा जीवाभावांनीं, । वनदेवींच्या मुलिंनो ! या ग, या लौकर नटुनी । कुणी गुलाबी पातळ नेसा, शालु कुणी हिरवा, । कुणि मोत्याची जाळी लेउनि हव्या तशा मिरवा । " कवीला सर्वत्र प्रेमाचें मांगल्य ओसंडत असलेलें दिसतें. "जिकडे तिकडे शुभ लग्नें हीं सारखीच लावी." अशी तो प्रीतिदेवतेची प्रार्थना करतो. त्याला फुलाफुलांमध्यें नवनवीन गुण दिसतात आणि त्या गुणांचे द्योतक असें नांव प्रत्येकाला तो देतो. कमल

म्हणजे काव्यपुष्प, जास्वदी म्हणजे उषा–पुष्प, तेरडा म्हणजे बाल-पुष्प, निशिगंध म्हणजे यौवन–पुष्प, कोरांटी म्हणजे जरठ–पुष्प अशी निंदा-व्यंजक नांवें प्रथम कवि ठेवतो, पण मग " मंगलकाली मंगल वदनीं मंगलताल हवीं" याची जाणीव होऊन तो गौरवदर्शक नांवें देतो. मोगरा हें हास्य–पुष्प तर गुलाब हें लज्जा–पुष्प; पारिजातक हें हृदय–पुष्प तर बकुल हें प्रेम–पुष्प असा ' बारशाचा थाट ' उडवून कवि म्हणतो— " फुलें तुम्ही घ्या, फुलें मला द्या, प्रेमाची ठेव, । कृष्ण घ्या कुणी, कृष्ण द्या कुणी, हीच देवघेव । "

कल्पनेची भरारी

शेवटीं प्रीतीचें निसर्गाशीं लग्न लावण्यास कवि निघतो. त्या लग्नाचें वैभव काय सांगावें ! प्रीति ही कवीची कन्या. तेव्हां तिला विवाह-प्रसंगाचे उंची उंची दागिने घालण्यास तो सहजच उत्सुक असतो. निसर्गातील सारी सुंदरता, रम्यता व कोमलता यांचे अलंकार तो आपल्या कल्पकतेनें घडवित आहे. ते असे—

" शशिकिरणांचे तंतु भिजवुनी संध्या रंगांनीं, । अष्टपुत्रि द्या नव नवरीला कुणी तरी विणुनी. । इंद्रधनुष्यें वळवुनि हातीं वज्रचुडा भरवा । शुभ्र फुलांचें तेज आटवुनि घडवा कुणि त्यांची । वेढिं विरोदी सौभाग्याचीं लेणीं पायांचीं । " चराचरामध्यें एक प्रेमाचा धागा ओवलेला आहे आणि या प्रेमामुळेंच पशूचा, मनुष्य होतो, मनुष्याचा देव बनतो, आणि देवाचा देवपणा टिकून राहतो, हें तत्त्वज्ञान त्रिभुवनांत दुमदुमविण्या-साठीं कवि आवेशानें म्हणतो, " जलदेवींनो । स्थलदेवींनो । गगन-देवतांनो । सकला शिकवा प्रेमपाठ; गा हाच अप्सरांनों ! । हृदयशारदे । हृदयिं राहुनि करिं मज प्रेमकवी । तुझ्या प्रीतिची स्फूर्तिच मज हा प्रेमपाठ शिकवी । पशूस कर शील मानव । मानव नेशिल देवपदा । देवपणा स्थिर देवांचाही राखिसी तूंच सदा । " या सर्व प्रेमपाठाची फलश्रुती काय ? तर " प्रेमतरंगें चित्त तरंगें, आत्माही रंगे । जगत् रंगलें, विश्व रंगलें एक प्रेमरंगें । "

उदात्त प्रेमाचें वर्णन

प्रेमाचें अधिकाधिक उदात्त स्वरूप गोविंदाग्रज वाचकांपुढें ठेवीत आहेत. वैषयिक प्रेम हें सर्वसामान्य लोकांच्या स्थूल दृष्टीला कळणारें. त्याचें वर्णन करणारीं थोडीफार कवनें त्यांनीं रचलीं, पण त्यापेक्षां दोन हृदयांचें परस्परांमधील आकर्षण रंगविणारीं निर्हेतुक प्रीतिहि त्यांनीं पुष्कळ रचिलीं. त्यांच्यावरची पायरी निसर्ग-प्रेमाची. प्रेमाचा चष्मा डोळ्यांवर लावला म्हणजे सर्वत्र मंगलच कसें दिसूं लागतें याचें चित्रण त्यांनीं कांहीं कवितामध्यें केलें आहे. आणि याहूनहि उदात्त असा प्रेमाचा प्रकार आहे. तो आकलन करण्यास मात्र कठिण आहे. एखाद्या डोंगरावर आपण जसजसें वर चढत जातों तसतशी अधिकाधिक शुद्ध हवा आपणांस मिळत जाते, पण त्यासाठीं चढण्याचे श्रम घ्यावे लागतात. 'प्रेमाचा प्रलयकाळ' या कवितेंत सर्वांत उच्च व उदात्त प्रेमाचें कवीनें गुणगान केलें आहे. बुद्ध, तुकाराम, ख्रिस्त, नानक यांच्या मनांचें गाणें या काव्यांत प्रगट झालेलें आहे. गडकरी आज असते तर त्यांनीं गांधीजींचेंहि नांव यांत गुंफलें असतें. या सर्व महात्म्यांनीं विश्वामध्यें प्रेमाचा प्रलयकाळ निर्माण केला आहे. आणि त्यामुळें "खडक बुडाले गर्वाचे । विरले डोंगर रागाचे । खंदक जिरले द्वेषाचे । कडे मोडले त्वेषाचे । जीव कोंडला आशेचा । श्वासाचि बंद निराशेचा । प्रेम-जलाचा । हृदयरसाचा । सागर करि तांडव-नाच । प्रलयकाळ तो बा हाच ।"

अशा बंधुप्रेमाचें, मानवप्रेमाचें, विश्वप्रेमाचें पाणी पूर येऊन चोहोंकडे पसरूं दे, अशी इच्छा प्रगट करतांना गोविंदाग्रज म्हणतात, "प्रेमसागरा, तव लहरी । उडवी अजुनी वरी वरी । अफाट लाटा नाचीव । ब्रह्मनाद तो ऐकीव । लाटांचे देउनि झोके । काळाचीं भिळवी टोकें । या बाजूला । त्या बाजूला । कुठेंहि मग मी पडे जरी । सर्व सारखे मला तरी."

महाराष्ट्रांतील निसर्ग

उदात्त व विशाल कल्पना गोविंदाग्रजांच्या काव्यांत ओतप्रोत भरून राहिल्या आहेत. प्रसादपूर्ण भाषेंतून त्या ऐकत असतांना रसिकांच्या

डोळ्यापुढें त्यावेळीं त्या नद्या, तो पूर, ते डोंगर वगैरे तीं तीं दृश्यें मूर्तिमंत उभीं राहतात. निसर्ग-चित्रें रंगविण्यांत ते मोठें कसब दाखवितात. श्रावण महिन्यांतील पावसाच्या सरीप्रमाणें त्यांच्या शब्दांच्या पंक्ती सर सर येऊन जातात आणि त्यांतून शुभ्र व शीतल अशा गारांप्रमाणें भासणाऱ्या कल्पनांचाहि सडा पडतो. "कृष्णाकाठीं कुंडल" या काव्यांत भाषेचा हा धावता ओघ जितका अस्खलित व डौलदार आहे, तितकींच त्यांतील कल्पना-चित्रें सुस्पष्ट व रेखीव आहेत. खरें पाहिलें तर, आतां कृष्णा-नदीच्या काठांवर कुंडल गांव कांहीं नाहीं, पण शिवाजीच्या काळीं तें तेथें होतें अशी कल्पना कवीनें केली आहे आणि आपल्या कल्पनेला मोकाट सोडलें आहे. एक 'प्रेमकहाणी' सांगणें हा ह्या कवनाचा मुख्य उद्देश. पण तें कवन अपूर्णच राहिलें आहे. त्या अपूर्ण कवनांतहि महा-राष्ट्राचा निसर्ग आणि शिवरायाचा गौरव यांचें वर्णन जें येऊन गेलें आहे, तें अगदीं हृदय हलविणारें आहे.

'राजसंन्यास' मधील रायाजी-शिवांगी यांच्या प्राणांतिक प्रेमाचे व स्वामिभक्तीचे पडसाद या काव्यांतहि ऐकूं येतात. सह्याद्रीचें स्वरूप कवीनें किती ओघवती भाषेनें व प्रसन्न कल्पकतेनें रेखाटलें आहे, पहा. "सह्याद्रीच्या कडेकपारीं, कोठें मोठे घाट। दरीपठारीं धुंडित जाणें, भारी अवघड वाट" महाराष्ट्रांतील नद्यांचें वर्णनहि वाचकाच्या डोळ्यापुढें उभें राहील अशा कौशल्यानें गडकऱ्यांनीं केलें आहे. या 'लोक-मातांचा' गौरव आचार्य कालेलकरांनीं गद्यांत व राजकवि यशवंतांनीं पद्यांत केलेलाच आहे, पण गडकऱ्यांच्या शब्दांचीं जादू व कल्पनेची किमया कांहीं औरच! एकेका शब्दामध्यें त्या त्या नदीचा सारा इतिहास ते उभा करूं शकतात. त्याचा नमुना-"मागीं दिसल्या सह्यगिरीच्या चिमण्या चिमण्या बाळा। वाजवितांना फिरतां पायीं घुंगुरवाळा। भीमानामें इथें नांदते श्रीमती चंद्रभागा। पुंडलिकाची मायमावली श्रीमहाराष्ट्र-गंगा। साधीसुरती बाळजिवाची डामडौलही नाहीं। बघून घ्या ही रसिका इकडे नाचे नीराबाई।"

महाराष्ट्राचें गौरव-गीत

'श्रीमहाराष्ट्रगीत' अपूर्ण आहे, पण एखाद्या मोठ्या मूर्तीचा उंच व

सुबक चौथरा पाहिला म्हणजे त्यावर केवढी मूर्ति बसाविली जाणार होती याची कल्पना येते, त्याप्रमाणें या पहिल्या दहा कडव्यावरूनहि कवीच्या मनानें या गीताचें स्वरूप केवढें भव्य बांधलें असेल हें सहज कळून येतें. महाराष्ट्रांत शौर्य आहे, तसेंच प्रेमहि आहे; पराक्रम आहे तसाच परमार्थहि आहे, वैभव आहे तसेच वैराग्यहि आहे. हा देश राकट आहे आणि नाजूक आहे, कणखर आहे आणि कोमलहि आहे, तो दगडांचा आहे आणि फुलांचाहि आहे—विविधतेनें तो नटलेला आहे. त्या विविधतेचें रमणीय वर्णन करतांना आरंभींच कवि भक्तिभावानें म्हणतो,

" मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा !
प्रणाम घ्यावा, माझा हा श्री-महाराष्ट्र देशा ॥ "

महाराष्ट्रांतील शेतकरी साधा भोळा व दीनदरिद्री असा असला तरी त्याच्या शौर्याचा दरारा दूरवर पसरलेला आहे. हें अभिमानानें कवि सांगतो, " तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणीकोंडा । वहाण पायीं अंगिं कांबळी उशाखालिं धोंडा । विळा कोयता धरी दिगंबर दख्खनचा हात । इकडे कर्णाटक हांसतसे, तिकडे गुजरात । आणि मराठी भाला घेई दख्खन कंगाल । तिकडे इस्तंबूल थरारे, तिकडे बंगाल ॥ "

प्रीति—भक्तीचा संगम

' मुरली ' हें गोविंदाग्रजांचें अत्यंत प्रेममधुर काव्य आहे. श्रीकृष्णाचें चारित्रच मधुर !-त्याचे ते गोप-त्यांच्या त्या बालक्रीडा—ती यमुना—ते कदंब आणि ती श्रीकृष्णाची मुरली—या सर्वांची मोहिनी हजारों वर्षें सर्व भारतीयांच्या मनावर विलक्षण पडलेली आहे. हिंदु-मुसलमान सर्व गवयांच्या बहुसंख्य गीतांचा विषय कृष्णलीला हाच असतो. शेंकडो संस्कृत व मराठी कवींनीं श्रीकृष्णावर व त्याच्या मुरलीवर आपापल्या काव्यांचीं फुलें वाहिलीं आहेत. गोविंदाग्रजांचें मन अतिशय महत्त्वाकांक्षी ! इतरांहून आपण कांहीं आगळें करून दाखवावें आणि इतरांना थक्क करून सोडावें अशी ईर्षा त्यांच्या प्रतिभेमध्यें मुसमुसत होती. त्यांना श्रीकृष्णाच्य मुरली-रवामध्यें प्रीति, भक्ति आणि मुक्ति यांचा संगम दिसला

श्रीकृष्णाच्या मुरलीचा मधुर ध्वनि श्रवण करण्यासाठीं राधेला जी अनिवार ओढ लागलेली होती; तिच्यावर त्यांनीं असें रूपक बसवलें आहे कीं, तळमळणाऱ्या जीवात्म्याला ईश्वरी साक्षात्काराची भूक लागलेली आहे. ' ही एक आस मनिं उरली । कन्हय्या ! वजाव वजाव मुरली ! ' अशी विनवणी राधा करीत आहे. त्याचा अर्थ तुकारामासारखा एखादा मुमुक्षु मानव ईश्वराच्या भेटीची वाट पहात आहे. या तळमळीची तीव्रता निरानिराळ्या शब्दांनीं गोविंदाग्रजांनीं व्यक्त केली आहे. राधा-कृष्णाचे हे भक्ति-भावनेचे खेळ उत्तर हिंदुस्थानांतील मथुरा-वृन्दावनाकडे खेळले गेले असल्याकारणानें त्यामध्यें 'छेल-छबेला,' 'अलबेला' यांसारखे हिंदी शब्द आणि " अब नंदलाल कर खैर ", " अब खेल करो बनमाली " अशीं वाक्यें मधूनमधून गुंफलेलीं आहेत. राधेचीं पहिली अवस्था वर्णन करतांना कवि म्हणतो —" जन्माचें झालें चीज । कायमची मेली नीज । विश्वाचें गवसे बीज, चिद्वृत्ति त्यांत अवतरली । " परमेश्वराची ओळख पटली त्यामुळें सुकलेलीं विश्वें भिजलीं आणि " पुष्पावेण येइ वास ! वाऱ्याविण चाले श्वास । हर्षाविण आतां हास । मरणाविण सुटका झाली " अशी राधेची अवस्था झाली.

कल्पनांची चमत्कृति

चमत्कृति हा काव्यांतील सौंदर्याचा प्राण आहे. शब्दांची, कल्पनांची, वर्णनांची योजना गोविंदाग्रज अशा कांहीं कौशल्यानें करतात कीं, त्यामुळें त्यांच्या काव्यांत चमत्कृति व वाचकांच्या चित्तांत विस्मय निर्माण झाल्याशिवाय रहात नाहीं. 'गोड निराशा'मध्यें एका 'जादूच्या बागे'चें वर्णन ते करतात. ही बाग म्हणजे एक बाला. ती कशी होती ? तर " नाहीं पाणी जरि भवतीं । तरी दोन कमळें हसतीं; । जन्म जलामधिं कमळांचा । न्याय असें हा जगताचा । परि या कमळांच्या रंगा । खेळे प्रेमाची गंगा । तुमच्या जगतीं । किरणें पडतीं । कमळें फुलतीं, । परि माझीं कमळेंच बघा । निजकिरणीं खुलवितीं जगा ॥ " नेहमींच्या बागेंत पाण्यामध्यें कमळें असतात ना ? पण बालेच्या कमळांत—म्हणजे डोळ्यांत

पाणी खेळत आहे. सत्यसृष्टींत सूर्याचीं किरणें पडलीं म्हणजे कमळें फुलतात ना ? पण काव्य-सृष्टींत बालेच्या डोळ्याचे किरणच जगाला खुलवितात. तिचे गाल म्हणजे पुरे फुललेले गुलाब ! पण कांटे नसलेले. विशेष हें कीं, 'गुलाब तर न मिळे मजला । परि कांटे मम देहाला ।' हे गालीचे गुलाब कसे चंचल आहेत, हें उडत्या शब्दांनीं व धांवत्या चालीनें कवीनें वर्णिले आहे, तें असें:—" क्षणांत फुलतीं, । क्षणांत लपती । दिसती हंसती, । घेर घेतला गिर्कीचा । थेर थरकत्या फिर्कीचा !"

'विचार' या कवितेंत विरोधाभासाची गंमत कवीनें पुढीलप्रमाणें केली आहे—" करिसी एकांती गर्दी, । एकांतहि जनसंमर्दी । जागा असतां कुणि त्यासी, । पुढचीं स्वप्नें दाखविसी । निजतां कोणी त्याकरवीं, करविसी तूं कामें बरवीं ।"

मोहक वर्णन-शैली

अशाच चमत्कृतिपूर्ण वर्णनशैलीनें 'चिमुकली कविता'हि नटलेली आहे. एक 'दशवर्षा बाला' हर्ष उधळीत चाललीं असतां 'भूदेवी-स्वर्देवी यांतिल हाच काय सांधा' अशी भ्रांति कवीला पडते. तो तिचे ओठ, केस, अंगकांति या सर्वांवर मनोहर उत्प्रेक्षांची रास उधळतो. तिच्या भुंवया पाहून कवीला वाटतें, " किंचित खुलत्या भिंवया चिमणी धनुर्ष्यैंच साचीं । चित्रपटांतील काय चिमुकल्या रामलक्ष्मणाचीं ! नखा-एवढ्या दोन हिरकण्या हंसती त्याखालीं, । तेजोरूपा श्रीकमला जणुं निज-कमलीं रमली !" तसेंच तिच्या अंगाच्या गौर-गुलाबी रंगाची कल्पना देण्यासाठीं कवि उत्प्रेक्षा लढवितो, " उषा-चंद्रिका जणूं भेटल्या त्या संगमकालीं । तांबुस धवलहि रस पाझरतां काय त्यांत न्हाली " अशी ही चिमुकली, सौंदर्यसंपन्न व उल्हासपूर्ण बालिका म्हणजे कवीच्या हृदयांतील कल्पनाच आहे असा आरोप गोविंदाग्रज करतात. या काव्यांतील निर्मल भावाचें वर्णन करावें कीं उज्ज्वल कल्पकतेचें स्तवन करावें कीं कोमल शब्द-पंक्तीच्या ओघाचे गुण गावेत ? हें सांगणें खरोखर कठीण आहे. अशाच गुणसंपदेनें भूषविलेली दुसरी कविता " लीला " ही आहे.

एक पांच वर्षांचीमुलगी-तीहि अनाथबालकाश्रमांतील. पण तिचें वर्णन करतांना गोविंदाग्रज म्हणतात, " पांच वर्षांचीं छबकडी सुरेख । जणूं चिमणीशी हिरकणीच देख । कशी चित्रासारखी उभी राही । नांव ठेवाया सोय मुळीं नाहीं ॥ " हिरकणीची उपमा देऊन कवीचें समाधान होत नाहीं. किती केलें तरी, हिरकणी या जमिनीवरचीच. म्हणून आकाशींच्या चांदणीची उपमा कवि देतो व म्हणतो, " कुण्या ऋषिचे यानास अडखळून । पडे निखळूनि जणुं नील पटांतून । आलि खालीं ही चांदणीच एक । तरिच इतकी ही चमकते सुरेख ॥ "

तो मोराचा पिसारा! आणि त्याचे ते चमचम करणारे निळे डोळे! त्यावर एकाहून एक सरस अशा तीन उपमा गोविंदाग्रज चढवितात, त्या अशा— " बुट्टे काळ्या शालूवरती । तारे निळ्या नभीं लकलकती । कृष्णजलावरि कमलें रमतीं । तसा डोळा हा ॥ मोरपिसावरती पाहा ॥ "

वयाच्या अकराव्या वर्षीं गोविंदाग्रजांनीं जी पहिली आर्या रचली, तींतहि वर्षनाचा बारकावा आढळतो. ती आर्या अशी, " चष्मा लावुनि डोळां, डोकिस पागोटि तांबडी घाली ! काठी टेंकित टेंकित येउनि बैसे पथारिच्या खालीं ॥ १ ॥ "

शब्द-सृष्टीचे ईश्वर

सुंदर पद-लालित्य हा तर गोविंदाग्रजांच्या काव्य-सृष्टीचा सुवर्ण-कळसच होय. दुरून प्रारंभीं दिसणारें हें शब्द-सौंदर्य त्यांच्या काव्या-काव्यांतून नुसतें ओसंडत आहे. त्याचें एकच उदाहरण द्यावयाचें तर, 'वेशभूषा'कारास सादरार्पित पद्यभूषा'मधील पुढील पंक्ति पहा—"मंजुळ गुंजारवें रंजवी कुंज कुंजगत भृंग, । घालिसि कुंज-मुखावरि रुंजी मृदुपदिं होउनि दंग । रचिसी नादभूषा । अथवा कुसुम-चापाशा "

शब्दांची लीला व अलंकाराची चमत्कृति ही गोविंदाग्रजांच्या काव्य-सृष्टीचीं बाह्य लक्षणें इतकीं लखलखीत आहेत कीं, त्यानेंच बरेचसे तरुण वाचक दिपून जातात. राजवाड्याच्या बाहेरील विजेची रोषणाईच टकमका पहात उभे राहणाऱ्या खेडवळासारखी त्यांची स्थिति होते. आंतील भावनेचें

जडजवाहीर पहाण्यास ते मोकळेच नसतात. अशा रसिक-मनांचें वर्णन कवि 'दिव्य प्रेमाच्या जाती'मध्यें करतो, " प्राण चंद्र हा कुमुदांना। काय जाणतो तो त्यांना। फुलें हंसति पाहुनि रविला। कळे न परि त्यांचे त्याला। चंद्रकांतमणि पाझरती चंद्र फिरे वरच्यावरतीं। कवि कोठें तरि तत्कविता परि। फिरे दिगंतीरं। रसिकमनें मग कविवरतीं। करिती ती दिव्यप्रीति।"

अनुप्रासांच्या लाटा

'पानपतचा फटका' म्हणजे तर केवळ फटाकड्यांची माळच आहे. ओळींओळींतून शब्दांचे स्फोट होत आहेत. " बोले नाना युक्ती नाना करुनी यवन ठार करा " अशा अनुप्रासांच्या लाटा ओळीओळींमध्यें उसळत आहेत. "अध्यक्ष नेमिले दक्ष भाऊ अरि भक्ष्य कराया तक्षकसे ॥" अशा वर्णनांत वीर वा करुण अशा रसांकडे वाचकांचें चित्त जाण्याऐवजीं तें त्या त्या शब्दावरच खिळून राहतें. पानिपतचें युद्ध हरण्याला शेवटचें कारण दुही हेंच झालें, हें कवीनें पुढील अलंकारिक भाषेनें निवेदिलें आहे. " सरदारांच्या बुद्धिमंदिरा आग लागली कलहाची " प्राण जाण्याची वेळ आली व यशःश्री बुडायची पाळी आली, तेव्हां तरी ही दुही टाळा, अशी काकुळत करणारा निरोप भाऊसाहेब पेशव्यांनीं होळकरांकडे धाडला; त्यांत ते म्हणतात, " देशकार्य हें व्यक्तीचें नच; सक्ति नको; भक्तीच हवी। आसक्ती सर्वांची असतां मिळवूं आतां कीर्ति नवी। राग नका धरूं, आग लागते यशा; भाग हा सर्वांचा। शब्द मुलाचा धरितां कैचा ? हाच मान का काकाचा ?।"

आठ चौकांचा हा पानपतचा पोवाडा वेगवती भाषा व अचाट कल्पना यांनीं नटलेला आहे. रण-संग्रामावर कोठें लग्नाचें, कोठें गोंधळाचें तर कोठें राष्ट्रसभेचें रूपक कवीनें बसविलें आहे. पण मुख्य भर लाटानुप्रास करून वाचकांना चकित करण्यावरच दिसतो. त्यापायीं अर्थ-हानि किंवा रसभंग झाला, तरी कवीस त्याची पर्वा नाहीं. पानिपतच्या पराभवामुळें मराठ्यांच्या राज्याचा ओघच फिरला, हें सांगतांना कवीनें

पुढील उपमा दिली आहे. " जसा नदाचा ओघ फिरावा पात्रीं पडतां गिरिशिखरें । पानपताच्या पर्वतपातें इतिहासाचा ओघ फिरे । " हें सर्व प्रदीर्घ काव्य आपण कां रचलें हेंहि कवीनें अखेरीस सांगितलें आहे. " पुरें पुरें हें राष्ट्रविघातक परस्परांतील वैर अहो । पानपताची कथा ऐकुनी बोध एवढा तरि घ्याहो ॥ " आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचें–भाऊसाहेब, विश्वासराव प्रभृतींच्या शौर्याचें वर्णन करतांना कवीचें हृदय अभिमानानें भरून येतें व तो प्रांजलपणें धन्योद्गार काढतो, " धन्य कवीचें भाग्य असे या, म्हणूनि मिळें हें गायाला ॥ "

विनोदी कविता

शृंगार व करुण याप्रमाणेंच हास्यरसहि खुलविण्याबद्दल गोविंदाग्रज प्रसिद्ध आहेत. विनोदकार म्हणून त्यांना मराठी साहित्यांत मानाचें स्थान आहे. नाटकाइतकें काव्यांत त्यांच्या विनोदाला मोकळें रान मिळालें नाहीं हें खरें, तथापि त्यांनीं कांहीं कांहीं कविता खास विनोदासाठींच रचलेल्या आहेत. ' विहिणींचा कलकलाट 'यांत ते लिहितात, " रण-वाद्यांचा दणदणाट । हत्यारांचा खणखणाट । विजयघंटांचा घणघणाट । एका जागीं मिळविले ॥ प्रळयमेघांचा गडगडाट । आणि विजांचा कडकडाट । भूमिभंगाचा तडतडाट । भरतीस हे घातले ॥ नाना वाजंत्री हीं सारीं ! एक केलीं यत्नें तरी । त्या कलकलाटाची नये सरी । लग्नांत विहिणी करितात जो ॥ " स्त्रियांच्या बोलभांडपणाचें हें वर्णन त्यांतील अतिशयोक्तीमुळें कोणाला हासविणार नाहीं ? प्रिं. वामनराव जोशी यांनींहि अशाच बाबतींत अशीच मजेशीर अतिशयोक्ति केल्याचें सुप्रसिद्ध आहे. एकदां ते आपल्या कॉलेजांतील मुलींना गिरसप्पाचा धबधबा पाह-ण्यास घेऊन गेले होते. त्या धबधब्याचें रौद्र स्वरूप पाहून आणि घनगंभीर घोष ऐकून मुलींना आनंद झाला व तो त्यांच्या बडबडींतून व्यक्त होऊं लागला. त्यांतील एक मुलगी वामनरावांना म्हणाली, " तात्या, या धबधब्याचा आवाज म्हणे दहा मैलांवर ऐकूं जातो ! " त्यावर वामन-रावांनीं मिस्किल स्मित करीत शांतपणें उत्तर दिलें, " तें सारें खरें, पण

तुम्ही गप्प बसला तरच !" गोविंदाग्रजांनीं 'काय करावें ?' या कवितेंत 'तोंडाळ बायको कडकडून येतां, काय करावें ?' असा प्रश्न करून बायकांवर अशीच खमंग टीका केली आहे. नदीला पूर आला असतां धरण बांधतां येतें, तोफ धडाडली तरी तिचा नेम चुकवितां येतो, वीज घरावर पडत असली तर उंच तार बांधतां येते, सावकाराची जप्ती आली असतां बाकी देऊन ती उठवितां येते, म्हैस अंगावर धावून आली असतां छत्री उघडून तिला पळवितां येतें, भिकार कवि आपलें काव्य घेऊन आला असतां तें वरवर वाचून त्याचा त्रास चुकवितां येतो, असे सर्वांवर उपाय आहेत, पण बायकोच्या तोंडाळपणावर तोडगा नाहीं. असें खुमासदार वर्णन गोविंदाग्रजांनीं या कवितेंत केलें आहे. 'रांगोळी घातलेली पाहून' या कवितेंत स्त्रियांच्या आगंतुक वृत्तीवर अशीच टीका केली आहे.

उपहासाची धार

काव्य–गायनाचा, कवींच्या परस्पर–प्रशंसेचा व प्रसिद्धि–लोलुपतेचा उपहास 'हुकुमेहुकूम' या कवितेंत करून गोविंदाग्रजांनीं हास्य निर्माण केलें आहे. रानांत एक पक्षी दृष्टीस पडला, तेव्हां त्या 'वृक्षावरच्या मित्रास' त्यांनीं 'गाणें गाच' असा आग्रह केला आणि त्याला अशी लालुच दाखविली कीं, "स्तुति गाण्याची तुझ्या बहुपरि करिन चार-चौघांत। चित्रहि आणिन तुझें कशाच्या तरी खास अंकांत। गाण्याची या तुझ्या शिफारस करूं अशी भरपूर। कीं शाळाखातेंही वेड्या करील तें मंजूर"

जगांत कांहीं माणसें निष्कारण चिंता करीत असतात, कुढत असतात, दुःखी असतात–अशा निराशेला त्यांना कांहीं कारणहि लागत नाहीं. 'सूरत वो वैसी' स्वभावच त्यांचा तसा. हें सत्य गोविंदाग्रजांनीं "चिंतातुर जंतु' या छोट्या कवितेंत मोठ्या मौजेनें मांडलें आहे. अशा एक निराशावादी माणूस काय म्हणतो हें आरंभीं सांगून त्याला कवि उत्तर देत आहे—" निजलें जग कां आतां इतक्या तारा खिळल्या गगनाला। काय म्हणावें त्या देवाला—" " वर जाउनि म्हण जा त्याला ॥ "

तसेंच "तेज रवीचें फुकट सांडतें उजाड माळावर उघड्या । उधळणूक ती बघवत नाहीं ' " डोळे फोडुनि घेच गड्या ॥ "

आकाशांतील तारांचें व सूर्याचें तेज जसें फुकट जातें, तसेंच पृथ्वीवरील झाडांचीं पानें व नदीचें पाणीहि. तें पाहून तो ' जंतु ' विचारतो, " हिरवीं पानें उगाच केलीं झाडांवर इतकीं कांहीं । मातींत त्यांचें काय होतसे ? " " मातिस मिळुनी जा पाहीं । " " पुराबरोबर फुकटावारी पाणी हें वाहुनि जात । काय करावें जीव तळमळे " " उडी टाक त्या पूरांत " ॥

तत्त्वज्ञानाचें गूढगुंजन

गोविंदाग्रजांची कल्पकता जसा सौंदर्याचा साज धारण करते, तसाच भव्यतेचा वेशहि परिधान करते. एकादी बालिका किंवा कलिका यांचें वर्णन ते जितक्या चातुर्यानें करूं शकतात, तितकेंच अखिल विश्वाचा पसारा आपल्या बुद्धींत सांठवून त्याचें रहस्य काव्यमय भाषेनें उकलून दाखविण्याचीहि शक्ति त्यांच्या लेखणींत आहे. केशवसुतांच्या ' झपूर्झा ', ' हरपलें श्रेय ' या कविताप्रमाणेंच गोविंदाग्रजांनींहि कांहीं गूढगुंजनात्मक कविता लिहून अज्ञेयाचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला आहे. ' फुटकी तपेली ' ही कविता अशा कल्पकतेनें व तत्त्व-चिंतनानें भरलेली आहे. " अनंततेची तहान " मानवी आत्म्याला लागलेली आहे. त्याचा प्रवास अखंड व दूरवरचा आहे. " विश्व मला जें दिसतें त्यांतिल, । विश्वें तुमचीं अणुसम होतिल, निजेक्षणीं तें तुमच्या जिरविल । काळांचा बाजारच सगळा । प्रवास माझा असा भयंकर ॥ " या दृश्य विश्वांच्या अनंत पटींनीं मोठीं अशीं विश्वें कवि पहात आहे. हें विश्व म्हणजे एक तपेली आहे, असें सांगतांना कवि म्हणतो, " ब्रह्माडांचीं खरी तपेली । करा रिकामी तरिही भरली । भरुनी भरणें भरवुनि उरली । जिरतिल विश्वें कितीक असलीं । कांठवरी जरि आधीं भरली ! " उपनिषदांतील 'पूर्णात् पूर्णमिदं ब्रह्म ' इत्यादि वचनांचें हें मराठी काव्यरूप किती सुगम आहे ! अशाच उन्मनी अवस्था ' कलगीचें गाणें ' या कवितेंत गोविंदाग्रजांनीं

रंगविली आहे. 'घुबडाच्या घूघूं' मधूनहि त्यांना 'शंभूचा डमरू' ऐकूं येतो.

उपमांची उधळपट्टी

गोविंदाग्रजांची कल्पनाशक्ति उद्दाम आहे, अनावर आहे, अकुंठित आहे. निसर्गाशीं तन्मय झालेले 'बालकवि' "अरुण" नांवाचें हृदयंगम गीत रचतात, हें पाहून गोविंदाग्रजांच्या काव्यमय मनामध्यें हर्षाच्या लाटा तर उसळल्याच, पण त्याबरोबर महत्वाकांक्षेचीहि ऊर्मि उचंबळली. "आपणहि असें काव्य कां न करावें? किंबहुना याहूनहि सरस कवन निर्माण करून आपण रसिकांना चकित करून टाकूं." अशी ईर्षा गोविंदाग्रजांच्या चित्तांत पेटली आणि त्यांनीं एक सोडून दोन काव्यें अरुणावर लिहिलीं. त्यांतील पहिला 'अरुण' म्हणजे मनोहर उपमांची उधळपट्टीच आहे. दुसऱ्या अरुणांत त्यांच्या मनांतील निराशेचा करुण सूर ऐकूं येत आहे. पहिल्याचें पदलालित्य व प्रसादपूर्ण रचना हीं इतकी रमणीय आहेत कीं, ती पाहतांच त्यांच्या 'प्रेमपाठा' सारख्या काव्य-रत्नांचीच स्मृति व्हावी. पहिल्या 'अरुणा' च्या पहिल्या चार ओळींहि किती ऐटदार आहेत पहा—"अहा! उगवला पहा अरुण हा उधळित तेजाला। जगा जागवी तसा जागवी कविच्या चित्ताला। जसा उडवि हा अरुण चहुकडे गगनीं रंगाला। तसा पहा कवि उडवी अपुल्या चित्त-तरंगाला" ॥

साक्षात् अरुणोदयाचें दर्शन गोविंदाग्रजांनीं कधीं घेतलें होतें कीं नाहीं याची साक्ष दोन्ही अरुणावरून पटत नाहीं; पण तें त्या निसर्गदृश्यांशीं समरस झाल्याची, त्यांत रंगून गेल्याची, बुडून गेल्याची खूणहि या काव्यांत कोठेंच आढळत नाहीं. आकाशांतील तें नित्य-नूतन, रक्त-रम्य-दृश्य पाहून, त्याच्याशीं एकतानता पावून, स्वतःचें भान हरपून, सौंदर्याची समाधि लागण्याइतकी तल्लीनता गोविंदाग्रजांचीं झाली असावी असें वाटत नाहीं. एखाद्या चित्रकारानें एखाद्या यंत्राच्या साहाय्यानें प्रभात-कालचे फोटो भराभर घ्यावेत; त्याप्रमाणें गोविंदाग्रजांनीं आपल्या कल्प-

कतेच्या साहाय्यानें अरुणोदयावेळचा लाल रंग निरनिराळ्या अलंकारांनीं तटस्थपणें वर्णन केलेला आहे. सूर्य हा आकाशींचें पुष्प असून त्यांतील मकरंदाचे रस चहुंकडे पसरले आहेत काय ? कां सूर्याच्या राजवाड्यास लाल कांच लावलेली आहे ? कीं भूमातेचा हा मळवट आहे ? अशा कल्पना करतां करतां कवीनें अशी मनोरम उत्प्रेक्षा केली आहे कीं, " कल्पलतांवर फुलें बहरतां सडा परागाचा । काय तरंगें स्वर्गगाजलिं तांबूस रंगाचा । " अशा नानाविध कल्पनांचा पाऊस कवीनें पाडला आहे. ब्रह्मपदाच्या किल्ल्यावरील हा जरिपटका आहे ? कीं मानवाला मिळालेला हा चिरंतनाचा ताम्रपट आहे ? अशा कल्पनामागून कल्पना करतांना खुद्द कवीच म्हणतो " मना ! कल्पना पुरे ! " आणि शेवटीं तत्त्व सांगतो, सृष्टि म्हणजे " सौंदर्याची, मांगल्याची, प्रेमाची खाण ! " अरुण-रसानें आपल्या 'मनिंचीं चित्रें रंगवा' असा संदेश कवीनें शेवटीं दिला आहे.

निराशेचें रडगाणें

प्रेमाचें व सृष्टिसौंदर्याचें गुणगान मुक्त कंठानें व अकुंठित कल्पनेनें गोविंदाग्रज करीत असले आणि त्यांतून नावीन्य, चमत्कृती, हर्ष ओसंडत असले तरी त्यांचें हृदय जखमी झालेलें होतें आणि त्यामुळें त्यांच्या काव्याच्या नसांतून निराशेचें रक्त वहात होतें. या निराशेची कारणमीमांसा या लेखाचे प्रारंभीं केलेली आहे. तिचीं तीव्र-सौम्य प्रतिबिंबें निरनिराळ्या कवितांमध्यें आढळतात. एका ' बालकवीस ' उद्देशून ते म्हणतात—" आम्ही गातों जें गाणें । तें जगताचें रडगाणें । हृदयीं जो भरला त्रास । तो कविताचरणीं प्रास । शब्दासाठीं हपापले । अर्थासाठीं जन टपले । हृदय करपले । रसहि हरपले । कवनाचि खपलें । गा तूं आतां गाच जरा । रसगंगेच्या मुशाफरा । " कवीला निराशा वाटण्याचीं कारणें कोणतीं हें त्यांनीं एका कडव्यांत सांगितलें आहे, तें असें-" नियमांनीं झालों ठार । ठराविकानें बेजार । हा जगण्याचा बाजार । सजीवतेचा आजार । अमुच्या कवनाचा पूर । मरत्या जीवाचा सूर । परि तव

कवनें । हलतां पवनें । भुलतिल भवनें । त्या कवनाचा सूर खरा । गा बागडत्या मुशाफरा । ”

संसारांत निराशा झालेली आणि भविष्य काळांतहि आशा लोपलेली, या आपल्या स्थितीचें शब्दचित्र कवि पुढील शब्दांनीं रेखाटतो, “ हातीं संसाराची माती । मनिंच्या आशा मनास खाती, । भूतकाळचीं भूतें रडती । मिटल्या जाग्या डोळ्यापुढतीं । शून्याचें मैदान । ”

अशा या मनःस्थितीवर तोडगा काय ? तर ‘ अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस ’ कवि विनवितो, “ गा तर चित्ता मम रमवाया; । हीच खरी जादूची माया । आनंदा खेळविणें वायां, । मशाल दिवसां लावुनि होतो । लाभ कुणाला काय । ”

जग म्हणजे सुखदुःखांचा बाजार. त्यांतील दुःखी चिजाच एखाद्याच्या वाट्याला येतात. एखादें फूल प्रेतावरच पडतें, एखाद्या पर्वतांतून ज्वालारस वाहतो, एखाद्या झाडावर वीज पडते ! अशा ‘ एखाद्याचें नशिब ’ कवीनें अलंकारिक भाषेनें वर्णन केलें आहे आणि शेवटीं देवाची प्रार्थना केली आहे कीं, “ पाही कोण अशा हताश हृदया ? जो तो असें आपला । देवा ! तूं तरि टाकि अश्रु वरुनी, त्यासाठीं तो तापला ॥ ”

सुख किंवा दुःख वाट्यास येणें हें ज्याच्या त्याच्या नशिबाचें फळ असतें. पण सुखी माणसांनीं दुःखी माणसांची विचारपूस करण्याइतकी तरी आस्था दाखवावी नां ? ‘पण जो तो असे आपला.’ ही मानवाची अनास्था, हृदयाची शुष्कता; वृत्तीची स्वार्थपरता यांचा कटु अनुभव कवीला आला आहे. म्हणून तो देवाकडे धाव घेत आहे.

समाजावर टीका

समाजांतील दुष्टत्वाच्या दडपणाखालीं कवीचें हळूवार हृदय चिरडून जातें आणि त्यांतून निराशेचा चीत्कार निघतो. अन्यायाचे आघात समाजाच्या अंगावर होत असलेले पाहून कवीचें कोमल मन निराशेचे सूर काढूं लागतें. पण व्यक्तिशः हळवे व दुबळें असलेलें हें मन प्रतिभेच्या पंखावर बसून उदात्त विचाराच्या अंतराळांत भराऱ्या मारूं लागलें,

म्हणजे मग मात्र तें अत्यंत आशावादी व सामर्थ्यशाली बनतें, एवढेंच नव्हें तर त्या दुष्टत्वाशीं व अन्यायाशीं युद्ध करण्याचा स्फूर्तिदायक संदेशहि तें जगास देतें. शारदेच्या सिंहासनापाशीं बसलेल्या कवीचा अधिकार सर्वांहून मोठा आहे. त्या अधिकारानें कवि समाजांतील व्यंगावर व वैषम्यावर जोराचे कोरडे ओढतो आणि समाजाला झगडा करण्याची, प्रतिकार करण्याची, प्रेरणा देतो. जगाचें स्वरूप कांटेरी कसें आहे, याचें वर्णन करतांना कवि ' अल्लड प्रेमास ' या कवितेंत म्हणतो, " बाग जगाची, ही न फुलांची, कांटे जागोजाग ! टाकिल कुणि तुज धिक्कारानें । रडविल किंवा उपहासानें । फसविल नकली की मालानें । कोणि भटकत, उगाच रखडत, फिरविल मागोमाग ! "

रूढीवर हल्ले

समाजांतील दुष्ट रूढी व अन्याय्य चालीरीती यांचीं कांहीं उदाहरणें 'स्मशानांतलें गाणें' या कवितेंत कवीनें दिलीं आहेत, तीं अशीं—'अन्नांवांचुनि सपिंड मरती; । मरतां त्यांतें पिंड अर्पिती ! । सजीव तोंवरि लत्ता देती । मरतां घेती, खांद्यावरतीं, उरफाटा सन्मान ! विधवा । मार्गीं मार्गे फिरवी, ! मांजर अडवें कार्य बिघडवी, । कर्तृत्वाची हीच थोरवी ! प्रेतां हसतां, कार्यक्षमता, न धरी परी गुमान ॥ "

" समानतेच्या मारी बाता । वरच्या लत्ता झेलित माथां; । सर्वेच खालीं झाडी लाथा । न ती निवारी, न ही आंवरी, बेशरमी हैवान ! "

धुवडास उद्देशून बोलतांना कवि म्हणतो, ' स्मशानांतील भुतापेक्षां समाजांतील माणसें अधिक हिंस्र व स्वार्थी आहेत.' कवि सांगतो, " शंख कुणाचा पोटासाठीं । गात कुणी तर तिसऱ्यासाठीं । छाया जिवाची उफराटी । जो तो ज्यात्यासाठीं ! । चल, हें मी तूं यांना सांगूं. "

स्फूर्तीचा संदेश.

गोविंदाग्रजांच्या अशा रूढिभंजक कवितांचा मेरुमणि म्हणजे "दसरा !" त्यांत कवि असा आवेशपूर्ण संदेश देतो, " टाकुनि सीमा मृत धर्माच्या,।

दंभाच्या वा अंधपणाच्या । जुनेपणाच्या, अहंपणाच्या; । सीमोल्लंघन–कालचि दसरा । जुन्या मतांचा जाळा कचरा ॥ श्रुतिस्मृतींना आतां विसरा । अंधभक्तिचा पांगुळगाडा । मोडुनि तोडुनि उपडा पाडा । पाताळीं तो नेउनि गाडा ! ”

सुधारणेच्या ह्या मोहिमेंतील वीरांना वंदन करण्यास गोविंदाग्रज विसरत नाहींत. महाराष्ट्रांतील समाज-सुधारणेचे जे अग्रदूत, त्यांचा गौरव करतांना ते म्हणतात—“ रूढीच्या किल्ल्यावर स्वारी । ‘अगरकरां’ची झडवा नौबत । ‘ भागवतां ’ची धराच हिंमत । ‘ केशवचंद्रांचे ’ घ्या चिलखत । फुका ‘ कृष्णा’ ची च तुतारी ” ॥

रूढीच्या सीमा उल्लंघणें म्हणजेच खरा दसरा, हें तत्त्व ठसवितांना गोविंदाग्रज सांगतात, “ रूढीचा गड खालीं उतरा । पाकोळ्या घुबडांना उडवा । जिवंत सोनें अखंड लुटवा । कृपण मनाचा रस्ता खुटवा । असा साजरा कराच दसरा ॥ ”

या दुष्ट रूढि तरी कोणत्या ? ‘ रडत बैसले महारमांग ’ । हा एक अस्पृश्यांचा प्रश्न आणि दुसरा विधवांचा–त्यांच्या दुर्दशेचें वर्णन कवि करतो—“ तशाच विधवा करिती तळमळ । फत्तर फुटतिल येउनि कळवळ । कुठला पोकळ गताभिमान ? । चला उठारे बांधा कंबर । ” अशा अनेक दुष्ट रूढींचा विध्वंस करण्याची प्रेरणा देण्यासाठीं कवीनें कमर कसली आहे आणि तो गर्जत आहे, “कुणी मनाचा असेल कच्चा । करील त्यालाही महशूर । या गाण्याचे गाउनि सूर । ‘ केशवपुत्रा ’ चा महशूर । ‘ गोविंदाग्रज ’ चेला सच्चा ॥ ”

आदरार्चीं स्थानें

लो. टिळकांविषयीं गोविंदाग्रजांना गाढ आदर असे. महाराष्ट्रांतील हा ‘ बौद्धिक ताजमहालच ’ आहे असें त्यांना वाट. शिवाजीमहाराजानंतर हाच राजकारणी पुरुष महाराष्ट्राचा भाग्य–विधाता निघाला, या दृष्टीनें ते त्यांच्याकडे भक्तिभावानें पहात. १९१८ सालीं स्वराज्याची शिष्टाई करण्यासाठीं लोकमान्य इंग्लंडास गेले, तेव्हां कवीच्या या भावनेला भरती आली व त्याची वाणी गुणगुणली, “ जें जें नश्वर गेलें निघुनी काळाच्या

पाठीं । अमृत तेवढें उरलें केवळ या दिवसासाठीं ॥" याच दिवसासाठीं ' उंच उभारुनि मान हिमालय तिष्ठत केव्हांचा ।' आहे असें कवीला वाटतें. तानाजीचें शौर्य, व्यास-वाल्मीकींचें काव्य, आर्यभट्ट-मिहिरादींचें ज्ञान-सारें कांहीं हा दिवस उजाडावा म्हणून होतें, फार काय, पानपतचें युद्ध, श्रीकृष्णाची गीता, श्रीरामाचा सेतु-हा सारा इतिहास घडला तो या दिवसासाठीं-अशी अतिशयोक्त प्रशंसा करून कवि " लोकमान्यांस भारतवर्षाचा आशीर्वाद " देतो आणि एकच मागणें मागतो; तें असें—" नलगे दौलत नलगे बरकत नको कोहिनूर । स्वदेश नलगे स्वराज्य नलगे हो सर्वहि चूर । एक सांगणें एक मागणें तेंच लाखवार । मागुनि घ्यावी श्रीशिवबांची भवानि तलवार । "

खोल सहानुभूति

उपेक्षितावद्दलहि गहिंवर येण्याइतकी गोविंदाग्रजांची सहानुभूति व्यापक आहे. ते ' ओसाड आडांतील फुला'ची दशा सहृदयतेनें वर्णितात; तशींच कुब्जेचीहि. श्रीकृष्ण मथुरेला गेले असतां सारें गोकुळ तळमळलें. त्यांचें सांत्वन करण्यासाठीं कृष्णांनीं उद्धवाला पाठविलें. उद्धवानें ' हे नंदाला, यशोदेस हे ' असे निरोप सांगितले. ' राधेला तर बहाल केली हरिनें जीवाची दुनिया ' पण बिचारी कुब्जा ! तिची आठवण कोण करणार ? " तोंड झांकुनी ओंठ दाबुनी, रडे आंतल्याआंत मनीं । पुसुनी टाकी झणि पदरानें अश्रू आले जरि नयनीं ॥ " अशी त्या कुरूप भक्तिणीची अवस्था जाणण्याइतकी सूक्ष्मता कवीनें दाखविली आहे आणि तिचा धांवा " दैवाची निर्दयता ' यांत रसपूर्ण रीतीनें दिला आहे. ' श्रीहरिसाठीं कुब्जा रडते हेंच हंसें होईल माझें ' हें तिचें हृद्गत कवीनें बरोबर ताडलें आहे.

' विरामचिन्हें ' या कवितेंत मानवी जीवनांतील विविध अवस्था कवीनें मार्मिकतेनें रंगविल्या आहेत. विद्यार्थिदशेंत जिज्ञासा वाढलेली असतांना मनुष्य प्रत्येक गोष्टीबद्दल चौकस असतो. याचें वर्णन करतांना कवि म्हणतो, " जें तें पाहुनि यापरी भक्तसे, दृकू संशयें टाकित, सारा

जीवनलेख मी करितसें तैं ' प्रश्नचिन्हां ' कित ! " शेवटी कवि प्रार्थना करतो, " देवा ! ' पूर्णविराम ' त्या तव पर्दी दे शीघ्र आतां मला ! "

गोविंदाग्रजांच्या अकुंठित कल्पकतेनें ' माझा मृत्युलेख ' लिहिण्याचें धाडस केलें आहे. त्या कवितेंत कवीनें आपली निराशा व आपलें जीवनाविषयींचें अज्ञान मोठ्या नम्रतेनें व प्रांजलपणानें मांडलें आहे, तें असें—

" यावज्जीवहि " काय मी " न कळलें आतांप्रती नीटसें । मित्रांतेहि कळे न गूढ—न कळे माझें मलाही तसें ॥ अज्ञाता ! मरणोत्तर प्रकट तें होईल तूंतें कसें ? । कोठें आणि कधीं तरी जगति मी होऊनि गेलों असें ॥ "

मराठी साहित्याच्या भाग्याची गोष्ट अशी कीं, गोविंदाग्रजांच्या जीवनाचें गूढ त्यांच्या मरणोत्तर त्यांच्या चहात्यांनीं व भक्तांनीं उकलून दाखविलें आणि शब्द-सौंदर्य, कल्पना-प्रभुत्व व भावोत्कटता या त्यांच्या गुण-संपदेचा संप्रदाय वाढता ठेवला. त्यांच्याइतकी सार्वत्रिक व गौरवपूर्ण स्मृति महाराष्ट्रांत दुसऱ्या कोणत्याच आधुनिक कवीची पाळली जात नाहीं.

* * *

महाबळेश्वराच्या दाट झाडींतून चालत असतांना एखाद्या थकलेल्या व तहानेलेल्या वाटसरूच्या दृष्टीस भलेमोठें मोहोळ दिसावें आणि त्यांतून टप् टप् टप् टप् मधाच मधुर थेंब गळत असावेत म्हणजे त्या



वाटसरूला किती हर्ष वाटेल ? तसाच हर्ष रसिकवर्गाला तांबे यांचा काव्य-संग्रह पाहतांना होतो. महाबळेश्वरच्या वातावरणांतील अणु-रेणु जसा स्निग्ध व शीतल आहे; तसाच तांबे यांच्या कवनांतील भाव आहे. महाबळेश्वरचें पाणी जसें थंडगार व संजीवक; तसें तांबे यांच्या काव्यांतील शृंगार-वीर-करुण-वत्सल हे रस आहेत आणि महाबळेश्वराच्या निरनिराळ्या 'टोकावरून' सूर्योदयाची किंवा सूर्यास्ताची जी रम्य व चंचल प्रभा दिसते, तीच तांबे यांच्या कल्पनाविलासामध्यें चमकत आहे. महाबळेश्वरांतील त्या खोल दऱ्या कधीं पौर्णिमेच्या चांदण्यानें तर कधीं हिवाळ्यांतील धुक्यानें काठोकांठ भरलेल्या असतात आणि फेसाळ दूध ओसंडणाऱ्या द्रोणाप्रमाणें भासतात; त्याचप्रमाणें तांबे यांच्या निरनिराळ्या प्रकारच्या काव्यांत सखोल सहानुभूति व अपार आशावाद ओतप्रोत भरून राहिलेला आहे. लुसलुशीत पद-लालित्य, मंजुळ नाद-माधुर्य,

विमल शृंगार–रस आणि एकंदरीनें सौंदर्य–पूजक वृत्ति या चार गुणांनीं तांबे हे अर्वाचीन कवींमध्यें सर्वश्रेष्ठ ठरले आहेत. किंबहुना त्या गुणांनीं संपन्न असा त्यांचा एक विशिष्ट संप्रदायहि रूढ झाला आहे.

काव्यात्म वृत्ति

तांबे हे जातिवंत कवि होते. त्यांची अवघी वृत्तिच काव्यात्मक होती. ते जणूं काव्यच जगत होते. अष्टौप्रहर त्यांचें मन काव्याच्या चिंतनांत गुंगलेलें असें. त्यांना निदिध्यास असें तो एक काव्याचाच. जसा तुकारामाला पांडुरंगाचा किंवा लोकमान्यांना स्वराज्याचा; तसा त्यांना काव्याचाच छंद दिवसभर व आयुष्यभर लागलेला होता. संसारांत संतोष पावून समाधानी वृत्तीनें जीवन घालवीत असतांनो जे जे विशेष अनुभव आपल्या मनाला चाटून किंवा कापून गेले, ते सर्व तांबे यांनीं काव्यरूपानें लिहून ठेवले. खुद्द त्यांनींच आपल्या काव्याची जन्मकथा निवेदन केली आहे, ती अशी, 'एखाद्या गोष्टीनें मनाला चटका बसैला कीं, तिला कवितेचें रूप द्यावयाचें. संसारांतील अनेक लहानमोठीं, घरांतील, घराबाहेर, जड सृष्टींतील, चैतन्य-सृष्टींतील दृश्यें मनाला झोंबलीं म्हणजे तीं काव्यरूपानें परिणत व्हावयाचीं; मग तीं कसल्याहि स्वरूपाचीं असोत. सामाजिक असोत, धार्मिक असोत, राष्ट्रीय असोत; असा क्रम आजतागाईत चालू आहे."

जेवढें म्हणून आपण अनुभविलें तेवढेंच लिहावयाचें, असें ब्रीद तांबे यांनीं ठेवलेलें होतें. त्यांनीं लौकिकाची चाड धरली नाहीं; द्रव्याची अभिलाषा ठेवली नाहीं. अत्यंत निष्कामपणें त्यांनीं काव्याची सेवा केली. ती लोकांपुढें ठेवून कवि म्हणून आपण मिरवावें असें त्यांना कधीं स्वप्नहि पडलें नाहीं. त्यांनीं काव्य रचण्यास लहानपणापासून प्रारंभ केला. पण त्यांच्या काव्याचें दर्शन मराठी वाचकाना प्रथम झालें तें १९२० सालीं–त्यांच्या वयाचे ४६ वे वर्षीं आणि तेंहि त्यांचे चाहते कवि प्रो. मायदेव यांच्या प्रयत्नांमुळें. 'डोळे हे जुल्मी गडे' हें रसिकांचें लाडकें पद तांबे यांनीं १८९१ मध्यें वयाच्या १६ वे वर्षीं लिहिलें, पण तें सुमारें तीस वर्षे दप्तरांत पडून होतें.

बरीच कविता त्यांनीं जाळूनहि टाकली. कीर्ति देवतेकडे पाठ फिरवूनच तें सरस्वती-देवीची आराधना करीत होते-त्यांच्याइतका प्रसिद्धि-विन्मुख कवि सापडणें कठिण. जसा कीर्तीचा तसाच संपत्तीचाहि नाद त्यांना कधींच लागला नाहीं. या आपल्या निरपेक्ष वृत्तीचें वर्णन खुद्द तांबेच अलंकारिक भाषेनें करतात, तें असें—"आपल्या ठायीं जर थोडीफार प्रतिभा असेल तर तिला लक्ष्मीपुढें नर्तकी म्हणून नाचवावयाचें नाहीं; सुवर्णाच्या नादावर तिला गावयास लावावयाचें नाहीं, हा अगदीं आरंभापासून माझा निश्चय होता आणि ईश्वरकृपेकरून तो अद्यापि टिकला आहे." जशी पूर्वीच्या साधु-संतांची भगवद्भक्ति, तशीच तांबे यांची काव्य-भक्ति.

जीवन व काव्य यांची सांगड

त्यांचें काव्य म्हणजे त्यांच्या जीवनाचें प्रतिबिंब. जसजसें जीवन वाढत गेलें; तसतसें त्यांच्या काव्याचे विषय बदलत गेले. या बदलाचें वर्णन तांबे पुढील प्रांजल शब्दांनीं करतात, "माझ्या कवितेचा हा एक विशेष आहे कीं, तिची वाढ माझ्या जीवनाच्या संगतीनें झाली आहे, मी पंधरा वर्षांचा होईपर्यंत ती शिशुप्रमाणें बोबडे बोल बोले. माझ्या नवयौवनाच्या कालांत ती कामुक झाली. आणि खरोखर त्या वेळच्या कांहीं कविता मी जाळून टाकिल्या. विवाहानंतर ती एका प्रेमांतच गुंगून गेली. पुढें माझीं मुलें सभोंवतीं दिसूं लागतांच तिनें मुलांचीं गाणीं गाइलीं. मृत्यु जेव्हां माझ्या दाराशीं आला आणि मुलांना घेऊन गेला, तेव्हां ती कविता चिंताक्रांत आणि उदासवाणी झाली." अखेरीस दिक्कालापलीकडील परम साध्यावर त्यांची दृष्टि खिळली व त्या वृत्तीचेहि पडसाद त्यांच्या काव्यांत उमटले. तांबे यांचें जीवन व काव्य यांचे ओघ एकमेकांत मिसळून चालले होते.

शिक्षण-सुखाचा त्याग

तांबे यांच्या जीवनास सुरुवात ता. २७ नोव्हेंबर १८७४ रोजीं झाली. त्या दिवशीं ग्वाल्हेर संस्थानांतील मुगावली या गांवीं या भास्कराचा जन्म

झाला. त्याचे वडील रामचंद्रपंत हे झांशी संस्थानांत कारकून होते. बालपणीं गांवांतल्या नदीकांठीं व रानावनांत भास्करानें स्वैर संचार केला व निसर्गाचीं चित्रें आपल्या मनाच्या तबकडीवर उमटवून घेतलीं, गरिबीमुळें शिक्षणांत खंड पडला. त्या खेड्यांत कांहीं दिवस भास्करानें भिक्षुंकी केली व साधुसंतांच्या पोथ्या वाचल्या. पुढें देवास संस्थानांत त्याचें इंग्रजी शिक्षण झालें. त्याची बुद्धि तरतरीत असल्यामुळें ते प्रवेश-परीक्षेंत मानानें उत्तीर्ण झाले. १८९३ सालीं अलाहाबाद विद्यापीठाची मॅट्रिकची परीक्षा उतरून ते पहिल्या वर्गांत आले. शिक्षणाची ओढ त्यांना इतकी कीं, एकदां त्यांनीं रात्रीं घरांतून पळ काढला व पंचवीस मैलांचा प्रवास पायीं केला. प्रिं. आगरकर, सानेगुरुजी वगैरे विद्या-सेवकांचा पंथच त्यांनीं धरला. आग्रा येथें भास्करराबांनीं बी. ए.चा अभ्यास सुरू केला, परंतु आपल्या वडील बंधूसाठीं त्यांनीं मोठा त्याग केला. त्यांचें शिक्षण पूर्ण व्हावें म्हणून त्यांनीं आपलें शिक्षण अपूर्ण ठेवलें. आपल्या अत्यंत आवडीच्या वस्तूचा त्याग हाच सर्वश्रेष्ठ नव्हे का? तो त्यांनीं केला. देवास तेथील शाळेंत वीस रुपये पगारावर, त्यांनीं शिक्षकाची नोकरी धरली. पुढें ते तेथील बालराजांचे शिक्षक बनले. त्यामुळें राजवाड्यांतील ग्रंथ-संग्रह त्यांना खुला झाला. त्याचा त्यांनीं यथेच्छ उपभोग घेतला.

राजकवित्वाचा मान

पुढें ते देवासच्या महाराजांचे खाजगी कारभारी झाले, नंतर त्या संस्थानाचे वकील म्हणून ते इंदूरास गेले. तेथें ते १९०८ पर्यंत राहिले. पुढें एका खेड्यांत न्यायाधीशाचें काम करण्याचा योग आला. नंतर दोनतीन संस्थानांत निरनिराळ्या नोकऱ्या त्यांना कराव्या लागल्या. त्यांच्या न्यायप्रिय व बाणेदार स्वभावाला त्या संस्थानांची हवा मानवेना. त्यामुळें त्यांना स्थलांतरें व स्थित्यंतरें करावीं लागलीं. शेवटीं ग्वाल्हेर संस्थानांत ते १९२६ सालापासून स्थिरावले व 'राजकवि'हि बनले. १९३४ सालीं त्यांच्या वयाला साठ वर्षें पूर्ण झालीं. म्हणून महाराष्ट्रांतील

शहरोशहरीं साहित्यिकांनीं सत्कार-सभा भरवून त्यांचा मोठा गौरव केला.

प्रा. मायदेव यांनीं १९२० सालीं तांबे यांच्या खनपटीस बसून व संशोधन करून त्यांच्या कविता जमविल्या व प्रसिद्ध केल्या, आणि स्वतः त्या सभा-परिषदामधून गाऊन दाखवून तांबे यांना योग्य ती कीर्ति मिळवून दिली. १९२६ सालीं तांबे हे इंदूर येथें भरलेल्या मध्यभारतीय कवि-संमेलनाचे अध्यक्ष झाले आणि १९३२ सालीं कोल्हापूरच्या साहित्य-संमेलनांतील काव्य-विभागाचें अध्यक्षस्थानहि त्यांना अर्पण करण्यांत आलें. त्याचप्रमाणें १९३५ सालीं, षष्ठ्यब्दिमूर्ति-समारंभाचे निमित्तानें, दुसरे एक कवि प्रा. माधवराव पटवर्धन यांनींहि त्यांचा काव्य-संग्रह साक्षेपानें संपादून प्रकाशित केला. "दुर्दैवानें मराठी कवींना नालायक वा निष्काळजीच संपादक भेटतात असें दिसतें." अशी तक्रार प्रा. पटवर्धनांनीं 'केशव-सुतां'च्या बाबतींत केलेली होती. तिला निदान तांबे यांच्या बाबतींत तरी पटवर्धनांनीं अणुमात्र जागा ठेवली नाहीं. तीस वर्षें तांबे यांच्या काव्यानें जो अज्ञात-वास पतकरला होता, तो मायदेव-पटवर्धनांच्या प्रयत्नानें समाप्त होऊन त्यांच्या काव्य-देवतेला पुढें राजैश्वर्य व लोकमान्यता उपभोगावयास सांपडली. अशा साफल्याच्या स्थितींत, वयाच्या ६७ वे वर्षीं, ता. ७ डिसेंबर १९४१ रोजीं ग्वाल्हेर येथें हा काव्य-भास्कर अस्तंगत झाला.

नाट्य-गीतांचे प्रवर्तक

तांबे यांचें पद-लालित्य कमालीचें कोमल आहे. मृदु व मंजुल शब्दांनीं नटलेलीं व मधुर चालीवर रचलेलीं त्यांचीं नाट्य-गीतें तर अतिशय मनोहर आहेत. गुलाबाच्या पाकळ्यांच्या पायघड्यावरून त्यांची शारदा पाउलें टाकीत जाते, असें वाटतें. 'श्वासानें जें सुमन करपतें' असा पारिजातकाचा नाजुकपणा गोविंदाग्रजांनीं वर्णिलेला आहे. तोच तांबे यांच्या काव्यांत भरून राहिलेला आहे. खुद्द तांबेच आपल्या काव्याच्या कोवळिकेचें स्वरूप 'अंगुली कठिण लागली, तरी संपली' असें करतात. तें अगदीं यथार्थ आहे. अशा भाव-मधुर व लालित्य-संपन्न नाट्य-गीतांचे

ते प्रवर्तकच आहेत म्हटलें तरी चालेल. ' मुशाफिर आम्ही ' ' राजकन्या आणि तिची दासी, ' ' बिजली जाशि चमके स्वारी, ' ' आज फिरुनि कां दारीं, ' ' फेरीवाला, ' इत्यादि त्यांचीं नाट्य-गीतें चतुर व संयमित शृंगारानें थबथबलेलीं आहेत. ' कुणि कोडें माझें उकलिल कां ? ' हें त्यांचें प्रणय-गीत गोविंदाग्रजांच्या ' गुलाबी कोड्या ' इतकेंच लोकप्रिय झालेलें आहे. " प्रणयप्रभा, तुजवीण, हृदय सांग, जगाहून भिन्न, डोळे हे जुल्मी गडे, कोणिकडे जादुगारिणी, कुणि असेल ग, घट तिचा रिकामा, घट भरे प्रवाहीं इत्यादि किती तरी काव्यांतून प्रेम-रसांच्या धारा वहात आहेत. शुद्ध शृंगाराचे निर्मल नमुने असणारीं प्रेम-गीतें त्यांच्या सर्व कवितांच्या सुमारें निम्मी आहेत. ' कला व नीति ' या वादांत त्यांनीं आपलें मत ' केवळ कलेच्या ' बाजूनें आपल्या पत्रांत दिलेलें असलें, तरी त्यांच्या काव्य-देवतेनें मात्र नीतीची व सभ्यतेची ' लक्ष्मण-रेषा ' कोठेंच ओलांडलेली नाहीं. त्यांच्या कलेनें सर्वत्र सूचकतेची मर्यादा पाळलेली आहे.

विषयांची विविधता

तांबे यांच्या काव्यांत शृंगार हा प्रधान रस असला, तरी करुण—वत्सलादि रसांनाहि त्यांत स्थान आहेच. " सांत्वन, शिशु-वंचना, आईकडे न्या " इत्यादि गीतें कारुण्यानें ओथंबलेलीं आहेत. तसेंच ' अंगाई गीत' ' चिवचिव चिमणी छतांत ' ' रुणुझुणु ये, ' 'तर मग गट्टी कोणाशीं ? ' ' लाजूं नको ताई ' वगैरे गीतें वात्सल्य-रसानें न्हालेलीं आहेत ' डुमडुमत डमरू ये ' असें ' रुद्रास आवाहन ' करणारें त्यांचें वीररसयुक्त गीत सुप्रसिद्धच आहे. ' प्रतिज्ञा ' ' कोण रोधील ? ' ' उखळांत दिलें शिर, ' 'वाटलें नाथ हो' या कविता गांधीजींच्या सत्याग्रही आंदोलनाचें गुणगान करणाऱ्या आहेत, तर ' राजराजेश्वरा हो दयाळा ' ही ' लोकमान्यांस ' उद्देशून लिहिलेली कविता भक्तिभावानें भरलेली आहे. ' झांशीवाली'सारख्या व्यक्तिगौरवाच्या कविता थोड्याच आहेत. 'नववधू प्रिया, ' ' रतलें परपुरुषाशीं ' ' घातली एकदां अतां उडी ' इत्यादि गूढगुंजनात्मक कवनें जीवात्मा व परमात्मा यांच्यासंबंधींचीं आहेत. संत—

कवींच्या 'विराण्यां'ची ही आधुनिक आवृत्तीच होय. " अनन्त-स्तोत्र, चरण कधीं कां, चरणिं तुझ्या मज, हरि अर्पावें काय, घर राहिलें दूर " इत्यादि काव्यांतून भक्तीचा आर्त स्वर ऐकूं येतो. ' घन तमीं शुक्र, ' ' मरणांत खरोखर ' इत्यादि कविता म्हणजे आशावादाच्या तुताऱ्याच होत. तांबे यांच्या काव्य-सृष्टींत जशीं रण-शृंगें आहेत, तशींच लग्न-वाद्यें आहेत आणि तशीच देवळाच्या गोपुरांतील सनईहि वाजत आहे.

तांबे याची काव्याची बैठक किती नम्रतेची आहे, याची साक्ष पुढील कवनावरून कोणासहि येईल. आपलीं कवनें हीं सुमनें आहेत असें मानून ते रसिकांना विनवितात, " कुस्करूं नका हीं सुमनें । जरि वास नसे यास । तरी तुम्हांस अर्पिलीं सु-मनें । मधु जरी नसे तिळभरी अन्तरीं तरी करीं हीं धरणें । यां वर्ण नसे सौवर्ण। जों न हीं शीर्ण तोंवरी धरणें । घ्या करीं, क्षणाभीतरीं वाळतिल तरी तयांना जपणें । अङ्गुली कठिण लागली तरी सम्पलीं ! हळुच यां शिवणें । अंजलीं धरुनि अर्पिलीं, भक्तिनें दिलीं म्हणुनि तरि घेणें ! "

नादमधुर-शब्द-रचना

मोहक वेष धारण करून एकादी सुंदर बालिका येतांना दिसावी, त्याप्रमाणें तांबे यांच्या कवितेंत ललित शब्दांनीं रंगविलेली रेखीव वर्णन-शैली पहावयास मिळते. ' रुणुझुणु ये ' या कवितेंतील शब्दसौंदर्य व वत्सलरस तर असामान्य आहे. त्याचा एक नमुना पहा — ' रुणुझुणु ये, रुणुझुणु ये झणकारित वाळा ! लुडलुडलुड दुडदुडदुडु ठुमकत ये बाळा ! " बालभास्कराच्या उदय-कालाचें वर्णन आरंभीं करून एक माता आपल्या बाळाला उठवितांना म्हणते, " जागति बघ चिऊकाऊ । लागति घरट्यांत गाऊं । डोलति तरु, लागति करुं ते हरिभजनाला । जागति गोठ्यांत गाइ,। पाजति वत्सांस पाहिं । ये रांगे ! कळ लागे माझिया स्तनांला ! "

' आनंदीआनंद ' या कवितेचा अणुरेणु आशावादानें भरलेला आहे. त्याला योग्य अशीच शब्दरचना कवीनें किती कौशल्यानें केली आहे, पहा—" आनन्दी आनन्द मुलांनो, आनन्दी आनन्द । चहूकडे दश-

दिशीं दाटला आनन्दी आनन्द ॥ फुलावरुनिया फुलावरि सुखें फुलपाखरुं ज्यापरी झुले, । तसें झुलाया तुम्हां उधळिलीं प्रभुजीनें चहुबाजू फुलें । म्हणुनी उडतां बागडतां । गरगरगर मण्डल धरितां । सलील हांसत गुण-गुणतां । वस्तुमात्र आनन्द दे, तुम्हां काय जगाचे फन्दू ? ''

' पुंगीवाला ' हें एक प्रदीर्घ कथा-काव्य आहे. त्यांत १११ श्लोक असले, तरी ते सुबोध, धावते व आकर्षक आहेत. पुंगीच्या जोरावर त्यानें गांवांतील उंदीर नदीकडे नेले, पुढें त्यानेंच इनाम न मिळाल्यामुळें गांवांतील मुलेंहि पुंगीच्या गुंगीनें गुहेकडे नेलीं, ही कथा अर्थानुसारी ध्वनीनें कवि कशी कथन करतो पहा—

" झटपट पटपट पाय आपटत, पुटपुट करित मुखानें, । खटपट वटवट टाकुनि चटचट टाळ्या पिटित करानें । नाचत भरभर मुलें चिमुकलीं निघतीं आनंदानें, । गरगर फिरती मधुर पांखरें जशी उधळतां दाणे । "

सुरेख वर्णनशैली

त्या पुंगीवाल्याचें शब्द-चित्र तांबे यांनीं बारकाईनें रेखाटलें आहे. तें असें—" बघति टकमक हे सकल नयन काय ? मूक व्हाया काय ह्या मुखा होय ? कुठुनि येई ही मूर्ति अति विचित्र ? कोण रेखाटूं शके इचें चित्र ? ॥ रंगीबेरंगी झगा पायघोळ । लाल पिवळा अति सैल, पडे झोळ । अंगकाठी किती रोड उन्च काळी, । उरीं केसाची दाट झुले जाळी । तीक्ष्ण लोचन अंगार पेटतात, । मिशा दाढी उभयतां भेटतात; अधिच त्याचें भाल तें भव्य मोठें । वरी भस्माचे ओढले फराटे । शेन्दुराचा वरि तिलक रसरशीत, । नयनिं तिसऱ्या जणुं अग्नि धगधगीत । दोन्हि कानीं रुद्राक्ष डोलतात, रुळे स्फटिकाची । माळ ही गळ्यांत " ॥

निसर्गाचीं शब्द-चित्रें

खेड्यांतील निसर्गाचें वर्णन ' गुराख्याचें गाणें 'मध्यें बहारीचें आहे; आणि त्याहून आहे त्या गुराख्याच्या समाधानी मनःस्थितीचें वर्णन. गुराखी आपला जीवन-क्रम सांगतांना म्हणतो, " तृषा लागतां नीर

झऱ्याचें ओंजळीनें मी पितों । क्षुधा लागतां कांदाभाकर यथेच्छ मी जेवीतों । फिरतां फिरतां करवंदें हीं तोडुनि मी भक्षितों । काडीनें मी काटे दाबुनि बोरेंही तोडितों । धनिका ताट रुप्याचें जरी । पांचहि पक्वान्नें त्यावरी, । नाहीं गोडि मुखाला परी. । गाईसङ्गें हिण्डुनि रानीं थकुनि सुखें जेवितों । जाडेंभरडें खाउनि धनिकाहूनि अधिक तोषतों. । ”

गुराख्याची संतुष्ट वृत्ति अशी कीं, त्याला काळी घोंगडीच आवडते, भरजरी मंदिल नव्हे. कोणाचा बांधलेला नाहीं, नोकर नाहीं, गुलाम नाहीं, असा तो गुराखी आपल्या सुखाची गुरुकिल्ली सांगतो, “ समाधान हा परिस अहा ! मज रानांतचि लाभतो । दुःखाच्या लोहास लाविता सुखसोनें बनवितो. । ” इंग्रजींतील ‘ चक्कीवाल्या’ची ही किती सुंदर प्रतिकृति आहे !

प्रभातकाळचें मनोहर दृश्य ‘ सोन्याची घेउनि करिं झारी ’मध्यें तांबे यांनीं रंगविलें आहे. तसेंच वर्णन ‘ रासमंडळ–गोपीचंदन ’ या कवितेंतहि त्यांनीं केलें आहे. तें असें—“ पिवळें ताम्बुस ऊन कोवळें पसरे चहुफेर, । ओढा नेई सोनें वाटे वाहुनिया दूर. । झाडांनीं किति मुगुट घातले डोकिस सोनेरी, । अहाहा ! पहा तर सोन्याचा गोळा तो क्षितिजीं । ” उषःकालीं आकाशांत उंच उंच भराऱ्या मारणाऱ्या पांखरांचीं शब्द-चित्रें तांबे यांची लेखणी किती कुशलतेनें काढते पहा— “ सोनेरी मखमली रुपेरी पङ्ख कितीकांचे, । रङ्ग किती वर तऱ्हेतऱ्हेचे इन्द्रधनुष्याचे । अशीं अचल फुलपाखरें फुलें साळिस जणु फुलती । साळीवर झोपली जणू का पाळण्यांत झुलती. । झुळकन् मुळकन् इकडुनि तिकडे किति दुसरी उडती, । हिरेमाणिकेंपाचू फुटुनी पङ्खचि गरगरती । उडूं, बागडूं, नाचूं, गरगर फिरूं चला मौजें । ”

रात्रींचें वर्णन करतां करतां तांबे यांनीं समाजांतील वैषम्य ‘ मार्ग-प्रतीक्षा’ या कवितेंत किती मार्मिकतेनें सूचित केलें आहे. “ धनिक सुन्दरी रम्य मन्दिरीं । मंचकावरी मुदित अन्तरीं. । कृषक–योषिता काम सारुनी । निजति तान्हुलें जवळ घेऊनी । ” हीं दोन दृश्यें भांडवलवाले व कामकरी या दोन ध्रुवांचें दर्शन घडवीत नाहींत काय ?

व्यक्तींचीं शब्द-चित्रें

'नदितिरीं उभी' असणाऱ्या स्त्रीची मूर्ति तांबे यांनीं मोजक्या शब्दांनीं कशी कोरली आहे, पहा—" नदितिरीं उभीं ती दाट तृणीं। आर्द्र वस्त्र ठिबके चरणीं.। नयन नभीं, कर दोन्ही जुळले। केशपाश उरिं पाठीं रुळले। तुफान हृदयीं. घोर उसळले। ही पसरे छाया मुखिं नयनीं। बघति तुङ् गिरि घेरा घालुनि। थिजले तरुवर तिला पाहुनी। स्थिरावले ढग पळतां गगनीं। डोकावि बालरवि ढगांतुनी।"

तसेंच सुरेख वर्णन 'घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी' या काव्यांतहि आहे. नदींत घागर भरली तरी स्त्रीचें लक्ष भलतीकडेच होतें. त्यावेळचें दृश्य रंगवितांना कवि म्हणतो, "घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी-। न दिसे तुज न पडे श्रवणीं ? पदर गळाला, उडे वायुवर, । कुरळे उडती केसहि भुरभुर प्रमदे, बघ त्या सावर आवर-कां उभी प्रवाहीं शून्य मनीं ?" तिला वाटतें, आपण ज्याची वाट बघत आहों, तो प्रियकरच आला. पण त्याच्या आगमनाच्या खुणा ज्या तिला वाटतात त्या निसर्गाच्याच लीला असतात. "पाउल नच तें, शेत सळसळे। शब्द न मानवि, वारा बोले। शीळ न वायुच वंशीं खेळे। कां विरघळशी भ्रमिं फिरफिरुनी ?"

कल्पनांमागून कल्पना चालवून व विविध अलंकारांनीं आपली कविता नटवून तांबे एका सुंदर स्त्रीचें वर्णन किती मनोवेधक करतात, हें "तूं कवण जगांतील ललना ?" या कवनामध्यें पहावयास सांपडतें. ते एका सुंदरीस पाहून प्रश्न करतात, "बालकल्पनासृष्टींतुनि का अवतरलीस या भुवना ?। गन्धर्वाच्या सुरसृष्टीमधिं पावलीस का जनना ?। का नन्दन-वनकुसुम पातलिस रिझवाया मम नयनां ?। सुर-जान्हविंतिल कमलगन्ध का मूर्त येशि मम सदना ? आनन्दच का शरीर धरूनी आलिस विहसित वदना ?।" ही मुलाची कल्पना ? कीं गंधर्वाची तान ? कीं नंदनवनां-तील कळी ? कीं आकाशगंगेंतील कमल-गंध ? कीं मूर्तिमंत आनंद-असे संदेहामागून संदेह कवीच्या मनांत उत्पन्न होतात.

'तीनी सांजा' या कवितेंतील एका कडव्यांत सहा उपमा कवीनें गुंफल्या आहेत. त्या अशा—"नाद जसा वेणूंत, रस जसा सुंदर कवनांत,

गन्ध जसा सुमनांत, रस जसा बघ या द्राक्षांत, । पाणि जसें मोत्यांत, मनोहर वर्ण सुवर्णांत । हृदयीं मी साठवी तुज तसा जीवित जों मजला । ”

अढळ आशावाद

खिन्न मनाला आशा व आनंद देणारी तांबे यांची एक सुविख्यात कविता आहे. निसर्गातील नाना दृश्यांतून आशावादाचा सूर त्यांनीं पुढील-प्रमाणें काढला आहे, “ घन तमीं शुक्र बघ राज्य करी, । रे खिन्न मना, बघ जरा तरी । फूल हसे काट्यांत बघ कसें, । काळ्या ढगिं बघ तेज रस-रसतें, तीव्र हिमांतुनि वसन्तहि हसे । रे उघड नयन, काळ पळे दुरी. ॥” काळोखांतहि तारा चमकतो, काट्यांतहि फूल फुलतें, ढगांतहि वीज तळ-पते, हेमंतानंतर वसंत येतो, असें सांगून कवि म्हणतो, “ फूल गळे, फळ गोड जाहलें, । बीज नुरे, डौलांत तरु डुले; । तेल जळे, बघ ज्योत पाजळे। का, मरणिं अमरता ही न खरी ? ” ॥ झाडावरील फूल सुकलें तरी तेथें फळ येतें, आंब्याची कोय नाहींशी झाली, तरी तिच्यांतूनच झाड वाढतें, तेल येंवाथेंवानें संपतें पण तेज पसरतें आणि मरणानें माणूस दृष्टिआड झाला तरी कीर्तीनें तो अमर होतो हा संदेश किती आशावादी आहे ? केशवसुत–गडकरी–यशवंत आदि अर्वाचीन कवींच्या साऱ्या काव्यांतून निराशेचाच सूर प्रामुख्यानें ऐकू येतो, पण तांबे यांचा काव्यात्म जीव कधींच निराश होत नाहीं. तो निसर्गातून आशावादाचें रम्य गीतच ऐकतो व इतरांना ऐकवितो हें विशेष. स्वतःच्या हृदयांत आनंदाचा तंबोरा लागलेला असला, म्हणजे बाहेरील अंधार–उजेड किंवा उन्हाळा–पाव-साळा अथवा सुख–दुःख ध्यानींसुद्धां येत नाहींत, या सिद्धांताचा हा पुरा-वाच नव्हे काय ?

वीराचा शुद्ध प्रणय

शुद्ध, निर्मळ व रसरशीत प्रणयाचें सभ्य, संयमित व कलापूर्ण चित्रण तांबे यांनीं आपल्या अनेक शब्द–मंजुल, कल्पना–सुंदर व भाव-मधुर गीतां-मध्यें केलेलें आहे. रजपूत रमणींच्या प्रणय-भावना रंगविण्यांत ते चतुर आहेत. रणांगणावर शौर्य गाजविणाऱ्या वीर–शिरोमणीची वाट पहाणारी

एक प्रिया आहे. तिच्या मनांतील भाव–लहरी ' बिजली जाशि चमके स्वारी। ' या कवनामध्यें उमटलेल्या आहेत. त्या स्त्रीला आपल्या वीर पतीचा अभिमान किती वाटतो, पहा—" जळ झुलें जसें वाऱ्यानें। तिकडील तशा शब्दानें। काशि बाइ झुलति हीं सैन्यें। देईल विजय मल्हारी"॥ अशा रणशूर विजयी पतीला " सोन्याच्या तबकामाजीं रत्नदीप उजळुनी " ओवाळण्यासाठीं ती सिद्ध आहे.

अशीच प्रतीक्षा करणारी दुसरी एक रमणी 'स्वारी कशी येईल ?' असें चिंतन करतां करतां गुणगुणते, " कुणास ठाऊक कवणे रूपीं येइल माझ्या घरीं ?। कशी तयारी करूं ? अङ्गणीं घालु कशी हातरी ? " असा संभ्रम उत्पन्न झाला असतांना तिला एकेक कल्पना सुचतात, त्या अशा– " का वाऱ्यावरि परिमळापरी अवतरेल तो तरी ? का ढगावरी गर्जनेपरी येइल भूमीवरी ?। काय विजेवरि लखलख येइल जाशि सोन्याची सरी ? नदीपुरावरि येइल का तो तरल तरङ्गापरी ?। घन राइमधिल का गोड लकेरीपरी ? का स्मितसा निजल्या बाल–कपोलावरी ? का मधुसा फुलल्या कमलदलाभीतरी। यापरि करितां विचार साजणि, होतें मी घाबरी। " किती कोमल शब्दांत किती रमणीय कल्पना !

थोर कुलांतील एक रजपूत वीर व त्याची रमणी यांचा हृदयंगम संवाद " मुशाफिर आम्ही ' या कवनामध्यें कवीनें गोवला आहे. तो वीर रानावनांत राहतो, पण त्या वनवासांतच प्रेमाचें सुख भोगण्यास ती स्त्री तयार असते–आणि म्हणून म्हणते, " तुम्हांविण अन्न। जरी अन्न अमृत,। विषाहुनि कडु इथें खचित। तुम्हांविण शय्या। शय्या कुसुमांची। रुते मज कांट्याहुनि साची.। " तेव्हां तो तिला बजावतो, " जिवाला धोका। धोका रानांत। नीट हें आणी ध्यानांत.। " पण तिचा निर्धार असा कीं, " तुम्हांविण जगणें,। जगणें मृत्युच कीं। तयाहुनि दुस्सह या लोकीं। "

" राजकन्या आणि तिची दासी " हें तर एक प्रेम–मधुर असें नाट्य-गीतच आहे. जवाहराचा व्यापारी म्हणून खैरपूरचा राजपुत्र राजकन्येच्या

राजवाड्यांत आला व तिला पाहून गेला, असा नाट्य-प्रसंग कवीनें योजला आहे. त्यांच्या दृष्ट-भेटीनंतर राजकन्या व दासी यांचा जो लाडिक व लाजरा संवाद झाला, तो या गीतांत खुबीनें वर्णिलेला आहे, " कंवराणीजी, किती लपवितां मन ? किति हीं सोंगं ? " असें दासीनें मिष्किलपणानें विचारल्यावर " काय पुन्हा ते खैर–तेच–त्या–का–कूवरजी ते " असा राजकन्येचा आनंदामुळें, लज्जेमुळें संभ्रम झाल्याचें या नाट्य-गीताचे शेवटीं दाखविलें आहे. ' स्वयंवर ' नाटकांतील रुक्मिणी व तिची दासी यांच्या संवादाची स्मृति होण्याइतका हा काव्य-रूप संवाद हृद्य व रम्य आहे.

स्त्रीविषयीं आदरभाव

तांबे यांची प्रेमाची कल्पना निर्मल आहे. स्त्रीजातीकडे ते आदरानें पहातात. पुरुषांची खाण म्हणजे स्त्री. पुरुषाचा स्वभाव घडविण्याचें कार्य माताच करते. चंद्राची कांति, रत्नाचें तेज, फुलाची कोमलता–या सर्व गुणांची गंगोत्री म्हणजे स्त्री. असा नारी-महिमा तांबे पुढील वेचक शब्दांनीं गातात. " भयचकित नमावें तुज रमणी, । जन कसे तुडविती तुज चरणीं ? । महाकवी, तत्त्वज्ञ, भूपती, । समर--धुरन्धर वीर धीरगति । स्थितप्रज्ञ हरि उरीं कोण्डिती, प्रसव तयांचा तूं जननी । भूत निघाला तव उदरांतुन । वर्तमान घे अंकीं लोळण, । भविष्य पाही मुली, रात्रदिन । तव हाकेची वाट मनी । तुझ्या कान्तिनें चन्द्र झळझळे । फुला फूलपण, मुली तुजमुळें, । रत्नीं राग तुझा गे उजळे, । तुझ्यास्तवच हीं प्रिय भगिनी । "

स्वतःच्या पत्नीवर कवि पूर्ण संतुष्ट आहे—तिचा त्याला अभिमान-सुद्धां आहे. आपली पत्नी काळी आहे असें लोक म्हणतात, हें ध्यानीं घेऊन कवि उत्तर देतो, " जन म्हणति सावळी तुज सगळे, । करुणार्द्र विचारे ते अन्धळे।' आपल्या अर्धांगीच्या काळेपणाची कैफियत देण्यासाठीं कवि एक पौराणिक पुरावा देतो; तो असा—" अगाध सुंदर यमुना काळी । तटीं गर्द झाडाच्या ओळी, । वेडा झाला तो वनमाळी,

उजळिते मनोमल श्याम जळें ॥ " काळ्या यमुनेच्या कांठी खेळणाऱ्या श्रीकृष्णानें कैक मनांचे कोपरे उजळले. निसर्गाचा दाखलाहि तसाच. काळा ढग द्रवतो म्हणून धनधान्य मानवाला मिळतें. हें सांगतांना कवि म्हणतो, " काळा काळा मेघ सुंदरी, । भाग्यहीन जो मोहे न परी, । धनधान्याची समृद्धि उदरीं । मरतील बापडे जरि न वळे ॥ "

ही बचावाची भूमिका सोडून कवि 'सहज तुशी हालचाल' या काव्यांत आपल्या पत्नीविषयींचा अभिमान मोठ्या गौरवानें गातो, तो असा— " सहज तुझी हालचाल मन्त्रें जणूं मोहिते । एकवार बघ हासुन डळमळेल सिंहासन । तळमळतिल मनि सुरगण हास्यास्तव खास ते ! ही अपूर्व शक्ति सगुण । झाडितसे मम अङ्गण । हें माझें भाग्य बघुन जळफळतिल देव ते ॥ " राजेच काय, पण देवहि हेवा करतील, असें माझ्या पत्नीचें थोरपण आहे अशी ग्वाही कवि देतो. बाह्यसौंदर्यापेक्षां अंतःसौंदर्याचेच पूजक तांबे आहेत.

नाट्य-प्रसंगाचें चित्रण

तांबे यांचें काव्य म्हणजे मधानें भरलेले घट. झऱ्यावर सायंकाळीं पाणी भरण्यास गेलेली तरुणी कोठें दिसेनाशी झाली—तिची घागर मात्र रिकामी राहिलेली आहे, अशा नाट्य—प्रसंगाचें चित्रण करतांना तांबे म्हणतात, "घट तिचा रिकामा झऱ्यावरी । त्या चुम्बिति नाचुनि जळ लहरी ॥" संध्याकाळच्या वेळीं शेतांतील कामकरिणी कशा विसांवा घेत बसतात याचें शब्द-चित्र पुढील कडव्यांत काढलें आहे—" पलीकडे त्या करुनि कापणी । बसल्या बाया हुरुप करोनी । विनोद करिती रमती हसुनी । जा पहा तिथें कुणि ही भ्रमरी ॥ "

नागरी ललनांची देव-दर्शनाला जाण्याची वेळ म्हणजे संध्याकाळ. त्यांचेंहि शब्द-चित्र पुढील शब्द-पंक्तींत काढलेलें आहे—" तांदूळ पदरीं बिल्वदळ करीं । चरण क्षाळुनि जवळ तळ्यावरि । जमति शिवालयिं पोक्त सुंदरी । हिरकणी बघा ही त्यांत तरी ॥ " वेळूच्या बेटांतून प्रियकराची शीळ ऐकूं आली, म्हणून ही तिकडे गेली, हें सांगून कवितेची

सूचक समाप्ति केली आहे. ती अशी—"पलीकडे वेळूंची जाळी । तेथें वारा घुडगुस घाली । शीळ गोड तीमधुनि निघाली । ही झुळुक हरपली लकिरीपरी ॥" संगीताच्या लकेरीप्रमाणें ती दिसेनाशी झाली.

दुसरा एक घट दुधानें भरलेला आहे व त्यांत प्रेमाची गोडी मिसळलेली आहे. कवि म्हणतो, "तें दूध तुझ्या त्या घटांतलें । कां अधिक गोड लागे न कळे ॥ साईहूनि मउमउ बोटें ती । झुरुमुरु झुरुमुरु धार काढिती, । रुणुझुणु कंकण करिती गीतीं, । का गान मनांतील त्यांत मिळे ?" गाण्याची गोडी दुधांत मिसळलेली !

प्रेमाचें अद्वैत तत्त्वज्ञान

प्रेम स्त्री–पुरुषांमध्यें अद्वैत उत्पन्न करतें. दोघांचीहि सुखदुःखें समान होतात. कारण एकावर, तर कार्य दुसऱ्यावर, असा असंगति अलंकार साधून तांबे यांनीं १९२० सालीं, ४६ वे वर्षीं, एक अतिरम्य भावगीत रचलें; तें असें—"कुणि कोडें माझें उकलिल का ? कुणि शास्त्री रहस्य कळविल का ?। हृदयिं तुझ्या सखि दीप पाजळे, । प्रभा मुखावरि माझ्या उजळे, । नव रत्नें तूं तूज भूषविलें, मन्मन खुललें आंतिल कां ? । गुलाब माझ्या हृदयीं फुलला । रंग तुझ्या गालावर खुलला । काटा माझ्या पायीं रुतला, । शूल तुझ्या उरीं कोमल कां ? । माझ्या शिरिं दग निळा डवरला, । तुझ्या नयनिं पाऊस खळखळला । शरच्चंद्र या हृदयीं उगवला, । प्रभा तुझ्या उरिं शीतल कां ? । मद्याचा मी प्यालों प्याला । प्रिये, तयाचा मद तुज आला; । कुणीं जखडिलें दोन जिवांला । मंत्र--बंधनीं केवळ कां ? । "

यांतील शब्द–सौंदर्य, अलंकार–वैभव व भाव–माधुर्य किती मनोहर आहे !

तसेंच दुसरें शृंगारपूर्ण नाट्य–गीत म्हणजे 'डोळे हे.' ध्वनि–मुद्रिकेमुळें या गीताचा प्रसार खूप झाला व त्यानें तरुण हृदयांना वेडें केलें. एका तरुणीची सलज्ज स्थिति किती थोडक्यांत कवीनें चितारली आहे, पहा—"डोळे हे जुल्मि गडे रोखुनी मज पाहूं नका ! जादुगिरी त्यांत

पुरी येथ उभे राहूं नका । घालुं कशी कशिदा मी ? होति किति सांगूं चुका ! बोचे सुइ फिरफिरुनी वेळ सख्या, जाय फुका । खळबळ किती होय मनीं ! हसतिल मज सर्व जणी; । येतिल त्या सन्धि बघुनि । आग उगा लावुं नका ! " महाराष्ट्रांतील मध्यमवर्गीय तरुण स्त्रीचा दिनक्रम व तिच्या सलज्ज प्रेमलीला यांचें हें चित्रण किती सूचक, संयमित व आल्हादक आहे, नाहीं ?

शृंगार व वत्सल या रसांचा संगम करणारें नाट्य–गीत म्हणजे 'गट्टी' हें होय. बहिणीचें लपलेलें प्रेम भाऊ तिच्या साध्यासाध्या शब्दांतून कसें हुडकून काढतो तें पहाण्यासारखें आहे. " तुझ्या गळा । माझ्या गळां । गुम्फूं मोत्यांच्या माळा—" " ताई, आणखि कोणाला ? " । चल रे दादा चहाटळा ! " " तुज कण्ठीं । मज अंगठी । " आणखि गोऽफ कोणाला ? " " वेड लागलें दादाला ! " " मला कुणाचें ? ताईला " । " तुज पगडी । मज चिरडी " । " आणाखि शेला कोणाला ? " " दादा, सांगूं बाबाला ? " " सांग तिकडल्या स्वारीला ! " असा हा संवाद मौजेचा आहे.

राष्ट्र-प्रेमाची ललकारी

तांबे यांच्या संवेदनक्षम हृदयांतून प्रेमाच्या अनेक धारा अखंड वाहात. त्या केवळ सांसारिक प्रेमाच्या असत असें नव्हे. स्त्री, मुलें, मित्र इत्यादी जिव्हाळ्याच्या व्यक्तीवर तर ते प्रेमाचा अभिषेक करीतच; पण भूमाता व जगन्माता यांच्याविषयींहि त्यांच्या अंतःकरणांत अगाध प्रेम असे. प्रेमाच्या नाना जाति त्यांच्या काव्यांत भरलेल्या आहेत. १९२० सालीं म. गांधींनीं राष्ट्रांत असहकारितेचें अभिनव, उदात्त व स्फूर्तिदायक असें युद्ध पुकारलें. त्याच्या नौबती ऐकून तांबे यांचें चिरतरुण अंतःकरण रोमांचित झालें. राष्ट्रीय संस्थेंत काम करण्याच्या उद्देशानें ते पुण्यास आले होते. पुढें देहानें नसलें तरी अंतःकरणानें ते राष्ट्रीय आंदोलनांत भाग घेत असत. त्या आंदोलनांतील भावनापूर्ण व उदात्त अंगांचें त्यांना आकर्षण होतें. त्याच्याशीं समरस होऊन त्यांनीं चार-पांच काव्यें रचलीं

आहेत. ' कोण रोधील ? ' या कवितेंत गांधीजींच्या आत्मबलाला उद्देशून ते म्हणतात, " या भविष्याचिया दिव्य कारागिरा । कोण रोधील ? । दे कोण कर सागरा ? ॥ " शस्त्रसंपन्न ब्रिटिश साम्राज्यसत्तेला ते बजावतात, " ज्यावरी भार तव, ज्यावरी गर्व तव । विफल तोफा तुझ्या, पलटणी सर्व तव । विफल बलदर्प तव, यांत का शर्व तव । उघड लोचन, पहा दूर राजा, जरा ॥ " दूरदृष्टीनें पुढील भविष्य काय दिसेल, हें सांगण्याचा अधिकार कवीचा आहे. कारण " कविस्तु क्रांतदर्शी. " त्या दिव्यचक्षूनें पाहून कवि भविष्य सांगतो, " तेथ त्या रत्नमय दिव्य सिंहासनीं । लखलखे भरतभूजननि बघ विजयिनी । प्रणय, नय, सत्य हे सज्ज गण रक्षणी । बघ भविष्याचिया दिव्य त्या मन्दिरा.' ॥ स्वातंत्र्याच्या दिव्य सिंहासनावर विराजलेली भारतमाता पाहून तांबे यांना किती आनंद झाला असता !

सत्याग्रही सेनेला चिरडून टाकण्यासाठीं ब्रिटिश सरकारानें दडपशाहीची पराकाष्ठा केली. पण या रावणी उपायांनीं गांधीजींचा रामबाण हटणार नाहीं, हें सांगतांना तांबे यांनीं कांहीं पौराणिक दाखले दिले व विचारलें, " उखळांत दिलें शिर, काय अतां ? । दणकवा मुसळ ढोंग न करितां । हरिश्चन्द्र तव सुत सत्याग्रही । सदा अहिंसारत तो निग्रही, । अजत्व मारा रिपुचा साही । परि हरीस आणी मानवता. ॥ " चिलया, प्रल्हाद इत्यादि सत्याग्रही बाल-वीरांचा इतिहास सांगून त्या सर्वांचें तेज गांधीजींत उतरलें आहे, असें कवि म्हणतो, " ह्या बाळांचा आत्मा पसरे । युगान्तरीं, तो आतां उतरे, । एकवट्टनि ' मोहनीं ' अवतरे -। तूं वांझ न गे माझी माता । "

तृणाच्या पात्यांत खड्ग

गांधीजींची प्रतिकारशाली चळवळ सुरू झाली, तेव्हां परतंत्र, भयभीत, निराश व असहाय्य जनतेला केवढा धीर आला, किती आशा वाटली, कोणती स्फूर्ति संचरली याचें वर्णन तांबे असें करतात, " वाटलें नाथ हो, तुम्ही उतरतां खालीं । दे असहकारिता हाक तुम्हां ज्या कालीं । हम्बरडा फोडी आर्त महात्मा जेव्हां । आघात झेलिले घोर

नं. ... ९२८५५ ८/३/५३

उरावर तेव्हां । त्या यज्ञें द्रवुनी गमे धावला देवा । ऐकिली आर्त किङ्काळी ॥ वाटलें उघडलीं द्वारें तीं स्वर्गाचीं, । वाटलें धावली माउलि ती गरिबांची । वाटलें पळालीं सकळ सङ्कटें साची । गरिबांचा आला वाली " ॥

निःशस्त्रांचा हा प्रतिकार बलाढ्य साम्राज्यसत्तेला काय करूं शकणार ? अशा शंकाकुल चिंतातुरांना उत्तर ' तृणाचें पातें ' या कवितेंत तांबे यांनीं दिलें आहे, तें असें—" तृणांचें पातें । हालतें डोलतें वातें ॥ झगा मखमली हिरवागार । मुकुटहि रत्नजडित छान्दार । तुरा तयावर झुपकेदार । हलवि हृदयातें ॥ यावरि तेज कसें रसरसतें । जीवन नसांतुनी थबथबतें । चिमणें इन्द्रचाप थयथयतें, दंवीं जइं न्हातें. ॥ मग या पायिं कसें तुडवीतां ? खड्ग यांतलें उद्यत बघतां । भरे कापरें स्मरतां सत्ता । झुलवि जी यांतें ॥" गवताचें पातें म्हणजे तरवारीचें पातें आहे असा अनुभव ब्रिटिश सत्तेला अखेर आलाच. कारण, " यांतुनिं कृष्ण मुरलि वाजवितो । वामन बलीस यांत दडवितो । यांतुनि नारसिंह गुरगुरतो । भ्या रे यातें" ॥ असें कवि सांगतो. सत्यादि गुणांच्या मागें जनता धावते व जनतेचें सामर्थ्य कोणाहि सम्राटाला भारी होतें, हा अनुभव इतिहासांत पुनः एकदां नोंदला गेला.

लो. टिळकांच्या निधनाची वार्ता ऐकतांच तांबे यांचें हृदय शोकानें उचंबळलें. ' लोकमान्यांस ' या काव्यांत ते त्यांच्या कार्याची थोरवी एका रूपकानें वर्णितात, ती अशी—" राजेराजेश्वरा हो दयाळा, । तातडी कां असे हो निघालां ? । अन्धकारीं पहातां नभांत । किर्र बोले अजूनहि रात, । देहकष्टामधीं रोड झाला, । रात्र सारी न निद्रा तुम्हांला । कुक्कुटाचा नसे शब्द झाला । पाहटेचा न तारा उदेला; । केवि ऊठाउठी हो निघालां ? । काय झालें असें हो दयाळा ? । हाक कोणी दिली हो तुम्हांला ? । तातडी कां असें हो निघाला ? " ॥

झांशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या समाधीवर तांबे यांनीं चार कडव्यांचें एक गीत रचलें आहे. त्यांतून त्यांचा पूर्वजांविषयींचा अभिमान प्रगट होतो. ' रे हिंदबांधवा, थांब या स्थळीं अश्रु दोन ढाळीं ' असें

सांगून ते म्हणतात, "मिळतील इथें शाहीर, । लवतिल माना वीर । तरु सारे ढाळितिल नीर, । ह्या दगडां फुटतिल जिभा । कथाया कथा सकळ काळीं" ॥

वीररसाचा आविष्कार

कोमल प्रेमगीतांची सनई वाजविण्यांत तांबे जितके सराईत होते, तितकेच आव्हान देणारीं, स्फुरण चढविणारीं, चैतन्य संचरविणारीं रणगीतें रचण्यांतहि ते चतुर होते. केशवसुतांची 'तुतारी' किंवा गोविंदाग्रजांचा 'दसरा' यांच्याइतकेंच आवेशपूर्ण व स्फूर्तिदायक 'रुद्रास आवाहन' हें तांबे यांचें काव्य आहे. वीररसाला साजेसा शब्द–शस्त्रांचा संभार त्यांच्या या कवितेनें धारण केला आहे. ऐरणीवरील तापल्या लोखंडावर घणाचे घाव बसले असतांना जशा अग्नीच्या ठिणग्या उडतात, तसे त्यांचे या कवितेंतील रसरशीत शब्द उचंबळत आहेत. १९२० सालीं सर्व राष्ट्रानें रौद्र रूप धारण केलें असतां कवीहि रुद्रास आपल्या कवितेच्या द्वारें पाचारण करतांना म्हणतो, "डमडमत डमरु ये, खणखणत शूल ये, शंख फुंकीत ये येइ रुद्रा ! प्रलयघनभैरवा, करित कर्कश रवा क्रूर विक्राळ घे क्रुद्ध मुद्रा ! ॥ कडकडा फोड नभ, उडव उडुमक्षिका । खडबडवि दिग्गजां तुडव रविमालिका । माण्ड वादळ, उधळ गिरि जशी मृत्तिका–खवळवी चहूकडे या समुद्रां ! पाड सिंहासनें दुष्ट हीं पालथी, । ओढ हत्तीवरूनि मत्त नृप खालती, । मुकुट रंकास दे, करिट भूपाप्रती–झाड खट्खट तुझे खड्ग क्षुद्रां" ॥ तसेंच 'घाबरूं नको बावरूं नको' या कवितेंत त्रस्त जनतेला धीर देतांना कवि म्हणतो, "जरी दिशांचे तट ढासळती, । नभ–सौधाचे स्तंभ कडाडति, । हंड्याझुंबर तडतड पडती । तरि हे वीरा, डगमगूं नको ! निर्वाणीचे काढ सुदर्शन । तळघरांत जे ठेलें लपवून । मार नेम रे अचूक रोखून । तूं जयश्रीस अंतरूं नको ॥"

शाश्वत तत्त्वांचा उद्गार

या राष्ट्रीय आंदोलनाच्या काळांत तांबे यांनीं ज्या कविता रचल्या, त्यांतील बहुतेकामध्यें निर्भयतेचा व प्रतिकाराचा संदेश, प्रगटपणें वा पर्या-

यानें, दिलेला आढळतो. त्यांतील तत्त्वे शाश्वत तर खरेंच, पण त्या वेळेस तें अत्यंत समयोचितहि होतें. एका कवितेंत ते म्हणतात, " जन पळभर म्हणतिल ' हाय हाय ! ' मी जातां राहिल कार्य काय ? । सूर्य तळपतिल, चंद्र झळकतिल । तारे अपुला क्रम आचरितिल । असेच वारे पुढें वाहतिल, । होईल कांही अंतराय ? । सखे-सोयरे डोळे पुसतिल । पुन्हा आपल्या कार्मी लागतिल । उठतिल, बसतिल, हसुनि खिदळतिल,-। मी जातां त्यांचें काय जाय ? । रामकृष्णही आले, गेले । त्यांविण जग का ओसचि पडलें ? । कुणी सदोदित सुतक धरिलें ? । मग काय अटकलें मजशिवाय ? ।

याच तत्त्वाचा पुरस्कार करणारी त्यांची एक कविता लोकप्रिय व चिरंजीव झाली आहे. ती म्हणजे—" मरणांत खरोखर जग जगतें; । अधिं मरण, अमरपण ये मग तें । सर्वस्वाचें दान अधी करि । सर्वस्वच ये स्वयें तुझ्या घरिं । सर्वस्वाचा यज्ञ करीं तरि । रे ! स्वयें सैल बन्धन पडतें । सीता सति यज्ञीं दे निजबळि । उजळुनि ये सोन्याची पुतळी, । बळी देउनी बळी हो बळी । यज्ञेंच पुढें पाऊल पडतें । "

भक्ताची आळवणी

मातेप्रमाणेंच राष्ट्रमातेचें आणि राष्ट्रमातेप्रमाणेंच जगन्मातेचेंहि प्रेम तांबे यांच्या अंतःकरणांतून वहात असे. एका कवितेंत ते परमेश्वराच्या वात्सल्याचें वर्णन करतात, तें असें-"निजल्या तान्ह्यावरी माउली दृष्टि सारखी धरी । तिचा कलीजा पदरीं निजला । जिवापलीकडे जपे त्याजला । कुरवाळुनि चिमण्या राजाला चुम्बी वरचेवरी ॥ अशीच असशी त्रिभुवनजननी, । बघत झोपल्या मज का वरुनी ? सुखदुःखांचीं स्वप्नें बघुनी कौतुकशी का खरी ?"

त्रिभुवनजननीची करुणा भाकतांना पन्नाशी उलटलेले तांबे म्हणतात, " चरण कधीं का पाहिन आई ? त्रिभुवनजननी मुंगीची तुज काळजि, मग का माझी नाहीं ? ढळे ऊन, दिन उरला थोडा । मागमूसही घरचा नाहीं. थकले घोडे पाय न टाकी, कशि गत होइल आज अगाई ? "

' सर्व कांहीं ईश्वरानें भरलेलें आहे. ' त्याला कोणीं, काय अर्पण करावें ? तसें अर्पण करणें हा एक प्रकारचा उद्धटपणांच होईल, अशी भक्तिपूर्ण, विनम्र, निरहंकारी भावना तांबे यांनीं ' अनंत-स्तोत्र ' या कवितेंत व्यक्त केली आहे, ती अशी-मदीं त्या तुझें रूप गाऊं धजें, । स्वयंदीपका दीप दावूं सजें; । न द्यावा जिथें पाय तेथें दिला, । बहू लाजलों भान येतां मला. । " तरी पण कवीला एक वस्तु परमेश्वरास अर्पण करण्याजोगी आढळली. तेव्हां तो म्हणतो, "हरि, अर्पावें काय तुला मीं ?। धूप, दीप, जळ, फूल, फळ तुझें कसें तुलाच वहावें ? । मीपण मम मी म्हणें तेंच मी अतां अर्पितों भावें. "

अवीट गोडीचा मध

साठीच्या घरांत तांबे जाऊन पोहचले. त्यांच्या अंतःकरणांतील प्रतिभेचें मोहोळ सुकून गेलें. अशा स्थितींत १९३३ सालीं एका पुणेरी रसिकानें तांबे यांना लिहिलें कीं, एक रसाळ कविता लिहून पाठवा. तेव्हां उत्तरादाखल तांबे यांनीं रिकामे मधुघट' ही चार कडव्यांची कविता पाठविली. ' आता कविता रचतां येत नाहींत ' असें निवेदन करणारी ही कविताच एक करुणरम्य असें हृदयंगम काव्य झालें आहे. त्यांत त्यांच्या साऱ्या जीवनाचें कार्य जसें सामावलें आहे, तसेंच मृत्यूच्या छायेचेंहि स्वरूप रेखाटलेलें आहे. दोन्ही अवस्था सारख्याच ललित व भावनापूर्ण शब्दांनीं त्यांनीं रंगविलेल्या आहेत. तांबे यांच्या काव्य-घटांतील मधाची गोडी अवीट व अक्षय्य आहे. त्यांच्या काव्य-मंदिरावरील हा सुवर्ण-कळस समग्रच पुढें देतों:—

" मधु मागशिं माझ्या सख्या परी । मधुघटचि रिकामे पडति घरीं ! आजवरी कमळाच्या द्रोणीं । मधू पाजिला तुला भरोनी । सेवा ही पूर्वीची स्मरोनी । करि रोष न सखया, दया करीं ॥ नैवेद्याची एकच वाटी । अता दुधाची माझ्या गांठीं । देवपूजेस्तव ही कोरांटी । बाळगी अंगणीं कधी तरी ॥ तरुण-तरुणिंचीं सलज्ज कुजबुज । वृक्षझऱ्यांचें गूढ मधुर

गुज । संसाराचें मर्म हवें तुज, । मधु पिळण्या परि हें बळ न करीं । ढळला रे ढळला दिन सखया ? । सन्ध्याछांया भिवविति हृदया । अतां मधूचें नांव कासया ? । लागले नेत्र रे पैलतिरीं ॥ ”



'निसर्ग' हा इतर कवींच्या वर्णनाचा एक विषय असतो–पण अनेकांपैकीं एक; 'बालकवीं'च्या बाबतींत मात्र तो एकच एक विषय होता. त्यांची बहुतेक सर्वच कविता या एकमेव विषयाला वाहिलेली आहे. फार काय, बालकवींच्या काव्यांतून साकार झाला तो विषय म्हणजे निसर्ग आणि निसर्गानें वाङ्मयीन अवतार घेतला तो म्हणजे बाल–कवि असें म्हटलें तरी चालेल. ते निसर्ग पहात होते, नव्हे जगत होते. निसर्गाशीं बोलण्यांत, त्याची मैत्री जोडण्यांत, त्याच्याशीं एकजीव होण्यांत, त्यांचें सारें आयुष्य समाप्त झालें. त्यांच्या लेखणीवाटें जणुं निसर्गच अवतरत असे–आणि त्याचें नांव काव्य!



सौंदर्याचे पूजक

कवि कोण? जो प्रौढवयांतहि आपली बाल्यवृत्ति कायम ठेवतो तो! "प्रौढत्वीं निज शैशवासि जपणें बाणा कवीचा असे" अशी खूण केशवसुतांनीं सांगून ठेवली आहे. त्या कसोटीस बाल–कवीइतके दुसरें कोणीच उतरत नाहीं. त्यांची ती लडिवाळ भाषा, त्यांच्या त्या स्वच्छंदी

कल्पना आणि त्यांचा तो सृष्टिमातेशीं प्रेमळपणा यावरून बाल–कवि हे वृत्तीनें आमरण बालच राहिले होते हें उघड दिसतें. आजूबाजूला राजकीय आंदोलनाचे झंझावात सुटलेले असोत कीं सामाजिक क्रांतीचे वणवे पेटलेले असोत, बाल–कवींचें मन निसर्ग–प्रेमांतच गुंग ! त्याची महत्त्वाकांक्षा कोणती ? " सुमकोशीं आपोआप । क्षण घ्यावी साखर-झोप " फुलांच्या पुड्यांत फुलपांखराप्रमाणें पहुडावें हेंच त्यांच्या जीवनाचें अंतिम साध्य. ती झोप संपल्यावर तुम्ही काय करणार ? असें कोणी विचारलें, तर बाल–कवि लगेच सांगतात, " डोलताचि जागें व्हावें । हासतची गुंगत जावें । " डोलावें-बागडावें-गावें, अशी आनंदमय, स्वप्नमय, काव्यमय अभिलाषा बाल–कवींची होती. जगांत जें जें सुंदर असेल, त्याचे ते भोक्ते होते. म्हणून त्यांना सदैव वाटे, " सुंदरतेच्या सुमनांवरचें दंव चुंबुनि घ्यावें । चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हांत हिंडावें । "

खानदेशांतील त्रिमूर्ति

असें काव्यमय जीवन जगणारे बालकवि यांचें संपूर्ण नांव त्र्यंबक बापूजी ठोमरे. त्यांचा जन्म ता. १३ ऑगस्ट १८९० रोजीं खानदेशांतील धरणगांव येथें झाला. केशवसुत, विनायक व बालकवि ही आधुनिक काव्य–त्रिमूर्ति कान्हदेशाच्या कुशींतूनच जन्मली. बालकवींचे वडील फौजदार होते. त्यांच्या नोकरीच्या बदलीमुळें बालकवींचें बालपण खान-देशच्या अनेक खेड्यांत गेलें. त्यामुळें निसर्गाचे ठसे त्यांच्या कोमल मनावर उमटले. त्यांना दोन भाऊ व दोन बहिणी होत्या. पैकीं ज्येष्ठ बहीण जिजी यांनीं त्यांना काव्याची गोडी लावली, त्यांचेकडून संत–वाङ्मय वाचून घेतलें आणि त्यांनीं कविता केल्यावर त्यांना प्रोत्साहन दिलें. बालकवींनीं पहिली कविता लिहिली ती वयाचे दहावे वर्षीं–एका लग्नाच्या गडबडींत–तीहि निसर्ग–वर्णनपरच आहे. त्यांनीं लहानपणींच मोरोपंतांचें समग्र आर्याभारत वाचलें होतें. त्याचें अनुकरण करून त्यांनीं कांहीं आर्याहि रचल्या. फुलांचें वेड त्यांना लहानपणापासून असे. तसेंच ओढ्याच्या कांठीं तासन्तास ते बसत व सृष्टि-सौंदर्याचें आकंठपान करीत.

पहाटे उठून ते बागेंत जात, कळ्याफुलें निरखीत, तन्मय होत व क्षितिजावरील अरुणोदयाची शोभा चित्तांत सांठवीत.

कीर्तीचें कोंदण

एरंडोल येथें बालकवींचें मराठी शिक्षण झालें व धुळे येथें इंग्रजी शिक्षण सुरू झालें. वयाचे सोळावे वर्षीं एका राष्ट्रीय शाळेंत शिक्षकाचेंहि काम त्यांनीं केलें. एका 'वनवासी' कीर्तनकाराबरोबर दोन महिने राहून त्यांनीं उज्जयिनीपर्यंत प्रवास केला. निसर्गाचा सहवास व देशाचा प्रवास यामुळें त्यांचें कवि-मन पुष्ट होत गेलें. १९०२ पासून ते प्रासांगिक काव्यें रचूं लागले. बाल-कवींच्या काव्य-प्रभेला कीर्तीचें कोंदण लवकर लाभलें. त्यांच्या वयाच्या १७ वे वर्षीं, १९०७ सालीं, जळगांव येथें 'पहिलें महाराष्ट्र कविसंमेलन' भरलें. त्यांत हा सडपातळ अंगाचा पण तेजस्वी डोळ्यांचा मुलगा उभा राहिला व 'अल्पमती मी बालक, नेणें काव्यशास्त्र व्युत्पत्ति। कविवर्योनो, मदिय बोबडे बोल धरा परि चित्तीं' असें समय-स्फूर्त पद्य म्हटलें अध्यक्षांनीं त्यांना 'बाल-कवि' ही पदवी दिली आणि एक पागोटें व जरीकाठी उपरणें देऊन त्यांचा गौरव केला.

१९०९ सालीं बडोदें येथें साहित्य संमेलन भरलें असतां, तेथें बाल-कवि स्वयंसेवक होते. त्यांनीं आपल्या कविता रे. टिळक, श्री. तात्यासाहेब कोल्हटकर, श्री. तात्यासाहेब केळकर इत्यादि प्रतिष्ठित साहित्यिकांना वाचून दाखविल्या, त्या ऐकून सर्वांची मर्जी त्यांचेवर बसली–टिळकांची तर विशेषच. त्यांनीं त्यांना नगर येथें आपल्या घरीं नेलें, कारण त्यावेळीं बालकवींची प्रकृति खालावलेली होती. टिळकांचें घर म्हणजे काव्याचें माहेरघर. तेथें बालकवींची कविता चोहोअंगांनीं बहरली. तेथें त्यांना चाळीस दिवसांचा विषमज्वर झाला असतांना लक्ष्मीबाई टिळकांनीं आईप्रमाणें त्यांची सेवाशुश्रूषा केली. सुमारें दोन वर्षें तेथें काढल्यावर, १९११ सालीं बालकवि पुण्यास गेले, साहित्य-सम्राट केळकरांनीं त्यांना 'केसरी'चे सहसंपादक नेमले. ता. १३ जानेवारी १९१२ च्या 'केसरी'त बालकवींनीं 'अर्वाचीन कवि' हा लेख लिहिला. त्या

नोकरीचा राजीनामा देऊन बालकवि नगर येथें परत गेले व मिशन हायस्कुलांत शिक्षक म्हणून काम करूं लागले. तेथें वीस रुपये पगारांत त्यांनीं आपलें स्वतंत्र बिऱ्हाड थाटलें.

अपघातानें अकाल-निधन

मिशनऱ्यांना मराठी शिकविण्याच्या निमित्तानें दरवर्षीं ते उन्हाळ्यांत महाबळेश्वरास जात. तेथील पर्वतराजि व वृक्षराजि यांच्याकडे पहात-पहातच व मित्रमैत्रिणींच्या गप्पागोष्टींत रंगतरंगतच त्यांनीं 'निर्झर' रचला व 'संध्या-रंजनी' रंगविली. 'निर्झरासारखी कविता मला ज्यावेळीं करतां येईल तेव्हांच मी खरा कवि होईन' असें गोविंदाग्रज म्हणत. त्यांच्या मैत्रीचा लाभ बालकवींना १९१४ पासून झाला. त्या वर्षीं ते पुनः पुण्यास गेले. या वेळच्या वियोगास उद्देशूनच रे. टिळकांनीं 'पांखरा, येशिल कधि परतून?' ही वात्सल्यानें ओथंबलेली कविता रचली. १९१६ मध्यें बालकवि पुनः पुण्याहून नगरास परत गेले व शिक्षकी करूं लागले. १९१८ सालीं ता. ३० एप्रिल रोजीं ते जळगांव येथें भाचीच्या लग्नासाठीं चालले होते. चैत्र शुद्ध नवमीचा दिवस! भादली स्टेशनावर रेल्वेचे रूळ ओलांडतांना त्यांच्या अंगावरून मालगाडी गेली व एका काव्यमय जीवनाची समाप्ति झाली. 'स्वप्नांतच व्हावा अंत' ही त्यांची दारुण मनीषा अशी पुरी झाली! 'येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा। जो करिल तुझ्यासह अन्त तुझ्या गीताचा।' हें त्यांनीं 'पांखरास' उद्देशून केलेलें भीषण भवितव्य खुद्द त्यांच्याच बाबतींत खरें ठरलें, हें मराठी भाषेचें दुर्दैव!

निराशेची मीमांसा

प्रकृतीचा आजार, आर्थिक ओढाताण, त्यामुळें स्थित्यंतरें-इत्यादि खडतर अनुभवांनीं बालकवीच्या हृदयाचे 'कोळसे' झाले होते, 'तूर्त जिवंतपणींच मी मरण अनुभवीत आहें' असे तीव्र निराशेचे उद्गार त्यांनीं एका पत्रांत काढले आहेत. बहुधा सर्वांच्या वाट्यास येतात, तींच सुखदुःखें कवीच्या

नशिबीं येतात, पण त्याचें मन संवेदनक्षम व हळूवार असल्यानें त्या सुखदुःखांचे स्वरूप त्यांना विराट व विक्राळ भासतें. सराफाच्या तरल ताजव्यांत केशरी काडी पडली, तरी केवढी हालचाल होते ! बाल–कवींचें मन सौंदर्याला आसुसलेलें व प्रेमाला भुकेलेलें ! त्याला रुक्ष व्यवहाराचे कांटे-कुटे व दगडधोंडे पाहून या जगाचाच वीट येणें साहजिक होतें. आत्महत्या करण्यापर्यंतहि त्यांच्या निराशेची धाव जाई.

प्रेम, सौंदर्य व आनंद

बाल–कवींचें काव्य बहुधा एकाच रसानें भरलेलें आहे-आणि तो रस म्हणजे प्रेम. त्यांच्या काव्यांतून एकच सूर ऐकूं येतो–आणि तो म्हणजे निसर्ग–वर्णनाचा. त्यांच्या काव्याचा संदेश एकच–आणि तो म्हणजे " आनंदीआनंद गडे. " त्यांची काव्य–सृष्टि एकरंगी आहे. त्यांचा "अरुण" अवलोका, "अष्टदिशांचा गोफ" पहा, 'फुलराणी' न्याहाळा, ' निर्झरास ' निखरा, " तारकांचें गाणें " ऐका,—सर्वत्र सौदर्य, प्रेम, आनंद यांचेच सुवर्ण–कण उधळलेले आढळतील. क्वचित् कोठें ' धर्मवीरां'सारखी वीररसाची ललकारी, तर क्वचित् ' निराशे 'सारखी करुण तान कानावर येईल. पण तो अपवादच. तो त्यांचा नित्यधर्म नव्हे. त्यांचा स्वभावधर्म म्हणजे ' गिरिशिखरें वनमालाही ' यांत रमणें हाच. 'सृष्टि मला हासविते, स्वर्गसौख्य दाखविते ' या काव्यानंदांत ते सदैव गुंग असत. त्या तंद्रींत डोलत असतांना जे सहज उद्गार त्यांच्या मुखाबाटें बाहेर पडत, ते म्हणजेच त्यांचें काव्य—भांडार. त्यांच्या एका कवितेसंबंधीं डॉ. माधवराव पटवर्धनहि एका चिकित्सक लेखांत असा गौरवपूर्ण अभिप्राय देतात कीं, " फुलराणी ही नितांतसुंदर कविता अथपासून इतिपर्यंत अवतरणीय व संस्मरणीय आहे. " त्यांच्या सर्वच कवनांतील मार्दव व माधुर्य केवळ अप्रतिम आहे. डॉ. पटवर्धन अशीहि कबुली देतात कीं, " केशवसुतांच्या प्रतिभेचें रत्न अधिक मोठें व विविध-रंगी असेल, पण बालकवि या हिरकणीचें पाणी कांहीं और आहे. " सृष्टिवर्णनाचा एकच रंग बालकवीच्या सर्व काव्यावर चमकत आहे खरा,

पण त्याची चमक इतकी अलौकिक आहे कीं, तिची सर दुसऱ्या कोणत्याहि आधुनिक मराठी कवीला येत नाहीं.

कवीचा स्वभावधर्म

' मुलाचे पाय पाळण्यांत ' दिसतात असें म्हणतात, त्याप्रमाणें बालकवींची ' अगदीं पहिली कविता ' ' वन-मुकुंद ' ही आहे. तींत आरंभीं वनांतील वृक्ष-वेलींचें वर्णन असून पुढें मुकुंदाच्या मुरलीचें रूपक रचलें आहे. या पहिल्या कवितेंतहि किती नाजूक पदलालित्य आहे, पहा. "अशा वनीं मीं ऐकिली मुरली । तिला ऐकूनि वृत्ति निमाली । काय कथूं त्या सुस्वर नादा । पुढें पाहिलें रम्य मुकुंदा ॥ "

' शारदेस ' वंदन करतांना कवि आपली भूमिका तिजपुढें पुढील शब्दांनीं मांडतो. ' निर्झरमय काननमय, गायनमय दिव्य जाहला देह. ' कवीला शारदा कशी, कोठें दिसते ? तर रविकिरणीं भासतसें कीं निर्झर-तांडवांत नाचतसें । पुष्पांवर हांसतसें रूप तुझें क्षणिक मानवांस दिसे. "

निसर्गाचा प्रभाव

जग अपूर्ण आहे, दुःखमय आहे याचा खेद करतां करतां कवीला त्या अपूर्णांतच सुख वाटूं लागलें. अपूर्ण जगाला पूर्ण करण्यांचे कर्तृत्वशाली ध्येय त्यांनीं ' दोष व प्रीति ' या कवितेंत रंगविलें आहे तें असें, ' गड्या पूर्णा ! मज आस तुझी नाहीं. । सख्या न्यूना ! ये मार मिठी देही ! प्रीति, माझ्या हृदयांत करी वास न्यूनतेला पूर्णत्व द्यावयास ! "

साऱ्या दुःखावर रामबाण रसायन कविजवळ आहे ते म्हणजे निसर्गाचें सान्निध्य. ' कवीची इच्छा ' त्यांनीं अशी सांगितली आहे. सुमकोषीं आपोआप । क्षण ध्यावी सांखर झोंप । डोलतची जागें व्हावें । हांसतची गुंगत जावें, सत्याचें स्वप्न पहावें । सत्यानें स्वप्नें ध्यावें स्वप्नींही स्वप्नें बघत । स्वप्नांतच व्हावा अंत । निसर्गांत तल्लीन होऊन आनंद कसा लुटावा याचा मार्ग दाखवितांना कवि ' कवीची इच्छा ' या कवितेंत म्हणतो. तुला बघावें गुंगावें । गुंगतची चुंबुनि घ्यावें गुंगतची होउनि जावें । त्वदाधीन जीवें भावें ! गुं गुं गुं गुं जोंवरती । जडतेची पडते

माती तरलित हो हृदयज्योती । दिव्य सूर श्रवणी येती. मुग्धमधुर हांस्यावरले । बिंदुकिरण कलिकेमधले, । हृदयतार हालविणारे । मनस्ताप मालविणारे मनोवृत्ति कालविणारे । अंधकार घालविणारे दिव्य तरंगी तरणारे । गोड गोड गुंफित सारे.

आपल्या मधुर काव्यांच्या पुरांत जगांतील निराशा बुडवून टाकूं, अशी हिंमतहि कवीच्या अंगीं पुढें पुढें स्फुरण पावूं लागली. 'अतृप्ति' या कवितेंत तो अशी प्रतिज्ञा करतो, "पाव्याच्या गोड सुरांत । बुडवून जगाला देऊं । स्वानंद सुखद राज्यांत । संत्रस्त जिवाला नेऊं । या अपूर्ण जगतासेंगें । मन तृप्ति कधींहि न पावे मग मंजु गायनासगें । बा, कां न उड्डनि तें जावें ?" तसेंच, तो म्हणतो "दुष्ट मत्सरी जगतापरतें । प्रेमाचें साम्राज्य सभोंतें । बनवुनि राहुं ॥"

गुप्त सौंदर्याचे उघडे खजिने

स्वतः बालकवि सृष्टीचे गायक होते–निसर्गाचे पूजक होते. विश्वांतील वस्तुवस्तूंत जें सौंदर्य लपलेलें आहे तें ते शोधून काढीत व इतरांना दाखवीत. त्यांचीं सारीं निसर्ग-गीतें म्हणजे अशा गुप्त सौंदर्याचे उघडे खजिने होत. 'अरुण' हा त्या निसर्ग–गीतांचा राजा. अचेतन वस्तूंवर मानवी धर्माचे आरोप करून सृष्टिदेवतेचें वर्णन बालकवींनीं सुंदर शब्दांनीं व मधुर कल्पनांनीं केलें आहे. तें असें–"पूर्व दिशा मधु मृदुल हांसते गालींच्या गालीं,। हर्षनिर्भरा दिशा डोलती या मंगल कालीं ॥ हे सोन्याचे, रक्तवर्ण हे, हे पिवळे कांहीं—रम्य मेघ हे कितेक नटले मिश्रित रंगांहीं. ॥"

अरुणोदयाचे वेळीं पूर्वेकडील आकाशावर लालिमा पसरलेला असतो. त्यावर बालकवींनीं पुढील मनोहर उत्प्रेक्षा लडिवाळ भाषेंत केल्या आहेत– "अरुण चितारी, नभःपटाला रंगवितो काय, । प्रतिभापूरित करी जगाला कीं हा कविराय ? । कीं, नव युवती उषासुंदरी दारीं येवोनी । रंगवल्लिका रम्य रेखिते राजस हस्तांनीं ? ॥ किंवा 'माझी चोरुनि नेली मोत्यांची माला' । म्हणुनि नभःश्री रुसली, आली लाली गालाला ? । प्रगट जाहलें श्रीरामाचें पुष्पक किंवा हें ?। कीं, सोन्याची पुरी द्वारका लखलखते आहे?"

पुढें सूर्योदय होऊन पांढरा शुभ्र प्रकाश सर्वत्र पसरला, तेव्हांचें वर्णन

बालकवीनें सुकुमार शब्दांत केले आहे. "परस्परांना दिशा म्हणाल्या प्रेमळ वचनांनीं "विरह-काल संपला गा गडे प्रेमाचीं गाणीं। या मेघाच्या कुंजामध्यें ही लपली कोण? तिला बोलवा-पुरे गडे ग। हा तुमचा मान!"

मानवी भावनांचा आरोप

दिवसाच्या प्रारंभींची संध्या रंगविणाऱ्या बालकवींनीं दिवसाच्या समाप्तीनंतरची संध्याहि तितक्याच लाडिक शब्दांनीं, कोमल कल्पनांनीं व नादमधुर रचनेनें 'संध्यारजनी' या काव्यांत रंगविली आहे. सूर्य दृष्टीआड झाला तरी पश्चिम दिशेच्या गालावर प्रेमाची लाली कायम आहे हें पाहून "थक्क होउनी दिशा म्हणाल्या 'काय मोहिनी ही। प्रेम-समाधी अजुनि खुळीची या उतरत नाहीं!"

संध्याकाळीं आकाशांत एक एक तारका हळुहळु उगवतांना दिसते. त्या त्यांच्या दर्शनाचें वर्णन कवीनें किती कौशल्यानें केलें आहे तें पहा—"संध्येच्या खिडकींत येउनी ही हंसरी तारा,। हळूंच पाहते खुणाविते ही 'या-या' कोणाला?॥ पलिकडचा तो तेजोमय नव पडदा सारून। बघते, हंसते, क्षणांत लपते, ही दुसरी कोण?॥"

एक-दोन करतां करतां लाखो तारकांनीं आकाश भरून गेलें. त्या तारकांवर एकामागून एक उत्प्रेक्षांचे अलंकार कवि कसे चढवित आहे तें पहा—"आली होती भरती, आतां अस्त समुद्राला,। त्या लाटांतुन काय सांडल्या या मौक्तिकमाला?। कल्पतरूचीं फुलें उडालीं कीं वाऱ्यावरती? आकाशींच्या गंगेला कीं बुदबुद हे येती?। नव टिकल्यांची चंद्रकळा कीं गगनश्री नेसे?। स्वर्गींचें भांडार उघडलें कीं रात्रीसरसे?। विश्वाशेखरावर टोप चढविला हिऱ्या-माणकांचा! मंगल मंगल जिकडेतिकडे जय मांगल्याचा!"

प्रतिभेचा बहर

साधें हिरवें गवत! त्यांत उगवलेली एक बारीक कळी! तिचें लग्न ठरलें सूर्य-किरणांशीं. तेव्हां तिचा भाऊ-वारा-संध्याकाळीं तिची यट्टा

करूं लागला. रात्रीं तिला प्रीतिचीं स्वप्नें पडलीं आणि प्रातःकालीं तिचें लग्न रविकिरणांशीं झालें. साराच स्वच्छंद कल्पनेचा मधुर खेळ ! तो खेळ बालकवि यशस्वीपणें खेळले आहेत. गेय चाल, सुगम शब्द शब्दांची पुनरुक्ति, त्यांचें नादमाधुर्य, अनुप्रासादि अलंकार, रेखीव सृष्टीवर्णनें, तल्लीनतेची भावना आणि या सर्वांतून प्रेमाचा व मांगल्याचा ओतप्रोत भरलेला संदेश !—हे बालकवींचे सारे गुण या एका कवितेंत एकवटलेले दिसतात. त्यांच्या रम्य प्रतिभेचा हा तळपता तुरा होय. एकदां वाचली कीं ती पाठ व्हावी आणि पाठ झाली कीं सदैव गुणगुणत रहावी अशी ती गोड, रसाळ, हंसरी कविता आहे. तिचे कांहीं कण पुढें दिले आहेत. " हिरवे हिरवे गार गालिचे—हरित् तृणाच्या मखमालीचे—त्या सुंदर मखमालीवरतीं फुलराणी ही खेळत होती ! आईच्या मांडीवर, बसुनीं—झोके घ्यावे, गावीं गाणीं; । याहुनि ठावें काय तियेला—साध्याभोळ्या फुलराणीला ? पुरा विनोदी संध्यावात । डोल डोलवी हिरवें शेत; तोच एकदां हांसत आला—चुंबून म्हणे फुलराणीला ॥" फुलराणीचें लग्न ठरलें ! मंडप घातला, वऱ्हाडी जमले. त्यांचें वर्णन—" तेजोमय नव मंडप केला,—लखख पांढरा दहा दिशांला, जिकडे तिकडे उधळित मोतीं—दिव्य वऱ्हाडी गगनीं येती । लाल सुवर्णी झगे घालुनी—हांसत हांसत आले कोणी; कुणी बांधिला गुलाबि फेटा—झगमगणारा सुंदर मोठा, आकाशीं चंडोल चालला । हा वाङनिश्चय करावयाला; हें थाटाचें लग्न कुणाचें ? साध्या भोळ्या फुलराणीचें "

आणि लग्नांत मंजुळ वाद्यें नकोत कां ? तीं कोण आणणार ? अर्थात सृष्टि—देवताच. कोण कोणतें वाद्य वाजवितो तें ऐका. " गाउं लागले मंगलपाठ—सृष्टीचे गाणारे भाट । वाजवि सनई मारुतराणा—कोकिळ घे तानांवर ताना । नाचुं लागले भारद्वाज—वाजविती निर्झर पखवाज । नवरदेव सोनेरी रविकर—नवरी ही फुलराणी सुंदर । लग्न लागतें । सावध सारे । सावध पक्षी, सावध वारे । दवमय हा अंतःपट फिटला—भेटे रविकर फुलराणीला ॥ "

सृष्टिसौंदर्याचीं नाना रूपें

या झाडावरून त्या झाडांवर उड्या मारणारा पक्षी ! बालकवींनीं केवळ

आपल्या शब्दांच्या साहाय्यानें तो ' अष्टदिशांचा गोफ ' या कवितेमध्यें वाचकांच्या डोळ्यापुढें उभा केला आहे.

" बाल विहग आनंद मूर्तिमान् झुलतो गगनांत । क्षणभर येथें क्षणभर तेथें, भिंगोरी साची ॥ गिरिशिखराचें गोल फूल हें सांध्य तरंगांनीं । झुलुनि त्यांतला पराग कीं हा भरभरतों गगनीं ? ॥ सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें । चैतन्याच्या गोड कोंवळ्या उन्हांत हिंडावें ॥ " शेवटच्या या दोन ओळींत बालकवींचें सारें जीवन-ध्येय किती सुंदरपणें व्यक्त झालें आहे !

अंगणांतील बालिका, तशाच आकाशांतील तारका. त्या ' तारकांचें गाणें ' गातांना बालकवि म्हणतात, " कुणि नाहीं ग कुणि नाहीं । आम्हांला पाहत बाई । शांति दाटली चोंहिकडे । या ग आतां पुढें पुढें । लाजत लाजत । हळूंच हांसत । खेळ गडे खेळूं कांहीं । कोणीहि पाहत नाहीं. ॥ फेकुनि द्या इकडे तिकडे । थोडेसे दंवबिंदु गडे । या निर्मल अवकाशांत प्रेमाचें पेरूं शेत ॥ "

सुरेख शब्द-चित्रें

" श्रावणमास " हेंहि काव्य अतिशय मधुर व मनोहर आहे. त्यांतील शब्दांचें मार्दव व माधुर्य अप्रतिम आहे. पावसाच्या सरीप्रमाणें शब्दांच्या पंक्ति सफाईनें पडत आहेत. स्त्रियांचीं आणि पाखरांचीं, हरिणींची आणि गाईचीं, चाफ्याचीं आणि पारिजातकांचीं शब्दचित्रें तर कमालीचीं सुंदर आहेत. त्यांचे कांहीं नमुने —" श्रावणमासीं हर्ष मानसीं हिरवळ दाटे चोहिंकडे; क्षणांत येतें सरसर शिवरें, क्षणांत फिरुनी ऊन पडे । वरतीं बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे । मंगल तोरण काय बांधलें नभोमंडपीं कुणिं भासे । उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा । सर्व नभावर होय रेखिलें सुंदरतेचें रूप महा । फडफड करुनी भिजले अपुले पंख पांखरें सांवरिती, सुंदर हरिणी हिरव्या कुरणीं निजबाळांसह बागडती ॥ देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयांत । वदनीं त्यांच्या वाचुनि घ्यावें श्रावण महिन्याचें गीत । "

रंगांची शोभा

सृष्टींतील झाडें, वेली, फुलें, डोंगर, गवत इत्यादी वस्तूंच्या रंगांच्या छटाहि न्याहाळण्याइतकी बालकवींची दृष्टी सूक्ष्म आहे. 'पाऊस' या कवितेंत ते म्हणतात, "कृष्ण कुणी काजळिच्या शिखरावाणी ! नील कुणी इन्द्रमण्याच्या कांतिहुनी ! गोकर्णी मिश्र जांभळे तसे कुणी; ॥ मधु मोतीं भूवरतीं भरभर ओती ! " तसेंच मेघांचा कापूस' यामध्यें रंगाची शोभा वर्णितांना बालकवि लिहितात, " फिकट निळीनें रंगविलेला कापुस मेघांचा वरुनि कुणी गुलजार फिरवला हात कुसुंब्याचा । त्यांतहि हंसली मंदपणें ती चंद्रकला राणी । कडेकडेच्या मेघांवर ये मोत्यांचें पाणी । इंद्र निळाचा रंग बहरवी गिरिच्या अंगाला । मधुन जळाची शुभ्र शोभते ती मोहनमाला ॥ "

अलौकिक निसर्ग-गीत

आधींच बालकवींची चित्तवृत्ति आनंदी व निसर्गांत रमणारी, त्यांत ते महाबळेश्वराच्या उच्च स्थानीं, शीतल हवेंत, उंच उंच पर्वतराजि व हिरवी हिरवी वृक्षराजि पहात हिंडत होते. वर आकाशांत उगवत्या किंवा मावळत्या सूर्याचे पिवळे-तांबडे-जांभळेहि रंग निरखीत होते; तर खालीं खोल खोल दऱ्यांतून कधीं उड्या मारीत तर कधीं वळणें घेत, धावत-नाचत जाणारे झरे आपल्या दृष्टींत साठवीत होते. आणि त्यांच्याबरोबर होतीं, त्यांच्याशीं समरस होणारीं दत्तोपंत व ताराबाई हीं टिळकांचीं मुलें. अशा या संजीवक वातावरणांत बालकवींना 'निर्झरास' हे अलौकिक काव्य स्फुरलें. त्यांत त्यांच्या सर्व काव्य-गुणांचें संमेलन झालेलें आढळतें. त्यामुळें हें एकंदर काव्य म्हणजे एक सुरेल संगीतच बनलेलें आहे. त्याचे कांहीं मासले पहा-"गिरिशिखरें वनमालाही । दरी दरी घुमवित येई ! कड्यावरूनि घेऊन उड्या । खेळ लतावलयीं फुगड्या । घे लोळण खडकावरती । फिर गरगर अंगाभवतीं, । जा हळुहळु वळसे घेत । लपत छपत हिरवाळींत । पाचूंचीं हिरवीं रानें । झुलव गडे, झुळुझुळु गानें ॥ "

या सुंदर निसर्गावर श्रीकृष्णाचें रूपक चढवून कवि म्हणतो, " मुरली-

च्या काढित ताना । वृंदावनिं खेळे कान्हा; धुंद करुनि तो नादगुणें । जडताही हंसवी गानें । दिव्य तयाच्या वेणुपरी । तूंहि निर्झरा ! नवल परी– गाउनि हें झुळुझुळु गान । विश्वाचें हरिसीं भान । गोपि तुझ्या हिरव्या वेली । रास खेळती भंवताली । तुझ्या वेणुचा सूर तरी । चराचरावर राज्य करी !"

जगांत सत्याचा शोध शास्त्रज्ञ करतात आणि लपलेलें सौंदर्य कवि लोक हुडकून काढतात. शास्त्रीय सत्य हें दुपारच्या उन्हाप्रमाणें तेजस्वी पण रखरखीत असतें आणि काव्यांतील तत्त्व हें मध्यरात्रींच्या चांदण्याप्रमाणें मंद पण मधुर असतें. या दोघांचाहि हेतू मानव–समाजांतील प्रेमभाव व ऐक्यभाव वाढीस लावून साधुत्वाची स्थापना करणें हाच असतो. सत्य, शिव व मंगल या त्रिमूर्तींचें अद्वैत असतें. तें ज्याच्या काव्यांत जितक्या प्रमाणांत असेल तितक्या प्रमाणांत तो कवि श्रेष्ठ. सुंदर सजावटीनें व मधुर भाषेनें सत्य सिद्धांत वाचकांच्या गळीं उतरविण्याचें कार्य श्रेष्ठ कवि करीत असतात. अशा श्रेष्ठ कवींमध्यें स्थान पावणारे बाल–कवि हे एक होत.

वा. भ. बोरकर : : : ३०

एक काळीसावळी बुटकी मूर्ति व्यासपीठावर उभी राहिली. तिच्या तोंडून आपल्या काव्याचे सकंप सूर बाहेर पडूं लागले. पण श्रोत्यांचा उत्साह उतूं चालला होता. 'गाड्याबरोबर नळ्याची यात्रा,' त्याप्रमाणें



साहित्य—संमेलनाबरोबर काव्य—गायनाचा कार्यक्रम होत असतो. तो ऐकण्यासाठीं जे लोक जमतात, त्यांचें लक्ष बहुधा गायनाकडेच जास्त; काव्याकडे कमी. एक जलसा, जत्रा किंवा गोंधळ असेंच स्वरूप बऱ्याच काव्य-गायनाच्या कार्यक्रमांना उच्छंखल व उथळ श्रोतृवर्ग आणून देतो. बडोद्यासहि तसाच श्रोतृगण जमलेला होता. १९३४ सालीं तेथें 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' भरलें असतां रात्रींच्या वेळीं काव्य-गायनाचा 'समारंभ' चालू झाला. हजारो स्त्री-पुरुषांनीं सभागृह ठेचून भरलें होतें. एकामागून एक जुने-नवे कवि व्यासपीठावर येऊन जनता-जनार्दनापुढें हजेरी देत होते. नव्या कवींना प्रायः अर्धवट काव्य म्हणूनच व्यासपीठ सोडण्यास श्रोतेमंडळी भाग पाडीत. अशा नव्या, अज्ञात कवि-जनांपैकींच एकजण पुढें आला. त्याची बुटकी मूर्ति व्यासपीठावर दिसूं लागतांच श्रोत्यांनीं ओरडा सुरू केला. त्यानें आपल्या कवितेची गद्य प्रस्तावना सांगण्यास

सुरुवात केली. त्याचे कोकणी उच्चार व सानुनासिक सूर यांचा विलक्षणपणाच श्रोत्यांच्या हुल्लडबाजीला पुरेसा होता. पण त्या उसळत्या उत्साहाच्या अनावर लाटा क्षणार्धात थांबल्या. 'दिव्यत्वाची जेथ प्रतीती' इत्यादि उदात्त भाव त्यांचे मनांत शिरूं लागले. 'गाळुनिया भाळींचे मोती' यासारख्या मनोहर पद–लालित्यानें नटलेल्या पंक्ति श्रोतृवृंदाच्या कानांत शिरूं लागल्या, तसतसें त्यांच्या हृदयांतील वादळ शमत गेलें आणि मग 'शांतिशिरीं मन चंवच्या ढाळी' असा भास होत होत, काव्याच्या अखेरीस श्रोत्यांच्या भावना पुऱ्या जिंकल्या गेल्या. त्यांनीं गुण–ग्राहकतेनें टाळ्यांचा एकच कडकडाट केला व 'तेथें कर माझे जुळती' याचा साक्षात् अनुभव घेतला. नंतर 'मुशाफिर' ही कविताहि सारंगीप्रमाणें तेथें रंगली. कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर, मध्यरात्रहि उलटल्यावर, केवळ कविमंडळांमध्यें, माधवराव पटवर्धन यांनीं निवडक काव्य–गायनाचा एक खास कार्यक्रम घडवून आणला, त्यांत या बुटक्या मूर्तीनें—बोरकरांनीं-आपल्या काव्याचा सारा पिसारा उलगडून दाखविला. त्याचें कौतुक सर्व कवींनीं मनोभावें केलें–माधनरावांनीं तर खूप उत्तेजन दिलें. जणूं या संमेलनांत हें नवें मोलाचें रत्नच आपल्या हातीं आलें अशा भावनेनें ते बोरकरांकडे अभिमानानें पहात होते. तेव्हांपासून बोरकरांच्या काव्याची कीर्ति कलेकलेनें एकसारखी वाढत आहे.

क्रांतीच्या आंदोलनांत

बाळकृष्ण भगवंत बोरकर यांचा जन्म गोमंतकांतील कुडचडे या गांवीं ता. ३० नोव्हेंबर १९१० रोजीं झाला. गोमंतक म्हणजे सृष्टि–सौंदर्याची खाण. तेथील राया, तेथील समुद्र व तेथील वन–सृष्टि यांवर बाळकृष्णाचें कवि–मन 'चरत होतें.' आपल्या जन्मग्रामीं बोरकर मराठी दोन यत्ता शिकले–तेवढेंच त्यांचें मराठीचें शिक्षण ! पुढें पोर्तुगीज व इंग्रजी या भाषांचा अभ्यास गोमंतकांतील परिस्थितीमुळें त्यांना करावा लागला. धारवाड येथें इंग्रजीच्या सात यत्ता तीन वर्षांत पुऱ्या करून ते १९२८ सालीं प्रवेश-परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर एक वर्ष

कर्नाटक कॉलेजांत त्यांनीं काढलें. पण शिक्षणाच्या पुढील पायऱ्या चढणें त्यांना गरिबीमुळें शक्य झालें नाहीं. ते सर्वांत वडील चिरंजीव. म्हणून त्यांचेवर संसाराची जबाबदारी. ती पार पाडण्यासाठीं पोर्तुगीज ट्रेनिंग कॉलेजचें प्रमाणपत्र मिळवून त्यांनीं १९३९ सालीं प्राध्यापकाचा पेशा पत्करला. खाजगी व सरकारी हायस्कुलांत शिक्षक म्हणून त्यांनीं सोळा वर्षें काढलीं. पण गोमंतकांतील स्वातंत्र्याचें आंदोलन सुरू होतांच त्यांचें मन अस्वस्थ झालें व त्यांनीं १९४६ सालीं राजिनामा दिला. त्यांनीं गोमंतकांतील राजकीय आंदोलनांत भाग घेतला. त्यामुळें तेथील सरकारनें त्यांना गोमंतकांत प्रवेश करण्यास बंदी केली. तरी भारतांत राहून ते ' आमचा गोमंतक ' नांवाचें वृत्तपत्र चालवून गोमंतकीय आंदोलनास कुमक पुरवीत होते. मुंबईत चाललेल्या गोमंतक-स्वातंत्र्याच्या चळवळीसहि ते हातभार लावीत होते. सध्यां त्यांनीं रामायणाच्या धर्तीवर 'महात्मायन' नांवाचें महाकाव्य ओव्यामध्यें रचण्यास प्रारंभ केला आहे व पुणें येथें वास्तव्य केलें आहे.

संत-वाङ्मयाचे संस्कार

आतांपर्यंत त्यांचे चार काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्याशिवाय ' मावळता चंद्र,' ' भावीण ' वगैरे कादंबऱ्या, ' कागदी होड्या 'सारखे लघुनिबंध आणि कांहीं अनुवादित पुस्तकेंहि त्यांनीं महाराष्ट्रीय रसिकांना सादर केलीं आहेत. लहानपणापासून त्यांच्या भावनेवर संत-वाङ्मयाचे संस्कार झाले आहेत. त्यांत ज्ञानेश्वरीचा तर विलक्षण प्रभाव पडलेला आहे. स्वामी रामतीर्थ व विवेकानंद, टॉलस्टॉय व टागोर प्रभृति आधुनिक ऋषि-मुनींच्या उदात्त भावार्चीं छाप त्यांचे मनावर पडली. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत प्रवास करून त्यांनीं अनुभवाचें धन विपुल जमविलें. नाना धर्मांचे व नाना पेशांचे मित्र त्यांच्या परिवारांत आहेत. त्यामुळें त्यांचा दृष्टिकोन व्यापक व सहानुभूति सर्वस्पर्शी आहे. त्यांच्या काव्यांत निसर्गाचें प्रेम वर्णिलेलें आहे, प्रणयाच्या लीला रंगविलेल्या आहेत, राष्ट्रीय आकांक्षा उमटलेल्या आहेत; त्याप्रमाणें त्यांना लागलेला ' चिरंतनाचा ध्यासहि ' सर्वत्र उमटलेला आहे. त्यांना ' शांती 'ची

प्यास लागलेली पुष्कळ काव्यांत दिसते. 'मंत्रमुग्ध माझी वृत्ती, मुकें मन, मुकी वाणी' ही त्यांची भूमिका त्यांच्या काव्याकाव्यांतून दिसते. ते राष्ट्रीय प्रवृत्तीचे असले तरी आध्यात्मिक वृत्तीचे आहेत–आणि या दोन्ही वृत्ति–प्रवृत्तींना अधिष्ठान आहे गाढ रसवत्तेचें.

स्वतंत्र प्रतिभा

'बोरकर गुंगत कविता करतात का कविता करतां करतां गुंगून जातात' हें श्री. वि. स. खांडेकरांना कोडें आहे. तसें कोडें कोणाहि रसिकास पडावें इतकी काव्यात्म वृत्ति बोरकरांची आहे. तांबे व बालकवि यांच्याप्रमाणें ते अष्टौप्रहर काव्याच्या विश्वांतच रममाण असतात. काव्य जगणाऱ्या थोड्या भाग्यवतांपैकीं ते एक आहेत. त्यांचें काव्य म्हणजे खरोखर त्यांचें जीवन-संगीतच. ते सदैव हें जीवन-संगीत आळवीत असतात आणि आळवितां आळवितां येणारे दिव्य अनुभव त्यांच्या काव्यांत शाश्वत रूप पावतात. "तांब्यांच्या अभिजात गायकीचा लौकिक व प्रसार वाढला तर हें 'जीवन संगीत' सार्थकीं लागलें असें मी समजेन" या संगीताच्या सुरांतच बोरकर बोलतात. याचा अर्थ त्यांची कविता केवळ अनुकरणात्मक आहे असा मात्र नाहीं. त्यांचें स्वतंत्रत्व त्यांच्या काव्याच्या अंतरंगांत स्पष्ट दिसतें. त्यांची बुद्धि स्वतंत्र व सूक्ष्म आहे आणि ती प्रखर चिकित्सा करणारी आहे. अनुकरणानें आंधळी बनणारी ती बुद्धीच नाहीं. त्यांच्या स्वर–सुंदर व भाव–निर्भर काव्य–गायनाइतकेंच त्यांचें विवेचक व समतोल गद्य भाषण ऐकणेंहि आल्हाद-दायक असतें. आणि संभाषणांत तर हे सारे गुण एकवटलेले असून त्यांचें भावपूर्ण हृदयहि ओतलेलें असतें. आस्था, ममत्व व सहानुभूति हे त्यांच्या स्वभावाचे विशेष गुण होत. 'जीवीं जीव घालून' ते दुसऱ्याच्या दुःखार्शी चटदिशीं समरस होतात. काव्य करण्याचे वेळींच तेवढी त्यांची भावना उसळ्या मारीत नाहीं. ती त्यांच्या बोलण्यांत, वागण्यांत हरघडीं दिसून येते, त्यामुळेंच त्यांचें काव्य रसिकांच्या हृदयाचा ठाव घेतें. त्यांच्या काव्यांत सृष्टि–वर्णनाचें वैभव आहे, प्रणयाचा विलास आहे, राजकीय

ध्येयवादाचा पडसाद आहे आणि तसाच ईश्वरी भक्तीचा जिव्हाळा पण आहे. या चारी गुणांवर मृदुल व मंजुल पद-ललित्याचा फुलोरा दरवळत आहे. ' करिं सुंदरि स्वर-शृंगार ' किंवा ' क्षणभंगुर जरि जीवन सखे सुंदर करुं आपण ' अशा पंक्ति त्यांतील विचार-सौंदर्याच्या आधीं शब्द-माधुर्यानेंच रसिकांचीं मनें जिंकून घेतात.

संगीत व चित्रकला

काव्य, संगीत व चित्रकला या तिन्ही कोमल कलांची जादू बोरकरांच्या लेखणीमध्यें सांठविली आहे. तांबे-बालकवींप्रमाणें रम्य कल्पनेचें नर्तन त्यांच्या काव्यांत सर्वत्र आढळतें. त्याचप्रमाणें त्यांनीं अभ्यासिलेल्या चित्रकलेची व संगीत कलेची सोनेरी प्रभाहि त्यांच्या काव्यावर पडलेली दिसते. दोनचार ओळींतच तें एखादें वैशिष्ट्यपूर्ण शब्दचित्र सुरेख रीतीनें रंगवितात, एवढेंच नव्हें तर त्यांत निरानिराळे रंग भरण्याचें चित्रकाराचें कसबहि त्यांचे अंगीं आहे. स्वतःच्याच संवेदना ते आपल्या काव्यांत ओतीत असल्यामुळें त्यांचें काव्य स्वतंत्र व पृथक् आहे, तथापि ते तांबे यांना गुरु मानतात. १९३६ सालीं त्यांनीं आपली गुरुभक्ति प्रगट करणारे ' कविवर भास्करास ' या नांवाचें कवन रचलें; त्यांत ' भास्कर ' या शब्दावर श्लेष साधून सूर्याच्या कार्याचें वर्णन करतां करतांच तांब्यांच्या काव्याचेंहि वर्णन साधलेलें आहे.

निसर्गाचें गौरव-गीत

पावसाळ्यामध्यें आकाशांत ढग भरून आले. त्यांचें शब्द-चित्र बोरकरांनीं अतिशय ललित-पद्धतीनें रेखाटलें आहे. त्याची चालहि आकाशांतील ढगांची गर्दी सूचित करणारी आहे. आणि निसर्गाचे चित्र-विचित्र रंगहि त्यांनीं मोठ्या कुशलतेनें या काव्यांत भरले आहेत, तें असें- " गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले । शीतल तनु चपल चरण अनिलगण निघाले ॥ " " धुंद सजल हसित दिशा । तृणपर्णीं सज्ज तृषा तृप्तीचे घन घनांत बघुनि मन निवालें ॥ "

बालकवींनीहि ' श्रावणमास ' चितारला आहे. बोरकरांनीं आपल्या

विशिष्ट शैलीनें रसिकांना 'श्रावण-दर्शन' घडविलें आहे. तें असें—
"गिरिदरींतुनि झरे-नव्हे हे हिरे उसळती निळे। ढगाढगांतुनि अन् पाऱ्यापरि ऊन गळे कोवळे॥ हवेंत फिरतें कुणी पाखरू घुमत भिंगरी-परी। वर्ण रुपेरी लावुनि झुलती सुमनें दर्भाकुरी॥"

कोणत्याहि कवीच्या वर्णन-शक्तीला आव्हान देण्याइतकें भरघोस व हसरें सृष्टि-सौंदर्य बोरकरांच्या गोमंतकांत फुललेलें आहे. त्यांतील 'दूध-सागर' घबघब्याचें वर्णन करतां करतां त्यांनीं आनंदाचा व आशेचा संदेश दिला आहे.

दिव्य भावाची प्रतीती

नुसती नादमधुर शब्द-योजना किंवा वर्णन-शैली अथवा कल्पना-शक्ति एवढीच सामुग्री काव्याला पुरेशी नाहीं. त्याच्या पोटांत खोल भावना व उदात्त विचार असावयास हवा तरच तें सत्काव्य! या कसोटीला पूर्णपणें उतरतील अशीं बोरकरांचीं बरींच काव्यें आहेत. त्यांतील क्रमानें व गुणानेंहि आद्य असणारें कवन म्हणजे 'तेथें कर माझें जुळती.' गीतेंत सांगितल्याप्रमाणें जेथें जेथें 'विभूतिमत्, श्रीमत्, ऊर्जित' प्रगट झालेलें असेल, तेथें कोणाहि सहृदय माणसाचें शिर नम्र होतें व कर जोडले जातात. ह्या तत्त्वाला सगुण साकार स्वरूप बोरकरांनीं आपल्या कवितेंत दिलें आहे. "दिव्यत्वाची जेथ प्रतीती। तेथें कर माझे जुळती॥" असा सिद्धांत सांगून बोरकर त्या दिव्यत्वाचे दाखले देतात. सर्वसामान्य व्यक्तीच्या हरघडच्या जीवनांतहि असें दिव्यत्व दडलेलें असतें हें ते दाखवितात.

अशा त्यक्त-बहिष्कृत समाज-घटकांचें पूजन जो कवि करतो, तो राष्ट्रांतील डोळ्यासमोर घडणाऱ्या दिव्य घटनांना बहिरा किंवा पाठमोरा कसा होईल? गांधीजी किंवा सानेगुरुजी यांचें जीवन म्हणजे अखंड यज्ञ होय. त्यांतून ज्या त्यागाच्या व सेवेच्या पवित्र ज्वाला निघाल्या, त्या पाहून कविचें हृदय बेभान नाचूं लागलें. १९४७ सालीं पंढरीच्या पांडुरंगाचें दर्शन हरिजनांना व्हावें म्हणून साने गुरुजींच्या 'पांडुरंगानें' आमरण उपोषण सुरू केलें, ती वार्ता ऐकतांच बोरकरांनीं 'पंढरीस वाजे घंटा'

अशी घोषणा करून त्या घंटानादाचें रहस्य काव्यमय भाषेनें महाराष्ट्राला सांगितलें, तें असें–" पंढरीस वाजे घंटा पांडुरंग झाला जागा । झाडा मागाया उठल्या गोदा–भीमा–चंद्रभागा ॥ " " प्राण इरेला टाकून पांडुरंग रागें उगा । रडा रडा पश्चात्तापें दीनां आलिंगाया लागा ॥ " " न्हात न्हात आसवांनीं जोडा तुटलेला धागा । महारांच्या महाराष्ट्रीं लावा ब्रह्मत्वाच्या बागा ॥ "

' माझी पूजा ' या कवितेमध्येंहि अशीच ' दिव्यत्वाची प्रतीती ' देणारीं स्थळें कवीनें दाखविलीं आहेत. स्वतः जळून मातृभूमीचें मुख उज्ज्वल करणाऱ्या क्रांतिकारकांना आरंभीं वंदन करून, बडिलांना उद्देशून कवि म्हणतो, " तुम्हि चंदन, हित, शांति । आश्वासन, विश्रांति । पुण्योदक नयनांतील तुमच्या पाणी अभिषेकांचें ॥ " तसेंच श्रमजीवी लोकांचा गौरव करतांना कवि सांगतो, " भाग्य न माझें अन् श्रमिकांनो ! तुम्हांपरी खपण्याचें । पीक काढुनी ताट भराया षड्रस नैवेद्याचें ॥ " स्वतःकडे नम्र भूमिका घेऊन कवि म्हणतो, " घंटा झालों, खवलों स्तोत्रें, यश तुम्हां सर्वांचें । "

गांधीजींचें विभूतिमत्व

गांधीजीबद्दल बोरकरांना गाढ आदर आहे. ' साबरमतीच्या कांठीं ' या कवितेंत त्यांनीं आपला आदरभाव पुढील शब्दांनीं व्यक्त केला आहे, " महात्म्याच्या पावलांनीं । येथें धूळ झाली बुका । हवेमध्यें श्वास त्याचे । धूप यायचा न तुका । तुझी भक्ती, तुझा त्याग । तुझें तप आलें फळा । माझ्या भविष्याचा मार्ग । मला झाला ग मोकळा ॥ महात्म्याच्या संगतीचा । मला लाभला एकान्त । सहा महिन्यांत झाला । खरा स्वप्नींचा दृष्टांत ॥ गाऊं त्याच्या ओव्या गाणीं । शेकड्यांनीं, सहस्रांनीं । त्याच्या पावलांच्या खुणा । उमटवूं पानोपानीं ॥ चरक्याच्या तालावर । रचूं त्याचें रामायण । जीवनांत पदोपदीं । करूं त्याचें पारायण " । आणि कवि आतां ' महात्मायन ' या नांवानें गांधीजींचें रामायण रचीत आहे.

एक साधी घटना ! केवळ एक चुकामूक ! पण तिच्यांतून कवि बोरकरांनीं आपल्या प्रतिभेच्या नजरेनें केवढें महान् तत्त्व शोधून काढलें

व किती प्रभावी रीतीनें तें मांडलें ! मुंबई येथें १९४५ सालीं गांधीजी असतांना त्यांची नेहमींची सायं-प्रार्थना होई. त्या प्रार्थनेस हजर राहण्या-साठीं कवि निघाला पण उशीर झाला. समुद्राला साक्षी ठेवून सायंकाळची प्रार्थना गांधीजींनीं संपवली होती आणि ते आपल्या निवासस्थानाकडे निघाले होते. तें जातांना त्यांचें फक्त ओझरतें दर्शन कवीला झाले. महात्मे व समाज यांचीहि चुकामूक जगाच्या इतिहासांत अशीच होत आली आहे. थोर विभूतींचें ओझरतेंच दर्शन मानवसमाजाला घडलें आहें हें महान् तत्व कवीनें या कवितेंत मोठ्या कौशल्यानें सूचित केलें आहे. यांतील ' दधीची, हरिजन,' इत्यादि शब्दन्शब्द अर्थपूर्ण आहे. " डोळ्यांत घेउनी प्राण । " कवि दर्शनासाठीं उभा राहिला. "राजमार्ग उघडा झाला। सुखकंपानें देह फुलला । प्रभु साकार दिसला " असें वाटून कवि गांधीजींच्या मूर्तीचें वर्णन पुढील वेचक शब्दांनीं करतो. " ती मूर्ति साजिरी ज्योति कर्पूरगौर । कृत-शांति-अहिंसा दलित स्फूर्ति गंभीर । गंगेपरि गेली पुढुनी संथ गतीनें । निःशब्द प्रीतिनें जीवबुनि दोन्ही तीर । यांतील ' गंगेपरी गेली पुढूनी संथ गतीनें ' हीं ओळच मुळीं त्या थोर विभूतींच्या गतीचें गांभीर्य मूर्तीमंत उभें करतें. ज्या रस्त्यावरून महात्माजी चालत गेले, तो ' जनसेवक पंथ तो कृतार्थ झाला आज । ' असें वाटून कवि म्हणतो —' धजलों न तया मी तुडवाया या चरणीं । " आणि अशी प्रार्थना देवापाशीं करतो. " तें भाग्य पथाचें द्या हो या जीवाला । " आणि योगायोग असा कीं, त्या घटकेपासून बोरकरांच्या जीवनांत क्रांति झाली. त्यांच्या आयुष्याचें नवें पान उलटलें गेलें. केवळ काव्यांत गुंगत राहणारा त्यांचा आत्मा प्रत्यक्ष जीवनांत उडी घेऊं लागला आणि महात्म्याचा मार्ग अनुसरूं लागला.

आणि गांधीजींची हत्या ! अतिमानुष जीवाचा तो अमानुष अंत ! त्यांचे रहस्य पूर्णपणें उकलणारी कविता अद्याप मराठींत एकहि निर्माण झालेली नाहीं. कविवर्गहि स्तिमित-मुन्न झाला. काव्य रचनेला अवश्य ती प्रशांत मनःस्थिती त्यांना लाभलीच नाहीं. दुःखाचे चीत्कार मात्र कांहीं कांहीं कवींनीं काढले आहेत. बोरकर 'हंसत लावा वज्रटिळा' या कवितेंत

गांधी-हत्येचा परिणाम असा वर्णन करतात, "खिस्त गाळितो मूक आंसवें, दुःखी बुद्ध बुडाला हो। डंख कलीचा सात युगांचा जडला वंशवडाला हो॥"

आणि शेवटी मरून अमर झालेल्या त्या महात्म्यालाच कळवळून ते विचारतात, "या हत्येचें पातक खडतर किती पिढ्यांना जाळिल हो?। कोण तुम्हांविण निज हृदयानें तात! तयांना क्षाळिल हो?॥"

पं. जवाहरलालांवर त्यांनीं अलीकडे केलेली एक कविता तर डॉ. टागोरांच्या उंच पातळिला स्पर्श करणारी आहे.

रसिकता व विरक्ति या दोन्ही वृत्ति बोरकरांच्या काव्यांतून वहात आहेत. राष्ट्रप्रेम व सृष्टिप्रेम या दोन्ही प्रकारच्या रस-धारांनीं त्यांचें काव्य पोसलेलें आहे. पुराण संस्कृति व नवीं ध्येयें यांच्या संगमावर त्यांच्या काव्याचा ताजमहाल उभा आहे. "मज लोभस हा इहलोक हवा" अशी आपली आकांक्षा नाना दृष्टांतांनीं व्यक्त करतांना ते म्हणतात, "शास्त्रांचा अभ्यास हवा, परि मानव्याचा ध्यास हवा॥ तृप्ति नको मज मुक्ति नको पण येथिल हर्ष नि शोक हवा। शोक हवा परि वाल्मिकीच्यापरि सद्रव अन् सश्लोक हवा।? मराठीचे वाल्मिकी बनण्या-इतकी भावनांची संशुद्धि व समृद्धि बोरकरांचे अंगीं बीजरूपानें आहे; तिचा रम्य साक्षात्कार त्यांचें 'महात्मायन' करुन देईल काय?

-•- -•- -•-

देश सोडला तरी ज्यांनीं भाषा सोडली नाहीं, असे मराठीचे अनन्य भक्त अनेक आहेत. त्याचप्रमाणें, धर्म टाकला तरी भाषा टाकली नाहीं असें अतूट नातेंहि मराठीशीं ठेवणारे कांहीं शारदा-भक्त आहेत. त्यांत रेव्हरंड



टिळक यांना आद्य स्थान द्यावें लागेल. मायभाषेचा लळा त्यांना आमरण होता. हिंदुधर्मातून खिस्ती धर्मांत ते गेले, तरी त्यांचें मराठी भाषेवरील प्रेम कायम राहिलें. त्यांनीं स्वतः तर माय-भाषेची सेवा आजन्म अखंड केलीच; पण आपल्या खिस्ती बांधवांचेंहि तोंड इंग्रजीकडून मराठीकडे वळविलें, किंबहुना खिस्ती समाजाच्या बायबलाची व भजनांची भाषा हेंगाडी, बेंगरूळ व अशुद्ध असे; तिचें यथार्थ विडंबन श्री. वरेरकर यांनीं 'संन्याशाचा संसार' या नाटकांत मार्मिकपणें केलें आहे. ते मराठी भाषेचे हाल वाचवून व तिचें धेडगुजरी स्वरूप घालवून शुद्ध-सरस मराठी भाषा खिस्त्यांच्याहि तोंडीं खेळविण्याचें श्रेय रे. टिळक यांनाच. मायभाषेचें आकर्षण जितकें अभेद्य, तितकेंच तिचें आवरण विशाल असतें; हें रे. टिळकांनीं आपल्या कृतीनें सिद्ध केलें. "तुझ्या महोदार सारस्वताच्या महासागरींचा जरी मीन मी" असा अभिमान ते बहात असत.

निसर्गाशीं समरसता

टिळक सृष्टिसौंदर्याचे मोठे भोक्ते होते. 'जें रम्य तें बघुनियां मज वेड लागे' अशा काव्य-वृत्तींत ते रंगलेले असत. त्यांतहि 'पात्र सोन्याचें असो मृत्तिकेचें। वेड मजला आंतल्या अमृताचें' अशी तत्त्वग्राही दृष्टि त्यांची होती. 'शुक्ति न लगे मज हवें खरें मोतीं' अशी रहस्य-स्पर्शी त्यांची बुद्धि होती. निसर्गातील सौंदर्याचे ते शोधक व पूजक होते. निसर्गात त्यांना आपला मित्र, गुरु, ईश्वरहि दिसे. काव्य-वृत्तीप्रमाणेंच धर्म-प्रवृत्तीहि त्यांच्याठायीं लहानपणापासून अखेरपर्यंत अबाधित होती. आणि तशीच देशभक्ति पण. या तीनहि निष्ठा त्यांच्या काव्यांत प्रतिबिंबित झाल्या आहेत. त्यांच्या काव्याचा दर्शनीं दिसणारा गुण म्हणजे सहजता. त्यांच्याइतकी प्रसादपूर्ण काव्य-रचना आधुनिक कवींत दुसऱ्या कोणाचीच नसेल. तांबे किंवा बाल-कवि यांच्याइतकें सुकुमार व मंजुल शब्दांचें साहित्य त्यांच्या भाषेमध्यें नसूनहि ती सहज-रम्यतेमुळें वाचकांचीं मनें जिंकीत जाते. गडकऱ्यांची उत्तुंग व चमत्कृति-जनक प्रतिभा त्यांच्या काव्यांत तळपत नाहीं, उलट त्यांची कल्पकता मर्यादित व उपमा-रूपकादि अलंकार जुनेपुराणेच असतात; तरी त्यांच्या प्रसन्न आत्म्याचें स्वच्छ प्रतिबिंब त्यांच्या काव्यांत पडलेलें असतें व त्यामुळें तें रसिकांच्या आत्म्यापर्यंत जाऊन पोंचतें. जितक्या उंचीवरून पाणी सोडावें, तितकें वर कारंजाचें पाणी चढतें ना? तसेंच कवीचा उद्गार अंतःकरणाच्या जितक्या खोल गाभाऱ्यांतून निघेल, तितका खोल तो रसिकांच्या हृदयांत ठाव घेतो. सुबोध व प्रसादपूर्ण अशा भाषाशैलीनें नटलेलें आणि जीवंत व प्रामाणिक भावनांनीं थबथबलेलें टिळकांचें काव्य म्हणजे मराठी भाषेचें मोलाचें लेणें होय. प्राचीन संत-कवींप्रमाणें त्यांनीं सोप्या भाषेंत, अंतरींच्या तळमळीनें, आपलीं आध्यात्मिक आंदोलनें आपल्या काव्यांत रंगविलीं आहेत.

संस्कृतचें अध्ययन

रे. टिळकांचा जन्म एका धर्मनिष्ठ घराण्यांत झाला. त्यांचे आजोबा

विरक्त वृत्तीचे होते. नारायणाला घेऊन ते रानावनांत जात व नाचत-नाचत भजन करीत. नारायण वामन टिळक १८६२ सालीं रत्नागिरी जिल्ह्यांतील करझगांव येथें जन्मले. महाबळेश्वराच्या पायथ्याशीं हें गांव असल्यानें सृष्टिदेवीशीं त्यांचें नातें बालपणापासूनच जडलें. त्यांचीं पहिलीं सात वर्षें त्या निसर्गाच्या सहवासांतच गेलीं. त्यांच्या आईला काव्य वाचनाची गोडी होती व काव्य-रचनेचीहि सवय होती. ती त्यांच्या वयाचे अकरावे वर्षीं दिवंगत झाली. तरी घराण्यांतील धर्म-प्रवृत्तीचे व काव्य-वृत्तीचे संस्कार नारायणावर बालपणापासून होतच गेले. वडील व्यवसायानें तलाठी व वृत्तीनें कर्मठ होते. नोकरीनिमित्त वाडिलांची बदली होई आणि त्यामुळें नारायणाच्या शिक्षणाचीं क्षेत्रेंहि बदलत. कल्याण येथें मराठी शिक्षण १८६९ ते १८७३ या चार वर्षांत नारायणानें घेतलें. त्यानंतर चार वर्षें त्यांनीं नाशिकास जाऊन स्वतंत्रपणें राहून संस्कृतचें अध्ययन केलें. १८७७ मध्यें त्यांनीं इंग्रजी शिकण्यास सुरवात केली. दोन वर्षांत पांच इयत्ता त्यांनीं पुऱ्या केल्या, इतकी त्यांची धारणाशक्ति अलौकिक होती. पण १८८० मध्यें त्यांना नोकरी धरावी लागली. तशीच दुसरी शृंखला लग्नाची. तीहि त्याच वर्षीं त्यांना अडकवून घ्यावी लागली. त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांना शिक्षणाचे संस्कार नव्हते, तरी नारायणरावांच्या परिस-स्पर्शानें त्याहि काव्य-रचना करूं लागल्या. त्यांनीं लिहिलेलीं 'स्मृति-चित्रें' तर अव्याज-मनोहरत्वामुळें अतुल्य ठरलेलीं आहेत. त्यांना शिकविण्यासाठीं नारायणरावांनीं, न्या. रानडे यांच्याप्रमाणेंच, अपार कष्ट केले.

धार्मिक प्रवृत्ति

नारायणरावांनीं कधीं शिक्षकाची नोकरी केली, तर कधीं पुराणिकाचा पेशा पत्करला कधीं ते कीर्तनकार बनले, तर कधीं कंपाझिटर होण्यातहि त्यांनीं कमीपणा मानला नाहीं. सतरा वर्षें ते निरनिराळ्या गांवीं वेगवेगळे व्यवसाय करीत भटकत होते. १८९१ मध्यें ते नागपुरास संस्कृत ग्रंथांचें भाषांतर व संशोधन करण्याच्या नोकरीस लागले. त्यांना चाळीस रुपये पगार

मिळत होता. पण नारायणरावांना खरा आनंद तें संस्कृत-साहित्याचें रत्न-भांडार लुटतांना होई. संस्कृतमध्यें काव्य-रचनाहि त्यांनीं त्यावेळीं केली. 'ऋषि' नांवाचें एक मासिक त्यांनीं धर्म-चर्चा करण्यासाठीं कांहीं दिवस चालविलें. धार्मिक जिज्ञासेचें वादळ त्यांच्या हृदयांत माजलें होतें. योगाभ्यासहि ते करीत. नवधर्माची स्थापना करण्याची ऊर्मिहि त्यांच्या चित्तांत उसळ्या मारीत असे. अशा स्थितींत—

ख्रिस्ती धर्मांत प्रवेश

नव्या नोकरीच्या शोधार्थ नागपुराहून नोरायणराव आगगाडींतून चालले होते. गाडींत एक उतारू त्यांचेशीं प्रेमळपणें बोलूं लागला. त्यांचे सफेत कपडे व लांबलचक दाढी हीं पाहून नारायणरावांच्या मुमुक्षु मनांत आदर उत्पन्न झाला. तो ख्रिस्ती धर्मगुरु होता. त्यानें आपल्या धर्माचा महिमा मुक्तकंठानें गाइला. हिंदुधर्मांतील कर्मकांडाला व उच्चनीचभावाला विटलेल्या नारायणरावांना ख्रिस्ती धर्माची ओढ लागली. त्या पाद्यानें नारायणरावांचे हातावर बायबल ठेवलें आणि कानांत भविष्य सांगितलें कीं, 'दोन वर्षांत तुम्ही प्रभूचे कृपा-छत्राखालीं याल' आणि तें भविष्य खरें ठरलें! १८९५ च्या फेब्रुवारींत टिळकांनीं हिंदुधर्म सोडला व ख्रिस्ती धर्माचा बाप्तिस्मा घेतला. आपली धर्म-जिज्ञासा शमविणें हा त्यांच्या धर्मांतराचा प्रधान हेतु होताच, पणं त्याशिवाय त्यांचा असाहि ग्रह झाला होता कीं, ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाल्यानेंच हिंदुस्थानाचा तरणोपाय आहे! रामायणाच्या धर्तीवर त्यांनीं 'ख्रिस्तायन' नांवाचें महाकाव्य लिहावयास घेतलें. १९०९ सालीं सुरु झालेलें हें महाकाव्य त्यांना पुढील दहा वर्षांच्या आयुष्यांतहि पुरें करतां आलें नाहीं. त्याची पूर्तता लक्ष्मी-बाईनीं पुढें केली. धर्मांतर केल्यानंतर २२ वर्षें ते नगर येथें राहिले व शांतचित्तानें विपुल काव्य रचत गेले. १९१७ सालीं ते सातारा येथें गेले व १९१९ मध्यें ख्रिस्तवासी झाले. याच वर्षानें गोविंदाग्रज व हरिभाऊ आपटे या प्रतिभा-पुत्रांना काळाच्या पडद्याआड नेलें. टिळक हे 'केशव-सुती' संप्रदायांतले ज्येष्ठ कवि होत. पण वर्डस्वर्थ व टेनिसन यांच्या काव्याची छाप त्यांच्या बऱ्याच कवितावर पडलेली आहे.

सं. नं. ... नि ९१० स्थळ प्रत

प्रवृत्ति-निवृत्ति यांचा वाद

'फुलामुलांचे कवि' ही पदवी टिळकांना मिळवून देणारीं अनेक काव्यें त्यांनीं रचलीं आहेत. त्या सर्वांत आकारानें व गुणानेंहि श्रेष्ठ असें काव्य म्हणजे 'वनवासी फूल'. त्यांत निसर्गाची थोरवी तर सहजच गाइलेली आहे, पण त्याबरोबरच कवीचा महिमाहि सुंदर रीतीनें स्तविला आहे. साधी, सफाईदार व धांवती भाषाशैली असून त्याच्यामध्यें मधून-मधून रमणीय कल्पना सहजतेनें गुंफलेल्या आहेत. या काव्य-सौंदर्याला बाध न आणणारे तात्त्विक विचारहि या सुमारें चारशें ओळींच्या काव्यांत सांठविलेले आहेत. हिंदुसमाजांतील नकली निवृत्तिवाद व त्यांतून बळावणारें नैराश्य व निष्क्रियता यांचें दृश्य टिळकांना एकीकडे दिसत होतें, तर ख्रिस्ती मिशनऱ्यांची सेवाशील प्रवृत्ति व निष्काम भूतदया यांचीं चित्रें त्यांच्या डोळ्यापुढें खेळत होतीं. हे दोन चित्रपट त्यांनीं १९०४ सालीं लिहिलेल्या 'वनवासी फूल' या कवितेंत रंगविले आहेत. जगांतील स्वार्थीपणाला, कृतघ्नपणाला व नीचपणाला विटून एक फूल, हिंदु संन्याश्याप्रमाणें, रानांत जाऊन बसतें व सूर्य, वायु, पाऊस इत्यादि निसर्ग-देवतेच्या लाडक्याशीं खेळत असतें. पण कवि त्या फुलाला भेटतो व जगाची उजळ बाजू त्याचेपुढें मांडतो आणि जगांत राहून आपला उपयोग इतरांस करून देण्यास उपदेशितो. निवृत्ति व प्रवृत्ति या दोन तत्त्वांचा वाद फूल व कवि यांच्या मुखानें टिळकांनीं काव्यमय पद्धतीनें रंगविला आहे.

कवीचें माहात्म्य

त्या कवीची योग्यता किती होती हें सांगतांना ते म्हणतात, "शास्त्रज्ञांच्या, तत्त्वज्ञांच्या पलीकडे संचार। दिक्कालानें अप्रतिहत तो ज्याचा स्वैरविहार॥" या काव्यांतील कवीचें वर्णन कोणत्याहि सत्कवीला लागू पडण्यासारखें आहे. कवीला शब्दामागून शब्द कसे सुचतात? तर वसंतऋतूकडे पक्षी जसे धांव घेतात तसें तें सहज, नैसर्गिक आहे. हें पुढील दोन ओळींत कवि सांगतो, "जसे वसन्ता नवे नवे द्विज तैसे नित्य जयाला। वाग्देवीचे दूत शब्द हो आतुर सेवायाला।"

नुसतें शब्द-भांडारच कवीजवळ असून भागत नाहीं. दुसऱ्याच्या मनाचें यथार्थ आकलन करण्याची शक्तिहि त्याचे ठायीं असावी लागते. फुलांचेंहि मनोगत तो ओळखूं शकतो. " मानसशास्त्रीं पूर्णविशारद सहज कवीची जाति । कुसुमांवरती तशांत त्याची अमोघ, विमल प्रीति ॥

अशा कवीला जगांत मान केवढा असतो ? याचें उत्तर टिळक देतात, " कोण असा जो दर्शन कविचें घडतां हासत नाहीं ? । बोलत नाहीं ? डोलत नाहीं ? प्रेमें नाचत नाहीं ? " त्यांत हा कवि तर अगदीं फूल-वेडा. " आकाशांत फुलें, धरेवरि फुलें, मद्रेहिं सारीं फुलें । " असें सर्वत्र फुलें पहाणाऱ्या टिळकांच्या कल्पनेंतील कवि म्हणतो, " जनांत किंवा वनांत किंवा नभांत सुमनें सारीं. । पायाखालीं फुलेंच सारीं, कमलें हृत्कासारीं॥"

वनवासी फुलाचें मनोगत

आपल्यावर प्रेम करणारा कवि-राज आपल्याजवळ आला आहे, याची जाणीव त्या फुलाला झाली व तें कवीला म्हणालें, " कवीश आपण, ओळखिलें कीं भक्तिरसाचे सिन्धु । वनवासी मी, द्या मज दीना दोनचार तरि बिन्दु ॥ "

त्या फुलानें आपलें ' दो दिवसांचें जीवित ' परमेशाला अर्पण केलें आहे. त्याला मानव-समाजांत जाऊन उद्यानांत डौलांत झुलावें अशी वासना नाहीं. म्हणून ' उद्यानीं मम नाश निश्चयें ! ' म्हणे कवीला फूल !' तेव्हां कवि त्याला उत्तर देतो ' ' वयें तरुण तूं परी अनुभवें दिसशी अजाण मूल ! ' पण दुसऱ्या दृष्टीनें त्या फुलाचा गौरव करण्यासहि कवि चुकत नाहीं. " वैराग्याचें निधान दिसशी मजला भक्तिरसाचें " असें त्याचें स्तवन कवि करतो. त्याला मोठेपणा देऊन, त्याची समजूत घालून, त्याला परोपकाराच्या कर्मयोगाची दीक्षा कवि देऊं पहातो. कवि त्याला जगांत चलण्याचा परोपरीनें आग्रह करतो. तेव्हां एकाद्या विरक्त साधूप्रमाणें, तें फूल जगांत आपण न जाण्याचें कारण निवेदन करतें, " पुन्हा म्हणे सुम सारा स्वार्थी मर्त्यलोक हा आहे । दर्शन राहो दूरच ! याचें नांव न मजला साहे ॥ "

मानवी समाजावर टीका

मानव स्वार्थी आहे याचा अनुभव फुलाला काय येणार ? तर भुंगा त्याच्या हृदयांतील मध चोखून घेऊन जातो व त्या फुलाला पूर्ण विसरतो. हा स्वार्थीपणा सांगतांना फूल म्हणतें, " नित्य करावें पुढें पुढें मधु गाणें गावें । न्यावें लुटून सुरसा, परी शेवटीं ओळख विसरुन जावें ॥ " आणखीहि अनेक पुरावे देऊन फूल जगावर नाना दोषांचे आरोप लादतें; ते असे—" फळें तोंवरी द्विजरायांचें गायन चाले वृक्षीं । सरतां तीं परि परके होती वृक्ष आणखी पक्षी ॥ कार्य साधितो तोंवर मिळती आशीर्वाद घनाला । थोडा चुकतां शिव्याशाप मग नको नकोसें त्याला । " शितें तोंवरी भुतें भोंवतीं " म्हण ही साधी भारी । परि अनुभूती सकल बुधांची हींत ओतिली सारी ॥ जगीं चहुंकडे स्वार्थ, नीचता, मूर्खपणा, अभिमान । हार म्हणोनी सापासाठीं कोण पुढें करि मान ? ॥ "

याच्या उलट, रानांत राहिलें म्हणजे उषेचें स्मित, सूर्याचा स्पर्श, सुगंध वाहून नेऊन फुलाची कीर्ति दिशादिशांना पसरणारा वारा आणि दंवबिंदूंचे मौक्तिकहार घालणारी सृष्टि—यांचा निःस्वार्थी सहवास लाभतो— " सृष्टीही हिममिषें मनोहर नव मोत्यांची जाळी । घाली मजवर सजवी मजला माय तशी प्रतिपाळी ॥ " म्हणून फूल विचारतें, " सोडुन असले मित्र निधी हे निष्काम प्रेमाचे । धूळ जगाची माथां घेणें कोण म्हणे कामाचें ? ॥ "

शेवटीं स्वार्थी, कपटी व नीच अशा जगावर जणुं शापवाणीच उच्चारीत तें फूल म्हणतें, " विचार तैसा उच्चारांचा प्रवाह कोठें वाहे ? । उच्चारांसम आचारांची श्रेणी कोठें आहे ? ॥ मनांत भलतें, जनांत भलतें, तुमचा व्यवहार । कापट्याचा सागर म्हणजे हा तुमचा संसार । " श्रीशंकराचार्यांसारख्यांनींहि जगांतील वैषम्य-नैर्घृण्यादि दोष जाणले होतेच; पण तरीहि जगाच्या उद्धारार्थ त्यांनीं सर्व देशभर संचार, जागृति व संघटना केली. त्याच विचारानें कवि जगाला विटलेल्या व दुरावलेल्या या फुलाला आंजारून-गोंजारून, त्याला महत्त्व देऊन, समाजाच्या

उपयोगीं पडण्याची प्रेरणा देत आहे. ' कला व जीवन ' या वादाचाहि योग्य निर्णय सुंदर रीतीनें टिळकांनीं येथें दिला आहे. त्या फुलाला मोठेपणा देतांना कवि म्हणतो, " तूं शोकाचें भंजन कुसुमा रंजन मूर्त मनाचें । तूं मोहाचें अंजन सुमना व्यंजन आनंदाचें ॥ " अशा आनंददायक फुलानें आनंद देण्याचें आपलें जीवितकार्य टाकून रानांत काळ कंठावा हें दुर्दैवाचें नव्हे काय ?

परोपकाराचा उपदेश

परमेश्वरानें दिलेला सुगंध फुलाच्या हृदयांत जसाच्या तसा वाळून जावा ही जगाची हानि नव्हे काय ? असा प्रश्न विचारून कवि त्याला ' चल मजसंगें, दे, दे सोडून आग्रह हें अज्ञान ' असें विनवितो आणि जगांतील दुसरे दाखले असे देतो, " प्रकाशसृष्टी, चंद्रकुमुदिनी, मेघधरा, तरुवेली । शोभतील का ? नांदतील का जरी निराळीं झालीं ? ॥ " सूर्यानें सृष्टीवर प्रकाश पाडला नाहीं, चंद्रानें कमळें फुलविलीं नाहींत, ढगांनीं आपल्या धारांनीं पृथ्वी भिजविली नाहीं, तर सृष्टींत शोभा ती काय राहिली ? आपल्या नैसर्गिक गुण-संपदेचा उपयोग तो काय झाला ? फुलाचा उपयोग तर मानवाला किती तरी प्रकारांनीं होण्यासारखा आहे. तरुण–तरुणींच्या प्रेम–प्रसंगांत फुलाची कामगिरी किती गोड व मोठी आहे, हें काव्यमय वाणीनें वर्णितांना कवि म्हणतो, ' तुला पाहुनी–स्मरुनी विरही विरहिणिच्या गालाला । तुझेंच सुमना घेइल चुम्बन ! नको निवारूं त्याला । ऐकुनियां तें सखी तयाची होइल वश कोपातें, । ताडिल तुजला, वाहिल वेणी–काल–सर्पिणीला ते । भिऊं नको ! ती नागिणही तुज सुमना ! वश होईल । भूषणसम तुज नित्य आपुल्या फणेवरी वाहील । तूं न जाणशिल तुझ्यामुळें तिज नवीन आली शोभा । जपेल ती तुज परंतु लोभी जैसा अलभ्य लाभा । तुझ्याभोंवतीं नर्तन करुनी स्तवितिल तुज अलि, कुसुमा । परिवार्धित ते करितिल तव ही अनुपम अभिनव सुषमा ॥ "

तसेंच दुःखितांचें सांत्वन, वीरांचा सत्कार, साधूंची पूजा इत्यादि

कायेंहि फूल करूं शकतें. आणि जातिवंत कवीला तर काय ? फुलांत काव्याचें ब्रह्मांड सांठविलेलें दिसतें. कवि आपली भूमिका निवेदन करतो, " फुला ! तुझ्यासम काव्यस्फूर्ती कविना देइ न कोणी । न मीं गायिलीं इतरां कवणां जितकीं फुलांस गाणीं ॥ " अशा फुलाला जगांतील संत-साधुसज्जनांची संगति मिळणें हें त्या फुलालाहि हितकर नाहीं काय ? सत्संगतीचें माहात्म्य वर्णितांना कवि म्हणतो, " चिन्तामणिची, कल्प-तरूची, कामदुधेची महती । नाहीं नाहीं साधुसंगतीपुढें महात्मे वदती ॥ " आणि अशी साधुसंगति जगांत गेल्यानेंच मिळणार. वनांत राहून कशी लाभणार ? परस्परांना आपापला लाभ देण्याचा हा एक यज्ञच विश्वांत चाललेला आहे. वृक्ष, नद्या, ढग, पाऊस, ऊस, चंदन इत्यादि दाखले कवि देतो. जगांतील दुःख हरण करणें हें केवढें उदात्त कार्य ! ' तें तूं करूं शकशील ' अशी जाणीव फुलाला कवि करून देत आहे. सूर्याचीं किरणें पसरतांच अंधाराचीं पुंटें नाहींशी होतात; त्याप्रमाणें प्रफुल्ल व सुगंधी फूल पहातांच मानवाचीं दुःखें विसरलीं जातील, हें पटवितांना कवि म्हणतो, " अश्रु म्हणजे शोकतरूचीं फुलें फुला ! तुज बघतां । लाजुन, जागीं थबकतील रे वेगें पडतां पडतां ! "

सुखदुःखाची मीमांसा

जगांत असें सत्कार्य करण्यास आपण गेलों, तर जगांतील स्वार्थाचा व दुष्टपणाचा त्रास आपल्याला होईल, ही फुलाची भीति ओळखून कवि त्याला समजावितो, " सुख येथें नच, सुख तेथें नच, सुखदुःखाचे कर्ते । औपण ! सुमना ! परमेशाच्या पूर्ण कृपेचे भोक्ते ! "

जग हें सुखदुःखमिश्रित आहे, हें तत्त्वज्ञान पटविण्यासाठीं कवि दाखले देतो, " तृषेवांचुनी पाणी नाहीं क्षुधेवांचुनी अन्न । उष्म्यावांचुन चंदन नाहीं उपभोगार्ह । कदा न ध्वान्तावांचुन सूर्याचाही प्रकाश विश्वीं नाहीं । दुःखावांचुन नको सुखाची, व्यर्थ कल्पना पाहीं ॥ "

अशा सुखदुःमिश्रित जगांत केवळ सुख मिळविण्याचा मार्ग म्हणजे प्रेमाचा. आपलें जीवन प्रेममय करणें हाच सुखी होण्याचा मार्ग. प्रेमशून्य

जीवन म्हणजे केवळ मरण. हा उदात्त विचार विरोधाभास साधून कवि पुढील शब्दांनीं सांगतो, " पुन्हां सांगतों, जीवन आणि प्रेम भिन्न नच । एक प्रेमहीनता मृति, केवळ तो स्वार्थाचा अतिरेक ॥ प्रेमासाठीं सुखा विसरणें हीच सुखाची पूर्ति । प्रेमासाठीं देहविसर्जन हीच खरोखर मुक्ति ॥ " कवीचें हें थोर तत्त्वज्ञान ऐकूनहि फुलाच्या मनांतील निवृत्ति गेली नाहीं. तें त्याला म्हणते, " तुझीं गायनें दिव्य ऐकुं दे इथेंच मजला रानीं. " तेव्हां कवि ' आपण आपलें कर्तव्य केलें ' असें समाधान मानून तेथून जातो. ' तो प्रेमरसाचा ठेवा ' असल्यानें त्या फुलापासून दूर होतांना त्याच्या डोळ्यांतून अश्रु गळाले. ते अश्रु त्या फुलाच्या वेलीनें शोषून घेतले. त्यामुळें त्या फुलाच्या अंगीं कवीची वृत्ति भिनली. " कविमय झालें चित्त सर्वथा विरक्त, वन्य फुलाचें । मागें, पुढतीं, वरीं, खालतीं कवीच अवघा नाचे । " शेवटीं तें फूल त्या वेलीवरून तुटून कवीच्या हृदयांत शिरलें व तेथेंच रमलें. या काव्याचा प्रारंभ, मध्य व अंत सर्वच कांहीं काव्यरसानें थबथबलेलें आणि तत्त्वज्ञानानें भरलेलें आहे.

एक बोधपर प्रेमकथा

अशीच दुसरी दीर्घ काव्य–कथा ' सुशीला ' ही आहे. सुमारें तीनशें ओळींच्या या कथेचें कथानक इतकेंच आहे कीं, सहा महिने शाळेंत राहिलेली सुशीला सुटी झाली म्हणून घरीं आली. त्यावेळीं तिला घरांतील माणसांना भेटण्याची ओढ विलक्षण लागली होती. कारण, " सर्व माझेंपण एकवटें जेथें । जिथें प्रेमाचें राज्य सदाचें तें । स्वार्थकपटाचा लेश नसे जेथें । जगीं उपमा कोणती त्या गृहातें । " अशा त्या निरुपम घरीं-मध्यें सुशीला आली, तेव्हां " बापभावांना हर्ष फार झाला, । मायबहिणींना प्रेमपूर आला । सहा महिन्यांनीं लाडकी सुशीला । परत आलेली पाहुनी गृहाला ॥ सारीं प्रेमळ माणसें. आपल्या शिकलेल्या सुशीलेला कुठें ठेवूं आणि कुठें न ठेवूं असें त्यांना झालें. रात्रभर गप्पा रंगल्या, दिवसा नवीन नवीन खेळ. आनंदाचेंच भोजन सुशीला सारखी करीत होती. " तोंडिं लावाया प्रेमहसित वाचा, । विनोदाचें रायतें पात्रिं

ज्याच्या । मीठ भाकर कोरडी, सुधा त्याला । महाभाग्याच्या धन्य सागराला " प्रेमानें प्रत्येक गोष्ट गोडावलेली. एकाद्या वेलीभोवतीं आळें असतें. त्या आळ्यांत पाणी घातलें व त्यांत वरून ऊन पडलें म्हणजे ती वेल कशी फोफावते ? तशी सुशीला आनंदानें फुगत चालली. हें वेलीचें रूपक कवीनें कसें बसंविलें आहे पहा—" ममत्वाचें खालती आलवाल । वरुन विरहाचें ऊनही विलोल, । आसवांचें जल सदा मिळत राहे, । प्रीतिलतिका जगतांत वाढताहे ! "

बाल्य व तारुण्य यांच्या सीमेवर सुशीला उभी होती. या संक्रमणावस्थेचें वर्णन टिळकांनीं अत्यंत सूक्ष्मतेनें व नाजूकपणानें केलें आहे. " किती किल्ले ती नवे नवे बांधी । किर्ती कार्ये कल्पनाबळें साधी । कंठि बाल्याच्या ठेवुनियां हात । फिरे रमणी तारुण्य-काननांत । " तरीहि ती बाल्यासींच अधिक बिलगलेली होती—' बाल्यासीमेवर हंसत-डुलत ' रहाणारी ती अर्धस्फुट कळी होती. तिच्या घरीं सर्वांत जास्त शिकलेली तीच. त्यामुळें त्या वयांत तिला साहजिकच गर्वाची बाधा झाली.

अहंकाराचा निषेध

घरांतील सर्व मंडळींनीं सुशीलेसाठीं चारुदत्त नांवाचा तरुण वर म्हणून योजला. तो ' अत्युच्च शीलाचा ' असून सुशिलेला सर्वथा अनुरूप होता. विद्येला विनय, मनोवृत्तीला धर्म, प्रीतीला उपकार किंवा शांतीला न्याय भेटावा; तसा सुशीलेला चारुदत्त होता. " जिथें विनयानें परिणिली सुविद्या, । तशी धर्मानें मनोवृत्ति बंद्या । जिथें उपकारा प्रीति माळ घाली । जिथें न्यायाची शांति सखी झाली ॥ पण गर्वांध सुशीलेनें चारुदत्ताला झिडकारलें आणि ती आपल्या भावी पतीचीं काल्पनिक चित्रें काढूं लागली. तथापि चारुदत्ताचें प्रेम एकनिष्ठ होतें. तो तिच्या गर्वाकडे कानाडोळा करी व इतर गुणांचें कौतुक करी. तो " म्हणे ' चंद्राला लागला कलंक । पद्मजन्माचें स्थान नीच पंक; । रम्य रत्नीं काठिन्य भरुन राहे । सदा अस्तोदय तारकांस आहे ॥ " या जगांतील कोणतीहि वस्तु घेतली तरी तिला कोणता ना कोणता दोष

जडलेला दिसतोच. चंद्र किती रम्य पण त्यावर कलंक आहे, कमळ किती कमनीय पण त्याचा जन्म चिखलांत, रत्नाचें तेज डोळे दिपविणारें पण तें फुलासारखें कोमल थोडेंच आहे ? दगडाप्रमाणें कठीण तें असतें. नक्षत्रांची प्रभा किती दिव्य पण त्या सदैव प्रकाशतात कोठें ? दिवसा त्या दिसतहि नाहींत. चंद्र, कमळ, रत्न, तारका—या सर्वांना जसा कांहीं ना कांहीं दोष आहेच, तसा सुशीलेला अभिमानाचा. तो विसरून जाण्याचा निश्चय चारुदत्तानें केला. कारण तो ख्रिस्ताचा खरा भक्त होता असें कवि सांगतो. सुशीलाहि ख्रिस्तभक्तच होती. ती दोन वर्षांनीं घरीं आली. तिच्या गर्वाची कमान चढतीच होती. " स्त्रियांमधला स्त्रीपणा जें हरीते । असो ऐशा धिक्कार शिक्षणातें । " असें म्हणण्याची पाळी तिनें आपल्या वर्तनानें आणली. पहिल्या भेटीच्या वेळचें घरांतील प्रेम, आनंद, गप्पा, खेळ— हें सर्व मावळलें होतें. कारण सुशीलेला आपल्या विद्वत्तेचा गर्व झाला होता. म्हणून कवि विचारतो, " विनय, शांती, धृति, सहिष्णुता, प्रीति, । सदा परमेशीं एकनिष्ठ भक्ति । स्त्रियांचे हें सौभाग्य अहंकारें । हरुन न्यावें विद्वत्त्व हें कसें रे । ? " पण लवकरच सुशीलेच्या गर्वावर उतारा मिळाला. ती परीक्षेंत अपयश पावली व महिनाभर आजारी पडली. त्या आजारांत 'तिचें सारें सौंदर्य लया गेलें.' उलट चारुदत्त परीक्षेंत उत्तीर्ण झाला, सुशीलेवरील प्रेमांत अढळ राहिला. सुशीला मात्र हताश झाली. तिनें आई—बापाला दुखविलें होतें, चारुदत्ताला झिडकारलें होतें. ती रानांत गेली व शोक करूं लागली, "वपू, विद्या, वक्तृत्व, वस्त्र, वित्त । वकारांना या लुब्ध मनुजचित्त । चित्त देवा पाहिजे, नको कांहीं ! । मला देवाविण कुणी जगीं नाहीं ॥ "

ती असा देवाचा धांवा करीत असतांच चारुदत्त तेथें गेला व तिला म्हणाला, " शुक्ति नलगे मज हवें खरें मोतीं । रूप नलगे तव हवी तुझी प्रीती ॥ पात्र सोन्याचे असो मृत्तिकेचें । वेड मजला आंतल्या अमृताचें ॥" बाह्यांगापेक्षां अंतरंगाकडे लक्ष देणाऱ्या चारुदत्ताचे मुखांतून टिळकांनीं आपल्या अढळ प्रेमाचें उदात्त तत्त्वज्ञानच रम्य भाषेनें वर्णिलें आहे. ही कथा जितकी प्रेमपूर्ण आहे तितकी बोधपूर्णहि आहे.

स्त्रीजातीविषयीं आदरभाव

अशा बोधाचे हिरे काव्याच्या कोंदणांत बसवून ते महाराष्ट्र-शारदेला अर्पण करण्यांत टिळकांचा हातखंडा होता. 'माझी भार्या' या काव्यांत त्यांनीं आपली स्त्रीविषयींची थोर भावना प्रगट केली आहे, ती अशी—"नमीतों मातेला—जगत गणितें दैवत तिला; । नमीतों कांतेला—नृपपद उणें जीस तिजला; । नमीतों मैत्रीला—परगृहगताही भगिनिला । नमीतों कन्येला—सतनु ममता तीच विमला ॥"

आपली भार्या आपल्याला सन्मार्गावर कशी नेते हें टिळकांनीं नाजूक शब्दांनीं सांगितलें आहे; तें असें.—"तिचें थोडें थोडें नकळत मला बोध करणें, । मला थोडें थोडें परि दृढ सुमार्गांत धरणें; । तिचें थोडें थोडें अमृतकण सारें चरित तें ! अनन्या रत्नांची खनि मज वृथा ती न दिसते !"

शेवटीं, भार्येच्या ठायीं मित्र, गुरु, शिष्या इत्यादि सर्व नात्यांचा संगम पाहून कवि कृतज्ञतेनें तिच्या पायावर प्रेमाचे अश्रु गाळतो. कालिदासानें 'गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ।' असें कांतेचें वर्णन अजाच्या मुखानें केलें. टिळकहि त्याच भूमिकेवरून म्हणतात, "अरे माझ्या मित्रा, चतुर: सचिवा, हे गुरुवरा, । प्रिये शिष्ये, भार्ये, मम सकल रे पुण्यनिकरा ॥ पहा हे प्रेमाश्रु तव चरणयुग्मीं वितरती । मनोवृत्ती माझ्या मधुसुमनवृष्टीच करिती !"

'बापाचे अश्रु' ही शोकपूर्ण काव्य-कथा सुमारें दोनशें ओळींची आहे. चित्रकार वामन विनायक साठे यांच्या मृत्यूवर लिहिलेली ही एक हृदयस्पर्शी विलापिका आहे. वामनाच्या बाल-लीलांचा चित्रपटच जणु त्याच्या बापाच्या उद्गारांतून कवीनें दाखविला आहे. ऐन तारुण्यांत मृत्यूचा घाला या कलावंतावर पडला. या अनर्थाचें वर्णन कवीनें करुण शब्दांनीं केलें आहे.

निसर्गांतील आनंद

टिळक स्वतःला 'फुलांतले भ्रमर' म्हणत. 'माझें जन्माचि हें फुला

निरविलें ' असें ते सांगत. फुलेंच काय, पण सारें सृष्टि-सौंदर्यच त्यांना ओढ लावी, तन्मय करी, वेडे बनवी. निसर्गांतील लहानलहान सौंदर्यें व माधुर्यें मानवी मनाला किती समाधान देतात; हें सांगतांना ते म्हणतात, " परंतु जेव्हां हृदयाचे । तुकडे होती मनुजाचे, । तेव्हां हीं अल्पेंच तया । सांवरिती दावून दया ॥ " हीं ' अल्पें ' कोणतीं ? मानवी मनाची दारुण निराशा नाहींशी करणारीं हीं अल्प औषधें म्हणजे " उड्या मारिते नदी दुरी । खळ खळ खळ खळ शब्द करी ॥ रम्य डहाळीवर उडुनी । राघू बसतां होय ध्वनि; । वनस्पती भिजवीत झणी । झरा निघाला गिरि-वरुनि । टप टप टप टप शब्द निघे । आनंदें तों जैं वळघे : " नाद व अर्थ हातांत हात घालून चालण्याचा भास या पंक्ति वाचतांना होतो, नाहीं ? पांखरांची चिवचिव, नदीची झुळझुळ, कोकिलेचें कुऊकुऊ–हे सारे ध्वनि म्हणजे—" परंतु जेव्हां चित्ताला । नको जीव आतां झाला । जेव्हां न चले मनुजाचें । तेव्हां भैषज हें साचें ! " हें सृष्टीचें ' गानवादन ' मनुष्याच्या मनाला अपार शांति देतें.

निसर्गाचें मूर्तिमंत चित्र उभें करण्याइतकें सांगोपांग व सुरस वर्णन टिळकांनीं ' पर्वतारोहण ' या कवितेंत केलें आहे. वाईपासून पांचगणी-पर्यंत जातांना एकीकडे एकाहून एक उंच डोंगर दिसतात तर दुसरीकडे खोल खोल दऱ्या दिसतात. त्यांचें वर्णन रूपकादि अलंकारांच्या साहाय्यानें टिळकांनीं किती मनोरम केलें आहे, पहा—" हा वैभवनाशें खिन्न दिसेना जरा ! हा गांभीर्याचा पुंज उभा साजरा । घे यांतुनि थोडें अगा मना पामरा, पृथ्वीवर हा वसे परंतु सारी दृष्टी वरी । इकडे पर्वत इकडे दरी ! । " तसेंच " घाट पाट जणुं शोभेचा वहात आला दिसे, । कांची वनदेवीची वसें; । शूर शिपायी अपुला म्हणुनी सृष्टी ज्या देतसे, । असा हा पट्टा गिरिचा असे; । कीं भांग सृष्टिच्या विचलित वेणींतला । कीं अंतःपट हा गिरि–दरि–युग्मांतला । हा कुंकुम पडुनी ईषदरुण जाहला । वरखालीं वा जाण्या पथ हा नरजन्माचे परी । इकडे पर्वत इकडे दरी. ॥ " डोंगरांतील घाट म्हणजे वनदेवतेचा कमरपट्टा आहे ? कीं सृष्टि-देवतेचा केसांतील भांग आहे ? किंवा शिपायाच्या तरवारीचा पट्टा

आहे ? अथवा डोंगर व दरी या जोडप्याच्या लग्नांतील अंतरपाट आहे ? अगर स्वर्ग-मृत्यूचा जिना आहे ? अशा एकाहून एक सुंदर उत्प्रेक्षांची माला कवीनें सुगम शब्दांनीं व ललित शैलीनें गुंफली आहे.

साहित्याची जादू

सृष्टिदेवीच्या अंतरंगांत शिरतांच रसिकाची सारी दृष्टि, सारी वृत्तिच कशी फिरून जाते आणि त्याला नव्या सौख्याचा अनुभव कसा येतो, नवींच दृश्यें त्याला कशीं दिसूं लागतात, याचें भव्य-रम्य वर्णन टिळकांनीं एका कवितेंत केलें आहे. ' अतां कोण्या वसंताचें म्हणूं सांगा मला गाणें ? ' असें ऐटदार नांव त्या कवितेचें आहे. तिची अखेर 'तरी आतांहि गाईन तया रागामधें संज्ञा जया देतां तुम्ही मौन' अशी सूचक केली आहे. प्रसाद तर आरंभापासून अंतापर्यंत सर्व काव्यांत भरलेला आहे. चालहि लयबद्ध असून लाटानुप्रासांचे घुंगुर तिच्या पायांत बांधले आहेत. कवि सांगतो, " वनीं एका दिनीं गेलों पहायाला वसंताला। विचारीतां कुणालाहि नसे ठावें कुठें गेला ॥ मनीं नाहीं, जनीं नाहीं, वनीं भेटेल आशा ही। मला होती; परी आशा दुजी स्वप्नाहुनी नाहीं ॥" रानांत वसंत भेटला नाहीं, म्हणून निराश झालेला कवि घरीं यावयास निघाला. तों त्याला हाक ऐकूं आली. एका देवतेनें कवीचा हात आपल्या हातांत घेतला, तेव्हांचा कवीचा अनुभव असा—" अहो ! दिव्याहुनी दिव्य स्वरुपाची जणूं खाणी। ब्रह्मांड गोलाची उभी तेजस्विनी राणी ॥ तिला पाहून स्वत्वाचें त्यजी सारें मला भान। कुणा ठावें कुठें होती वपू होते कुठें प्राण ॥ " ती तेजस्वी देवता पाहतांच कवीचें भान हरपलें, आपलें शरीर कोठें आहे ? जीव कोठें आहे ? याची कशाचीच शुद्ध त्याला राहिली नाहीं. पण त्या देवतेनें कवीला प्रेमानें गोंजारलें. तेव्हां ' क्षणार्धी मी बने मूल.' त्याला त्या देवतेनें मांडीवर घेतलें, त्याच्याकडे प्रेमानें, हंसत पाहिलें. कवीला असा चमत्कार दिसूं लागला, " फुलें सारींच नक्षत्रें; खडे सारे हिरे मोतीं। भरे सौंदर्य हें विश्वीं, भरे नेत्रीं भरे चित्तीं। " निसर्गाचा प्रभाव तो हा ! आणि सरस्वतीचें, साहित्याचें

कार्यहि हेंच ! प्रतिभाशाली कवि फुलांनी नक्षत्रें, खड्यांना हिरे आणि मानवांना देव बनवितात, हेंहि या कवितेंत सूचित केलें आहे, नाहीं कां ?

विश्वव्यापी प्रेम

' सृष्टीची भाऊबीज ' ही कविता टिळकांच्या साऱ्या निसर्ग-काव्याचा कळस आहे. त्यांत त्यांचें प्रेम, प्रसाद व प्रतिभा हे तीनहि काव्यगुणांचे 'प्र'कार प्रकर्षानें प्रगट झाले आहेत. ' चंद्रकांत राजाची कन्या ' ही साधी पण धांवती चाल आणि सोपेसोपे शब्द व साधेसाधे अलंकार– असा बाह्यवेष असूनहि या कवितेंतील सौंदर्य–दृष्टि व भाव-वैभव अलौकिक आहे. पृथ्वी व द्यु ही बहिण–भावाचो जोडी भाऊबीज साजरी करते, हें सांगतांना कवि म्हणतो, " भाउबिजेची करी तयारी चार मास धरणी । ' रुसुनी हसुनी घेइ हवें तें जलदापासोनी ॥ " जिकडे दृष्टि फेकावी, तिकडे सृष्टीमध्यें बहीण-भावांचें शुद्ध प्रेम क्रीडा करीत असल्याचें कवीला आढळतें. नदी ही बहीण व झाडें हे भाऊ. लाटांचीं तबकें हातांत घेऊन नदी भावांना ओवाळते आणि झाडें आपल्या बहिणींना फुलांची ओवाळणी घालतात. ज्यांच्याजवळ फुलें नाहींत, ते नुसती मान डोलावून आपलें प्रेम दाखवितात–आणि त्यानेंही नदी प्रसन्न होते. ही कल्पना कवीनें किती नाजूकपणें मांडली आहे, पहा—" निजलहरींच्या मिषें नदी ही तरुंना ओंवाळी । कुणी एक, कुणि अनेक, सुमनें ओवाळणि घाली ॥ ज्यांच्या-जवळीं कांहि न द्याया तरु ते डोलोनी । प्रेम दावितीं; स्वीकारीं तें सरिता हांसोनी ॥ " जल-लहरी या बहिणी; त्यांचा भाऊ कोण ? तर फेस. म्हणून " लहरी अपुल्या शिरीं घेउनी कोमल फेनाला । कशा नाचती ! खेळविती लघु, रम्य भाउबाळा ॥ " कवि लाडिकपणानें एका फुलवेलीला विचारतो, "फुलवेली, मम कानामध्यें सांग गडे ! पाहूं । भावांमध्यें कोण तुझा गे आवडता भाऊ ? ॥ " आणि कवि आपणच सुचवितो कीं, वृक्ष हा तुझा भाऊ असेल. तेव्हां ती वेल त्याला झिडकारून उपरोधिकपणें व श्लेष साधून म्हणते, "पुरे पुरें झालें, ज्ञान तुझें बा कविकुळटिळका." वृक्ष हा तर वेलीचा पति, बंधु नव्हे; असें ती वेल कवीला समजावते.

तेव्हां भुंगा हा तुझा भाऊ कां ? असें कवि विनोदानें विचारतो. त्यावर वेल फणकाऱ्यानें उत्तर देते, " भुंगा म्हणजे भिक्षुक नि भाट ! ' तसेंच, ' वारा, सूर्य, ढग हेहि माझे भाऊ नाहींत ' असें वेलीनें सांगून टाकलें; आणि ती–"म्हणे ' वेलिंना ओव्या गाई कोण सांग पाहूं ? भाउबिजेला तोच भेटला आज सखा भाऊ । ' संपलें ! वेलीचें व कवीचें संभाषण येथें संपलें : आणि त्यांतच सूचित झालें कीं, टिळकासारखा फुलवेडा कवि हाच वेलीला आपला भाऊ वाटतो. तो आपल्या बहिणीच्या घरीं आला आहे आणि प्रेमाच्या नजरेनें इकडेतिकडे पहात आहे. त्यामुळें त्याला बारीकबारीक, साधींसाधीं फुलेंहि हिऱ्यासारखीं वाटतात. " हे पाचूचे खडे, हिरकण्या सुंदरशा इकडे । नीलमणी हे, कण सोन्याचे, चित्रमणी तिकडे ॥ हीं गवताचीं, भूमिलतांचीं फुलें जनां दिसती । दिसोत; यांची कविच्या नयनां ओळख परि पुरती । "

मानसिक वैभव

आपल्या कल्पनाशक्तीचे विशाल पंख पसरून कवीनें भावाबहिणीची आणखी एक भव्य जोडी शोधून काढली. ती म्हणजे " हीं कालाचीं दोन लेंकरें सुंदर दिनरजनी । व्यवसायी बहु भाउराय परि शांत पुरी भगिनी ॥ दिवस हा भाऊ व रात्र ही बहीण. भाऊ सदैव उद्योगी व बहीण स्वभावानें शांत. असे प्रेमाचे खेळ बाह्य सृष्टीमध्यें अनंत चालू आहेत; आणि तसेंच अंतःसृष्टीमध्यें-मानससृष्टीमध्येंहि सुरू आहेत. ते पहाण्याची दृष्टि मात्र पाहिजे. ती टिळकांजवळ होती, म्हणून ते म्हणतात, " अन्तःसृष्टीमधें पहा हो चला काय चाले, बंधुभागिनीच्या प्रेमरसाला किति भरतें आलें. ॥ " अहंवृत्ति ही बहीण व हर्ष हा भाऊ; भक्ति ही बहीण व विश्वास हा भाऊ, आणि शेवटीं दिवाळी ही बहीण व व्यवसाय हा भाऊ–अशा भावाबहिणींच्या जोड्याचें प्रेम चराचरामध्यें पहावयास टिळकांनीं रसिकांना शिकविलें. त्यांच्या मनांत सृष्टि सदैव खेळे-जशी मानससरोवरांत हसी. त्यामुळें ' अधळा झालों तरे ' आपलें कांहीं नुकसान होणार नाहीं असें टिळक म्हणतात. " सृष्टीचें मधु बाह्य रूप न

दिसो डोळ्यांस चिंता न तें। ती हंसीसम मानसीं मम सदा सानंद हो खेळते!" असें सांगून त्यांनीं मानवाच्या जीवन-मूल्यांचें जें दर्शन घडविलें आहे, तें महत्त्वाचें आहे. ते विचारतात, "जरी नेत्रें गेलीं तरि अनुरती काय सरली?। जरी नेत्रें गेलीं तरि मति मला का विसरली?। जरी नेत्रें गेलीं तरि हृदय कां हरपलें?। जरी नेत्रें गेलीं तरि अशुभ तें काय घडलें? ॥" मनुष्याचें मनुष्यपण त्याच्या प्रीतीमध्यें, बुद्धीमध्यें, भावनांमध्यें सांठविलेलें आहे. तें सारें अंधळ्याच्या ठायींहि शाबूतच असतें. मग डोळे तेवढे गेले म्हणून काय अनर्थ ओढवला? असा प्रश्न कवि करतो. अशी समतेची, अद्वैताची, प्रेमभावाची सारंगी कवीच्या अंतरंगीं सदैव वाजत असते. तो म्हणतो, "अन्तर्यामीं गडबड जंगी। तिथेंहि वाजे परि सारंगी ॥ नका कोणती पुसूं मला, । ठाऊक ती माझी मजला. ॥"

समतेचा संदेश

या उच्च व उदात्त भूमिकेवर उभा असलेल्या कवीला हा थोर, हा लहान असला भेदभाव कसा जाणवणार? 'कारण मी वेडा नुसता' या कवितेंत कवि आपला समभाव पुढील शब्दांनीं वर्णन करतो, "सोडा अवघा राग अतां। ओळखून घ्या मज पुरता। गिरिशिखरावर उभा असो, । दरींत किंवा कुणी वसो; । समान दोघेहि मजला; । कारण, मी पुरताच खुळा। 'वरी खालती'। जगांत म्हणती, । परंतु दिसती। एकच मज अवघी सत्ता!। कारण मी वेडा नुसता!"

देव देवळांत किंवा देव्हाऱ्यांत नसतो, तो सर्व विश्वांत विस्तारला आहे. मानव तेवढे देव व त्यांची सेवा म्हणजे देव-पूजा, असा नवा मानवधर्म टिळकांना मान्य आहे. ते 'लोक-मित्र' या कवितेंत म्हणतात, "जनसेवा। ही ईश्वरसेवा। याविण दुसरा हेतु न ठावा, । प्रेम आणखी देव दिसावा। एक सदा ज्यातें।"

मानवी कर्तृत्वाचा हुंकार

मानवी कर्तृत्वाचें बल व महत्त्वाकांक्षेचें क्षेत्र यांचें वर्णन टिळकांनीं अत्यंत आवेशपूर्ण भाषेनें व विशाल मनोवृत्तीनें केलें आहे. 'पुरें जाणतों

मीच माझें बल' या स्वाभिमानपूर्ण नांवाच्या कवितेंत ते गरजतात, " हा एक कक्षेंत छावा गजाचा, दुजीमाजि हा सिंह केकावतो। हा जाहला अर्धमेला भयानें। लपोनी महाव्याघ्र डोकावतो; । हे पर्वतांचे उभे क्षुद्र धोंडे महासागरांचे पुढें पल्लव । बोला हवें तें, मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बल॥' एका बगलेंत हत्ती तर दुसरींत सिंह, असे धरून हा 'भरत' वाघांना व पर्वतांना व समुद्रांना क्षुद्र लेखतो. मनुष्याला आत्मसामर्थ्याची जाणीव देऊन त्याला परिस्थितीवर स्वामित्व गाजविण्यास प्रेरणा देणारी अशी कविता मराठींत दुसरी क्वचितच असेल. कवि शेवटीं म्हणतो, " मी ओळखीलें मला पूर्ण; आतां कशाला मला पाहणें आरसे ?। माझ्यापुढें नित्य आत्मानुभूती; पहावे दुजे तर्क आतां कसे ? "

अशाच स्फूर्तीनें रसरसलेलें टिळकांचें दुसरें काव्य म्हणजे ' रणशिंग '. केशवसुतांची ' तुतारी ' पुढें ठेवून तें लिहिलेलें उघड दिसतें. अनुकरण असलें, तरी त्यांत टिळकांनीं आपलें स्वत्व प्रगट केलेलें आहे. 'बोंबाबोंब' या कवितेंत अशीच शिकवण आहे. केशवसुतांच्या ' नवा शिपाई ' प्रमाणें टिळकांनीं 'ब्राह्मण किंवा महार' ही कविता रचली. तींत ते म्हणतात, " मी ब्राह्मण वा महार मी,। गणीं न कवणालाच कमी ।" ही समतापूर्ण दृष्टि ठेवून मनुष्यत्वाला मोठेपण ते देतात—" या सृष्टींतिल दिव्यपण । तेंच तेंच हें मनुजपण । मांगल्याची ही ठेव । हीस्तव देईन मी जीव ॥ "

अढळ देशभक्ति

मानवधर्माची ही पताका खांद्यावर असली, तरी देशभक्तीची पाऊलवाट टिळक विसरले नव्हते. ते खिस्ती झाले तरी गर्वानें गर्जून सांगतात, " हिंदभूमि माझी जननी । आले हीच्या कुशींतुनी–। हिरेच अवघे माझे ते । मन्मन त्या मोहुन जातें। मलांत पडले। खनींत दडले। मुकुटीं जडले। अवघे उचलुन घेइन मी । जन्मभूमिसेवाधर्मीं ॥ पांच कशाचे, हे जितुके। हिंदभूमिबालक तितुके । मम देहाचे प्राण खरे । कसेहि असले तरि सारे ॥" जेवढे म्हणून हिंदमातेचे पुत्र, तेवढे सारे माझे प्राण–ही भूमिका धर्मांतरित होऊनहि टिळकांनीं आमरण ठेवली. ' तूं खिस्तरूप हो ' असें

जें ध्येय आपल्याला पटलें, तें त्यांनीं कोठें कोठें मांडलें आहे. पण स्वदेश व स्वभाषा यांचा विसर त्यांना कधींच पडला नाहीं-त्यांचा अभिमान त्यांनीं कधींच सोडला नाहीं. 'माझ्या जन्मभूमीचें नांव' या डौलदार कवितेंत तो देशभाषेचा अभिमान, हत्तीच्या सोंडेतून उडणाऱ्या जलधाराप्रमाणें, नाचत आहे. "तुझ्या महोदार सारस्वताच्या महासागरींचा जरी मीन मी। झालों तरी गे तृषा मन्मनाची कधींही कधींही न होणें कमी। आई! गुरुस्थान अंतीं जगाचें तुझें! यांत शंका न कांहीं जरी। सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं न कोठें तरी!॥"

भारतमातेचें वाङ्मय समुद्रासारखें अपरंपार; त्यांतील मी एक मासा आहें; समुद्रांत राहिलों तरी माझी तहान भागलेली नाहीं अशी आपली भूमिका निवेदून कवि राष्ट्रमातेला उद्देशून म्हणतो, "तूं साऱ्या जगाची गुरु आहेस. तुझ्याइतकें सामर्थ्य साऱ्या जगांत दुसऱ्या कोणापाशीं नाहीं." या माझ्या देशांतील अन्नपाणी म्हणजे अमृत होय, या भावनेनें उचंबळून येऊन कवीचें मन म्हणतें," वारा तुझ्या स्पर्शेनें शुद्ध झाला मला लाधला! भाग्य हें केवढें। माते! स्वयें देशि जें अन्नपाणी, सुधा बापुडी कायशी त्यापुढें। तूं बाळगीशी मला स्कंधिं-अंकीं! सुखाची खरी हीच सीमा पुरी! सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं न कोठें तरी!"

'जो जननीचा, जो जनकाचा गे तोच तुझाही मान' असा गौरव करून कवि 'प्रियकर हिंदीस्तान' मध्यें देशप्रेमाचें गीत गातो, तें असें- "प्रियकर हिंदीस्तान। अमुचा प्रियकर हिंदीस्तान। हा अलंकार हो भूगोलाचा। यास नसे उपमान। सर्व सुखाची खाण। अमुच्या सर्व सुखाची खाण॥ हें अभिमानाचें, सौभाग्याचें अमुच्या रम्य निधान॥"

बालमनाचें स्वरूप

फुलाइतक्या मुलावर कविता टिळकांनीं केलेल्या नसल्या, तरी दोहोंची रम्यता व मृदुता समानच आहे. 'लेकराची जिज्ञासा' या कवितेंत मुलांच्या चौकस स्वभावाचें शब्दचित्र त्यांनीं रेखाटलें आहे व शिक्षकाचें महत्व वर्णिलें आहे. ते म्हणतात, "हा बाळ पाहून अनेकविधां पदार्था।

नाचे हसे पुसतसे वाडिलास अर्था । जिज्ञासु हा सकल विश्व शिकावयाला । तो धन्य ! तो सुकृति ! जो शिकवील याला ॥ " बालकाचें मन विकासशील असतें हा विचार टिळक निरनिराळ्या रूपकांनीं खुलवून कसा सांगतात, पहा—" हें फूल पाहत असें उमलावयाला । हें चंद्रबिंब चढतें उदयाचलाला । बाहेर अंकुर निघो बघतो द्रुमाचा । होतो विकास शिशुच्या मृदु मानसाचा ॥ " याच रूपकांचा विस्तार करण्याचेंहि चातुर्य टिळकांनीं दाखविलें आहे, तें असें—" जो होउनी अनिल हें फुलवील फूल । सारील दूर शशिचें घनमेघजाल । कीं अंकुरास जल जो पुरवील माळी । तो धन्य यत्करगता शिशुबुद्धि झाली ॥ " शिक्षकाचें कर्तव्य कोणतें व त्याचें महत्त्व काय ? याचें यथार्थ स्वरूप सांगणाऱ्या या चार ओळी कोणत्याहि विद्यालयाचे शिरोभागीं पिंपळपानाप्रमाणें ब्रीदवाक्य म्हणून शोभणाऱ्या नाहींत काय ?

' एक अमेरिकन मुलगी ' कशी दिसत होती, याचें मनोहर शब्दचित्र टिळकांनीं रेखाटलें आहे, तें असें—" वाटे उषाच हसते फिरते जगांत । कीं स्फूर्ति हीच कविची मधुरूप घेत । अव्याजता रसिकता जणुं मूल झाली । स्वर्गातुनी सहज भूवर आज आली ॥ " वात्सल्यानें ओसंडणाऱ्या टिळकांच्या हृदयांतून निघालेले बोल ' माझी ताई ' या काव्यांत ऐकावयास मिळतात. लडिवाळपणानें कवि म्हणतो, " ताइ, तूं फूल गडे माझें । ताइ, तूं नक्षत्रचि माझें । ताइ, तूं रत्न गडे माझें । ताइ, तूं पांखरुं गे माझें । या सर्वांहुन गोड गोड गे शील–रूप तूझें । यांची उपमा नच साजे ॥ फूल हें हसतें, तूं हसशी । परी तव अर्थ किती हास्यीं । काय फुलाच्या मला पाकळ्या दावितील मौजे । जसें हे ओठ गडे तुझे ॥ "

केशवसुत हे टिळकांचे जसे गुरु; तसे बाल–कवि हे त्यांचे शिष्य. त्यांचेवर त्यांनीं पुत्राप्रमाणें प्रेम केलें. टिळकांच्या घरींच बालकवि रहात. त्यांचें कवि-मन टिळकांच्या व त्यांच्या पत्नींच्या वत्सल रसावर सारखें पोसत गेलें. एकदां बालकवि नगरहून पुण्यास गेले असतां टिळकांनीं एक भावनापूर्ण कवन रचलें. त्यांत ते आर्तस्वरानें कळवळून विचारतात—

" पांखरा ! येशिल का परतून ? । मत्प्रेमानें दिल्या खुणांतुन । एक तरी अठवून ? । हवेसवें मिसळल्या माझिया । निःश्वासा वळखून ? । वाऱ्यावरचा तरंग चंचल ! जाशिल तूं भडकून ! थांब, घेउं दे रूप तुझें हें । हृदयीं पूर्ण भरून । जन्मवरी मजसवें पहा ही । तव चंचूची खूण ! विसर मला, परि अमर्याद जग । राही नित्य जपून । ये आतां घे शेवटचें हे । अश्रू दोन पिऊन ॥" या लहानसर काव्यांतील शब्दांचें नाजूकपण वर्णावें, कीं भावनेचें हळुवारपण स्तवावें ? हेंच कळेनासें होतें.

कवीची भूमिका

स्वतःच्या काव्याला टिळक किती कोमल मानीत, जिवापाड जपत, याचें सुंदर चित्र 'कवीची विनवणी' या कवितेंत पहावयास सांपडतें. तांबे यांनीं 'कुस्करूं नका हीं सुमनें' अशी रसिकांना प्रार्थना केली आहे. तीच भावना टिळकांनीं निराळ्या भाषेनें व्यक्त केली आहे, ती अशी—" पहा ! उघडिलें हृदयाला, । यांत दुखें घाला भाला ! कोमल, कौशल्यें नटला । कर तुमचा जरि किति असला । तरी तयानें । माझीं कवनें । जरा स्पर्शणें सहन न होणें कधिं मजला ! । याहुन जीव बरा गेला ! ॥ कारण, कवनें नच माझीं । नच तुमचीं,—मी गातों जीं । हीं निःश्वसितें । कोण सोडितें । मम हृदयीं तें—। विचारुनी; भिउनी त्याला । पुढें करा मग कर अपुला ॥" आपलीं कवनें म्हणजे आपल्या हृदयाचीं स्पंदनें. म्हणून त्यांना स्पर्श करूं नका; त्यापेक्षां माझ्या छातींत भाला खुपसून मला ठार करा, असें कवीचें सांगणें आहे. याचा अर्थ त्याला रसिक नको आहेत असा मात्र नव्हे. उलट 'कवि आणि रसज्ञ' यांचें नातें किती जवळचें असतें हें सांगतांना तो म्हणतो, " कमला रवि चंद्र चंद्रकांता, । जल मीनाप्रति, वाक्प्रवाह अर्था, । कवितेस रसज्ञता, न झाली । क्षणही हीं कधिं युग्मकें निराळीं ! ॥" कमल व सूर्य, चंद्रकांत व चंद्र, मासा व नदी, वाणी व अर्थ याप्रमाणें कविता व रसिक यांचें नातें अतूट आहे.

कवीला स्फूर्ति कोठून येते ? त्याला प्रतिभा कशी वश होते ? त्याच्या हातून कविता कशा निर्माण होतात ? या नेहमींच्या प्रश्नांचीं उत्तरें प्रश्ना-

च्याच स्वरूपांत देणारी 'कवि' ही टिळकांची कविता अतिशय प्रसन्न आहे. तींत ते विचारतात, "न कळे कोठुन होते लतिकेच्या ठायिं पुष्प-परिपूर्ति, । न कळे केव्हां कैशी होते कवीच्या मनाप्रति स्फूर्ति । न कळे कोठुन येती द्विजराज नवे वसंतकालीं ते । न कळे कोठुन येती धावत तव शब्द भेटण्या कविते । न कळे कोठुन येतें शोभा द्यायास हास्य अधराला । न कळे कोठुन येतो प्रसाद कविच्या नवीन काव्याला ॥"

भक्तिरसाचे कल्लोळ

जाति–धर्म–देशाच्या वर आकाशाप्रमाणें साहित्य पसरलेलें असतें, याची प्रचीती टिळकांची कविता वाचतांना येते. फादर स्टीफन्स या खिश्चन कवीनें पूर्वी 'जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी । कीं परिमळामाजीं मोगरी । तैसी भाषांमाजी साजिरी । मराठिया' अशा अलंकारिक भाषेनें मराठीचा महिमा गाइला होता. पण स्वतंत्र व सरस अशी काव्यरचना करून मराठी भाषेला संपन्न व समर्थ करणारे रे. टिळक हेच पहिले ख्रिस्ती कवि. त्यांनीं तीस वर्षें सतत विपुल काव्य–रचना केली. त्यांत सृष्टिप्रेमानें ओथंबलेलीं कवनें प्रमुख आहेत. इतर कवनामध्यें शृंगार, करुण व वत्सल हे रस खेळत आहेत. भक्तिरसाचे कल्लोळ असे अभंगहि त्यांनीं रचले आहेत. प्रसन्न भाषा व प्रेमळ भावना या दोन गुणामुळें त्यांचा 'अभंगांजलि' हृदयंगम झाला आहे. "तुझ्या पडोनियां गळां । कंठ करोनी मोकळा ॥ रडावेसें मला वाटे । ऊर वारंवार दाटे ॥ येई प्रभुराया येई । धरी मला ये हृदयीं ।" अशी तळमळीची वाणी या अभंगांतून ऐकूं येते. ख्रिस्त असो वा कृष्ण असो,—भक्ताचा आर्त धावा रसिकांच्या अंतःकरणाचा ठाव घेतो.

टिळकांच्या कल्पनेंत उत्तुंगता किंवा नावीन्य नसतें, पण सहजता व रम्यत्व असतें. 'अनल जसा अनिलानें' 'नक्षत्रा घन जैसे', 'दुर्गिध तक्राच्या बिंदुसे जहालें' अशा जुन्या कल्पनाच त्यांनीं अनेक ठिकाणीं मांडल्या आहेत. गोविंदाग्रजांच्या कल्पकतेमधील नावीन्याचें यौवनसुलभ तेज टिळकांच्या लेखणींत जसें नाहीं, तसेंच केशवसुतांची क्रांतिकारक तडफहि

नाहीं. पुनरुक्ति करून पाल्हाळ करण्याचे व कवितेला 'तात्पर्याची' जोड देण्याचे दोष त्यांच्या काव्यांत आहेत. क्वचित् संस्कृतप्रचुर किंवा क्लिष्टहि शब्द-रचना किंवा वाक्यरचना ते करतात, पण सामग्र्यानें पहातां प्रसादपूर्ण शब्द-रचना व प्रेमळ भावना यांचा संगम घडविणारा टिळकाइतका यशस्वी कवि आधुनिक मराठी कवींमध्यें दुसरा कोणीच झाला नाहीं हें निर्विवाद.

बॅ. सावरकर : : : : ३२

एकाद्या जाग्रत ज्वालामुखीच्या पोटांत रटरटा शिजणारा जो जळजळीत अग्नि-रस असतो, त्यानेंच जणु कांहीं आपलें काव्य बॅ. सावरकर लिहीत असतात. ' विनायक ' या नांवानें त्यांनीं दहा हजार ओळींहून



आधिक भरेल, इतकी विपुल काव्य-रचना केली आहे व " वैनायक " नांवाचें नवें वृत्तहि घडविलें आहे. विनायकाचे-म्हणजे गरुडाचे-इतर गुणहि त्यांच्या काव्यांत ओतप्रोत भरलेले आहेत. गरुडाची भरारी जितकी उंच, तितकीच सावरकरांची कल्पकता; गरुडाची झेप जितकी जोरदार, तितकीच सावकरांची भावना विशाल, आणि पंखांची फडफड करीत अंतराळांतून धावणाऱ्या गरुडाचा जसा विलक्षण वेग, तशीच सावरकरांचीं ओघवती व ओजस्वी भाषाशैली. गरुडाचें उड्डाण अमृत-कुंभाच्या प्राप्तीसाठीं, तसेंच सावरकरांचें काव्य-लेखन स्वातंत्र्य-लाभार्थ. अशा अलौकिक गुण-संपदेमुळें या विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत तरी बॅ. सावरकरांइतका प्रतिभाशाली कवि मराठींत दुसरा कोणीच ठरत नाहीं. सरस्वतीच्या उद्यानांत कोणी कवि कोकिल असेल, तर कोणी मयूर असेल, कोणी चंडोल असेल तर कोणी भारद्वाज असेल; कोणी शुक असेल-काकहि असेल; पण पक्षिराज गरुडाचें स्थान विनायकराव सावरकर यांचेंच.

कवित्वाचे अंकुर

श्री. विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म भगूर यां गांवीं ता. २८ मे १८८३ रोजीं झाला. 'माला' कार चिपळूणकर यांना दिवंगत होऊन यावेळीं नुकतें एक वर्ष झालें होतें; त्यांच्या 'निबंधमालेचे' पडसाद अद्याप मराठी हृदयांत जोरानें उमटत होते. सावरकरांनीं 'निबंधमाले'चीं पारायणें लहानपणींच कित्येक वेळां केलीं होतीं. मराठ्यांच्या बखरी अनेकवार वाचून ऐतिहासिक पुरुषांपासून त्यांनीं स्फूर्ति मिळविली. प्राचीन काव्याचा सुरस 'भेला' असलेलें 'नवनीत' तर त्यांनीं बहुतेक तोंडपाठच केलें. वक्तृत्वकला त्यांच्या जिव्हेवर नर्तन करीत असे! काव्यशक्तीहि त्यांच्या ठायीं बालपणापासूनच अंकुरित झाली होती. दहाव्या वर्षीं त्यांनीं एक पोथी रचिली आणि बाराव्या वर्षीं त्यांचा स्वदेशाचा फटका 'जगद्धितेच्छूं' त प्रसिद्ध झाला. 'सर्व पेशव्यांत थोर पेशवे कोण व कां?' हा निबंध सतरावे वर्षीं त्यांनीं लिहिला. 'करमणूक' पत्रानें लावलेल्या चढाओढींत तो सर्वश्रेष्ठ ठरून त्याला बक्षीसहि मिळालें.

वयाच्या पंधराव्या वर्षीं! समोर अष्टभुजा भवानीची मूर्ति आहे, नीरांजनाचा प्रकाश पडलेला आहे, रात्रींची गंभीर शांतता पसरलेली आहे, रोहिडेश्वरापुढें स्वराज्याची शपथ घेणाऱ्या बाल–शिवाजीची मूर्ति चित्तांत खेळत आहे, अशा वेळीं विनायकानें देवीच्या चरणावर हात ठेवून प्रतिज्ञा केली कीं, "देशाचें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं सशस्त्र क्रांतीचा केतु उभारून मी मारतां मारतां मरेतों झुंजेन."

लेखनकला व वक्तृत्वकला

पंधरावे वर्षीं सावरकरांनीं गणेश–उत्सवांत प्रकट व्याख्यान दिलें व वक्तृत्व–स्पर्धेंत पहिल्या क्रमांकाचें बक्षिस मिळविलें. आणि याच सुमारास "नाशिकवैभव" या पत्रांत त्यांनीं अग्रलेख लिहिला. वक्तृत्व–स्पर्धेंत सावरकरांना बक्षिस काय मिळालें? तर प्रा. शिवरामपंत परांजपे यांचें 'काळ' पत्र. त्यांतील काव्य–स्फूर्ति व स्वातंत्र्य–भक्ति पाहून सावरकरांचें त्याच द्रव्यानें घडविलेलें हृदय उचंबळूं लागलें. सावरकर हें मान्य करतात

कीं, " जर मला माझ्या क्रांतिकारक जीवनाच्या स्फूर्तीचें गुरुपद कोणास तरी देणेंच पडेल, तर तें मी ' काळा 'सच देऊं शकेन." ता. १ जानेवारी १९०० रोजीं त्यांनीं ' मित्र–मेळा ' काढला. त्यामार्फत शिवाजी-उत्सव व गणेशोत्सव हे कार्यक्रम प्रकटपणें करीत; पण बंदुक–तलवारींचें शिक्षण गुप्तपणें घेत.

क्रांतीची उपासना

बाल सावरकरावर कांहीं कौटुंबिक आपत्ति कोसळल्या. प्लेगनें कहर केला. वडील, चुलते व दोन्ही भाऊ–या सर्वांना या ' गांड्या तापानें ' गांठलें. त्यांपैकीं वडील १८९९ मध्यें प्लेगनें निधन पावले. आई महामारीनें १८९२ सालींच मृत्यु पावली होती. चुलतेहि प्लेगनेंच गिळले. बाबा (गणेश) व बाळ (नारायण) हे दोघे भाऊ मात्र वाचले. अशा धामधुमींतहि सावरकर १९०१ सालीं मॅट्रिक झाले. त्याच वर्षीं त्यांचा विवाह झाला. १९०२ ते १९०५ हीं चार वर्षें त्यांनीं पुणें येथें फर्गसन कॉलेजमध्यें काढलीं. पण त्यांचें सारें लक्ष असे कॉलेजबाहेरील लो. टिळक व प्रो. परांजपे यांच्या भाषणाकडे व चळवळींकडे. त्यावेळीं बंगालची फाळणी सरकारनें केल्यामुळें साऱ्या राष्ट्रांत क्रोधाची आग पेटली होती. तिची खूण म्हणून पुणें येथें लकडी–पुलाच्या (आतां संभाजी–पुलाच्या) खालीं विदेशी कपड्यांची प्रचंड होळी करण्यांत आली. तिचा पुढाकार घेतला होता सावरकरांनीं. अध्यक्ष होते लो. टिळक व वक्ते होते स्वातंत्र्यकवि प्रो. परांजपे ! मग सभेचा थाट काय विचारावा !

१९०५ च्या डिसेंबरांत सावरकर बी. ए. झाले व १९०६ च्या जूनमध्यें ते इंग्लंडला रवाना झाले. त्यासाठीं त्यांच्या सासऱ्यानें त्यांना द्रव्य-साहाय्य केलें. शिवाय शामजी कृष्णवर्मा यांचीहि मदत होती. शामजींकडे सावरकरांना शिफारस–पत्र दिलें लो. टिळकांनीं. इंग्लंडमध्यें ' अभिनव–भारत ' या नांवाची संस्था सावरकरांनीं स्थापन केली. तेथून हिंदुस्थानांत पिस्तुलें पाठविण्याचा उपक्रम सुरू झाला. १९०९ सालीं, जुलै महिन्यांत, इंग्लंडांत मदनलाल धिंग्रा यांनीं कर्झन वायलीचा खून

केला आणि त्याच वर्षी डिसेंबर महिन्यांत नाशिक येथें अनंत कान्हेरे यांनीं जॅकसनला ठार केलें. याचा एक परिणाम म्हणजे ता. १३ मार्च १९१० रोजीं सावरकरांना इंग्लंडांत अटक झाली. तेथून त्यांना ता. १ जुलै रोजीं हिंदुस्थानला आगबोटींतून चौकशीसाठीं पाठविण्यांत आलें. आपल्यापुढें मृत्यु उभा आहे हें सावरकरांना दिसलें.

जन्मठेपीच्या यातना

अशा वेळीं निर्वाणीचें धैर्य सावकारांच्या हृदयांत स्फुरलें. त्यांना घेऊन जाणारी आगबोट फ्रान्सच्या किनाऱ्यावर मार्सेलिस बंदरांत उभी होती. तेव्हां आग्ऱ्याहून सुटणाऱ्या शिवाजीमहाराजांचें स्मरण करीत त्यांनीं त्या आगबोटींतून पळून जाण्याचें ठरविलें. ता. ८ जुलै रोजीं पहाटेच्या वेळीं एक फूट रुंदीच्या भोंकांतून त्यांनीं आपलें शरीर समुद्रांत झोंकून दिलें. कातडी सोलली गेली, तरी ते दीडशें फूट समुद्र पोहून गेले. शिपायांचा पाठलाग सुरू झाला. त्यांचीं पिस्तुलें उड्डं लागलीं. किनाऱ्याला पाय लागतांच सावरकर तीनशें यार्ड तसेच धांवत–पळत सुटले. पण फ्रेंच शिपायानें लांच खाल्ली, नागरिक स्वातंत्र्याची पायमल्ली केली आणि आपल्या देशाचा कायदा मोडून सावरकरांना इंग्रज शिपायांच्या स्वाधीन केलें. शिपायाच्या कसलें ? यमदूतांच्याच ! कारण, ता. २३ जुलै १९१० रोजीं हिंदुस्थानांत परत आल्यावर सावरकरांना दोन जन्मठेपींची शिक्षा झाली.

दोन जन्मठेपींची शिक्षा ! ती भोगण्यासाठीं सावरकरांना अंदमानला जाणाऱ्या बोटीवर ता. ४ जुलै १९११ रोजीं चढविण्यांत आलें ! तेथें मृत्युहूनहि भयंकर अशा आपत्ती भोगून, सुमारें तेरा वर्षांनीं, ता. ६ जानेवारी १९२४ रोजीं त्यांना हिंदुस्थानांत आणण्यांत आलें. रत्नागिरी येथें सुमारें तेरा वर्षें स्थानबद्ध अवस्थेंत त्यांनीं काढल्यानंतर ता. १० मे १९३७ रोजीं ते पूर्ण मुक्त झाले. या अवधींत त्यांनीं हिंदुसभेचें कार्य केलें. त्या सभेचे ते सतत पांच वर्षें अध्यक्ष होते. यानंतर त्यांच्यावर सन्मान व सत्कार यांची वृष्टि होत गेली. १९३८ सालीं मुंबई येथें भरलेल्या 'मराठी साहित्य संमेलना'चे ते अध्यक्ष होते. १९४३ सालीं

ता. २८ मे रोजीं, त्यांच्या साठी–समारंभानिमित्त त्यांना एक लाख वीस हजार रुपयांची थैली पुणें येथें अर्पण करण्यांत आली.

१९४८ च्या मेपासून १९४९ च्या फेब्रुवारीपर्यंत गांधी–खून–खटल्यांत ते गुरफटले गेले. आपल्या बावन्नपानी जबानींत त्यांनीं जेव्हां गहिंवरलेल्या कंठानें, "माझी मातृभूमी स्वतंत्र झालेली पहाण्यास मी जिवंत आहें म्हणून मी स्वतःला धन्य समजतों." असें आनंदाचे उद्‌गार काढले, तेव्हां त्यांच्या—व इतरांच्याहि – डोळ्यांतून अश्रु ओघळले. न्यायमूर्तींनीं त्यांना निर्दोषी म्हणून सोडून दिलें.

प्रतिभेचे नाना विलास

सावरकरांनीं आपला सारा जन्म अन्यायाशीं प्रत्यक्ष झुंज खेळण्यांत घालविला असल्यानें त्यांच्या काव्यांत निराशा, विफलता, दीनता, पलायनवाद यांचें धुकें पसरलेलें नाहीं, तर वीरता, भव्यता, ओजस्विता व भीवष्यसूचकता यांचीं तेजस्वी किरणें लकाकत आहेत. 'जगन्नाथाचा रथोत्सव' किंवा 'अनंताची आरती' यासारख्या चिमुकल्या कवनांत कल्पकतेची केवढी भव्यता आहे! 'सागरास,' 'सांत्वन' वा 'मृत्युपत्र'—अशा कविता म्हणजे उदात्त करुणरसाच्या गंगायमुनासरस्वतीच. 'तारकांस पाहून' अथवा 'प्रभाकरास' यामध्यें शुद्ध काव्य-कल्पनेचा रम्य विलास आढळतो. आणि त्यांचें तें कमलासारखें कोमल 'कमला' काव्य, तें नाना रसांनीं ओथंबलेलें 'गोमंतक' खंडकाव्य, ते वीररसाला उधाण आणणारे बाजी-तानाजीप्रभृतींचे पोवाडे—तोडच नाहीं यांना अवघ्या मराठी वाङ्मयांत.

चरित्राची पार्श्वभूमि

सावरकरांचें काव्य म्हणजे कवित्व व क्रांतिकारकत्व यांचा संगम. 'विद्युत्तंतूनीं विणलेलें' त्यांचें क्रांतिकारक जीवन आणि त्यांतून स्फुरलेलें तेजाळ काव्य! त्या जीवनाच्या आकाशांत त्यांचीं काव्यें नक्षत्राप्रमाणें तळपत आहेत. नाहीं तर नुसती 'झोप' ही त्यांची कविता एरवी

वर्णनपर म्हणून बरी वाटली असती, पण अंदमानांतील दिवसभरच्या यमयातनानंतर येणाऱ्या झोपेचें वर्णन सावरकरांनीं केलें आहे, ही पार्श्वभूमि समजली, म्हणजेच त्या कवितेचें खरें मर्म व महत्त्व ध्यानीं येतें. त्यांनीं आपली जशी सारी गुणसंपदा, तशीच आपली प्रतिभाहि मातृभूमीच्या सेवेलाच वाहिली होती. १९१० सालीं इंग्लंडमध्यें अटक झाल्यावर सावरकरांनीं लंडनच्या तुरुंगांतून 'माझें मृत्युपत्र' हें करुणोदात्त काव्य आपल्या वहिनीस पाठविलें. त्यांत ते म्हणतात, 'हे मातृभूमि । तुजला मन वाहियेलें । वक्तृत्व—वाग्विभवही तुज अर्पियेलें । तूतेंचि अर्पिलि नवी कविता रसाला । लेखाप्रति विषय तूंचि अनन्य झाला ॥" स्वातंत्र्य हाच त्यांचा एकमेव विषय. त्या यज्ञाच्या भूमीवर त्यांनीं स्वतःचा देह वाहिला—आपले लहानथोर बंधुहि त्याच स्वातंत्र्य-यज्ञांतील आहुति ठरल्या. ही आपली उच्च भूमिका कवि किती स्वाभिमानानें सांगतो पहा- "त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाल झाला । त्वत्स्थंडिलीं बघ अतां मम देह ठेला । हें काय, बंधु असतों जरि सात आम्ही । त्वत्स्थंडिलींच असते दिधले बळी मीं ॥"

स्वातंत्र्य—लक्ष्मीची पूजा बांधण्यांत आपण गुंतल्यामुळें काव्य—लक्ष्मीची षोडशोपचारें पूजा आपल्या हातून होत नाहीं अशी रुखरुख सावरकरांना सदैव होती. १९१३ सालीं डॉ. रवींद्रनाथ टागोर यांना नोबेल पारितोषिक मिळाल्यावर त्यांच्या अभिनंदनपर कविता सावरकरांनीं केली. तींत स्वतःची काव्य-विषयक भूमिका ते पुढील काव्यमय शब्दांनीं वर्णितात— "देवळांत जगदंबेचा । हरूं ताप पुजारी तीचा । लघु खंड उगाळी साचा चंदनी ॥ झिजझिजत सहाणेवरती । लघुखंड तो तुला देती । घे ख्यात तोरणा प्रणती । मानुनी ॥" श्रीशारदेच्या मंदिराला तोरणाप्रमाणें शोभादायक काव्य आपण रचलें असतें, पण तें कार्य सोडून आपण मातृभूमीच्या अंगाचा दाह शांत करण्यासाठीं सहाणेवर चंदन घाशीत बसलों आहें व व त्याचा लेप तिला लावीत आहों, असें आपल्या काव्याचें स्वरूप सावरकर वर्णितात. राष्ट्राच्या पारतंत्र्याच्या नरक-यातना संपाव्यात, म्हणून ते अंदमानच्या नरक-यातनांत जाऊन पडले. कष्ट, छळ, अपमान, हालअपेष्टा

इत्यादींच्या अग्निशय्येवर पावलें टाकतांच ते काव्यार्ची कमलें फुलवीत. "पोळ्यांतुनि त्या मधमाशा । लघु लघु नीडीं निज जैशा । गोड कल्पना तशा तदा ।" त्यांच्या डोक्यांतून निघत. काव्यानंदाचा मध ते चाखीत आणि त्यांमुळें भोंवतालीं यातनांची आग धगधगत असतांनाहि "मम मस्तिष्कीं शत गार्णी । गुणगुणती मंजुळ वाणी । शत सनयांतुनि परि त्याही । शकूं सामावत तें नाहीं ॥"

सृष्टि-सौंदर्याशीं समरसता

डोळ्यासमोर मृत्यु उभा ठाकला, तरी त्यांच्या हृदयांत नवीन काव्याचा जन्म होत असे. साता पहाऱ्यांत त्यांना डांबून, ठेवलें असतांना चुकून केव्हां तरी चंद्राची कोर दिसतांच त्यांच्यातील 'बाल-कवि' जागा होतो व आनंदानें नाचत-बागडत गातो, "कोर कोंवळ्या चंद्राची !-ती पोर पोवळ्या ओठांची ! ॥" भीषण परिस्थितीवरहि मात करण्याचें काव्य-शक्तीचें हें केवढें सामर्थ्य! चोहोंबाजूला निखारे पेटलेले असतांनाहि हृदयांत 'आनंदाचा पूर' वाहूं लागावा, 'हसूं निकें लोटावें, 'चुटचुटक्या आणि मिटमिटक्या' असे स्वच्छंदी शब्द सुचावे ही प्रतिभेची केवढी विलक्षण जादू !

दुर्दम आशावाद

याच दुर्दम्य मनःसामर्थ्यावर सावरकर संकटांचे सागर तरून गेले. ते इंग्लंडला गेले व क्रांति-कार्य करूं लागले, तेव्हांपासून त्यांचें जीवित तरवारीच्या धारेवर टांगलें गेलें. आपल्याला आतां अटक होणार व आपण इंग्लंडांतील तुरुंगांत झिजून झिजून मरणार असें भविष्य त्यांना दिसूं लागलें ! ते हिंदुस्थानांतून तेथें गेले होते कोणत्या आशेनें आणि भवितव्य काय ठरूं लागलें ! राष्ट्राला नसलेलें स्वातंत्र्य मिळविणें दूरच, पण आपलें असलेलें वैयक्तिक स्वातंत्र्यहि नष्ट होणार-हें भविष्य त्यांना दिसूं लागलें. अशा निराशामय अंधारांतूनहि जी वीज चमकून गेली ती म्हणजे 'सागरास' ही कविता. तींत त्यांची महत्त्वाकांक्षा, त्यांची निराशा, त्यांची मायभूमीवरील भक्ति, त्यांची विरह-व्याकुलता, त्यांची भेटीची

तळमळ–हे सारे गुण प्रतिबिंबित झाले आहेत. समुद्रकांठीं बसून सागरास उद्देशून ते म्हणतात, " ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा, प्राण तळमळला । भूमातेच्या चरण–तला तुज धूतां । मीं नित्य पाहिला होता । मज वदलासी अन्य देशिं चल जाऊं । सृष्टिची विविधता पाहूं । तइं जननी–हृद्–विरहशंकितहि झालें । परि तुवां वचन तिज दिधलें । मार्गज्ञ स्वयें मीच पृष्ठिं वाहीन । त्वरित या परत आणीन । "

समुद्र, मातृभू व स्वतः यांना व्यक्तिस्वरूपें देऊन त्यांचा संवाद या काव्यांत वर्णिला आहे. प्रथम सागर सावरकरांना म्हणतो, ' जगाची मौज पहाण्या-साठीं परदेशाला जाऊं या, चल' हें ऐकतांच राष्ट्र–मातेच्या हृदयांत भीति उत्पन्न झाली कीं, आपला हा लहानगा मुलगा दूर जाणार कीं काय ? विरहाच्या शंकेनें तिचें हृदय भरून गेलें. पण स्वार्थी वाटाड्याप्रमाणें सागरानें भारतमातेला आश्वासन दिलें कीं, ' मी माझ्या पाठीवरून वाहून याला नेईन व परत लवकर आणीन. ' यावर विश्वास ठेवून व मातृ-भूमीच्या उद्धारासाठीं अधिक सामर्थ्यशाली बनण्यासाठीं सावरकर समुद्रमार्गानें हिंदुस्थानांतून इंग्लंडला गेले. पण त्यांना तेथें अनुभव काय आला ? " शुक पंजरिं वा हरिण शिरावा पाशीं । ही फसगत झाली तैशी । भूविरह कसा सतत साहुं यापुढती । दशदिशा तमोमय होती । गुण–सुमनें मीं वेचियलीं या भावें । कीं तिनें सुगंधा घ्यावें । जरि उद्धरणीं व्यय न तिच्या हो साचा । हा व्यर्थ भार विद्येचा । ती आम्रवृक्ष वत्सलता । रे । नवकुसुमयुता त्या सुलता । रे । तो बाल गुलाबहि आतां । रे । फुलबाग मला हाय पारखा झाला । सागरा, प्राण तळमळला ॥ " पोपट पिंजऱ्यांत अडकावा किंवा हरिण जाळ्यांत सांपडावा, त्याप्रमाणें सावरकरांची फसगत झाली. मातृभूमीची भेटच अंतरली. सर्वत्र अंधार दिसूं लागला. तिच्या सेवेसाठीं वेचलेलीं फुलें सुकून जाऊं लागलीं. तिच्या उद्धारासाठीं संपादिलेली बॅरिस्टरीची विद्या फोल ठरूं लागली. स्वदेशां-तील आप्त-मित्रहि दुरावले.

उज्ज्वल राष्ट्र–प्रेम

सावरकरांची मातृभूमीवर इतकी अपार निष्ठा कीं, तिच्यापुढें त्यांना

इतर सारे देश तुच्छ वाटत ! स्वदेशांतील झोपडीसुद्धां परदेशांतील राजवाड्यापेक्षां अधिक सुखाची, ही आपली भावना प्रगट करतांना ते म्हणतात—" नभिं नक्षत्रें बहुत एक परि प्यारा । मज भरतभूमिचा तारा । प्रासाद इथें भव्य परी मज भारी । आइची झोपडी प्यारी । तिजविण नको राज्य, मज प्रिय साचा । वनवास तिच्या जरि वनिंचा ॥" अशा आपल्या प्रिय राष्ट्र-मातेपासून आपल्याला दूर ठेवणाऱ्या त्या विश्वासघातकी समुद्रावर शेवटीं रागावून सावरकर विचारतात, " या फेन-मिषें हंससि निर्दया कैसा । कां वचन भंगिसी ऐसा ? ' समुद्रानें वचनभंग करून आपल्याला असें कां फसविलें असावें ? याचें काव्यमय कारण कवीला सुचतें. तें म्हणजे इंग्लंड ही समुद्र-स्वामिनी आहे आणि हिंदुस्थान परतंत्र व दुर्बल आहे. पण पुराणांचा आधार घेऊन सावरकर समुद्राला असा धाक घालतात कीं, पूर्वी ज्या अगस्ति-ऋषीनें तुला एका आचमनांत गिळून टाकलें होतें, त्याला माझी आई तुला शासन करण्यास सांगेल, " त्वत्स्वामित्वा सांप्रत जी मिरवीते । भिउनि कां आंग्लभूमीतें ? । मन्मातेला अबल म्हणून फसवीसी । मज विवासनातें देशीं । तरि आंग्लभूमि-भयभीता । रे । अबला न माझिही माता रे । कथिल हें अगस्तिस आतां । रे । जो आचमनीं एक क्षणिं तुज प्याला । सागरा प्राण तळमळला ॥ " आपण स्वतः कोंडलें जाणार, आपला देश दाण्यांत अडकलेला, अशा अवश, अगतिक, असहाय्य अवस्थेंतहि सावरकरांची धैर्यशाली प्रतिभा अदम्य आशेनें व अकुंठित गतीनें उड्डाण करते हें पाहून कोण आश्चर्यचकित होणारं नाहीं ?

कारुण्यांतील उदात्तता

संकटाचा अग्नि-वर्षाव चौफेर होत असतांनाहि सावरकर स्वतःचा धीर टिकवीत होते, एवढेंच नव्हे तर आप्त, अनुयायी, मित्र, चहाते यांनाहि धीर देत होते. इंग्लंडमध्यें त्यांच्याभोंवतीं पोलिसी पाश पसरले जात असतांनाच हिंदुस्थानांत त्यांचे वडील बंधूस काळेपाण्याची शिक्षा झाली व धाकट्या बंधूस अटक झाली. वडील बंधूंची पत्नी निराधार झाली ! या वहिनीवर

सावरकरांचें बालपणापासून अतिशय प्रेम. तिचें " सांत्वन " करण्यासाठीं एक ओवीबद्ध पत्र सावरकरांनीं पाठविलें. त्यांत त्यांचें जीवनविषयक तत्त्वज्ञानहि सहज येऊन गेलें आहे. आपत्तींतहि आनंद मानून ते गरजतात, " धन्य धन्य आपुला वंश । सुनिश्चयें ईश्वरी अंश । की रामसेवा-पुण्य-लेश । आपुल्या भाग्यीं लाधला ॥ " देश-सेवा हीच देव-सेवा. ' सुटली रघुवीराची प्रथम रणाज्ञा ! ' म्हणून ते स्वातंत्र्य-संग्रामांत पडले. त्यांत आत्माहुति देण्याची पाळी आली हें आपलें भाग्य ! तें कसें, हें समजावून सांगतांना फुलाचा दाखला देऊन सावरकर लिहितात, " अनेक फुलें फुलती । फुलोनियां सुकोन जाती । कोणीं त्यांची महती गणती । ठेविली असे ? ॥ परी जें गजेंद्रशुंडेनें उपटिलें । श्रीहरीसाठीं मेलें । कमलफूल तें अमर ठेलें । मोक्षदातें पावन ॥ " आपलें राष्ट्र म्हणजे गजेंद्र. त्याला परतंत्रतेच्या मगरीनें गिळलें आहे. त्या गजेंद्रानें विष्णूला वहाण्यासाठीं आपल्या सोंडेंत धरलेलें फूल म्हणजे आपलें जीवन. राष्ट्रासाठीं खर्ची पडलेलें जीवन म्हणजे देवाला वाहिलेलें फूल. दोघांचेंहि सार्थक झालें. यांत कमल, गजेंद्र इत्यादीमुळें केवढें पवित्र वातावरण निर्माण झालें आहे !

कवि असा सिद्धांत निवेदन करतो, "अमर होय ती वंशलता । नवश जीचा देवांकरितां । दिगंतीं पसरे सुगंधता । लोकहितपरिमलाची ॥ " देवासाठीं, देशासाठीं आपल्या सर्वस्वाचा होम करण्याची आपली प्रतिज्ञा आहे. मोठें कार्य आपण हातीं घेतलें आहे. तेव्हां मोठेपणाला साजेसें आपण वागलें पाहिजे, हें बहिनीच्या चित्तावर ठसवितांना सावरकर म्हणतात, " महत्कार्याचें कंकण धरिलें । आतां महत्त्वमत्व पाहिजे बाणलें । ऐसे वर्तन पाहिजे केलें । कीं जें पसंत पडलें संतांना ॥ अनेक पूर्वज ऋषीश्वर । अज्ञात वंशजांचे संभार । साधु साधु गर्जतील । ऐसें वर्तणें या काला ॥ " साध्या शब्दांत किती कारुण्य, किती उदात्तत्व सांठविलेलें आहे !

मनोवृत्तींचीं शब्दचित्रें

इंग्लंडच्या तुरुंगांत १९१० सालीं कोंडले गेले असतांना सावरकरांनीं आपल्या बहिनीला जो अखेरचा ठरूं पहाणारा निरोप पाठविला, तो

' माझें मृत्युपत्र ' या कवितेंत शाश्वत स्वरूप पावला आहे. बाल्या-पासूनच्या आठवणी त्यांत आलेल्या आहेत. " वैशाखिंचा कुमुदनाथ नभांत हांसे । " अशी मधुर सुरुवात करून सावरकर आठवण करून देतात, " सैंपाक त्वां निजकरें कुशलें करावा । प्रेमें तुझ्या अधिकच सु-रसाळ व्हावा । संवाद सर्व भिळुनी करितां नितांत । जेवावयासि बसलों जणुं चांदण्यांत ॥" घरांतील सारीं माणसें चांदण्यांत बसून गोड पदार्थ मुखांत घालीत असले, तरी त्यांच्या मुखांतून कोणत्या गोष्टी बाहेर पडत होत्या ? " श्री रामचंद्र-वनवास-कथा रसाला । कीं केवि देश इटली रिपुमुक्त झाला । तानाजिचा समरधीर तसा पवाडा । गावा चितोडगड वा शनिवारवाडा ॥ " प्रभु रामचंद्राच्या, श्रीशिवरायाच्या, राणा प्रतापाच्या, थोरल्या माधवरावांच्या-अशा प्रतापी व स्वातंत्र्यदात्या विभूतींच्याच कथा त्या तरुणांच्या गप्पागोष्टींत निघत. पण जेवण संपतांच त्या संपत नसत. त्यांतून स्फूर्ति घेऊन सावरकरांचे कुटुंबीय स्वातंत्र्य-सेवेच्या शपथा घेत. तरुण म्हणत, ' आम्ही बाजी प्रभु होऊं '; तर तरुणी प्रतिज्ञा करीत ' आम्ही रजपूत रमणी ठरूं ' " झाल्या तदा प्रियकरांसह आणभाका । त्या सर्व देवि वहिनी स्मरती तुम्हां का ? । ' बाजी प्रभू ठरूं ' वदे युवसंघ सर्व । ' आम्ही चितोर युवती ' युवती सगर्व ॥ " तारुण्यांतील आंधळ्या भावनेच्या भरांत आम्ही स्वातंत्र्य-संगरांत उडी घेतली, असें मात्र नव्हे; तर इतिहासाच्या प्रकाशांत, डोळे उघडे ठेवूनच, आम्ही आमचा मार्ग चालू लागलों, ही ग्वाही देतांना सावरकर सांगतात, " कीं घेतलें व्रत न हें अम्हि अंधतेनें । लब्धप्रकाश इतिहास-निसर्ग-मानें । जें दिव्य, दाहक म्हणूनि असावयाचें । बुध्याचि वाण धरिलें करिं हें सतीचें ॥ "

वज्रासारखा निर्धार ज्या हृदयांत होता, त्याच हृदयांत प्रेमाच्या कोमल भावना फुलत होत्या. शेवटीं गहिंवरून सावरकर वहिनीच्या पायावर डोकें ठेवून म्हणतात, " माझा निरोप तुज येथुनि हाच देवी । हा वत्स वत्सल तुझ्या पदिं शीर्ष ठेवी । सप्रेम अर्पण असो प्रणती तुम्हांते । आलिंगन प्रिय-करा मम अंगनेतें ॥ " एकादा कवि एकाद्या यक्षाचा निरोप त्याच्या पत्नीला मेघामार्फत पोंचवीत असेल, तर दुसरा एकादा कवि एका

राजकन्येचा संदेश तिच्या प्रियकराला राजहंसाच्या मुखानें कळवीत असेल; पण जन्म–मृत्यूच्या सीमेवर उभे राहून सावरकरांनीं आपल्या 'देवी' बहिनीस पाठविलेल्या या रसपूर्ण व धृतिपूर्ण पत्रास तोड जगाच्या वाङ्मयांतहि क्वचितच सांपडेल !

स्वतंत्रतेचें स्तोत्र

स्वातंत्र्याचे पोवाडे गाणारे एक श्रेष्ठ शाहीर एवढीच सावरकरांची भूमिका नाहीं. त्या स्वातंत्र्यासाठीं सर्वस्वाची होळी करण्यास ते तयार होते. म्हणून ' प्रियकर हिंदुस्थान ' या कवितेंत ते ग्वाही देतात, " जननि तुझ्या सन्मान–रक्षणीं अर्पु रणीं हे प्राण। शत्रुकंठ भंगोनि घालुं तुज दारुण रक्तस्नान॥" अशा क्रियाशील भूमिकेवरून 'स्वतंत्रतेचें स्तोत्र' सावरकरांनीं जें रचिलें आहे, त्यांत विलक्षण जिवंतपणा व परिणामकारकता आली आहे. ' बोले तैसा चाले ' हें त्यांचें ब्रीद. ' आधीं केलें मग सांगितलें । " हा त्यांचा बाणा. देवी स्वतंत्रतेसाठीं तळहातावर शीर घेऊन तिचा जयजयकार करतांना ते म्हणतात—" परवशतेच्या नभांत तूंची आकाशीं होशी । स्वतंत्रते भगवती ! चांदणी चमचम लखलखशी ॥ "

हा सर्व त्याग, हें सारें शौर्य, हे सारे हाल कशासाठीं ? आपलें ध्येय कोणतें ? हें सावरकर पुढील शब्दांनीं सांगतात, " आमुचिया वंशाच्या गौरवाचिया—। भारतीय केवल ना, मानवीयही । वंशाच्या गौरवार्थ ! अखिल मानवी यौवनांत अनुभवीन यौवनास मी ॥ " अखिल मानवतेची सेवा हेंच ध्येय.

वीरवृत्तीचें दर्शन

इंग्लंडमध्यें अटक झाली, फ्रान्समध्यें उडी ठोकली आणि सावरकरांची स्वारी मुंबईस आली. टिळक–आगरकरांनीं पावन केलेल्या डोंगरीच्या तुरुंगांत त्यांना डांबण्यांत आलें. 'भयंकर कैदी' म्हणून त्यांचा बंदोबस्त जादा होता. छातीवर बिल्ला व पायांत तीन शेर वजनाची कांटेरी बेडी !

आणि मुंबईहून दोन जन्मठेपेची शिक्षा देऊन सरकारनें सावरकरांना

अंदमानास पाठविलें. 'तुरुंग दगडी राक्षस हा' त्यांचे अस्थि—अस्थिचें मांस—मांस करपून—करपून टाकीत होता. त्या भीषण अवस्थेंतहि रम्यतेचें दर्शन त्यांना एकदां झालें. तें म्हणजे चंद्राचें. त्याचें वर्णन करतांना सावरकर म्हणतात, " लोहगजाची जी जाळी । कोठडीस मम ती खालीं । टाकुनि कांबळि मी अपुली । टाकित अंगा तों दिसली ॥ समोरची नभिं मज देखा । चमकत चिमुकलि शशिलेखा । 'शशिलेखा रे शशिलेखा !' । मावळुं शकुनि न त्या हरिखा ॥ "

चंद्रकोर दिसतांच पोटांत मावेना इतका आनंद या कविरायाला झाला व " टाळि वाजवुनी मीच मशीं । कथिली वार्ता अद्भुतशी । सहा सहा महिन्यांत कधीं । चंद्र दिसेना बंदिमधीं ॥ वर्षहि न जिथें तिथी तिथें । कळणें कैशी तरिही ते । असेल पंचमि—चतुर्थिची । कोर कोवळ्या चंद्राची ॥ प्रथमचि दिसला चंद्र जना । नसेल गमला तैंहि मना । हर्ष तसा तै मज गमला । आनंदाला भर आला ॥ "

चंद्र—दर्शनाप्रमाणेंच दुसरी सुखद गोष्ट म्हणजे निद्रा. सर्व दिवसभर पाशवी श्रमानें व पिशाच—छळानें शरीराचा भुगा झाल्यावर भुईला शरीर टेकतांच निद्रादेवीचा संजीवक हात त्यावरून फिरूं लागे, तेव्हांचा आनंद त्यांनाच माहीत ! दिवसभराचे श्रम कसे ? त्यांचें वर्णन सावरकर करतात, " घाण्याच्या भवति भवति सर्व दिनभरी । तुटुं पाहति पाय तरी धाव-धावतां । घामानें गळल्या जें चिंब जाहलें । भू—वर्तुल आतांची सुकत तें जरा ॥ " तरीसुद्धां मन ताजेतवानें राहिलें, हृदयांतील काव्य—ज्योत तेवत राहिली; कारण सावरकरांची राष्ट्र—भक्ति अशी अढळ कीं, "कवण जगे ? अहह जरी हिंदची मरे ? कवण मरे ? हृष्ट जरी हिंद जगे रे ! ॥ " त्या हिंदभूसाठीं आपण छळ सोसतो, हें एक महान तपच आहे, या भावनेनें ते उत्साह धरून काळ कंठीत होते. त्या सर्व कष्टांचा शीण नाहींसा करणाऱ्या निद्रेला आवाहन करून ते म्हणतात, " म्यां अपुल्या हस्तेंची रचुनि मम चिता । ठेवियलें तीवरतीं,—चंडिके तया । करुं सुतृप्त !—अग्निकुंडिं तूंहि त्या तंई । हे निद्रे, सहगमना अंगने-समा । करुनी या यमपुरींत येशि मजसवें ! मम शय्या बंदीगृहिं संगतीं तुझ्या । प्रेममृदुल,

मोहक, जणुं शेज फुलांची। देवा, या निद्रेसी तरि निदान तूं। नेउं नको मजपासुनि–सर्व यद्यपी। नेलेंसी। काय नसे मजसि ती इथें ? ॥

शारदेच्या दोन मूर्ति

आपली कविता ही मुरली नसून रणभेरी आहे असें "मूर्ति दुजी ती !" या कवितेंत सावरकर सांगतात. लंडनच्या पोलीस चौकींत—कडाक्याच्या थंडींत डांबलें गेलें असतांना सावरकरांनीं ही भव्य कल्पना रंगविली आहे. या कवितेचें वृत्त त्यांनीं स्वतः बनाविलेलें आहे. त्या 'वैनायक' वृत्तांत कवि आपल्या काव्याची सुकुमार मूर्ति कशी आहे तें सांगतोः— "एक मूर्ति ती : नाचत हृदयमंचकीं। रसिकमनाची वीणा घेउनी करीं। तंतुतंतुंतुनि कुशल–स्पर्श–पुलकिता। प्रेमाची बीज थरारूनि देत जे;। भावनांसि मोहन घालूनि ती करी। लोण्याहुनि कोमलशा कोमल अशा। कीं जाव्या चांदण्यामधेंहि वितळुनी !" "आणि दुजी ती : मूर्ति प्रखर जी तुझी। कविते घेऊनि शिरे वाण सतीचें। अहह ! हास्य करित प्रज्वलित चितामी ॥" 'परंतु भिल्लीणीचा वेष घेऊन शंकरापुढें मोहक नृत्य करणारी पार्वतीच जगाच्या संहाराचें भीषण नृत्यहि करते; त्याप्रमाणें लोण्याहून मऊ अशा काव्य–मूर्तिऐवजी तें दुसरी विक्राल मूर्तीच कल्पितात. कारण—" लोखंडी जबडा वांसूनि आपला। कर्तव्य प्रकट आज ! मम चिरावया। दांतांच्या कवळ्यांच्या करवतींत दों !" अशा तुरुंगामध्यें तें सांपडले आहेत. तेथें " मंजुल रुणुझुणु रुणुझुणु " असें काव्य कसें निर्माण व्हावें ? आणि तें कसें आवडावें ? आपल्या काव्य–देवतेला काली मातेचें स्वरूप देऊन सावरकर तिचें रूप पुढीलप्रमाणें रेखाटतात—" लाल लाल चिकट विकट त्या गळ्यांतुनी। धार तीच घट घट त्या क्रुद्ध मुखें पी। पेल्यांतुनि लाल मद्य पी जसें कुणी ! पिउनि रक्त आपुलेंचे आपली तृषा। शांतविल्या त्या प्रचंड रौद्रभीषणा। रुंडधरा छिन्न–मुंड मूर्तिसी नमो ॥ "

भावनेची कोवळीक

सावरकरांची मूर्ति पाहिली तर ती एखाद्या 'भाव–कोवळ्या'

कवीला साजणारी आहे—सशस्त्र क्रांतिकारकांच्या नेत्याला नव्हें. आणि त्यांची मूळची मनोवृत्ति ? तीहि कवीलाच शोभणारी आहे. शकुंतला स्नेहभावामुळें वेलिंचीं फुलें तोडित नसे.–सावरकरांना आत्मौपम्य–बुद्धि–मुळें–सर्वत्र ईश्वर वसत असल्यामुळें–गवतावरसुद्धां पाय देववत नाहीं, " तृणांतेहि नोलांडवे । " ही ज्ञानदेवांनीं वर्णिलेली मनाची कोवळीक सावरकरांच्याहि अंगीं आहे हें त्यांच्या पुढील उताऱ्यावरून सिद्ध होतें.— " आत्मौपम्यांत मुरत चित्त थिजोनी । कितिदां तरि चरण अकस्मात चालतां । स्तंभित होऊनि रहावेत घटि घटी । कांहीं केल्याहि तया तरुण कोंवळ्या । गवताचे अंकुर दुखतील या भयें । पाय त्यांवरी नये पडूंचि कीं पुढें ॥" शरिरानें नाजूक व मनानें कोवळे असे सावरकर धैर्याचे व निश्चयाचे महामेरू आहेत. कोणतेंहि संकट त्यांना भिववूं शकत नाहीं—कोणतेहि हाल त्यांना दबवूं शकत नाहींत. शीखांच्या इतिहासांतील " बंदा वीर " वगैरे विभूतींचे अजिंक्य धैर्य त्यांच्या ठायीं आहे. आपली मातृभूमि पुनः स्वतंत्र व समर्थ करण्यासाठीं तें कोणत्याहि हाला–जुलुमाला तोंड देण्यास सिद्ध आहेत. " श्रीबंदा वीर " या कवितेंत ते अशी प्रतिज्ञा करतात कीं,—" तो शकला श्रीबंदा हिंदु हुतात्मा । सहण्यासी जरि असह्य छळ तसे तरी । कां शकेन मीहि न हे छळ सहूं अहा । मीहि हिंदुची असतां ? हे सहेनची–। याहुनिही भयद असे छळ सहेनची ! परि झटेन, जीवनांतिंही झटेनची । करण्यासी ही विमुक्त मातृभू पुन्हा । मुक्त पुन्हा ! शक्त पुन्हा, मनुज–मंगला । पुण्यभूमि पुनरुत्थित पतित–पावना ! "

पोवाड्यांतील स्फूर्ति

चालूं स्वातंत्र्य–संग्रामाला स्फूर्ति मिळावी म्हणून इतिहासांतील अनेक स्वातंत्र्य–युद्धाचे पोवाडे सावरकरांनीं रचलेले आहेत. "विनायकानें रचिले पवाडे । स्वदेश–सत्प्रेम तयांत गाढे ॥ " अशी त्यांची प्रशंसा कवि असून क्रांतिकार्य करणाऱ्या त्यांच्या एका सहकाऱ्यानें केली आहे. त्यांचें नांव सेनापति बापट. शिवाजीच्या स्वातंत्र्य–युद्धावर सावरकरांनीं गोंधळाचें

रूपक कसें बसविलें पहा—"स्वातंत्र्यदेवाचा गोंधळ केला। यजमान स्वामी श्रीशिवराय झाला। सांवळ्या रंगाचे शूर मावळे। प्रेमानें अभिमानें गोंधळी झाले। पारतंत्र्याचा मग बोकड चिरिला। प्रभुवर भूवर शिववीर आला॥

सिंहगडचा पोवाडा, बाजी प्रभूचा पोवाडा व चाफेकरांचा पोवाडा—हे सावरकरांचे तीन पोवाडे अवघ्या महाराष्ट्रांत दुमदुमले. याचें नैमित्तिक कारण म्हणजे प्रासंगिक परिस्थिति हें जसें खरें; तसेंच त्यांतील वीररसाचा उत्कर्ष हेंहि आहे. चाफेकरांचा पोवाडा सावरकरांनीं आपल्या वयाच्या पंधरावे वर्षीं रचला. आणि १९०५ सालच्या त्या स्वातंत्र्य—लालसेच्या काळांत, 'मित्रमेळ्या' साठीं सावरकरांनीं बाजी—तानाजींचे चैतन्यदायक पोवाडे रचले. ते ब्रिटिश सरकारानें १९०९ मध्यें जप्त केले होते; पण कॉंग्रेस सरकारानें १९४५ सालीं त्यावरील जप्ती उठविली. तानाजी किंवा बाजी यांच्या पराक्रमाचें वर्णन सावरकरांनीं इतक्या वीर्यशाली वाणीनें केलें आहे कीं, त्यामुळें ते ते घनघोर प्रसंग वाचकांच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभे रहातात. हे पोवाडे रचतांना सावरकर इतके तल्लीन झालेले दिसतात कीं, जणु कांहीं आपणच तानाजी आहोंत, बाजी आहोंत अशा आविर्भावानें ते बोलत आहेत असें वाटतें. बाजीच्या पोवाड्याचा प्रारंभच किती रोमांचकारक आहे पहा—" चितोडगडिंच्या बुरुजांनो त्या जोहारासह या। प्रतापसिंहा प्रथित—विक्रमा, या हो, या समया॥ तानाजीच्या पराक्रमासह सिंहगडा येई। निगा रखो महाराज रायगड की दौलत आई॥ जरिपटका तोलीत धनाजी—संताजी या या। दिल्लीच्या तक्ताचीं छकलें उधळित भाऊ या॥ स्वतंत्रतेच्या रणांत मरुनी चिरंजीव झाले। या ते तुम्ही राष्ट्रवीरवर, या हो या सारे॥ घनदाट सभा थाटली। गर्जना उठली। घोर त्या कालीं। जय स्वतंत्रेचा बोला। जय राष्ट्रदेविचा बोला। जय भवानि कीं जय बोला। तुम्ही मावळे हरहर महादेव बोला। चला घालुं स्वातंत्र्य—संगरीं रिपूवरी घाला॥"

ध्वनि—काव्याचा गुण

अशा आवाहनामुळें स्वातंत्र्याला पोषक असें वातावरण श्रोत्यांच्या

चित्तांत निश्चयानें निर्माण होतें. यांतील प्रत्येक ओळ म्हणजे वीररसाचा ओघ आहे. त्यांतील भावार्थ द्व्यर्थी आहे. शिव-कालाप्रमाणेंच सद्यःकालालाहि तो लागू असल्याचें पाहून श्रोत्यांचें हृदय उचंबळून येतें. उदाहरणार्थ, " हाय ! हाय ! तो म्लेंच्छांसंगें घडित बैसलाची । स्वदेश–भूच्या पायासाठीं बेडी दास्याची । " हें आरंभींचें बाजीचें वर्णन घ्या. प्रारंभीं मुसलमानांची सेवा करणाऱ्या बाजीचें हें वर्णन इंग्रजांची ताबेदारी करणाऱ्या कैक रावसाहेब-रावबहादुरांना बरोबर लागूं पडे. तसेंच "देशद्रोही चांडाळांचा भरला बाजार । गुलामगिरि जे देती त्यांना निष्ठा विकणार ॥ तुम्हीच ना स्वातंत्र्य चिरियलें या पोटासाठीं ? । तुम्हीच ना रे भूमातेच्या नख दिधलें कंठीं ? ॥ " असे प्रश्न मेळ्यांत जे जे ऐकत, त्यांच्या डोळ्यांपुढें आंग्लकालच अधिक उभा राही. भावनेची तीव्रता व भाषेची सालंकृतता आणि सद्यःकालीन परिस्थितीचे पडसाद यामुळें हें काव्य लोकप्रिय झालें. "स्वराज्य नाहीं स्वदेश नाहीं धिक् त्या देहाला ॥ हा चरण तर अर्थांतरन्यासामुळें सर्वांच्या तोंडीं स्वराज्याचा मंत्र म्हणून खेळत असे.

सूक्ष्म वर्णन

शिद्दीनें पन्हाळगडाला वेढा दिला व शिवाजीला त्यांत कोंडलें. या प्रसंगाचें वर्णन काव्यमय भाषेंत सावरकर असे करतात—,"लक्ष्मीचें मृदु कमल, शारदासुंदरिचा वीणा । स्वतंत्रतेचा कलिजा अडके गडांत शिवराणा ॥ " पण शिवाजीला पकडणें म्हणजे ' जीवंत पवन ' धरणें होय, हा अनुभव सिद्दी जोहारला आला. शिवाजीनें यवनांना गुंगारा दिला आणि किल्ला सोडला. त्याचें नाट्यमय वर्णन कवीनें सूचकतेनें केलें आहे—" कृष्णपक्षिच्या काळ्या त्या रात्री दडल्या । गर्द झाडिला भिउनि चांदण्या बाहेर न पडल्या ॥ अशा तमीं किलकिलें दार कां तटावरि झालें ? । बाजि निघाले श्रीशिव आले आले शत भाले ॥ भाला खांद्यावरी मराठा घोड्यावरि स्वारी । भरितां, घोडा थै थै नाचे–तोंच शीळ आली । वीर हो टांच घोड्याला । बाण हा सुटला । अडविणें त्याला ॥ "

जीवाचे कान करून व प्राण कंठांत आणून बाजीप्रभू शिवाजीच्या तोफांचे आवाज ऐकत होते. त्यांची उत्सुकता किती होती हें सांगतांना कवि म्हणतो, " काय वाजलें बाजीराया बार न गडिं झाला । शिळा कोसळे, पान सळसळे, पक्षी ओरडलां ॥ " पुनः बाजी उसळला, निर्वाणीचा निर्धार करून तो म्हणाला, " लढा तरी मग चला वीर हो रणांत घुसलों मी । रक्तें मढवूं लढवूं खिंडीची तसू तसू भूमी । शपथ तुम्हाला वृक्ष-पक्षि-जल-शिला-तेज-वारे । आम्ही पडतां तोफेपूर्वीं लढा तुम्ही सारे ।" शिवाजीराजे सुरक्षित पोचले, तोफांचे बार झाले—" तों बार धडाधड झाले । प्राण परतले । हास्यमुख केलें । हा पहिला बार शिवाचा । हा दुसरा निजधर्माचा । हा तिसरा निजदेशाचा । हा चवथा कर्तव्याचा । बार पांचवा धडाडला हर बोला जय झाला । चला घालूं स्वातंत्र्यसंगरीं रिपूवरी घाला ॥ "

त्रिपुटीचें ऐक्य

झिरझिरित पडद्याआडून जडजवाहिर दिसावें, त्याप्रमाणें बाजीप्रभूच्या पोवाड्यांतून शिवरायाच्या स्वातंत्र्य-युद्धाप्रयाणेंच इंग्रजांशीं चाललेल्या स्वातंत्र्य-संग्रामाचें दर्शन ओझरतें होतच आहे. पण सावरकरांच्या अंगीं असलेल्या प्रचारकी वृत्तीनें काव्य-वृत्तीवर मात केली आणि पोवाड्याचे शेवटीं तो अन्योक्तीचा पडदाहि टाकून, ते विचारूं लागले, " अहो बंधुनो ! पूर्वज ऐसे स्वतंत्र रणगाजी । स्वतंत्र त्या पूर्वजां शोभतां वंशज का आजी ? " गोष्टीला ' तात्पर्य ' जोडावें, त्याप्रमाणें, " विनवि विनायक यांतिल व्यावें समजुनि अर्थाला ॥ " अशी उघड प्रार्थनाहि कवीनें केली आहे. या पोवाड्यांची चाल किंवा भाषा जुन्या पोवाड्याइतकी अस्सल नाहीं, तर संस्कृतप्रचुर पद्यासारखीच ती आहे, हें खरें; पण त्यांतील भाषेचा वेग, कल्पनेचें नर्तन व मुख्य म्हणजे स्वातंत्र्य-भावनेचे कल्लोळ इतके जोरदार आहेत कीं, त्या धबधब्याच्या धारेंत सांपडलेला वाचक अखेरपर्यंत वेगानें वाहत जातो. वाचक, कवि व नायक या तिघांहि व्यक्तींचें एकरूपत्व जसें सावरकरांच्या पोवाड्यांत होतें, तसें

अन्यत्र क्वचित्च होत असल्याचें आढळतें. सिंहगडाच्या पोवाड्यांतहि 'तानाजि चढूं लागले । स्वातंत्र्य चढूं लागलें ।' इत्यादि वर्णनें वाचतांना वाटतें, हा तानाजी सिंहगड चढत नसून, सावरकर चढत आहेत—किंबहुना आपण वाचकच तो चढत आहोंत.

श्रीशिवाजीप्रमाणेंच लो. टिळकहि स्वातंत्र्याचे सेनानी. म्हणून १९०० सालीं ते नाशिक येथें गेले असतांना त्यांच्या स्तवनार्थ नऊ आर्या "श्री—मयुरेशस्फूर्तीनें" कवि विनायकानें रचल्या व त्यांत टिळकांचा गौरव असा गाइला कीं, "लाजविलेंसि निज यश धवलें त्वां सत्य हिमनगा तिलका । संतत जनपदसेवार्पित तूं तुज कवि न गान गातिल का ? ॥" उत्तरेस उंच व शुभ्र हिमालय खडा आहे, पण त्यालाहि टिळकांनीं आपल्या धवल यशानें व उच्च विचारांनीं लाजविलें !

काव्य-कल्पनेचा विलास

देशाच्या राजकारणाचा वाराहि आपल्या अंगावर न घेणारा व केवळ काव्य—कल्पनेंत विहार करणारा एकादा प्रतिभाशाली कवि जशीं रसमय कवनें रचतो, तशींहि कांहीं काव्यें सावरकरांच्या लेखणींतून मधूनमधून बाहेर पडलीं आहेत. 'तारकांस पाहून' हा एक त्याचा नमुना आहे. १९०६ सालीं बॅरिस्टर होण्यासाठीं इंग्लंडास जातांना जहाजाच्या डेकवरून समुद्राचें जें स्वरूप दिसलें, त्याचें वर्णन आरंभीं कवीनें केलें आहे, तें असें—"नुमजे लागे कुठें नभ कुठें जलसीमा होई ! नभांत जल तें, जलांत नभ तें संगमुनी जाई । आकाशींचे तारे सागरिं प्रतिबिंबित होती । किंवा आकाशीं हे बिंबति सागरिंचे मोती ॥"

फुलांचा चित्रपट

'कमला' काव्याच्या प्रारंभीं जें फुलबागेचें वर्णन आलें आहे, तें तर अत्यंत कल्पना—सुंदर आहे. 'ज्या विवासनांत हृदयाचें स्पंदनहि बंद पडावें' त्यां अंदमानांत अशी सरस काव्य-निर्मिति कशी झाली याचें आश्चर्य कोणास वाटणार नाहीं ! शंभरावर ओळीमध्यें फुलबागेचें वर्णन

सावरकर किती डौलानें व ऐटीनें करतात पहा—" फुलबाग किती शोभे लहान, नटवी, करी । नटुनी थटुनी नाना नखरे वरचेवरी ॥ "

चांदण्यामध्यें ती बाग एकाद्या नदींतील नावेप्रमाणें मनोहर दिसे. " नौकेंत कौमुदीच्या ही नटली कितिदां तरी । बाग योजनगंधा त्या वन-देव–पराशरीं ॥ " त्या बागेंतील निरनिराळ्या रंगांचीं व आकाराचीं फुलें पाहून त्यावर एकाहून एक रमणीय उत्प्रेक्षांचा साज सावरकर चढ-वीत आहेत. हिरवीं, पांढरी, पिवळी फुलें पाहून ते म्हणतात, " हिरवाचि कधीं शालू, सित मलमालिचा कधीं । रेशमी जरतारी वा जयाच्या पदरामधीं ॥ "

जाई, कर्दळी, केळ, शेवंती, सोनचाफा, केतकी, सूर्यफूल, निशिगंध, गुलाब व धोतराहि–अशा विविधवर्णी फुलांचें हृदयंगम चित्रण आपल्या कल्पनेच्या कुंचल्यानें सावरकरांनीं केलें आहे. सोनचाफा हा मातीचेंहि सोनें करतो, ही त्याची किमया वर्णितांना सावरकर म्हणतात, " आणि हे सोनचाफ्या, तूं शिकलासि तरी कुठें । ही दिव्य किमया ? आम्हा स्वयंमन्य नरा जिथें ॥ रुप्याचेंही करायासी जड स्वर्ण न साधतें, । ओल्या मातींत सूर्याचीं किरणें पिळुनी तिथें ॥ मृदुचेतन सोन्याचीं, स्वर्णचंपक, हीं फुलें । सुगंधी तुज पाहोनी निर्मितां मन हें भुले । ॥ " या सोन-चाफ्याची प्रिया म्हणजे चमेली. " प्रियाची सोनचांफ्याची, चमेली किति ही खुले । तो तिच्यावरि ती त्याच्यावरतीं उधळी फुलें ॥ "

आणि निशिगंधाचें तें उंच, शुभ्र व सुगंधी फूल ! जणुं प्रेमाच्या सैन्यांतील रुप्याचें शिंगच ! " फूल ह्या निशिगंधाचें हें अधीरचित्तें हृदें । कामसेनापुरोगामी रौप्यशृंगाचि काय तें ! ॥ " बागेमध्यें शतधारांचें कारंजें आहे. त्यांतून पाण्याचे थेंब उडत आहेत. त्यावर सूर्याचे किरण पडले कीं इंद्रधनुष्यें दिसूं लागतात. या दृश्याची शोभा सावरकर शब्दांनीं डोळ्यापुढें उभी करतात, " कारंजें शतधारांचें कासारांत तया उडे । नृत्यबिंदुवरी त्याच्या तेजोबिंब यदा पडे ॥ तदा गमे असा लीलासरा उडत ये तया । थवा इंद्रधनुष्याच्या पिलांचा विहरावया ॥ " कमळांचे देठ पाण्यांत अर्धवट बुडालेले पाहून सावरकरांच्या कवि-मनाला गोपी-

वस्त्र-हरणाचें स्मरण होतें व ते म्हणतात, " जलार्धमग्ननाला ह्या शोभती नलिनी तशा । शोभती लाजत्या गोपी यमुनेंत तंई जशा ॥ " रम्य कल्पनांनीं विणलेलें हें वातावरण पुढील शृंगारिक कथानकाला उठाव आणणारेंच आहे.

क्लिष्टतेची कारण-मीमांसा

मात्र या काव्यावर रम्यतेबरोबर क्लिष्टतेची सावलीहि बरीच पडलेली आहे. संस्कृतप्रचुर शब्द-योजना व दूरान्वित वाक्य-रचना यामुळें पुष्कळ ठिकाणीं अर्थ दुर्बोध झाला आहे. याशिवाय कल्पनांची व विचारांची गर्दी सावरकरांच्या डोक्यांत इतकी झालेली असते कीं, त्यामुळें त्यांचा स्पष्ट व सुबोध आविष्कार नेहमीं नीट होऊं शकत नाहीं. सूक्ष्मता साधण्या-साठीं विचारांचे व कल्पनांचे पापुद्रेहि ते काढतात. या सर्वांमुळें त्यांची कांहीं कांहीं काव्यें दुर्बोध झालीं आहेत. पण ते कांटे बाजूस सारले म्हणजे मग मात्र सुरंगी व सुगंधी गुलाब हातीं येतात हें खचित.

वात्सल्यमिश्रित कारुण्य

' प्रभाकरास ' हें चिमुकलें काव्य करुण व वत्सल या दोन रसांनीं ओथंबलेलें आहे. सावरकरांचा पहिला मुलगा प्रभाकर चार वर्षांचा होऊन मृत्यु पावला. त्यावेळीं सावरकर इंग्लंडांत होते. आपल्या प्रथम अपत्याचा निरोप घेऊन सावरकर दूरदेशीं आले होते. त्यांच्या कवि-हृदयाला या अपत्य-निधनानें शोकाचे धक्के बसले. त्याबरोबरच मनाचा तोल संभाळण्याइतकी विवेकशीलताहि त्यांच्या अंगीं होती, हें या काव्यां-तील विचारावरून दिसतें. आपल्या मुलाची स्मृति चिरकाल रहावी म्हणून या प्रेमळ पित्यानें शीखांच्या इतिहासाचा आपला मराठी ग्रंथ त्याला अर्पण केला. पण दुर्दैव असें कीं, त्या बालकाप्रमाणें या ग्रंथाचाहि अकालींच अंत झाला. ब्रिटिश सरकारानें तो इतिहास जप्त केला— प्रसिद्धीपूर्वीच त्याचें हस्तलिखित सरकारानें आपल्या ताब्यांत घेतलें. बालक गेलें आणि त्याच्या स्मृतीचें साधनहि गेलें. ही सारी हळहळ

या कवितेंत ओतप्रोत भरलेली आहे. कवीनें आपल्या हृदयींची तळमळ या काव्यांत ओतली आहे.

याहून अधिक उत्कट वात्सल्य व कारुण्य 'श्री बंदावीर' या काव्यांत कांठोकांठ भरलेलें आहे. बादशहानें त्याचे दोनशें शिष्य ठार केले—कारण ते मुसलमान होईनात. मग बंदाच्या एकुलत्या एक बालकाला कापण्यांत आलें. त्याला वध-स्थानीं नेण्याचा प्रसंग वज्रालाहि विरघळविणारा! त्या प्रसंगाशीं समरस होऊन कवि त्या बादशहाच्या नोकरांना विनवितो, "हळु न्यारे, हळु। संभाळूनि लेंकरूं। हें लहान इतुकें कीं सांचल्या तया। रक्ताच्या डबक्यांतचि सहज बुडुनिया। जावें कीं जातां त्या वधशिलेकडे" सारा प्रसंगच चित्त थरारविणारा आहे! 'वीर करी गर्ज आणि शोक करी पिता' अशा भिन्नरसांचा संगम तेथें झाला. कवीला जितकी हळहळ वाटते, तितकीच त्या वीराचें अतुल धैर्य व अढळ धर्मनिष्ठा पाहून धन्यता वाटते. या दोन्ही भावनांचे संमिश्र उद्गार पुढील ओळींत उमटले आहेत—"हाय हाय—धन्य धन्य—हाय हाय हा। धन्य धन्य धन्य! तरिहि धैर्य ना चळे।"

भक्तीची तार

विश्व हाच ईश्वर असा भाव सावरकरांनीं 'जगन्नाथाचा रथोत्सव' या कवितेंत व्यक्त केला आहे. या काव्यांतील कल्पनेची भव्यता इतकी प्रचंड आहे कीं, ती पाहून 'महदाश्चर्यें हृदय सुखभरें थरकांपे' असें त्यांच्याच शब्दांत म्हणावेसें वाचकाला वाटतें. "ऐश्वर्ये भारी। या अशा। ऐश्वर्ये भारी। महाराज आपुली कथा ना कुठें निघे स्वारी?॥" अशी पृच्छा जगदीश्वराला कवि करतो. मात्र प्रौढ सावरकरांच्या लेखीं, जगदीश्वर म्हणजे जगताचा ईश्वर नाहीं, तर जगत् हाच ईश्वर आहे. या जगदीश्वराचें ऐश्वर्य म्हणजे विश्वरूपदर्शनच होय. "दिक्क्षितिजांचा दैदीप्य रथ तुझा सुटतां। ह्या कालपथाच्या अतुट उतरणीवरता। नक्षत्रकणांच्या उठे धुराळा रता॥" हा जगाचा नाथ रथांतून निघाला आहे. क्षितिज हा त्याचा रथ, काळ हा त्याचा मार्ग, सूर्य म्हणजे मशाली,—अशा थाटांत

रथ चालला म्हणजे नक्षत्रांचा धुरळा उडतो आणि मौज अशी दिसते कीं, " ह्या सूर्यशतांच्या किती मशाली जळती । मधुनीच शतावधि चंद्रज्योति ह्या उडती । सरसरत बाण हे धूमकेतुचे सुटती ॥ "

विश्वाचें विराट स्वरूप बुद्धीनें आकलून त्याला काव्याचें मोहक रूप देण्यांत सावरकर निष्णात आहेत. ' माळ गुंफितांना ' या कवितेंत ते त्रिगुणांची, सूर्यांची, नरमुंडांचीं, भूकंपांची—अशा माला गुंफत आहेत. " माळ गुंफितांना । ऐका कवनाला । गुंफी कोण कशी माला । घाली जगदंबा । त्रिगुणातीताला । त्रिगुणी बिल्वदली माळा । प्रकृति देवि गुंफी । देव विराटासी । नव नव सूर्य मालिकासी प्रलयंकार काली । गुंफि महाकाला ती नरमुंडचंडमाला । उद्भवा घाली । घालि उद्भवाला । सृष्टि भूकंपाची माला । "

' अनंताची आरती ' करतांनाहि सावरकरांची भावना असेंच व्यापक स्वरूप धारण करते. नम्र मानव ईश्वराची पूजा कशी करतो ? तर " निरंजनासी निरंजनाचा देवा दीप तुला । दाविती देवा दीप तुला ॥ आकाशाच्या अंगणांत तव । सूर्यसहस्त्री जो दीपोत्सव । पाजळिती हे पणती अपुली त्यास करूं साजरा । दाविती, देवा दीप तुला ।" ईश्वर सर्वत्रच आहे; त्याला कोण काय अर्पण करणार ? " आईच्याची बागेमधुनी । ताजी ताजी वेचुनि वेचुनि । मुली गुंफिती आईच्याची वेणींतूनि फुला । दाविती देवा दीप तुला ॥ " विशाल कल्पना व भाक्तिपूर्ण भावना यांनीं नटलेलें हें चिमुकलें पद मनोरम आहे.

सामाजिक सुधारकाची भूमिका

राजकीय क्रांतिकारक हा आपला पहिला अवतार संपवून सामाजिक सुधारक या दुसऱ्या भूमिकेवरून हिंदूंच्या ऐक्याचें व संघटनेचें कार्य सावरकरांनीं आरंभिलें. त्यासाठीं त्यांनीं 'हिंदूंचें एकतागात' रचलें, तें असें—

" तुम्ही अम्ही सकल हिंदू । बंधुबंधू । तो महादेवजी पिता आपुला चला तया वंदूं ॥ ध्रु ॥ ब्राह्मण वा क्षत्रिय चांग । जरि झाला । कसलेंहि रूप वा रंग । जरि ल्याला । तो महार अथवा मांग । सकलाला । ही

एकचि आई हिंदु जाति आम्हांस तिला वंदूं ॥ " हिंदु समाजांतील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठीं सावरकरांनीं खूप प्रचार व प्रयत्न केले. रत्नागिरी येथील एका मंदिरांत हरिजनांचा प्रवेश झाला. तेव्हां समाज-सुधारक सावरकर 'सुतक युगांचें फिटलें' अशी आनंदाची आरोळी ठोकतात व म्हणतात, " तुम्हि देवाच्या येउं दिलेंती दारीं । आभार जाहले भारी । तुम्हि वरदानीं शिवुनि पतित हा माथा । मळविलें पावना हाता । या ठेवुं पदांवरति पवित्रां ताता । दिधलाति पतित हा माथा । तुम्हि धर्माचे सूर्य कथुं किती नवला । सांवली तमाची शिवला ॥ "

सावरकर हे राजकीय किंवा सामाजिक पुढारी आहेत म्हणून त्यांच्या काव्याला नसतें महत्त्व चिकटलेलें आहे, असें मुळींच नव्हे. त्यांच्या नेतृत्वाचें वलय काढून टाकलें, तरी निर्भेळ काव्याच्या कठोर कसोटीलाहि पुरेपूर उतरण्याजोगेंच सावरकरांचें काव्य तेजःसंपन्न व प्रतिभासंपन्न आहे. त्यांच्या काव्यांतील पंक्तीच्या पंक्ति महाराष्ट्राच्या जिव्हेवर नाचल्या; त्या जितक्या त्यांतील इष्ट स्वातंत्र्य-भावनेच्या आविष्कारामुळें; तितक्याच त्यांतील असामान्य काव्य-सौंदर्यामुळेंहि.

— — —

आधुनिक कवीचे जे खास गुण मानले जातात, ते बहुतेक सर्व माधव जूलियन यांच्या काव्यांत आढळतात--आणि तेंहि अगदीं ठळकपणानें. मानवी प्रेमाचें निःसंकोच चित्रण जुने कवि फारसे करीत नसत.



राधाकृष्णादि देवादिकांच्या बुरख्यांतूनच प्रणय-लीलांचें वर्णन ते करीत. पण नवे कवि तरुण-तरुणींच्या प्रेमाचा आविष्कार स्पष्टपणें करतात. या बाबतींत माधव जूलियन हे अग्रभागीं आहेत; इतके कीं, त्यांच्या कांहीं टीकाकारांनीं त्यांना 'प्रणयपंढरीचे वारकरी' अशीच पदवी देऊन टाकली. दुसरें टोंक क्रांतीचें. राजकीय व सामाजिक क्रांतीचें रण-शिंग आपल्या काव्यांतून फुंकण्याचें एक वैशिष्ट्यच आधुनिक कविवर्गाचें होऊन बसलें आहे. माधव जूलियन यांनीं अशी नव्या युगाची, मानवधर्माची, समतेची व स्फूर्तीची तुतारी आपल्या अनेक काव्यांतून जोरानें फुंकली आहे.

आधुनिक काव्याचीं लक्षणें

जीवनांतील कोणताहि विषय काव्याला वर्ज्य आहे, असें आधुनिक कवि मानीत नाहींत. जगांतील कोणत्याहि विषयावर आपल्या हृदयांतील

कसल्याहि भावना निर्भीडपणें मांडणें हें त्यांचें एक वैशिष्ट्य आहे. आत्मनिष्ठता हें माधव जूलियनच्या काव्याचें एक विशेष लक्षणच आहे. विविध वृत्तांत आधुनिक कविता प्रगट होते. यमकाचें बंधन कैक वेळां ती झुगारून देते. सुनीतें, भावगीतें,-अशा लघु स्वरुपानें ती वावरते. पैठणीऐवजीं पांचवारी पातळेंच ती अधिक पसंत करते. महाकाव्याकडे आधुनिक कवींचें फारसें लक्ष नाहीं. फारच तर, खंडकाव्यापर्यंत त्यांची धांव. सध्यांच्या धावपळीच्या व अस्वास्थ्याच्या काळांत वाचकालाहि अशीच, आपल्या बोलींत लिहिलेलीं, आपल्या सांसारिक भावना रंगविणारीं, चुटचुटीत लघुकाव्येंच पचतात व आवडतात अशी गजलें व सुनीतें माधव जूलियन यांनीं खूप लिहिलीं आहेत. त्यांत त्यांची रसिकता, बहुश्रुतता, प्रांजलता व निर्भीकता हे गुण स्वच्छपणें दिसतात.

विशिष्ट कामगिरी

आधुनिक मराठी कवींमध्यें प्रा. माधवराव पटवर्धन यांचें एक विशिष्ट स्थान आहे. त्यांच्याइतका संशोधक बुद्धीचा, व्यासंगी वृत्तीचा व ठाशीव भाषाशैलीचा दुसरा कवी अलिकडच्या काळांत झालाच नाहीं. आपलें काव्य पुनःपुनः घासून-पुसून, स्वच्छ करून, पैलू पाडून एखाद्या तेजस्वी हिऱ्याप्रमाणें रसिकांच्या हातीं देण्याचा माधवरावांना मोठा उल्हास ! सामाजिक सुधारणेसाठीं त्यांच्या चित्ताची जी चडफड होई ती त्यांच्या काव्यांतून तत्तरसाप्रमाणें वाहत आहे. उलट तरुण अंतःकरणांतील प्रेम-भावनेचीं शीतल-रम्य कारंजींहि त्यांच्या काव्यांत सर्वत्र उडत आहेत. मराठी काव्याला जाति-वृत्तांची भक्कम व व्यवस्थित तटबंदी उभारण्याचें श्रेय खास माधवरावांचेंच !

फार्शी भाषेचा व्यासंग

'माधव जूलियन' ह्या फसव्या टोपण नांवानें प्रसिद्ध असलेल्या ह्या कवीचें नांव माधव त्रिंबक पटवर्धन असें होतें. त्यांचा जन्म बडोदें येथें

ता. ११ जानेवारी १८९४ रोजीं झाला. मुळशी पेट्यांतील आवळस हें त्यांचें मूळगांव. तेथें त्यांचें मराठी शिक्षण झालें. १९०३ सालीं ते पुनः बडोदें येथे गेलें व १९०९ सालीं ते प्रवेश परीक्षेंत उत्तीर्ण झाले. ऐच्छिक भाषा म्हणून फार्शीचा अभ्यास त्यांनीं केला. बडिलांनीं त्यांचेवर फार्शीची जबरदस्ती केली होती. शिष्यवृत्त्या पटकावून व शिकवण्या मिळवून माधवरावांनीं कॉलेजचा अभ्यास नेटानें रेटला. १९११ सालीं ते इंटर-मध्यें उत्तीर्ण झाले. त्यावेळीं त्यांना फार्शीतील एक बक्षीस व पहिल्या वर्गाचे गुण मिळाले. १९१६ सालीं ते फार्शी व इंग्रजी हे विषय घेऊन बी. ए. झाले. १९१८ सालीं ते एम्. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गांत उतरले. त्यावेळींहि त्यांचे विषय फार्शी व इंग्रजी हेच होते. त्यांच्या या फार्शीच्या व्यासंगाचें फल म्हणजे १९२६ सालीं त्यांनीं प्रसिद्ध केलेला फार्शी व मराठी कोश. त्यासाठीं सतत पांच वर्षें ते परिश्रम करीत होते. मराठींत हा कोश अजूनहि अद्वितीयच आहे.

मानाचे तुरे

एम्. ए. झाल्याबरोबर त्यांना पुणें येथील फर्गसन कॉलेजांत फार्शीच्या प्राध्यापकाचें काम मिळाले. तें त्यांनीं १९२४ सालापर्यंत केलें. नंतर राजीनामा देऊन त्यांनीं चार वर्षें हायस्कूलच्या शिक्षकींत घालविलीं. १९२८ सालीं कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजांत फार्शीचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. तेथें ते अकरा वर्षें होते. १९३३ सालीं नाशिक येथें कवि-संमेलन भरलें. त्याचें अध्यक्षस्थान माधवरावांना देण्यांत आलें. तसेंच १९३६ सालीं जळगांव येथें 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' भरलें. त्याच्या अध्यक्षपदाची माळहि माधवरावांच्या गळ्यांत पडली. "छन्दोरचना" ह्या त्यांच्या पांडित्यपूर्ण प्रबंधामुळें मुंबई-विद्यापीठानें माधवरावांना १९३९ सालीं "डॉक्टर" (D. Litt) ही पदवी अर्पण केली. मराठी विषयांत ही पदवी मिळविणारे माधवराव पहिले !

दहा काव्य-ग्रंथ

सुमारें वीस वर्षे माधवरावांनीं गद्य-लेखन व पद्य-लेखन केलें. त्यांचे

दहा काव्य-ग्रंथ बाहेर पडले आहेत. १९२६ सालीं त्यांचा 'विरह-तरंग' बाहेर पडला आणि तरुणांच्या जिव्हेवर खेळूं लागला. १९२८ सालीं "सुधारक" हा त्यांचा काव्य-ग्रंथ प्रसिद्ध झाला आणि त्यांतील नवविचारांचे धक्के महाराष्ट्राला बसूं लागले. "गजलांजली, स्वप्नरंजन, मधुलहरी व तुटलेले दुवे" ह्या पुस्तकांत त्यांच्या सुनीतांचा व स्फुट कवितांचा संग्रह झालेला आहे. उमर खय्यामच्या रुबायांचें भाषांतरहि त्यांनीं प्रसिद्ध केलें. फार्शीच्या अभ्यासांत जन्म घालविलेल्या व नांव मिळविलेल्या माधवरावांनीं आपल्या आयुष्याच्या अखेरीस भाषाशुद्धीचें मोठें आंदोलन केलें. परभाषांचें आक्रमण मराठी भाषेवर होऊं नये आणि त्या आक्रमणामुळें मराठींतील जुने शब्द विसरले जाऊं नयेत ह्या प्रचाराचा त्यांनीं धोशा लावला. त्यासाठीं "भाषा-शुद्धि-विवेक" नांवाचें स्वतंत्र पुस्तकच त्यांनीं लिहिलें. त्यांत त्यांनीं आजच्या मराठींतून काढून टाकण्यास योग्य अशा बाराशें शब्दांची जंत्रीहि दिली आहे. अशी महाराष्ट्र-शारदेची बहुविध सेवा करून हा पंडित-कवि वयाच्या अवघ्या ४५ व्या वर्षीं, ता. २९ नोव्हेंबर १९३९ रोजीं, पुणें येथें निधन पावला.

"मी 'काव्यं यशसे' म्हणूनि धरिली नाहीं करीं लेखणी। अर्थ हवा म्हणूनि नकलीं स्तोत्रें न मी गाइलीं॥" अशी आपली भूमिका माधवरावांनीं सांगितली आहे. कीर्ति किंवा पैसा याकडे लक्ष न देतां माधवराव लेखन करीत. त्यांचा स्वभाव जसा स्वाभिमानी व बाणेदार होता; तसेंच त्यांचें साहित्यही घोटीव व ठाशीव आहे. मातृभाषेचा कडकडीत अभिमान, समाजसुधारणेचा तीव्र अभिनिवेश, प्रेम-भावनेचा स्वच्छंद अविष्कार आणि नव्या नव्या चाली व विषय—या विशिष्ट गुणांमुळें माधवरावांची काव्यरचना म्हणजे मराठी भाषेंतील एक सुंदर लेणें ठरलें आहे. महाराष्ट्रांतील सुशिक्षित वर्गाचें तोंड नवीन कवितेकडे वळविण्याचें श्रेय "रवि-किरण-मंडळा"स आहे आणि त्या श्रेयाचा मोठा वाटा माधवरावांना आहे.

मातृभाषेचें स्तोत्र

स्वभाषा व स्वसंस्कृति यांचा पटवर्धनांना गाढ अभिमान होता. मातृभाषेच्या मोठेपणाचें जें गीत त्यांनीं रचले; तें तर आतां सर्वतोंमुखीं झालेलें आहे. त्यांतील स्वाभिमान, कृतज्ञता, महत्वाकांक्षा व विशाल दृष्टी हे गुण अलौकिक आहेत. मातृभाषेचें महिम्न-स्तोत्र गातांना ते म्हणतात—" मराठी असे आमुची मायबोली जरी आज ही राजभाषा नसे । नसो आज ऐश्वर्य या माउलीला, यशाची पुढें दिव्य आशा असे । जरी पंचखंडांत ही मान्यता घे स्वसत्ताबळें श्रीमती इंग्रजी, । मराठी भिकारीण झाली तरीहि कुशीचा तिच्या तीस केवी त्यजी ? ॥ " राजभाषा म्हणून इंग्रजीला व राष्ट्र-भाषा म्हणून हिंदीला मानाचें स्थान मिळालें असलें; तरी मातृभाषा म्हणून प्रत्येक महाराष्ट्रीय आपल्या हृदयाच्या देव्हाऱ्यांत मराठीचीच पूजा करील. " जरी मान्यता आज हिंदीस देई उदेले नवें राष्ट्र हें हिंदवी, । मनाचे मराठे मराठीस ध्याती हिची जाणुनी योग्यता, थोरवी, । असूं दूर देशावरी उत्तरीं वा असूं दक्षिणीं दूर तंजावरीं । मराठी असे आमुची मायबोली, अहो ज्ञानदेवीच देखा खरी ॥ "

मराठीचे सर्व भक्त एका मायबोलीच्या कृपाछत्राखालीं बसूं शकतात-मग ते राहणारे कोठलेहि असोत किंवा कोणत्याहि धर्माचे असोत. सर्व जगांत आम्ही आमच्या मायबोलीला मान्यता मिळवून देऊं अशी प्रतिज्ञा करतांना पटवर्धन म्हणतात, " मराठी असे आमुची मायबोली जरी भिन्न धर्मानुयायी असूं, । पुरी बाणली बंधुता अंतरंगीं, हिच्या एक ताटांत आम्हीं बसूं । हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडूं, वसे आमुच्या मात्र हृन्मंदिरीं । जगन्मान्यता हीस अपूं प्रतापें हिला बैसवूं वैभवाच्या शिरीं ॥"

आजमितीला इंग्रजीसारख्या संपन्न भाषांच्या मानानें मराठी गरीब असेल, तर तिच्या ' लक्तराकडे ' पाहूं नका, तिचें रूप व चापल्य अद्वितीय आहे, ती ' पारतंत्र्यात खंगली ' आहे, तिची ' थोर संपत्ती ' उपेक्षेमुळें बुडाली आहे, पण आम्ही सिंधु मंथून रत्नें काढूं आणि तिनें

तिला भुषवूं; मग तिला जगांतील भाषा खंडणी देतील, असा अकुंठ आशावाद कवीनें या काव्यांत ओतलेला आहे. कोल्हटकरांच्या 'महाराष्ट्र गीता 'प्रमाणेंच पटवर्धनांचें हें भाषा-गीतहि महाराष्ट्र-लक्ष्मीच्या कंठांतील एक तेजःपुंज रत्नहार आहे.

महाराष्ट्राचा कडवा अभिमान

महाराष्ट्राचा जळजळीत अभिमान पटवर्धनांच्या अंगीं कसा खेळत असे हें त्यांच्या 'मराठबाणा' या कवितेवरून स्पष्ट दिसतें. महाराष्ट्राचें रूप व सामर्थ्य वर्णन करतांना ते म्हणतात, 'महासिंधु याला असे पाठि-राखा, तसें साह्य सह्याचलाचे कडे।' "महाराष्ट्र हा कृष्णपाषाण देही, । परी लोहपाणीहि अंगांत या।" महाराष्ट्राचे निर्माते छत्रपती शिवाजीमहाराज यांच्याविषयीं कवीनें पुढील शब्दांत आपला आदर व्यक्त केला आहे. "सदावंद्य जो क्षात्रकर्मप्रणेता महाराष्ट्र-सम्राट शिवाजी प्रभू। तया पूज्य ती पूज्य तत्सेवकाला न कां संत-माता महाराष्ट्र भू?"

ज्ञानेश्वरींतील मराठी भाषा तर अमृतालाहि फिकी पाडणारी! खिस्ती, मुसलमान वगैरे इतर धर्मांच्या अनुयायांनींसुद्धां मराठींत काव्य-रचना करून तिला विविधतेचें सौंदर्य मिळवून दिलें आहे. हा तिचा गुण गातांना कवि म्हणतो—"जिच्या 'अमृतातेंहि जिंकील पैजा' असा बोल ये प्रत्ययाचा निका। पहा भिन्नजातीय पुष्पाकरांहीं दिसे गालिचा कीं हिचा वाटिका।" मराठी भाषेच्या प्रेमामुळें तिचा कैवार घेण्यास कवि सदैव सिद्ध आहे. तो आपलें ब्रीद जाहीर करतो—"मराठीस अन्याय कोठेहि झाला, स्वदेशीं-विदेशीं कुणी गांजिलें। मराठी कसा मी न संताप माझा धडाडे जरी तीव्र दुःखानिलें?। मराठी जनांचेंच वर्चस्व राहो स्वतःच्या महाराष्ट्रदेशीं तरी-।। प्रसादे तुझ्या कोणती व्यक्त आशा करूं अन्य हे वंद्य वागीश्वरी?।।"

'मराठा' माणसाची चतुरंग ब्रीदावली कवीनें पुढील मोजक्या शब्दांनीं गाइली आहे—"भवानी आमुची आई, शिवाजी आमुचा राणा। मराठी आमुची बोली, गनीमी आमुचा बाणा।।"

वात्सल्याच्या छटा

वात्सल्य रसाचे तुषार अनेक कवितांमध्यें कवीनें उडवलेले आहेत. पण त्या सर्वांत 'अंगाई' या काव्यांतील मातृभक्तीचा उमाळा कांहीं विलक्षण आहे. एक आई आपल्या मुलाला निजविण्यासाठीं रात्रीच्या वेळीं गाणें गात आहे. गाणें गातांगातां तिला आपल्या स्वतःच्या आईची आठवण होते आणि ती म्हणते, " तुज थोपटतें, मांडीवर मी घेतें । झोकेहि हळूहळू देतें । जर आईची मांडी शिर टेकाया । तर इन्द्रपदहि तें वाया ! । मज दुर्मिळ ती, जीवर ठेवुनि डोकें । विसरूनि भोवतिल धोके, । वाटतें यथेच्छ रडावें । अन् पदराखालीं दडावें, । झोपेंत अथांग पडावें । ही प्राप्त तुलानीज ! नसे जरि बाळा पाळणा आणि झोपाळा ॥ "

आपल्या मुलासाठीं झिजतांना आपल्यासाठीं अशाच प्रकारें झिजणाऱ्या आई-बापांची आठवण होणें किती स्वाभाविक ! त्या दुहेरी प्रेमाचे धागे राजकवि यशवंतांनीं " दैवतें मायतात " या कवितेंत गुंफले आहेत. तेंच कौशल्य पटवर्धनांनीं या कवितेंत दाखविलें आहे, शेवटीं ते म्हणतात, " मज आईनें हेंच नभाचें लेणें । दाविलें असेल मजेनें । भरवित इवले काउचिऊचे घास-। रुचि काय तिच्या प्रेमास ! त्या प्रेमाची गोड गहन उत्कटता । या हृदयीं आतां पटतां । हा स्मारक बाल्यसुखाचा । हा स्मारक मातृसुखाचा । हा साक्षी मधु कुतुकाचा, । नर्भि बघतां मी परिचित या चंद्राला । ये हृदयीं भाव-उमाळा ॥ "

' प्रेमस्वरूप आई ! वात्सल्यसिंधु आई ! ' असें गौरवगीत गाऊन माधवरावांनीं 'आईची आठवण' केली आहे. ती कविता वाचून यशवंतांच्या काव्यांतील कांहीं कांहीं शब्दांची, भावनांची व विचारांचीहि आठवण होण्यासारखी आहे. माधवराव म्हणतात, " विद्या-धन-प्रतिष्ठा लाभ अतां मला हीं । आईविणें परी मी हा पोरकाच राहीं । सारें मिळे परंतु आई पुन्हा न भेटे । तेणें चिताच चित्तीं माझ्या अखंड पेटे ॥ आई तुझ्या वियोगें ब्रह्मांड आठवे गे । कैलास सोडुनी ये उल्केसमान वेगें ॥ "

पोरक्या मुलाच्या मनांत कोणत्या आशा नाचतात ? " ही भूक

पोरक्याची होई न शांत आई। पाहूनियां दुज्यांचें वात्सल्य लोचनांहीं। वाटे इथूनि जावें, तूझ्यापुढें निजावें। नेत्रीं तुझ्या हसावें, चित्तीं तुझ्या ठसावें ॥" शेवटीं 'परि येइ येइ वेगें' या यशवंतांच्या शब्दांत ते आळवतात, "घे जन्म तूं फिरूनी। येईन मीहि पोटीं ॥"

कल्पनेचे विलास

भाषेचे अलंकार घडवून किंवा कल्पनेचीं फुलें फुलवून आपली कविता शृंगारण्याची हौस पंडित-कवि पटवर्धनांना फारशी नाहीं. तथापि काव्य म्हटलें कीं, त्यांत कल्पनेचें नर्तन आलेंच. रात्रीं रानांत लुकलुकणाऱ्या काजव्याप्रमाणें त्यांच्या काव्यांत अधूनमधून कांहीं कांहीं सुंदर कल्पना चमकतात. 'चांदण्यांतील हुरहूर' या कवितेंत पृथ्वीदेवी चांदण्याचें रेशमी वस्त्र ल्याली आहे अशी कल्पना करून ते म्हणतात— 'अमृतानें सृष्टि न्हाली, । चंद्रिकेचें क्षौम ल्याली, । हा हिजवर उधळे चूर रुप्याचा का हिम का कापूर ? ॥"

बालकवीचा 'निर्झर' प्रसिद्ध आहे. त्यांत निसर्ग उड्या मारत आहे. पटवर्धनांनींहि 'निर्झरास' ही कविता रचली आहे. त्यांत त्यांच्या स्वभावाचें वैशिष्ट्य दिसून येतें. आरंभीं "तुझ्या हास्यांत चमके। साऱ्या विश्वाचें चैतन्य-। धन्य माझे डोळे धन्य ! ॥" असें म्हणून आपल्या हृदयांतील निराशा आठवून ते विचारतात—"बाळ, तुझ्या रे वाचून। कळणार तरी कुणा। भग्न अंतरींच्या खुणा ? ॥"

आशा कशी असते याचें वर्णन करतांना ते लिहितात—"प्रीतीच्या सुंदर बागांत्। सुमकंचुक घालुनि अंगांत्। आशा बसली गाणीं गात्। वसंत रागांतले आळवित मोहक मधुर स्वर रंगांत् ॥"

सामर्थ्याचे पूजक

गांधीजींची अहिंसा शौर्याची, प्रतिकाराची व तेजस्वी आहे हें मर्म अचूक ओळखून पटवर्धनांनीं त्यांचा गुणगौरव "महात्मा काय करील एकला ?" या कवितेंत असा केला आहे—"घेउनि सत्य, प्रीति, अहिंसा

यांचा झेंडा करीं । संचरे गांधी देशावरी । खादी पटका, त्यावर चरका, अर्धा उघडा गडी । तोंड दे जुलुमाला हरघडी ॥ सानथोर रंजलेगांजले यांना हृदयीं धरी । योग हा अनासक्तिचा वरी । हा क्रांति कराया झटे राज्यधोरणीं । हा पुढें सरे कीं प्रथम मी पडो रणीं । हा हिरा न फुटणें हाणा घण ऐरणीं । भूतदयेचा सागर अथवा म्हणा दिसे चेवला । महात्मा करिल काय एकला ? ''

ईश्वरापुढें नम्रभाव

पटवर्धन हे चिकित्सक वृत्तीचे व तार्किक बुद्धीचे होते. ईश्वराला मानवानें कसें पूजावें ? याविषयीं कुसुमाग्रजांनीं एक भावपूर्ण कविता केलेली आहे. तशाच मानवतेच्या प्रेमानें भरलेलें 'पोरक्या पोराचा धावा' हें पटवर्धनांचें काव्य आहे. त्यांत तो अनाथ पोर परमेश्वराला म्हणतो— '' कोणत्या स्वरूपीं प्रभो, तुला मी पाहूं ? । ये धाव आसवें पूस, पसर तव बाहू । तूं विश्वात्मक, तूं गूढ, तुझी कित्ती सत्ता । मी क्षुद्र जीव मज चोहीकडुनि इयत्ता । संसार जगाचा चालविशी तूं बापा । मी स्वतःच-साठीं खपुनि टाकितों धापा । तूं सर्वशक्तिमान् सिंधू तुला भेटाया । मी बिंदु धडपडें, शोषी मज ही माया । जें प्रेम अनिर्वचनीय तेंच तूं देवा । मी कुठें अनुभवूं ? कशी करूं तव सेवा ? ''

आईच्याच ठायीं ईश्वराची मूर्ति पहाणारा तो मुलगा म्हणतो— '' प्रेमाची गंगा क्षमाशील जी आई । तन्नेत्रीं, ओष्ठीं, स्तनीं तुझी नवलाई । अनसूया माता किति पदवी ही मोठी । साकार ईश्वरी त्रिपुटी येई पोटीं । पोरकें पोर मी रडतों धाई धाई । मी करूं कुणाच्या मांडीवर अंगाई ? । खेळूनि गुदगुल्या करूं कवण जीवाला ? । गाळूनि अश्रू मी आणूं कुणास उमाळा ? । संपली चढणही, वृथा अता ती आस । परि व्हावें बालक, रुचें हेंच जीवास ॥ ''

संसाराच्या भारानें चेपलेला पिता, दारिद्र्याला कंटाळून म्हणतो— '' दिडकीसहि किति लागती अर्ज—आर्जवें । भागे न कष्ट कामानें । आणखी स्वभावार्जवें ॥ '' '' बाहेर चांदणें पडे दुधासारखें । परि भरेल

का बाळाचें पोट या दुधानें सखे ? ॥ " " वाटतें नको हें जिणें । ही पापभीरुता जाचीं । पैक्याच्या छत्राविणें ॥ " या काव्यांत वात्सल्य व करुण हे दोन्ही रस भरलेले आहेत. 'विधवेचा बाळ' या कवितेंतहि हेच रस खेळत आहेत.

अन्य कवींचें गुण-ग्रहण

तांबे यांच्या गुणांचे चहाते माधवराव होते. बोरकरांनीं 'कविवर भास्करास' ही सुश्लिष्ट कविता लिहून तांब्यांचा गौरव केला; तसाच पटवर्धनांनींहि 'कवि भास्करास' या कवितेंत केला आहे, तो असा— " तूं प्रसाद, तू रस खरा कवी । गा, बुडव जगत हें सुखासवीं ॥ " " तृणींहि तुज सौंदर्य आढळे । गळे अहंता, भाव उचमळे । आनंदाचा गंध दरवळे, हटसमाधि का वृथा हवी ॥ " " शोधाया जा शब्द कशाला । मोहुनि धावे प्रतिभाबाला । संगीताशीं रंग मिळाला, चित्र-मालिका पहा नवी ॥ "

तांबेच काय पण सर्व कविवर्गाविषयीं पटवर्धनांना आपुलकी वाटत असे. कवीची गरिबी व अवहेलना ध्यानीं घेऊन ते एका कवितेंत म्हणतात, " सोसावया अजि नकोच दुरुक्ति-मारा । गेला कवीश्वर, बरा सुटला बिचारा ! ॥ " 'वृद्ध कवि' हें त्यांचें काव्य तर अत्यंत भावनापूर्ण आहे. जणुं कांहीं त्यांच्या प्रौढ वयांतील मनाचेंच तें प्रतिबिंब आहे. त्याचें विडंबन त्यांनीं स्वतःच 'वृद्ध भटजी' या आपल्या कवितेंत केलें आहे. यावरून 'वृद्ध कवि' हें आपलें काव्य त्यांना किती आवडलें असावें हें दिसून येतें. या काव्यांतील 'वृद्ध कवि' तरुण कवींना उद्देशून नम्रतेनें म्हणतो—"मी झालों पिकलें पान आणखी तुम्ही । टवटवीत सुमनें नामी । काव्याच्या कल्पद्रुमीं ॥ या भाट उषेचे तुम्ही, गीत गा नवें, । कांतिचें पुढील तुम्हांला । सौंदर्य दिसें, वानवें. ॥ शारदा दिव्य माउली थोर आपुली । अन् बाळें आपण सारीं । सोनुलीं तिचीं सानुली ॥ नाचलों खेळलों पुरा, अतां भागलों । मी मांडीवर आईच्या हा पहुडाया चाललों." हीच कृतार्थतेची, समाधानाची वृत्ति माधवरावांना प्राप्त झालेली होती.

वादळ उठविण्याची शक्ति

माधवरावांचें एक एक काव्य म्हणजे नवनवें वादळ ! 'विरह–तरंग' हें त्यांचें पहिलें खंड–काव्य किती वादग्रस्त ! डे. व्ह. ट्रॅ. सोसायटीनें त्याला पारितोषिक देण्याचें नाकारलें; पण पुढें मुंबई–नागपूर विद्यापीठांनीं तें प्रवेश–परीक्षेसाठीं लावलें. 'हें लांच्छनास्पद आहे, तिरस्करणीय आहे' अशी टीका कोणी कोणी केली; तर कोणी 'कवीनें आपल्या काव्य–कलेची बहार उडवून दिली आहे.' अशी प्रशंसा केली, एवढेंच नव्हे तर, कांहीं चोखंदळ चिकित्सकांनीं असेंहि मत प्रदर्शित केलें कीं, "कित्येक बाबतींत कालिदासाच्या मेघदूतापेक्षांहि विरह–तरंग अधिक सरस आहे." कोणाला या खंडकाव्यांतील 'नायक निर्जीव' वाटला, तर कोणाला 'नायिका अवास्तव' दिसली. पण बहुतेक सर्व टीकाकारांना व वाचकांना या पहिल्याच काव्य–कृतीवरून कवीच्या लेखन–सामर्थ्याची जाणीव मात्र पटली हें खास.

या काव्याचें मूळ म्हणजे 'प्रियकराची विरह-पत्रिका' या नांवाचे १९१३ सालीं रचलेले पंचवीस श्लोक. त्यांचा विस्तार करून २३२ श्लोकांचें हें खंडकाव्य १९२६ सालीं कवीनें प्रसिद्ध केलें. त्याची दुरुस्ती व सफाई कवीनें खूपच केली. अशा परिष्काराची कवीला मोठी हौस. सात वर्षांनीं दुसरी व नंतर पंधरा वर्षांनीं तिसरी आवृत्ति या काव्य-संग्रहाची निघाली.

कॉलेजियनांची प्रणय-कथा

या छोट्याशा काव्यांत प्रभाकर नांवाचा एक कॉलेज–तरुण आपली प्रेम–कहाणी सांगत आहे. वैशाख शुद्ध अष्टमीच्या दुपारपासून काव्यास प्रारंभ होतो आणि दुसरे दिवशीं सकाळीं नायक-नायिकांचा विरह संपतो. आपल्या विफल प्रेमाचीं स्मृति–चित्रें नायक, स्वगत भाषणा-प्रमाणें, आठवून आठवून रंगवीत आहे. प्रार्थना–समाजिष्ट अशा सुधारकी कुटुंबांतील 'इंदु' नांवाच्या तरुण विधवेवर प्रभाकराचें प्रेम बसतें.

तीहि कॉलेजांत शिकतच असते. कॉलेजांतील टेनिसचे सामने, सहभोजनें सहली, इत्यादि नाना निमित्तांनीं त्या दोघांचा सहवास वाढतो व प्रेमभाव बळावतो. 'थोराची, विदुषी, सुधारक–सुता' अशी इंदु असल्यामुळें ती मोकळेपणानें वावरते. महाबळेश्वराच्या सृष्टि–सौंदर्यांतहि ते विहार करतात. त्यावेळीं प्रभाकर लग्नाची गोष्ट काढतो, तेव्हां इंदु नकार देऊन त्याच्यापासून दूर जाते. यामुळें नायकाच्या हृदयांतील 'विरह–तरंगा'स प्रारंभ होतो. त्याला सर्वत्र इंदुच दिसूं लागते. आणि ती कशी? तर— "जीचें भाषण मंजु गुंजन जणूं कुंजीं करी कोयळ। जीचें अंतर भावसुंदर जणूं ओथंबलें मोहळ॥" कोकिळेसारखा आवाज आणि मधासारखें हृदय–अशा गुणांनीं नटलेली नायिका, तर नायक कसा? तो स्वतःच आपलें वर्णन करतो, "जो क्रीडापटु, वेषभक्त, कवनप्रेमी, कला–चाहता,। ज्याला मासिक वेतनांत बहुशा कष्टेंच ये राहतां,। आशा एकच ज्यास धार्मिक गमे, सौंदर्य–धर्म चर!। विद्यार्थ्यांस अशा म्हणे कुणि महाविद्यालयीं 'मंचर'!॥" मंचर, किंवा रोमँटिक, अशा या तरुणालाहि समाज–सुधारणेचा ध्यास होतो. तो सांगतो, "होतों एक बडा सुधारक तदा विद्यार्थिकालांत मी,। सर्वांगीण सुधारणा ध्रुव जया तारा निराशा–तमीं;।"

प्रेमाचें तत्त्वज्ञान

महाबळेश्वराच्या सृष्टि-सौंदर्यामुळें त्या दोघांना एकमेकांचें सौंदर्य विशेषच आकर्षक वाटूं लागलें. तेथील उन्हांतील सौम्यता, स्ट्रॉबेरी फळांची लाली आणि गुलाबाचे रंग–हे सारे आपल्या इंदूनें उसने दिले आहेत अशी कल्पना करून नायक गुणगुणतो, "तेथें ऊन तुझ्याकडूनि उसनी घे सौम्यतामाधुरी। ओठापासुनि रम्य तांबुस छटा स्वादिष्ट इष्टापुरी;। घेई रानगुलाब कान्तिच तुझी, ये बाह्य शोभा खरी। तो निर्गंध परी निराशच करी गे चित्र–काव्यापरी.॥"

इंदु दूर गेली, तेव्हां उदारपणानें व खऱ्या प्रेमभावानें प्रभाकर तिचें कल्याणच चिंतितो व म्हणतो, "कोठेंही अस तूं! सुखी पण सखे,

आहेस ना इंदु गे ? । ध्येयाचे वद, का तुझ्याहि फुटले स्वश्चापवर्णी (= इंद्रधनुष्याच्या रंगाचे) फुगे ? । का वाटे तुज, देव मानुनि तुवां पाषाण आराधिला, । प्रेमाचा उलटा वियोगच भवीं सायास हा साधिला ? ॥ " प्रभाकराला वाटे कीं, खरें प्रेम हें उदबत्तीप्रमाणें स्वतःला जाळील, पण दुसऱ्याला ताप देणार नाहीं, तो म्हणतो, " अन्याला बुडवावया बिलगतें तें प्रेम नाहीं खरें, । तत्स्वातंत्र्य हिरावयास बघतें तें प्रेम नाहीं खरें; । स्वांगें धूप जळूनि गंधित करी वायूस, जाई वरी, । सेवा-धर्महि यापरीच जग हें आनंददायी करी ॥ "

काव्यांतील दोष

तरुणांच्या प्रेमाचा आविष्कार या काव्यांत कलात्मक पद्धतीनें केला आहे. नायक–नायिकांचे स्वभाव उदार व उदात्त रंगविले आहेत. पण या काव्यांत कल्पकता व सुबोधता यांचें प्रमाण फार कमी आहे. 'सहलणें, कानगुजला, हळदुनी ' असे नवे शब्द कवीनें आपल्या टांकसाळींत पाडले आहेत; तसेच ' रुंजी, हिंपुटी ' वगैरे जुने शब्दहि वापरले आहेत. त्यांच्याइतकेच अपरिचित असणारे ' कर्दा, वडांग ' असे ग्रामीण शब्दहि त्यांनीं योजले आहेत आणि ' स्वर्हानि ' (Paradise Lost), " शिरीषशील, शैलकाठिन्य ' ' सौंदर्यधर्म चर ' असा संस्कृतचा माराहि केला आहे. 'प्रेमाची परिपूर्णता परिणयीं ' अशा अनुप्रासयुक्त अर्थांतर-न्यासाचा अर्थ किती काव्य–वाचकांना झटदिशीं कळेल ? शिवाय ' हृद्य मजा ', ' खुर्चीसन्मुख ', ' ज्वानीच्या अरुणोदयीं ' असे शब्द–संकरहि मधूनमधून वाचकाला खटकतात. अशी भाषेची क्लिष्टता, कल्पना-शक्तीचा मर्यादितपणा आणि भाषालंकारांची दुर्मिळता या तीन उणिवा त्यांच्या पुढील काव्यांतहि आढळतात.

'सुधारका'ची पार्श्वभूमि

'सुधारक' या खंड–काव्याचा थाट कांहीं वेगळाच आहे. एक कथा-सूत्र घेऊन त्यांत कवीनें काव्याचे मणि ओवलेले आहेत. या मण्यांची कांति, वजन व आकार ' विरह-तरंगा' हून अगदीं निराळा आहे. 'सुधारकाची'

भाषा अगदीं सोपी व ओघवती आहे आणि वृत्त धावतें व सुटसुटीत आहे. 'घरास आली सरला बाला' अशा सुगम ओळीमागून ओळी वाचतांना आपण रे. टिळकांचीच एखादी काव्यकथा वाचीत आहों असा भास वाचकास होतो. प्रारंभीं कथानकाला अशी पार्श्वभूमि जोडलेली आहे कीं, दिवाळीचे दिवस आहेत–'मधुर वस्तूंची चंगळ' आहे—'खमंग गप्पा' चालल्या आहेत आणि परीक्षा तर दूर आहे—अशा ऐषआरामाच्या परिस्थितींत कांहीं स्नेहीमंडळी कडोविकडीचे वादविवाद करीत असतांना एक अज्ञात कवि तेथें आले. 'देखा टेकाडेच सवाई।' असें सुंदर काव्य–गायन त्यांनीं केलें. तें काव्य म्हणजेच 'सुधारक'.

शब्दांची चमत्कृति

व्यवहारांतील 'चलनी' भाषा कवीनें सर्वत्र वापरली आहे. 'नंदी, भडभुंजे, झब्बू, खाबू, गब्रू,' इत्यादि काव्याला वावडे असणारे शब्दहि या आधुनिक कवितेंत विनोदार्थ घातलेले आहेत. आणि ते त्या त्या पात्रांना शोभणारेहि आहेत. 'हवेवर हवाला,' 'चहा चहाची' अशा शब्दलीला थोड्याच आहेत. 'देशभाषेचा ताठा' धरून 'पायचाकी (सायकल), पोटाग (ममता),' असे बरेच शब्द वापरले आहेत. पण काव्याला क्वचित् क्वचित् जी दुर्बोधता आली आहे, ती मुख्यतः संस्कृतच्या दडपणानें. 'तिची दुरत्यय ती वाग्यतता।' अशा संस्कृत शब्दांचा आशय भरभर काव्य वाचणाऱ्याच्या गळीं कसा उतरणार? 'भाषेचाहि कठिण तडाखा। मतामतांचा काय कडाखा।' असा पिंड या खंडकाव्याचा आहे. तो अज्ञात कवि 'नवकवितेचा प्रेमळ पाठक। जुन्या कवींचा कृतज्ञ पाइक' असा समतोल वृत्तीचा दाखविला आहे—किंबहुना माधवरावांच्या स्वभावाचेंच तें प्रतिबिंब आहे. इंग्रजी शब्दसुद्धां मराठी पेहराव चढवून दत्तक घेण्याची माधवरावांना हौस होती. 'नाशनिष्ठ (= नॅशनॅलिस्ट), कळप (= क्लब), मुक्ता ढवळे (= पर्ल व्हाइट)' इत्यादि चमत्कृतिजनक शब्दामुळें काव्याला विनोदाची खुमारी आली आहे.

उपहासाचा सुंदर नमुना

' सुधारक ' हें काव्य मुख्यतः उपहासपर आहे. समाजांत सत्ता, विद्वत्ता व ऐश्वर्य यांनीं मोठेपणास चढलेलीं माणसेंसुद्धां किती वंचना करतात व विसंगत वर्तन ठेवतात हें यांत तीक्ष्ण भाषेनें रंगविलेलें आहे. थोरा-मोठ्यांचीं ढोंगें उघड्यानागड्या स्वरूपांत कवीनें चव्हाट्यावर मांडलेलीं आहेत. त्यामुळें ' कुत्सित सगळीकडे कुचाळी ' असा भास हें काव्य वाचतांना दांभिक सुशिक्षितांना होणें साहजिकच आहे. पण माधवरावांनीं आपल्या प्रखर बुद्धिप्रकाशांत समाजांतील साप-विंचू उपहासाच्या चिमट्यानें धरून लोकापुढें मांडले, हें त्यांचें धैर्य अभिनंदनीय होय.

कादंबरीप्रमाणें एकेका ' अध्यायांत ' एकेका पात्राचा प्रवेश घडविलेला आहे. सर्व कथा अठरा अध्यायांत सांगितली आहे. पहिल्या अध्यायांत रावबहादुर ठोसर यांचें स्वभाव-चित्र सविस्तर रंगविलेलें आहे. हें ' बिलंदर कायदेबाज ' होते. वकिली करून त्यांनीं खूप पैसा मिळविला आणि समाज-सुधारणेंत भाग घेतला. ' सुधारणा पण यांची सक्रिय.' त्यामुळें पुनर्विवाहाचे वेळीं ते मागें सरले नाहींत. पांच यत्ता इंग्रजी शिकलेल्या विमलेशीं त्यांनीं विवाह केला. पहिल्या बायकोपासून झालेली त्यांची मुलगी सरला. ही प्रि. अण्णासाहेब कर्वे यांच्या कॉलेजांत शिकून ग्रहीतागमा झाली. तिचें लग्न रंगराव देशमुख नांवाच्या तरुण विधुरा-बरोबर झालें.

या कथेचा नायक वासू राजे. त्याचें अंतर्बाह्य असें सविस्तर व मनोहर शब्द-चित्र कवीनें रेखाटलें आहे. विसावे वर्षीं विधवा झालेली सुशीला ही त्याची आई. नर्सचा धंदा करून ती पोट भरी व मुलाचें शिक्षण चालवी. वासू मॅट्रिक झाला; त्यावेळींच सुशीलेला मृत्यु आला. वासू हा " प्रसन्न, राजस, विनीत, सालस " असा नायक दाखविला आहे. विचारामध्यें तो आगरकरांचा सच्चा चेला आहे.

सुंदर शब्दचित्रें

या काव्यांतील दोन शब्द-चित्रें प्रेक्षणीय आहेत. फर्गसन कॉलेजांतील

रँ. परांजपे व प्रा. वासुदेवराव पटवर्धन—दोघेहि आपापल्या क्षेत्रांत अग्रेसर. त्यांचें वर्णन करतांना कवि म्हणतो—" नच बहुवेषी वा कलिकारक । मूर्ति भव्य, सम उंची जाडी । दोघांचे आवाज पहाडी । सारखीच वर्गीत धडाडी । दोघे नास्तिक आणि सुधारक ॥ " यापैकीं प्रा. पटवर्धन हे जातिवंत शिक्षक व अभिजात रसिक होते. त्यांचें वर्णन विरोधाभासानें कवीनें केलें आहे, तें असें–" भावबळें ज्वालामुखि पर्वत । परी शिरावर बर्फाचा थर । अरुण कांति त्या भव्य मुखावर । हृदय कसें तें ? प्रसून, पत्थर । आणि गिरा ? मधुधारा, कर्वत ॥" त्यांचें हृदय कधीं फुलाप्रमाणें तर कधीं दगडाप्रमाणें भासे आणि त्यांची भाषा म्हणजे कधीं करवतीची तर कधीं मधाची धार ! त्यांची सत्यनिष्ठा व सुधारकी बाणा यांचें वर्णन पहा—"लेखन लहरींवर अवलंबित । कांहि म्हणो कुणि त्यास अडविणें । खिंडारीं एल्गार चढविणें । निशाण सत्याचेंच उभविणें । लोक बघुन हें होत स्तंभित ॥ "

कॉलेज-विद्यार्थ्यांचें जीवन

बहुतेक सारे विद्यार्थी ऐषआरामी. त्यांपैकीं बऱ्याच जणांना तेव्हां बालगंधर्वाचें विलक्षण वेड असे. बालगंधर्वाची मोहिनी कां पडे, हें कवि पुढील मोजक्या शब्दांनीं सांगतो, " लबाड लाडिक डोळे हसती । कुंद-कळ्यांची नाजुक वेणी । ऐशी अधरीं दंतश्रेणी, । मान–लंचक ती तर जिवघेणी । भोळिंखुळीं रंगांत गवसती ॥ " नाटकांना आश्रय देणें निरनिराळ्या दृष्टींनीं अवश्य कसें आहे, हें उपरोधिक भाषेनें कवि कसें सांगतो पहा—" यास नको का द्याया आश्रय ? । ललित कलांचा विकास कैसा । होइल गाडुन टाकुन पैसा ? । निधिवर नागापरी न बैसा, । अर्थ-शास्त्र हें म्हणे, ' करा व्यय ' ॥ " अर्थशास्त्राच्या दृष्टीनें संपत्तीचा प्रवाह खेळता राहिला पाहिजे. तें तत्त्व विद्यार्थ्यांच्या उधळपट्टीनें पाळलें जातें !

उपमा-उत्प्रेक्षा यांचा दिपविणारा प्रकाश किंवा भिजविणारा वर्षाव माधवरावांच्या काव्यांत फारसा आढळत नाहीं. पण मध्यरात्रींच्या शांत वेळीं महाविद्यालय कसें दिसे याचें वर्णन करतांना त्यांनीं मनोरम उत्प्रेक्षा

केली आहे. ती अशी—" पहा उलटतां मध्यनिशा ती, । दिसे तमाचा अथांग सागर । छात्रालय जणुं जहाज त्यावर । प्रकाशमाला विलसे सुंदर । श्वासहि जणुं अवरोधी शांती ॥ "

सूक्ष्म व रेखीव वर्णन-शैलीचा कवीचा गुण अनेक ठिकाणीं दिसतो. कर्व्यांच्या कॉलेजभोंवतींची वनश्री वर्णितांना कवि म्हणतो, " दूर सिंहगड आणि तोरणा, । मुठा नदीच्या पाटाखालीं । बागमळ्यांची दाटी झाली, । सदैव वस्त्रें हिरवी ल्याली । अशी वनश्री खुले शोभना ॥ " त्या कॉलेजांतील प्रिं. वामनराव जोशी व प्रा. मायदेव यांचीं शब्दचित्रें पहा—" किती दाविती गुरु ते कळकळ । रसज्ञ तार्किक नम्र विनोदी । कुणि शंकांतुन तत्त्वें शोधी । हाय कुणी कवि कंठीं गोडी । कुणि उद्योगी सदा धावपळ ॥ "

विडंबनाची धार

पुण्यांतील राष्ट्रीय पक्षाचें विडंबन करतांना माधव जूलियन म्हणतात, " असावयाचें ऐसेंच पुणें । अप्रामाणिक कार्मठ्यांचें । अधिष्ठान राष्ट्रीय शाळ्यांचें । दयानंद हितवादी यांचे । हाल पहा कीं, कांहीं न उणें ॥ "

पुण्यांत 'विद्येची तिथें अफाट पोई !' पहावें तिकडे संस्था व मंडळें ! त्यांतील दिखाऊपणावर टीका करतांना कवि विनोदी सुरांत म्हणतो, " जिकडे तिकडे मंडळ, संस्था । रुमाल, डगला, शिष्ट उपरणें, । कांहीं पोपटपंचीं करणें, । बेताबेतानें घर भरणें, । भाव हा पुन्हा-लय लय सस्ता. ॥ "

पुणें म्हणजे जशी विद्येची बाजारपेठ, तशीच विवाहाची उतारपेठ. वैशाखामध्यें तेथें लग्नाची धामधूम ! तिचें वर्णन कवीनें पुढीलप्रमाणें केलें आहे—" विवाहपेठच पुणें शहर हें ! मालाची चहुकडून भरती, । लहानमोठे सवदे ठरती । बाप मुलींचे त्यांतच मरती । तरुण झुराया नकोत विरहें ॥ " तसेंच, " वैशाखाचे दिवस रजेचे । जरी उपरणीं-शालू यांचे । चौघडियांचे अन् सनयांचे । भुईनळ्यांचे अन् हवयांचे । रात्रंदिन ते ऐन मजेचे ! "

सनातनी समाजाला विधवांचें केशवपन, सहगमन इत्यादि क्रूर चाली पसंत होत्या. त्यांचा उपहास कवीनें पुढील शब्दांनीं केला आहे–" भट-शाही ती गेली शिव शिव । बळजोरीचीं तीं सहगमनें, । पतिमुक्तीस्तव तशींच वपनें । इंग्रजींत या कोठुन खपणें ? । धर्म नव्या संस्कृतींत निर्जिव । काय करावें ? गेली सत्ता. । भगवा झेंडा पडला खालीं, । शास्त्रार्थांची होय टवाळी, । धर्माला कुणि नुरला वाली । सुधारकांना द्याया लत्ता. "

विलायतेस विद्या–संपादनासाठीं जाणारे तरुण परत येतांना पदवी-बरोबरच गोरी बायकोहि आणतात व तिचा लकडा चुकविण्यासाठीं कोणी कोणीं तिला हजारो रुपये देतात. या सत्य प्रकारावर बारीकशी टीका करतांना पटवर्धन लिहितात, " असावयाचा शिवाय मार्गे । विलायतेमधिं गोरा गोंधळ । सुवर्णपुष्पांची मग ओंजळ । द्यावी लागे म्हणत 'नको छळ' । नच अनुरागें पण उपरागें ॥ "

ढोंगी सुधारक–वर्गावरहि कवीनें ताशेरे झाडले आहेत. बोलघेवड्या सुधारकाचें वर्णन त्यानें पुढील शब्दांनीं केलें आहे. " असेंहि म्हणती सुधारणाप्रिय, । ' सुधारणा तर अवश्य व्हावी । इतरांनीं ती परी करावी, । उघडपणें मी महती गावी । सहानुभूती दावुन सक्रिय ?' ॥

प्रेरक विचार

अशीच तीक्ष्ण टीका कवीनें समाजावर 'तेथें चल राणी' या काव्यांत सूचकतेनें केली आहे. त्यांत कवि म्हणतो, " भाळे न इथें प्रीति धना-विण कुणाला । ना माल गुणाला । लावण्य नसे जेथ जणू चीज किराणीं॥ तेथें चल राणी ॥ " मत्सरानें ग्रासलेलें हें जग सोडून संतोषानें भरलेल्या रानांत जाऊन राहण्याची मनीषा कवि प्रगट करतो, " कोठें तरी रानांत बसूं या नि हसूं या । जेथें न असूया । संतोष पडूं दे न कुठें न्यून निधानीं ।"

पटवर्धनांचे बुद्धिवादी, स्वाभिमानी व चैतन्यपूर्ण विचार पहावयाचे असतील तर ' भ्रांत तुम्हां कां पडे ' हा गज्जल वाचावा. त्यांत ते सिद्धांतरूप वाणीनें आदेश देतात, " कर्मयोगीं एक व्हा रे, नायकी वा पायकी । दावुनी घ्या लायकी । खानदानींतील नादाना, करीं धे फावडे ॥

जो करी कर्तव्य, घामेजूनि खाई भाकरी धन्य त्याची चाकरी। लेखणी बंदूक घ्या वा तागडी वा नांगर। हिन्दवी व्हा चाकर। एक रक्ताचेच आहों साक्ष देई आंतडें ॥ चूड घ्या अन् चेतवा हें रूढ धर्माचें मढें। आचरा शांतिक्षमा, निंदोत ते जे निंदिती। संयमीला न क्षिती। वैरबाधा खास दिव्य प्रेममंत्रानें झडे ॥ कायदा पाळा गतीचा, काळ मागें लागला। थांबला तो संपला। धावत्याला शक्ति येई आणि रस्ता सापडे ॥ ''

सेनापतीप्रमाणें असा आवेशपूर्ण आदेश देणाऱ्या कवीला स्वतःची जाणीव होते व तो विनयानें म्हणतो, '' शब्द माझे बोबडे अन् ज्ञान माझें तोकडें। चित्त माझें भाबडें ॥ '' शब्द किंवा वृत्त फारसी असलें, तरी त्यांत भावना व विचार अस्सल मराठीच ओतण्यांत माधवराव दक्ष असत. म्हणूनच ते ' भासे सुरई जरी इराणी। आहे पण ही मराठी ' असें रूपकानें सांगतात. त्यांच्या काव्यांतील रस खास मराठी वृत्तींतून निघालेला आहे, आणि म्हणूनच त्यांचें काव्य महाराष्ट्रांत लोकप्रिय झालें आहे.



"दुःखाच्याखोऱ्यांतला" कवि 'राज–दर्बारा'स गेला, मोठी कीर्ति कमावून आला आणि अखेरीस 'राज-कवि'हि बनला; तरी पण तो सदैव लोक-कविच राहिला. श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या वास्तव्यानें पवित्र बनलेल्या चाफळच्या परिसरांत, तारळें या गांवीं, ता. ९ मार्च १८९९ रोजीं, यशवंत दिनकर पेंढरकर या लोक–राज–मान्य कवीचा जन्म झाला. श्रीशिवाजीमहाराजांच्या पराक्रमाचे पडसाद उमटविणाऱ्या त्या डोंगराळ मुलुखांतच त्यांचें बालपण गेलें. या वयांत यशवंतरावांच्या मनावर धर्म, संस्कृति व इतिहात यांचे जे संस्कार घडले, त्यांचें फल 'देहाचा पूल' वगैरे त्यांच्या काव्यांत दृष्टीस पडतें. पूर्व-परंपरेवर पोसलेलें असल्यामुळेंच त्यांचें मन अभिमानानें व ऐटदारपणें 'स्वातंत्र्य–लक्ष्मीस मुजरा' करूं शकलें.



सुखदुःखांना सामुदायिक स्वरूप

खेड्यांतील जीवन व घरांतील गरिबी यामुळें यशवंतरावांचें शिक्षण कसेंबसें इंग्रजी सात इयत्तापर्यंतच झालें. शिक्षण होतांच पोटाचा प्रश्न. मनांत महत्त्वाकांक्षा व हृदयांत काव्यलालसा उसळत असतांना त्यांना

नोकरीचा रस्ता पहावा लागला. तो भक्ति–शौर्यानें स्फुरण पावणारा निसर्ग-रम्य चाफळ प्रांत त्यांना सोडावा लागला. त्या चाफळखोऱ्यांतील मांडवी नदीला 'तुझिया गानीं मला ऐकुं दे दासांचा उपदेश' अशी पुनः पुनः विनवणी करीत त्यांना आपल्या स्वातंत्र्यपूत मायभूसीकडे पाठ फिरवावी लागली व पुण्याची वाट धरावी लागली. पुणें येथें कारकुनी–नोकरीचें 'जूं बैसलें मानेवरी!' त्यांना अनुभव असा आला कीं, 'कारकुनी म्हणजे असेल-नसेल त्या अभिरुचीची राखरांगोळीच.' त्यांतहि येरवडा येथील मुलांच्या बंदिशाळेंत त्यांना खर्डेघाशी करावी लागली. पण जातिवंत कवीचें जीवंत मन अंतःस्फूर्तीनें इतकें समर्थ बनलेलें असतें कीं, तें बाहेर आग पेटलेली असली, तरी अंतर्यामीं बाग फुलवूं शकतें. अग्निकणांतूनच कमलें फुलविण्याची जादू कविश्रेष्ठाच्या प्रतिभेंत सांठविलेली असते. तीच जादुगिरी करून यशवंतरावांनीं आपलीं वैयक्तिक सुखदुःखें काव्यांत अशा खुबीनें मांडलीं कीं, त्यामुळें त्यामध्यें सार्वजनिक आकर्षण उत्पन्न व्हावें. बहुधा प्रत्येक वाचकाला 'रावलों वृथा संसार–सौख्य--विभ्रमीं' असा उद्वेग आलेला असतोच. तो उत्कट भावनेनें व प्रौढ भाषेनें कवीनें मांडलेला पाहतांच वाचकाच्या मनाला पोट – उकाला झाल्याचें समाधान लाभतें. 'खोल भावनांचें गोड आविष्करण' अशी जी साहित्याची व्याख्या केली जाते, तिचें प्रत्यंतर यशवंतरावांच्या अनेक काव्यांतून ठसठशीतपणें पहावयास सांपडतें.

निराशेंतहि धैर्य

खडतर जीवनाचा मार्ग चालत असतांना नानाविध निराशेचे चटके यशवंतरावांना बसत गेले, हें साहजिकच आहे. 'माझ्या मनोरथाचा भंगून आंस गेला' अशी हळहळ त्यांना वाटूं लागली. 'दुर्दैव--तीव्र–तापें हा भस्म जीव होई' अशी किंकाळी त्यांचें अंतःकरण फोडूं लागलें. 'ही आग सभोतीं, श्रम केले विझवाया, गेले परि वाया' अशी विफलता त्यांच्या चित्ताला घेरूं लागली. निराशेचा अंधार दाटला! चोहोबाजूंनीं

'कोंडमारा' झाला! 'खिळखिळे कोसळे माझें घर टिकाव कुठवर धरूं?' अशी केविलवाणी भाषा त्यांच्या मुखांतून निघूं लागली. अखेर 'मृत्यूस' हाक मारून 'घाली न हुतूतू' अशी त्याची आळवणीहि त्यांनीं केली. पण गडद अंधारानंतर तेजस्वी प्रकाश दिसूं लागला. पिचलेल्या अंतःकरणांतून निघालेले कवीचे आर्त स्वरच ऐकून सारा महाराष्ट्र वेडावून गेला. कवीच्या निराशेंतहि धैर्याचें पाणी खेळूं लागलें. तो दुर्दैवाला आव्हान देऊं लागला, दुःखाला 'नको करूं फुंफाट' म्हणून बजावूं लागला, 'मरणा येउं नको आतांच' असें आज्ञापूं लागला.

राजा व प्रजा यांचा नजराणा

'कौटुंबिक कवि' असा लौकिक कवि यशवंतांना लवकरच लाभला. लघुकथाच्या क्षेत्रांत श्री. य. गो. जोशी यांचें जें स्थान, तेंच नवकाव्यांत श्री.य.दि. पेंढरकर यांना मिळालें. दोघेहि 'यशवंतच!' कवि यशवंतांचीं कवनें महाराष्ट्रांतील खेड्यांमधील झोपड्यांपासून शहरांतील राजवाड्यांपर्यंत गुण-गुणलीं जाऊं लागलीं. त्यांच्या 'सारंगीवाल्या' प्रमाणें त्यांची कविता 'अंधार–सिंधु मंथुनी फेकिसी उडु–रत्नें कीं गगनीं' असा भास रसिकांना होऊं लागला. सुगम व संयमित अशी प्रसादपूर्ण काव्य–रचना ते जशी करीत, तसेंच प्रभावी काव्य–गायनहि करण्यास त्यांनीं आरंभ केला. ऐतिहासिक काळांत होनाजी–प्रभाकरादि शाहिरांच्या लावण्या–पोवाड्यांना हजारों श्रोत्यांचें कडें जसें पडे; तसेंच यशवंत–गिरीशांचें काव्य–गायन म्हटलें कीं, तेथें आबालवृद्ध रसिकांची गर्दी उडे! १९२१ सालीं बडोदें संस्थानांत साहित्य–संमेलन भरलें असतां, त्यांत कवि यशवंतांनीं आपल्या काव्याची जी ललकारी सोडली, ती ऐकतांच 'साऱ्या सभाजनांनीं या वानिलें कृतीला!' नवाच तारा उदयास आला असा भास संमेलनांतील साहित्यिकांना झाला. त्या ताऱ्याच्या रम्य व दीप्तिमानें तेजानें सर्वजण चकित व प्रसन्न झाले. 'मराठ्यांच्या महालक्ष्मीला' त्यानें येथेंच मुजरा केला आणि 'पुन्हा लावीन नाचाया महाराष्ट्रीं दऱ्याखोरीं' असा विसार दिला. पुढें वीस वर्षांनीं कवीनेंच अशी पावती दिली आहे कीं, "इथेंच

कीं माझ्या रांगड्या वाणीचीं गाणीं। डोलविल्या माना कौतुकें ऐकुनि रसिकांनीं॥" त्याच वर्षीं कोल्हापूर येथें पहिलें 'महाराष्ट्र कवि-संमेलन, भरलें असतांना 'देहाचा पूल' हें वीर-रसानें रसरसलेलें काव्य यशवंतांनीं म्हणून दाखविलें आणि मानाचें रौप्य-पदक पटकावलें. तशीच 'पंचारती जनांची' त्यांना गांवोगांव ओवाळूं लागली.

चिरंजीव आई !

ता. २२ जानेवारी १९२२ रोजीं त्यांची अशी एक अलौकिक कविता जनतेपुढें आली कीं, त्यामुळें सारा महाराष्ट्र यशवंतांवर मोहित झाला. ती कविता म्हणजे 'आई !' अवघ्या बेचाळीस ओळींचें हें काव्य म्हणजे यशवंतांच्या कीर्ति-मंदिराचें तोरणच ! आईनें यशवंतांना चिरंजीवपद जसें दिलें, तसेंच यशवंतांनीं आईला चिरंजीव करून सोडलें. आई नसते कोणास ? कोणाची जीवंत असेल, कोणाची नसेल-पण आईची स्मृति, आईची भक्ति-सर्व कालीं, सर्व स्थलीं, सर्वोच्च आहे, अथांग आहे, शाश्वत आहे. या सार्वजनिक भावनेला प्रसन्न व उत्कट रूप यशवंतांनीं आपल्या 'आई' या काव्यांत दिलें. त्यांत प्रसाद आहे, भक्ति आहे, कारुण्य आहे, नाट्य आहे—हृदय हलविणारे, मन जिंकणारे, आत्मा प्रसन्न करणारे-सारे गुण त्या काव्य-कोहिनूरांत सांठविलेले आहेत. "सुंदर रसाळ कविता-अशी कविता पुनः होणें नाहीं." अशी या कवितेची भलावण पंडित-कवि माधव जूलियन यांनीं केली. तोच अभिप्राय सर्व रसिकांचाहि पडला.

काव्य-गायनाची मोहिनी

यशवंतांहून अधिक उज्ज्वल कल्पकतेचे, अधिक मधुर पद-लालित्याचे किंवा अधिक विशाल ध्येयदृष्टीचे कवि महाराष्ट्र-शारदेच्या दरबारांत झाले नाहींत, असें नाहीं; पण यशवंतांइतकी लोकप्रियता दुसऱ्या कोणत्याच आधुनिक मराठी कवीच्या वाट्यास आली नाहीं. श्रोतृजनांच्या सुख-दुःखांना प्रौढ-गंभीर वाणीनें वाचा फोडणाऱ्या त्यांच्या कविता असल्यानें

त्या लोकप्रिय होतच होत्या; पण सुगंधाला वाऱ्याची झुळुक भेटावी त्याप्रमाणें त्यांच्या रमणीय काव्याला पोषक गायनाची जोड लाभली आणि म्हणून यशवंतांना कमालीची लोकप्रियता मिळाली. सर्वसामान्य कवि-जनाला न साजणारा त्यांचा तो सुदृढ रुबाबदार देह, त्यांचा तो गंभीर पण सकंप असा आवाज आणि भावनेनें फुललेल्या मुद्रेनें व ऐटदार अभिनयानें काव्यांतील शब्दन् शब्द सजीव करण्याचा त्यांचा तो थाट—यामुळें त्यांचें काव्य—गायन रसिकांचें चित्त तल्लीन करून सोडीत असे. अलीकडील भाव-गीत-गायनांत गायनावरच भर फार असतो; पण यशवंतांच्या काव्य-गायनांत योग्य त्या शब्दावर योग्य तो जोर देऊन काव्यांतील भाव मूर्तिमंत उभा करण्यावर कटाक्ष असे. त्यांचें वीरश्रीयुक्त काव्य ऐकून ज्याचें अंतःकरण थरारून गेलें नाहीं, असा सुशिक्षित तरुण त्यावेळच्या महाराष्ट्रांत सांपडणें कठीण ! आणि त्यांची 'आई !' ती कविता ऐकली नाहीं असा मराठीभक्त विरळा व ती ऐकून आपले डोळे न पुसलेला सहृदयहि विरळाच ! ' आई ' सारखीं काव्य—रत्नें सांठविणाऱ्या त्यांच्या ' यशोधन ' या काव्य—ग्रंथाच्या तीन आवृत्या अवघ्या चार वर्षांतच निघाल्या. हें यश मराठींत तरी अपूर्व होतें.

भाट नव्हे, मंत्री

' रवि—किरण—मंडळा'चें तेज महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत पसरविणारे यशवंत व गिरीश हे दोन तेजस्वी किरण होत. यशवंतांनीं बारा काव्य—ग्रंथ लिहिले व तीन गद्यग्रंथहि रचिले. अलीकडे थोडेबहुत बालधाड्मयहि त्यांनीं लिहिलें आहे. त्यांच्या या शारदोपासनेचा सत्कार राजा व प्रजा या उभयतांनींहि केला. १९४० सालीं ते बडोदें संस्थानाचे राजकवि झाले आणि १९५० सालीं मुंबई येथें भरलेल्या ' साहित्य—संमेलना'चें अध्यक्षपद त्यांना बहाल करण्यांत आलें. १९३९ सालीं बडोदें संस्था-नाच्या सिंहासनावर श्रीमंत प्रतापसिंह यांना राज्याभिषेक झाला. त्यांचें वर्णन करणारा ' काव्य—किरीट ' हा ग्रंथ यशवंतांनीं लिहिला. त्यांत ' भाटगिरी ' केलेली नसून वशिष्ट मुनींप्रमाणें राजाला प्रजारक्षणाचा

योग्य तो उपदेश निर्भीडपणें केला आहे. त्यांच्या लेखणींत समर्थांच्या कमंडलूंतील पाणी जसें खेळत आहे, तसेंच श्रीशिवछत्रपतींच्या भवानी तलवारीचें पाणीहि तळपत आहे. रामशास्त्र्यांच्या महाराष्ट्राचा वारसा त्यांनीं पुढें चालविला आहे, असें म्हणण्यांत फारशी अतिशयोक्ति नाहीं.

स्वत्वाचा प्राण

यशवंतांचीं सुखदुःखें वैयक्तिक असलीं, तरी त्यांना सामाजिक आकर्षण आहे. त्यांच्या काव्यांत 'कटु निराशा माजलेली' असली, तरी तींत आशा व धैर्य आहे आणि त्यांच्या काव्यांत राज-भक्ति क्रीडा करीत असली, तरी लोक-सेवेचा विसर त्यांना कधींच पडलेला नाहीं. गेलीं तीस वर्षें ते सतत काव्य-रचना करीत आहेत. बदलत्या काळाबरोबर त्यांच्या काव्याचे विषय व रचनेचे प्रकार पालटले असले; तरी त्यांच्या पोटांतील त्यांचा बाणेदारपणा व स्वाभिमान पूर्वीइतकाच धगधगीतपणें पेटलेला आहे.

साहित्याचें ध्येय

सरस्वतीच्या दरबारांत कोणताहि भेदाभेद नाहीं. हें तत्त्व यशवंतांनीं आपल्या 'पाणपोई' काव्यांत आरंभींच पुढील शब्दांनीं सांगितलें आहे—"येइ भाई येथ पाही घातली ही पाणपोई। धर्म-जाती कोणती ती भेद ऐसा येथ नाहीं। संसृतीचा हा उन्हाळा, तळ्खली होई जिवाची। स्वेदबिंदू अश्रुधारा याविना पाणीच नाहीं॥"

जीवनांतील ताप नाहींसें करण्याचें सामर्थ्य साहित्याचें अंगीं असतें. हा महिमाच या कवितेंत कवीनें गाईला आहे; त्याचबरोबर व्यक्तिशः स्वतःचा नम्रभावहि प्रगट केला आहे, तो असा—"आद्य जे कोणी कवी तत्स्फूर्तिच्या ज्या सिन्धु-गङ्गा। आणिल्या वाहून खान्दीं कावडी त्यांतील कांहीं। पान्थ-सेवा-साधनीं हें व्हावयातें गार पाणी। मृत्तिकेचे मात्र माझे कुम्भ, ही माझी नवाई॥ ओन्जळी, दों ओन्जळी आकण्ठ किंवा घे पिऊनी। हो जरा ताजातवाना, येउं दे सामर्थ्य पायीं। पावतां तृप्ती मना संचारतां अङ्गीं उमेदी। जो दुवा देशील पान्था तेवढी माझी कमाई॥"

अशी कमाई यशवंतांनीं गडगंज करून ठेवली आहे हें त्यांचें थोरपण. संसारांत सुख-शांतीचा झरा साहित्य-सेवा हाच कवीला वाटतो. हा बौद्धिक आनंद आपल्याला अखंड लाभावा म्हणून श्रीशारदेस त्रिवार वंदन करून कवि म्हणतो, "संसारसौख्यीं समाधान नाहीं । तुझ्या गायनीं जें मला लाभतें । आत्मासवें सम्पदेचे सुखाचे । तुझ्या सेवनीं तोडिले पाश ते. आई ! कृपेची मला न्यूनता ती । नको दाखवूं हेंच मीं याचितों; । माते ! तुला वन्दितों भक्तिभावें । पुन्हा वन्दितों, वन्दितों, वन्दितों ! ॥ "

उत्प्रेक्षांच्या माला

यशवंतांच्या कवितेनें पायांत मंजुळ शब्दांचें पैंजण बांधलेले नाहींत; तसेंच उपमा-उत्प्रेक्षादि अलंकारांचें ओझेंहि तिच्या अंगावर घातलेलें नाहीं. तथापि श्रीमंत प्रतापसिंहाच्या राज्यारोहणासारखा महोत्सव वर्णावयाचा असतांना ते ठेवणींतील दाग-दागिने बाहेर काढतात. ' राजाच्या चित्तांतून संकल्प प्रगटला' या सूक्ष्म घटनेवर यशवंतांनीं मनोहर उपमांची रम्यमाला गुंफली आहे, ती अशी-' प्रगटे उषःकालीं जसें रविबिम्ब कीं क्षितिजावरी, किंवा प्रफुल्लाब्जांतुनी पसरे सुगंध सरोवरीं, आम्रा वसन्तीं येतसे जैसा तरारुन मोहर, कीं आर्णव-क्षोभांतुनी रत्नावली ये बाहिर ॥ रत्नांतुनी झळके प्रभा, स्वर येति जैं वीणेंतुनी । संकल्प हा प्रगटे तसा नृपचित्त-कल्लोलांतुनी ॥ "

तसेंच व्यतिरेक हा अलंकार साधून त्यांनीं शिवाजीच्या स्मारकांचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे. " शिलालेख लेखाविण । कीर्तिध्वज वसनाविण । डिण्डिम कीं नादाविण । भासती जनां तीं ॥ " हें वर्णन वाचून ज्ञानेश्वरींतील ' चंद्रमे जे अलांच्छन । मार्तंड जे तापहीन । ' इत्यादि ओव्यांची आठवण कोणास होणार नाहीं ?

महाराष्ट्राचा अभिमान

महाराष्ट्राचा अभिमान यशवंतांच्या नसानसांतून वहात आहे. महाराष्ट्राची सेवा आपल्या हातून घडावी व तो आपल्या मोठेपणानें खराखुरा ' महा-राष्ट्र ' व्हावा, अशी तळमळ यशवंतांनीं ' माझा महाराष्ट्र ' या

कवितेंत व्यक्त केली आहे. ते म्हणतात, " अमर्याद भूगोल विस्तारलेला किती त्यामधीं देश पुज्जाळले । महाराष्ट्रभूचें परी त्यांत माझ्या दिसे सम्प्रती तेज मन्दावलें । तयासारिखा दिव्य तेजोगुणी हा महाराष्ट्र होईल केव्हां पुन्हा ? । महाराष्ट्र माते ! जना बुद्धि दे या तुझ्या वैभवोत्कर्ष-संवर्धना ॥ " शेवटीं ते इच्छा व्यक्त करतात, " महाराष्ट्र माझा ' असे आज आम्ही जरी जन्मलाभामुळें बोलणें । ' महाराष्ट्र माझा ' असें घात-लेल्या कर्धी भूषणांच्यामुळें बोलणें ? । "

शाहिराची ऐट

महाराष्ट्राला एका काळीं ज्यांनीं महत्–पदास चढविलें, त्या शूर-वीरापुढें कवि आपलें मस्तक आदरानें लववितो. अशा स्वातंत्र्य–पोषक शूर–वीरांचें एक प्रतीक या दृष्टीनेंच बडोद्याच्या महाराणीसाहेबांकडे कवीनें पाहिलें आणि ऐतिहासिक कालांतील शाहीराच्या तडफेनें त्यानें उद्गार काढले, " दऱ्याखोऱ्यांतला आला कवी हा खास दर्बारा । मराठ्यांच्या महालक्ष्मी तुला घे शाहिरी मुजरा । जगाचा मानितों स्वामी स्वतांला मी महा मानी । असें शास्ता जनांचा मी परी माई तुझा भाट । दिपावे विश्व वाणीनें, तुझ्या येथें न तो थाट । नभींच्या तारकाराशी पदाघातें झुगारीन । परी स्वातंत्र्यलक्ष्मी गे । तुझ्या पायीं सदा लीन ॥... " समाधी लागली आहे म्हणोनी तोंवरी बोल । मराठ्यांच्या यशोगानीं मनानें स्फूर्तीनें डोल ॥ "

निर्धारवंत उद्योग शीलाच्या स्पर्शानें काय चमत्कार घडतो, हें सांगतांना यशवंत म्हणतात, " तुझ्या हातीं सुवर्णाचें मिळावें मोल मातीला । हिऱ्याचें तेजही तैसें चढावें गारगोटीला । दिसावी पावलाखालीं खड्यांना तारका-कान्ती । विषारी: तीक्ष्ण काट्यांचीं तुझ्या स्पर्शे फुलें होतीं । मनीषा ही जरी ठेवी मनीं या खूणगांठीसी । ग्रहांचें साह्य शूराला, यशःश्री पायिंची दासी ॥ "

जनतेचा वकील

सिंहासनापुढें शिर लवविणारा हा कवि प्रजेच्या वतीनें ताठ मान करून

बोलूं शकतो. 'काव्य-किरीटा'मध्यें महाराजासाठीं देवाची प्रार्थना करतांना कवि म्हणतो, " प्रभो, अमुच्या सामर्थ्य दे नृपाला । धीर देइल जें दीन-दुर्बलाला । भक्ति शक्तीची वाढवील लोकीं । गांजल्यांना होईल पाठिराखी. ॥ " याहूनहि अधिक कडकडीत शब्दांत कवीनें राजधर्म उपदेशिला आहे तो असा—" शिरावरि हवा जया मुगुट, बसाया हवें जया तख्त । तयानें निराश्रितांसाठीं । खपाया नको काय सक्त ? ॥ भुकेनें तडफडतां कोणी । तयाचा शाप नृपाळाला ॥ " असाहि शास्त्रार्थ कवि सांगतो.

राष्ट्रभक्तांची आरती

श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभे करणारें वीरश्रीयुक्त जें काव्य प्रथम यशवंतांनीं रचलें, तें म्हणजे 'देहाचा पूल' हें होय. शिवापूर येथें विजापूरचा मुसलमान सरदार तळ देऊन राहिला होता. त्यानें आपल्या छावणीभोवती खंदक खणून त्यांत लाकडें पेटवलीं होतीं. हा आगीचा खंदक ओलांडून शिवाजी आपल्या मावळ्यांनिशीं त्या सरदारावर चालून गेला. त्यावेळीं त्या जळत्या खंदकावर चार मावळ्यांनीं आपलीं शरीरें पसरलीं. या आत्मत्यागाचें, स्वामिनिष्ठेचें, स्वातंत्र्यभक्तीचें जें चित्र कवीनें रंगविलेलें आहे, तें कोणाचेंहि हृदय उचंबळून टाकणारें आहे. आणि त्याचें काव्यगायन यशवंत इतक्या तन्मयतेनें करीत कीं, तें ऐकतांना श्रोत्यांचें भान हरपून जात असे. शिवाजीनें आपली मान वळविण्यांचा अवकाश कीं, " तों उभे राहिले भाले । रिपुरुधिरास्तव तान्हेले । जय भवानिचा गर्जोनी । धावले शिवाजीराजे । घेउनी जिवाचे दोस्त । तीनशें मावळे सर्जे । ते किरण तयाचे दिव्य । तो सहस्रकरसा साजे । स्थापक ते स्वातन्त्र्याचे । चालक ते जरिपटक्याचे । तारक ते शिवशाहीचे । " पुढें 'खंदकावर आपले देह कोण टाकील ?' असें 'निघतांच शब्द बाहेर । जन निजले त्यावर चार ।" असा रोमहर्षक इतिहास वर्णन करून कवि विचारतो, 'कां स्वराज्य तेव्हां झालें ? । कां स्वराज्य सांप्रत नुरलें ? ॥ '

अशा देशभक्त प्राणत्यागी शूरवीरांना वंदन करतांना कवि म्हणतो, " सङ्गरीं वीराग्रणी जे धैर्यमेरू सङ्कटीं । जन्मले या भारतीं । राष्ट्रचक्रोद्धारणीं कर्णापरीं ज्यांना मृती । गाउं त्यांना आरती ॥ देह जावो देह राहो नाहिं ज्यांना तत्क्षिती । लोकसेवा दे रती । आणि सौभद्रापरी देतात जे आत्माहुती । गाउं त्यांना आरती ॥ "

शूर देशभक्तांचा काळ शिवाजीच्याच वेळीं होता असें नाहीं. टिळक–गांधींच्या स्वराज्य--संग्रामांतहि पराक्रमी तरुण अहमहमिकेनें पुढें आले. त्यांना परक्या सरकारनें तुरुंगांत डांबलें तरी त्यांचें धैर्य व ध्येय अभंगच राहिलें. अशा धैर्यशाली व ध्येयवादी स्वातंत्र्य–भक्तांच्या अंतःकरणांतील विचार–तरंग 'तुरुंगाच्या दारांत' या कवितेंत यशवंतांनीं प्रगट केले, ते असे, " वाढुं दे कारागृहाच्या भिंतिची उन्ची किती । मन्मना नाहीं क्षिती । भिन्तिच्या उंचींत आत्मा राहतो का कोन्डुनी । मुक्त तो रात्रंदिनीं ! ॥ अग्निही वाटेल मातें चन्दनाचें लेपन । कीं सुधेचें सिंचन । शृङ्खला पायांत माझ्या चालतांना रुमझुमे । घोष मंत्रांचा गमे । लौकरी स्वातन्त्र्य-भानो ! भारतीं दे दर्शन । होउं तेव्हां पावन । "

उपेक्षित वर्गाकडे लक्ष

'बंदिशाला' या खंडकाव्यांतहि यशवंतरावांनीं आपल्या राष्ट्रमातेविषयीं गाढ भक्ति प्रगट केली आहे. त्या कथेंतील नायक संजीव रणांगणावर नोकरीसाठीं जातो. त्यावेळचे त्याच्या मुखांतील राष्ट्रगीत अत्यंत भावनापूर्ण व हृदयस्पर्शी आहे. तें असे—"वन्दन तुज मायभूमि ! हें अखेरचें ! न कळे तव दर्शन कधिं फिरुन व्हायचें ! ॥ "

स्वतःसंबंधीं संजीव म्हणतो, " मान उंच करुं पाहे कोंवळी कळी । धडगत लागेल तिची केवि वादळीं ? । झिडकारुनि दिधलें जें लेकरूं तुवां । टाकलास ज्याचा तूं तोडुनी दुवा । तरि त्याच्या नच खळती अश्रु नेत्रिंचे । वन्दन तुज मायभूमि हें अखेरचें ॥ ग्रीष्माचा दाह काय वाळल्या तृणा ? । राखेला जाळिल कां अग्नि तो पुन्हां ? । परि तुझी न भेट मला व्हायची पुढें । ह्या शल्यें हें तुटतें मात्र आंतडें ॥ "

दांभिकतेवर टीका

' दिवंगताचें स्मारक ' ही एक करुण-रसानें भरलेली काव्य-कथा आहे. मायभूमिचे एक थोर सुपुत्र दिवंगत झाले. त्यांच्या स्मारकाची सभा भरली असतांना स्तुति-स्तोत्रांची फैर झडली. स्मारकासाठीं पैशाची मागणी करण्यांत आली. तेव्हां " आवाहन हें होईल वायां कैसें पुण्य-स्मरणीं ? खिशांत भराभर हात घातले श्रद्धाळू श्रोत्यांनीं । वक्त्यांचेहि सढळ आकडे आणि पटापट पडले. " पण त्या दिवंगत देशभक्ताच्या घरीं त्याची बायको आणि दोन लेकरें हालअपेष्टा भोगीत होतीं. त्यांचें दैन्य दूर करण्याचा विचार कोण करतो ? " दिवङ्गताच्या गेहीं तिकडे अश्रु टपाटप गळले ! कारण पुण्यस्मरणामाजीं चूर मृताची कान्ता । करीत होती दोन लेकरांसवें मूक आकान्ता । "

पैसे जमले, स्मारक-मंदिर उभारलें, त्याचें उद्घाटन समारंभानें झालें. त्या दिवशीं रात्रीं त्या देशभक्तांच्या बायकामुलांना घरांतून हाकलून देण्यांत आलें. तेव्हां " फिरतफिरत तीं मन्दिराचिया येइ वळचणीखालीं । आणि लेकरें तिचीं पायऱ्यावरींच झोपीं गेलीं. ॥ " सकाळीं भय्या आला व " चलो, निकालो ' असें खेसकला. ही काव्यकथा जितकी शोकपूर्ण आहे; तितकीच समाजाच्या दांभिक वृत्तीवर व अनास्था-बुद्धिवर टीका करणारी नाहीं काय ?

आईची रसवत्ता

जसा गडकऱ्यांचा 'राजहंस'; तशी यशवंतांची 'आई'. दोन्ही नाट्यगीतें करुण रसानें थबथबलेलीं आहेत—रसिकांच्या हृदयाचा ठाव घेणारीं आहेत. पहिल्यांत मातेचा मुलासाठीं शोक; तर दुसऱ्यांत मुलाचा मातेसाठीं आक्रोश आहे. पहिल्याची भाषा बहुमोल अलंकारांनीं नटलेली आहे; तर 'आईचे' बोल साधे-सरळ-सोपे, पण अंतःकरण कापीत जाणारे आहेत. सुरुवातच अशी हृदय हलविणारी आहे-"'आई' म्हणोनि कोणी । आईस हाक मारी ती हाक येइ कानीं । मज होय शोककारी । नोहेच हाक, मातें । मारी

कुणी कुठारी । आई कुणा म्हणूं मी ? । आई घरीं न दारीं ! ही न्यूनता सुखाची । चित्ता सदा विदारी । स्वामी तिन्ही जगांचा । आईविना भिकारी ॥ "

त्या लहान आईविरहित मुलाच्या दृष्टीला आजूबाजूला सर्वत्र मातृ-प्रेमाचीं दृश्यें दिसतात, त्यामुळें त्याचें दुःख दुणावतें. पशु–पक्ष्यांतहि हें मातृप्रेम त्याला दिसतें, तें असें—" चारा मुखीं पिलांच्या । चिमणी हळूच देई । गोठ्यांत वासरांना । ह्या चाटतात गाई । वात्सल्य हें पशूंचें । मी रोज रोज पाही । पाहून अन्तरात्मा । व्याकूळ मात्र होई । वात्सल्य माउलीचें । आम्हां जगांत नाहीं । दुर्भाग्य याविना का ? । आम्हांस नाहिं आई ॥ "

ही दृश्यें पाहून त्याला आईची अधिकच आठवण होते. आपल्या रोजच्या आयुष्यांत आईनें आनंद कसा ओतला असता, याचें स्मरण होऊन तो म्हणतो, " शाळेंतुनी घराला । येतां धरील पोटीं । काढून ठेविलेला । घालील घास ओठीं । उष्टया तशा मुखाच्या । घावेल चुम्बना ती ! कोणी तुझ्याविना गे । का ह्या करील गोष्टी ? । तूझ्याविना न कोणी । लावील सांजवाती । साङ्गेल ना म्हणाया । आम्हां 'शुभम् करोति' ॥ "

या मातृहीन बालकाला एक बहिण आहे. ती त्याच्याहून लहान आहे. अजाणपणामुळें तिला आईच्या वियोगाचें दुःख जाणवत नाहीं. त्यामुळें तर या बालकाला अधिकच भडभडून येतें व तो म्हणतो, " ताईस या कशाची । जाणीव कांहिं नाहीं । त्या सान बालिकेला । समजे न यांत कांहीं । पाणी तरारतांना । नेत्रांत बावरे ही । ऐकूनि घे परन्तु । " आम्हांस नाहिं आई " । साङ्गे तसें मुलींना । " आम्हांस नाहिं आई " । ते बोल येति कानीं । " आम्हांस नाहिं आई ॥ "

यशवंतांनीं आपला सारा आत्माच या कवितेंत ओतलेला दिसतो. त्यांच्या काव्याचा सर्वत्र जयजयकार झाला पण तें कौतुक पहावयाला आपली आई नाहीं, ही खंत जीवाला जाळीत होती, म्हणून ते म्हणतात, "गुम्फून पूर्वजांच्या । मी गाइलें गुणांला । साऱ्या सभाजनांनीं । या वानिलें कृतीला । आई, करावया तूं । नाहींस कौतुकाला । या न्यूनतेमुळें ही ।

मज त्याज्य पुष्पमाला । पंचारती जनांची । ना तोषवी मनाला । परि जीव बालकाचा । तव कौतुका भुकेला ॥ "

या काव्यांतील करुण रसाचा उच्च बिंदू म्हणजे त्याचें अखेरचें कडवें; तें असें, " येशील तूं घराला । परतून केधवा गे । दवडूं नको घडीला । ये ये निघून वेगें । हे गुन्तले जिवाचे । पायीं तुझ्याच धागे । कर्तव्य माउलीचें । करण्यास येइ वेगें । रुसणार मी न आतां । जरि बोलशील रागें । ये रागवावयाही । परि येइ येइ वेगें ॥ "

अनुभूतीचे उद्गार

आईची थोरवी यशवंतांनीं प्रथम भावनेनें जाणली. पण पुढें तेरा वर्षांनीं स्वतःच्या अनुभवावरूनहि त्यांना ती पटली. स्वतः मोठे झाल्यावर, आई किंवा बाप बनल्यावर, आपल्या मुलांचे कष्ट उपसल्यावर, त्यांची शुश्रूषा अलोचन जागरणें करून केल्यावर मगच आपल्या आई-बापांनीं आपल्यासाठीं असेंच सायास सोसले असतील ही अनुभूति येते. तिचें मार्मिक चित्रण 'दैवतें माय-तात' या कवितेमध्यें यशवंतांनीं केलें आहे. तें असें—" आणि आतां थाटल्या प्रपंचांत । अहो झालों आम्हीच माय-तात । माय-तातांच्या ह्याच भूमिकांनीं । दिली तुमची थोरवी जाणवोनी॥ थिटया अमुच्या पङ्खांत ऊब कोठें ? प्राण चिमण्यांचा लोचनांत गोठे ! आणि कळतें सोसतां ताण हाल । किती आम्हास्तव कष्टला असाल । दीप तेवावा जेवि अहोरात्र । मनें निरलस जागला श्रान्तगात्र । मानहानी पत-करुनि रोष लोकीं । तुम्हीं केली नित पाठराखणी कीं ॥ शिळें-पाकें सेवून सणावारीं । जुनें-पानें लेवून घरींदारीं । सदा पुरवावें गोडधड मुलांना । असे अवघड संसार-यज्ञ जाणा ॥ "

उदात्त वात्सल्य

करुणाप्रमाणेंच वत्सल रसहि यशवंत खेळवूं शकतात. बालकाच्या मुखाचें चुंबन घेतांना किती उदात्त भावना असावयास पाहिजे, हें त्यांनीं 'मोक्षाचीं दारें' या कवितेंत सांगितलें आहे, तें असें—" नको चुम्बन मज देउं तुझें बाळा ! नसे तितुकी शुद्धता मम मुखाला । नको त्या त्या अश्लील

शब्द–कोटी । प्रगट झाल्या माझिया सदा ओठीं ॥ खऱ्या–खोट्याचा कधि न विधिनिषेध । धरुन केला वट्ट वर्वे मर्म-भेद ॥ हवा दावाया स्वाभिमान जेथें । पुढें केलें मुख दीनपणें तेथें । असें दूषित जे कैक कलंकांनीं । नव्हे चुम्बाया योग्य निर्मलांनीं ॥ ”

परंतु दुसऱ्या दृष्टीनें विचार करतां बालकाच्या ओठांतील अमृत प्राशन करणेंच कवीला योग्य वाटतें. बालकाला ‘देवराय’ असें संबोधून कवि म्हणतो, “ येच अथवा ये बालदेवराया । काय दवडूं हा पर्वकाल वाया ? स्वेछया तूं सजलास चुम्बनास । कलङ्कांचा मम कराया निरास ॥ ” शेवटीं कवि म्हणतो, “ अरे पापांनो भुतांनो, पळा रे ! पहा मोक्षाचीं मला खुलीं द्वारें ! ”

दुसऱ्या एका कवितेंत कवि आपल्या अंगणांत इंदुकलेनें नाचावें–बागडावें ही वात्सल्यपूर्ण मनीषा प्रगट करतांना म्हणतो, “ दवबिन्दू पडती चमकती हरित तृणावरती । पुष्पदलांवरती जणूं ते शिम्पल्यांत मोती ॥ अङ्गणांत माझ्या घागऱ्या चरणींच्या तुझिया । ओघळुनी साऱ्या नर्तनीं सहजीं पसराव्या ॥ ” गवतावरील दंव किंवा शिंपल्यांतील मोती, तशा अंगणांत मुलीच्या पायांतील चांदीच्या घागऱ्या पसराव्या अशी कवीची लालसा.

मुलाची आईवरील माया ‘ आई ’ या कवितेंतुन ओसंडत आहे; तीच भावना इंदुकलेच्या पुढील उद्गारांत खेळत आहे. “ नको सुमनशय्या, नको जरतारी शृंगार । कुबेरसदनींचे नको मणि–मोत्यांचे हार ॥ आई-च्या अङ्कीं निरन्तर लोळण लाभावें । वत्सल नजरेची पाङ्घरुन झूल झोंपि जावें ॥ नको अन्नपाणी, भुकेला मुकेहि पुरतात । लालन–पालन हें मिळाल्या स्वर्गावर लाथ ! ”

सुधा ही चिमुकली बालिका. तिनें लुटुपुटीचा स्वयंपाक केला. त्यांतील भात म्हणजे फुलांच्या कळ्या. त्या पाहून वत्सल कवि आनंदाचे ढेकर देत देत म्हणतो, “ परि कुसकरलेल्या कळ्यांचा वाढ आज भात । पुढचे पाहुं पुढें तृप्तता आज मला त्यांत ! ”

यशवंतांची ‘ आई ’ कधीं रागावेल कां ? पण ती रागावली–मुलाला मारूं लागली, तेव्हां तें मूल म्हणतें, “ मालुं नको ग । मी केलं काय

तली ग !" मुलांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले, त्याचें वर्णन कवि पुढील उत्प्रेक्षांनीं करतो " अश्रुबिंदु शिशुनयनांमधुनी । टपटप खालीं गालांवरुनी । ओसरले, जणु गगनांतुनी । तारका तुटती । कीं फुलें वेलिचीं गळतीं ?" माय-लेकरांचा हा संग्राम किती चटदिशीं संपला ? आणि तोहि कसा ? " जरी माय ती मारी वरुनी । तरि पायांशीं तिच्या बिलगुनी । मुखाकडे वर बिचकत बघुनी । वदे वेल्हाळ-"कां देसी आई माल ?" या संग्रामाच्या समाप्तीनंतर दोन्ही लढाऊ पक्षांचा तह कोणत्या अटींवर झाला ? " घेई चटकन उचलुनि वरती । चुम्बुनि रडवी मोहक मूर्ती । पदरा-खालीं स्तनिं लावी ती । तिचेही झाले । अश्रूंनीं नयन मग ओले ॥ " आणि शेवटीं कवीनें वात्सल्याचें असें सुंदर चित्र रेखाटलें आहे कीं, " गालासन्निध गाल बिलगला । गळ्याभोंवती हात चिमुकला । दुजा आइच्या पुशि नयनांला । दृश्य हें बघुन । निवतील न कां कविनयन ? ॥ "

शारदेची आळवणी

याच वात्सल्याच्या भावनेनें कवि सरस्वती-मातेची ' आळवणी ' करतो. ती अशी—" अदय काय होइ माय आपुल्या मुलावरी ? । आळवून आळवून । कण्ठ चालला सुकून । पाहणार अन्त काय आणि तोहि कुठवरी ? ॥ तव मुखास चंद्रकांति । लोचनांत चंद्रज्योति । हेंहिं चांदणें, मलाच काजळी निशा परि ! ॥ कुरण दाट धेनु त्यांत । घे न घास परि मुखांत । बावरून हम्बरेंच वासरू जरी घरीं ॥ " शेवटीं कवि शारदेची प्रार्थना करतो, " तव कृपासुधातुषार । नन्दनवन उभविणार । खडकमाळ हें कपाळ पिकाविणार तूं खरी ॥ बोलुं कांहि तूं नकोस । देउं वैभवें नकोस । फेक एक नजर मात्र मग नुरेन खापरी ॥ "

शृंगारांतील सोज्वळपणा

यशवंत हे शृंगाराच्या गंधर्व-नगरींत भराऱ्या मारून प्रेमाच्या लकेऱ्या सोडणारे कवि नव्हेत. पण जेव्हां केव्हां ते प्रेमाच्या साम्राज्यांत शिरतात, तेव्हां ते आपल्या सोज्वळ प्रतिभेची चमक दाखवितात. 'नौकाविहार'-मधील शब्दांचें लालित्य, भावनेची कोमलता आणि कल्पनेची प्रसन्नता

हे गुण गोविंदाग्रज–बालकवीची बरोबरी करणारे आहेत. एका चांदण्या-रात्रीं नदीतील नौकेवर बसून विहार करणारा नायक नायिकेला म्हणतो, "सखे ग, प्रशान्त किति यामिनी। ही तशीच जलवाहिनी ॥ ही विशाळता किति तरी। तव उदार हृदयापरी। करुं विहार चल तीवरी ॥ किति अथांग जल हें दिसें। तव अगाध अनुरागसें। मज जडे जयाचें पिसें ॥" नदीच्या पाण्याची विशालता व सखोलता वर्णितां वर्णितां कवीनें आपल्या सखीच्या हृदयाचें व प्रेमाचेंही वर्णन किती मनोहर तऱ्हेनें केलें आहे ! या काव्याची चाल मधुर आहे, त्याहून तिची वर्णनशैली मधुरतर आहे आणि त्याहून त्यांतील भावना मधुरतम आहे.

नौकेंतील नायक आपल्या सखीचा अनुनय करतांना म्हणतो, "तव मुखीं छटा नाचती। जळिं लहरि तशा धावती। तव मृदुता अनुकारिती ॥ चमकत्या तरंगांसवें। ही डुलेल नौका जवें। जशि रसिकजनीं कंचनी ॥" एकाद्या मजलशींत नाचणाऱ्या नर्तकीशीं नावेची तुलना कवीनें येथें केली आहे, तर दुसरीकडे अष्टमीच्या चंद्रकोरेशीं त्या नावेचें साम्य दाखविलें आहे. शेवटीं कवि आपल्या सखीला साक्षात् देवी लक्ष्मी मानतो व म्हणतो, "भवनांत तूं इन्दिरा। प्रगटलीस या पामरा। सुरपदास न्याया झणीं॥"

असेंच दुसरें मनोहर प्रेमगीत म्हणजें 'मनमोहिनी'. त्यांतील नायक गुणगुणतो, "सदाकदा जातांयेतां तुला पाहियेलें। आज दर्शनें परि तुझिया भाव नव उदेले ॥ मिळे तुझ्या तन्मयतेमधिं साक्ष कौतुकाची। जणू आरती तूं धरिली स्नेहलोचनांची। जणू पुष्पवृष्टी केली अरुणकपोलांची ॥"

तांबे यांच्याप्रमाणें यशवंतांनीं कांहीं नाट्य–गीतें लिहिलीं आहेत. एका विवाहित स्त्रीच्या दारीं तिचा पूर्वीचा प्रियकर येतो, तेव्हां ती त्याला विचारते, "येसिं कशाला दारीं। ऐसा ऐन दुपारीं ? ॥ बघसी इतुका। मज रोखुन का ? । का तूं भृंग ? चितारी ? । छे, दिसतोस शिकारी ॥

गृहिणीचें चित्र

काव्य–कल्पनेंतील सुंदर स्त्रीचें अलंकारपूर्ण वर्णन 'प्रतिमा–लेखन' या कवितेंत यशवंतांनीं केले आहे. तें असें--"तूं तशीच राहा उभी जराशीं

मिन्तीशीं रेलुनी । घेउं दे प्रतिमा मज काढुनी ॥ चंद्रिका सुगंधी देहीं तव जाहली । रत्नांस मृदुलता देहीं तव लाभली । द्रवरूप सुधा ती द्युतिरूपा पावली अशा अलौकिक आश्चर्यांच्या रमतां सम्मेलनीं । घेउं दे प्रतिमा मज काढुनी ॥ "

परंतु केवळ कल्पना-विलासांत रमण्याची वृत्ति यशवंतांची नाहीं. व्यवहाराच्या खडबडीत जमिनीवरून चालत जाणारे ते एक रसिक प्रापंचिक आहेत. 'तूंच रमणी !' या कवितेंत यशवंतांनीं आपल्या गृहिणीचें जें शब्दचित्र रेखाटलें आहे तेंच बहुतेक सर्व वाचकवर्गास पटण्याइतकें खरेंखरें आहे. कल्पनेचा सारा रंग पुसून व भाषेचे अलंकार अंगावरून काढून, संसारांतील काबाडकष्ट करणाऱ्या गृहिणीचें सुखदुःख-मिश्रित्त चित्र त्यांनीं रेखाटलें, तें असें. "उन्हातान्हामाजीं अविरत जिनें कष्ट करणें । तिच्या गालीं पद्मासम कुटुन लाली बहरणें ? ॥ कपाळीं चिन्तेचे ध्वज सतत तुझ्या फडकती । कपाळीं कष्टांचे ढग सतत तुझ्या डंवरती ॥ कितीही सौंदर्योद्धत झळकल्या मूर्ति भुवनीं । तुझ्या व्यंगानेंही मज सहचरी, तूंच रमणी ! "

एका गरीब गृहिणीला आपल्या पतिविषयीं किती प्रेमळ आस्था वाटते हें ' प्रतीक्षा ' या काव्यांत यशवंतांनीं रंगविलें आहे. पती घरीं येण्याची वेळ झाली तेव्हां "दार वाजलें । उठुन धावलें । पाहिलें, परंतु नाहिं कोणि पातलें ॥ केशविरचनीं । हातुनी फणी । गळुनि पडे तरि न पटे शकुन कां झणीं ! नाहणी-घरीं । उपसलें जरी । ऊन पाणि निवुन जाय भान ना तरी ॥ जाळ फुरफुरे । पापणी स्फुरे । अजुन यायचें न कसें ! हृदय हें झुरे ॥ भाकरी करीं । चढत ना वरी । करपुनीहि जाय दुजी ही चुलीवरी ॥

ग्रामीण प्रेमगीतें

ग्रामीण प्रेमगीतें हें एक यशवंताचें प्रशंसनीय वैशिष्ट्य आहे. खेड्यांतील शेतकरी जीवनांतून रांगडा शृंगार मोकळ्या अंगानें कसा वावरतो हें त्यांनीं कौशल्यानें दाखविलें आहे. त्यांतील 'न्याहरीचें गाणें' रजतपटावरहि चित्रित झालें आहे. त्याचा आरंभ असा आहे—" न्यारिचा

वकुत होईल । मैतरणी बिगिबिगि चाल । नाङ्गूरसुटीच्या आंत । पोंचाया होवं ततं । सोडितिल हात बैलाला । धुण्डील नदर कोनाला । ”

तितकेंच लोकप्रिय झालेलें यशवंतांचें दुसरें ग्रामीण गीत म्हणजे ‘प्रेमाची दौल्त’. त्यांतील शब्द जितके समर्पक, तितकीच त्यांतील भावना उत्कट आहे. नवरा नुकताच निवर्तला असतां आपल्या पोटीं येणाऱ्या मुलाचें चिंतन करीत एक प्रेमी स्त्री म्हणते, “ ही तुझीच वाकळ म्हणुनि मला लै प्यारी । पिर्तीची आवड समद्याहुनि रे न्यारी । झालींत लक्तरं तरीहि मजला गोड । पुरविते पिर्त पाहिजेल त्याचं कोड । ही तुझीच थाळी म्हणुनि चाटते राया । मज लागिर झालं म्हणती आयाबाया । हा तुझाच पावा, मोरवेलिची काठी । झोपते घेउनी रोजच पोटीं–पाठीं । हें तुझ्या डोइंच जुनं जरी मुण्डासं । कुरवाळित बसत्यें, होतं माझं हासं । हें तुझ्या अङगचें जपुनि ठेविलं कुडतं । ही दौलत माझी—येडच त्याचं-जडतं ॥ ”

खेड्यांतील वैभवाचें वर्णन ‘ घर ’ या छोट्या कवितेंत यशवंतांनीं केलें आहे. एका मुलीचा बाप नवरदेवाच्या पित्याकडे येऊन विचारतो, ‘पोरिला हौस मोत्यांची । ती तुम्ही कशी पुरवाल ? ॥ ’ तेव्हां वर–पिता अभिमानानें उत्तर देतो, “पडवीला कणगी पोती । मोती त्यांमधिं बिनमोल । दावणीस गायीबैल । त्यें अम्हां हिरे अन् लाल । दरसाल । पिकें येतात । खाण शेतांत । तीच सोन्याची । बैसलीच गांठ जन्माची । ”

निराशेचा सूर

निराशा ही एखाद्या जळूप्रमाणें यशवंतांच्या जीविताचें शोषण करीत होती. त्या निराशेचे उद्रेक अनेक कवितांमधून बाहेर पडले आहेत. ते अंतरींचे तळमळीचे बोल असल्याकारणानें त्यांतून जिवंत काव्याचे लोट वाहतांना दिसतात. जग ज्याला जिवंतपणीं छळतें त्यालाच त्याच्या मृत्यूनंतर डोक्यावर घेऊन नाचतें, हें वैषम्य “ जगा ! तुझी सारी तऱ्हा सदा उफराटी ! ” अशा तीक्ष्ण शब्दांनीं चित्रित करणारी ‘ जग-रहाटी ’ ही त्यांची कविता आहे. तींत ते चडफडून उद्गारतात; “ एक तरी बागेंतील फूल कौतुकें देशील । बाळगिली आशा फोल । अतां पुष्पराशीमाजीं बुडे ।

मात्र ताटी ! ॥ " आणखी एक उदाहरण पहा—" आपुल्याच जातां । थायीं । पाडियले ठायीं ठायीं । केव्हढी ही आतां घाई । चालविती द्याया खान्दा; मिरविती हाटीं ॥ " आणखी विरोधी अनुभव कवि सांगतो, " हयातींत आगडोम्ब । विझविण्या एक थेम्ब । मिळाला न; आतां कुम्भ । किती रिकामे हे होती तिलान्जलीसाठीं ॥ मिळावया ऊब कोठें । झिजवितां उम्बरठे । दार बन्द जेथें तेथें । धूपारती–शेजारती अतां दिनराती ! "

निराशेची अंतिम अवस्था

"घरीं आणि दारीं भरला घोर तिमिर सारा । एकही दिसेना कोठें व्योम-पटीं तारा ! " अशा घनदाट निराशेनें कवीचें मन आंबून जातें—आणि त्याला स्वतःचेंच भय वाटतें. आपण हात लावला तर सोन्याची माती होईल, नक्षत्रांच्या शिळा होतील अशा भीतीनें तरुणाला आशीर्वाद देण्यालाहि तो धजत नाहीं. 'आशीर्वाद' या कवितेंतील कवीची मनःस्थिति म्हणजे निराशेचा कडेलोट होय. आपल्या सावलीनें दुसऱ्याचें मंगल भवितव्य विटाळलें जाऊं नये म्हणून तो दूर दूर राहतो. कट्ट निराशेंतहि केवढी मधुर उदारता ही ! कवि म्हणतो, " तुज द्याया आशीर्वादा मी उचलूं केंवि हात ?। करि कांचन–रज हो वाळू । मग केंवि तुला कुरवाळूं । जाईल काळवण्डूनी तव कान्ती जन्मजात ॥ नाभिं नक्षत्रांची शोभा । धरि मी न पहाया लोभा । निखळतील मम नजरेनें, भय नान्दे मानसांत ॥ उल्हास उकळतो जेथें । सुखपूर्ति खिदळते जेथें । प्रगटून कशाला तेथें मी पसरूं काळरात ? तूं सजसी व्योमविहारा । जा विहङ्गमा परभारा । अणु–अणूंत दूषित माझ्या वास्तव्यें येथ वात ॥ माङ्गल्य मूर्त होवोनी । दिग्विजयें ये परतोनी । अस्पृश्य तोंवरी येथें मी बसतों बघत वाट ॥ "

मृत्यूची विनवणी

कवीनें आपुल्या अनुभवाचें ' गुलामाचें गाऱ्हाणें ' गाइलें आहे. तें बहुतेक नोकरीवाल्या वाचकांना पटण्यासारखेंच आहे. तें असें–" जूं बैसलें मानेवरी । चाबूक हा पाठीवरी । ह्या कर्दमीं मार्गावरी । चौखूर धावावें

परि । हाकावया जो बैसला । सत्तामदें तो झिङ्गला । माया–दयेची आर्द्रता । नाहीं तयाच्या अन्तरीं ॥ ''

सांसारिक यातनांची पराकाष्ठा झाली, तेव्हां कवि देवापाशीं अखेरचे मागणें मागतो, तें असें—'' राबलों वृथा संसारसौख्याविभ्रमीं । ने प्रभो आपुल्या धामीं । जाहलो सर्वथा श्रमी । चाललों जरी सत्पथें । तरि तुफान उलटें सुटे । सैराट तारुं भडकतें, विफल रुस्तुमी । ''

शेवटीं निराशेची सीमाच संपून कवि मृत्यूचीहि ' घाली न हुतूतू ' अशी विनवणी करतो. तो वैतागून म्हणतो, '' हें जीवित कीं सासर, माहेर जिवाला–। तूं एक जिव्हाळा । कां चाळवण्या दाविसि ? दे गाढ मिठी तूं । घाली न हुतूतू ॥ ही आग सभोंती, श्रम केले विझवाया । गेले परि वाया; ना थेम्ब म्हणावाच जरी आणिक ओतूं । घाली न हुतूतू ॥''

थोरांचें नैराश्य

केवळ वैयक्तिक संसारांतच निराशा भेटते असें नाहीं. साऱ्या जगाचीहि घडी घालू पहाणाऱ्या मुत्सद्यांना व महात्म्यांना, सेनापतींना व राज्यकर्त्यांना, द्रष्ट्यांना व प्रेषितांना–आपल्या कार्यांत बहुधा अपयशच आलेलें आढळतें. युद्धानें कोणतेहि प्रश्न सहसा सुटत नाहींत. तेव्हां राष्ट्र-नेत्यांना वाटणारी निराशा ' युगंधरांचें पालुपद ' या कवितेंत रंगावेली आहे. ती अशी, ''घडी बसाया हवी जगाची ! नवीन सुंदर शांत निरामय । उरस्फोड कां थोडी केली ? । सिन्धु आटले किति शाईचे । बोरु मेरूमान्दरांचे । झिजले, गेले तासुन चिंबुन । फेसहि आला ओठाभंवती । पण–जमेच ना, घडेच ना । बनेच ना, पटेच ना । ''

मानवतेसाठीं सुरू केलेल्या युद्धांत मानवी भावना कशा खाक होऊन जातात, याचें वर्णन करतांना कवि म्हणतो, '' निरोप देतांना सातांचीं । विदीर्ण हृदयें ठिबक–ठिबकती । थारोळीं रक्ताचीं जमतीं । घरीं नि समरीं नद्या वाहती । वाहुनि सुकती, फिरून वाहती । आणि वाहतां गाणें गाती । ताल जयाला पडघम धरती । शतकें गेलीं ! युगेंहि गेलीं !! परन्तु त्यांचें एक पालुपद । जमेच ना, घडेच ना, । पटेच ना, घडेच ना ! ''

सुखदुःखाच्या कसल्याहि अवस्थेंत चित्तांत समाधान असूं द्यावें, हा

संतांना साजेसा उपदेश कवीनें नदीच्या रूपकाचे द्वारें केला आहे; तो असा-" करिते का कधिं खन्त । सरिता करिते का कधिं खन्त ? " राङ्गत लोळत दौडत धोळत । कडेकपारींतुनी खळाळत । आक्रमित निज पन्थ ॥ मरुभूमींतुन दहनभूमिंतुन । गात चालली एकच गायन-' करूं जग शोभावन्त ! ' ॥

कर्तृत्वाला आवाहन

मात्र हें समाधान दुबळ्यांचें, नाकर्त्यांचें नाहीं. अशा समाधानी वृत्तींतून कर्तृत्व खुललें पाहिजे व पराक्रमाचें तेज झळकलें पाहिजे, असा युक्तिवाद यशवंतांच्या काव्यांत रसरशीतपणें भरलेला आहे. ' बाणा ' या कवितेंत ते मानवी कर्तृत्वाच्या अभिनिवेशानें म्हणतात. " काय होइ विन्मुख कैचा तरी देवराणा ? । उभे राहुं आम्ही अमुच्या जरी परित्राणा ॥ योजिली अम्हांस्तव त्यानें जरी माळ जागा । कसूं कम्बरा फुलवाया तेथ रम्य बागा । विफल यत्न झाले तरिही कधिं न करूं त्यागा । भुलुनि तोच येइल अमुच्या पुष्पपरागांना ॥ दाविली तयानें किंवा जरी बन्दिशाळा । तिथें लावुनी तुळशीचें रोप पुजूं त्याला । खलांच्याहि हृदयीं स्फुरवूं भक्तिचा उमाळा । भासवूं तया हें गोकुळ; नव्हे बन्दिखाना ॥ "

उदात्त भावना

यशवंतांच्या भावनेचा उदात्तपणा ' अन्य नको वरदान ' या कवितेंत ठसठशीतपणें व्यक्त झाला आहे. ही सारी कविताच मुखोद्गत करण्यासारखी आहे. तींत तारुण्यांतील कर्तृत्वाची ऐट आहे आणि तशीच वार्धक्यांतील भक्तीची नम्र भावना पण आहे. आर्त, दुःखी, अपमानित अशांच्या संरक्षणासाठीं आपलें सर्वस्व अर्पण करण्याची संतांची वीर-वृत्ति या कवितेंत काठोकांठ भरलेली आहे. कवि म्हणतो, "अन्य नको वरदान । प्रभो, मज अन्य नको वरदान ॥ कोठें चिमणें बालक रडतें । कोठें शोकीं कुटुम्ब बुडतें । त्वरित तयांना रिझवायातें । द्या मजला अवधान । प्रभो मज अन्य नको वरदान ॥ तसाच येतां प्रसङ्ग बाका । ' अहो, उठा जन लज्जा राखा ' । अशा दशदिशीं फुटतां हाका । द्या हातांत कृपाण

प्रभो, मज अन्य नको वरदान ॥ घावामागुनि घाव बैसुनी । देह शोणितें निघतां न्हाउनि । विह्वळतां जन भवतीं मरणीं । न चळो धैर्य इमान । प्रभो, मज अन्य नको वरदान ॥ '

कलेचा गौरव

थोर कलावंताच्या दर्शनानें कवीच्या भावना हेलावतात. मराठी रंगभूमीची सर्वश्रेष्ठ देवता म्हणून रसिकापुढें पंचवीस–तीस वर्षे अपूर्व तेजानें तळपणारे बाल–गंधर्व यांच्या गुणांचें वर्णन यशवंतांनीं पुढील काव्यपूर्ण शब्दांनीं केलें आहे, " तुफान सिंधु नाचतो । अफाट वात खेळतो । त्वदीय गान ऐकतां क्षणार्ध सर्व थाम्बले ॥ कवीन्द्रही नसून तूं । मुनींद्रहि नसून तूं । स्वगीत–योगसाधनें जगास सर्व भारिलें । "

याहिपेक्षां अधिक हृदयंगम वर्णन ' गायकास नजराणा ' या कवितेंत केलें आहे. ' एकच प्याला ' नाटकांत कारुण्यमूर्ति सिंधु दळण दळते व दळतां दळतां ' चंद्र चवथिचा ' ही ओवी म्हणते. तो प्रसंग किती करुण-रसपूर्ण आहे याचें वर्णन जातिवंत कवीच करूं जाणे. तसे कवि असलेले यशवंत यांनीं अल्पाक्षरामध्यें, विरोधाभासाची गुंफण करून, पुढील प्रशस्तिपर कवन रचलें आहें. " चन्द्र चवथिचा । रामाच्या ग बागेमध्यें चाफा नवतिचा ॥ गीत–गायनीं । शब्द ते न, अश्रुहार देसि गुम्फुनी । एक ओळ ही । निघतां तव वदनांतुनि डुलत अहिमहि ॥ यामिनि रडे । अश्रबिंदु–चांदणेंच पडत चहुंकडे ॥ हृदय कढकढे । या गङ्गायमुनांना पूर बहू चढे । नगहि उपळले । ऐन वसन्तांत मेघ नाभें उफाळले ॥ सजिव जड बने । जडतेला येइ जीव रडति मग वनें ॥ गायका, तुला । अश्रूंचा नजराणा हाच अर्पिला ॥ "

बाल–गंधर्व हे तर लोकोत्तर नट, पण रात्रींच्या वेळीं रस्त्यांतून सारंगी वाजवत फिरणारा सामान्य कलावंत पाहिला तरी यशवंतांच्या भावना उचंबळून येतात. ते व गिरीश या दोघांनींहि ' सारंगीवाला ' या एकाच विषयावर दोन कविता केल्या आहेत. यशवंतांनीं आपल्या कवितेंत सारंगीवाल्याची स्तुति करतां करतां संगीत–कलेचें कार्य काय आहे–किंबहुना सर्वच कलांचें ध्येय कोणतें असावें, हें सूचित केलें आहे;

एवढेंच नव्हे तर समाजांतील दैन्य, दारिद्र्य, विषमता वगैरे दोषांवरहि टीकेचा झोत पाडला आहे. 'सारंगीवाला' अंधाराचें मंथन करून त्यांतून जीं रत्नें निघतात तीं आकाशांत फेकून देतो आणि तींच नक्षत्रें म्हणून चमकतात अशी उत्तुंग कल्पना करून कवि म्हणतो, "लागले हे दीप गगनीं। वादनाच्या मंजु गानीं। अन्धारासिन्धु मन्थुनी फेकिसी उडुरत्नें कीं गगनीं. ॥" संसारांत दुःखें भोगणाऱ्या जीवांचें समाधान करण्याचें कार्य कलावंत करतो हें सांगतांना यशवंत म्हणतात, "तीव्र समरीं जीविताच्या। फुटति छाती ज्या जनांच्या। तूं धन्वन्तरि, तीं हृदयें देशी सङ्गीतीं सान्धवुनी ॥" गरीब बिचारी आई! थकली भागलेली हमालीण! अशा दीनदुबळ्यांना आनंद व उत्साह देणें हें कलेचें कार्य आहे. असें सांगताना कवि म्हणतो, "हें उपाशी मूल उठलें। माउलीचे अश्रु प्यालें। अङ्गाइ गावया तया हिण्डसी सारङ्गी वाजवुनी ॥ धूळ जीतें शेज झाली। येथ निजली ही हमाली। चैतन्य द्यावया तिला उद्यांस्तव अवतरसी दिव्य मुनी ॥" हेंच ध्येय यशवंतांच्या काव्य-रचनेचेंहि आहे, नव्हे काय?



नव्या कल्पना, नवीं ध्येयें व नवे विषय घेऊन नवनवीन चालींत तीं रंगविण्याचें सामर्थ्य ' कुसुमाग्रज ' या कवीनें दाखविलें. त्यांच्या नांवांत ' कुसुम ' असलें तरी त्यांच्या काव्यांत कोमलता फारशी नाहीं.



उकळत्या तेलांत आपली लेखणी बुचकळूनच जणु कांहीं ते आपली कविता लिहीत असावेंत असें वाटतें. तांबे किंवा टिळक यांनीं आपली कवनें म्हणजे सुमनें होत असें रसिकांना निवेदिलें आहे, पण कुसुमाग्रजांना आपल्या कविता म्हणजे यज्ञांतील समिधा वाटतात. त्यांचें वर्णन त्यांनीं पुढील शब्दांनीं केलें आहे. " समिधाच सख्या या, त्यांत कसा ओलावा, कोठुन फुलांपरि वा मकरंद मिळावा?। जात्याच रुक्ष या, एकच त्या आकांक्षा, । तव आंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा ! ॥ " रसिकांचा ' आंतर अग्नि ' फुलविण्याचें त्याचें सामर्थ्य अलौकिक आहे. राष्ट्रांतच नव्हे तर सर्व जगांत जी क्रांती सध्या चालू आहे, तिची तुतारी कुसुमाग्रजांच्या काव्यांतून ऐकूं येते. आतांपर्यंत दैन्याखालीं दडपलेला मानव जागृत होऊन अन्यायाच्या व जुलमाच्या शृङ्खला तोडूं पहात आहे. त्याचे आशावादी व आवेशपूर्ण उद्गार त्यांच्या काव्यांतून स्पष्टपणें ऐकूं

येतात. " वाळू–रणिं ओढीत असे जीवन–रिक्षा " असा घाम गाळणारा कामकरी हाच उद्याचा शास्ता होणार आहे, असा विश्वास ते प्रगट करतात. "फुटलेल्या पणतींत जळे कोरडी ज्योत" असें जीवन कंठणाऱ्या बहुसंख्य किसान–कामगारांच्या भावना व आकांक्षा त्यांच्या काव्यांत तीक्ष्णतेनें व ठळकपणें प्रगट झाल्या आहेत.

गोदेचें तेजस्वी पाणी

आपल्या काव्यांतून तेजोगंगा वहाविणारे बॅ. सावरकर व गोविंद हे कवि ज्या गोदावरीचे कांठीं जन्मले व तिचें श्रीरामांनीं पावन केलेलें पाणी प्यालें, त्याच गोदावरीच्या काठांवर कुसुमाग्रजांचें बालपण पोसलें गेलें. त्यांचें खरें नांव विष्णु वामन शिरवाडकर. त्यांचा जन्म नाशिक येथें तारीख २७ फेब्रुवारी १९१२ रोजीं झाला. तेथेंच त्यांचे बी. ए. पर्यंतचें शिक्षण झालें. बी. ए. ची पदवी घेऊन ते वृत्तपत्र–व्यवसायांत शिरले. त्या व्यवसायासाठीं त्यांनीं प्रथम कांहीं दिवस पुणें येथें काढले. नंतर ते मुंबई येथे गेले आणि नंतर तेथेंच त्यांनीं वास्तव्य केलें. विसाव्या वर्षापासून त्यांनीं काव्य–रचनेस आरंभ केला. पण त्यांचेकडे सर्व महाराष्ट्राचें लक्ष एकदम खेचलें गेलें, तें 'क्रांतीचा जयजयकार' या तेजस्वी कवितेनें. १९३९ सालीं डमडम येथील तुरुंगांतील राजबंद्यांनीं अन्नत्याग करून मृत्यूला मिठी मारली. त्यावेळीं ब्रिटिश सरकारनें चालविलेल्या अमानुष अत्याचारांना अजिंक्य ठरणारें धैर्य ज्या राजबंद्यांनीं दाखविलें; त्यांच्या हृदयांतील उत्कट व ऊर्जस्वल भावनांचे पाट या काव्यांतून वहात आहेत. या काव्याच्या तेजानें मराठी वाचकांचे डोळे दिपले आणि त्यानंतर ते कुसुमाग्रजांच्या सर्व काव्याचेच चाहते बनले. कुसुमाग्रजांनीं काव्याप्रमाणेंच कादंबरी व नाटक या साहित्य–प्रांतांतहि संचार केला आहे. 'जीवन–लहरी' हा त्यांचा पहिला कविता–संग्रह जुन्या चाकोरींतूनच जाणारा आहे. पण 'विशाखा' व 'किनारा' हे त्यांचे काव्यसंग्रह मात्र त्यांच्या ज्वलंत गुणांचे प्रतिनिधी आहेत. त्यांचीं सारीं वैशिष्ट्यें त्यांत तळपत आहेत. कालिदासाच्या

'मेघदूता'चें भाषांतरहि त्यांनीं प्रसन्न भाषेमध्यें केलें आहे. 'वैष्णव' व 'जान्हवी' या त्यांच्या दोन कादंबऱ्या प्रसिद्ध असून 'वैजयंती' व 'दुसरा पेशवा' हीं त्यांचीं दोन नाटकें रंगभूमीवर आलेलीं आहेत.

क्रांतीचा शाहीर

१९१५ सालापासून पांच वर्षें मराठी काव्याच्या साम्राज्यावर गडकऱ्यांनीं आपली सत्ता चालविली. त्यांच्या बरोबरीनें रे. टिळक व बालकवि यांनींहि आपल्या मधुर काव्याची मोहिनी रसिकावर घातली. पण या तिघा कविश्रेष्ठांच्या प्राणज्योती साधारणतः एकदमच विझल्या. त्यामुळें मराठी काव्यांत जो अंधार पसरला; तो निवारण्याचें कार्य 'रवि-किरण-मंडळानें' केलें. विशेषतः माधव जूलियन, यशवंत व गिरीश या त्रिमूर्तीनीं महाराष्ट्राच्या रसिकतेवर आपलें अधिराज्य चालविलें. त्यांच्या-इतकेंच प्रभावी पण स्वतंत्र आकर्षण तांबे यांचें होतें. या कवींनीं दहा-पंधरा वर्षें रसिकांच्या मनावर राज्य चालविलें. त्यानंतर १९३५ सालापासून जे कवि नवयुगाचा झेंडा हातीं घेऊन पुढें सरसावले त्यांत कुसुमाग्रजांचें स्थान वरचें आहे. अनेक भाव-गीत-गायकांच्या मुखांतून त्यांचीं तेजस्वी काव्यें महाराष्ट्रांतील गांवोगांवींच्या हजारो श्रोत्यांच्या कानामनांत शिरलेलीं व स्थिरावलेलीं आहेत. 'तिमिरांतुनी तेजाकडे' आपल्या वाचकाला नेणारीं हीं काव्यें जितकीं प्रकाशमान; तितकींच दाहकहि आहेत.

गेल्या वीस वर्षांत कुसुमाग्रजांनीं दोनशेंच्या आंतच कविता लिहिल्या. आपल्या प्रत्येक कवितेंत आपल्या विशेष गुणांचा कांहीं ठसा असावा या इच्छेमुळें ते काव्य-रचना संयमानें करीत असावेत. 'विशाखा'नंतर दहा वर्षांनीं 'किनारा' प्रसिद्ध झाला. हीं दहा वर्षें म्हणजे १९४२ ते १९५२. हा काळ राष्ट्राच्या इतिहासांतील अत्यंत आणीबाणीचा-तीव्र प्रक्षोभाचा व विराट घटनांचा! महाकाव्यें ज्यावरून ओवाळून टाकावींत, असा हा काळ! पं. नेहरूंनीं "Epic grandeur" असें वर्णन केलें तें याच काळाचें. पण या काळाचें आवाहन फारच थोड्या मराठी

कवीच्या अंतःकरणास जाऊन पोहचलें. त्यांमध्यें कुसुमाग्रज हे अग्रगण्य होत. ते मानवता–प्रेमी आहेत आणि म्हणूनच क्रांतिवादी आहेत. केशवसुतांनीं ज्या सामाजिक क्रांतीची तुतारी फुंकली, ती आतां पूर्णावस्थेस पोहचत आहे. राजकीय क्रांति १९४७ सालीं शांततेच्या अभिनव मार्गानें घडून आली. पण अद्याप आर्थिक क्रांति व्हावयाची आहे. समाजाच्या सर्वांगीण क्रांतीची घोषणा कुसुमाग्रजांच्या काव्यांतून ऐकूं येते.

निराशेचा शेवट

'टिळकांच्या पुतळ्याजवळ' गेलें असतांना कवीला सर्वत्र थैमान घालणारी निराशा आठवते. आणि तो म्हणतो, "उद्दाम निराशा करि तांडव हृदयांत। घोंगावें वादळ जेवीं जीर्ण गडांत, ॥ हें जीवन कसलें, ही मरणांची माला। मासोळी झटते तोडायास गळाला, ॥" पण 'ती कणखर मूर्ति' पाहतांच 'आंतला शांत गल्बला झाला।' कुसुमाग्रजांच्या कवितेंत दुबळी निराशा आढळत नाहीं. केशवसुतांपासून यशवंतांपर्यंत बहुतेक सर्व कवींना ग्रासणाऱ्या निराशेवर ते स्वार होतात. आशा व धैर्य या दोन डोळ्यांनीं ते भविष्यकाळाकडे सतत पहात अहेत. वादळांतून चाललेल्या जहाजावरील खलाशांना दूरवर नजर टाकिली असतांना समुद्राचा किनारा दिसला म्हणजे जो हुरूप येतो; तो वाचकांच्या चित्तांत कुसुमाग्रज आपल्या काव्यांनीं निर्माण करतात. संग्रामांत घायाळ झालेल्या वीराला ते सांगतात, "सरायास संग्राम आला अतां। तपांची समोरी उभी सांगता। युगांच्या श्रमांचा दिसे हा निवारा। आला किनारा।"

जीर्ण जगाचा विध्वंस होत असलेला ते पाहतात. 'निरोप' या कवितेंत ते म्हणतात, "ठावें न कोठें मज, काय झालें। गेलें जळोनी मन मानवांचें। मांगल्य सारें पडलें धुळींत। चोंहीकडे नर्तन हिंस्रतेचें।' जें जें गमे सुंदर जीवनांत। त्यांच्या शवांचा खच हो धरेला।" पण लगेच ते अशी आशा दाखवितात, "यज्ञामधें शतकांतुनी। बलिदान संतत जाहलें। ये देवता ज्वालांतुनी। तें श्रेय आतां लाभलें! ॥"

कोणाचें हृदय श्रमलें असेल, कोणाच्या हृदयांत अंधार कोंदला असेल, तर त्याला ते 'तारका'मध्यें आशा दाखवितात, "रुपेरी पिसांची रचती शेज। माझिया श्रमल्या हृदयासाठीं। प्रकाश-पुष्पांचे गुंफती हार। माझिया उदास अंधारासाठीं।"

नवी चेतना

काव्यांतील जुने विषय, जुने संकेत, जुन्या कल्पना यांचा वीट कवीला आला आहे. म्हणून तो 'नवें-जुनें' या कवितेंत आवेशानें सांगतो, "नवीन कांहीं गा हो आतां। जुनें-जुन्याचें चर्वण सरुं द्या। प्रतिभेचीं पांखरें आपुल्या। नव्या नभामधुनी भिरभिरुं द्या॥ तीं कमलें तीं, त्याच चांदण्या। तेंच चांदणें, तोच सुधाकर। प्रेम तेंच तें, त्या नवयुवती। तीं कुसुमें अन् तो कुसुमाकर॥"

साधा माणूस हाहि चैतन्याचा अंश आहे आणि सामान्य नागरिक हाहि समाजाचा प्रबळ घटक आहे, ही नवी जाणीव, ही व्यक्ति-स्वातंत्र्याची महती 'मातीचें घर' या कवितेंत कुसुमाग्रज मुक्तकंठानें गातात आणि म्हणतात—"मातीचें पण तुझेंच हें घर। कर तेजोमय बलमय सुंदर॥ तेज भरे जें ग्रहनक्षत्रीं। प्रकाशतें जें दिवसारात्रीं। जीवनमय जें करी धरित्री। कण त्याचा मम उजळी अंतर। फुलांत उमलत, घनांत गर्जत, नदींत वाहत, वायुंत विरहत। तेंच तुझेंपण होय इथें स्थित। नच घर माझें, तव हें मंदिर॥"

लोक-देवतेला आवाहन

राष्ट्राला स्वातंत्र्य लाभण्यापूर्वीं जीं आंदोलनें झालीं; त्यांना महाकालीच्या नृत्याची उपमा देऊन कवीनें १९४६ सालीं तिला आवाहन केलें आहे. तें वाचून तांबे यांच्या रुद्राची आठवण कोणासहि होईल. कल्पना व आवेश या दोन्ही गुणांनीं लखलखणारे त्यांतील दोन उतारे पहा—"तडितांचे बांधुन पायामधिं पैंजण। उधळीत भोंवतीं नक्षत्रांचे कण। मेघांचे घुमवित मृदंग रणभीषण। मदांध सामर्थ्यें तुडवित ये निज चरणाखालीं। संहाराची सुवर्णघटका आली गे आली। हे लोक-देवते

क्रुद्ध तुझ्या नर्तनें । डळमळो पृथ्विचा तोल नभीं भीतिनें । राखेंत लोळुंदे किरीट–सिंहासनें। शापमुक्त त्या भूवर कर मानवता बलशाली । संहाराची सुवर्णघटका आली गे आली ॥ ”

वीररसाचा उद्रेक

प्रक्षुब्ध लोक-देवतेच्या क्रोधाच्या लाटा थोपवून धरण्यासाठीं परके सरकार दडपशाही करीत होतें, पुढाऱ्यांना तुरुंगांत डांबीत होतें, लाठी-मारानें जखमी करीत होते, गोळीबारानें किंवा फांसानें ठार करीत होते. तरी ते देशभक्त गरजत, “ आहे अजिंक्य हा निर्धार ! क्रूर काजळी चिरेबंद तट सभोंवतीं बांधा । नाहीं विद्ध तरी होणार ! परजा साखळदंड उभारा सूळ संगिनींचे। ध्याया निर्दय बलिदान। जखमांवरचें रक्त पुसोनी गर्जत राहिल हा । रणाचें सूडाचें गान ॥ ”

जागें झालेलें मानवत्व अजिंक्य आहे मृत्यूलाहि जिंकणारें आहे आणि तें स्वातंत्र्याचा ध्वज आकाशांत फडकविणार, हा हुतात्म्यांचा ‘ अजिंक्य निर्धार ’ ओजस्वी भाषेनें कवि वर्णितात.

जाग्रत मानवतेचा हुंकार ‘ मातीचा पुत्र ’ या काव्यांतहि ऐकूं येतो. स्वसामर्थ्याची जाणीव झालेला मानव देवांना बजावतो, “ स्वर्गामधल्या हे गर्वोद्धत देवदैवतांनों । दयेचें आज नको दान। पृथ्वीवरचा मानव मी हा उभारुनी बाहू देतसे तुम्हांस आव्हान ॥ मातीचा मी पुत्र पुकारी स्वर्गाच्या दारीं । माझ्या जातीची महती । हिरावलेली परत मागतों स्वतंत्रता माझी प्रतिष्ठा माझी जी होती ॥ ”

मूक जनतेचा हुंकार

समुद्राच्या लाटामध्यें जहाजेंच्या जहाजें गडप होतात, याचें वर्णन अनेक कवींनीं केलें आहे. पण कुसुमाग्रजांनीं मातीचेंहि सामर्थ्य तसेंच विराट असल्याचें दाखविलें आहे. सर्वांच्या पायाखालीं तुडविली जाणारी माती–पण ती मोठमोठे राजवाडे गिळून बसते. तशीच तुडविली गेलेली मूक जनता यापुढें राज्यसत्ता आपल्या पोटांत पचनीं पाडील. त्यांच्या ‘ मातीची दर्पोक्ति ’ अशी आहे—‘ प्रासाद भिडूं द्या गगनाला गर्वांत । डोलूं द्या

पताका सत्तेच्या उन्मत्त । दौलती उठूं द्या प्राशुनि दुर्बळ रक्त। कोसळेल इमला समूळ एका रातीं । मातीवर चढणें एक नवा थर अंतीं ॥ "

ही झाली मातीची नुसती दर्पोक्ति; पण प्रत्यक्ष कृति ? ' आगगाडी व जमीन ' यांच्या दाखल्यानें ती कृति कवीनें भेदक रीतीनें रंगविली आहे. जमीन दडपीत, तिच्या अंगावरून वेगानें धांवत व आनंदानें शीळ फुंकत आगगाडी उन्मत्तपणें चालली आहे; पण जमीन खचतांच ती उलटीपालटी होऊन तिचे तुकडे तुकडे होतात. ती प्रथम किती ऐटीनें चालली आहे पहा—" शिरली घाटांत । अफाट वेगांत । मैलाचें अंतर । घोटांत गिळीत।" पण आगगाडीच्या दडपशाहीनें चिडून गेलेली जमीन सूडानें पेटली व तिनें एक पूल ढासळला. "हवेंत पेटला। सुडाचा धुमारा । कोसळे दरींत। पुलाचा डोलारा ॥ " तेव्हां ' हजार शकलें पडलीं खालतीं । ' १९३८ सालीं कवीनें केलेलें हें रूपक दहा वर्षांच्या आंत खरें झालें आणि मदोन्मत्त ब्रिटिश साम्राज्यशाहीला भारतीय भूमीनें नामशेष करून टाकलें.

राज्यसत्तेला इषारा

१९४२ च्या ' चले जाव ' आंदोलनांत तर ब्रिटिश सरकारनें दडपशाहीचा अग्नि–वर्षाव केला. पावित्र्य चिरडलें गेलें, माणुसकी ठार झाली ! अशा वेळींहि आशा व स्फूर्ति पुरवीत रहाण्याचें कार्य जीवंत कवीचें आहे. कुसुमाग्रज १९४३ सालीं लिहिलेल्या ' बलिदान ' मध्यें असें भाकित करतात, " धुंळीमधोनीं फुलतिल ज्वाला । धगधगतिल पाषाण । हें व्यर्थ न हो बलिदान् ! ॥ घरांघरांतुन पथापथावर । पवित्रतेचें पडे कलेवर । माणुसकीच्या मुडद्यावरती थयथयले हैवान ! हें व्यर्थ न हो बलिदान् ! ॥ "

आणि तो 'क्रांतीचा जयजयकार !' डोळ्यासमोर मृत्यु आ वासून उभा असतांनाहि त्या राजबंद्यांचा आत्मविश्वास अमर व ध्येयनिष्ठा अढळ होती

यांचें प्रभावी चित्रण कुसुमाग्रजांनीं केलेलें आहे. ते राजबंदी गरजतात—"कुद्ध भूक पोटांत घालुं द्या खुशाल यैमान। कुरतडुं द्या आंतडीं करूं द्या रक्ताचें पान। संहारक काली, तुज देती बळीच आव्हान। बलशाली मरणाहुन आहे अमुचा अभिमान। मृत्युंजय आम्ही। आम्हांला कसलें कारागार?। अहो हें कसलें कारागार?। गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार॥"

मातृभूमीच्या मुक्ततेचें एकच वेड लागलेल्या या वीरांनीं आपल्या मायभूमीला अखेरचें वंदन केलें आहे, तें असें–"श्वासांनो, जा वायू-संगें ओलांडुन भिंत। अन् आईला कळवा अमुच्या हृदयांतिल खंत। सांगा वेडीं तुझीं मुलें हीं या अंधारांत। बद्ध करांनीं अखेरचा तुज करतीं प्रणिपात। तुझ्या मुक्तिचें एकच होतें वेड परी अनिवार। तयांना वेड परि अनिवार। गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार!"

असे तेजस्वी तरुण आपल्यासाठीं मारले जाणार म्हणून भारतमातेला शोक होईल. पण तो शोक अकारण आहे. असें सांगून कवि अशीं आशा फुलवितो कीं, या हुतात्म्यांच्या हातांतील शृंखलामुळेंच भारत-मातेच्या पारतंत्र्याच्या शृंखला तुटणार आहेत आणि यांच्या बलिदानांतून स्फूर्ति पावून नवे नेते जन्मास येतील व स्वातंत्र्याचा उषःकाल आपल्या राष्ट्राला दाखवितील. "कशास आई, भिजविसी डोळे उजळ तुझे भाल। रात्रीच्या गर्भांत उद्यांचा असे उषःकाल। सरणावरती आज आमुची पेटतांच प्रेतें। उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते। लोहदंड तव पायामधले खळाखळा तुटणार। आई, खळाखळा तुटणार। गर्जा जय-जयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार।"

उकळत्या वीर–रसावर कारुण्याचा तवंग पसरविणारी ही कविता अनन्यसाधारण आहे.

मानवतेचा धर्म

कुसुमाग्रजांनीं चित्रित केलेला 'वैष्णव'हि हुतात्म्यांच्या कोटींतीलच आहे. तो स्वतःचें स्वरूप सांगतो, "बलहीनांचा नत पाइक मी। प्रबलांचा नेता। उन्मत्तांचा अजिंक्य वैरी। दलितांचा त्राता॥" या वैष्णवाचा धर्म कोणता? पूजा कोणती? तर, "अभिमानाची, स्वतंत्रतेची। समतेची पूजा। प्रज्ञेची जाणीव मानणें हाच धर्म माझा॥ जुमानितों ना जातिवर्ण मी। कर्मबंधनें वा। एक मानतों मी मानवता। योग तिची सेवा॥" मानवतेचा पूजक आणि समतेचा उपासक असा हा स्वतंत्र बुद्धीचा वैष्णव वीर आहे.

अशा मानवतेचा साक्षात्कार 'सहानुभूति' या काव्यांत कवि घडवितो. रस्त्यावर भीक मागणाऱ्या अनाथाला भीक कोण घालतो? तर दीन दरिद्री असा मजूरच! तो "म्हणे, राहिन दिन एक मी उपाशी। परी लाभूं दे दोन घांस यासी। खिसा ओतुनि त्या भुक्या ओंजळींत। चालु लागे तो दीनबंधु वाट। —आणि धनिकांचीं वाहनें पथांत। जात होतीं तीं आपुल्या मदांत।"

आर्थिक वैषम्यावर टीकास्त्र

आपलें खेड्यांतील झोपडें सोडून एक बेकार माणूस भाकरीचा घास शोधण्यासाठीं शहरांत गेला. तेथें भुकेनें मरून तो पायवाटेला पडला. मृत्यूमुळें तो कोणकोणत्या यातनांतून सुटला हें 'बळी' या काव्यांत सांगून कुसुमाग्रजांनीं सध्यांच्या जीवन-संग्रामावर तीक्ष्ण टीका केली आहे. ते म्हणतात, "ना भुकेचा यापुढें आक्रोश पोटीं चालणें। याचनेचे दीन डोळे बंद झाले यापुढें! यापुढें ना स्वाभिमाना लागणें आतां चुडा। अंतराला आसुडाचे घाव मार्थीं जोखडें! मानवाच्या संस्कृतीची काय लागे

ही ध्वजा । तीस कोटी दैवतांच्या की दयेचें हें मढें ? मूक झालेल्या मुखानें गर्जतें का प्रेत हें । घालिती हे बंद डोळे का निखाऱ्यांचे सडे ? ॥ ”

ही झाली बेकाराची दशा. पण कामगारांची कहाणी तरी काय निराळी आहे ? ‘ गुलाम ’मधील एक कामगार गिरणींतील चक्रांचा बेहोष घोष ऐकून ऐकून कंटाळला–वैतागला आणि त्यानें “पाहिलें सभोंतीं फोडुनि अन् किंकाळी । चक्रांत घातलें मनगट आवेशांत । ” त्याचा परिणाम काय झाला ? तर “ तनु दुभंग झाली आणि थांबलें चाक । घंटाध्वनि घुमला गंभीर अवकाशांत । ” कामगार तर मेलाच; पण त्याचें जीवन यंत्रमय करणारीं तीं शेंकडों चक्रेंहि क्षणभर थांबलीं. जागी झालेली माणुसकी यंत्रांचा जुलुम सहन करणार नाहीं अशी प्रेरणा देणारें हें काव्य प्रभावी आहे.

एका शेतकऱ्याच्या घरादाराचा “ लिलाव ” श्रीमंत सावकार करीत आहे. या करुण रसाचा कळस करणाऱ्या अखेरच्या ओळी अशा आहेत—“ भुकें अर्भक अन् कवळुनी उरास । पदर टाकुनि त्या घेई पाजण्यास. । ऊर उघडें तें तिचें न्याहळोनी । थोर थैलींतिल वाजवीत नाणीं–। “ आणि ही रे । ” पुसतसे सावकार । उडे हास्याचा चहुंकडे विखार । ”

भक्तिरसाचा उठाव

वीर व रौद्र या दोन प्रमुख रसांच्या अनुषंगानें कुसुमाग्रजांनीं करुण, भक्ति, वत्सल इत्यादि रस घोळले आहेत. ‘ भाक्तिभाव ’ या कवितेंत डॉ. टागोरांच्या थाटांत ते ईश्वराला आवाहन करतात, “ मिरवणूक ये वाजत गाजत । नृपापरी तूं तींत विराजत । दुमदुमती जयनाद तुझे नित । वैभव तें विसरून घडीभर स्वागत हें मम घेशिल का ? ॥ ”

ईश्वराची साक्ष डोंगराडोंगरांतून, आकाशांतून पटते; पण ईश्वराचें

स्वरूप मला कळत नाहीं असें कवि 'अज्ञात'मध्यें सांगतो आणि शेवटीं अशी शंका घेतो कीं, सारे मानव ज्याचा शोध करतात तो ईश्वर सत्य आहे कीं मृगजळाप्रमाणें मिथ्या आहे ? तो कसाहि असला तरी मानवाची प्रगतीच करीत आहे असा विश्वास कवीला वाटतो. तो म्हणतो, " गिरीदरीचीं गहन भव्यता । चरणखुणा तव त्यांत शोधतां । लोहमार्ग त्यांतून धडाडत धूर भरे गगनांत । अससी सतत मला अज्ञात ॥ अथांग नीलामधून वरती । तुझ्या स्मितार्चीं कमलें फुलतीं । कृष्ण घनांचे ग्रासति कुंजर तोंच तयां निमिषात् । अससी सतत मला अज्ञात ॥ अससि कुठें तूं–अखंड मानवयात्रा तुज शोधते । अथवा अससी मृगजल, परि जें प्रगतिपथीं ओढतें ! ॥ "

'पाउलचिन्हें' मध्येंहि असाच संशयवाद कवि प्रगट करतो, तो असा–'गवसे न किनारा, फिरे जरी दर्यांत । शत शतकामधुनी शिडें उभारुन नाव ! स्मित करुन म्हणाल्या मला चांदण्या कांहीं, । तो मुक्त प्रवासी फिरत सदोदित राही । उठतात तमावर त्यार्चीं पाउलचिन्हें–। त्यांनाच पुससि तूं, आहे कीं तो नाहीं ? "

भक्तीचें आधुनिक स्वरूप

याच भावनेचा सुंदर विस्तार 'मी काय तुला वाहूं' या रसार्द्र काव्यांत कुसुमाग्रजांनीं केला आहे. हें सारेंच काव्य म्हणजे एक उदात्त-रम्य भाव-गीत आहे, भक्ति–गीत आहे, संत–वचन आहे. कवीला पेंच असा पडला आहे कीं, " मी काय तुला वाहूं-तुझेंच अवघें जीवित-वभव । काय तुला देऊं ? नक्षत्रांच्या रत्नज्योती । तुझिया ओटीवर झळ-झळती । दीप रवीचे घरिं, तुजपुढती–। वात कशी लावूं ?॥" सूर्यनक्षत्रांच्या धन्यापुढें वाती काय लावाव्या ? तसेंच समुद्राचा स्वामी असणाऱ्या ईश्वराला पाण्यानें स्नान कसें घालावें ? " सागर सारे तव बागेंतिल । तृण-

पर्णावर जमलेलें जल । देवबिंदूचें, शिंपुनि ओंजळ । घालुं तुला न्हाऊं ?।" जगांतील सारी पुष्प–सृष्टि ज्याच्या मुठींत, त्याला कंळी वहावी कशी ? " चतुर फुलारी वसन्त फुलवित । तुजसाठीं सुमसंचय अगणित । कशी लाजरी अर्धसुगंधित । कळी करीं घेऊं ? ॥ " आणि ईश्वराला वस्त्र तरी कोणतें अर्पण करावें ? चंद्रानें आकाशाचा पट त्याचेसाठीं विणलेला आहे ना ? " झुलती तव सदनाच्या द्वारीं । सांज उषेचे पट जरतारी । विणतो विधु अंबर चंदेरी । वसन कुठें पाहूं ?" आणि ईश्वराचे अलंकार इंद्रधनुष्याचें कंकण ? त्याच्या हातांत आहे व शुक्रासारखा हिरा गळ्यांत लकाकत आहे. " अलंकार तुज शोधूं कोठुन ?। शुक्र तुझ्या कंठांतिल भूषण । इंद्रधनूचें सुरम्य–कंकण । शृंगारित बाहूं ! ॥ "

पण आहे, एक वस्तु मात्र खास माझी आहे, ईश्वराला अर्पण करण्याजोगी आहे. ती म्हणजे प्रेमपूर्ण अश्रु – सर्व मानवाबद्दल वाटणाऱ्या सहानुभूतीचा अश्रु ! कवि म्हणतो, " एकच आहे माझी दौलत । नयनीं जो हा अश्रु तरंगत । मानवतेचें ज्यांत मनोगत । तोच पदीं वाहूं ?॥ " ईश्वराच्या अगाध महिम्याचें व मानवाच्या कोमल भक्तिभावनेचें हें आधुनिक स्वरूप किती हृदयंगम आहे.

वक्रोक्तीनें टीका

त्या पारतंत्र्याच्या काळांत परक्या सरकारच्या क्रौर्याला उघड नांवें ठेवणें हि धोक्याचें होतें. म्हणून प्रा. शि. म. परांजपे यांच्याप्रमाणें वक्रोक्तीचा आश्रय करून कुसुमाग्रजांनीं 'मेघांची सेना' वर्णन केली आहे आणि त्यांत ग्रीष्माचे रूपानें सरकारवर टीका केली आहे. ती अशी, " सार्वभौम हा ग्रीष्म बलोद्धत । चराचरांला सुटला जाळित । अग्निपाश करकचून करतो धरणीची दैना ! चालली मेघांची सेना ! ॥

अशाच व्यंजनापूर्ण स्वरानें कवि 'मेघास' म्हणतो, " गर्जत ये ओढित

ये आसुड तडिलेचा । गर्वोन्नत माथा तो नमवे भास्कराचा । लोकाग्रणि नमवि जसा मातल्या नृपाळा ।" उपमान व उपमेय यांची अदलाबदल करून, कवीनें आपला भावार्थ किती कौशल्यानें प्रगट केला आहे!

अशाच लक्षणेनें मदांध साम्राज्यशाही व ध्येयनिष्ठ स्वातंत्र्य-लालसा यांचें द्वंद्व कवीनें 'अहि-नकुल' या काव्यांत प्रभावी व ओजस्वी शब्दांनीं रंगविलें आहे. विषारी नाग जमिनीवरून चालला म्हणजे त्याचे परिणाम काय होतात हें कवि पुढीलप्रमाणें सांगतो, "मार्गावर याच्या लवत तृणाचीं पातीं । पर्णावर सुमनें मोडुनि माना पडतीं । थरथरतीं झुडुपें हादरती नववेली । जणुं गुलाम सारे या सम्राटापुढती !"

सम्राटाला साप म्हणण्याऐवजीं सापाला 'सम्राट' म्हणून कवीनें संबोधलें आहे. त्या नागाची ऐटदार गति पहा—"चालला पुढें तो-काय ऐट ! आनंद !। अग्नीचा ओघळ ओहळतो जणुं मंद, । टाकली यमानें कट्यार वा कनकाची । चालली बळींचा वेध घेत ही धुंद ! ॥ चालला पुढें तो लचकत मुरडत मान, । अवतरे मूर्तिमान मल्हारांतील तान ! । चांचल्य विजेचें, दर्याचें गांभीर्य । चालला मृत्युचा मानकरीच महान !"

पण या मृत्यूच्या मानकऱ्याचाहि मृत्यु मुंगुसानें घडविला आणि 'वाऱ्यापरि गेला नकुल वनांतुनि दूर.' १९३८ सालीं कुसुमाग्रजांच्या अशा राष्ट्रीय आकांक्षा फुलविणाऱ्या कविता सहृदय वाचकांना किती आशापूर्ण वाटल्या असतील !

ध्येयनिष्ठेचें गौरव-गीत

आणि कवीचें भविष्य १९४७ सालीं साकार झालें. राष्ट्राला स्वातंत्र्य लाभलें. स्वतंत्र भारताच्या तिरंगी ध्वजाचा कवीला केवढा अभिमान ! त्या ध्वजांतील 'निळें चक्र' हें हें प्रतीक घेऊन कवि आनंदानें गातो—

" धरतीच्या जखमी हृदयांतिल । सुफलित स्वप्नें इथेंच होतिल । रक्षित मानव्याची दौलत । जागवुनी जागेल ॥ नक्षत्रांच्या दिव्य पथांतुन । इंद्रधनुष्याच्या वेशींतुन । निळे चक्र हें जाइल, जेथें । जगत नवें उमलेल!" अशा अपार आशावादानें व असीम अभिमानानें कुसुमाग्रजांचें काव्य फुललेलें आहे.

चतुर ब्रिटिश सरकारच्या सात पहाऱ्यांतून एकदम गुप्त होऊन स्वातंत्र्याचा अमृतकुंभ आणण्यासाठीं देशांतरीं भरारी मारणाऱ्या सुभाषबाबूंना ' सुवर्ण-गरुडा ' या सूचक नांवानें संबोधून कुसुमाग्रज अशी विशाल कल्पना करतात, " घन रात्रींत जैसा घुसतो अग्नीशर । तिमिरावर फुलवित तेजाचा मोहर । अमरत्वाच्या सारंगीवर । छेडूनिया तात । काळ होऊनी शाहिर गाइल । तव गौरव-गीत ॥ "

संकटांची तमा न बाळगतां आपलें उद्दिष्ट निश्चयानें हस्तगत करूं पहाणाऱ्या ध्येयनिष्ठ मानवांचा प्रातिनिधि म्हणून कवीनें कोलंबस निवडला आहे. ' कोलंबसाचें गर्व-गीत ' या काव्यांत तो ध्येयनिष्ठ निर्धाराचे उद्गार काढतो, ते असे—" काय सागरीं तारुं लोटलें परताया मागें । असे का हा आपुला बाणा । त्याहुन घेऊं जळीं समाधी सुखें, कशासाठीं । जपावें पराभूत प्राणा ॥ कोट्यावधी जगतांत जिवाणू जगती अन् मरती । जशीं तीं गवताचीं पातीं, । नाविक आम्ही परंतु फिरतों सात नभाखालीं ! निर्मितों नव क्षितिजें पुढतीं ! " समुद्र, त्याचा किनारा, त्यावरील वादळें, त्यांतून दिसणारा दीपस्तंभ, त्यांतील आशेची वात—यांचीं वर्णनें सुमाग्रजांच्या काव्यांत वारंवार येतात. त्या सर्वांतून अदम्य आशावाद व अढळ ध्येयनिष्ठा यांचाच संदेश ऐकूं येतो. तो असा—" चला उभारा शुभ्र शिडें तीं गर्वानें वरतीं । कथा या खुळ्या सागराला । " अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा । किनारा तुला पामराला ।"

कल्पनेंतील नावीन्य

कुसुमाग्रजांची कल्पकता भव्य आहे. तिच्यांत नावीन्याचें तेज झळाळत आहे. ती बहुविध रूपें धारण करूं शकते. आधुनिक युगांतील एक चमत्कार म्हणजे जगाच्या कोनाकोपऱ्यांतील वृत्तें व गीतें ऐकविणारा रेडिओ. त्याच्या 'आकाशित लहरी' वरून काय काय कानीं पडतें हें सांगतांना कवि म्हणतो, "दूरदूरचीं ऐकिव नगरें ! अज्ञाताच्या अथांगतें-तुन । लुटून दौलत भरुन तारवें । येत पऱ्या या शिडें उभारुन । सान दिव्यांचें छोटें बंदर । सुवर्णनौका तिथें विसावुन । येत किनाऱ्यावरील घेउन भरलेले घट शिरीं ॥ " रेडिओंतील ध्वनीच्या लहरी म्हणजे पऱ्या आहेत आणि त्या देशोदेशींच्या दौलतीनें भरलेल्या घागरी डोक्यावर घेऊन घरोघर येत आहेत अशी मनोहर कल्पना कवीनें केली आहे. रेडियोवरून युद्धाच्या वार्ता येतात, त्यांना उद्देशून कवि म्हणतो, "फुलवित येती कुणी अग्निकण । ज्यांत उद्याचें भरे रणांगण । परि अवघ्यांची एक मनीषा-नक्षत्रांच्या निळ्या पथांतुन । व्योमनदीच्या जलांत न्हाउन । चंद्रकरांना वाट विचारित । करावयाला बोधन रंजन । यावें माझ्या घरीं । आल्या आकाशित लहरी ! "

उत्प्रेक्षांची माला

रेडियोसारखा नव्यांतला नवा विषय ज्या कवीच्या कल्पकतेला खाद्य पुरवूं शकतो; त्याला ताजमहालासारखें अमर सौंदर्याचें प्रतीक हा काव्याचा विषय कां न वाटेल ? त्या प्रेमगर्भ व सौंदर्य-सिंचित कलाकृतीवर आपल्या कल्पनेची रुंजी घालण्यांत कैक कवींची प्रतिभा रमली आहे-थकलीहि आहे. कुसुमाग्रज आपल्या कल्पनेच्या ताना घेऊन त्या कलामूर्तीचें गुण--गान पुढील उत्प्रेक्षांनीं करतात, " वर पूर्ण चंद्रमा पसरी मायाजाल । वसुधेच्या वदनीं लहरे हास्य सलील । तें समूर्त होउन

तीरावर यमुनेच्या । हिमशुभ्र उभा हा संगमावर विशाल ॥ काव्य मनोहर, हो रचनेंत बहार । यमकांपरि गमती भव्य समान मिनार । वर विहग कल्पना कलानंद बेहोष । ताळि समाधिस्थ हो पण कारुण्य अपार ॥ कीं, ब्रह्मांडाच्या अथांग या कासारीं । ग्रहनक्षत्रांचीं फुललीं कमलें सारीं । या भू--पद्माच्या एक पाकळी वरती । हा थेंब दवाचा विलसे विमल रुपेरी ॥ ''

हा शुभ्र ताजमहाल म्हणजे पृथ्वीचें हास्य आहे कीं सृष्टीचें काव्य आहे कीं कमळावरील दंवबिंदु आहे ? अशा उत्प्रेक्षामागून उत्प्रेक्षा करून कवीला शेवटीं असा विचार सुचतो कीं, विलासी शहाजहाननें किती ' असत्य प्रणय ' केले असतील आणि आपल्या ' हीन देहलालसें 'साठीं कैक अबलांवर अत्याचार केले असतील ?

नाशिककडील द्राक्षांच्या बागांचें वर्णन कवीनें ' मायदेशचा वारा '-मध्यें केलें आहे, तें कल्पनामधुर आहे. हिरवीं वस्त्रें नेसलेल्या वेगळ्यांत मोत्यांचे हार घातलेल्या पऱ्यांप्रमाणें द्राक्षांच्या वेली दिसतात अशी उत्प्रेक्षा करून कवि म्हणतो, '' द्राक्षांचे बहरत बाग मनोहर जेथें । त्या सुनीत वेली रांग पऱ्यांची गमते । लेऊन उभ्या जणु हिरव्या नव वसनातें । कटिकंठावरती वरती मौक्तिकहारा । हा काय माझिया मायदेशचा वारा ॥'' तसेच पानमळे. त्यांचें चित्र कवीनें पुढीलप्रमाणें रेखाटलें आहे—'' ते नागवेलिचे मांडव शीतल शांत । विश्रांतिच जेथें झालेली विश्रांत । विहिरीवर नादेल सुरेल जीवनगीत । काळींत वाहती संथ रूपेरी धारा । हा काय माझिया मायदेशचा वारा ! ''

विजेवर चालणारी व ' पोलादी पथ ' तुडविणारी आगगाडी वेगानें धांवत असलेली पाहून कवीच्या मनांत ज्या कल्पना उसळतात, त्या ' वेगवती 'मध्यें त्यानें पुढीलप्रमाणें मांडल्या आहेत—'' कुद्ध काय हें

तुफान धावत । मदांध जलदीच्या लाटांवर, । तडितेचा कडकडतो आसुड दुभंगुनी तिमिरांकित अंबर !" समुद्राच्या लाटा व विजेचे आसूड हीं उग्र दृश्यें कुसुमाग्रजांचे लाडकें विषय दिसतात.

उपहासाची तीक्ष्णता

युद्धांतील भीषणता व क्रूरता यांचें वर्णन उपरोधाचा आश्रय करून कवि 'फेरीवाला' या कवितेंत करतो. फेरीवाला आनंदानें हाका देत म्हणतो, "अमोल माझा माल, नको धन । रक्तमांस हें स्वस्त चाललें । खुशाल या लुटण्याला ! आला आला फेरीवाला ! ॥ हा घट देखा, यांतिल शोणित । मेलें तरि अद्यापि उघाणत । उमद्या युवकांचें हो जीवित । रणांगणावर पिळून त्याचा । घट ताजा हा भरला । आला आला फेरीवाला ॥" तरुण मर्दांचें रक्त वायां चाललें ! तसेंच कोमल अबलांच्या डोळ्यांतील अश्रु ! "कुपींत या भरलें जल कोमल । अगणित अबलांच्या नेत्रांतिल ॥"

बाँब हल्ल्यांत बेचिराख झालेल्या घराघरांत प्रेमळ जोडप्यांची राख झाली ! "मंजुषेंत या राख मनोहर । उदात्त सोज्ज्वळ नैतिक नागर ! आग बरसतां सुखी घरांवर । मिठ्या मारुनी गळ्यांत जळले । त्याचा मिश्रित काला । आला आला फेरीवाला ॥ सहज बोट राखेतुन सारा । गृहसौख्याचा गोड उबारा । गुंतुन राहे आंत बिचारा ! अदग्ध आशांचे काळे कण । लागति अजुनी कराला ! आला आला फेरीवाला !" आणि युद्धाच्या संहारक शक्तीचा दुष्टपणा तीव्रतेनें दाखविण्यासाठीं तरुणांचें रक्त व अबलांचे अश्रु यांच्या जोडीला कवीनें बालकांच्या ललाटरेषाहि आणल्या आहेत. "जुनावट अथवा प्रौढ नको का ? । ही घ्या दुसरी संदुक देखा, । बाळजिवांच्या ललाटरेखा । फुलण्यापूर्वीं फुटलेल्या हा मिळतो माल कुणाला ? । आला आला फेरीवाला ! ॥" यापेक्षां

कोणत्या कडक शब्दांनीं या संहारक शक्तींचा पाशवीपणा रंगवितां येईल? हिंदुस्थानची फाळणी झाली आणि मानवांतील पशुता मोकाट सुटली. वाघलांडग्यांना लाजविणारे अत्याचार बंधुबंधूंनीं केले. स्त्री पाहिली नाहीं, मूल पाहिलें नाहीं, सर्वांची ससेहोलपट झाली. त्या भीषणतेचें स्पष्ट चित्र दाबलेल्या रागानें व कोंडलेल्या चिडीनें कवीनें येथें काढलें असावें.

'सैगल' या चित्रपट–नटाचा गौरव करतांना "घडिभर जागव रे-अमुची अशीच मानवता' असें ते म्हणतात. "अशीच मानवता" जागवणारे स्फूर्तिशाली व ओजस्वी कवि ते स्वतः आहेत. यापुढें त्यांच्या प्रति, मेचे नवेनवे पैलू दृष्टीस पडतील अशी महाराष्ट्रीय रसिकांची अपेक्षा आहे. म्हणून कवि बोरकरांच्या सुरांत सूर मिसळून ते रसिक विनवितात, "नव्यानें गा रे कुसुमाग्रजा!"





प्रमुख संदर्भ-ग्रंथ

१. महाराष्ट्र सारस्वत–वि. ल. भावे

२. मराठी वाङ्मयाचा इतिहास–ल. रा. पांगारकर

३. मराठी साहित्याचें समालोचन–वि. सि. सरवटे

४. अर्वाचीन मराठी साहित्य–वि. पां. नेने

५. अर्वाचीन मराठी वाङ्मय-सेवक–गं. द. खानोलकर

६. पांच संत-कवि–शं. गो. तुळपुळे

७. स्वभाव-लेखन–पु. ग. सहस्रबुद्धे

८. लघुकथालेखन–ना. सी. फडके

९. हास्य-विनोद-मीमांसा–न. चिं. केळकर

१०. केळकर–चरित्र आणि वाङ्मय–मा. का. देशपांडे

११. मुक्तात्म्यापासून प्रमद्वरेपर्यंत–रा. शं. वाळिंबे

१२. आधुनिक कवि–पंचक–ग. त्र्यं. माडखोलकर

१३. मराठी साहित्याची रूपरेषा–वि. पां. दांडेकर

१४. मराठी वाङ्मयाचा परामर्श–गं. भा. निरंतर

१५. मराठी ग्रंथ–सूचि–शं. ग. दाते

शिखरे-वाङ्मय

चरित्रें

म. गांधींचें चरित्र
गांधी–जीवन–कथा
राष्ट्र–पिता गांधीजी
गांधी–रण–गीता
राष्ट्र–जनक टिळक
लोकमान्य टिळक
सुधारकाचार्य आगरकर
डॉ. राधाकृष्णन

प्रबंध

गांधीजींचें रामराज्य
साम्राज्य व स्वराज्य
सर्वश्रेष्ठ हिंदुधर्म
आजकालचे साहित्यिक

कादंबरी

थोरली आई
आईची कृपा
भावनांचा नाच
जिवलग

नाटकें

वैष्णवजन
आठ साल

लघुकथा

क्रांति–किरण
गंगेचे थेंब